# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २०/१/२०१०

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/१/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

(१)

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक २०/१/२०१० रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर —— श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र

२. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३८ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३९ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ५ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४० | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ६ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४१ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ७ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४२ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ८ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४३ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ९ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४४ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १० | श्रीमती निर्मले विद्या विजय | ४५ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४६ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४७ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १३ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४८ | श्री. शेखर केशव यादव |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४९ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५० | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १६ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५१ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १७ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५२ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १८ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५३ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १९ | श्री. राजू जग्यासी | ५४ | श्री. किशोर जग्यासी |
| २० | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५५ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २१ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५६ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २२ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५७ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २३ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ५८ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २४ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ५९ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २५ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २६ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६१ | श्री. मोहन साधवाणी |
| २७ | श्री. लाल पंजाबी | ६२ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २८ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६३ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २९ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६४ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| ३० | श्रीमती शकुंतला पाटील | ६५ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३१ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६६ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३२ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६७ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३३ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६८ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३४ | श्री.एडके गणपत गोविंद | ६९ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३५ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ७० | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३६ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ७१ | श्री. प्रकाश गणपत सावंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ३७ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | ७२ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| | | ७३ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. गायकवाड दिलीप, २. श्रीमती संगीता राजेश कंडारे, ३. श्रीमती जया प्रकाश माखीजा, ४. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ५. श्री. कुमार आयलानी, ६. श्री. मोहन (गारो) रामरख्यानी, ७. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), ८.श्री. राजेश नानीकराम वधारीया

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
२. श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. विजयकुमार मसाळ, उप–आयुक्त
४. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
५. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त
६. श्रीमती संगिता धायगुडे, उप–आयुक्त, आरोग्य
७. डॉ.जी.टी.जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
८. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा परिक्षक
९. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
१०.श्री. जवादे, शहर अभियंता
११.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१२.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, साबांवि
१३.श्री. सेलवन, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
१४.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१५.श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१६.श्री. कुमार जग्यासी, उप अभियंता, कर
१७.श्री. के.एन. म्हात्रे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
१८.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१९.श्री. अभिजित महामुलकर, प्रोग्रामर, नासुके
२०.श्री. संतोष लोणे, उप अभियंता, नासुके
२१.श्री. गवारी, प्र.प्रभाग अधिकारी
२२.श्री. उदय लिमये, मुख्य लिपिक, साप्रवि
२३.श्री. विशाल कदम, वरिष्ठ लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती नर्गिस खान

दुपारी ३.२० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u>४.०० वाजताची सभा सुध्दा आताच स्थगित करायची आहे ना? तर त्या अगोदर मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, आयत्यावेळचा एक गोषवारा यापुर्वीच आपणांस प्रस्तृत करण्यात आलेला आहे त्याच बरोबर पाच लक्षवेधी सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यांवर निर्णय घेवुन नंतरच सभा स्थगित केली जावु शकेल. आयत्यावेळचा जो विषय आहे तो मी वाचुन दाखवितो.

**विषय:–** उल्हासनगर महापालिकेच्या परिवहन सेवेसाठी उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील १ कैलास कॉलनी, २ हॉटे ऍम्ब्रॉसीयाच्या बाजूला, विठ्ठलवाडी स्टेशन जवळील ३, उल्हासनसगर रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेकडील जागा मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना तात्पुरता जागा वापर परवाना देण्यास मान्यता देणे.

हा विषय सभेच्या कामाकाजात सामावुन घ्यायचा आहे की याबाबत कुणाची काही हरकत आहे?

<u>काही सदस्य :-</u>हा विषय सभेच्या कामकाजात सामावुन घ्या.

<u>महापालिका सचिव :-</u>सर्व संमतीने?

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:-</u>नाही, नाही कुणाची काही हरकत नाही.

<u>महापौरः—</u>सदरहु विषय कार्यसूचीवर समाविष्ट करुन घेण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आह. 

---

**विषय** :— आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेणे बाबत

सूचकाचे नांव :—श्री. बी.बी. मोरे

अनुमोदकाचे नांव :—श्री. प्रशांत धांडे

<u>महासभा ठराव क्र. :— ५८ ई</u> <u>दिनांक : २०/१/२०१०</u>

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील विषयास या सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

**विषय** :— उल्हासनगर महापालिकेच्या परिवहन सेवेसाठी उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील १ कैलास कॉलनी, २ हॉटे ऍम्ब्रॉसीयाच्या बाजूला, विठ्ठलवाडी स्टेशन जवळील ३, उल्हासनसगर रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेकडील जागा मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना तात्पुरता जागा वापर परवाना देण्यास मान्यता देणे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिवः—</u> लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत श्री. सुरेश जाधव व अनुमोदक आहेत श्री. किशोर जग्यासी

**विषय** :— शहरात होत असलेल्या अनाधिकृत बांधकामाबाबत लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत श्री. जमनादास पुरस्वानी व अनुमोदक आहेत श्री. तुलसीदास वसिटा

**विषय** :— जन्म—मृत्युचा दाखला मिळणेस दिरंगाई तसेच मालमत्ता कराचा भरणा केल्याशिवाय जन्म दाखला देवू नये याबाबत लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सुचना क्र. ३ जीचे सुचक आहेत श्री. प्रशांत धांडे व अनुमोदक आहेत श्री. सुरेश जाधव

**विषय** :— जकात नाका मेसर्स कोनार्क कंपणीला कोणत्या अधिकारान्वये देण्यात आल्या याबाबत लक्षवेधी सूचना.

लक्षवेधी सुचना क्र. ४ जीचे सुचक आहेत श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

**विषय** :— सर्व्हे नं. ५८, मौजे म्हारळ, उमपा जकात नाका नं. ५ मागे, उल्हासनगर—१ येथे भुखंडावर मुस्लीम कब्रस्तान दफनभुमी उमपा/नरवी/सजा/६०, दिनांक २९/१२/०९ रोजी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रशासनाने सदर भुखंड हस्तांतरण करण्यास केलेल्या मागणी विरोधात लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सुचना क्र. ५ जीचे सुचक आहेत श्रीमती मिनाताई सोनेजी व अनुमोदक आहेत श्री. प्रशांत धांडे

**विषय** :— महासभा ठराव क्र. ३१, दिनांक २९/६/२००७ मध्ये अंशत: बदल करण्याकरीता आयत्यावेळचा विषय म्हणून येत्या महासभेत ठेवण्याबाबत लक्षवेधी सूचना

या पाच लक्षवेधी सूचनांपैकी तीन लक्षवेधी सूचना संबंधीत लक्षवेधीचे सूचक यांनी मागे घेतल्या आहेत. श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. प्रशांत धांडे, श्रीमती मिनाताई सोनेजी यांच्या लक्षवेधी सूचना मागे घेण्यात आल्या आहेत. बाकी राहिल्या दोन लक्षवेधी सूचना त्यापैकी सुरेश जाधव यांची लक्षवेधी सूचना आहे. तिचा विषय याप्रमाणे आहे.

**विषय** :— शहरात होत असलेल्या अनाधिकृत बांधकामाबाबत लक्षवेधी सूचना

व दुसरी जी लक्षवेधी सूचना आहे ती श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांची आहे तिचा विषय याप्रमाणे आहे.

**विषय** :— सर्व्हे नं. ५८, मौजे म्हारळ, उमपा जकात नाका नं. ५ मागे, उल्हासनगर—१ येथे भुखंडावर मुस्लीम कब्रस्तान दफनभुमी उमपा/नरवी/सजा/६०, दिनांक २९/१२/०९ रोजी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रशासनाने सदर भुखंड हस्तांतरण करण्यास केलेल्या मागणी विरोधात लक्षवेधी सूचना

या लक्षवेधी सूचना दाखल करुन घेण्याबाबतीत मा. महापौरांनी निर्णय घ्यायचा आहे. मा. महापौरांनी दोन्ही लक्षवेधी सूचना स्विकृत करुन दाखल करुन घेतल्या आहेत.

<u>महापौर :—</u> सदरच्या दोन्ही लक्षवेधी सुचना स्विकृत करण्यात येत आहेत.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u>कर्मचा—यांच्या रोजंदारीवरील सेवेसंदर्भात आयत्यावेळीच्या विषयान्वये जो विषय येणार होता त्याचे काय झाले? इतर सर्व विषय सभागृहापुढे येतात. हाच विषय सभागृहापुढे का येत नाही?

<u>महापालिका सचिव :—</u>तो विषय सभागृहापुढे आणण्यात आलेला नाही.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—कर्मचा—यांच्या बाबतीतील जो विषय आहे त्याबाबतीत महासभा वारंवार प्रशासनास निर्देश देत असतांनाही त्याबाबतीत कार्यवाही का होत नाही?

महापालिका सचिव :—त्याबाबत प्रशासनाचे म्हणणे असे आहे की, ४ चटईक्षेत्र निर्देशांकाबाबतीत एक विषय आहे, व विकास आराखडा तयार करण्यासाठी नगरचना अधिकारी नियुक्ती करण्यासाठी एक विषय आहे. या विषयांबरोबर कर्मचा—यांच्या रोजंदारी सेवेविषयीचा विषय विशेष महासभेत घेण्यात येईल.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—इतर विषय पारीत होतात. परंतु कर्मचा—यांविषयीचा जेव्हा कधी विषय येतो तेव्हा पुढील महासभेत, पुढील महासभेत असे सांगितले जाते व टाळले जाते.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—मा. आयुक्त साहेब, मागील वेळेस तुम्ही महासभेत सांगितले होते की, पुढच्या महासभे अगोदर मी हा विषय निर्णयीत काढुन देतो म्हणुन. तो विषय तुम्ही अजुनही निर्णयीत काढलेला नाही.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—प्रशासन महासभेस दुर्लक्षीत करीत आहे. वारंवार निर्देश देवुनही प्रशासन लक्ष देत नाही.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, प्रस्ताव तयार आहे, मी म्हटले आचारसंहिता चालु असल्यामुळे हा विषय काही घेवु नका. मी आणतो आहे तो विषय.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—कर्मचा—यांच्या संबंधीत जेवढे काही विषय आहेत ते पुढील महासभेत आणले जावेत.

महापालिका सचिव :—दोन लक्षवेधी सूचना व आयत्यावेळचा एक विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेतला आहे. आता ही सभा जेव्हा पुढील सूचनेनंतर होईल त्या सभेत या दोन्ही लक्षवेधी सूचना व आयत्यावेळचा विषय घेतला जाईल.

काही सदस्य :—सभा स्थगित करा.

महापौर:—ही सभा स्थगित करण्याच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी
अनुमोदकाचे नाव :—श्री. बी.बी. मोरे

स्थगित प्रस्ताव

ठाणे जिल्हयातील भिवंडी विधान सभा मतदार संघात पोट निवडणूकीची कार्यवाही आहे त्यामुळे संपुर्ण ठाणे जिल्हयात आदर्श आचारसंहिता लागु करण्यात आली असून सदरची आचारसंहिता दिनांक २४ जानेवारी, २०१० रोजी संपृष्टात येणार आहे. यासाठी आज दिनांक २०/१/२०१० रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित केलेली ही सभा दिनांक २४/१/२०१० नंतर घेणे संयक्तीक ठरेल. यासाठी या सभेचेकामकाज पुढील सचूना देईपर्यंत स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ५८ के** | **दिनांक : २०/१/२०१०**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २०/१/२०१० रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभचे कामकाज पुढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** कृपया राष्ट्गिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी ३.२५ वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— ११/२/२०१०

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ११/२/२०१० रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

## ९—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक २०/१/२०१० रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. परंतु सदरची सभा स्थगित केल्यानी ती सभा गुरुवार दिनांक ११/२/२०१० रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर —— श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र

२. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३६ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३७ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३८ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३९ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४० | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४१ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४२ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४३ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४४ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १२ | श्रीमती निर्मले विद्या विजय | ४५ | श्री. शेखर केशव यादव |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४६ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४७ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १५ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४८ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४९ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५० | श्री. किशोर जग्यासी |
| १८ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५१ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५२ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २० | श्री. राजू जग्यासी | ५३ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २१ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५४ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २२ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५५ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २३ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५६ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २४ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ५७ | श्री. मोहन साधवाणी |
| २५ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २६ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५९ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २७ | श्री. लाल पंजाबी | ६० | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २८ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६१ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २९ | श्रीमती शकुंतला पाटील | ६२ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३० | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६३ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३१ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६४ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३२ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६५ | श्री. पाटील प्रधान धर्मा |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ६६ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३४ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | ६७ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३५ | श्री. कुमार उत्तमचंद आयलानी | ६८ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी, २. श्री. राम (चार्ली) पारवानी, ३. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ४. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ५. श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास, ६. श्री. सुखरामानी महेश पहलाजराय, ७. श्री.एडके गणपत गोविंद, ८. श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा, ९. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे, १०. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, ११. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), १२. श्री. सुनिल साहेबराव गंगवानी, १३. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
२. श्री. विजयकुमार मसाळ, उप—आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
५. श्रीमती संगिता धायगुडे, उप—आयुक्त, आरोग्य
६. श्री. अ.पा. गुरगुळे, नगररचनाकार
७. श्री. सी.पी. सिंग, सहा. संचालक, नगररचनाकार
८. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
९. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा परिक्षक
१०.डॉ. जी.टी. जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
११.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१२.श्री. अली, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
१३.श्री. सेलवन, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
१४.श्री. रमेश शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य
१५.श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१६.श्री. के.एन. म्हात्रे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
१७.श्री. बाजीराव जाधव, प्र.प्रभाग अधिकारी
१८.श्री. उदय लिमये, मुख्य लिपिक
१९.श्री. अभिजीत महामुलकर, प्रोग्रामर, नासुके
२०.श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ५.१८ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

यावेळी सांयकाळचे ५ वाजुन १८ मिनिटे झाले आहे.

महापालिका सचिव :—प्रश्न क्र. २१६ हा श्री. राजेश वानखेडे यांचा आहे.

? **प्रश्न क्र. २१६ :—** उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. ४ अंतर्गत मागील एक वर्षापासून श्री. भदाणे यांनी प्रभाग अधिकारी पदाचा कार्यभार स्विकारला प्रभाग समिती क्र. ४ अंतर्गत किती अनधिकृत बांधकामे करण्यात आली? त्यापैकी किती अनधिकृत बांधकामांना नोटिसा बजावणेत आल्या? किती अनधिकृत बांधकामे बेकायदेशीर ठरवून तोडण्यात / निष्कासित करण्यात आली? निष्कासित करण्यात आलेल्या बांधकामांचे ठिकाणी परत नव्याने बांधकाम करण्यात आले आहे का? श्री. भदाणे यांनी प्रभाग अधिकारी म्हणून काय कारवाई केली? का कारवाई न करता फक्त वसूली केली? याबाबत महासभेत चर्चा होवून सुचक, समाधानकारक, सविस्तर माहिती मिळावी.

उत्तर :— उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र ४ अंतर्गत श्री. भदाणे यांनी फेब्रुवारी २००९ पासून प्रभाग अधिकारी पदाचा कार्यभार स्विकारला आहे त्यानुसार

अ) प्रभाग समिती क्र ४ मध्ये एकूण ११७ अनधिकृत बांधकाम आढळून आलेली आहेत.

ब) त्यापैकी सर्वच बांधकामांना नोटीसा देण्यात आलेलया आहेत.

क) प्रभाग समिती मध्ये आढळून आलेली सर्वच अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहेत.

ड) निष्कासित करण्यात आलेल्या बांधकामांचे ठिकाणी परत नव्याने बांधकामे करण्यात आलेली आढळून आलेली नाहीत.

इ) श्री. भदाणे यांनी प्रभाग अधिकारी म्हणून हा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार २००५ नंतर होणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार निष्कासनाची कारवाई केलेली आहे.

सदस्य श्री. राजेश वानखेडे :— आयुक्त साहेब, मी श्री. भदाणे यांच्या विरोधात जो प्रश्न विचारला आहे, त्यांनीच मला येथे उत्तर दिले आहे. मला तुमच्याकडुन उत्तर हवे होते.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—मला तर असे वाटते की, उल्हासनगर महानगरपालिकेचे नाव श्री. भदाणे महापालिका ठेवले जावे. स्वत: त्यांनी कसे प्रश्नाचे उत्तर दिले आहे?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—मा. महापौर महोदया, आपले ठरले होते की, श्री. भदाणे आल्यानंतर चर्चा करु. तोपर्यंत हा प्रश्न प्रलंबित ठेवु या.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—आयुक्त साहेब, हसण्यासारखी गोष्ट आहे, या सदस्याने प्रश्न विचारला आहे कुणाला? एका चोरासंबंधी. चोरानेच उत्तर दिले आहे स्वत:संबंधीच्या प्रश्नाचे. हे काय चालले काय आहे हे? प्रश्न आपणांस विचारलेला आहे आपण उत्तर दिले पाहिजे. श्री. भदाणेच्या विरोधातील प्रश्न आहे आणि श्री. भदाणेच उत्तर देत आहे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—उल्हासनगर महानगरपालिकेचे श्री. भदाणे महापालिका असे नाव ठेवले जावे. जर असेच चालले तर.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—प्रश्न ज्या विभागाशी संबंधीत असतो त्या त्या विभागाचे संबंधीत अधिकारी उत्तर देतात. तो प्रश्न श्री. भदाणेच्या विभागाशी सबंधीत असेल. तुम्हांला संशय असेल तर मी उत्तर देतो सुधारीत. जर तुम्हांला माझ्याकडुन उत्तर हवे असेल तर मी उत्तर देतो. पाहिजे तर हा प्रश्न पुढच्या सभेला ठेवतो.

सदस्य श्री. राजेश वानखेडे :—ही जी ११७ अनाधिकुत बांधकामे आढळुन आलीत, ती तोडली म्हणुन सांगितली आहे. ही खरी गोष्ट आहे का? हे उत्तर खरे आहे का?

<u>**सदस्य श्री. किशोर जग्यासी :**</u>—मा. आयुक्त साहेब, कल्याण महानगरपालिकेची महासभेस एकवेळ आपण उपस्थित रहा. आपणांस माहित पडेल, प्रश्न ज्या विभागाचा असतो त्या विभागाचा संबंधीत अधिकारी उत्तर देत असतो. आयुक्त महासभेत बोलत सुध्दा नसतात. मात्र येथे प्रत्येक विभागाच्या अधिका—याशी संबंधीत प्रश्नाचे उत्तर आपण देता.

<u>**सदस्य श्री. राजेश वानखेडे :**</u>—साहेब, तुम्ही अजुन मला उत्तर दिले नाही.

<u>**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):**</u>—श्री. भदाणे आल्यानंतर उत्तर देवु तोपर्यंत हा प्रश्न प्रलंबित ठेवु या.

<u>**सदस्य श्री. राजेश वानखेडे :**</u>—तोपर्यंत हे उत्तर खोटे आहे असे समजु?

<u>**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):**</u>—जे उत्तर दिले आहे ते उत्तर सत्य आहे.

<u>**सदस्य श्री. राजेश वानखेडे :**</u>—सत्य आहे तर तुम्ही एक पत्र दिलेले आहे, मग ते खोटे असेल?

<u>**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):**</u>—मी म्हणतो, उत्तर सत्य आहे. श्री. भदाणे आल्यावर त्यावर चर्चा होईल. कुठले उत्तर खरे आहे खोटे आहे या विषयी मी बोलत नाही.

<u>**सदस्य श्री. राजेश वानखेडे :**</u>—श्री. भदाणे पुढच्या मिटींगला कधी येणार?

<u>**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):**</u>—पुढल्या सभेला हजर ठेवु त्यांना.

<u>**महापालिका सचिव :**</u>—मा. महापौरांतर्फे प्रश्न क्र. २१६ प्रलंबित ठेवण्यात आला आहे.

<u>**महापालिका सचिव :**</u>—प्रश्न क्र. २१७ हा श्री. रविंद्र बागुल यांचा आहे.

**?** <u>**प्रश्न क्र. २१७ :**</u>— मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाचे निर्मल एमएमआर अभियान प्रकल्पाअंतर्गत तिस—या टप्पयातील एकूण १५१ कामे निविदा मागवून अशासकिय संस्थांना देण्यात आली त्यापैकी ५० टक्क्याहून जास्त कामे म्हणजेच ७७ कामे ही जागरुक महिला मंडळ या अशासकिय संस्थेस देणेत आलीत. निविदेतील अटी व शर्तीनुसार संबंधीत संस्थेने पात्रतेचे पुरावे दिले आहेत का? संस्थेस अशासकिय/निमशासकिय संस्थांमध्ये वस्ती शौचालयाचे बांधकाम देखभाल दुरुस्तीचा अनुभव आहे का? संस्थेने मागील पाच वर्षात केलेल्या शौचालये बांधकामांची ठिकाणे व तपशिल दिला आहे का? संस्थेचे मागील तीन वर्षाचे ऑडीट झाले आहे का? संस्थेने आयकर भरल्याने प्रमाणपत्र सादर केले आहे का? संबंधीत संस्था विश्वस्त व्यवस्था कार्यालयात नोंदणीकृत आहे का? संस्थेने उल्हासनगर शहरातील वस्ती शौचालयांची बांधकामे सुरु करणेपूर्वी वस्त्यांचे सर्वेक्षण करुनप युजर लिस्ट तयार करुन ४० व्यक्तीसाठी एका शौचालयांची मागणी केली आहे का? शौचालयांची कामे सुरु करणेपूर्वी वस्ती सहभाग घेवून सीबीओ संस्था रजिस्टर केली आहे का? रजिस्ट्रेशन करीता अर्ज सादर केला आहे का? संस्थेने सुरु असलेल्या शौचालयांचे बांधकामासाठी वास्तुविशारद व आरसीसी कन्सल्टंटची नियुक्ती केली आहे का? नियुक्त वास्तुविशारदाने जागांची मोजमापे घेवून आवश्यक असलेल्या शिटस्नुसार आराखडा बनविला आहे का? मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाचे नियमानुसार अंदाजपत्रकास महापालिकेच्या शहर अभियंता यांनी तांत्रिक मंजुरी दिली आहे का? दिली नसल्यास सदर कामे सुरु करण्यास कोणी व कोणत्या आधारे परवानगी दिली? सुरु असलेल्या बांधकामावर महापालिकेचे अभ्यिंता देखरेख करतात का? करीत असल्यास वेळोवेळीच्या क्यूब टेस्ट, मटेरियल टेस्टचे प्रमाणपत्र जमा केली आहेत का? संस्थेच्या चालू बांधकामांची वेळोवेळी मोजमापे घेणेत आली आहेत का? मोजमाप पुस्तकात नोंद करण्यात आली आहे का? का मोजमाप पुस्तकात केलेल्या कामांची नोंद न करताच देयके देणेत आली आहेत? वरील सर्व बाबींचे प्रमाणपत्र, नोंदींचा तपशिल, पात्रतेच्या पुराव्यांचा तपशिलांच्या प्रती, नोंदणी प्रमाणपत्रच्या प्रती, नियुक्ती पत्रे, तांत्रिक मंजुरीची पत्रे इत्यादीच्या सत्यप्रती मिळाव्यात. महापालिका प्रशासनाने नियमबाहय पध्दतीने नियम, अटी, शर्ती धाब्यावर बसवून, चुकीचा पायंडा

पाडून जागरुक महिला संस्थेस फायदा मिळावा या दृष्टीने शौचालयांची कामे दिली असल्यास सदर विषयी सभागृहात चचा होवून सुचक, समाधानकारक, सविस्तर माहिती मिळावी व सदर प्रकरणी गैर आढळुन आल्यास दोषीवर कारवाई करणेत यावी ही विनंती.

उत्तर :— विदेतील अटी व शर्तीनुसार जागरुक महिला मंडळ संस्थेने अंशतः पुरावे दिलेले आहे.

नाही

नाही

नाही

नाही

होय

याबाबतची माहिती सदर सेवाभावी संस्थेकडून मागविलेली आहे. सी.बी.ओ. निश्चित करुन त्यांचे आवश्यक असल्यास नोंदणी प्रक्रिया एनजीओ ने करणे आहे. अद्यापपर्यंत अशा सीबीओची नावे व इतर तपशिल प्राप्त झालेला नाही साबांवि कडे याबाबत पाठपुरावा सुरु आहे.

यावेळी उप—महापौर श्री. विनोद ठाकुर हे सभागृहातुन बाहेर गेले. 

सदस्य श्री. रविंद्र बागुल :— सचिव साहेब, मेहरबानी करुन प्रश्न जरा वाचुन दाखविला जावा. ब—याच दिवसातुन महासभा होत आहे.

महापालिका सचिव :—शौचालयाच्या कामासंदर्भातील प्रश्न आहे.

सदस्य श्री. रविंद्र बागुल:—पहिली गोष्ट ब—याच दिवसातुन ही महासभा होत असल्यामुळे प्रश्नांशी संबंधीत कागदपत्र आज मी बरोबर आणली नाही. एमएमआरडीएस शौचालयाची जी कामे आपण कामे दिलेली आहे, त्यामध्ये किती ठेकेदारांना किती कामे दिली आहेत? याची माहिती मी मागितली होती. ती माहिती मिळाली आहे. परंतु एकाच ठेकेदाराला ४७ कामे का दिलीत? त्याच्याकडे संबंधीत सर्व कागदपत्र आहेत काय? लेखा परिक्षण अहवाल आहेत का? तो नियमितपणे इनकम टॅक्स भरत आहे का? ही संस्था महानगरपालिकेशी जास्त संबंधीत आहे का? आणि त्याने ती कामे पुर्ण केलीत का? आतापर्यंत जी काही कामे झालीत त्यामध्ये अशी काही कामे आहेत की, काही शौचालयांच्या टाक्यांची गळती होत आहे. काही ठिकाणी बोरींग केलेली नाही. येथे जेवढे काही नगरसेवक बसलेले आहेत त्यांनी सांगावे की, आमच्या प्रभागात एमएमआरडीएच्या माध्यमातुन बोरींगची जी कामे करण्यात आली आहेत ती व्यवस्थित झाली आहे का? संबंधीत अधिका—याने उत्तर दयावे. आयुक्त साहेब, माझ्याकडे एक पत्र आहे. जे पंधराजण आहेत त्यांच्याकडे तीन वर्षाचा लेखा परिक्षणाचा अहवाल सुध्दा नाही. आयकर प्रमाणपत्र भरल्याचा दाखलाही नाही आहे. माहिती अधिकारान्वये आम्ही जी कागदपत्रे मागिवली होती, त्यांची माझ्याकडे सविस्तर यादी आहे. आपण अशा लोकांना निविदा दिली आहे का? यांच्याकडे कोणतीही कागदत्रे नाहीत. शौचालय बांधण्याचे सुध्दा त्यांना माहिती नाही. प्लान कसा आहे, काय आहे? कित्येक ठिकाणी सुलभ शौचालय बांधण्यात आली ती बरोबर आहे का?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—सन्माननिय महापौर महोदया, सन्माननिय उपमहापौर व सन्माननिय आयुक्त साहेब तसेच सर्व सन्माननिय सदस्यगण, उल्हासनगर महानगरपालिकेत निर्मल एमएमआर अभियानाची कामे चालु आहेत. पहिल्या टप्प्यामध्ये ८२ व दुस—या टप्प्यामध्ये ८१ कामे आपण घेतली होती. दुस—या टप्प्यातील कामांसाठी एमएमआरडीएने सुचना दिली होती की, स्थानिक एनजीओ या योजनेस सामिल करुन घ्यावे. त्याबाबतीत सूचना होती की, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत नेमण्यात आलेल्या काही एनजीओ आणि वाटल्यास महानगरपालिकेने आपल्या अखत्यारित टेंडरींग करुन एनजीओंना सामिल करुन घ्यावे, त्याप्रमाणे या योजनेचे एनजीओ फिक्स करण्यासाठी आपण टेंडरींग केले होते. एनजीओ फिक्स केले आहे त्यामध्ये जेवढे काही एनजीओ आले आहेत त्याची आपण स्क्रुटनी रिपोर्ट तयार केले. आणि सर्व एनजीओंचे रिपोर्ट आपण एमएमआरडीएला पाठविला होता. एमएमआरडीएनें त्या सर्व एनजीओंना इलिजिबल करुन कामे देण्यास होकार दिला होता. त्याप्रमाणे स्थानिक पातळीवर आपण ज्या एनजीओंनी जितकी कामे

मागितली आहेत त्याप्रमाणेच आपण त्यांना कामांचे वितरण केले आहे. ज्यांनी जास्त कामे मागितली त्यांना जास्त कामे दिलीत. ज्यांनी कमी कामे मागितली त्यांना कमी कामे दिली आहेत.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**ज्या लोकांनी ही कामे केली ती त्यांनी पुर्ण केली आहेत का? त्यांच्याकडुन आपण जे जे मागितले होते, तीन वर्षाची ऑडीट केलेली आहे का? शौचालय बांधकामाचा अनुभव आहे का? दूसरे काम कधी सुरु केले आणि किती वर्षात त्यांनी कामे पुर्ण केलीत?

**श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—**सन्माननिय महापौर महोदया, या सेकंड पेजमध्ये आपण जनसेवेला २४ कामे दिली होती. जागृकला ४२ कामे दिली होती. आणि बाकीची.......

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**दोन मिनिटे महापौर महोदया, जी जागृक संस्था आहे या संस्थेस ४२ कामे दिली आहेत या संस्थेस विशेष असे काय आहे? ही संस्था उल्हासनगरची आहे की बाहेरची आहे? ती संस्था कुठली आहे? कोणाची संस्था आहे?

**श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—**ही संस्था स्थानिकच आहे. त्यांनी निविदा भरली होती. आणि त्याप्रमाणे त्यांना काम दिलेले आहे. आजपर्यंत त्यांना जी ४२ कामे दिली आहेत त्यात ४० कामे अंतिम टप्प्यात आहेत. आणि २ जे कामे आहेत ते आरसीसीचे काम चालु आहे.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**किती वर्षात त्यांनी ही कामे पुर्ण केलीत?

**श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—**मागील सहा महिन्यापासुन काम चालु आहे.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**माझ्याकडे अशी यादी आहे की अदयापपर्यंत काही लोकांची कामे झालेली नाहीत. भिमनगर येथे अजुनही शौचालयाच्या कामाचा स्लॅब टाकला नाही. किती वर्षाचे काम आहे ते? कुठल्या संस्थेला दिले आहे? त्यांनी अजुनपर्यंत का नाही काम केले? त्यांचे पेमेंट का थांबलेले आहे अजुनपर्यंत? का तो काम करत नाही? तो नाही करत असेल तर दुस—याला दया. परंतु अशा संस्थेस आपण ४२,४६ कामे दिलेली आहेत ती झाली का?

**श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—**जी संस्था काम करत नव्हती, प्रगती दाखवत नव्हती त्यांची कामे काढुन आपण स्थानिक एनजीओकडुन ती कामे करुन घेतली आहेत. आता या सेकंड पेजमध्ये सुध्दा काही एनजीओ कमी पडत आहेत असे दिसते. जनसेवेची बरीच कामे रखडलेली दिसतात ती कामे आम्ही दुस—या स्थानिक एनजीओ कडुन करुन घेण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत. प्रस्ताव पाठविण्यासाठी सांगितले आहे.

यावेळी उप—महापौर श्री. विनोद ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**दोन मिनिट साहेब, आम्ही ही जी सूचना मागीतली आहे, सप्रेम मित्र मंडळ, युनायटेड स्पेशल, जय दुर्गा मॉ, महिला ग्राहक, ज्योति प्रतिज्ञा महिला मंडळ, मंगला साई हे ज्या पंधरा संस्था आम्ही मागिविल्या आहेत त्यामध्ये काही काहींचे ऑडीटच नाही आहेत. काहींना अनुभवच नाही आहे. यावर आपण काय एक्शन घेतल्या आहेत?

**श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—**आपण टेंडर मागविल्यानंतर संगळयांची छाननी केली, छाननीमध्ये जे काही आढळले त्याचा विस्तृत रिपोर्ट आपण एमएमआरडीएकडे पाठविला. एमएमआरडीएने सांगितले की, तुम्हांला जास्तीत जास्त शौचालय बांधायचे आहेत. जास्तीत जास्त तुम्ही एजन्सी नेमा.जेवढया जास्तीत जास्त एजन्सी नेमायच्या होत्या तेवढया जास्तीत जास्त एजन्सी आपण नेमलेल्या आहेत. त्यामध्ये काहींच्या त्रृटी राहिलेल्या होत्या त्यांनी कामे केलेली आहेत.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—श्री. शिर्के साहेब, एमएमआरडीएने असे एक पत्र दिलेले आहे. जेवढी कामे आहेत ती महापालिकेच्यानियंत्रणाखाली दिलेली आहेत. माझ्या मते एमएमआरडीएसंबंधी काही राहत नाही. महापालिकेच्या हद्दीत जर काम आहे तर ही जबाबदारी तुमची आहे ना?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—महापालिकेचीच कामे आहेत परंतु जी एनजीओ आपण नेमलेली आहेत पहिल्या पेज मध्ये एनजीओ नेमायची प्रक्रिया जी होती, एमएमआरडीए व काही प्रमाणात महापालिकेचा त्यामध्ये सहभाग होता. परंतु आता दुस—या पेजमध्ये त्यांनी एमएमआरडीए आणि सर्व महानगरपालिकेंना निर्देश दिले होते की आपण आपल्या स्थानिक एनजीओ नेमावे कारण त्यांनी जे तीन एनजीओ नेमले होते त्यांच्याकडुन कामे होत नव्हती. तिकडुन सारख्या तक्रारी येत होत्या त्यामुळे स्थानिक एनजीओंचा सहभाग असावा यासाठी त्यांनी स्थानिक एनजीओ नेमावे असे आदेश दिले होते त्याप्रमाणे आपण प्रक्रिया केली आहे.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—आता काय नविन घेणार काय?

सदस्य श्री. राजु जग्यासी :—एमएमआरडीएचे लेखी उत्तर आहे का आपणाकडे?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—कशाबद्दल.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—हेच की जे एनजीओ नेमण्याबाबत एमएमआरडीएने सांगितले ते.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—५४ एनजीओंना त्यांनी मान्यता दिली आहे. ५४ एनजीओ निविदापध्दतीने व कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये ज्या संस्थांची नोंदणी झाली होती. त्याची पुर्ण यादी तयार केली आहे. त्यांचा टेंडर स्क्रुटीनी रिपोर्ट तयार केला आहे. कुणाकडे कोणती अर्हता नाही जसे की, कुणाकडे इनकन टॅक्स सर्टीफिकेट नाही, कुणाकडे अनुभव नाही, कमी आहे. तरी सुध्दा आम्ही रिपोर्ट पाठविला आहे. त्यांनी ५४ च्या ५४ संस्थांना मान्यता दिली आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—तो अहवाल तुमच्याकडे आहे?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—होय.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—आपण त्यांना लेखी दिले आहे का?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—होय आपण लेखी दिले आहे. त्यांनी सुध्दा लेखी मान्यता कळविली आहे.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—आता नंतर जी नविन कामे आहे ती देणार का परत?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—एमएमआरडीएने जर पुढील फंड उपलब्ध करुन दिला तर तिसरा टप्पा आपण घेवु शकतो.

सदस्य श्री. रव्रिदं बागुल :—काही ठिकाणी अत्यंत तातडीचे काम असेल तर काय करणार? आज आयुक्त साहेबांकडे एक शिष्टमंडळ येवुन गेले. त्यांनी सांगितले की, जुनी जी शौचालय झाली आहेत त्यांची टाकी खाली पडली किंवा शौचालयामध्ये काही जिवीत हानी झाली तर काय करणार? याला कोण जबाबदार? गुलशन नगरमध्ये आज सुध्दा जावुन बघुन या. मी कमित कमी चार पत्र दिली आहेत. शौचालयाची टाकी तुटली आहे, उदया जर ती टाकी तुटली आणि काही जिवित हानी झाली तर काय करणार? त्यास जबाबदार कोण?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—आगामी अर्थसंकल्पामध्ये त्यांची दुरुस्ती करुन घेवु.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—याबाबतीत काल एका वर्तमानपत्रामध्ये बातमी छापुन आली आहे. निर्मल एमएमआर अभियानांअंतर्गत शौचालयाची हे जे लोक कामे करत आहेत ते अत्यंत निष्कृष्ट प्रतीची रेती वापरत आहे. ही गोष्ट खरी आहे क? याची आपण चौकशी केली आहे का? संबंधित अभियंता कोण आहे? माझ्याकडे वर्तमानपत्राचे कात्रण आहे. पेपरवाले जर खोटी बातमी देत असेल तर पेपरवाल्यांना मी विचारेल की तुम्ही खोटी बातमी का देतात? आपण खरी न्युज दया ना?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—नाही, उल्हासनसगरमध्ये असे काही होत नाही. आपल्याकडे निष्कृष्टप्रतीचे जी काही कामे आढळली ज्यामध्ये दुस—या माळयापर्यंतचे बांधकाम झाले होते अशी बांधकामे पायापर्यंत तोडुन घेतलेली आहेत. आणखी दोन तीन कामे आपण तोडुन घेतली आहेत. निष्कृष्टप्रतीचे बाधकाम आढळुन आले तर आपण ते तोडुन घेतो. एका ठिकाणी तर दुस—या माळयापर्यंत तयार झालेले बांधकाम तोडुन घेवुन आपण ते दुस—या ठेकदोरास दिले.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—साहेब, मी गुलशन नगरबद्दल बोलतो. तेथे शौचालयाची टाकी तुटलेली आहे. त्यासाठी काय करणार? किती दिवसात त्या टाकीची दुरुस्ती करुन देणार? तेथिल लोक आज आयुक्तांना भेटुन गेले. आयुक्त साहेबांनी त्यांना आश्वासने दिले आहेत. परंतु उदया सकाळ जर ती टाकी क्रॅक झाली व त्यात काही हादसा झाला तर त्यास जबाबदार कोण?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—आपण आर्थिक तरतुदीप्रमाणे त्याबाबत कार्यवाही करु.

यावेळी सदस्य श्री. मोहनदास रामरख्यानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—आर्थिक तरतुद म्हणजे काय? काय करणार? आम्ही तुम्हांला पत्रही दिली आहेत. जे फिरते शौचालय आहे ते तरी उपलब्ध करुन दया.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—अर्थसंकल्पीय तरतुदीप्रमाणे करुन घेवु.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—यासाठी अर्थसंकल्पात तरतुद नाही काय? लोक शौचालयाच्या टाकीत पडल्यानंतर बजेट तरतुद करणार काय? साहेब, तेथिल परिस्थिती पहा, आपण तेथिल परिस्थिती पाहिली आहे का? ती टाकी कशी हलते? तेथिल लोक घाबरले आहेत.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—चालेल, आम्ही बघुन कार्यवाही करु.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—श्री. शिर्के साहेब, किती दिवसात कार्यवाही कराल.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—सोमवार पर्यंत आपण साईड विजीट करु या.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—ठिक आहे, ठिक आहे.

सदस्य श्री. भारत राजवानी :—श्री. शिर्के साहेब, आपण हा जो चौकशी अहवाल दिलेला आहे, ज्याबाबतीत मी तक्रार केली होती, ६६ व ६७ प्रभागांच्या सरहद्दीवर एमएमआरडीएच्यावतीने जे काम चालु आहे, त्याचे आपण हे जे उत्तर दिले आहे हे काम सिमेच्याबाहेर आहे. प्रभाग क्र. ६६ व ६७ च्या सरहद्दीमध्ये २० फुटचा पॅसेज आहे. प्रभाग क्र. ६६ व ६७ मध्ये २० फुटाचा जो पॅसेज आहे, तो कसा वाटप करणार?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—या कामासंदर्भात संबंधीत उप अभियंत्याने जो अहवाल दिलेला आहे, की हे काम दोन्ही प्रभागांच्या सरहद्दीवर आहे, सिमेला लागुन आहे.

सदस्य श्री. भारत राजवानी :—माझ्या मते हे काम प्रभाग क्र.६६ मध्ये न येता ६७ मध्ये येते. व मागील महासभेत असे सांगण्यात आले होते की, सन्माननिय सदस्य दुस—या सदस्याच्या प्रभागात विकास काम

करण्यासाठी जर एखादा सदस्य मागणी करत असेल तर त्या प्रभागाच्या विद्यमान सदस्याकडुन त्या कामासाठी ना हरकत घेतली पाहिजे. तर आपण असा काही ना हरकत दाखला घेतला आहे का?

यावेळी सदस्या श्रीमती मालती करोतिया, श्रीमती रजनी महाडिक, श्रीमती कविता सिरवानी, श्रीमती मंजु पोपटानी, कु.शंकुंतला जग्यासी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

__सदस्य श्री. मोहन साधवानी :—__मा. महापौर, उप—महापौर आणि आयुक्त साहेब, मी श्री. शिर्के साहेबांचे लक्ष वेधु इच्छितो की, हरीजन क्वाटर्स जे आहेत ते प्रभाग क्र. ६६ मध्ये येतात. व हे जे सुलभ शौचालय बांधले जात आहे ते हरीजन क्वाटर्स मध्येच बांधले जात आहे. व ती दलित वस्ती आहे, दलित वस्ती सुधारण्यासाठी राज्य सरकार जर काही निधी देत आहे, तर त्यांना ती सुविधा मिळाली पाहिजे. व ६६ व ६७ ची सरहद्द काय घेवुन बसला आहात? तीन वर्ष झाली हा नगरसेवक त्या प्रभागामध्ये कधी गेला आहे? त्याने कधी ती सरहद्द पाहिली आहे? तीन वर्षामध्ये त्यांनी त्या प्रभागामध्ये कधी साफसफाई करुन घेतली आहे? पहिली गोष्ट म्हणजे तो विभाग प्रभाग क्र. ६७ च्या सरहद्दीवर येतच नाही. क्वाटर्समध्ये भरपुर जागा आहे...... श्री. उन्हाळे साहेबांना सांगुन मी तीन पत्र देवुन मी ते काम मंजुर करुन घेतले आहे. आता हे महाशय म्हणत आहेत की, तो विभाग प्रभाग क्र. ६७ मध्ये येतो. तो विभाग प्रभाग क्र. ६६ मध्ये येवो कि ६७ मध्ये येवो गलिच्छ वस्तीतील लोकांना एक चागली सुविधा मिळत आहे. त्या सुविधेपासुन त्यांना वंचित का ठेवावे? त्यासाठी राज्य सरकार पैसे देत आहे, दलितांच्या सुविधेसाठी. त्यांना यापासुन वंचित ठेवणे म्हणजे दलितांवर अत्याचार आहे.

__सदस्य श्री. भारत राजवानी :—__आमच्या प्रभागातील कामांचे आम्ही पाहुन घेवु.

__सदस्य श्री. मोहन साधवानी :—__पहिले तर तो विभाग आपल्या प्रभागात नाही. आयुक्त साहेब, याबाबतीत तो विभाग कुणाच्याही प्रभागातील असो त्याठिकाणी हे काम झाले पाहिजे.

__सदस्य श्री. भारत राजवानी :—__दलित वस्तीतील कामाशी माझा विरोध नाही. तेथे शौचालयाची आवश्यकता नाही.

__सदस्य श्री. मोहन साधवानी :—__तो विभाग प्रभाग क्र. ६७ मध्ये येतच नाही.

__सदस्य श्री. भारत राजवानी :—__तो विभाग प्रभाग क्र. ६७ मध्येच येतो. याबाबतीत सर्व्हे सुध्दा करण्यात आला होता.

__सदस्य श्री. मोहन साधवानी :—__बीएसयुपीचा जो प्रकल्प आहे तो हरीजन क्वाटर्समध्येच येत आहे. तेथे जुने शौचालय होते ते तोडुन नविन बांधण्यात येत आहे.

__सदस्य श्री. भारत राजवानी :—__बरीचशी जागा खाली पडली आहे तेथे बांधा ना?

__सदस्य श्री. मोहन साधवानी :—__तो विभाग माझ्या प्रभागातील आहे, श्री. जवांदे साहेबांना आपण सर्व्हे करण्यास सांगा.

__सदस्य श्री. प्रशांत धांडे :—__मा. आयुक्त साहेब, एमएमआरडीएने जो प्रकल्प दिलेला आहे, मग तो विभाग प्रभाग क्र. ६६ मध्ये येवो कि प्रभाग क्र. ६७ मध्ये येवो. तेथिल रहिवाशांना एमएमआरडीएच्या शौचालयाचा लाभ मिळाला पाहिजे. यासाठी एमएमआरडीएने तो प्रकल्प दिलेला आहे. त्याबाबतीत कुणाची काही हरकत असेल तर ती एमएमआरडीए पाहिल. ते काम झाले नाही तर जनतेचे नुकसान होईल.

__सदस्य श्री. भारत राजवानी :—__एमएमआरडीए कडे मी तक्रार केली आहे, त्यांचे म्हणणे आहे की, हे प्रकरण महापालिकेशी संबंधीत आहे. व तेथे हे विकास काम करण्याच्या मी विरोधात नाही. माझ्या प्रभागात या कामाची आवश्यकताच नाही.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—शहरात जर विकास कामे होत राहिलीत तर त्यामध्ये विरोध करणे योग्य नाही.

सदस्य श्री. भारत राजवानी :—माझ्या प्रभागात या कामाची आवश्यकताच नाही ना?

यावेळी सदस्या श्रीमती मालती करोतिया, श्रीमती रजनी महाडिक यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—हा विभाग माझ्या प्रभागात येतो आणि संपुर्ण दलित वस्ती माझ्या प्रभागात येते.

सदस्य श्री. भारत राजवानी :—तो विभाग प्रभाग क्र. ६७ मध्ये येतो.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—तो विभाग कोणत्याही प्रभागात येवो तेथे हे काम चालु राहिले पाहिजे.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—मा. आयुक्त साहेब, जो कोणी शहर अभियंता असेल, त्याने प्रभाग रचनेचा जो नकाशा असेल तो त्यांना दाखवावा. त्यानुसार तो विभाग कुणाच्या प्रभागात येतो हे स्पष्ट होईल त्यामुळे वाद संपृष्टात येईल.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—मा. महापौरजी, तो विभाग कोणत्या प्रभागात येतो हा प्रश्न वेगळा आहे. त्याबाबतीत वैयक्तीकपणे यांनी भांडण करणे हे बरोबर नाही. त्याठिकाणी दलितांवर अत्याचार होता कामा नये. जर एमएमआरडीएने त्याठिकाणी शौचालयाचे काम प्रस्तावित केले असेल तर त्याबाबतीत यांना वाईट वाटता कामा नये. ते काम तेथे होवु दयायला पाहिजे. माझ्या प्रभागात नको, तुमच्या प्रभागात नको.

सदस्य श्री. भारत राजवानी :—हे संपुर्ण सभागृहाची दिशाभुल करत आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—त्याठिकाणी जे काम प्रस्तावित केले आहे ते काम होवु दयावे.

सदस्य श्री. भारत राजवानी :—एमएमआरडीएकडुन आम्हांला येथे शौचालय बांधुन पाहिजे अशी तेथिल कुणाचीही मागणी नाही.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—तेथे जावुन चौकशी करा, तेथे जी जुनी शौचालय होती त्यामध्ये एवढी काही दुर्गंधी येत होती की त्यांचा कुणी वापर करु शकत नव्हता. आयुक्तांना वारंवार सांगुन मी तेथिल लोकांना सार्वजनिक शौचालयाची सुविधा दिलेली आहे. कारण की तो विभाग माझ्या प्रभागात येतो. तीन वर्षाच्या कालावधीत यांनी कधी तेथे सफाई कामगार पाठविले आहेत? यांचा कोणता मुकादम तेथे काम करतो? हे त्यांना विचारा.

सदस्या श्री. मालती करोतिया:—मा. आयुक्त साहेब, आमचे मा. सदस्य श्री. मोहन साधवानी यांनी हा जो मुद्दा उपस्थित केला आहे तो बरोबर आहे. कारण की, तेथिल वाल्मीक समाजाच्या वस्तीत सार्वजनिक शौचालय व्यवस्थित नाही. श्री. भारत राजवानी जी काही हरकत घेत आहेत ती चुकीची आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—दुसरी गोष्ट अशी की, सदरहु क्ष व्यक्तीच्या प्रभागात ती जागा जर खाली राहिली तर ती वेगळया कामासाठी विकसीत करण्याचा त्यांचा विचार आहे. आणि म्हणुनच एमएमआरडीएचे शौचालय यांना नको आहे.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—जुने शौचालय तोडुन तेथे नविन शौचालय बांधण्यात येत आहे तेथे दुसरे काम कसे होवु देणार?

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—मा. महापौरजी व आयुक्त साहेब, श्री. भारत राजवानी यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो तुम्ही तेथे हे काम का केले म्हणुन काही विरोधात उपस्थित केलेला नाही. त्यांचे असे म्हणणे आहे की, ते काम माझ्या प्रभागात येते म्हणुन मला कळवायला पाहिजे होते. कामाला विरोधात केलेला नाही.

सदस्या श्रीमती मालती करोतिया :—विरोध नाही तर मग हे काय आहे? ते नविन नविन नगरसेवक आहेत.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—तुम्ही एकटेच दलित आहात का?

यावेळी सदस्या श्रीमती मोना वनवारी, श्रीमती संगिता कंडारे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

सदस्य श्री. भारत राजवानी :—तो विभाग बीएसयुपीमध्ये जात असतांना तेथे या कामाची आवश्यकता काय?

सदस्या श्रीमती मालती करोतिया:—यांनी सरळ सरळ कामास विरोध केला आहे.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :— त्यांनी कोठे विरोध केला आहे? त्यांनी विरोध केलेलाच नाही, विषय सरहद्दीचा आहे. अजिबात विरोध केलेला नाही, उगीचच इश्यु करु नका.

सदस्या श्रीमती मालती करोतिया:—त्या झोपडपट्टीमध्ये वाल्मीक समाजाचे लोक राहतात तसेच महाराष्ट्रीयन समाज तसेच इतर सर्व समाजाचे गरीब लोक राहतात. तेथे कुणाच्या घरात शौचालय आहे, कुणाच्या घरात नाही, म्हणुन एमएमआरडीच्या माध्यमातुन शौचालय बांधण्याची आवश्यकता आहे.

यावेळी सदस्य श्री. कुमार आयलानी, श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. लाल पंजाबी हे सभागृहातुन बाहेर गेले.

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—महापौर महोदया, ती वसाहत कुणाच्या प्रभागात येते, सरहद्द काय आहे?

सदस्य श्री. राजु जग्यासी :—मा. महापौरजी, आपणाकडे सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. व प्रत्येक विभागाची आपण सरहद्द निश्चित करत असतो. एवढी मोठी चर्चा होण्यासारखा काही मुद्दाच नाही. शौचालयाचे काम चालु असलेला हा विभाग कुणाच्या प्रभागात येतो हे आपण निश्चित करु शकता. व या सभागृहात असा निर्णय घेण्यात आलेला आहे की, एक नगरसेवक दुस—याच्या प्रभागात कोणतेही विकास काम करु शकत नाही. तो विभाग कुणाच्या प्रभागात येतो याबाबत आपण निर्णय दया त्यामुळे हा वाद संपृष्टात येईल. त्यावर एवढी चर्चा करण्याची आवश्यकताच काय आहे?

सदस्य श्री. राजेश वधारिया :—मा. महापौरजी, आता जो विषय चालला आहे की, निर्मल एमएमआर योजनेअंतर्गत जे शौचालयाचे बांधकाम केले जात आहे, त्यावर अंदाजे ३५ लाख रुपये खर्च आहे. ज्या वस्तीत ते शौचालय बांधले जात आहे, ती वस्ती बीएसयुपी प्रकल्पाअंतर्गत तोडुन नविन तेथे इमारती बांधण्यात येणार आहे. आणि त्यातील तरतुदीनुसार प्रत्येक घरामध्ये लॅटरीन बाथरुम बांधले जाणार आहे. आपणच म्हटले आहे की, बीएसयुपी अंतर्गत हे काम केले जाणार आहे, बीएसयुपी योजने अंतर्गत त्यांना नविन घर मिळणार आहे. लॅटरीन, बाथरुम नविन त्यांना बांधुन मिळणार आहे. असे असतांना एवढी मोठी रक्कम खर्च करण्याची आवश्यकता काय आहे?

सदस्य श्री. मोहन साधवानी :—मा. महापौर, उप—महापौर, हा जो बीएसयुपीचा प्रकल्प तयार होणार आहे, त्याचा सर्वच्या सर्व रहिवाश्यांना फायदा मिळणार नाही. या प्रकल्पाच्या आजुबाजुला जे दलित लोक राहतात त्यांच्या वापरासाठी सार्वजनिक शौचालय तर हवे आहे ना? व इमारतीमध्ये महापालिकेचे फक्त ३६ कर्मचारी राहतात. तेथे ५०० घरांची वस्ती आहे ते लोक कोठे जातील?

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**आयुक्त साहेब, हे सदस्य एवढा मोठा जो वाद घालत आहेत, तो सोडविण्यासाठी प्रभागांची सरहद्द काय आहे ती दाखवा.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**सर्वांच्या घरात शौचालय आहे.

**उप—महापौर:—**एक एक सदस्याने बोलावे. दोन चार सदस्यांनी उभे राहुन एकाच वेळी बोलणे बरोबर नाही.

**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—**ज्या त्या नगरसेवकाने आपल्या प्रभागात काम करणे अपेक्षित आहे. प्रश्न असा आहे की, जेव्हा सार्वजनिक हिताचे निर्णय योजना होतात. किंवा शासनाकडुन ज्या योजना येतात, आणि त्यावर ज्यावेळेस अंमलबजावणी होते त्यावेळेस आयुक्त ज्या जागा ठरवितात, त्यानुसार ही जागा ठरविली आहे. मला असे वाटते की, जवळ जवळ ९०, ९५ टक्के काम पुर्ण झालेले आहे. आता ते काम बंद करणे शक्य होणार नाही. काम होईल कारण तो आयुक्तांचा निर्णय होता. आणि माझ्या माहितीनुसार आणि नियमाप्रमाणे आयुक्तांना कुणाचे प्रमाणपत्र देण्याची गरज नाही.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**मागील महासभेत मी याबाबतीत विचारणा केली असता चौकशी करु असे सांगण्यात आले होते. त्या चौकशीत त्यांना एवढा वेळ लागला. तो प्रभाग कुणाच्या सरहद्दीत आहे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**मा. महापौरजी, ९५ टक्के काम झाले आहे. त्यावेळेला हा नगरसेवक झोपला होता?

**सदस्य श्री. भारत राजवानी:—**मी यापुर्वीच महासभेत आवाज उठविला आहे. आयुक्त साहेब, मागील महासभेत आपण काय म्हटला होतात, चौकशी करुन सांगु म्हणुन ना?

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. लाल पंजाबी, श्री. कुमार आयलानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**तेथे जर शौचालय बांधायचे नसेल तर मग काय ती जागा हडप करायची आहे का?

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**मागील महासभेत श्री. शिर्के साहेबांनी सांगितले होते की, चौकशी करुन सांगु. त्याच वेळेस काम थांबविले का नाही?

**सदस्य श्री. रमेश चव्हाण :—**सचिव साहेब, पुढील विषय घेतला जावा.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**का? मागील महासभेतील या प्रश्नाचे उत्तर तर दया अगोदर?

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :—**आयुक्त साहेबांनी जे उत्तर दिले आहे ते एकदम बरोबर आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**मागील महासभेत त्यांनी सांगितले होते त्यावेळेस का नाही सुनवाई झाली? त्यानंतर मला कोठे सांगितले आहे?

**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—**मा. महापौर महोदया, तो विभाग कोणत्या प्रभागात येतो याविषयी चौकशी करुन सांगतो असे म्हटले असेल, त्यावेळेला आयुक्तांनी जेव्हा प्रकल्प मंजुर केला असेल त्याला प्रभागाच्या सरहद्दीची काही अडचणच येत नाही. कारण की सार्वजनिक हिताचे हे प्रश्न आहे. आणि शासनाची योजना आहे आणि त्यानुसार कार्यवाही झाली आहे. यामध्ये तो विभाग कुणाच्या प्रभागात येतो हा प्रश्न येत नाही.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**शासनाची योजना आहे असे मी त्यावेळेस सुध्दा म्हटले होते. त्यावर त्यांचे म्हणणे आहे की, ही महापालिकेची जबाबदारी आहे. आमचा काही संबंध येत नाही.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>याबाबतीत माझे उत्तर पुरेसे आहे असे मला वाटते.

यावेळी सदस्या श्रीमती निलु चांदवानी, श्रीमती मंजु पोपटानी, श्रीमती कविता सिरवानी, कु. शकुंतला जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापालिका सचिव :–</u>प्रश्नोत्तराचा कालावधी समाप्त झाला.

यावेळी सदस्या श्रीमती लता निकम, सदस्या श्रीमती जया माखिजा हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

लक्षवेधी सुचना जीचे सुचक आहेत श्री. सुरेश जाधव व अनुमोदक आहेत श्री. किशोर जग्यासी
लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

यावेळी सदस्य श्री. दिलीप गायकवाड, श्री. धनंजय बोडारे, श्री. लाल पंजाबी यांनी सभागृहातुन बाहेर गेल्या.

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक १</u>

सुचकाचे नावः–श्री. सुरेश जाधव
अनुमोदकाचे नाव :– श्री. किशोर जग्यासी

**विषय :–** शहरात होत असलेल्या अनाधिकृत बांधकामाबाबत लक्षवेधी सूचना

उल्हासनगर शहरात अनाधिकृत बांधकामे नियमित व दररोज होत आहेत. दिनांक १ जानेवारी, २००५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने अनाधिकृत बांधकामे करण्यात येवू नयेत असे आदेश निर्गमित केलेले आहेत. असे असतांनाही उल्हासनगर महानगरपालिकेतील काही अधिकारी बांधकाम ठेकेदार यांना हाताशी धरुन व संगनमताने अनाधिकृत बांधकामास आर्शिवाद देवुन संरक्षण देत आहेत.

अनाधिकृत बांधकामांबाबत लोकप्रतिनिधी हे वारंवार तोंडी/लेखी आयुक्त साो. यांचेकडे तक्रार करुन देखिल त्यावर कार्यवाही केली जात नाही. तसेच सध्या जी अनाधिकृत बांधकामे मोगम पध्दतीने निष्कासित केली जातात ती बांधकामे नंतर परत पुर्ववत अधिकारी यांच्या आर्शिवादाने बांधली जात आहेत. म्हणजेच मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा सतत अवमान होत आहे ही बाब अत्यंत खेदजनक आहे.

या आणि अशा प्रकारे होणा–या अनाधिकृत बांधकामांना आर्शिवाद देणा–या अधिकारी यांचे वर काय कार्यवाही होणार व अनाधिकृत बांधकामांवर कशा प्रकारे आळा बसेल याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत येत्या महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

---

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, आणि सर्व सन्माननिय सदस्य, अनाधिकृत बांधकाम विभागाशी संबंधीत ही लक्षवेधी स्विकृत केल्याबद्दल मा. महापौर आणि उप–महापौर यांना धन्यवाद देवुन त्यांचे मी अभिनंदन करतो. मा. आयुक्त साहेब, आमच्या शहरामध्ये ८५५ अनाधिकृत इमारती तोडण्यासंदर्भात जे आदेश आले होते, त्याबाबतीत सन्माननिय उच्च न्यायालयाने आदेश दिले होते की, या शहरामध्ये यापुढे अनाधिकृत बांधकामे होता कामा नयेत. या आदेशाचे पालन केले गेले नाही. त्याचे मी आपणासमोर एक उदाहरण देतो. मा. उप–आयुक्त श्री. दिपक सावंत यांनी ३१/१०/२००९ ला एक पत्र दिले होते, त्यामध्ये काही अनाधिकृत बांधकामाची नावे दिली होती. ती अदयाप

निष्कासित करण्यात आली नाही. त्यानंतर त्याच्या अनुषंगाने मी एक पत्र २३/१२/२००९ रोजी प्रभाग समिती क्र. ३ च्या अधिका—यांना दिले होते. त्यामध्ये मी स्पष्टपणे म्हटले होते की, या अनाधिकृत बांधकामांवर कारवाई व्हावी. डॉ. दिपक सावंत यांनी ज्या ठिकाणांचा उल्लेख केला होता त्याच ठिकाणांचा मी त्या पत्रात उल्लेख केला होता. आणि त्या पत्रात मी स्पष्टपणे म्हटले होते की, जर यांवर कारवाई केली नाही तर महासभेत त्याचा खुलासा दयावा. परंतु त्याचे मला काही उत्तर दिले नाही. त्यानंतर ४/१/२०१० रोजी आयुक्तांनी काही बांधकामके तोडण्याबाबतीत आदेश दिले होते त्या पत्रासोबतच्या अनाधिकृत बांधकामाची यादी माझ्याकडे आहे. तीही बांधकामे तोडली नाहीत. आणि ज्या प्रभाग समितीमध्ये श्री. भदाणे सारखे उप—आयुक्त आपण दिले, एका लिपिकाला उप—आयुक्त म्हणुन तेथे पाठविला. आणि अशा व्यक्तीने आयुक्तांच्या आदेशानंतरही त्या बांधकामांवर कारवाई केली नाही. याचाच अर्थ मा. उच्च न्यायालयाचा अपमान केला आहे. त्याचे खंडन केले आहे. त्याबद्दी त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. अशा अधिका—याने आयुक्तांच्या आदेशावर कारवाई केली नाही. त्याबद्दल त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. कारण असे जे भ्रष्ट अधिकारी आहे त्यांच्यावर आपण कारवाई न करता त्यांना उप—आयुक्त म्हणुन बसविले आहे. कारण या शहराची संपुर्ण जबाबदारी आपली आहे. मा. न्यायालयाच्या आदेशाचा आपण मान राखला पाहिजे. परंतु तसे काही न करता उलट आपण त्यास उपआयुक्त म्हणुन बसविले आहे. त्यानंतर आमच्या सदस्याने प्रश्न विचारला होता, त्यामध्ये त्याने तीच ठिकाणे दर्शविली आहेत, जी तोडण्यासाठी यापुर्वी आदेश देण्यात आले होते. त्या प्रश्नाच्या उत्तरात म्हटले आहे की, या बांधकामावर कारवाई केली आहे व हे बांधकाम तोडले आहे. याच ठिकाणांवर जी बांधकामे आहेत त्याबाबत माहितीच्या अधिकारान्वये कालच नगररचना विभागांकडुन माहिती घेतली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, या ठिकाणच्या बांधकामांना आम्ही बांधकाम परवानगी दिलेली नाही. आणि दोन महिन्यांपुर्वी श्री. भदाणे म्हणतात की, मी ते बांधकाम तोडले आहे, म्हणजे ते या सभागृहांचा अपमान करत आहेत. दिशाभुल करत आहेत. त्याचबरोबर आपलीही ते दिशाभुल करत आहेत. आणि आपल्या आदेशालाही तो मानत नाही. अशा भ्रष्ट अधिका—याला आपण वरच्या पदावर बसविले आहे. मराठीमध्ये म्हण आहे की, '' आंधळ दळंत आणि कुत्र पिठ खातय'' त्या पध्दतीचा येथे कारभार चालला आहे. आपण एक वरिष्ठ अधिकारी आहात, आपण अशा अधिका—यास कधीच उप—आयुक्त बनवायला नको होते. त्यांना तीन,तीन, चार,चार वेळा निलंबित केले आहे. त्याचप्रमाणे नेताजी हायस्कुल येथे एक शाळा आहे, त्याठिकाणी लहान मुले शिकायला जातात. त्याठिकाणी दोन माळे अनाधिकृत बांधकाम केले आहे. त्याविषयी आपणाकडेही तक्रार झालेली आहे. तरीही त्याचे निष्कासन करण्यात आलेले नाही. उदया सकाळ जर ती इमारत कोसळली आणि त्यामध्ये जर लहान मुले दगावली तर त्याची जबाबदारी आपली राहिल. याची आपण नोद घ्यावी. मागच्या वेळेस एक नंदलाल समिती आली होती. त्यामध्ये अनाधिकृत बांधकामास जबाबदार म्हणुन काही सदस्यांची नावे घेण्यात आली होती. त्यामध्ये माझेही नाव घेण्यात आले होते, आणि त्यामध्ये काही अशा सदस्यांची नावे होती की ज्यामध्ये काही सदस्यांचे स्वत:चे घर नव्हते. प्रत्येक वेळेस अनाधिकृत बाधकाम तोडण्या संदर्भात सदस्यांनी जी आपणाकडे मागणी केली जाते ती तोडली पाहिजेत. तरीही त्याबद्दल लक्ष दिले जात नाही. तेवढया पुरते शटर काढले जाते आणि दाखविले जाते की आम्ही हे बांधकाम तोडले आहे. माहिती अधिकारान्वये मी जी माहिती मागविली आहे ती मी आपणांस देतो. कालच्या तारखेचेच पत्र आहे. मी जी जी ठिकाणे दर्शविली आहेत त्याठिकाणावरील बांधकामांवर अदयापपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही. आपणांस विनंती आहे की, मी ज्या ज्या ठिकाणांची यादी देत आहे त्या सर्व ठिकाणांची अनाधिकृत बांधकामे तोडण्यात यावीत

यावेळी श्री. सुरेश जाधव यांनी अनाधिकृत बांधकामांची यादी मा. महापौर महोदया यांना सादर केली.

## <u>अनाधिकृत बांधकामाची यादी</u>

**१. कमला नेहरुनगर, शुक्ला चक्की जवळ, उल्हासनगर-१**
**२. बॅ.नं. ३५ अे, उल्हासनगर-१**
**३. बॅ.नं. ३५ बी, उल्हासनगर-१**
**४. बॅ.नं. ३५, उल्हासनगर-१**
**५. संभाजीनगर, उल्हासनगर-१**
**६. बॅ.नं. २०५, उल्हासनगर-१**
**७. धोबीघाट, अंबिका माता मंदिर समोर, उल्हासनगर-१**
**८. केब्रीज शो रुम जवळ, उल्हासनगर-१**

९. बॅ.नं. ७१, उल्हासनगर-१
१०. साईश्रृष्टी अपार्टमेंट समोर, झुलेलाल मंदिर चौक, उल्हासनगर-२ टिअर गर्डर
११. अमन टॉकीज जवळ, प्लॉट नं. ७०५, विशाल आईस्क्रीमच्या पाठीमागे ८० X १५० शेडचे बांधकाम चालु आहे.
१२. श्री.कन्हैया (ठेकेदार) बॅरेक नंबर ७१२, सेंट्रल हॉस्पिटल रोड, उल्हासनगर-३ टिअर गर्डन
१३. पंजाबी कॉलनी , बॅ.नं. ७३४ जवळ, उल्हासनगर-३
१४. बॅ.नं.३०१, उल्हासनगर-२,टिअर गर्डर
१५. बॅ.नं.२३२, उल्हासनगर-२, टिगर गर्डर
१६. श्री. यादव बॅ.नं. ९०१ जवळ, माता सागर अपार्टमेंट (३५ X ३० चे बांधकाम )
१७. गुड्डू अमित चेलाराम मार्केट, उल्हासनगर-२ टिअर गर्डर
१८. श्री. गुरुमुखदास गणेश क्रिपा बिंल्डिग जवळ, सम्राट बिस्किट बंगला १२ X २५ टिअर गर्डर
१९. रुम नं.जी २२३ गुरुव्दारा मागे पंजाबी कॉलनी, उल्हासनगर-३ टिअर गर्डर.
२०. मेहबुब चाळ जवळ शांतीनगर, उल्हासनगर-३ (१५X२०टिअर गर्डर श्रीमती लक्ष्मी शहा )
२१. बॅ.नं. ७६६ समोर उल्हासनगर-२, टिअर गर्डर
२२. श्री. राजु शेरा बॅ.नं. ९०१ जवळ, उल्हासनगर-२ टिअर गर्डर.
२३. झुलेलाल गेट समोर, उल्हासनगर-२
२४. जे.के. बिस्कीट , टेरेसवर ४० X ८० प्रमाणे ४ अनाधिकृत गाळयांचे बांधकाम
२५. बॅ.नं.३४१, टिअर गर्डन चे बांधकाम
२६. हाऊ बॅटरी, महाराष्ट्र अपार्टमेंट जवळ, सेक्शन १७, उल्हासनगर-३.
२७. आझादनगर रोड, उल्हासनगर-२तीन शेड बांधकाम परवाना क्र. उमपा/नरवि/बाप/५७/०९/३३६, ग्रीन झोन अथवा रिझरवेशन बाबत तडताळणी करणे
२८. शिल्क मिलसच्या समोर, इंडिस्ट्रियल एरिया, ४ पक्के शेड प्रति शेड ३०० X १०००
२९. क्रिष्ण मिटर इंडस्ट्रियल एरिया , टेरेसच्या दुस-या माळयाचे काम ८० X १५०
३०. नरेश वेष्णविदेवी भवन समोर महेश असिड कार्यालया समोर उल्हासनगर-२ टिअर गर्डर
३१. कॉटक्टर श्री. घई यांचे आर.सी.सी. तळमजला, एक माळा पान हाउस जवळ, सिरुचौक उल्हासनगर-२
३२. श्री. प्रभु यांचे टेरेस बांधकामे २ माळयामध्ये परिवर्तीत अनाधिकृत बांधकामे ब.नं. २८८, उल्हासनगर-२
३३. बॅ.नं. २७३/६, उल्हासनगर-१, १ टिअर गर्डर
३४. श्री. गोदु क्रिष्णानी ऑफिस जवळ, माता मंदिर जवळ,उल्हासनगर-३
३५. बॅ.नं. ११९७ शिवसेना शाखे समोर, शांतीनगर, उल्हासनगर-३
३६. समाज मंदिराच्या बाजुला शांतीनगर, उल्हासनगर-३
३७. श्री. सी.आर. सोनावणे, समाज मंदिरा जवळ, शिवसेना शाखे समोर, शांतीनगर, उल्हासनगर-३
३८. गेपाल भटीजा, बॅ.नं. १६१४च्या मागे, उल्हासनगर-४
३९. दुलारी पाडा, बेकरीवाला, उल्हासनगर-४
४०. श्री. शेटटी हनुमान मंदिर समोर, शांतीनगर रोड, उल्हासनगर-३
४१. श्री. जितेंद्र सिंग, भैय्यासाहेब आंबेडकर सोसायटी, पंचशिलनगर, उल्हासनगर-३
४२. गावडे क्लिनिक मागे, उल्हासनगर-३ टिअर गर्डर
४३. धिरज हॉटेल समोर, उल्हासनगर-५
४४. बसंत बहार पाठीमागे, उल्हासनगर-५
४५. चिराग हॉटेलच्या बाजुला, उल्हासनगर-५
४६. बसंत बहार समोर, उल्हासनगर-५
४७. पोस्ट ऑफिसच्या बाजुला, उल्हासनगर-५

४८. चिराग हाटेल समोर उल्हासनगर-५
४९. गो शाळे समोर उल्हासनगर-५
५०. भाटीया रोड, अशोक पिकलच्या समोर, उल्हासनगर-५
५१. साईबाबा मार्केट समोर, वसंत बहार रोड जवळ, क्रांती नगरचे बाहेर उल्हासनगर-५
५२. पारुशहा मार्केट जवळ, उल्हासनगर-५
५३. वसंत शहा दरबारचे मागे, उल्हासनगर-५
५४. वसंतशहा यिबल्डिंगचे टॅरिसवर, उल्हासनगर-५
५५. नेहरुनगर, उल्हासनगर-५
५६. ब.नं. १८१२, सेक्शन ३८, उल्हासनगर-५
५७. मानसी बिल्डिग जवळ उल्हासनगर-५
५८. कॉन्ट्रक्टर यांचे ३ वेगवेगळे आर.सी.सी. दुकाणे मानसी पॅलसेच्या पाठीमागे त्यापैकी एकाच.उ क्र. उमपा/नरवि/बाप/२५/०१/२०३ दि.८/६/2007, उल्हासनगर-५ .
५९. आर.सी.सी. पाया भरणी पुर्ण पोटमाळया करीता निर्माणाधिन, त्याच प्लॉट मध्ये टिअर गर्डर सुलभ शौचालय जवळ, उल्हासनगर-५
६०. २ दुकाने नामे राधे राधे जीन्स मॉ. शेरावाली पॅलेस अनाधिकृत बांधकामे, उल्हासनगर-५
६१. टिअर गर्डर लालसाई कॉम्पलेक्सचे पाठीमागे, उल्हासनगर-५
६२. स्वामी देवप्रकाश कॉम्पलेक्स क्र. उमपा/नरवि/बाप/१९/२०/२००९ दि. २५/११/२००९ चौकशी व्हाकवी.
६३. जुने पेट्रोल पंपाजवळ, नाल्याचे बाजुला, उल्हासनगर-५
६४. वसंत बहार रोडच्या बाजुला , उल्हासनगर-५
६५. आवतराम चौक राज मंदिर कोल्ड्रींग दुकानाचे समोर, उल्हासनगर-२, टिअर गर्डर
६६. विठ्ठलवाडी रेल्वे तिकीट कार्यालयाचे मागे, उल्हासनगर-३
६७. खन्ना कपांऊड, उल्हासनगर-३ लोड बेअरिंग -२ हाऊसेस
६८. बॅ.नं. २०५ च्या बाजुला नियर प्रकाश ऑटो, उल्हासनगर-३
६९. चेलाराम मार्केटच्या पाठीमागे, उल्हासनगर-५ लोडबेरिंग.
७०. शॉप ८, हनुमान मंदिराच्या बाजुला, शांतीनगर, उल्हासनगर-३
७१. खादी मशिन, उल्हासनगर-५ जोशी टॅकर पाईंट, गायकवाड पाडा-२ वर्क अे.डी.एम. ४५ **x** १२ आणि २० **x** १७
७२. गणेशनगर, हिराघाट, ऑन पोलिस प्लॉट, उल्हासनगर-३
७३. बॅ.नं. १९१७ जवळ लोड बेरिंग, उल्हासनगर-५
७४. अपोझिट बॉबीबार, ओ.टी. सेक्शन, उल्हासनगर-५ लोड बेरिंग
७५. प्लॉट नं. २०५ च्या पाठी मागे उल्हासनगर-१
७६. बॅ.नं. ११६१ जवळ, तेजुमल चक्की लोंड बेरिंग
७७. बॅ.नं. ५०७ जवळ अमन टॉकीजच्या जवळ, कॅम्प नं.२ लोडबेरिंग
७८. पंचरत्न अपार्टमेंट, गांधीरोड, अे. विंग उल्हासनगर-५
७९. श्री.कृष्ण को. ऑपरेटिव्ह सोसायटी, बॅ.नं. ३, सी/१७/१०२, भाटीया हॉस्पिटल उल्हासनगर-५
८०. जय महालक्ष्मी को. ऑप.हा. सो. ब्लॉक नं. सी.८६२, रुम नं. १७२३, उल्हासनगर-५
८१. कॅनरा बॅक, दुधनाका जवळ बस स्टेशन, उल्हासनगर-५
८२. सुविधा अपार्टमेंट/कैलास पर्वत अपार्टमेंट, कैलास कॉलनी, उल्हासनगर-५
८३. जय बाबा कुंज, जुने पेट्रोल पंप , उल्हासनगर-५
८४. गुरुप्रसाद पॅलेस को. ऑप.हौ.सो.गांधीरोड, उल्हासनगर-५
८५. लक्ष्मीनारायण अपार्टमेंट लाल चक्की उल्हासनगर-५
८६. स्वामी सर्वानंद हॉस्पिटल, उल्हासनगर-५
८७. ओम साईराम अपार्टमेंट ब्लॉक नं. सी.९२४/९२५, कुर्ला कॅम्प रोड, उल्हासनगर-५
८८. जिवन गोट हॉस्पिटलला लागुन, चालिया साहेब मंदिरा जवळ, उल्हासनगर-५.
८९. राखी अपार्टमेंट सी.९१५, कुर्ला कॅम्प, विनोद ठाकुर जवळ उल्हासनगर-५
९०. बॅ.नं.१८५५ सेक्शन ३९, सेक्शन ३९ समोर माणिक गंगवानी फॅक्टरी, उल्हासनगर-५

९१. पारस रेसिंडन्सी जवळ सी.६३, कुर्ला कॅम्प, उल्हासनगर-५
९२. सत्यसाई पॅलेस, गोविंदराम लुंड जवळ, उल्हासनगर-५
९३. सी.१४/७९/८०, घारोंदा अपार्टमेंट, रिक्षा स्टॅन्ड, भाटीया उल्हासनगर-५
९४. शिव पॅलेस प्रभाराम मंदिरा समोर उल्हासनगर-५
९५. ब्ल्यु मुन ऑवर, ब्लॉक नं. अे.९५९/१९१७,१९१८, कैलास कॉलनी, उल्हासनगर-५
९६. कैलाशपती अपार्टमेंट, कैलास कॉलनी उल्हासनगर-५
९७. साईदिप अपार्टमेंट उल्हासनगर-५
९८. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळया जवळ, सुभाष टेकडी उल्हासनगर-५
९९. निकिता अपार्टमेंट उल्हासनगर-५
१००. देवकी प्लाझा गुरुनानक स्कुल जवळ, उल्हासनगर-५
१०१. मुक्ती अपार्टमेंट, बॅ.नं.१३८९२ रुम नं.१ आणि २ सेक्शन ३२ उल्हासनगर-४
१०२. वॉटर टॅंक जवळ, कुर्ला कॅम्प उल्हासनगर-५
१०३. लालचक्की जवळ, वाघमारे हॉलला लागुन, उल्हासनगर-४
१०४. अमरदिप अपार्टमेंट टिप्सी टॉप्सी अपार्टमेंट जवळ, उल्हासनगर-४

यावेळी सदस्य श्री. लाल पंजाबी, श्री. धनंजय बोडारे, श्री. दिलीप गायकवाड यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री. सुरेश जाधव :– श्री. भदाणे सारख्या माणसाला आजच्या आज बडतर्फ करावे. जोपर्यंत आपण हा निर्णय देत नाही. तोपर्यंत मी जमिनीवर बसेल. आणि त्याचप्रमाणे मी महापौरांना व उप–महापौरांना विनंती करतो, अधिका–याने हे जे अनाधिकृत बांधकाम चालले आहे त्याच्या चौकशीसाठी आदेश दयावेत. मा. आयुक्तांकडुन याची चौकशी व्हायला पाहिजे. जे अनाधिकृत बांधकाम आहे त्याची मी यादी देत आहे, त्याची सीबीआय चौकशी झाली पाहिजे. नाहीतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत याची चौकशी झाली पाहिजे. आपण आदेश देत नसाल तर तोपर्यंत अनाधिकृत बांधकामास तोडण्यास मान्यता देत नाहीत तोपर्यंत मी असे समजेल की आपण अनाधिकृत बांधकामास मान्यता देत आहात. या सर्व प्रकरणाची लाचलुचपत प्रतिबंध विभागातर्फे चौकशी झाली पाहिजे. जोपर्यंत आपण आदेश देत नाही, तोपर्यंत मी असे समजेल की आपण अनाधिकृत बांधकामांना मान्यता देत आहात. मी सर्व सदस्यांना सांगेन, सभागृह नेतांना सांगेन की आपणही अनाधिकृत बांधकामांस मान्यता देवु नये. आणि जोपर्यंत श्री. भदाणे सारख्या माणसाला निलंबित केले जात नाही तोपर्यंत आपणही माझ्या बरोबर जमिनीवर बसावे अशी मी सर्वांना विनंती करतो.

यावेंळी खालील सदस्य व्यासपीठासमोरील मोकळया जागेत जमीनीवर बसले

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुरेश जाधव | १७ | श्री. दत्तात्रय पवार |
| २ | श्री. राजेश वानखेडे | १८ | डॉ. निना नाथानी |
| ३ | श्री. मुकेश तेजी | १९ | श्रीमती लिलाबाई आशान |
| ४ | श्री. प्रधान पाटील | २० | श्रीमती विद्याताई निर्मले |
| ५ | श्री. शेखर यादव | २१ | श्रीमती बेबी भोईर |
| ६ | श्री. दिलीप गायकवाड | २२ | श्रीमती ज्योती माने |
| ७ | श्री. गोविंदराम लुंड | २३ | श्रीमती वसुधा बोडारे |
| ८ | श्री. सुंदर मंगतानी | २४ | श्रीमती मिनाताई सोनेजी |
| ९ | श्री. हरेश जग्यासी | २५ | श्री. प्रकाश सावंत |
| १० | श्रीमती शकुंतला पाटील | २६ | श्रीमती मालती करोतिया |
| ११ | कु. शकुंतला जग्यासी | २७ | श्री. तुलसीदास वसिटा |
| १२ | श्रीमती कविता सिरवानी | २८ | श्रीमती रजनी महाडिक |
| १३ | श्रीमती चंद्रा टेकचंदानी | २९ | श्रीमती सुजाता रिजवानी |
| १४ | श्रीमती निलम रावत | ३० | श्री. विजय सुपाळे |
| १५ | श्रीमती ज्योती चैनानी | ३१ | श्रीमती निलु चांदवानी |
| १६ | श्री. भजनलाल रामचंदानी | ३२ | श्रीमती मंजु पोपटानी |

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>मा. आयुक्त साहेब, परत प्रश्न उद्‌भवला श्री. भदाणे यांचा. पहिली गोष्ट मी आपणांस एक प्रश्न विचारु इच्छितो, एक जनसंपर्क अधिका–यासारख्या कनिष्ठ अधिका–यास उप–आयुक्ताचे पद देणे कायदयात बसते काय? आपण चार चार उप–आयुक्तांची नेमणुक केलेली आहे, ते आपल्या नजरेसमोर सक्षम नाहीत. आपण चार उप–आयुक्त बोलावले आहेत त्यांना महानगरपालिकेतील जनतेचे पैसे काढुन आपण पगार देतो. ते सक्षम नाहीत काय? एकटा श्री. भदाणेच सक्षम आहे? श्री. सुरेश जाधव यांनी जे पत्र दिले आहे त्याची इतिवृत्तात नोंद आली पाहिजे. सर्व सदस्यांची मागणी आहे की, जोपर्यंत श्री. भदाणे यांना तुम्ही निलंबित करत नाहीत तोपर्यंत जमिनीवर बसलेला कोणताच नगरसेवक उठणार नाही. आपण निर्णय दयावा. ही या सभागृहास विनंती आहे.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>मा. महापौर, मा. उप–महापौर आणि आयुक्त साहेब, मी सुध्दा अनाधिकृत बांधकामांची एक यादी दिली आहे तिला एक महिना होवुन गेला. त्यावेळी माझ्या समोर श्री. भदाणे यांना ते बांधकाम तोडण्यास सांगितले होते. अदयापपर्यंत ती बांधकामे त्याने तोडली नाहीत. विशेषकरुन भावेशा मार्केटच्या बाजुला जी दुकाने आहेत या अगोदर महापालिकेने ती तोडली आहेत. त्यानंतर कालच पुन्हा तेथे शटर लावले आहे. आपण आदेश दिल्यानंतर सुध्दा ते अनाधिकृत बांधकामे तोडत नाहीत.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u>ही मोठी शरमेची गोष्ट आहे. आयुक्त साहेब, ज्या अधिका–याला प्रभाग अधिकारी म्हणुन नेमणूक दिली जाते आणि त्यानंतर त्याच्या विरोधात ज्या तक्रारी येतात, आणि त्यानंतर तुम्ही त्याला प्रभाग क्र. १,२,३,४ चे अनाधिकृत बांधकामसंदर्भात कार्यभार सोपवितात. नंतर तो काढुन घेतात.

**यावेळी काही सदस्य शहर बचाओ, श्री. भदाणे हटाओ अशा घोषणा देत होते.**

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, या सर्व सदस्यांचा आरोप आहे की, श्री. भदाणे यांनी पैसे घेतले आहेत, पैसे घेवुन ते अनाधिकृत बांधकामे तोडत नाहीत.

**यावेळी काही सदस्य सेम,सेम व शहर बचाओ, श्री. भदाणे हटाओ अशा घोषणा देत होते.**

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>एवढे महत्व श्री. भदाणे सारख्या त्या किरकोळ अधिका–यास देवु नये. एवढया सदस्यांना जमिनिवर बसावे लागते.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>हा महासभेचा अपमान आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, श्री. भदाणे सारख्या जनसंपर्क अधिका–याच्या विरोधात तुम्ही सर्व जमिनिवर बसण्याची आवश्यकता नाही. त्याला महानगरपालिकेत येणे सुध्दा मुश्किल होईल.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>मला असे वाटते की, जे लोक जमिनीवर बसत नाहीत त्यांचा श्री. भदाणेला पाठींबा आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, खाली जमिनिवर बसून जे नगरसेवक ओरड करत आहेत. चार,चार अनाधिकृत बांधकामावर कारवाई झाली पाहिजे. माझे बोलणे प्रथम ऐकुन घेतले जावे मला प्रथम बोलु दया त्यानंतर आपल्याबरोबर येवुन बसतो. एक मिनिटात गप्प होतील, ऐकुन घ्या, मी काय बोलु इच्छितो ते. प्रथम माझे ऐकुन घेतले जावे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>श्री. भुल्लर महाराजजी, आपल्या विषयी बोलत आहोत का? आपण बसून घ्या.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>मला प्रथम बोलु दिले जावे त्यानंतर मी आपल्याबरोबर येवुन बसतो. माझा श्री. भदाणे यांना पाठिंबा नाही आहे. परंतु माझा बेकायदेशीर बांधकामांना विरोध आहे. माझे म्हणणे आहे की, उदया सकाळपासुनच त्यांच्यावर कारवाई करणे सुरु केले पाहिजे. अनाधिकृत बांधकामे जमिनीच्या पातळीवर येत

नाहीत तोपर्यंत निष्कासित केली जावी. एक सुध्दा अनाधिकृत बांधकाम उभे राहता कामा नये. सर्व जमिनिच्या पातळीपर्यंत आली पाहिजेत.

<u>उप–महापौर :–</u>मी महापौरांच्यावतीने आयुक्तांना आदेश देतो की, श्री. भदाणे यांना आताच्या आता उपायुक्त पदावरुन दुर करावे.

<u>सदस्य श्री. तुलसीदास वसिटा :–</u>मा. महापौरजी, जेव्हा श्री. भदाणे प्रभाग समिती क्र. ४ चे प्रभाग अधिकारी होते त्यावेळेस त्यांच्या काळात किती अनाधिकृत बांधकामे झाली आहेत?

<u>महापौर :–</u>सर्व सदस्यांनी आताच्यावेळेस शांत रहावे, पुढच्या वेळेस बघु या.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. आयुक्त साहेब, श्री. भदाणे यांना निलंबित करा, निलंबित केल्याशिवाय आम्ही जमिनिवरुन उठणार नाही, निलंबित, निलंबित, निलंबित. मी आमच्या शहराच्या आमदारांना विनंती करतो की, आपण सुध्दा आमच्यात सहभागी व्हा. आपण सुध्दा आमच्यात सहभागी होवून जमिनिवर बसावे व श्री. भदाणे यांना निलंबित करण्यासाठी आदेश दया.

<u>सदस्य श्री. सुंदर मंगतानी :–</u>श्री. भदाणे यांना निलंबित करण्याविषयी आपण एवढा विचार का करत आहात? आपण सुध्दा त्यांना सामिल आहात काय?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मी उप–महापौरांचे अभिनंदन करतो, त्यांनी आम्हांला साथ दिली.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>उप–महापौर महोदय, तो तुमचा मानसपुत्र आहे का?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, मला सुध्दा बोलण्याचा अधिकार आहे. या विषयावरील माझे बोलणे ऐकुन घेतले जावेत. निर्णय घेण्याअगोदर माझे सुध्दा ऐकुन घेतले जावे. आपण काहीही करा जेवढी काही अनाधिकृत बांधकामे आहेत ती सर्व जमिनदोस्त झाली पाहिजेत. केवळ शटर काढुन किंवा पत्रे काढुन फोटो काढुन आणता कामा नयेत. सर्व बांधकामे जमिनदोस्त झाली पाहिजेत. अशा प्रकारचा आपण आदेश काढा.

<u>उप–महापौर :–</u>मा. महापौरांच्या वतीने मी आयुक्तांना आदेश देतो की, श्री. सुरेश जाधव यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे जेवढया काही अनाधिकृत बांधकामांची यादी दिली आहे.......

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>त्या व्यतिरिक्तही जेवढी काही अनाधिकृत बांधकामे आहेत,..........

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u> कोणतेही एका सदस्याचे नाव न घेता ज्यांनी ज्यांनी अनाधिकृत बांधकामांची यादी दिली आहे ती सर्व अनाधिकृत बांधकामे............

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सर्व अनाधिकृत बांधकामे जमिनदोस्त केली पाहिजेत.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>महापौर महोदया, जरा लक्ष दया. आयुक्त साहेब, जरा लक्ष दया. या सर्व नगरसेवकांनी श्री. भदाणेबद्दल जो आक्षेप घेतला, त्यास आम्ही काही विरोध करत नाही. ज्या नगरसेवकाचे अनाधिकृत बांधकाम असेल त्याला सुध्दा निलंबित केल्याशिवाय सोडु नये. आता तुम्ही जो निर्णय घेत आहात त्याला आम्ही विरोध करत नाहीत. पण जमिनिवर बसलेल्या या नगरसेवकांमधील कुणाचे जर अनाधिकृत बांधकाम असेल तर त्या नगरसेवकाला निलंबित केला पाहिजे. कारण नगरसेवकच अनाधिकृत बांधकामे करतात. आणि नगरसेवकाचे अनाधिकृत बांधकाम तोडु नये म्हणुन श्री. भदाणेला बोलतात.....

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>मा. महापौर महोदया, असाही आपण आदेश दया की, श्री.बी.बी. मोरे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे कुठल्या नगरसेवकाचे बांधकाम असेल तर त्या नगरसेवकाचे पद सुध्दा रद्द झाले पाहिजे. श्री. मोरे साहेबांच्या म्हणण्याला मी अनुमोदन देतो.

<u>सदस्य श्री.सुरेश जाधव:–</u>मा. आयुक्त साहेब, जे नगरसेवक अनाधिकृत बांधकाम करत असतील त्यांचे पद आपण रद्द करु शकतात.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मी तेच म्हणत आहे, नगरसेवकाचे जर अनाधिकृत बांधकाम असेल ना तर ते तोडले जाईल व त्यास निलंबित केले जाईल.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>जर अनाधिकृत बांधकामे आपण तोडली नाहीत तर न्यायालयाचा अपमान आहे. न्यायालयाचा अवमान झालेला आहे. कारण आपल्याकडे मी जी माहिती दिली आहे त्यामध्ये स्पष्ट लिहिले आहे की, अनाधिकृत बांधकाम झालेले आहे. आणि या संदर्भात न्यायालयात जर कोण गेले तर आपल्यावर आरोप होवु शकतात. म्हणुन मी आपणांस निवेदन करतो की, आपण त्वरीत श्री. भदाणे यांना निलंबित करावे. आणि हे जे अनाधिकृत बांधकामे आहेत ती तोडण्यात यावीत.

<u>सदस्य श्री. बी.बी मोरे :–</u>उप–आयुक्त साहेब, चौकशी न करता तुम्ही निलंबित करणार? त्याच्यावर कुठलाही दोषारोप न ठेवता त्यास जर तुम्ही निलंबित केले आणि उदया जर तो कोर्टात गेला, हे जे जमिनिवर बसले आहेत ना त्यांना येथुन घरी जावे लागेल. तो कोर्टात जाईल. कोर्टात जाईल.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>आपण चौकशी करा, त्यासाठी पंधरा दिवसाचा वेळ दया. व तोडण्यास गेल्यानंतर, जर कोणी यांना पैसे देवुन बांधकाम केले असेल तर त्यावेळेस तो सांगेन की, मी यांना पैसे देवुन बांधकाम केलेले आहे. त्यावेळेस हे सर्व चौकशी मध्ये येईल. यासाठी आपण पंधरा दिवसाची वेळ दया पंधरा दिवसात सर्व अनाधिकृत बांधकामे जमिनीच्या पातळीत आणा. आणि पंधरा दिवसानंतर चौकशीनंतर दोषी आढळले तर त्यांना निलंबीत करा.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>मा. महापौर, व आयुक्त साहेब, माझी लक्षवेधी असून मला बोलु दिले जात नाही.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>श्री. भदाणेवर चौकशी बसवा, चौकशीत दोषी आढळले तर निलंबित करा, त्याबाबत मी नाही असे म्हणत नाही.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>माझ्याकडे अगोदरच चौकशीचा अहवाल आहे. आपणांस दाखवतो. हा पहा.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>चौकशीविना, दोषारोपाविना, निलंबित करणे हे काय आहे? हा काय प्रकार आहे? हे अख्खा दिवस आपापल्या बाकावर बसले होते त्यांना आता तेथे बसायचे नाही म्हणुन जमिनीवर बसले आहेत.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>मा. आयुक्त साहेब, कुणाकडुन व्यक्तीगत अनाधिकृत बांधकामांची यादी घेवुन अनाधिकृत बांधकामे तोडु नका. संपुर्ण शहरामध्ये सर्वसाधारणपणे जेवढी काही अनाधिकृत बांधकामे आहेत, त्यांच्या विषयी लॉटरी सिस्टम काढुन ज्याची पहिली चिठ्ठी निघेल ते बांधकाम प्रथम जमिनदोस्त करा.

<u>सदस्य श्री. बी.बी.मोरे :–</u>कॅम्प नं. ५ पासुन अनाधिकृत बांधकामांची यादी काढायची कॅम्प नं.१ पर्यंत.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>सन्माननिय महापौर महोदया, हा अनाधिकृत बांधकामाविषयीचा विषय आहे. शासनाच्या धोरणानुसार आणि उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महानगरपालिका अनाधिकृत बांधकाम निष्कासित करण्यास बांधिल आहे. अनाधिकृत बांधकाम झाल्यानंतर, तक्रार प्राप्त झाल्यानंतर आपण कारवाई करतो. ब–याचवेळा असे बांधकाम परत परत होते, तेव्हा आपण परत ते बांधकाम तोडतो. बांधकाम होण्याचे प्रमाण आणि तोडण्याचे प्रमाण याच्यात कोठेतरी एकवाक्यता असावी. त्यादृष्टीने श्री. भदाणे यांच्याकडे उप–आयुक्त पदाचा कार्यभार सोपविला आहे. त्यांच्यावर अतिरिक्त आयुक्त आहेत. श्री. भदाणे हा त्या विभागाचा प्रमुख जरी असला तरी त्याच्यावर पर्यवेक्षण करण्याचे काम अतिरिक्त आयुक्त करत आहेत. त्यामुळे श्री. भदाणे त्या विभागाचा सर्व्हे सर्व्हा नाही. अतिरिक्त आयुक्त त्याच्यावर निर्णय घेतात, त्यानुसार श्री. भदाणे कार्यवाही

करतात. श्री. भदाणे फक्त ज्या ठिकाणी माझ्याकडे तक्रारी प्राप्त होतात, अथवा अतिरिक्त आयुक्तांकडे तक्रारी प्राप्त होतात त्या तक्रारींच्या बाबतीत कार्यवाही करण्याचे श्री. भदाणे यांना आदेश देण्यात आलेले आहे. बाकीच्या अनाधिकृत बांधकामांच्याबाबतीत सहा. आयुक्त आहेत, त्या त्या विभागाचे ते कार्यवाही करतात. यात श्री. भदाणे यांना पाठीशी घालण्यात किंवा अनाधिकृत बांधकामांना पाठींबा देण्यास प्रशासनाचा कोणताही उद्देश नाही. नियमाप्रमाणे अनाधिकृत बांधकाम तोडणे हे प्रशासनाचे काम आहे. या नियमानुसारच प्रशासन काम करते. मला असे वाटते की, श्री. भदाणे यांनी काही चुका केल्या असतील तर त्याच्याविरुध्द कारवाई करणे हे उचित राहिल. मी त्यास पाठींबा देत नाही. जर अशा काही चुका निदर्शनास आल्या असतील तर चौकशी केली जाईल व चौकशी केल्यानंतर त्यास निलंबित केले जाईल. तत्पुर्वी जी अनाधिकृत बांधकामांची यादी दिली आहे त्या यादीप्रमाणे मी उदया जेसीबी व प्राक्लेन मशिन मागवतो. माझी ही सभागृहाला विनंती आहे, मध्ये कोणी येवु नये. नाहीतर नंतर फोन येतात व त्यामुळे काम होत नाही. बांधकाम न तोडण्याचे मलाही माहित आहे. माझी सभागृहाला परत हात जोडुन कळकळीची विनंती आहे. जर तुम्ही एकदा गंभीरता दाखविली तर सर्व अनाधिकृत बांधकामे जेसीबी आणि प्राक्लेने आणुन तोडतो. मध्ये कोणीही येवु नये अशी मी विनंती करतो. आपण सहकार्य दया मी स्वत: जावुन ही अनाधिकृत बांधकामे तोडतो.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—आयुक्त साहेब, तुम्हांला माझी विनंती आहे, अनाधिकृत बांधकामाची जेवढी काही यादी दिली आहे ती सर्व बांधकामे तोडा. त्याच्यामध्ये जर कुणी नगरसेवक आला तर तुम्हांलाही येथुन घालविल्याशिवाय राहणार नाही. कोणी नगरसेवक मध्ये आला तर त्याविषयीचा अहवाल शासनास दया. त्याला तुम्ही अनर्ह करा. तो सदस्य अनर्ह झालाच पाहिजे. मग तो नगरसेवक श्री.बी.बी. मोरे असो किंवा आणखी कोणी असो. या मताचा मी आहे.

आयुक्त (श्री.अशोक बागेश्वर):—मला असे वाटते की, सभागृह माझ्या मताशी सहमत होईल.

सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—मी श्री. मोरे यांच्या मताशी सहमत आहे. अनाधिकृत बांधकामे जमिनदोस्त करा, जर कुण्या एखादया व्यक्तीचा फोन येतो की अमुक एकाचे बांधकाम आहे ते तोडायचे नाही हे ऐकता कामा नये. कुणाकडे लक्ष देता कामा नये. आपण सकाळपासुन आपले काम लाईनीत चालु करा. व लॉटरी काढा. आणि एक एक बांधकाम जमिनदोस्त करा. सांयकाळी ५.३० वाजता पाच पाच अनाधिकृत बांधकामांची यादी काढा.

आयुक्त (श्री.अशोक बागेश्वर):—ज्या ज्या तक्रारी आहेत, त्यांच्याबाबतीत लॉटरी सिस्टमनुसार रोज कार्यवाही करु. पाच पाच अनाधिकृत बांधकामे रोज घेवु या.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—आणि जो नगरसेवक मध्ये आला असेल त्याचे नाव पुढील महासभेत सांगितले जावे म्हणजे आम्ही त्याचा येथे उजादुजा करु.

आयुक्त (श्री.अशोक बागेश्वर):—माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, दोष देण्याचा उद्देश नाही. फक्त आपणाला विनंती आहे की, अनाधिकृत बांधकामे तोडण्यासाठी मला सहकार्य करा एवढीच विनंती आहे बस्स.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—आयुक्त साहेब, आपण बोललात आम्ही मान्य करतो. परत माझा तोच एक मुंद्दा आहे. चार चार उप—आयुक्त येथे आहेत ते सक्षम आहेत की नाहीत? जो व्यक्ती या शहरात पहिल्यापासुन वादग्रस्त ठरला आहे, जो व्यक्ती मार खातो त्याला तुम्ही त्याच जागेवर ठेवता? हे कुठपर्यंत योग्य आहे? आपण चार उप—आयुक्त ठेवले आहे, एका जनसंपर्क अधिका—यास तुम्ही एवढे मोठे पद देता? हेच चुकीचे आहे. अनाधिकृत बांधकामे तोडा अगर नका तोडु तो नंतरचा प्रश्न आहे.

आयुक्त (श्री.अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, जी नेमणूक आहे ती नियमानुसार आहे. मला माहित आहे, नियम आहे, नियमानुसार आहे. जर चुकीची असेल तर आपण दाखवा उदया मी ती रद्द करतो. आपण नियम दाखवा कोणत्या नियमानुसार नाही.

**यावेळी काही सदस्य बचाव बचाव अशा घोषणा देत होते.**

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>अनाधिकृत बांधकामे तोडण्याची जबाबदारी कोणत्या अधिका—यावर सोपवत आहात?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>प्रत्येक प्रभागाच्या प्रभाग अधिका—यावर जबाबदारी सोपविण्यात यावी व आयुक्तांनी त्यांच्यावर पर्यवेक्षण करावे.

<u>आयुक्त (श्री.अशोक बागेश्वर):—</u>प्रत्येक प्रभागात प्रभाग अधिकारी आहे तेथिल अनाधिकृत बांधकामाची लॉटरी सिस्टीम नुसार लॉटरी काढली जाईल व त्यानुसार लॉटरी काढुन अतिरिक्त आयुक्त पर्यवेक्षण करतील. तोपर्यंत त्याला निलंबित करणार नाही का?

यावेळी सदस्य श्री. जीवन इदनानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>मा. महापौरजी, या शहरात किंवा कुठल्याही महानगरपालिकेत अनाधिकृत बांधकामे तोडणे त्यासाठी कोणत्याही आयुक्तास महासभेच्या कोणत्याही अनुमतीची किंवा योजनेची बिल्कुल आवश्यकता नाही. अनाधिकृत बांधकामे निष्कासित करणे हे आयुक्तांचे कर्तव्य आहे. या शहरात जेथे कोठेही अनाधिकृत बांधकाम ते १०० टक्के निष्कासित झाले पाहिजे. तुटल्यानंतर त्याचे पुन्हा बांधकाम होता कामा नये. यासाठी तुम्हांला आमच्याकडुन कोणत्याही परवानगीची योजनेची आवश्यकता नाही, कोणी मध्ये येवु नये, कोणी मला विचारु नये, मला कोणी थांबविणार नाही. कोणत्याही नगरसेवकास असा कोणताही अधिकार देण्यात आलेला नाही की, जी कोणत्याही अनाधिकृत बांधकामावरील कारवाई संदर्भात त्यांनी कुणास फोन करावा. मग तो अधिकारी कोणताही आयुक्त असो, अतिरिक्त आयुक्त असो, उप—आयुक्त असो किंवा तोडफोड करणारा कोणताही अधिकारी असो. त्यास आपण हे बांधकाम तोडू नका असे सांगण्याचा कोणत्याही नगरसेवकास अधिकार दिलेला नाही. अशा प्रकारे जो अधिकार नाही आहे, त्याचा जर कुणी नगरसेवक वापर करत असेल तर आयुक्तांना योग्य ती कार्यवाही करण्याचा पुर्णपणे अधिकार आहे. व हे शहर अनाधिकृत बांधकामाची समस्या पुर्णपणे भोगत आले आहे.या अगोदर ८५५ अनाधिकृत इमारती त्यानंतर महाराष्ट्र शासनाकडुन आम्ही अध्यादेश काढुन आणला ज्यामुळे मुश्किलीनी ज्या लोकांची राहती घरे तुटणार होती ती आम्ही वाचवु शकलो. म्हणुन अशा प्रकारची एखादी नविन दुर्घटना घडु नये म्हणुन कुठे एक इंचाचे सुध्दा अनाधिकृत बांधकाम होवु नये आणि जर झाले तर ते तोडणे अति आवश्यक आहे. व जी तोडली जातात ती पुन्हा बांधली जातात. त्यामुळे चुकीचा संकेत मिळत आहे की कुठे ना कुठे काही चुकीचे काम होत आहे ज्यामुळे तुटलेली अनाधिकृत बांधकामे पुन्हा उभी राहत आहे. ती सर्व पुन्हा तोडली पाहिजे. त्यानुसार एक एक अनाधिकृत बांधकाम तोडले पाहिजे. त्यात माझ्या मतानुसार श्री. भदाणे हा काही विषय नाही. कुणी व्यक्ती हा विषय नाही. अशी मानसिकता निर्माण झाली पाहिजे की, या शहरातील एक एक अनाधिकृत बांधकाम तोडले पाहिजे आणि अशा प्रकारची कठोर कारवाई केली पाहिजे. जेणेकरुन यापुढे कुणाची अनाधिकृत बांधकाम करण्याची हिम्मत होणार नाही. एक विटेचे सुध्दा बांधकाम करण्याची हिम्मत कुणाची होणार नाही. अशा प्रकारची आपणांस येथे ताकद दाखवावी लागेल. शक्ती दाखवावी लागेल. व आम्हां सर्व नगरसेवकांना मा. महापौर, उप—महापौरांना आयुक्तांच्या पाठीशी उभे राहावे लागेल. अशा प्रकारच्या ताकतीच्या आधारावर या शहरास आपण योग्य दिशेन घेवुन जावु शकेल. धन्यवाद।

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u> मा. महापौरजी, मला असे वाटते येथे जी चर्चा होत आहे, त्यानुसार सभागृहाचा सन्मान ठेवणे आवश्यक आहे. श्री. भदाणे यांच्याकडे जो कार्यभार सोपविला आहे तो जर अन्य दुस—या एखादया कार्यक्षम अधिका—याकडे सोपविला तर ही सर्व समस्या संपृष्टात येईल. धन्यवाद।

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>मा. महापौरजी, माझा या गोष्टीला विरोध नाही. परंतु एक लक्षात घ्या की श्री. सुरेश जाधव यांचा प्रभाग आहे. मी अभिनंदन करतो की, त्यांनी घडुन आणले पण त्यातल्या त्यात मी विचारतो. श्री. सुरेश जाधवच्या प्रभागामध्ये डॉ. श्री. सदाफुले यांचे अनाधिकृत बांधकाम चालु आहे त्याचे काय केले यांनी? डॉ. श्री. सदाफुले यांचे बांधकाम चालु आहे, काय असते प्रत्येक नगरसेवकाच्या म्हणजे दिव्याखाली थोडा अंधार आहे. आणि म्हणुन माझे मत आहे की, पहिले नगरसेवकांची अनाधिकृत बांधकामे तोडा.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. आयुक्त साहेब, जरा आमचे सदस्य जास्तच तावात आले. त्यांना माहितीच नाही. मला तर असेही वाटते की, ते अनाधिकृत बांधकामास समर्थन देत आहेत. याच्यावरुन सिध्द होत आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>डॉ. सदाफुलेचे अनाधिकृत बांधकाम तुमच्या प्रभागात येतात.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मला वाटते हे शहराचे आयुक्त आहेत. मला तर संशय येतो की, हे पण त्याच्यामध्ये गुंतलेले आहेत. मला आयुक्तांना असे म्हणायचे आहे की, त्यांनी आपल्या अधिकारान्वये यांना निलंबित करण्यात यावेत. हे अनाधिकत बांधकामास समर्थन देत आहेत.

**यावेळी काही सदस्य शेम शेम अशा घोषणा देत होते.**

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मी एक इंच सुध्दा अनाधिकृत बांधकाम केलेले नाही, पाहिजे तर मी नगरसेवक पदाचा राजीनामा देईल.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>कशाला भडकतात आता? बोलु दया ना मला पण?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>१९९७ पासुन मी नगरसेवक आहे. आणि कुणी सांगितले की, एक इंच जागा श्री. मोरे यांनी अनाधिकृत घेतलेली आहे. मी आता राजीनामा देईल, आता राजीनामा देईल.

<u>सदस्य श्री.सुरेश जाधव :–</u>मा. आयुक्त साहेब, हे जे म्हणत आहेत ना डॉ. सदाफुले यांच्या बांधकामाबाबत, बांधकामाचे ते ठिकाण माझ्या प्रभागात येतच नाही. आणि येत असले तरी ते तुटले पाहिजे. आणि हे जे वकिली करत आहे अधिका–यांची ते यांना शोभत नाहीत. हे शहराचे एक जबाबदार व्यक्ती आहेत, ८५५ अनाधिकृत इमारतीचा मुद्दा या शहराने भोगला आहे, तसा प्रकार पुन्हा या शहरामध्ये होवु नये याकरीता मी ही लक्षवेधी सूचना येथे मांडली आहे. मी अगोदरच म्हटल आहे की, येथे आंधळ दळत आणि कुत्र खातय हे या ठिकाणी सिध्द होत आहे. आणि हे सिध्द होत आहे की, हे अनाधिकृत बांधकामास प्राधान्य देत आहेत. एका अधिका–याला वाचविण्याचा प्रयत्न करत आहेत. माझी आयुक्तांना विनंती आहे की, अशा नगरसेवकाला त्वरीत निलंबित कराव.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>अरे तुम्ही निंलबित व्हाल, बघा आता तुम्ही, तुमच्या बाबतीत येईल. एकाही नगरसेवकाचे नाव आले ना तर मी आरपीआय पक्षाच्यावतीने स्टेज लावल्याशिवाय राहणार नाही. काय समजलात काय तुम्ही? अरे, तुम्ही अनाधिकृत बांधकामे करायची आणि तुमची तोडली मग? श्री. भदाणेला हटाओ?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>श्री. काजळे, श्री. समतानी, श्री. भदाणे यांना निलंबित करण्याचे आदेश निघाले होते, त्यापैकी श्री. काजळे आणि श्री. समतानी यांना निलंबित केले, म्हणजे गरीबावर तुम्ही अन्याय करणार काय? त्या दोघांना निलंबित केले श्री. भदाणेला का ठेवले शिल्लक? तिघांना निलंबित करण्यासाठी एकत्रित आदेश निघाले होते. आयुक्त साहेब, मला एक सांगा, प्रभाग समिती ४ मध्ये श्री. भदाणे किती वर्षापासुन तेथे सहा. आयुक्त आहे? त्याच्या कालावधीमध्ये झालेले अनाधिकृत बांधकाम तोडण्यासाठी त्याला उप–आयुक्त म्हणुन पाठविले जाते? ही कुठली पध्दत झाली? उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासन निर्णयानुसार जो अधिकारी, जो कर्मचारी अनाधिकृत बांधकामास जबाबदार असणार त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. त्यानुसार तुम्ही कारवाई केली? एका ठिकाणी कारवाई दाखविता, त्यामध्ये श्री. काजळे आणि श्री. समतानी या कनिष्ठ अधिका–यांना तुम्ही निलंबित करता आणि श्री. भदाणेला तुम्ही उप–आयुक्त करतात? त्याच्या विरोधात आज बहुतांश नगरसेवक जमिनीवर बसले आहेत, आपणाकडे चार चार उप–आयुक्त आहेत, चार उप–आयुक्त असतांना श्री. भदाणेला उप–आयुक्त करण्याची गरज काय पडली तुम्हांला? ते उप–आयुक्त सक्षम नाहीत काय? नसतील तर पाठवुन दया घरी. एक अतिरिक्त आयुक्त, आयुक्त, तीन उप–आयुक्त आहेत. एवढे सर्व मंजुर पदे असतांना एका जनसंपर्क अधिका–याला उप–आयुक्त केले जाते, काय गरज काय? एकतर हे उप–आयुक्त लायक नाहीत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>टिलसन मार्केट तोडण्यास जातात, येथिल आमदार त्या लोकांना थापड मारुन परत पाठविले जाते तो अधिकारी तेथिल अनाधिकृत बांधकाम तोडु शकत नाही. असे अधिकारी काय काम करतील? आमचा अधिकारी मार खावुन येईल काय?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>अधिकारी जर काम करु शकत नसतील तर त्यांना घरी पाठवुन दया. काय गरज आहे अशा अधिका–यांची?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>त्यावर काय कारवाई झाली? आमचा अधिकारी मार खावुन येणार काय? ते बांधकाम तुटले सुध्दा नाही.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>काय करायचे? त्या आदेशानुसार? त्याच्यावर कारवाई होवु दया त्यानंतर चौकशी करा. जर दोघांना तुम्ही निलंबित करतात तर यास निलंबित का नाही करत? एकाला एक न्याय आणि दुस–याला वेगळा न्याय, हा न्याय कुठला? आदेश तुमचाच? काय आहे त्याच्यामध्ये स्पष्ट करा.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>श्री. काजळे आणि श्री. समतानी यांना तीन चार वेळा मी स्वतः फोन करुन सांगितले होते, श्री. काजळे यांना एका बांधकामाचा दरवाजा काढण्यासाठी मी स्वतः नागपुरवरुन फोन करुन सांगितले होते. परंतु त्यांनी काम केले नाही. म्हणुन त्यास निलंबित केले. श्री. समतानीच्या बाबतीतही तसेच झाले आहे. आयुक्तांचे आदेश पाळले जात नाहीत. आयुक्तांनी स्वतः सांगुनही ते काम करत नाहीत म्हणुन त्यांना निलंबित केले. ते कारण वेगळे होते तुमचे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>मा. महापौरजी मी माझ्या लक्षवेधीवर अजुनपर्यंत चर्चा केलेली नाही. तर कृपया मला बोलु दिले जावे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>आयुक्त साहेब, ते ब–याचवेळे पासुन उभे आहेत त्यांच्या प्रश्नाला उत्तर दया साहेब.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, शांतपणे सभेचे कामकाज चालु दया. आपण सर्वजण काय करत आहात?

<u>सदस्य श्री. रव्रिंद बागुल :–</u>साहेब जात नाहीत साहेब आपल्या प्रश्नाचे उत्तर देत आहेत.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>बोलता बोलता मी संत कबिरांचे वचन म्हणतो. ''भुरा देखने मै चला, भुरा न मिला कोई, जब झाका मुझमे, मुझसे भुरा न कोई''

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>मा. आयुक्त साहेब, जेव्हा श्री. भदाणे यांना प्रभाग समिती क्र. ४ चा प्रभाग अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात आले होते............

<u>महापौर :–</u>मी आयुक्त साहेबांना असा आदेश देते की, श्री. भदाणे साहेबांचा पदभार काढुन घ्यावा.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>ठिक आहे, मा. महापौर महोदया, मा. महापौर महोदयांनी आदेश दिला आहे की, श्री. भदाणे यांचा पदभार काढुन घ्या. त्यावर मी कार्यवाही करतो.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>तोडफोडीचे काय?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>तोडफोड चालु होईल. माझी सर्व सन्माननिय सदस्यांना विनंती आहे, महापौरांनी आदेश दिला आहे की, श्री. भदाणे यांचा पदभार काढुन घ्यावा म्हणुन.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>आणि परत कधी देणार? परत कधी त्याला उप–आयुक्त करणार तेही सांगुन टाका. मा. महापौरांनी सांगितले की, त्याचा पदभार काढुन घ्या म्हणुन परंतु तुम्ही त्यास पुन्हा कधी पदभार

देणार तेही सांगुन टाका. म्हणजे आम्ही जातो घरी? वा,वा काय खेळ खंडोबा चालविला आहे तुम्ही लोकांनी? एक श्री. युवराज भदाणे हा काय पुर्ण महापालिकेचा मालक झाला काय? का आयुक्त आहे तो?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—पदभारावर पदभार देत आहात.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—आयुक्त साहेब, हे फक्त तुमच्याबद्दल खेळखंडोबा मांडतात. महापौरांनी आदेश दिल्यानंतर त्यात महापौरांचा सहभाग नाही आहे. महापौरांनी आदेश दिला आहे त्याच्या पुढची कारवाई तुम्हांला काय करायची आहे?

सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—तुम्हांला कारवाई करायला सांगितली आहे, तुम्ही श्री. युवराज भदाणे यांना का पाठीशी घालता? एवढया तक्रारी आल्यानंतर सुध्दा? तुम्ही येथे दिशाभुल करत आहात? दोन उप—आयुक्तांना निलंबित करता आणि एकाला जवळ करता तुम्ही?

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, सचिव साहेब, एकदा महापौरांनी आदेश दिल्यानंतर, रुलिंग दिल्यानंतर त्यानंतर चर्चा होत असेल तर महापौरांचा हा अपमान आहे. आम्ही महापौरांबरोबर आहोत.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सचिव साहेब, तुम्ही सांगा, महापौरांनी एकदा रुलिंग दिल्यानंतर काय झाले पाहिजे? कायदा सांगा आपण की कायदा काय आहे?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—उप—महापौरजी भावना समजुन घ्या.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—श्री. सुरेश जाधव यांचा रक्तदाब वाढला आहे, लवकरात लवकर कार्यवाही करा. साहेब, उदया सकाळ आपल्या महापालिकेत काही होईल?

उप—महापौर :—मा. महापौरांच्या आदेशानुसार श्री. युवराज भदाणे यांना तात्काळ निलंबित करण्यात येत आहे, असे आयुक्तांना आदेश देत आहे आणि त्यांच्यावर चौकशी बसविण्यात यावी.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—बेकायदेशीर बांधकामावरील कारवाईसाठी?

उप—महापौर :—अनाधिकृत बांधकामांवर कारवाई होईल. आयुक्त साहेबांनी तसे सभागृहात आश्वासन दिले आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—आयुक्त साहेबांनी उभे राहुन सांगावे, उदयापासुन बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई सुरु होईल. बेकायदेशीर बांधकामे जेवढी काही असतील त्या सर्वांची यादी मागविली जावी. असे नाही की आता जी यादी दिली आहे तिच दयाल? उदया कुणी अनाधिकृत बांधकामाची यादी देईल ती सुध्दा घेतली जावी व सर्व अनाधिकृत बांधकामांवर कारवाई झाली पाहिजे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—आयुक्त साहेब, १०० शिलाई मशिन कुणाकडुन घेतल्या त्याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—मी आधीच या सभागृहात जाहिर केले आहे. निवेदन केलेले आहे. अनाधिकृत बांधकामांच्याबाबतीत कुठलीही हाईघाई होणार नाही. त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—सन्माननिय महापौर, उप—महापौर व आयुक्त साहेब, श्री. भदाणे यांना निलंबित करत आहात चांगली गोष्ट आहे, माझा त्यास विरोध नाही. पण त्याच्यावर जो देखरेख करतो अतिरिक्त आयुक्त त्याचे काय?

सदस्य श्री. सुरेश जाधव :—मा. आयुक्त साहेब, मा. महापौरांच्या आदेशानुसार उप—महापौरांनी जे आदेश दिले आहेत त्याबाबतीत आपण अदयाप काही निवेदन दिले नाही. त्याचे काय? आदेश दया आयुक्त साहेब. आयुक्तांनी अदयापपर्यंत काही निर्णय दिलेला नाही. उप—महापौरांच्या आदेशाचे पालन केलेले नाही.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—उप—महापौर साहेब, हा आदेश तुम्ही महापौरांच्या परवानगीने दिला की, अगोदर महापौर वेगळे बोलल्या होत्या. आता तुम्ही वेगळे बोलत आहात? तुम्ही महापौरांच्या वतीने बोललात का?

उप—महापौर :—मा. महापौरांच्या परवानगीने.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—तसे सांगा ना?

सदस्य श्री. सुरेश जाधव :—आयुक्तांनी अदयापपर्यंत त्यावर काही प्रतिक्रिया दिलेली नाही.

उप—महापौर :—आयुक्त साहेब सांगतील. प्रतिक्रीया देतील.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, सभागृहाचे कामकाज महापौरांच्या अध्यक्षतेखाली चालते आणि महापौर जे आदेश देतात ते सर्वांवर बंधनकारक आहे, मला याबाबतीत वेगळे स्पष्टीकरण करण्याची गरज नाही.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—साहेब, आपल्याला तर कसलीच गरज नाही, आमच्या शहराबद्दल काही गरज नाही. ते आम्हांला कळते. परंतु एक आयुक्त म्हणुन आपल्या तोंडुन दोन शब्द ऐकुन घ्यावेत एवढीच आमची अपेक्षा आहे.

महापालिका सचिव :—ठिक आहे, लक्षवेधी सूचना..........

सदस्य श्री. सुरेश जाधव :—आयुक्तांनी अदयाप आदेश दिलेला नाही.

सदस्य श्री. प्रकाश सावंत :—मा. आयुक्त साहेब, महापौरांनी जो आदेश दिलेला आहे तो मानेन एवढे तर म्हणा ना?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, मी आताच सांगितले की, महापौराचा आदेश सर्वांवर बंधनकारक आहे, त्यात आयुक्तही आलेत. आता वेगळे सांगण्याची काही गरज नाही.

यावेळी सदस्य श्री. राजु जग्यासी, श्री. अंकुश म्हस्के हे सभागृहातुन बाहेर गेले.

सदस्य श्री. राजेश वानखेडे :—पण तुम्ही ही गोष्ट मान्य करता काय?

यावेळी सदस्य श्री. जीवन इदनानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—मी सांगतो, सभागृहाचे कामकाज हे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली चालते. त्या पीठासीन अधिकारी आहेत. त्यांचे आदेश आयुक्तांवर बंधनकारक आहेत.

यावेळी जमिनिवरील बसलेले पालिका सदस्यांनी आपले आसनग्रहण केले.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—धन्यवाद।

महापालिका सचिव :—लक्षवेधी सूचना क्र.२ जिचे सुचक आहे श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

लक्षवेधी सूचना याप्रकारची आहे.....

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

सुचकाचे नावः— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

**विषय :—** सर्व्हे नं. ५८, मौजे म्हारळ, उमपा जकात नाका नं. ५ मागे, उल्हासनगर—१ येथे भुखंडावर मुस्लीम कब्रस्तान दफनभुमी उमपा/नरवी/सजा/६०, दिनांक २९/१२/०९ रोजी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रशासनाने सदर भुखंड हस्तांतरण करण्यास केलेल्या मागणी विरोधात लक्षवेधी सूचना

मा. जिल्हाधिकारी यांचे कडे सर्व्हे नं. ५८, मौजे म्हारळ, उमपा जकात नाका नं.५ मागे, उल्हासनगर—१ येथे भुखंडावर मुस्लीम कब्रस्तान दफनभुमी उमपा/नरवि/सजा/६०, दिनांक २९/१२/२००९ रोजी मा. जिल्हाधिकारी यांचे कडे प्रशासनाने सदर भुखंड हस्तांतरण करण्यास मागणी केलेली आहे. प्रशासनाने भविष्यात निर्माण होणा—या समस्या, अडचण व कायदा व सुव्यवस्था यांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी दफनभुमी देणेपुर्वी खालील मुद्यांचा गांभीर्यपुर्वक दखल घ्यावी. तसेच संबंधित विभागाने या प्रकरणी दिलेलया अहवालाचा दखल द्यावी.

१) सदर ठिकाणी दरवर्षी येणारा महापुर त्यामुळे रोगराई पसरते. याबाबतचा दिनांक ८/१/२००७ रोजी मा. तहसिलदार, उल्हासनगर याचा अहवाल आहे.

२) सदर ठिकाणी उल्हासनदी अंतर्गत जलशुध्दीकरणाचा प्रकल्प आहे.

३) सदर भुखंड हा म्हारळ शेतकरी सामुदायिक सोसायटीच्या खाजगी मालकीची मिळकत आहे.

४) या विरोधात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल आहे.

५) प्रारुप मंजुर आराखडयात शिट नं. ४७ येथे जागा आरक्षित आहे.

६) सदर ठिकाणी बहुतांश हिंदु वस्ती आहे. त्यामुळे जातीय तेढ निर्माण होवु शकते.

७) सदर रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ (२४० फुटाचा) आहे. रस्ता रुंदीकरणात सदर भुखंड बांधित होईल. सदर विभागाची आपणांस ना हरकत घ्यावी लागेल.

८) सदर परिसरात अनेक नामवंत शाळा आहेत. त्यामुळे विदयार्थ्यांच्या शिक्षणास पोषक वातावरण राहणार नाही.

९) मा. उपसंचालक, नगररचना विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांनी मा. आयुक्तांना सदर भुखंड न देण्याबाबत निर्देश दिले आहेत.

१०) महाराष्ट्र शासन, पाणी पाठबंधारे विभाग, महाराष्ट्र अभियांत्रिकी पाहणी संस्था, यांचा दिनांक जानेवारी २००७ रोजी सदर भुखंड बाबत अहवाल (मरी रिपोर्ट) दिला आहे. सदर अहवाला सदर भुखंडात दफनभुमीमुळे उल्हासनदीचे पाणी दुषित होईल असा अहवाल आहे.

११) कार्यकारी अभियंता सो. ठाणे लघु पाटबंधारे विभाग, कळवा, जि. ठाणे यांचे दिनांक ११/२/२००८ रोजी उपसंचालक, नगररचना कोकण विभागास सदर भुखंड न देण्याबाबत निर्देश दिले आहेत.

१२) जनहित याचिका क्र. १४०/२००६ पारित आदेशानुसार प्रधान सचिव नगरविकास यांचे दिनांक ९/४/२००८ रोजी बैठकित सदर भुखंड न देण्याबाबत निर्देश दिले आहेत. इतर जागा दयावी.

१३) नगरविकास विभाग क्र. टीपीएस/१२०८/९०, नवि—१२, दिनांक १६ एप्रिल, २००८ आदेशानुसार मा. आयुक्तांना सदर भुखंड न देण्याबाबत निर्देश दिले आहेत.

१४) उपसंचालक, कोकण विभाग यांनी दिनांक २७/३/२००८ रोजी मा. आयुक्तांना निर्देश दिले आहेत की त्यांना इतर जागी दफनभुमी दयावी.

१५) दिनांक १५/६/२००९ रोजी विधी विभाग, उमपा यांचे निर्देशपत्रकात तत्कालीन आयुक्त व इतर यांनी शिट नं. ४७ या आरक्षित भुखंडावर दफनभुमी देण्याचे निर्देश आहेत.

तरी श्री. अशोक बागेश्वर यांनी सर्व्हे नं. ५८, मौजे म्हारळ, उमपा जकात नाका नं. ५ मागे उल्हासनगर–१ येथे भुखंडावर मुस्लीम कब्रस्तान दफनभुमी उमपा/नरवि/सजा/६०, दिनांक २९/१२/२००९ रोजी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रशासनाने सदर भुखंड हस्तांतरण करण्यास केलेली मागणी ही वरिष्ठांनी दिलेलया आदेशांच्या नियमबाहय आहे. संबंधित विभागाच्या अहवालाचा तसेच नागरीकांच्या जिवितांचा विचार केला जावा. भविष्यात पाण्याचा पेट्रोलपेक्षा जास्त महत्व येणार आहे. त्यामुळे नदीलगत दफनभुमी देणे सर्व नागरीकांच्या हिताचे नाही. तरी या लक्षवेधी सूचनाची महासभेत चर्चा करण्यात यावी ही विनंती.

---

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>प्रशासनाने या लक्षवेधीचे काही उत्तर तयार केले आहे का?

यावेळी सदस्या श्रीमती निलम रावत, श्रीमती ज्योती चैनानी, डॉ. निना नाथानी, श्रीमती जयश्री पाटील, श्रीमत चंद्रा टेकचंदानी, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. नरेंद्र दवणे हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>नगररचनाकार (श्री. अ.पा.गुरगुळे):–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका चालु असलेल्या कब्रस्तानच्या संदर्भात १३/३/२००८ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिले होते, त्यानुसार ९/४/२००८ रोजी मा. सचिव, नगरविकास यांच्याकडे सभा आयोजित केली होंती. त्या सभेमध्ये दफनभुमीसाठी, वापरासाठी जागा योग्य नसलयाच्या दृष्टीकोनातुन निर्णय घेण्यात आलेला होता. त्यासाठी दफनभुमीसाठी महापालिकेने सर्व संबंधीतांच्या संमतीने पुररेषेने बाधित न होणारी व नियोजनाच्या दृष्टीने योग्य अशी पर्यायी जागा उपलब्ध करण्याबाबतची कारवाई करावी अशा स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत त्याप्रमाणे ती कारवाई करण्यात येईल.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>आता येथे दयायचे नाही ना?

<u>नगररचनाकार (श्री. अ.पा.गुरगुळे):–</u>नाही, जरुरी नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> प्रधान सचिवांचा आदेश आहे, सर्व संबंधितांची बैठक झाली होती, सर्व तेथे उपस्थित होते. तर आता दफनभुमीसाठी ही जागा दयायची नाही? आयुक्त साहेब आपण सांगा. येथे दफनभुमीसाठी जागा दिली जाणार नाही.

<u>नगररचनाकार (श्री. अ.पा.गुरगुळे):–</u>पुररेषने बाधित होती म्हणुन ही जागा दिली जाणार नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> आयुक्त साहेब याचे आपण उत्तर दया ना?

<u>नगररचनाकार (श्री. अ.पा.गुरगुळे):–</u>मा. सचिव, नगरविकास विभाग यांच्या आदेशानुसार सदरची जागा न देता दुसरी पर्यायी जागा देण्यात येईल.

यावेळी सदस्य श्री. गोविंदराम लुंड, श्री. भारत राजवानी, श्री. प्रभुनाथ गुप्ता सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> ही जागा दिली जाणार नाही? आयुक्त साहेब, आपणही उभे राहुन सांगा. हा जो आदेश आहे तो आपल्या बोलल्यानुसार दिला आहे ना यांनी?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>सन्माननिय महापौर महोदया, त्या सभेचे इतिवृत्त आहे, त्याची नगरविकास विभागाच्या सचिव साहेबांकडुन प्रत घेतो.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> इतिवृत्ताची प्रत मी दिली आहे. ती वाचुन पहा ना?

यावेळी शासनाचे दिनांक १६ एप्रिल, २००८ चे पत्र व त्या सोबत दिनांक ९/४/२००८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी मा. महापौरांना इतिवृत्तात समावेश करण्याप्रयोजनार्थ सादर केले ते पुढीलप्रमाणे आहे.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—खात्री करुन घेतो. त्यानंतर कार्यवाही केली जाईल.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— ही जी प्रत आहे ती बोगस आहे का? मेढीचा रिपोर्ट आहे की तेथे दफनभुमीस जागा दिली तर आपले जलशुध्दी केंद्र तेथे आहे, किडे असलेले पाणी पिण्यास देवुन लोकांना मारायचे आहे का?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—त्यानंतर सचिव साहेबांकडे एक बैठक झाली होती. तेथे वॉल वगैरे बांधायला सांगितला होता. ठिक आहे आता सचिव साहेबांना अहवाल पाठवितो व कार्यवाही करतो.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— दफनभुमीसाठी ती जागा दिली जाणार नाही. सचिव साहेबांच्या आदेशानुसार आपण रिपोर्ट पाठवाल का? सचिव साहेबांचा जो आदेश आहे त्याचे अनुपालन होईल ना?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सचिव साहेबांना रिपोर्ट पाठवितो.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सचिव साहेबांचा आदेश आहे, त्यांनी रिपोर्ट नाही मागविला आहे? सचिव साहेबांनी दुसरी जागा देण्यास सांगितले आहे. आपण सचिव साहेबांच्या आदेशाचे अनुपालन करणार की नाहीत?

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—सन्माननिय महापौर महोदया, आयुक्त साहेब, आज उल्हासनगरमध्ये मुस्लिम बांधव १ लाख राहतात. माझी अशी विनंती आहे की, उल्हासनगरमध्ये मुस्लिम बांधवांना कब्रस्तान नाही काय? काय देणारच नाही आपण? जागा कोठे रिकामी आहे?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—दुसरी जागा दया,.तेथे महापौरांचा रिपोर्ट आहे, महापौरांचा.

सदस्य श्री. रविंद्र बागुल:—त्याठिकाणी जागा कुठे रिकामी आहे? तहसिलदार व जिल्हाधिकारी साहेबांनी आदेश दिलेला आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—तहसिलदार व जिल्हाधिकारी पेक्षा प्रधान सचिव आहे. प्रधाव सचिवांकडे सभा झालेल्या आहेत, प्रधान सचिवांनी स्पष्ट केले आहे की, तेथे दफनभुमी केली तर पिण्याच्या पाण्यात किडे घुसतील व पाणी दुषित होईल. उल्हास नदीचे दुषित पाणी आपणांस लोकांना पाजायचे आहे का? शहरासाठी, लोकांसाठी काम करा.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—श्री. महाराजजी, म्हारळ गावा शेजारी हिंदु लोकांची स्मशानभुमी आहे, ते सर्व नदीच्या बाजुलाच आहे, तर तेथिल पाणी दुषित होत नाही काय?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—हिंदुंच्या स्मशानभुमीत जाळुन राख होते. दफनभुमीत तेथेच पडुन राहतात व किडे निघतात. ते किडे नदीत जातील. मेडीचा अहवाल आहे. मेढी समजतात काय आपण, मेढी काय आहे ते? महाराष्ट्र इंजिनिअर रिसर्च इन्स्टीटयुट त्याचा अहवाल आहे. आपणांस वाचता येत असेल तर वाचा नाही वाचता येत असेल तर दुस—यास वाचायला लावा. आपण घरी बसा याविषयावर बोलुच नका.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—आपण असे बोलु नका. येथे आम्हांस बसविले आहे............ ठिक आहे बोला आपण.

यावेळी सदस्य श्री. भारत राजवानी, श्री. प्रभुनाथ गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मेढीचा अहवाल आपण जर वाचाल तर आपण म्हणाल जागा दुस—या ठिकाणी दया.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—ठिक आहे दुस—या जागी. पण जागा कुठे आहे? आपण या जागेस सुध्दा देत नाहीत दुसरी जागा सुध्दा नाही. मग देणार कोठे? येथुन कल्याणला जावे लागते. येथुन कल्याण ५ किलो मिटरवर आहे. आज मुस्लीम लोकांना उल्हासनगर येथुन कल्याणला जावे लागते. आज आपणांस पत्रही आले आहे. यापुढे असे काही मयत झाले तर महानगरपालिकेसमोर येवुन उभे राहिल. तर यांना कब्रस्तानासाठी आपण कोठे जागा देणार? महानगरपालिकेत जागा आहे का? त्यांची कबर तयार करण्यासाठी महानगरपालिकेत जागा असेल तर आपण दया. मला तर असे वाटते की, प्रत्येक माणुस मेल्यानंतर त्यास कब्रस्तान व स्मशानभुमी जरुरीचे आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—आता माझे ऐकुन घ्या. प्रधान सचिवांच्या आदेशानंतर तत्कालीन आयुक्त श्री. समीर उन्हाळे यांनी सबमिशन तयार केले होते १५/६/२००९ ला, ते हे सबमिशन आहे. त्यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे. ४६ क्रमांकाचे आरक्षण आहे. शिट नं. ४६ मधील जागा कब्रस्तानासाठी आरक्षित आहे. ती जागा त्यांना दिली जावी. त्यासाठी आमची काही हरकत नाही.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—आम्ही त्यांच्या विरोधात नाही.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—आयुक्त साहेब, आमचे म्हणणे एवढेच आहे की, उल्हासनगरमध्ये जवळ जवळ १ लाख मुस्लिम बांधव राहतात. त्यांना कब्रस्तान देणे योग्य आहे की नाही? कधी देणार? कित्येक वर्षापासुन फक्त पेपरबाजी चालत आली आहे.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, मी येथे स्पष्ट केलेले आहे, मा. प्रधान सचिव यांच्याकडील बैठकीचे जे इतिवृत्त आहे, त्याबाबतीत त्यांच्याकडुन खात्री करुन घेवुन त्यांच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**नाही, जर श्री. महराज यांची त्याबाबतीत हरकत असेल तर त्यांनी दुसरी जागा दयावी. उल्हास नदीच्या बाजुला एक प्लॉट आहे. सगळे प्लॉट नदीच्या बाजुलाच आहेत. बाकी सर्व प्लॉट भरलेलेच आहे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**सन्माननिय महापौरजी, श्री. रविंद्र बागुल हे आता २००७ मध्ये निवडून आले आहेत. परंतु ज्यावेळेस आम्ही १९९७ मध्ये निवडुन आलो त्यावेळेस आम्ही पहिला पहिला हा विषय घेतला होता की मुस्लीम बांधवांना कब्रस्तानसाठी जागा दयावी. आणि त्यासाठी कुठल्याही सदस्याने विरोध केलेला नाही.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**विरोध नाही तर मग हे काय आहे? श्री. बी.बी. मोरे साहेब, विरोध नाही तर मग हे काय आहे?

**सदस्य श्री. बी.बी.मोरे :—**त्यांना म्हारळची जागा दाखविली, वाटेल तेवढया जागा दाखविल्या, मुस्लीम समाजाला त्या जागा मान्य नाहीत. ते म्हणतात आम्हांला हीच जागा पाहिजे. अशातला तो वाद आहे. तो वाद मंत्रालयापर्यंत गेलेला आहे. तेथुन काय निर्णय होईल त्याप्रमाणे त्यांना जागा दिली जाईल.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**श्री.बी.बी. मोरे साहेब, वालधुनीचा एक प्लॉट होता त्याच्याबाबतीत सुध्दा वाद झाला. नंतर मनसेने तेथे काही फलक लावले त्यानंतर तेथुन निघाले ते आता म्हारळला गेले. तेथे सुध्दा वाद होईल मग दुसरीकडे जाणार? म्हणजे माणुस मेल्यानंतर त्याला दफन करण्यासाठी जागा दया. महानगरपालिकेला माझी एवढी विनंती आहे की, कुठेतरी त्यांना कब्रस्तानासाठी जागा करुन दयावी. त्यांचे सुध्दा येथे मिळकती आहे. त्यांचे सुध्दा येथे संख्याबळ आहे.

**सदस्य श्री. रमेश चव्हाण :—**मा. आयुक्त साहेब, कब्रस्तानास जागा देण्यास आमचा कुणाचाही विरोध नाही.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**मग हे काय आहे साहेब?

**सदस्य श्री. रमेश चव्हाण :—**जरा ऐका तुम्ही जरा? समजुन घ्या. मेढीचा अहवाल आहे की, त्याठिकाणी पुर आला की १० फुट उंचीपर्यंत पाणी भरते हे पाणी जर भरले तर ते पाणी आपल्याला, उल्हासनगरवाशीयांना पिण्यासाठी जे पाणी येते ते दुषित होईल म्हणुन त्यांचा अहवाल आहे की, दफनभुमीसाठी तेथे जागा देण्यात येवु नये. आमचा कुणाचाही विरोध नाही.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**श्री. चव्हाण साहेब, त्यांना फाउंडेशन बांधुन फेन्सींग बांधुन जर दिली तर असे काही होणार नाही. तुम्ही इमारत बांधता तिचे सांडपाणी कोठे जाते?

यावेळी सदस्या श्रीमती निलु चांदवानी, श्रीमती मंजु पोपटानी, श्रीमती लीलाबाई आशान, श्रीमती शकुंतला पाटील, कु. शकुतला जग्यासी, श्रीमती चंद्रा टेकचदांनी, श्रीमती कविता सिरवानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**उच्च न्यायालयात हा विषय झालेला आहे, त्यानंतर प्रधान सचिवांकडे या विषयी बैठक झालेली आहे. त्यानंतर तो विड्रॉ झालेला आहे. व प्रधान सचिवांनी उच्च न्यायालयात स्पष्टपणे लिहुन दिले आहे की आम्ही दफनभुमीसाठी जागा देणार नाही. अन्य दुस—याठिकाणी देवु. त्यानुसार आपण कोठेही आपण दफनभुमीसाठी जागा दया आमचा विरोध नाही. कब्रस्तानासाठी जागा देण्यास आमचा विरोध नाही. परंतु तेथे जागा दिली जावु नये. मेढीचा अहवाल आहे की, दुषित पाणी उल्हासनगरवाशियांना ते पिण्यास देवु इच्छित नाहीत. ती जागा सोडुन आपण कोठेही दया. त्या जागेसाठी माझा विरोध आहे. अन्य कोठेही दया.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे? विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** दिनांक १९/१२/२००९ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

यावेळी सदस्य श्री. मोहन साधवानी, श्री. तुलसीदास वसिटा, श्रीमती रजनी महाडिक, श्रीमती मालती करोतिया हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**महापौर :—** मागील सभेचे दिनांक १९/१२/००९ रोजीचे विशेष महासभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. २ :—** दिनांक १९/१२/२००९ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. जीवन इदनानी
अनुमोदकाचे नाव : श्री. लाल पंजाबी

**महासभा ठराव क्र. ६४ अ** **दिनांकः– ११/२/२०१०**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक १९/१२/२००९ रोजीच्या विशेष महासभेचे पृष्ठ क्र. १ ते १२ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

एकमताने

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३:–** अनुकंपा तत्वाने ३ उमेदवारांना नियुक्ती देणे

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**महापौर :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३ :–** अनुकंपा तत्वाने ३ उमेदवारांना नियुक्ती देणे

**प्रस्तावना**

अनुकंपा तत्वाने नियुक्ती देणेबाबत शासनाने दिनांक २३/४/२००८ रोजीच्या निर्णयान्वये अनुकंपा योजनेसाठी सुधारीत कार्यपध्दती प्रसिध्द केली आहे.

त्या अन्वये, १) अनुकंपा तत्वाने नियुक्ती देणेकामी गट 'क' व गट 'ड' करीता प्रतिक्षासुची तयार करण्यात आली आहे. २) शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे दिनांक २२/८/२००५ पुर्वीच्या प्रतिक्षा यादीमधील पात्र उमेदवारांना तीन वर्षात टप्प्या टप्प्याने म्हणजेच प्रथम वर्षी ५० टक्के पुढील वर्षी २५ टक्के व तद्नंतर २५ टक्के अशी नियुक्ती देणे अपेक्षित आहे. त्यानुसार मागील वर्षी सन २००८ मये एकुण उमेदवारांच्या ५० टक्के अर्थात १५ उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली आहे. ३) सबब, यावर्षी सन २००९ मध्ये २५ टक्के उमेदवारांना म्हणजेच एकत्रित परिक्षा यादीतील अ.क्र. १६ ते २३ व सन २०१० मध्ये २५ टक्के उमेदवारांना म्हणजेच एकत्रित प्रतिक्षा यादीतील अ.क्र. २४ ते ३० येथिल उमेदवारांना अनुकंपा तत्वाने नियुक्ती द्यावयाची आहे.

मात्र, प्रस्तावित उमेदवारांची शैक्षणिक अर्हता विचारात घेता उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर सरळसेवेने नियुक्ती देणेकामी केवळ २ विद्युत मदतनीस व ३ संगणकचालक अशी पदे रिक्त आहेत. तरी अनुकंपा तत्वाने नियुक्ती देणेकामी ॲड. भोळे यांचेकडील दिनांक ३०/७/२००९ रोजीच्या पत्राद्वारे यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय तसेच गट 'क' व गट 'ड' करीता प्रतिक्षासुचीमधिल अ.क्र. १६ ते २३ मधील त्यांची शैक्षणिक पात्रता व आरक्षणानुसार संवर्ग आणि पदे याचा विचार करता उपलब्ध उमेदवारांची यादी पुढीलप्रमाणे––

| अ.क्र. | प्रतिक्षा सुचीतील क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराची शैक्षणिक अर्हता | प्रस्तावित पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | १६ | श्रीम. सुनंदा गुलाब सोनवणे | ७ वी | विद्युत मदतनीस |
| २ | १७ | श्री. मनिष अरुण भोवते | १२ वी | संगणक चालक |
| ३ | १८ | श्री. मिथुन देवू भोईर द्वारा जिजाबाई देवू भोईर | ९ वी | विद्युत मदतनीस |

तरी ॲड. भोळे यांचेकडील दिनांक ३०/७/२००९ रोजीच्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे उमेदवारांना अनुकंपा तत्वाने नियुक्ती देणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) अन्वये मा. महासभा पटलावर मान्यतेसाठी सादर करीत आहे.

**महासभा ठराव क्र: ६५** **दिनांकः– ११/२/२०१०**

सुचकाचे नाव :–श्री. रामसागर यादव
अनुमोदकाचे नाव :– श्री. राम पारवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे अनुकंपा तत्वाने श्रीमती सुनंदा गुलाब सोनवणे व श्री. मिथुन देवू भोईर द्वारा जिजाबाई देवू भोईर यांना विद्युत मदतनीस, व श्री. मनिष अरुण भोवते यांना संगणक चालक पदी नियुक्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

**विषय क्र. ४ :—** उल्हासनगर—३ फारवर लाईन चौक येथिल शहिद प्रेम रामचंदानी पुतळयाची दिशा बदणेस मान्यता देणे

———————————————————————————————————————————

**<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आपल्या येथे राष्ट्रीय पुरुषांचे जे पुतळे उभारले जातात, त्या पुतळयांच्या भोवती होर्डिंग्ज लावले जातात, त्यामुळे त्या पुतळयांना विदयुतता येते. आता जो प्रस्ताव आपण मांडलेला आहे, त्याच्या बाजुला इतक्या होर्डिंग्ज लावल्या आहेत की, तो पुतळा कुणाचा आहे तेच दिसत नाहीत. अशा ठिकाणच्या होर्डिंग्ज महानगरपालिकेने स्वत:च्या अधिकारात काढुन घ्यावे. व यापुढे पुतळयांच्या आजुबाजुस कोणतेही होर्डिंग्ज लागणार नाही याची दक्षता महानगरपालिकेने घ्यावी.

<u>महापालिका सचिव:—</u>ठिक आहे? पास?

यावेळी सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर, श्रीमती सुजाता रिजवानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ४:—** उल्हासनगर-३ फारवर लाईन चौक येथिल शहिद प्रेम रामचंदानी पुतळयाची दिशा बदणेस मान्यता देणे

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर—३ फॉरवर लाईन चौकात सार्वजनिक बांधकाम उपविभागातर्फे सुशोभिकरणाचे काम सुरु असून सदर ठिकाणी महापालिकेतर्फे उत्तर—पुर्व दिशेकडे मुख असलेले शहिर प्रेम रामचंदानी यांचा पुतळा बसविण्यात आलेला आहे.

तेथिल फॉरवर लेन शॉपकिपर्स असोसिएशन यांनी त्यांचे पत्राद्वारे सदर पुतळयाची दिशा बदलून कल्याण—अंबरनाथ हा वाहतूकीचा मुख्य रस्ता असल्याने दक्षिण—पूर्व दिशेकडे पुतळयाचे मुख करणेस विनंती केली आहे. सदर कामास तेथिल रहिवासी व दुकानदारांची हरकत नसल्याचे त्यांनी कळविले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे सदर पुतळयाची दिशा बदलून कल्याण—अंबरनाथ रोडवरील दक्षिण—पूर्व दिशेकडे पुतळयाचे मुख करणेस पोलिस खात्याच्या मान्यतेच्या अधिन राहून महापालिकेकडून नाहरकत देणेस मा. महासभेची मंजूरी प्राप्त होणे आवश्यक असल्याने मा. महासभेच्या मान्यतेस प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र: ६६</u> <u>दिनांक:— ११/२/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता
अनुमोदकाचे नाव :— श्री. राम पारवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर-३ फॉरवर लाईन चौक कल्याण—अंबरनाथ रोडवरील दक्षिण—पूर्व दिशेकडे पुतळयाचे मुख करणेस पोलिस खात्याच्या मान्यतेच्या अधिन राहून शहिद प्रेम रामचंदानी पुतळयाची दिशा बदलणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

**विषय क्र. ५ :—** वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांचे वारसास नियुक्ती देणे.

———————————————————————————————————————————

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ५:—** वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांचे वारसास नियुक्ती देणे.

प्रस्तावना

लाड कमिटीच्या शिफारसी वारसा (वशिला) पध्दतीच्या अंमलबजावणीबाबत नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकिर्ण—२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२,नवि—६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक ३० जुन १९९४ नुसार महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा वैद्यकीय दृष्टया अपात्र ठरविल्यानंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त, दिवंगत, वैद्यकीय सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | सफाई कर्मचा—यांचे नाव | सेवा निवृत्ती/मृत्यु दिनांक | वारसाचे नाव | कर्मचा—याशी असलेले नाते संबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती हिराबाई विश्वनाथ पाटोळे | वैद्यकीय सेवा निवृत्ती दिनांक १५/६/२००९ | श्री. अरुण विश्वनाथ पाटोळे | मुलगा |
| २ | श्री. हरी चंदर अल्हाट | स्वेच्छा सेवा निवृत्ती दिनांक ३१/१०/२००९ | श्री. किशोर हरी अल्हाट | मुलगा |
| ३ | कै. फकिरचंद घुरे | मृत्यु दिनांक २३/११/२००६ | श्री. सतबिर फकिरचंद घुरे | मुलगा |
| ४ | कै. साहु चंदर पाठारे | मृत्यृ दिनांक ५/१/२००९ | श्री. गणेश साहु पाठारे | मुलगा |
| ५ | कै. रुख्मिणी बन्डु कांबळे | मृत्यु दिनांक २४/११/२००८ | श्रीम. कौशल्याबाई कृष्णा शेजुल | मुलगी (विवाहीत) |
| ६ | श्रीमती लता दौलत चंडालिया | स्वेच्छा निवृत्ती दिनांक ३०/९/२००९ | श्री. जितु दौलत चंडालिया | मुलगा |
| ७ | श्रीमती जनाबाई सखाराम मगरे | वैद्यकिय सेवा निवृत्ती | श्री. सिध्दार्थ लक्ष्मण मोहाड | भाचा (बहिणीचा मुलगा) |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिका—याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रु. किंवा त्याहुन अधिक आहे असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असा त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेस निहित असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राकिारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त, दिवंगत, स्वेच्छा, वैद्यकीय सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्काने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ६७ दिनांकः– ११/२/२०१०

सुचकाचे नाव :– श्री. तुलसीदास वसिटा

अनुमोदकाचे नाव :– श्री. जे.के. ढोके

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांचे ७ वारसांस नियुक्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ६ :– सफाई कामगार/मुकादम चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.**

---

काही सदस्य :–पास–पास......

महापौर :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ६:–** सफाई कामगार/मुकादम चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

प्रस्तावना

महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर कर्मचा–यास ३ महिन्यांची नोटिस देवून स्वेच्छा निवृत्ती घेता येते. तसेच नियम ७१ अन्वये रुग्णता निवृत्ती वेतनासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३० वर्षाच्या सेवेनंतर व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षाच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | सफाई कर्मचा–यांचे नाव | अर्हतकारी सेवा | नियम | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती दयाबाबई दिपचंद | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३०/११/२००९ |
| २ | श्रीमती शामो किशनपाल | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०१/२०१० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | श्री. महेश डिब्बन | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०१/२०१० |
| ४ | श्रीम. रुपवती ओमी | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०१/२०१० |
| ५ | श्री. अशोक गेणु म्हस्के | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०१/२०१० |
| ६ | श्रीम. पुनिया रतनपाल | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०१/२०१० |
| ७ | श्रीम. सिमा राजु संकत | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०१/२०१० |
| ८ | श्री. सतबिर मिठ्ठन | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०१/२०१० |
| ९ | श्री. जयप्रकाश सुमेरा | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०३/२०१० |
| १० | श्री. सर्जेराव सुखदेव गायकवाड | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०१/२०१० |
| ११ | श्रीम. ममो प्रितम | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०१/२०१० |

तरी वरील सफाई कामगार यांना ''स्वेच्छा सेवा निवृत्ती'' देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: ६८** **दिनांकः— ११/२/२०१०**

सुचकाचे नाव :— श्री. लालबिहारी यादव

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे ११ सफाई कामगार यांना ''स्वेच्छा निवृत्ती'' देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :—** श्री. एस.पी. सुतार, मजुर पाणी पुरवठा विभाग यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ७:—** श्री. एस.पी. सुतार, मजुर पाणी पुरवठा विभाग यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

**प्रस्तावना**

श्री. एस.पी. सुतार, मजुर पाणी पुरवठा विभागात यांनी स्वेच्छा निवृत्ती मिळणेबाबत दिनांक ३/१०/२००९ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. श्री. एस.पी. सुतार, मजुर हे उल्हासनगर महानगरपालिकेत दिनांक ८/८/१९८५ पासुन कार्यरत आहेत. त्यांची एकुण सेवा २० वर्षापेक्षा जास्त झाली आहे. महाराष्ट्र

नागरी सेवा (सेवा निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम ६६ पोट नियम (१) अन्वये श्री. एस.पी. सुतार, मजुर यांना यांच्या अर्जानुसार दिनांक ३१/१२/२००९ रोजी स्वेच्छा निवृत्ती घेता येईल तसेच त्यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रलंबित व प्रस्तावित नाही.

वरील वस्तुस्थिती पाहता श्री. एस.पी. सुतार, मजुर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम ६६ पोट नियम (१) अन्वये दिनांक ३१/१२/२००९ रोजी स्वेच्छा निवृत्ती घेण्याबाबतचा प्रस्ताव मा. महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्तावित आहे.

**महासभा ठराव क्र:** ६९      **दिनांक:— ११/२/२०१०**

सुचकाचे नाव :— श्री. भारत राजवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. एस.पी. सुतार, मजुर पाणी पुरवठा विभाग यांना स्वेच्छा निवृत्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात हिवताप निर्मुलन कार्यक्रमांतर्गत करारतत्वावर १८ कर्मचा—यांची नेमणुक करणेस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आयुक्त साहेब, सफाई कर्मचा—यांना किंवा हिवताप निर्मुलन कर्मचा—यांना मान्यता दिली पाहिजे त्यासाठी प्रस्ताव चांगला आहे. पण आठ दिवसापुर्वी सफाई कर्मचारी, स्वच्छता निरिक्षक व त्या विभागाचे उप—आयुक्त त्यांच्याशी चर्चा झाल्यानंतर असे आढळुन आले की, उल्हासनगरमध्ये मच्छरांचा जबरदस्त प्रादुर्भाव आहे. मच्छर कशामुळे होतात ते नक्की आपल्या कर्मचा—यांना कळत नाही की काय? बाजुच्या शहरामध्ये मच्छर कमी आहे. बदलापुरला गेल्यानंतर मच्छर कमी आहेत आणि उल्हासनगरला आल्यानंतर जास्त वाटतात. संध्याकाळी फिरणेही मुश्किल किंवा एका जागेवर बसणेही मुश्किल होते. त्याची कारणे काय? आपली फवारणी चालु आहे. धुराची मशिन चालु आहे. यावर नक्की उपाययोजना काय? हिवताप निर्मुलनासाठी आपण अठरा कर्मचारी ठेवतोय. जसे आपल्याकडे साफसफाईसाठी जे कर्मचारी आहेत, साफसफाई होते, काही ठिकाणी कमी होत असेल. पण मच्छर याठिकाणी कशामुळे जास्त आहेत? आपण जी फवारणी करतो त्यामध्ये काय दोष आहेत काय? किंवा मलेरीया ऑईल आणतो त्यामध्ये काही दोष आहेत काय? किंवा आणखी काही दोष आहेत काय? जेणेकरुन मच्छरांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत. यावर्षी मच्छर जास्त आहेत. त्याची कारणे काय? आणि त्याच्यावर अटकाव कसा आणता येईल ज्या पध्दतीने बदलापुरला किंवा कल्याणला गेल्यानतर, कल्याणला सुध्दा काही भाग जो उल्हासनगरला लागुन आहे त्याठिकाणी किंवा ज्या ठिकाणी जास्त दुर्गंधी आहे त्याठिकाणी मच्छर आहेत. पण जो चांगला विभाग आहे त्याठिकाणी गेल्यानंतर मच्छर दिसुन येत नाही. त्याची कारणे काय आणि हे मच्छरांचे प्रमाण कमी कसे करता येईल, ते जरा पहा.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :**—सचिव साहेब, माझा माईक बरोबर चालत नाही तो जरा दुरुस्त करा. आता तो मी कसातरी चालवुन घेत आहे.

**महापालिका सचिव :**—चालु आहे ना, आपण प्रेमाने हाताळा.

**सदस्य श्री. बी.बी.मोरे :**—माझा माईक व्यवस्थीत चालत नाही.

**महापालिका सचिव :**—आपण प्रेमपुर्वक हाताळा जास्त जोर देवु नका.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :**—मी जास्त दाब देत आहे का, म्हातारपणात? सन्माननिय महापौरजी, सभागृहापुढे हा जो विषय आलेला आहे की, उल्हासनगर महापालिका क्षेत्रात हिवताप निर्मुलन कार्यक्रमांतर्गत करारतत्वावर १८ कर्मचा—यांची नेमणुक करणेस मान्यता देणे, आता या उल्हासनगर शहराची लोकसंख्या किती आहे? जवळ जवळ ७ लाखावर गेलेली आहे. त्यामध्ये हे १८ कर्मचारी कोठे कोठे काम करणार आहेत? एका प्रभागात करणार आहेत, एका प्रभाग समिती क्षेत्रात करणार आहेत, की दोन प्रभागात करणार आहेत? की आपण ज्या चार प्रभाग समित्या स्थापन केलेल्या आहेत, त्यांच्यामध्ये करणार आहेत? याचे काही स्पष्टीकरण झालेले नाही. तेव्हा मला असे सुचवायचे आहे, की येथे डॉ. जिंदे असतील त्यांनी यावर स्पष्टीकरण करावे. हे १८ कर्मचारी कुठल्या पध्दतीने काम करतील? त्यांना काही अवगत आहे का? नाही तर दुस—या एखादया कर्मचा—यांस हे काम दिले तर तो करु शकणार नाही. आणि त्या कर्मचा—यास काही शिक्षण आहे का? त्याला काही माहिती आहे का? आणि हे जे १८ कर्मचारी असतील त्याच्यामध्ये पुन्हा महापालिकेने वाढ करावी. १८च नाही त्यात वाढ करावी अशी माझी सूचना आहे.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :**—दोन मिनिटे सचिव साहेब, ३०५ सफाई कामगारांचे भरतीचे काय झाले?

**डॉ. जी.टी. जिंदे (वैद्यकीय आरोग्य अधिकारी ):**—आदरणीय महापौर, उप—महापौर, मा. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, १८ कर्मचा—यांचा आकडा आपण यासाठी दिलेला आहे, माहे जुन २००८ पर्यंत शासनाचें १८ आरोग्य कर्मचारी या महापालिकेत कार्यरत होते. २००८ मध्ये त्यांची इतरत्र बदली करण्यात आली. आणि त्यानंतर सदरहु पदे रिक्त आहेत. त्यामुळे हैक्टर बॉण्ड डिसीसेज आहेत. मलेरिया, डेंग्यु, चिकुनगुनिया यांच्याविषयी दोन,तीन महिन्यापुर्वी एक लक्षवेधी सुध्दा झाली. तर हा जो कर्मचारी वर्ग आहे, या कर्मचा—यांच्याबाबतीत सातत्याने आम्ही शासनाकडे मागणी करुनही शासनाकडुन त्यांच्या जागी दुसरे कर्मचारी मिळाले नाहीत. म्हणुन कमीत कमी जी गरज आहे, त्या गरजेप्रमाणे १८ बहुउद्देशीय कर्मचा—यांची आपण मागणी केली आहे. आणि आपली ही सहा आरोग्यकेंद्राला तीन कर्मचारी दिले जावेत. प्रत्येक आरोग्य केंद्रास तीन याप्रमाणे सहा आरोग्य कर्मचा—यांची आपण मागणी केली आहे. आणि एवढे कर्मचारी याआगोदर आपल्याकडे कार्यरत होते आणि मागच्या पावणेदोन वर्षापासुन ते कार्यरत नाहीत. प्रायोगिक तत्वावर आम्ही १८ कर्मचा—यांची मागणी केली आहे. श्री.बी.बी. मोरे साहेबांनी अतिशय चांगला मुद्दा उपस्थित केला आहे. की जनगणनेनुसार सहा लाखाची लोकसंख्या जरी आपण गृहित धरत असलो तरी सात लाख, आठ लाखापर्यंत लेकसंख्या गेली आहे. परंतु जनगणनेनुसारची कमित कमी सहा लाखाची लोकसंख्या गृहित धरुन अठरा कर्मचा—यांची मागणी केली आहे.

**काही सदस्य :**—ठिक आहे, पास—पास......

**सदस्य श्री. रमेश चव्हाण :**—मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, माझी एक तक्रार आहे ती मी लेखी स्वरुपात आपणाकडे दिलेलीही आहे. अॅन्थोनी हा जो ठेकेदार आहे, त्याची माणसे डब्बे घेवुन येतात, तर ते एक दिवस येतात व चार दिवस येत नाहीत. आपल्याकडुन पेमेंट तो कमी घेवुन जातो का? आणि दुसरे असे की, आपण जी नविन स्वीपींग मशिन आणलेली आहे, तीच्याबाबतीत तुम्ही जरा सर्व्हे करा. सकिंग करण्याची जी पध्दती असते ती सकिंग बरोबर होत नाही. रात्रीच्या वेळेस तो नुसता पाणी मारत फिरतो. यासाठी तुम्ही व्यवस्थीत सर्व्हे करा आणि त्यानंतरच त्याचे पेमेंट करा. कारण की आपल्या महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अगोदरच हलाखीच आहे आणि तो नुसता लुटायला बसला आहे. नविन नविन उपकरणे आणल्यामुळे आपण त्याला पैसे देतो. पण तसे काम सुध्दा आपण त्याच्याकडुन घेतले पाहिजे. ते डब्बेवाले प्रत्येक घरोघरी गेले पाहिजेत. आठ आठ दिवस डब्बेवाला गायब असतो, त्यांच्याठिकाणी पर्यायी माणुस

त्याला दयायचा असतो पण तो देत नाही. लेखी तक्रार देवुन मौखिकपणे तक्रार देवुन तसेच फोन करुन वारंवार सांगितले, तरी त्याच्याकडुन प्रतिसाद मिळालेला नाही तो जाड कातडीचा झालेला आहे. यासाठी तुमच्याकडुन कार्यवाही होवुन त्याचे पेमेंट थांबवावे अशी माझी तरी अपेक्षा आहे.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**मा. महापौर महोदया आणि आयुक्त साहेब, श्री. रमेश चव्हाण साहेबांनी हा जो मुद्दा उपस्थित केला आहे तो अगदी बरोबर आहे. मला सुध्दा हाच प्रश्न सतावत आहे. माझ्या सुध्दा प्रभागात एक दिवस डब्बेवाला येतो तर पाच दिवस येत नाही. त्याच्याकडे याबाबतीत तक्रार केलेली आहे.

**महापालिका सचिव :—**पास?

**काही सदस्यः—** पास, पास.....

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ८:—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात हिवताप निर्मुलन कार्यक्रमांतर्गत करारतत्वावर १८ कर्मचा-यांची नेमणुक करणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या ६,८०,९९१ एवढी आहे. महापालिका क्षेत्रात शासनाची हिताप निर्मुलन कार्यक्रमांतर्गत ३ आरोग्य सहाय्यक, १८ बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (एमपीडब्ल्यु) ची पदे मंजुर होती. हिवताप निर्मुलन कार्यक्रमांतर्गत काम करणारे कर्मचारी यांची महानगरपालिकेची पुर्वपरवानगी न घेता माहे जुन, २००८ मध्ये जिल्हा हिताप अधिकारी, ठाणे यांनी अन्य ठिकाणी प्रतिनियुक्ती/बदली केली आहे. तत्पुर्वी सन २००७ मध्ये आरोग्य सहाय्यकांची पदे देखिल काढुन घेण्यात आली आहे.

सदर आरोग्य कर्मचारी व एमपीडब्ल्यु यांची पुर्ननियुक्ती होणेकरीता मा. सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग) पुणे यांना विनंती केली आहे. त्या अनुषंगाने मा. सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग), पुणे यांनी सहा. संचालक, आरोग्य सेवा (हिवताप), ठाणे यांना कार्यवाही करणेबाबत कळविले होते. परंतु त्याबाबतीत कार्यवाही झालेली नाही. याबाबत त्यांना सदर बाब निदर्शनास आणुन दिलेली आहे.

हिवताप निर्मुलन कार्यक्रमांतर्गत कार्यरत एमपीडब्ल्यु ची प्रतिनियुक्ती अन्य ठिकाणी केल्यामुळे सदर कार्यक्रमांतर्गत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सर्व्हेक्षणाचे काम सद्यस्थितीत बंद आहे. तसेच रक्तनमुने गोळा करण्याचे काम देखिल अत्यल्प प्रमाणात आहे.

मागील वर्ष उल्हासनसगर शहरात संशयित ११ डेंग्युचे रुग्ण आढळुन आलेले आहेत. तसेच सद्यस्थितीत देखिल संशयित डेंग्युचे व चिकुनगुनियाचे रुग्ण आढळुन येण्याची शक्यता नाकारता येत नाही. किटकजन्य व जलजन्य आजाराचे संभाव्य उद्रेक टाळण्यासाठी पारेषण काळात रुग्ण शोध, किटक शास्त्रीय सर्व्हेक्षण, समुळ उपचार, आरोग्य शिक्षण इत्यादी उपाययोजना करणे ही कामे हिवताप कार्यक्रमांतर्गत कार्यरत आरोग्य सहाय्यक व एमपीडब्ल्यु ही कामे करत होते. परंतु सदर कर्मचारी काढुन घेतल्यामुळे पुरेशा मनुष्यबळाअभावी सदर उपाययोजना करणे शक्य नसल्यामुळे साथ उद्रेक होणे नाकारता येत नाही.

शासनाकडील प्राप्त सुचनांप्रमाणे पावसाळयात जलद ताप सर्व्हेक्षण, कंटेनर सर्व्हेक्षण, समुळ उपचार डासोत्पत्ती स्थानात गप्पी मासे सोडणे करीता बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी यांची आवश्यकता आहे. परंतु सदर पदे काढुन घेतल्यामुळे हिवताप नियंत्रणाकरीता पावसाळयापुर्वी व पावसाळयात करावयाच्या उपाययोजना करणे महानगरपालिकेस अडचणीचे झाले आहे.

तरी महानगरपालिका क्षेत्रातील हिवताप निर्मुलन कार्यक्रमांतर्गत, १८ एमपीडब्ल्यु यांची प्रायोगिक तत्वावर सुरुवातीच्या सहा महिन्याकरीता ठोक मासिक वेतनाने करार पध्दतीने नियुक्ती करण्याचे प्रस्तावित करणेत येते. सदर कर्मचा—यांकडुन हिवताप कार्यक्रमांतर्गत केली जाणारी वरील कामे करुन घेणे प्रस्तावित आहेत. तसेच शासनाचे कुटुंबकल्याण कार्यक्रम, लसीकरण कार्यक्रम, साथरोग नियंत्रण कार्यक्रम इत्यादी राष्ट्रीय कार्यक्रमाचे उद्दीष्ट देखिल त्यांना वाटप करण्यात येईल जेणेकरुन महानगरपालिकेस राष्ट्रीय कार्यक्रमाचे उद्दीष्ट साध्य करण्यास मदत होईल.

महानगरपालिका क्षेत्रात एकुण ६ नागरी आरोग्य केंद्र कार्यरत आहे. प्रत्येक नागरी आरोग्य केंद्रास तीन याप्रमाणे १८ पदांची सद्यस्थितीत महानगरपालिकेस आवश्यकता आहे. तसेच हिवताप नियंत्रण करणे ही सर्वस्वी जबाबदारी महानगरपालिकेची आहे. सदर पदांवर काम करणा–या कर्मचा–यांची शैक्षणिक अर्हता १० वी पास प्रस्तावित आहे.

सदर पदे वर्तमानपत्रात जाहिरात देवून सदर पदे भरण्याचे प्रस्तावित करणेत येते. प्राप्त अर्जातुन आवश्यक शैक्षणीक अर्हता धारण करणा–या उमेदवारांची निवड करुन त्यांना जिल्हा हिवताप अधिकारी, ठाणे यांचेकडुन प्रशिक्षणाकरीता पाठविणेत येईल. जिल्हा हिवताप अधिकारी, ठाणे यांचेकडे प्रशिक्षणाकरीता पाठविणेत येईल. जिल्हा हिवताप अधिकारी, ठाणे यांचे पत्रानुसार ते आटी वर्कस (क्षेत्र कर्मचारी) यांना २९ दिवसांकरीता रु. ६०७३/– एवढे एकत्रित वेतन अदा करतात.

सदर पदांवरील वेतनावर खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| पदनाम | पदांची संख्या | दरमहा मासिक ठोक वेतन | एका महिन्याकरीता अपेक्षित खर्च | सहा महिन्याकरीता अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (क्षेत्र कर्मचारी) | १८ | रु. ६०००/– | रु. १,०८,०००/– | ६,,४८,०००/– |

वरील पदांवरील खर्च महानगरपालिका अंदाजत्रक सन २००९–१० मधील आरोग्य केंद्र या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध तरतुद रु. ३०,००,०००/– यातुन शिल्लक तरतुद रु. २२,०७,०२३/– खर्च करण्याचे प्रस्तावित करणेत येते.

तरी मा. महासभेसमोर मान्यतेकरीता व निर्णयार्थ सविनय सादर.

महासभा ठराव क्र: ७० दिनांक:– ११/२/२०१०

सुचकाचे नाव :– श्रीमती विद्या निर्मले
अनुमोदकाचे नाव :– श्री. जे.के. ढोके

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात हिवताप निर्मुलन कार्यक्रमांतर्गत करारतत्वावर १८ बहूउद्देशिय आरोग्य कर्मचा-यांची नेमणुक करण्यास व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९** :– दिनांक १/९/२००९ च्या महासभा ठराव क्र. १७ मध्ये अंशत: बदल करण्याप्रयोजनार्थ ‘‘सेठ देवीचंद एच. वलेचा चौक’’ ऐवजी ‘‘सेठ देवीचंद एच. वलेचा मार्ग’’ असे नामकरण करण्यास मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ९**:— दिनांक १/९/२००९ च्या महासभा ठराव क्र. १७ मध्ये अंशत: बदल करण्याप्रयोजनार्थ ''सेठ देवीचंद एच. वलेचा चौक'' ऐवजी ''सेठ देवीचंद एच. वलेचा मार्ग'' असे नामकरण करण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील रस्त्यांचे व चौकांचे एकुण ७२ नामकरणाच्या प्रस्तावास महासभा ठराव क्र. १७, दिनांक १/९/२००८ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर ठरावातील अनु. क्र. ३९ वरील स्वामी नारायण पॅलेस, भाटीया हॉस्पीटल, उल्हासनगर—५ येथिल चौकास ''सेठ देवीचंद एच वलेचा चौक '' असे नामकरण करण्याऐवजी संगणकीय टंकलिखित चुकीमुळे''सेठ देवीचंद एच. वलेचा मार्ग '' असे नामकरण मंजुर करण्यात आले आहे.

मा. श्री. भारत गंगोत्री यांनी त्यांचे संदर्भिय पत्रान्वये सदर नामकरणाच्या प्रस्तावात सुधारणा करुन ''सेठ देवीचंद एच. वलेचा चौक'' असे नामकरण मंजुर करणेबाबत विनंती केली आहे.

तरी उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता स्वामी नारायण पॅलेस, भाटिया हॉस्पीटल, उल्हासनगर—५ येथिल चौकास ''सेठ देवीचंद एच. वलेचा चौक'' असे नामकरण मंजुर होणेस महासभेची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ७१ दिनांक:— ११/२/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. भारत राजवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिनांक १/९/२००९ च्या महासभा ठराव क्र. १७ मध्ये अंशत: बदल करण्याप्रयोजनार्थ ''सेठ देवीचंद एच. वलेचा मार्ग '' ऐवजी ''सेठ देवीचंद एच. वलेचा चौक '' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १०** :— महापालिकेतील कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना सुधारीत वेतन निश्चिती लागु करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १०:—** महापालिकेतील कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना सुधारीत वेतन निश्चिती लागु करणे.

<u>प्रस्तावना</u>

महापालिकेतील दोन वैदयकीय अधिकारी (श्रीमती) डॉ. एस.आर.रेलवानी, डॉ. राजा रिझवानी यांना राज्य शासनाने शासन आदेश क्रमांक वेपूर—१२०९/प्र.क्र.—२७/सेवा—९, दिनांक २२ एप्रिल, २००९ अन्वये सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २००९ लागू करुन त्यांची सुधारीत वेतन संरचना रुपयें ९३००—३४८००/— वेतन बॅड व रुपये ४४००/— ग्रेड वेतन अशी वेतनश्रेणी निश्चित करुन देण्यात आलेली आहे.

त्यानंतर वित्त विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय यांच्या कडील शासन अधिसूचना क्रमांक—वेपूर—१२०९/प्र.क्र. १५३/सुधारणा—७/सेवा—९, दिनांक ४/११/२००९ नुसार वैदयकीय अधिकारी यांना सुधारीत वेतनश्रेणी रुपये ८०००—१३५००/— विशेष वेतनश्रेणी लागू करुन सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे रुपये १५६००—३९१००/— वेतन बॅड व रुपये ५४००/— पे ग्रेड अशी निश्चित करण्यात आलेली आहे. महापालिकेतील दोन्ही वैदयकीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १४/१२/२००९ च्या पत्रान्वये सदरची वेतनश्रेणी त्यांना देण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

शासन निर्णयाप्रमाणे महापालिकेतील कार्यरत वैदयकीय अधिकारी यांना सुधारीत वेतनश्रेणी देय्य आहे. तरी सदरची वेतनश्रणी वैदयकीय अधिकारी यांना लागू करणेसाठी मा. महासभेपूढे मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ७२ <u>दिनांक:— ११/२/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

अनुमोदकाचे नाव :— श्री. तुलसीदास वसिटा

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे महापालिकेत कार्यरत वैद्यकीय अधिकारी (श्रीमती) डॉ. एस.आर.रेलवानी, डॉ. राजा रिझवानी यांना सुधारीत वेतन श्रेणी रुपये ८०००-१३५००/- विशेष वेतनश्रेणी लागु करून सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे रुपये १५६००-३९१००/- वेतनबॅड व रुपये ५४००/- पे ग्रेड निश्चित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ११ :—** विद्युत विभागामार्फत निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यास मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ११**:— विद्युत विभागामार्फत निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

विद्युत विभागामार्फत निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यासाठी जनसंपर्क कार्यालयामार्फत ३ वर्तमानपत्र म्हणजे दै. उल्हास विकास, दै. खबरे आज तक व दै. पुण्यनगरी यात निविदा सुचना देवुन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या.

त्यांच्या प्रतिसादात मे. दिपक टेडर्स, मे. जनता कंटेनर्स, प्रशांत एंटरप्रायजेस अंबरनाथ, सुडडुभाई स्क्रॅप आणि मोटार पार्टस यांनी कोरे निविदा चे कोरे प्रपत्र खरेदी केले.

सदर निविदा इसारा रक्कमेसह सादर करण्याची मुदत २९/१२/२००९ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत होती, त्यांच्या प्रतिसादात मे. दिपक टेडर्स सुडडुभाई स्क्रॅप आणि मोटार पार्टस, प्रशांत एंटरप्रायजेस अंबरनाथ, मे. जनता कॅटेनर्स अशा ४ निविदाधारकांनी इसारा रक्कमेसह सिलबंद निविदा वेळेवर सादर केल्या. वेळेवर मिळालेल्या चारही निविदा दिनांक २९/१२/२००९ रोजी दुपारी ५.३० वाजता उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

COMPERATIVE STATEMENT

| Sr. No. | Descr. Of Un-serviceable Articles | Unit | Appx Qty. | Expected cost Per Unit in Rs. | M/s. Deepak Traders | M/s. Suddubhai scrap & Motor Parts Per Unit in Rs. | M/s. Prashant Enterprises Pet Unit in Rs. | M/s. Janata Containers Pet Unit in Rs. | Amount of Highest Rate X Qty. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | All Types of Chokes | Kg | 3000 | 14-00 | 41.52 | 40.90 | 41.00 | 35.00 | 124560.00 |
| 2 | All Types of Accessories such as Tube starter/holder | Kg | 120 | 9-00 | 15.02 | 13.20 | 14.00 | 3.00 | 1802.40 |
| 3 | Allum Metallic Materials | Kg | 100 | 60 | 68.07 | 65.90 | 67.00 | 64.00 | 6807.00 |
| 4 | PVC arm/unarm cable & wire (Allum.) | Kg | 100 | 7-00 | 35.02 | 30.10 | 34.00 | 18.00 | 3502.00 |
| 5 | G.S./MS./G.I Metallic Materials | Kg | 300 | 18-25 | 18.52 | 18.14 | 16.50 | 14.00 | 5556.00 |
| 6 | All Type of Ceiling Fans (36" to 56") | Each | 20 | 121 | 187.52 | 180.00 | 170.50 | 125.00 | 3750.40 |

सदर दराच्या तुलनात्मक तक्त्यानुसार मे. दिपक टेडर्स ॲटम १ ते ६ मध्ये सर्वात जास्त व अपेक्षित दरापेक्षा ही सर्वात जास्त आहे.

वरील बाब लक्षात घेता (१) मे. दिपक टेडर्स यांचे ॲटम १ ते ६ मध्ये सर्वात जास्त दर आहेत त्यामुळे ॲटम १ ते ६ त्यांना उपलब्ध परिमाण व ३१ मार्च, २०१० अखेरपर्यंत जमा होणा—या परिमाण विल्हेवाट करणेस मान्यता मिळावी. (२) जर सर्वाधिक दराच्या निविदाधारकांनी साहित्य घेण्यास नकार दिला तरत्याची

E.M.D. फेरफिट करुन दुस–या कुठल्याही एजन्सीला अपेक्षित दरानुसार साहित्याची विल्हेवाट करण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करणेस मान्यता मिळावी.

सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे मंजुरीकरीता सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ७३ <u>दिनांकः– ११/२/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. सुरेश जाधव
अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वानखेडे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे विद्युत विभागामार्फत निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यास व मे. दिपक ट्रेडर्स यांच्याशी निविदेतील दराच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वाधिक दरावर किंवा आयुक्तास इष्ट वाटल्यास दुस–या कंत्राटदाराशी समसमान दरावर संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १२ :–** राज्य ग्रंथालय परिषदेवर दोन पालिका सदस्यांचे नाम नियुक्त करणे.

---

<u>काही सदस्य :–</u>हा विषय सभेच्या कामकाजातुन वगळण्यात यावा.

<u>महापौर :–</u> सदरचा विषय सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १२:–** राज्य ग्रंथालय परिषदेवर दोन पालिका सदस्यांचे नाम नियुक्त करणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. अ.मा. गाडेकर, प्र. सहायक ग्रंथालय संचालक यांचेकडील दिनांक २२/१२/२००९ रोजीच्या पत्रानुसार राज्य ग्रंथालय परिषदेवर महानगरपालिका प्रतिनिधींची शासनातर्फे नियुक्ती करण्याची महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम १९६७ मध्ये तरतुद आहे.

आपल्या महानगरपालिकेत सध्या कार्यरत असलेल्या व ग्रंथालय चळवळीची आस्था असलेल्या सन्माननिय दोन सदस्यांची नावे, पत्ते, शैक्षणीक पात्रता, हुद्दा व दुरध्वनी क्रमांक इत्यादी माहिती शासनास तातडीने सादर

करावयाची आहे. त्यानुसार राज्य ग्रंथालय परिषदेवर महापालिका प्रतिनिधी म्हणुन शासनाकडे कोणत्या दोन सदस्यांच्या नावाची शिफारस करायची याचा निर्णय घेण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ७३ अ                                        दिनांक:— ११/२/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. रामसागर यादव

अनुमोदकाचे नाव :— श्री. रमेश चव्हाण

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार राज्य ग्रंथालय परिषदेवर दोन पालिका सदस्यांना नियुक्त करण्याचा प्रस्ताव पुढच्या सभेत घेण्या प्रयोजनार्थ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १३ :—** उल्हासनगर महापालिकेच्या परिवहन सेवेसाठी उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील १ कैलास कॉलनी, २ हॉटे ऍम्ब्रॉसीयाच्या बाजूला, विठ्ठलवाडी स्टेशन जवळील ३, उल्हासनसगर रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेकडील जागा मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना तात्पुरता जागा वापर परवाना देण्यास मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १३:—** उल्हासनगर महापालिकेच्या परिवहन सेवेसाठी उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील १ कैलास कॉलनी, २ हॉटेल ऍम्ब्रॉसीयाच्या बाजूला, विठ्ठलवाडी स्टेशन जवळील ३, उल्हासनगर रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेकडील जागा मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना तात्पुरता जागा वापर परवाना देण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या बीओओटी तत्वावर पीपीपी अंतर्गत शहर बससेवा सुरु करण्यासाठी मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. उल्हासनगर यांना कार्यादेश देण्यात आलेले आहे. सदर बससेवा सुरु करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्वशासनाच्या परवानग्या प्राप्त झालेल्या आहेत. तसेच बस बॉडी बांधण्याचे काम मे. रुबी बस प्रा.लि., अहमदाबाद येथे सुरु आहे.

सदर परिवहनच्या पार्किंग व डेपोसाठी उल्हासनगर महापालिका हद्दीतील कैलास कॉलनी, शिवमंदिर जवळील (मंजूर विकास आराखडयानुसार आरक्षण क्र. ५०) व हॉटेल एॅब्रॉसीयाच्या बाजुला, विठ्ठलवाडी स्टेशन जवळील जागा (मंजुर विकास आराखडयानुसार आरक्षण क्र. १९३) या दोन्ही जागा प्रारुप विकास योजनेनुसार परिवहन सेवेसाठी आरक्षित आहे. व उल्हासनगर रेल्वे स्टेशनच्या पश्चिम कडील जागा (प्रसिध्द प्रारुप योजनेनुसार हरीत पट्टयात येत आहे.) तरी वरील तिन्ही जागा निविदेच्या अटी व शर्ती/करारानुसार खालील अटी व शर्तीच्या आधिन राहुन मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. उल्हासनगर यांना बस पार्किंग/डेपो म्हणुन तात्पुरती वापरण्यास मान्यता मिळावी.

**अटी व शर्ती––**

१) सदर जागेचा ताबा उल्हासनगर महानगरपालिकेकडे राहिल.

२) सदर जागा जेव्हा महापालिकेस वाटेल त्याक्षणी सदरची जागा ठेकेदारास सोडावी लागेल.

३) सदर जागेचे भाडे वेळोवेळी महापालिका ठरवेल त्या प्रमाणे ठेकेदारास अनुज्ञेय राहिल.

तरी सदरची बाब धोरणात्मक स्वरुपाची असल्याने सदर प्रस्ताव मा. महासभेसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

**महासभा ठराव क्र:** ७४ **दिनांकः– ११/२/२०१०**

सुचकाचे नाव :– श्री. प्रशांत धांडे

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महापालिकेच्या परिवहन सेवेसाठी उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील १ कैलास कॉलनी, २ हॉटेल ऍम्ब्रॉसीयाच्या बाजूला, विठ्ठलवाडी स्टेशन जवळील ३, उल्हासनसगर रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेकडील जागा मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना तात्पुरता जागा वापर परवाना देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**


महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–**आमच्या सन्माननिय सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी यांचा आज वाढदिवस असल्याने मा. महापौर, मा. उप–महापौर, मा. आयुक्त साहेब यांचे अभिनंदन करु इच्छितात कृपया श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी व्यासपीठावर यावे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :–**आमच्या सन्माननिय सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी यांना आमच्या सर्वांच्या लाख लाख शुभेच्छा।

**महापालिका सचिव :–**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

 जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२०/२/२०१०

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/२/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

१०

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दिनांक २०/२/०१० रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

३. महापौर —— श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र

४. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३७ | श्रीमती जया माखिजा |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३८ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३९ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४० | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४१ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४२ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४३ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४४ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ११ | श्रीमती विद्याताई निर्मले | ४५ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १२ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४६ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १३ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४७ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १४ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४८ | श्री. शेखर केशव यादव |
| १५ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४९ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५० | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५१ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १८ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५२ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५३ | श्री. किशोर जग्यासी |
| २० | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५४ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २१ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५५ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २२ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५६ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २३ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५७ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २४ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ५८ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २५ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ५९ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २६ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६० | श्री. मोहन साधवाणी |
| २७ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६१ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २८ | श्री. लाल पंजाबी | ६२ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २९ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६३ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३० | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६४ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३१ | श्रीमती शकुंतला पाटील | ६५ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३२ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६६ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३३ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६७ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३४ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६८ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३५ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ६९ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३६ | श्री. कुमार उत्तमचंद आयलानी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. दत्तात्रय नारायण पवार, २. श्री. राजू जग्यासी, ३. श्री.एडके गणपत गोविंद, ४.. श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा, ५. श्रीमती महाडीक रजनी मोहन, ६. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), ७. श्रीमती मीना सोनेजी (सोंडे), ८. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), ९. श्रीमती शिला मनसुलकर, १०. श्री. ढोके जनार्दन, ११. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी, १२. श्री. राजेश नानीकराम वधारीया

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
२. श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त
४. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
५. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त
६. श्री. सी.पी. सिंग, सहा. संचालक, नगररचना
७. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
९. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
१०. श्री. एम. जवांदे, शहर अभियंता
११. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१२. श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१३. श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
१४. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१५. श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१६. श्री. ए.एन. म्हात्रे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
१७. श्री. बाजीराव जाधव, प्र. प्रभाग अधिकारी
१८. श्री. उदय लिमये, मुख्य लिपिक, साप्रवि
१९. श्री. जनार्दन देवकर, व. लिपीक, आरोग्य

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती अमिता संखे
४. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.३८ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>ठिक आहे, आता दुस–या सभेचे काय करत आहात आपण?

<u>महापालिका सचिव :–</u>दुसरी सभा चालु करण्याबाबतीत आपण काय निर्णय घेत आहात यासाठी विचारणा करत आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>मा. महापौर महोदया, आपण सभा बोलवा त्यानंतर आपला निर्णय दया.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मागच्या महासभेत मा. महापौरांनी जे आदेश दिले होते त्या संदर्भात अगोदर निर्णय दया. दुसरी सभा त्यानंतरची गोष्ट आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>दुस–या सभेचा विषय वाचु? विषय क्र. १.............

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**सभा चालवु नका. आपण  अपमान करत आहात.

**सदस्य श्री. किशोर जग्यासी :—**एकिकडे आपण मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाचा अपमान करत आहात दुसरीकडे आपण म्हणत आहात की सभा चालविली पाहिजे, हे काय चालले आहे?

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**याची इतिवृत्तात नोंद आली पाहिजे.  जर या महासभेचा निर्णयच होत नसेल तर बजेटची सभा घेवुन भरोसा काय ते बजेट बरोबर असेल म्हणुन?  आता आम्हांला विश्वास नाही राहिला. त्यामुळे बजेटची सभा होता कामा नये.     उदया आम्ही अर्थसंकल्प मंजुर करणार तो ही खाजगी सचिवांना विचारुन.  त्यापेक्षा अर्थसंकल्प मंजुर करण्याची आवश्यकता काय?  आम्हांला अधिकारच नाही ना? खाजगी सचिवांना विचारायला लावा.

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**अर्थसंकल्पीय सभा चालु देणार नाही.

**सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—**मा. महापौरजी या विषयावर मी काही शब्द बोलु इच्छितो, त्यास आपली अनुमती पाहिजे. मा. महापौर, उप—महापौर व आयुक्त महोदय, हा विषय खरच उल्हासनगर महानगरपालिकेच्या इतिहासात गंभीर विषय आहे.  पहिल्यांदाच कुण्या अधिका—याच्या निलंबनासाठी एवढे सारे नगरसेवक जमिनीवर बसले आहे.  व पहिल्यांदाच कुण्या राज्याचा राज्यमंत्री याप्रकारचा आदेश देत आहे की, याप्रकारचा निर्देश, संकेत देतो की, त्याचे निलंबन करायचे नाही.येथे विषय एका श्री. यूवराज भदाणेचा नाही.  विषय या शहरातील अनाधिकृत बांधकामांवर नियंत्रण लावण्या संदर्भाचा आहे.  व गंभीर विषय आहे.  त्या विषयावर सर्व सदस्यांना सहमत होणे अति आवश्यक आहे.  आजच्या परिस्थितीत येथे नगरसेवकांचे मतभेद शहरात जे प्रतिबिंबीत होत आहे, ते सुध्दा ठिक नाही.जी परिस्थिती निर्माण होते, ती केवळ एक छोटयाश्या विषयाबाबत हा शहराच्या भविष्याशी संबंधीत प्रश्न आहे.  करांचे दर निश्चित करण्याची आजची शेवटची तारीख आहे. त्याबाबतीत सर्व सदस्यांचे साधारणत: एक मत आहे की, या पुर्वीचे जे मत आहे तेच राहिले पाहिजे. अर्थसंकल्प मंजुर केले नाही तरी करांचे दर यापुर्वीचे कर आहेत तेच राहतील त्यामध्ये कोणतेही परिवर्तन येणार नाही.  परतु त्यावर योग्य प्रकारे चर्चा होणे अति आवश्यक आहे. त्यानुसार मी असे म्हणत आहे की, या सभागृहात जे थांबले आहे, सभागृहाच्या भावना लक्षात घेता यावर तोड काढणे अति आवश्यक आहे. त्याचबरोबर मी असेही म्हणतो की कुणाचेही निलंबन ही शिक्षा होत नसते.  जर याची कोड निलंबनाने निघत असेल तर व निलंबन केल्यानंतर चौकशीमध्ये तो अधिकारी जर दोषी असल्याचे आढळु शकतो. किंवा त्यास दोषमुक्त केले जावु शकते.  यापैकी जो कोणताही निष्कर्ष असेल त्यानुसार कार्यवाही करण्यास काही हरकत नाही.  सभागृहाच्या ज्या भावना आहेत त्या लक्षात घेता, त्यांचा मान ठेवुन तसेच सभागृहाचे जे नियम व रितीरिवाज आहेत, त्यांचा मान ठेवुन या सभागृहाचे पुढील कामकाज करण्यास सहकार्य दयावे धन्यववाद।

**यावेळी मा. महापौर श्रीमती राजश्री चौधरी हया सभागृहातुन बाहेर गेल्या** 
**व मा. उप—महापौर श्री. विनोद ठाकुर त्यांच्या जागी पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.**

**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—**सन्माननिय महापौर महोदया, मी निवेदन करु इच्छितो,  मा. राज्यमंत्री महोदयाशी मी बोललो आहे.  अनाधिकृत बांधकामावर कारवाई करु नका असे त्यांचेही म्हणणे नाही.  उलट अनाधिकृत बांधकामावर कठोर कारवाई करा असे त्याचे म्हणणे आहे, त्यांचे आदेश आहेत.  दुसरी गोष्ट अशी होती की, श्री. भदाणेला निलंबित करायचे किंवा नाही, त्याबाबतीत त्यांचे एवढेच म्हणणे आहे की माझ्याकडे सविस्तर अहवाल पाठवा, अहवाल पाठविल्यानंतर त्यावर मी जे निर्देश देईल त्यानुसार कारवाई करा.  होवु शकते की, मंत्री महोदय निलंबनासाठी परवानगी देतील, आज या बाबतीत सभागृहाला माझी विनंती होती की, मंत्री महोदयांचे निर्देश येईपर्यंत थांबण्यास काही हरकत नाही.  कारण की, मंत्री महोदयांनी कुठेही म्हटलेले नाही, चौकशी करु नये असेही मंत्री महोदयांनी म्हटलेले नाही.  त्यांनी फक्त एवढेच म्हटले आहे की, माझ्याकडे सविस्तर अहवाल पाठवा, तो तपासल्यांनतर जे निर्देश शासन देईल त्याप्रमाणे कारवाई करा. त्यानुसार अनाधिकृत बांधकामावर कारवाई करण्याचे आपले ठरले आहे.  त्यांची जी चौकशी आहे ती नियमाप्रमाणे चौकशी होईल फक्त अहवाल शासनाकडे पाठवायचा आहे.  आणि त्यांचे निर्देश घ्यायचे आहे. मला वाटते याबाबत कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही आणि शासनाचे आदेश हे सभागृहावर, माझ्यावर व संस्थेवर बंधनकारक आहे.

सदस्य श्री. लाल पंजाबी :—आयुक्त साहेब, राज्यमंत्री महोदयांचे आपणांस फोनवर आदेश आलेला असेल परंतु हा जो ९/११/२००९ चा आपणाकडे अहवाल देण्यात आलेला आहे, उप—आयुक्तांनी आपणांस लिहुन दिलेले आहे की, या तीन अधिका—यांचे निलंबन केले पाहिजे. त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. त्यामधील दोन अधिका—यांवर कारवाई केली जाते, व ज्याचे पहिलेच नाव आहे अशा तिस—या अधिका—यावर आपण कारवाई का केली नाही ही पहिल्या दिवसापासुन सर्व सदस्यांची मागणी होती की, पहिल्या क्रमांकावर असलेल्या प्रमुख अधिका—यावर कारवाई का झाली नाही? त्यावरच हे सर्व वाद विवाद चालले आहे. हे आपण मंत्री महोदयास सांगावयास पाहिजे होते की, गोपनिय अहवाल जो आहे तो या अधिका—याच्या विरोधात आहे.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, दोन अधिका—यांवर निलंबनाची जी कारवाई झालेली आहे त्याबाबतीत सांगु इच्छितो की, त्यांना अनाधिकृत बांधकामे निष्कासीत करण्याचे मी आदेश दिले होते. त्याचे पालन न केल्यामुळे निलंबित केले होते. मी नागपुरला अधिवेशनास गेल्यानंतर एक दरवाजा काढण्यास सांगितले होते तरी त्यांनी काढला नाही, त्यांना आयुक्तांचे आदेश बंधनकारक आहे. आदेशाचे पालन झाले नाही. म्हणुन त्या दोन अधिका—यांवर निलंबनाची कारवाई झालेली आहे. याचा अर्थ श्री. भदाणेला निलंबित किंवा त्याच्याविरुध्द चौकशी करु नये असा होत नाही. नियमानुसार चौकशी झाल्यानंतर कारवाई होईल.

सदस्य श्री. किशोर जगयासी :— आपणांस मी आणखी एक गोष्ट सांगु इच्छितो की, ज्या अधिका—याने त्याच्या विरोधात लिहिले होते, त्या डॉ. दिपक सांवत यांना हटवुन या अधिका—यास उप—आयुक्त करण्यात आले आहे. डॉ. दिपक सावंत ज्या पदावर होते त्या पदावरुन त्यांना हटवुन श्री. भदाणे यांना बसविण्यात आले. ज्याने श्री. भदाणे यांच्या विरोधात तक्रार केली होती. त्यांना हटवुन त्याच्या जागेवर श्री. भदाणे यांना बसविण्यात आले आहे. काय हीच चौकशी होत आहे?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, मी मागच्या सभेत सांगितले आहे, सदरचे प्रशासकिय अधिकार आयुक्तांचे आहे. आयुक्तांनी केलेली कृती बरोबर आहे. जर या कृती विरुध्द आपणांस काही हरकत असेल तर आपण शासनाकडे दाद मागवु शकतात.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—उप—आयुक्त ज्या अधिका—याची तक्रार करतो, त्या उप—आयुक्तास हटवुन ज्याची तक्रार केली असेल त्या अधिका—यास उप—आयुक्त केले जावु शकते काय? हा कोणता कायदा आहे? श्री. दिपक सांवत यांनी त्यांच्या विरोधात तक्रार केली आहे, त्यांना हटवुन त्यांच्या जागेवर यास बसविले आहे.

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—मा. महापौरजी, हा जो सभागृहाचा अपमान होत आहे त्याच बरोबर मा. महापौर आणि उप—महापौरांचाही अपमान होत आहे. हे लक्षात घेता राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीचे आम्ही सदस्य सभात्याग करत आहोत.

यावेळी सभागृहात उपस्थित असलेले राष्ट्रवादी कॉगेस पाटीचे श्री. प्रभुनाथ गुप्ता, श्रीमती सुरेखा वेलकर, श्रीमती निलु चांदवानी, श्रीमती मंजु पोपटानी, श्रीमती संगिता कंडारे, श्रीमती सुजाता रिजवानी, श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, श्री. संजय बठिजा, श्री. अनिल विदयार्थी, श्री. रविंद्र बागुल यांनी सभात्याग केला.

महापालिका सचिव :—कृपया हजेरीपटावर स्वाक्षरी करुन जा.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:—ही सभा पुढील सूचना देईपर्यंत स्थगित केली जात आहे. कारण या परिस्थितीत सभा चालविणे शक्य नाही.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौर महोदया, मा. उप—महापौर महोदय, करांचे दर निश्चित करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात २० फेब्रुवारी ही शेवटची तारीख आहे. जर आज करांचे दर निश्चित झाले नाही तर त्याचा परिणाम काय होईल हे सचिव साहेबांनी कृपया सभागृहास सांगावे.

यावेळी श्री. नरेंद्र राजानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:—सन्माननिय सदस्य हो, या सभागृहाची आजची स्थिती ठिक नाही. आमचे काही सन्माननिय सदस्य जमिनीवर बसले आहेत, त्यासाठी त्यांचा आदर ठेवुन ही सभा पुढील सूचना देईपर्यंत स्थगित केली जात आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>करांचे दर निश्चित होत नसेल तर त्यांचा परिणाम काय होईल? याबाबत कृपया माहिती दिली जावी.

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.०० वाजता उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. विनोद ठाकुर यांनी सभा पुढील सूचना देईपर्यंत स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—१०/३/२०१०

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १०/३/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

१०—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दिनांक २०/२/०१० रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा स्थगित झाल्याने ती सभा बुधवार दिनांक १०/३/२०१० रोंजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर —— श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र

२. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३७ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३८ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३९ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४० | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४१ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४२ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४३ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४४ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४५ | श्री. शेखर केशव यादव |
| १२ | श्रीमती निर्मले विद्या विजय | ४६ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४७ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४८ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १५ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४९ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५० | श्री. किशोर जग्यासी |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५१ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १८ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५२ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १९ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५३ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २० | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५४ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २१ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५५ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २२ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ५६ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २३ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ५७ | श्री. मोहन साधवाणी |
| २४ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २५ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५९ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २६ | श्री. लाल पंजाबी | ६० | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २७ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६१ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २८ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६२ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| २९ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ६३ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३० | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६४ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३१ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६५ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३२ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६६ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३३ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६७ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३४ | श्री.एडके गणपत गोविंद | ६८ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६९ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ३६ | श्री. कुमार आयलानी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान, २. श्रीमती सुजाता रमेश रिझवानी, ३. श्री. राजू जग्यासी, ४. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ५. डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी, ६. श्री. लालबिहारी बुझारत यादव, ७. श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी, ८. कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल, ९. श्री. प्रशांत किसनराव धांडे, १०. श्रीमती मीना सोनेजी (सोंडे), ११. श्री. पाटील प्रधान धर्मा, १२. श्रीमती शकुंतला पाटील

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
२. श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. विजयकुमार मसाळ, उप–आयुक्त
४. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
५. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी
८. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
९. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१०.श्री. एस.के.सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
११.श्री. एस. एन. अली, उप अभियंता, पाणी पुरवठा
१२.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
१३.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१४.श्री. ए.एन. म्हात्रे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
१५.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१६.श्री. उदय लिमये, मुख्य लिपिक, साप्रवि

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती नर्गिस खान

सायंकाळी ४.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>सदस्य श्री. तुलसीदास वसिटा :–</u>सन्माननिय महापौरजी, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे जेष्ठ सदस्य श्री. मोहन साधवानी यांचा आज वाढदिवस आहे. त्यानिमित्त सभागृहात मिठाई वाटप करण्यास अनुमती दिली जावी.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>ही सभा अर्ध्या तासासाठी स्थगित केली जावी.

<u>महापौर :–</u>पाच वाजेपर्यंत सभा स्थगित केली जावी काय? सर्वसंमतीने?

ही सभा ५.०० वाजेपर्यंत स्थगित केली जात आहे. व ज्या अनुषंगाने सभा स्थगितीचा ठराव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

---

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी

स्थगित प्रस्ताव

दिनांक १०/३/२०१० रोजीच्या अर्थसंकल्पीय महासभेचे कामकाज अर्ध्या तासासाठी म्हणजेच सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ९० ब दिनांक : १०/३/२०१०

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १०/३/२०१० रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभचे कामकाज अर्ध्या तासासाठी म्हणजेच सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ४.३५ वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५.२४ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर —— श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र

२. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३७ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३८ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३९ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४० | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४१ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४२ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४३ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४४ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४५ | श्री. शेखर केशव यादव |
| १२ | श्रीमती निर्मले विद्या विजय | ४६ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४७ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४८ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १५ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४९ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५० | श्री. किशोर जग्यासी |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५१ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १८ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५२ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १९ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५३ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २० | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५४ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २१ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५५ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २२ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ५६ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २३ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ५७ | श्री. मोहन साधवाणी |
| २४ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २५ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५९ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २६ | श्री. लाल पंजाबी | ६० | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २७ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६१ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २८ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६२ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| २९ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ६३ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३० | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६४ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३१ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६५ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३२ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६६ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३३ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६७ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३४ | श्री.एडके गणपत गोविंद | ६८ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |
| ३५ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६९ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ३६ | श्री. कुमार आयलानी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान, २. श्रीमती सुजाता रमेश रिझवानी, ३. श्री. राजू जग्यासी, ४. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ५. डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी, ६. श्री. लालबिहारी बुझारत यादव, ७. श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी, ८. कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल, ९. श्री. प्रशांत किसनराव धांडे, १०. श्रीमती मीना सोनेजी (सोंडे), ११. श्री. पाटील प्रधान धर्मा, १२. श्रीमती शकुंतला पाटील

खालील अधिकारी सभेस हजर होते.

३. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
४. श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
५. श्री. विजयकुमार मसाळ, उप–आयुक्त
६. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
७. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
९. श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी
१०.डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
११.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१२.श्री. एस.के.सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१३.श्री. एस.एन. अली, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१४.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
१५.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१६.श्री. ए.एन. म्हात्रे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
१७.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१८.श्री. बाजीराव जाधव, प्र. प्रभाग अधिकारी
१९.श्री. उदय लिमये, मुख्य लिपिक, साप्रवि
२०.श्री. जनार्दन देवकर, व. लिपीक, आरोग्य

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती नर्गिस खान

<u>सदस्य श्री. सुंदर मंगतानी :–</u>मा. महापौरजी, मा. उप–महापौरजी, व आयुक्त साहेब, पाणी टंचाईसंदर्भात सभा अर्धा तास स्थगित केली पाहिजे. उल्हासनगर कॅम्प नं. ३ मध्ये जी भिषण पाणी टंचाई आहे ती दुर कधी होईल? आपल्या सत्तेची तीन वर्ष निघुन गेली आहेत. तरीही पाणी टंचाईची समस्या दुर झालेली नाही. तीन वर्षापासुन मी आपणांस पत्र देत आले आहे. तीन वर्षात काहीही झालेले नाही पुढे काय होईल? फक्त भांडण करा, रस्ते तयार झालें पाहिजेत, रस्त्यांना नावे दिली पाहिजेत. यास्तव मी तर असे म्हणतो की, माझ्याबरोबर सर्व सन्माननिय सदस्यांनी व्यासपीठासमोरील मोकळया जागेत जमिनिवर बसले पाहिजेत.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>आम्ही आपणाबरोबर आहोत.

<u>सदस्य श्री. सुंदर मंगतानी :–</u>आपण लोकांना पिण्याचे पाणी पुरवु शकत नाहीत. फक्त मोठ मोठया गोष्टी करतात. संपुर्ण उल्हासनगर कॅम्प नं. ३ मध्ये पाण्याची भिषण टंचाई निर्माण झालेली आहे. त्याबाबतीत कुणी बोलण्यास तयार आहे काय? आयुक्त साहेबांना घेराव घाला. आयुक्त साहेब पाणी दया नाहीतर आम्ही तुम्हांला घेराव घालतो.

<u>महापौर :–</u>सचिव साहेब, सभा सुरु करण्यात यावे.

<u>महापालिका सचिव :–</u>कृपया लक्ष दया. मा. महापौरांच्या आदेशानुसार सभेचे कामकाज सुरु करण्यात येत आहे.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सभेचे कामकाज सुरु होण्याअगोदर मी एक अभिनंदन प्रस्ताव मांडु इच्छितो. काल राज्यसभेमध्ये एक फार मोठा इतिहास रचला गेला. महिला आरक्षणाचे विधेयक मंजुर झाले आहे. त्यासाठी संयुक्त पुर्वगामी लोकशाही आघाडीच्या अध्यक्षा मा. श्रीमती सोनियाजी गांधी, मा. पंतप्रधान श्री. मनमोहन सिंगजी तसेच सर्व राजकिय पक्षांचे, ज्यांनी हे विधेयक मंजुर करण्यास सहकार्य दिले त्या सर्वांना मी धन्यवाद देतो व महिलांना सुध्दा धन्यवाद देतो.

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—**तो भाजपाचा प्रस्ताव होता.

**सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—**आमचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. शरद पवार साहेबांनी सुध्दा या विधेयकास समर्थन दिले होते. त्यांचे सुध्दा अभिनंदन केले जावे.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—**भाजपाने सुध्दा समर्थन दिले आहे.

**काही सदस्य :—**शिवसेना व भाजपानेही काही प्रस्ताव दिले होते.

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—**शिवसेना व भाजपाचा प्रस्ताव होता.

**महापौर :—**सदरचा अभिनंदन प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

---

**अभिनंदन प्रस्ताव**

दिनांक ८ मार्च या जागतिक महिला दिनाच्या मुहुर्तावर भारताच्या संसदेत इतिहास घडला आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांसह राज्यांच्या विधी मंडळातील ३३ टक्के जागा महिलांसाठी आरक्षित करणारे संविधान दुरुस्ती विधेयक राज्यसभा या संसदेच्या वरिष्ठ सभागृहास सादर होवुन त्याला दिनांक ९ मार्च २०१० ला त्या सभागृहाची मान्यता मिळाली आहे, यामुळे आपल्या विधी मंडळात महिलांना राखीव जागा देणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला आहे. स्त्रियांच्या सबळीकरणासाठी जगात होत असलेल्या प्रयत्नांचे हे जसे मोठे यश आहे तसेच गेली १४ वर्षे भारतात होत असलेल्या त्याच प्रयत्नांना आलेली ही आनंददायक फलश्रुती आहे. या सर्व प्रकरणात पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी दाखविलेला विवके व केलेला निर्धार जेवढा महत्वाचा तेवढाच या विधेयकाच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याची सोनिया गांधी यांची तयारीही मोठी होती. प्रमुख विरोधी पक्षांची साथ घेवुन डॉ. मनमोहनसिंग यांच्या सरकारने मिळविलेली ही फार मोठी उपलब्धी आहे आणि ती देशाच्या राजकिय इतिहासात सुवर्णाक्षराने नमुद होणारी आहे. या विधेयकामुळे देशाच्या राजकिय व सामाजीक प्रकृतीत चांगला बदल घडुन येईल अशीच सा—यांची अपेक्षा आहे. स्त्रियांचा सहभाग ही राजकरण व समाजकरणाला प्रगल्भ बनविणारी बाब आहे. प्रगत जगाने या सत्याचा अनुभव घेतला आहे. भारताच्या स्वांतंत्र्य लढयातील महिलांच्या योगदानाने तसा प्रत्यय याही देशाला या आधी आणून दिला आहे. संसद व राज्य विधीमंडळातील त्यांचा वाढीव सहभागही असाच प्रगल्भकारी व प्रगतीकारक ठरणार आहे. यास्तव सर्व महिलांना शुभेच्छा देवुन महिला विधेयकाचे स्वागत करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र.** ९० क — **दिनांक :— १०/३/२०१०**

सुचकाचे नाव :—१) श्री. मोहन साधवानी
२) श्री. प्रभुनाथ गुप्ता
अनुमोदकाचे नाव :—१) श्री. बच्चाराम रुपचंदानी
२) श्री. लाल पंजाबी

ही महासभा ८ मार्च या जागतिक महिला दिनाच्या मुर्हुतावर संसदेच्या दोन्ही सभागृहांसह राज्यांच्या विधीमंडळातील ३३ टक्के जागा महिलांसाठी आरक्षित करणा—या संविदान दुरुस्ती विधेयकाचे स्वागत करुन सर्व महिलांचे व केद्र शासनाचे अभिनंदन करीत आहे.

सुचकाची सही/—१)
२)

अनुमोदकाची सही/—१)
२)

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १:—** स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २०१०—११ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००९—१० चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे

---

<u>महापौर :—</u>विषयास पुढे सुरु करण्यापुर्वी मा. सभापती स्थायी समिती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी कृपया मंचावर यावे.

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**</u>मा. महापौर महोदया, महाराष्ट्राचे रत्न फक्त महाराष्ट्राचेच रत्न नाही तर संपुर्ण भारताचे जगविख्यात फलंदाज श्री. सचिन तेंडुलकर यांनी विश्व विक्रम करत करत, आज असा एक विश्व विक्रम केला आहे की, तो यापुर्वी कधी कुणी केला नाही आणि यापुढे कुणी करु शकणार नाही. अशा प्रकारचा त्यांनी विक्रम केला आहे आणि दोनशे धावा करुन नविन उचांक गाठलेला आहे. उल्हासनगर महापालिकेचे हे सभागृह त्यांचे अभिनंदन करावे यासाठी अभिनंदन प्रस्ताव पारीत करण्यात यावा.

<u>महापौर :—</u>सदरचा अभिनंदन प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

---

<u>अभिनंदन प्रस्ताव</u>

नाबाद दोनशे धावांचे शिखर गाठणारा सचिन जगातील पहिला खेळाडु ठरला त्याने १९० चा आकडा पार केला आणि जो तो आपल्या जागी थिजला. जागचे हललो आणि तो आउट झाला तर... कल्पनाच भयंकर होती. शेवटच्या शतकात एक धाव घेवुन सचिनची डबल सेंच्युरी झाली तेव्हा सचिन सोबत लाखो करोड भारतीयांच्या माना उंचावल्या होत्या. आकाशाच्या बाप्पाचे आभार मानण्यासाठी।

क्रिकेटच्या जगात जर देव असेलच तर तो सचिन तेंडुलकर आहे. आणि या देवासमोर आज सारे क्रिकेट विश्व नतमस्तक झाले. जागतिक क्रिकेटच्या इतिहासातील एक महान खेळाडु म्हणुन सचिनने आपली मुद्रा आज पुन्हा उंचावली. दक्षिण अफ्रिकेच्या विरुध्दच्या दुस—या एक दिवशीय सामन्यात दोन—अडीच तासाची त्याची खेळी ऐतिहासिक ठरली. ग्वाल्हेरच्या मैदानावर सचिन जणु एक मिशन घेवुनच उतरला होता. २५ चौकार आणि तीन षठकारासह सचिनची बेट धावांची बरसात करीत असतांना सारे ब्रम्हांड जणु त्यांच्या विक्रमावर पुष्पवर्षाव करण्यासाठी सज्ज होते. सचिन विक्रमाच्या उंबरठयावर असतांना कट्टर नास्तिकांचेही हात जोडले गेले असतील विश्वासच नाही त्या देवाला त्यांनी साकडे घातले असेल. तर्कसंगत वाढण्याला अंधश्रंध्दा विरोधी विज्ञाननिष्ठेला आव्हान दिले. भल्याभल्यांनी त्याच्या डबल सेंच्युरीसाठी हात जोडले देवा साकडे घातले. त्यातही राष्ट्रीय एकात्मता सर्व धर्म समभाव होता. केवळ भारतातल्याच नव्हे तर जगभरातल्या क्रिकेट शौकीनसाठी सचिन तेंडुलकर हा हाडामासाचा देव आहे. अशा या महान खेळाडुचे उल्हासनगर महानगरपालिकेच्यावतीने अभिनंदन करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र.</u> ९० ड     <u>दिनांक :— १०/३/२०१०</u>

सुचकाचे नाव :—श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

ही महासभा दक्षित अफ्रिकेविरुध्द ग्वाल्हेरच्या मैदानावर झालेल्या सामन्यात श्री. सचिन तेंडुलकर यांनी नाबाद द्विशतक झळकविल्याबद्दल अभिनंदन करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>मा. महापौर महोदया, आता अभिनंदनाविषयी गोष्ट निघाली आहे तर मी एक प्रस्ताव मांडु इच्छितो, उल्हासनगर मधील एक लहानशी बालिका जीने कलर्स या वाहिनीवरील उतरन मालिकेत इच्छा या पात्राद्वारे एक आदर्श भुमिका पार पाडली आहे. तिचा इच्छाचा रोल जगभरात फार प्रसिध्द झाला आहे. तीला ''ग्रेट वुमन एचीव्हर्स अवॉर्ड'' हे एक मोठे अवार्ड मिळाले आहे व उदया रात्री सोनी टीव्हीवर या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दाखविले जाणार आहे. तीचे नाव कु. स्पर्श खानचंदानी असे आहे. जो अवॉर्ड ऐश्वर्या रॉय, सुस्मिता सेन यांना मिळाला आहे व तिसरा उल्हासनगरमधील या मुलीला मिळालेला आहे. ११ मार्च रोजी तिचा सोनी टीव्हीवर कार्यक्रम आहे. तिचे महापालिकेतर्फे अभिनंदन करण्यात आले पाहिजे. माझी एक सूचना आहे की, ती मुलगी उल्हासनगरमध्ये राहत असल्याने येणारी जी महासभा आहे, त्या महासभेत उपस्थित राहण्यासाठी महापौरांच्यावतीने तिला एक पत्र पाठविण्यात यावे व तिचा महासभेत सत्कार केला जावा. माझी मा. महापौरांना व सर्व सहकार्यांना माझी विनंती आहे की, येणारी जी १९ किंवा २० तारखेची महासभा असेल त्या महासभेमध्ये तिला बोलावुन घेवुन तिचे अभिनंदन केले जावे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>मा. महापौरजी, मी सुध्दा एक सांगु इच्छितो की, उल्हासनगरचा एक विदयार्थी कु. नितीन वाधवानी ज्याचा सीएच्या परिक्षेत तिसरा नंबर आला आहे, त्याचे सुध्दा अभिनंदन केले जावे.

<u>महापोर :—</u>कु. इच्छा खानचंदानी या बाल कलाकाराला पुढच्या महासभेत बोलावुन सत्कार केले जाईल आणि कु. नितीन वाधवानी बाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करीत आहे.

---

<u>अभिनंदन प्रस्ताव</u>

कु. नितीन वाधवानी हा उल्हासनगर येथिल विदयार्थी असून त्याने सीएच्या परिक्षेत तिसरा नंबर मिळविला आहे त्याबद्दल त्याचे अभिनंदन करण्यास प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र.</u> ९० इ      <u>दिनांक :— १०/३/२०१०</u>

सुचकाचे नाव :—बच्चाराम रुपचंदानी
अनुमोदकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा कु. नितिन वाधवानी या मुलाने सिएच्या परिक्षेमध्ये तिसरा क्रमांक मिळविल्याबद्दल त्याचे अभिनंदन करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**</u>विषय वेगळा आहे, परंतु अशाच पध्दतीचा आहे, महापौरांना पत्रही दिलेले आहे. अंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेमध्ये निवड झालेला कु. राकेश खापरे हा एक गरीब कुटुंबातील मुलगा आहे. तो सुभाष टेकडी येथे राहतो त्याला बॅकाकला जायचे आहे. तो तक्षविदयालयामध्ये शिक्षण घेत आहे. आणि त्याला जाण्यासाठी, प्रवास खर्चासाठी पैसे नाहीत, ऐपत नाही म्हणुन तो जावु शकत नाही. यासाठी माझी आपणांस एक विनंती आहे की, यापुर्वी जशी आपण लोकांना मदत केलेली आहे आणि त्यांच्या प्रवासाचा खर्च आपण केलेला आहे, त्याप्रमाणे कु. खापरे हा विदयार्थी जो तक्षशिल विदयालयामध्ये शिकतो त्याने आपल्याकडे अर्ज केलेला आहे. त्याला २० तारखेला जायचे आहे. त्याच्या प्रवास खर्चासाठी आणि उल्हासनगरमधील कला गुणांना वाव देणारे, संधी देणारे आपण लोक आहोत ती आपण सिध्द करुन दाखवावी. त्याला मदत करावी असा प्रस्ताव मी ठेवत आहे. तसा कायदेशीर प्रस्ताव तुम्ही नंतर आणला तरी चालेल तरी त्याचा प्रवासाचा खर्च आपण उचलावा.

<u>**सदस्य श्री. रमेश चव्हाण :—**</u>मा. आयुक्त साहेब, तसे पत्र मीही दिलेले आहे. त्याला प्रवास खर्चासाठी पंन्नास हजार रुपयाची आवश्यकता आहे. अधिक काळ वाट पाहावयास न लावता त्यास ही रक्कम लवकरच देण्यात यावी ही विनंती आहे.

<u>**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—**</u>सन्माननिय महापौर महोदया, संबंधीत जो विदयार्थी आहे त्याला बोलावुन घेवुन आणि त्याच्या प्रवासाचा जो खर्च आहे, तो देण्यात येईल. आणि हा वेगळा विषय आहे सभेपुढे तो नंतर घेतो.

<u>**महापालिका सचिव:—**</u>मा. स्थायी समिती सभापती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी स्थायी समितीच्यावतीने अर्थसंकल्प तयार केला असून त्या या सभागृहास प्रस्तृत करीत आहेत व मा. महापौर महोदया यांच्या हातात त्या देतील. मा. स्थायी समिती सभापतीच्यावतीने अर्थसंकल्पाची जी पुस्तीका आपणांस दिलेली आहे, त्यात आयुक्तांनी सन २०१०—२०११ उत्पन्न व खर्चाचे अंदाज व त्या आधारे स्थायी समितीने अर्थसंकल्पीय अंदाजाबाबत दिनांक १०/२/१० रोजीच्या ठराव क्र. १२६ सुध्दा उपलब्ध आहे. त्यामध्ये भाषणाची सुध्दा प्रत आहे आपण सर्वांनी ती वाचलीच असेल. त्यामुळे असे मानण्यात येईल की आपण ती वाचलीच असेल. जर सन्माननिय सदस्यांना याबाबत आपला काही प्रस्ताव ठेवायचा असेल तर मा. महापौरांच्या संमतीने आपला प्रस्ताव मांडु शकतात.

<u>**श्रीमती जया प्रकाश माखिजा (मा. सभापती, स्थायी समिती) :—**</u>मा. महापौर मा. उप महापौर, मा. आयुक्त, सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेतो , व सर्व नेतागण, सर्व पक्षाचे गटनेते, सर्व समित्यांचे सभापती, सन्माननीय नगरसेवक नगरसेविका, अधिकारी, कर्मचारीगण, पत्रकार बंधू व उपस्थित नागरीक आपल्या सर्वांचे सन 2010—2011 च्या अर्थसंकल्पामध्ये या महासभेमध्ये स्वागत आहे.

असे म्हणतात की, स्थानीक स्वराज्य संस्था एक शाळा आहे. जेथे शहराची समस्या, विकास व अन्य संबंधित मुद्दयांचा अभ्यास करण्याचा फायदा मिळतो. या शाळेमध्ये मी प्रथमच निवडून आली आहे. तीन वर्षांच्या अभ्यासानंतर मला स्थायी समिती सभापती पदाची मोठी जबाबदारी सोपविली आहे. या जबाबदारीस पार पाडण्यासाठी षहरातील विकासासंबंधी सर्व निर्णय आम्ही घेतले परंतु त्यात विषेश निर्णय म्हणजे शहरातील अंदाजपत्रक तयार करणे. त्या अंदाजपत्रकास आम्ही दिनांक 10/2/2010 रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये सर्व स्थायी समिती सदस्यांनी मिळून पुर्ण केला आहे.

सर्वात प्रथम आम्ही आपल्यासमोर सन 2009—10 च्या विकास कामांचा हिशोब आपल्यासमोर मांडतो.

<u>**6 th Pay ulkjp oru %&**</u>

केंद्र तथा राज्य शासनाच्या निर्णयानुसार आम्ही महानगरपालिका कर्मचारी व अधिकारी यांच्या वेतनामध्ये वाढ करण्यासाठी 6 th Pay नुसारच्या वेतन आयोगाच्या शिफारशी मंजुर केल्या आहेत. या शिफारशी नुसार आमच्या महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना सुधारीत वेतन मिळाले आहे.

**JNNURM %& t- ,u- ,u- ;q- vkj- ,e-**

आम्हांस हे माहित आहे की, आपल्या षहरामध्ये पाणी पुरवठा करण्यासाठी किमान 50 वर्षा अगोदर पाईप लाईन टाकली होती. त्यामुळे पाण्याची समस्याविषयी व लोकांच्या नाराजी विषयी समस्या निर्माण झाली आहे. ही समस्या कायम काढुन टाकण्यासाठी जे. एन. एन. यु. आर. एम. योजनेच्या माध्यमातुन 166 करोड रूपयाची योजना मंजूर केली आहे. त्याचा कार्यादेश काढण्यात आला आहे.

>kiMiVVh fodkl

शहरातील गरीब जनतेसाठी जे झोपडपट्टयांमध्ये राहतात त्यांना घर देण्याच्या योजने अंतर्गत किमान 600 प्लॅटस बनविण्याचे काम राहुलनगर, उल्हासनगर – 3 व वाल्मिकी वसाहत उल्हासनगर 5 मध्ये चालु केले आहे. या योजने अंतर्गत हळु हळु संपुर्ण शहरातील पुर्ण झोपडपट्टयांचा विकास करण्याची योजना आहे.

bZ xOgZuUl

आपण 21 व्या शतकात आहोत ज्यास संगणीकीय युग म्हणतात. त्याचा फायदा घेण्याप्रयोजनार्थ जे. एन. एन. यु. आर. एम. च्या अंतर्गत 6 करोड रूपयांचा प्रस्ताव मंजूर करुन कामास सुरुवात केली आहे. काही वेळेतच आपल्या शहरातील जनता घरी बसून जन्म व मृत्यूचे दाखले व महापालिका संबंधित अन्य काही सेवांचा फायदा इंटरनेटद्वारे घेवु शकतील.

lkQlQkbZ

शहरातील व्यापारी क्षेत्र व अन्य काही मुख्य भागात दिवसभरात भरपुर गर्दी असल्यामुळे साफसफाई करणे सोपे होत नाही. या गोष्टी लक्षात घेवुन रस्त्याची साफसफाई रात्री करण्यासाठी मॅकेनिकल स्विपींग मशीन (Machanical sweeping Machine) च्या माध्यमातुन काम सुरु केले आहे. आपल्या माहितीसाठी आपणांस सांगण्यात येते की, बृहनमुंबई महानगरपालिके नंतर अशा प्रकारच्या अत्याधुनिक उपकरणाने साफ सफाई करण्याबाबतीत आमच्या महानगरपालिकेचे स्थान दुसरे आहे.

xkMZu lq'kksHkhdj.k

शहरातील भागांचा व उदयानांचा विकास आणि व उदयानात कारंज्या बसवुन आम्ही या वषी भरपुर प्रमाणात यश मिळविले आहे.

egkikfydk bekjr lq'kksHkhdj.k

आम्ही आयुक्त श्री. बागेश्वर यांचे आभार व्यक्त करतो की त्यांनी काही क्षणातच महापालिका इमारतीला नवे स्वरुप दिले आहे. जागा वाटपाची आवश्यकता पाहून एक माळा व एक नविन प्रशासकिय इमारतीचे काम त्यांनी सुरु केले आहे.

cl lsok

पर्यावरण व शहरातील सर्व जाती धर्माच्या जनतेसाठी या वर्षात आम्ही 10 सुंदर बससेवा केली आहे.

jLrs fodkl

संत निरंकारी हॉल ते भारत चौक, डॉलफीन क्लब, व्हीनस ते प्रभात सिनेमा, गायकवाड पाडा, विठ्ठलवाडी पोलिस स्टेशनच्या समोर अशाप्रकारे काही रस्त्यांचे सिमेंट कॉक्रेटीकरण वा डांबरीकरण चालू वित्तीय वर्षामध्ये सुरु केले आहे.

या गतीने शहरास सुंदर बनविण्या प्रयोजनार्थ वर्ष 2010–2011 च्या अंदाजपत्रकामध्ये जी तरतुद केली आहे त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| v-dz- | Tkek | jDde | [kpZ | jDde |
|---|---|---|---|---|
| 1 | स्थानिक संस्था कर | 114 कोटी | पगार व भत्ते | 64.21 कोटी |
| 2 | मालमत्ता कर | 75 कोटी | एम.आय.डी.सी | 46.75 कोटी |
| 3 | पाणी वसुली | 62 कोटी | कर्ज | 35.18 कोटी |
| 4 | अनुदान | 10.66 कोटी | आरोग्य विभाग | 8.90 कोटी |
| 5 | एम..आर.टी.पी. तर्फे वसुली | 25.35 कोटी | शिक्षण | 9.00 कोटी |
| 6 | अनधिकृत बांधकाम नियमित | 1.50 कोटी | शहर विद्युत | 5.50 कोटी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | करने | | | |
| 7 | परवाने व  इतर शुल्क | 0.66 कोटी | बागबगीचे | 6.85 कोटी |
| 8 | इतर | 21.68 कोटी | पाणी व्यवस्था | 7.89 कोटी |
| 9 | जे.एन.एन.यु.आर.एम. | 229.05 कोटी | भुयारी गटार व्यवस्था | 3.90 कोट |
| | | | अग्निशमन | 3.49 कोटी |
| | | | पाणी व मलनिसःरन | 7.25 कोटी |
| | | | बांधकाम विभाग तर्फे रस्ते व अन्य सुविधा | 45.65 कोटी |
| | | | प्रभाग समिती विकास कार्य | 12.16 कोटी |
| | | | परिवहन | 0.24 कोटी |
| | | | असाधारण लेखे | 21.10 कोटी |
| | | | इतर | 7.99 कोटी |
| | | | जे.एन.एन.यु. आर. एम. | 253.41 कोटी |
| | ,dw.k tek | 539-90 dksVh | ,dw.k [kpZ | 539-47 dksVh |

वर्ष 2010–2011 साठी  पाणी टॅकर, अग्निशमन, टॅक्स, विकास शुल्क, सेवा शुल्क मध्ये वाढ करण्यासाठी आमच्याकडे जे प्रस्ताव ठेवण्यात आले होते परंतु मालमत्ता कर व काही विकास शुल्काच्या दरात स्थायी समितीच्या सदस्यांनी फक्त 4 टक्क्यांची वाढ मंजुर केलेली आहे. इतर घट भरुन करण्यासाठी मालमत्ता कर व पाणी बिलाची वसुली करण्याची जबाबदारी आम्ही प्रषासनावर ठेवली आहे.

lu & 2010&2011 P;k vnkt Ik=dkph ize[k fo'k'kr% ;k iek.k vkgs-

fla/kq Hkou

काही वर्षापासुन बंद बोट क्लब गार्डन च्या विकासाच्या मुद्दयावरील विवाद मिटविण्या प्रयोजनार्थ आम्ही महापालिका फंडातुन 1 करोड रूपयांची तरतुद सिंधू  भवन निर्माण करण्यासाठी केली आहे.

ejkBh Hkou] ;wih Hkou o MkW- ckcklkgsc vkacsMdj Hkou

शहरात राहणा–या सर्व वर्गाच्या नागरीकांच्या भावना लक्षात ठेवुन आम्ही 1.50 करोड रूपयांची तरतुद मराठी भवन, युपी भवन व डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन साठी ठेवली आहे.

jsu okWVj gkosZLVhax@RAIN Water Harvesting

ग्लोबल वार्मीग व नागरीकांचे हित लक्षात ठेवुन आम्ही आमच्या तर्फे या योजनेसाठी काही उपाययोजना करणे आवश्यक आहे.  यासाठी पावसाचे पाणी जतन करुन ठेवण्यासाठी महापालिका इमारतीमध्ये रेन वॉटर हॉर्वेस्टींग व्यवस्था करण्यासाठी 25 लाख रूपयाची तरतुद ठेवली आहे.

jLrs fodkl dk;Zde

आम्ही यापुर्वी सुध्दा आपणांस सांगितले आहे की उल्हासनगर शहरामध्ये काही रस्त्यांचे सिमेंट कॉक्रिटीकरण व डांबरीकरणाचे काम चालु आहे.  त्यास पुर्ण करण्यासाठी 5 कोटी रुपये नविन रस्ते बनविण्यासाठी आणि 2 कोटी रुपये पावसाळया अगोदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी ठेवले आहे.

uxjlsod fu/kh

आपल्या प्रभागातील संपुर्ण विकास करण्यासाठी प्रत्येक नगरसेवकांच्या तीव्र इच्छा  लक्षात ठेवुन नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी च्या माध्यमातुन 22 लाख रूपयाची तरतुद केली आहे.

lkQlQkbZ

शहरातील रस्त्यांची साफसफाई साफसफाई, मेकॅनिकल स्विपींग, जतूनाशक व अन्य साहित्यांची खरेदी करण्यासाठी 9 करोड रूपये ठेवले आहेत.

vfXu'keu O;oLFkk

महाराष्ट्र शासनाने अग्निशमन सेवा मजबुत करण्यासाठी महाराष्ट्र फायर सेफ्टी योजना जाहिर केली आहे. या योजनेसाठी करण्यात आलेल्या कार्याने 35 टक्के अनुदान प्राप्त होईल. महानगरपालिकेने या योजनेच्या माध्यमातुन 2.50 करोड रूपयाने महानगरपालिका मुख्य इमारतीच्या मागे एक अधुनिक फायर स्टेशन आणि चार नवी गाडया खरेदी करण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे.

t-,u-,u-;-vkj-,e- ;ktuk

आपणा सर्वांना माहित आहे की जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेच्या माध्यमातुन शहरातील काही समस्यांचे निवारण केले जावु शकते. यासाठी काही योजना मंजुर केल्या गेल्या आहेत व काही योजना प्रगतीपथवर आहेत. या योजना वेळेत पुर्ण करण्यासाठी 253 करोड रूपये वर्ष 2010–2011 च्या अंदाजपत्रकात तरतुद ठेवण्यात आली आहे.

ikFkfed f'k{k.k

महानगरपालिका शिक्षण मंडळद्वारे संचलित शाळेचे विदयार्थ्यांचे शिक्षण, शिक्षकांचे पगार व भत्ते व अन्य सुविधांसाठी 9 करोड रूपये अंदाजपत्रकात ठेवले आहे.

efgyk cky dY;k.k o vU; jk"Vh; dk;de

शहरातील महिला व मुलां संबंधित 13 विविध योजनांसाठी 130 लक्ष रूपये ठेवले आहे. या प्रकारे अपंगासाठी कल्याणकारी योजना, कुटुंब कल्याण., टी. बी. निवारण, एडस विषयी माहिती व अन्य कार्यक्रमांसाठी तरतुद ठेवली आहे.

उत्पन्न व खर्चासाठी विविध लेखा शिर्षातंर्गत केलेली तरतुदाची विस्तृत माहिती आपणांस दिलेल्या अंदाजत्रकामध्ये उपलब्ध आहे.

महापालिकाद्वारे केले गेलेले विकास कार्याने आपणा सर्वांना "All is well" असे वाटत असेल. या परस्थितीस सांभाळुन ठेवण्यासाठी आम्ही आपणांस निवेदन करत आहे की, आपण आपल्या प्रभागवाशियांना, आपल्या मित्रवर्गास व आपल्या नातेवाईकांस मालमत्ता कर व पाणी देयक नियमित भरण्यासाठी प्रोत्साहित करणार म्हणजे वसुल केलेली रक्कम विकास कार्यासाठी ठेवली जाईल व त्यास वेळीच पुर्ण केली जाईल.

स्थायी समितीद्वारे बनविला गेलेल्या या अंदाजास कृपया सर्वसंमतीने मंजुरी दया.

आभारी आहे.

यावेळी मा. सदस्य श्री. हिरानंद जग्यासी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

**सदस्य श्री. सतिश चहाळ :—**सचिव साहेब, आम्हांस प्रस्ताव वाचता येत नाही. त्यामुळे आपणांस आम्ही विनंती करतो की, त्यांचे भाषण त्यांनी या सभागृहास वाचुन दाखवावे. आम्हांला काय आहे ते समजत नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, मा. स्थायी समिती सभापती महोदया, मा. सदस्य, आजचा हा जो अर्थसंकल्प आहे तो स्थायी समितीने तयार करुन सभागृहासमोर सादर केला आहे. मला असे वाटते की, तो परिपुर्ण आहे व सर्वोत्तम आहे. महिला दिनानंतरचा पहिला दिवस आहे, स्थायी समिती सभापती या नात्याने एका महिलेने महापौर या नात्याने एका महिलेस प्रस्तृत केलेला अर्थसंकल्प आहे. शहरातील सर्व महिलांचे हित लक्षात घेता या अर्थसंकल्पात कुठल्याही प्रकारची करवृध्दी दर्शविण्यात आलेली नाही. यासाठी मी महिला दिनाबरोबरच जे विधेयक पारीत झाले आहे जे विधेयक पारीत झाले आहे त्याबदृदल त्यांचे अभिनंदन करतो. त्याच बरोबर स्थायी समिती महोदयांचे सुध्दा अभिनंदन करतो. आयुक्तांनी जेवढे काही कर वाढीचे प्रस्ताव सादर केले होते, ते सर्व ठोकरुन या शहरातील समस्त महिला वर्गाकडे लक्ष देवुन अतिशय चांगला असा हा अर्थसंकल्प सादर केला आहे. त्याचबरोबर काही विषय मी महासभेपुढे ठेवु इच्छितो. या अगोदर म्हणजे सन २००९—२०१० मध्ये आम्ही जो अर्थसंकल्प सादर केला होता त्यावेळेस सुध्दा आम्ही या सभागृहात काही गोष्टींचा उल्लेख केला होता. त्यानुसार आम्ही १०० टक्के सफलता प्राप्त केली आहे. जी, जी आश्वासने आम्ही दिली होती ती सर्व आश्वासने आम्ही पुर्ण केली आहेत. आम्ही मागील अर्थसंकल्पात परिवहन सेवेचा उल्लेख केला होता. ती परिवहन सेवा सुरु झाली आहे. यापुर्वीच्या अर्थसंकल्पात आम्ही मेकेनेकेल स्विपींगचा उल्लेख केला होता, व ती शहरात सुरु झाली आहे.

मेकेनिकल स्विपींगच्याद्वारे रस्त्याची साफसफाई होत आहे. याबाबत उल्हासनगर महाराष्ट्रात दुस—या व तिस—या स्थानात येत आहे. मागील अर्थसंकल्पात आम्ही रस्त्यांची जेवढी काही कामे दर्शविली होती ती सर्वच्या सर्व कामे आज सुरु आहेत. आपण पाहिले असेल की, निरंकारी हॉल पासुन भारत चौकाकडे जो रस्ता जातो त्याचे काम सुध्दा प्रगतीपथावर आहे. डॉल्फिन क्लबपासुन शांतीनगरच्या रस्त्याचे काम सुध्दा सुरु झाले आहे. पेट्रोल पंपापासुन ४नंबर ओटीपर्यंतचा रस्त्याचे काम सुध्दा विकासावर आहे. व्हिनस टॉकिज पासुन ते प्रभात टॉकिज पर्यंतच्या रस्त्याचे सुध्दा विकासकाम सुरु आहे. काम पुर्ण होत आले आहे. गायकवाड पाडयाच्या रस्त्याचे जे काम आम्ही दर्शविले होते त्याचे सुध्दा काम चालु आहे. मागील अर्थसंकल्पात रस्त्यावरील खड्डे भरण्याची जी कामे आम्ही दर्शविली होती ती कामे सुध्दा आम्ही आमच्या कार्यकालावधीत पुर्ण केली आहे. व आपण शहरामध्ये जे सुंदर रस्ते बघत आहात ते तयार करण्याकामी यश प्राप्त केले आहे. जेएनएनयुआरएम विषयीचे आम्ही जे प्रस्ताव ठेवले होते त्यानुसार १६६ कोटीचा पाणी पुरवठयाचा प्रकल्प, जो उल्हासनगरच्या इतिहासात पहिल्यांदाच आला आहे त्यास मा. सभापती महोदयांनी मान्यता दिली आहे. आयुक्तांच्या प्रयत्नाने व देखरेखीखाली ३५ कोटीचे बीएसयुपीचे काम सुरु करण्यात आम्ही सफलता मिळविली आहे. यासाठी मी आयुक्त साहेबांना सुध्दा धन्यवाद देतो. ६ कोटीचे ई—गर्व्हनन्सचे काम संपुर्ण महाराष्ट्रात पहिल्यांदाच सुरु झाले असेल तर ते उल्हासनगरमध्ये त्यामध्ये मी सफलता प्राप्त केली आहे. त्यासाठी श्री. मुकेश आयलानी साहेबांना मी धन्यवाद देवु इच्छितो. तर आपण पाहिले असेलच जसेही आयुक्त साहेबांनी या शहरात आयुक्त म्हणुन कार्यभार स्विकारला तेव्हापासुन उल्हासनगर महानगरपालिकेचे रुप पालटले आहे. आपण जसे उल्हासनगर महानगरपालिकेत पाय ठेवतात, आपणांस एक सुंदर इमारत दृष्टीस पडते. जेव्हा आपण एखादया सुंदर ठिकाणी बसुन काम कराल तर काम सुध्दा सुंदर होईल. यासाठी आयुक्तांना धन्यवाद देतो. त्यांनी या महानगरपालिकेच्या इमारतीचे रुप पालटण्याचे कार्य सुरु केले आहे. त्याचबरोबर महापालिका इमारतीवर एक अतिरिक्त माळयाचे बांधकाम करण्याचे काम सुध्दा प्रगतीपथावर आहे. उदयानांबाबतीत जर आपण पाहिले तर आम्ही जिजामाता उदयानाचे काम दर्शविले होते ते सुरु आहे. लाललोई उदयानाचे काम सुरु आहे. शांतीनगर येथिल प्रवेशद्वार पाहिले तर आपणांस असे वाटते की एका सुंदर शहरात आपण प्रवेश केला आहे. हे सर्व पाहता एक वर्षामध्ये शहरामध्ये सुंदरता आली आहे. त्या प्रवेशद्वाराचे कामही सुरु आहे. महानगरपालिका इमारती समोरील उदयानात स्वामी विवेकानंद यांच्या पुतळयाजवळ कारंज्या बसविण्याचे आम्ही मागील अर्थसंकल्पात दर्शविले होते ते कार्यसुध्दा प्रगती पथावर आहे. शिवाजी महाराजांचा पुतळयाचे सुशोभिकरण करण्याचे आम्ही दर्शविले होते ते कार्यसुध्दा सुरु प्रगतीपथावर आहे. ब—याचशा पुतळयांचे व शहराच्या सौंदर्यात भर घालणारी विकास कामे सुरु आहेत. याच बरोबर वृक्षारोपणाचे सर्वांत चांगले कार्य या शहरात झाले आहे. संपुर्ण शहरात वृक्षारोपण केले जात असल्याचे आपण पाहिले असेल. फक्त वृक्षारोपण केले जात नसुन त्यांना पाणी देण्यासाठी एका वाहनाची व्यवस्था करुन रोजच्या रोज पाणी देवुन ती झाडे वाढविण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे हे शहर सुंदर होत आहे. व सर्वात चांगले असे जे दुसरे काम आहे जे उल्हासनगर महानगरपालिकेच्या सर्व सदस्यांच्या एकतेमुळे झाले आहे. ते आहे कामगारांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसारचे वेतन सर्वांत अगोदर देण्यामध्ये आम्ही सफलता प्राप्त केली आहे. इतर ठिकाणी कर्मचा—यांना विविध समस्यांना तोंड दयावे लागत आहे परंतु उल्हासनगर महानगरपालिकेने सर्वात अगोदर सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी केली आहे. जुन्या कामांबाबतीत मी सभागृहामध्ये जे निवेदन केले त्यानुसार ती सर्व कामे करण्यामध्ये आम्ही सफलता प्राप्त केली आहे. व जेवढी होतील तेवढी कामे करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. या वर्षीचा जो अर्थसंकल्प स्थायी समिति महोदयांनी सादर केला आहे तो अतिशय चांगला आहे. आयुक्त महोदयांनी मालमत्ता करामध्ये वाढ, पाणी पट्टीमध्ये वाढ, पाणी टॅकरच्या भाडयात वाढ दर्शविली होती ती सर्व ठोकरुन अतिशय चांगला असा अर्थसंकल्प महासभेत सादर केला आहे. त्यामध्ये पाणी पुरवठयाचा जो १६६ कोटीचा प्रकल्प आहे, तो आम्ही मंजुर केला आहे, त्यात आमची प्रांथमिकता अशी राहिल की, हे काम आम्ही चांगल्या प्रकारे पार पाडावे व त्यामध्ये आम्ही यशस्वी होवु आमचे असे प्रयत्न राहतील. बीएसयुपीचे ३५ कोटीचे जे काम आम्ही हाती घेतले आहे, त्यामध्ये सुध्दा आमचे असे प्रयत्न राहतील की यामध्ये सुध्दा आम्ही सफल होवू. ई—गर्व्हनन्सचे ६ कोटीचे जे काम आहे ते सुध्दा लवकरच सुरु होणार आहे. आम्ही हे तीन प्रकल्प चांगल्या पध्दतीने पुर्ण करु या गोष्टीचे या अर्थसंकल्पात विशेष करुन लक्ष देण्यात आलेले आहे. दुसरी ही महत्वाची गोष्ट अशी की स्थायी समितीने या शहरास वेगवेगळया नावाने काही इमारती बांधण्याचे प्रस्तृत केले होते. ज्यामध्ये सिंधु भवनचा उल्लेख होता, उत्तरभारतीयांसाठी भवनाचा उल्लेख होता, मराठी भवनाचा उल्लेख होता, डॉ. आंबेडकर भवनाचा उल्लेख होता. त्याचबरोबर आणखी काही भवनांचा उल्लेख केलेला होता. परंतु आमचे उल्हासनगर हे अनेकता मध्ये एकतेचे प्रतिक आहे. यासाठी या महापालिकेने सर्वसंमतीने उत्तरभारतीय भवन, मराठी भवन, आंबेडकर भवन या सर्वांना बाजुला सारुन आम्ही सर्व एक आहोत अशी घोषणा देत उल्हासभवन या नावाने

या महासभेत प्रस्ताव ठेवत आहोत. या भवनामध्ये सर्व जाती धर्माचे लोक येतील, यासाठी त्याचे नाव आम्ही उल्हास भवन असे ठेवु. नविन रस्त्यांसाठी मा. स्थायी समिती सभापती महोदयांनी ५ कोटी रुपयांची तरतुद ठेवलेली आहे. परंतु यापुर्वी प्रस्तृत केलेले जे वेगवेगळे भवन होते ते अडीच कोटी रुपये खर्चाचे होते त्या ऐवजी उल्हासभवनसाठी एक कोटी रुपयाची तरतुद करुन उर्वरीत दिड कोटी रुपये रस्ते दुरुस्तीसाठी म्हणुन साडेसहा कोटीची तरतुद करत आहोत. रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी स्थायी समितीने दोन कोटी रुपयांची तरतुद ठेवली आहे ती आम्ही कायम करीत आहोत. नगरसेवक निधी म्हणुन सहा लाखा रुपये ठेवण्यास मा. स्थायी समिती सभापती महोदयांनी मान्यता दिलेली आहे. स्थायी समितीचा जो निधी आहे त्यात मा. स्थायी समिती सभापती महोदयांनी १६ लाख रुपये ठेवले असून त्यास कमी करुन १२ लाखाची मान्यता आम्ही येथे देत आहोत. तसेच ज्या प्रभांगामध्ये अधिक काम करण्याची आवश्यकता आहे अशा काही प्रभागांचे क्रमांक मी यापुढे देत आहे त्या प्रभागांमध्ये ५,५ लाख रुपयांची वाढीव कामे करण्यात यावीत. असे ५२ प्रभाग आहेत की जेथे अधिकाधिक कामांची आवश्यकता आहे. त्याठिकाणी पाच पाच लाख रुपये खर्चाची ही अधिक कामे करण्यात यावीत. शिक्षण मंडळासाठी आम्ही ९ करोड रुपये ठेवले आहेत, जेणेकरुन शहरातील गरीब मुले चांगल्या प्रकारचे शिक्षण घेवु शकतील. ज्याप्रमाणे महापौर निधी, उप—महापौर निधी, स्थायी समिती सभापती निधी, व अन्य काही निधी ठेवुन चांगला असा अर्थसंकल्प सादर केला आहे. मा. आयुक्तांनी महोदयांनी कर वाढीचे जे प्रस्ताव सादर केले होते ते ठोकरुन मा. स्थायी समिती सभापती यांनी जे ठेवले आहे त्यांची मी येथे विस्ताराने माहिती देत आहे. कोणतीही करवाढ न करता, २०६ कोटीचे जे प्रकल्प आम्ही आणत आहोत ते लक्षात घेता मा. स्थायी समिती महोदयांनी ४ करांमध्ये वाढ केली आहे. पाणी पुरवठा लाभ कर जो यापुर्वी तीन टक्के होता आता तो ४ टक्के केला आहे. मलप्रवाह सुविधा लाभ कर १ टक्क्याच्या ऐवजी २ टक्के साफसफाई कर ५ टक्क्याऐवजी सहा टक्के व पथकर सहा टक्केच्या ऐवजी ७ टक्के, फक्त या करांमध्ये वाढ करुन बाकी सर्व करांमध्ये प्रस्तावित केलेली करवाढ रद्द केली आहे. पाणीपट्टी करामध्ये वाढ करण्यास नकार दिला आहे. टॅकरवरील भाडयात वाढ करण्यास नकार दिला आहे. अग्निशमन सेवा शुल्क या सर्व करांची प्रस्तावित वाढ रद्द केली आहे. सर्व सदस्यांच्या हातात अर्थसंकल्पाची पुस्तिका आहे, नगररचना विभागाकडुन बांधकाम परवानगीच्या वेळेस जे शुल्क वसूल केले जाते त्यांमध्ये थोडीफार वाढ करण्यात आलेली आहे. दोनशे चौरस मिटरच्या बांधकामाच्या प्लींथ सर्टीफिकेटसाठी यापुर्वी जे ५००० रुपये घेतले जात होते त्याऐवजी ७५०० रुपये व दोनशे मिटर पेक्षा जास्त जागेसाठी यापुर्वी जे ५००० रुपये घेतले जात होते त्या ऐवजी १०००० रुपये घेतले जातील ही अल्पशी दरवाढ केली जाणार आहे. व दोनशे मिटरपर्यंतच्या बांधकामाच्या कंम्पीलीशन सर्टीफिकेट साठी ५०० च्या ठिकाणी ७५० व २०० मिटरपेक्षा जास्त बांधकामाच्या कंम्पलीशन सर्टीफिकेटसाठी ५००० रुपये ऐवजी १०००० रुपये घेण्याचा प्रस्ताव आम्ही ठेवला आहे. अशा प्रकारे या अर्थसंकल्पात जास्त काही करवाढ केलेली नाही.

२००९—१० चा जो २५६.९५ करोड उत्पन्न व २५६.९० लाख खर्चाचा हा अर्थसंकल्प या सभेपुढे सादर करण्यात आलेला आहे त्यास सर्वसंमतीने मान्यता दिली जावी.

वर्ष २०१०—११ ची जी अर्थसंकल्पाची जी पुस्तिका आपणांस मिळाली आहे त्यामध्ये टेलिफोन इन्टरकॉम दुरुस्ती यासाठी ५ लाख रुपये वाढ करण्याचा प्रस्ताव मी येथे ठेवत आहे. गोल मैदान येथे हेल्थ सेंटर उघडण्यात येणार असल्याचे पहिल्यांदाच स्थायी समिती महोदयांनी अर्थसंकल्पात दर्शविले आहे. कॅम्प नं. १,२,३ चे सर्व रहिवाशी या केंद्राचा फायदा घेवु शकतील. त्यासाठी २५ लाख रुपयाची तरतुद यामध्ये केली जावी. ज्या प्रभांगामध्ये ५—५ लाख रुपयांचे जे वाढीव काम केले जाणार आहे ते प्रभाग समिती क्र. १ मधील प्रभाग क्र १, ३, ६, १४, १५, १६, १८, २०, २१, २४, २५ या प्रभागांचा समावेश आहे. प्रभाग समिती क्र. २ मधील प्रभाग क्र. १२, १३, २२, ३०, ३३, ३४, ३५, ४१, ४४, ४६, ४३ व ५४ चा समावेश आहे. प्रभाग समिती क्र. ३ मधील प्रभाग क्र. ७, ८, ९, १०, ११, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५६, ५८, ५९, चा समावेश आहे. प्रभाग समिती क्र. ४ मधील प्रभाग क्र. ५५, ५७, ६०, ६२, ६४, ६५, ६८, ७०, ७१, ७२, ६३, ७४, ७५, ७६ या प्रकारे ५२ प्रभागांचा समावेश आहे. या ५२ प्रभागात ज्या प्रभागाचे विकासाचे काम थांबलेले आहे त्यामध्ये ५,५, लाख रुपये खर्चाची अधिक कामे होतील. या प्रकारे या सभागृहात हा जो अर्थसंकल्प सादर करण्यात आलेला आहे. त्याबद्दल मी असे म्हणेन की हा अतिशय चांगला अर्थसंकल्प आहे. यास सर्वसंमतीने पारीत केले जावे. धन्यवाद। रस्त्यांसाठी ५—५ कोटी ऐवजी ऐवजी ६.५० कोटी तरतुदीचा आम्ही जो प्रस्ताव ठेवलेला आहे आणि रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी दोन कोटींची जी तरतुद ठेवली आहे त्याविषयी गटनेत्यांकडुन काही रस्त्यांच्या यादया आलेल्या आहेत त्यांसाठी मा. महापौर महोदया, मा. उप—महापौरजी, मा. स्थायी समिती सभापती महोदया व आमचे सभागुह नेता हे निर्णय घेतील. त्या यादया मी सचिव साहेबांना देत आहे. याबाबत आपसामध्ये बसुन निर्णय घेतला जाईल. कारण

की रस्त्यांसाठी साडेसहा कोटीची जी तरतुद ठेवण्यात आलेली आहे त्या निधीतुन कोणत्या रस्त्यांची कामे करण्यात यावी याचा निर्णय समिती घेईल. धन्यवाद।

यावेळी मा. सदस्या श्रीमती संगिता कंडारे हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण:–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, स्थायी यसमिती सभापती, व आयुक्त साहेब, मला एक सूचना करायची आहे. आणि थोडासा फेरबदल असा आहे की, उल्हासनगरमध्ये कॅम्प नं. १ ते ५ मधील स्मशान भुमींची अवस्था एवढी खराब आहे की, भिंती तुटल्या आहेत. मध्यंतरी तक्रार आलेली की, डुकरे घुसुन लहान मुलांना.......... त्यासाठी ४ स्मशानभुमींसाठी ५ लाख रुपयांची तरतुद ठेवली आहे ती अत्यंत कमी आहे. त्याबाबतीत सभागृहाला माझी अशी सूचना आहे की, प्रत्येक स्मशानभुमीसाठी १५,१५ लाख रुपयांची तरतुद ठेवण्यात यावी. आणि दुसरे म्हणजे व्हीटीसी ग्राउंड मध्ये बायोगॅस प्रकल्प उभारण्यात येणार आहे त्याच्यासाठी आपण तरतुदी ठेवली आहे २५ लाख रुपये. परंतु अंदाजित रक्कम अशी ५० लाख रुपये आहे. तर २५ लाख रुपये कमी होईल. ५० लाख रुपये ठेवले तर ते काम सुरु होईल. आपणांस अशी विनंती आहे की या कामासाठी ५० लाख रुपयाची तरतुद ठेवण्यात यावी. आणि तिसरे म्हणजे शिक्षण मंडळ सभापती आणि उपसभापती या दोघांनाही वाहनभत्ता असतो, आपल्या येथे उपसभापती यांना वाहनभत्ता नाही. तरी कृपया उपसभापतींनाही वाहनभत्ता देण्यात यावे असे यात नमुद करण्यात यावे. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, मा. स्थायी समिती सभापती व आयुक्त साहेब, आयुक्त साहेब मी आपणांस काही सांगु इच्छित असल्याने कृपया आपण लक्ष दयावे. सर्वात प्रथम स्थायी समिती सभापती महोदयांना मी अभिनंदन करतो त्यांनी अतिशय असा चांगला अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पावर अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे. प्रशासनाने या अर्थसंकल्पावर जर लक्ष दिले तर या शहरामध्ये जी विकास कामे आहेत ती अतिशय चांगल्या पध्दतीने पुर्ण होवु शकतील. कारण की, असे पाहण्यात आले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये सिमेंटची एक गोणी सुध्दा मिळत नाही. किरकोळ दुरुस्तीचे काम होत नाही. प्रत्येक झोनमध्ये मिस्त्री असतो परंतु मजुर नसतात हे तर असे झाले की, इंस्पेक्टर जास्त हवालदार कमी. तर आयुक्त साहेबांना माझी अशी विनंती आहे की, या अर्थसंकल्पाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच शहरामध्ये जी विकास कामे चालु आहेत ते लक्षात घेता ज्या काही कर्मचा–यांची कमतरता आहे ती दुर करण्यासाठी पदे भरण्यात यावीत. प्रत्येक झोनमध्ये पुरेसे कर्मचारी दिले जावेत. व सार्वजनिक आरोग्य विभागात सफाई कामगारांना कचरा उचलण्यासाठी ज्या गाडया पुरविल्या जातात त्याची स्थिती अतिशय खराब आहे, किरकोळ खर्चासाठी आगाऊ रक्कम दिली जात नाही. आयुक्त साहेबांना माझी विनंती आहे की या बाबीकडे लक्ष दिले जावे. मा. महापौरजी, मागील महासभेत मी आपणांस पत्र दिले होते आज सुध्दा मी पत्र दिले आहे. उल्हासनगर मधील व्यापा–यांकडुन हा जो स्थानिक कर घेतला जात आहे त्याबाबतीत आजच्या या महासभेमध्ये एक ठराव पारीत करुन राज्य शासनास सभागृहाच्या भावना कळविल्या जावेत की, उल्हासनगरमधील जनता, उल्हासनगरचे व्यापारी स्थानिक स्वराज्य संस्था कराच्या विरोधात आहेत. कारण की अगोदरपासुनच जकात करामुळे व्यापारी अतिशय त्रस्त आहेत. शेजारच्या अंबरनाथ आणि बदलापुर मध्ये जकात कर नसल्याने उल्हासनगरमधील व्यापा–यांच्या धंदयावर फार मोठे नियंत्रण येते. यास्तव माझी आपणांस विनंती राहिल की, स्थानिक कर व जकात कर लावु नये. यासाठी सर्वसंमतीने आपण ठराव पारीत करुन शासनास पाठवु या आपण जर विचाराल की पैसे कोठुन येतील तर खरे तर ते शासनाचे काम आहे. मी आपणांस एक सूचना देतो की जसे गुजरात मध्ये वॅट टॅक्सवर सर्चचार्ज लावुन सरचार्जची जी रक्कम गोळा होते ती महापालिकेस दिली जाते. महाराष्ट्र शासनाने सुध्दा तसे केले पाहिजे. माझी आपणांस विनती आहे की, आपण या प्रकारचा ठराव या महासभेत पारीत करावा. जर कायदयानुसार आपण असा ठराव पारीत करु शकत नसाल तर मा. स्थायी समिती सभापती श्रीमती जया माखिजा महोदयांचे जे भाषण आहे त्यामध्ये कमीत कमी अशी वाक्य आली पाहिजे की, आमची ही जी सभा आहे तिचा असा निर्णय आहे की, उल्हासनगरमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था कर लागु होता कामा नये. मला आशा आहे की, सभागृहात आमचे हे जे सन्माननिय सदस्य बसले आहेत ते उल्हासनगरमधील व्यापा–यांचे हित लक्षात घेता अशा प्रकारचा ठराव पारीत करतील किंवा जी कायदेशीर बाब असेल तीस मान्यता देवु. व आयुक्त साहेबांना मी पुन्हा एकदा विनंती करतो की जसे मी आपणांस सांगितले, लहान लहान कामे तर होत नाहीत त्यांकडे लक्ष दिले जावे. कारण की, ५३९ ते ५४० कोटीचा आपण अर्थसंकल्प पारीत करतो परंतु जेव्हा आम्ही प्रभागात जातो, झोनमध्ये जातो तेव्हा आम्हांस एक सिमेंटची गोणी सुध्दा मिळत नाही. एक मजुर मिळत नाही, एक सफाई कामगार मिळत नाही त्यासाठी खुप दु:ख होते. आम्ही लोकांना काय सांगणार? एकीकडे आम्ही म्हणत

आहोत की, शहराचा विकास होत आहे. आम्ही विकासाची मोठमोठी कामे करतो. त्याचबरोबर लहान लहान कामांकडे सुध्दा आम्ही लक्ष दिले पाहिजे. मी पुन्हा एकदा आयुक्त साहेबांना व महापौर महोदयांना विनंती करतो की, व्यापा—यांची जी समस्या आहे, व्यापा—यांचे जे दु:ख आहे ते लक्षात घेता आज येथे ठराव पारीत केला जावा. धन्यवाद।

यावेळी मा. सदस्य श्री. मोहनदास रामरख्यानी, श्री. महेश सुखरामानी हे सभागृहातुन बाहेर गेले.



**सदस्य श्री. सुंदर मंगतानी :—**मा. महापौरजी, मा. उप—महापौरजी आणि आयुक्त साहेब, ५२ प्रभागांमध्ये ५,५, लाख रुपयाचे हे जे जादा काम होणार आहे त्यामध्ये माझ्या प्रभागाचा क्रमांक नाही, सर्वात जास्त समस्या माझ्या प्रभागात आहे. प्रभाग क्र. ४५ आणि ४६ चा त्यामध्ये समावेश केला पाहिजे. व शहरात पुल बांधले जात आहे, रस्ते बांधले जात आहेत असे हे सांगत आहेत परंतु उल्हास स्टेशनचा रस्ता जो गटार बनला आहे, तो आजपर्यंत तयार करण्यात आलेला नाही. तो त्यांच्या लक्षात येत नाही, उल्हास स्टेशनवरुन रोज लाखो लोक कॅम्प नं. १,२,३ मध्ये येजा करत आहेत, व तेथे पावसाळयात कितीतरी पाणी भरते त्यामुळे महिलांना त्रास होतो. सर्वात घाणेरडा रस्ता उल्हास स्टेशनचा आहे. परंतु तो तयार करत नाहीत. त्या रस्त्याचे गटारात रुपांतर झाले आहे. आपण म्हणता की संपुर्ण शहर स्वच्छ व सुंदर आहे. फक्त आपल्या फायदयासाठी ५२ प्रभागांमध्ये ५,५, लाख रुपये खर्चाचे वाढीव काम आपण समाविष्ट केली आहेत. माझ्या प्रभागामध्ये सर्वत्र समस्याच समस्या आहेत. दुजाभाव केला जात आहे. मागील वेळेस गलिच्छ वस्तीचाही मला निधी मिळाला नाही. तीन वर्षात मला एक रुपयाचाही निधी मिळाला नाही. मनमानी करुन आपल्या सदस्यांना निधी दिला आहे. शिवाजी नगर, आयोध्या नगर, गणेश नगर या चार घोषित झोंपडपट्टया असूनही एक रुपयाचाही निधी मिळाला नाही. व हे सर्व आपल्या दालनामध्ये बसवून पाहिजे तसा निधी वाटप करत आहेत. व जमनादास पुरस्वानी या अर्थसंकल्पाची प्रशंसा करत आहे की, उल्हासनगर शहर सुंदर बनविले आहे. मी तर असे म्हणतो की, उल्हासनगरचा सत्यानाश केला आहे. उल्हासनगरचा रस्ता तयार केला जात नाही. पिण्याच्या पाण्याची समस्या आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प मंजुर करण्याचा आम्हांस कोणताही अधिकार नाही. तरी सुध्दा मंजुर होत आहे. कारण की सत्ता आहे मजबुर आहे. ज्या प्रभागांमध्ये सर्वात जास्त समस्या आहेत त्यांच्यासाठीच वाढीव निधी मंजुर केला पाहिजे. मी आपणांस बरीचसी पत्र दिली आहेत. गलिच्छ वस्ती निधीसाठी मी पन्नास एक पत्र दिले आहेत आयुक्त साहेब, पाहिजे तर त्याची प्रत मी आपणांस देवु शकतो. महापौरजी, आपणांसही त्याची प्रत देवु शकतो. उल्हास स्टेशन हा सर्वात घाणेरडा रस्ता आहे, तेथुन रोज लाखो लोक येजा करतात या रस्त्यावरच चांदीबाई कॉलेज आहे त्या रस्त्यात गटाराचें स्वरुप आले आहे. असे असतांना आपण या शहरास सुंदर कसे म्हणता. या शहराचे तर गटार झाले आहे. रस्ता तयार करा, गल्ली बनवा, गटारे बांधा, झाडे लावा. उल्हास स्टेशनचा जो रस्ता आहे मुख्य रस्ता आहे , त्याची दुरुस्ती करणे अतिशय आवश्यक आहे. तो रस्ता कोण तयार करणार? आहे कुणाचे लक्ष? नगरसेवकाचे वर्तमानपत्रात नाव आले पाहिजे, टीव्हीवर फोटो आला पाहिजे, असे रस्ते तयार केले पाहिजे. हे अतिशय चुकीचे होत आहे. पाण्याची समस्या दुर करण्यासाठी मी किती प्रयत्न केले, सभा तहकुब करा, हे करा ते करा. एका शहरास आपण पिण्यास पाणी देवु शकत नाहीत? काय फायदा आहे त्या सत्तेचा? अडीच वर्षामध्ये आपण १० एमएलडी पाणी वाढवुन घेवु शकला नाहीत? मेहरबानी करुन अशा सभा बैठका घेत बसु नका. शहरवाशियांना अगोदर पाणी दया. व पाच पाच लाखाचा हा जो ५२ प्रभागामध्ये निधी दवुन आपण भेदभाव करत आहात. हे सर्व रद्द करा. ज्याचा प्रभागात जास्त समस्या असतील त्यांनाच हा ५ लाखाचा वाढीव निधी मिळाला पाहिजे. व ज्याच्या प्रभागात गलिच्छ वस्ती आहे आणि मागील तीन वर्षापासुन ज्यास त्याचा निधी मिळाला नाही त्यालाच प्रथम गलिच्छ वस्तीचा निधी मिळाला पाहिजे. या बाबती आपणाकडे काही उत्तर आहे? तीन वर्षापासुन मी पत्रव्यवहार करत आहे, माहिती अधिकारान्वये माहिती मागत आहे. आजपर्यंत माहिती अधिकारान्वये मागितलेल्या माहितीची मला माहिती मिळाली नाही. आम्ही हे केले, ते केले, रस्ते तयार केले, अमुक केले, टमुक केले असे म्हणता परंतु संपुर्ण शहराचा सत्यानाश झाला आहे. नाहीतर ही खुर्ची सोडुन दया.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, यांच्या येथिल राधास्वामी सत्संग पासुन तीन नंबर ओटीपर्यंतचा आमच्या आमदार साहेबांनी एवढा चांगला रस्ता तयार केला त्याबद्दल तर त्यांनी प्रशंसा करावयास पाहिजे होती. यांना फक्त उल्हास स्टेशनचा एकच रस्ता दिसतो त्या

व्यतिरिक्त तर काही दिसत नाही. या शहरामध्ये आमच्या लोकांनी कोणते काम केले नाही? आमच्या आमदार साहेबांनी २५ रस्ते तयार केले. त्याबद्दल आपण प्रशंसा केलीत काय?

<u>सदस्य श्री. सुंदर मंगतानी :—</u>उल्हास स्टेशनच्या रस्त्यांनी लाखो लोक येजा करतात, उल्हास स्टेशन रेल्वे स्टेशन आहे, तेथिल रस्ता चांगला तयार केला पाहिजे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>श्री. भुल्लर महाराजजी आमच्या माजी आमदारांचा निधी आहे.

<u>सदस्या श्रीमती मालती करोतिया :—</u>मा. आयुक्त साहेब, श्री. सुंदर मंगतानी यांनी जो मुद्दा उपस्थित केला ती वस्तुस्थिती आहे.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

यावेळी मा. सदस्या श्रीमती मोना वनवारी, श्रीमती चंद्रा टेकचंदानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.



<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>माजी आमदारांच्या निधीतुनच रस्त्याची कामे झालेली आहेत, नविन आमदारांचा निधी अजुन आलेला नाही.

<u>सदस्य श्रीमती मालती करोतिया :—</u>त्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण का केले जात नाही? आम्हांला कॉंक्रिटीकरणाचा रस्ता पाहिजे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौर महोदया, रस्त्यांबाबतीत मी अगोदरच सांगितले आहे की, रस्त्यांची आपणांस जी काही यादी दयायची असेल ती दया. रस्त्यांबाबतीत एक समिती नेमली जाईल. ती समिती कोणत्या रस्त्यांचे काम हाती घ्यायचे ते ठरवेल.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>स्थायी समिती सभापती महोदया, काही सदस्यांकडे जर निधी जास्त होत असेल तर त्यांचा निधी कपात करुन तीन तीन लाख रुपयांचा निधी आम्हांस दिला जावा असा माझा प्रस्ताव आहे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>मा. महापौरजी, आता त्यांनी अर्थसंकल्प वाचुन दाखविला.

<u>सदस्य श्री. सुंदर मंगतानी :—</u>५२ प्रभागांमध्ये ५,५, लाखाची ही जी वाढीव कामे करणार आहात त्याबाबत मी सांगु इच्छितो की, सर्वात जास्त घाणेरडा व जास्त समस्याचा प्रभाग माझा आहे. माझ्या प्रभागाचा सुध्दा यामध्ये समावेश केला जावा.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>आपणांस जे काही करायचे असेल ते करा परंतु आम्हांस जे काही बोलायचे आहे ते तर आपण जरा ऐकुन तर घ्या. हा जो अर्थसंकल्प आहे तो आकडयांची हेराफेरी करुन फुगवलेला अर्थसंकल्प आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>श्री. सुंदर मंगतानी या सदस्यास एवढेही माहित आहे की, उल्हासनगर शहरामध्ये स्टेशनच्या बाजुला स्कायवॉकचे काम चालु आहे. त्यामुळे रस्ता खराब झालेला आहे. परंतु मुद्दामहुन ते सभागृहात ओरडुन ओरडुन उल्हास स्टेशनच्या रोडबाबत सांगत आहे. त्यांना चांगले माहित आहे की, स्कायवॉकचे काम चालु आहे, त्यामुळे रस्ता खराब झाला आहे. आता जेवढे काही रस्ते तयार होतील

त्यासाठी एक समिती नेमली जाईल व जे रस्ते खरोखरच खराब असतील, व जे रस्ते बनण्या लायक असतील त्यास जरुर प्राधान्य दिले जाईल. तर मग श्री. सुंदर मंगतानी यांचाच का रस्ता सोडुन देणार आम्ही? दुसरे म्हणजे पाण्याविषयी, आम्ही ठरविले आहे की, कॅम्प नं. १,२,३ मध्ये पाणी कमी येते, कॅम्प नं. ४ व ५ मध्ये जरा पाणी बरे येते. तर आम्ही येथे सांगतो की, सर्वांना समान पाणी मिळाले पाहिजे असा आम्ही निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी काय करावे लागेल? एक बैठक घ्यावी लागेल. संबंधीत सर्व अभियंते यांना बोलावुन समप्रमाणात सर्वांना पाणी कसे देता येईल याचा विचार केला पाहिजे. श्री. सुंदर मंगतानी यांच्या प्रभागात जर पंधरा मिनिट पाणी मिळत असेल तर श्री.बी.बी. मोरे यांच्या प्रभागात एक तास पाणी मिळता कामा नये असा निर्णय घेवुन आम्ही काम करणार आहोत.

<u>सदस्य श्री. सुंदर मंगतानी :—</u>१२ नगरसेवक आहेत ज्यांच्या प्रभागात पाणी पुरवठा कमी दाबाने होत आहे, माझ्या एकटयाच्या प्रभागात कमी दाबाने पाणी होत नाही. श्री. लाल पंजाबी यांच्या प्रभागात सुध्दा पाणी पुरवठा कमी दाबाने होत आहे. आणि त्यानंतर उल्हास स्टेशनचा रस्ता तयार झाला तर केवळ माझे नाव होणार नाही तर सत्ताधारी पक्षाचे नाव होईल. काही मोजक्या प्रभागांमध्ये पाच पाच लाख रुपये खर्चाची जे वाढीव काम होणार आहे, ते होता कामा नये. ज्या प्रभागात समस्या आहेत त्याच प्रभागात या निधीतुन ही कामे झाली पाहिजेत.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>ज्या प्रभागांमध्ये आजपर्यंत काहीही विकास कामे झालेली नाहीत अशा प्रभागांमध्ये विकासकामे करण्यासाठी ही विशेष तरतुद करण्यात आलेली आहे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>श्री. मोरे साहेब, तुमची पोपटपंची बंद करा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>आणि हे श्री. सुंदर मंगतानी हे सत्ताधारी पक्षाकडुन पैस घेतील आणि दुनियादारीही घेतील. व मोठ मोठयाने ओरडणे हे सुरुच ठेवतील.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>पाच, पाच लाख रुपयाचा निधी सर्व प्रभागांना मिळाला पाहिजे. मोजक्याच प्रभागांना का? सर्व प्रभागांना मिळाला पाहिजे. अर्थसंकल्पीय तरतुद सर्व प्रभागांना एकसारखीच असली पाहिजे.

<u>सदस्य श्री. सुंदर मंगतानी :—</u>शहरात कोण पैसे घेतात हे सर्वांना माहित आहे, मेहरबानी करुन माझे नाव घेवु नका. मी देणा—यामधील आहे, घेणा—यामधील नाही. माझा स्वत:चा दर महिन्याला पंधरा हजार रुपये खर्च चालु आहे. मला माहिती आहे कोण कोण पैसे खातो. तरी सुध्दा मी त्याबद्दल काही बोलत नाही कारण त्याबद्दल बोलण्यामध्ये माझा काही संबंध नाही. आम्हांला पाणी दया, पाणी दया.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>खाणा—याला खावु दया, शेम शेम.........

<u>सदस्य श्री. सुंदर मंगतानी :—</u>या शहरास नर्क बनवु नका. थोडा स्वर्ग बनवायचा विचार करा. जर उल्हासस्टेशनचा रस्ता झाला तर शिवसेना, भाजपाचे नाव होईल.

यावेळी मा. सदस्य श्री. रामसागर यादव हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>उल्हास स्टेशनचा रस्ता, उल्हास स्टेशनचा रस्ता असे किती वेळा सांगणार तेथे स्कायवॉकचे काम चालु आहे.

<u>सदस्य श्री. सुंदर मंगतानी :—</u>तीन वर्षापासुन जेवढे काही सभापती झाले त्यांनी आपल्या लोकांना प्राधान्य दिले आहे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>आपणांसही देतील, सत्ताधारी पक्षवाले जरुर देतील.

<u>सदस्य श्री.सुदर मंगतानी :—</u>कधी देतील? दिड वर्ष उरले आहे, काय देणार? काहीपण बोलता.

<u>काही सदस्य :—</u>पाच वर्षानंतर देणानर काय?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u> सत्ताधारी पक्षामध्ये राहुन ओरड करत आहात.

<u>सदस्य श्री. सुंदर मंगतानी :—</u>आपण सुध्दा बसुन घ्या ना, आपण का बोलता? आपण आपल्या स्वत:साठी बोलता त्याप्रमाणे मला सुध्दा माझ्या स्वत:च्या प्रभागासाठी बोलण्याचा हक्क आहे.

<u>उप—महापौर :—</u>सन्माननिय सदस्य श्री. सुंदर मंगतानी साहेब, आपण एकाच वेळेस काय ते बोलुन घ्या. वारंवार उभे राहुन बोलण्याची काही आवश्यकता नाही. दुस—या सदस्यांनाही बोलायचे आहे.

<u>सदस्य श्री. सुंदर मंगतानी :—</u>मी एकदाच बोललो आहे, आणि ते आपण ऐकले आहे, त्याचे आपण उत्तर दया.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>श्री. सुंदर मंगतानी यांनी जे काही वक्तव्य केले ते चुकीचे आहे, यांना माहित आहे, उल्हास स्टेशन येथे स्कायवॉक तयार झाला आहे., त्यामुळे रस्त्याची पुर्ण खराबी झाली आहे. स्कायवॉकचे काम पुर्ण झाल्यानंतर रस्त्याचे काम सुरु होणार आहे, हे ही त्यांना चांगले माहिती आहे. आणि प्रत्येक सदस्यांनी आपल्या प्रभागातील एक एक दोन दोन रस्त्याचे काम या यादीमध्ये समाविष्ट केले आहे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, स्थायी समिती सभापती आणि आयुक्त साहेब, आज हा जो अर्थसंकल्प स्थायी समिती सभापती महोदयांनी सादर केला आहे. आणि स्थायी समिती सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी त्यातील काही तरतुदी वाचुन दाखविल्या, आम्ही काय काय सुधारणा करत आहोत एवढेच दाखविले आहेत. त्यात त्यांनी काही प्रभागांसाठी पाच पाच लाख रुपयांची वाढीव कामे करण्यात येतील असे सांगितले आहे, परंतु ती तरतुद त्यांनी मोजक्याच प्रभागांसाठी ठेवलेली आहे, ही तरतुद त्यांनी सर्व प्रभागांसाठी ठेवली पाहिजे आणि त्याचबरोबर त्यांनी साफसफाईचा एक मुद्दा सांगितला......

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>आयुक्त साहेब, तुम्ही जरा ऐकुन घ्या.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u> ॲन्थोनी हा जो ठेकेदार आहे, त्या ठेकेदाराला अगोदरच एक ठेका दिलेला आहे. परत कचरा विल्हेवाट लावण्याचा दुसरा एक ठेका दिला आहे. व रस्ते साफसफाईसाठी जी गाडी मागविली आहे (पॉवर स्विपींग मशिन) ती सुध्दा अप्रत्यक्षपणे ॲन्थोनीला दिलेली आहे, तरीसुध्दा उल्हासनगरमध्ये किती रोगराई आहे ते आम्ही तुम्हांला दाखवुन देतो त्यासाठी तुम्ही आमच्याबरोबर फिरा. कितीतरी कचरा पडलेला आहे. फार मोठया प्रमाणावर मच्छर झालेले आहेत. जंतुनाशके फवारणीसाठी जी तरतुद ठेवलेली असते ती जाते कोठे? हा खर्च होतो कोठे? फक्त आकडयांची हेराफेरी करुन बेजेट फुगविणे आणि प्रत्यक्षात वस्तुस्थिती वेगळीच आहे. तरीसुध्दा आमच्या गोष्टीकडे काळजीपुर्वक लक्ष देवुन या अर्थसंकल्पामध्ये ज्या तरतुदी दर्शविल्या आहेत, त्यांवर अंमलबजावणी आहे हे तुमच्या कारकिर्दीमध्ये आहे. महापौरांच्या कारककिर्दीमध्ये शहर सुंदर व्हावे ही आमची इच्छा आहे. हे तुमच्या माहितीसाठी सांगतो. ठाणे शहरामध्ये श्री. सतिश प्रधान नगराध्यक्ष होते. त्यांनी संपुर्ण ठाणे शहराचा कायापालट केला होता. त्यानुसार आज मी तुम्हाला विनंती करतो की, फक्त आकडयांचा अर्थसंकल्प सादर न करता काही दिशा दया. लोकांना खोटी आश्वासने देवु नका. जी कामे होण्यासारखी आहेत त्याच कामांची त्यांना आश्वासने दिली पाहिजेत. काही प्रभागांसाठी तुम्ही पाच, पाच लाखांची वाढीव तरतुद ठेवलेली आहे. इतर सदस्यांच्या बाबतीत सात्पंन्न भाव दर्शविला आहे. असे होता कामा नये. तरी सुध्दा याची तुम्ही दखल घ्यावी आणि ही पाच लाखाची वाढीव तरतुद सर्व प्रभागांना मिळेल अशी मी आपणाकडुन आशा करतो.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, त्याचबरोबर स्थायी समिती महोदया, याठिकाणी सन २००८—०९ च्या अर्थसंकल्पामध्ये काही रस्ते घेतले होते. त्याचे काम पुर्ण करण्यात आलेले नाहीत. आणि मागच्या २००८ मध्ये ती कामे झालेली नाहीत. मागच्या अंदाजपत्रकात ती

कामे घेतलेली नव्हती.  जी यादी आहे ती सविस्तरपणे मी आपणांस वाचुन दाखवितो.  कृपया ती कामे घेण्यात यावीत.

१. फकडमंडली ते डॉ. राय यांचा दवाखाना
२. कॅम्प नं. २ मधील बसस्टॉप ते कॅम्प नं. १ मधील बसस्टाप ते बिरला गेट निळकंठ मंदिर

उप–महापौर :–घोळका करुन उभे असलेल्या सन्माननिय सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपापल्या आसनावर बसून घ्यावे.  अर्थसंकल्पावर चर्चा चालु आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–मा. सचिव साहेब, मी यादी वाचुन दाखवित आहे, त्याची कुणी दखल घेणार आहे का?

३. साईकला अपार्टमेंट ते सी ब्लॉक ६३०
४. बॅरेक नं. १९३९ ते १९६७
५. स्वामी शांती प्रकाश हॉल ते सोनी इस्टेट, बस स्टॉप ३५० रस्ता
६. बॅरेक नं. ६७४ ते शांतीविलास ते
७. धिरज टॉवर ते बॅक ऑफ बडोदा

अशी अनेक ५० कामांची यादी मी दिलेली आहे.  ती यादी मी मा. महापौर व स्थायी समिती सभापती महोदयांना देत आहे.  यादीत दर्शविलेली कामे अर्थसंकल्पात घेण्यात यावी ही विनंती.  धन्यवाद।

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–मा. महापौरजी, हा जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे. त्याबाबतीत सार्वजनिक आरोग्य विभागाशी सबंधित एक प्रश्न आहे.  कचरा वाहतुक ठेकेदार अॅन्थानीला आपण रोजच्या हिशोबाने पैसे देतो आणि त्यानंतर पॉवर स्विपींग जी ही मशिन रस्ता सफाई करण्यासाठी आपण आणलेली आहे  त्याचा काय उपयोग झालेला आहे? ही मशिन कोठुन कठपर्यंत चालते?  मा. उप–महापौर साहेब, ही जी मशिन आहे, जर अॅन्थोंनीला तुम्ही दररोजचे १ लाख ३० हजार देत असाल तर या मशिनचा उपयोग काय? ही मशिन येथे आणण्याची गरज काय होती? आणि या मशिनने तुम्ही आजपर्यंत किती रस्त्यांची सफाई केलेली आहे? कोण कोणत्या रस्त्यांची सफाई केली आहे? अर्थसंकल्पामध्ये हे जे ८ लाख रुपये दर्शविले आहे, उप–महापौर साहेब, श्री. अॅन्थोनी या ठेकेदाराला तुम्ही हा जो ठेका दिलेला आहे, त्या ठेक्याप्रमाणे रोड, रस्ता, नाले......................

काही सदस्य :– पास, पास.....

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–अहो, मला जरा बोलु दया, बोलू दया. मध्ये बोलु नका श्री. बोडारे साहेब, मी जे बोलत आहे ते बोलु दया. तुम्ही नंतर बोला ना?  मी ऐकेल तुमचे.

काही सदस्य :–पास, पास.....

सदस्य श्री. रविंद्र बागुल:– मला बोलु दया. श्री. अॅन्थोनी या ठेकेदाराला तुम्ही हा जो ठेका दिलेला आहे, रस्ते साफ करण्यासाठी ही जी पॉवर मशिन आणलेली आहे, या अर्थसंकल्पामध्ये याचा काय उपयोग आहे?  ती मशिन कोठुन कुठपर्यंत चालते, कोठपर्यंतचे रस्ते साफ केलेले आहेत? त्या मशिनमुळे काही फायदा आहे का? का उगाचच त्या मशिनमध्ये अर्थसंकल्पाचे पैसे घालविले आहेत?

सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–मा. महापौरजी, ही सभा अर्थसंकल्पाविषयीची आहे, हे कोणत्या विषयावर बोलत आहेत?

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–श्री. गायकवाड साहेब, हा बजेटचाच विषय आहे, बजेटमध्ये पास झालेली ही मशिन आहे.

यावेळी मा. सदस्या श्रीमती लता निकम, श्रीमती ज्योती चैनानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u>यांना दर महिन्याला कुठलातरी ठेकेदार धरायला व त्याविषयी बोलायला पाहिजे असते.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>नाही, नाही, नाही. श्री. गायकवाड साहेब, तुम्ही सत्तेत आहात तुम्हांला ठेकेदाराची गरज लागते, आम्हांला गरज नाही.

यावेळी श्री. रविंद्र बागुल व श्री. दिलीप गायकवाड हे सन्माननिय सदस्य एकत्रितपणे जोर जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>अर्थसंकल्पावर चर्चा चालु आहे, अर्थसंकल्पावर बोला.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>श्री. दिलीप गायकवाड तुम्ही सत्तेत आहात, तुम्हांला ठेकेदाराची गरज लागेल आम्हांला ठेकेदाराची गरज नाही.

<u>उप—महापौर:—</u>श्री. बागुल साहेब, आपण फक्त अर्थसंकल्पावर चर्चा करावी.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>मी अर्थसंकल्पावरच बोलत आहे.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>मा. महापौरजी, पॉवर स्विपींग मशीचा यांनी हा जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे, त्याबद्दल मी त्यांना विचारु इच्छितो की, त्यांचे गटनेते येथे उपस्थित आहेत का? आहेत ना? स्विपींग मशिनद्वारे दिवसाला जेवढे काही रस्ते झाडले जातात त्याची संपुर्ण यादी गटनेतेकडे दिली जातात ती त्यांना मिळाली आहे किंवा नाही हे त्यांना प्रथम विचारा नंतरच प्रश्न विचारा कारण ही अर्थसंकल्पावरील सभा आहे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य घोळका करुन आपसात बोलत होते.

<u>उप—महापौर :—</u>सन्माननिय सदस्य, आपसात बोलु नका. कृपया आपण जरा बसुन घ्या.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>श्री. रविंद्र बागुल यांनी स्विपींग मशीनबाबतचा विषय काढला. स्विपींग मशिनच्या कामकाजाचा अहवाल रोजच्या रोज गटनेत्यांना दिला जातो. हे खरे आहे की खोटे आहे हे त्यांनी आपल्या गटनेत्यांना विचारुन नंतरच यावर चर्चा करावी.

यावेळी मा. सदस्य श्री. हरेश जग्यासी, श्री. भारत राजवानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>सन्माननिय महापौरजी, श्री. रविंद्र बागुल हे स्थायी समितीचे सदस्य आहेत. यांनी स्विपींग मशिनच्या प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे आणि आता हे येथे विचारत आहेत? यांना काही वाटते का? यांनी अर्थसंकल्पाचा काही अभ्यास केला आहे का? स्विपींग मशिनचा प्रस्ताव त्यांनी स्थायी समितीत मंजुर केला आहे. तो विषय येथे कशाला घ्यायचा?

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>स्थायी समितीत कोणी प्रस्ताव पारीत केला? आम्ही तीन सदस्य आहोत. तुमचे किती सदस्य आहेत? सभापती कोण आहेत? तुमचे किती सदस्य आहेत? आपण त्या सभेचे इतिवृत्त पहा, मी त्यावेळी विरोध केलेला आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौर महोदया, मा. उप—महापौरजी, आयुक्त साहेब, मी येथे आणखी एक सूचना करु इच्छितो की, ही जी रस्त्यांची यादी आलेली आहे, ज्या ज्या सदस्यांनी आपल्या प्रभागातील रस्त्यांची नावे दिली आहेत त्यानुसार यामध्ये बहुतांश सर्व सदस्यांच्या प्रभागातील रस्त्यांचा समावेश आहे. याबाबतीत आम्ही एका समितीची नियुक्ती केलेली आहे, त्या समितीमध्ये मा. महापौर, उप—महापौर, स्थायी समिती सभापती व विरोधी पक्ष नेता व सार्वजनिक बांधकाम समितीच्या सभापती यांचा समावेश आहे.

यामधील कोणकोणत्या रस्त्यांचे, साडे सहा कोटी रुपये खर्चाचे काम हाती घ्यायचे ते ही समिती ठरवेल. आम्ही सर्वांचे प्रस्ताव येथे ठेवले आहे. या सर्व यादया मी मा. महापौरांना सादर करीत आहे. याचबरोबर शहरातील चार स्मशानभुमींसाठी प्रत्येकी पंधरा पंधरा लाख रुपये याप्रमाणे ६० लाख रुपये खर्चाचा प्रस्ताव आलेला आहे. त्या कामी सुध्दा या अर्थसंकल्पात तरतुद केली जावी.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>महापौर महोदया, मी आपणांस विनंती करतो की, .........

<u>उप—महापौर :—</u>श्री. चहाळ साहेब, कृपया आपण बसुन घ्या. नंतर बोला. माईक बंद करा.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>मा. महापौरजी, उप—महापौर आणि आयुक्त साहेब, वर्षाचा अर्थसंकल्प, मागील वर्षी काय झाले आणि पुढीच्या वर्षासाठी आपणांस काय करायचे आहे? मतभेद असतील परंतु जी वास्तविकता आहे ती स्विकारलीच पाहिजे. वर्षानुवर्षे जी कामे रखडली होती ती सन २००९—१० या वर्षात आम्ही दिलेल्या आश्वासनानसार प्रशासनाच्या माध्यमातुन पुर्ण केली आहेत. जे सांगितले ते केले. म्हणजे आमच्याकडे शक्य असते, बोलण्याअगोदर करणे तर तेही केले असते. बोलण्याच्या अगोदर तरतुद करावी लागते आणि त्यानंतर करावे लागते. आधी केले मग बोलले असे करता येत नाही. पण बोले तैसा चाले. आम्ही बोललो तसेच चाललो आहोत. जे रस्ते घेतले तेच रस्ते केले आहेत. ते पुर्ण केलेले आहेत. सर्वांना दिसत आहे. पॉवर स्वीपींग मशीन कशासाठी आणली? रस्ते साफ करण्यासाठी आणलीत. कुठले वॉर्ड नाहीत, वार्डाची यादी दिलेली आहे, किती किलीमीटरचे? यामध्ये काही त्रुटी असतील तर ते भरुन काढण्याचे काम तुमचे आमचे सर्वांचे आहे. पण केव्हा? आज ही अर्थसंकल्पावरील चर्चा आहे. अर्थसंकल्पातबाबत मला काय इच्छा आहे? माझ्या शहरामध्ये, माझ्या विभागामध्ये, माझ्या वॉर्डामध्ये मला काय हवे आहे हे मांडायचे सोडुन नको ते विषय घेतले जातात. म्हणुन मी श्री. बागुल यांना सांगतो की अर्थसंकल्पावर बोला. आम्ही उल्हासनगर मधील जनतेचे प्रतिनिधीत्व करत आहोत. उल्हासनसगरच्या सर्व सामान्य जनतेचा अपेक्षा काय आहे? आमच्याकडुन काय आहे? प्रशासनाकडुन काय आहे? त्याबाबत समर्पक भाषेत श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले आहे. सन २००९—२०१० मध्ये आम्ही दिलेली आश्वासने पुर्ण केली आहेत. केली नसतील तर ती तुम्ही सांगा. एखादा रस्ता झाला नाही आणि पाच लाख मिळाले नाहीत म्हणुन श्री. सुंदर मंगतानी यांनी बोलायचे हे बरोबर नाही. तुमचा राग कशासाठी होता? पाच लाखासाठी होता की रस्त्यासाठी होता? रस्त्यासाठी तुम्हांला पर्याय मोकळा होता. तो रोड घेतला का नाही? आता घेणार ना? श्री.बी.बी. मोरे साहेबांनी सांगितले की, तेथे स्कायवॉकचे काम चालु आहे, इतर रस्ते घेतले आहे, त्यामध्ये हा ही रस्ता घेतला जाईल. तुम्ही सांगा ना आमचे रस्ते घ्या. तुम्हांला काय विकास करायचा आहे तो येथे ठेवा. आम्ही खुला मंच ठेवला आहे, त्यामुळे चर्चा ठेवली आहे. नाहीतर सुरुवातीस सांगितले असते, अर्थसंकल्प सादर केला आहे आणि स्थायी समिती सभापतींनी अर्थसंकल्प सादर केला असता आणि पास पास करुन निघुन गेलो असतो. परंतु चर्चा केवळ तेवढयासाठीच ठेवली आहे की सदस्यांनी याठिकाणी आपले विचार मांडावेत. त्यांना अपेक्षित असलेल्या सुधारणा काय आहेत? विकास काय पाहिजे आहे, त्याबाबतीत आपले मत ठेवावे, त्यावर चर्चा होईल आणि त्यानुसार अर्थसंकल्प पारीत होईल. मला वाटते ते तुम्हांला अपेक्षित नाही. जुन्या पध्दतीनेच चालले पाहिजे. पास, पास म्हणत बोट वर केले की झाले. परंतु याठिकाणी स्थायी समिती सभापतींचे आणि स्थायी समिती सदस्यांचे आणि आयुक्तांचे अभिनंदन केले पाहिजे. महापालिका इमारतीचा त्यांनी कायापालट केला आहे. पुवी आम्हांला वाटायचे की, महापालिकेच्या बाथरुममध्ये जावुच नये. परंतु आयुक्तांनी आल्या आल्या महापालिका इमारतीकडे लक्ष घातले कारण पुर्व अनुभव होता. महापालिकेची इमारत चांगली करण्याचा प्रयत्न केला. चांगल सुस्ज अस सभागृह सुध्दा वर होत आहे. या महापालिकेत दरवर्षी आम्ही सभापती दोन दोन महिने कॅबिनसाठी रखडतात. अधिका—यांची अपसात भांडणे अतिरिक्त आयुक्तांनी कुठे बसाव, उप—आयुक्तांनी कुठे बसाव, कर निर्धारकांनी कुठे बसाव अशा प्रकारची आता या महापालिकेत अवस्था झालेली आहे. काही चांगले निर्णय घेतले त्याची स्तृती करा. ठिक आहे उणिवा तुम्ही दाखवा, चांगले केले तर स्तुतीही करा ना. जे केले ते केले, श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितल्याप्रमाणे जेएनएनयुआरएमची एवढी मोठी, प्रचंड योजना.. पुर्वीच्या काळामध्ये होवु शकली नाहीत. येथुन डीपीआर सुध्दा जावु शकला नव्हता. मागच्या दोन वर्षाच्या काळात येथुन डीपीआर पाठवुन राज्य शासनाची मंजुरी पाठवुन, केंद्र शासनाकडे मंजुरी आणुन इकडे योजना चालुही झाली. त्याचे पुनर्वसनही झालेले आहे. बीएसयुपीची योजना झालेली आहे. जेएनएनएमयुआरमएच्या माध्यमातुन पैसे मंजुर झाले. योजना चालु आहे तिचा लाभ वर्षभरामध्ये उल्हासनगरच्या सर्व नागरीकांनाही होईल. इतर सर्व त्यांनी नमुद केल्याप्रमाणे जे झाले ते झाले रस्ते झाले आहेत.सर्वात महत्वाचे जे त्यांनी सांगितले. बससेवा वगैरे किंवा मॅकेनिकल स्विपींग, ठिक

आहे रस्ते विकासाचे काम चालु आहे, ते झाल्यानंतर त्या मशिनचा फायदाच होईल. आता कमी प्रमाणात असेल, निर्णय तुम्हीच घेतला होता. स्थायी समितीत सर्वांनी मिळुन निर्णय घेतला होता. जसे आमच्या श्री. दिलीप गायकवाड साहेबांनी सांगितले, पण जे चांगले आहे ते चांगलेच आहे ना? त्याचा फायदा होईल. परंतु खास करुन इतर सुविधांच्या बरोबरच मग ते रस्ते असोत, उदयाने असोत, कामगारांचे बाराबारा, तेरातेरा वर्षापासुन पदोन्नतीचे विषय रखडलेले होते. कर्मचा–यांना पदोन्नती नाही. त्यांना वेतनवाढी नाहीत. श्री. हरेश इदनानी साहेब असतील तर त्यांनी सांगावे, मागच्या दोन वर्षामध्ये कर्मचा–यांसाठी किती खर्च झालेला आहे? आर्थिक बोझा किती वाढलेला आहे? सहावे वेतन आयोग, आणि मागच्याच दुपारी ३.०० वाजता झाली त्या महासभेत वर्षानुवर्षे १९९२ पासुन रखडलेला कर्मचा–यांचा विषय याठिकाणी घेतलेला आहे त्यामुळे साडेसात कोटीचा आर्थिक बोझा या महापालिकेवर पडणार आहे. म्हणजे कर्मचा–यांचे कुठलेही विषय आम्ही लांबणीवर ठेवले नाही त्यांच्यावर न्याय केला आहे. त्याचबरोबर जे नालायक कर्मचारी असतील त्यावर कठोर कारवाई करण्याची सुध्दा आम्ही येथे तजविज केली. अशा प्रकारे सर्वांगीण विकास साधतांना विरोधकांच्या, विरोधक म्हणुन नाही तर वैयक्तीक, नागरीक म्हणुन, जनप्रतिनिधी म्हणुन असणा–या ज्या अपेक्षा आहे त्या या ठिकाणी व्यक्त केल्या त्याबद्दल तुमचे अभिनंदन. २०१०–११ चा अर्थसंकल्प याठिकाणी दिलेला आहे. त्यामध्ये थोडीफार फेरफार करण्यासाठी रस्त्यांची यादी आमच्या श्री. दिलीप गायकवाड यांनी दिलेली आहे. मागच्या वर्षी ५३ रस्ते घेतलेले होते. मा. सभापती स्थायी समिती आणि मा. महापौरांनी काही रस्ते सुचविलेले आहेत. आणि वैयक्तीकपणे तुम्ही काही रस्ते सुचवा आणि रस्ते हे शहरातीलच आहेत. विकास झाला तर तो शहराचा होणार आहे. कुठल्याही विभागाचा झाला तरी त्याचा फायदा शहरातील सर्व नागरीक घेणार आहेत. तर रस्ते कुठले असतील तर ते सुचना. त्याची यादी तुमच्याकडे दिली आहे ती मा. महापौर, उप–महापौरांना दया. मला वाटते ती वाचायची काही आवश्यकता नाही. त्याच्यामध्ये श्री. भुल्लर महाराज यांच्या प्रभागातील काही रस्त्यांची नावे हातानी लिहिली आहेत तीही त्यामध्ये अंतर्भुत आहे. दुर्बल घटक योजनेअंतर्गत जो विकास निधी आहे, त्यामध्ये कमी तरतुद केलेली आहे. सी–४ मध्ये ६० लाख, ६० लाख आणि ६० लाख १ कोटी २० लाख रुपये होतात. तर त्याठिकाणी खर्चामध्ये १ कोटी आणि १ कोटी असे २ कोटी दुर्बल घटकांसाठी ठेवा. आता थोडयावेळा पुर्वीच भावनेच्या भारात श्री. सुंदर मंगतानी हे म्हणालेत की माझ्या प्रभागात तीन गलिच्छ वस्ती आहेत, उल्हासनगरमध्ये अशा १२७ झोपडपट्टया आहेत, आणि ख–या अर्थाने तिथला विकास होणे आवश्यक आहे. म्हणुन ६० लाख रुपयाचा निधी फार कमी आहे. म्हणुन त्या ठिकाणी १, १ कोटी अशा प्रमाणे २ कोटीची तरतुद करावी म्हणजे खर्चाची बाजु ८० लाखाने वाढते. जमेमध्ये पाणी पुरवठेचा निधी माझ्यामते कमी दाखविलेला आहे. त्यामध्ये ८० लाख रुपये वाढवावे. बाकी रस्त्यांवरील खड्डे भरण्याच्याबाबतीत २ कोटी दर्शविण्यात आलेले आहेत. तर माझी एक सूचना आहे, मागच्या वर्षी केली होती की, मेंटेनन्स ऑफ रोड याबाबतीत वर्षाचे एकत्रित निविदा मागविण्यात यावी. जेणे करुन आज खड्डे भरले आणि उदया पुन्हा खड्डे भरले असे होता कामा नये. म्हणुन जो कोण ठेकेदार असेल तो वर्षभर ते खड्डे भरण्यास बांधिल असेल मग याठिकाणी दोन कोटीचे अडीच कोटी झाले तरी चालतील. किंवा दोन कोटीसाठी घ्या. वाढले तर चालतील. निविदा येईल तशी. त्यासाठी आपली तरतुद असेलच. पण मेंटेनन्स ऑफ रोडची निविदा एकत्रितपणे दयावी किंवा प्रभाग समितीनिहाय दयावी की जेणेकरुन त्या प्रभाग समितीमधील रस्त्यांवरील पडलेले खड्डे व ते भरण्याचे काम वर्षभर तो ठेकेदार करेल तसा प्रयोग करुन पहा. नाहीतर आपण वर्षातुन दोन वेळा तो कधी खड्डें भरत कधी भरत नाही, त्यासाठी मेंटेनन्स ऑफ रोड याला फक्त नाव दया. रस्त्यावरील खड्डे भरणे या ऐवजी मेटेनन्स ऑफ रोड आणि रस्ते दुरुस्ती असे नाव दया. आणि नेहमी मी सांगतो की, आपल्या अर्थसंकल्पामध्येच तरतुद करा की, शहरामध्ये असलेले जे आरक्षित भुखंड आहेत ते ताब्यात घेण्यासाठी आपला जो इन्फ्रास्ट्रक्चर फंड आहे किंवा डेव्हलोपमेंट फंड आहे तो वापरा परंतु तसे यामध्ये कोठेही नमुद नाही. मागच्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये आपण तसे म्हटले होते दुर्दैवाने ते झाले नाही. मी आयुक्तांचे व संपुर्ण टिमचे अभिनंदन करतो की, एमआयडीसीची थकबाकी दिली जात आहे. त्याचा त्रास आम्हांला आता होतो आहे. पण गेल्या अडीच तीन वर्षामध्ये कधीही एमआयडीसीची थकबाकी झालेली नाही. म्हणजेच चालु बिल आणि मागच्या थकबाकीपोटीचे बिल असे दोन्ही आपण भरत आहोत. पण जो आपल्याला त्रास होतो व जी कपात होते ती मागच्या दहा–बारा वर्षापासुनची जी थकबाकी होती तीची सुध्दा तरतुद या अर्थसंकल्पामध्ये मला वाटते केली आहे की, जुनी थकबाकी आणि पुढे येणारे जे नियमीत बिल आहे ते, अशाप्रकारे सर्वकष अर्थसंकल्प या ठिकाणी सादर केलेला आहे. माझी सर्वांना विनंती आहे की, याच्यावर बरीच चर्चा झाली. नको ती चर्चा झाली. हवी असलेली चर्चा झाली. सर्वांनी हा अर्थसंकल्प एकमताने पारीत करावा. सर्वांना संधी दिली आहे की, आपल्या प्रभागातील रस्त्यांची यादी दया. याबाबत जी समिती आहे ती हा निधी कोठे वापरायचा तो ठरवेल. जशी आवश्यकता असेल तशी. उल्हास स्टेशनला आवश्यकता असेल तर उल्हास स्टेशनला वापरेल. ४ नंबरला सुध्दा आहे. जेथे स्टेशनला जाणारे अप्रोर्च रोड

आहे तेथे त्या प्रत्येक ठिकाणी आवश्यकता आहे. त्याबाबत समिती ठरवेल त्यानुसार निधी वापरेल. परंतु हा जो अर्थसंकल्प आहे तो एकमताने पारीत करु या अशी मी सर्वांना विनंती करतो. धन्यवाद।

यावेळी मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. महापौरजी, उप–महापौर, स्थायीसमिती सभापती व आयुक्त साहेब, संपुर्ण शहराला नजरेसमोर ठेवुन शहराच्या उन्नतीसाठी आपण याठिकाणी जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे, त्यामध्ये पाणी हा अति आवश्यक असा विषय आहे. त्याकडे आपण दुर्लक्ष केले आहे. ते मी आपल्या नजरेस आणुन देतो. पाणी हे सर्वांना आवश्यक अशी वस्तु आहे आणि दोन वर्षानंतर महापालिकेच्या निवडणूका लागणार आहे. जेएनएनयुआरएम ही जी योजना आखलेली आहे, त्या अनुषंगाने मला वाटते की, आपण अर्थसंकल्पामध्ये कपात केलेली आहे. हा जो अर्थसंकल्प आहे तो एक वर्षासाठी आहे. आणि ही योजना जी राबविली आहे त्याचा कालावधी तीन वर्षाचा आहे. ही योजना एक वर्षात पुर्ण होणार आहे का? आणि या एका वर्षामध्ये एखादया ठिकाणी पाईपलाईन फुटली, एखादी जर नविन पाईप लाईन टाकायची असली तर त्यावेळेस आम्ही सदस्य काय करणार? कारण या अर्थसंकल्पात तशी तरतुदच ठेवलेली नाही. तर माझी मा. महापौर, उप–महापौर, स्थायी समिती सभापती महोदयांना विनंती आहे सन २०१०–२०११ च्या अंदाजपत्रकात पाणी पुरवठा विभागासाठी कमी निधी प्रस्तावित करण्यात आलेला आहे. त्यात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

**भाग क्र. १ पाणी खाते –ब** मी आपल्या निदर्शनास आणुन देतो, तपशिल आहे पाणी पुरवठा २००९–१० मध्ये ५० लाख एवढा निधी ठेवला होता आणि आता योवळेस २०१०–११ साठी २५ लाखाचा निधी ठेवला आहे. त्याचप्रमाणे कुपनलिका दूरुस्ती खर्च हा २००९–१० मध्ये १५ ठेवला होता, यावेळसही १५ च आहे. आणि कुपनलिका उभारणी व दुरुस्ती २००९–१० च्या अर्थसंकल्पात ३० लाखाचा निधी होता परंतु यावेळेस तो १५ लाखाचा निधी ठेवलेला आहे. इतर आकस्मीक खर्च १२ लाख होता तो १० लाख ठेवला आहे. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने उल्हासनगर महापालिका हद्दीतील सांडपाणी प्रक्रिया न करता तसाच उल्हास नाल्यात सोडण्यात येणा–या पाण्यात सोडल्याने पाण्याच्या प्रदुषणात वाढ होत असल्याने यापुढे सांडपाणी उल्हास नाल्यात न सोडण्याचे सूचीत केले आहे. यामुळे शाखा अभियंता श्री. शानबाग यांनी अथक प्रयत्न करुन मागील २० वर्षापासुन बंद व नादुरुस्त स्थितीत असलेले खडेगोलवली येथिल व शांतीनगर येथिल मलप्रक्रिया केंद्र कार्यरत करुन घेतले आहे. तसेच श्री. ढाके व श्री. सुंदरम यांनी अंदाजे २४, २५ वर्षापुर्वी टाकण्यात आलेली ड्रेनेज लाईन व चेंबर दुरुस्त करुन सध्या सुरु करुन घेतलेली आहे. परंतु भविष्यात पंपींग स्टेशन व ड्रेनेज लाईन निगा व दुरुस्ती व देखभालीचा खर्च वाढणार आहे. तरी कृपया खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.

**मलनिस्सारण खाते–क** तपशिल आहे, भुयारी गटारी जोडणी साहित्य व निगा २००९–१० मध्ये २५ लाखाची तरतुद होती. व यावेळेस फक्त ५ लाखाची तरतुद केलेली आहे. भुयारी गटार दुरुस्ती मागच्या २००९–१० च्या अर्थसंकल्पामध्ये १ कोटी १८ लाखाची तरतुद केली होती. व यावेळेस फक्त ५० लाखाची तरतुद केली आहे.

**पाणी खाते व पाणीखाते–ब भाग क्र. २** तपशिल आहे, नविन पावर पंप व पाणी पुरवठा साहित्य त्यासाठी २००९–१० मध्ये १ कोटी ५० लाखाची तरतुद ठेवली होती यावेळेस फक्त ५ लाखाची तरतुद ठेवली आहे. नविन कुंपनलिका २००९–१० मध्ये २५ लाखाची तरतुद ठेवण्यात आली होती यावेळेस फक्त २० लाखाची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

**पाणी खाते भुयारी गटारी–क भाग क्र. २** तपशिल आहे, ड्रेनेज पंप पालम उत्खनन व खरेदी २००९–१० मध्ये २५ लाखाचा निधी उपलब्ध होता, यावेळी फक्त १५ लाख ठेवण्यात आलेली आहे. तसेच उल्हासनगर पालिकेच्या पाणी पुरवठा कार्यालयाच्या इमारतीची निगा व दुरुस्ती न केल्याने त्यांची अवस्था बिकट व दयनिय झालेली आहे, गंभीर असून प्लॉस्टर करणे, छताची गळती, शौचालयाची दुरुस्ती झालेली नाही त्यामुळे कार्यालयाची दुरुस्ती व नुतनीकरण करणे गरजेचे आहे, यासाठी भाग क्र. २ –ब अनुक्रमांक ५ मध्ये ३० लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. परंतु कॅम्प नं. १ ते ५ मधील कार्यालयाची निगा दुरुस्तीसाठी व नुतनीकरणासाठी १ कोटीची तरतुद करण्यात यावी. तसेच सेव्हरेज लाईनसाठी गाडीची कमतरता भासत असून प्रत्येक प्रभाग समिती कार्यालयास एक वाहन याप्रमाणे वाहन खरेदीसाठी ५० लाखाची तरतुद करण्यात यावी.

यावेळी काही सदस्य घोळक्याने उभे राहुन आपसात बोलत होते.

उप–महापौर :–श्री. जमनुजी, श्री. प्रभुनाथ गुप्ताजी, ही अर्थसंकल्पीय सभा आहे, आपण जरा बसुन घ्याावे.

सदस्य श्री. सुरेश जाधव:–सेव्हरेज लाईन गाडीची कमतरता भाषत असून प्रत्येक प्रभाग समिती कार्यालयात एक वाहन याप्रमाणे चार वाहनांची आवश्यकता असून सध्यास्थितीत तीन गाडया उपलब्ध आहेत. आणखी एक गाडी खरेदी करण्याची आवश्यकता असल्याने निधीची तरतुद करण्यात यावी. त्याचप्रमाणे **पृष्ठ क्र. २७, जलनिस्सारण खाते क ड यामध्ये अनुक्रमांक** ४ हा जो निधी आहे, मा. महापौरजी, आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती महोदया, त्याबाबत मला माहिती पाहिजे. या विषयीचा ज्यांनी अर्थसंकल्प तयार केला आहे, त्यांच्याकडुन मला माहिती पाहिजे. हा निधी कोणत्या विभागामार्फत तयार करण्यात येतो?

यावेळी मा. सदस्य श्री. रामसागर यादव यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

उप–महापौर :–तुम्ही आपले प्रस्ताव ठेवा उत्तर नंतर देवु.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–माझ्या मते पृष्ठ क्र. २७, पाणी पुरवठा जलनिस्सारण जे खाते आहे ते पाणी पुरवठयामध्ये आहे, त्याचा अर्थसंकल्प हा पाणी खात्यामध्येच झाला पाहिजे. आणि त्यानुसार कामकाज झाले पाहिजे. तत्कालीन आयुक्त श्री. सोनावणे साहेबांनी जे आदेश दिले होते हे खाते पाणी पुरवठयामध्येच जायला पाहिजे. धन्यवाद।

सदस्य श्री. किशोर जग्यासी:–मा. महापौरजी, उप–महापौरजी, स्थायी समिती सभापती महोदया, आयुक्त साहेब, पृष्ठ क्र. १३ मधील बी–२ बाबत मला चर्चा करायची आहे. यामध्ये डिझास्टर मॅनेजमेंटविषयीची देखभाल, निगा व दुरुस्ती याविषयी मला खुलासा हावा आहे की या निधीचा कशामध्ये वापर होणार आहे? ६० लाखाचा निधी आहे, आयुक्तांची सुध्दा तीच मागणी आहे, स्थायी समितीने देखील त्यास मान्यता दिली आहे, परंतु या निधीचा कोठे वापर करणार याचा जरा खुलासा दया.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–मा. महापौरजी, मी काही आकडेवारी देत आहे ती लक्षात घेवुन निधी वाढवावा. त्याबाबत मी पत्र देत आहे.

श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):–मा. महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री. किशोर जग्यासी यांनी डिझास्टर मॅनेजमेंटविषयी जे सांगितले ते एकत्रित आहे, त्यात वेगवेगळे कार्य आहेत, देखभाल, निगा व दुरुस्ती. …………

सदस्य श्री. किशोर जग्यासी :–आपला आवाज कमी येत आहे.

श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):–यामध्ये वेगवेगळे कार्य असून फायर देखभाल व दुरुस्तीचा खर्च आहे ६० लाख रुपये. इमरजन्सी मेनेजमेंट आहे ५ लाख रुपये, इतर कामात २ लाख रुपये असे एकुण मिळुन ७४ लाख रुपये आहेत.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :–नेताजी येथिल जे फायर स्टेशन आहे, ते दुरुस्त होईल का येथे? याचा मला खुलासा पाहिजे.

श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):– महापालिकेच्या मागील फायर विभागाने काही गाडया घेण्याचा कार्यक्रम बनविला आहे. त्यात ३५ टक्के शासनाकडुन मिळतील व ६५ टक्के आपणास दयावे लागेल. त्यात मागील फायर विभाग आहे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :–श्री. हरेशजी, माझा एक साधा प्रश्न आहे, नेताजी येथे फायर स्टेशनचे शेड बनविले आहे, ते दुरुस्त करणार आहेत की नाही एवढाच माझा प्रश्न आहे बस्स.

श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—नाही आहे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—तो नाही आहे?

यावेळी मा. सदस्य श्री. हरेश जग्यासी, श्री. भारत राजवानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—नाही.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—मा. आयुक्त साहेब, आपण हा जो अर्थसंकल्प बनविला आहे, आपणांस एक वेळ त्या ठिकाणी जावुन भेट दिली पाहिजे. १० वर्षापासुन त्या फायर स्टेशनचा जो शेड आहे तो खराब झाला आहे. तो बनविण्यासाठी आपण तरतुद केलेली नाही? शहरासाठी ही आवश्यक सुविधा आहे. मला अतिशय दु:ख होत आहे की, जी आवश्यक बाब आहे त्यावर चर्चा होत नाही. रोड, पाणी व इतर काही विषयांवरच चर्चा होत आहे. आपणांस असे वाटत नाही का तेथे फायर स्टेशन बनविले पाहिजे, शेड तयार झाला पाहिजे.

उप—महापौर :—आपला काय प्रस्ताव आहे तो आपण ठेवा त्याची आपण अर्थसंकल्पात तरतुद करु.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—आपण तर निधी ठेवलाच नाही?

उप—महापौर :—आपण प्रथम प्रस्ताव तर ठेवा ना?

श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—विभागाचे म्हणणे आहे की ७ लाख रुपये..............

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—आता जर प्रस्ताव ठेवला तर याच अर्थसंकल्पात येईल की दुस—या अर्थसंकल्पात येणार?

उप—महापौर :—नाही तो आताच ठेवणार, बोला ना तुम्ही.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—तेच तर मी म्हणतो ना की याच अर्थसंकल्पात का नाही घेतला?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, जमा व खर्चाचा जो अंदाज होता तो आयुक्तांनी स्थायी समितीच्या समोर ठेवला आहे. स्थायी समितीने त्यास मान्यता दिली आहे. स्थायी समितीच्या मान्यतेनंतर तो महासभेत आला आहे. महासभा त्यावर निर्णय घेवु शकते. आपला जो प्रस्ताव आहे तो आपण समोर ठेवा, महासभा हो म्हणेल तर तो प्रस्ताव मान्य होईल.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—मा. आयुक्त साहेब, ही आपली नैतिक जबाबदारी आहे की, शहरातील डिझास्टर मॅनेजमेंट जे आहे त्यास आपण प्रथम प्राधान्य दिले पाहिजे. फायर ब्रिगेड व आपत्ती व्यवस्थापनाबाबत आपण प्रथम विचार केला पाहिजे. त्याबाबत आपण विचार केला नाही.

उप—महापौर :—आपण आपला प्रस्ताव ठेवा ना? आपणांस जर तेथे इमारत बनवायची असेल तर आपण बनवु ना?

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—शहरातील आावश्यकता आहे, आपण तेथे भेट दया. शहरासाठी आवश्यक आहे माझा त्यामध्ये काही स्वार्थ नाही. आपण अर्थसंकल्प तयार करता? श्री. शिर्के यांना बोलु दया किंवा आपण बोला. त्यास आपण दुरुस्त करणार का? दुसरा सुध्दा विषय आहे, सार्वजनिक बांधकाम विभागाचा विषय आहे, श्री. शिर्के यांना बोलवा. मा. महापौरजी, आपली जर अनुमती असेल तर फायरचा जो अधिकारी आहे त्यास येथे बोलवा. ते जेथे बसले आहेत त्यांना वर मंचावर बोलवा. सांगा ते आवश्यक आहे की नाही आहे?

<u>सदस्य श्री. रविंद बागुल :–</u>सन्माननिय आयुक्त साहेब, माझा एक छोटासा प्रस्ताव आहे. उल्हासनगर मध्ये रस्त्यांना फलक लावा की अमुक अमुक हा रस्ता आहे. हा रस्ता बिर्लागेट आहे, हा रस्ता एक नंबर आहे, हा रस्ता दोन नंबरचा आहे. कुठल्याही स्टेशनच्या बाहेर किंवा कुठेही, मी जळगावला गेलो, मी जळगावमध्ये फिरलो, तेथिल महानगरपालिकेत गेलो, त्या शहरात एक खेडेगाव आहे त्या गावात सुध्दा एक बोर्ड लावला आहे. तर माझी अशी इच्छा आहे की, आयुक्त साहेब, आपल्या उल्हासनगरमध्ये अशी पध्दत पाहिजे.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>सन्माननिय महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. बागुल साहेबांची सूचना स्वागतार्ह आहे आणि मला आपणांस सांगण्यास आनंद होत आहे की, याबाबत आदेश सुरु झालेले आहेत. तर मला असे वाटते की, या महिन्याच्या शेवटपर्यंत बोर्ड लागतील.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>धन्यवाद साहेब. आपण या मुद्‌दयाबद्‌दल आम्हांला चांगले उत्तर दिलेत.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, स्थायी समिती सभापती महोदया, आयुक्त साहेब, नेताजी येथिल फायर स्टेशनची इमारत तोडुन आपण नविन बनविण्यासाठी प्रस्ताव आणा. माझे अजुन तीन प्रश्न आहेत.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, स्थायी समिती सभापती महोदया, आयुक्त साहेब, आमचे सन्माननिय सदस्य श्री. किशोर जग्यासी यांना जे सांगायचे आहे, नेताजी येथे जे फायर स्टेशन आहे, मा. आयुक्त साहेब आपण जरा लक्ष दिले तर बरे होईल. नेताजी येथिल कॅम्प नं. ५ येथिल जे फायर स्टेशन आहे ते पडिक आहे. त्याविषयी आपण अर्थसंकल्पात काही तरतुद करावी अशी माझी विनंती आहे. त्याचप्रमाणे त्या फायर स्टेशनमध्ये आपले दोन फायर स्टेशन झाल्यानंतर जे कर्मचारीवृंदाची आवश्यकता पडेल ते कर्मचारीवृंद त्वरीत भरण्यात यावेत. अशी तरतुद या अर्थसंकल्पात असावी. त्याचप्रमाणे दुसरे असे की दर पावसाळयाच्या दिवसात वालधुनी नाला जो आहे त्या नाल्याला दरवर्षी पुर येवुन सर्व झोपडपट्टयांमध्ये पाणी शिरते. त्यामुळे फार मोठी जिवीत हानी व वित्त हानी होते तर मागच्यावर्षी एमएमआरडीएकडुन तो नाला बांधुन घेण्यासाठी काही तरतुद होती. त्याच्यासाठी महापालिकेने काही निधी दयावयाची आवश्यकता होती. तो निधी देण्याची तरतुद आपण करावी. जेणेकरुन पावसाचे पाणी झोपडपट्टीमध्ये शिरणार नाही अशी आपणांस माझी विनंती आहे, धन्यवाद।

<u>काही सदस्य :– </u>पास करा, पास.....

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>मा. महापौरजी, शहरातील सर्वात मोठा जो विषय आहे, डिस्पोजल यासाठी काय विचार केला आहे? पृष्ठ क्र. ६. २६, विषय नं. ७ आहे, बायोकॅमिकल वेस्ट डिस्पोजोबल, त्यासाठी आपण काय तरतुद केली आहे? शहरात ना गाडी येते ना काही? हे फारच भयानक आहे, ज्या कोणास एड्स असेल, जर इंजेक्शन रस्त्यावर फेकले तर ते इंजेक्शन ज्या लागेल त्यास सुंध्दा हा रोग होवु शकतो. ही इतकी खतरनाक बाब आहे. यासाठी काय करायचे? आपण जे दोन लाख रुपये ॲन्थानी या ठेकेदाराला देतात, हे सुध्दा अर्थसकल्पात यावयास पाहिजे होते त्याची तरतुद आपण केलेली नाही. त्यासाठी मला याचे उत्तर पाहिजे. यासाठी आपण काय विचार केला आहे? पृष्ठ क्र. ६. २६, विषय नं. ७ आहे, बायोकॅमिकल वेस्ट डिस्पोजोबल आहे. साहेब आपण हा अर्थसंकल्प फारच विचारपुर्वक बनविला आहे, आपण उत्तर देवु शकत नाही? मी तर फक्त हा अर्थसंकल्प वाचला आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>याचे उत्तर दया. याचे उत्तर लवकर दया आम्हांस सुध्दा यावर बोलायचे आहे.

<u>श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):–</u>हा जो बायोकॅमिकल वेस्ट डिस्पोजल आहे, हा कल्याण महापालिकेशी टायअप आहे, एक एजन्सी आहे. ती एजन्सी प्रत्येक दवाखान्यातुन बायोकॅमिकल वेस्ट एकत्रित करते. तेथुन पैसे घेतात व कल्याण महापालिकेतील जेथे इन्सीनरेशन प्लान्ट आहेत त्यांच्याकडे जातात. यात आमचा काही खर्च नाही आहे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>श्री. हरेशजी आपली गोष्ट बरोबर आहे. परंतु मी यांना विचारतो की, ही सुविधा आपल्या शहरात आहे का?

श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—हो आहे ना?

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—आहे? माझ्या मते नाही आहे. मी आपणांस सिध्द करुन देईल. आपण डॉ. जिंदे साहेबांना विचारा. मी आजपर्यंत एक सुध्दा गाडी पाहिलेली नाही. कोणती गाडी घेवुन जाते, नंबर सांगा गाडीचा?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौरजी, आमचे सन्माननिय सदस्य श्री. किशोर जग्यासी यांचा बायोकॅमिकल वेस्टबाबत जो विषय आहे जसे की, श्री. हरेश इदनानी साहेबांनी सांगितले की, खाजगी कंपनीला दिले आहे, मी स्वत: पाहिले आहे की, मोठ मोठी हॉस्पीटल आहेत, जेथुन ते कॅमिकल निघते तेथुन ती गाडी कॅमिकल वेस्ट गोळा करते. आणि जर नाही गोळा करत असणार तर आमचे सदस्य श्री. किशोरजी डॉ. जिंदे यांना संपर्क करतील. आणि तेथे जावुन स्वत: भेट देतील. या विषयास सोडुन या अर्थसंकल्पास सर्वसंमतीने पारीत केले जावे. पोवणे दोन तासापासुन या अर्थसंकल्पावर चर्चा झाली आहे. अर्थसंकल्प शहराच्या हितासाठी आहे, या अर्थसंकल्पावर मतदान घ्या. नाहीतर जास्त चर्चा न करता सर्वसंमतीने अर्थसंकल्प पारीत करा.

सदस्य श्री. सतिश चहाळ :—मा. महापौरजी, उप—महापौर, स्थायी समिती सभापती, आयुक्त साहेब, आपल्या श्री. जमनादास पुरस्वानीजी यांना अर्थसंकल्प पारीत करण्याची एवढी घाई झाली आहे की, त्यावर चर्चाच झाली नाही पाहिजे. त्यांना असे वाटते की, अर्थसंकल्पामध्ये जे आहे ते अगदी बरोबर आहे. आमदार श्री. कुमार आयलानी साहेब, आपणासोबत बसले आहेत, ते २ नंबर ओटी येथे फिरले होते. तेथे रस्त्याची काय स्थिती आहे ती त्यांना विचारा? आमच्या शहरातील नवनिर्वाचीत आमदार ते सुध्दा मान्य करत आहे की, शहरातील रस्त्याची काय स्थिती आहे ते. त्यांच्यासाठी तरतुद नाही आहे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—मा. महापौरजी, हे दोन जे मुद्दे मी उपस्थित केलेत ते शहरासाठी अतिशय आवश्यक आहे. आपण त्यावर विचार करुन उत्तर दया आपणांस काय करायचे आहे? विषय घ्यायचा आहे नाही आहे? आयुक्त साहेबांनी विचार केला पाहिजे. दोन्ही गंभीर विषय आहेत.

यावेळी मा. सदस्य श्री. मुकेश तेजी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, जो बायोकॅमिकल बाबत विषय चालु आहे तो हॉस्पीटलमधुन जमा होतो. जो पोल्युशन ॲक्ट आहे त्याप्रमाणे तो हॉस्पीटल मधुन जमा करतात व कल्याण येथे जातात. सर्व डॉक्टर त्यांना पैसे देतात, त्यात महापालिकेचा काहीही खर्च नाही आहे. आणि मला असे वाटते की, जेथे तरतुद आवश्यक आहे त्याबाबत प्रस्ताव दया. आम्ही तर फक्त अंदाज ठेवले आहेत आपण त्यामध्ये तरतुद करु शकतो.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—ते ठिक आहे, परंतु अशी कोणतीही गाडी नाही.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—नाही, नाही, अर्थसंकल्प चुकीचा झाला आहे, ती तरतुद ठेवण्यात आली नाही.......................

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—मी असे म्हणत नाही की अर्थसंकल्प चुकीचा झाला आहे.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—महापौर महोदया मी हे सांगु इच्छितो की, ................

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—शहरासाठी झाले पाहिजे असे मी म्हणत आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. श्री. किशोरजी, आपण जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे त्याची तरतुद का नाही ठेवण्यात आली की, त्याचा मुद्दा येथे खाजगी बाबतीत आहे, जर आपणांस असे वाटत असेल की तसे नाही तर आपण प्रस्ताव दया, आम्ही सुधारीत अर्थसंकल्प आणु.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>ठिक आहे.

<u>**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**</u>मा. महापौरजी, माजी महापौर श्रीमती लिलाबाई आशान यांचा एक असा प्रस्ताव आहे की, उल्हासनगर—४ येथिल ओटी सेक्शन चौकामध्ये सुशोभिकरण करण्याचा प्रस्ताव येत्या आर्थिक अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करण्यात यावा. ४ नंबर ओटीमध्ये तीन चार प्रभाग लागुनच आहेत. मा. श्री. धनंजय बोडारे यांचाही प्रभाग त्यास लागुनच आहे, तर त्या चौकाचे सुशोभिकरण व्हावे असे त्यांनी पत्र दिले आहे. ते मी आपणांस देतो. आणि त्याचप्रमाणे पाणी पुरवठा विभागाच्या निधीमध्ये वाढ करण्याबाबत मी आपणांस जे काही पत्र दिले आहे, पाणी पुरवठा ही एक अत्यावश्यक बाब आहे आणि ती शहराची एक ज्वलनशील समस्या आहे. त्याच्यावर सहानुभुतीपुर्वक विचार करण्यात यावा. धन्यवाद।

यावेळी मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के, श्री. दिलीपकुमार जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>**उप—महापौर :—**</u>ज्यांना ज्यांना बोलायचे असेल त्यांना बोलु दया. सर्वांना बोलायची संधी दिली जाईल.

<u>**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**</u>मा. महापौरजी, जसे सुरुवातीस श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की, आम्ही आमच्या कामाचा १०० टक्के रिजल्ट दिला आहे. बससेवा पाहिली तर १०० मधुन ४ बस चालु आहेत. रिजर्ट ४ टक्के आहे. स्विपींग मशिनरी पुर्णपणे अयशस्वी आहे. त्यास शुन्य टक्के रिजल्ट म्हणतात. कोणताही कर वाढविला नाही असे सांगितले जाते. प्रत्यक्षात मालमत्ता करामध्ये, पाणी पुरवठा लाभ कर, मलप्रवाह लाभ कर, स्वच्छता कर, व पथकरामध्ये एक एक टक्याची वाढ केली आहे. काय ही करवाढ नाही? विकास निधी रहिवाशी वापराचे बांधकामासाठी ३० रुपये प्रति चौरस मिटरचे ६० रुपये चौरस मिटर केले आहे. म्हणजेच १०० टक्के वाढ. व्यवसायिक वापराचे बांधकामासाठी ४० रुपये प्रति चौरस मिटरचे ६० रुपये प्रति चौरस मिटर म्हणजेच ५० टक्क्याची वाढ., प्लींथ सर्टीफिकेट २०० मिटरपर्यंत साठी ५००० रुपयाऐवजी साडेसात हजार रुपये, ५० टक्क्याची वाढ, प्लींथ सर्टीफिकेट २०० मिटरपासुन पुढील ५००० चे १०००० म्हणजेच १०० टक्के दरवाढ, बांधकाम पुर्णत्वाचा दाखला २०० मिटरपर्यंत ५००० ते ७५००, ५० टक्याची वाढ, २०० मिटरच्यावरील बांधकामसाठी ५००० चे १०००० ही आहे १०० टक्क्याची दरवाढ. प्रिमीयम, स्टेअरकेस, लॉबी, पॅसेज इत्यादीचे रहिवासी बांधकामासाठी पहिले जो रेडिरेकनर होता, १०० टक्के होता त्याचे १५० टक्के केले आहे. यामध्ये आहे, ५० टक्क्याची वाढ. व्यवसायिक वापरासाठीची बाल्कीनी बंदीस्तासाठी, पहिले चार हजार होते त्याचे आता ६००० केले आहे. ही आहे ५० टक्क्याची वाढ. व्यवसायिक वापराच्या स्टेअरकेस प्रिमीयमसाठी २०० टक्के होता आता २५० टक्के केला आहे ही आहे २५ टक्क्याची वाढ, जर आपण म्हणत असाल की ही वाढ नाही तर मग यास काय म्हणाल? याचा जरा खुलासा करा. आपला जो खेमानी नाला उल्हास नदीस मिळतो जेथे आपल्या व कल्याण महानगरपालिकेच्या आणि तसेच आजुबाजुच्या गावांचे पिण्याचे पाण्याचे स्त्रोत आहेत, त्यामध्ये खेमानी नालयाचे पाणी जाते. आपल्या महानगरपालिकेच्या शहर अभियंत्यावर या संदर्भात या अगोदरसुध्दा एक केस झालेली आहे. व आता सुध्दा वसई—विरारच्या ४ उप—आयुक्तांना दोन वर्षाची सजा झाली आहे. ज्याची या अर्थसंकल्पात कोणतीही तरतुद नाही.तर काय आपणांस असे वाटते काय की, नालयाचे ते दुषित पाणी आपल्या पिण्याच्या पाण्यामध्ये सोडले जावे व आपल्या शहरवाशियांनी कर सुध्दा भरायचा व दुषित पाणी पिऊन आजारीही पडायचे? या विषयी आपल्या अर्थसंकल्पात कोणतीही तरतुद नाही. होय आपणाकडे पेव्हर ब्लॉकसाठी जरुर पैसा आहे, ३५०,२५० रस्तयासाठी बरेच पैसे आहेत व त्याच २५०,३५० सिमेंट कॉक्रिटच्या रस्त्यावर पुन्हा इन्टरब्लॉक लावण्यासाठी जरुर पैसा आहे. परंतु खेमाणी नाल्याचा प्रवाह वळविण्यासाठी पोवणे चार कोटी आपणाकडे नाहीत. जसे श्री. बोडारे साहेबांनी सांगितले की, एमआयडीसीचे आपणावर फार मोठे कर्ज आहे. तर त्याबाबतीत असा विचार करा की ते कर्ज का आहे? आपण त्यांच्याकडुन ७ रुपये पर एमएलडी या दराने पाणी घेतो. व सवलतीच्या दरात लोकांना पाणी पुरवठा करतो. आज स्टीम वॉटर प्राधिकरण जे आहे, भिंवडी, ठाणे व मिराभाईंदर महापालिकेचे संयुक्त प्राधिकरण आहे. येथुन ८० किलोमिटरवर मिराभाईंदर महानगरपालिका साडेचार रुपये एमएलडी या दराने पाणी पुरवठा करते. ४ रुपये दराने ठाणे महानगरपालिकेस पाणी दिले जाते. आणि साडेतीन रुपयेमध्ये तेच पाणी भिंवडी महापालिकेस दिले जाते. आणि पाणी शहाडाच्या त्याच स्त्रोतातुन उचलले जाते. जेथुन पाणी उचलुन एमआयडीसी आपणांस पाणी पुरवठा करते त्याच स्त्रोतातुन ते पाणी

उचलतात, आपल्या लोकांना स्वस्तात पाणी देतात या बाबीकडे आजपर्यंत आपले लक्ष गेलेले दिसत नाही. आपल्या माहितीसाठी सांगु इच्छितो की, महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र वॉटर रिसोर्सेस नावाची एक ॲथोरीटी तयार केली आहे, ज्याबाबत मी एक रिटपिटीशन टाकली आहे की, हे जे दर आहेत हे फार जास्त आहेत. व चुकीने आमच्याकडुन जादा दर घेतला जात आहे. स्टेम व एमआयडीसी पाण्यास कोणते दर आकारते याची माहितीच्या अधिकारात माहिती घेवुन त्यांच्याकडे मी एक पिटीशन आकले आहे. व अशी विनंती केली आहे की, साडेतीन रुपये प्रति एमएलडी या दराने आम्हांला पाणी दया किंवा तो जो प्रोजेक्ट आहे तो आम्हांला दया. कारण की त्यास १२५ कोटीपेक्षा जास्त पेमेंट आम्ही यापुर्वीच केलेल्या आहेत. तर कृपया त्याचा पाठपुरावा करावा. आम्हांला बरोबर घ्या. आम्ही आपणाबरोबर येण्यास तयार आहोत. या अर्थसंकल्पात रेग्युलायझेशनच्या फीचा उल्लेख करण्यात आलेला आहे. रेग्युलायझेशनचे काम कित्येक महिन्यापासुन बंद आहे. त्याकडे लक्ष दिले पाहिजे. तसेच भाजी मंडयांची आपणाकडे काही वसुली नाही. मार्केटमधुन एक रुपयाची सुध्दा वसुली येत नाही. त्याबाबतीत काही प्रस्ताव दया. नविन मार्केटचा लोक फुकटात वापर करत आहे. त्यांना तेथुन हटवुन नव्याने निविदा काढा. आणि आपले महसुली उत्पन्न वाढवा. आपण आपल्या कर्मचा—यांना सहाव्या वेतन आयोगाचा पगार लागु केला आहे. परंतु त्यांची कार्यक्षमता तर वाढवा. पगार वाढविण्या अगोदर कुणीही असा विचार करतो की, माझा कामगार बरोबर काम करत आहे की नाही? जर तो बरोबर काम करत असेल तरच मी त्याचा पगार वाढवावा. आपण प्रथम पगार वाढविता आणि नंतर म्हणता की, यानंतर आता चांगले काम कर. अश्याने साहेब, काम चांगले होणार नाही. आपण म्युनिसीपल ॲसेट डिस्पोजल मध्ये साडे तेरा कोटी मागील अर्थसंकल्पात टाकले होते, आज सुध्दा तेवढीच रक्कम त्यात टाकले आहे. मागच्यावर्षी आपण त्यात काहीच रक्कम आणली नाही यावर्षीही काही रक्कम येणार नाही. जेएमएमयुआरम मध्ये बरेचसे प्रकल्प दर्शविले आहेत. मला तर हे शेखचिल्लीची स्वप्ने दिसतात. आपले काम आहे त्यावर पाठपुरवठा करणे. मी आपल्या मागील अर्थसंकल्पीय सभेत म्हटले होते की, महापौर उपमहापौर व स्थायी समिती सभापती एकदा सुध्दा दिल्लीस जावुन आले नाहीत. तर यावर्षी एकदा आपण जावुन या. परंतु परिणाम मात्र काहीच नाही. तर आपण एकदा नाही दहा वेळा जा. होवु शकते आपण येथे बसुनच काम करुन घेण्यास सक्षम आहात. परंतु येथे बसुनच काम करा. किंवा तेथे जावुन काम करुन घ्या. परंतु प्रकल्प मंजुर करुन आणा. आम्ही आपणांस सीटी डेव्हलोपमेंट प्रोजेक्टमध्ये दोन हजार कोटीचे प्रस्ताव तयार करुन दिले होते. ही २००७ पुर्वीची गोष्ट आहे. त्यानंतर आपणांस काम काय होते फक्त डीपीआर तयार करायचा आहे. व राज्य सरकार व केंद्र सरकारकडुन मंजुरी घेवुन त्यांच्याकडुन पैसे आणायचे आहेत ते सुध्दा काम आपणाकडुन होत नाही. डीपीआर तयार करण्यासाठी सल्लागार नेमायचा आहे. त्याच्यावर आपणांस देखरेख करायची आहे. की डीपीआर बरोबर बनविला जात आहे की नाही? व कार्यपध्दतीनुसार ते बरोबर होत आहे की नाही? केंद्र सरकारकडे पाठपुरावा करायचा आहे. याबाबतीत आम्ही विचार करत असतो. भिवंडीचा महापौर जावुन तेथे बसतो व आपले काम करुन घेतो. आज टाईम्स ऑफ इंडियामध्ये बदलापुरच्या बाबतीत आमच्या वाचनात आले की ७०० कोटीचा निधी त्यांनी मंजुर करुन आणला आहे. हे पाहता आम्ही तर बदलापूरपेक्षाही मागे आहे. तेथे सुध्दा भाजपाचे नगराध्यक्ष म्हणुन श्री. रामपातकर आहे. तर कमीत कमी त्यांच्याकडुन काही शिका. शहराचे भले करण्याचे शिका. आता आपण जे दर वाढविले आहेत, त्याबद्दल मी एक गोष्ट आपणांस विचारु इच्छितो, मालमत्ता कराचा दर आहे ४ टक्के याचबरोबर विकास शुल्क जे आपण वाढविले आहे तो कर आहे की फी आहे? याचा फक्त खुलासा करा.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, स्थायी समिती सभापती, आयुक्त व माझे सर्व सहकारी मित्र, तसे तर मी फक्त एक मिनिट बोलणार होतो माझी एक सूचना होती. ज्याप्रकारे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी अर्थसकल्पाचे प्रस्ताव या महासभेपुढे मांडले सर्व मुद्दयांचे स्पष्टीकरण केले, व त्यानंतर जेव्हा श्री. धनंजय बोडारे हे बोलत होते तेव्हा मला असे वाटत होते की, हे तर आता समारोपाचे भाषण आहे. परंतु त्यानंतर पुन्हा चर्चा चालु झाली आणि आमच्या श्री. राजेश वदारिया यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. व त्याबद्दल मी मोजक्या शब्दात सांगु इच्छितो की, या तीन वर्षात अर्थसंकल्पाविषयी मी काही बोललो नाही. त्या अगोदर एकदा मी दशा आणि दिशा याविषयी बोललो होतो. या महानगरपालिकेची अगोदर जी दशा होती, त्याबाबतीत श्री. जमनादास पुरस्वानी यांनी मोजक्या शब्दात माहिती दिली आहे ती मी अधिक उघड आणि विस्तृतपणे मांडु इच्छितो, त्यावेळी महापालिकेची दशा अशी होती की, आमच्या शहराचे ठेकेदार शर्ट काढुन महापालिकेत बसले होते व घोषणा देत होते की, आमची देयक रक्कम अदा करा. आज तीन वर्षात आम्ही महानगरपालिकेची स्थिती निश्चित स्वरुपात सुधारलेली आहे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>सन्माननिय महापौरजी, मला एक मिनिट बोलायचे आहे.

<u>उप–महापौर :–</u>नाही, नाही त्यांना अगोदर बोलु दया, त्यानंतर तुम्ही बोला. तुम्ही असे मध्येच बोलु नका.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>सभागृहामध्ये कोणत्याच टेबलावर पिण्यासाठी पाणी ठेवलेले नाही. एक तास झाला, याबद्दल सुध्दा बोलु नको का? हे कोणाचे काम आहे? तुमचे शिपाई सांगतात की, पाणी नाही. काय करता तुम्ही? भरा बाटल्या सर्व? अहो, तुम्ही पाणी पाजु शकत नाही, अर्थसंकल्पावर काय चर्चा करायची? हे काय आहे? फेकु का सर्व?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>श्री. चहाळ साहेब, सांगा तुम्ही पाणी पाहिजे म्हणुन, आम्ही पाणी पाजतो तुम्हांला? सांगा ना?

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>तर मी सांगत होतो की, या महानगरपालिकेत आमचे ठेकेदार शर्ट उतरुन बसले होते की आम्हांला आमची बिलाची रक्कम मिळत नाही. त्या महानगरपालिकेची, त्या अर्थसंकल्पाची आजच्या अर्थसंकल्पाची तुलना केली तर असे दिसून येईल की आम्ही याची दशाही बदलली आहे दिशाही बदलली आहे. आता या दोन तीन वर्षापासुन असे होत आहे की, आम्ही कार्यक्षमताही सिध्द करत आहोत. पुर्वी अर्थसंकल्पाबाबतीत सांगितले जायचे की आम्ही हे करु ते करु. असे करणार आहोत, तसे करणार आहोत. परंतु हे अर्थसंकल्पाचे पहिले भाषण आहे. व आम्ही मागील वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये सुध्दा उल्लेख केला होता. व या वर्षी स्पष्टपणे सांगितलेले आहे. श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सर्व मुद्दे विस्तृतपणे मांडले आहेत. जेएनएनयुआरएमची योजना आहे. त्यामध्ये १६६ कोटीची एक योजना आहे, बीएसयुपीची एक योजना आहे. सध्या आमच्या महिला महापौर आहेत, स्थायी समिती सभापतीही महिला आहेत. त्यांनी बराच पाठपुरावा करुन या योजना मार्गी लावल्या आहेत. दुसरे असे मी सांगु इच्छितो की, ही जी जेएनएनयुआरएमची योजना आहे ती दोन वर्षाची योजना नाही आहे. ती २००३ पासुन चालु झाली होती. व सध्याही चालु आहे. जेव्हा आपली पाच पाच वर्ष सत्ता होती तेव्हा आपण या योजनांवरुन एक नया पैसा सुध्दा आणला नव्हता. आपण तर सर्वांचे अभिनंदन केले पाहिजे कारण की, त्यांनी एवढया मोठया प्रमाणात या शहरात पैसा आणला आहे. त्यावेळेस आपले आमदार होते, आपणाकडे सत्ता होती. महापौर होते, स्थायी समिती सभापती होत्या. परंतु आपण एक नया पैसा सुध्दा शासनाकडुन आणला नाही. यास्तव आपण काही आणले नाही असे बोलण्याचा आपणांस अधिकारच नाही. महिला वर्षामध्ये एवढया मोठया प्रमाणावर शासनाकडुन निधी आणलेला असतांना व येणा–या वर्षामध्ये आणखी पैसे आणले जातील. ७,८ करोड काय ७०००, ८००० करोड सुध्दा आणले जातील. ती काय फार मोठी गोष्ट नाही. आज स्कायवाकचा प्रोजेक्ट आमच्या कार्यकालावधीत चालु झाला आहे. एमएमआरडीएचे आयुक्त श्री. रत्नाकर गायकवाड यांना आम्ही फेब्रुवारी महिन्यात येथे आणले. त्यांनी यास मंजुरी दिली. तर पहिले म्हणजे आपण शासनाच्या या प्रकल्पांचा पाठपुरावा करत आहोत, आमचे आमदार हे नविन नविन निवडून आले आहेत, ४,५ महिने झाले आहेत, ते पुढे जावुन आपले कर्तृत्व सांगतील. आणखी काही शासनाच्या योजना आहेत त्या आम्ही मंजुर करुन आणु. यात फार मोठी गोष्ट नाही. आमची मोठी योजना येणार आहे ती म्हणजे अंडरग्राउंड ड्रेनेजच्याबाबत फार मोठी पाईप लाईन आहे. आपण जी गोष्ट करत आहात विकास शुल्क वाढविण्याची तर या महासभेत आपण पहा, आपण मतदान दिले या शहरातील अगदी मार्जिनेल इनक्रीज आहे, ते यासाठी आहे की, येणा–या वेळेत शासनाचा जो निधी आहे, आपण जर वाढ दाखविली नाही तर शासनाकडुन जो निधी येणार आहे तो मिळणार नाही. आज आपण जे विकास शुल्काबाबत गोष्ट काढली त्याबाबत आजच्याच दिवसात आम्ही शहरातील इमारतीसाठी एफएसआयबाबत ४ निर्देशांक करण्याचा, डीपआरचा, इनक्रीजींग हाईटबाबत व आज ही जी पहिली महासभा होती त्यामध्ये विविध प्रपोजल पास केलेत, जर शहरातील बिल्डरांनी महापालिकेस काही सहकार्य केले तर त्यामध्ये काही मोठी बाब नाही. मी आणखी एक मुद्दा ठेवु इच्छितो, व मला आशा आहे की, आम्ही सर्व नगरसेवक प्रशिक्षणासाठी बाहेर जातो प्राव्हटई एलिवेशन व पर्यावरणासाठी, एका वेळेस आम्ही गेलो होतो त्यावेळेस आमच्या महापौर महोदया होत्या, आताचे उप–महापौर श्री. विनोद ठाकुर होते, श्री. बोडारे होते, बरेचसे नगरसेवक होते त्यावेळेस आम्ही तेथे एकत्र येवुन निश्चित केले होते की, दारिद्रय निर्मुलन कक्ष जो आहे ते ब–याच महापालिकेत आहे, त्याची जी योजना आहे ती अंमलात आणली पाहिजे त्याबाबत आज प्रथमच आम्ही ३० कोटीची अर्थसंकल्पात तरतुद ठेवली आहे. बिकर सेक्शनसाठी १२ कोटी, महिला व बालकल्याणसाठी ३० कोटी व दारिद्रय निर्मुलनसाठी आम्ही ३० कोटीचा अर्थसंकल्पासाठी ठेवले आहे. तर माझी अशी विनंती आहे की, महापालिकेत एक दारिद्रय निर्मुलन कक्ष बनले पाहिजे. आम्ही एक निश्चय केला होता की, शहरातील गोरगरीबांसाठी दारिद्रय निर्म्रुलन कक्ष तयार करुन त्यांच्यासाठी काम केले पाहिजे. त्यासाठी

अर्थसंकल्पात दारिद्रय निर्मुलन कक्षाचा सुध्दा तरतुद असली पाहिजे. व मला असे वाटते की, हा एवढा चांगला अर्थसंकल्प आहे की, यापेक्षा चांगला शिलकीचा अर्थसंकल्प बनुच शकला नसता, त्यासाठी माझी सर्वांना विनंती आहे की, हा जो अर्थसंकल्प आहे तो सर्व संमतीने पारीत झाला पाहिजे. यासाठी आपण सर्वांनी मतदान घेवुन अथवा सर्व संमतीने पारीत करावे धन्यवाद।

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौर महोदया, जसे की, श्री. राजेश वदारिया यांनी सांगितले की, मालमत्ता करात वाढ केली आहे, तर मी आधीच सांगितले होते की, ४ टक्के वाढ केलेली आहे. तर त्यात काय होईल की ज्यास १००० रुपये टॅक्स फक्त १०४० रुपये येईल किंवा १०५० येईल अशी ४ टक्क्यांनी वाढ आहे. तसेच त्यांनी विकास शुल्काच्या बाबत सांगितले ती कर नाही ती एक फी आहे, ती या महापालिकेस मिळेल. जे कोणी प्लान पास करतील त्यांच्या फीची वाढ आहे कराची वाढ नाही आहे. तसेच श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, फारच सुंदर अर्थसंकल्प तयार केला आहे परंतु ज्यास नकारात्मक बोलायचे आहे तो नकारात्मक बोलेल. एका वेळेस आमचे श्री. बोडारे साहेबांना एक शेतकरी भेटला, त्यास श्री. बोडारे साहेबांनी सांगितले की आपले अभिनंदन आहे आपण यावर्षी १० लाख रुपये कमविले, त्या शेतक–याने श्री. बोडारे यांना काय सांगितले ते मी आपणांस सांगतो, यावर्षी १० लाख जरी कमविले तरी मागील वेळेस तर नुकसान केले होते. तर ते म्हणाले मागील वेळेस नुकसान झाले तर काय झाले आता तर १० लाख रुपये कमविले. तर त्या शेतक–याने सांगितले की, यावर्षी कमविले तर दुस–या वर्षाची काय हमी आहे? होवु शकते दुस–यावर्षी सुध्दा नुकसान करु. तर नकारात्मक विचार करणारे लोक मागील गोष्टीचा सुध्दा विचार करतात. व सकारात्मक विचार करणारे लोक विकासाकडे जातात. तर मी संपुर्ण सभागृहास विनंती करेल की, नकारात्मक विचार सोडुन या सुंदर अर्थसंकल्पास सर्वसंमतीने पारीत करा.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>दोन फक्त मुद्दे राहिलेले आहेत, आम्ही खुले सांगतो सभागृहातच काय तर शहराच्या बाहेर सुध्दा, विकास कर्ता तर काय ते डंगेच्या चोटवर सुध्दा बोलु शकतोच. त्यांनी दोन आरोप केलेले आहे, की तुम्ही दिल्लीला गेलेले आहात, तर मग काय दिल्ली गेले तर प्रत्येक वेळेस तुमची परवानगी घेवुन जायची गरज आहे का? दुसरी गोष्ट म्हणजे १०२ कोटीची योजना आहे, उच्च न्यायालयात हे प्रकरण प्रलंबित आहे, विचारा त्यांना. आणि दुसरी गोष्ट आहे, खेमानी येथिल, त्यांनी जे येथे सांगितले. आम्ही एमआयडीसीमध्ये गेलो, या एमआयडीसीने ही योजना कधीपासुनच चालु केली आहे. त्यांची बचत रक्कम किती होती, चालु रक्कम किती आहे, ही माहिती आम्हांस मिळाली, यांनी नंतर प्रपोजल दिले की, टेक ओवर का करु नये? जेव्हा आम्ही विरोधी पक्षामध्ये होतो तेव्हा आपणांस प्रोत्साहन दिले होते की हे करा, तर तोच मुद्दा आपण ठेवला आहे. ठिक आहे तो मुद्दा आपण ठेवला आहे आपले अभिनंदन. बाकी राहिले खेमानी नाल्याच्या बाबत तर आमचे दोघीबाजुंनी प्रयत्न चालू आहे, मागील वेळेस महापौर महोदया व आम्ही तेथे गेलो होतो एमएआयडीसी एरिग्रेशनवाल्यांशी बातचित झाली, आम्हांस घाणीचे पाणी प्यावे लागत आहे, तर नाला ड्राव्हर्ट करण्याचे काम एमजीपीवाल्यांतर्फे तयार आहे. एमएमआरडीएने ६ कोटीचे अनुदान देणे मंजुर केले आहे. त्याचे प्राकलन कमी दराचे आहे. पोवणे चार कोटीचे आहे, त्यासाठी ते येथे अंतर्भुत केलेले नाही. राहिली दुसरी गोष्ट म्हणजे पाण्याचे ड्रायव्हर्शन बाबत एमआयडीसीने आपले जे इनटेक वेल आहे तो पुढे घेवुन जाण्यासाठी, आता जेथे आमचा नाला आहे, तो वर्षानुवर्षे वाहत आहे. तो फक्त २००३ पासुनच वाहत नाही आहे. मागील वर्षीच सांगितले की ही काय जादुची कांडी नाही की मागील वर्षाची घाण एका वर्षातच काढुन टाकेल. तर पाणी जेथुन घेतात, नाला सोडुन तेथुन वर कमीत कमी १०० मिटर वर घेण्याचा एमएआयडीसीने प्रस्ताव मांडला आहे व त्यांचे काम सुध्दा चालु आहे. म्हणजे नाला वळविण्याचे काम होईल त्याच बरोबर एमआयडीसीवर दबाव सुध्दा टाकला आहे की आपले इनटेक वेल आत घ्या कारण तेथील किना–यावरचे जे पाणी वाहुन जात आहे, त्यामुळे लोकांना त्रास होवु नये म्हणुन. तेथिल लोक वर्षानुवर्षे पाणी पीत आहेत परंतु लोकांना त्याबाबत काही त्रास झाला नाही, परिणाम झाला नाही. आज एका वर्षात होणार नाही आहे. आपण त्यास सुधारत आहोत. यासाठी जे अंतर्भुत केले आहे, ते चांगलया प्रकारची सुविधा आपण देत आहोत. जसे आता श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की, कमित कमी वाढ जसे की, कर्मचा–यांस ६ वा वेतन आयोग आपणांस लागु नाही करायचा तर त्यावेळेसच बोलावयास पाहिजे होते? ६ वा वेतन लागु झाला तेव्हा आपण काही केले नाही तेव्हा आपण टाळया वाजविल्या. तेव्हा आपण काही बोलला नाही आता अर्थसंकल्पाच्या वेळी दिले आहे तर आपण बोलत आहात जर परत घ्यायचे आहे तर परत घ्या? कर्मचा–यांची पात्रता वाढवायची आहे. एवढया वर्षानुवर्षे काम करुन कर्मचा–यांची मानसिकता बदलायची होती ती त्वरीत बदलण्याची आम्ही प्रयत्न करता आहोत, त्यास सहयोग करा धन्यवाद।

यावेळी मा. सदस्य श्री. मोहन साधवानी, श्री. सुरेश जाधव हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>उप–महापौर:–</u>मा. महापौरजी, या सुंदर व चांगल्या अर्थसंकल्पास आपण सर्वसंमतीने पारीत करा असे मी आपणांस सांगत आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>मा. महापौरजी, मी एक खुलासा मागीतला होता की, विकास शुल्क हे फी आहे की कर आहे? तो खुलासा अदयापपर्यंत मला मिळाला नाही. दुसरे म्हणजे आपण कर वाढविण्याचा विचार करता आहात तर काय २० फेब्रुवारी नंतर आपण कराचे दर वाढवु शकतात? त्याचा खुलासा केला जावा.

<u>काही सदस्य :–</u>मतदान घ्या.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>खुलासा करा ना साहेब? मतदान तर घेतलेच जाईल ना?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, मी आपणांस एक प्रश्न विचारतो, ज्यावेळेस सुध्दा महासभेत अर्थसंकल्प प्रस्तृत झाला आहे, त्यावेळेस राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने त्याचे समर्थन केले आहे. चांगल्या कामासाठी आम्ही सहकार्य दिले आहे. जर सदस्य मतदान घ्या म्हणतात तर भलेही आपण मतदान घेवु शकता. परंतु जर आम्ही सहकार्य करत आहोत तर आमच्या गोष्टी आपण ऐकुन घेतल्या पाहिजेत, आम्ही काही बोललेच नाही पाहिजे काय?

<u>उप–महापौर :–</u>आपण तीन, चार वेळा बोललात, किती वेळा आपण बोलणार? आपण बसुन घ्या.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>अर्थसंकल्पावर बोललेच नाही पाहिजे काय?

<u>उप–महापौर :–</u>आपण बसुन घ्या.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>आम्ही जे स्पष्टीकरण मागितले होते की २० फेब्रुवारी नंतर आपण कराचे दर वाढवु शकतात काय? कुठल्या नियमाची तरतुद आहे आपण त्याचा खुलासा करा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>हा जो कर व दर आहे तो २० फेब्रुवारीपर्यंत झाला पाहिजे. मी श्री. राजेश वदारिया यांना सांगु इच्छितो की हा प्रस्ताव २० फेब्रुवारीपुर्वी स्थायी समितीत पारीत झाला आहे. २० फेब्रुवारीपुर्वी स्थायी समितीने पारीत करुन तो महासभेस दिला आहे. व महासभेच्या अर्थसंकल्पाची सभा जेव्हा ठेवली होती तेव्हा त्या सभेस स्थगित केले होते. त्यासाठी यास पास करण्यास काही दुमत नाही आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>मी आपणांस सांगतो की, सेक्शन ९९ मध्ये जी काही आपली पध्दत आहे कर वाढवायची किंवा घटवायची, २० फेब्रुवारीपर्यंत महासभेत त्याबाबत प्रस्ताव पारीत झाला पाहिजे. तर आपले हे जे दर वाढविण्याचे प्रस्ताव आहेत ते प्रस्ताव बेकायदेशीर आहेत. बेकायदेशीर आहेत, बेकायदेशीर आहेत. आपण पास करत असाल तर पास करा.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>आपण जो २० फेब्रुवारीचा मुद्दा येथे उपस्थित केला तर मी त्यांना सांगु इच्छितो की, ठाणे महापालिकेच्या आजुबाजुच्या ज्या महापालिका आहेत त्याबाबत मी येथे मांडु इ च्छितो की, तर मी श्री. राजेश वदारिया यांना सांगु इच्छितो की, ठाणे जिल्हयात किंवा मुंबई महानगरपालिकेत फक्त माहिती काढुन घ्या की, किती आयुक्तांनी मार्चच्या महिन्यात, आमच्या आयुक्तांनी तर फेब्रुवारी महिन्यातच अर्थसंकल्पाचे प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवले होते. परंतु मी श्री. वदारिया यांना सांगेल की त्यांनी पडताळुन पहावे की, महाराष्ट्रातील किती आयुक्तांनी मार्चच्या महिन्यात स्थायी समितीपुढे अर्थसंकल्प प्रस्तुंत केले आहेत. जर ते तपासुन पाहतील तर त्यांस खुलासा मिळेल. व शासन सुध्दा खुलासा देईल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>आपण दुस–या महापालिकेबाबत बोलत आहात, आम्ही उल्हासनगर महानगरपालिकेच्या सभागृहाबाबत बोलत आहोत. बदलापुर, मुंबई किंवा ठाणे महापालिकेची गोष्ट करत नाही

आहोत. तर आपण याबाबत खुलासा करा की कोणत्या सेक्शनमध्ये तरतुद आहे? आज आपण १० मार्च रोजी जे दर वाढवित आहात ते बरोबर आहेत काय?

यावेळी मा. सदस्य श्री. किशोर जग्यासी, श्री. बच्चाराम रुपचंदानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सदस्य श्री. गोविंदराम लुंड :—</u>मा. महापौरजी, माझी एक विनंती आहे, ८१ लाखाबाबत, मागील वर्षी एसी लावला जाईल असे सांगण्यात आले होते परंतु ते अदयाप केले नाही तर ते आता तरी पारीत करा? सर्वांनी मागील वर्षी एक एक लाख रुपये घेतले आहेत. आता एवढे गरम होत आहे, आता पास करा अर्थसंकल्प?

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, मा. स्थायी समिती सभापती, आयुक्त साहेब, मा. स्थायी समिती सभापती महोदयांनी जो अर्थसंकल्प पारीत केला आहे तो एका स्वप्नाप्रमाणे आहे. कारण हा अर्थसंकल्प वास्तविकच्या आधारावर बनला नाही. परंतु त्या वास्तविकाच्या हिशोबाने ते वास्तविकाच्या आधारावर नाही आहे. मागील वर्षीचा जो अर्थसंकल्प ६६२ कोटी रुपये मंजुर केला होता जो पुर्णपणे अयशस्वी झाला आहे. ही बाब स्थायी समितीच्या सभेत पुर्णपणे समोर आली आहे व मागील अर्थसंकल्प दोंनशं बत्तीस कोटीपर्यंत येवुन थांबला आहे. या ताज्या अनुभवानुसार यावर्षीचा पाचशे २९ कोटी रुपयाच्या अर्थसंकल्पावर भरोसा कसा केला जावु शकतो. आपण मिळकत करामधील उत्पन्न जे ७५ कोटी रुपये दाखविले आहे. व पाणी पुरवठा विभागामध्ये सुध्दा जवळ जवळ तेवढीच. काय या दोन्ही करांची वसुली कधी २५ कोटीपर्यंत पोहचली आहे? एखादया वर्षाचा अनुभव असु शकेल परंतु मागील तीन वर्षाचे प्रत्यक्ष आकडे हे जर स्विकारतील तर या करांची वसुली १४ ते १६ च्या आसपासच राहिले आहे. आपण आकडे वाढविले आहेत. प्रत्यक्षात एवढी वसुली होणे शक्य नाही. आपले महापालिका वसुलीवर नाही तर दुस—याच वसुलीकडे लक्ष आहे. आपण उत्पन्नाचे आकडे वाढवुन खर्च वाढवु इच्छिता जेणेकरुन बोगस प्राकलन बनवुन महापालिका इमारतीची लुट करता येवु शकेल. हे मी दाव्यानिशी सांगु इच्छितो. कारण की माझ्याकडे उदयानांची काही बोगस प्राकलने आहेत. जी मी मा. महापौर, आयुक्त साहेब, व सचिव साहेब यांना देत आहे. व यास चौकशीसाठी दिले जावे.

यावेळी प्राकलनांच्या प्रति आयुक्तांना देण्यात आल्या.

<u>महापालिका सचिव :—</u>मा. महापौरांच्या आदेशाने बोलत आहे, मतदान घेतले जावे असा त्यांचा आदेश आहे.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>मा. महापौरजी, प्रथम याचा खुलासा करा.

<u>महापालिका सचिव :—</u>मतदान घेण्याअगोदर, मा. स्थायी समिती सभापती यांच्याकडुन जो अर्थसंकल्प प्रस्तुत करण्यात आला त्यामध्ये काही सन्माननिय सदस्यांनी रस्त्यांची यादी दिली आहे, ती पुढीलप्रमाणे आहे. त्याची इतिवृत्तातांत नोंद घेण्यात येईल. आपण जी समिती नेमली आहे ती त्यावर निर्णय घेईल.

| अ.क्र. | ठिकाण | कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | साईबाबा मंदिर नाका नं. ८ ते राधास्वामी सतसंग पर्यंत सी.सी. रस्ता सदरील रस्ता शहरातील प्रमुख रस्ता आहे. शहरात प्रवेश करतांना रस्ता सुशोभित असल्यास सौंदर्य करणास नाव मिळेल. | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे, सौंदर्यीकरण करणे |
| २ | अंबरनाथ बदलापूर ते शांतीनगर रस्ता | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे १ करोड |
| ३ | प्र. क्र. ३८ मध्ये नता यादव यांच्या घरापासून दुर्गा माता मंदिरापर्यंत २ एम ५० रोड बाजूला | सी सी रस्ता बनविणे, नाला व पायवाटा बांधणे, इंटर ब्लॉक करणे. |
| ४ | प्र.क्र. ३८ मध्ये शिवाजी भवाळ यांच्या घराच्याबाजूला सोलसे यांच्या बाजुचा | सी.सी. पायवाटा व नाली बनविणे |
| ५ | प्र.क्र. २१, हिलव्हीव सोसायटी ते बेवस चौक | |
| ६ | प्र.क्र. २१, झुलेलाल मंदिर ते साई दर्शन अपार्टमेंट | |
| ७ | प्र.क्र. २१, लहोरी अपार्टमेंट ते वॉटर टॅक एमएसडीसी बॅ.नं. २०४ | |
| ८ | प्र.क्र. १८, बस स्टॉप पासुनचा रस्ता ते महाराष्ट्र मित्र मंडळ शाळा | एम ३५० रस्ता बनविणे |

| | | |
|---|---|---|
| | | २५ लाख |
| ९ | प्र.क्र. १८, आशा कोल्ड्रीक्सचा रस्ता ते पोलिस स्टेशन | एम ३५० रस्ता बनविणे, १० लाख |
| १० | प्र.क्र. ६६, सेक्शन ३९, हरीओम अपार्टमेंट ते आनंदपुरी दरबार उल्हासनगर–५ एम २५० रस्ता बनविणे | |
| ११ | प्र.क्र. ६६, कैलास नगर ते गोरख धाम, उल्हासनगर–५ | |
| १२ | प्र.क्र. १३, हिल एरिया, उल्हासनगर –३ | ४५ लाख |
| १३ | उत्तम अपार्टमेंट ते महेश सोसायटी, उल्हासनगर–१ | |
| १४ | प्र.क्र. १९, राहुल नगर, बॅ. नं. १२७,१२९,१५० | |
| १५ | प्र.क्र. ३४, कामगार हॉस्पीटल ते सतनाम कॉलनी, बॅ.नं. ५२२, | पेव्हर ब्लॉक बनविणे |
| १६ | बाशाराम अपार्टमेंट ते हनुमान मंदिर पर्यंत | नाला व फुटपाथ बनविणे |
| १७ | प्र.क्र. ९, गोल्डन प्लायवुड (रमाबाई आंबेडकर नगर), ब्राम्हणपाडा ते केणीचाळ, शांतीनगर | ३५० सीसी रस्ता बनविणे |
| १८ | प्र.क्र. ९, ब्राम्हणपाडा सार्वजनिक शौचालयाजवळ | समाजमंदिर बांधणे. १० लाख |
| १९ | प्र.क्र. १३, जेठानंद अपार्टमेंट ते महादेव अपार्टमेंट रस्ता बांधणे | |
| २० | प्र.क्र. १३, स्विमिंग पुल ते कल्याण अंबरनाथ रस्ता, व्हाया दिवार ट्रान्सपोर्ट | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| २१ | प्र.क्र. १८, मोहटा देवी मंदिर ते कल्याण अंबरनाथ रस्ता | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| २२ | प्र.क्र. १४, भाटिया चेंबर, व्हाया शाप्लु पॅलेस, भावना फारमर ते मामा सोसायटी | |
| २३ | प्र.क्र. १४, रघुवंशी सोसायटी ते ते हिमांशु अपार्टमेंट, विजय हाईड स्कुल | |
| २४ | प्र.क्र. १४, सोनेसर अपार्टमेंट ते साईट नं. ५७, विशीमरन पार्क | |
| २५ | जय मल्हार मित्र मंडळ ते कलर फॅक्टरी, व्हाया शिवसेना शाखा उल्हासनगर–५ | |
| २६ | सुशील स्नेह स्कुल ते ब्लॉक ए ६९, कैलास कॉलनी, उल्हासनगर–५ | |
| २७ | प्र.क्र. ४६, रामायण नगर ते ओटी चौक | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| २८ | प्र.क्र. ५९, सुखमनी सागर ते राधाक्रिष्णा मंदिर (बॅ.क्र. १६१०) | २५० रस्ता, नाला व फुटपाथ बांधणे. |
| २९ | प्र.क्र. ५९, सतरामदास हॉस्पीटल ते स्कुल नं. १२, | २५० रस्ता व नाला बांधणे |
| ३० | प्र.क्र. ५९, बॅ.नं. १६७९ ते बॅ.नं. १६८४ | २५० रस्ता व नाला बांधणे |
| ३१ | स्वामी शांतीप्रकाश पुतळयापासून दुधनाका व्हाया सेक्शन–३९, गाऊन बाजार, उल्हासनगर–५ | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| ३२ | व्हीनस चौक ते जयधाम चौक व्हाया संभाजी चौक, उल्हासनगर–४ | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| ३३ | सुभाष टेकडी ते बुस्टरपंप व्हाया ससाणे घरापर्यंत, उल्हासनगर– ४ व ५ | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| ३४ | नेताजी चौक ते बॅ.क्र. २१०८, व्हाया जयबाबा धाम, निजधाम आश्रम उल्हासनगर–५ | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| ३५ | श्रीराम चौक, उल्हासनगर–४ | सुशोभिकरण करणे |
| ३६ | शांतीनगर स्मशानभूमी चौक, उल्हासनगर–३ | सुशोभिकरण करणे व कारंज लावणे |
| ३७ | कॅम्प नं. १ ते ५ मधील सर्व प्रमुख चौक व प्रवेशद्वार | सुशोभिकरण व किरकोळ दुरुस्ती करणे |
| ३८ | प्र.क्र. ५६, सार्वजनिक मित्र मंडळ ते ट्रान्सफॉर्मपर्यंत | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| ३९ | श्रीराम सिनेमाजवळ, उल्हासनगर–४ | प्रवेशद्वार बनविणे |
| ४० | हनुमान मंदिर ते लादी कारखाना, कैलास कॉलनी, उल्हासनगर–५ | |
| ४१ | धर्माजी पाटील कॉलनी ते दत्त मंदिर दुर्गापाडा, उल्हासनगर–५ | |
| ४२ | महात्मा फुले चौक ते दुनिचंद कलानी कॉलेज, उल्हासनगर–१ | |
| ४३ | प्र.क्र. १८, नवजीवन बॅंक ते बसस्टॉप, उल्हासनगर–१ | ६ लाख |
| ४४ | सोनार गल्ली ते बॅ. नं. ३२७ | पेव्हर ब्लॉक रस्ता बनविणे |
| ४५ | सोनार गल्ली ते बॅ.नं. ३१८, हासु अडवानी गार्डन | पेव्हर ब्लॉक रस्ता बनविणे |
| | | |
| ४६ | वार्ड क्र.७, गवळी पाडा, दिपक गैरेज, सचदेव नगर कॉ. हाऊसिंग सोसायटी मधील गेट पर्यंत नाला बनविणे | |
| ४७ | शिवाजी नगर ते अयोध्यानगर, वार्ड क्र. ५२ | ५.०० |
| ४८ | ओ. टी. चौक, उल्हासनगर–४ येथिल चौकाचे सुशोभिकरण करुन विकसित करणे. | |
| ४९ | स्मशान भुमी पासून बोटक्लब पर्यंत व हडक माता चौक पर्यंत, वार्ड क्र.२८. रस्त्याचे विकास काम करणे. | |

| | | |
|---|---|---|
| ५० | काजल पेट्रोल पंप चौक, वार्ड क्र.२८. येथिल चौकाचे सुशोभिकरण करणे. | |
| ५१ | उल्हासनगर–१.कमला नेहरुनगर, वार्ड क्र.२०, साईबाबा चौक ते दुबेपानवाला चौक, येथे रस्थ्याचे काम करणे. | २०.०० |
| ५२ | नेताजी स्कुल ते प्रभाराम मंदीर पर्यंत एम ३५० रस्ता बांधणे | ५०.०० |
| ५३ | समाज मंदीर हॉल, शिवसेना ऑफीस जवळ, बॅरेक नं. ११०. | १५.०० |
| ५४ | बस स्टॉप, उल्हासनगर–१ येथे एम ३५० रस्ता बनविणे | ५०.०० |
| ५५ | रवी हाऊसिंग एजन्सी ते कवाराम चौक, नवीन हॉस्पीटल च्या मागे एम ३५० रस्ता बनविणे | २०.०० |
| ५६ | हील व्हु ते बेवास चौक येथे एम ३५० रस्ता बनविणे | २५.०० |
| ५७ | मोरिया नगरी व्हाया कालानी सोसायटी ते लालचक्की पर्यंत सिमेंट कॉंक्रिट रोड, वार्ड क्र.६० येथे सिमेंट कॉंक्रीटीकरण रस्ता बनविणे | २५.०० |
| ५८ | नेताजी चौक ते मच्छी मार्केट व नेताजी चौक ते हिललाईन पोलिस स्टेशन, वार्ड क्र.६०.येथे सिमेंट कॉंक्रीटीकरण रस्ता बनविणे | ५०.०० |
| ५९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते भगत वकील यांचे घरापर्यंत, वार्ड क्र.८. एम ३५० कॉंक्रिटकरण करणे | २०.०० |
| ६० | कैलास कॉलनीजवळ डॉ. महेश्वरी हॉस्पीटल, सुशिला सिन्हा शाळेजवळ, उल्हासनगर–५ येथे नाली व कल्व्हर्टचे काम करणे | १०.०० |
| ६१ | उल्हासनगर–४ येथील स्मशानभुमीची दुरुस्ती करणे | १५.०० |
| ६२ | व्ही.टी.सी. क्रिडा संकुल येथे बायोगॅस प्रकल्प उभारण्यासाठी प्रस्ताव, उल्हासनगर–४ प्रकल्प कार्यान्वीत करणे | ५०.०० |
| ६३ | शांतीनगर परिसरातील सांवत बंगलापासून, भागीरथी ते गारुडीपाडा पर्यंत, उल्हासनगर–३ येथे एम –३५० सिमेंट कॉंक्रिटीकरण रस्ता बनविणे | २५.०० |
| ६४ | शिवनेरी हॉस्पीटल समोरील रस्ता, उल्हासनगर–४.येथे एम –३५० सिमेंट कॉंक्रिटीकरण रस्ता बनविणे | २५.०० |
| ६५ | ओ.टी. चौक, उल्हासनगर–३ व्हाया अयोध्यानगर ते उल्हासनगर स्टेशन. | ७५.०० |
| ६६ | वार्ड क्र.४७.करिश्मा सोसायटी ते सुखसागर अपार्ट. पर्यंत, रुंदीकरण करुन सिमेंट कॉंक्रिटीकरण रस्ता बनविणे | |
| ६७ | फकड मंडली से डॉ. राय यांची डिसपेंन्सरी. येथे रस्ते नाली व पुल | |
| ६८ | बस स्टाप से बिरला गेट.येथे रस्ते नाली व पुल | |
| ६९ | साई कला अपार्टमेन्ट ते ब्लॉक ६३०.येथे रस्ते नाली व पुल | |
| ७० | बॅरेक १९३९ ते १९६७.येथे रस्ते नाली व पुल | |
| ७१ | बॅरेक २०५८ से २०५९ तथा बॅरेक २१०१ से २१०८. | |
| ७२ | स्वामी शांती प्रकाश हॉल ते श्री. किशन दुकान.येथे रस्ते नाली व पुल | |
| ७३ | सोनी ड्रेसेस ते बस स्टॉप पर्यंत एम ३५० रोड. एम ३५० रस्ता बनविणे | |
| ७४ | बॅरेक नं. ६७४ शांती व्हालासे साई व्दार अपार्टमेंट पर्यंत एम ३५० रोड . | |
| ७५ | धीरज टॉवर ते बॅंक ऑफ बडोदा पर्यंत एम ३५० रोड . | |
| ७६ | भाजी मार्केट उल्हासगनर ४४४ गार्डन ते पिंकी अपार्टमेंट पर्यंत एम ३५० रोड. | |
| ७७ | जवारक हुसेन लाल खान घर ते पंजाबी कॉलनी रिक्शा स्टॅंड पर्यंत एम ३५० रोड. | |
| ७८ | आमदार निवास (सपना गार्डन) ते सुदंरी सागर, वार्ड क्र. २६. | २०.०० |
| ७९ | गुरुव्दारा मेहनवान सिंह, वार्ड क्र.२७. | २०.०० |
| ८० | पंजाबी कॉलनी रोड ते शिवगंगा शिवसागर ते पंचायत हॉल पर्यंत एम ३५० रोड . | |
| ८१ | सेवल ठाकूर हाऊस ते बॅरेक नं. १९११ ओटी सेक्शन पर्यंत एम ३५० रोड . | |
| ८२ | झुलेलाल चौक ते हरी ओम अपार्टमेंट व्हाया अनंदपुरी दरबार, सेक्शन ३९पर्यंत एम ३५० रोड. | |
| ८३ | डॉ. आंबेडकर पुतला ते गॅस गोडाऊन का रस्ता पर्यंत एम ३५० रोड | |
| ८४ | ब्लॉक ७०७लक्ष्मीविला ते ब्लाक ७७८श्री राम तथा नारायण जग्यासी मार्ग पर्यंत एम ३५० रोड. | |

| | | |
|---|---|---|
| ८५ | स्टेशन रोड ते नंदलाल आहुजा कारखाना तक तथा नारायण जग्यासी मार्ग पर्यंत एम ३५० रोड. | |
| ८६ | साई पार्क से दशहरा मैदांन पर्यंत एम ३५० रोड. | |
| ८७ | उल्हासनगर स्टेशन ते नंदलाल फॅक्टरी पर्यंत एम ३५० रोड | |
| ८८ | बॅ.नं. १०७४ ते वडोलगाव चर्च पर्यंत, सेंट जोसेफ चर्च ब्रीजच्या जवळ पर्यंत एम ३५० रोड | |
| ८९ | न्यु सिध फॅक्टरी ते आश सिलिकेट.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९० | नागेश्वर मंदिर ते ओ.टी. चौक.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९१ | गायकवाड पाडा ते नाका नं. ११ टॅकर रोड.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९२ | कुर्ला कॅम्प चौक ते हनुमान मंदिर.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९३ | गणेश नगर ३९ सेक्शन ते रविंद्रनगर.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९४ | मराठा सेक्शन – तळेकर यांच्या घरापासून माळकर यांच्या घरापर्यंत. येथे रस्ते नाली व पुल | |
| ९५ | सरस्वती नगर ते काजल पेट्रोल पंप.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९६ | साई कला अपार्टमेंट.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९७ | गुरुव्दारा ते बाबासाहेब आंबेडकर चौक, उल्हासनगर.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९८ | बाबासाहेब आंबेडकर चौक ते रेल्वे द्रक सिडीया पर्यंत, उल्हासनगर–४.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९९ | इंदिरा गांधी मार्केट ते राधा कृष्णा चौक.येथे रस्ते नाली व पुल | |
| १०० | राम मंदीर ते शहाड गावठण रिटेनिंग वाल और सौदर्यीकरण.येथे रस्ते नाली व पुल | |
| १०१ | हिरा घाट टेम्पो स्टॅन्ड ते स्मशान चौक पर्यंत.येथे रस्ते नाली व पुल | |
| १०२ | झुलेलाल चौक (गाऊन बाजार) ते हरिओम अपार्टमेंट व्हाया आनंदपुरी दरबार.येथे रस्ते नाली व पुल | |
| १०३ | बस स्टॉप कॅम्प नं. १ ते बिर्ला गेट वायडनिंग अॅण्ड कॉक्रिटीकरण. | |
| १०४ | प्रभाग क्र. ७० मधील गुरुव्दारा ते शिवसेना शाखा, तानाजी नगर, उल्हासनगर–५. | |
| १०५ | तानाजी नगर, शिवसेना शाखा ते सेक्शन ४० पर्यंत एक २५० रस्ता. | |
| १०६ | प्रभाग क्र. ६४, कुर्ला कॅम्प रोड, उल्हासनगर ४ येथील ब्लॉक नं. ए–८९ ते ब्लॉक नं. १०१ पर्यंत एम २५० रोड. | |
| १०७ | प्रभाग क्र. ५ मधील घुले हाऊस ते मराठे हाऊय (कल्व्हर्ट) पर्यंत एम २५० रोड. | |
| १०८ | प्रभाग क्र. ७६ मधील राजेश शेलार हाऊस ते शिवसेना शाखा गायकवाड पाडा पर्यंत एम २५० रोड. | |
| १०९ | प्रभाग क्र. ६४ मधील ब्लॉक नं. १२९ ते ब्लॉक नं. १३५ पर्यंत एक २५० रस्ता. | |
| ११० | प्रभाग क्र. ७५ मधील संतोष पाटोले शॉप ते लोखंडे हाऊस पर्यंत.येथे रस्ते नाली व पुल | |
| १११ | प्रभाग क्र. ७६ अकाश किराणा स्टोअर्स ते विठठ्ल मंदिर. येथे रस्ते नाली व पुल | |
| ११२ | आंबेडकर पुतळयापासून गॅस गोडाऊन पर्यंत, आंबेडकर नगर, लालचक्की शेजारी, उ. न. ५.येथे रस्ते नाली व पुल | |
| ११३ | प्रभाग क्र. ६४ मधील कुर्ला कॅम्प ब्लॉक ३२६ ते ३५३ पर्यंत विकास आराखडयातील रस्ता. | |
| ११४ | प्रभाग क्र. ४८ मधील वाको कपांउड मधील अंतर्गत रस्ता. | |
| ११५ | बॅरेक नं. १८७६ ते बलविरसिंग गुरुव्दारा प्रभाग क्र. १७. | |
| ११६ | एकता नगर ते चोडेकर पाडा / दुर्गादेवी पाडा. | |
| ११७ | उल्हासनगर ४ येथील संभाजी चौक ते संतोष सिंग यांच्या वरवाटी पर्यंतचा ३५० चा रस्ता. | |
| ११८ | परमानंद यांच्या वरवारी पासून ते संभाजी चौक पर्यंतचा रस्ता. | |
| ११९ | दुनिचंद कॉलेज ते महात्मा फुले चौक, उल्हासनगर–१. | |
| १२० | निलकठं पॅलेस, गार्डनच्या सभोतालचा परिसर, उल्हासनगर १, एम २५० रस्ता. | |
| १२१ | सावंत बंगला ते गारुडी पाडा मार्ग राजीव गांधी चौका पर्यंत रस्ता बनविणे | ३०.०० |
| १२२ | भिमा खांडेकर यांच्या घरापासून पाण्याच्या बावडी पर्यंत असणारा मोठा नाला. | १५.०० |
| १२३ | नेताजी चौक, उल्हासनगर ५ येथे टॉवर, कारंजे (फाऊन्टन) व लहानसे गार्डन. | २५.०० |
| १२४ | संतु बिल्डींग चौक येथे सौंदर्यीकरण करणे | १०.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| **नैसर्गिक आपत्ती निधीतून विकास कामे** | | |
| १२५ | उल्हासनगर स्टेशनजवळील पादचारी पूल. | ३५००० कोटी |
| १२६ | सि.एच.एम. कॉलेज, पादचारी पुलाच्या दिशेने संरक्षक भिंत बनविणे. | |
| १२७ | वालधुनी पूल, राजीव गांधी चौकाकडे संरक्षक भिंत बांधणे. | |
| **नविन रस्ते बांधणे** | | |
| १२८ | मिनिस्टर कॉम्प्लेक्स ते श्रीराम सिनेमापर्यंत रस्ता. | १००० कोटी |
| १२९ | राधास्वामी सतसंग ते एमएसइबी कंपाऊंड कल्याण—अंबरनाथ रोडपर्यंत रस्ता. | |
| १३० | निलकंठ मंदीर ते बसस्टॉप पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण. | |
| १३१ | शहाड ते सी ब्लॉक पर्यंत रस्ता. | |
| **विकास निधीमधून विकास कामे** | | |
| १३२ | उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयाची नविन इमारत (नुतनीकरण, विद्युतीकरण, फर्निचर). | ४००० कोटी |
| १३३ | प्रभाग समिती क्र १,२,३,४ बांधणे. | |
| **सफाई कामगार इमारत** | | |
| १३४ | सफाई कामगारांची इमारत बांधणे. | १००० कोटी |
| **झाडे/संरक्षक जाळया खरेदी करणे** | | |
| १३५ | प्रभाग समिती क्र १. | २५ लक्ष |
| १३६ | प्रभाग समिती क्र २. | २५ लक्ष |
| १३७ | प्रभाग समिती क्र ३. | २५ लक्ष |
| १३८ | प्रभाग समिती क्र ४. | २५ लक्ष |
| **कारंज्याची दुरुस्ती देखभाल (अस्तित्वातील)** | | |
| १३९ | उल्हासनगर कॅम्प क्र १ ते ५ मधील अस्तित्वातील कांरज्याची देखभाल. | ४५ लक्ष |
| **नविन कारंज्या बनविणे** | | |
| १४० | कैलाश कॉलनी चौकाजवळ. | १० लक्ष |
| १४१ | ब्लॉक चौकाजवळ. | ८ लक्ष |
| १४२ | शहाड गार्डनजवळ. | १० लक्ष |
| १४३ | नाना—नानी गार्डन. | ४ लक्ष |
| १४४ | स्मशानभुमी चौक, उल्हासनगर—३. | ८ लक्ष |
| १४५ | गुलराज टॉवरजवळ. | ५ लक्ष |
| १४६ | बसस्टॅड, उल्हासनगर—१. | २ लक्ष |
| १४७ | बालकनजीबारी. | ३ लक्ष |
| १४८ | प्रभाग क्र. ३० बॅ.नं. ९०५ येथिल गार्डन मध्ये | ८ लक्ष |
| **उद्यान बनविणे** | | |
| १४९ | वार्ड क्र. २० एमआयडीसी गार्डन. | ५ लक्ष |
| १५० | वार्ड क्र. २९ येथील आरक्षित भुखंडावर उद्यान. | २५ लक्ष |
| १५१ | लल लोही गार्डन | ५ लक्ष |
| १५२ | शोभराज गार्डन. | ५ लक्ष |
| १५३ | उल्हासनगर १ येथील डंपीग गार्उन. | ५ लक्ष |
| १५४ | एम.एस.इ.बी. समोर आणि बहरानी चौक. | ५ लक्ष |
| १५५ | प्रभाग क्र. ३०, बॅ. नं. ९०५ येथे उदयान | ७ लक्ष |
| १५६ | प्रभाग क्र. १८, शिवसेना शाखेजवळ, बॅ.नं. ११० | १० लक्ष |
| **उद्यानाची देखभाल** | | |
| १५७ | प्रभाग समिती क्र १. | १५ लक्ष |
| १५८ | प्रभाग समिती क्र २. | १५ लक्ष |
| १५९ | प्रभाग समिती क्र ३. | १५ लक्ष |
| १६० | प्रभाग समिती क्र ४. | १५ लक्ष |
| | | |
| १६१ | उल्हासनगर १ येथे निलकंठ महादेव मंदीर ते बसस्टॉप. | २०० लक्ष |
| १६२ | उल्हासनगर ४ वाको जंक्शन ते सम्राट बिस्किट. | ७५ लक्ष |
| १६३ | उल्हासनगर ४ माया आईस फॅक्टरी ते हरीसन्स पिकल प्रोडेक्ट. | ६० लक्ष |
| १६४ | उल्हासनगर ४ नागेश्वर मंदीर ते ओ.टी. सेक्शन. | १०५ लक्ष |
| १६५ | उल्हासनगर ४ चॅम्पीयन वेफर ते जंगल हॉटेल मार्गे जिजामाता गार्डन. | ५० लक्ष |
| १६६ | उल्हासनगर ४ जिजामाता गार्डन ते उल्हासनगर स्टेशन उल्हास विद्यालय. | ८८ लक्ष |
| १६७ | उल्हासनगर आकाश कॉलनी, चाळ नं. १३, लोखंडे यांचे घर. | १० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| १६८ | उल्हासनगर ५ कुर्ला कॅम्प ब्लॉक क्र. ९० ते १०१, कानसई रोड. | १६ लक्ष |
| १६९ | उल्हासनगर जयजनता कॉलनी, शिवसेना ऑफीस समोर, कंपाऊड वॉल. | १२ लक्ष |
| १७० | वार्ड क्र. ७६ दुर्गापाडा येथील पांडूरंग भोईर ते काशिनाथ शेलेकर रोड. | ३४ लक्ष |
| १७१ | वार्ड क्र. ७१ येथील हनुमान मंदीर ते लादी कारखाना मार्ग चरन पटेल नगर. | ४० लक्ष |
| १७२ | वार्ड क्र. ५२ कोळगे यांचे घर ते मराठा यांचे घर ते कल्व्हर्टपर्यंत मोठा नाला. | ३० लक्ष |
| १७३ | वार्ड क्र. ५१ मध्ये बॅरेक क्र. १३४६ पासून ते साईबाबा मंदीर पर्यंत रस्ता. | २५ लक्ष |
| १७४ | उल्हासनगर ५ प्रभाग क्र. ६८ मध्ये हिरापुरी चौक ते लक्ष्मीनगर शांतीप्रकाश योगा आश्रम मार्ग रस्ता. | २० लक्ष |
| १७५ | उल्हासनगर ४ प्रभाग क्र. ४७ शिवशक्ती कॉलनी मध्ये गंगा निवास जवळ संरक्षक भिंत बांधणे. | ५ लक्ष |
| १७६ | उल्हासनगर ३ भगत कवाराम चौक ते रवि हाऊसिंग एजन्सी, नारायणदास जग्यासी हॉस्पीटल मार्गाचा रस्ता. | १५ लक्ष |
| १७७ | उल्हासनगर ३ लोकमान्य तिलक एरिया ते विसर्जन घाट ते उल्हास स्टेशन जवळ संरक्षक भिंत. | |
| | | |
| १७८ | स्वामी शांतीप्रकाश पुतळयापासून दुधनाका व्हाया सेक्शन ३९, गाऊन बाजार, उल्हासनगर ५. | ८०० लक्ष |
| १७९ | व्हिसन चौक ते जयधाम चौक व्हाया संभाजी चौक, उल्हासनगर ४. | ६०० लक्ष |
| १८० | सुभाष टेकडी ते बुस्टरपंप व्हाया ससाणे घरापर्यंत, उल्हासनगर ४ व ५. | ५०० लक्ष |
| १८१ | नेताजी चौक ते बॅ.क्र.२१०८ व्हाया जयबाबा धाम, निजधाम आश्रम उल्हासनगर ५. | ११०० लक्ष |
| १८२ | श्रीराम चौक, उल्हासनगर ४. | ४० लक्ष |
| १८३ | शांतीनगर स्मशानभुमी चौक, उल्हासनगर ३. | १५ लक्ष |
| १८४ | स्मशानभुमी चौक, उल्हासनगर ४. | १०० लक्ष |
| १८५ | कॅम्प क्र. १ ते ५ मधील सर्व प्रमुख चौक व प्रवेशव्दार सुशोभिकरण व किरकोळ दुरुस्ती. | १०० लक्ष |
| १८६ | वार्ड क्र. ५६ मधील सार्वजनिक मित्र मंडळ ते ट्रान्सफार्मरपर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्ता. | ८५ लक्ष |
| १८७ | श्रीराम सिनेमाजवळ प्रवेशव्दार. | २५ लक्ष |
| १८९ | उल्हासनगर ५ कैलाश कॉलनी येथे सुशिला सिन्हा शाळेजवळ साकव. | ५० लक्ष |
| १९० | उल्हासनगर ३ मधील सावंत बंगला ते राजविर गांधी चौक येथील रस्ता. | |
| १९१ | प्रभाग क्र. ८ डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते भगत वकील यांचे घरापर्यंत रोड ३५० कॉक्रीट रस्ता. | |
| १९२ | प्रभाग क्र. ६८ स्वामी त्रिलोदास उद्यानाचे विकास व सुशोभिकरण. | ५ लक्ष |

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—मा. महापौरजी, मला सुध्दा बोलण्याची संधी दया ना? महापौर महोदया, उप—महापौरजी, मा. स्थायी समिती सभापती, आयुक्त साहेब, व सर्व सन्माननिय सदस्य, हा जो अर्थसंकल्प तयार करण्यात आला तो कोठे कोठे चांगला आहे व कोठे कोठे चुकीचा आहे. त्यावर विशेष लक्ष दिले जावे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—कोठे कोठे चुकीचा आहे? आम्ही दोन तास बसु तुम्ही जरा सांगा.

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—आपण मागील वेळेस सांगत होतात की, ७००,५०० इमारती बनविणार, हॉस्पीटल बनविणार, त्याचा निधी कोठे आहे?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—आपण माझे ऐकुन घ्याल का? आपण म्हणालात की कोठे कोठे चुकीचा आहे तर मग मला सांगा कोठे कोठे चुकीचा आहे ते?

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—तसे पाहिले तर ब—याच ठिकाणी चुकीचा आहे. सर्वात प्रथम तर मी सांगेल की आपण पाण्याची व्यवस्था करा, जो अर्थसंकल्प ठेवला आहे तो केव्हा होईल?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—श्री. गुप्ताजी, आपण विस्ताराने सांगा की आपण म्हणालात कोठे कोठे चुकीचा आहे. आम्ही ऐकण्यास तयार आहोत, अर्धातास आम्ही ऐकु आपण फक्त विस्ताराने सांगा.

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—आपण पाच मिनट थांबु शकत नाहीत तर अर्धा तास कसे थांबणार आपण? मा. महापौर महोदया, सर्वात प्रथम आपण शहरास पाणी दया, सफाई दया मग नंतर बोला. शहरातील लोक पाण्यासाठी भटकत आहेत, काय गोष्ट करत आहात आपण?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—श्री. गुप्ताजी, विस्ताराने आपण सांगा आम्ही ऐकण्यास तयार आहोत. विरोधी पक्षाची गोष्ट नाही, आपण विस्ताराने सांगा. आपण या सभागृहातील सन्माननिय विरोधी पक्ष नेता आहात, आपण म्हणालात की हा अर्थसंकल्प कोठे कोठे चुकीचा आहे. आपण आम्हांस सांगा विस्ताराने की कोठे कोठे चुकीचा आहे?

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :–</u>चुकीचा तर बराच आहे. आम्हांला हे बरोबर दिसते की, शहरात फक्त इमारती बनविल्या जात आहेत व हरीतपट्टा कमी दिसतो. तुम्ही हे सांगतात की आमचे २५ रस्त्याचे काम चालु आहे परंतु तो कोणाचा निधी आहे, तो आमच्या जुन्या आमदाराचा निधी आहे. आपण काय बोलणार? आता पर्यंत यांचा निधी आलेला नाही आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>श्री. गुप्ताजी, आपण एक सांगा की आपणांस उचित काय वाटले?

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :–</u>हे जे एमएमआरडीएचे काम चालु आहे, ब्रिज बनत आहे, शौचालय बनत आहेत, आपले बिल नाही आहे. जसे यांनी सांगितले की श्री. रत्नाकर गायकवाड यांना सांगितले होते, तुम्ही काही मेहरबानी केली नाही, पुर्ण मुंबई शहरात काम चालु आहे तर उल्हासनगरचे सुध्दा काम चालु आहे. यांची काही मेहनबानी नाही. शासनाची योजना आहे. याच बरोबर मी असे सांगतो की, प्रभाग क्र. ३२ मध्ये बरेचसे असे रस्ते आहेत, जे रस्ते कच्चे आहेत. मच्छी मार्केटपासुन सोना मार्बल पर्यंत दुसरे मयुर हॉटेल पासुन सेंट्रल हॉस्पीटल पर्यंत पावसाळयात येथे अडीच तीन फुट उंचीपर्यंत पाणी भरते, याची आपणांस आठवण नाही का? मालीमाता मंदिर येथिल रस्ता मी आपल्या इंजिनिअरला नेवुन दाखविला, प्रत्येक वर्षी लोकांच्या घरात पाणी भरत आहे. मी महापौरांना निवेदन करतो की, जेथे कामाची आवश्यकता असेल तेथीलच काम मंजुर केले जावे. ज्यांच्या प्रभागात पाणी भरते, लोकांच्या घरात पाणी जाते अशा ठिकाणांचा सर्व्हे करण्यासाठी एक समिती नियुक्त करावी व जेथे आवश्यकता आहे तेथेच काम केले जावे. एवढेच बोलु इच्छितो. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सन्माननिय महापौर महोदया, जेव्हा समिती नियुक्त करण्यात आली तेव्हा हे झोपले होते, हे त्या समितीमध्ये सदस्य आहेत, कोणत्या रस्त्यांचे काम हाती घ्यायचे हे ती समिती ठरवणार आहे. यांच्या सांगण्यानुसार ते काम होणार आहे. हे त्या वेळेस आपली सूचना देवु शकतात. मला वाटते त्यावेळेस हे झोपले होते म्हणुनच आता त्यांनी ही चर्चा काढली आहे.

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :–</u>माजी आमदारांनी मंजुर केलेली ही कामे आहेत. आपण जे म्हणत आहात ते चुकीचे आहे.

यावेळी सन्माननिय सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता व श्री. राजेंद्रसिंह भुल्लर हे एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत होते हे समजून येत नव्हते.

<u>महापालिका सचिव :–</u>जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजुने ३१ मते</u>

१. श्री. गोविंदराम लुंड
२. श्रीमती शिला मनसुलकर
३. श्रीमती लिलाबाई आशान
४. श्री. भजनलाल रामचंदानी
५. श्री. दत्तात्रय पवार
६. श्रीमती निलम प्रेमसिंग रावत
७. श्री. कुमार आयलानी
८. श्री. रामचंद्र पारवानी
९. श्री. लाल पंजाबी
१०. श्री. जमनादास पुरस्वानी
११. श्री. हरेश जग्यासी
१२. श्री. धनंजय बोडारे
१३. श्रीमती विद्याताई निर्मले
१४. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
१५. श्री. रमेश चव्हाण
१६. श्री. दिलीप गायकवाड
१७. श्रीमती वसुधा बोडारे
१८. श्रीमती नेहा भोईर

१९.श्रीमती ज्योती माने
२०.श्री. शेखर यादव
२१.श्री. राजेश वानखेडे
२२.श्री. विजय सुपाळे
२३.श्रीमती जया माखिजा
२४.श्रीमती राजश्री चौधरी
२५.श्री. रामसागर यादव
२६.श्री. विनोद ठाकुर
२७.श्री. दिलीपकुमार जग्यासी
२८.श्री. बी.बी.मोरे
२९.श्री. अंकुश म्हस्के
३०.श्री.जे.के. ढोके
३१.श्रीमती सुमन शेळके

<u>महापालिका सचिव :—</u>जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात १५ मते</u>
१. श्री. तुलसीदास वसिटा
२. श्री. सुंदर मंगतानी
३. श्रीमती इंदिरा उदासी
४. श्रीमती रजनी महाडिक
५. श्री. भारत राजवानी
६. श्री. प्रभुनाथ गुप्ता
७. श्रीमती सुरेखा वेलकर
८. श्रीमती निलु चांदवानी
९. श्रीमती मंजु पोपटानी
१०.श्री. अनिल विदयार्थी
११.श्री. रविंद्र बागुल
१२.श्री. गणपत एडके
१३.श्री. सतिश चहाळ
१४.श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
१५.श्री. संजय भठिजा

<u>महापालिका सचिव :—</u>एकुण सोळा सदस्य आहेत, श्री. राजेश वदारिया वगळता प्रस्तावाच्या विरोधात पंधरा सदस्य आहेत व दोन सदस्य तटस्थ आहेत.

<u>तटस्थ सदस्य</u>
१. नरेद्र दवणे
२. श्रीमती जयश्री पाटील

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १:—** स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २०१०—११ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००९—१० चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे

<u>प्रस्तावना</u>

सन २००९—२०१० या अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न रुपये **६३२.९०** कोटी अपेक्षित होते आणि खर्च रुपये **६३२.८७** कोटी अपेक्षित होता. अर्थसंकल्पीय अंदाजप्रमाणे उत्पन्न झाले नाही त्यामूळे खर्ची कपात करणे आवश्यक असून सदर वर्षाकरिता आयुक्तांनी अर्थसंकल्पीय अंदाजात येणेप्रमाणे स्थायी समितीसमोर सुधारणा प्रस्तुत केलेली होती .

उत्पन्न : २६२.९६ कोटी
खर्च : २६२.९१ कोटी

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदीप्रमाणे आयुक्तांनी सन २०१०—२०११ करिता उत्पन्न व खर्चाचे अंदाज तयार केले असून ते स्थायी समितीसमोर खालील प्रमाणे सादर केले होते दृ

उत्पन्न : ४५३.३२ कोटी
खर्च : ५१९.२६ कोटी

वित्तीय वर्ष २०१०—२०११ चे अपेक्षित उत्पन्न व खर्च लक्षात घेता रहाणारी तुट रुपये ६५.९४ कोटी मालमत्ता कर , पाणी पट्टी , टँकर भाडे व इतर फी च्या दरामध्ये वाढ करणेचा स्वतंत्र प्रस्ताव आयुक्तांनी पुस्तीकेच्या स्वरुपात स्थायी समिती पुढे सादर केला होता .

<u>शिक्षण मंडळाचे सन २००९ — २०१० चे सुधारीत अंदाज :—</u>

शिक्षण मंडळाचे वर्ष २००८—२००९ चे खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : १७,२१,०१,०३४ /—
अंदाजपत्रकीय खर्च रुपये : १५,७३,६३,६२० /—
अखेरची शिल्लक रुपये : १,४७,३७,४१४/—

उपरोक्त अंदाजापोटी रक्कम रु. ६,७५,००,०००/— महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्यात आले होते .

<u>शिक्षण मंडळाचे सन २०१०—२०११ चे मूळ अंदाज</u> :—

प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडावयाची कार्ये व कर्तव्य लक्षात घेता, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे वर्ष २०१०—२०११ साठी खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते .

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : २६,८७,१७,००० /—**
**अंदाजपत्रकीय खर्च रुपये : २६,८७,१७,००० /—**

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रुपये ९,१६,३५,५०० शासकीय अनुदान अपेक्षित असून उर्वरित रक्कम रु. १७,५८,६६,५००/— महापालिकेकडून महापालिका वर्गणी म्हणून तरतूद करण्यात आली होती .

शिक्षण मंडळाचे सन २००९—२०१० चे सुधारित व २०१०—२०११ चे मूळ अंदाजपत्रक , आयुक्तांचे महापालिकेसाठी २००९—२०१० चे सुधारित अंदाजपत्रक व २०१०—२०११ चे जमा व खर्चाचे अंदाज , कर व दर वाढीचे प्रस्ताव तसेच प्रशासनाकडून तपशिलवार माहिती घेवून अधिनियमाचे कलम ९६ नुसार अर्थसंकल्पीय अंदाज तयार केले आहेत

<u>सन २००९—२०१० चे सुधारित अंदाजपत्रक</u> :

आयुक्तांनी २००९—२०१० करिता उत्पन्न व खर्चाचे सादर केलेले अंदाज पुढील प्रमाणे फेरफार करुन मंजूर करण्यास शिफारस करण्यात आली आहे .

(आकडे हजारात)

| पान | उत्पन्न (आयुक्तांचे | २६२९५७२ | खर्च (आयुक्तांचे | २६२९०५९ | पान |
|---|---|---|---|---|---|

| क्रमांक | अंदाज) | | अंदाज) | | क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| २९ | पाणी पुरवठा (कर) | १५००० | , नविन रस्ते बनविणे | ३०००० | २२ |
| २९ | पाणी पुरवठा (पा. पु.) | १५००० | | | |
| | एकूण | २६५९५७२ | एकूण | २६५९०५९ | |
| | अखेरची शिल्लक | | | ५१३ | |

<u>महापालिकेचे सन २०१०—२०११ चे मूळ अंदाजपत्रक</u> :

आयुक्तांनी २०१०—२०११ करिता सादर केलेले अंदाज पुढील प्रमाणे फेरफार करुन मंजूर करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

| पान क्रमांक | उत्पन्न (आयुक्तांचे अंदाज) | ४५३३१९२ | खर्च (आयुक्तांचे अंदाज) | ५१९२५५८ | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सर्व साधारण कर | ११५००० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्र.१) | १०८०० | १७ |
| ०१ | महापालिका शिक्षण कर | २२५०० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (दुर्बल घटक) | १२००० | १७ |
| ०१ | वृक्ष कर | २५०० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्र.२) | १२००० | १७ |
| ०१ | पथ कर | २७५०० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (दुर्बल घटक) | १०८०० | १७ |
| ०२ | बांधकाम परवाना व प्रिमियम | ५०००० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्र.३) | १२००० | १८ |
| ०८ | शिक्षण कर | ३७५०० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (दुर्बल घटक) | १०८०० | १८ |
| ०८ | रोजगार हमी कर | ५००० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्र.४) | १४४०० | १८ |
| ०५ | महापालिका मालमत्ता विनियोग | ११५००० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (दुर्बल घटक) | ८४०० | १८ |
| २९ | पाणी बिले वसुली (कर) | २२०००० | धर्मदायी संस्थाना अनुदान | ५०० | १८ |
| २९ | पाणी बिले वसुली (पा.पु.) | २३०००० | बायोमिथालेशन प्लांट | २००० | २१ |
| २९ | पाणी पुरवठा लाभ कर | १२५०० | नविन उदयान बनविणे | ५००० | २१ |
| २९ | मल प्रवाह सुविधा लाभ कर | ५००० | नवीन कारंजे लावणे | ५००० | २१ |
| २९ | साफ सफाई कर | २२५०० | बोट क्लब येथे सिंधु भवन बनविणे | १०००० | २१ |
| ०४ | शिक्षण करावरील सुट | ७५० | पायाभूत सुविधा निधीतून विकास | —१५००० | २३ |
| ०५ | रोजगार हमीकरावरील सुट | १०० | महापौर निधी | ५००० | २२ |
| | | | उप महापौर निधी | २५०० | २२ |
| | | | स्थायी समिती सभापती निधी | २५०० | २३ |
| | | | नगरसेवक निधी | २०४०० | २३ |
| | | | नगरसेवक निधी (दुर्बल घटक) | १४००० | २३ |
| | | | नविन रस्ते | ४०००० | २२ |
| | | | शिक्षण कर परतावा | ३७५०० | २६ |
| | | | रोजगार हमी कर परतावा | ५००० | २६ |
| | | | प्राथमिक शिक्षण | — ४०४१९ | १५ |
| | | | मराठी भवन , यु.पी. | १५००० | २१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन | | |
| | | | संत कवरराम जंक्शन सुशोभिकरण | २००० | २४ |
| | एकूण | ५३९९०४२ | एकूण | ५३९४७३९ | |
| | | | अखेरची शिल्लक | ४३०३ | |

<u>शिक्षण मंडळाचे सन २००९—२०१० चे सुधारित अंदाज</u> :——

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : १७,२१,०१,०३४ /—
अंदाजपत्रकीय खर्च रुपये : १५,७३,६३,६२० /—
अखेरची शिल्लक रुपये : १,४७,३७,४१४/—

उपरोक्त अंदाजापोटी रक्कम रु. ६,७५,००,०००/— महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्यास शिफारस करण्यात आली आहे .

<u>सन २०१०—२०११ चे मूळ अंदाज</u> :—

आयुक्तांनी २०१०—२०११ करिता शिक्षण मंडळाचे अंदाज सादर केलेले अंदाज पुढील प्रमाणे फेरफार करुन मंजूर करण्यास शिफारस करण्यात आली आहे .

| खर्च ( आयुक्तांचे अंदाज ) | १९,८४,५७,००० |
|---|---|
| शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वेतन | —१,६०,००,००० |
| शाळेचा आकस्मिक खर्च | — २,००,००० |
| निवृत्ती वेतन व उपदान खर्च | — २५,००,००० |
| खाजगी प्राथमिक शाळा अनुदान | — ५,००,००० |
| शिक्षक कल्याण निधी | — १,००,००० |
| खेळ व स्काउट मध्ये हुशार विदयार्थ्यांना शिष्यवृती पुरविणे | — ५०,००० |
| विदयार्थ्यांना व्यायामाचे व इतर साहित्य पुरविणे | —३,००,००० |
| कार्यालयीन देखभाल व खर्च | — २५,००,००० |
| नविन शाळेच्या इमारतीवरील खर्च | — १,००,००,००० |
| विदयार्थ्यांचा वैदयकीय विमा काढणे | — १०,००,००० |
| शैक्षणिक अनुदान प्राथमिक शाळांना प्रयोगशाळा व चित्रपट खर्च | — १,००,००० |
| शुध्द पाण्यासाठी ॲक्वागाड बसविणे | — ३,००, ००० |
| खेळणी साहित्य , संगणक , दुरदर्शन संच खरेदी इत्यादी | — ३,००, ००० |
| शाळेतील मुलांसाठी सुंगंधीत दुधाचे वितरण करणे | — १,००,००,००० |
| कर्मचारी व विदयार्थ्यांना छत्री व रेनकोट पुरविणे . | — ६,००,००० |
| शिपाई व पहारेकरी ठेवणे | — ४०,००,००० |
| विदयार्थी व पटसंख्या वाढविण्यास जाहिरात | — २,५०,००० |

| | |
|---|---|
| लेखन साहित्य पुरविणे . | — १०,००,००० |
| एकूण खर्च | १४,८७,५७,००० |

उपरोक्त खर्चापैकी महापालिकेचा हिस्सा म्हणून रुपये ९,००,००,०००/— अनुदान मंजूर करण्यास शिफारस करण्यात आली आहे

**१) मालमत्ता कर : प्रस्तावीत आकारणी पुढील प्रमाणे मान्य करण्यास शिफारस करण्यात आली आहे**

| कराचा तपशिल | प्रचलीत (%) | प्रस्तावीत (%) |
|---|---|---|
| पाणी पुरवठा लाभ कर | ३ | ४ |
| मल प्रवाह सुविधा लाभ कर | १ | २ |
| साफ सफाई कर | ५ | ६ |
| पथ कर | ६ | ७ |

२) पाणी पट्टी दर : प्रस्तावीत आकारणी अमान्य करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

३) पाणी टॅंकर भाडे : प्रस्तावीत आकारणी अमान्य करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

४) अग्निशमन सेवा शुल्क : प्रस्तावीत आकारणी अमान्य करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

५) वर्ष २००९—२०१० मध्ये अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा—या सेवांबाबतचा तपशिल विचारात घेवून हे अर्थसहाय महापालिकेच्या इतर उपलब्ध निधीतून कायम ठेवण्यास शिफारस करण्यात आली आहे .

६) वर्ष २००८—२००९ चे लेखा विवरण पत्र , कर्जाचा तपशिल व विविध खात्यातील शिल्लक रक्कम इत्यादीची नोंद घेण्यात आली आहे

७) पायाभूत सुविधा निधीत जमा होणारी संपूर्ण रक्कम फक्त जे. एन.एन.यु.आर.एम. योजनेतर्गत मंजूर प्रकल्पांसाठी Escrow खात्यात जमा करुन उभारलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी खर्च करणेबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यास शिफारस करण्यात आली आहे

८) नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी आकारण्यात येणारे शुल्क पुढीलप्रमाणे आकारणी करणेस शिफारस करण्यात आली आहे दृ

| तपशिल | प्रचलीत (रुपये) | मंजूर दर (रुपये) |
|---|---|---|
| जमिन विकास (घरगुती) साठी विकास शुल्क आकारणी | ३० प्रतिचौरस मिटर | ६० प्रतिचौरस मिटर (वाणिज्य वापरासाठी दुप्पट) |
| बांधकाम (घरगुती) साठी विकास शुल्क आकारणी | ४० प्रतिचौरस मिटर | ६० प्रतिचौरस मिटर (वाणिज्य वापरासाठी दुप्पट) |
| जोता पुर्णत्वाचा दाखला (२०० चौरस मीटर पेक्षा जास्त) | ५००० | १०००० |
| जोता पुर्णत्वाचा दाखला (२०० चौरस मीटर पर्यंत) | ५००० | ७५०० |
| इमारत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला / वापर परवाना (२०० चौरस मीटर पर्यंत) | ५००० | ७५०० |

महासभा ठराव क्रमांक : ९१

| | | |
|---|---|---|
| इमारत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला / वापर परवाना (२०० चौरस मीटर पेक्षा जास्त) | ५००० | १०००० |
| अभियंता / पर्यवेक्षक परवाना | ५००० | ७५०० |
| अभियंता पर्यवेक्षक नुतनीकरण | २५०० | ५००० |
| रहिवासी प्रयोजनार्थ जीना, पॅसेज व लॉबी इ. बाबींसाठी सवलतीकरिता प्रिमियम | शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलीत बाजार दराच्या १०० टक्के | शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलीत बाजार दराच्या १५० टक्के |
| वाणिज्य प्रयोजनार्थ जीना, पॅसेज व लॉबी इ. बाबींसाठी सवलतीकरिता प्रिमियम | शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलीत बाजार दराच्या २०० टक्के | शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलीत बाजार दराच्या २५० टक्के |
| बाल्कनी बंद करणेचे सवलतीकरिता प्रिमियम | ४००० | ६००० |

दिनांक : १०/३/२०१०

सुचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री. बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०० अन्वये आवश्यक असलेल्या गोष्टींच्या अधिन राहून स्थायी समितीने ठराव क्रमांक १२६ दिनांक १०/२/२०१० अन्वये महानगरपालिकेस सादर केलेल्या सन २०१०—२०११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजास, सन २००९—२०१० च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास व इतर बाबींकरिता पुढील फेरफारांच्या अधिन राहून अंतिम स्वीकृती देत आहे .

१) मालमत्ता कर : प्रस्तावीत आकारणी स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे मंजूर करीत आहे

| कराचा तपशिल | प्रचलीत (%) | प्रस्तावीत (%) |
|---|---|---|
| पाणी पुरवठा लाभ कर | ३ | ४ |
| मल प्रवाह सुविधा लाभ कर | १ | २ |
| साफ सफाई कर | ५ | ६ |
| पथ कर | ६ | ७ |

२) पाणी पट्टी दर : प्रस्तावीत आकारणी नामंजूर करीत आहे.

३) पाणी टॅकर भाडे : प्रस्तावीत आकारणी नामंजूर करीत आहे .

४) अग्निशमन सेवा शुल्क : प्रस्तावीत आकारणी नामंजूर करीत आहे .

५) वर्ष २००९—२०१० मध्ये अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा—या सेवांबाबतचा तपशिल विचारात घेवून हे अर्थसहाय महापालिकेच्या इतर उपलब्ध निधीतून कायम ठेवण्यास मंजुरी देत आहे .

६) वर्ष २००८—२००९ चे लेखा विवरण पत्र , कर्जाचा तपशिल व विविध खात्यातील शिल्लक रक्कम इत्यादीची नोंद घेण्यात येत आहे

७) पायाभूत सुविधा निधीत जमा होणारी संपूर्ण रक्कम फक्त जे. एन.एन.यु.आर.एम. योजनेतर्गत मंजूर प्रकल्पांसाठी Escrow खात्यात जमा करुन उभारलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी खर्च करणेबाबतचा प्रस्तावास राज्यशासन / पदनिर्देशित अधिकारी (जिल्हाधिकारी ठाणे ) यांचे मंजुरीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे .

८) नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी आकारण्यात येणारे शुल्क स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे आकारणी करणेस मान्यता देत आहे .

| तपशिल | प्रचलीत (रुपये) | मंजूर दर (रुपये) |
|---|---|---|
| जमिन विकास (घरगुती) साठी विकास शुल्क आकारणी | ३० प्रतिचौरस मिटर | ६० प्रतिचौरस मिटर (वाणिज्य वापरासाठी दुप्पट) |
| बांधकाम (घरगुती) साठी विकास शुल्क आकारणी | ४० प्रतिचौरस मिटर | ६० प्रतिचौरस मिटर (वाणिज्य वापरासाठी दुप्पट) |
| जोता पुर्णत्वाचा दाखला (२०० चौरस मीटर पेक्षा जास्त) | ५००० | १०००० |
| इमारत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला / वापर परवाना (२०० चौरस मीटर पेक्षा जास्त) | ५००० | १०००० |
| अभियंता / पर्यवेक्षक परवाना | ५००० | ७५०० |
| अभियंता पर्यवेक्षक नुतनीकरण | २५०० | ५००० |
| रहिवासी प्रयोजनार्थ जीना, पॅसेज व लॉबी इ. बाबींसाठी सवलतीकरिता प्रिमियम | शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलीत बाजार दराच्या १०० टक्के | शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलीत बाजार दराच्या १५० टक्के |
| वाणिज्य प्रयोजनार्थ जीना, पॅसेज व लॉबी इ. बाबींसाठी सवलतीकरिता प्रिमियम | शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलीत बाजार दराच्या २०० टक्के | शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलीत बाजार दराच्या २५० टक्के |
| बाल्कनी बंद करणेचे सवलतीकरिता प्रिमियम | ४००० | ६००० |
| जोता पुर्णत्वाचा दाखला (२०० चौरस मीटर पर्यंत) | ५००० | ७५०० |
| इमारत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला / वापर परवाना (२०० चौरस मीटर पर्यंत) | ५००० | ७५०० |

**महानगरपालिकेचे सन २००९—२०१० चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज :**

स्थायी समितीच्या शिफारसीप्रमाणे सन २०१०—२०११ करिता उत्पन्न रुपये २६५.९१ कोटी व खर्च रुपये २६५.९० कोटी खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाजास स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे अंतिम स्वीकृती देत आहे .

**महानगरपालिकेचे सन २०१०—२०११ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज :**

स्थायी समितीच्या शिफारसीप्रमाणे सन २०१०—२०११ करिता उत्पन्न रुपये ५३९.९० कोटी व खर्च रुपये ५३९.४७ कोटी खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाजास पुढील फेरफाराच्या अधिन राहून अंतिम स्वीकृती देत आहे .)

| पान क्रमांक | उत्पन्न (स्थायी समितीचे अंदाज) | ५३९९०४२ कोटी | खर्च (स्थायी समितीचे अंदाज) | ५३९४७३९ कोटी | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ३० | पाणी बीले वसुली (कर) | +१०००० | टेलीफोन , इंटरकॉम , दुरुस्ती व बसविणे | + ५०० | १२ |
| ३० | पाणी बीले वसुली (पा. पु.) | +७००० | स्मशान भूमी दुरुस्ती | +५५०० | १७ |
| | | | क्रिडा खर्च | +१००० | १९ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा प्रभाग—१ | —६०० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा ( दुर्बल घटक) प्रभाग—१ | —१५०० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा | —१६०० | १७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ( दुर्बल घटक) प्रभाग—२ | | |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा प्रभाग—३ | —५०० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा ( दुर्बल घटक) प्रभाग—३ | +४०० | १८ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा प्रभाग—४ | —१३०० | १८ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा ( दुर्बल घटक) प्रभाग—४ | +१७०० | १८ |
| | | | अग्निशमन इमारत दुरुस्ती व निगा | —६००० | १३ |
| | | | अग्निशमन इमारत बनविणे | +६००० | २० |
| | | | बायोमिथालेशन प्लांन्ट | +२५०० | २१ |
| | | | सिंधु भवन | —१०००० | २१ |
| | | | मराठी , युपी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन | —१५००० | २१ |
| | | | उल्हास भवन | +१०००० | २२ |
| | | | गलिच्छ वस्त्यात विकास कार्य | +४००० | २३ |
| | | | दुर्बल घटक वसाहतीत विकास कार्य | +४००० | २३ |
| | | | आरोग्य केंद्र | +२५०० | २४ |
| | | | नवीन रस्ते | +१५००० | २२ |
| | | | पावर पंप व पा. पु. साहित्य खरेदी व बसविणे (नविन) | +२००० | ४० |
| | | | पावर पंप व पा. पु. साहित्य खरेदी व बसविणे (दुर्बल घटक) | +१००० | ४० |
| | | | भुयारी गटार जोडणी साहित्य खरेदी व बसविणे | +२००० | ४० |
| | | ५४१६०४२ | एकूण | ५४१५३३९ | |
| | | | अखेरची शिल्लक | ७०३ | |

सदर लेखा शीर्षातून पुढील प्रमाणे विकासाचे काम हाती घेण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली आहे .

| अ. क्र. | ठिकाण | कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | साईबाबा मंदिर नाका नं. ८ ते राधास्वामी सतसंग पर्यंत सी.सी. रस्ता सदरील रस्ता शहरातील प्रमुख रस्ता आहे. शहरात प्रवेश करतांना रस्ता सुशोभित असल्यास सौंदर्य करणास नाव मिळेल. | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे, सौंदर्यीकरण करणे |
| २ | अंबरनाथ बदलापूर ते शांतीनगर रस्ता | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे १ करोड |
| ३ | प्र. क्र. ३८ मध्ये नता यादव यांच्या घरापासून दुर्गा माता मंदिरापर्यंत २ एम ५० रोड बाजूला | सी सी रस्ता बनविणे, नाला व पायवाटा बांधणे, इंटर ब्लॉक करणे. |
| ४ | प्र.क्र. ३८ मध्ये शिवाजी भवाळ यांच्या घराच्याबाजूला सोलसे यांच्या बाजुचा | सी.सी. पायवाटा व नाली बनविणे |
| ५ | प्र.क्र. २१, हिलव्हीव सोसायटी ते बेवस चौक | |
| ६ | प्र.क्र. २१, झुलेलाल मंदिर ते साई दर्शन अपार्टमेंट | |
| ७ | प्र.क्र. २१, लहोरी अपार्टमेंट ते वॉटर टॅंक एमएसडीसी बॅ.नं. २०४ | |
| ८ | प्र.क्र. १८, बस स्टॉप पासुनचा रस्ता ते महाराष्ट्र मित्र मंडळ शाळा | एम ३५० रस्ता बनविणे २५ लाख |
| ९ | प्र.क्र. १८, आशा कोल्ड्रीक्सचा रस्ता ते पोलिस स्टेशन | एम ३५० रस्ता बनविणे, १० लाख |
| १० | प्र.क्र. ६६, सेक्शन ३९, हरीओम अपार्टमेंट ते आनंदपुरी दरबार उल्हासनगर–५ एम २५० रस्ता बनविणे | |
| ११ | प्र.क्र. ६६, कैलास नगर ते गोरख धाम, उल्हासनगर–५ | |
| १२ | प्र.क्र. १३, हिल एरिया, उल्हासनगर –३ | ४५ लाख |
| १३ | उत्तम अपार्टमेंट ते महेश सोसायटी, उल्हासनगर–१ | |
| १४ | प्र.क्र. १९, राहुल नगर, बॅ. नं. १२७,१२९,१५० | |
| १५ | प्र.क्र. ३४, कामगार हॉस्पीटल ते सतनाम कॉलनी, बॅ.नं. ५२२, | पेव्हर ब्लॉक बनविणे |
| १६ | बाशाराम अपार्टमेंट ते हनुमान मंदिर पर्यंत | नाला व फुटपाथ बनविणे |
| १७ | प्र.क्र. ९, गोल्डन प्लायवुड (रमाबाई आंबेडकर नगर), ब्राम्हणपाडा ते केणीचाळ, शांतीनगर | ३५० सीसी रस्ता बनविणे |
| १८ | प्र.क्र. ९, ब्राम्हणपाडा सार्वजनिक शौचालयाजवळ | समाजमंदिर बांधणे. १० लाख |
| १९ | प्र.क्र. १३, जेठानंद अपार्टमेंट ते महादेव अपार्टमेंट रस्ता बांधणे | |
| २० | प्र.क्र. १३, स्विमिंग पुल ते कल्याण अंबरनाथ रस्ता, व्हाया दिवार ट्रान्सपोर्ट | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| २१ | प्र.क्र. १८, मोहटा देवी मंदिर ते कल्याण अंबरनाथ रस्ता | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| २२ | प्र.क्र. १४, भाटिया चेंबर, व्हाया शाप्लु पॅलेस, भावना फारमर ते मामा सोसायटी | |
| २३ | प्र.क्र. १४, रघुवंशी सोसायटी ते ते हिमांशु अपार्टमेंट, विजय हाईड स्कुल | |
| २४ | प्र.क्र. १४, सोनेसर अपार्टमेंट ते साईट नं. ५७, विशीमरन पार्क | |
| २५ | जय मल्हार मित्र मंडळ ते कलर फॅक्टरी, व्हाया शिवसेना शाखा उल्हासनगर–५ | |
| २६ | सुशील स्नेह स्कुल ते ब्लॉक ए ६९, कैलास कॉलनी, उल्हासनगर–५ | |
| २७ | प्र.क्र. ४६, रामायण नगर ते ओटी चौक | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| २८ | प्र.क्र. ५९, सुखमनी सागर ते राधाक्रिष्णा मंदिर (बॅ.क्र. १६१०) | २५० रस्ता, नाला व फुटपाथ बांधणे. |
| २९ | प्र.क्र. ५९, सतरामदास हॉस्पीटल ते स्कुल नं. १२, | २५० रस्ता व नाला बांधणे |
| ३० | प्र.क्र. ५९, बॅ.नं. १६७९ ते बॅ.नं. १६८४ | २५० रस्ता व नाला बांधणे |
| ३१ | स्वामी शांतीप्रकाश पुतळयापासून दुधनाका व्हाया सेक्शन–३९, गाऊन बाजार, उल्हासनगर–५ | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| ३२ | व्हीनस चौक ते जयधाम चौक व्हाया संभाजी चौक, उल्हासनगर–४ | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| ३३ | सुभाष टेकडी ते बुस्टरपंप व्हाया ससाणे घरापर्यंत, उल्हासनगर– ४ व ५ | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| ३४ | नेताजी चौक ते बॅ.क्र. २१०८, व्हाया जयबाबा धाम, निजधाम आश्रम उल्हासनगर–५ | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| ३५ | श्रीराम चौक, उल्हासनगर–४ | सुशोभिकरण करणे |
| ३६ | शांतीनगर स्मशानभूमी चौक, उल्हासनगर–३ | सुशोभिकरण करणे व कारंज लावणे |
| ३७ | कॅम्प नं. १ ते ५ मधील सर्व प्रमुख चौक व प्रवेशद्वार | सुशोभिकरण व किरकोळ दुरुस्ती करणे |
| ३८ | प्र.क्र. ५६, सार्वजनिक मित्र मंडळ ते ट्रान्सफॉर्मपर्यंत | सिमेंट कॉंक्रिट रस्ता बनविणे |
| ३९ | श्रीराम सिनेमाजवळ, उल्हासनगर–४ | प्रवेशद्वार बनविणे |
| ४० | हनुमान मंदिर ते लादी कारखाना, कैलास कॉलनी, उल्हासनगर–५ | |
| ४१ | धर्माजी पाटील कॉलनी ते दत्त मंदिर दुर्गापाडा, उल्हासनगर–५ | |
| ४२ | महात्मा फुले चौक ते दुनिचंद कलानी कॉलेज, उल्हासनगर–१ | |
| ४३ | प्र.क्र. १८, नवजीवन बॅंक ते बसस्टॉप, उल्हासनगर–१ | ६ लाख |
| ४४ | सोनार गल्ली ते बॅ. नं. ३२७ | पेव्हर ब्लॉक रस्ता बनविणे |
| ४५ | सोनार गल्ली ते बॅ.नं. ३१८, हासु अडवानी गार्डन | पेव्हर ब्लॉक रस्ता बनविणे |
| | | |
| ४६ | वार्ड क्र.७, गवळी पाडा, दिपक गैरेज, सचदेव नगर कॉ. हाऊसिंग सोसायटी मधील गेट पर्यंत नाला बनविणे | |

| | | |
|---|---|---|
| ४७ | शिवाजी नगर ते अयोध्यानगर, वार्ड क्र. ५२ | ५.०० |
| ४८ | ओ. टी. चौक, उल्हासनगर–४ येथिल चौकाचे सुशोभिकरण करुन विकसित करणे. | |
| ४९ | स्मशान भुमी पासून बोटक्लब पर्यंत व हडक माता चौक पर्यंत, वार्ड क्र.२८. रस्त्याचे विकास काम करणे. | |
| ५० | काजल पेट्रोल पंप चौक, वार्ड क्र.२८. येथिल चौकाचे सुशोभिकरण करणे. | |
| ५१ | उल्हासनगर–१.कमला नेहरुनगर, वार्ड क्र.२०, साईबाबा चौक ते दुबेपानवाला चौक, येथे रस्त्थ्याचे काम करणे. | २०.०० |
| ५२ | नेताजी स्कुल ते प्रभाराम मंदीर पर्यंत एम ३५० रस्ता बांधणे | ५०.०० |
| ५३ | समाज मंदीर हॉल, शिवसेना ऑफीस जवळ, बॅरेक नं. ११०. | १५.०० |
| ५४ | बस स्टॉप, उल्हासनगर–१ येथे एम ३५० रस्ता बनविणे | ५०.०० |
| ५५ | रवी हाऊसिंग एजन्सी ते कवाराम चौक, नवीन हॉस्पीटल च्या मागे एम ३५० रस्ता बनविणे | २०.०० |
| ५६ | हील व्हु ते बेवास चौक येथे एम ३५० रस्ता बनविणे | २५.०० |
| ५७ | मोरिया नगरी व्हाया कालानी सोसायटी ते लालचक्की पर्यंत सिमेंट कॉक्रिट रोड, वार्ड क्र.६० येथे सिमेंट कॉक्रीटीकरण रस्ता बनविणे | २५.०० |
| ५८ | नेताजी चौक ते मच्छी मार्केट व नेताजी चौक ते हिललाईन पोलिस स्टेशन, वार्ड क्र.६०.येथे सिमेंट कॉक्रीटीकरण रस्ता बनविणे | ५०.०० |
| ५९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते भगत वकील यांचे घरापर्यंत, वार्ड क्र.८. एम ३५० कॉक्रिटकरण करणे | २०.०० |
| ६० | कैलास कॉलनीजवळ डॉ. महेश्वरी हॉस्पीटल, सुशिला सिन्हा शाळेजवळ, उल्हासनगर–५ येथे नाली व कल्व्हर्टचे काम करणे | १०.०० |
| ६१ | उल्हासनगर–४ येथील स्मशानभुमीची दुरुस्ती करणे | १५.०० |
| ६२ | व्ही.टी.सी. क्रिडा संकुल येथे बायोगॅस प्रकल्प उभारण्यासाठी प्रस्ताव, उल्हासनगर–४ प्रकल्प कार्यान्वीत करणे | ५०.०० |
| ६३ | शांतीनगर परिसरातील सांवत बंगलापासून, भागीरथी ते गारुडीपाडा पर्यंत, उल्हासनगर–३ येथे एम –३५० सिमेंट कॉक्रिटीकरण रस्ता बनविणे | २५.०० |
| ६४ | शिवनेरी हॉस्पीटल समोरील रस्ता, उल्हासनगर–४.येथे एम –३५० सिमेंट कॉक्रिटीकरण रस्ता बनविणे | २५.०० |
| ६५ | ओ.टी. चौक, उल्हासनगर–३ व्हाया अयोध्यानगर ते उल्हासनगर स्टेशन. | ७५.०० |
| ६६ | वार्ड क्र.४७.करिश्मा सोसायटी ते सुखसागर अपार्ट. पर्यंत, रुंदीकरण करुन सिमेंट कॉक्रिटीकरण रस्ता बनविणे | |
| ६७ | फकड मंडली से डॉ. राय यांची डिसपेंन्सरी. येथे रस्ते नाली व पुल | |
| ६८ | बस स्टाप से बिरला गेट.येथे रस्ते नाली व पुल | |
| ६९ | साई कला अपार्टमेन्ट ते ब्लॉक ६३०.येथे रस्ते नाली व पुल | |
| ७० | बॅरेक १९३९ ते १९६७.येथे रस्ते नाली व पुल | |
| ७१ | बॅरेक २०५८ से २०५९ तथा बॅरेक २१०१ से २१०८. | |
| ७२ | स्वामी शांती प्रकाश हॉल ते श्री. किशन दुकान.येथे रस्ते नाली व पुल | |
| ७३ | सोनी ड्रेसेस ते बस स्टॉप पर्यंत एम ३५० रोड. एम ३५० रस्ता बनविणे | |
| ७४ | बॅरेक नं. ६७४ शांती व्हालासे साई व्दार अपार्टमेंट पर्यंत एम ३५० रोड . | |
| ७५ | धीरज टॉवर ते बॅक ऑफ बडोदा पर्यंत एम ३५० रोड . | |
| ७६ | भाजी मार्केट उल्हासगनर ४४४ गार्डन ते पिंकी अपार्टमेंट पर्यंत एम ३५० रोड. | |
| ७७ | जवारक हुसेन लाल खान घर ते पंजाबी कॉलनी रिक्शा स्टॅड पर्यंत एम ३५० रोड. | |
| ७८ | आमदार निवास (सपना गार्डन) ते सुदंरी सागर, वार्ड क्र. २६. | २०.०० |
| ७९ | गुरुव्दारा मेहनवान सिंह, वार्ड क्र.२७. | २०.०० |
| ८० | पंजाबी कॉलनी रोड ते शिवगंगा शिवसागर ते पंचायत हॉल पर्यंत एम ३५० रोड . | |
| ८१ | सेवल ठाकूर हाऊस ते बॅरेक नं. १९११ ओटी सेक्शन पर्यंत एम ३५० रोड . | |
| ८२ | झुलेलाल चौक ते हरी ओम अपार्टमेंट व्हाया अनंदपुरी दरबार, सेक्शन ३९पर्यंत एम ३५० रोड. | |
| ८३ | डॉ. आंबेडकर पुतला ते गॅस गोडाऊन का रस्ता पर्यंत एम ३५० रोड | |

| | | |
|---|---|---|
| ८४ | ब्लॉक ७०७लक्ष्मीविला ते ब्लाक ७७८श्री राम तथा नारायण जग्यासी मार्ग पर्यंत एम ३५० रोड. | |
| ८५ | स्टेशन रोड ते नंदलाल आहुजा कारखाना तक तथा नारायण जग्यासी मार्ग पर्यंत एम ३५० रोड. | |
| ८६ | साई पार्क से दशहरा मैदांन पर्यंत एम ३५० रोड. | |
| ८७ | उल्हासनगर स्टेशन ते नंदलाल फॅक्टरी पर्यंत एम ३५० रोड | |
| ८८ | बॅ.नं. १०७४ ते वडोलगाव चर्च पर्यंत, सेंट जोसेफ चर्च ब्रीजच्या जवळ पर्यंत एम ३५० रोड | |
| ८९ | न्यु सिंध फॅक्टरी ते आश सिलिकेट.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९० | नागेश्वर मंदिर ते ओ.टी. चौक.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९१ | गायकवाड पाडा ते नाका नं. ११ टॅकर रोड.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९२ | कुर्ला कॅम्प चौक ते हनुमान मंदिर.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९३ | गणेश नगर ३९ सेक्शन ते रविंद्रनगर.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९४ | मराठा सेक्शन – तळेकर यांच्या घरापासून माळकर यांच्या घरापर्यंत.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९५ | सरस्वती नगर ते काजल पेट्रोल पंप.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९६ | साई कला अपार्टमेंट.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९७ | गुरुव्दारा ते बाबासाहेब आंबेडकर चौक, उल्हासनगर.येथे रस्ते नाली व पुल | |
| ९८ | बाबासाहेब आंबेडकर चौक ते रेल्वे द्क सिडीया पर्यंत, उल्हासनगर–४. येथे रस्ते नाली व पुल | |
| ९९ | इंदिरा गांधी मार्केट ते राधा कृष्णा चौक.येथे रस्ते नाली व पुल | |
| १०० | राम मंदीर ते शहाड गावठण रिटेनिंग वाल और सौदर्यीकरण.येथे रस्ते नाली व पुल | |
| १०१ | हिरा घाट टेम्पो स्टॅन्ड ते स्मशान चौक पर्यंत.येथे रस्ते नाली व पुल | |
| १०२ | झुलेलाल चौक (गाऊन बाजार) ते हरिओम अपार्टमेंट व्हाया आनंदपुरी दरबार.येथे रस्ते नाली व पुल | |
| १०३ | बस स्टॉप कॅम्प नं. १ ते बिर्ला गेट वायडनिंग ॲण्ड कॉंक्रिटीकरण. | |
| १०४ | प्रभाग क्र. ७० मधील गुरुव्दारा ते शिवसेना शाखा, तानाजी नगर, उल्हासनगर–५. | |
| १०५ | तानाजी नगर, शिवसेना शाखा ते सेक्शन ४० पर्यंत एक २५० रस्ता. | |
| १०६ | प्रभाग क्र. ६४, कुर्ला कॅम्प रोड, उल्हासनगर ४ येथील ब्लॉक नं. ए–८९ ते ब्लॉक नं. १०१ पर्यंत एम २५० रोड. | |
| १०७ | प्रभाग क्र. ५ मधील घुले हाऊस ते मराठे हाऊय (कल्व्हर्ट) पर्यंत एम २५० रोड. | |
| १०८ | प्रभाग क्र. ७६ मधील राजेश शेलार हाऊस ते शिवसेना शाखा गायकवाड पाडा पर्यंत एम २५० रोड. | |
| १०९ | प्रभाग क्र. ६४ मधील ब्लॉक नं. १२९ ते ब्लॉक नं. १३५ पर्यंत एक २५० रस्ता. | |
| ११० | प्रभाग क्र. ७५ मधील संतोष पाटोले शॉप ते लोखंडे हाऊस पर्यंत.येथे रस्ते नाली व पुल | |
| १११ | प्रभाग क्र. ७६ अकाश किराणा स्टोअर्स ते विठ्ठल मंदिर. येथे रस्ते नाली व पुल | |
| ११२ | आंबेडकर पुतळयापासून गॅस गोडाऊन पर्यंत, आंबेडकर नगर, लालचक्की शेजारी, उ. न. ५.येथे रस्ते नाली व पुल | |
| ११३ | प्रभाग क्र. ६४ मधील कुर्ला कॅम्प ब्लॉक ३२६ ते ३५३ पर्यंत विकास आराखडयातील रस्ता. | |
| ११४ | प्रभाग क्र. ४८ मधील वाको कपांउड मधील अंतर्गत रस्ता. | |
| ११५ | बॅरेक नं. १८७६ ते बलविरसिंग गुरुव्दारा प्रभाग क्र. १७. | |
| ११६ | एकता नगर ते चोडेकर पाडा / दुर्गादेवी पाडा. | |
| ११७ | उल्हासनगर ४ येथील संभाजी चौक ते संतोष सिंग यांच्या वरवाटी पर्यंतचा ३५० चा रस्ता. | |
| ११८ | परमानंद यांच्या वरवारी पासून ते संभाजी चौक पर्यंतचा रस्ता. | |
| ११९ | दुनिचंद कॉलेज ते महात्मा फुले चौक, उल्हासनगर–१. | |
| १२० | निलकठं पॅलेस, गार्डनच्या सभोतालचा परिसर, उल्हासनगर १, एम २५० रस्ता. | |
| १२१ | सावंत बंगला ते गारुडी पाडा मार्ग राजीव गांधी चौका पर्यंत रस्ता बनविणे | ३०.०० |
| १२२ | भिमा खांडेकर यांच्या घरापासून पाण्याच्या बावडी पर्यंत असणारा मोठा नाला. | १५.०० |
| १२३ | नेताजी चौक, उल्हासनगर ५ येथे टॉवर, कारंजे (फाऊन्टन) व लहानसे गार्डन. | २५.०० |

| | | |
|---|---|---|
| १२४ | संतु बिल्डींग चौक येथे सौंदर्यीकरण करणे | १०.०० लक्ष |
| **नैसर्गिक आपत्ती निधीतून विकास कामे** | | |
| १२५ | उल्हासनगर स्टेशनजवळील पादचारी पूल. | ३५००० कोटी |
| १२६ | सि.एच.एम. कॉलेज, पादचारी पुलाच्या दिशेने संरक्षक भिंत बनविणे. | |
| १२७ | वालधुनी पूल, राजीव गांधी चौकाकडे संरक्षक भिंत बांधणे. | |
| **नविन रस्ते बांधणे** | | |
| १२८ | मिनिस्टर कॉम्प्लेक्स ते श्रीराम सिनेमापर्यंत रस्ता. | १००० कोटी |
| १२९ | राधास्वामी सतसंग ते एमएसइबी कंपाऊंड कल्याण—अंबरनाथ रोडपर्यंत रस्ता. | |
| १३० | निलकंठ मंदीर ते बसस्टॉप पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण. | |
| १३१ | शहाड ते सी ब्लॉक पर्यंत रस्ता. | |
| **विकास निधीमधून विकास कामे** | | |
| १३२ | उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयाची नविन इमारत (नुतनीकरण, विद्युतीकरण, फर्निचर). | ४००० कोटी |
| १३३ | प्रभाग समिती क्र १,२,३,४ बांधणे. | |
| **सफाई कामगार इमारत** | | |
| १३४ | सफाई कामगारांची इमारत बांधणे. | १००० कोटी |
| **झाडे/संरक्षक जाळया खरेदी करणे** | | |
| १३५ | प्रभाग समिती क्र १. | २५ लक्ष |
| १३६ | प्रभाग समिती क्र २. | २५ लक्ष |
| १३७ | प्रभाग समिती क्र ३. | २५ लक्ष |
| १३८ | प्रभाग समिती क्र ४. | २५ लक्ष |
| **कारंज्याची दुरुस्ती देखभाल (अस्तित्वातील)** | | |
| १३९ | उल्हासनगर कॅम्प क्र १ ते ५ मधील अस्तित्वातील कारंज्याची देखभाल. | ४५ लक्ष |
| **नविन कारंज्या बनविणे** | | |
| १४० | कैलाश कॉलनी चौकाजवळ. | १० लक्ष |
| १४१ | ब्लॉक चौकाजवळ. | ८ लक्ष |
| १४२ | शहाड गार्डनजवळ. | १० लक्ष |
| १४३ | नाना—नानी गार्डन. | ४ लक्ष |
| १४४ | स्मशानभुमी चौक, उल्हासनगर—३. | ८ लक्ष |
| १४५ | गुलराज टॉवरजवळ. | ५ लक्ष |
| १४६ | बसस्टॅड, उल्हासनगर—१. | २ लक्ष |
| १४७ | बालकनजीबारी. | ३ लक्ष |
| १४८ | प्रभाग क्र. ३० बॅ.नं. ९०५ येथिल गार्डन मध्ये | ८ लक्ष |
| **उद्यान बनविणे** | | |
| १४९ | वार्ड क्र. २० एमआयडीसी गार्डन. | ५ लक्ष |
| १५० | वार्ड क्र. २९ येथील आरक्षित भुखंडावर उद्यान. | २५ लक्ष |
| १५१ | लल लोही गार्डन | ५ लक्ष |
| १५२ | शोभराज गार्डन. | ५ लक्ष |
| १५३ | उल्हासनगर १ येथील डंपीग गार्उन. | ५ लक्ष |
| १५४ | एम.एस.इ.बी. समोर आणि बहरानी चौक. | ५ लक्ष |
| १५५ | प्रभाग क्र. ३०, बॅ. नं. ९०५ येथे उदयान | ७ लक्ष |
| १५६ | प्रभाग क्र. १८, शिवसेना शाखेजवळ, बॅ.नं. ११० | १० लक्ष |
| **उद्यानाची देखभाल** | | |
| १५७ | प्रभाग समिती क्र १. | १५ लक्ष |
| १५८ | प्रभाग समिती क्र २. | १५ लक्ष |
| १५९ | प्रभाग समिती क्र ३. | १५ लक्ष |
| १६० | प्रभाग समिती क्र ४. | १५ लक्ष |
| | | |
| १६१ | उल्हासनगर १ येथे निलकंठ महादेव मंदीर ते बसस्टॉप. | २०० लक्ष |
| १६२ | उल्हासनगर ४ वाको जंक्शन ते सम्राट बिस्किट. | ७५ लक्ष |
| १६३ | उल्हासनगर ४ माया आईस फॅक्टरी ते हरीसन्स पिकल प्रोडेक्ट. | ६० लक्ष |
| १६४ | उल्हासनगर ४ नागेश्वर मंदीर ते ओ.टी. सेक्शन. | १०५ लक्ष |
| १६५ | उल्हासनगर ४ चॅम्पीयन वेफर ते जंगल हॉटेल मार्गे जिजामाता गार्डन. | ५० लक्ष |
| १६६ | उल्हासनगर ४ जिजामाता गार्डन ते उल्हासनगर स्टेशन उल्हास विद्यालय. | ८८ लक्ष |
| १६७ | उल्हासनगर आकाश कॉलनी, चाळ नं. १३, लोखंडे यांचे घर. | १० लक्ष |
| १६८ | उल्हासनगर ५ कुर्लो कॅम्प ब्लॉक क्र. ९० ते १०१, कानसई रोड. | १६ लक्ष |

| | | |
|---|---|---|
| १६९ | उल्हासनगर जयजनता कॉलनी, शिवसेना ऑफीस समोर, कंपाऊड वॉल. | १२ लक्ष |
| १७० | वार्ड क्र. ७६ दुर्गापाडा येथील पांडूरंग भोईर ते काशिनाथ शेलेकर रोड. | ३४ लक्ष |
| १७१ | वार्ड क्र. ७१ येथील हनुमान मंदीर ते लादी कारखाना मार्ग चरन पटेल नगर. | ४० लक्ष |
| १७२ | वार्ड क्र. ५२ कोळगे यांचे घर ते मराठा यांचे घर ते कल्व्हर्टपर्यंत मोठा नाला. | ३० लक्ष |
| १७३ | वार्ड क्र. ५१ मध्ये बॅरेक क्र. १३४६ पासून ते साईबाबा मंदीर पर्यंत रस्ता. | २५ लक्ष |
| १७४ | उल्हासनगर ५ प्रभाग क्र. ६८ मध्ये हिरापुरी चौक ते लक्ष्मीनगर शांतीप्रकाश योगा आश्रम मार्ग रस्ता. | २० लक्ष |
| १७५ | उल्हासनगर ४ प्रभाग क्र. ४७ शिवशक्ती कॉलनी मध्ये गंगा निवास जवळ संरक्षक भिंत बांधणे. | ५ लक्ष |
| १७६ | उल्हासनगर ३ भगत कवाराम चौक ते रवि हाऊसिंग एजन्सी, नारायणदास जग्यासी हॉस्पीटल मार्गाचा रस्ता. | १५ लक्ष |
| १७७ | उल्हासनगर ३ लोकमान्य तिलक एरिया ते विसर्जन घाट ते उल्हास स्टेशन जवळ संरक्षक भिंत. | |
| | | |
| १७८ | स्वामी शांतीप्रकाश पुतळयापासून दुधनाका व्हाया सेक्शन ३९, गाऊन बाजार, उल्हासनगर ५. | ८०० लक्ष |
| १७९ | व्हिसन चौक ते जयधाम चौक व्हाया संभाजी चौक, उल्हासनगर ४. | ६०० लक्ष |
| १८० | सुभाष टेकडी ते बुस्टरपंप व्हाया ससाणे घरापर्यंत, उल्हासनगर ४ व ५. | ५०० लक्ष |
| १८१ | नेताजी चौक ते बॅ.क्र.२१०८ व्हाया जयबाबा धाम, निजधाम आश्रम उल्हासनगर ५. | ११०० लक्ष |
| १८२ | श्रीराम चौक, उल्हासनगर ४. | ४० लक्ष |
| १८३ | शांतीनगर स्मशानभुमी चौक, उल्हासनगर ३. | १५ लक्ष |
| १८४ | स्मशानभुमी चौक, उल्हासनगर ४. | १०० लक्ष |
| १८५ | कॅम्प क्र. १ ते ५ मधील सर्व प्रमुख चौक व प्रवेशव्दार सुशोभिकरण व किरकोळ दुरुस्ती. | १०० लक्ष |
| १८६ | वार्ड क्र. ५६ मधील सार्वजनिक मित्र मंडळ ते ट्रान्सफार्मरपर्यंत सिमेट कॉक्रीट रस्ता. | ८५ लक्ष |
| १८७ | श्रीराम सिनेमाजवळ प्रवेशव्दार. | २५ लक्ष |
| १८९ | उल्हासनगर ५ कैलाश कॉलनी येथे सुशिला सिन्हा शाळेजवळ साकव. | ५० लक्ष |
| १९० | उल्हासनगर ३ मधील सावंत बंगला ते राजविर गांधी चौक येथील रस्ता. | |
| १९१ | प्रभाग क्र. ८ डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते भगत वकील यांचे घरापर्यंत रोड ३५० कॉक्रीट रस्ता. | |
| १९२ | प्रभाग क्र. ६८ स्वामी त्रिलोदास उद्यानाचे विकास व सुशोभिकरण. | ५ लक्ष |

'अ' अंदाजपत्रकातील प्रभाग समिती क्रमांक —१ मधील प्रभाग क्रमांक : १, ३, ६, १४, १५, १६, १८, २०, २१, २४, २५ प्रभाग समिती क्रमांक —२ मधील प्रभाग क्रमांक : १२, १३, २२, ३०, ३३, ३४, ३५, ४१, ४३, ४४, ४६, ५४ प्रभाग क्रमांक —३ मधील प्रभाग क्रमांक ७,८,९,१०,११,४७,४८,४९,५०,५१,५२,५३,५६,५८,५९ व प्रभाग समिती क्रमांक : ४ मधील प्रभाग क्रमांक ५५, ५७, ६०, ६२, ६३, ६४, ६५, ६८, ७०, ७१, ७२, ७४, ७५, ७६ यास एकूण ५२ प्रभागात प्रत्येकी रक्कम १५,००,०००/—रुपये व उर्वरित २४ प्रभागात प्रत्येकी रक्कम १०,००,०००/— रुपये या प्रमाणे विकासाचे काम करण्यास मंजुरी देत आहे

**<u>शिक्षण मंडळाचे सन २००९—२०१० चे सुधारित व सन २०१०—२०११ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज :</u>**

महापालिका शिक्षण मंडळाचे सन २००९—२०१० चे सुधारित व सन २०१०—२०११ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजास स्थायी समितीच्या शिफारसीप्रमाणे अंतिम स्वीकृती देत आहे .

सन २०१०—२०११ मध्ये उल्लेख केलेल्या विकास कामामधुन कोणते काम प्राधान्याने घेण्याप्रयोजनार्थ महापौर, उप—महापौर, सभापती स्थायी समिती, सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व सभापती सार्वजनिक बांधकाम समिती आणि शहर अभियंता सदस्य सचिव या सर्वांची महापौर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यास मंजुरी देत आहे.

वरील सर्व बाबींच्या तरतूदीच्या प्रयोजनासाठी वरील अंदाजपत्रक छापून प्रत्येक महापालिका सदस्यास त्याची प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ७.२१ वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:—१९/३/२०१०

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/३/२०१० रोजीच्या</u>
<u>सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

११

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १९/३/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत उप—महापौर तथा पीठासनीन अधिकारी श्री. विनोद ठाकुर हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

५. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३५ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ३ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३६ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ४ | श्री. गायकवाड दिलीप | ३७ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ५ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३८ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३९ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४० | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ८ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४१ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ९ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४२ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १० | श्रीमती निर्मले विद्या विजय | ४३ | श्री. शेखर केशव यादव |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४४ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४५ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १३ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४६ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४७ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४८ | श्री. किशोर जग्यासी |
| १६ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४९ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १७ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५० | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १८ | श्री. राजू जग्यासी | ५१ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १९ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५२ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २० | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५३ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २१ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २२ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५५ | श्री. मोहन साधवाणी |
| २३ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५६ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २४ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५७ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २५ | श्री. लाल पंजाबी | ५८ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २६ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ५९ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २७ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६० | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २८ | श्रीमती शकुंतला पाटील | ६१ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २९ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६२ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३० | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६३ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३१ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६४ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३२ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६५ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३३ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | ६६ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३४ | श्री. लालबिहारी बुझारत यादव | ६७ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

मा. महापौर ——१. श्रीमती राजश्री चौधरी, सदस्य/सदस्या——२. श्रीमती निलम प्रेमसिंग रावत, ३. श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी, ४. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ५. श्री. कुमार उत्तमचंद आयलानी, ६. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम, ७. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ८. श्री. ढोके जनार्दन किसनराव, ९. श्री.एडके गणपत गोविंद, १०. श्रीमती वेलकर सुरेखा राजन, ११. कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल, १२. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, १३. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), १४.श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
२. श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
५. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. जी.टी. जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
७. श्री. माधव जवांदे, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
८. श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य
९. सौ. प्राजक्ता कुलकर्णी, प्र.जनसंपर्क अधिकारी
१०. श्री. हिबारे, स्वच्छता निरिक्षक
११. श्री. भास्कर मिरपगार, अग्निशमन अधिकारी
१२. श्री. अभिजित महामुलकर, प्रोग्रामर, नासुके
१३. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव

दुपारी ३.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u>विषय क्र. १..........

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मा. सचिव साहेब, एक मिनिट, मा. उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आता उन्हाळयाचे दिवस आहेत. मार्च महिना आहे. एवढा उकाडा होतो की येथे आम्ही बसुच शकत नाही. आणि त्यामध्ये निवडून आलेले ७६ नगरसेवक व ५ स्विकृत नगरसेवक असे ८१ नगरसेवक आणि अधिकारी, कर्मचारी मिळुन जवळ जवळ १०० च्या आसपास लोक सभागृहात बसतात. एवढया उकाडयामध्ये सभेचे कामकाज चालविणे शक्य होणार नाही. या महापालिकेतर्फे करोडो रुपयाची उलाढाल होते, जे पी आणि सोनु या ठेकेदारांना येथे ठेके दिले जातात, महापालिकेचा पैसा उधळला जातो परंतु महापालिकेतर्फे येथे एक जनरेटर आणला जात नाही. तसेच या इमारतीस लिफ्ट लावली पाहिजे. कारण की दादा गोविंदराम लुंड सारखे जे वयोवृध्द नगरसेवक आहे त्यांना जिने चढणे त्रासाचे होते. त्यातच दादा श्री. गोविंदराम लुंड हे आजारी असून त्यांना सलाईन लावली असतांना देखील आज ते या महासभेत उपस्थित राहिले आहेत अशा व्यक्तींना जर महापालिकेत काही कमी–जास्त झाले तर या महापालिकेस टाळे लावल्याशिवाय आम्ही काही सोडणार नाही. आणि म्हणुन माझी एक सूचना आहे की, याठिकाणी एकतर तुम्ही जनरेटर लावला पाहिजे व दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे या इमारतीस लिप्ट लावली पाहिजे. सर्व सन्माननिय सदस्य काही बोलत नाही म्हणुन महापालिका अधिकारी म्हणतात, चला महापालिकेचा खजाना लुटु दया, लुटु दया.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. उप–महापौरजी, मा. आयुक्त साहेब, साडे पाचशे कोटी रुपयाचे अर्थसंकल्प असलेल्या महापालिकेत दरवर्षी महापालिका इमारतीवर करोडो रुपयाचा खर्च होत असतांना ही सभागृहाची अशी दुर्दशा, उन्हाळयाचे दिवस असतांना याची दखल घेतली जात नाही. फर्निचर वर फर्निचर तयार केले जात आहे. सिलींग पडत आहे, सर्व तुटफुट होत आहे.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी /श्री.बी.बी. मोरे :–</u>मा. उप–महापौरजी आणि आयुक्त साहेब, जोपर्यंत लाईट येत नाही तोपर्यंत सभा स्थगित केली जावी.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>लाईट येत नाही तोपर्यंत महासभा होणार नाही, होणार नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>कुमारी स्पर्श खानचंदानी या मुलीच्या सत्काराचा जो ठेवण्यात आलेला आहे तो पार पाडुन सभा स्थगित केली जावी.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>नाहीतर आम्हांला लाकडी पंख आणुन दया ते आम्ही येथे फिरवत राहु.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u> सभा अर्ध्या तासासाठी स्थगित केली जावी का?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>जोपर्यंत लाईट येत नाही तोपर्यंत सभा स्थगित केली जावी.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>मा. उप–महापौरजी, दुसरी गोष्ट अशी की आजच्या या सभेत अधिका–यांची उपस्थिती सुध्दा कमी आहे. बरेचसे अधिकारी रजेवर गेले आहेत काय? सभेचे कामकाज सुरु होईपर्यंत सर्व अधिकारी सभागृहात उपस्थित असले पाहिजे. कारण की ही महासभा आहे, महासभेचा सन्मान ठेवला पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>मा. महापौरजी, आमचे असे म्हणणे आहे की, या सभेच्या कामकाजातुन प्रश्नोत्तराचा कालावधी वगळला जावा.

**उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**सांयकाळी ४.४५ वाजेपर्यंत सभेचे कामकाज स्थगित केले जात आहे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :–**ठिक आहे चला, धन्यवाद।

**सदस्य श्री. गोविंदराम लुंड :–**व लिप्टची व्यवस्था करण्याबद्दल सुध्दा बोला. सभा स्थगित करा.

**सदस्य श्री. सतिश चहाळ :–**मा. महापौरजी, जरा लक्ष दया. मागील महासभेत मी आपणांस म्हटले होते की, सभागृहात पिण्यासाठी थंड पाणी मिळत नाही. या बाबीकडे अदयाप आपण लक्ष दिले नाही. साडेपाचशे कोटीचा अर्थसंकल्प असलेल्या महापालिकेची बेईज्जत होत आहे.

**उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** ही सभा सांयकाळचे ४.४५ वाजेपर्यंत स्थगित करण्यासाठी सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

**स्थगन प्रस्ताव**

सुचकाचे नाव :–श्री.बी.बी. मोरे
अनुमोदकाचे नाव :–श्री. मोहन साधवानी

सध्या मार्च महिना असुन उन्हाळयाचे दिवस आहेत सभागृहातील विद्युत पुरवठा खंडीत असल्याने मोठया प्रमाणावर उकाडा होत आहे त्यामुळे सन्माननिय सदस्य सभागृहात बसु शकत नाहीत. सभागृहात ८१ नगरसेवक आणि अधिकारी, कर्मचारी मिळुन जवळ जवळ १०० च्या आसपास लोक बसतात. एवढया उकाडयामध्ये सभेचे कामकाज चालविणे शक्य होणार नसल्याने सभेचे कामकाज सांयकाळी ४.४५ वाजेपर्यंत स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ९१ (१)** **दिनांक:–१९/३/२०१०**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता सांयकाळी ४.४५ वाजेपर्यंत सभा स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

**सर्वानुमते**

उप–महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. विनोद ठाकुर यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

यावेळी सांयकाळी ४.४५ वाजता पुन्हा सभा सुरु करण्यात आली.

१. उप–महापौर –– श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३५ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ३ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३६ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ४ | श्री. गायकवाड दिलीप | ३७ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ५ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३८ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३९ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४० | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ८ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४१ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ९ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४२ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १० | श्रीमती निर्मले विद्या विजय | ४३ | श्री. शेखर केशव यादव |
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४४ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४५ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १३ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४६ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४७ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४८ | श्री. किशोर जग्यासी |
| १६ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४९ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १७ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५० | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १८ | श्री. राजू जग्यासी | ५१ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १९ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५२ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २० | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५३ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २१ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २२ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५५ | श्री. मोहन साधवाणी |
| २३ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५६ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २४ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५७ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २५ | श्री. लाल पंजाबी | ५८ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २६ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ५९ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २७ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६० | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २८ | श्रीमती शकुंतला पाटील | ६१ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २९ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६२ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३० | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६३ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३१ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६४ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३२ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६५ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३३ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | ६६ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३४ | श्री. लालबिहारी बुझारत यादव | ६७ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

मा. महापौर ––१. श्रीमती राजश्री चौधरी, सदस्य/सदस्या––२. श्रीमती निलम प्रेमसिंग रावत, ३. श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी, ४. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ५. श्री. कुमार उत्तमचंद आयलानी, ६. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम, ७. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ८. श्री. ढोके जनार्दन किसनराव, ९. श्री.एडके गणपत गोविंद, १०. श्रीमती वेलकर सुरेखा राजन, ११. कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल, १२. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, १३. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), १४.श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
२. श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
५. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. जी.टी. जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
७. श्री. माधव जवांदे, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग

८. श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य
९. सौ. प्राजक्ता कुलकर्णी, प्र.जनसंपर्क अधिकारी
१०. श्री. हिबारे, स्वच्छता निरिक्षक
११. श्री. भास्कर मिरपगार, अग्निशमन अधिकारी
१२. श्री. अभिजित महामुलकर, प्रोग्रामर, नासुके
१३. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सन्माननिय श्री.बी.बी. मोरे साहेब, सभेचे कामकाज सुरु करु या.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—सभेचे कामकाज सुरु करा.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—गणपुर्ती आहे काय?

महापालिका सचिव :—होय, गणपुर्ती आहे. विषय क्र. १ प्रश्नोत्तरे.........

काही सदस्य :—प्रश्नोत्तरे पुढील सभेत घेण्यात यावीत.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:—प्रश्नोत्तरे कालावधी वगळण्यास सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड
अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

प्रस्ताव

दिनांक १९/३/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेतील विषय क्र. १ वरील प्रश्नोत्तर कालावधी वगळण्यास प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ९१ (२) दिनांक : १९/३/२०१०

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १९/३/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेतील प्रश्नोत्तराचा कालावधी वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

उप—महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—प्रश्नोत्तरे पुढील सभेत घ्यायची? पुढील विषयाकडे वळण्याअगोदर काही लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या आहेत.

**लक्षवेधी सूचना क्र. १**

सुचकाचे नाव:—श्री गोविंदराम लुंड
अनुमोदकाचे नाव :— श्री. भजनलाल रामचंदानी

**विषय :—** न्यु इंग्लिश स्कुल, नेताजी चौक, उल्हासनगर—५ या इमारतीच्या अतिरिक्त मजल्याचे अनधिकृत बांधकामाबाबतची लक्षवेधी सूचना

सदस्य श्री. सतिश चहाळ :—सन्माननिय सदस्य श्री. गोविंदराम लुंड हे सभागृहात उपस्थितच नाहीत तर मग त्यांची लक्षवेधी चर्चेस कशी घेणार?

महापालिका सचिव :—कोणकोणत्या लक्षवेधी सूचना आल्या आहेत त्या प्रथम वाचुन तर दाखवु दया.

**लक्षवेधी सूचना क्र. २**

सुचकाचे नाव:— श्री. सुंदर मंगतानी
अनुमोदकाचे नाव :—श्रीमती कविता सिरवानी

**विषय :—** शहरात पाणी पुरवठा कमी दाबाने व अनियमित होत असल्याने कॅम्प नं. १,२,३ करीता व कॅम्प नं. ४

व ५ करीता स्वतंत्र जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबतची लक्षवेधी सूचना

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आयुक्त कोठे आहेत?

सदस्य श्री. सतिश चहाळ :—लक्षवेधी सूचना देणारे सदस्य सभागृहात हजरच नाहीत.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—कोण कोणत्या लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या आहेत त्या त्यांना अगोदर वाचुन तर घेवु दया.

महापालिका सचिव :— **लक्षवेधी सूचना क्र. ३**

सुचकाचे नावः— नरेंद्र दवणे

**विषय :—** सिटीएस क्र. १३०२२, शिट क्र. २८, बोटक्लब हया भुखंडावर निरनिराळे जातीय भवन बनविण्याच्या वादात न पडता तेथे भव्य गार्डन बनविण्याचा प्रस्ताव मंजुर करणेबाबत लक्षवेधी सूचना

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—सचिव साहेब, आयुक्त नाहीत, लक्षवेधी सूचनेचे उत्तर कोण देणार?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—सचिव साहेब, लक्षवेधी सूचना वाचुन दाखविण्या अगोदर मी आपले असे निदर्शनास आणुन देवु इच्छितो की, ना येथे आयुक्त आहेत ना कोणी अधिकारी आहेत, फक्त एक अधिकारी बसलेला आहे. अतिरिक्त आयुक्त नाहीत. फक्त एक अधिकारी आहे, मग ही महासभा कुणासाठी चालवायची? याला काय अर्थ आहे काय? महापौरांच्या आसनावर पीठासीन अधिकारी म्हणुन उप—महापौर बसले आहेत परंतु अधिकारी कोठे आहेत?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आयुक्तांबरोबर इतर अधिकारी कोठे आहेत?

सदस्य श्री. सतिश चहाळ :—सध्या काय आहे, माहिती आहे काय, सभागृहात नियमच चुकीचे झाले आहेत. सर्व अंधाधुंदी कारभार आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आयुक्तांना समजत नाही का? महासभा आहे ती?

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—उप—महापौरांच्या अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज चालु आहे, शांततेने लवकर पार पाडा. सर्व विषय पास, पास म्हणा.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—श्री. बागुल साहेब, असे बोलु नका, आज ते महापौरांच्या आसनावर आसनस्थ आहेत. सन्माननिय महापौर असे संबोधुन बोला.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—सचिव साहेब, अर्थसंकल्पीय सभेचे इतिवृत्त दिले नाही त्याचे काय झाले?

महापालिका सचिव :—अर्थसंकल्पीय सभेचे इतिवृत्त तयार झालेले नाही, कारण की, एकाच दिवशी दोन सभा होत्या, त्यातील एका सभेचे इतिवृत्त तयार करुन कायम करण्यासाठी आपणापुढे ठेवले आहे. दुस—या सभेचे इतिवृत्त पुढील सभेच्या सभा सूचनेबरोबर प्रस्तृत केले जाईल.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मला त्याविषयी चर्चा करायची आहे?

महापालिका सचिव :—तर मग ते इतिवृत्त आता आपण कायम कोठे करत आहोत? पुढील सभेतच आपण कायम करणार आहोत.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मार्च महिना संपत आलेला आहे, तसे तर फेब्रुवारी महिन्यातच आपणांस अर्थसंकल्प प्रस्तृत करायचा आहे. सुधारीत केले आहे नाही, कसे कळेल? येथे तर काहीच होत नाही. ते इतिवृत्त कधी कायम होईल? आणि आमचे काम कधी होईल? जे महत्वाचे इतिवृत्त आहे तेच आम्हांला मिळत नाही?

महापालिका सचिव :—आपण १० मार्च रोजी जेव्हा सभा घेतली होती, त्यानंतर पाच दिवस सुट्टी होती त्यामुळे तीन दिवसात दोन्ही सभांचे इतिवृत्त तयार होवु शकत नाही. त्यामुळे एक इतिवृत्त तयार झाले ते आपणांस दिले.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—नाही, परंतु आज आम्हांस त्यावर चर्चा करायची आहे तर मग कधी करणार? मग काय पुढील महिन्यात चर्चा करणार?

महापालिका सचिव :—आपणांस वेळ तर दयावा लागेल ना, इतिवृत्त तयार होण्यासाठी?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—फायदा काय आहे? अर्थसंकल्प पारीत करुन काही होत नाही, कुणास आदेश दिला जात नाही, कुणास पत्र दिले जात नाही, काही गोष्टी होत नाहीत. अर्थसंकल्पाची एवढी मोठी सभा आहे, त्याचे इतिवृत्त नाही.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—इतिवृत्त कायम करु नका ना, दुस—या वेळेस करु.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :</u>—नका करु ना, फायदा काय आहे? आपल्याला माहितच नाही की अर्थसंकल्प कितीचा होता, कसा पास झाला? श्री. सुरेश जाधव यांनी सूचना केल्या होत्या, आम्ही काही सांगितले होते, कधी होणार? अंमलात आणल्यानंतर? मी लोकल टॅक्स विषयी बोललो होतो, त्यावेळी महापौर, उप—महापौर व आयुक्त साहेबांनी आश्वासन दिले होते की, आम्ही ठराव करुन पाठवु, तर मग ते केले नाही केले? इतिवृत्त बघितल्यानंतर आम्ही विचारु काय? लोक आम्हांला विचारतात, अर्थसकल्प आपण पारीत केलात, मजाक केली काय? दोन दिवसानंतर सभा ठेवली असती काय फरक पडला असता? मा. महापौरजी, अर्थसंकल्पीय सभेचे आम्हांला इतिवृत्त मिळाले नाही. मला त्यावर बोलायचे आहे. केव्हा बोलणार?

<u>सदस्य श्री. गोविदराम लुंड :</u>—मा. महापौरजी, माझ्या लक्षवेधीचे काय झाले?

<u>महापालिका सचिव :</u>—लक्षवेधी क्र. ४..........

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :</u>—सचिव साहेब, माझ्या प्रश्नाचे काय उत्तर आहे? आपण लक्षवेधी वाचत चालला आहात? माझ्या प्रश्नाचे कोण उत्तर देईल? माझ्या प्रश्नाबाबत आयुक्तांचे काय उत्तर आहे? आयुक्तांचे काय उत्तर आहे? मी उत्तर मिळविण्यासाठी उभा आहे. मला उत्तर मिळाले नसतांना आपण लक्षवेधी सूचना वाचत चालले आहात. या महासभेत हे काय चालले आहे?

<u>उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :</u>—सन्माननिय सदस्य श्री. रुपचंदानीजी आपण कृपया बसून घ्या. सचिवांना लक्षवेधी सूचना वाचुन दाखवु दया. सभा झाल्यापासुन फक्त तीन दिवस कामकाजाचे होते. या तीन दिवसात इतिवृत्त तयार होवु शकत नाही.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :</u>—मा. महापौरजी, मी आपणांस विचारु इच्छितो की, अर्थसंकल्पाची महत्वपुर्ण सभा आहे. त्यांमध्ये शहराशी संबंधीत बरेचसे निर्णय घेण्यात आले होते. विशेष करुन स्थानिक करासंबंधीचा माझा जो मुद्दा होता तो आपण सर्वांनी मान्य केला होता की या विषयी पुढील महासभेत आपण ठराव पारीत करु. आज ती महासभा आलेली आहे. तर त्या स्थानिक कराबाबत आपण काय करणार आहात? स्थानिक स्वराज्य करबाबत आपण सवांनी मान्य केले होते. सभागृहात मी चर्चा केली होती, त्यास आपण सर्वांनी संमती दर्शविली होती की, पुढील महासभेत आपण ठराव पारीत करु. शासनाकडे पाठवु. तर मग तो ठराव कधी करणार एप्रिल महिन्यात? स्थानिक कर लागु झाल्यानंतर? व्यापा—यांच्या भावनांशी का खेळत आहात? सर्व व्यापारी आम्हांला विचारतात.

<u>उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :</u>—स्थानिक स्वराज्य संस्था करासंदर्भात आपण ठराव कसा पारीत करु शकतो ते कायदयानुसार जरा सांगा?

<u>सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :</u>—महानगरपालिकेने व्यापा—यांची जी भावना आहे, की आम्हांस जकात कर नको आहे, स्थानिक स्वराज्य करही नको आहे. शासनाला जर महसूलच पाहिजे असेल तर वॅट करावर सरचार्ज आकारुन महसूल गोळा करावा. जसे गुजरात मध्ये केले जात आहे. आणि ही बाब आपण सर्वांनी मान्य केली होती.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):</u>—सन्माननिय महापौर महोदय, सन्माननिय सदस्याचा प्रश्न आहे की, व्यापा—यांना जकात कर नको आहे, स्थानिक स्वराज्य संस्था करही नको आहे. याबाबत शासनाने असा निर्णय घेतला आहे की, स्थानिक स्वराज्य कर लागु करायचा आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :</u>— नाही, नाही मी आपणांस हे विचारतो की, ३१ मार्च पासुन जकात कर बंद होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था करासाठी व्यापा—यांना नोंदणी करायची आहे. आज १९ तारीख आहे. १९ दिवस निघुन गेले. हे आता स्थानिक स्वराज्य संस्था संदर्भात महानगरपालिकेची पुढील कार्यवाही काय आहे? यासाठीच मी मागील सभेत म्हटले होते की, व्यापा—यांची अशी मागणी आहे, त्यावेळी सर्व गटनेते उपस्थित होते. विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता हे सुध्दा उपस्थित होते व त्यावेळी असे ठरले होते की, शासनास आपण असे कळवु की, उल्हासनगरमधील व्यापा—यांची अशी भावना आहे की, आम्हांला जकात कर नको आहे, त्याचबरोबर स्थानिक संस्था करही नको आहे. जर शासनास महसूलच पाहिजे असेल तर जसे गुजरात मध्ये वॅटवर सरचार्ज लावुन येणारी रक्कम महापालिकेस दिला जातो. त्याप्रकारे आपण एक ठराव पारीत करुन शासनास पाठवु. हे आपण सुध्दा मान्य केले होते. त्याबाबत पुढे काय झाले? काय निर्णय झाला? जर १ एप्रिल पासुन स्थानिक कर लागु झाला तर, त्याबाबतीत महापालिकेने काय तयारी केली आहे? व्यापा—यांना बोलावले आहे काय? त्यांना सांगितले आहे काय? जर व्यापा—यांचा एवढया मोठया प्रमाणावर विरोध आहे तर याबाबतीत आपण काय केले? व्यापा—यांना हे दोन्ही कर नको आहे, त्यांच्या भावनांशी आपण का खेळत आहात?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):</u>—सन्माननिय महापौर महोदय, आता सन्माननिय सदस्य यांनी जो प्रश्न उपस्थित केला, तर त्यासाठी विशेष सभा घ्यावी लागेल, शासनाची जी भावना आहे, स्थानिक स्वराज्य कर लावु नये असा जर ठराव केलो तर शासन निर्णयाच्या विरोधी होईल.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—ठिक आहे, मी म्हणतो आपणांस करायचे नाही, आमचे जे नेते आहेत, त्यांनी म्हटले होते आम्ही हा ठराव करु. आज १९ तारीख आहे, बाकी ११ दिवस पडुन आहेत, आपण काय केलेत? आपण व्यापा—यांना सांगितले आहे का की, स्थानिक स्वराज्य संस्था कर लागु होणार आहे, त्यासाठी नोंदणी शुल्क आहे, फॉर्म भरावा लागणार आहे. आपण हे काही केले आहे?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदय, शासनाने स्थानिक संस्था करासंदर्भात प्रशिक्षण ठेवले आहे, आपल्या येथिल काही कर्मचारी प्रशिक्षणासाठी नवि मुंबई येथे गेले आहेत. शासनाचा अंतिम निर्णय अदयाप आलेला नाही. तो आल्यानंतर सर्व वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द केला जाईल.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आयुक्त साहेब, मी विचारु इच्छितो की, आपणांस शासनाने लेखी कळविले आहे, हे बरोबर आहे? अशा प्रकारचा शासन निर्णय आला आहे ना? त्यानंतर महानगरपालिकेने काय कारवाई केली आहे? व्यापा—यांना हे सांगण्यात आले आहे काय?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदय, शासनाने जो निर्णय जाहिर केला आहे तो महाराष्ट्रातील सर्व वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाला आहे आणि सर्वांना तो माहित आहे. राहिली गोष्ट दराबाबतची दर अदयाप शासनाने अंतिम केले नाहीत. त्यांना जेव्हा अंतिम स्वरुप देण्यात येईल तेव्हा वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात येईल.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आयुक्त साहेब, मी आपणांस काय विचारत आहे, आपण काय उत्तर देत आहात? आपणाकडे उपविधी आले आहेत. ते आपण प्रसिध्द केले आहेत काय? सर्वांना ते दाखविले आहेत काय? आपणाकडे जो शासन निर्णय आलेला आहे त्या व्यतिरिक्त जे उपविधी आहेत ते व्यापा—यांना आपण दाखविले आहेत काय? नागरीकांसाठी आपण जाहिर सूचना काढली आहे काय?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदय, शासनाचे जे उपविधी आहेत त्या संदर्भात सूचना व हरकती होत्या त्या गॅजेटमध्ये प्रसिध्द झाले आहेत. यासाठी सूचना व हरकती मागविल्या आहेत, सर्वांना हे माहित आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—सर्वांना हे माहित आहे ठिक आहे, आपण महापालिकेच्यावतीने काय केलेत? तर मग आपण लेखी का देता? माहित आहे हे कसे सांगता? आपण महापालिकेच्यावतीने काय केले आहे?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदय, महानगरपालिकेने हे प्रसिध्द करण्याबाबतीत शासनाचे कोणतेही निर्देश नाहीत.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—१ तारखेनंतर आपण कसे करणार? मी सांगतो, एक तारीख आली आणि स्थानिक संस्था कर लागु झाला तर आपण व्यापा—यांकडुन कशी वसुल कराल.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदय, जे नियम बनविले जातात, ते शासनाकडुन बनविले जातात. शासनच त्यांच्याबाबतीत सूचना व हरकती मागविते व अंतिम निर्णय घेते.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आयुक्त साहेब, शासन कधी पाठविणार? १९ तारीख झाली. ११ दिवस राहिले आहेत, १२ व्या दिवशी आपणांस हा कर लागु करायचा आहे. याबाबतची कार्यवाही कधी होणार? हे तर असे झाले की, चर्चा करुन निघुन जायचे, अंमलबजावणी काही करायची नाही.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सन्माननिय सदस्य श्री. बच्चारामजी, कृपया आपण ........

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—असे बोलुन निघुन जायचे येथे तर मग काय उपयोग?

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—आपण आपले प्रश्न विचारुन दोन मिनिट शांतपणे बसुन घ्या तर बरे होईल. आपले बोलणे सलगपणे चालु आहे, कुणाचे ऐकुन तर घ्या ना? आपण कुणाचे ऐकुन घेण्यास तयार नाहीत. याबाबतीत एक विशेष महासभा बोलाविली जाईल. स्थानिक स्वराज्य कराबाबत सभा घेवुन त्यावेळेस चर्चा होईल आता हा विषय नाही आहे. मेहरबानी करुन आपण बसुन घ्या.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—नाही,नाही मी काय म्हणतो कधी बोलविणार आपण सभा? आपण व्यापारी लोकांशी का खेळता? विशेष सभा कधी बोलविणार? आपण शहराशी खेळता, व्यापा—यांच्या भावनांशी खेळत आहात.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—कृपया आपण बसुन घ्या.

महापालिका सचिव :—लक्षवेधी सूचना क्र. ४

सुचकाचे नावः— नरेंद्र दवणे

**विषय :—** मा. राज्यपाल, मा. विरोधीपक्ष नेते व तारांकित प्रश्न (हिवाळी अधिवेशन २००८) चा अवमान करुन ए/ब्लॉक ३१२ ते ३१८ (डीपी रोड) रस्त्यामधील अनाधिकृत बांधकाम निष्कासित न करुन व रस्ता जनहितार्थ मोकळा न केल्याबाबत लक्षवेधी सूचना.

लक्षवेधी सूचना क्र. ५

सुचकाचे नावः— किशोर जग्यासी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वानखेडे

**विषय :—** अग्निशमन विभागाचे नेताजी चौकातील केंद्राची इमारत धोकादायक ठरवून कधी रिक्त करण्यात आली याबाबत लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सूचना क्र. ६

सुचकाचे नावः— राजेंद्रसिंह भुल्लर

**विषय :—** महापालिका प्रशासनामार्फत शहरातील साफसफाईकरीता आणण्यात आलेल्या अत्याधुनिक सफाई मशिनबाबत विरोधात लक्षवेधी सूचना

या सहा लक्षवेधी सूचना असून मा. पीठासीन अधिकारी यांनी त्या सर्वच्या सर्व रद्द केल्या आहेत.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—मा. महापौर महोदय, ती मुलगी कोठे गेली जिचा सत्कार करावयाचा होता.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—शुक्रवारी आपण सभा बोलवत जावु नका.

महापालिका सचिव :—कोणी बोलत शनिवार सभा घेवु नका, कोणी म्हणत मंगळवारी सभा बोलावु नका.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—शुक्रवार असा दिवस आहे की, ज्या दिवशी लाईट नसते. त्यात सर्वांना त्रास होतो.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—सभा रविवारी बोलवा. शुक्रवार नाही, शनिवार नाही, रविवारी बोलवा.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—यापेक्षा हे चांगले आहे की आम्ही जनरेटरची व्यवस्था करु.

सदस्य श्री.मोहन साधवानी :—मा. महापौर महोदय, जनरेटर खरेदी करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतुद करा. अदयाप अर्थसंकल्पीय विषयाचे इतिवृत्त कायम झालेले नाही. तर जनरेटर खरेदी करण्याची तरतुद त्यामध्ये करा.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:— प्रशासनाकडुन एक आयत्यावेळचा एक विषय म्हणुन पुढील प्रस्ताव प्राप्त झाला आहे. आपली मान्यता असल्यास ते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करुन घेता येतील.

**विषय** :–दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वर्ष २००९–१० करीता तयार केलेल्या प्राकलनास
मंजुरी मिळणे.

या विषयास विषय पत्रिकेवर घेण्यासाठी कुणाची काही हरकत?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–हा विषय नियमीत सभा सूचनेवर आणावा.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–श्री. जमनुजी, श्री. मोरे साहेब, विषय कोणता आहे तो बघा, वाटप करु दया. वर्ष २००९–१० करीता आहे, पुढच्या महिन्यात निधी मिळणार नाही. हा जो निधी आहे तो मार्च २००९–१० करीता आहे, मिळाला तो मिळाला पुढील महिन्यात पाठवुन काही उपयोग नाही. विषय कुठला आहे तो तरी बघा.

सदस्य श्री. राजेश वदारिया :–मा. महापौरजी, या विषयामध्ये परिशिष्ट अ,ब,क कोठे आहेत? काहीच सोबत नाही आहे?

महापालिका सचिव :–लाईट नाही आहे, झेरॉक्स काढायच्या आहेत.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–मा. महापौरजी, हे २००९–१० चे आहे. जर मार्च महिन्याच्या शेवटी नाही केले तर हे पैसे हा निधी निघुन जाईल. कुठल्याही प्रभागाचे काम असो काम झाले पाहिजे. आयत्यावेळचा विषय म्हणुन हा विषय घेणे आवश्यक आहे. नाहीतर आपला निधी परत जाईल.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–मा. सचिव साहेब, जरा यादी वाटप करा.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :–मा. महापौर व सचिव साहेब, हा दलितवस्तीचा जो गोषवारा दिलेला आहे त्यामध्ये अ,ब,क हे परिशिष्ट नाही आहे.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :–मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, जरा यादी वाटप करा.

उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–आता लाईट आल्यानंतर झेरॉक्स करुन वाटप करु.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–तुम्ही म्हणाला को–या कागदावर सहि करा मग ठराव पास करा आम्ही ते कधीही करणार नाही. लाईट नसेल तरी काय झाले? परिशिष्ट अ,ब,क हे काय आहे हे आम्हांला समजायला नको? त्यांच्याकडे आहे नाही आहे, बस्स त्यांनी फक्त लाईट नसल्याचे सांगुन दिले?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, सार्व.बांध. विभाग):–हा सन २००९–१० करीताचा दलित वस्तीसाठी जो प्रस्ताव आलेला आहे, हा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविणे आहे त्यासाठी परिशिष्ट अ मध्ये झोपडपट्टयांची यादी जी १९९८ सालच्या १७ व त्यानंतर ३ अशा २० झोपडपट्टयांची यादी आहे. परिशिष्ट ब मध्ये ४१ झोपडपट्टयांची यादी आहे, या सर्व झोपडपट्टयांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शेडयुल कास्ट लोकांच्या वस्त्या आहेत. त्यानंतर परिशिष्ट क मध्ये कामांची यादी आहे. कामांची यादी आता झेरॉक्स काढुन देण्यात येत आहे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :–मा. महापौरजी, यास विना वाचल्याशिवाय कसे मंजुर करणार?

महापालिका सचिव :–झेरॉक्स काढुन आपणांस यादी वाटप करण्यात येत आहे. हा विषय दाखल करायचा आहे की नाही हे प्रथम सांगा. हा विषय नंतर घेतला जाईल.

**<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>**मा. आयुक्त साहेब, या यादीमध्ये झोपडपट्टीचे जे प्राकलन दिलेली आहेत, त्यामध्ये काही झोपडपट्टीचे नावे लिहिलेली नाहीत. त्या यादीमध्ये काही प्रभागांची प्राकलने समाविष्ट करण्यात यावी.

**<u>महापालिका सचिव :–</u>**हा विषय सभेच्या कामकाजात समाविष्ट केला जावा काय? सर्वसंमतीने? ठिक आहे?

**<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :–</u>**आम्हांला अदयाप गोषवा–या सोबतची यादी मिळाली नसतांना आपण ठराव कसा पारीत करत आहात?

**<u>महापालिका सचिव :–</u>**थोडयाच वेळात गोषवा–या सोबतची यादी आपणांस दिली जाईल. यादीचे झेरॉक्स काढण्याचे काम चालु आहे.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>**मा. महापौरजी, आपण सभागृहास पुर्ण माहिती देत नाहीत आणि विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेतात हे कसे? हा काय प्रकार आहे? कमित कमी सभागृहास आपण माहिती तर दया ना?

**<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>**आपणांस गोषवा–यासोबतची यादी आता प्रस्तृत केली जाईल.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>**यादी प्रस्तृत केल्यानंतर आपण विषय सभेच्या कामकाजात सामावुन घ्या. सामावुन घेण्यास आम्ही कोठे नाही म्हणतो.

**<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>**मा. महापौरजी, या यादीमध्ये काही प्रभागाचे प्राकलने नाही आहेत तर कृपया करुन जे जे सदस्य त्यांच्या प्रभागातील प्राकलने देत असतील तर ती त्यामध्ये दाखल करावीत. ही नम्र विनंती.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>**आमचा विरोध नाही, परंतु आपण सभागृहास माहिती तर दया. आम्हांला वाटते काम झाले पाहिजे परंतु त्याची माहिती तर दया.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**मा. महापौरजी, विरोधी पक्ष नेताजी, दलित वस्ती ज्या प्रभागाची आहे त्या प्रभागाची यादी प्रशासनाने तयार केली आहे, तसेच ज्यास पाहिजे तो सदस्य त्यामध्ये आपले प्राकलन टाकु सुध्दा शकतो. आणि तोच गोषवारा आपणांस येथे दाखल करुन घ्यायाचा आहे की, आयत्यावेळचा हा विषय आहे, तो दाखल करुन घ्या.

**<u>महापालिका सचिव :–</u>**विषय फक्त दाखल करुन घेतला जाईल, चर्चा नंतर होईल.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>** त्यात काय काय चर्चा होईल काय नाही, विषय आताच आम्ही मंजुर करत नाही आहोत.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**आमचा सुध्दा विरोध नाही आहे, फक्त परिशिष्ट अगोदर आम्हांला प्रस्तृत करा त्यानंतर विषय सामावुन घेण्याचा आपण निर्णय घ्या.

**<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>**मा. आयुक्त साहेब, हा विषय आपण सभेच्या कामकाजात सामावुन घ्यावा. ज्या ज्या प्रभागातील कामे आहेत त्या त्या प्रभागाच्या सदस्यास विचारुन यादीस अंतिम स्वरुप दयावे.

**<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :–</u>**मा. महापौरजी, माझ्या प्रभागात ९९ टक्के दलित वस्ती आहे, आपल्या यादीमध्ये या झोपडपट्टीचे नाव नसतांना ठराव कसा पारीत करायचा?

**<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>**आपल्या प्रभागातील काम त्यात समाविष्ट केले जाईल.

**<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :–</u>**त्या यादीमध्ये माझ्या प्रभागातील काम समाविष्ट नाही.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>२००९–१० ची यादी आहे आज मार्च महिन्यातील १९ तारीख आहे तर आपण ११ महिने १९ दिवस कोठे होतात? पुर्ण वर्षात ही यादी आणली नाही? हा विषय आधी का नाही आला?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>ही लोक झोपली होती का? आता पर्यंत यांनी हा विषय का नाही आणला?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>मा. महापौरजी, जेव्हा अर्थसंकल्पाचे इतिवृत्त आपण देवु शकत नाहीत तर मग झोपडपट्टयांची जी यादी आहे त्याबाबत सांगितले जाते की यादी झेरॉक्स नाही केली.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, गलिच्छ वस्ती सभापती महोदयांना आता चार पाच महिने झालेले आहेत, त्याच जागेवर ते बसलेले आहेत, त्यांना खुर्चीवर बसुन तीन महिने झालेले आहेत, आता हे मार्च अखेर चालु आहे. हा काही महापालिकेचा निधी नाही आहे, हा शासनाचा निधी नाही आहे. शासनाचा निधी आपल्या महानगरपालिकेला मिळुन दयाचा आहे. असा दलित वस्तीच्या कामासाठी जर कोणी विरोध करत असेल तर त्याच्यावर अस्ट्रोसिटी ॲक्ट हा गुन्हा दाखल करावा. त्यामध्ये तशी तरतुद आहे की, जर दलित वस्तीच्या कामास कोण विरोध करत असेल तर त्यावर अस्ट्रोसिटी ॲक्ट हा गुन्हा दाखल करावा.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>मा. महापौरजी, यांना स्पष्ट माहित असले पाहिजे की, दलित वस्तीचा निधी हा शासनाकडुन आलेला आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मा. महापौरजी, आमचा विरोध नाही लक्षात ठेवा.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>हा विषय मार्चच्या महिन्यात गेला पाहिजे, आम्ही सुध्दा त्यास सहमत आहोत.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>आम्ही फक्त एवढेच म्हणतो की, परिशिष्ट जे आहेत त्यांची यादी दयावी.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>मा. महापौरजी, यावर मतदान घ्या. दलित वस्तीच्या कामांच्या बाबत मतदान घ्या. ज्यांचा विरोध आहे त्यांनी हात वर करावेत.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>सन्माननिय महापौर महोदय, ...........

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौरजी, हा विषय अत्यंत आवश्यक असून तो ३१ मार्चपुर्वी केला पाहिजे. आपण या विषयावर मतदान घ्या.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. महापौरजी, जर गंभीर विषय आहे तर त्याचे कागदपत्र तर दया ना? आता सांगाता गंभीर विषय आहे, मग त्याचे कागदपत्र का देत नाहीत? आमचा विरोध नाही आहे. परंत सभागृहास आपण माहिती दया.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>:ऐकुन घ्या, आपणांस यादी दिली जात आहे. कोणाचे काम राहिले असेल तर ते आपण यादी टाकुन देवु.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u> मी तेच म्हणत आहे. आमचे काम करा परंतु सभागृहास माहिती दया. आपण काय करत आहात ते?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>मा. आयुक्त साहेब, शासनाचे सरसकट आदेश आहेत, या कामाला कुणी विरोध करु नये.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>आमचा विरोध नाही आहे परंतु परिशिष्ट तुम्ही देत नाहीत. आणि आता म्हणता मतदान घ्या. असे जर तुम्ही प्रत्येक वेळेस करत राहाल तर हे बरोबर नाही आहे.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>:प्रथम प्रशासनाची ही भुमिका तुम्ही ऐकुन घ्या.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौरजी, २००२–२००७ पर्यंतचे जे सदस्य आहेत ते चर्चा करत करत तीन वेळा असा दलित वस्तीचा निधी व्यपगत झाला. आणि आज परत त्याच सदस्यांनी विरोध केला आहे. काय हे लोक २००२–२००७ चा जो कालावधी होता त्यास परत दोहरत आहेत. यासाठी माझी विनंती आहे की, आपण मतदान घ्या.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>श्री. जमनादास पुरस्वानीजी, आपण जर एवढे गंभीर असता तर आज प्रथम आपण या सभागृहास यादी दिली असती.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>श्री. मोरे साहेब, आपण दलित वस्तीचे प्रतिनिधीत्व करतात आणि मला बोलावयास लाज वाटते की, आपण विरोध करत आहात.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>श्री. धांडे साहेब, श्री. मोरे साहेब आपण बसुन घ्या.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>आपण विसरु नका आपण शेडयुल कास्ट प्रभागातुनच निवडून आला आहात. ज्या बाबासाहेबांनी कायदा दिलेला आहे त्यासच तुम्ही विरोध करत आहेत.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>श्री. धांडे साहेब, आपण बसुन घ्या.

<u>महापालिका सचिव :–</u>दाखल करायची काय?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>महापौर साहेब.............

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> आपण बसुन घ्या. यावर चर्चा नंतर करु. आयुक्त साहेब बोलत आहेत बसुन घ्या.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>सन्माननिय महापौर महोदय, हा जो दलित वस्ती सुधारणेचा निधी आहे तो केंद्रीय शासनाचा केन्द्रशासन पुरस्कृत फंड आहे त्याचा तो निधी आहे. हा राज्य सरकाराला मिळतो आणि सध्याची जी स्थिती आहे त्यात ठाणे जिल्हयासाठी जी परिस्थिती होती त्यात उल्हासनगरचा समावेश नाही. जर निधी इतर वेळेस खर्च झाला नाही तर आपलयास आयत्यावेळी असे पैसे मिळतात. म्हणुन हा प्रस्ताव आता आणलेला आहे. नऊ महिने वगैरे हा प्रस्ताव करण्याची गरज नव्हती. परंतु इतर ठिकाणी पैसे खर्च झाले नाही तर शासन ते पैसे समायोजित करते, त्याकरीता हा प्रस्ताव आपण आणलेला आहे, शासनाकडे जर शिल्लक पैसा असेल तर आपणांस तो मिळु शकेल या दृष्टीकोनातुन तो आणलेला आहे आतापर्यंत तो नव्हता.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>आम्ही सदस्य काय म्हणत आहे, तुम्ही ते परिशिष्ट सभागृहात प्रस्तृत करा ना? आम्ही या दलित वस्तीच्या या निधीच्या विरोधात नाही आहोत. तुम्ही सभागृहात यादी वाटप करा ना, तुम्ही यादी वाटप करत नाही आहात? आणि आयत्यावेळस हा विषय आणता आणि पास करा, पास करा.....

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>पाच मिनिटात तुम्हांला वाटप होईल. लाईट आता आली, पाच मिनिट बसा ना देंत आहे ना तुम्हांला.

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :–</u>मा. महापौरजी, आमच्या प्रभागातील गौतमवाडीचे का झाले तेथे ९० टक्के दलित वस्ती आहे. त्याचे तर यामध्ये नाव नाही आहे?

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>श्री. गुप्ताजी, हा विषय फक्त दाखल करायचा आहे, त्यावर चर्चा नंतर होईल.

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :–</u> दाखल करा ना.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>श्री. गुप्ताजी ज्याचे राहिले आहे त्याचे आम्ही यादीत काम दाखल करु ना?

<u>महापालिका सचिव :–</u>हा फक्त विषयपत्रिकेवर दाखल करण्यासाठी आहे, चर्चेचा विषय नाही आहे. चर्चा नंतर होईल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>श्री. गुप्ताजी आपणांस माहित आहे का आपला विषय आहे की नाही? एका बाजुला बोलतात आम्हांला माहित नाही, एका बाजुला बोलतात आमचा विषय नाही आहे? आपण विरोधी पक्ष नेता आहात चांगल्याप्रकारे बोला. मा. महापौर महोदय, यादी देत आहोत त्या यादीच्या आधारावर हा विषय दाखल करुन घेवु या. हे जर यांना मंजुर नसेल तर मतदान घ्या.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. महापौरजी,......

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>हे फक्त दाखल करायचे आहे, दाखल केल्यानंतर तुम्ही चर्चा नंतर घ्या ना.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>सर्वात प्रथम परिशिष्ट अ,ब व क दया नंतर त्यास मंजुरी दयाची की नाही ते नंतर बघु.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>मतदान घ्यायचे काय? दाखल करा, दाखल करा.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>मा. महापौरजी, दाखल करुन घ्या. दलित वस्तीच्या कामाविरुध्द आम्ही नाही आहोत.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>विषय दाखल करण्यात येत आहे. कृपया जरा लक्ष दया. ५ मिनिट सर्वांनी जरा लक्ष दया.

<u>महापालिका सचिव :–</u>आपल्या मध्ये एक लहानशी बालिका जी महान कलाकार बनली आहे. कु. स्पर्श खानचंदानी जी इयत्ता ४ थी मध्ये शिकत आहे. आणि तिचे वय फक्त ९ वर्ष आहे. या सभागृहात उल्हासनगर महापालिकेच्यावतीने मा. महापौर महोदयांनी व मा. आयुक्त साहेबांनी सन्मानित करण्यासाठी तिस येथे बोलाविले आहे व ती येथे सभागृहात उपस्थित आहे. मी तिला निवेदन करतो की तीने व्यासपीठावर यावे. तिने आपल्या कलेचे असे शिखर गाठले आहे की, ज्याचा कोणी उल्लेख करतांना कोणी थकु शकणार नाही. ही जी मुलगी आहे हिने

१. कलर्स या वाहिनीवरील ''उतरण''या मालिकेत 'इच्छा' म्हणुन केलेली भुमिका पार पाडलेली आहे. या भुमीकेमुळे तीची बरीचशी प्रशंसा झाली व तिला बरीचशी पारीतोषीके सुध्दा मिळालेली आहेत. या मुलीने दुरदर्शनवरील कोणकोणत्या वाहिनीवरील कोणकोणत्या कार्यक्रमात काम केले आहे ते मी आपणांस सांगु इच्छितो. १. कलर्स या वाहिनीवरील ''उतरण''या मालिकेत 'इच्छा' म्हणुन केलेली भुमिका

१४. दिग्दर्शक श्री. अनंत महादेवन यांच्या ''रेड अलर्ट'' या हिंदी चित्रपटात अभिनेता सुनिल शेट्टी, नसुरुद्दीन शहा, भाग्यश्री यांच्या बरोबर सहकलाकार म्हणुन केलेली भुमिका

१५. सोनी या वाहिनीवरील ''सीआयडी'' या मालिकेत मुक–बधिर मुलीची केलेली भुमिका

१६. झी या वाहिनीवरील ''श्री'' या मालिकेत नवेली या पात्राद्वारे केलेली भुमिका

१७. स्टार वन या वाहिनीवरील '' दिल मिल गये'' या मालिकेत स्पॉईल चाईल्ड म्हणुन केलेली भुमिका

१८. सोनी या वाहिनीवरील ''कॉमेडी सर्कस'' या मालिकेत मुलांसाठी खास कार्यक्रमात केलेली भुमिका

१९. सोनी या वाहिनीवरील ''किंग का तडका'' या विनोदी सर्कसमध्ये केलेली भुमिका

२०. स्टार वन या वाहिनीवरील ख्रिसमससाठी आयोजित केलेल्या ''लाफ्टर के फटके'' या विशेष कार्यक्रमात केलेली भुमिका

२१. भारत सरकारच्यावतीने ''विज वाचवा'' असा संदेश देणा–या दुरदर्शनवरील जाहिरातीत केलेली भुमिका

२२. सोनी या वाहिनीवरील ''इंडियन टेली ॲवार्ड डान्स नंबर्समध्ये घेतलेला सहभाग आणि केलेली भुमिका

२३. कलर या वाहिनीवरील गणेश उत्सवाच्या वेळी ''नृत्य'' कार्यक्रमात घेतलेला सहभाग आणि केलेला अभिनय

२४.कलर या वाहिनवरील '' शुभ मंगलम २०१०''      मध्ये घेतलेला सहभाग आणि केलेली भुमिका
२५.दिग्दर्शक श्री. महेश भट्ट यांनी विश्वेस पिक्चर या हिंदी चित्रपट ''कजरा रे'' मध्ये केलेली भुमिका
२६.सोनी या वाहिनीवरील ''आहट हॉरर'' या मालिकेत केलेली भुमिका
२७.सोनी या वाहिनीवरील नृत्य कार्यक्रमात सहभाग घेवून मिळविलेले ''सीआयडी गॅलेंट्री अॅवार्ड''
२८.कलर या वाहिनीवरील ''होली रे'' या कार्यक्रमात सहभाग घेवुन केलेले नृत्य
२९.सोनी या वाहिनीवरील कार्यक्रमात सहभाग घेवून मिळविलेले ''जीआरएस वुमन अॅचीवर्ड अवॉर्ड २०१०''

## पारितोषिके

### पारितोषिकांसाठी दाखल केलेले नामनिर्देशन

१. न्यु टॅलेंट अॅवार्ड
२. इंडियन टेलि अॅवार्ड
३. आयटीए अॅवार्ड

## मिळालेली पारितोषिके

१. इंडियन टेलिव्हिन अॅकेडेमी यांच्यामार्फत श्रीमती अरुणा ईराणी यांच्या हस्ते दिनांक २६/२/२०१० रोजी आयटीसी मुंबई येथे देण्यात आलेला जी. आर. ८, यंग वुमन अॅचीवड अॅवार्ड २०१०
२. सीरी फोर्ट अॅडीटेरियम, नवी दिल्ली येथे दिनांक १९/६/२००९ रोजी देण्यात आलेले एज्युकेशनड अॅण्ड टॅलेंट अॅवार्ड २००९
३. दिनांक १५/८/२००९ रोजीच्या प्रजासत्ताक दिनी लायन्स क्लब इंटरनेशनल डिस्ट्रीट, कलकत्ता यांच्याकडुन देण्यात आलेले गौरव चिन्ह
४. रोटरी क्लब, उल्हासनगर यांच्याकडुन देण्यात आलेले व्होकेशनल अॅक्सलेन्स अॅवार्ड २००९–१०
५. रोटरी क्लब, उल्हासनगर (पुर्व) यांच्याकडुन अभिनयासाठी देण्यात आलेले अॅक्शेलेन्स अॅवार्ड २००९–१०
६. ऑल इंडिया सिंधी पंचायत फेडरेशन व इंटरनेशनल सिंधी पंचायत फेडरेशन, मुंबई यांच्याकडुन देण्यात आलेला झुलेलाल अॅवार्ड
७. मुंबई येथे सिएमॅक डवर डान्स अॅकेडमी यांच्याबरोबर हिंदुस्तान टाईम्स या वृत्तपत्राने आयोजित केलेल्या स्मार्ट किंड्स डान्स कॉम्पीटीशनमध्ये संपादित केलेले यश
८. दुरदर्शनने आयोजित केलेल्या सोलो डान्स कॉम्पीटीशनमध्ये सहभागी होवून सर्व फे–या यशस्वीपणे पार पाडुन अंतिम फेरीत दिलेली धडक

---

१. सन २००७–०८ मध्ये इयत्ता २ री मध्ये शिकत असतांना शैक्षणीक व इतर सर्व कार्यक्रमामध्ये सहभाग घेतल्याबद्दल केंद्रीय विदयालय (सीबीएससी बोर्ड) यांच्याकडुन बेस्ट स्टुडंट म्हणुन मिळालेले पारितोषीक
२. सन २००८–०९ मध्ये इयत्ता ३ री मध्ये शिकत असतांना शैक्षणीक व इतर सर्व कार्यक्रमामध्ये सहभाग घेतल्याबद्दल केंद्रीय विदयालय (सीबीएससी बोर्ड) यांच्याकडुन चमकता तारा म्हणुन मिळालेले अॅवार्ड

---

१. भरत नाटयम या नृत्यप्रकाराची पहिली आणि दुसरी परिक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण केली
२. माउंट आबू येथे प्रजापिता ब्रम्हकुमारीज विश्वविदयालयच्या इंटरनेशनल पिस कॉन्फरन्स मध्ये केलेले नृत्य
३. जवळ जवळ १०० कार्यक्रमांमध्ये घेतलेला सहभाग

श्री. संतोष लोणे, यांच्या कार्यक्रमाची क्लिप दाखवा. कृपया प्रोजेक्टरकडे लक्ष दया. यांनी उतरण या मालिकेत जे काम केले आहे तसेच सोनी या वाहिनीवरील कार्यक्रमात जे अॅवार्ड मिळाले होते त्याची दृश्य आपण पहा.

ही जी मुलगी आहे ही उल्हासनगरची चमकता तारा आहे. व आज या सभागृहात मा. पीठासीन अधिकारी यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात येईल व तीला प्रमाणपत्र देण्यात येईल यानंतर ज्या कुणास तिचे अभिनंदन करायचे असेल ते स्वतंत्रपणे तिचे अभिनंदन करु शकतात. यानंतर ही मुलगी आभार प्रदर्शनाद्वारे आपले मनोगत व्यक्त करणार.

या मुलीस भाजपा गटाच्या वतीने ११ हजार रुपयाचे पारीतोषीक देण्यात येत आहे.
भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस गटाच्या वतीने अडीच हजार रुपयाचे पारितोषीक देण्यात येत आहे.
श्री. दिलीप जग्यासी यांच्यावतीने १००० हजार रुपयाचे पारितोषीक देण्यात येत आहे.
श्री. गोविंदराम लुंड यांच्यावतीने ५०० रुपयाचे पारितोषीक देण्यात येत आहे.
श्रीमती लिलाबाई आशान यांच्यावतीने ५०० रुपयाचे पारितोषीक देण्यात येत आहे.
शिवसेना पक्षाच्या वतीने १५ हजार रुपयाचे पारितोषिक देण्यात येत आहे.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—मा. महापौरजी, कु. स्पर्श हीने दोन शब्द बोलण्याअगोदर तिच्या अगोदर तिच्यासाठी एक शब्द मी बोलु इच्छितो. स्पर्श माझ्या घरची मुलगी आहे यासाठी तिच्याबद्दल दोन शब्द मी बोलु इच्छितो. उल्हासनगरमध्ये राहणारा एक साधासा परिवार जीचे वडिल ऑर्डीनन्स फॅक्टरीमध्ये अधिकारी आहे. जीची आई सरिता खानचंदानी ही व्यवसायाने प्राध्यापिका आहे. त्यांच्या घरची ही सुपुत्री ज्या सुपुत्रीने जगभरात एक बाल कलाकार म्हणुन आपले नावलौकिक केले आहे. उल्हासनगरमधील त्या मुलीचा उल्हासनगर महापालिकेच्यावतीने या सभागृहात सत्कार करुन एक अनोखे कार्य आपण करत आहोत. व मला असा एक विश्वास आहे की, कु. स्पर्शने या सभागृहात व उप—महापौरांच्या खुर्चीस स्पर्श केल्याने आपल्यात एक पॉझीटीव्ह असा प्रवाह वाहेल. तसेच अधिकारी व नगरसेवक मिळुन या शहराचे एक चांगले काम करु. जसे कु. स्पर्श हीने एवढया लहान वयात किर्ती प्राप्त करुन घेतली आहे त्याप्रमाणे आम्ही या शहरासाठी किर्ती प्राप्त करु. मी कु. स्पर्श खानचंदानी हीस अभिनंदन देतो तसेच तिच्या आई—वडिलांना अशा गौरव प्रसंगी हार्दिक अभिनंदन देतो. धन्यवाद।

कु. स्पर्श खानचंदानी :—आभारी आहे.

महापालिका सचिव :—कु. स्पर्श खानचंदानी हीस हॉलिवुड फिल्मसाठी सुध्दा आमंत्रित केले आहे.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—उल्हासनगरमधील सर्व महिलांतर्फे या छोटया महिलेस हार्दिक हार्दिक अभिनंदन.

कु. स्पर्श खानचंदानी :—आभारी आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी:—मा. महापौरजी, कु. स्पर्श खानचंदानी या मुलीने फक्त आपल्या समाजाचेच नाहीतर संपुर्ण उल्हासनगरची मान वर केली आहे. एवढया लहान वयात ही मुलगी एवढया मोठया उंचावर पोहचली आहे. मी संपुर्ण उल्हासनगर शहराच्यावतीने व या सभागृहात जेवढे सन्माननिय सदस्य बसलेले आहेत त्यांच्यातर्फे या मुलीस मी हार्दिक अभिनंदन करतो. व एवढा मोठा आर्शिवाद देतो की ही मुलगी फार पुढे जावुन प्रगती करो. व एवढी पुढे जावो की या मुलीचे पुन्हा एकदा या सभागृहात सन्मान होवो धन्यवाद।

कु. स्पर्श खानचंदानी :—आभारी आहे.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—मा. महापौरजी, कु. स्पर्श खानचंदानी हीचा महापालिकेतर्फे जो सत्कार झालेला आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—त्या मुलीस बोलु दया. बालकलाकाराला बोलु दया जरा.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—ज्या मातेने व पित्याने तीस जन्म दिला आहे की तिला एवढया पुढे आणले आहे त्या माता व पित्यास मी धन्यवाद देतो. जसा शिक्षकाचा मुलगा किंवा मुलगी शिक्षक होते तसे यांची मुलगी ही पुढे आली आहे त्यांनी या मुलीस पुढे आणले आहे, त्या माता, पित्यास धन्यवाद। व या मुलीस आमच्या आरपीआय पक्षाच्यावतीने व महाराष्ट्र शाखेच्यावतीने भरपुर अभिनंदन करतो.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—मा. महापौरजी..............

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—श्री. मोहन साधवानीजी, त्या मुलीस बोलु दया. आपण तर नेहमीच बोलतो.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>फिल्म मध्ये व सिरीयलमध्ये काम करणे म्हणजे या लहान वयात फार मोठी कला आहे. मी या मुलीस असा आर्शिवाद देतो की, पुढे जावुन ही मुलगी असेच पारितोषीके मिळवित राहो. तसेच संपुर्ण उल्हासनगर शहराचे व सिंधी समाजाचे नावलौकिक करो. धन्यवाद।

<u>कु. स्पर्श खानचंदानी :–</u>आभारी आहे.

<u>उप–महापौर :–</u>जरा दोन मिनिटे शांती राखा.

<u>सदस्य श्री. गोविंदराम लुंड:–</u>त्या मुलीस बोलु दिले जावे.

<u>कु. स्पर्श खानचंदानी :–</u>मी उभी राहून बोलते. नमस्कार, मी अभिनेत्री कु. स्पर्श पुरुषोत्तम खानचंदानी येथे उपस्थित असलेले सर्व पाहुणे व स्त्रोतागणांचे हार्दिक स्वागत करते. सर्वप्रथम मी या कार्यक्रमाच्या आयोजकास धन्यवाद देते, ज्यांनी या सुंदर मनोरम कार्यक्रमाचे आयोजन केले. व माझ्या प्रतिमेस आपणा सर्वांसमोर सादर करण्याची संधी दिली. असे म्हणतात की, लेखणीमध्ये तलवाराच्या बरोबर लढण्याची क्षमता आहे, या लेखणीने कविता लिहिली जाते व चांगल्या–वाईट गोष्टीसुध्दा तर चला मी आज आपणांस अशीच काही कविता ऐकविते जी आपल्या झोपलेल्या अंर्तमनास जोर देईल. व जीवनातील प्रत्येक उतार–चढावास लढण्याची क्षमता देईल. ''मंदिर मज्जीद गिरजा घराने, मंदिर मज्जीद गिरजा घराने, मंदिर मज्जीद गिरजा घराने वाटुन घेतले देवाला, भुमी वाटली, समुद्र वाटला, नका वाटु माणसाला. भुमी वाटली, समुद्र वाटला, नका वाटु माणसाला'' ''मंदिर मज्जीद गिरजा घराने, मंदिर मज्जीद गिरजा घराने, मंदिर मज्जीद गिरजा घराने वाटुन घेतले देवाला, भुमी वाटली, समुद्र वाटला, नका वाटु माणसाला. भुमी वाटली, समुद्र वाटला, नका वाटु माणसाला, नका वाटु माणसाला, आता रस्ता तर चालु झाला आहे, आता रस्ता तर चालु झाला आहे, मंजील बसली फार दुर आहे. उजेड बंगल्यामध्ये बंद आहे, उजेड बंगल्यामध्ये बंद आहे, प्रत्येक दिवा मजबुर आहे. मिळाला नाही सुर्याचा संदेश, मिळाला नाही सुर्याचा संदेश, प्रत्येक घाट व मैदानास, भुमी वाटली, समुद्र वाटला, नका वाटु ............

<u>काही सदस्य :–</u>माणसाला.....

<u>कु. स्पर्श खानचंदानी :–</u>नका वाटु........

<u>काही सदस्य :–</u>माणसाला.....

<u>कु. स्पर्श खानचंदानी :–</u>आभारी आहे.

यावेळी सर्व सदस्यांनी टाळया वाजविल्या.

<u>महापालिका सचिव :–</u>आभारी आहे, कु. स्पर्श खानचंदानी.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u>कु. स्पर्श खानचंदानी यांच्या अभिनंदनासाठी पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

<u>अभिनंदन प्रस्ताव</u>

उल्हासनगर–४ येथे राहणारी एका सामान्य कुटुंबातील इयत्ता ४ थी मध्ये शिकत असलेली एक ९ वर्षाची मुलगी कु. स्पर्श खानचंदानी या मुलीने एवढया लहान वयात फार मोठे यश प्राप्त केले आहे. तिने विविध वाहिन्यांवर आपली प्रतिमा झळकवली आहे. तसेच कलर्स वाहीनीवरील उतरण या मालिकेत इच्छा म्हणुन केलेली भुमिका फार गाजली आहे. या मुलीने विविध पारितोषीके मिळविलेले आहेत. या मुलीने भारतरत्न पहिला आणि दुसरी परिक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण केली आहे. सन २००७–०८ मध्ये इयत्ता २ री मध्ये शिकत असतांना शैक्षणीक व इतर सर्व कार्यक्रमामध्ये सहभाग घेतल्याबद्दल केंद्रीय विदयालय (सीबीएससी बोर्ड) यांच्याकडुन बेस्ट स्टुडंट म्हणुन मिळालेले पारितोषीक मिळविले आहे. सन २००८–०९ मध्ये इयत्ता ३

री मध्ये शिकत असतांना शैक्षणीक व इतर सर्व कार्यक्रमामध्ये सहभाग घेतल्याबद्दल केंद्रीय विदयालय (सीबीएससी बोर्ड) यांच्याकडुन राईजींग स्टार म्हणुन मिळालेले ॲवार्ड मिळविले आहे.

या लहान वयामध्ये या मुलीने १०० विविध कार्यक्रमात भाग घेतलेला आहे. एवढया लहान वयात एवढे मोठे यश संपादन केल्याने या मुलीस महापालिकेचे स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देवुन अभिनंदन करण्यास प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ९१ (३) दिनांक :— १९/३/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी
अनुमोदकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा कु. स्पर्श खानचंदानी या बालकलाकराचे महापालिकेचे स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देवुन अभिनंदन करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—असे भाषण करावयास शिका.

महापालिका सचिव :—आता आपल्या विषयाकडे वळु या. विषय क्र. २.......

सदस्य श्री. सुरेश जाधव :—मा. सचिव साहेब, आयुक्त साहेब, एक मिनिट, मी पुढील विषयाकडे वळण्याअगोदर एक सूचना देवु इच्छितो. उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे जागतिक पाणी दिन शिबीर आयोजित केलेले आहे, तरी सर्व सदस्यांना मी विनंती करतो व आग्रहाचे आंमत्रण देतो की २२ तारखेला संध्याकाळी ४.०० वाजता टाउन हॉलमध्ये पाणी दिनानिमीत्त एक शिबीर ठेवले आहे, सर्व पत्रकार बंधु, सर्व सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांना निमंत्रण देत आहे, कृपया याची नोंद घ्यावी. धन्यवाद।

महापालिका सचिव:—ठिक आहे?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सचिव साहेब, सभा सुरु होण्यापुर्वी मागील वेळेस आमचे सन्माननिय सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी काही अनाधिकृत नगररचना विभागाने जे प्लॅान पास केले होते ते स्वत: नगररचनाकारांनी सांगितले होंते की हे चुकीचे प्लान आहेत त्यानंतर एवढी मेहनत करुन आमचे श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी त्याबाबतची यादी एवढे प्रयत्न करुन आणली त्यानंतर चर्चा झालीच नाही त्याचे काय झाले? कुठपर्यंत कारवाई पोहोचलेली आहे, जे प्लान झाले होते ते बंद केले की नाही? जी साईट चालु होती ती बंद झाली की नाही, तो विषय दबला गेला आहे. श्री. महाराज भुल्लर यांनी किती प्रयत्न केला होता, अशा ७,८ काय १५,२० संचिका आणल्या होत्या, एवढा मोठा अभ्यास करुन या सभागृहास पुर्ण जागृती दिली होती, या शहरास दाखविले होते की, किती मोठा भ्रष्टाचार झाला, त्याचे काय झाले जरा खुलासा करणार काय? मा. आयुक्त साहेब, याचा जरा आपण खुलासा करणार काय? नगररचनाकार कुठपर्यंत पोहचले आहेत? त्यांनी कारवाई केली काय? त्यांनी आश्वासन दिले होते की, लवकरात लवकर त्या साईड बंद करण्यात येणार आहेत. श्री. महाराज भुल्लर यांच्या विषयाला काही उत्तर आहे की नाही? कुठपर्यंत आले आहे?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौरजी, सदरची श्री. भुल्लर महाराज यांची लक्षवेधी होती, त्याबाबत सहा. संचालक यांनी चौकशी केलेली आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>आवाज ऐकु येत नाही साहेब.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सहा. संचालक यांनी चौकशी केलेली आहे. चौकशीचा अहवाल तयार होता परंतु विद्युत पुरवठा बंद झाल्यामुळे ते सभागृहास देता आले नाही. पुढच्या सभेत तो विषय ठेवु आपण.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>ती कामे त्वरीत बंद केलेली आहेत काय?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>जी कामे नियमानुसारची नव्हती ती कामे बंद करण्यात आलीत.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>ठिक आहे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. महापौरजी, यांनी जेव्हा सांगितले की, प्लानची चौकशी होईल तेव्हापासुन नगररचनाकार रजेवर गेले आहेत. त्याची माहिती दया की ते केव्हापासुन रजेवर गेलेले आहेत? व याची चौकशी कोण करु शकतो? नगररचनाकार स्वत:ची चौकशी करु शकतो काय? नगररचनाकार यांनी स्वत: सभागृहात कबुली दिली की माझ्याकडुन चुक झाली आहे व मी त्याची चौकशी करतो. तर नगररचनाकार हे स्वत:ची चौकशी स्वत: करत आहेत की दुसरे कोणी? हा अधिकार कुणाचा आहे?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>ती चौकशी सहा. संचालक करत आहेत.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>सहा. संचालक कोठे आहेत? ते सुध्दा येथे नाहीत? ते आता कोठे गेले?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सहा. आयुक्त कल्याण येथे गेले आहेत. त्यांना कल्याणचा सुध्दा कार्यभार आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>त्यांना माहित आहे, आज महासभा आहे, त्यांना आज येथे विचारणार आहेत तर मग ते कल्याण येथे कसे गेले? त्यांना हे माहित नव्हते काय की आज महासभा आहे म्हणुन? महासभेचे त्यांना एवढे महत्व वाटत नाही काय?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>ते महासभेत उपस्थित होते.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>हे निघुन गेलेत, नगररचनाकार कोठे प्लान पास करतात? घरात बसुन?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. आयुक्त साहेब, एमआरटीपी ॲक्टमध्ये आपला सुध्दा एक अधिकार आहे, ज्या प्लानविषयी तक्रार आलेली आहे, आपण स्वत: जावुन प्लानबद्दल चौकशी करु शकता. आपण असा कुठलाही एक प्लान तपासला आहे काय? ते सुध्दा उत्तर दया. नगररचनाकार नाही आहे तरी चालेल आपण उत्तर दया. आपला जो अधिकार आहे त्याचा आपण कधी वापर केला आहे काय? आपण एक सुध्दा क्षेत्राची जावुन तपासणी केली आहे काय? तेथे भेट दिली आहे काय? याचे उत्तर दया.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>प्लानबद्दल सात संचिका होत्या, ते बोगस प्लान होते सनदेच्या जागेवर ते प्लान पास झाले होते, त्या साईट बंद करण्यात आल्या आहेत काय? आम्ही ज्यावेळेस शहरात फिरतो त्यावेळेस आम्हांला असे दिसते की त्या साईट चालु आहेत.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>दोन मिनिटे, श्री. धांडे साहेब, त्या ७ नाहीत, ११ संचिका होत्या. ११ संचिकेमध्ये ४ वजा केल्या.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>३ वजा केल्या होत्या बाकीच्या ७ संचिका होत्या.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>नाही पण ११ संचिका होत्या.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>एकुण १२ संचिका आहेत. जोपर्यंत त्यांच्याविषयीचा अहवाल सादर केला जात नाही तोपर्यंत बांधकाम स्थगित केले पाहिजे. आपला अहवाल आला पाहिजे त्यावर चर्चा झाली पाहिजे. दुनिचंद कालानीचे एवढया मोठया प्रमाणावर काम चालु आहे, त्याबाबतीत मी परवाच आपणांस सांगितलेले आहे. परवाच आपणांस सांगितले आहे आपण म्हणालात की त्याबाबत स्थगिती आदेश आहेत. हे काम मुख्य रस्त्यावर आहे. बाकीचे बांधकामे तर ब—याच आतमध्ये आहेत. ती तर कोणी जावुन पाहुही शकत नाही. आम्ही पाहावयास गेलो तर आमच्यावर काहीतरी आरोप लावला जाईल. यासाठी मी आपणांस विचारु इच्छितो की आपण त्या बांधकामाचे पंचनामे केले आहेत काय? कोणती साईट कुठे आहे? कोणती साईट कुठे आहे? याची माहिती आहे का? पंचनामा झाला आहे काय? महासभेनंतर आपण जेव्हा स्थगिती आदेश दिला, स्थगिती आदेश देण्याअगोदर त्या बारा जागांचा पंचनामा झाला आहे काय? सध्यस्थिती काय आहे?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदया, जी लक्षवेधी सूचना होती.....

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>लक्षवेधी सूचना नव्हती स्थगन प्रस्ताव होता. आपण जेव्हा अहवाल दयाल त्यावेळी पुन्हा चर्चा होईल. आपण जो काही अहवाल दयाल त्यातील प्रत्येक मुद्दयावर उत्तर दिले जाईल. ती लक्षवेधी नव्हती, स्थगन प्रस्ताव होता.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>जो स्थगन प्रस्ताव होता त्याचा ठराव आला आहे. ठरावात असे लिहिले आहे की, चौकशी केली जावी व जे काही बेकायदेशीर बांधकाम असेल त्यावर कारवाई केली जावी. त्यानुसार कारवाई चालु आहे. याचा अहवाल तयार आहे तो पुढील महासभेत आणला जाईल.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. आयुक्त साहेब, याची चौकशी कोण करत आहे त्या अधिका—याचे नाव सांगा.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सहा. संचालक, नगररचना यांचे मी नाव सांगितले ना?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>नगररचनाकारांची चौकशी सहा. संचालक नगररचना हे करत आहेत?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>नगररचनाकारांची चौकशी सहा. संचालक नगररचना हेच करतील ना?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>आयुक्त साहेब, त्यांचा अहवाल पुढील महासभेत येईल ना? मग ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. २ :—</u> दिनांक १९/१२/२००९ (त्यात २०/१/१० व ११/२/२०१०), २०/१/२०१० (त्यात दिनांक ११/२/२०१० व २०/२/२०१० (त्यात १०/३/२०१०) रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे

---

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले:—</u>मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, दिनांक १९/१२/२००९ पान क्र. ७ या पानावर मी गेल्या वेळेस विचारले होते की, श्री. सोनु ठेकेदार याच्यावर अदयापपर्यंत कार्यवाही झालेली नाही आहे. कारवाई का नाही केली?

<u>महापालिका सचिव :—</u>आपणांस कारवाई पाहिजे ना? कारवाई अपेक्षित आहे ना?

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :—</u>होय. आयुक्त साहेब, मागील वेळेस मला असे सागण्यात आले की, श्री. शिर्के साहेब नाहीत, श्री. जवांदे साहेब नाहीत तसेच आयुक्त साहेब सुध्दा नाहीत, असे मला कारण सांगण्यात आले व त्यावर अदयापपर्यंत कारवाई करण्यात आलेली नाही. त्याला काळया यादीमध्ये सुध्दा टाकलेले नाही. का नाही टाकले?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):—</u>मा. . महापौर, मा. आयुक्त साहेब व सर्व सदस्यगण, मा. महापौरांच्या दालनामध्ये जे छत पडले होते महापालिकेच्या वरच्या माळयावर जे काम चालु आहे तेथिल ठेकेदाराकडुन ते काम करुन घेतलेले आहे. ते स्वखर्चाने करुन घेतलेले आहे.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले:—</u>स्व:खर्चाने करुन घेतले ठिक आहे. मी उपोषणाला बसल्यानंतर मला आयुक्त साहेबांनी लेखी पत्र दिले आहे की आम्ही त्याच्यावर कारवाई करु. कारवाई करुन त्याला काळया यादीत टाकु तर अजुनपर्यंत त्याच्यावर कारवाई का नाही केली? मला तुम्ही लेखी का लिहुन दिले? त्याच्यावर कारवाई झालीच पाहिजे. त्याने हा प्रकार जाणुनबुजुन केला होता.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):—</u>ठिक आहे आम्ही तपासुन घेतो.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले:—</u>तपासुन नाही, मला सर्व माहित आहे. तुम्ही काय तपासुन बघता? मला आता प्रश्नाचे उत्तर दया. त्यांना तुम्ही काळया यादीमध्ये कधी टाकणार?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):—</u>हे जे काम आहे ते दुस—या ठेकेदाराला दिलेले आहे. सोनु त्याचा सब कॉन्ट्रक्टर आहे. त्यामुळे सोनुला काळया यादीमध्ये टाकता येणार नाही. सोंनुला काळया यादीमध्ये टाकुन चालणार नाही.

<u>सदस्या श्रीमती विदयाताई निर्मले:—</u>कसे का नाही चालणार? तुम्ही मला लेखी का लिहुन दिले मग?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.):—</u>त्याच्यावर कायदयाप्रमाणे जी काही कार्यवाही आहे ती आम्ही करु.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले:—</u>कायदयाप्रमाणेच लिहून दिले होते त्यांना काळया यादीमध्ये टाकु म्हणुन? आयुक्त साहेब तुम्ही मला लिहून दिले होते या प्रश्नाचे मला उत्तर दया आणि त्याला काळया यादीमध्ये टाकलेच पाहिजे. नाहीतर मी परत उपोषणाला बसेल.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदय, सदरचा मुद्दा तपासून घेतो जर त्याचा दोष असेल तर, कारण काय पाणी सोडल्यामुळे तो अपघात झाला, त्याच्या कामाचा दर्जा काय होता तो तपासावा लागेल.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले:—</u>आयुक्त साहेब, तुम्ही हे सर्व खोटे बोलत आहात, हे सर्व तुम्ही त्यादिवशी तपासून बघितलेले आहे? आणि मला तसे पत्र दिले आहे की त्याच्यावर कारवाई करु म्हणुन. आज पाच महिने झाले अदयाप त्यावर कारवाई केली नाही आणि त्याला तुम्ही काळया यादीमध्ये टाकलेच पाहिजे. आयुक्त साहेब तुम्ही मला उत्तर दया. त्याच्यावर कारवाई करणार की नाही करणार? यापुढे त्याच्यावर काय कारवाई करणार?

<u>उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सन्माननिय सदस्या यांच्या भावना लक्षात घेवुन मी आयुक्त साहेबांना निर्देश देतो की, जो कोणी ठेकेदार असेल त्याची चौकशी करुन त्याच्यावर कायदेशीर कारवाई केलीच पाहिजे.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले:—</u>त्याच्यावर कायदेशीर कारवाई केलीच पाहिजे आणि ज्या संस्थेला त्यांनी काम दिलेले आहे त्यांनाही काळया यादीमध्ये टाकले पाहिजे.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>चौकशी करु, जो कोणी ठेकेदार असेल किंवा संस्था असेल त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करु.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले:–</u>यापुढे महानगरपालिकेचे त्यास ठेका दिला जाता कामा नये. याची दक्षता मा. महापौर महोदय आपणही घेतली पाहिजे. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :–</u>मा. महापौर महोदय, सोनु ठेकेदाराचे काम अतिशय निष्कृष्ट दर्जाचे आहे. गटनेत्यांची त्यांनी जी काही दालने तयार केलीत त्या सर्व दालनांमध्ये पाण्याची गळती होत आहे. यास्तव त्याच्यावर कठोरात कठोर कारवाई केली जावी. त्याच्या कामाचे सर्व्हेक्षण करुन त्याचे बिल अदा केले जावे. अन्यथा त्यास बिलाची रक्कम दिली जावु नये. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>मा. महापौरजी, माझ्या लक्षवेधी सूचनेनंतर आलेल्या चर्चेत पृष्ठ क्र. ३६ व ३८ वर **मेढीचा रिर्पोट** अशी नोंद आलेली आहे त्या ऐवजी **मेरी** असे वाचले जावे.

<u>महापालिका सचिव :–</u>इतिवृत्त कायम?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> मागील सभेचे दिनांक २०/१/२०१० रोजीच्या पृष्ठ क्र. ३६ व ३८ वर आलेल्या मेढीचा रिपोर्ट या ऐवजी मेरीचा रिपोर्ट अशी दुरुस्ती करुन उर्वरीत सर्व सभांचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे. 

---

☑

<u>विषय क्र. २ :–</u> दिनांक १९/१२/२००९ (त्यात २०/१/१० व ११/२/२०१०), २०/१/२०१० (त्यात दिनांक ११/२/२०१० व २०/२/२०१० (त्यात १०/३/२०१०) रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. गोविंदराम लुंड
अनुमोदकाचे नाव : श्री. प्रभुनाथ गुप्ता

<u>महासभा ठराव क्र. ९१ अ</u> <u>दिनांक : १९/३/२०१०</u>

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक १९/१२/२००९ (त्यात २०/१/१० व ११/२/२०१०) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते १२६ पर्यंतचे, दिनांक २०/१/२०१० (त्यात दिनांक ११/२/२०१०) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ५३ पर्यंतचे व २०/२/२०१० (त्यात १०/३/२०१०) रोंजीचे पृष्ठ क्र. १ ते ५५ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

उप—महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३:—** उल्हासनगर पाणी पुरवठा, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी पुरवठा निहाय देयकाच्या थकबाकी वसुली व व्याज माफी प्रयोजनार्थ निर्भय योजनेत सहभागी होणे.

---

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मा. महापौरजी, हा जो प्रस्ताव आपण आणला आहे यात असे नमुद करण्यात आले आहे की, .......

<u>महापालिका सचिव :—</u>प्रशासनाकडुन हा प्रस्ताव परत घेण्याची मागणी करण्यात आलेली आहे. आपणांस वाटत असेल तर आपण हा प्रस्ताव वगळु शकतात.

<u>काही सदस्य :—</u>हा प्रस्ताव पुढे ढकला.

<u>महापौर :—</u> सदरचा विषय वगळण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३ :—** उल्हासनगर पाणी पुरवठा, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी पुरवठा निहाय देयकाच्या थकबाकी वसुली व व्याज माफी प्रयोजनार्थ निर्भय योजनेत सहभागी होणे.

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या शहाड व बारवी योजनेतुन उल्हासनगर शहरास सरासरी ११५ द.ल.ली. प्रतिदिन पाणी पुरवठा करण्यात येतो. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडुन दिनांक १९/१२/९४ पाासून विविध मंजूर दराप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेस पाणी पुरवठा करण्यात येत असून महानगरपालिकेमार्फत ठोक पाणी खरेदीपोटी महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळास पाणी देयकांची रक्कम निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात आली. सदर देयकानुसार पुर्णपणे रक्कमेची अदायगी न झाल्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून निव्वळ देयकाच्या थकबाकीवर विलंब शुल्क आकारण्यात येते, मंजुर कोटयापेक्षा जास्त पाणी वापरावर दंडात्मक दराने रक्कम आकारली जाते. तसेच जलमापक बंद कालावधीत दंडात्मक आकारणी करण्यात येते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून त्यांचे पत्र क्र. २१७४ दिनांक २४/९/२००९ अन्वये जुलै २००९ अखेरच्या थकबाकी बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे सादर करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| १. निव्वळ पाणी देयकाची रक्कम | : रु. ६६.७० कोटी |
| २. मंजुर कोटयापेक्षा जास्त पाणी वापरावरील दंडात्मक आकार | : रु. ०८.३४ कोटी |
| ३. जलमापक बंद असल्यामुळे दंडात्मक आकारणी | : रु. ०२.१६ कोटी |
| ४. विलंब आकार | : रु. ७४.२६ कोटी |
| | रु. १५१.२६ कोटी |

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून दर्शविण्यात आलेल्या एकूण थकबाकीच्या रु. १५१.२६ कोटीच्या रक्कमेत निव्वळ देयकाची रक्कम रु. ६६.७० कोटी वाजवी असता दंडात्मक रक्कम रु. ८४.५६ कोटी दिसून येते.

सदर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून त्यांचे पत्र क्र. २०५६ दिनांक ८/९/२००९ नुसार निव्वळ पाणी देयकापोटीची थकबाकीची रक्कम दिनांक ३१/१२/०१० पर्यंत भरण्यास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या देयकातील जलमापक नादुरुस्तीची व मंजुर खपावरील जादा खर्चासाठी वाढीव आकार व विलंब शुल्क माफी बाबत प्रस्तावास मा. कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून मंजूरी प्राप्त झाल्यावर सदर रक्कम संबंधित स्थानिक देयकातून वगळण्यात येईल असे कळविले आहे.

त्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत निव्वळ पाणी देयकाची थकबाकी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या तपशिलानुसार भरल्यास दंडात्मक रक्कम महानगरपालिकेस भरावी लागणार नाही. महाराष्ट्र औद्योगि विकास महामंडळाकडून सादर करण्यात आलेल्या देयकातील परिमाण महानगरपालिकेच्या स्विकृत परिमाणात तफावत असल्याने देयकांच्या रक्कमेत तफावत येते. या संदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे पत्रव्यवहार सुरु आहे.

या पुर्वीसुध्दा अशा तफावती बाबत व विलंब शुल्काबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे पत्रव्यवहार झाला होता व या संदर्भात मा. मुख्यमंत्री यांचे दालनात बैठक सुध्दा झाली होती. त्या बैठकीतील चर्चेनुसार महानगरपालिकेच्या डिसेंबर १९९४ ते मार्च २००३ पर्यंतच्या देयकातील परिमाणातील फरक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व महानगरपालिका यांनी संयुक्तपणे तपासणी करुन महानगरपालिकेच्या परिमाणनुसार देयकाची रक्कम ठरविण्यात आलेली आहे. व सदाची रक्कम महानगरपालिकेमार्फत सन २०१३ पर्यंत त्रैमासिक हप्त्याने भरल्यास त्यावरील विलंब शुल्क माफीबाबत मान्यता मिळाली आहे. परंतु महानगरपालिकमार्फत सदर थकबाकी रक्कम विहित कालावधीत भरली गेली नसल्यामुळे या रक्कमेवरील विलंब शुल्काची रक्कम ही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या थकबाकीच्या विवरणात दिसून येते.

| बाब | म.औ.वि.मडळाचे परिमाणानुसार | | | उमपाच्या परिमाणानुसार | |
|---|---|---|---|---|---|
| | देयकाची रक्कम | विलंब शुल्क | एकुण | देयकाची रक्कम | एकुण |
| अ) डिसेंबर ९४ ते फेब्रुवारी २००३ | | | | | |
| देयक आकारणी | १४६.५५ | ५१.८६ | १९८.४१ | १३६.८४ | १३६.८४ |
| देयक अदायगी | १०३.८३ | —— | १०३.८३ | १०३.८३ | १०३.८३ |
| शिल्लक—अ) | ४२.७२ | ५१.८६ | ९४.५८ | ३३.०१ | ३३.०१ |
| १) फेब्रुवारी २००३ अखेर अंतिम मान्य रक्कम व डिसेंबर २०१३ पर्यंत भरावयाची रक्कम | ३३.०१ | —— | ३३.०१ | ३३.०१ | ३३.०१ |
| २) डिसेंबर २०१० पर्यंत भरावयाची रक्कम | २७.२० | —— | २७.२० | २७.२० | २७.२० |
| ३) उमपाच्या मार्फत देयक अदायगी | ९.७५ | —— | ९.७५ | ९.७५ | ९.७५ |
| अ) शिल्लक (२—३) | १७.४५ | —७ | १७.४५ | १७.४५ | १७.४५ |
| ब) मार्च २००३ ते डिसेंबर २००९ | | | | | |
| देयक आकारणी | २१४.३५ | २२.४० (अंदाजित) | २३६.७५ | १९२.२५ | १९२.२५ |
| देयक अदायगी | १९२.६७ | —— | १९२.६७ | १९२.६७ | १९२.६७ |
| शिल्लक ब | २१.६८ | २२.४० | ४४.०८ | —०.४२ | —०.४२ |
| एकूण अ+ब | ३९.१३ | ६१.५३ | | १७.०३ | १७.०३ |

| क) म.औ.वि.मंडळाच्या दिनांक २४/९/२००९ च्या पत्रानुसार सुधारीत थकबाकी | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पाणी देयक | ६६.६९ | ६१.५३ | — | — | — |
| मंजुर कोटयापेक्षा जास्त पाणी वापर | — | ८.६४ | — | — | — |
| जलमापक बंद दंड | — | २.१६ | — | — | — |
| एकुण क | ६६.६९ | ७२.०३ | — | — | — |

उपरोक्त विषयानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पत्रानुसार दंडात्मक रक्कमेच्या माफीच्या योजनेत भाग घेवून रु. ६६.२७ कोटी निव्वळ पाणी देयकाची रक्कम दिनांक ३१/१२/१० पर्यंत भरल्यास विलंब शुल्क व दंडात्मक रक्कमेपोटी रु. ७२.०३ कोटी माफ करण्याचा प्रयत्न करणे महानगरपालिकेच्या दृष्टीने हिताचे होईल.

वर नमुद केल्याप्रमाणे व तक्त्यानुसार पाणी परिमाणाच्या तफावती व डिसेंबर ९४ ते फेब्रुवारी २००३ पर्यंतच्या संयुक्तीकरीता मान्य परिमाणानुसार महानगरपालिकेस डिसेंबर २०१३ पर्यंत रु. ३३.०१ कोटी रक्कम निव्वळ पाणी देयकापोटी हप्त्या–हप्त्याने एकुण ४० हप्त्यात भरावयाची आहे. त्यापैकी डिसेंबर २०१० पर्यंत रु. २७. ३० कोटी रक्कम महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळास जमा करावी लागेल.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिमाणानुसार मार्च २००७ ते नोव्हेंबर, २००९ या कालावधीपर्यंत निव्वळ पाणी देयकापोटी रु. २१.६७ कोटी थकबाकी दिसून येते. डिसेंबर १९९४ ते फेब्रुवारी २००३ पर्यंतच्या संयुक्तिक रित्या मान्य परिमाणाच्या आधारावर म्हणजेच उमपाच्या परिमाणानुसार विचार करता उमपास नोव्हेंबर २००९ पर्यंतची थकबाकी लक्षात घेता डिसेंबर २०१० पर्यंत रु. १७.४५–०.४२ असे एकूण रु. १७.०३ कोटी रक्कम पाणी देयकापोटी जमा करावी लागेल असे दिसुन येते.

सदर दंडात्मक रक्कम माफी व विलंब शुल्क माफी करीता दिनांक ३१/१२/२०१० पर्यंत निव्वळ पाणी देयकाची रक्कम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे विहित कालावधीत उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत ठराव पारीत करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास पाठविणे आवश्यक आहे.

तरी वरील योजनेत सहभागी होवून उपरोक्त दंडात्मक रक्कम व विलंब शुल्क माफ करुन घेण्याकरीता मा. महासभेच्या मंजुरीसाठी सादर करीत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ९१ ब      <u>दिनांक:–१९/३/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री. अंकुश म्हस्के

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर पाणी पुरवठा, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी पुरवठा निहाय देयकाच्या थकबाकी वसुली व व्याज माफी प्रयोजनार्थ निर्भय योजनेत सहभागी होणे कामीचा प्रस्ताव पुढच्या सभेत घेण्या प्रयोजनार्थ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

उप–महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४ :–** दिनांक १ एप्रिल २०१० पासुन निवृत्त होणा–या ८ स्थायी समिती सदस्यांच्या जागी ८ सदस्यांची नेमणुक करणे.

---

<u>महापालिका सचिव :–</u>सर्व पक्षांच्या गटनेत्यांकडुन स्थायी समिती सदस्य पदासाठी

<u>लोकभारती पक्षाकडुन</u>

१. श्री. जीवन इदनानी

२. श्री. अंकुश म्हस्के

<u>भारतीय जनता पक्षाकडुन</u>

१. डॉ. निना प्रकाश नाथानी

<u>राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडुन</u>

१. सौ.संगिता कंडारे

२. सौ. सरोजिनी टेकचंदानी

<u>शिवसेना पक्षाकडुन</u>

१. श्री. धनंजय बोडारे

२. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

<u>भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाकडुन</u>

१. श्री. सुंदर मंगतानी

या सर्वांना हार्दिक शुभकामना.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र.** ४:– दिनांक १ एप्रिल २०१० पासुन निवृत्त होणा–या ८ स्थायी समिती सदस्यांच्या जागी ८ सदस्यांची नेमणुक करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे १६ सदस्यांपैकी ८ सदस्य ०१ एप्रिल, २०१० पासून आळीपाळीने निवृत्त होणार आहेत त्यांची नावे व पक्ष इत्यादीचे विवरण खालीलप्रमाणे.............

| अ.क्र. | नाव | पक्ष | संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्री. मोहन रामरख्यानी | लोकभारती | २ |
| २ | श्री. जीवन इदनानी | लोकभारती | |
| ३ | श्री. रामसागर यादव | शिवसेना | २ |
| ४ | श्री. प्रधान पाटील | शिवसेना | |
| ५ | श्री. राजु जग्यासी | राष्ट्रवादी कॉंग्रेस | २ |
| ६ | श्री. गणपत एडके | राष्ट्रवादी कॉंग्रेस | |
| ७ | श्री. हरेश जग्यासी | भारतीय जनता पार्टी | १ |
| ८ | श्री. मोहन साधवानी | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १ |

स्थायी समितीचे उर्वरित ८ सदस्यांची नावे व त्यांचा पक्ष इत्यादीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पक्ष | संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्री. दत्तात्रय पवार | लोकभारती | २ |
| २ | श्री. दिलीप जग्यासी | लोकभारती | |
| ३ | श्रीमती पंचशिला पवार | आरपीआय | १ |
| ४ | श्री. रविंद्र बागुल | राष्ट्रवादी कॉंग्रेस | १ |
| ५ | श्रीमती जया माखिजा | भारतीय जनता पार्टी | २ |
| ६ | श्री. जमनादास पुरस्वानी | भारतीय जनता पार्टी | |
| ७ | श्री. रमेश चव्हाण | शिवसेना | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | श्रीमती मिनाताई सोनेजी | शिवसेना | २ |

माहे मार्च २०१० च्या सभेत निवृत्त होणा–या सदस्यांच्या जागी निवडावयाच्या नविन ८ सदस्यांच्या जागांच्या तुलनेत नियुक्तीचा पक्षनिहाय प्रमाणशिर प्रतिनिधीत्व विवरण तक्ता खालीलप्रमाणे असेल.

| लोकभारती | शिवसेना | राकॉपा | भाजपा |
|---|---|---|---|
| २ | २ | २ | १ |
| कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | एकुण |
| १ | ० | ० | ८ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३१ (अ) मधील तरतुदी अनुसार माहे मार्च २०१० मध्ये महापालिकेद्वारे स्थायी समितीवर केली जाणारी ८ पालिका सदस्यांची नियुक्ती मान्यता प्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे ८ पदासाठीचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन करण्यांत येईल. त्यामुळे आर.पी.आय व म.न.से या दोन्ही गटाचे प्रतिनिधींना प्रमाणशीर प्रतिनिधीत्व मिळणार नाही.

सबब निवृत्त झालेल्या सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा/नोंदणीकृत पक्षाचा, गटाचा, आघाडीचा किंवा रिक्त होणा–या जागांवर फ्रन्टचा असेल त्याच मान्यता प्राप्त पक्षाच्या, नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या, आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांस नामनिर्देशित करणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त तक्त्यात विर्निदिष्ट केलेल्या संख्येप्रमाणे स्थायी समिती सदस्य पदाच्या ८ रिक्त जागांवर नविन ८ सदस्य नेमणे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ९२ दिनांक:–१९/३/२०१०

सुचकाचे नाव :– श्री. गोविंदराम लुंड
अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार खालील आठ सदस्यांची स्थायी समितीवर नेमणूक करीत आहे.

१. श्री. इदनानी जीवन
२. श्री. म्हस्के अंकुश
३. डॉ. निना नाथानी
४. श्री. सुंदर (बाबु) मंगतानी
५. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
६. श्री. धनंजय बोडारे
७. श्रीमती सरोजीनी टेकचंदानी
८. श्रीमती संगिता कंडारे

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

उप–महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५** :–शांतीनगर, उल्हासनगर–३ येथे संरक्षण भिंत बांधण्यास खोदलेल्या खड्डयामध्ये पडुन मृत्युमुखी पडलेल्या कु. राजकिशोर निकाळे यांच्या कुटुंबियास रु. २ लाख आर्थिक मदत देणे.

---

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**सन्माननिय उप—महापौर आणि आयुक्त साहेब, हे दोन लाख रुपये देण्यास माझा विरोध नाही. पैसे देण्याची ही प्रथा सर्वांकरीता लागु राहिल काय? उल्हासनगरमध्ये आज ७६ प्रभाग आहेत. ७६ प्रभागांमध्ये जर अशी कोठे घटना घडली तर त्यास दोन दोन लाख देण्यासाठी आपणाकडे पैसा आहे का? आयुक्त साहेब, मी प्रश्न विचारला आहे त्याचे मला उत्तर दयावे.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के :—**सन्माननिय महापौर व आयुक्त साहेब, मागील महासभेत मी सुध्दा आपणांस सुचीत केले होते की, आपल्या महापालिकेच्या मागे असलेल्या मध्यवर्ती जकात नाक्या शेजारी एक टॅम्पो एका घरावर गेला होता ते सुध्दा गरीब परिवार आहे, त्यांचे सुध्दा भरपुर नुकसान झाले आहे. मुलगी आठ दिवस रुग्णालयात दाखल होती. त्याच्याविषयी आपण काही विचार केलेला दिसत नाही.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**आर्थिक मदत दिली जात असेल तर सर्वांना दिली जावी. उल्हासनगरमध्ये अशा घटना भरपुर होत आहे. उल्हासनगरमध्ये ७६ प्रभाग आहेत.

**सदस्य श्री. अकुश म्हस्के :—**जकात वसुलीसाठी आपण जो ठेका दिलेला आहे त्या ठेकेदाराकडील ड्रायव्हरच्या चुकीमुळे टॅम्पो त्या घरावर गेला होता. आणि ज्या भिंतीवर तो टॅम्पो आदळला ती भिंत महापालिकेची आहे. ती भिंत तोडुन तो टॅम्पो आतमध्ये गेला होता. त्या गरीबांसाठी विचार करायला एवढा वेळ का लागला?

**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—**माझी सभागृहाला विनंती आहे, मदत देण्याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. गरजु किंवा अडचणीत असलेल्या व्यक्तीस किंवा कुंणाच्या कुटुंबातील कुणी दगावले असेल तर आपण त्याना मदत देतो. त्याबाबतीत माझी सभागृहाला विनंती आहे, याबाबत कुठेतरी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. नाहीतर प्रत्येक ठिकाणी आपण असे करतो. यासाठी माझी विनंती आहे की एकदा ठरवुन घ्या की कुणाला कश्या प्रसंगी मदत दयाची याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेवुन कार्यवाही केली तर बरे राहिल.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**या अगोदर श्री. बी.बी. मोरे साहेबांच्या प्रभागात सुलभ शौचालयात विजेचा शॉक लागुन एक मुलगा दगावला होता. त्याच्या कुटुंबियांना सुध्दा अशा प्रकारची मदत देण्यात आलेली आहे. शांतीनगर येथे संरक्षण भिंतीसाठी खोदलेल्या खड्डयात पडुन श्री. राज किशोर निकाळे या नावाच्या मुलाचा मृत्यु झालेला आहे. आज उल्हासनगरमध्ये एवढी मोठी लोकसंख्या आहे कुठे ना कुठे काही ना काही घटना घडत असते. तर अशा प्रकारची घटना घडली तर सर्वांना आर्थिक मदत देण्याचा हा नियम चालु राहिल काय?

**सदस्य श्री. जीवन इदनानी :—**बाकी लोकांना देण्याबाबतीत कोणते धोरण ठरले आहे का ते सांगा.

**सदस्य श्री. प्रकाश सावंत :—**मा. महापौर साहेब, ५,६ महिन्यामध्ये या ज्या घटना घडत आहेत त्या ठेकेदाराच्या चुकीमुळे होत आहे. त्याची भरपाई ठेकेदाराने केली पाहिजे. असे माझे मत आहे. कारण ठेकेदाराला आपण सोडुन देतो आणि महापालिकेचे पैसे अशा घटनामध्ये वाया घालविते. महापालिका जेव्हा त्या ठेकेदाराला पैसे देते तेव्हा कोठे जिवित हानी झाली व वित्त हानी झाली तर ती ठेकेदाराने भरुन दिली पाहिजे. त्याच्यावर जबाबदारी टाकावी अशी माझी सभागृहाला विनंती आहे आणि ती सर्वांना मान्य होईल अशी माझी अपेक्षा आहे. काम चालु असतांना जीवत वित्तीय हानी झाली तर त्याची भरपाई तुम्ही करुन दयावी अशी एक अट करारनाम्यावर सहि करतांनाच टाकुन देण्यात यावी.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**सन्माननिय सदस्य श्री. प्रकाश सांवत जे काही बोलले त्यांच्या मताशी मी सहमत आहे जर एखादी दुर्घटना घडली तर त्याच्या भरपाईचा खर्च ठेकेदाराने केला पाहिजे. महापालिकेला तो भुर्दंड कशाला?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा जो विषय आला आहे, तो मागील महिन्यात मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के यांच्या प्रभागात जी दुर्घटना झाली होती, दुर्घटनाग्रस्तांना आर्थिक मदत देण्याविषयी आपण आश्वासन दिले होते की, या विषयीचा याबाबतचा विषय आपण पुढील महासभेत मंजुरीस्तव आणु. तर माझी आपणांस विनंती आहे की, दोघांनाही महानगरपालिकेच्यावतीने जरुर आर्थिक मदत

देण्यात आली पाहिजे व पुढील काळासाठी असा ठराव तयार केला पाहिजे की, यानंतर महानगरपालिकेच्या एखादया ठेकेदाराच्या चुकीने जर अशी काही दुर्घटना होत असेल तर त्याची भरपाई ठेकेदाराच्या बिलातुन रक्कम कपात करुन केली पाहिजे. परंतु हा जो विषय आला आहे तो सर्वसंमतीने पारीत केला पाहिजे.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—शांतीनगर येथिल संरक्षण भिंत बांधण्यासाठी खोदलेल्या खड्डयात मृत्युमुखी पडलेल्या मुलाच्या कुटुंबियास तसेच मध्यवर्ती जकात नाक्याशेजारी झोपड्डीत टॅम्पो घुसुन झालेल्या दुर्घटनेत दुर्घटनाग्रस्त कुटुंबियांना आर्थिक मदत मिळाली पाहिजे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सन्माननिय महापौरजी, श्री. अंकुश म्हस्के यांच्या प्रभागात झालेल्या अपघातीत नुकसानग्रस्त कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव पुढील महासभे पारीत करा. यांनतर असे काही घटना झाल्यातर ठेकेदाराकडुन रक्कम वसुल केली जावी.

सदस्य श्री.सतिश चहाळ :—मा. महापौरजी, या गोष्टीबद्दल सहानुभुती आहे, मुलगी मेली त्याचे दु:ख आहे. परंतु जे ठेकेदार काम करतात त्या ठेकेदाराला दंड न आकारता महानगरपालिका तो भुर्दंड का सहन करते हे काही समजत नाही. हा जनतेचा पैसा आहे. ज्या व्यक्तीस शिक्षा झाली पाहिजे त्या ठेकेदाराचे काम होते, त्या ठेकेदाराला शिक्षा न देता तुम्ही महापालिका खर्च सोसते. याचे उत्तर दयाल का आयुक्त साहेब.

सदस्य श्री. प्रकाश सावंत :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, हा जो विषय आहे तो सहानुभुतीचा विषय आहे. महापालिकेने मदत केली पाहिजे, आपले ते नागरीक आहेत. नैसर्गीक आपत्तीमुळे त्यास मदत केली पाहिजे. कुठल्याही ठेकेदाराच्या चुकीमुळे त्यास मदत करणार हे चुकीचे आहे. आता आपण म्हणालात की झोपडपट्टीवर टॅम्पो चढतो, खड्डयात मुलगा पळुन मृत्युमुखी पडतो हे ठेकेदाराच्या चुकीने होते त्या जागी महापालिका पैसे देणार आहे का? काही तरी धोरणात्मक निर्णय ठरवा. ठेकेदाराकडुन कुठलीही हानी झाली तर त्याने ती जबाबदारी घेतली पाहिजे. त्या ठेकेदारावर एफआरए दाखल झाला पाहिजे व त्या व्यक्तीस त्या ठेकेदाराने स्वत:हुन नुकसान भरपाईची रक्कम दिली पाहिजे. ती नुकसान भरपाईची रक्कम निश्चित करावी व त्याच्या करारनाम्यात ती नमुद करावी, ही मी आपणांस विनंती करतो.

सदस्य श्री. सतिश चहाळ :—मा. महापौर महोदय, असे जे ठेकेदार आहेत त्यांचे ठेके रद्द करायला पाहिजे, ज्यांच्यामुळे जिवितहानी होते. शहरामध्ये अशा ठेकेदारांना ठेका देता कामा नये.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, या विषयावर जेव्हा मागील सभेत चर्चा होत होती महानगरपालिका गुन्हेगार आहे असे त्यावेळी श्री. शिर्के साहेबांनी मान्य केले होते. आता हे जे सदस्य चर्चा करत आहेत ते त्यावेळी झोपले होते का? ते आता म्हणत आहेत की ठेकेदार गुन्हेगार आहेत की महानगरपालिका गुन्हेगार आहे. त्यावेळी सविस्तर चर्चा झाली होती व यांनी मान्य केले होते की आमची चुक आहे. महानगरपालिकेच्या चुकीमुळे ती दुर्घटना झालेली आहे. ठेकेदारावर आज हे का ढकलत आहात? ठेकेदाराने वारंवार पत्र दिलेले आहे. आम्ही त्यांना मार्किंग करुन दिलेली नाही. त्यावेळी सदस्य झोपले होते का?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. आयुक्त साहेब, माझे असे मत आहे की या विषयावर अधिक चर्चा न करता ठराव पारीत केला जावा.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—यापुढे असा प्रकार घडल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जावे.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—दोन्ही झोपडीधारकास ५१—५१ हजार रुपये दिले जावेत.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—दोन्ही झोपडीधारकांना ५०,५० हजार दिले जावेत.

महापालिका सचिव :—५०,५० हजार की २५,२५ हजार?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>५०,५० हजार.

<u>महापालिका सचिव:–</u>ठिक आहे? पास? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५:–** शांतीनगर, उल्हासनगर–३ येथे संरक्षण भिंत बांधण्यास खोदलेल्या खड्डयामध्ये पडुन मृत्युमुखी पडलेल्या कु. राजकिशोर निकाळे यांच्या कुटुंबियास रु. २ लाख आर्थिक मदत देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे वालधुनी क्र. उमपा/साबांवि/शअ/१४३३, दिनांक २६/८/२००९ अन्वये वालधुनी नदी ते राजीव गांधी चौक पर्यंतच्या संरक्षक भिंतीचे कार्यारंभ आदेश मे. शंकर ट्रेडर्स, कल्याण यांचे नावे निर्गमित करण्यात आले आहे. सदर ठिकाणी तेथिल परिसरातील नागरीक प्रात: विधी करीता बसतात. कु. राज किशोर निकाळे हा ६ वर्षीय बालक तेथे प्रात: विधीकरीता बसलेल्या असता सदर बालकाचा पाय घसरुन खड्डयात पडला व दुर्देवाने बालकाचा मृत्यु झाला.

सदर बाब दु:खद असून सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून सदर मृत बांलकांच्या कुटुंबियांना महापालिकेतर्फे रु. २.०० लक्ष एवढी आर्थिक मदत होणेकरीता सदर विषय मा. महासभेमध्ये मंजूरीकरीता ठेवणेस प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ९३ <u>दिनांक:–१९/३/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. अंकुश म्हस्के
अनुमोदकाचे नाव :– श्री.बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे शांतीनगर, उल्हासनगर–३ येथे संरक्षण भिंत बांधण्यास खोदलेल्या खड्डयामध्ये पडुन मृत्युमुखी पडलेल्या कु. राज किशोर निकाळे यांच्या कुटुंबियास रु. २ लाख आर्थिक मदत देंणे मान्य करीत आहे.

**तसेच––**

याचबरोबर मध्यवर्ती जकात नाक्या शेजारी झालेल्या अपघातातील नुकसानग्रस्त झोपडीवाशियांना प्रत्येकी रु. ५०/– हजार आर्थिक मदत देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

उप–महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ <u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र. ६ :–** दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वर्ष २००९–१० करीता तयार केलेल्या प्राकलनास मंजुरी मिळणे.

---

<u>महापालिका सचिव :–</u>परिशिष्ट अ,ब,क सर्वांना दण्यात आले आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>यामध्ये काही कामे समाविष्ट करायचे तर नाही ना?

<u>सदस्य श्री. तुलसीदास वसिटा:–</u>दलित वस्ती निधीमधुन माझ्या प्रभागात करावयाच्या कामासाठी जो निधी ठेवण्यात आलेला आहे त्यामध्ये वाढ करण्यात यावी कारण माझ्या प्रभागात सरस्वती नगर ही फार मोठी दलित वस्ती आहे. माझ्या प्रभागासाठी दलित वस्ती निधी १५ लाख रुपये केला जावा.

<u>महापालिका सचिव :–</u>कृपया लक्ष दया. पहिली यादी ५८ कामांची आहे. त्यानंतर जी कामे समाविष्ट करण्यास सांगण्यात आली आहे त्यांची यादी मी वाचुन दाखवितो. अनुक्रमांक ७० वर प्रभाग क्र. ६८ मधील ९९५००० रुपये खर्चाचे एक काम समाविष्ट करण्यात येत आहे. आता एकुण ७० कामे होत आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ५९ | ६ | महात्मा फुले नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९०००० |
| ६० | १२ | कौशल नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९५००० |
| ६१ | ३२ | गौतमवाडी याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९०००० |
| ६२ | १३ | महात्मा फुले नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९२००० |
| ६३ | ४६ | गणेश नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९५००० |
| ६४ | २९ | सरस्वती नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ०५५०००० |
| ६५ | ५४ | सम्राट अशोक नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९०००० |
| ६६ | २८ | भाऊजी नगर, भैय्यासाहेब आंबेडकर सोसायटी याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९२००० |
| ६७ | ०९ | शांतीनगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ५००००० |
| ६८ | ३० | लोकमान्य टिळक नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ०५००००० |
| ६९ | १८ | पाईपलाईन शिवसेना शाखा याठिकाणी एम २५० सी.सी रस्ता बनविणे | ९९०००० |
| ७० | ६८ | पटेलनगर, महात्मा फुले नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९५००० |

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>सचिव साहेब, आपण जी यादी वाचुन दाखवित आहात ती ठिक आहे. परंतु ही यादी ५० टक्यापेक्षा जास्त दलित वस्ती असलेल्या झोपडपट्टयांमधील कामाची असेल तरच या प्रस्तावास आमचे समर्थन आहे. आणि जर ५० टक्क्यापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या वस्तीतील कामे असतील तर मी यास आव्हान देण्यासाठी न्यायालयात जाईल.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>मा. महापौर महोदय, माझ्या प्रभागात ५० टक्क्यापेक्षा कमी दलित वस्तीचा विभाग असल्यामुळे मी सभापती असूनही माझ्या प्रभागातील कामे प्रस्तावीत केली नाहीत. तसेच शिवसेनेचे आमचे जेष्ठ सदस्य श्री. भुल्लर महाराज यांच्याही प्रभागातील काम दिलेले नाही त्याचबरोबर श्री. रामसागर यादव यांच्याही प्रभागातील काम यात दिलेले नाही. ज्या घोषित झोपडपट्टया आहेत किंवा ज्यांमध्ये ५० टक्यापेक्षा जास्त दलित वस्ती आहेत अशा झोपडपट्टयांचीच कामे दिलेली आहेत तीच कामे पारीत करावी दुस–या कुणाचीही कामे समावेश करु नयेत. असे मी जाहिरपणे सांगु इच्छितो धन्यवाद।

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>मा. महापौरजी, अनु.क्र. ४२ व अनु.क्र. ४५ वर दर्शविलेले काम सारखेच आहे व अंदाजित खर्चाची रक्कमही सारखीच आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४२ | ७५ | उल्हासनगर–५ येथील महात्मा फुले नगर, नेहरु नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९९२०० | महात्मा फुले नगर, नेहरु नगर |
| ४५ | ७५ | उल्हासनगर–५ महात्मा फुले नगर, नेहरु नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९९२०० | महात्मा फुले नगर, नेहरु नगर |

हे चुकीने दोनदा लिहिण्यात आले आहे की दोन कामे आहेत? याचा खुलासा केला जावा.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>चुक माणसानेच होते.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>होय, चुक मानली पाहिजे, चुक माणसानेच होते. यापुढे चुक नाही झाली पाहिजे. हे सुध्दा माणसाचेच काम आहे.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, सार्व. बांध.):–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब व सर्व सदस्य, ही जी यादी आहे ही यादी पुर्ण तपासून त्याचे प्राकलन तयार केले जाईल, प्लान बनविले जातील त्यामध्ये काही डबल एन्ट्री असेल काही चुक असेल तर ती दुरुस्त केली जाईल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>हे सांगु नका. हे सांगा की हया दोन एन्ट्री आहेत की चुकीने तसे झाले आहे. माझा स्पष्ट प्रश्न आहे त्याचे स्पष्ट उत्तर दया.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, सार्व. बांध.):–</u>एरिया आहे त्याप्रमाणे जास्तीत जास्त जेवढे काम आहे त्याप्रमाणे तपशिलवार काम टाकुन तपशिलवार प्राकलन तयार केले जाईल. एरिया मोठा असल्यामुळे ते काम परत लिहिले आहे परंतु तपशिलवार काम प्राकलनात टाकुन देवु.

<u>महापालिका सचिव:–</u>पास? ७० कामांची यादी आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>प्रथम त्यांना स्पष्टीकरण देवु दया.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, सार्व. बांध.):–</u>स्पष्टीकरण हे देण्यात येते की, तेथिल जागा फार मोठी आहे, ही जी यादी दिली आहे त्यामध्ये दोन जागी एकच काम दिसत आहे परंतु प्राकलनावर, व प्लाननुसार तपशिलवार काम टाकुन प्राकलन बनविले जाईल. व जेवढी तरतुद आहे त्याप्रमाणे ते काम होईल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>तर मी आपणांस एक शाब्बासकी देवु इच्छितो की, सर्व प्राकलने ९ लाख ९९ हजार, दोनशे, सहाशे, शंभर अशा आहेत व एक प्राकलन असे आहे की ते राउंड फिगर म्हणजे १० लाखाचे आहे, शाब्बास।

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>ठिक आहे, कमी करुन टाका प्राकलने.....

<u>महापालिका सचिव :–</u>७० कामांची यादी आहे. ठिक आहे? पास?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

<u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र. ६:– दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वर्ष २००९–१० करीता तयार केलेल्या प्राकलनास मंजुरी मिळणे.**

<u>प्रस्तावना</u>

शासन निर्णय क्र.विधयो–१०२००/१५९२/प्र.क्र.१८९/नवि–४ दिनांक ५/३/२००२ नुसार दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत हाती घ्यावयाची कामे अनुसूचित जातीच्या लोकांची लोकसंख्या ५०% पेक्षा जास्त असलेल्या वस्त्यांमध्ये किंवा महानगरपालिकेच्या अनुसूचित जातीच्या प्रभागामध्येच घेणे आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.८,३७,३८,४०,४३,४५,५५,६३,६४ हे ९ प्रभाग अनुसूचित जातीचे राखीव प्रभाग आहेत. तसेच पुढील वस्त्यांमध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या ५०% पेक्षा जास्त असल्याचे यापूर्वी तत्कालीन नगररचनाकार / शहर अभियंता व उप–आयुक्त शहर यांनी प्रमाणित करुन ठेवलेले आहे.––– १) क्रांतीनगर, उल्हासनगर–१ २) प्रबुध्द नगर, उल्हासनगर–१ ३) वाल्मिकीनगर, उल्हासनगर–१ ४) दत्तवाडी, उल्हासनगर–१ ५) महाकाली मंदीर, उल्हासनगर–१ ६) हरिजन वस्ती, उल्हासनगर–१ ७) गौतमबुध्दनगर, उल्हासनगर–३ ८) गरीब नगर, उल्हासनगर–२ ९) मिलिंदनगर, उल्हासनगर–४ १०) सरस्वतीनगर, उल्हासनगर–३ ११) वाल्मिकीनगर, उल्हासनगर–४ १२) हरिजन पाडा, उल्हासनगर–४ १३) नागसेन नगर, उल्हासनगर–४ १४) रामजी आंबेडकर नगर, उल्हासनगर–४ १५) विर तानाजी नगर, उल्हासनगर–४ १६) श्रीरामनगर, उल्हासनगर–५ १७) हरिजन क्वॉटर्स, उल्हासनगर–५ १८) पटेल नगर, उल्हासनगर–५ १९) महात्मा फुले नगर, उल्हासनगर–५ २०) ज्योतिबा फुले नगर, उल्हासनगर–५.

तसेच शहरामध्ये अन्य वस्त्यांमध्ये दलितांची संख्या ५०% पेक्षा जास्त असल्याचे वारंवार संबंधित प्रभागाचे नगरसेवक यांनी निदर्शनास आणून देत असल्याने याबाबत उप–आयुक्त सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना यांनी शहरातील दारिद्रिय रेषेखालील लोकांची यादी तयार करणेसाठी केलेल्या वस्तीनिहाय सर्वेक्षणाचा अहवाल मा. नगरपालिका प्रशासन संचनालय यांचेकडून मागविला होता. या अहवालानुसार नागरी सुविधा केद्राने तयार करुन दिनांक ५/७/२००८ च्या पत्रासोबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्राप्त झालेली यादी आधारभूत मानून त्यातील अनुसूचित जातीचे रहिवासी यांचे लोकसंख्येचे प्रमाण ग्राहय धरुन त्यातील ५०% पेक्षा जास्त अनु.जातीच्या रहिवाशांची लोकसंख्या असणा–या वस्तींकरीता या योजनेअंतर्गत काम करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

अशा प्रकारे पात्र दलित वस्त्यांमध्ये संबंधित नगरसेवकांनी मागणी केल्याप्रमाणे मा.सभापती गलिच्छ वस्ती सुधारणा यांचेकडून प्राप्त झालेली प्रस्तावित करणेच्या कामांची यादी सोबत जोडली आहे. त्याप्रमाणे ५८ कामे असून त्यांची प्राकलनिय किंमत रु.५,६३,०८,५४५/– इतकी होत आहे. या कामांच्या स्थळ नकाशांना नगररचनाकार यांची मान्यता मिळणे बाकी आहे.

तरी सदर प्रस्तावास निधी उपलब्धतेसाठी व मंजूरीसाठी मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे पाठविणेपूर्वी नगररचना विभागाच्या मान्यतेच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यतेसाठी मा.महासभेपुढे ठेवणेस मान्यता मिळणेस प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ९४ <u>दिनांक:–१९/३/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. दिलीप गायकवाड
अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता पुढील नमुद केलेल्या ७० कामांच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

दलित वस्ती निधीअंतर्गत वर्ष २००९–१० मध्ये करावयाच्या कामांची यादी

| अ. क्र. | प्रभाग क्र. | कामाचे नाव व ठिकाण | प्राकलनिय किंमत | दलित वस्तीचे नाव |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | ४ | दत्तवाडी येथील अंबिका मंदीर जवळ शौचालय बांधणे व पेव्हरब्लॉक बसविणे. | ९९५००० | दत्तवाडी |
| २ | ५ | वार्ड क्र.५ येथील वाल्मिक नगर, दत्तवाडी, भिमनगर येथील सि.सि.पॅसेज, नाली, पेव्हरब्लॉक, नाली बनविणे व समाजमंदीर दुरुस्ती करणे. | ९९८९२० | वाल्मिक नगर, दत्तवाडी, भिमनगर |
| ३ | ८ | उल्हासनगर–३ वार्ड क्र.८ येथील चोपडा कोट येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर येथे प्रवेशद्वार बनविणे. | ९९९३०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| ४ | २४ | वार्ड क्र.२४ येथील महाकाली नगर येथील महाकाली मंदीर परिसरात सि.सि.पॅसेज, नाली व पेव्हरब्लॉक बसविणे. | ९९२२५० | महाकाली नगर |
| ५ | ३८ | वार्ड क्र.३८ येथील रमाबाई आंबेडकर नगर येथील शिवाजी भवल गुप्ता किराणा स्टोर परिसर, दुर्गा मंदीर मागे, हनुमान नगर येथील नेताजी यादव यांचे घर याठिकाणी सि.सि.पेव्हमेंट व नाली पेव्हर ब्लॉक बसविणे. | ९९८३७५ | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| ६ | २० | वार्ड क्र.२० येथील इंदीरा नगर, हर्षवर्धन नगर, व टिळक नगर येथील नाना पवार यांचे घराजवळ, पुजा किराणा स्टोर, युवराज मोरे, निर्मल ससाणे यांचे घर, प्रेमदास माने, लालसिंग ठाकूर, सिताराम मारुती, गणेश चव्हाण, शिवसेना ऑफीस याठिकाणी सि.सि.पेव्हमेंट व पेव्हरब्लॉक बसविणे. | ९९१८०० | इंदीरा नगर, हर्षवर्धन नगर व टिळक नगर |
| ७ | १८ | वार्ड क्र.१८ येथील मुकूंद नगर येथे फरसाण मार्ट दुकान ते विठ्ठल अपार्टमेंट पर्यत नाला बनविणे. | ९९४९०० | मुकूंद नगर |
| ८ | ३३ | वार्ड क्र.३३ गौतम बुध्द नगर येथील रेड्डी यांचे घर ते कांबळे यांचे घरापर्यंत समाज मंदीर व नाल्यावर झाकण बसविणे. | ९५१५०० | गौतमबुध्द नगर |
| ९ | ३७ | भैयासाहेब आंबेडकर नगर येथे सलुबाई, निकाळजे,गोडबोलेबाबा, रतनाबाई घराजवळ, बुध्दविहार, समाजमंदीर परिसरात, टेकडी मोरया येथे सी.सी. पायवाटा, नाली व पेव्हर ब्लॉक बसविणे. | ९९५००० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| १० | ३९ | वार्ड क्र.३९ येथील गायकवाड यांचे घर, गुप्ता किराणा स्टोर व कान्याबाई मोरे यांचे घरासमोरील परिसर येथे सि.सि.पेव्हमेंट व नाली बनविणे. | ९९८६०० | |
| ११ | ४० | वार्ड क्र.४० गरीब नगर, आझाद नगर येथील शिवसेना ऑफीस ते आझाद शाळा पर्यंत पेव्हमेंट, नाली बनविणे. | ९९९७०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| १२ | ४३ | वाड क्र.४३ येथील साईबाबा नगर ते निकम किराणा स्टोर, मातोश्री रमाबाई आंबेडकर शाळेजवळ समाजमंदीर बनविणे. | ९६२७०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| १३ | ४५ | वार्ड क्र.४५ गंगा पिर मंदीर ते तेजा यांचे घर, फॉरवर लाईन येथे पेव्हमेंट नाली बनविणे. | ९९९७०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | ४५ | वार्ड क्र.४५ रिशपाल उज्जैनवाल यांचे घर ते इमली पाडा व आजूबाजूचा परिसर, फॉरवर लाईन याठिकाणी पेव्हमेंट, नाली बनविणे. | ५००००० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| १५ | ७ | वार्ड क्र.७ रामकिशन करोतिया नगर, गौतम बुध्द नगर याठिकाणी सि.सि.पॅसेज, पेव्हर ब्लॉक बसविणे व नाली बनविणे. | ९९८३०० | रामकिशन करोतिया नगर |
| १६ | ९ | वार्ड क्र.९ रमाबाई आंबेडकर नगर याठिकाणी सि.सि. पॅसेज, पेव्हरब्लॉक व नाली बनविणे. | ९९७९०० | रमाबाई आंबेडकर नगर |
| १७ | १० | वार्ड क्र.१० खन्ना कंपाउंड याठिकाणी सि.सि.पॅसेज, पेव्हर ब्लॉक व नाली बनविणे. | ९९७५०० | खन्ना कंपाउंड |
| १८ | ११ | वार्ड क्र.११ इंदीरा आशिरद नगर याठिकाणी सि.सि. पॅसेज, पेव्हरब्लॉक व नाली बनविणे. | ९९८४०० | इंदीरा आशिरद नगर |
| १९ | २९ | वार्ड क्र.२९ याठिकाणी ब्लॉक नं.११९०, सरस्वती नगर येथील वाधूमल यांचे घर याठिकाणी सि.सि.पॅसेज, पेव्हरब्लॉक व नाली बनविणे. | ९९८८०० | सरस्वती नगर |
| २० | ४७ | वार्ड क्र.४७ भिमनगर येथील श्रीराजा शेख यांचे घर ते डॉ.आनंद माहेरे यांचे घर याठिकाणी सि.सि. पॅसेज,पेव्हरब्लॉक व नाली बनविणे. | ९९९५०० | भिमनगर |
| २१ | ४८ | वार्ड क्र.४८ येथील मिलींद नगर शिवनगर येथील सि. सि.पॅसेज, पेव्हरब्लॉक व नाली बनविणे. | ९९८४०० | मिलिंद नगर |
| २२ | ४९ | वार्ड क्र.४९ येथील महादेव नगर याठिकाणी सि.सि. पॅसेज, पेव्हरब्लॉक व नाली बनविणे. | ९९९४०० | महादेवनगर |
| २३ | ५० | वार्ड क्र.५० हरीजन पाडा येथील पाटकर यांचे घर ते गॅस गोडाऊन, माता मंदीर जवळ सि.सि.एम–२५० ने रस्ता, पेव्हमेंट ब्लॉक व नाली बनविणे. | ९९९२०० | हरिजन पाडा |
| २४ | ५१ | वार्ड क्र.५१ येथील वाल्मिक नगर व आजूबाजूचा परिसर बॅरेक क्र.१३१७ ते १३२२ पर्यंत सि.सि.पॅसेज, नाली व चेकर्ड टाईल्स बसविणे. | ९९९२०० | वाल्मिक नगर |
| २५ | ५२ | वार्ड क्र.५२ येथील सिताराम नगर येथील कोळगे यांचे घर ते मराठे यांचे घर, गणेश मंदीर याठिकाणी नाला बनविणे. | ९९९५०० | सिताराम नगर |
| २६ | ५३ | वार्ड क्र.५३ येथील सिध्दार्थ नगर येथे नाला बनविणे. | ९९९६०० | सिध्दार्थ नगर |
| २७ | ५६ | वार्ड क्र.५६ येथील संभाजी चौक ते दुर्गा पाडा याठिकाणी फुटपाथ बनविणे. | ९९८७०० | संभाजी चौक |
| २८ | ६३ | उल्हासनगर–४ याठिकाणी भिमसेना चौक ते सेंट्रल पार्क हॉटेल याठिकाणी सि.सि.३५० ने रस्ता व नाली बनविणे. | ९९९७०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| २९ | ६३ | उल्हासनगर–४ येथील सिध्दार्थ हौसिंग सोसायटी ते डिफेंस कॉलनी याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९९८०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | ६६ | उल्हासनगर–५ येथील सफाई कामगार वसाहत जवळ पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ६९९२०० | सफाई कामगार वसाहत |
| ३१ | ६६ | उल्हासनगर–५ येथील सफाई कामगार वसाहत जवळ समाज मंदीर बनविणे. | ३००००० | सफाई कामगार वसाहत |
| ३२ | ६५ | उल्हासनगर–४ येथील समता नगर, सिध्दार्थ नगर, कैलाश कॉलनी याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९९९०० | समता नगर, सिध्दार्थ नगर, कैलाश कॉलनी |
| ३३ | ६१ | उल्हासनगर–४ येथील राधेश्याम नगर येथील मारुती पॅलेस ते वैष्णवी पॅलेस पर्यंत पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे | ९९९३०० | राधेश्याम नगर |
| ३४ | ६४ | उल्हासनगर–४ नागसेन नगर येथील पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९७५१०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| ३५ | ६४ | उल्हासनगर–४ येथील गणेश नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९७७०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| ३६ | ७० | उल्हासनगर–५ वार्ड क्र.७० येथील जय जनता कॉलनी लोखंडे यांचे घराजवळ पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९८२०० | जयजनता कॉलनी |
| ३७ | ७० | उल्हासनगर–५ विर तानाजी नगर येथील राघू गवंद यांचे घर ते सोनावणे यांचे घर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९९५०० | तानाजी नगर |
| ३८ | ६४ | उल्हासनगर–४ येथील साईनाथ कॉलनी याठिकाणी नाला बनविणे. | ९९९९०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| ३९ | ६८ | उल्हासनगर–५ बॅरेक क्र.७४१ ते महात्मा फुले नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९८२०० | महात्मा फुले नगर |
| ४० | ६२ | उल्हासनगर–४ ब्राम्हणपाडा येथील हनुमान मंदीर ते दिनकर यांचे घर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९९४०० | |
| ४१ | ७१ | उल्हासनगर–५ येथील गौतमनगर याठिकाणी नाली बनविणे. | ९९९६०० | गौतमनगर |
| ४२ | ७५ | उल्हासनगर–५ येथील महात्मा फुले नगर, नेहरु नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९९२०० | महात्मा फुले नगर, नेहरु नगर |
| ४३ | ७५ | उल्हासनगर–५ येथील हिल लाईन पोलिस स्टेशन ते नेहरु नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९९१०० | नेहरु नगर |
| ४४ | ७५ | उल्हासनगर–५ नेहरु नगर येथील मंगल अर्चना अपार्टमेंट याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९९००० | नेहरु नगर |
| ४५ | ७५ | उल्हासनगर–५ महात्मा फुले नगर, नेहरु नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९९२०० | महात्मा फुले नगर, नेहरु नगर |
| ४६ | ७२ | उल्हासनगर–५ कैलाश कॉलनी येथील यादव यांचे घराजवळ पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९८२०० | कैलाश कॉलनी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४७ | ७२ | उल्हासनगर–५ कैलाश कॉलनी येथील महेश्वरी हॉस्पीटल मागे पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९९६०० | कैलाश कॉलनी |
| ४८ | ७६ | उल्हासनगर–५ वार्ड क्र.७६ येथील तुकाराम पाटील चाळ ते शांती प्रकाश आश्रम याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९९६०० | तुकाराम पाटील चाळ |
| ४९ | ५५ | उल्हासनगर–४ वार्ड क्र.५५ येथील सिध्दार्थ मैदानजवळ पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९८६०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| ५० | ५५ | उल्हासनगर–४ वार्ड क्र.५५ येथील बुध्द कॉलनी येथे पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९६८०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| ५१ | ५५ | उल्हासनगर–४ कानसई रोड येथील प्रविण दोंदे यांचे घर ते निकम यांचे घर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९५५०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| ५२ | ६० | उल्हासनगर–४ दिशा क्लासेस ते एम.एस.इ.बी.पर्यंत पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९८६०० | |
| ५३ | ६३ | उल्हासनगर–४ भिमशक्ती कॉलनी, महात्मा फुले नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९९३०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| ५४ | ६४ | उल्हासनगर–४ येथील विक्रमशिला कॉलनी याठिकाणी पेव्हमेंट रस्ता नाली बनविणे. | ९९९८०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| ५५ | ६४ | उल्हासनगर–४ ब्लॉक क्र.९० याठिकाणी पेव्हमेंट रस्ता नाली बनविणे. | ९९८५०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| ५६ | ६४ | उल्हासनगर–४ ब्लॉक क्र.९५ समोर पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९९९०० | अनुसूचित जातीचे ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या |
| ५७ | ६९ | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र.६९ मधील बॅरेक क्र. १७८२ समोरील कच्छीपाडयामध्ये सिमेंट कॉक्रीटचा रस्ता व नाली बांधणे. | १०००००० | कच्छीपाडा |
| ५८ | ६७ | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र.६७ मधील हरिजन पाडयामध्ये सि.सि.पायवाटा व नाली बांधणे आणि पेव्हर ब्लॉक बसविणे. | १०००००० | हरिजन पाडा |
| ५९ | ६ | महात्मा फुले नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९०००० | |
| ६० | १२ | कौशल नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९५००० | |
| ६१ | ३२ | गौतमवाडी याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९०००० | |
| ६२ | १३ | महात्मा फुले नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९२००० | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६३ | ४६ | गणेश नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९५००० | |
| ६४ | २९ | सरस्वती नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ०५५०००० | |
| ६५ | ५४ | सम्राट अशोक नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९०००० | |
| ६६ | २८ | भाऊजी नगर, भैय्यासाहेब आंबेडकर सोसायटी याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९२००० | |
| ६७ | ०९ | शांतीनगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ५००००० | |
| ६८ | ३० | लोकमान्य टिळक नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ०५००००० | |
| ६९ | १८ | पाईपलाईन शिवसेना शाखा याठिकाणी एम २५० सी. सी रस्ता बनविणे | ९९०००० | |
| ७० | ६८ | पटेलनगर, महात्मा फुले नगर याठिकाणी पेव्हमेंट रस्ता व नाली बनविणे. | ९९५००० | |

या ठरावाद्वारे घेतलेला निर्णय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट कार्यान्वीत करण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

उप—महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, स्थायी समितीवर आता आता नियुक्त झालेली आमची सन्माननिय सदस्या डॉ. निना नाथानी यांचे आम्ही अभिनंदन करु इच्छितो.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :</u>—श्री. जमनुजी एक मिनिट, मा. महापौर महोदय, आयुक्त साहेब, महाराष्ट्राचे थोर साहित्यीक कवि विंदा करंदीकर यांचे मागच्या आठवडयात निधन झाले आहे. थोर साहित्यीकास श्रध्दांजली वाहणे हे आपले कर्तव्य आहे. मी आपणांस विनंती करतो की शोक प्रस्ताव याठिकाणी पारीत करावा, हा प्रस्ताव सुरुवातीसच मांडायचा होता परंतु कु. स्पर्श खानचंदानी हिचा याठिकाणी स्पर्श झाला. थोर साहित्यीक विंदा करंदीकर व शिवसेना नेते, माजी खासदार श्री. मधुकर सरपोतदार यांना सुध्दा याठिकाणी श्रध्दांजली वाहिली जावी.

<u>उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:</u>—शोक प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

<u>शोक प्रस्ताव</u>

एरवी त्रिखंडाला अनंत हस्त देणा—या जगन्नियंत्याने देता देता विंदांचेच हात आपल्या हाती घेतले.... श्रमिकांच्या दु:खाचा हुंदका मांडणारे विंदा माझ्या मना बन दगड... असे म्हणता —म्हणता कपडक काढून उपभोगावी... असेही म्हणायचे, तर प्रेमकविता लिहून युगुलांचेही आवडते व्हायचे त्याच वेळेस बालकविताही

तेवढयाच सहजतेने लिहून अनेक घराघरांत आजोबा  बनून जायचे.  बाविशीतच बुढ्ढा बनलेल्या तरुणांना उसाठीचा गजल ऐकवतांना त्यांनी दुख—या गुडघ्यांमागचे हळवे मन मुखर केले.

मराठी साहित्य वैश्विक उंचीवर नेणा—या आणि आपल्या तत्वचितनपर साहित्याने येणा—या पिडयांमधील प्रतिभावंतांना बळ देणारे ज्ञानपीठ विजते कविवर्य विंदा करंदीकर हे रविवार दिनांक १४/३/२०१० रोजी सकाळी काळाच्या पडदयाआड गेले. ९१ वर्षांच्या विंदांच्या निधनाचे वृत्त थडकल्यानंतर उभ्या महाराष्ट्राने दु:खाचा एकच हुंदका दिला आणि गोविंद विनायक करंदीकर उपाख्य विंदा नावाचे एक पर्व अस्तंगत झाले.

तसेच शिवसेना नेते, माजी खासदार श्री. मधुकर सरपोतदार यांचे सुध्दा काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

वर उल्लेखिलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र.  ९४ अ</u>     <u>दिनांक:—१९/३/२०१०</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. गोविंद (विंदा) विनायक करंदीकर, श्री. मधुकर सरपोतदार यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे.  तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.२५ वाजता उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. विनोद ठाकुर यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:— २०/४/२०१०

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/४/२०१० रोजीच्या</u>
<u>सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

(१)

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा मंगळवार दिनांक २०/४/२०१० रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत उपमहापौर, श्री विनोद ठाकुर हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

उप–महापौर तथा पिठासिन अधिकारी –– श्री. विनोद ठाकुर

| | |
|---|---|
| १ | श्री. गायकवाड दिलीप |
| २ | श्री. रविंद्र दशरथ बागूल |
| ३ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत |
| ४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| ५ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान |
| ६ | श्री. राजू जग्यासी |
| ७ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती |
| ८ | श्री. ढोके जनार्दन किसनराव |
| ९ | श्री.एडके गणपत गोविंद |
| १० | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ११ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| १२ | श्रीमती अशान लिलाबाई लक्ष्मण |
| १३ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १४ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १६ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| १७ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| १८ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| १९ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

मा. महापौर –– १) श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र, सदस्य/सदस्या २) श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर, ३) श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील, ४) श्रीमती संगीता राजेश कंडारे, ५) श्री. रामसागर जनार्दन यादव, ६) श्री. मोरे भानजी भिकारी, ७) श्री. दत्तात्रय नारायण पवार, ८) श्री. विजय खंडु सुपाळे, ९) श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी, १०) श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज), ११) श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी, १२) श्रीमती सुजाता रमेश रिझवानी, १३) श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद, १४) श्री. राम (चार्ली) पारवानी, १५) श्री. हरेश परमानंद जग्यासी, १६) श्रीमती जया प्रकाश माखीजा, १७) श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, १८) डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी, १९) श्री. आयलानी कुमार उत्तमचंद, २०) श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम, २१) श्री. भठीजा (बब्बु) संजय, २२) श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे, २३) श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा, २४) श्री. लाल पंजाबी, २५) श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास, २६) श्रीमती शकुंतला पाटील, २७) श्री. मोहन (गारो) रामरख्यानी, २८) श्री. सुखरामानी महेश पहलाजराय, २९) ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी, ३०) श्री. लालबिहारी बुझारत यादव, ३१) श्रीमती महाडीक रजनी मोहन, ३२) श्रीमती पंचशिला नाना पवार, ३३) श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी, ३४) श्रीमती करोतीया मालती राधाचरण, ३५) श्री. मंगतानी सुंदर आसनदास, ३६) श्री. बोडारे धनंजय बाबूराव, ३७) श्रीमती बोडारे वसुधा धनंजय, ३८) कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल, ३९) श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे, ४०) श्री. शेखर केशव यादव, ४१) श्री. सुरेश मधुकर जाधव, ४२) श्री. प्रशांत किसनराव धांडे, ४३) श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, ४४) श्री. चव्हाण रमेश महादेव, ४५) श्री. किशोर जग्यासी, ४६) श्रीमती चेनानी ज्योती रमेश, ४७) श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी, ४८) श्रीमती ज्योती शाम माने, ४९) श्रीमती लता शांताराम निकम, ५०) श्री. मोहन साधवाणी, ५१) श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), ५२) श्री. बच्चाराम रूपचंदानी, ५३) श्रीमती मंजू ईश्वर

पोपटानी, ५४) श्रीमती विद्या विजय निर्मले, ५५) श्रीमती मीना सोनेजी (सोंडे), ५६) श्रीमती वनवारी मोना अशोक, ५७) श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), ५८) श्री. मुकेश सोहन तेजी, ५९) श्री. सुनिल साहेबराव गंगवानी, ६०) श्री. प्रकाश गणपत सावंत, ६१) श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी, ६२) श्री. राजेश नानीकराम वधारीया.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.
४. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
५. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
६. श्री. रमेश काजळे, उप कर निर्धारक व संकलन
७. श्री. भास्कर मिरपगारे, प्रभारी अग्निशमन अधिकारी
८. श्रीमती संगिता धायगुडे, उपआयुक्त (आरोग्य)
९. श्री. संतोष दहेरकर, उपआयुक्त
१०.श्री. हिबारे, स्वच्छता निरिक्षक
११.श्रीमती प्रतिभा कुलकर्णी, प्रभारी जनंसपर्क अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती अमिता संखे
३. श्रीमती नर्गिस खान

दुपारी १.१८ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

श्री. विनोद ठाकुर, उप महापौर तथा पिठासिन अधिकारीः– गणपुर्ती अभावी ही सभा पुढील सुचना देईपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :– मा. पिठासिन अधिकारी ही सभा पुढील सुचना देईपर्यंत स्थगित करण्यात येत आहे. व प्राप्त झालेल्या चारही लक्षवेधी रदद् कराव्या लागतील. चारही लक्षवेधीचे सुचक यासभेस उपस्थित नाहीत.

सदस्य श्री. जीवन इदनानीः– ठिक आहे, चारही लक्षवेधी सुचना रदद् कराव्या.

सदस्य श्री. बी.बी. मोरेः– सन्मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आज.................

सदस्य श्री. जीवन इदनानीः– सन्मा. महापौर साहेब, आयुक्त साहेब, आमचे वरिष्ठ सदस्य श्री. बी.बी. मोरे यांचा आज वाढदिवस आहे. आम्हा सर्वांच्या वतीने मोरे साहेबांना वाढदिवसांनिमित्त हार्दिक शुभेच्छा.

सदस्य श्री. जे. के. ढोकेः– सन्मा. महापौर साहेब, आत्ताच आमचे सन्मा. सदस्य जीवन इदनानी यांनी बी.बी. मोर यांच्या वाढदिवसानिमित्त सुचना मांडली तिला मी अनुमोदन देतो व सभागृहात मिठाई वाटप करण्यास अनुमती दिली जावी अशी विनंती करतो.

श्री. विनोद ठाकुर, उप महापौर तथा पिठासिन अधिकारीः– गणपुर्ती अभावी ही सभा पुढील सुचना देईपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

महापालिका सचिव :–कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी १.२५ वाजता उपमहापौर तथा पिठासिन अधिकारी श्री.विनोद ठाकुर यांनी पुढील सुचना देईपर्यंत सभा स्थगित करण्यात येत असल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— १८/६/२०१०

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८/६/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

१—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा मंगळवार दिनांक २०/४/२०१० रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा गणपुर्ती अभावी स्थगित झाल्याने ती सभा दिनांक १८/६/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

६. महापौर —— श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

७. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३३ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३४ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ५ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३५ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ६ | श्री. गायकवाड दिलीप | ३६ | श्री. रामसागर जनार्दन यादव |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३७ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ८ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ३८ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ३९ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४० | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४१ | श्री. शेखर केशव यादव |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४२ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १३ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४३ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४४ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४५ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १६ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४६ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १७ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४७ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ४८ | श्रीमती ज्योती शाम माने |
| १९ | श्री. राजू जग्यासी | ४९ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २० | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २१ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ५१ | श्री. रमेश चव्हाण |
| २२ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५२ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २३ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५३ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २४ | श्री. लाल पंजाबी | ५४ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २५ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ५५ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २६ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ५६ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २७ | श्रीमती शकुंतला पाटील | ५७ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| २८ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ५८ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| २९ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ५९ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३० | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६० | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |
| ३१ | श्री.एडके गणपत गोविंद | ६१ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ३२ | श्री. मुकेश सोहन तेजी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती चेनानी ज्योती रमेश, २. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ३. श्रीमती जया प्रकाश माखीजा, ४. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ५. डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी, ६. श्री. आयलानी कुमार उत्तमचंद, ७. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम, ८. ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी, ९. श्रीमती महाडीक रजनी मोहन, १०. श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी, ११. श्री. मंगतानी सुंदर आसनदास, १२. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान, १३. कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल, १४. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे, १५. श्री. किशोर जग्यासी, १६. श्री. मोहन साधवाणी, १७. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), १८. श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी, १९. श्री. सुनिल साहेबराव गंगवानी, २०. श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१४. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
१५. श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त
१६. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
१७. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त
१८. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
१९. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
२०. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
२१. श्री. एम. जवांदे, शहर अभियंता
२२. श्री. एस.के.सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
२३. श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
२४. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
२५. श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
२६. श्री. जी.जी. हिबारे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
२७. श्री. नंदु समतानी, प्र.प्रभाग अधिकारी
२८. श्री. जनार्दन देवकर, लिपिक, आरोग्य
२९. श्री. गायकवाड, शिक्षण अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव

४. श्रीमती अमिता संखे
५. श्रीमती नर्गिस खान

दुपारी ३.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—** ही सभा काही अपरिहार्य कारणास्तव पूढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यात यावी.

**काही सदस्य :—**सभा स्थगित करा.

**महापौर :—**ही सभा पुढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यात येत आहे. सर्वांच्या संमतीने सभा स्थगित ठराव पुढील प्रमाणे संमत करण्यात येत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक २०/४/२०१० रोजी स्थगित करुन दिनांक १८/६/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आलेली सभा काही अपरिहार्य कारणास्तव पूढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. १** **दिनांक : १८/६/२०१०**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २०/४/२०१० रोजी स्थगित करुन दिनांक १८/६/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज पुढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी ३.२० वाजता महापौर श्रीमती राजश्री चौधरी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)

महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:– १२/७/२०१०

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १२/७/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

**१—ब**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा मंगळवार दिनांक २०/४/२०१० रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा गणपुर्ती अभावी स्थगित झाल्याने ती सभा दिनांक १८/६/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजेची पुन्हा स्थगित झाल्याने सोमवार दिनांक १२/७/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर —— श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

२. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३५ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ३ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३६ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ४ | श्री. गायकवाड दिलीप | ३७ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ५ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३८ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३९ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४० | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ८ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४१ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४२ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४३ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ११ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | ४४ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १२ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४५ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १३ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४६ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १४ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४७ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १५ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४८ | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४९ | श्री. किशोर जग्यासी |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५० | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १८ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५१ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५२ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २० | श्री. राजू जग्यासी | ५३ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २१ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५४ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २२ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २३ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५६ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| २४ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५७ | श्री. मोहन साधवाणी |
| २५ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ५८ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २६ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५९ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २७ | श्री. लाल पंजाबी | ६० | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २८ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६१ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २९ | श्रीमती शकुंतला पाटील | ६२ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३० | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६३ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३१ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६४ | श्री. मुकेश सोहन तेजी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | श्री.एडके गणपत गोविंद | ६५ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३३ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६६ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३४ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ६७ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| | | ६८ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी, २. श्री. आयलानी कुमार उत्तमचंद, ३. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ४. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे, ५. श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास, ६. श्री. मोहन (गारो) रामरख्यानी, ७. श्री. ढोके जनार्दन किसनराव, ८. श्री. मंगतानी सुंदर आसनदास, ९. श्री. शेखर केशव यादव, १०. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), ११. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), १२. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी, १३. श्री. राजेश नानीकराम वधारीया

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
२. श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त
४. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
५. श्री. संगिता धायगुडे, उप–आयुक्त
६. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. एम. जवादे, शहर अभियंता
९. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१०.श्री. एम जी. गिरगावकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
११.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
१२.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१३.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१४.श्री. जी.जी. हिबारे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
१५.श्री. रमेश काजळे, प्र. प्रभाग अधिकारी
१६.श्री. नंदु समतानी, प्र.प्रभाग अधिकारी
१७.श्री. कुमावत, प्र. प्रभाग अधिकारी
१८.श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी
१९.श्री. प्राजक्ता कुलकर्णी, प्र. जनसंपर्क अधिकारी
२०.श्री. भास्कर मिरपगारे, अग्निशमन अधिकारी
२१.श्री. अभिजित महामुलकर, प्रोग्रामर, नासुके
२२. श्री. जनार्दन देवकर, लिपिक, आरोग्य विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती अमिता संखे
५. श्रीमती नर्गिस खान

दुपारी ३.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u>प्रश्न क्र. २१८ हा श्री. रमेश चव्हाण यांचा असून सध्या ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे त्यांच्या प्रश्नोत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

**?** **प्रश्न क्र. २१८** :— सन २००५ पासुन आजतागायत उल्हासनगर शहरामध्ये किती इमारती व बंगले बनविले? व किती पर्यायी सीडीचा उपयोग करुन एफ.एस.आय. दिले गेले आहेत?

अ. ज्या भुखंडांना पर्यायी सीडी दिली आहे त्यांचे आजचे स्थितीत सदरचे रेकॉर्ड तसेच मालकी व ताबा कोणाकडे आहे? व सद्यस्थिती काय आहे? उपविभागीय (SDO) अधिकारी, पवई उल्हासनगर–३ यांचेकडे किंवा महानगरपालिकेकडे?

ब. ज्या भुखंडांना पर्यायी सीडी देण्यात आलेली आहे व त्यांनी एफएसआय वाढविले आहेत त्यांची आजची स्थिती कशी आहे? त्यातील किती भुखंडावर किती घरे, झोपडया, चाळी आहेत? आणि ते अंदाजित किती जुने आहेत?

क. त्या भुखंडावरील रहिवासी यांना घरपट्टी पाण्याचे कनेक्शन दिलेले आहे काय? त्याच प्रमाणे येथे गटारे, पायवाट, सीसी पॅसेज आणि स्ट्रीट लाईट यांची सुविधा महानगरपालिकेकडुन पुरविल्या आहेत का?

म. शासन आणि मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वर्ष २००१ व २००५ पर्यंतच्या अनाधिकृत बांधकामास अधिकृत करावयाचे आहे, परंतु ज्या भुखंडांना अतिरिक्त वाढीव एफ.एस.आय. वाढुन देण्यात आलेला आहे त्या भुखंडावर ज्या चाळी, दुकाने व झोपडयांचे बांधकाम केलेले आहेत त्यांना जमिनिचा मालकी हक्क कसा देण्यात येईल? कारण एक जमिनीची विक्री दोंन वेळा कशी करण्यात येईल?

इ. वर नमुद केलेल्या सर्व बाबी थांबविण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेने कोणती उपाययोजना केलेली आहे? केली असल्यास ती लवकरात लवकर लागु करण्याचे आदेश दिले आहे का?

<u>उत्तर :—</u> सन २००५ पासून आजतागायत उल्हासनगर शहरामध्ये ५२४ बांधकामांना इमारत बांधकामाची परवानगी देण्यात आलेली असून सदरचे विषय उप–विभागीय अधिकारी यांच्या अखत्यारीतील आहेत. सदरचे विषय उप–विभागीय अधिकारी यांच्या अखत्यारीतील आहेत. पर्यायी सीडी देण्याचे काम उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयाशी संबधित असुन त्याबाबतचा तपशील उपलब्ध नाही. सदरचा मुदद्ा या विभागाशी संबंधित नाही.

<u>महापालिका सचिव :—</u>प्रश्न क्र. २१९ हा श्री. भारत राजवानी यांचा असून सध्या ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे त्यांच्या प्रश्नोत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

**?** **प्रश्न क्र. २१९** :— उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण व उल्हासनगर महानगरपालिका यांचे संयुक्त विद्यमाने निर्मल एम.एम.आर. अभियांना अंतर्गत सुलभ, वस्ती शौचालये बांधणेची मोहिम राबविणेत येत असून त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सुचक, समधानकारक, सविस्तर माहिती मिळावी ही विनंती.

प्र.क्र. १ (अ) निर्मल एम.एम.आर. योजने अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत कुठे व किकती सुलभ, वस्ती शौचालये बांधणेस मंजुरी देणेत आली आहे का? त्यापैकी किती शौचालयांची कामे सुरु आहेत व किती कामे बंद आहेत? शौचालयांची कामे कोणत्या अशासकिय संस्थांना दिली आहेत? प्रत्येक संस्थेस किती कामे दिली आहेत? सदर संस्थांना शौचालयांचे दुरुस्ती व बांधकामाचा अनुभव आहे का? त्या विश्वस्त मंडळाकडे नोंदणीकृत आहेत का? सदर संस्थांचे मागील तीन वर्षाचे ऑडीट झाले आहे का? त्यांनी आयकर भरल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे का? संस्थांनी वास्तुविशारदाची नेमणूक केली आहे का? विशारदाने आराखडे व नकाशे तयार केले आहेत का? शौचालयांची कामे सुरु करणे पुर्वी वस्ती सर्वेक्षण केले आहे का? सर्वेक्षणानुसार शौचालयांचा शिटला मान्यता देणेत आली आहे का? सुरु असलेल्या शौचालयांचे बांधकामावर महापालिका अभियंते देखरेख करतात का? देखरेख करीत असल्यास वेळोवेळी क्युब टेस्ट व मटेरियलची टेस्ट घेणेत येते का? घेणेत आलेल्या टेस्टमध्ये निष्कृष्ट दर्जाचे काम झाल्याचे निष्पन्न झाले आहे का? कोणत्या ठिकाणचे शौचालयाचे कामात निदर्शनास आले आहे?

<u>उत्तर :—</u> निर्मल एम.एम.आर. योजनेअंतर्गत उल्हासगनर महानगरपालिका हद्दीत पहिल्या टप्प्यामध्ये एकुण ९५ व दुसऱ्या टप्प्यामध्ये १५१ असे एकुण २४६ ठिकाणी शौचालय बांधण्यात मंजुरी देण्यात आली होती.

त्यापैकी १६३ शौचालयांची कामे सुरु आहेत व ८३ कामे बंद आहेत. अशासकीय संस्थानिहाय शौचालयांच्या कामांची यादी सोबत जोडली आहे. सदर संस्थाना शौचालयाचे दुरुस्ती व बांधकामाचा अनुभवाबाबतची माहिती यादी सोबत जोडली आहे. होय. परंतु त्यापैकी मे. जय दुर्गा माँ महिला सहकारी संस्था यांनी विश्वस्त मंडळामडे नोंदणीसाठी अर्ज सादर केला आहे. सेवाभावी संस्थांच्या यादीमध्ये नमुद आहे. सेवाभावी संस्थांच्या यादीमध्ये नमुद आहे.

होय. होय. सर्व संस्थानी वास्तुविशारदाची नेमणुक केलेली आहे. तसेच जागेवर सर्वेक्षण करुन त्यांचे नकाशे व प्राकलने तयार केली आहेत. होय. होय.सर्वेक्षणानुसार जागेच्या उपलब्धतेप्रमाणे व एमएमआरडीएन नेमुन दिलेल्या इष्टांकाच्या मर्यादित जास्तीत जास्त जागांवर सुविधा पुरविल्या जातील अशा प्रकारे प्राकलने व नकाशे तयार केले आहेत.

होय. सुरु असलेल्या शौचालयांचे बांधकामावर महापालिका अभियंते व सल्लागारांचे अभियते यांचेकडुन देखदेख करतात तसेच वेळोवेळी क्युब टेस्ट व मटेरियलची टेस्ट घेणेत येते. या योजनेअंतर्गत – पहिल्या टप्प्यातील खालील ०४ कामे–१) प्रभाग क्र ४४ महावीर किराणा स्टोअर्स येथील बैठकीचे वस्ती स्वच्छतागृह निष्कृष्ठ दर्जाचे आढळल्यावर पुर्णपणे निष्कासित करुन नव्याने बांधण्यात आले आहे. २) प्रभाग–. मधील विठ्ठल मंदिर ब्राम्हणपाडा, शांतीनगर येथिल २२ बैठकीचे वस्ती स्वच्छता गृहाचे सेप्टीक टॅकच्या परदीचे काम निष्कृष्ट दर्जाचे आढळुन आल्यावर त्वरीत निष्कासित करुन पुन्हा नव्याने बांधण्यात आले आहे.

३) प्रभाग क्र. १६ मधील विवेकानंद शाळेजवळील २४ बैठकीचे शौचालयाचे कॉलम निष्कृष्ट दर्जाचे आढळुन आल्यावर त्वरीत निष्कासित करुन नव्याने बांधण्यात आले आहेत. ४) प्रभाग क्र. ७ मधील करोतिया नगर येथिल शौचालयाचे सेप्टीक टॅकचे परदीच्या कॉन्क्रीटीकरणाचा काही भाग निष्कासित करुन नविन स्लॅब टाकणे पुर्वी नव्याने कॉक्रिटीकरण करण्यात आले.

<u>**महापालिका सचिव :–**</u>प्रश्न क्र. २२० हा श्री. भारत राजवानी यांचा असून सध्या ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे त्यांच्या प्रश्नोत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

**?**

**<u>प्रश्न क्र. २२० :–</u>** उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण व उल्हासनगर महानगरपालिका यांचे संयुक्त विद्यमाने निर्मल एम.एम.आर. अभियांना अंतर्गत सुलभ, वस्ती शौचालये बांधणेची मोहिम राबविणेत येत असून त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सुचक, समधानकारक, सविस्तर माहिती मिळावी ही विनंती.

ब) कामांचा खराब दर्जा, व कामे रखडणेची कारणे काय आहेत? खराब व निष्कृष्ट दर्जाचे काम होत असल्याबबात महापालिका सदस्य व नागरीकांनी तक्रारी केल्या आहेत का? कोणत्या कामाबाबत तक्रारी आल्या आहेत? सदर तक्रारीवर महापालिकेने कोणती कारवाई केली आहे का? केली असल्यास कोणती कारवाई केली आहे? कारवाई केली नसल्यास कारवाई न करणेची कारणे कोणती आहेत? कार्यारंभ आदेश ज्या अशासकिय संस्थांना देणेत आले आहेत त्याच संस्था शौचालयांची बांधकामे करीत आहेत का? त्यांनी अन्य पेटा ठेकेदारांना काम दिले आहे? यावर महापालिका प्रशासन देखरेख ठेवत आहे का?

<u>उत्तर :–</u> उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत निर्मल एमएमआर अभियाना अंतर्गत मु.म.प्र.वि.प्रा. यांचे परवानगीने नियुक्त केलेल्या अशासकिय संस्था मार्फत वस्ती शौचालये बांधण्यात येत आहेत.

सदर वस्ती शौचालयांचे बांधकामांचा दर्जा उत्तम असून संबंधित महापालिका अभियंता यांचे कार्यक्षेत्रातील निष्कृष्ट दर्जाचे आढळुन आलेले ४ कामे निष्कासित करुन त्यांची पनर्रबांधणी करण्यात आली आहे. पहिल्या टप्पयातील मु.म. प्र.वि.प्रा. यांनी नियुक्त केलेल्या अशासकिय संस्थांची कामे रखडली होती ती आता पुर्णत्वास येत आहेत.

या योजने अंतर्गत निष्कृष्ट दर्जाच्या कामांबाबत लेखी तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. परंतु महापालिका अभियंता यांना आढळुन आलेल्या खालील ४ निष्कृष्ट दर्जाची बांधकामे निष्कासित करुन पुनर्रबांधणी करण्यांत आली आहे. तसेच माननीय नगरसेवकांनी निदर्शनास आणून दिलेल्या कामांतील त्रृटी व दुरुस्त्या वेळोवेळी संबंधीत सेवाभावी संस्थेकडुन करुन घेण्यात आलेल्या आहेत व दुरुस्त्या करुन घेण्यात येत आहेत.

१) प्रभाग क्र. ४० महावीर किराणा स्टोअर्स येथिल बैठकीचे वस्ती स्वच्छतागृह निष्कृष्ट दर्जाचे आढळल्यावर पुर्णपणे निष्कासित करुन नव्याने बांधण्यात आले आहे.

२) प्रभाग–९ मधील विठ्ठल मंदिर ब्राम्हणपाडा, शांतीनगर येथिल २२ बैठकीचे वस्ती स्वच्छतागृहाचे सेप्टीक टॅकच्या परदीचे काम निष्कृष्ट दर्जाचे आढळुन आल्यावर त्वरीत निष्कासित करुन पुन्हा नव्याने बांधण्यात आले आहे.

३) प्रभाग क्र. १६ मधील विवेकानंद शाळेजवळील २४ बैठकीचे शौचालयाचे कॉलम निष्कृष्ट दर्जाचे आढळुन आल्यावर त्वरीत निष्कासित करुन नव्याने बांधण्यात आले आहेत.

४) प्रभाग क्र. ७ मधील करोतिया नगर येथिल शौचालयाचे सेप्टीक टॅकचे परदीच्या कॉक्रिटीकरणाचा काही भाग निष्कासित करुन नविन स्लॅब टाकणे पुर्वी नव्याने कॉक्रिटीकरण करण्यात आले आहे.

कार्यारंभ आदेश ज्या अशासकिय संस्थांना देणेत आले आहे त्यांनी त्यांचे मार्फत नियुक्त केलेल्या ठेकेदारामार्फत शौचालयांची बाधंकामे करीत आहेत त्यांवर महापालिका सार्वजनिक बांधकाम विभागाचे सनियंत्रण आहे. या योजनेमध्ये एमएमआरडीएने पहिल्या टप्पयातील नियुक्त केलेल्या तीन सेवाभावी संस्था, स्पार्क, युवक प्रतिष्ठान व जनसेवा यांचेमार्फत सुरु असलेल्या कार्यपदतीप्रमाणे दुस–या टप्प्यातील कामे स्थानिक सेवाभावी संस्था यांचे प्रतिनिधी मार्फत

काम करीत आहेत. परंतु संपुर्ण कामास महानगरपालिकेने निर्गमित केलेल्या कार्यारंभ आदेशातील तरतुदीप्रमाणे संबंधित सेवाभावी संस्था जबाबदार असणार आहे

<u>महापालिका सचिव :—</u>प्रश्न क्र. २२१ हा श्री. भारत राजवानी यांचा असून सध्या ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे त्यांच्या प्रश्नोत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. २२१ :—</u> उल्हासनगर महानगरपालिका हद्‌दीत मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण व उल्हासनगर महानगरपालिका यांचे संयुक्त विद्यमाने निर्मल एम.एम.आर. अभियांना अंतर्गत सुलभ, वस्ती शौचालये बांधणेची मोहिम राबविणेत येत असून त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सुचक, समधानकारक, सविस्तर माहिती मिळावी ही विनंती.

क) वार्ड क्रमांक ६७ मध्ये सुरु असलेल्या शौचालयांचे बांधकामांचा प्रस्ताव कोणत्या महापालिका सदस्याने सादर केला आहे. त्यांचे नाव व प्रस्ताव पत्राची प्रत मिळावी? याबाबत महासभेत मा. कार्यकारी अभियंता (साबांवि) यांनी शौचालयांचे बांधकाम दोन वार्डाचे सिमारेषेवर असल्याने चौकशी करु असे सांगितले होते. सदरची चौकशी करण्यात आली का? कोणी चौकशी केली आहे? शौचालयाचे ठिकाण वार्ढ क्र. ६६ व ६७ मध्ये निश्चित कोणत्या ठिकाणी आहे? याचा अहवालाची सत्यप्रत मिळावी. दिनांक २०/८/२००९ चे महासभेत सदर विषयावर चर्चेचे वेळी मा. उप महापौर यांनी निर्मल एमएमआर अभियानाअंतर्गत सुरु असलेल्या शौचालयांचे कामाचे चौकशीसाठी मा. महापौरांचे अध्यक्षतेखाली चौकशी नेमण्यात येईल असे सांगितले होते. त्यानुसार चौकशी समिती नेमण्यात आली आहे का? समिती नेमण्यात आली असल्यास समितीने चौकशी अहवाल सादर केला आहे का? त्याची प्रत सर्व महापालिका सदस्यांनी पुरविणेत आली आहे का? समिती नेमली नसल्यास कधी नेमण्यात येणार आहे? तसेच चौकशी अहवाल कधीपर्यंत प्राप्त होणार आहे?

<u>उत्तर :—</u> निर्मल एमएमआर अभियाना अंतर्गत वार्ड क्र. ६७ मध्ये सुरु असलेल्या शौचालयांचे बांधकामाची मागणी श्री. मोहन साधवानी या महापालिका सदस्य यांनी केली होती. याबाबत संबंधित उप अभियंता यांचेकडुन चौकशी करण्यात आली आहे.

सदर शौचालयाचे ठिकाण वार्ड क्र. ६६ व ६७ च्या दोन्ही वॉर्डाच्या सिमेवर आहे.

सबंधीत उप अभियंता यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत सोबत सादर करण्यांत येत आहे.

निर्मल एमएमआर अभियांनाअंतर्गत सुरु असलेल्या शौचालयाचे कामाचे चौकशीसाठी मा. महापौरांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आलेली नाही.

सदर चौकशी समिती नेमण्याबाबत मा. महापौर महोदया यांचेशी सल्लामसलत करुन चौकशी समितीची नेमणूक करणेची कार्यवाही केल्यानंतर चौकशी अहवाल सादर करणेत येईल.

यावेळी सदस्य श्री. रमेश चव्हाण यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापालिका सचिव :—</u>प्रश्न क्र. २२२ हा श्री. रमेश चव्हाण यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २२२ :—</u> महानगरपालिकेतील सर्व कर्मचारी वर्गाला मराठी भाषेचे ज्ञान आहे का? याबाबत

अ. महानगरपालिकेतील कर्मचा—यांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे का?

ब. उल्हासनगर महानगरपालिकेतील किती कर्मचारी यांनी मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे?

क. असल्यास किती कर्मचारी?

ड. ज्या कर्मचा—यांनी मराठी भाषेची परिक्षा दिलेली नाही त्यांचेवर काय कार्यवाही करण्यात आली?

म. ज्या कर्मचा—यांनी मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण केलेली नाही याची माहिती देण्यात यावी.

ज. तरी वरील सर्व बाबींची सविस्तर माहिती देण्यात यावी.

<u>उत्तर :–</u> शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. ममावा/–१०९४/५५१/प्र.क्र.३७/९४/२०–ब, दिनांक १९ ऑगस्ट १९९४ व दिनांक ८ डिसेंबर, १९८७ व अन्य शासकिय परिपत्रकाद्वारे सुचीत केल्याप्रमाणे शासकिय कर्मचारी वर्गाला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तथापी याबाबत उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत मागणी केलेली माहिती विस्तुत स्वरुपाची असल्याने ती संकलित करुन उपलब्ध करणेस काही अवधी देण्यात यावा.

**<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>** मा. महापौर महोदया, मा. उप–महापौर, आयुक्त साहेब, माझा प्रश्न असा होता की, महानगरपालिकेतील कर्मचा–यांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे का? याचे मला अदयाप उत्तर मिळालेले नाही. प्रश्न देवून किती दिवस झाले? अदयाप उत्तर का दिले नाही?

**<u>श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त (मुख्यालय):–</u>**मा. महापौर, उप–महापौर व आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे विस्तृत माहिती प्रत्येक कर्मचा–यांचे सेवापुस्तक तपासून यादी तयार करावी लागेल याला थोडासा अवधी लागेल. त्यामुळे ही माहिती मी पुढील सभेत देतो.

**<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>**मी प्रश्न विचारुन किती दिवस झाले? आता तर सर्व विभागांचे संगणकीकरण झाले आहे.

**<u>श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त (मुख्यालय):–</u>**आपला बराचशा कर्मचारी वर्ग निवडणूकीच्या कामासाठी व जनगणनेच्या कामासाठी गेला होता.

**<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>**आयुक्त साहेब, पुढील सभेत या विषयीची माहिती नक्की दया. त्यावेळेस पुन्हा पुढच्या सभेत माहिती दिली जाईल असे सांगु नका.

**<u>महापालिका सचिव :–</u>**प्रश्न क्र. २२३ हा श्री. बी.बी. मोरे यांचा आहे.

**<u>प्रश्न क्र. २२३ :–</u>** महाससभेत स्थायी समितीच्या आडमुठेपणाच्या धोरणावर चर्चा होवून निर्णय घेणेबाबत.

उल्हासनगर पालिकेत ७६ नगरसेवक निवडून आले आहे व पाच नगरसेवक कॉ.ऑप केलेले आहेत. असे ८१ नगरसेवकांची महापालिका असतांना त्यात १६ नगरसेवक स्थायी समितीत निवडून देतात व त्या १६ सदस्यात एक चेअरमन असतो. सन २००९–१० साठी स्थायी समितीने १६ सदस्यांना (८) आठ लाख निधी मंजुर करुन दिला तो निधी कोणत्या कारणास्तव मंजुर केला व तो निधी पास करतांना महासभेचा परवाना का घेण्यात आल नाही. स्थायी समिती महासभेला न विचारता असा निधी पास करु शकते का? करत असल्यास कुठल्या कायदयाने स्थायी समितीला असे अधिकार कोणी दिलेत याचा खुलासा व्हावा व नंतर स्थायी समितीने बाकी आठ सदस्य निवडून आले त्यांना तीन लाख निधी मंजूर केला हे कारण काय महापालिकेत फक्त स्थायी समिती व तिचे २४ सदस्य काम करताहेत का? इतर सदस्यांना त्यांच्या प्रभागात निधी नको का असा भेदभाव स्थायी समिती चेअरमन करत असेल तर या पुढे कुठलाही प्रस्ताव अथवा निधी बाबत महासभेला न विश्वासात घेतले तर महासभेची आवश्यकता आहे का? कृपया महासभेत यांचेवर सखोल चर्चा होणेस विनंती.

<u>उत्तर :–</u> मा. स्थायी समिती ठराव क्र १४७ दिनांक २७/२/२००९ अन्वये वर्ष २००९–१० च्या अर्थसंकल्पिय 'अ' अंदाजपत्रक भाग–२ क्र ४ बांधकाम (२५) मधील रु.१.५० कोटीच्या तरतूदीमधून १६ कामांच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. परंतू या लेखाशिर्षातर्गातील तरतूदीमधून आधीचे मा. सदस्यांसह नवनिर्वाचित मा.सदस्यांनीही कामाची मागणी केली असल्याने याबाबत मा.आयुक्त सो.यांचे दालनात मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, कार्यकारी अभियंता (साबांवि), शहर अभियंता यांचे उपस्थितीत आयोजित केलेल्या ८.०० लक्ष एवढया रक्कमेची कामे व नवनिर्वाचित सदस्यांना प्रत्येकी ३.०० लक्ष निधिची कामे हाती घेण्यात यावी असे ठरले.

त्याप्रमाणे सर्व कामांचे प्रस्ताव तयार करुन त्यास मान्यता घेऊन कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. उक्त लेखाशिर्षातील ठेवलेल्या तरतूदीच्या मर्यादित स्थायी समितीने खर्च करण्याकरीता प्रति सदस्य मंजूरी दिलेली असल्याने व त्यात खर्चात कोणतीही वाढ होत नसल्याने समायोजनाचा कोणताही प्रस्ताव मा. महासभेत ठेवणे अभिप्रेत नव्हतें. कामांत प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यास स्थायी समिती सक्षम आहे.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :– सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, मी प्रश्न विचारला होता की, स्थायी समितीमध्ये १६ सदस्य आहेत आणि त्या स्थायी समितीला असे कुठले अधिकार दिले आहेत की, त्यांनी त्यांचे १६ सदस्यांसाठीच आठ आठ लाख रुपये मंजुर करुन घ्यावेत? आणि उल्हासनगर महापालिकेत जे इतर सदस्य असतील त्यांना एकही पैसा मंजुर करु नये असे कुठल्या कायदयात आहे? असा प्रश्न मी विचारला होता. तर त्यावर त्यांनी सांगितले आहे की, काही सदस्यांना आम्ही आठ लाख रुपये मंजुर केले आहेत. आणि काही नवनिर्वाचीत सदस्यांना ३ लाख मंजुर केले आहेत, मला तरी असे वाटते की, मी स्वत: सदस्य आहे. मला एक लाख काय एक दमडी सुध्दा मंजुर करण्यात आलेली नाही. असा भेदभाव का? याचे मला महासभेत सविस्तर उत्तर दिले पाहिजे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–सन्माननिय सदस्याने प्रश्न विचारला आहे त्याचे संबंधित कोणी अधिकारी उत्तर देणार आहे का की महासभा अशीच स्थगित राहणार आहे?

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–संबंधित अधिकारी सभागृहात आलेले नाहीत का? नाही आहेत? सन्माननिय सभागृहाला मी अशी विनंती करतो आणि सन्माननिय महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब यांना विनंती करतो की, आज माझी तब्येत बरी नसतांना, फ्लुने आजारी असतांना सुध्दा नगरसेवक म्हणुन मी महासभेत हजर राहु शकतो. त्याचे कारण काय की, आम्हांला ज्या लोकांनी निवडून दिले ज्या लोकांनी मतदान केले, त्या जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही महासभेत तातडीने येतो. मात्र संबंधित अधिकारी महासभेत उपस्थित राहत नाहीत असे कित्येक वेळा झालेले आहे? ही गोष्ट बरोबर नाही. आमच्या सभागृहाला व महापालिकेला लाजिरवाणी गोष्ट आहे. त्यात अधिकारी हजर राहु शकत नाही म्हणजे काय? दोन वेळा महासभा स्थगित झालेली आहे व २–२,३–३ महिन्याचे प्रश्न आहेत, हे प्रश्न सुटले नाही तर मलातरी असे वाटते की, अधिकारी काम करत नाहीत. असा याचा अर्थ होतो. म्हणुन मी अशा अधिका–यांचे या सभागृहासमोर निंदा करतो आणि पुढच्या सभेत उत्तर मिळाले नाही तर अशा अधिका–यांवर कारवाई करावी एवढी मी विनंती करतो. आणि माझे भाषण पुर्ण करतो.

महापालिका सचिव :–श्री. मोरे साहेब, संबंधित अधिकारी आता सभागृहात आले आहेत, आपणांस आपला प्रश्न आता विचारायचा आहे काय? की पुढील सभेत विचारायचा आहे? संबंधित आले असल्याने आपण आपला प्रश्न विचारला पाहिजे, आपण आपला प्रश्न विचारुन घ्या.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–नाही, नाही. श्री. मोरे साहेब, तुम्ही तुमच्या प्रश्नाचे त्यांच्याकडुन उत्तर घ्या ना? संबंधित अधिकारी आलेले आहेत. स्थायी समितीच्या १६ सदस्यांना निधी दिला जातो इतर सदस्य काय सदस्य नाहीत? त्यांना त्यांच्या प्रभागात विकासाची कामे करायची नाहीत? ते काय निवडून आलेले नाहीत काय? फक्त स्थायी समितीचे १६ सदस्यच निधी घेणार आहेत काय? विचारा, विचारा प्रश्न विचारुन घ्या. कायदयात तरतुद आहे का? फक्त स्थायी समितीच्या १६ सदस्यांनाच निधी भेटणार काय?

सदस्य श्री.बी.बी.मोरे :–श्री. धांडे साहेब, एक लक्षात घ्या. एकदा सभागृहाच्या समोर सन्माननिय सदस्याने आणि सर्वांनी संबधित अधिका–याचा निषेध करुन संबंधित सदस्य जेव्हा खाली बसतो आणि नंतर पुन्हा तो विषय उपस्थित करायचा हे माझ्या माहितीप्रमाणे बरोबर दिसत नाही. म्हणुन आणि आता ती वेळ गेलेली आहे. पुढच्या वेळेला बघु ना? काय हरकत आहे? ठिक आहे पुढील सभेत या प्रश्नाचे योग्य प्रकारे उत्तर देण्यात यावे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–अहो, श्री. मोरे साहेब, काय सेटींग झाली का?

महापालिका सचिव :–प्रश्न क्र. २२४ हा श्री. मोहन साधवानी यांचा आहे.

प्रश्न क्र. २२४ :– टोटल हाउ मेनी प्लॉन उल्हासनगर म्युनिसीपल कॉर्पोरेशन अप्रुव्हड फोर्म १.४.२००८ टू १५.११.२००९. काईंडली गिव मी द डिटेल्स इन प्रभाग समिती वाईज (लाईक १,२,३,४) इन द फोलोविंग फॉर्मेट.

१. डेट

२. अप्रुव्हड

३. नेम ॲण्ड अडरेस ऑफ पर्सन

४. टोटल एरिया पास

५. रेसिडंटल ऑर कर्मर्शिअल

६. वेदर द प्लॉन इज अप्रुव्हड ऑन रिजर्व प्लॉट

७. डेट ऑफ वर्क स्टारटेड

८. डेट ऑफ प्लिंथ सर्टीफिकेट

उत्तर :— आपण नमुद केलेल्या कालावधीतील यादी सोबत जोडत आहेत, उर्वरित माहिती अद्यावत करावयाचे काम सुरु आहे.

सदस्य श्री. मोहन साधवानी :— मा. महापौर, मा. उप—महापौरजी, मी आयुक्त साहेबांना विचारु इच्छितो की, माझ्या प्रश्नाचे उत्तर कोण देणार? आपण देणार की, नगररचना विभागाचे अधिकारी देणार? १५ नोव्हेंबरला मी एक प्रश्न विचारला आहे. त्याचे जे उत्तर दिले आहे तेही अर्धवट आहे.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, आज नगररचनाकार नाहीत, सहा. संचालक नगररचना यांना आज सभेस उपस्थित राहण्याबाबतीत सांगण्यात आले होते. ते कल्याण महानगरपालिकेत बसलेले आहेत. महासभेस येतो म्हणुन त्यांनी सांगितले होते परंतु ते अदयाप आलेले नाहीत. आले तर ते उत्तर त्यांच्याकडुनच घ्यावे लागेल.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—१५ नोव्हेंबर २००९ ला मी प्रश्न विचारला आहे आणि आता १२ जुलै, २०१० आहे. अदयापपर्यंत पुर्णपणे उत्तर दिलेले नाही. काम चालु आहे एवढेच लिहिले आहे व उत्तरे जे दिले आहे ते सुध्दा हाताने लिहुन दिले आहे. आपणाकडे सर्व विभागांचे संगणकीकरण झाले असतांनाही शाळेतील मुले जशी लिहितात त्याप्रमाणे आम्हांस या प्रश्नाचे उत्तर हाताने लिहून दिले आहे. आणि ते सुध्दा अर्धवट? तर पुढील महासभेत मला या प्रश्नाचे सविस्तर उत्तर दिले पाहिजे. मी प्रश्न विचारला आहे की, १/४/२००८ पासुन १५ नोव्हेंबर २००९ पर्यंत किती प्लान मंजुर केले आहेत? त्यांच्या तारखा, प्लान मंजूर केल्याचा दिनांक आणि ज्याच्या नावाने प्लान मंजुर केला त्याचे नाव आणि पत्ता, मंजुर केलेल्या प्लानचे क्षेत्र आणि रहिवास वापरासाठी की व्यवसायिक वापरासाठी आहे? आणि जर आरक्षित भुखंडावर प्लान मंजुर केला असेल तर, आणि कामास सुरुवात झाल्याची तारीख आणि प्लींथ सर्टिफिकेट दिल्याचा दिनांक या आठ प्रश्नांपैकी फक्त दोन,तीन प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे आणि पाच प्रश्नांचे उत्तर दिलेले नाही. काय या बाबतचे उत्तर पुढील महासभेत देणार?

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—सचिव साहेब, नगररचनाकारां विरुध्द जी चौकशी समिती बसविली होती. तिचा अदयाप आम्हांला काही निर्णय मिळालेला नाही. त्यांच्यावर काही कारवाई करण्यात आली आहे की, ते निर्दोष असल्याचे आढळुन आले आहे, त्याबाबतीत आम्हांला काही उत्तर मिळालेले नाही.

महापालिका सचिव :—या बाबतचा विषय नियमित सभा सूचनेवर आहे.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—सचिव साहेब, हा प्रश्न प्रलंबित राहिल ना?

महापालिका सचिव :—प्रश्न क्र. २२५ हा श्री. प्रकाश सावंत यांचा आहे.

**?** प्रश्न क्र. २२५ :— ४५५ अनधिकृत इमारतींचे सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने यापुढे शहरात एकही अनधिकृत बांधकाम होवू देवू नये असे स्पष्ट आदेश दिलेले असतांनाही निवडणूकीचे काळामध्ये उल्हासनगरात किती अनधिकृत बांधकामे बांधण्यात आली? निवडणूकीनंतर मा. आयुक्त यांचे आदेशानुसार किती बांधकामे बांधण्यात आली? सन २००९ मध्ये किती लोंड बेरींग व इमारतींना बांधकाम परवानगी देणेत आली? बांधण्यात आलेले बांधकाम अनधिकृतपणे विनापरवानगी बांधलेले असल्यास/बांधकाम परवानगी दिलेली नसल्याने सदरची अनधिकृत बांधकामे का निष्कासीत करणेत आली नाहीत? कधी निष्कासीत कारण्यात येणार आहेत?

<u>उत्तर :—</u> प्रभाग समिती क्र १ अंतर्गत एकूण १५  अनधिकृत बाधंकाम निदर्शनास आलीत. ७ बांधकामे रंगरंगोटी व गीलावाचे व ८ वाढीव अनधिकृत बांधकामापैकी ७ बांधकामे निष्कासीत करण्यात आले व एक बांधकाम न्याय प्रविष्ट आहे.

प्रभाग समिती क्र २ या कार्यक्षेत्रात निवडणूकीच्या काळात एकूण १६ अनधिकृत बांधकामे झाली होती. त्यापैकी १३ बांधकामांचे निष्कासन करण्यात आले आहे व ३ बांधकामे निष्कासित करण्याकरिता नोटीस बजावण्यात आली आहे.

मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार यापुढे शहरात एकही अनधिकृत बांधकाम होवू नये असे स्पष्ट आदेश दिलेले आहेत. परंतू निवडणूकीच्या काळात आचारसंहितेच्या फायदा घेवून काही अनधिकृत बांधकामे केलेली आढळून आलेली आहेत. त्यापैकी

अ) प्रभाग समिती क्र ३ मध्ये एकुण ८ अनधिकृत बांधकामे आढळून आलेली आहेत.

ब) एकही नाही.

क) लोड बेअरींग व इमारतींची बांधकाम परवानगी नगररचना विभाग, उ.म.पा. यांचेमार्फत देण्यात येते.

ड) निवडणूक काळात बांधण्यात आलेली ७ अनधिकृत बांधकामे या कार्यालयामार्फत निष्कासित करण्यात आलेली आहेत व उर्वरीत १ बांधकामांना नोटीस बजावण्यात आलेली आहेत.

इ) पुरेसा पोलिस बंदोबस्त उपलब्ध झाल्यावर उर्वरीत अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात येतील.

मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार यापुढे शहरात एकही अनधिकृत बांधकाम होवू नये असे स्पष्ट आदेश दिलेले आहेत. परंतु निवडणूकीच्या काळात आचारसंहितेचा फायदा घेवून काही अनधिकृत बांधकामे केलेली आढळून आलेली आहेत, त्यापैकी

अ) प्रभाग समिती क्र ४ मध्ये एकूण १४ अनधिकृत बांधकामे आढळून आलेली आहेत.

ब) एकही नाही.

क) लोड बेअरिंग व इमारतींची बांधकाम परवानगी नगररचना विभाग, उ.म.पा. यांचेमार्फत देण्यात येते.

ड) निवडणूक काळात बांधण्यात आलेली ७ अनधिकृत बांधकामे या कार्यालयामार्फत निष्कासित करण्यात आलेली आहेत. व उर्वरित ७ बांधकामांना नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

इ) पुरेसा पोलिस बंदोबस्त उपलब्ध झाल्यावर उर्वरीत अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात येतील.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u> मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, हा जो प्रश्न मी विचारला होता, त्यास सहा महिने होवून गेले आहे.  आता यामध्ये काय प्रगती आहे?  तेथे इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले असून त्यापुढील प्रगती काय आहे?  याचे उत्तर मला पुढील महासभेत दयावा. अशी मी आपणांस विनंती करतो. आणि ते बरोबर असावे कारण की आता जे उत्तर दिलेले आहे ते बरोबर नाही.  माहित नाही, आमच्या अधिकारात नाही अशी उत्तरे दिली जातात.  अशा प्रकारची उत्तरे देणे बरोबर नाही.  व्यवस्थित उत्तरे दयावे अशी मी आपणांस विनंती करतो.

<u>महापालिका सचिव :—</u>प्रश्न क्र. २२६ हा श्री. मोहन साधवानी यांचा आहे.

? <u>प्रश्न क्र. २२६  :—</u> प्लीज लिस्ट द फोलोविंग क्युशन इन द नेस्ट जनरल बॉडी मिटींग.

१.  व्हाय द सीनीरीटी ऑफ श्रीमती सिमा टेजवानी, बीएससीए बीएड वर्कींग इन जसमल किशनचंद सिंधी इंग्लीस प्राईमरी स्कुल हॅस बिन सपरसडेड बाय ज्यु. टीचर विथ द अप्रुव्हल ऑफ ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफीसर.

२.  व्हाय सी.नं. १३,१४,१५ ॲण्ड १६ हॅव्ह बिन अेकन सिनिअर टु श्रीमती सिमा टेजवानी इग्नोरिंग हर सी. नं. १२ इन द सिनिरीटी लिस्ट अप्रुव्हड बाय ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफिसर.

३.  वॉट आर द रिजन फोर एक्ल्युशन ऑफ सिरिअल नं. १२ इन द ॲप्रुव्हड सिनिरेटी लिस्ट

४.  हु इज टू बी हेल्ड रिसपॉन्सिबल फोर इलिगल ॲप्रुव्हल ऑफ सिनिरेटी लिस्ट.

५. व्हाय इनसस्टीज हॅस बिन अलोवेड टु बि प्रिपिटयुएटेड.

उत्तर :– १. जसनमल किशीनचंद शिरंगी या इंग्रजी माध्यमाच्या अनु. शाळेत इ.१ ली चे ७ वी चे प्रत्येकी १ वर्ग तुकडी मंजूर आहेत त्यामुळे शिक्षक निश्चितीकरण निकषानुसार सदर शाळेस इ.१ली ते ४थी साठी ४ शिक्षक व इ.५वी ते ७वी साठी १.३ प्रमाणे ३ डि.एड. शिक्षक व १ प्रशिक्षित पदवीधर असे एकूण ४ शिक्षक ४ शिक्षक देय ठरतात. शाळेत १ स्वतंत्र मुख्या. याप्रमाणे मुख्याध्यापकासह ८ शिक्षकपदे मंजूर आहेत. या कार्यालयाने श्रीम. तेजवानी या शिक्षिकेस सेवाजेष्ठता असलेल्या पदवीधर शिक्षिका श्रीम. रेखा फुलसंगे यांना पदवीधर शिक्षिका मंजूरी दिलेली आहे. श्रीम. तेजवानी या बी,डी.शै. पात्रता धारण करणाऱ्या शिक्षिकेची सेवाजेष्ठता डावलून त्यांच्यापेक्षा कमी सेवा असलेल्या शिक्षकाची अनु. मंजुरी या कार्यालयाने दिलेली नाही. शासन नियमानूसार व संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार या कार्यालयाने शिक्षक अनु. मंजूरी दिलेली आहे.

सदस्य श्री. मोहन साधवानी :– ठिक आहे.

महापालिका सचिव :–प्रश्न क्र. २२७ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

? प्रश्न क्र. २२७ :– महापालिकेने आरक्षित केलेल्या शिट नं. ६७ खेळाच्या मैदानासाठी राखीव भुखंड क्र. १६ बाबत खालील प्रश्नांची सूचक समाधानकारक व सविस्तर उत्तरे मिळणेबाबत.

प्र.क्र. १ अ) प्रशा/कॅम्प/प्र.भुमापक/राखीव जागा/जा.क्र. ४३७, दिनांक १२/७/१९८७ मध्ये प्रशासन शहर वसाहत (प्रांत विभाग) ने उल्हासनगर परिषदेस शिट नं. ६७ खेळाच्या मैदान
ासाठी राखीव भुखंड क्र. १६ चा ताबा दिला आहे. त्या भुखंडावर कोणाची मालकी आहे?

ब) महापालिकेच्या ताब्यातील इतर भुखंड आरक्षित जे प्रांत विभागाने महापालिकेच्या ताब्यात दिले आहे त्याच्यावर मालकी हक्क कोणाचा आहे?

क) महापालिकेच्या ताब्यातील आरक्षित भुखंडावर विकासकाने इमारत बांधकाम परवानगी, नकाशे महापालिकेने मंजुर केले आहे का? किंवा अशा भुखंडावर महापालिका प्लॉन मंजुर करण्यास परवानगी देवू शकते का?

ड) महापालिका ताब्यातील प्रत्येक आरक्षित भुखंडाची सद्यस्थिती व ताबा कोणाकडे आहे याची माहिती देण्यात यावी?

सदर प्रश्नांची माहिती समाधानकारक व सविस्तर उत्तरे येत्या महासभेत देण्यात यावे ही विनंती.

उत्तर :– कागदोपत्री ताबा दिलेला आहे.

कागदोपत्री ताबा दिलेला आहे.

नाही, कुंपण भिंत देण्यात आलेली आहे.

कागदोपत्री ताबा दिलेला आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– ठिक आहे.

महापालिका सचिव :–प्रश्न क्र. २२८ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

? प्रश्न क्र. २२८ :– महासभेत महापालिका नागरीसुविधा केंद्र विभागाचे केलेल्या खाजगीकरणाबाबत विचारलेल्या खालील प्रश्नांची योग्य, सुचक व समाधानकारक उत्तरे मिळणेबाबत.

प्रश्न क्र अ) उल्हासगनगर महानगरपालिका नागरीसुविधा केंद्र विभागाचे खाजगीकरण करण्यात आले आहेत?

प्रश्न क्र ब) खाजगीकरण झाले असल्यास कोणत्या एजन्सीला ठेका देण्यात आला आहे..? किती वर्षासाठी? वार्षीक किती रक्कम ठेकेदारास द्यावे लागणार आहेत? करारनामा झाला आहे का? त्या मधील अटी व शर्ती कोणत्या आहेत? करारनामाची प्रत द्यावी.

प्रश्न क्र क) त्या एजन्सीचे नांव व ठेकेदाराचे नांव नोंदणीकृत क्रमांक द्यावी? त्या एजन्सीचे वार्षिक उलाढाल (टर्नओवर) किती आहे? ठेकेदाराकडुन बॅक गॉरंटी घेतली आहे का? किती?

प्रश्न क्र ड) सदर एजन्सीने किती जणांना नियुक्त केले आहे? त्या प्रत्येक कर्मचाऱ्यांची नांवे/पत्ता /वय/ शैक्षणिक अर्हता/ नियुक्त पद या सर्वांनी तपशिलवार माहिती द्यावी.

प्रश्न क्र प) महापालिकेच्या नागरीसुविधा केंद्रचे खाजगीकरण करणेकामी महासभा व स्थायी समितीची मंजुरी घेतली आहे का? मंजुरी घेणे आवश्यक आहे का? मंजुरी घेतली असल्यास त्याचा ठराव क्रमांक व दिनांक द्यावा?

प्रश्न क्र फ) खाजगीकरण केलेल्या विभागात महापालिका कर्मचारी काम करत आहेत का? असल्यास महापालिका कर्मचारी का करतात?

प्रश्न क्र भ) नागरीसुविधा केंद्र खाजगीकरण केलेल्या विभागात संगणक कोणाचे वापर करण्यात येणार आहेत? संगणकांची दुरुस्ती कोणामार्फत करण्यात येणार आहे?

प्रश्न क्र ध) खाजगीकरण केलेल्या विभागातील कर्मचाऱ्यांना किती मासिक वेतन देण्यात येत आहे?

प्रश्न क्र थ) प्रत्येक नागरीसुविधा केंद्र स्थापनेसाठी महापालिकेचा किती खर्च झाला आहे?

तरी सदर प्रश्नांची योग्य सुचक उत्तरे देण्यात यावी हि विनंती.

<u>उत्तर :–</u> होय

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना महानगरपालिकशी संबधित विविध सेवा, जन्म–मृत्यु दाखले, करभरणा, विविध परवाने इत्यादी सेवा त्यांचे जवळील क्षेत्रामध्ये उपलब्ध करुन देणेकामी शहरात बांधा, वापरा व हस्तांतरित करा () पध्दतीने १० वर्षाचे कालावधीसाठी नागरिक सुविधा केंद्रे प्रस्थापित करण्यात आलेली आहेत. सदर प्रकल्प () जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान अतंर्गत अनिवार्य करण्यात आलेल्या सुधारणा कार्य{मानुसार कार्यान्वयीत करण्यात आलेला आहे.

याबाबतचा ठेका न्युनतम निविदाकार मे. सन डिजीटल या कंपनीस देण्यात आलेला आहे. सदर काम हे बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर दहा वर्षाचे कालावधीसाठी देण्यात आलेले आहे. याकरिता राज्य शासनाच्या महासेतु प्रकल्पाचे धर्तीवर प्रती एक परिपुर्ण सेवा () ११.५० पैसे इतका न्युनतम दर वाटाघाटी अंती मान्य करण्यात आलेला आहे. करारनाम्याची प्रत सोबत जोडली आहे.

एजन्सीचे नाव मे. सन डिजीटल असुन ठेकेदाराचे नाव श्री. संजय नाईक हे आहे. संस्थेचा नोंदणीकृत क्रमांक सी.ई.२०३८१ आहे. सदर संस्थेची वार्षिक उलाढाल ही ५४.४ लाख इतकी आहे. सदर ठेकेदाराकडुन रु.१० लाख इतकी बॅक गॅरंटी घेतलेली आहे.

सदर इजन्सीकडून घेतलेल्या माहितीनुसार एजन्सीमार्फत १९ मुलांना नियुक्त केले असून याबदद्लची सविस्तर माहिती सोबत जोडली आहे.

सदर प्रकल्प हा जवाहरलाल नेहरु राष्ट्रिय नागरी पुर्ननिर्माण अभियान नुसार राबविण्यात येत असून त्यासाठी महासभा ठराव क्र ५० दिनांक ३१/०८/२००७ व स्थायी समिती ठराव क्र ४८ सदर ठरावांची प्रत सोबत जोडण्यात आलेल्या आहे.

खाजगीकरण हे केवळ नागरिंकाशी संबंधीत कामकाज () चे झालेले असुन (अर्जावरील कार्यवाही) ही महापालिकेच्या अधिकारी / कर्मचारी यांचे मार्फत होते. त्याचप्रमाणे कांउटरवरिल खाजगी कर्मचाऱ्यांवर माहिती तंत्रज्ञान विभागाचे संपुर्ण नियंत्रण आहे तशा प्रकारचा करार करण्यात आला आहे.

शहरातील सर्व केंद्रावर एजन्सी मार्फत केबिन, संगणक, प्रिंटर,युपिएस, ए.सी, व साहित्य बसविण्यात आलेली आहेत. केवळ महापालिका मुख्यालयातील उपलब्ध संगणक सर्व्हर नेटवर्कीग वापण्याची मुभा सदर एजन्सीस देण्यात आलेली असून सदर बाब निविदेतील अटी व शर्तीमध्ये नमुद आहे. केवळ महापालिका मुख्यालयातील उपलब्ध सर्व्हर, संगणकांची देखभाल माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे करण्यात येते.

सदर एजन्सीकडून घेतलेली माहितीनुसार त्यांचे अधिनस्त कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण कालावधी अंर्तगत रु.२५००/– व प्रशिक्षण कालावधी समाप्ती परिक्षेनंतर रु.३५००/– इतके वेतन अदा करण्यात येते.

सदर प्रकल्प हा बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर उभारण्यात आलेला असून महानगरपालिकेला स्थापनेचा कोणताही खर्च आलेला नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>या प्रश्नाचे उत्तर कोण देणार? जन्मु–मृत्यु दाखला देण्यासाठी एका संस्थेची नेमणूक केली आहे असे आपण उत्तर दिलेले आहे. आता तेथे नागरीकांना ज्या काही असुविधा होत आहेत त्याची आपणांस सुध्दा माहिती आहे की नाही? याबाबत मी स्वत: कित्येक वेळा आपणाकडे आलेलो आहे. तेथे पैश्याची मागणी केली जाते, पैसे दिले तरच आम्ही आपणांस हे दाखले देवू असे तेथे सांगितले जाते. त्याबाबतीत आपणांस काय सांगायचे आहे?

<u>श्री. अभिजित महामुलकर(प्रोग्रामर, नासुके):–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, नागरी सुविधा केंद्रात जन्मु–मुत्यु देण्याच्या कामाचे जे खाजगीकरण करण्यात आलेले आहे नागरीकांकडुन अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांना टोकन क्रमांक दिला जातो. त्यानंतर त्यांना काउंटरवरच त्या विषयीचे उत्तर मिळावे, संबंधित विभागात त्यांना फे–या माराव्या लागु नयेत यासाठीच आम्ही नागरी सुविधा केंद्र तयार केलेले आहे. परंतु स्वाक्षरी करणारे दुसरे प्राधिकारी असल्याने याकामी काही वेळा विलंब होत असतो.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>विलंबाची गोष्ट नाही, दाखले देण्यासाठी नागरीकांकडुन पैश्याची मागणी केली जाते. नाव आपणांस सुध्दा माहिती आहे परंतु मी त्या व्यक्तीचे येथे नाव घेत नाही. मी आपणांस सुध्दा पैसे मागणा–या व्यक्तीचे नाव सांगितले आहे, आपणांस सुध्दा ते नाव माहित आहे. डॉक्टर साहेबांचे सुध्दा त्याविषयी तक्रार आहे. लोकांच्या लेखी तक्रारी आहेत की, अमुक एक व्यक्ती एवढे पैसे मागत आहे, दोष कोणाला दयायचा? जो चालवत आहे त्यास की आपल्या अधिका–यास दोष दयायचा?

<u>श्री. अभिजित महामुलकर(प्रोग्रामर, नासुके):–</u>सर, त्यामध्ये आमचे महापालिकेचे कर्मचारी आहेत, ते खरे तर वैदयकीय आरोग्य अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली आहे. त्यांची तक्रार सुध्दा आली आहे. त्यांची बदली सुध्दा केली आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>त्यांच्या ऐवजी कोण दुसरा कर्मचारी आला आहे का?

<u>श्री. अभिजित महामुलकर(प्रोग्रामर, नासुके):–</u>नाही, अदयाप या कर्मचा–यांना कार्यमुक्त केलेले नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>आयुक्त साहेब, तेथे लोकांना ब–याच असुविधा आहेत. जन्म–मृत्यु दाखल्यासाठी जे नागरीक येतात त्यांना बिना पैश्याने दाखले दिले जात नाहीत. ज्या कर्मचा–यांच्या बदल्या झालेल्या आहेत त्यांना कार्यमुक्त करुन त्यांच्या जागी दुसरे कर्मचारी ठेवले जावेत.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. महापौरजी, श्री. भुल्लर महाराजजी, आपल्या अनुमतीने मी बोलु इच्छितो की, ....

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>मा. महापौरजी, श्री. कात्या नावाचा एक कर्मचारी तेथे आहे. त्याच्या विषयी एक उदाहरण आपणांस सांगतो. माझ्या प्रभागातील एका व्यक्तीचे निधन झालेले, त्यांचा मुलगा, एकतर तो दु:खात त्यानंतर मृत्यु दाखला देण्यासाठी त्याला कमीत कमी १०–१५ फें–या मारावयास लावल्या. नागरी सुविधा केंद्रामध्ये जन्म आणि मृत्यु दाखला मिळविण्यासाठी येथे एवढा काही त्रास आहे की सांगु नका. त्या विभागाचा प्रमुख कोण आहे? तिथे कुणीही लक्ष देत नाही. तेथे सर्व पैश्याचा व्यवहार चालला आहे. या कर्मचा–याव्यतिरिक्त आणखी कुणीतरी एक महिला कर्मचारी आहे. तिचे नाव काही कळलेले नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>महिला कर्मचारी असल्यामुळे तिला कुणी काही बोलुच शकत नाही.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. महापौरजी, मी आपणांस एक ताजे उदाहरण सांगु इच्छितो. नुकतेच माझ्या प्रभागातील माझे मित्र श्री. राजु वासवानी यांचा मुलगा नदीमध्ये बुडुन मृत्युमुखी पडला. त्याचे २२ तारखेला रात्री निधन झाले व त्याच्या पोस्टमार्टमची २३ तारीख दाखविली. व ते सर्व कागदपत्र नागरी सुविधा केंद्रात सादर केले गेले. तेथे एक महिला कर्मचारी बसते ती मुत्यु दाखला देण्यास तयार नाही. ती काय म्हणते एकतर २२ तारखेची २३ करा किंवा २३ तारखेची २२ करा. हा काय प्रकार आहे? जर कुण्या व्यक्तीचे २२ तारखेला रात्री निधन झाले असेल आणि २३ तारखेला कल्याण येथे पोस्टमार्टम केले असेल १२ वाजेनंतर जर पोस्टमार्टम होत आहे तर त्यामध्ये २३ तारीख लिहिले आहे. ती लोकांना सांगते की तुम्ही काहीही करा आणि ते दुरुस्त करुन आणा. येथे घरी कुणाचा मृत्यु झाला आहे व त्यांना येथे सारख्या फे–या मारावयास सांगते. माझ्या सोबत स्वत: डॉक्टर तेथे येवुन त्या महिला कर्मचारीस सांगितले आहे की, जर २२ तारखेस त्याचा मृत्यु झाला आणि २३ तारखेस त्याचे पोस्टमार्टम झाले तर ही

एक सामान्य बाब आहे, तर आपण त्यांना मृत्यु प्रमाणपत्र सादर करा. परंतु आज अजुनपर्यंत त्याची एन्ट्री झालेली नाही आहे. ही स्थिती आहे आज आमच्या महापालिकेतील कर्मचा—यांची जे दाखला देतात. आपण जरा पहा, त्याबाबत आपण काय करु शकता ते?

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:—</u>आयुक्त साहेब, माझ्या प्रभागात ६ जानेवारी २०१० ला एका मुलाचा जन्म झाला आहे. व तो श्री. कात्या नावाचा कर्मचारी सांगतो या मुलाच्या जन्माची नोंद नाही आहे. हे कागदपत्र आणा, ते कागदपत्र आणा. त्यानंतर तुम्हांस जन्म दाखला मिळविण्यासाठी कमीत कमी पंधरा फे—या माराव्या लागल्या. त्या व्यक्तीने श्री. कात्या नावाच्या कर्मचा—यास सर्व कागदपत्र दाखविली तरीही तो म्हणतो की, आमच्याकडे जन्माची नोंद नसल्याने आम्ही काहीही करु शकत नाही, हे काय आहे? व ते हजार पंधराशे रुपयाची मागणी करत आहेत, हे काय चालले आहे? १०, पंधरा रुपय खर्चाचे ठिकाणी हजार, पंधराशे रुपये मागतात हे काय आहे?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. आयुक्त साहेब, जन्म आणि मृत्यु दाखला संदर्भातील हा जो प्रश्न आहे त्या संदर्भात मी एक प्रश्न विचारु इच्छितो की, मृत्यु दाखला घेण्याचा अधिकार कुणास आहे? या संदर्भात एक प्रश्न उद्भवला होता. ज्या बाबत मी आपले मा. सचिव श्री. कुकरेजा साहेब यांचा सल्ला घेतला होता. एखादया व्यक्तीचे निधन झाल्यानंतर त्या व्यक्तीचा मुत्यु दाखला घेण्याचा अधिकार त्या व्यक्तीचे जवळचे नातेवाईक यांचा आहे की, मृत्यु दाखला ही एक सार्वजनिक संपत्ती आहे, ती कुणीही घेवु शकतो. या बाबत महासभेत उत्तर मिळाले पाहिजे. कारण की, एका व्यक्तीस जवळचे कुणीही नातेवाईक नसल्यामुळे आपली मिळकत तीन, चार व्यक्तींच्या नावाने केली होती. परंतु त्या तीन चार व्यक्तीनी त्यांचा मुत्यु दाखला मागण्यासाठी अर्ज केला. तेव्हा येथे असे सांगण्यात आले की, त्या व्यक्तीचे जे जवळचे नातेवाईक आहेत त्यांनाच मृत्यु दाखला दिला जाईल. याबाबत जेव्हा मी आमचे आदरणीय श्री. प्रकाश कुकरेजा यांना विचारले तेव्हा त्यांचे उत्तर असे होते की, ही एक सार्वजनिक संपत्ती आहे. ती कुणीही घेवु शकते. परंतु या दाखल्यासाठी येथे त्या लोकांना दोन,तीन महिने चकरा मारावयास लावल्यानंतर नंतर काय झाले ते माहित नाही. तो दाखला कशाप्रकारे दिला किंवा नाही, किंवा काय देणे घेण झाले जसे की, श्री. भुल्लर महाराज यांनी एका प्रकरणात विषय सांगितले. तर आपल्या येथे संदिग्धता निर्माण केली जाते. यासाठी मृत्यु दाखला मागण्याचा अधिकार कुणास आहे ते कृपया येथे सांगितले जावे.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदया, जन्म मुत्यु दाखल्याचे महापालिका एक नोंदवही तयार करते. हे दोन्ही दस्तऐवज हे सार्वजनिक दस्तऐवज आहेत. एकदा का अभिलेख्यात नोंदणी झाली की या दस्तऐवजांची कुणीही मागणी करु शकतो. त्यासाठी मागणी करणारा व्यक्ती हा मयत व्यक्तीचा जवळचा नातेवाईक असला पाहिजे असे काही बंधन नाही. एकदा का महापालिकेच्या अभिलेख्यामध्ये त्यांची नोंदणी झाली की सार्वजनिक मालमत्ता संबोधून त्याची प्रत मागणीप्रमाणे कुणालाही दिली जावु शकते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> त्या लोकांना एवढे दिवस कशाप्रकारे त्रास देण्यात आला. याबाबत श्री. कुकरेजा यांच्याकडुन आपण माहिती घ्या, ते येथे बसलेले आहेत. एखादया व्यक्तीसाठी जर एखादा व्यक्ती, एखादया बॅकेमध्ये पाच,दहा लाख रुपये ठेवलेले असतील, भलेही त्या व्यक्तीकडे मृत्युपत्र असेल की, त्यांनी माझ्या नावाने ही रक्कम बॅकेत ठेवलेली आहे. परंतु जोपर्यंत मयत व्यक्तीचा मला मृत्यु दाखला मिळत नाही तोपर्यंत मला ते पैसे मिळणार नाही. असे सांगितल्या नंतरही वारंवार त्यास फे—या मारण्यास लावण्यात आल्या व त्याच्याकडुन काही रक्कमेची मागणी सुध्दा करण्यात आली की, अमुक एवढी रक्कम दिल्यानंतरच आपणास हा दाखला देण्यात येईल. नाहीतर त्याचा जो जवळचा नातेवाईक आहे त्यास आपण घेवुन या. त्या व्यक्तीस ना मुलगा आहे ना मुलगी आहे. जवळचा नातेवाईक कुणास मानणार? अशाप्रकारे या महापालिकेस हलाखीची स्थिती आहे. जन्म आणि मृत्यु दाखला देण्याच्या कार्यप्रणालीत आपण अयशस्वी ठरलो आहोत. आम्ही लोकांना सांगतो की, आपणांस एक तासात किंवा दोन तासात तुम्हांला जन्म किंवा मृत्यु दाखला मिळेल. परंतु याप्रकारचे कोणतेही काम वेळेवर होत नाही. मी येथे एक जन्म दाखला घेण्याचे एक छोटेसे काम टाकले होते येथे श्री. अभिजीत उपस्थित आहेत त्यांना तुम्ही विचारा. कितीवेळा मी तेथे कार्यालयात गेलो, तेथे सर्व कागदपत्रांची नोंद आहे, परंतु तेथे सही करणारा कुणी अधिकारी उपस्थित नव्हते. हे जन्म दाखला देण्यासाठी सही करणार कोणच नाही? आज मॅडम नाही आहेत, डॉक्टर नाही आहेत. आज आमची ही स्थिती आहे तर जनतेची काय स्थिती होत असणार? येथिल डॉक्टरांना शिकवावे लागेल किंवा त्यांची पॉवरची वाटणी करावी लागेल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>आयुक्त साहेब, जन्म व मृत्युची नोंदणी नागरी सुविधा केंद्रामध्ये होत असते. डॉक्टर साहेब याबाबत आपली सुध्दा चर्चा वारंवार झालेली आहे. आता हा विषय आपल्याशी संलग्न आहे. आपल्या विभागातील कर्मचारी व शिपाई यांच्यावर आरोप आहे की, ते वांरवार पैश्याची मागणी करतात. हे आपल्या निदर्शनास आल्यावर सुध्दा आपण त्यांच्यावर काही कारवाई केलेली नाही. श्री. महाराज यांचे म्हणणे आहे की आपणाकडे त्याबाबत लेखी तक्रार सुध्दा केलेली आहे. याबाबत आधी मी यावर आपणाकडे चर्चा केली होती. आपण त्यावेळेस

८०,८० दाखले प्रलंबित होते. मी आपणांस सांगितल्या नंतर आपण त्यावर सहया केल्या आहेत ही माझ्या समोरची गोष्ट आहे. याचा संबंध आपल्याशी आहे की डॉ. रेलवानी यांच्याशी आहे? आपण आता असे उभे आहात की, आपणांस काही माहितच नाही आहे?

डॉ. राजा रिजवानी (वैदयकीय अधिकारी):—डॉ. रेलवानी यांच्याकडे तो पदभार आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आपणाकडे तो पदभार नाही आहे.

डॉ. राजा रिजवानी (वैदयकीय अधिकारी):—जर त्या रजेवर गेल्या तर मी त्यावर स्वाक्षरी करतो.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—त्या सुट्टीवर गेल्यावर? इतर वेळेस नाही?

डॉ. राजा रिजवानी (वैदयकीय अधिकारी):—हो, इतर वेळेस नाही.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :— त्या नसतांना आपण सहया करतात तर आपली काय जबाबदारी आहे? एक म्हणजे लोकांना सुविधा हव्यात. त्या सुट्टीवर जातात तेव्हा तुम्ही सहया करतात. म्हणजे त्या सुट्टीवर जाणार तेव्हा सहया होतील व तद्नंतर प्रलंबित राहील? आयुक्त साहेब, आपले हे लक्षात आले का की एक एक महिन्यापर्यंत लोकांना थांबावे लागते. हे अपयश आपले आहे, जर एक विभाग अपयशी होत आहे, दोन तासात जन्म व मृत्यु दाखला मिळत नाही तर आपले लक्ष कोठे आहे? आपण काय करत आहात? म्हणजे आयुक्त, महापौर , महासभा लोकांना कितीही सुविधा देण्याचा प्रयत्न करणार व आपल्या सारखे अधिकारी असेल तर लोकांना सुविधा मिळणार नाहीत?

डॉ. राजा रिजवानी (वैदयकीय अधिकारी):—साहेब, आयुक्त साहेबांचे असे आदेश आहेत की, जर डॉ. रेलवानी मॅडम नसतील त्या सुट्टीवर असतील तर डॉ. रिजवानी साहेब सहया करतील, व डॉ. जिंदे साहेब नसतील तर त्या दोघांच्या अनुपस्थितीत मला सहया करण्याचे अधिकार आहेत. जर ते उपस्थित असतील तर सहया करण्यास ते दोघेही जबाबदार आहेत. जर ते दोघेही नसतील तर मी सहया करतो. हे श्री. अभिजित यांना सुध्दा माहित आहे. व सर्वांना सुध्दा माहित आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—याचाच अर्थ श्री. भुल्लर महाराज यांनी जो आरोप केला आहे की आम्हांला एका महिन्यापासुन फिरावे लागले तर हे खरोखर सत्य आहे.

डॉ. राजा रिजवानी (वैदयकीय अधिकारी):—नाही, नाही, जेव्हा श्री. राजु जग्यासी व श्री. जमनादास पुरस्वानी यांची केस होती त्यावेळेस मी स्वतः ती हाताळली.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—ही तर सभागृहात चर्चा चालली आहे, जन्म व मृत्यु दाखल्याविषयीची बाब येथे आलीच नाही पाहिजे. इतकी साधी गोष्ट आम्ही लोकांना देवु शकत नाही तर काय सुविधा देणार?

डॉ. राजा रिजवानी (वैदयकीय अधिकारी):—साहेब, महत्वाची गोष्ट म्हणजे हे काम लिपिकाचे आहे लिपिक आमच्याकडे नाहीत. फक्त दोन लिपिक आहेत, श्री. कात्या यांची प्रभाग समिती ४ मध्ये बदली झाली. ज्यास आम्ही आज कार्यमुक्त केले. श्रीमती शारदा यांना सुध्दा कार्यमुक्त केले. मी कार्यमुक्त आदेश तयार केला ते पाहुन त्या निघुन गेल्या.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आज महासभा आहे म्हणुन कार्यमुक्त केले? हा प्रश्न कधीचा आहे? प्रश्न कधी विचारला आहे?

डॉ. राजा रिजवानी (वैदयकीय अधिकारी):—साहेब, जनगणनेच्या कामात त्यांची ऑर्डर निघाली होती. त्या जनगणनेमध्ये होत्या. त्यांना ऑर्डरच हातात घेतली नव्हती.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—नाही महासभा असल्यामुळे आज त्यांना आपण ऑर्डर दिली. म्हणजे आपल्या सहमतीने हे चालले होते. येथे पैसे घेण्याचा विषय चालु आहे हे आपणांस निदर्शनास आणुन दिल्यानंतर सुध्दा आपण त्यांना तेथेच बसविले आहे? आपली सहमती होती कि आपला त्यामध्ये सहभाग होता.

डॉ. राजा रिजवानी (वैदयकीय अधिकारी):—साहेब, ऑर्डर आता आली आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—कुणाची?

डॉ. राजा रिजवानी (वैदयकीय अधिकारी):—श्रीमती शारदा यांची.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आपण हा आदेश कधी काढला होता? आपणांस श्री. महाराज भुल्लर यांनी निदर्शनास आणुन दिल्यानंतर की श्री. राजु जग्यासी यांनी निदर्शनास आणुन दिल्यानंतर? निदर्शनास आणुन दिल्यानंतर आपले काम होते की.....................

डॉ. राजा रिजवानी (वैदयकीय अधिकारी):—१२ मे चा जनगणनेचा आदेश आहे, आज त्या येथे आल्या आज त्यांना मी कार्यमुक्त केले.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—त्यांना आपण कार्यमुक्त केले, परंतु तेथे कुणी नविन कर्मचारी येईल, जर आपली काम करण्याची पध्दत बरोबर नसेल तर त्यास जबाबदार आपण आहात. आपली काम करण्याची पध्दत कशी पाहिजे आपला विभाग कसा असला पाहिजे हे आपणावर अवलंबुन आहे. जो कोणी नविन कर्मचारी येईल तो तसाच करेल. त्यास काही फरक पडणार नाही. आपण काय पध्दत अवलंबतात, आपले जर कामावर लक्ष असेल तर बरे होईल. लोक खराब नसतात ते खराब होतात.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—एका दिवसात किती जन्म—मृत्यु दाखले निघतात?

श्री. अभिजित महामुलकर (प्रोग्रामर, नासुके):—एका दिवसात ११० जन्म व मृत्युचे दाखले निघतात

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—११० जन्म व मृत्युचे दाखले आपणास बनवावे लागतात. ११० दाखल्यासाठी विभागात काय व्यवस्था असली पाहिजे?

श्री. अभिजित महामुलकर (प्रोग्रामर, नासुके):—आपल्या येथे पाच कॅम्प आहे, पाच कॅम्पमध्ये हे काम वाटण्यात आले आहे.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—याचा अर्थ एव्हरेज २० कॅम्पमध्ये?

श्री. अभिजित महामुलकर (प्रोग्रामर, नासुके):—ज्या, ज्या प्रभागामध्ये हॉस्पीटल आहेत, स्मशानभुमी येतात, तेथे विभाजन करुन दिले गेले आहेत. तेथुन आमच्याकडे नोंदी येतात. ५ कॅम्पातील ५ लिपिक याची नोंद रजिस्टरमध्ये करुन त्याची ताबडतोब नोंद संगणकावर घेतली जाते. काही कागदपत्र तयार करावी लागतात, त्या कागदपत्रांची छाननी करुन दाखले दिले जातात.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—कर्मचारी नाहीत, लिपिक नाहीत, अशी कारणे सांगितली जातात परंतु हा एवढा गंभीर विषय आहे. एखादयाला मृत्यु दाखला पाहिजे, आणि त्यासाठी एक, एक, दोन,दोन महिने त्यास फे—या माराव्या लागत आहेत. जसे श्री. जमनादास पुरस्वानी यांची तक्रार आहे, श्री. राजु जग्यासी यांची तक्रार आहे. श्री. भुल्लर महाराज यांची तक्रार आहे की, मृत्यु दाखला मिळविण्यासाठी लोकांना दोन, दोन महिने फे—या माराव्या लागत आहेत. आपण सर्वजण या परिस्थितीतुन गेलो आहोत किंवा आपणांस जावे लागणार आहे. आज ज्या कुण्या नागरीकांना त्रास होत आहे तोच त्रास उदया आपल्या मुला—बाळांना येवु शकणार आहे, हे तर आपण मान्य करु शकतो. त्या व्यवस्थेस ठिक करणे हे येणा—या पिढीसाठी कर्तव्य नाही काय? यासाठी लिपीक नाही किंवा कुणी अधिकारी नाही, कुणी अधिकारी स्वाक्षरी करत नसेल तर दुसरा करेल. दुसरा करत नसेल तर तिसरा करेल. हा तर्क कुणी मान्य करु शकतो काय? सर्वसामान्य समाज हा तर्क मान्य करु शकतो का? आपणाकडे एक किंवा दोन लिपिक आहेत, जर आपणांस दिवसभरात १०० दाखल्यांवर सहया करायच्या आहेत तर उल्हासनगर शहर पाच कॅम्पामध्ये विभागलेले आहे. आपणाकडे जे काही अर्ज येतात त्यावर दोन किंवा तीन दिवसामध्ये निर्णय झाला पाहिजे आणि तशाप्रकारचा फलक त्याठिकाणी लावण्यात आला पाहिजे. एकाच खिडकीवरुन आपण दाखले वितरीत केले पाहिजेत. त्यासाठी तीन दिवसाच्या ठिकाणी चौथा दिवस लागता कामा नये. लोकांना असे वाटले पाहिजे की, आज बारा तारखेला मी अर्ज दिला आहे तर पंधरा तारखेला मला दाखला मिळाला पाहिजे. त्यांना जी काही पोच पावती दिली असेल ती घेवुन ते येतील व दाखला घेवुन जातील. जर एखादया प्रकरणात कागदपत्रांची कमतरता असेल किंवा एखादे प्रकरण वादग्रस्त असेल किंवा राजकिय स्वरुपाचा तयार केलेला कुठला एखादा विषय नसेल तर आणि जर एखादा सर्वसाधारण विषय

असेल तर तो वेगळा असतो. बाकी सर्वसामान्य नागरीकांना या दाखल्यांसाठी जर महिनोनमहिने फिरावे लागावे? आणि अशा परिस्थितीत एक साधारणश: दाखल्यासाठी आम्ही महासभेचा वेळ खर्ची घालायचा? दाखला वेळेवर मिळाला पाहिजे. त्यानंतर पुढील गोष्टींचा आपण विचार करु शकतो. यासाठी मा. महापौरजी आपण आदेश दिला पाहिजे की, जन्म–मृत्यु दाखल्यासाठी तीन दिवसांच्यापुढे लागता कामा नये. चौथा दिवस लागत असेल तर त्यासंबंधी जो कुणी कर्मचारी असेल मग तो कितीही मोठा असो त्यास काहीना काही शिक्षा ही केलीच पाहिजे.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>मा. आयुक्त साहेब, मला वैद्यकीय अधिका–यांना अशी विचारणा करायची आहे की, आपण जे म्हणता की, लिपिक नाही, लिपिक नाही याचा अर्थ काय? रजेवर आहे असे आपण सांगु शकता. लिपिक नाही असे कसे सांगता? एखादा व्यक्ती उल्हासनगर–४ येथुन जन्म–मृत्यु दाखल्यासाठी येथे येत असेल आणि त्यास जर तुम्ही सांगितले की, लिपिक नाही तर मग त्यांनी काय परत जायचे? येण्यासाठी त्यांनी ३० रुपये खर्च केलेले असतात आणि जाण्यासाठी ३० रुपये खर्च करायचे? अशा प्रकारे एका कामासाठी एका फेरीत ६० रुपये खर्च करायचे? आज लिपिक नाही, परवा दुसरा कुणी नसेल त्यापुढील दिवशी आपण नसाल हे काय चालले आहे? मी तर असेही सांगु इच्छितो की, जन्म–मृत्यु दाखल्यांसाठी तीन दिवसच काय, त्याच्याकडे जर सर्व कागदपत्र असतील तर त्याच दिवशी त्यास वेळी त्यास दाखला मिळाला पाहिजे. डॉक्टर साहेब, आपण आता काही वेळापुर्वी आपण म्हणत होतात ना की, डॉक्टर रेलवानी मॅडम नाहीत. नाहीत म्हणजे काय? कामावर असतील तर मग त्या कामावर आहेतच ना? नाहीत याचा अर्थ काय?

<u>डॉ. राजा रिजवानी (वैद्यकीय अधिकारी):–</u>ज्या अर्जदारांची कागदपत्र पुर्ण आहेत जसे की, मृत्युचे कारण, स्मशानभुमीचा दाखला अशा प्रकारची ज्यांच्याकडे कागदपत्र आहेत त्यांच्याकडुन आम्ही ती घेतो, आम्ही त्यांना परत पाठवित नाहीत. जर यदा कदाचित जर कुण्या अर्जदाराकडे पुरेशी कागदपत्र नसतील तरच त्यास आम्ही परत पाठवितो. एरवी आम्ही अशा अर्जदारांना परत पाठवितो असे कधीही झालेले नाही.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>आता आपण जे काही बोलत आहात ते चुकीचे बोलत आहात. आपण थोडया वेळापुर्वी म्हणाला होतात की, जर डॉक्टर नसतील तर...............

<u>डॉ. राजा रिजवानी (वैद्यकीय अधिकारी):–</u>समजा जर डॉक्टर नसतील तर मी आहेच ना?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>नाही आहेत म्हणजे? सुट्टीवर आहेत का? सुट्टीवर असतील तर वेगळे आहे परंतु आपण म्हणालात की डॉक्टर नाहीत. म्हणजेच त्या कामावर आहेत परंतु तेथे नाहीत. याचाच अर्थ कामावर आहेत आणि नाहीतही. याचा अर्थ काय? आयुक्त साहेब, जर एखादया व्यक्तीकडे जन्म–मृत्यु दाखला मिळविण्यासंदर्भातील सर्व कागदपत्र असतील आणि तो जर दाखला घेण्यासाठी तो दाखला न घेता परत गेला नाही पाहिजे याची तुम्ही काळजी घ्या आणि तशी व्यवस्था करा. अन्यथा संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>आजच्या घडीला जन्म–मृत्यु दाखल्यांची नोंद करण्यासाठी पुरेसे कर्मचारी आहेत. आपण म्हणाल की, नोंदणी केलेली आहे परंतु स्वाक्षरी करणारे अधिकारी उपस्थित नाहीत. यासाठी मी आपणांस असे विचारु इच्छितो की, जन्म–मृत्यु दाखल्यांची नोंद करण्यासाठी आपणाकडे पुरेसे कर्मचारी आहेत किंवा नाहीत.

<u>सदस्य श्री. गणपत एडके :–</u>मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, काही वेळेस काही व्यक्ती जन्म–मृत्यु दाखला मिळविण्यासाठी आवश्यकत ती कागदपत्र घेवुन महापालिकेत येतात. त्यांना दाखले तयार करुन न देता संबंधित काही लिपिक त्यांची कागदपत्रे स्वत:कडे घेवुन ठेवतात. जन्मानंतर पंधरा किंवा सोळा दिवसानंतर जन्म दाखल्यामध्ये नोंद करण्यासाठी आवश्यक असतें. या मुदतीनंतर नोंद करण्यासाठी १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर सत्यप्रतिज्ञापत्र दयावे लागते. पंधरा दिवसाच्या कालावधीत संबंधित लिपिक कागदपत्रांमध्ये अमुक हे कागदपत्र नाहीत, ते कागदपत्र नाही असे सांगुन उडवाउडवीचे उत्तरे देवुन, हे आणा ते आणा असे सांगतात. आणि त्यामध्ये पंधरा दिवसाचा कालावधी निघुन जातो. आणि त्याव्यक्तीस १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर सत्यप्रतिज्ञा करावी लागते. मृत्यु दाखल्यासाठी डॉक्टर कडुन पोस्टमार्टम रिपोर्ट त्याच बरोबर स्मशानभुमीची पावती असतांनाही पोलिस पंचनामा मागितला जातो. त्यामुळे चार वर्षापासुन एका व्यक्तीला मृत्यु दाखला मिळालेला नाही. आणि बरीच उदाहरणे अशी आहेत की, संबंधित अधिका–याच्या नावाने पैसे मागितले आहेत. त्यांना मी त्यांच्यासमोर उभे केले आहे, तरी सुध्दा त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. आज जन्म–मृत्यु दाखला देण्यामध्ये फार मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार चालला आहे, याकडे लक्ष देण्यात यावे.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>जन्म–मृत्युची नोंद करण्यासाठी आपणाकडे पुरेसे कर्मचारी उपलब्ध आहेत का?

<u>श्री. अभिजित महामुलकर (प्रोग्रामर, नासुके) :—</u>नाहीत. सर्व सफाई कामगार संवर्गातील कर्मचारी दिलेले आहेत. जन्म—मृत्यु दाखल्यांच्या नोंदीसाठी फक्त तीन लिपिक दिलेले आहेत. बाकी सर्व सफाई कामगार संवर्गातील कर्मचारी आहेत. याबाबतीत विभागाचे असे म्हणणे आहे की, या कर्मचा—यांना कुठेही स्वाक्षरी करायची नाही त्यांना फक्त जन्म मृत्युच्या नोंदी शोधायच्या आहेत. सद्यस्थितीत तीन लिपिक आहेत. पाच कॅम्पांसाठी पाच लिपिक असले पाहिजेत.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—</u>मा. महापौरजी, समजा असे कुणी कुटुंब आहे जे एकटेच राहत आहे. आणि दुर्देवाने त्यांच्या पतीचे निधन झाले आहे. आणि त्या घरातील महिला कधी घरातुन बाहेर पडलेली नाही. अशा महिलेस आपल्या पतीचा मृत्यु दाखला मिळविण्यासाठी १०, १५ फे—या माराव्यास लावल्या जातात आणि प्रत्येक वेळेस हे एक कागदपत्र घेवुन या, ते घेवुन या असे सांगीतले जाते. तर आयुक्त साहेब आपण असे करु शकत नाहीत काय की आपण आपल्या रजिस्टरमध्ये त्यांच्या मृत्युची नोंद घेवुन त्यांना सांगावे की, दाखल्यासाठी आपण अमुक अमुक ही कागदपत्रे घेवुन या, ही कागदपत्र आणल्यानंतर लगेच आपणांस मृत्यु दाखला दिला जाईल. ई—गर्व्हनन्स मध्ये आपले महापालिकेचे काम फार चांगल्या प्रकारे चाललेले आहे त्याबाबतीत श्री. अभिजित साहेब, यांचे आम्ही नेहमीच चांगले नाव काढतो. त्यांच्यामुळेच ई—गर्व्हनन्सचे काम चांगल्याप्रकारे चालले आहे. परंतु ई—गर्व्हनन्सबाबतीत नेहमी आम्हांला असे विचारले जाते की, आपणांस मृत्यु दाखला किती दिवसात मिळतो. त्याबाबती काहीही उत्तर देता येत नसल्यामुळे नाईलाजास्तव आम्हांला गप्प रहावे लागते.

<u>श्री. अभिजित महामुलकर (प्रोग्रामर, नासुके) :—</u>जेएनएनयुआरएमच्या योजनेत इंटरनेटवरुन दाखले देण्याचा प्रस्ताव आहे. जशीही जेएनएनयुआरएम ई—गर्व्हनन्स येईल..........

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—</u>जेएनएनयुआरएमची आपण वाट का पाहत आहात? तुम्ही आताच सुरुवात का करत नाहीत?

<u>श्री. अभिजित महामुलकर (प्रोग्रामर, नासुके) :—</u>आपणाकडे आता आता निधी आलेला आहे. थोडयाच दिवसात ही योजना कार्यान्वीत होईल.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—</u>आपण निश्चित असा कालावधी सांगा.

<u>श्री. अभिजित महामुलकर (प्रोग्रामर, नासुके) :—</u>लवकरच निविदेस अंतिम स्वरुप दिले जाईल, सहा महिन्यामध्ये ऑन लाईन दाखले देण्याचा आमचा मानस आहे. त्यामुळे यासाठी नागरीकांना येथे येण्याची आवश्यकता पडणार नाही.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>मृत्युची नोंद करण्यासाठी स्मशानभुमीमध्ये महापालिकेचे कर्मचारी असतात का? याचे उत्तर दया. होय किंवा नाही?

<u>डॉ. राजा रिजवानी(वैद्यकीय अधिकारी):—</u>साहेब, एक कॅम्प वगळता इतर कॅम्पांमध्ये या कामी कर्मचारी आहेत.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>कॅम्प नं. १,२ साठी लिपिक नाही.

<u>डॉ. राजा रिजवानी(वैद्यकीय अधिकारी):—</u>कॅम्प नं. १ व २ साठी एकच स्मशानभुमी आहे. कॅम्प नं. ३ च्या स्मशानभुमीमधील लिपिक आताच सेवानिवृत्त झालेला आहे. त्याठिकाणी आम्ही अदयाप दुसरा लिपिक नियुक्त केलेला नाही. कॅप नं. ४ च्या स्मशानभुमीत लिपिक आहे. फक्त कॅम्प नं. ५ च्या स्मशानभुमीत लिपिक नाही. मात्र त्याठिकाणी लिपिकाची नियुक्ती केलेली आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>उल्हासनगर शहरामध्ये रोजच एवढया मोठया प्रमाणावर दु:खद निधन होतात, त्यांची नोंद करण्यासाठी स्मशानभुमीत लिपीक नाहीत. आणि आपण आम्हांस अशा प्रकारे उत्तर देत आहात? किती मोठी दु:खाची ही गोष्ट आहे. स्मशानभुमीसाठी ज्याची नेमणुक झालेली आहे. त्याने ताबडतोब तेथे हजर झाले पाहिजे. आणि त्याने तेथे रोज हजेरी लावली पाहिजे त्याने महानगरपालिकेत येता कामा नये. तो कर्मचारी सकाळपासुन संध्याकाळपर्यंत तेथेच हजर राहिला पाहिजे. आज या महासभेत आम्ही बोलल्यानंतर उदया तुम्हांला करायचे तेच तुम्ही करणार? पण आयुक्त साहेब, आपण याकडे जातीने लक्ष दया.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मा. आयुक्त साहेब, फक्त एका मुद्दयाचे मी स्पष्टीकरण मागु इच्छितो, जर कुणी व्यक्ती आपल्या मुळ कागदपत्रांसह झेरॉक्स कागदपत्र बरोबर आणत असेल तर त्याची कागदपत्र साक्षंकित करण्यासाठी आपणाकडील कुण्या अधिका—याला अधिकार आहेत काय? येथे असे पाहण्यात आले आहे की, त्या व्यक्तीस

आपली कागदपत्र साक्षांकित करुन घेण्यासाठी परत पाठविले जाते. याचे जरा स्पष्टीरकण करा की, जर त्याच्याकडे मुळ कागदपत्र आहेत, ती पाहून छायांकित प्रतीं साक्षांकीत करुन देण्याच्या सुविधेबाबत खुलासा करावा.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—जन्माची किंवा मृत्युची जेव्हा आपल्या जन्म—मृत्यु नोंद वहीत नोंद होते त्यानंतर पाच दहा वर्षांनी पुन्हा जर कोणी जन्म—मृत्यु दाखल्यासाठी आपणाकडे येतो तेव्हा आपले अधिकारी त्यास एवढया काही चकरा मारावयास लावतात की विचारु नका. स्मशानभुमीची पावती आणा, डॉक्टरांचे प्रमाणपत्र घेवुन या. २० वर्षापुर्वीचा डॉक्टर निधन पावला असेल तर काय करणार? आणि त्यानंतर कुणाचा ना कुणाचा शिक्का मारुन आणा. आपल्या संगणकावर जन्म—मृत्यु संदर्भातील नोंद झाल्यानंतर अर्जदारास विनाशायास जन्म—मृत्युचे दाखले मिळाले पाहिजे परंतु एक म्हण आहे की, एखादा माणुस झोपला असेल तर त्याला उठविले जावु शकते. परंतु तो जर झोपेचे सोंग करत असेल तर त्यास उठविले जावु शकत नाही. आमचे अधिकारी झोपेचे सोंग करतात. ही कागदपत्र आणा ती कागदपत्र आणा, प्रत्येकास त्यांना त्रस्त करुन सोडले आहे. विशेषत: या विभागाबाबतीत संपुर्ण सभागृहाचे असे मत आहे की, हा विभाग बरोबर काम करत नाही, यासाठी आपणांस त्यांच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—श्री. अभिजित आणि डॉक्टर रिजवानी हे त्यांचे पुरावे आहेत, एकदा श्री. मोहन साधवानी माझ्याबरोबर होते त्यांच्या प्रभागात जो व्यक्ती राहतो आणि माझ्या प्रभागात त्या व्यक्तीचे दुकान आहे. त्या व्यक्तीस या लोकांनी किती फे—या मारावयास लावल्या त्याबाबतीत यांनी येथे उत्तर दयावे. श्री. अभिजित तुम्ही सांगा.................. या रुग्णालयात एका मुलाचा जन्म झाला होता. त्याचा जन्म दाखला मिळविण्यासाठी त्याचे नातेवाईकांना आपण किती फे—या मारावयास लावल्या ते आयुक्त साहेबांना सांगा आणि त्याचे कारण काय होते?

श्री. अभिजित महामुलकर (प्रोग्रामर, नासुके) :—ज्या रुग्णालयात मुलाचा जन्म झाला होता, तेथुन जन्मासंबंधी नोंद आली होती. परंतु ती नोंद करण्यात आलेली नव्हती.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—कोणी नोंद केली नाही?

श्री. अभिजित महामुलकर (प्रोग्रामर, नासुके) :—संबंधित लिपिकाने नोंद घेतलेली नाही.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—लिपिक कुठला आहे, महापालिकेचा आहे की हॉस्पीटलचा आहे.

श्री. अभिजित महामुलकर (प्रोग्रामर, नासुके) :—जन्म—मृत्यु नोंदणी विभागातीलच श्री. कात्या म्हणुन आहे. त्यांनी नोंद न घेतल्यामुळे त्या व्यक्तीस १५ ते २० दिवस चकरा माराव्या लागल्या.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—मा. आयुक्त साहेब, हा फार मोठा गंभीर मुद्दा आहे, यावर जरा चौकशी करा. चर्चा चालु ठेवा. वाटल्यास आपण उत्तर नंतर दया.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौरजी, मी या विभागाची स्वत: बैठक घेतो.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—लिपिक कर्मचारी नाहीत, त्यामुळे हे काम सफाई कामगारास दिले आहे.

सदस्य श्री. लाल पंजाबी :—साहेब, या संदर्भात श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी जो मुद्दा उचलला होता, या सभागृहात ई—गर्व्हनन्स बाबत आम्ही जो प्रस्ताव पारीत केला होता, त्यावेळेस आम्हांला सांगितले होते की प्रशासनाच्यावतीने हा ठराव आपण पारीत करा की, जन्म व मृत्यु दाखल्याबाबत आम्ही अशी व्यवस्था करणार आहोत की, आपण जेथेही राहतात तेथे आपण घरी बसून संगणकावर घेवु शकतात. तर त्या विषयाबाबत आम्हांस सांगा व हा जो ठराव पारीत करण्यात आला त्याविषयी काय झाले, कुठपर्यंत आले ते सुध्दा आम्हांस सांगाल तर बरे होईल.

सदस्य श्री. प्रकाश सावंत :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आपल्या महापालिकेतील कर्मचारी स्मशानभूमीमध्ये जी नोंद घेतात त्यांना असे काही सांगण्यात आले आहे का की तुम्ही मराठीत किंवा इंग्रजीमध्ये नोंद घ्यावी म्हणुन. कारण एकदा आम्ही तेथे गेलो असतांना आम्ही मराठीत नोंद घेण्याविषयी सांगितले तर तो म्हणाला नाही म्हणाला. तसेच इंग्रजी सुध्दा त्याला व्यवस्थीत लिहिता येत नव्हते. असा काही आदेश आपण काढला आहे का की इंग्रजीमध्येच तुम्ही नोंद घ्यावी?

सदस्य श्री. सतिश चहाळ :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आपण जे आश्वासन दिले आहे की, मी चौकशी करतो याचा महानगरपालिकेस किती दिवसात परिणाम मिळेल? आयुक्त साहेब, मी तुम्हांला विचारत आहे. हे जे तुम्ही

आता आश्वासन दिले की, या विषयी माहिती काढुन त्याचा अहवाल तयार करु. तर मग याचे परिणाम कधी मिळणार? किती दिवसात?

सदस्य श्री. प्रकाश सावंत :—आयुक्त साहेब, मी जो प्रश्न विचारला आहे, त्यानुसार मराठीमध्ये नोंदी करणे अत्यावश्यक असतांना इंग्रजीमध्ये नोंद करण्याबाबतीत आपण आदेश दिले आहेत काय? कृपया याचे उत्तर दयावे.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, महाराष्ट्र शासनाचा कारभार आहे, शासनाचा कारभार मराठीतून चालतो. त्यामुळे मराठी व्यतिरिक्त अन्य कुठल्या भाषेत नोंदी करण्याबाबतीत आदेश देण्यात आलेले नाही. दुसरा जो प्रस्ताव आहे त्याबाबतीत मी अगोदरच स्पष्ट केले आहे की, उदया किंवा आज बैठक घेतो आणि शक्य होईल तेवढया लवकर कारवाई करण्यात येईल.

सदस्य श्री. सतिश चहाळ :—किती दिवसात परिणाम मिळेल?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—उदया बैठक घेतो म्हणजे २ दिवसात होईल. उदया बैठक झाली की कारवाई सुरु होईलच.

सदस्य श्री. लाल पंजाबी :—साहेब, ई—गव्हर्नन्सवाला विषय कुठपर्यंत आला आहे? त्याबाबत जरा माहिती दिली जावी.

श्री. अभिजित महामुलकर (प्रोग्रामर, नासुके) :—ई—गर्व्हनन्स बाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाकडुन मंजुर होवुन आलेला आहे. शासनाकडुन मंजुर होवून आल्यानंतर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची जी संगणक प्रणाली आहे तिचा आम्ही वापर करणार आहोत. कारण की शासनाने असा निर्णय घेतला आहे की, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने चांगल्या प्रकारच्या सुधारणा केल्या आहेत. त्याप्रकारे सर्व महानगरपालिकांमध्ये सुधारणा झाल्या पाहिजे. त्या सर्व सुधारणा आम्ही येथे करणार आहोत. त्यानुसार कल्याण—डोंबिवली महानगरपालिकेला कार्यादेश दिले आहेत. त्याबाबतचा अभ्यास पुर्ण झालेला आहे. दुसरा जो आहे तो कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत नव्हता. सर्व्हर्स व कॉम्प्युटर दयायचे होते त्याबाबत आम्ही निविदा मागविली आहे. त्या निविदेची सॉर्ट लिस्टींग झालेली आहे. आता छाननी चालु आहे. दुसरा लिफाफा उघडल्यानंतर आमच्याकडील सर्व अधिका—यांकडे संगणक होतील. व कुणाकडे काय कागदपत्र प्रलंबित आहेत ते सुध्दा आपणांस इंटरनेटवर दिसेल. ही आजची स्थिती आहे. येणा—या सहा महिन्यामध्ये आम्ही संपुर्ण महापालिकेस ई—गर्व्हनन्स सेवा कार्यान्वीत करु.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—सन्माननिय आयुक्त साहेब, जन्म—मुत्यु दाखल्या बाबत सन्माननिय सदस्यांनी बरीच चर्चा केली आहे. जन्म—मृत्यु दाखले देण्यास वेळ लागतो. अशा ब—याचशा गोष्टी सन्माननिय सदस्यांनी निदर्शनास आणुन दिल्या आहेत. परंतु एका मुद्दयाबाबत कोणत्या सदस्याने विचारणा केलेली नाही, तो मुद्दा असा आहे की, यदा कदाचित आपला एखादा नातेवाईक समजा नाशिकला निधन पावला, त्याचा मुलगा किंवा इतर काही नातेवाईक उल्हासनगर येथे राहत असल्यामुळे त्याचे प्रेत उल्हासनगरला आणले. आणि उल्हासनगरमध्ये त्याचा अंत्यविधी केला तर त्याचा मृत्युचा दाखला कोणी दयायचा?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, जन्म आणि मृत्यु निबंधकाच्या कायदयाखाली जे नियम आहेत, त्यानुसार असे आहे की, जेथे ज्या व्यक्तीचा मृत्यु होईल तेथेच त्याच्या मृत्युची नोंद होते आणि तेथेच दाखला दिला जातो.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—कारण की, आपल्या महापालिकेत एक महिला कर्मचारी आहे तिने असा काही त्रास दिला आहे की, विचारता सोय नाही. आणि म्हणुन त्या महिला कर्मचारीस मी माझ्या कार्यालयात बोलावुन, समजावुन सांगितले होते की, त्या व्यक्तीचे जेथे निधन झाले असेल तेथुनच त्याच्या नातेवाईकांना त्याचा मृत्युचा दाखला दिला जाईल अशा तुम्ही त्यांना सूचना दया परंतु काही सूचना अशा उलटया सुलटया आल्यामुळे लोक फे—या मारुन मारुन थकतात आणि अखेर महापालिकेला दोष देवुन निघुन जातात. असा प्रकार ब—याचवेळा झाला आहे. आणि म्हणुन मी हा प्रश्न विचारलेला आहे.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, सन्माननिय सदस्यांनी केलेली सूचना योग्य वाटते मी यानंतर तेथे सूचना फलक लावतो की कोणत्या कांउटरवर कोणत्या प्रकारचे दाखले मिळतील.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, श्री.बी.बी. मोरे साहेबांनी ज्या महिला कर्मचारीच उल्लेख केला ती महिला कर्मचारी कोण आहे, तिचे त्यांनी नाव घ्यावे. म्हणजे आम्हांला सुध्दा जरा समजेल, ती महिला कोण आहे? श्री. मोरे साहेबांनी तीचे नाव नाही घेतले.

**महापालिका सचिव :—**प्रश्नोत्तराचा कालावधी समाप्त होवून २० मिनिटे झालेली आहेत. श्री. गोविंदराम लुंड यांनी आपल्या सभागृह नेता पदाचा राजीनामा दिला आहे. त्यास मा. महापौरांनी संमती दिली आहे. आता त्यांच्या जागेवर श्री. बच्चाराम रुपचंदानी यांच्या नावास मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे. श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचे हार्दिक अभिनंदन. आणि आपल्या महापालिकेत कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा या पदावर एक नविन अधिकारी आले आहेत. मा. महापौरांच्या आदेशानुसार त्यांनी व्यासपीठावर येवुन सभागृहास आपला परिचय करुन दयावा.

**श्री. एम.जी. गिरगावकर (कार्यकारी अभियंता, पापु):—**आदरणीय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, मा. सभागृहनेता, मा. विरोधी पक्ष नेता, मा. सर्व सदस्य, अधिकारी वर्ग यांना माझा नमस्कार. मी श्री. एम.जी. गिरगावकर कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा २ जुलै रोजी या महापालिकेत रुजु झालो आहे. यापुर्वी मी अत्यंत दुष्काळग्रस्त भाग असलेल्या मराठवाडयाच्या नांदेड, वसमत जिल्हा हिंगोरी, भुमपरांडा जिल्हा उस्मानाबाद याठिकाणी कार्य केलेले आहे. त्याच प्रमाणे भिंवडी महापालिकेत कार्यकारी अभियंता म्हणुन कार्यरत होतो त्यानंतर माझी येथे बदली झालेली आहे. भिवंडी महापालिकेत कार्यरत असतांना त्याठिकाणी तीन प्राधिकरण पाणी पुरवठा भिवंडी, ठाणे व मिराभाईंदर या महापालिकांमध्ये जाणा—या ३०० एमएलडी पाणी पुरवठयाची जी प्राधिकरणे आहेत त्याचाही माझ्याकडे अतिरिक्त कार्यभार होता. माझी २० वर्ष सेवा झालेली आहे व या २० वर्षाच्या कालावधीत माझी ज्या ज्या ठिकाणी बदली आहे त्या ठिकाणी मी तीन तीन वर्षाचा कालावधी पुर्ण केलेला आहे. या कालावधीत ग्रामीण आणि शहरी भागातील मोठे प्रकल्प मी कार्यान्वीत केलेले आहे. हा माझा मागील कामाचा अनुभव तसेच या महापालिकेंचे मा. महापौर, मा. उप—महापौर व मा. आयुक्त व सर्व सन्माननिय सदस्य यांच्या मार्गदर्शनाने या महापालिकेत सुध्दा मी पुर्वीप्रमाणे निश्चीत चांगली सेवा करेल. एवढे बोलतो. धन्यवाद।

**सदस्य श्री. गोविंदाराम लुंड:—**मा. महापौरजी, नवनियुक्त सभागृह नेता श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचे मी अभिनंदन करु इच्छितो.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**प्रश्नोत्तरे संपली काय?

**महापालिका सचिव :—**प्रश्नोत्तराचा कालावधी कधीच संपला, प्रश्नोत्तराचा कालावधी ४ वाजता संपला.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**सचिव साहेब, बाकीचे प्रश्न राहिले आहेत ते कधी होणार? हया वर्षी होतील की पुढच्यावर्षी?

**महापालिका सचिव :—**पुढच्या सभेत, पुढच्या सभेत.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**पुढच्या सभेत की पुढच्या वर्षी? अहो साहेब, किती प्रश्न राहिलेले आहे आम्ही कधीपासून वाट बघतो आहे.

**महापालिका सचिव :—**फार जास्त काही प्रश्न राहिलेले नाही.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**आम्हांला बाहेरगावी जावुन यायचे आहे.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**सचिव साहेब, सभेचे पुढील कामकाज चालु करण्याअगोदर सर्व सन्माननिय सदस्यांच्या मी असे निदर्शनास आणून देवु इच्छितो की, महापालिकेचे जे बोधचिन्ह आहेत ते ज्या व्यक्तीने तयार केले त्याबद्दल आज पुण्यनगरी या वर्तमानपत्रामध्ये व दैनिक सामनामध्ये बातमी आलेली आहे. त्याचा मथळा असा आहे की, ''बोधचिन्ह साकारणा—या चित्रकारास १२ वर्षापासुन बक्षिसाची प्रतिक्षा'' आज या बोधचिन्हाला १२ वर्ष झालेली आहे. आणि ज्यावेळेस नगरपालिका होती, त्यानंतर तिचे १९९६ मध्ये महानगरपालिकेत रुपांतर झाले. त्यानंतर श्रीमती यशस्वीनी नाईक यांनी जेव्हा महापौर म्हणुन कार्यभार स्विकारला त्यानंतर बोधचिन्हासाठी या महासभेत एक ठराव पारीत करण्यात आला. आणि जो कोणी सर्वसमावेशक असे बोधचिन्ह तयार करेल त्यास १० हजार रुपयाचे पारितोषिक दिले जाईल असे जाहिर केले होते. त्यानंतर आज या बोधचिन्हाला १२ वर्ष होत आहेत, श्री. शरद निकम म्हणुन व्यक्ती आहे, त्यांना अजुन पर्यंत बक्षिस मिळालेले नाही. त्याने बिचा—याने आपल्या या महापालिकेत येवून आपल्या चपला एवढया झिजविल्या आहेत, तरीदेखील त्यास या बक्षिसपासुन वंचित ठेवण्यात आलेले आहे. आजच्या

पुण्यनगर व सामना वर्तमानपत्रात त्याच्याबाबत माहिती लिहुन आलेली आहे. तरी मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, ज्या व्यक्तीने एवढे चांगले बोधचिन्ह बनविले ज्याचे नाव संपुर्ण महाराष्ट्रामध्ये गाजत आहे, महापौरांच्या खुर्चीच्या पाठमागील बोधचिन्ह व आम्ही बसलो आहोत त्या खुर्चीच्या मागील बोधचिन्ह अशा व्यक्तीने येथे बनविलेले आहे. त्याचा सन्मान या सभागृहात करण्यात यावा आणि येत्या महासभेत त्यास बक्षिस देण्यात यावे, ही विनंती करतो.

उप–महापौर :–त्या व्यक्तीस पुढील महासभेत बोलवून त्याचे बक्षिस त्याला देण्यात येईल.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे:–**देणार की नाही?

उप–महापौर :–हो, हो त्याचे बक्षिस आपण देवु.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :–**त्या व्यक्तीस घरी पत्र पाठवुन सन्मानाने बोलवा, त्यास सन्मानाने बोलवुन त्याचा सत्कार करावा.

महापालिका सचिव :– विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. २ :–** दिनांक २०/२/२०१० (त्यात दिनांक १०/३/२०१०) व १९/३/२०१० रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

---

महापौर :– मागील सभेचे दिनांक २०/२/२०१० (त्यात दिनांक १०/३/२०१०) व १९/३/२०१०

रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. २ :–** मागील महासभेचे दिनांक २०/२/२०१० (त्यात दिनांक १०/३/२०१०) व १९/३/२०१० सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. प्रभुनाथ गुप्ता
अनुमोदकाचे नाव : श्रीमती मिनाताई सोनेजी

**महासभा ठराव क्र. १ ड** **दिनांक:–१२/७/२०१०**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक २०/२/२०१० (त्यात दिनांक १०/३/२०१०) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ५६ पर्यंतचे दिनांक १९/३/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ३६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:—** वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांचे वारसास नियुक्ती देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ३** :— वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांचे वारसास नियुक्ती देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर, लाड कमिटीच्या शिफारसी वारसा (वशिला) पध्दतीच्या अंमलबजावणीबाबत नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकिर्ण—२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२,नवि—६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक ३० जुन १९९४ नुसार महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा वैद्यकीय दृष्टया अपात्र ठरविल्यानंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त, दिवंगत, वैद्यकीय सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | सफाई कर्मचा—यांचे नाव | सेवा निवृत्ती/मृत्यु दिनांक | वारसाचे नाव | कर्मचा—याशी असलेले नाते संबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. जयराम गोपा बागुल | वयोमानानुसार सेवानिवृत्ती दि. ३०/९/२००९ | श्री. भावसिंग जयराम बागुल | मुलगा |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिका—याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रु. किंवा त्याहुन अधिक आहे असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असा त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेस निहित असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राकिारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त, दिवंगत, स्वेच्छा, वैद्यकीय सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्काने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> २ <u>दिनांक:—१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती निलु चांदवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत १ सफाई कामगार यांचे नावासमोर दर्शविलेल्या नातेवाईकांना वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ४ :—** सफाई कामगार/मुकादम चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४:—** सफाई कामगार/मुकादम चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर कर्मचा—यास ३ महिन्यांची नोटिस देवून स्वेच्छा निवृत्ती घेता येते. तसेच नियम ७१ अन्वये रुग्णता निवृत्ती वेतनासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३० वर्षाच्या सेवेनंतर व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षाच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | सफाई कर्मचा—यांचे नाव | अर्हतकारी सेवा | नियम | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. प्रेमा महावीर चौटेले | २०वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०३/२०१० |
| २ | श्रीम. अनुसया रॉबीन कसबे | २०वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३०/०४/२०१० |
| ३ | श्रीम. लीला रामचंद्र | २०वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३०/०४/२०१० |
| ४ | श्रीम. बबीता अर्जुन पवार | २०वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०४/२०१० |
| ५ | श्रीम. गौरी मौजी परमार | २०वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०३/२०१० |
| ६ | श्रीम. शलिनी रोहीदार साठे | २०वर्षापेक्षा जास्त | ६५ | ३०/०१/२०१० |

तरी वरील सफाई कामगार यांना ''स्वेच्छा सेवा निवृत्ती'' देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ३ <u>दिनांक:–१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. बच्चाराम रुपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे ६ सफाई कामगारांना आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन स्वेच्छा निवृत्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

**विषय क्र.** ५ :–सफाई कामगार पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना ''वैद्यकीय सेवा निवृत्ती'' देणेबाबत.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र.** ५:– सफाई कामगार पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना ''वैद्यकीय सेवा निवृत्ती'' देणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कामगार यांनी वयोमानानुसार तसेच शारीरिक आजारपणामुळे त्यांचेकडुन सफाई काम होत नसल्यामुळे ''वैद्यकीय सेवा निवृत्ती'' मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

| अ. क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | एकुण सेवा | वैद्यकीय सेवा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्रीम. छब्बी विठठ्ल भोईर | १९ वर्षापेक्षा जास्त | १६/०२/२०१० |
| २ | श्रीम. बर्फी शिशपाल | १५ वर्षापेक्षा जास्त | २१/०२/२०१० |
| ३ | श्री. अर्जुन हिरामण चाबुकस्वार | १२ वर्षापेक्षा जास्त | १६/०२/२०१० |

त्याअनुषंगाने संबंधित कर्मचारी शारिरीक दृष्टया सेवा करणेस पात्र आहेत किंवा नाहीत याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणेबाबाबते मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे तसेच संबंधित कर्मचारी यांना कळविण्यात आले होते.

संबंधित कर्मचारी यांनी मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांचेकडील प्रमाणपत्र सादर केले आहेत. त्यानुसार त्यांना नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतुन वैद्यकीय सेवानिवृत्ती देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये रूग्णता निवृत्ती वेतनासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. तसेच नियुक्ती प्राधिकारी वैद्यकीय सेवा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये वैद्यकीय सेवा निवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी वरील सफाई कामगार यांना वैद्यकीय कारणास्तव ''सेवानिवृत्ती'' देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ४ दिनांक:–१२/७/२०१०

सुचकाचे नाव :– श्री. राजु जग्यासी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे ३ सफाई कामगारांना वैद्यकीय कारणास्तव आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन सेवा निवृत्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६** :–१२ विवादित बांधकाम परवानगींबाबतचा अहवाल विचारात घेणे.

---

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आता सध्या सहा. संचालक व नगररचनाकार या सभागृहात उपस्थित नाहीत तर या विषयावर चर्चा कोण करणार? सहा. संचालक व नगररचनाकार सभेत उपस्थित नाहीत, जो अहवाल आहे तो बरोबर नाही. तर चर्चा कोण करणार? आपण दिलेली माहिती पुर्णपणे चुकीची आहे.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–सन्माननिय महापौर महोदया, आजच्या सभेत त्यांचा विषय असून ते सभेत उपस्थित नसल्यामुळे मी नगररचनाकारांची कारणे दाखवा नोटिस काढतो. तसेच त्यांच्या विभागास कळवितो की ते सभेत उपस्थित राहत नाहीत, त्यांच्यावर कारवाई करतो.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :–मा. आयुक्त साहेब, मला असे कळले आहे की, नगररचनाकार आपली बदली करुन दुस–या ठिकाणी जाणार आहेत. त्यांच्यावर काही कारवाई होणार नाही.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–मी त्यांच्या विभागास कळवितो.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>ते प्रत्येक महासभेत उपस्थित नसतात, आजपर्यंत त्यांच्यावर काहीही कारवाई झालेली नाही.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>आपण त्यांच्या विभागाला कळवू की, ते सभेत उपस्थित राहत नाहीत, गैरहजर राहतात.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>जे प्लान नगररचनाकार यांनी पारित केले आहे त्यांवर काय कारवाई करणार? जे चुकीचे प्लान त्यांनी पारित केले आहेत त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>आता सहा. संचालक यांनी सर्व प्लान तपासून पाहिले आहेत.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>स्वत: सहा. संचालक सभेत नाही आहेत.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>सहा. संचालक आहेत, त्यांच्याजवळ अतिरिक्त कार्यभार आहे. जर आपला त्यांवर विश्वास नसेल तर आपण डायरेक्टरकडुन तपासून घेवु या. त्यांच्याकडे मी १२ ही प्लान ऑफिसली पाठवितो.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>ठिक आहे, संचालक, नगररचना यांच्याकडे आपण अहवाल पाठवा, चालेल.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>मा. आयुक्त साहेब, नगररचनाकार कधी येतील आणि या मुद्दयांबाबत कधी उत्तर देतील. ३,३ महिने महासभा होत नाही.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>सन्माननिय महापौर महोदया, नगररचनाकारांना सूचना देवुनही जर ते महासभेत हजर राहत नसतील तर त्यांच्याबाबतीत आपणाकडे एकच पर्याय शिल्लक आहे तो म्हणजे त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठीचा प्रस्ताव त्यांच्या विभागाकडे पाठविण्यात येईल तो प्रस्ताव मी पाठवितो.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>त्यांनी जे चुकीचे प्लान मंजुर केलेले आहेत त्याबाबत काय कारवाई करणार?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>जे चुकीचे प्लान मंजुर केले आहेत त्याबाबतीत सहा. संचालक नगररचनाकार यांचा अहवाल आलेला आहे आणि तो जर सभागृहास मान्य नसेल तर संचालक नगररचना यांच्याकडुन तो तपासून घेवु आणि त्यानुसार कारवाई करु.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौर महोदया आणि मा. आयुक्त साहेब, हा विषय आमचे सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर यांनी प्रस्तृत केला होता. त्यातील १२ प्लानवर महासभेत चर्चा झाली. ज्यावेळी श्री. भुल्लर चर्चा करत होते तेव्हा नगररचनाकार सांगत होते की, हा प्लानसुध्दा रिव्होक करतो. अशाप्रकारे एक एक प्लान रिव्होक करत होते. त्यानंतर त्यांनी सांगितले होते की, यावर मी सविस्तर अहवाल सादर करेल. आज महासभेपुढे अहवाल आहे परंतु नगररचनाकार नाहीत. ही महासभा त्या अहवालाशी सहमत नाही. तो अहवाल बरोबर आहे किंवा नाही याची पुन्हा छाननी झाली पाहिजे. याविषयी वेगवेगळया व्यक्तींची वेगवेगळी मते असू शकतील, परंतु माझे असे मत आहे की, या विषयाबाबत सभागृहातील पाच सदस्यांची समिती तयार केली पाहिजे, ज्यामध्ये नगररचनाकर हे असतील व इतरही काही अधिकारी असतील माझे एवढेच म्हणणे आहे की याबाबत पुन्हा चौकशी झाली पाहिजे. जेव्हा श्री. भुल्लर महाराज यांनी एक एक प्लानवर चर्चा केली होती त्यावेळेस सर्व प्लानस बाबत त्यांनी सांगितले होते की, हे प्लान मी रिव्होक करत आहे. त्यावेळेस श्री. नरेंद्र राजानी यांनी श्री. नगररचनाकार यांना विचारणा केली होती की, हे प्लान रिव्होक करत आहे असे आपण सहजतेने कसे म्हणत आहात? तेव्हा त्यांनी सांगितले होते की, मी नंतर सविस्तर माहिती घेवुन अहवाल सादर करेन. हा एक आश्चर्याचा विषय आहे, ज्या नगररचनाकाराने या सभागृहात एक एक प्लानवर दोन दोन मिनिटामध्ये रिव्होक करण्यासंदर्भात सहमती दर्शविली होती की मी हे प्लान रिव्होक करत आहे. आणि त्यानंतर त्याच नगररचनाकारने त्याबाबतचा अहवाल लिहिला आहे तो बरोबर आहे की चुकीचा आहे? तो एक आश्चर्याचा विषय आहे. मला वाटते की यासाठी एक समिती नेमली जावी. व या

सर्व प्लानची नगररचनाकार व सहा. संचालक नगररचना यांच्या देखरेखीखाली व पाच सदस्यांच्या देखरेखीखाली माहिती घेतली पाहिजे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–</u>मा. महापौरजी, सर्वात पहिला चिंतेचा विषय मला हा वाटत आहे की, आयुक्त साहेब ज्या प्रकारे बोलत आहेत की त्यांच्याविरुध्द खातेनिहाय शिस्तभंगाची कारवाई करु. आयुक्त साहेब, एवढया गंभीर विषयावर आयुक्तांचे अशा प्रकारचे वागणे योग्य नाही. या प्रकरणांसंदर्भात मेहनत घेवुन श्री. महाराज भुल्लर यांनी ज्या सात आठ फाईल गोळा केल्या होत्या आणि त्यावर महासभेत एवढी काही जी चर्चा झाली. आठही फाईली संदर्भात नगररचनाकार यांनी सांगितले होते की, हा प्लान आम्ही रिव्होक करु. रिव्होक करु. ते स्वत: प्लान पास करत होते आणि स्वत: रिव्होक करत होते आणि त्यानंतर चौकशी अहवालात ते प्लान बरोबर असल्याचे सिध्द करत महासभेपुढे अहवाल घेवुन येतात व आपण म्हणता की, आम्ही त्यांच्या विरोधात खातेनिहाय चौकशी करण्यासाठी त्यांच्या विभागात अहवाल सादर करु. त्यांच्या विरोधात खातेनिहाय चौकशी होईल तेव्हा होईल, त्यांची बदली होईल तेव्हा होईल. परंतु अशा प्रकारचा अधिकारी या शहरात येवुन आपल्या मनमानीने पाहिजे तसे काम करुन निघुन जाईल, त्यांची बदली होईल. त्यानंतर त्याचे निलंबन जरी झाले परंतु त्याने त्याच्या जिवननिर्वाहाची व्यवस्था या शहरात कोणत्या ना कोणत्या प्रकारे करुन ठेवली असेल. आणि त्याबाबतीत त्यास कुठलीही चिंता नसेल तर त्याबाबतीत आपल्या सारख्या अधिका–यांचा जर एवढाच असा रोक असेल की आम्ही त्यांच्या विरोधात खातेनिहाय चौकशी करु. हे बरोबर नाही. आम्हांस आपणाकडुन यापेक्षा कठोर कारवाईची अपेक्षा आहे. आज हे केवळ आठ प्लान आहेत, परंतु यापुढे एखादा अधिकारी येथे येवुन आठशे प्लान असेच बेकायदेशीरपणे मंजुर करुन निघुन जाईल, तर असे लोक अशा प्रकारच्या गैरमार्गांचा फायदा कसा उचलायचा हे जाणतात. महानगरपालिका त्यांच्यासाठी काम करत नाही. महानगरपालिका सर्वसाधारण व्यक्तीसाठी काम करते. चुकीच्यापध्दतीने काम करुन घेणा–या व्यक्तींसाठी महानगरपालिका काम करत नाही. हे आपण मान्य केले पाहिजे. तर आधारावर हा विषय गंभीरतेने घेवुन याबाबत श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जी सूचना केली आहे की, या प्रकरणाची योग्य प्रकारे चौकशी झाली पाहिजे. ज्याप्रकारे एक अधिकारी सात आठ फाईलींवर सही करतो ज्यामध्ये कदाचित अवश्यक त्या कागदपत्रांची कमतरता आहे. किंवा काही प्रकरणांमध्ये एफएसआय कोणत्या ना कोणत्या प्रकाराने अॅडजस्ट करुन वाढुन दिली आहे. यांची काही माहिती नाही. चौकशी झाली आहे. त्या चौकशीत काही ठिकाणी होय तर काही ठिकाणी नाही, काही बरोबर आहेत तर काही बरोबर नाही असा अहवाल दिलेला आहे. आम्हां लोकप्रतिनिधींना त्याबाबतची काही माहिती नसावी? तर याप्रकरणांची पुन्हा चौकशी होणे, चौकशीत लोकप्रतिनिधींचा समावेश होणे हे अतिशय आवश्यक आहे.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव:–</u>आयुक्त साहेब, विकास आराखडयाचे काय झाले?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>सन्माननिय महापौर महोदया, विकास आराखडयाचे काम चालू आहे. ते प्रगतीपथावर आहे. त्यानंतर त्याचा सर्व्हे होईल व त्यानंतर सूचना व हरकती मागविले जातील आणि त्यानंतर सभागृहासमोर येईल.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :–</u>आणखी किती वेळ लागेल?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>तसे काही सांगता येणार नाही. जेवढया लवकर होईल तेवढया लवकरत तो सभागृहापुढे आणला जाईल. साधारणत: सहा महिने लागतील.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :–</u>या अगोदर जी सभा झाली होती त्यावेळी सुध्दा आपण असे सांगितले होते की, पाच सहा महिन्यामध्ये होईल.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>आज सुध्दा मी तेच सांगत आहे. साधारणत: सहा महिने लागतील.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–</u>मा. आयुक्त साहेब, आमचा जो विषय चालला होता त्यामध्ये श्री. लालबिहारी यांनी दुसरा विषय जोडला. आणि त्यावर उत्तर देण्यासाठी आपण उभे राहिला. माझ्या प्रश्नावर आपण उत्तर देत नव्हता. श्री. लालबिहारी यांच्या प्रश्नास उत्तर देण्यास आपण ताबडतोब सुरुवात केली. आपणांस वाटले की यांचा मुद्दा आता मागे पडत आहे. परंतु तरीही या आगेदरच्या सभेत आपण सहा महिन्याचा कालावधी

दिला होता आणि आता पुन्हा आपण स्वत: या कामी सहा महिने लागतील असे सांगत आहात. दरम्यान मध्यंतरीचा जो दोन महिन्याचा कालावधी गेला त्याचे काय?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, दोन महिन्यापुर्वी सांगितले होते की, साधारणत: लागतील, दोन महिन्याच्या कालावधीत काम चालु आहे पुढच्या चार महिन्यात ते काम पुर्ण होईल असे वाटले होते.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—या प्रश्नाचे उत्तर ठरलेले आहे, सहा महिने लागतील.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—आता दोन महिन्यानंतर सुध्दा आपण असेच सांगाल की, साधारणत: सहा महिन्याची वेळ लागेल?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—नाही, नाही तेवढा कालावधी कमी होईल. जसे जसे दिवस जातील तसे तसे तेवढा कालावधी कमी होत जाईल. साधारणत: सहा महिन्याचा कालावधी होतो. आणि सहा महिन्याच्या कालावधीत झाले नाही तर मुदतवाढीसाठी आपणाकडे प्रस्ताव आणण्यात येईल.

सदस्य श्री. नरेदं राजानी:—या शहरामध्ये योग्य प्रकारे प्लान मंजुर व्हावेत, या शहरात योग्य प्रकारे विकास आराखडा लवकरात लवकर तयार व्हावा. याची आवश्यकता आणि तत्परता आपणांस जाणवत नाही का?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—साहेब, यासाठीच तर विकास आराखडयाचे काम चालु केले आहे.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—नाही, नाही आम्ही विचारु इच्छितो की, दोन महिन्यामध्ये त्याचे कुठपर्यंत काम झाले? तर काय उत्तर होईल.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—उत्तर पाहिजे असेल तर सर्व्हे होणार, मी सांगितले आहे की सर्व्हेचे काम चालु आहे.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :— विषय जर असेच भटकत गेले तर अशीच चर्चा चालत राहणार हे महासभेच्या हिताचे नाही, त्यासाठी मी विषयास वाढवत नाही आहे परंतु महापौर महोदया आपणाकडुन आदेशाची अति आवश्यकता आहे, हे दोन्ही विषय गंभीरतेने आयुक्त साहेबांस महासभेपुढे सांगा.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सभागृहातील सर्व सदस्य, तसेच सर्व पदाधिकारी, सर्वात प्रथम मी आपल्या पक्षाचे आभार प्रकट करतो की, ज्यांनी माझा सभागृह नेता पदी सर्वानुमते निवड केली. त्यानंतर येथिल माझे जे भाजपाचे नेते आहेत त्यांचा मी आभारी आहे. त्याचबरोबर महापौर महोदया व इतर जे सदस्य आहेत त्यांनी या पदासाठी माझ्या नावास स्विकृती दिली त्यांचाही मी आभारी आहे. आज ज्या विषयावर येथे चर्चा चालली आहे. आणि ज्या नाटयमय पध्दतीने आयुक्त साहेब उत्तरे देत आहेत, म्हणजेच याबाबतीत गंभीर असल्याचे ते दिसून येत नाही. अशाप्रकारे ते जे हे उत्तर देत आहे त्याचे मला खुप दु:ख होत आहे. जोपर्यंत शासन आणि प्रशासन एकत्रितपणे काम करणार नाहीत तोपर्यंत या शहराचा विकास होणार नाही. मला विश्वास आहे की, प्रशासनातील जे अधिकारी आहेत, ते महापालिका शासनाबरोबर काम करतील. व शहराच्या विकासाची जी गती आहे त्यामध्ये कुठल्याही प्रकारची बाधा येणार नाही. कारण की, लहान सहान बाबींसाठी आमच्या शहराचे नाव बदनाम होत आहे, म्हटले जाते की, तुमच्या महापालिकेत काही काम होत नाही. ज्याप्रमाणे आपणांस जन्म—मृत्यु दाखल्याचे उदाहरण देण्यात आले. त्यानंतर आता प्लानबाबत सांगण्यात आले. अशाप्रकारची जर कामे होत राहिली तर सत्ताधारी पक्षात व इतर पक्षामध्ये निवडून आलेले आमचे जे सहकारी आहेत, त्यांचे नाव होणार नाही. मला आशा आहे की, आमचे आयुक्त साहेब, प्रत्येक विषयात गंभीर झाले तर शासन आणि प्रशासनाचे नाव होईल. सभागृह नेता या नात्याने मी पहिल्यांदाच सभागृहात बोलत आहे यापुढे मी आणखी बोल राहिल. मला अपेक्षा आहे की, आयुक्त साहेब, याकडे लक्ष देतील.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, मी नम्रतापुर्वक निवेदन करु इच्छितो की, मी गांभीर्यपुर्वकच निवेदन केले होते. मी अगोदरच सांगितले होते की, विकास आराखडा तयार करण्यासाठी साधारणत: सहा महिन्याचा कालावधी लागतो आणि ते काम सध्या चालु आहे. सर्व्हेचे काम चालु आहे ते झाल्यानंतर पुढील काम चालु होईल. त्यानंतर महासभेपुढे येईल. मला असे म्हणायचे होते की, सर्व्हेचे काम चालु आहे. ते कुठपर्यंत आले आहे त्याची सध्यस्थिती मी सांगितली आहे. दुसरा मुद्दा नगररचनाकार यांच्या विषयीचा होता त्याबाबत मी सांगितले होते की, नगररचनाकार यांना सांगुनही ते आज महासभेत हजर राहिले नाहीत. त्यांचा मुळ विभाग आहे नगररचना विभाग, त्यांच्याविरुध्द मी किंवा आपण कारवाई करु शकत नाही. त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यासाठी त्यांच्या विभागाकडे प्रस्ताव पाठविणे जरुरीचे आहे. माझे हेच म्हणणे होते आणि ते गंभीरता पुर्वक होते. तिसरा मुद्दा जो होता तो १२ प्लान संदर्भातील होता, त्याबाबत सहा. संचालक नगररचना यांनी जो चौकशी अहवाल दिला आहे, तो अहवाल जर सभागृहाला मान्य नसेल तर नगररचनाकार यांच्या पदावरील वरिष्ठ प्राधिकारी जे आहेत ते संचालक नगररचना यांच्याकडुन या प्लानची छाननी करुन घेवुन ते जे अहवाल देतील, त्यांच्यावर दयायला कारवाई करु. त्याव्यतिरिक्त दुसरा काही पर्याय नाही कारण की हा तांत्रिक मुद्दा आहे. याप्रकरणांबाबत सदस्यांची समिती नेमण्यास माझी काही हरकत नाही.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब आपण आता जे सांगितले की, सहा. संचालक यांना अधिकारी आहेत तर आपणांस काय अधिकार आहेत? याबाबत आपणांस काही माहित आहे? प्लानमध्ये आपणांस काय अधिकार आहे? हे जे प्लान पास होतात आपणासही त्याबाबत अधिकार आहे त्याची आपणांस माहिती आहे का? नगररचनाकार जे काही प्लान मंजुर करतात त्या ठिकाणांची पाहणी करुन दिलेली परवानगी बरोबर आहे की नाही हे आपण तपासून पाहू शकता. आपल्या या अधिकाराची आपणांस माहिती आहे का?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—आयुक्तांच्या काही अधिकार दुस—या अधिका—यांना प्रदान करण्यांत आले आहेत. याबाबतचे आयुक्तांचे अधिकार नगररचनाकार यांच्या मार्फत वापरले जात आहेत. जर आपणांस येथे असे वाटत असेल की व तांत्रिक प्राधिकारी सांगत असेल की हे चुकीचे आहे तर मी कारवाई करेन.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—मा. आयुक्त साहेब, मी काय बोलतो की, नगररचनाकारांनी जे प्लान मंजुर केले आहेत त्याविषयी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात तरतुद आहे की, आयुक्त त्याठिकाणांची पाहणी करु शकतो. प्लाननुसार तेथे बांधकाम होत आहे किंवा नाही? या अधिकाराचा आपण कधी वापर केला आहे का? हे मी आपणांस विचारु इच्छितो. त्यावर चर्चा करु इच्छितो.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, अधिकारांचा जो प्रश्न आहे, सर्व अधिकार आयुक्तांचेच असतात ते दुस—या अधिका—यांना प्रदान केले जातात. व नगररचनाकार हे तांत्रिक अधिकारी असल्यामुळे प्रत्यक्ष जागेवर जावुन बांधकामाबाबत पाहणी करण्याचे काम नगररचनाकारांचे आहे. आयुक्तांचे नाहीत.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—याचा अर्थ जे १२ प्लान रिवोक केले होते, त्यापैकी एकही प्लान बाबत आपण जागेवर जावुन पाहणी केली नाही ना? आयुक्त साहेब आपण या १२ जागेंवर जावुन स्वत: पाहणी करु शकता आपणांस अधिकार आहे. आपण विचारा आपण एक सुध्दा जागेवर गेला होतात का?

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—मा. महापौरजी, आपण यांना विचारा यांना अधिकार आहे की नाही? मा. महापौर महोदया, मी सांगितले आहे की हे पाहणी करु शकता किंवा नाही.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, मी सांगितले आहे की नाकारण्याचे अधिकार किंवा स्विकारण्याचे अधिकार आयुक्तांचे आहेत. त्याबाबत तांत्रिक अधिकार हे सहा. संचालकाकडे असल्यामुळे सहा. संचालक यांच्याकडुन ते प्लान परत तपासून घेण्यात आलेले आहे. तसा सहा. संचालक यांचा अहवाल आहे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—पाहणी केली आहे की नाही ते सांगा?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदया, आयुक्तांना तपासणी करण्याचे अधिकार नाही आहे ते अधिकार सहा. संचालक यांना प्रत्यक्ष पाहणी करण्याचे आदेश दिले होते त्यानुसार त्यांनी पाहणी केलेली आहे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. महापौर महोदया, आपण पहा हे म्हणाले की तपासणी करण्याची आवश्यकता नाही मला त्यांच्याकडुन हेच उत्तर पाहिजे होते.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आपण आता असे म्हणालात की सहा. संचालक यांचा अहवाल आलेला आहे परंतु सन्माननिय सदस्यांच्या म्हणण्यावरुन असे वाटते की ते याबाबत संतृष्ठ नाही आहेत. तर माझी असे सूचना आहे की आपण त्यांच्या अधिकारांच्या वर आहात. जसे आपणालात की नगररचनाकारांवर कारवाई होईल, त्यानुसार पुढील महासभेच्या अगोदर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. व माझी दुसरी एक सूचना आहे जसे आमचे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की, पाच सदस्यांची एक समिती नेमली जावी. सहा. संचालक नगररचना यांनी या कामी जे काम केले आहे ते बरोबर आहे किंवा नाही? त्याची छाननी करण्यासाठी पाच सदस्यांची समिती नेमली जावी. याबाबत मा. महापौरांस माझी विनंती आहे. हे जे १२ प्लॉन आहेत त्यांची सहा. संचालक नगररचना यांनी बरोबर छाननी केली आहे किंवा नाही? त्याविषयी आमचे आयुक्त साहेब सांगातात की, मी त्याठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करण्याची आवश्यकता नाही. त्यांनी त्या ठिकाणांची पाहणी केली नसेल. शेवटी हे कसे झाले? एकीकडे नगररचनाकार महासभेत सांगतात की, हे काम बरोबर नाही आणि दुसरीकडे सहा. संचालक नगररचना म्हणतात की, बरोबर आहे. यावरुन सदस्यांना असे वाटते की यामध्ये काही गडबड आहे ती दुर करण्यासाठी समिती नेमली जावी.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>सन्माननिय महापौरजी, उल्हासनगर शहरामध्ये ८५५ अनाधिकृत इमारतींचा मुद्दा गाजत असतांना २००७ नंतर जेवढे काही नविन प्लान मंजुर झाले आहेत, त्याच्यामध्ये मा. महापौरांनी खास लक्ष घालुन ते सर्व प्लान तपासून पाहावेत. अशी माझी त्यांना विनंती आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>मा. महापौरजी, सत्ताधारी आणि विरोधी पक्षासह संपुर्ण सभागृहातील सर्वांचे एकच मत आहे की, या १२ प्रकरणांसंदर्भात चौकशी करण्यासाठी सदस्यांची एक समिती नेमली जावी कारण की, विषय अतिशय गंभीर आहे. तर मी असे सांगु इच्छितो की कमित कमी सहा, सात सदस्यांची समिती नेमली जावी. श्री. धनंजय बोडारे व श्री. जमनादास पुरस्वानी यांना मी विनंती करतो की, विरोधी पक्षातील सदस्यांच्या नावांसह याकामी पाच, सहा सदस्यांची एक समिती गठित केली जावी. श्री. जमनादास पुरस्वानीजी, विरोधी पक्ष सदस्यांशी विचारविनिमय करुन आपण नंतर नावे दया.

<u>सदस्य श्री. महेश सुखरामानी:—</u>मा. आयुक्त साहेब, याबाबतीत माझी एक सूचना आहे एखादया प्रभाग समितीतील प्लान असेल तर त्या समितीच्या सभापती यांना सुध्दा घेतले जावे.

<u>महापालिका सचिव :—</u>काय निर्णय झाला? महापौर महोदया म्हणत आहे की सभागृहाचा निर्णय सांगा. पुढील कामकाज सुरु करायचे आहे. कृपया लक्ष दया, काय सभागृहाचा एकच निर्णय आहे का की, समिती गठित करण्याचा? या समितीसाठी जे नावे आली आहेत ती मी वाचुन दाखवितो. १) श्री. बच्चाराम रुपचंदानी, २) श्री. नरेंद्र राजानी, ३) श्री. जीवन इदनानी, ४) श्री. अंकुश म्हस्के, ५) श्री. धनंजय बोडारे, ६) श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, ७) श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, ८) श्री. बी.बी. मोरे.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>ही यादी कशासाठी आहे?

<u>महापालिका सचिव :—</u>हे जे १२ प्लान आहेत, .........

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>हे काय करणार ते सांगा ना जरा?

<u>महापालिका सचिव :—</u>तेच सांगत आहे.

<u>सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—</u>अधिका—यांची नावे का नाही घातली, ते सुध्दा समितीत असले पाहिजे ना?

<u>महापालिका सचिव :</u>—ते आपण ठरवत आहात, आम्ही नाही.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :</u>—मा. महापौरजी, सचिव साहेब, अधिकारी सुध्दा असले पाहिजेत. तसेच आपण सविस्तर सांगा की ही समिती कशासाठी गठित करता ते? सभागृहाला विस्तृतपणे सांगा की समिती कशासाठी गठित करायची आहे?

<u>महापालिका सचिव :</u>—१२ प्लान संदर्भात मागील महासभेत......

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :</u>—बारा प्लानचा तो अतिशय गंभीर असा विषय आहे, श्री. भुल्लर महाराज यांनी उपस्थित केला होता तोच विषय आहे ना?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :</u>—या विषयावर आम्ही बोलु शकणार नाहीत काय? आम्हांला बोलण्याचा अधिकार नाही काय?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :</u>—हे सात आठ सदस्य काय निर्णय घेणार? बाकीचे सदस्य नाहीत काय? हे बिल्कुल चालणार नाही. समिती गठित होवु देणार नाही. या समितीमध्ये जेवढया काही सदस्यांची नावे घेतली आहेत ते सर्वच बिल्डर आहेत.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :</u>—सचिव साहेब, हे सात, आठच लोक का?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :</u>—आयुक्त साहेब, भलेही सभागृहाने हा निर्णय घेतला असेल परंतु हे शासकिय काम आहे काय? याची कायदयामध्ये तरतुद आहे का?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :</u>—आयुक्त साहेब, हा विषय सभागृहाचा आहे व सर्वांना अधिकार आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :</u>—होय हा विषय सभागृहाचाच आहे. सभागृहाचे सर्व सन्माननिय सदस्यांना त्याविषयी माहिती असली पाहिजे हा त्यांचा अधिकार आहे. आठजण आपापले घ्यायचे आणि गुपचुपगुपचुप करायचे इकडे तिकडे? आणि कागदावर नाव लिहुन दयायचे. त्या विषयाला माझा निषेध आहे.

<u>महापालिका सचिव :</u>—काय करायचे आहे ते जरा सांगा.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :</u>—सचिव साहेब, या विषयावरील नावे वगैरे काढुन टाका. नाहीतर सगळयांची नावे दया.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>—मा. महापौर महोदया, या विषयास स्थगित करा. गटनेत्यांच्या बैठकीत आजच्या या विषयाबाबत निर्णय घेतला जाईल. आता या विषयास पुढे ढकला.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :</u>—समितीची काही आवश्यकता नाही.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :</u>—हे सभागृहासमोर आले पाहिजे........

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :</u>—आता श्री. धांडे यांनी जी सूचना दिली त्याबाबत माझे असेही मत आहे की, हे जे सात आठ लोकांची जी समिती बनलेली आहे, या १२ प्लानवर यांनी जर चांगले काम केले तर ही समिती ठेवायची नाहीतर दुसरी सात लोकांची समिती नेमायची. तेही समाधानी राहतील.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :</u>—मा. आयुक्त साहेब, आज या १२ प्लानबद्दल घोटाळा आहे, ही समिती झाल्यानंतर २४ प्लान होतील.


<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>ही वशिला सिस्टम  समिती आहे, यासाठी सभागृहातील जेवढे सदस्य आहेत त्यांची नावे.......

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>परत त्यांची समिती बनवावी लागेल त्यामुळे परत समिती बनवु नका.

<u>महापालिका सचिव :—</u>हा विषय सर्वसंमतीने वगळायचा काय?

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:—</u>वगळा, वशिला सिस्टम लावु नका.

<u>काही सदस्य :—</u>हा विषय पुढे ढकला.

<u>महापौर :—</u> सदरचा विषय सभेतुन वगळण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ६:—** १२ विवादित बांधकाम परवानगींबाबतचा अहवाल विचारात घेणे.

**प्रकरण क्र. ६:—** श्री. रमेशलाल गिधनामल डिंगरिया व इतर

बॅरेक नं. १९९३ समोर, चालता नं. ५०४,५०९ ह, शिट नं. ७६, कॅम्प नं.३.

नगर रचनाकार हयांनी दिलेली बांधकाम परवानगी योग्य असून दिलेल्या बांधकाम पूर्णतेचा दाखला सुध्दा योग्य आहे.

**प्रकरण क्र. ७:—** श्री. रमेशलाल पी. नागरानी व इतर,

यू.नं. ८६, शिट नं. ६८, कॅम्प नं.५

नगर रचयनाकार हयांनी दिलेला अहवाल योग्य असल्याचे दिसून येते. तथापी नगर रचनाकार यांचे अहवालाप्रमाणे जागेवरील क्षेत्र सनदाप्रमाणे जास्त असल्याचे स्थळ निरीक्षणाचे वेळेस निर्देशनास आल्याने सदरचे नकाशे रदद् बादल करुन सुधारीत नकाशे सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

**प्रकरण क्र. ८:—** श्री. नंदकुमार नेघनदास मनवानी व इतर चार

प्लॉट नं. ३२२,३३३,३३४ भाग, ३२९ भाग ३२३ भाग

यु.नं.८२,८३, शिट नं.२९, कॅम्प नं.३.

नगर रचनाकार हयांनी दिलेल्या अहवालाशी सहमत आहे. शिवाय घर्मदाय आयुक्त यांची परवानगी नांव बदल करतेवेळेस देण्यात आलेली आहे किंवा नाही हा मुदद्‌ा उपविभागीय अधिकारी हयांनी सनद देतेवेळेस तपासणे आवश्यक आहे. तथापी नांव बदल झाल्यानंतर बांधकाम परवानगी देण्यांत आलेली योग्य आहे असे दिसून येते.

**प्रकरण क्र. ९:—** श्री. दिलीप श्यामसिंग चंचलानी

ब्लॉक नं. सी. ३१, रुम नं. ८१,८२,८३, शिट नं. ५०, उल्हासनगर—४.

नगर रचनाकार हयांनी दिलेला अहवाल योग्य असून त्या अहवालाशी सहमत आहे.

**प्रकरण क्र. १०:—** श्री. सुरेश आर. मुलचंदानी,

ब्लॉक नं. सी.९, रुम नं. ३६,

ब्लॉक सी.१०, रुम नं.३७, प्लॉट नं. ८०, शिट नं. ५०, उल्हासनगर—३.

नगर रचनाकार हयांनी दिलेल्या अहवालाशी सहमत आहे.

<u>सादर,</u>

नगर रचनाकार हयांनी एकूण १२ प्रस्तावांची छाननी करुन अहवाल सादर केलेला आहे. त्या अहवालावर माझा अहवाल खालील प्रमाणे आहे.

**प्रकरण क्र. १:—** श्री. जयप्रकाश पारुमल छाबडिया व इतर

यू.नं.१२,१५,१९ भाग, शिट नं.५१ ह, कॅम्प नं.४

नगर रचनाकार हयांच्या अहवालाशी सहमत आहे. ताबा पावती ७/४/८७ रोजी महानगरपालिकेला मिळालेली आहे, असे मा.नगर सेवकांचे म्हणणे आहे. तथापि जागेचा मालकी हक्क महानगरपालिकेकडे नाही. तसेच मालकी हक्काबाबतचा निर्णय राजस्व विभागाचा असतो. सनद राजस्व विभागांनी दिलेली असून तसेच ''वरवार'' यासाठी २५ टक्के गाळे किंवा जागा देण्याचा निर्णय शासनाचे १९९४ च्या आदेशात कुठेही नमूइ नाही. दिलेली बांधकाम परवानगी योग्य दिसून येते.

**प्रकरण क्र.** २:— श्री. धनराज एन.बालानी

यु.न.३, शिट नं. ५१ ह, कॅम्प नं.३.

नगर रचनाकार हयांनी दिलेल्या अहवालाशी मी सहमत आहे. बांधकाम परवानगी योग्य प्रकारे दिलेली असल्याचे दिसते.

**प्रकरण क्र.** ३:— श्रीमती. प्रेमीबाई टोपदास चंचलानी

यु.न.१६, शिट नं. ४८, कॅम्प नं.३.

नगर रचनाकारांनी दिलेली बांधकाम परवानगी योग्य असल्याचे दिसून येते.

**प्रकरण क्र.** ४:— हिन्दुस्तान पेन्सिल फॅक्टरी प्राय. लि.

प्लॉट नं.२९, सेक्शन ३, शिट नं.७, कॅम्प नं.४.

शासनानी जी सदन त्यांचे दि. १२/३/१९८५ चे आदेश क्रमांक ४३ (ए) () अन्वये जी अटी व शर्ती दिलेली आहे. त्यात मा. नगर सेवकांचे म्हणण्याप्रमाणे अटी व शर्ती नाही. नगर रचनाकारांनी दिलेल्या अहवालाशी मी सहमत आहे.

**प्रकरण क्र.** ५:— अशोक एस. आडकानी

बॅरेक क्रमांक १९९३, रुम नं.१ व २, शिट नं.७६, कॅम्प नं.५.

नगर रचनाकारानी दिलेल्या अहवाल योग्य आहे. नव्याने नकाशे सादर करण्यास सूचना दिलेलया आहे. तसेच नगररचनाकार हयांनी संबधीतांवर योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

**प्रकरण क्र.** ११:— श्री. राम एस. निकम,

यू.नं.७९, चालता नं.१५४, शिट नं.२२, लाल चक्की, उल्हासनगर—४.

नगर रचनाकार हयांनी दिलेलया अहवालाशी सहमत आहे. अनाधिकृत बांधकाम नियमित करण्यासंदर्भात ४० फुट रोडच्या विषयासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांत आलेला होता व शाासनानी त्यांचे दि. ३१/०१/२००८ चे पत्रानुसार प्रस्ताव नियमांकित करण्याच्या कळविले होते. त्या अनुषंगाने प्रस्ताव नियीमत करण्यात आलेला होता व त्यानंतर बांधकाम जूने असल्याने नवीन बांधकामाला मंजूरी देण्यात आलेली होती.

**प्रकरण क्र.** १२:— प्राध्यापक शहिद दुनिचंद तेलनदास कालानी मेमोरियल ट्रस्ट

आरक्षण क्रमांक ५७, शिट नं.७५, उल्हासगनर—१.

उल्हासगनर महानगरपालिका यांच्या दि.२४/४/२०१० चे पत्रानुसार बांधकाम परवानगी (तळ २ मजला) देण्यांत आलेली होती. तसेच दि. ४/१/२०१० रोजी नगर रचनाकार हयांनी तिसऱ्या मजल्यावरील परवानगी देण्यांत आलेली होती. तथापी सदर मिळकत महानगरपालिकेची असून, महानगरपालिका सोबत केलेले करारनामे अप्राप्त असून दिलेली बांधकाम परवानगी दि. २२/२/२०१० रोजी नगर रचनाकार हयांनी रदद् केलेली आहे.

वरील सर्व प्रकरणे नगररचनाकार हयांनी दिलेल्या बांधकाम परवानगीच्या संबधांत तपासले असता वरील प्रमाणे शेरे दिलेले आहेत. तथापी अजून बांधकाम परवानगी तपासणीच्या मुद्यावर मा. नगरसेवक हयांची मागणी असल्यास प्रकरणे योग्य ती पुनश्च तपासणीसाठी मा. उपसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबइ हयांचेकडे पाठविता येईल.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | बांधकामाचे ठिकाण | प्लान नंबर | विपर्यस्त मुद्दा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. जयप्रकाश पारुमल छाबडिया, श्रीमती आरती जयप्रकाश छाबडिया, श्रीमती लिला शंकरलाल पुरस्वानी, श्री. रमेश मोहनदास पुरस्वानी | यु. न. १२,१५, १९ भाग शिट नं. ५१ ए कॅम्प नं. ४ | उमपा/नरवि/बांप/१६०/०९/११३६, दिनांक ९/१२/२००९ | टिंबर डेपो आरक्षण क्र.२०१ ताबा पावती दि.७.०४.८७ रोजी महापालिकेस मिळाला आहे.तरी सदर जागेवर प्लान पास करण्यात आला आहे. शासन निर्णय क्र. टिपीडी/१०९४/सीआर—१४/९४ नवि—९ दि.०७.०४.९४ नुसार २५ टक्के ताबा महापालिकेन घेणे आवश्यक होते.तो घेतला नाही. सदरहु परवानगी इंडस्ट्री प्रयोजनार्थ देण्यात आली आहे. | यु. नं. १२, १५ (भा), १९, शिट नं. ५१, उ. नगर—४ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत श्री. जयप्रकाश पारुमल छाब्रीया व इतर ३ यांचे वास्तुविशारद श्री. भुषण रुपानी यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. ०३.१०.०९ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने प्रस्तावाची छाननी केली असता मंजूर व प्रारुप विकास आराखडयानुसार विषयांकित जागा आरक्षण क्र. २०१ टिंबर सॉ मिलसाठी आरक्षित असुन प्रारुप विकास योजनेनुसार रहिवासी विभागात समाविष्ट आहे. शासनाचे दिनांक ०७/०४/१९९४ अधिसुचनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेची मंजुर विकास योजना व प्रारूप विकास योजनेतील कठोरतम तरतुदीसह बांधकाम परवानगी देणेबाबत आदेशित केले आहे, त्यामुळे सदर जागेवर रहिवासी वापर अनुज्ञेय न करता औद्योगिक वापर अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. विकासकास उपविभागीय अधिकारी यांचेकडुन सनद प्रदान करण्यात आलेली असल्याने विकासकास या कार्यालयाचे क्र. उमपा/नरवि/बांप/१६०/०९/११३६ दि. ०९.१२.०९ रोजी बांधकाम परवानगी.देण्यात आली आहे. सदर ठिकाणची सनद विकासकाच्या नावे दिसून येते तसेच तात्पुरता ताबा महानगरपालिकेला दिलेला दिसून येतो. तथापि श्री. राजेंद्रसिंह वी. भुल्लर, नगरसेवक यांनी मालकी आरक्षण असल्यामुळे २५ टक्के बांधकाम महानगरपालिकेस देणे आवश्यक होते असे म्हणणे आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | परंतू विषयांकित जागी सॉ मिलसाठी म्हणजेच औद्योगिक बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. शासनाच्या निर्देशानुसार टिंबर सॉ मिलची जागा २५ टक्के घेणेबाबत कोणतेही आदेश नाहीत. त्या सदरच्या योजनेत २५ टक्के आरक्षित बांधकामाचा महानगरपालिकेस घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. |
| २ | श्री. धनराज एन. बालानी | यु.नं. ३, शिट नं. ५१ ए, कॅम्प नं. ३ | उमपा/नरवि/बांप/५९/०८/०१, दिनांक ९/४/२००९ | त्या जागेवर ३९१.८० चौ. मी.एरिया नाही.सनद मध्ये ३५७.१८चौ.यार्ड आहे.प्लॉन पास झाला आहे३९१.८०चौ. मी.सनद पडताळणी झाली नाही.२५.९.०८ जा.क्र.४६ पत्रानुसार सनद पडताळणी झाली नाही.तशी नोंद नोंदवहीत आहे.त्यामध्ये ११७.६/९ मध्ये खाडाखेड आहे. सनद क्षेत्रफळ ११७.६/९ तर ३९१.८० चौ.मी.प्लॉन पास केला आहे.या प्रकाराची चौकशी करावी.सनद नं.२१३ दि.२०.१२.०४ त्यामागे उमपा/नरवि/जीआर—१५ दि.१२.०६.०२ पत्र आहे. ना हरकत दाखला आहे.माहीती अधिकारा अंतर्गत उपविभागीय कार्यालयाने नगररचनाकार,उमपा यांस लिहिले आहे की श्रीमती कमला शौकिन यांच्या अर्जावर ना हरकत दाखला आहे.शिट नं.५२ ए यु.नं.४ डीआयएलआर दप्तरी नोंदवहीत धनराज बालानी यांचे नांवे यु.नं.३ हा १०.४ चौ.मी जागा आहे. सीडी नोंदवहिचा उतारा एसडीओ ने दिला आहे. | यु. नं. ३, शिट नं. ५१, शांतीनगर, उ.नगर—३ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत श्री. वसंत वरदमल चेलानी यांचे वास्तुविशारद श्री. अविनाश कुमावत यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. २४.०७.०८ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. जागेचे क्षेत्र ३९१.८० चौ. मी. होते. विकासकाकडे सदर जागेच्या ३ सनदा असुन त्याचे क्षेत्रफळ ४७४.६६ चौ. यार्ड होते. त्यापैकी उपविभागीय अधिकारी कार्यालयाने २ सनदेची पडताळणी करुन दिलेली आहे आणि ११७.६६ चौ.वार क्षेत्राची सनदेची मुळ नस्ती त्यांच्याकडे उपलब्ध होत नसल्याने सनदेच्या रजिस्टर उतारा प्रतीवरुन उताऱ्याची पडताळणी करुन देण्यात आलेली आहे. त्यामध्ये असलेल्या खाडाखोडा हा कार्यालयाचा विषय होत नाही. तसेच नांव बदल्याच्या दाखल्याची पडताळणी करुन घेतलेली आहे व नांव बदल्याच्या दाखल्यात तिन्ही सनदांच्या क्षेत्रफळाची बेरीज करुन आलेल्या क्षेत्रफळावरती बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | श्रीमती प्रेमीबाई टोपदास चंचलानी, घनश्यामदास चोरुमल चंचलानी, खेमचंद कुंदामल चंचलानी, श्री. धर्मदास वीरामल चंचलाणी, श्री. सुरेश नंदुमल चंचलानी, श्री. दौलत दर्यारामल चंचलानी | यु. नं. १६, शिट नं. ४८, कॅम्प नं. ३ | उमपा/नरवि/बांप/६०/९८/८१५, दिनांक ४/११/९९ | सदरचा प्लॉन १९९४ जीआर नुसार अर्धा जागेवर प्लॉन पास करायला हवा.त्यानी जेवढी सनदचे क्षेत्रफळ आहे तेवढा प्लॉन पास केला आहे. ५०टक्के जागेवर प्लॉन पास न करता १०० टक्के प्लॉन पास केला आहे.त्याचे कडुन गाळे बनवुन घ्यावयाचे होते.त्यासाठी महापालिकेला खर्च करावा लागला. सदर जागेचा ताबा महापालिकेस दि. ०७.०४.८७ मध्ये दिला आहे.त्या जागेचे मालक महापालिका आहे. मनपा अधिकाऱ्यांनी डोळे बंद करुन प्लॉन पास केलेला आहे.दि.१८.०२.०३ बांधकाम पुर्णत्वाचा दाखल दिला आहे.त्याचा जा.क्र. ४७/६०/९८/८७७ आहे.आता पुन्हा दि.०३.०८.०९ रोजी सुधारित बांधकाम परवानगी दिली आहे.जाग हस्तांरित केली असतानाही खोटया पद्धतीने महापालिकेच्या जागेवर सुधारित बांधकाम परवानगी कोणत्याही कायदयात बसत नाही. ५८८९.४६ चौ.मी.चा जीना क्षेत्रफळ सामासिक अंतरे क्षेत्रफळ दिल्याने ५६४.६१ चौ.मी. जादा देण्यात आले आहे.दोषींवर कायदेशिर कारवाई करण्यात यावी.सहा महिन्यानंतर बांधकाम पुर्णत्वाचा दाखला दिल्यानंतर कोणत्याही सुधारित बांधकाम परवानगी देता येत नाही. | उपरोक्त विषयांकित जागेवर मुळ बांधकाम परवानगी या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/४७/९८/८९६ दि. १८.०२.०३ रोजी 'ए' विंग तळमजला + २ रा मजला, 'बी' विंग तळमजला + २ रा मजला, 'सी' विंग तळघर + तळमजला + ३ रा मजला अशी वाणिज्य वापरासाठी बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आलेली होती. विकासकाने २५ टक्क्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेस 'सी' विंगमधील २ रा व ३ रा मजला हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. परंतू 'सी' विंगसाठी बांधकाम पूर्णतेचा दाखला दिला असुन फक्त 'ए' विंग व 'बी' विंग साठी पुर्नसुधारीत प्रस्ताव विकासकाने सादर केलेला आहे. तथापि, जीन्याचे प्रिमियम भरुन 'ए' विंग व 'बी' विंगमध्ये प्रस्तावित नकाशे सादर करण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने विकासकास पुर्नसुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. १) ५० टक्के जागेवर नकाशे मंजुर करण्याची कोणतीही तरतुद नाही. २) जागेची सनद विकासकाकडे असून तात्पुरता ताबा महापालिकेस दिलेला आहे. ३) भागशः पुर्णत्वाचा दाखला दिल्याने २००९ मध्ये सुधारीत नकाशे सादर केलेले आहेत. ४) ५६४ चौ.मी. जादा देण्यात आले आहे असे म्हणणे अयोग्य असून तिन्ही विंगमधील जीन्याचे क्षेत्राचा समावेश करुन सुधारीत परवानगी देण्यात आलेली आहे. |
| ४ | हिंदुस्तान पेन्सिल फॅक्टरी प्राय.लि. | प्लॉट नं. २९, सेक्शन—३, शिट नं. ७, कॅम्प नं. ४ | उमपा/नरवि/बांप/३३/०८/७५९, दिनांक ७/१०/२००९ | कंडिशनल सीडीप्रमाणे शासन मंजुरीशिवाय सदर जागा विकु शकत नाही.कर्ज घेवु शकत नाही.गहाण ठेवु शकत नाही.तसेच फेरबदल करु शकत नाही.यांनी प्लॉन पास केला आहे.प्लॉन बघुन लोक बुकींग करतील. सदर इमारतीत लोक गाळे घेतील.त्यामुळे लोकांना नाहक त्रास सहन करावा लागेल.बॅंकेतुन कर्ज घेतल्यामुळे बॅंकेचे दिवाळखोरीत जाईल.लोकांची व बॅंकेची फसवणुक होईल. | प्लॉट नं. २९, सेक्शन ३, इंडस्ट्रियल इस्टेट, शिट नं. ७, उ.नगर—४ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत मे. हिंदुस्तान पेन्सिल फॅक्टरी द्वारा श्री. अनिल पी. होतचंदानी (कुलमुखत्यार) यांचे वास्तुविशारद श्री. भुषण रुपानी यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. ०७.०४.०८ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रस्तावाची छाननी केली असता मंजूर व प्रारुप विकास आराखडयानुसार विषयांकित जागा औद्योगिक विभागात येत असुन सदर विकासकास या कार्यालयाचे क्र. उमपा/नरवि/बांप/ ३३/०८/७९ दि. ०७. १०.०९ रोजी बांधकाम परवानगी.देण्यात आली आहे. तथापि तक्रारदार याने शासन मंजूरी शिवाय सदर जागा विकू शकत नाही. कर्ज घेऊ शकत नाही, तसेच फेरबदल करु शकत नाही असे म्हणणे आहे. शासनाने त्यांचे दि. १२. ०३.१९८५ चे आदेश क्र. ४३ (ए) (vii) अन्वये जी अटी व शर्ती दिलेली आहे. त्यात तक्रारदाराच्या म्हणण्याप्रमाणे अटी व शर्ती नाहीत. या उलट त्या जागेचा उपयोग औदयोगिक वापरासाठी करावा अशी सूचना अट क्र. ४ मध्ये स्पष्ट देण्यात आलेले आहे. म्हणून औदयागिक वापरासाठीच परवानगी असल्याने शासनाची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. |
| ५ | श्री. अशोक एस. अडवानी, श्री. अनिल जे. बजाज | बॅ. नं. १९९३, रुम नं. १ व २, शिट नं. ७६, कॅम्प नं. ५ | उमपा/नरवि /बांप/०८/ ०५/५२, दिनांक १/६/२०० ५ | सामासिक अंतरे क्षेत्रफळ देण्याचा अधिकार मा.आयुक्तांचा आहे.यावर आयुक्तांची सही नाही.नगररचनाकार व मुख्यालय उपआयुक्तांची सही आहे.चुकीच्या पद्धतीने प्लॅन पास केला आहे. | उपरोक्त विषयान्वये बॅ.नं. १९९३, रुम नं. १,२, शिट नं. ७६, उ.नगर—५ येथील सुधारीत बांधकाम परवानगी देतेवेळेस तळमजला + १ मजलेचे वाणिज्य वापरासाठी सुधारीत बांधकाम परवानगी ही विकासकाच्या प्लॉटचे आकार अनियंत्रित असल्यामुळे मागील बाजुला व सामासिक अंतरात सुट अपेक्षित होती व मंजूर बांधकाम नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्र ६.६.२.२ व प्रसिध्द प्रारुप नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्र. ६.६.२ अन्वये सामासिक अंतरात सुट देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असल्याने त्यानुसार सदर परवानगीमध्ये विकास ? कामे सादर केलेल्या बांधकाम नकाशाच्या छाननी वर मा. अतिरिक्त आयुक्त यांचेकडे प्रकरण सादर केले असता मा. आयुक्तानी सहाय्यक संचालक नगररचना यांनी जागा पाहणी करुन अहवाल सादर करण्यास |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | आदेशीत केले. त्यानुसार सहाय्यक संचालक यांनी स्थळ पाहणी करुन अहवाल सादर केला होता. तथापि सदरच्या कालावधीत मा. आयुक्त यांनी सहाय्यक संचालक नगररचना यांना विकास नियंत्रण नियमावलीनुसार सामासिक अंतराच्या शिथिलतेचे अधिकार मा. सहाय्यक संचालक नगररचना यांना दिले होते. त्याबाबत मा. आयुक्त यांना सदरचे अधिकार बहाल करता येत नाहीत याबाबतची विचारणा केली होती. तरी त्या मध्यंतरीच्या काळात सदरच्या संचिका परस्पर Outward करण्यात आल्या. त्यामुळे ही सदरची बाब निदर्शनास आल्याने संबंधित कर्मचाऱ्यावरती योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने विकासकास नव्याने सामासिक अंतरात सुट विरहीत नकाशे सादर करण्याबाबत सुचना देण्यात आलेले आहेत. तरी सदरचे मंजूर केलेले नकाशे रद्‌बादल करण्यात येत असुन नव्याने सुधारीत दाखल केलेल्या नकाशाबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |
| ६ | श्री. रमेशलाल गिधनामल डिंगरीया, श्री. मुरली रमेशलाल डिंगरीया | बॅ. नं. १९९३ समोर, चालता नं. ५०८, ५०९ ए शिट नं. ७६, कॅम्प नं. ५ | उमपा/नरवि/बांप/१४५/०६/१६३, दिनांक १०/५/२००७, १४५/०६/८८८, दिनांक ०६/११/२००९ | सहा महिन्यानंतर सुधारित बांधकाम परवानगी देता येत नाही.बांधकाम पुर्णत्वाचा दाखला सन २००७ रोजी घेतल्यानंतर दि.०६.११.०९ रोजी सुधारित बांधकाम परवानगी कायदयानुसार देता येत नाही.तर कोणत्या आधारे सुधारित बांधकाम परवानगी दिली आहे . | चा.नं. ५०८,५०९,५०९ ए, बॅ.नं. १९९३ जवळ, उल्हासनगर–५ या जागी विकासकाने तीन सब डिवीजन ले आऊट करुन घेऊन त्यांना ए,बी व सी असे प्लॉट करुन घेतलेले आहेत. सदर ठिकाणी तीन विकासकाच्या नावे बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामधील एका विकासकाने बांधकाम पुर्ण केलेल होते. परंतु उर्वरित दोन विकासकाने जागेवर बांधकाम चालू न केल्यामुळे विकासकाने जीनाचे प्रिमियम भरुन उपरोक्त जागेवर सुधारीत बांधकाम परवानगीसाठी वास्तुविशारदामार्फत प्रस्ताव सादर केलेला होता. त्याअनुषंगाने मुळ बांधकाम परवानगी या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/१४५/०६/१३६ दि. १०.०५.०७ रोजीच्या पत्रान्वये मंजूर करण्यात आलेली आहे. तथापि, बांधकाम परवानगी मंजूर घेऊन जागेवर कुठल्याही प्रकारचे बांधकाम सुरु केले नव्हते. तद्नंतर विकासकाने त्याचा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | सुधारीत नकाशा सादर करुन या कार्यालयाचे सुधारीत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/१४५/०६/८८८, दि. ०६.११.०९ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम परवानगी मंजूर करुन घेऊन बांधकाम सुरु केलेले आहे. |
| ७ | श्री. रमेशलाल पी. नागरांनी, श्री. अमरलाल ह. कामरा, श्री. दिपक जी. गंगवानी, श्री. सुरेशलाल जी.धामेजा, श्री. महेश उ तन्ना तर्फे कुलमुखत्याधारक श्री. रमेश पी नागरानी | यु. नं. ८६, शिट नं. ६८, कॅम्प नं.५ | उमपा/नरवि/बांप/५१/०७/१०३२, दिनांक ३०/१०/९७, ५१/०५/८२३, दि. २६/१०/२००९ | दि.२७.०७..०९ रोजी परवानगी दिली आहे.सामासिक अंतरे क्षेत्रफळ नियमावली तरतुद क्र.६.६.२. २प्रसिध्द प्रारुप नियमावली तरतुद क्र.६.६.२ अन्वये अधिकार मा. आयुक्तांना आहे.सामासिक अंतरे क्षेत्रफळ देण्याचा अधिकार मा. आयुक्तांचा आहे.यावर आयुक्तांची सही नाही.नगररचनाकार व मुख्यालय उपआयुक्तांची सही आहे.सहा महिन्यानंतर सुधारित बांधकाम परवानगी देवु शकत नाही. | यु.नं. ८६, शिट नं. ६८, उल्हासनगर–५ या जागेत विकासकाने त्यांचे वास्तुविशारदमार्फत दि. १३.०६.२००७ रोजी बांधकाम परवानगीबाबत प्रस्ताव सादर केला होता. त्याअनुषंगाने विकासकास या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/बांप/५१/०७/१०३२ दि. ३०.१०.२००७ रोजी बांधकाम परवानगी देण्यात आली होती.<br>तथापि तक्रारदार यांचे म्हणण्यानुसार सामासिक अंतरामध्ये सुट देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना आहेत. असे म्हणणे आहे. परंतु विकासकाने सुधारीत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव सादर करतेवेळेस सामासिक अंतरात सुट अपेक्षिलेली नसून नियमानुसार बांधकाम परवानगीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने विकासकास या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/बांप/५१/०७/८२३ दि. २६.१०.०९ रोजीच्या पत्रान्वये श्री. रमेशलाल नागरानी व इतर यांच्या नांवे सुधारीत बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आलेली होती. तथापि, प्रत्यक्ष स्थळनिरिक्षण केले असता जागेवरील क्षेत्र सनद क्षेत्रापेक्षा जास्त असल्याने व ते सुधारीत नकाशामध्ये दर्शविण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने सदरचे नकाशे रद्बादल करुन विकासकास त्यांच्याकडे असलेल्या सनद क्षेत्रावर सामासिक अंतरात सुट विरहीत नव्याने सुधारीत नकाशे सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | नंदकुमार नेबनदास मनवानी व इतर चार | प्ला.नं. ३२२,३३३,३३४ भा, ३२९ भा, ३२३, भा, इ.न. ८२,८३, शिट नं. २९, कॅम्प नं. ३ | उमपा/नरवि/बांप/८३/०८/७४०, दिनांक ३/१०/२००९ | कंडिशनल सीडी तसेच जागेच्या संरक्षणासाठी दिली आहे.गहाण ठेवु शकत नाही.प्लान रहीवाशी वापरासाठी केला आहे.लोकानी बॅकेतुन कर्ज काढुन प्लॅट घेतल्यास नागरीकांना तसेच बॅकेचे नुकसान होणार आहे.ट्रस्टने मा. धर्मादयाआयुक्तांची मंजुरी घेणे आवश्यक होते.दि.२५.०५.०९रोजी ३२३.९० चौ.मी. जागा महापालिका व त्यांनी खोटा करार करुन सदर रस्त्यांचे रुंदीकरण झाल्याचे दाखवुन जागेचा ताबा घेतला आहे.त्यामध्ये प्लाट नं.३२१ ,३२२व ३३१ ही त्यांची जागा नाही.तसेच रोडची सीडी दिली जात नाही.नगररचना विभागाच्या नस्तीतील सादरमध्ये ३२१,३२२ व ३३१दाखवली नाही. सीडी एकुण २०००चौ.मी.क्षेत्रफळ आहे.मंजुरी दिली ३०८१.९६चौ.मी. म्हणजे एकुण ११००चौ.मी.जादा परवानगी दिली आहे.सदर ट्रस्टची जागा आहे रहीवाशी वापरास परवानगी दिनी आहे.शिट नं.२१ साईड क्र.८३ प्राथमिक शाळेसाठी राखीव आहे.त्याचा ताबा दि.०७.०४.८७ मध्ये महापालिकेस मिळाला आहे.सदर ठिकाणचे रोडवायडिंग झाले नाही.तसे सार्वजनिक बांधकाम विभागचे पत्रक आहे. धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीशिवाय सदरहु जागा विकु शकत नाही. किंवा विकसित करता येत नाही. | प्लॉट नं. ३३२,३३३,३३४ (भा), ३२१ (भा), ३२२ (भा), ३२३ (भा), ई.नं. ८२,८३, यु.नं. १६९ (भा), शिट नं. २१, उ.नगर–३ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत श्री. मेघराजमल वा. आहुजा, श्री. मनोहर डी. नेभवानी व इतर ३ यांचे वास्तुविशारद श्री. भुषण रुपानी यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. २०.०८.०९ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने प्रस्तावाची छाननी केली असता मंजूर व प्रारुप विकास आराखडयानुसार विषयांकित जागा रहिवासी विभागात येत असुन विकासकास उपविभागीय अधिकारी यांचेकडुन नांव बदलाचा दाखला देण्यात आला असुन त्यामध्ये एकुण ३१०३.१५ चौ.मी. एवढे क्षेत्रफळ दाखविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने विकासकास या कार्यालयाचे क्र. उमपा/नरवि/बांप/८३/०८/७४० दि. ०३.१०.०९ रोजी बांधकाम परवानगी.देण्यात आली आहे. १) सदर जागेची सनद राधा स्वामी सत्संग यांच्या नावे असून नाव बदलाचा दाखला खाजगी असल्याने विकासकाच्या नावे नकाशा मंजूर करण्यात आलेला आहे. २) बांधकाम परवानगी देतेवेळेस विकासकामे ट्रस्टबाबतचे कोणतेही कागदपत्र उपलब्ध करुन दिलेले नाहीत. ३) भविष्यामध्ये सदर ठिकाणच्या रस्त्याचे रस्तारुंदीकरण होणार असेल त्यादृष्टीकोनातून जागा बाधीत होत असेल तर रस्त्यात बाधीत होणारी जागा सोडून बांधकाम परवानगी देण्यात येते. व त्याचा ताबा मनपास दिला आहे किंवा नाही याचा खुलासा मालमत्ता विभागाकडून घेण्यात येईल. व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करणे उचित होईल. तसेच बाधीत होणाऱ्या जागेचा चटई क्षेत्र निर्देशांक विकासकास देण्याबाबतची तरतुद आहे. ४) रस्त्याची सनद दिली जात नाही हा विषय या कार्यालयाशी संबंधीत नाही.<br>५) शिट क्र. २१ आरक्षणाची बाब सुयुक्तीक वाटत नाही. ६) धर्मदाय आयुक्त यांची परवानगी घेण्यात आली नाही या संबधांत उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर या कार्यालयाने नावात बदल करतेवेळेस धर्मदाय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक होते. ती या विभागाशी संबंधीत नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | श्री. दिलीप श्यामसिंग चंचलानी मार्फत मधु गे. आचरा | ब्लॉक नं. सी–२१, रुम नं. ८१,८२,८३िशट नं. ५०, उल्हासनगर–३ | उमपा/नरवि/बांप/१५०/०७/०६५४, दिनांक ९/३/२००९ | ब्लॉक नं. सी–२१, रुम नं. ८१ पुर्ण व रुम नं. ८२ च्या अर्ध्या भागावर संताषी निवास नावाचा टकेडीवर बंगला बांधण्यात आलेला आहे, तेथे जागेपेक्षा अधिक चटईक्षेत्र मंजुर करण्यात आले आहे. ज्या जागेवर बांधकाम करण्यात येत आहे, त्यामध्ये ते क्षेत्र व विनिर्दिष्ट केलेले ठिकाण नाही. | ब्लॉक नं. सी–२१, रुम नं. ८१ (भा), ८२,८३, इ. नं. ४४, शिट नं. ५०, उ.नगर–३ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत श्री. मधु के. आचरा (कुलमुखत्यार) यांचे वास्तुविशारद श्री. बुलचंद सोनेसर यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. ०१.१२.०७ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. जागेचे क्षेत्र ३५८.९० चौ.मी. होते. विकासकाकडे सदर जागेच्या ३ सनदा असुन त्याचे क्षेत्रफळ ३५८.९० चौ.मी. होते. त्यापैकी उपविभागीय अधिकारी कार्यालयाने २ सनदेची पडताळणी करुन दिलेली आहे. तसेच एका सनद पडताळणी प्रकरणी सनद ऐवजी रुम नं. ८१ भाग चा उतारा सादर केला आहे. तसेच त्याबाबत नाव बदलाचा दाखला दिला असून त्यात क्षेत्राचा उल्लेख केलेला आहे. तसेच नांव बदल्याच्या दाखल्याची पडताळणी करुन घेतलेली आहे. त्या अनुषंगाने प्रस्तावाची छाननी केली असता मंजूर व प्रारुप विकास आराखडयानुसार विषयांकित जागा रहिवासी विभागात येत असुन सदर विकासकास या कार्यालयाचे क्र. उमपा/ नरवि/बांप/१५०/०७/६५४, दि. ०९.०३.०९ रोजी बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे जादा चटई क्षेत्र देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. |
| १० | श्री. सुरेश आर. मुलचंदानी मे. शेरावाली बिल्डर्स | ब्लॉक नं. सी.९, रुम नं. ३६, ब्लॉक सी १०, रुम नं. ३७,प्लाट नं. ८०, शिट नं. ५०, उल्हासनगर–३ | उमपा/नरवि/बांप/७४/२००८/५०६, दिनांक २२/१/२००९ | ब्लॉक नं. सी.९, रुम नं. ३६, ब्लॉक सी १०, ३६ यांचे सुध्दा बाजुच्या जागेवर देवीभवानी इमारत बनविली आहे. आपल्या लोकांनी त्यांना ८०० मीटरचा एफएसआय दिलेला आहे आणि नंतर १०० मिटरची साईड मार्जीन दिलेली आहे. याप्रकरणामध्ये सीडी व्हेरीफिकेशन झालेले नाही. सीड पडताळणी करता येत नाही असे त्यांनी लिहिले आहे. | ब्लॉक नं. सी–९,१० रुम नं. ३६, ३७ (भा), शिट नं. ५०, उ.नगर–३ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत मे. शेरावाली बिल्डर्स तर्फे श्री. सुरेश के. मुलचंदानी यांचे वास्तुविशारद श्री. अनुपसिंग सोधी यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. ३०.०८.०८ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. जागेचे क्षेत्र ५८५.४५ चौ.मी. होते. विकासकाकडे सदर जागेची सनद असुन उपविभागीय अधिकारी कार्यालयाने सनदेची पडताळणी करुन दिलेली आहे. तसेच नांव बदल्याच्या दाखल्याची पडताळणी करुन घेतलेली आहे. त्या व्यतिरिक्त जीनाचे क्षेत्र तसेच मा. आयुक्त यांनी उजव्या, डाव्या व मागील बाजूच्या सामासिक अतंरात मा. आयुक्त यांनी सुट देण्यात आली असून जीनाचे क्षेत्र |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | १२१. २९ चौ.मी. चे प्रिमियम भरुन बांधकाम नकाशे मंजूर करण्यात आलेले आहे. |
| ११ | श्री. राम एस निकम व श्रीम. रत्नमाला आर निकम | यु.नं. ७९, चालता नं. १५४, शिट नं. २२, लाल चक्की, उल्हासनगर —४ | सुधारीत बांधकाम नकाशा उमपा/नरवि/बांप/६४/०७/४९५, दिनांक १७/८/२००९ | प्लॉन नं.६४/०७/४९५, दिनांक १७/८/२००९ हा सुध्दा ४० फुट डिपी रोडवर आपण प्लान मंजुर केला आहे. | महाराष्ट्र शासनाने आदेशित केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये बांधकामे नियमाधीन करण्याचे कार्यवाही सुरु आहे. सबंधीत मिळकतधारकास मा. पदनिर्देशित प्राधिकारी यांनी नमुना ड मधील प्रमाणपत्र अदा करण्यात आली आहेत. 'ड' प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्यानंतर विकासकाने वास्तुविशारदमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव सादर केला आहे. तथापि विषयांकित जाागा ही मंजूर विकास आराखडयानुसार ४० फुट रस्त्याने बाधीत होत आहे. तसेच प्रारुप विकास योजनेमध्ये सदरचा रस्ता वगळून सदरची जागा रहिवासी वापरात समाविष्ट केलेली आहे. मात्र महाराष्ट्र शासनाच्या दि. १४.०१.२००६ रोजीच्या अध्यादेशानुसार त्यातील नियम (४) मधील पोट नियम (२) (९) च्या तरतुदीनुसार दंड भरुन सदर जागेवरील अनधिकृत बांधकाम नियमित करुन घेतले आहे. सदरचे बांधकाम जुने असल्याने विकासक ते निष्कासित करुन नव्याने बांधकामाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर जागेची सनद विकासक यांच्या नावे देण्यात आलेली आहे. मंजुर विकास आराखडयानुसार ४० फुट विकास रस्ता हा जागेवर अस्तित्वात नसून रस्त्यावर अनेक बांधकामे आहेत. व भविष्यात सुदधा हा रस्ता विकसित होणे शक्य नाही. त्यामुळे प्रारुप विकास योजनेमध्ये हा रस्ता वगळून त्यांच्या शेजारी अस्तित्वात असलेला ४० फुट रुंद रस्त्यालाच ६० फुट रुंद करण्यात आलेले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | तसेच महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. टिपीएस–१२०७/३८७/प्र.क्र.२४/०८/नवि–१२, नगर विकास विभाग यांचे दि. ३०.०१.२००८ च्या पत्रान्वये अनधिकृत बांधकाम नियमाधीन झालेल्या विषयांकित जागेचा पुर्नविकास इतर कोणत्याही नियमात सवलत न देण्याच्या अटीच्या अधीन राहून १ चटई क्षेत्र निर्देशांक मर्यादित करण्याच्या संदर्भाधिन प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही. त्या अनुषंगाने विकासकास बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. |
| १२ | प्राध्यापक शहिर दुनिचंद तेलनदास कालानी मेमोरियल ट्रस्ट | मंजुर विकास आराखडयातील आरक्षण साईट क्र. ५७, शिट नं. ७५, उल्हासनगर–१ | उमपा/नरवि/बांप/१६२/७९/८०, दिनांक | सदरहु इमारत व जागा महापालिका निहित असून वाढीव बांधकामासाठी महापालिकेच्या परवानगीवाचून संस्थेच्या प्राध्यापकास बांधकाम परवानगी देणे नियमबाहय आहे. | साईट नं. ५७, ए ब्लॉक रोड, उ.नगर–१ हया जागेवर संदर्भ पत्र क्र. १ अन्वये तळमजला + २ मजलेचे कॉलेजची बांधकाम परवानगी सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे हयांचे कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/बांप/१६५ दि. २४.०४.८० अन्वये मंजूर करण्यात आलेली होती व जागेवर मंजूर नकाशाप्रमाणे तळमजला + २ मजलेचे बांधकाम आतापर्यंत करण्यात आलेले होते. तथापि या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/सा/८९/०९, दि. ०४.०१.२०१० रोजीच्या पत्रान्वये शहीद दुनीचंद तेजनदास कलानी मेमोरीयल ट्रस्ट यांच्या नावाने तिसऱ्या मजल्यावर देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीच्या प्रस्तावामध्ये पुरेशी कागदपत्रे नसल्याने तसेच सदरची मिळकत महानगरपालिकेची असून आपल्यासोबत केलेले करारनामे या महानगरपालिकेस अप्राप्त आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी दिलेली बांधकाम परवानगी दि. २२.०२.२०१० रोजीच्या पत्रान्वये रद्द करण्यात आलेली आहे. |

<u>महासभा ठराव क्र:</u> ४ अ <u>दिनांक:–१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे १२ विवादित बांधकाम परवानगींबाबतचा अहवाल विचारात घेणे कामी पुढच्या सभेत घेण्या प्रयोजनार्थ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ७ :—** श्रीमती उषा सचीन चव्हाण हया दिनांक २६/९/२००४ पासुन सतत ५ वर्षपेक्षा जास्त कालावधी अनधिकृतपणे कामावर गैरहजर असल्याने त्यांना महापालिका सेवेतुन बडतर्फ करणेस मान्यता देणे.

---

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सचिव साहेब, एक मिनिट, यापुर्वी सभागृहात असे बरेचसे विषय आलेले आहेत. सन्माननिय सदस्य श्री. बोडारे साहेब, लक्ष दया. या महापालिकेत या सभागृहात असे विषय आलेले आहेत. जो एक वर्षपेक्षा जास्त गैरहजर राहिला असेल त्यास काढुन टाकण्यात यावे. कारण त्यास नोकरीची आवश्यकताच नाही. कारण त्यास जर नोकरीची गरज राहिली असती तर पाच, पाच वर्ष, चार,चार वर्ष गैरहजर राहिले नसते. आणि त्याप्रमाणे महापालिकेस कुठलीही सूचना न देता, कुठलेही प्रमाणपत्र न देता व कुठलीही परवानगी न घेता तो जर रजेवर जात असेल तर त्याला महापालिका सेवेत ठेवु नये. असे माझे स्वत:चे मत आहे म्हणुन मी म्हणतो की हा विषय वगळायचा, असे माझे स्पष्ट मत आहे.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदया, हे जे कर्मचारी सतत पाच वर्ष गैरहजर आहेत त्यांना नोकरीतून काढण्यासाठीच हा प्रस्ताव आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>मंजुर, ठिक आहे?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ७:—** श्रीमती उषा सचीन चव्हाण हया दिनांक २६/९/२००४ पासुन सतत ५ वर्षपेक्षा जास्त कालावधी अनधिकृतपणे कामावर गैरहजर असल्याने त्यांना महापालिका सेवेतुन बडतर्फ करणेस मान्यता देणे.

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते कि, श्रीम. उषा सचिन चौव्हाण याना, त्याचे सेवा निवृत्त सासु, श्रीम. शारदा किशन चौव्हाण याचे रिक्त जागेवर, वारसा पध्दतीने १८/०७/२००३ रोजी नियुक्ती देण्यात आली होती. त्यानतंर त्या दि. २६/०९/२००४ पासून सतत अनाधिकृतपणे कामावर गैरहजर आहेत. त्याची सेवा ०१ वर्ष ०२ महिने झालेली आहे.

त्याचे अनाधिकृतपणे गैरहजेरीबाबत त्यांना

१) दि.२६/०३/०५ रोजी ज्ञापन देऊन कामावर त्वरित हजर व्हावे याबाबत कळविले होते.

२) दि. १६/८/२००७ रोजी कारणे–दाखवा नोटिसद्वारे गैरहजेरीचा खुलासा देऊन ०७ दिवसात कामावर हजर व्हावे अन्यथा त्याचे विरूध्द मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) अंतर्गत कार्यवाही करण्यात येईल असे कळविले होते.

त्यानुसार, त्यानी त्याचे दि. २९/१३/२००७ चे पत्रान्वये खुलासा केला होता कि त्याची सासु व पतीचे भितीमुळे त्या कामावर हजर झालेल्या नाही, आता त्या कामावर हजर होण्यास तयार असुन त्यानां इतर विभागत कामावर ठेवावे अशा खुलासा केल्यानुसार त्याना या कार्यालयाने दि. २५/०६/२००८ चे पत्रान्वये ०७ दिवसाचे आत, उप–आयुक्त (आरोग्य) याचे कडे हजर व्हावे, असा आदेश देण्यात आला होता परंतू त्या दिड वर्षे कामावर हजर झालेल्या नाहीत.

आता त्यांनी दि. ०७/१२/२००९ चे पत्रान्वये पुन्हा कामावर हजर करून घेण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

मुबंई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) ''नियुक्ती प्राधिकारी'' माा. महासभा आहे, त्यानुसार सदरचा प्रस्ताव हा मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

तसेच रजा समाप्तीनंतर अनाधिकृतरित्या गैरहजर राहिल्यास नियम ४८ (२) नुसार शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) १९८९ नियम मधील नियम ४८(२) अन्वये देय/अनुज्ञेय मंजुर केलेल्या रजेंतरची कर्मचा–यांची अनुपस्थिती ही हेतुपुरस्पर कामावर अनुपस्थिती समजुन शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र आहे.

२) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) १९८२ नियम १९ अन्वये सक्षम प्राधिकारी (नियुक्ती प्राधिकारी) कर्मचा–याला गैरवर्तणुक, नादारी किंवा अकार्यक्षमता या कारणावरून शासकिस सेवेतुन काढुन टाकू शकेल अथवा सक्तीने सेवा निवृत्त करू शकेल अशी तरतुद आहे. मात्र असा आदेश काढण्यापूर्वी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ०८ ते १५ मध्ये उल्लेखलेली कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक आहे.

३) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) १९८९ नियम मधील नियम ६३(३) नुसार मंजुर करणारा सक्षम अधिकारी रजेशिवाय असलेल्या अनुस्थितीच्या कालावधीचे स्थायी कर्मचा–याचे बाबतीत ०१ वर्ष व अस्थायी कर्मचा–याचे बाबतीत ९० दिवसांचे मर्यादित भूतलक्षी प्रभवाने असाधारण रजेत परिवर्तन करू शकेल अशी तरतुद आहे.

४) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शा. परिपत्रक क्र. अरजा २४८८/१०६१/सेवा–०९, दि. ०७/१/१९८९ परिपत्रकानुसार म.न.से (रजा) नियम १६ व ६३(२) नुसार शिथिल करून दिर्घकालीन असाधारण रजा मंजूर करण्यासंदर्भात परिपत्रकातील परिच्छेद ३ मध्ये पध्दत विहित केलेले आहे. त्या नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) १९८९ नियम ४०व ४१ अन्वये संबंधीत कर्मचा–यांना रजा वाढ देण्यापूर्वी वैद्यकिय मंडळापुढे उभे करण्याची तरतुद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

५) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) १९८२ नियम ४८ नुसार नियुक्ती प्राधिकरी आदेशनुसार शासकिय कर्मचा–याच्या सेवेतील खंड क्षमापित करू शकेल मात्र नियम ४८ (१) (अ) नुसार असे खंड शासकिय कर्मचा–याच्या आटोक्याबाहेरील कारणांमुळे पडलेले असले पाहिजेत. तसेच ४८ (१) (क) नुसार सेवेत दोन किंवा अधिक खंड पडलेले असतील तर अशा खंडाचा एकुण कालावधी एक वर्षापेक्षा अधिक असता कामा नये.

मात्र नियम ४८ (२) नुसार नियम ४८ पोटनियम (१) खाली क्षमापित केलेल्या खंडाचा कालावधी अर्हताकारी सेवा म्हणून हिशोबात घेतला जाणार नाही अशी तरतुद आहे.

उपरोक्त संदर्भ ३ वरील नियामानुसार रजेशिवाय असलेल्या अनुपस्थितीच्या कालावधीचे भुतलाक्षी प्रभावने असाधारण रजेमध्ये परिर्वतन करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिक–यास असले तरी कायम शासकिय कर्मचा–याचे बाबतीत १ वर्ष अस्थायी कर्मचा–याचे बाबतीत ९० दिवस पर्यंतची मर्यादा आहे. सबब यापुढे उपरोक्त संदर्भ ४ वरील शासन परिपत्रकातील तरतुदी परिणामकारकपणे अंमलात आणणे आवश्यक आहेत.

प्रस्तुत प्रकरण उपरोक्त संदर्भ १ ते ५ वरील तरतुदीस अनुसरून नसल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिका–याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळून चारशे रूपये किंवा त्याहून अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हाणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) १९८२ मधील नियम ७१ अन्वये वैद्यकिय सेवा निवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगापलिका अधिनियम १९४९ मधील नियम कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिका म्हणजेच महासभा '' नियुक्ती प्राधिकारी'' म्हणून सक्षम आहे.

श्रीम. उषा सचीन चव्हान हया दि. २६/९/२००४ पासुन सतत ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी अनधिकृतपणे कामावर गैरहजर आहे परंतु त्यानुसार त्या कामावर हजर झालेल्या नाहीत

तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) नुसार त्यांना महापालिका सेवेतुन बडतर्फ करणेस मा. महासभेची मान्यता होणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५ <u>दिनांक:–१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे कायदयाच्या पुर्ततेच्या अधिन राहून श्रीमती उषा सचीन चव्हाण हया दिनांक २६/९/२००४ पासुन सतत ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी अनधिकृतपणे कामावर गैरहजर असल्याने त्यांना महापालिका सेवेतुन बडतर्फ करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :–** १५ वर्षाकरीता बी.ओ.टी. तत्वावर अभिकर्ता स्वखर्चाने उल्हासनगर शहरामधील डाव्या बाजुला विविध ठिकाणी दिशा दर्शक फलक लावणे व त्याऐवजी उजव्या बाजुला महापालिकेला वार्षिक देय रक्कम अधिन राहून जाहिरातीचे हक्क देणे.

---

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>नगरसेवकांना समजणार नाही अशा पध्दतीने डावी बाजु कोणती व उजवी बाजु कोणती...

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:–</u>हा विषय नाकारण्याचा आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा विषय स्पष्टपणे सभागृहासमोर मांडावा. जरा आम्हांला हा विषय समजुन घ्यायचा आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>होय, हा विषय समजला पाहिजे.

<u>सदस्य श्री.राजु जग्यासी :–</u>विषय वगळा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>होय, विषय वगळा.

<u>महापालिका सचिव :–</u>विषय वगळायचा काय? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :–</u>विषय पुढे ढकला.

<u>महापौर :–</u> सदरचा विषय पुढे ढकलण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ८** :— १५ वर्षाकरीता बी.ओ.टी. तत्वावर अभिकर्ता स्वखर्चाने उल्हासनगर शहरामधील डाव्या बाजुला विविध ठिकाणी दिशा दर्शक फलक लावणे व त्याऐवजी उजव्या बाजुला महापालिकेला वार्षिक देय रक्कम अधिन राहून जाहिरातीचे हक्क देणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयांन्वये उल्हासनगर महानगरपालिका शहरांमधील विविध ठिकाणी दिशा दर्शक फलक (Location and Arrow for Public Information) लावणेसाठी बी.ओ.टी.तत्वावर १५ वर्षाकरीता पवन कंपनी यांनी असा प्रस्ताव दिला आहे कि त्यात आम्ही दिलेल्या आकृती नुसार तेथे दिशा दर्शविणारे फलक लावेल व त्याचा संपूर्ण खर्च निविदा धारक वहन करील. त्याच्या ऐवजी त्याला दिशा दर्शविणा—या फलकाच्या उजव्या बाजूला जाहिरातीचे हक्क पाहिजेत. व सदरच्या कालावधीमध्ये येणारा संपूर्ण खर्च व देखभाल स्वत:करतील.

त्यामुळे केलेल्या खर्चाचा दोन वर्षामध्ये गुतविलेल्या खर्चाऐवढे उत्पन्न मिळणार नाही. म्हणून हा दोन वर्षाचा नियम त्याला लागु करणे रास्त दिसत नाही. तसेच सदर प्रस्तावाबाबत मा. महापौर यांनी सुचविल्या प्रमाणे सदरचा प्रस्ताव १५ वर्षाकरीता देणेबाबत योग्य वाटते. निविदा धारकाशी करारनाम्याचा कालावधी १५ वर्षाचा राहणार आहे. उक्त १५ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर शहरातील सर्व दिशा दर्शक फलक हे निविदा धारक महापालिकेस हस्तांतरीत करेल. त्याचप्रमाणे जाहिरातीकरीता ४५ टक्के भाग व उर्वरीत ५५ टक्के भागात उमपाचे नाव दर्शविणारे सुचना असेल. तसेच ठरलेल्या जाहिरातीच्या भागात म्हणजे ५५ टक्के भागात महापालिकेचे स्लोगन किंवा बोध वाक्य लिहिण्याकरीता वापरण्यात येईल. जेनेकरूण महापालिकेकडुन करण्यात येणा—या प्रसिध्दीकरणाचा खर्च वाचेल.

उक्त बाबी विचारात घेता शहरांमधील विविध ठिकाणी दिशा दर्शक फलक निविदा काढून विविध ठिकाणी दिशा दर्शक फलक लावने किंवा बी.ओ.टी तत्वावर देणे महानगरपालिका शहरांमधील विविध ठिकाणी दिशा दर्शक फलक लावणेसाठी फलकावर ४५ टक्के निविदाधारकाची जाहिरात व ५५ टक्के भागात उमपाचे नाव दर्शविणारे सुचना असेल. या गोष्टी विचारात घेवून शहर स्वच्छ, सुदर व दिशादर्शक ठेवण्याकरीता शहरांच्या विविध ठिकाणी दिशा दर्शविणारे फलक लावणेकरीता प्रस्ताव तयार करून महानगरपालिकेस वार्षिक देय रक्कम याबाबत निविदा मागविणे उचित होईल. व १५ वर्षांच्या कालावधीसाठी निविदा मागविनेकरीता मा. महासभमध्ये या प्रस्तावावर चर्चा करूण निर्णय घेण्याकरीता प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ५ अ

दिनांक:—१२/७/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे १५ वर्षाकरीता बी.ओ.टी. तत्वावर अभिकर्तास स्वखर्चाने उल्हासनगर शहरामधील डाव्या बाजुला विविध ठिकाणी दिशा दर्शक फलक लावणे व त्याऐवजी उजव्या बाजुला महापालिकेला वार्षिक देय रक्कम अधिन राहून जाहिरातीचे हक्क देणेकामी पुढच्या सभेत घेण्या प्रयोजनार्थ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ९ :–** महानगरपालिकेतील वर्ग–२, वर्ग–३ व वर्ग–४ मधील कर्मचा–यांना अश्वासीत सेवांतर्गत प्रगती योजनेचा लाभ देणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ९ :–** महानगरपालिकेतील वर्ग–२, वर्ग–३ व वर्ग–४ मधील कर्मचा–यांना अश्वासीत सेवांतर्गत प्रगती योजनेचा लाभ देणे.

<u>प्रस्तावना</u>

शासन निर्णय क्रमांक वेतन ११९९/प्रक्र२/९९/सेवा–३, दिनांक २० जुलै, २००१ रोजीच्या परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेतील विविध पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्याने सेवेतील कुंठीतता घालविणे बाबत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देवून त्यांना सुधारीत वेतनश्रेणी लागू करणेबाबत प्रस्तावीत करण्यात येत आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना ज्या–ज्या वेळी एकाच पदावर नियमित १२ वर्ष सेवा पूर्ण होते त्या – त्या वेळी सदर योजनेअंतर्गत उपरोक्त दिनांक २० जुलै, २००१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारसीनंतर सेवांतर्गत प्रगती योजनेचा लाभ देणेबाबत मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावीत करण्यात येते आणि मा. महासभेच्या मान्यतेनंतर सदर लाभ देण्यात येतो.

त्यानुसार शासननिर्णयातील तरतुदी, गोपनीय अहवाल प्रतवारी(वर्ग–२ आणि वर्ग–३ मधिल संबंधीत कर्मचारी) जात पडताळणी प्रमाणपत्र, सेवाविषयक तपशिल विचारात घेतल्यानंतर सफाई कामगार संवर्गातल कर्मचारी (रू. २५५०–३२००) यांना सुधारीत वेतनश्रेणीचा (रू. २६१०–४०००) लाभ देणेबाबत संबंधीत कर्मचारी यांची यादी विवरणपत्र–अ मध्ये तसेच पुढीलप्रमाणे संवर्गातील : वर्ग–२ ( उप मुख्य लेखाधिकारी, वैद्यकीय अधिकारी ), वर्ग–३ चे (कनिष्ठ अभियंता, लिपिक, मिस्त्री, गवंडी, वाहन चालक) तसेच वर्ग–४ चे (विद्युत लिपिक, विद्युत मदतनीस, मजूर, सुरक्षारक्षक, माळी, शिपाई) या संवर्गातील पात्र अधिकारी/कर्मचारी यांना सदर लाभ देण्याबाबत विभागीय पदोन्नती समितीमार्फत शिफारस करण्यात येत आहे. तसेच याबाबत पात्र अधिकारी / कर्मचारी यांची यादी सोबत विवरणपत्र – ब मध्ये नमुद केली आहे. तसेच तत्कालीन विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेकडील दिनांक २६/१२/२००५ रोजीच्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे सन १९९५ पूर्वीचे व जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यापासुन सूट मिळविलेले असे विविध संवर्गातील संबंधीत कर्मचाऱ्यांची स्वतंत्र यादी विवरणपत्र – क प्रमाणे प्रस्तावीत केली आहे विवरणपत्र – ब आणि विवरणपत्र – क मध्ये नमुद वेतनश्रेणी ही पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे निश्चित करण्यात आली असुन मान्यतेनंतर सुधारीत वेतनश्रेणीविषयक आदेश निर्गमित करण्यात येतील.

तरी उल्हासनगर महानगरपालिकेतील विविध पदांवरील अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक २० जुलै, २००१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार व विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारसीनुसार सेवांतर्गत योजनेचा लाभ देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महासभा पटलावर प्रस्तावीत करीत आहे.

<u>महासभा ठराव क्र: ६</u> <u>दिनांक:–१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. बच्चाराम रुपचंदानी
अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार सोबत जोडलेल्या यादीमधील ५४७ पात्र कर्मचा–यांना अश्वासीत सेवांतर्गत प्रगती योजनेचा लाभ व पदोन्नती पदाच्या वेतन संरचनेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :– विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १० :– प्रस्तावाची सूचना

महापालिका निहित इमारत किंवा सार्वजनिक उदयोगांसाठीचे जागेवर उदयानांवर महापालिकेच्या
बोधचिन्हासह फलक लावणे

---

सदस्य श्री. लाल पंजाबी :–हा माझा अशासकिय प्रस्ताव आहेत, शहरातील जेवढया काही मालमत्ता आहेत जसे गोलमैदान येथे साधुवासवानी उदयान आहे, उल्हासनगर–४ येथे स्वामी शांतीप्रकाश उदयान आहे, टाउन हॉल आहे शहरातील अन्य प्रकल्प आहेत, प्रेमचंद पेसुमल यात्री निवास आहे, जर बाहेरील लोक येथे येतात तर माझी अशी सूचना आहे की, तर सर्वांना असे वाटते की, साधुवासवानी गार्डन हे मिशनने बनविले आहे, स्वामी शांतीप्रकाश उदयान आहे ते तेथिल ट्रस्टने बनविले आहे. परंतु कोणत्याही जागी महापालिकेचे फलक नाही आहे. बाहेरील व्यक्ती जेव्हा तेथे येतात, तर ते विचारतात की हे जे उदयान आहेत ते त्या ट्रस्टचे आहे तर महापालिकेने याबाबत काय केले आहे? तर माझी अशी सूचना आहे की, ज्या काही सार्वजनिक मालमत्ता आहेत तर तेथे उल्हासनगर महानगरपालिका व सोबत महापालिकेचे बोधचिन्ह, जसे मोठ मोठया कंपनीचे एक ब्रॅण्ड नाव असते, रिलायन्स कंपनी असो, युनियन बॅक असो, बॅक आफ बडोदा असो तर प्रत्येकाचे एक बोधचिन्ह असते, प्रत्येकाची ओळख असते तर त्याच प्रकारे प्रत्येक सार्वजनिक ठिकाणी, आयुक्त साहेब, जरा पहा ही माझी सूचना आहे. तर सार्वजनिक ठिकाणी महापालिकेचे संपुर्ण नाव व बोधचिन्हाचे फलक लावले पाहिजे. भलेही त्या खालोखाल त्या ट्रस्टचे नाव जसे स्वामी शांतीप्रकाश उदयान, साधुवासवानी उदयान, यात्री निवास, टाउन हॉल असे नाव असले पाहिजे, म्हणजे लोकांना माहित पडले पाहिजे की, हे महापालिकेचे प्रकल्प आहे. कुणा व्यक्ती विशेषाचे नाही आहे. तर माझी आपणांस विनंती आहे की, या प्रस्तावास पारीत करुन याची जी अंमलबजावणी आहे ती तीन महिन्याच्या आत प्रत्येक जागेवर झाली पाहिजे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–मा. महापौर, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आमचे मित्र श्री. लाल पंजाबी यांनी जो प्रस्ताव मांडला तो फारच चांगला प्रस्ताव आहे. उल्हासनगर शहरात असे वाटते की जे काही बगिचे आहेत ते खाजगी आहेत. आमचे श्री. लाल पंजाबी यांनी जे सांगितले त्याबाबत मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. व लवकरात लवकर केली जावी, तसे तर आमच्यरा श्री. लाल पंजाबी साहेबांनी तीन महिन्याच्या कालावधीत कारवाई करावी असे सांगितले आहे जर त्या अगोदर होत असेल तर फारच चांगले होईल. मला अपेक्षा आहे की आयुक्त साहेब याकडे लक्ष देतील.

महापालिका सचिव :–पास ना सर्व संमतीने?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–सन्माननिय महापौर महोदया, मी सभागृहाची परवानगी मागत आहे की, उल्हासनगर शहरातील विविध ठिकाणी दिशादर्शक फलक लावणे विषयीचा जो प्रस्ताव आहे ती बीओटी तत्वानुसारची आहे. सभागृहाने त्यास वगळण्यास मान्यता दिली आहे तर मी सभागृहास विनंती करतो की शहरात जे बीओटी तत्वावर जे काम चालु आहे त्या नुसार या योजनेचा प्लान आणलेला होता त्याअनुसार शहरातील मध्यभागी जे फलक लावण्यात येतील ते दोन्ही बाजुने डाव्या व उजव्या बाजुने लावण्यात येतील त्यासाठी जो ठेका दिला जाईल तो खर्च ठेकेदार करेल. तो फलक आपल्या महापालिकेतील स्थळदर्शकावर लावला जाईल. ५५ टक्के जी जागा आहे त्या जागेवर स्थळदर्शक फलक लावण्यात येईल व जी ४५ टक्के जागा आहे उजव्याबाजुची त्यावर जाहिरातीचे फलक असेल. जर जाहिरात झाली तर वर्षाची तो स्केअरफीटप्रमाणे दर देईल आणि तो तसे पैसे महापालिकेस देईल. व त्याबद्दल त्यास १५ वर्षाचा जाहिरातीसाठी अधिकार दयावा लागेल. होवु शकते की त्यात १० टक्के १५ टक्के ३ वर्षामध्ये वाढ होवु शकते. असाच प्रस्ताव होता तर माझी सभागृहास विनंती आहे जर होवु शकते तर यावर आपण विचारा करावा.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–मा. आयुक्त साहेब, हा जो आपण सभागृहापुढे प्रस्ताव मांडला त्याबाबत जर त्याची सविस्तर माहिती आपण सभागृहास देणार व सर्वांनी त्यावर अभ्यास केला तर आपण म्हणालात त्यावर आम्ही विचार करु शकतो.

**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—** तो ठेकेदार पोल वगैरे या ज्या पायाभुत सुविधा उभारेल त्यासाठी तो जो खर्च करेल तो निघाला पाहिजे म्हणुन ४५ टक्के जागेवर तो जो जाहिरात करेल त्यासाठी निविदा मागविल्या जातील आणि ज्याचा दर जास्त येईल त्यास हे काम दिले जाईल. १५ वर्ष यासाठी दयायचे आहे की, पायाभुत सुविधासाठी तो जो खर्च करेल त्याचा तो खर्च निघाला पाहिजे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**आयुक्त साहेब, कल्पना ठिक आहे.

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—**मी यापुर्वीच म्हटले आहे की यावर अभ्यास करण्यासाठी सविस्तर माहिती दया. त्यानंतर आम्ही विचार करु. तोपर्यंत तो विषय वगळा.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**कल्पना फार चांगली आहे. ४५ टक्के आणि ५५ टक्के जे आपण सांगितले त्यामध्ये वैयक्तीकपणे कुणी व्यक्ती, किंवा कुणी एखादा पास किंवा पैसे देवुन कुणी उदयानात प्रवेश देणार काय? अशी काही सविस्तर माहिती दिलेली नाही ना? यामुळे नगरसेवकांना माहितच पडत नाही की कशासाठी हे दिले जात आहे? फक्त जाहिरातीसाठी तो करणार नाही त्यामागे काहीना काही काम चालवेल.लोकांना मनोरंजन करण्यासाठी काही पासेस देईल. किंवा भाडयाने वगैरे देईल काय? हे सुध्दा सर्व आले पाहिजे ना?

**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—**सदरची जाहिरात रस्त्यावर जे फलक लागणार आहेत रस्त्याच्या मध्ये जे बोर्ड लागणार आहे, समजा जसे की महापालिका कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, चोपडा कोर्ट असे एका बाजुला फलक लागेल आणि ते बोर्ड टि टाईप असेल आणि उजवी साईड जी आहे त्यावर ती जाहिरात करेल. तो जाहिरात दुस—याची घेईल त्याच्याकडुन तो पैसे वसुल करेल त्याबद्दल्यात तो आपल्याला पैसे देईल. एवढी जाहिरात आहे स्केअर फुटानुसार एवढया जाहिरातीवर एवढे पैसे होतात.

**महापालिका सचिव :—**काय करायचे?

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—** पुढील सभेत निर्णय झाला आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

विषय क्र. १० :— प्रस्तावाची सूचना

महापालिका निहित इमारत किंवा सार्वजनिक उदयोगांसाठीचे जागेवर उदयानांवर महापालिकेच्या
बोधचिन्हासह फलक लावणे

प्रस्तावकः— श्री. लाल पंजाबी
अनुमोदक — श्री. बच्चाराम रुपचंदानी

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे महापालिका निधीतून सार्वजनिक उपयोगासाठी गोल मैदान येथील ब्रम्हकुमारी पीस पार्क, साधुवासवानी गार्डन, रोटरी मिंडटाऊन गार्डन, सार्वजनिक बाजार, समाज मंदीर, वाचनालये, शौचालये, यात्री निवास, व्ही.टी.सी. गाऊंड, सार्वजनिक उद्याने, बागा, क्रिडांगणे व मनोरंजनासाठीच्या जागा, शाळा, जनरल अरुणकुमार वैद्य सभागृह, विश्रामगृह व इतर. सार्वजनिक इमारती महापालिके तर्फे वेळोवेळी बांधण्यात आलेल्या आहेत यापैकी काही महापालिका निहित बांधकामे किंवा सार्वजनिक उद्याने, सुशोभिकरणासाठी व सुस्थितीत ठेवणेचे प्रयोजनार्थ खाजगी संस्थाकडे देण्यात आलेली आहेत, परंतु कोणतीही संस्था महापालिका निहित मालमत्ता बांधकाम किंवा उद्यानावर महापालिकाचे नाव

दर्शविणारे फलक जाहिर करीत नाही, उलट सदरहू संस्था स्वत:च्या नावाने फलक प्रदर्शित करुन महापालिकेचे नाव जाहिर करत आहे त्यामुळे त्याचा परिणाम उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रतिमेवर होत आहे. उल्हासनगर महानगरपालिका शहरात सार्वजनिक उपयोगासाठी बांधकाम किंवा उद्यानाचे काहीही काम करत नाही.

महानगरपालिका निहित बांधकाम किंवा इमारती किंवा उद्याने शहरात मोठया संख्येने उपलब्ध असून त्यास प्रसिध्दी मिळत नाही, म्हणून प्रत्येक महानगरपालिका निहित इमारतीवर किंवा खुल्या जागेवर किंवा सार्वजनिक उद्यानांवर महापालिकेचे नाव दर्शविणारे फलक लावणे व त्यास प्रसिध्दी देणे गरजेचे असून प्रशासनास त्याविषयीचे अंमलबजावणी प्रयोजनार्थ कठोर निर्देश देणेकामी महासभेपुढे प्रस्तावित.

<u>प्रस्तावित महासभा ठराव क्र.</u> ७ <u>दिनांक:—१२/७/२०१०</u>

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता महापालिका निहित प्रत्येक इमारत किंवा सार्वजनिक उदयोगासाठीचे जागेवर किंवा उदयानांवर महापालिकेच्या बोधचिन्हासह दर्शविणारा फलक लावणेचे काम पुढील ३ महिन्यात पुर्ण करणेस अन्यथा संबंधित कसूरदार अधिकारी/कर्मचा—यांवर कारवाई करण्यास प्रशासनास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>पहिली सभा समाप्त.

सायंकाळी ५.११ वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— १८/६/२०१०

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८/६/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

२

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १८/६/२०१० रोजी सायंकाळी ४.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

८. महापौर —— श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

९. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३३ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३४ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ५ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३५ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ६ | श्री. गायकवाड दिलीप | ३६ | श्री. रामसागर जनार्दन यादव |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३७ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ८ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ३८ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ३९ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४० | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४१ | श्री. शेखर केशव यादव |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४२ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १३ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४३ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४४ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४५ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १६ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४६ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १७ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४७ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १८ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ४८ | श्रीमती ज्योती शाम माने |
| १९ | श्री. राजू जग्यासी | ४९ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २० | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २१ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ५१ | श्री. रमेश चव्हाण |
| २२ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५२ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २३ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५३ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २४ | श्री. लाल पंजाबी | ५४ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २५ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ५५ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २६ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ५६ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २७ | श्रीमती शकुंतला पाटील | ५७ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| २८ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ५८ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| २९ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ५९ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३० | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६० | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |
| ३१ | श्री.एडके गणपत गोविंद | ६१ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ३२ | श्री. मुकेश सोहन तेजी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती चेनानी ज्योती रमेश, २. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ३. श्रीमती जया प्रकाश माखीजा, ४. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ५. डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी, ६. श्री. आयलानी कुमार उत्तमचंद, ७. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम, ८. ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी, ९. श्रीमती महाडीक रजनी मोहन, १०. श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी, ११. श्री. मंगतानी सुंदर आसनदास, १२. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान, १३. कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल, १४. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे, १५. श्री. किशोर जग्यासी, १६.



श्री. मोहन साधवाणी, १७. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), १८. श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी, १९. श्री. सुनिल साहेबराव गंगवानी, २०. श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

३०.श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
३१.श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त
३२.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३३.श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त
३४.श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
३५.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
३६.डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
३७.श्री. एम. जवांदे, शहर अभियंता
३८.श्री. एस.के.सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
३९.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
४०.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
४१.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
४२.श्री. जी.जी. हिबारे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
४३.श्री. नंदु समतानी, प्र.प्रभाग अधिकारी
४४.श्री. जनार्दन देवकर, लिपिक, आरोग्य
४५.श्री. गायकवाड, शिक्षण अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती अमिता संखे
५. श्रीमती नर्गिस खान

सायंकाळी ४.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे:–</u> मा. महापौर महोदय, सभेचे कामकाज सुरु होण्याअगोदर मी एक शोक प्रस्ताव मांडु इच्छितो, शिक्षण मंडळाचे माजी सदस्य श्री. नितीन कुलकर्णी यांचे नुकतेच काही दिवसांपूर्वी निधन झाले आहे. सभागृहाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली वाहली जावी.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>मनसेचे महाराष्ट्रातील जेष्ठ नेते श्री. संभाजी पाटील यांचे नुकतेच काही दिवसापुर्वी निधन झाले. तसेच आपल्या सभागृहातील सदस्य श्री. सुंदर मंगतानी यांच्या मातोश्री श्रीमती रुक्मणीदेवी मंगतानी यांचे सुध्दा काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे तर माझी संपुर्ण सभागृहास विनंती आहे की, संपुर्ण सभागृहाने त्यांना श्रध्दांजली वाहावी व दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन मौन धारण करावे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सदरहु शोक प्रस्ताव सर्वांच्या संमतीने पुढीलप्रामणे संमत करण्यात येत आहे. कृपया मौन धारण करावे.

सुचकाचे नाव :– श्री. राजेश वानखेडे

अनुमोदकाचे नाव :–श्री. लाल पंजाबी

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर नगरपालिका शिक्षण मंडळाचे माजी सदस्य श्री.नितीन कुलकर्णी यांचे नुकतेच काही दिवसापुर्वी निधन झाले

तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व उल्हासनगरमधील जेष्ठ नेते श्री. संभाजी पाटील यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले. व उल्हासनगर महापालिकेच्या प्रभाग क्र. ४६ चे विद्यमान सदस्य श्री. सुंदर मंगतानी यांच्या मातोश्री श्रीमती रुक्मणीदेवी मंगतानी यांचे सुध्दा काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे

..३..

वर उल्लेख केलेल्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. १ अ** **दिनांक:–१८/६/२०१०**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री.नितीन कुलकणी, ॲड. श्री. संभाजी पाटील, श्रीमती रुक्मणीदेवी मंगतानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सूचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :–**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, मी सर्वांना विनंती करतो की, आपण मा. आयुक्त साहेबांचा अभिनंदनाचा प्रस्ताव सभागृहात पारीत करु या. कारण आज उल्हासनगर शहराचा जो कायापालट दिसत आहे, आज महापालिकेचा जो कायापालट दिसत आहे, हे आमचे डॅशींग, डायनामिक आणि कर्तव्यबाज आयुक्त आज आम्हांला लाभलेले आहेत, त्यामुळे आयुक्तांचा अभिनंदनाचा प्रस्ताव या ठिकाणी आपण सर्वानुमते पारीत करु या. त्यांनी आज उल्हासनगरमध्ये जेवढे काही कार्य केलेले असेल, रस्ता दुभाजक येथे जी झाडे लावली, तर आज झाडे वाचवा असा संपुर्ण देशामध्ये प्रचार होत आहे. आज उल्हासनगरमध्ये आयुक्तांनी हजारहुन जास्त झाडे लावण्याचा कार्यक्रम त्यांनी केलेला आहे. आज आपण या ज्या सभागृहात बसलो आहोत, त्या आधी सभागृह कसे होते, महापालिकेचा नक्शा कसा होता, आयुक्त श्री. बागेश्वर यांनी जो कारभार हाती घेतला, त्यानंतर त्यांनी संपुर्ण महापालिकेचा कायापालट केला आहे. आणि दुसरे म्हणजे जे काम त्यांनी सर्वात पुर्वीपासून रेंगाळलेले होते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रवेशद्वाराचे जे काम रेंगाळलेले होते, ते काम देखील त्यांनी आल्यापासुन, खुर्चीवर बसल्यापासून लगेच चालु केले. त्याबद्दल सुध्दा त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव पारील केला पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे आपले जे मेनगेट आहे श्री. छत्रपती शिवाजी प्रवेशद्वार ते देखील त्यांनी केले. उल्हासनगरमध्ये प्रवेश केल्याबरोबर ते अतिशय प्रसन्नतेचे असे वातावरण या ठिकाणी निर्माण झालेले दिसते. असे एवढे मोठे कार्य त्यांनी करुन दाखविल्याबद्दल त्यांचे सर्वांनी अभिनंदनाचा प्रस्ताव सर्वानुमते पारीत करावा, अशी मी सर्वांना विनंती करतो.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के :–**मा. महापौर महोदया, उप–महापौर महोदय, आयुक्त साहेबांचे अभिनंदन करायचे हे बरोबर आहे. परंतु दोन महिन्यापुर्वी जकात नाक्याशेजारील घरामध्ये जो टॅम्पो घुसुन अपघात झाला होता,

त्या घरातील सदस्यांना आपण पैसे देवु, चेक देवु  असे कबुल केले होते. दोन महिने उलटुन गेले तरी सुध्दा अजुन त्याबाबत काही कार्यवाही झालेली नाही. त्याबाबत मी आयुक्त साहेबांना विचारतो की, हे काम कशाबाबत रखडलेले आहे?  त्याचे कारण काय आहे?

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :–**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, हा जो आयुक्तांच्या अभिनंदनाबाबतचा प्रस्ताव मांडला आहे त्याचे मी अनुमोदन करते व आयुक्त साहेबांबरोबर मी लेडी पॉवर म्हणुन मा. महापौर महोदया यांचे सुध्दा अभिनंदन करते. कारण की त्या महिला असून सुध्दा त्यांनी चांगले काम केले आहे. तसेच दुसरी एक गोष्ट मी सांगु इच्छिते की, उल्हासनगरमध्ये मोठया प्रमाणावर जी विकास कामे चालु आहेत त्याचे श्रेय सर्वस्वी महानगरपालिकेतील पदाधिकारी सर्व सदस्य व अधिकारी, कर्मचा–यांना जाते.  त्यांचेही अभिनंदन केले पाहिजे. माझ्या प्रभागात गटाराची एक फार मोठी समस्या गेल्या आठ वर्षापासुन होती.  या समस्येबाबत मी फार त्रस्त होते.  या कामाचे मागील वेळेस जे प्राकलन तयार केले होते ते ७० लाखाचे प्राकलन तयार केले होते.  त्यानंतर त्याच कामाचे ५० लाखाचें प्राकलन तयार केले होते. परंतु निधी उपलब्ध नसल्यामुळे मागील वर्षापासुन ते काम थांबले होते.  परंतु आमचे आयुक्त साहेब श्री. बागेश्वर साहेब व शहर अभियंता श्री. जवांदे साहेब यांचे मी विशेषकरुन आभार मानु इच्छिते.   कारण की त्यांनी हे काम केवळ पाच लाखामध्ये अतिशय चांगल्याप्रकारचे पुर्ण केले.  माझ्या प्रभागातील ती जी झोपडपट्टी आहे ज्या झोपडपट्टीमध्ये दरवर्षी पावसाळयाचे पाणी जमा व्हायचे त्याप्रमाणे यावर्षी पुराचे पाणी जमा होत नसल्याने यासाठी ते झोपडपट्टीवाशी

..४..

आपणांस मनापासुन धन्यवाद देतील.  यास्तव मा. आयुक्त श्री. बागेश्वर साहेब, शहर अभियंता श्री. जवांदे साहेब, महापौर महोदया, व उप–महापौर महोदय यांचे मी अतिशय ऋणी आहे.

**सदस्य श्री. जीवन इदनानी :–**मा. महापौर महोदया, या सभागृहाचे नुतनीकरण तर झाले, फार चांगले वाटले. आणि हे काम आपल्या नेतृत्वाखाली झाले.  ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे.  याचबरोबर मी विशेषकरुन अभिनंदन करु इच्छितो आमचे महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा यांचे, त्याचबरोबर विदयुत विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. मुकेश आयलानी यांचे.  या दोघांचे या कामामध्ये फार मोठे योगदान आहे.  या दोघांचे सुध्दा अभिनंदन केले जावे.  ब–याच वर्षानंतर आपण सर्व नगरसेवकांना ही फार मोठी भेट दिली आहे. त्याबद्दल अतिशय आभारी आहे.  व दुसरी गोष्ट मी सांगु इच्छितो की, आपल्या सभागृहाचे सदस्य श्री. अंकुश म्हस्के यांच्या प्रभागात ६ महिन्यापुर्वी एक ट्रक मध्यवर्ती जकात नाक्या शेजारी झोपड्डीत घुसला होता. त्या झोपडीधारकास नुकसान भरपाई दिली जाईल असे सभागृहात सांगण्यात आले.होते.  वारंवार स्मरणपत्र दिल्यानंतरही व जकात विभागाचे उप–आयुक्त, श्री. म्हसाळ साहेब यांना वारंवार सांगितल्यानंतरही अदयापपर्यंत नुकसान भरपाई मिळालेली नाही.  त्यांनी सांगितले की, मी यांच्याशी बोलतो, त्यांच्याशी बोलतो. महापौर महोदया, अदयापपर्यंत तो प्रश्न सुटलेला नाही.  कृपया करुन हा प्रश्न प्रथम सोडविला जावा. या प्रश्नाचे शेवटी काय होणार आहे? याबाबतीत मला निर्णय दया. एका गरीबाची दोन कुटुंबे आहेत, ते महानगरपालिकेत एका दरवाजातुन दुस–या दरवाज्यात भटकत आहेत.  परंतु त्यांच्याबाबतीत काही निर्णय घेतला जात नाही.

**श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय) :–**मा. महापौर, उप–महापौर आणि आयुक्त साहेब, मध्यंतरी विधानसभेची आचारसंहिता लागलेली होती. मे महिन्यापर्यंत आचारसंहिता होती.  २ जुनपर्यंतचा निवडणूक कार्यक्रम होता.  परंतु ती लवकरच संपुष्टात आली.  त्या आचारसंहितेमुळे हे काम राहुन गेले आहे. या आठवडयात हे काम होईल.

**सदस्य श्री. जीवन इदनानी :–**आभारी आहे.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :–**सन्माननिय महापौर महोदया, उप–महापौर महोदय व आयुक्त साहेब, आजच्या महासभेत आयुक्त साहेबांचे अभिनंदन करण्यात आलेले आहे.  राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्यावतीने आम्हीही त्यांचे अभिनंदन करतो.  सभागृहाचे हे जे नुतनीकरण केले आहे ते पाहुन सर्व सदस्यांना अतिशय आनंद झाला आहे. सर्व सदस्य वातानुकुलीत सभागृहात बसलेले आहेत.  उन्हाळयात उकाडयाने त्रस्त होवून श्री.बी.बी. मोरे साहेब सभागृहात नेहमी म्हणायचे की, सभागृहात वातानुकुलीत यंत्रणा बसवा.  आयुक्त साहेब, तुम्ही शहरातील रस्त्यांच्या मध्यभागी जी झाडे लावली आहेत त्यामुळे शहरात हिरवाई निर्माण झाली आहे.  परंतु त्याबाबतीत

मी तुम्हांला एक आठवण करुन देवु इच्छितो की, शहाड स्टेशन समोरील, शहाड फाटकपासुन सुध्दा झाडे लावण्याचे काम सुरुवात करा. उल्हासनगर कॅम्प नं.३ मध्ये रस्त्याच्या मध्यभागी झाडे लावली आहेत तशी याठिकाणी सुध्दा लावली जावीत. अशी आमची इच्छा आहे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी आणि आयुक्त साहेब, आज सर्व सन्माननिय सदस्य अतिशय खुश आहेत. सभागृहाच्या नुतनीकरणासाठी मा. महापौर, उप—महापौर आणि आयुक्त साहेबांनी जे सहकार्य केले त्याबद्दल धन्यवाद देत आहे. आमच्या रिपब्लीकन पक्षाच्यावतीने मी सुध्दा त्यांना धन्यवाद देतो. पण मी एक चिमटा घेतो तो असा की, उल्हासनगर महानगरपालिकेचे आम्ही सर्व सदस्य येथे सभागृहात आल्यानंतर वातानुकुलीत सभागृहात बसतो. शहरातील समस्या येथे मांडणार परंतु आमच्या शहरातील लोक घाणीच्या साम्राज्यामध्ये नाकाला रुमाल लावुन शहरात वावरत आहेत. पावसाळयाचे दिवस आहेत. कचरा ठेकेदाराने, घरोघरी जावुन कचरा गोळा करणारे डबेवाले काढुन घेतले आहे. शहरातील कचरा उचलला जात नाही. आठ आठ दिवस कच—याचे ढिग लागले आहेत. स्थायी समितीचे सन्माननिय सभापती यांचा प्रभाग लागुन लागुनच आहे.या प्रभागांमध्ये दोन दोन, तीन तीन ट्रक भरतील एवढा कचरा साठलेला आहे. शहरातील जेव्हा पाहणी केली तेव्हा असे दिसुन आले की, प्रत्येक नाल्याच्या ठिकाणी कचरा पडलेला आहे. त्या ठिकाणी जातांना एवढी काही दुर्गंधी येते की लोक म्हणतात की हे काय शहर आहे? आणि आम्ही जर म्हटले की आम्ही येथे आलिशान वातावरणात बसलो आहोत. तर ते म्हणतील की, पहिल्यांदा शहर सुधरवा. शहराचे बघा? या शहरात काय चालले आहे? आणि म्हणुन माझी एक विनंती आहे की, सन्माननिय महापौर, उप—महापौर व आयुक्त साहेबांनी शहरास भेट दयावी. प्रत्येक प्रभागात फिरावे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. जिंदे साहेब, येथे आले आहेत, त्यांना मी सांगु इच्छितो की, या दुर्गंधीच्या साम्राज्यामुळे शहरात उदया रोगराई पसरली तर शहराची पुन्हा हानी होईल. ही हानी टाळण्यासाठी आपण शहर स्वच्छतेकडे लक्ष दयावे. या शहरामधील झोपडपट्टयांमध्ये फार प्रश्न आहे. झोपडपट्टयांमध्ये अतिशय दुर्गंधी निर्माण झालेली आहे. प्रत्येक पत्रकार येतो, फोटो काढुन जातो आणि पेपरमध्ये देत राहतो. स्थानिक वर्तमानपत्रामध्ये तर असे फोटो रोज येतात. महानगरपालिका मजा मारते, शहरातील जनतेचा कररुपाने गोळा केलेला जो पैसा आहे, त्या पैश्यातुन तुम्हांला हे सर्व दिसते. आणि त्या पैश्याने जर उधळपट्टी

..५..

केली आम्ही तर त्यांना प्रतिउत्तर देणार नाही. कारण आम्हांला माहित आहे. परंतु आमची येणारी पिढी माफ करु शकणार नाही. आणि म्हणुन जनतेचा पैसा उडवितांना हे लक्षात घेतले पाहिजे की, नुसती महापालिका सजवुन आपल्याला ते बरोबर दिसणार नाही. त्याच्याबरोबर शहर सुधारले पाहिजे. शहरवाशियांनी, व्यापा—यांनी धन्यवाद देण्यासाठी येथे यायला पाहिजे होते. आणि सांगितले पाहिजे होते की, आयुक्त साहेब तुम्ही नविन आला आहात तुम्हांला महापौर आणि उप—महापौरांनी साथ दिली. आणि म्हणुन एवढे घडतेय. आयुक्त साहेब, तुम्ही एक लक्षात घ्या, आयुक्त साहेब व महापौरजी. आपली जी समिती आहे मग तो भाजपाचा सदस्य असो, सेनेचा असो की राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस व आरपीआयचा सदस्य असो. स्त्री आणि श्रीमती यांच्या कर्तृत्वानेच काही गोष्टी होतात अशी एक म्हण आहे. आणि म्हणुन या महासभेमध्ये आयुक्त साहेबांनी जरी हे सभागृह सजविले असेल ते केवळ आमच्या सहकार्याने.जर आम्ही काही पक्षाच्या सदस्यांनी विरोध केला असता पैश्याची उधळपट्टी करु नका, सर्व गोष्टीकडे लक्ष दया, पाण्याकडे लक्ष दया, कच—याकडे लक्ष दया, तर हे होवू शकले नसते. आणि म्हणुन आम्ही एक विचार केला की आमचे देखील सहकार्य पाहिजे आणि त्यामुळेच या सभागृहाची सजावट झाली आहे. पण तुम्हांला धन्यवाद देतो आहे की अशा प्रकारचे काम या शहरात देखील झाले पाहिजे. शहराकडे लक्ष दया. आणि शहर सुंदर आणि नंदनवन दिसेल असे पहा. ठिक आहे तुम्ही रस्त्याच्या मधोमध झाडे लावली आहेत हे चांगले केले परंतु कच—याच्या बाबतीत अजिबात काही काम झालेले नाही आणि होत नाही असा माझा व्यक्तीश: आरोप आहे की या शहरामध्ये एवढी दुर्गंधी पसरलेली आहे. कच—याच्या गाडया बंद झालेले आहेत. डब्बेवाले बंद झालेले आहेत, कामगार बरोबर नाहीत आणि शहरातील लोक आम्हां सदस्यांना बोलत आहेत. आणि आता तर वातानुकुलीत सभागृह तयार केले आहे अशी जर बातमी शहरात गेली आणि श्री.बी.बी. मोरे वातानुकुलीत सभागृहात बोलत आहे अशा वेळी सभागृहाबाहेर बोलतांना मला खाली बघावे लागेल. आणि म्हणुन तुम्हांला माझी विनंती आहे की शहराकडे लक्ष दया. शहर सुंदर व नंदनवन होईल त्यावेळेला आम्हांला समाधान वाटेल, या सभागृहातील सदस्यांनाही चांगले वाटेल की खरोखरच आम्ही शहराचे नागरीक, लोकप्रतिनिधी आम्ही काहीतरी चांगले काम करतो. एवढे बोलुन मी माझे भाषण संपवितो.

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—मा. महापौर महोदया, उप—महापौर, आयुक्त साहेब, व सचिव साहेब, आयुक्त साहेबांचे स्वप्न होते की हे सभागृह सुंदर बनविले जावे. या सभागृहाच्या सौंदर्यात भर घालण्यामध्ये महापालिका सचिव श्री. कुकरेजा साहेब, व विदयुत विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. मुकेश आयलानी यांचे फार मोठे योगदान आहे. त्यांच्याबरोबर काम करणारे सर्व कर्मचारी बंधु आणि भगिनी यांनी जे योगदान दिले त्याबद्दल त्यांनाही धन्यवाद देवु इच्छितो. त्याचबरोबर याकामी सहकार्य करणा—या सर्व पदाधिकारी व नगरसेवकांनाही, राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीच्यावतीने धन्यवाद देवु इच्छितो. जय हिंद, जय महाराष्ट्र।

सदस्य श्री. सतिश चहाळ :—मा. महापौर महोदया, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, महानगरपालिका अस्तित्वात आहे असे आज पहिल्यांदाच वाटु लागले आहे. आणि श्रीमती राजश्री चौधरी यांच्या महापौर पदाच्या कार्यकाळात या सभागृहाचे नुतनीकरण करण्यात आलेले आहे. याचे श्रैय मा. महापौर व आयुक्त यांना जाते. त्याचबरोबर सचिव साहेब श्री. प्रकाश कुकरेजा व विदयुत विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. मुकेश आयलानी साहेब यांनी कल्कता दाखवुन उल्हासनगर महानगरपालिकेला एक चांगले सभागृह केले आहे. याचबरोबर मा. महापौरांना मी विनंती करु इच्छितो की, शहरवाशियांना सभेचे कामकाज घरबसल्या पाहता यावे म्हणुन स्थानिक वृत्तवाहिन्यांवर थेट प्रक्षेपण करण्यास परवानगी दिली जावी. जेणेकरुन महासभेमध्ये काय चालले आहे शहराचे हिताचे कोणते प्रश्न सभागृहात उपस्थित केले जात आहे आणि त्यावर काय निर्णय घेतला जात आहे हे नागरीकांना आपल्या घरीबसल्या पाहता येईल. तसेच शहरातील रस्त्यांवरील दुभाजकावर जी झाडे लावण्यात आली आहेत ती शहराच्यादृष्टीने चांगली गोष्ट आहे. परंतु उल्हासनगरमध्ये जे घाणीचे साम्राज्य आहे त्यावर जर लक्ष दिले तर फार चांगले होईल. एवढे बोलुन मी पुन्हा एकदा मा. महापौर महोदया, उप—महापौर साहेब, आयुक्त साहेब, श्री. प्रकाश कुकरेजा, श्री. मुकेश आयलानी या सर्वांचे सभागृहाच्यावतीने अभिनंदन करतो, जय हिंद, जय महाराष्ट्र।

सदस्य श्री. तुलसीदास वसिटा :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आम्ही कॉग्रेस पक्षाच्यावतीने आपले आभार व्यक्त करतो.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी आणि आयुक्त साहेब, आपण एवढे चांगले काम केले त्याबद्दल आम्ही आपले अभिनंदन करतो. त्याचबरोबर आपण या गोष्टीकडेही लक्ष दिले की, महापालिकेचे नुकसान होवु नये. तीन वर्षापुर्वी या कामाचा अंदाजित खर्च ८१ लाख रुपये दर्शविण्यात आला होता. आज आपण हेच काम २५ लाखात केले आहे. हे पाहता असे दिसुन येते की आपण अतिशय लक्षपुर्वक असे काम करत आहात. आपण महापालिकेचे हित विचारात घेत आहात. पाच मिनिटापुर्वी सन्माननिय सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी सुध्दा सांगितले की, त्यांच्या प्रभागात नाल्याचे ७० लाख रुपये खर्चाचे प्राकलन होते. ते काम आपल्या अधिका—यांनी केवळ पाच लाखात केले. ६५ लाख महापालिकेचा फायदा केला. यासाठी सुध्दा

..६..

आम्ही आपले अभिनंदन करु इच्छितो. यावरुन असे दिसून येते की, आपण उल्हासनगरचे नुकसान करणार नाहीत. हे आमच्या पुर्णपणे लक्षात आले आहे. आपण चांगले काम करा आम्ही आपल्या बरोबर असू.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, आपले खरोखरच मन:पुर्वक अभिनंदन. श्री. मोरे साहेबांनी सांगुन चिमटा काढला. चिमटा काढायची सवयच आहे त्यांना. सांगतात आणि चिमटा काढतात. ती जुनी सवय आहे त्यामुळे वाईट वाटुन घेवु नका. मला एक वर्षापुर्वीचा काळ आठवितो आहे. याच सभागृहामध्ये श्री. मोरे साहेब सभासूचनेच्या पृष्ठाने हवा घेत होते, एवढे उकडत आहे तुम्ही सभागृहात वातानुकुलीत यंत्रणा कधी बसविणार? आणि सभागृहात वातानुकुलीत यंत्रणा बसविल्यानंतर बाकीचे सदस्य आठवण करुन देतात हे त्यांचे मोठेपण आहे. पण श्री. मोरे साहेब, जे चांगले काम करतात त्यांचे अभिनंदन केलेच पाहिजे. त्यांचे कौतुक केलेच पाहिजे. अभिनंदन करण्यामध्ये कंजुषी कशाला? कोठुनतरी सुरुवात झाली. एक घाण अधिक दुसरी घाण बरोबर दोन घाण होत्या त्यातील एक घाण तर साफ झाली? आता या सभागृहामध्ये चांगल्या वातावरणात बसून चांगले विचार करु या. त्यासाठी महापौर व आयुक्तांनी आपणांस चांगले वातावरण तयार करुन दिले आहे आता बाकीची घाण साफ करु. आतापर्यंत आपण केले नाही काय? जे चांगले आहे त्याचे कौतुक झालेच पाहिजे. संपुर्ण सभागृहाचे वतीने आयुक्त व त्यांचे संपुर्ण संघाचे अभिनंदन करतो त्यामध्ये त्यांचे शहर अभियंता आले, दोन्ही विभागाचे कार्यकारी अभियंता आले, त्यात श्री.

शिर्के साहेब आले, श्री. आयलानी साहेब आलेत, श्री. जवांदे साहेब आणि श्री. कुकरेजा साहेब या प्रत्येकाने आपापली जी कल्पकता आहे ती कल्पकता राबविली आणि या सभागृहामध्ये चांगले पोषक वातावरण निर्माण केले. संपुर्ण उल्हासनगर शहराचे लोकप्रतिनिधी या सभागृहात येतात आणि सात लाख लोकांचे प्रतिनिधी या शहराच्या विकासावर चर्चा करतात. आणि चर्चा करतांना वातावरण गरम होवु नये म्हणुन वातानुकुलीत यंत्रणा बसविली आहे. यासाठी संपुर्ण सभागृहाला माझी विनंती आहे की एक चांगल्या प्रकारचे पोषक वातावरण निर्माण केलेले आहे त्यामुळे पोषक विचार सुध्दा, सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन याठिकाणी आपण चर्चा करु या. आणि या उल्हासनगरचा विकास करु या धन्यवाद।

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>या अगोदर श्री. मोरे साहेबांनीच विषय काढला होता की, सभागृहात खुप खुप उकाळत असल्याने वातानुकुलीत यंत्रणा बसविली जावी.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्य, एक म्हण आहे की, स्वच्छ मन आणि स्वच्छ विचारानेच स्वच्छ कार्य केले जावु शकते. जेव्हा आपले मन स्वच्छ असेल आणि आपले विचार स्वच्छ असतील, आपण एखादया चांगल्या ठिकाणी बसला असाल तर एक चांगले काम केले जावु शकते. हीच विचारधारा मनात ठेवुन आमच्या आयुक्त साहेबांनी आम्हांस एक सुंदर सभागृह तयार करुन दिले आहे, त्यासाठी सर्व अधिका–यांचे हार्दिक हार्दिक अभिनंदन व आयुक्त साहेबांनी येथिल कार्यभार स्विकारल्यापासुनच या महापालिकेस सुंदर बनविण्याचे कार्य हाती घेतले. मग तो बाहेरचा पॅसेज असो किंवा मागील संरक्षण भिंत असो, श्री. बोडारे साहेबांनी आताच सांगितले की आम्ही चांगल्या वातावरणात बसल्याने आम्ही शहरासाठी चांगले विचार करु शकतो. लोकांना कशाप्रकारच्या सुविधा दयायचे आहेत त्यासाठी कशाप्रकारचे कार्य करायचे, सभागृहातील सर्व पक्षाच्यावतीने आयुक्त साहेबांचे व त्यांच्या सहकार्यांचे सर्वांनीच अभिनंदन केले आहे. संपुर्ण सभागृहाच्यावतीने अभिनंदन करतांना सभागृहाचे मत व्यक्त करतो की, आजची ही सभा पुढील सूचना देईपर्यंत स्थगित करत आहोत. आजच्या या ज्या दोन्ही सभा आहेत दुपारी ३.०० वाजेची आणि सांयकाळची ४.३० वाजेची या दोन्ही सभा पुढील सूचना देईपर्यंत स्थगित केल्या जाव्यात असे संपुर्ण सभागृहाचे मत आहे.

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :–</u>मा. महापौर महोदया, उप–महापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्यावतीने गटनेता पदासाठी श्रीमती निलु चांदवानी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. हे मी सभागृहास सांगु इच्छितो धन्यवाद।

<u>महापौर :–</u>आपल्या सर्वानुमते आयुक्त श्री. अशोक बागेश्वर व इतर अधिका–यांसाठी अभिनंदनाचा प्रस्ताव

पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

---

<u>अभिनंदन प्रस्ताव</u>

उल्हासनगर शहराचे नाव अवैध बांधकामाने गाजत असतांना पालिका आयुक्त श्री. अशोक बागेश्वर यांनी लोकप्रतिनिधी व अधिका–यांच्या मदतीने शासनाच्या विविध योजना राबविण्याचा विडा उचलला आहे. आयुक्तांनी एका वर्षाच्या कालावधीत महापालिका मुख्यालयाच्या इमारतीचे सुशोभिकरण करुन सहा मजल्यांची नविन प्रशासकिय इमारत बांधण्यास घेतली आहे. तसेच पालिका कामात पारदर्शकता आणल्याने नागरीकांच्या तक्रारी

..७..

अर्ध्या कमी झाल्या आहेत. महापालिका हद्दीतील रस्त्यांची बांधणी, बीएसयुपी योजना, १६८ कोटीची पाण्याची वितरण योजना, शौचालयांची योजना, आदीयोजना राबविण्यात येत असल्याने शहराचा चेहरा मोहरा बदलला आहे. या सर्व योजना पालिका आयुक्त श्री. अशोक बागेश्वर यांच्या एका वर्षाच्या कालावधीत राबविण्यात आल्या आहेत.

आयुक्त श्री. अशोक बागेश्वर यांनी रस्ता दुभाजकावर झाडे लावली. आयुक्त श्री. अशोक बागेश्वर यांनी डॉ. बाबसाहेब आंबेडकर प्रवेशद्वाराचे काम मार्गी लावले.

आता महापालिका सभागृह इतके छान झाले आहे की, या सभागृहाचे वातावरण चांगले निर्णय घेण्यासाठी प्रोत्साहन देईल व कामकाजाचा दर्जा वाढेल.

आयुक्त श्री. अशोक बागेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा, विदयुत विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. मुकेश आयलानी, शहर अभियंता श्री. माधव जवांदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. आर.बी. शिर्के यांनी कल्पकता वापरुन महापालिका सभागृहाच्या सौंदर्यात भर घालण्याचे काम अतिशय कमी खर्चात केले. ८१ लाख रुपये खर्च अपेक्षित असलेले महापालिका सभागृहाचे नुतनीकरण करण्याचे व वातानुकुलीत यंत्रणा बसविण्याचे काम केवळ २५ लाखात पार पाडले.

यास्तव आयुक्त, श्री. अशोक बागेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली विदयुत विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. मुकेश आयलानी, महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शहर अभियंता श्री. माधव जवांदे व कार्यकारी अभियंता श्री. आर.बी. शिर्के यांचे अभिनंदन करण्यास प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र.</u> १ ब <u>दिनांक :– १८/६/२०१०</u>

सुचकाचे नाव :– १) श्री. प्रशांत धांडे
२) श्री. जीवन इदनानी
३) श्री. जमनादास पुरस्वानी
४) श्री. प्रभुनाथ गुप्ता
५) श्री.बी.बी.मोरे

अनुमोदकाचे नाव :– १) श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
२) श्री. धनंजय बोडारे
३) श्रीमती मिनाताई सोनेजी
४) श्री. तुलसीदास वसिटा
५) श्री. सतिश चहाळ

ही महासभा आयुक्त श्री. अशोक बागेश्वर व त्यांचे सहयोगी विदयुत विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. मुकेश आयलानी, महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शहर अभियंता श्री. माधव जवांदे व कार्यकारी अभियंता श्री. आर.बी. शिर्के यांचे महापालिका सभागृह चांगले केल्याबद्दल अभिनंदन करीत आहे.

सुचकाची सही/– १)
२)
३)
४)
५)

अनुमोदकाची सही/–१)
२)
३)
४)
५)

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u>भारतीय जनतापक्षाच्यावतीने भाजपा गटनेता म्हणुन श्री. नरेंद्र राजानी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. यासाठी मा. महापौरांनी त्यास स्विकृती दिलेली आहे. व त्याबाबत घोषणा सुध्दा करत आहेत.

..८..

त्याबद्दल आपले अभिनंदन आहे. तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्यावतीने श्रीमती निलु चांदवानी यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस गटनेता पदी नियुक्ती केली आहे, त्यास सुध्दा मा. महापौरांनी स्विकृती दिलेली आहे. व त्याबाबत त्या घोषणा सुध्दा करत आहेत. तसेच या सभा स्थगित होण्याआधी आपल्या महापालिकेतील एक नविन अधिकारी श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक यांनी मंचावर येवुन आपली ओळख पटवुन दयावी.

श्री. विकास चव्हाण (मुख्य लेखा परिक्षक):— मा. महापौर महोदया, मा. उप—महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव साहेब, आणि उपस्थित सर्व सन्माननिय सदस्य, मी आपल्या महानगरपालिकेत ४ जुन २०१० रोजी मुख्य लेखा परिक्षक या पदावर रुजु झालो आहे. यापुर्वी शासनाच्या वित्त विभागाअंतर्गत विविध पदांवर सेवा केली असून यापुर्वी ठाणे येथे लेखा अधिकारी शिक्षण या पदावर कार्यरत होतो. तेथुन पदोन्नतीने आपल्या महानगरपालिकेत हजर झालो आहे. धन्यवाद।

सदस्य श्री. प्रशांत धांडे :— मा. महापौर महोदया आणि सचिव साहेब, मी संपुर्ण सभागृहास अवगत करु इच्छितो की, क्रिडा समिती सभापतींच्यावतीने आपणा सर्वांना निमंत्रण पत्र आले असेलच, तरीही मी आपणांस सूचीत करु इच्छितो की, आज टाऊन हॉलमध्ये कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे आणि उदया अंतिम स्पर्धा होणार आहे, आणि २००९ च्या गणेत्शोवांमधील सुंदर सजावटींना पारितोषीक वितरण समारंभ सुध्दा आहे. तर आपणांस विनंती आहे की, आपण त्या कार्यक्रमास उपस्थित राहून त्या कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

महापौर :— सर्वांच्या संमतीने अनिश्चित कालावधीसाठी सभा स्थगितीबाबत पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

स्थगित प्रस्ताव

दिनांक १८/६/२०१० रोजी सांयकाळी ४.३० वाजता आयोजित करण्यात आलेली सभा काही अपरिहार्य कारणास्तव पूढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. १ क — दिनांक : १८/६/२०१०

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १८/६/२०१० रोजी सांयकाळी ४.३० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज पुढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव:— राष्ट्रगीत होण्याअगोदर आपल्या उल्हासनगरचे तहसिलदार येथे उपस्थित आहेत ते काही महत्वाच्या सूचना देवु इच्छितात. कृपया ऐकुन घ्यावीत.

यावेळी मा. तहसिलदार यांनी १ जानेवारी २०१० या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्र मतदार यादयांचे पुनरीक्षण व १०० टक्के मतदारांचे छायाचित्र ओळखपत्र तयार करणेची मोहिम हाती घेतली असल्याचे व सदरचे काम दिनांक १५/६/२०१० ते ३१/७/२०१० पर्यंत पुर्ण करण्यात येणार असल्याविषयी काही सूचना दिल्या..

..९..

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

--10--

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— १२/७/२०१०

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १२/७/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

२—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १८/६/२०१० रोजी सायंकाळी ४.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित झाल्याने ती सोमवार दिनांक १२/७/२०१० रोजी सायंकाळी ४.३० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर —— श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

२. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३५ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ३ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३६ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ४ | श्री. गायकवाड दिलीप | ३७ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ५ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३८ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३९ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४० | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ८ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४१ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४२ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४३ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ११ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | ४४ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १२ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४५ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १३ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४६ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १४ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४७ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १५ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४८ | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४९ | श्री. किशोर जग्यासी |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५० | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १८ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५१ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५२ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २० | श्री. राजू जग्यासी | ५३ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २१ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५४ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २२ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २३ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५६ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| २४ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५७ | श्री. मोहन साधवाणी |
| २५ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ५८ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २६ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५९ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २७ | श्री. लाल पंजाबी | ६० | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २८ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६१ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २९ | श्रीमती शकुंतला पाटील | ६२ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३० | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६३ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६४ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३२ | श्री.एडके गणपत गोविंद | ६५ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३३ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६६ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३४ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ६७ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| | | ६८ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |

..११..

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी, २. श्री. आयलानी कुमार उत्तमचंद, ३. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ४. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे, ५. श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास, ६. श्री. मोहन (गारो) रामरख्यानी, ७. श्री. ढोके जनार्दन किसनराव, ८. श्री. मंगतानी सुंदर आसनदास, ९. श्री. शेखर केशव यादव, १०. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), ११. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), १२. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी, १३. श्री. राजेश नानीकराम वधारीया

खालील अधिकारी सभेस हजर होते.

२३.श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
२४.श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त
२५.श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त
२६.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
२७.श्री. संगिता धायगुडे, उप—आयुक्त, आरोग्य
२८.श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
२९.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
३०.श्री. माधव जवादे, शहर अभियंता
३१.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
३२.श्री. एम जी. गिरगावकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
३३.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
३४.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
३५.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
३६.श्री. जी.जी. हिबारे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
३७.श्री. रमेश काजळे, उप—कर निर्धारक व संकलक
३८.श्री. नंदु समतानी, प्र.प्रभाग अधिकारी
३९.श्री. भगवान कुमावत, प्र. प्रभाग अधिकारी
४०.श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी
४१.श्री. प्राजक्ता कुलकर्णी, प्र. जनसंपर्क अधिकारी
४२.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
४३.श्री. अभिजित महामुलकर, प्रोग्रामर, नासुके
४४. श्री. जनार्दन देवकर, लिपिक, आरोग्य विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती अमिता संखे
५. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ५.४५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १:–** वर्ल्ड रिनेवल स्पिरीटयुल ट्रस्ट, उल्हासनगर-२ यानां उल्हासनगर ५ येथील बॅरेक नं. २०६७ जवळील सामाजिक सभागृह भाडे तत्वावर देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

महापालिका सचिव :–किती वर्षासाठी? १५ वर्षासाठी?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–तीन वर्षासाठी, तीन वर्षासाठी. १५ वर्षासाठी नाही.

..१२..

सदस्य श्री. रमेश चव्हाण :–सचिव साहेब, विषय काय आहे तो जरा पुन्हा वाचुन दाखविला जावा.

महापालिका सचिव :– पुन्हा विषय वाचुन दाखवितात.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–गोषवा–यामध्ये किती वर्षाचा कालावधी लिहिलेला आहे? १० वर्षासाठी दिले जावे.

महापालिका सचिव :–किती वर्षासाठी दयायचे?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–तीन वर्षासाठी.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :–जावु दया जावु दया, पंधरा वर्षासाठी दया.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–२५ वर्षासाठी दया, २५ वर्षासाठी?

सदस्य श्री. मोहन साधवानी :–कुणाबाबतचा प्रस्ताव आहे? ब्रम्हकुमारीवाल्याविषयींचा प्रस्ताव आहे का?

महापालिका सचिव :–भाडे किती असेल?

सदस्य श्री. रमेश चव्हाण :–५०० रुपये घ्या.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–मा. महापौर महोदया, सामाजिक कार्य करण्यासाठी या संस्थेने जागेची मागणी केली आहे. या संस्थेने याअगोदर गोल मैदान येथे अतिशय चांगले काम केले असल्याचे सर्व सन्माननिय सदस्यांनी आणि शहरवाशियांनी पाहिले आहे. यासाठी या संस्थेस १० वर्षासाठी ती जागा दिली जावी व कमित कमी भाडे आकारले जावे.

महापालिका सचिव :–कमीत कमी भाडे किती असेल?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–ती ट्रस्ट जो खर्च करणार आहे, त्याचा त्या संस्थेस फायदा मिळाला पाहिजे.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–जसे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की, ब्रम्हकुमारी ही संस्था शहरासाठी चांगले कार्य करत आहे. मी सुध्दा श्री. जमनादास पुरस्वानी यांच्या मताशी सहमत आहे. व त्यांना ही जागा १० वर्षासाठी दिली जावी.

महापालिका सचिव :–भाडे किती असेल? भाडे?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>१०० रुपये प्रतिमहा.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>५०० रुपये प्रतिमहा. १० वर्षासाठी देत आहात, १०० रुपयाने काय होणार आहे?

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>साहेब, १०० रुपयात काय भेटते ते सांगा मला? बाहेर कुठे एक हातगाडी तरी लागली जाते का? ५०० रुपयात काय होते? ५००० घ्या, ३००० घ्या. तुमच्याकडे हजाराचा आकडाच नाही का? हजाराचा आकडा घ्या महानगरपालिकेला फायदा होईल.

<u>महापालिका सचिव :–</u>सर्वांनी एकमत करुन निर्णय घ्या आणि सांगा.

<u>महापालिका सचिव :–</u>५०० रुपये?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>१० वर्षासाठी ५०० रुपये, ५०० रुपये प्रतिमहा.

<u>महापालिका सचिव:–</u>ठिक आहे?

<u>सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :–</u>५०० रुपये किती कालावधीसाठी?

..१३..

<u>महापालिका सचिव :–</u>प्रतिवर्षासाठी, प्रतिवर्षासाठी.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>प्रत्येक महिन्याचे ५०० रुपये? १० वर्षाचे १०० रुपये म्हणतात काय म्हणायचे काय? महिन्याला ५०० रुपये घ्या.

<u>महापालिका सचिव :–</u>६००० रुपये वर्षाचे होत आहेत. ६००० रुपये? ठिक आहे? पास? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :–</u>पास, पास..........

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र.** १:– वर्ल्ड रिनेवल स्पिरीटयुल ट्रस्ट, उल्हासनगर-२ यानां उल्हासनगर ५ येथील बॅरेक नं. २०६७ जवळील सामाजिक सभागृह भाडे तत्वावर देणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री.बी के सोम वर्ल्ड रिनेवल स्पिरीटयुल ट्रस्ट, उल्हासनगर –२ यांनी विषयांकित ठिकाणी बांधण्यात आलेल्या सामाजिक सभागृह भाडेतत्वावर मिळणे बाबत विंनती केलेली आहे.

सदर संस्थेमार्फत त्याठिकाणी १)मधुमेह रुग्णासाठी शिबीर आयोजित करणे २) लहान मुलांसाठी सुट्‌टीमध्ये घरगुतीचे काम शिकवणे ३) वेळेचा सदुउपयोग करण्याबाबत इ.कामे करीता बनविण्यात आलेले सामाजिक सभागृह ३३ वर्षाच्या कालावधीसाठी उपयोगाकरीता मागणी केलेली आहे.

प्रभाग क्र ७४ मधील बॅ.नं. २०६७ जवळ उल्हासनगर –५ येथे सामाजिक सभागृह महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास निधीतून बांधण्यात आलेले असुन सहाय्यक अभियंता, श्रेणी १ वर्ग १ सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे पत्र क्र.जा. क्र.स.अ.श्रे.१/सा .बां .उ. वि. / ३ / ४७ दि ०६/०१/१० अन्वये महानगरपालिका मालमत्ता नोंदवहित नोंद घेण्यात आलेली आहे.

मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (ख) मध्ये नमुद केलेप्रमाणे शासनाने महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेली कोणतीही मालमत्ता समुचित शासनाच्या पुर्वमंजुरी वाचुन, हस्तांतरणाच्या शर्ती विरुद्‌ध अशा कोणत्याही रीतीने पट्‌टयाने देता, विकता किंवा अभिहस्तांतरीत करता येणार नाही.

उक्त बाब विचारात घेता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाच्या तरतुदी अन्वये वर्ल्ड रिनेवल स्पिरीटयुल ट्रस्ट , उल्हासनगर –२ यांनी मागणी केलेले प्रभाग क्र.७४ मधील बॅ.नं.२०६७ जवळ उल्हासनगर–५, येथील सामाजिक सभागृह भाडेतत्वावर देणेकामी शासनाकडुन पुर्व मुजुरी घेणे आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे. त्याकामी प्रथम मा. महासभेची मंजुरी घेणे अवश्यक आहे.

महासभा ठराव क्र: ८ दिनांक:–१२/७/२०१०

सुचकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार आयुक्त विहित करतील अशा अटी, शर्ती व निर्बंधावर उल्हासनगर–५ येथिल बॅरेक २०६७ जवळील सामाजिक सभागृह शासनाच्या मंजुरीस अधिन राहून वर्ल्ड रिनेवल स्पिरीटयुल ट्रस्ट, उल्हासनगर–२ यांना १० वर्षाच्या कालावधीसाठी रुपये ६०००/– वार्षिक दराने जागा वापर परवाना देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :– विषय क्र. २ वाचुन दाखवितात

..१४..

**विषय क्र. २:–** वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे सहा वारसास नियुक्ती देणे.

काही सदस्य :–पास–पास......

महापालिका सचिव :–पास? सर्वसंमतीने?

महापौर :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र.** २:– वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगार यांचे वारसास नियुक्ती देणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा(वशिला)पध्द्तीच्या अंमलबजावणीबाबत, नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण–२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि–६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दिनांक ३० जुन १९९४ नुसार, महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्ती, मृत्यु, तसेच स्वेच्छा किंवा वैद्यकिय सेवा निवृत्तीनंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सेवा निवृत्त/दिवगंत सफाई कामगार/मुकादम यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे त्यांचे वारसाचे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अक्र | सफाई कर्मचा—याचे नाव | सेवानिवृत्तीचा/ मृत्युचा दिनांक | वारसाचे नाव | कर्मचा—याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. बबी मधुकर गुडेकर | स्वेच्छा सेवानिवृत्त दि.३१/७/०९ | श्री.सागर मधुकर गुडेकर | मुलगा |
| २ | श्रीम. जमूना भगवान | वयोमानानुसार सेवा निवृत्त दि. ३१/५/०९ | श्रीम. आश्विनी बापु लोणारे | भाची(बहिणीची मुलगी) |
| ३ | कै. निर्मला सुरेश वाल्मिकी | दिवंगत दि.११/८/०८ | श्री. सुंदर सुरेश वाल्मिकी | मुलगा |
| ४ | श्री. गोविंद बोहरी | वैदयकिय सेवा निवृत्त दि १/७/०९ | श्री. राजू हरपाल गूहेर | भाचा(बहिणीचा मुलगा) |
| ५ | श्री.अशोक गेनु म्हस्के | स्वेच्छा सेवानिवृत्त दि. ३१/१/१० | श्री.महेंद्र अशोक म्हस्के | मुलगा |
| ६ | कै. हेमंत मगन चौव्हान | दिवंगत दि. ११/८/०९ | श्री.जीवन मगन चौव्हान | भाऊ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त/दिवंगत, सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र</u>: ९      <u>दिनांक:—१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. प्रधान पाटील

अनुमोदकाचे नाव :— श्री. रविंद्र बागुल

ही महासभा वरील प्रस्तावनेत उल्लेखलेल्या निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे सहा रिक्त जागांवर त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या नातेवाईकांना वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३:–** सफाई कामगार/मुकादम पदावर कार्यरत पाच कर्मचारी यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापालिका सचिव :–</u>पास? सर्वसंमतीने?

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३:–** सफाई कामगार/मुकादम चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना स्वेच्छा सेवा नियुक्ती देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये रूग्णता निवृत्ती वेतनासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. तसेच नियुक्ती प्राधिकारी वैद्यकीय सेवा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कामगार यांनी वयोमानानुसार तसेच शारीरिक आजारपणामुळे त्यांचेकडुन सफाई काम होत नसल्यामुळे ''वैद्यकीय सेवा निवृत्ती'' मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेले आहे.

| अ. क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | एकुण सेवा | वय | वैद्यकीय सेवा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.साहेबराव राजाराम गायकवाड | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०३/२०१० |
| २ | श्री. चिमनबाई भिषण | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३०/०४/२०१० |
| ३ | श्री. जेलेसिंग घासीराम | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०५/२०१० |
| ४ | श्रीम. रेखा सोनु कामंडिया | २२ वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०५/२०१० |
| ५ | श्री. केशव लिंबाजी | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०५/२०१० |

त्याअनुषंगाने संबंधित कर्मचारी शारिरीक दृष्टया, सेवा करणेस पात्र आहेत किंवा नाहीत, याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणेबाबाबते मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे तसेच संबंधित कर्मचारी यांना कळविण्यात आले होते.

संबंधित कर्मचारी यांनी, मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांचेकडील प्रमाणपत्र सादर केले आहेत. त्यानुसार त्यांना, नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतुन वैद्यकीय सेवानिवृत्ती देणे आवश्यक आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ७१ अन्वये वैद्यकीय सेवा निवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

..१६..

तरी, वरील सफाई कामगार यांना, वैद्यकीय कारणास्तव ''सेवानिवृत्ती'' देणेकामी, मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: १० दिनांक:—१२/७/२०१०

सुचकाचे नाव :— श्रीम. बी.बी. मोरे
अनुमोदकाचे नाव :— श्रीम. रजनी महाडीक

ही महासभा वरील प्रस्तावनेत उल्लेखलेल्या पाच कर्मचा—यांना आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन स्वेच्छा सेवानिवृत्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४ :—** वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे दोन वारसास नियुक्ती देणे.

---

सदस्य श्री. सुरेश जाधव :—मा. महापौर, मा. उप—महापौर आणि आयुक्त साहेब, श्री. लालजी खंडोबा चव्हाण यांनी आपली नियुक्ती तीन चार लोकांना विकली आहे. कारण अशा पध्दतीने नोकरी विकत राहिल्यामुळे वाद निर्माण होतो यासाठी त्यांचा जो कोणी रक्ताचा नातेवाईक असेल अशाच व्यक्तीस त्यांनी वारस म्हणुन नोकरी दिली पाहिजे. अन्य कोणालाही देवू नये. आणि एक कामगार तीन,तीन, पाच,पाच लोकांना आपली नोकरी विकतो असे होता कामा नये.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—आयुक्त साहेब, त्यांचे पुरावे आमच्याकडे आहेत. या व्यक्तीने आपली नोकरी तीन लोकांना लिहून दिलेली आहे. सत्यप्रतिज्ञापत्रावर त्यांनी तीन लोकांना खोटी कागदपत्र तयार करुन दिली आहेत. मी तर असे म्हणतो की, अशा व्यक्तीवर तुम्ही प्रथम कारवाई केली पाहिजे. माझ्याकडे त्याचे पुरावे आहेत. त्या कागदपत्रांची झेरॉक्स प्रत माझ्याकडे आहे आणि त्याच्याशी ज्याचे रक्ताचे नाते असेल त्यालाच ती नोकरी देण्यात यावी.

महापालिका सचिव :—सफाई कामगार पदासाठी हे जे श्री. गोपि लालजी यांच्या वारसाची नियुक्ती सोडुन इतरांची नियुक्ती करायची आहे ना?

सदस्य श्री. सुरेश जाधव :—ज्यांच्याशी त्यांचे रक्ताचे नाते आहे त्यांचेच पास करा.

महापालिका सचिव :—याबाबतीत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार अंमलबजावणी केली जाते. तर मग काय दोन्ही कर्मचा—यांचे प्रस्ताव पुढे ढकलायचे काय?

**सदस्य श्री. सुरेश जाधव :–** तर मग हा विषय पुढे ढकला.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :–**मा. महापौरजी, या विषयाबाबत मला एवढेच सांगायचे आहे की, सर्वच सफाई कामगार आपली सेवा दुस–यास विकत असतात. मग ती बहिणीच्या मुलाला, मावशीच्या मुलाला, काकाच्या मुलाला अशा पध्दतीने तेथे रक्ताचे नाते न बघता, नोकरी विकतात. आणि त्याबाबतीत मला एक सांगायचे आहे की, आपल्या महापालिकेत सफाई कामगार हा जर निवृत्त होण्याच्या अगोदर, तो जर काम करु शकत नसेल तर त्यावेळेस त्याच्या बाबतीत आपण सहानुभूतीपुर्वक विचार केला पाहिजे की हा आता काम करु शकत नाही त्यामुळे त्याचे घरदार चालु शकत नाही. म्हणुन रक्ताच्या नात्यातील त्याचा मुलगा किंवा मुलगी कुणीही असो त्याला आपण नोकरी दिली पाहिजे. अहो सर्रास हे सेवानिवृत्त होवून जातात आणि मग बघतात कोणाला नोकरी दयायची? मग कोण किती पैसे देतो, एक लाख, दोन लाख,तीन लाख अशा पध्दतीने पैश्याचा बाजार वाढत चालला आहे. तर

..१७..

महानगरपालिकेत अशा प्रकारचा बाजार भरविणा–या लोकांना जर आपण नोकरीस ठेवले तर ते बरोबर होणार नाही. इतरांवर तो अन्याय होईल.

**सदस्य श्री. सुरेश जाधव :–**मा. महापौरजी, उप–महापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब, जे प्रस्ताव वादग्रस्त असतील ते बाजूला सारुन इतरांचे प्रस्ताव पारीत केले जावेत.

**सदस्य श्री. रमेश चव्हाण :–**मा. महापौरजी, उप–महापौरजी आणि आयुक्त साहेब, ज्यांच्याशी रक्ताचे कोणतेही नाते नाही अशा व्यक्तींना यापुर्वीही सफाई कामगारांनी आपल्या नोक–या विकलेल्या आहेत. त्याची कागदपत्रे साहेब, मी तुम्हांला महासभा संपल्यानंतर दाखवितो. अशी पाच, सहा प्रकरणे आहेत. ती तुमच्यासमोर आणून दाखवितो. नोकरी विकणे हा काय प्रकार आहे? दुस–यालाच जो कोणी त्यांना जास्त पैसे देतो त्यास देतात.

**महापालिका सचिव :–**हा पुर्ण विषयच पुढे ढकलायचा आहे ना? या विषयामध्ये दोन कर्मचा–यांचा प्रस्ताव आहे. त्या दोघांचाही प्रस्ताव नाकारायचा काय?

**सदस्य श्री. सुरेश जाधव :–**जो वादग्रस्त असेल तो रोखुन धरा. आणि बाकीचा पारीत करा.

**महापालिका सचिव :–**तर मग श्री. गोपी लालजी यांचाच एक वादग्रस्त प्रस्ताव आहे. श्री. गोपी लालजी यांच्या विषयीचा प्रस्ताव नाकारुन दुस–या कर्मचा–याविषयीचा प्रस्ताव आहे तो पारीत करायचा काय? ठिक आहे, पास?

**काही सदस्य :–**पास–पास......

**महापौर :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ४:–** वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे दोन वारसास नियुक्ती देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा(वशिला)पध्द्तीच्या अंमलबजावणीबाबत, नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण–२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि–६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दिनांक ३० जुन १९९४ नुसार, महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्ती, मृत्यु, तसेच स्वेच्छा किंवा वैद्यकिय सेवा निवृत्तीनंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सेवा निवृत्त/दिवगंत सफाई कामगार/मुकादम यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे त्यांचे वारसाचे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अक्र | सफाई कर्मचा—याचे नाव | सेवानिवृत्तीचा/ मृत्युचा दिनांक | वारसाचे नाव | कर्मचा—याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. राधाकृष्ण भिवा साठे | वैदयकिय सेवानिवृत्त दि.०२/०२/१० | श्रीम.लता अशोक साठे | वहिनी (भावाची पत्नी) |
| २ | श्री. गोपी लालजी | वैदयकिय सेवानिवृत्त दि.३०/५/०९ | श्रीम.मनिषा मिलिंद गोरे | मावस बहिणीची |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त/दिवंगत, सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र: ११</u> <u>दिनांक:–१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :– श्री. सतीश चहाळ

ही महासभा वरील प्रस्तावनेत उल्लेखलेल्या श्रीमती मनिषा गोरे यांचे नावास मान्यता न देता इतर निवृत्त/दिवंगत सफाई कामगाराचे एक रिक्त जागेवर श्रीमती लता अशोक साठे यांची वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :–**सफाई कामगार पदावर कार्यरत दोन कर्मचाऱ्यांना वैद्यकीय स्वेच्छा निवृत्ती देणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापालिका सचिव :–</u>पास? सर्वसंमतीने?

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५:–** सफाई कामगार पदावर कार्यरत दोन कर्मचाऱ्यांना वैद्यकीय स्वेच्छा निवृत्ती देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये रूग्णता निवृत्ती वेतनासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. तसेच नियुक्ती प्राधिकारी वैद्यकीय सेवा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कामगार यांनी वयोमानानुसार तसेच शारीरिक आजारपणामुळे त्यांचेकडुन सफाई काम होत नसल्यामुळे ''वैद्यकीय सेवा निवृत्ती'' मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेले आहे.

| अ. क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | एकुण सेवा | वैद्यकीय सेवा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्री. उत्तम नाना शेरे | १३ वर्षपेक्षा जास्त | ०४/०३/२०१० |
| १ | श्री. सिताराम भिमसेन | १३ वर्षपेक्षा जास्त | ०४/०३/२०१० |

त्याअनुषंगाने संबंधित कर्मचारी शारिरीक दृष्टया, सेवा करणेस पात्र आहेत किंवा नाहीत, याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणेबाबाबते मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे तसेच संबंधित कर्मचारी यांना कळविण्यात आले होते.

संबंधित कर्मचारी यांनी, मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांचेकडील प्रमाणपत्र सादर केले आहेत. त्यानुसार त्यांना, नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतुन वैद्यकीय सेवानिवृत्ती देणे आवश्यक आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा

कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ७१ अन्वये वैद्यकीय सेवा निवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

..१९..

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, वरील सफाई कामगार यांना, वैद्यकीय कारणास्तव ''सेवानिवृत्ती'' देणेकामी, मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: १२ दिनांकः–१२/७/२०१०

सुचकाचे नाव :– श्री. रामचंद्र पारवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा प्रस्तावनेत उल्लेख केलेल्या दोन सफाई कामगारांना वैद्यकीय कारणास्तव आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन सेवा निवृत्ती देणे मान्य करित आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६** :–एक वर्षापेक्षा जास्त कालावधी अनाधिकृतपणे गैरहजर असलेल्या सात सफाई कामगारांना
रुजु करुन घेणे.

---

काही सदस्य :–हा प्रस्ताव नाकारला जावा.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, एक वर्षापासुन एखादा सफाई कामगार जर कामावर येत नसेल तर तो ज्या प्रभागात काम करतो त्या प्रभागातील स्थिती काय असेल? मग तो कोणाचाही प्रभाग असो. साहेब, आपण या सफाई कामगारांना कामावर रुजु करुन घेतले आहे परंतु त्या प्रभागाच्या नगरसेवकाची स्थिती काय आहे? त्या नगरसेवकाने काय केले पाहिजे? त्याच्या बदली आपण दुसरा कामगार देतात काय? दुसरा कामगार दिला आहे का?

काही सदस्य :–हा प्रस्ताव नाकारला जावा, नाकारला जावा.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :– कोण म्हणते कामगार दिले? रुजु करुन घेतले आहेत. एक वर्षापेक्षा जास्त कालावधीत जो कर्मचारी कामावर आला नाही त्याला पुन्हा कामावर रुजु करुन घेतले आहे, त्याला काय शिक्षा आहे?

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>मा. महापौर, उप—महापौर व आयुक्त साहेब, या विषयात उल्लेख केलेले सात कर्मचारी गेल्या दोन दोन अडीच अडीच वर्षापासुन सतत गैरहजर आहेत. त्यांना आपण रुजु करुन घेतात, आणि तेही महासभेची परवानगी न घेता?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u> मा. महापौरजी, आता हा जो सहाव्या क्रमांकाचा विषय आलेला आहे. हे बरोबर आहे की, ज्या सफाई कामगारांना नोकरीची जरुरी नाही, एक वर्षापेक्षा जास्त कालावधी ते गैरहजर राहिलेले आहेत. कायदेशीररित्या आपण त्यांना पुन्हा कामावर रुजु करुन घ्यावयास नको होते. समजा, एखादया प्रकरणांमध्ये एखादा कर्मचारी खरोखरच आजारी असेल त्यांना डॉक्टरांनी वैद्यकीय प्रमाणपत्र दिलेले असेल पण अशा कर्मचा—यास काहीतरी दंड किंवा त्याची वार्षिक वेतनवाढ रोखणे अशा प्रकारे काहीतरी शिक्षा करुन कामावर घेतले पाहिजे त्यामुळे हा संदेश इतर कामगारांना जाईल कि न कळविता आपण जर गैरहजर राहिलो तर आपली वेतनवाढ

..२०..

थांबीवली जाईल. सेवा पुस्तिकेत शेरा मारला जाईल. या सा—या गोष्टी गरीब माणसासाठी केल्या पाहिजेत, असे माझे स्वत:चे मत आहे.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, श्री. मोरे साहेब, हे जे सात कर्मचारी आहेत त्यांच्याविषयी महासभेची परवानगी न घेता प्रशासनाने त्यांना कामावर रुजु करुन घेतलेले आहे. प्रथमत: ही गोष्ट चुकीची आहे. आणि दुसरी गोष्ट अशी की, हे जे सात कामगार आहेत. ते जवळ जवळ अडीच ते तीन वर्ष गैरहजर आहेत. एक वर्षापेक्षा जास्त कालावधीत गैरहजर असलेल्या कामगारांना काढुन टाका म्हणता आणि दोन अडीच वर्षापेक्षा जास्त कालावधीत गैरहजर असलेल्या कामगारांना कामावर घ्या हे कुठल्या कायदयात बसते? श्री. मोरे साहेब सांगतात तशीही शक्यता नाही आहे. रुजु करुन घेतल्यानंतर आता महासभेची परवानगी मागत आहेत. आयुक्त साहेब हे बरोबर आहे का?

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, श्री. विनोद बतन उज्जैनवाल हा जो सफाई कामगार आहे तो २००२ पासुन प्रभाग क्र. १५ मध्ये कामावर होता. तर तो आता प्रभाग क्र. ४० मध्ये कसा गेला? त्याचे जरा उत्तर मिळेल का?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदया,................

<u>सदस्य श्री. गोविंदराम लुंड :—</u>आयुक्त साहेब, मी अगोदरच हा प्रस्ताव नाकारण्यास सांगितले होते. व आमच्या श्री. बोडारे साहेबांनी सुध्दा हा प्रस्ताव नाकारावा असे सांगितले होते. तरी सुध्दा हा प्रस्ताव सभागृहापुढे येतो कसा? दोन अडीच वर्षानंतरा सफाई कामगार पुन्हा कामावर येतो, प्रभागामध्ये सफाई कामगार नसतात तेव्हा तुम्ही तेथे सफाई कामगार देतात काय? यासाठी हा प्रस्ताव नाकारला जावा.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदया, कामगारास हजर करुन घेतल्यानंतर, त्यांना नियुक्ती दिल्यानंतर त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करायची आहे. चौकशी होईल त्यानंतर त्यांना कामावरुन काढुन टाकु.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>मागील महासभेत एक विषय होता श्रीमती उषा चव्हाण सतत गैरहजर असल्याबाबतचा. म्हणजेच प्रशासनाची विसंगती कशी आहे एकाला एक न्याय दुस—याला दुसरा न्याय. सतत गैरहजर राहणा—या कामगारांना बडतर्फ करण्याचा मागच्या महासभेंत विषय क्र. ५ नुसार प्रस्ताव तुम्ही आणता. आणि या सात कर्मचा—यांना वेगळा न्याय. हा कुठला न्याय?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदया, या कर्मचा—यांची चौकशी होईल, ते बेकायदेशीररित्या गैरहजर असल्याबाबत त्यांनाही निलंबित करण्याचा प्रस्ताव ठेवतो.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>मग कामावर का घेतले?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदया, कामावर घेतल्यावरच चौकशी होईल ना? कामावर न घेता चौकशी कशी सुरु करता येईल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>आयुक्त साहेब, तुम्ही गोषवा—यामध्ये स्पष्टपणे नमुद केले आहे. महापालिकेची परवानगी असल्याशिवाय कामावर घेवु शकत नाही. मग ही महानगरपालिका, महासभा त्यांना कामावर घेवु इच्छित नाही. जे बेजबाबदार आहेत त्यांची कसली चौकशी? जे मागील तीन वर्ष आले नाहीत ते पुढील तीस वर्ष येणार नाहीत. हा या महासभेचा निर्णय आहे की त्यांना कामावर घेण्यात येवु नये. कुठेतरी शिस्त असली पाहिजे.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, मा. आयुक्त साहेब, श्री. विनोद बत्तन उज्जैनवाल हा जो सफाई कामगार आहे तो २००२ पासुन गायब आहे. तो अगोदर माझ्या प्रभागात होता. त्याची बदली झाली असल्यास तो कोणत्या प्रभागात आहे. किंवा त्याच्याबददल तुम्ही मला कोणता सफाई कामगार दिला आहे त्याचे नाव सांगण्यात यावे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, हे जे सात सफाई कामगार आहेत, ते दोन सव्वा दोन वर्षापासुन गैरहजर होते. तर त्यावेळी आरोग्य अधिकारी, सहा. आरोग्य अधिकारी यांनी त्यांना सांगितले होते की, कोण कोण कामावर येवु शकतात? त्यांनी फक्त हजेरी लावलेली होती. कामावर नाहीत ते, त्यांचा पगार निघत नाही. त्यांना हजर करुन घेतलेले नाही.

..२१..

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u> मा. महापौरजी, उप—महापौरजी, मा. आयुक्त साहेब, माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही अजुन.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, ते कर्मचारी सातत्याने गैरहजर होते. म्हणुन त्यावेळी उप—आयुक्त आरोग्य यांनी, आरोग्य अधिकारी व सहा. आरोग्य अधिका—यांना विचारले, हे लोक कामावर येवु शकतात की नाही त्यांना बोलवा. त्यावेळेस ते आलेले आहेत. परंतु त्यांना हजर करुन घेतलेले नाही. महासभेच्या मान्यतेंनंतरच त्यांना हजर करुन घेतले जाईल. त्यांना पगार वगैरे काही दिलेला नाही.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदया, त्यांना बडतर्फ करण्याचा प्रस्ताव आणतो.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u> मा. महापौरजी, उप—महापौरजी, मा. आयुक्त साहेब, माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही अजुन. श्री. विनोद बत्तन उज्जैनवाल, हा माझ्या प्रभागात २००२ पासुन होता. तो प्रभाग क्र. ४० मध्ये आता कसा गेला? त्याचे उत्तर हवे मला.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. महापौरजी, मा. सदस्या श्रीमती सुर्वे महोदयांचा प्रश्न असा आहे की तो कर्मचारी जर गैरहजर होता त्यास पगार मिळत नव्हता तर मग त्याची बदली कशी झाली? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी श्री. म्हसाळ साहेबांना व्यासपीठावर बोलवा.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, श्री. विनोद बत्तन उज्जैनवाल हे प्रभाग क्र. ४० मध्ये कसे गेले, याबाबत बदलीचे आदेश आम्ही तपासून बघतो.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u>काय?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>बदली आदेश तपासुन बघतो.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u>कधी उत्तर मिळेल मग? कधी तपासून घेणार?

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>मा. महापौर, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्या जो प्रश्न विचारत आहेत त्याचे हे उत्तर देत नाहीत. जो माणुस कामावर नाही, हजेरीपटावर नाही त्याला बोलावुन घेतले गेले. प्रभाग क्र. ४० मध्ये तो माणुस गेला कसे असे मा. महोदया म्हणत आहेत, त्याचे तुम्ही उत्तर देत नाहीत.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. आयुक्त साहेब, ही इतिहासात लिहिली जाणारी बाब आहे की कामगार गैरहजर असतो आणि त्याची बदली होते.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>तुम्ही काहीतरी चुकीचे उत्तर देत आहात, त्याचे हजेरीपट आयुक्त साहेबांना दाखवा. ही माणसे कामावर नाहीत व पगार घेत आहेत असे त्यांचे स्पष्ट मत आहे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>त्याचा पगार निघलेला नाही.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>तो प्रभाग क्र. ४० मध्ये गेलाच कसा?

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u>२००२ पासुन तो माझ्या प्रभागात आहे तो प्रभाग क्र. ४० मध्ये गेलाच कसा?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>२००२ नंतर अनेक बदली आदेश झालेले होते. त्यामुळे तो नेमक्या कोणत्या आदेशान्वये प्रभाग क्र. ४० मध्ये गेला हे तपासून पाहवे लागेल.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u>त्याच्या बदल्यात त्याच्या जागेवर दुसरा कामगार दिला आहे?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>मा. आयुक्त साहेब, मा. म्हसाळ साहेब, तुमचे हे जे उत्तर आहे ना ते फिरवाफिरवीचे उत्तर आहे. तुमच्या त्या विभागामध्ये सगळा सावळा गोंधळ चाललेला आहे. तुम्हाला मी माझ्या प्रभागातीलच

..२२..

उदाहरण देतो. एका कामगाराची हजेरी तीन वर्षापासुन माझ्या प्रभागात आहे आणि तो काम करतो दुसरीकडे. जर बदली झाली असेल तर हजेरी माझ्या प्रभागात कशी घेतली जाते?

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>श्री. म्हसाळ साहेब, तुम्ही अगोदर गोषवारा वाचा. गोषवा—यामध्ये तुम्ही असे म्हटले आहे की, ७ सफाई कामगारांना कामावर घेण्याचे आदेश संबंधीत स्वच्छता निरिक्षक यांना देण्यात आले होते. त्या नुसार संबंधीत स्वच्छता निरिक्षक यानी खालील प्रमाणे त्याना कामावर हजर करुन घेतले आहे. हा काय प्रकार आहे?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>श्री. म्हसाळ साहेब, तुमचे अजिबात लक्ष नाही.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>श्री. के.एन म्हात्रे हे जे आपल्याकडे मुख्य स्वच्छता निरिक्षक होते........

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>श्री. म्हात्रे असु दया की आणखी कोणी असु दया, आयुक्त असु दया. किंवा आम्ही असु दया परंतु काही पध्दत आहे की नाही तुमच्या विभागाला? रितीरिवाज, शिस्त काहीतरी असले पाहिजे ना? उदया तुम्ही नसाल, आम्हीही नसु. मग कोणी कसेही वागावे असे होते का? श्री. म्हात्रे यांनी काय केले हा आमचा विषय नाही आहे. तुम्ही येथे काय लिहिले आहे तो आमचा विषय आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>आयुक्त साहेब, माझ्या प्रभागातील दोन कर्मचा—यांची बदली झाली, त्यांच्या जागी अजुनही कामगार आलेले नाहीत.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–आपल्याकडे आरोग्य विभागाच्या उप–आयुक्त नव्यानेच जेव्हा रुजु झाल्या होत्या त्यावेळेस गैरहजर कामगार किती आहेत? याचा जेव्हा त्यांनी आढावा घेतला त्यावेळी त्यांनी सर्वांना सांगितले, श्री. म्हात्रे यांना सांगितले की, जे लोक गैरहजर आहेत परंतु त्यांना कामावर येण्याची इच्छा आहे, त्यांची तुम्ही माहिती घ्या.त्यांना नोटिसा काढा, त्यावेळेस हे लोक आलेले होतें. परंतु महासभेच्या मान्यतेशिवाय हजर करुन घेणार नाही असे त्यांना सांगितले होते म्हणुन हा प्रस्ताव ठेवलेला आहे.

सदस्य श्री. प्रकाश सावंत :–अहो, श्री. म्हसाळ साहेब, तुम्ही गोषवारा वाचा हो. तुम्ही स्वतः तुमच्या गोषवा–यामध्ये म्हटलेले आहे आणि सर्वांकडे एवढी बेकारी वाढली असतांना जे कामगार दोन, दोन अडीच अडीच वर्ष कामावर येत नाही त्यांचीच काय जरुरी आहे? माणुस दिडशे, दोनशे रोजावर काम करतो. येथे तुम्ही यांना १४ हजार, १५ हजार पगार देता आणि त्यांना बोलावुन तुम्ही हजर करुन घेता. सफाई निरिक्षक महासभेच्या मंजुरीशिवाय त्यांना हजर करुन घेवु शकतो काय? कायदयामध्ये बसते काय? सांगाना.

सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :–बदलीमध्ये किती खाल्ले? आज उत्तर दया, किती खाल्ले तुम्ही? मला उत्तर हवे आहे, उत्तर मिळाल्याशिवाय मी खाली बसणार नाही.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–आयुक्त साहेब, तुमच्याच निरिक्षकांकडुन जो अभिप्राय आलेला आहे त्यानुसार गोषवा–यात काय म्हटलेले आहे? किती तफावत आहे? या तफावतीमुळे सन्माननिय सदस्यांना असे वाटते की, या महापालिकेत काय भ्रष्टाचार चाललेला आहे? सांगा ना तुम्ही? आता तोंडी आदेश दिला आणि तोंडी आदेशाने कामावर घेता? हा कुठला प्रकार चालला आहे या महासभेत? या महापालिकेत काय चालले आहे?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–सन्माननिय महापौर महोदया, सदर गोषवा–याच्या पृष्ठ क्र. २ वर लिहिलेले आहे की, सदर सफाई कामगार यांना कामावर हजर करुन घेण्याबाबत लेखी आदेश न दिल्यामुळे संबंधित स्वच्छता निरिक्षक यांनी सदर सफाई कामगार यांचे हजेरीपत्रक लेखा विभागात सादर केलेले नाही. पगार निघालेला नाही हे यावरुन दिसते. हजर करुन घ्यायचे किंवा नाही याचा निर्णय महासभेने घेतल्यानंतर त्यांच्याविरुध्द चौकशी होवून त्यांना शिक्षा करण्याचा प्रस्ताव महासभेसमोर आणण्यात येईल.

यावेळी मा. सदस्य श्री. अनिल विदयार्थी सभागृहातुन बाहेर गेले. 

सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :–माझा विषय वेगळा आहे साहेब, माझ्या प्रभागातील सफाई कामगार प्रभाग क्र. ४० मध्ये जातो तो कसा जातो?

..२३..

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–सन्माननिय महापौर महोदया, प्रभाग क्र. ४० मध्ये त्यांनी तो दाखविला आहे तो कसा दाखविला आहे याची चौकशी करुन त्याची तुम्हांला लेखी माहिती देतो.

सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :–ठिक आहे.

काही सदस्य :–हा प्रस्ताव नाकारला जावा.

महापालिका सचिव :–नाकारायचा ना?

काही सदस्य :–होय, नाकारला जावा, नाकारला जावा.

महापौर :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

**विषय क्र. ६:–** एक वर्षापेक्षा जास्त कालावधी अनाधिकृतपणे गैरहजर असलेल्या सात सफाई कामगारांना रुजु करुन घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते कि, खालील सफाई कामगार, १ वर्षापेक्षा जास्त कालावधी कामावर गैरहजर होते. सफाई कामगाराचे गैरहजेरीचे प्रमाण जास्त असल्याने सफाई व स्वच्छतेवर त्याचा विपरित परिणाम पडलेला दिसुन येत होता, त्याच प्रमाणे सफाई व स्वच्छता व्यवस्थित होत नसल्याच्या लोकप्रतिनिधीच्या तक्रारी वारंवार कार्यालयास येत होत्या. अशा परिस्थितीत शहरात स्वच्छतेचा व पर्यायाने नागरिकाच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होक्त नये, यासाठी उक्त सफाई कर्मचा–याच्या विनंती नुसार व सफाई व स्वच्छतेच्या कामासाठी आवश्यकता असल्याने स्वच्छता निरिक्षक, मुख्य स्वच्छता निरिक्षक यांनी दिलेल्या अहवालानुसार, त्यांना मा. आयुक्ताचे आदेशाचे अधिन राहुन, उप–आयुक्त (आरोग्य) यांनी लेखी आदेश न देता, तोंडी आदेशान्वये खालील ७ सफाई कामगारांना कामावर घेण्याचे आदेश संबंधीत स्वच्छता निरिक्षक यांना देण्यात आले होते. त्या नुसार संबंधीत स्वच्छता निरिक्षक यानी खालील प्रमाणे त्याना कामावर हजर करुन घेतले आहे.

| अ. क्र | सफाई कर्मचा–यांचे नाव | प्र.क्र | गैरहजर कालावधी | कामावर घेतल्याचे दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. धनराज उत्तम साबले | ६४ | ०१/०५/०७ ते ०८/०१/१० | ०९/०१/१० | २ वर्षे ८ महिने ८ दिवस |
| २. | श्री.अनिल नामदेव मानकर | ७२ | ०७/०३/०७ ते ३१/०१/१० | ०१/०२/१० | २ वर्षे १० महिने २५ दिवस |
| ३. | श्री.विनोद बतन उज्जैनवाल | ४० | ०७/०४/०८ ते २०/०१/१० | २१/०१/१० | २ वर्षे ९ महिने १४ दिवस |
| ४. | श्री. राकेश मदन | ३६ | १७/०७/०७ ते ०३/०१/१० | ०४/०१/१० | २ वर्षे ५ महिने १८ दिवस |
| ५. | श्री. संतोष यादव पाटील | ३२ | २१/११/०८ ते ०६/०१/१० | ०७/०१/१० | २ वर्षे १ महिने १६दिवस |
| ६. | श्री. कैलास सुखदेव | ७२ | ०९/११/०७ ते ३१/०१/१० | ०१/०२/१० | २ वर्षे २ महिने २२ दिवस |
| ७. | श्री. रविंद्र पांडु | ३७ | १२/०१/०९ ते १२/०१/१० | १३/०१/१० | २ वर्षे १ दिवस |

सदर सफाई कामगार याना कामावर हजर करुन घेण्या बाबत लेखी आदेश न दिल्यामूळे संबंधीत स्वच्छता निरिक्षक यांनी सदर सफाई कामगार यांचे हजेरी पत्रक लेखाविभागास सादर केलेले नाही.

सदर अनधिकृत गैरहजर सफाई कामगारांना कामावर रुजू करुन घेणेकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम –१९४९ चे कलम ५३ (१) अन्वये "नियुक्ती प्राधिकारी" मा. महासभा असल्याने मा. महासभेची मान्यता घेणे आवश्यक होते. परंतु

..२४..

उप–आयुक्त आरोग्य यांनी सफाई कामाची निकट पाहाता सदर सफाई कर्मचारी यांना तोंडी आदेशान्वये कामावर हजर करुन घेतल्याच्या केलेल्या कार्यवाहीस तसेच त्यांचा अनधिकृत गैरहजर कालावधी महाराष्टभ नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२कलम ४८ नुसार सेवानिवृत्ती वेतन,उपदान व इतर सेवा विषयक लाभ मिळण्यास ग्राहय धरला जाणार नाही या अटीवर त्याना हजर झालेल्या दिनांकापासुन कामावर रुजु करुन घेण्यास मुंबई महानगरपालिका अधिनियम –१९४९ चे कलम ५३ (१) अन्वये मा. महासभेच्या मान्यतेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १३ <u>दिनांक:–१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. प्रशांत धांडे

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेले कारणांमुळे खातेनिहाय चौकशी व शिस्त भंगाच्या कारवाईस अधिन राहून एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अनाधिकृतपणे गैरहजर राहिलेल्या सात कर्मचा—यांना कामावर रुजु करुन घेण्यास मान्यता देत नाही.

**कारण——**

खातेनिहाय चौकशीच्या निकालाच्या अधिन राहून शिस्त भंगाची कारवाई करणे गरजेचे आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ७ :—**सफाई कामगार/मुकादम पदावर कार्यरत तीन कर्मचाऱ्यांना स्वेच्छानिवृत्ती देणेस मान्यता देणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ७ :—** सफाई कामगार/मुकादम पदावर कार्यरत तीन कर्मचाऱ्यांना स्वेच्छानिवृत्ती देणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर, कर्मचाऱ्यास ३ महिन्यांची नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३० वर्षांच्या सेवेनंतर, व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षांच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत. त्यानुसार त्यांना त्यांचे नासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरालिका सेवेतून स्वेच्छा सेवा निवृत्ती देणे आवश्यक आहे.

..२५..

| अ.क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | अर्हतकारी सेवा | नियम | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम कमला रामअवतार | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०५/२०१० |
| २ | श्रीम. शिता ईश्वर | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०५/२०१० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | श्री प्रल्हाद सजन बाविस्कर | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०७/२०१० |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम, ६५ व ६६ अन्वये, सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, वरील सफाई कामगार यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: १६ — दिनांक:–१२/७/२०१०

सुचकाचे नाव :– श्रीम. मिनाताई सोनेजी
अनुमोदकाचे नाव :– श्रीम. सुमन शेळके

ही महासभा वरील प्रस्तावनेत उल्लेखलेल्या तीन कर्मचा–यांना आयुक्त विनिर्दिष्ट करतील अशा तारखेपासून स्वेच्छा सेवानिवृत्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ८** :– श्री. गजानन गणपत शितोळे, मजुर, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक १०/०५/२०१० पासुन वैद्यकीय सेवा निवृत्ती देण्यात मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

महापौर :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ८** :– श्री. गजानन गणपत शितोळे, मजुर, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक १०/०५/२०१० पासुन वैद्यकीय सेवा निवृत्ती देण्यात मान्यता देणे.

प्रस्तावना

श्री. गजानन शितोळे, मजूर, सा. बां. विभाग यांचा दिनांक १५/१२/२००९ रोजी वैद्यकीय कारणास्तव सेवा निवृत्ती मिळावी म्हणून विनंती अर्ज सादर केला होता. त्यानुसार कार्यालयीन आदेश क्र.

जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/७३६, दिनांक २२/१२/२००९ अन्वये मा. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, ठाणे यांचेकडे शारिरीक तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यानुसार क्र १०१, दिनांक ४/५/१० नुसार सदर कर्मचारी पुढील सेवा करण्यात कायमचे अपात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र दिलेले आहे.

सदर कर्मचारी हे दिनांक २/११/१९९६ पासुन महापालिका सेवेत कार्यरत असून त्यांची १३ वर्ष, ०६ महिने, ०८ दिवस एवढी सेवा झाली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवानिवृत्ती) नियम १९८२ नियम ८० च्या तरतुदीस अनुसरुन त्यांना वैद्यकीय दाखला मिळाल्यापासून ७ दिवसाचे आंत सेवा निवृत्त करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सेवानिवृत्ती) नियम १९८२ नियम ७१ अन्वये वैद्यकीय सेवा निवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

श्री. गजानन गणपत शितोळे, मजुर, सा.बा.विभाग यांना दिनांक १०/०५/२०१० रोजी वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्ती देणेकामी मंजुरी करिता मा. समासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १५ <u>दिनांकः–१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी
अनुमोदकाचे नाव :– श्री. मालती करोतिया

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. गजानन गणपत शितोळे, मजुर, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना वैद्यकीय कारणास्तव आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन सेवा निवृत्त देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९** :– सफाई कामगार पदावर कार्यरत एका कर्मचाऱ्यास वैद्यकीय सेवा निवृत्ती देणे

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ९** :– सफाई कामगार पदावर कार्यरत एका कर्मचाऱ्यास वैद्यकीय सेवा निवृत्ती देणे

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये रूग्णता निवृत्ती वेतनासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. तसेच नियुक्ती प्राधिकारी वैद्यकीय सेवा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कामगार यांनी वयोमानानुसार तसेच शारीरिक आजारपणामुळे त्यांचेकडुन सफाई काम होत नसल्यामुळे ‘‘वैद्यकीय सेवा निवृत्ती’’ मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेले आहे.

..२७..

| अ. क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्तीचा दिनांक | एकुण अर्हतकारी सेवा | वैद्यकीय सेवा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| २ | श्री. विष्णु गंगाराम देवकर | ०२/११/९६ | १२ वर्षापेक्षा जास्त | ०९/०५/२०१० |

त्याअनुषंगाने संबंधित कर्मचारी शारिरीक दृष्टया, सेवा करणेस पात्र आहेत किंवा नाहीत, याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणेबाबाबते मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे तसेच संबंधित कर्मचारी यांना कळविण्यात आले होते.

संबंधित कर्मचारी यांनी, मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांचेकडील प्रमाणपत्र सादर केले आहेत. त्यानुसार त्यांना, नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतुन वैद्यकीय सेवानिवृत्ती देणे आवश्यक आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ७१ अन्वये वैद्यकीय सेवा निवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, वरील सफाई कामगार यांना, वैद्यकीय कारणास्तव ''सेवानिवृत्ती'' देणेकामी, मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र: १६</u> <u>दिनांक:–१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्रीम. चंद्रा टेकचंदानी

ही महासभा प्रस्तावनेत उल्लेख केलेल्या एका सफाई कामगारांस आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन वैद्यकीय कारणास्तव सेवा निवृत्ती देणे मान्य करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :–** सफाई कामगार/मुकादम पदावर कार्यरत तीन कर्मचाऱ्यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

---

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> सचिव साहेब एक मिनिट, आयुक्त साहेब, जे सफाई कामगार स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतात, त्यांच्या जागी आपण नविन कर्मचारी भरता का? काय पध्दत आहे? आतापर्यंत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा–यांच्या जागी किती कर्मचारी आले? अगोदरच नगरसेवकांची बोंब आहे की सफाई कामगारांची कमतरता आहे.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>सन्माननिय महापौर महोदया, साधारणत: कायदयातील तरतुद अशी आहे की, २० वर्ष सलग सेवा झाली तर कायदयानुसार आपण स्वेच्छा सेवानिवृत्ती देतो. परंतु सफाई कामगारांना लाड कमिटीच्या शिफारशी लागु असल्याने त्यांच्या निवृत्ती नंतर त्यांच्या वारसांना नियुक्ती देण्यात यावी असे शासनाचे आदेश आहेत. आता यांनी निवृत्ती घेतल्यानंतर वारसाची नोकरीसाठी शिफारस करतील आणि

वारसास आपणांस नोकरी दयावी लागेल. जर आपण त्यांची सेवानिवृत्ती मंजुर केली नाही तर त्यांना काम करावे लागेल. वैद्यकीय सेवा निवृत्ती सोडुन इतर कारणासाठी सेवा निवृत्ती दयायची कि नाही याचा निर्णय महासभेने घ्यायचा आहे. जर महासभेने नामंजुर केले तर एकतर त्यांना काम करावे लागेल नाहीतर .................



<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>जे मयत झालेले आहेत, त्यांच्या जागी सुध्दा आपण अनुकंपा तत्वाने त्याच्या वारसांना कामावर घेतो. परंतु माझ्या प्रभागातील प्रभाग क्र. ४८ व ४९ मधील प्रत्येकी २,२, कामगार किंवा महिला सफाई कामगार निधन पावले परंतु त्यांच्या जागी नविन कोणी सफाई कामगार आलेले नाहीत. त्याबाबतीत?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>तपासून बघतो.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>आयुक्त साहेब, वारस म्हणुन कुणाकुणास नेमता येईल. समजा, आता कोणी स्वेच्छा सेवानिवृत्ती घेत आहे, तर तो वारस म्हणुन कोणास नेमु शकतो. त्याच्या रक्ताच्या नातेवाईकास किंवा तो ज्या कुणास दत्तक घेत असेल त्यास कुणी एखादया मुलीस दत्तक घेतो तर हा मुद्दा जरा स्पष्ट करा.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>सन्माननिय महापौर महोदया, शासनाचे जे निर्देश आहेत त्यानुसार ज्यांच्याशी रक्ताचे नाते आहे ते. या व्यतिरिक्त सेवानिवृत्त होणा–या सफाई कामगारास जर असे वाटत असेल की, आले रक्ताचे नातेवाईक आपले संगोपन करु शकणार नाहीत तर तो कुणासही आपला वारस नेमु शकतो.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:–</u>जर कोणी रक्ताचा नातेवाईक नसेल बहिणीचा मुलगा, भावाचा मुलगा, चुलत भावाचा मुलगा असे लोक सुध्दा चालु शकतील काय?

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :–</u>महापौर महोदया, शहरात कधीही आणि कुठेही आग लागु शकते आग विझविण्यासाठी आपणाकडे जे अग्निशमन दल आहे त्यामध्ये पुर्वी ६० कर्मचारी होते. तेथे आता २२ कर्मचारी आहेत.

<u>महापालिका सचिव :–</u>हा विषय विषयपत्रिकेवर कुठे आहे?

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव:–</u> हा विषय सभा सूचनेवर नाही.

<u>श्री. किशोर जग्यासी :–</u>हा विषय सभा सूचनेवर नाही, परंतु सेवानिवृत्ती विषयी आपण जे काही सांगत आहात व कर्मचा–यांना सेवानिवृत्ती देत आहात त्यानुसार अग्निशमन दलामध्ये साठ कर्मचा–यांतुन फक्त २४ कर्मचारी सध्या कार्यरत आहेत. त्यांना दिवस रात्र काम करावे लागत आहे. त्याविषयी आपण काही केलेले नाही. आणि आता एवढया कामगार/कर्मचा–यांना सेवानिवृत्ती देवुन आपण काय करणार? भविष्यातील आपले नियोजन काय आहे? त्याबाबत ते विचारत आहेत.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u>मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, अग्निशमन विभागाची जी ३८ पदे आहेत ती भरण्यासाठी आयबीपीएस ही जी बोरिवलीची संस्था आहे, त्या संस्थेकडे पत्रव्यवहार केला आहे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>श्री. म्हसाळ साहेब, श्री. लालबिहारी यादव यांनी जी आपणांस माहिती दिली आहे की अग्निशमन विभागात ६० कर्मचारी असले पाहिजेत तेथे फक्त २२ कर्मचारी आहेत हे बरोबर आहे का? तेथे किती कर्मचारी असले पाहिजेत?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u>मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, जो बॅकलॉग आहे तो अग्निशमन सल्लागार यांनी आपणांस काढुन दिला आहे. मशिनरी व मनुष्यबळ असा दोन्हींचा बॅकलॉग आहे कर्मचा–यांची संख्या ६० नाही आहे ३८ आहे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—३८ आहे?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, होय ३८ पदे आहेत. आणि ती भरण्यासाठी आपण प्रशिक्षकांकडे मागणी केली होती. ज्यांनी कोर्स केलेला आहे अशा उमेदवारांमधुनच ती भरती करावयाची आहे. ही जी संस्था आहे त्यांच्याकडे आपण लेखी स्वरुपाची मागणी केली आहे. कर्मचारी भरण्याबद्‌दल विनंती केली आहे. त्यांनी सुरुवातीला मान्यता दर्शविलेली होती परंतु त्यांनी सांगितले की, १०० पदे असतील तर .............

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—किती वेळेपासुन भरती बंद आहे? किती वेळेपासुन आपण भरती केलेली नाही ते आपण सांगणार?

..२९..

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, १०० पदे जर असतील तर आम्ही ती पदे भरणार आहोत. त्यांनी सुरुवातीला पत्र पाठविले होते तसेच दुरध्वनीवरुन सुध्दा सांगितले होते, त्यानंतर आयबीपीएस ही जी एक बोरीवलीची संस्था आहे. नोव्हेंबर डिसेंबरच्या दरम्यान आपण आयबीपीएसला पत्र पाठविले होते.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—श्री. म्हसाळ साहेब, अग्निशमन दलाचा कुणी अधिकारी येथे उपस्थित असेल तर त्यांना व्यासपीठावर बोलवा.

सदस्य श्री. प्रकाश सावंत :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, ही एक अत्यावश्यक सेवा असतांना येथे अग्निशमन विभागाच्या गाडीला ड्रायव्हर नाही आहे. जेथे ६० ते ६५ माणसे असायला हवीत तेथे फक्त १९ माणसे आहेत. त्यातील तीन माणसे आजारी आहेत, गाडीला ड्रायव्हर नाही आहे. उपकरण असून ते तुम्ही वापरणार कसे? तुम्ही डायरी काढता आपत्तकालीन व्यवस्थेची, जर व्यवस्थाच नसेल तर आपण आपत्तकालीन व्यवस्था कशा प्रकारे करणार आहोत? हे आपण सांगु शकाल का? दर वर्षी माणसे कमी होतात, ही संख्या दर वर्षी कमी होते. तर आपण आपत्तकालीन सेवा कशी देणार? हे आपण सांगु शकाल काय? आज या माणसांची गरज आहे. कुठल्या विभागाला तुम्ही काय दिले याचे सभागृहाला काही घेणे देणे नाही, जनतेला घेणे देणे नाही. तुम्ही नागरीकांकडुन कर वसूल करतात त्यासाठी त्यांना तुम्ही सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. तीन तीन गाडया आपण घेत आहोत, दुसरे फायर स्टेशन तयार करत आहोत आणि ड्रायव्हर फक्त एक आहे. श्री. मिरपगार, मी जे सांगत आहे ते बरोबर आहे का?

श्री. भास्कर मिरपगार (प्र. अग्निशमन अधिकारी):—होय, बरोबर आहे. दोन लोक सध्या आजारी असल्यामुळे... ..

सदस्य श्री. प्रकाश सावंत :—एकच ड्रायव्हर आहे. तोही आला नाही तर मग फायरब्रिगेड बंद तर मग काय फायरब्रिगेड सुध्दा आपण बीओटी तत्वावर देणार काय?

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—मा. आयुक्त साहेब, अग्निशमन दलामध्ये किती ड्रायव्हरर्स आहेत, किती फायरमन्स आहेत याची नावासह आम्हांला पुढील महासभेत यादी देण्यात यावी. आणि तेथे कर्मचा—यांची लवकरात लवकर भरती झाली पाहिजे. कारण त्यांची खुपच आवश्यकता आहे.

सदस्य श्री. दत्तात्रय पवार :—मा. आयुक्त साहेब, महापालिकेच्या प्रत्येक विभागामध्ये अशाप्रकारे कर्मचा—यांची कमतरता आहे. केवळ अग्निशमन दल हा एकच विभाग अपवाद नाही. मघाशी आपण जन्म—मृत्यु नोंदणीचे एक उदाहरण घेतले त्या विभागात तीन लिपिक नाहीत. अशी प्रत्येक विभागामध्ये कर्मचा—यांची कमतरता आहे. त्यासाठी प्रत्येक विभागात कर्मचा—यांची भरती केली तर आपणांस शंभर पेक्षा जास्त कर्मचा—यांची आवश्यकता भासणार आहे. जेथे अनुशेष बाकी असेल तेथे लवकरात लवकर कर्मचा—यांची भरती करावी व अनुशेष भरुन काढावा अशी माझी विनंती आहे आणि माझ्या विनंतीचा विचार करावा, पुन्हा एकदा विनंती आहे.

**सदस्य श्री. प्रकाश सावंतः**—आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. दत्तात्रय पवार यांना कळले किंवा नाही हे मला माहित नाही परंतु मी आपत्तकालीन सेवेबद्दल बोललो आहे. इतर सर्व विभागामध्ये कर्मचारी कमी असले तरी आपण त्या ठिकाणचे काम निभावून नेवु शकतो. परंतु हे काम करण्याचे लायकीचे कोणी नाहीत. त्यामुळे तीच माणसे आणि प्रशिक्षीत माणसे असली पाहिजेत हे माझे म्हणणे आहे आणि ताबडतोब भरती केली पाहिजे. पाहिजेतर तुम्ही पत्र लिहा, पाठपुरवा करा आणि लवकरात लवकर तेथे कर्मचारी भरले जातील याची आपण दक्षता घ्या. नाहीतर या शहराची परिस्थिती फार वाईट होणार आहे. तुम्ही जेव्हा आपत्तकालीन पुस्तिका काढता त्या आपत्तकालीन व्यवस्थेसाठी किती कर्मचारी आहेत? तुमच्या गाडीवर ड्रायव्हर नसेल ती फायरब्रिगेडची गाडी चालविणार कोण? एका लिपिकाचे काम दुसरा लिपिक करु शकतो. ड्रायव्हरचे काम ड्रायव्हरनेच केले पाहिजे. यासाठी माझे म्हणणे आहे की आपण केवळ पत्रव्यवहार न करता ठोस कार्यवाही करावी. पत्रव्यवहार चालु आहे हे मी गेल्या तीन वर्षापासुन ऐकतो आहे. तुम्हांलाही जवळ जवळ दोन वर्ष होत आहेत. तुम्हीही दोन वर्षापासुन ऐकत आहे. तरी परिस्थीती सुधरत नाही. परिस्थिती सुधारण्यासाठी आपण जबाबदारी घ्या.

**सदस्य श्री. लालबिहारी यादव :**—मा. महापौरजी, याच्याशी संबंधीत जे अधिकारी आहेत, त्यांनी खरेखोटे काय आहे याबाबतीत महासभेस उत्तर दिले पाहिजे. येथे सन्माननिय सदस्य वेगवेगळया समस्या मांडत आहेत. परंतु अधिकारी त्याबाबत काही उत्तर देत नाहीत. त्यांनी त्यांचे उत्तर दिले पाहिजे. सभागृहास सांगितले पाहिजे की आमच्याकडे किती कर्मचारी आहेत? उत्तर देण्यासाठी व्यासपीठावर कुणीही येत नाही याचाच अर्थ संबंधीत कोणीही अधिकारी येथे उपस्थित नाही.

..३०..

**श्री. भास्कर मिरपगार (प्र. अग्निशमन अधिकारी):**—मा. महापौर महोदया, मा. उप—महापौर, मा. आयुक्त साहेब, आणि सन्माननिय सर्व सदस्य, आता सन्माननिय सदस्यांनी अग्निशमन दलातील कर्मचा—यांबाबत जो प्रश्न विचारला त्याबाबत मी माहिती देत आहे. उल्हासनगर —३ येथिल मुख्य अग्निशमन दलामध्ये ४ ड्रायव्हर आहेत त्यापैकी श्री. हरी बुधवंत या ड्रायव्हरच्या मोतीबिंदुचे ऑपरेशन झाल्यामुळे ते सध्या रजेवर आहेत. त्यानंतर श्री. सुरेश शिरपुरकर हे एक ड्रायव्हर आहेत. ते कामावर असतांना अचानक त्यांच्या छातीत दुखु लागल्यामुळे तीन दिवस झाले ते रजेवर आहेत. सध्या दोन ड्रायव्हर बारा तास डयुटी करतात. त्याचप्रमाणे श्री. बळीराम सुर्यवंशी हे व्हीटीसी फायरब्रिगेड येथिल ड्रायव्हर ३० जुन २०१० रोजी सेवानिवृत्त झाल्यामुळे सध्या तेथे तीन ड्रायव्हर कार्यरत आहेत. आठवडयातील सुट्टीच्या दिवशी एका वाहनचालकाला सुट्टी दिल्यानंतर जे वाहनचालक कामावर असतील ते डबल डयुटी करतात. शासनाच्या ध्येय धोरणानुसार तासाला २० रुपये याप्रमाणे त्यांना ओव्हरटाईम स्वरुपात त्याचा मोबदला दिला जातो. फायरमनची कमतरता आहे हे मीही मान्य करतो. आणि त्या दृष्टीने मी साहेबांना विनंती सुध्दा केली आहे आणि त्यादृष्टीने कार्यवाही सुरु आहे. आयबीपीएस संस्थेकडे प्रस्ताव ठेवलेला आहे. परंतु त्यांना १०० उमेदवार उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. एक उमेदवार असो किंवा ९९ उमेदवार असोत १०० उमेदवारांची फी भरावी लागेल अशी त्यांची अट आहे. अग्निशमन विभागात आता २२ फायरमन कार्यरत आहेत, ९ लिडिंग फायरमन, ४ उपस्थानक अधिकारी, व वाहनचालकांच्या बाबतीत तर मी आताच सांगितले की, ५ वाहन चालक आहेत. त्यातील दोन रजेवर आहेत.

**सदस्य श्री. लालबिहारी यादव :**—किती कर्मचारी असले पाहिजेत?

**श्री. भास्कर मिरपगार (प्र. अग्निशमन अधिकारी):**—फायरमन ६० असले पाहिजेत.

**सदस्य श्री. लालबिहारी यादव :**—६० फायरमन असले पाहिजेत? आता किती आहेत?

**श्री. भास्कर मिरपगार (प्र. अग्निशमन अधिकारी):**—आता २२ फायरमन आहेत.

**सदस्य श्री. लालबिहारी यादव :**—२२ फायरमनने काम होते का?

**श्री. भास्कर मिरपगार (प्र. अग्निशमन अधिकारी):**—अडचणी तर येतात.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :–</u>आग लागते तेव्हा तेथे पोहचत तर नाहीत ना?

<u>श्री. भास्कर मिरपगार (प्र. अग्निशमन अधिकारी):–</u>असे तर कधी झाले नाही.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :–</u>नाही, नाही ब–याच वेळेला झालेले आहे. शिवाजी चौकात झाले होते. ब–याच ठिकाणी असे झाले आहे.

<u>श्री. भास्कर मिरपगार (प्र. अग्निशमन अधिकारी):–</u>नाही,नाही.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :–</u>आग विझल्यानंतर आपली गाडी तेथे पोहोचते.

<u>श्री. भास्कर मिरपगार (प्र. अग्निशमन अधिकारी):–</u>असे कधीही झालेले नाही. वेळेवरच गाडी पोहाचली आहे. मनुष्यबळ कमी आहे हे मी मान्य करतो. परंतु जेवढे काही मनुष्यबळ उपलब्ध आहे त्यांच्याकडुन आम्ही काम करुन घेतलेले आहे.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, माझ्यामते हा विषय जरी सभासूचनेवर नसला तरी मा. महापौरजी, आपणांस विनंती आहे, या शहराचा हा गंभीर विषय आहे. त्याचबरोबर सन्माननिय आयुक्त साहेब, याठिकाणी आपणांस विनंती करेन की, आपल्या महानगरपालिकेच्या जागेमध्ये इमारतीचे काम फार जोरदार चालु आहे. मला वाटते परवाच तिचे उद्घाटन झाले आहे. ही चांगली गोष्ट आहे. महापालिका इमारतीस अनेक मजले चढविले पाहिजेत. अनेक दालने तयार करा तुम्ही नगरसेवकांसाठी, अधिका–यांसाठी. परंतु या शहरात जर लोकच जिवंत राहिले नाहीत तर नगरसेवक येवुन बसतील कुठे? हा प्रश्न उदयाला उद्भवु नये म्हणुन मी या ठिकाणी आवर्जुन आपले लक्ष वेधु इच्छितो. कारण की आता अग्निशमन विभागाच्या अधिका–याने सांगितले की, चार वाहनचालकापैकी फक्त दोन वाहनचालक कामावर आहेत. त्यातच एकाचे मोतीबिंदुचे ऑपरेशन झाले आहे, एक रजेवर गेला आहे. एक सेवानिवृत्त झाला आहे. सध्या पावसाळयाचे दिवस आहेत, उप–महापौर

..३१..

साहेब आपण सक्रिय आहात, आपण शहरातील नाल्यांची पाहणी करत आहात. शहरातील नाल्यांची चांगल्यापध्दतीने सफाई झाली आहे असे आपले म्हणणे आहे वर्तमानपत्रातुन आम्हांस वाचनास मिळाले. ही एक आनंदाची गोष्ट आहे. आणि आयुक्त साहेब, तुम्हांला मी आवर्जुन सांगेन त्या इमारतीचे काम करत असतांना चार वाहन चालकांच्या ठिकाणी तुम्ही आठ वाहनचालकांची भरती केली पाहिजे. जेणेकरुन एक वाहनचालक बारा तास काम करु शकत नाही. आपण पाहिले असेल की इमारती कोसळल्यानंतर इतर शहरातुन आपणांस फायरब्रिगेडच्या गाडया मागवाव्या लागल्या. त्याठिकाणी आपण रात्रंदिवस थांबुन काम केले आहे. ढिगा–याखालुन मृतदेह काढलेले आहेत. आणि असा काही प्रकार अचानक या शहरामध्ये झाला, एखादया इमारतीला आग लागली, झोपडपट्टीला आग लागली, कोठे शॉर्टसर्किट होवुन आग लागली त्याचबरोबर या शहरामध्ये इमारती पडतात उल्हासनगर शहरासाठी ही नविन बाब नाही आहे. अशा वेळेस आपणाकडे फायरब्रिगेड तयारीत असली पाहिजे परंतु ती तयारीत नाही ड्रायव्हर आजारी आहे. ड्रायव्हर कमी आहेत. यास्तव माझी आपणांस विनंती आहे ही सर्वी कामे करत असतांना मानवतेच्या नात्याने मनुष्यहानी होवू नये म्हणुन आपण जास्तीत जास्त काळजी घेवु. तातडीची उदया बैठक लावुन ड्रायव्हरची नविन भरती, फायर ब्रिगेडची नविन भरती लवकरात लवकर करावी अशी आपणांस मी विनंती करतो. धन्यवाद।

<u>महापालिका सचिव :–</u>पास? ठिक आहे?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. १०:–** सफाई कामगार/मुकादम पदावर कार्यरत तीन कर्मचाऱ्यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर, कर्मचाऱ्यास ३ महिन्यांची नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३० वर्षांच्या सेवेनंतर, व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षांच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कामगार/ मुकादम यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत. त्यानुसार त्यांना त्यांचे नासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरालिका सेवेतून स्वेच्छा सेवा निवृत्ती देणे आवश्यक आहे.

| अ. क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्तीचा दिनांक | अर्हतकारी सेवा | नियम | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री इकबाल अहमद शेख | ०१/०८/८९ | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०५/२०१० |
| २ | श्री लालचंद चंदू मोरे | ०१/०८/८९ | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३०/०६/२०१० |
| ३ | श्री मधू इतवारी सौदे | ०१/०८/८९ | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०७/२०१० |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम, ६५ व ६६ अन्वये, सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

..३२..

तरी, वरील सफाई कामगार यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: १७** दिनांक:–१२/७/२०१०

सुचकाचे नाव :– श्रीम. मोना वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्रीम. शकुंतला पाटील

ही महासभा वरील प्रस्तावनेत उल्लेखलेल्या तीन कर्मचा–यांना आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन स्वेच्छा सेवानिवृत्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ११ :—** शासननिर्णयाच्या धर्तीवर महापालिका कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवा अंर्तगत प्रगती आश्वासीत योजनेचा लाभ देणे.

---

**<u>महापालिका सचिव :—</u>**पास? कुणाचा काही प्रश्न तर नाही ना?

**<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>**मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, अनु. क्र. ११ चा जो विषय आहे, शासननिर्णयाच्या धर्तीवर महापालिका कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवा अंर्तगत प्रगती आश्वासीत योजनेचा लाभ देण म्हणजे काय? या संदर्भात आपण कोणतीही माहिती दिली नाही. संपुर्ण माहिती देवुन नंतर हा विषय आणावा.

**<u>महापालिका सचिव :—</u>**पास कि वगळायचा?

**<u>काही सदस्य :—</u>**विषय वगळण्यात यावा.

यावेळी मा. सदस्य श्री. राजु जग्यासी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

**<u>महापौर :—</u>** सदरचा विषय वगळण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

✂ **विषय क्र. ११ :—** शासननिर्णयाच्या धर्तीवर महापालिका कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवा अंर्तगत प्रगती आश्वासीत योजनेचा लाभ देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

शासन निर्णय क्रमांक वेतन — ११०९/प्र.क्र. ४४/सेवा ३, दि १ एप्रिल, २०१० अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देणेबाबत तपशिल नमुद केला आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार विषयांकीत प्रकरणी दिनांक २० जुलै, २००१ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना सुधारीत स्वरूपात यापढे ''सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना'' या नावाने दिनांक १ ऑक्टोंबर, २००६ पासुन पुढीलप्रमाणे अंमलात येईल :—

२. **(अ) <u>योजनेचा तपशिल</u>** : सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना कमाल वेतन बॅड पी बी — ३ (रू. १५६००—३९१००) + ५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागू राहील.

..३३..

या योजनेखाली पात्र कर्मचाऱ्यांना त्यांच्या संपूर्ण सेवाकालावधीत कमाल दोन वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येईल. तथापि, तीन किंवा त्यापेक्षा जास्त पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरणार नाही. मात्र ज्या कर्मचाऱ्यांना दोन प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्या आहेत त्या कर्मचाऱ्यास या योजनेखाली फक्त एकच लाभ अनुज्ञेय होईल.

**(ब) <u>योजनेचा पहिला लाभ</u>** : (१) विषयांकीत प्रकरणी शासनाकडील दि. २० जुलै, २००१ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या आधिन पदोन्नती संधी उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यास या योजनेखाली १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येईल.

(२) कालबध्द् पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेखाली कर्मचाऱ्यांनी घेतलेला लाभ हा या योजनेखाली त्या कर्मचाऱ्यांचा पहिला लाभ समजण्यात येईल.

(३) विवक्षित सेवाकालावधीनंतर, संबंधीत पदाच्या कर्तव्ये व जबाबदारीत वाढ न होता, अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचनेचा (Non functional pay structure) मंजूर करण्यात आलेला/येणारा लाभ हा या योजनेखालील पहिला लाभ समजण्यात येईल. उदा. मंत्रालय / विधान मंडळ सचिवालयातील कक्ष अधिकाऱ्यांना चार वर्षाच्या नियमित सेवेनंतर देण्यात येत असलेली अकार्यात्मक वेतनसंरचना.

(४) कर्मचाऱ्यास या योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी एक अथवा दोन वेळेस प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असेल व त्यानंतर पदोन्नतीसाखळीत (Hierarchy) पुढील पदोन्नतीचा संवर्ग

उपलब्ध नसेल तर, तो ज्या पदाच्या वेतनसंरचनेत वेतन घेत आहे ते पद जणू काही एकाकी पद आहे असे समजून त्याला एकाकी पदास ज्याप्रमाणे या योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात येतो, त्याप्रमाण पहिला लाभ मंजुर करण्यात येईल. एकाकी पदांना ही योजना लागू करण्याविषयीचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

(क) योजनेचा दूसरा लाभ :

(१) पहिल्या लाभानंतर १२ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यास पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना दूसरा लाभ म्हणून करण्यात येईल. तथापि, या योजनेतील पहिला लाभ म्हणून ज्या पदांची वेतनसंरचना मजुर करण्यात आली आहे त्या पदाला विवक्षीत सेवाकालावधीनंतर, त्या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यात वाढ न होता, अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतनसंरचना दुसरा लाभ म्हणून मंजूर करण्यात येईल.

(२) दुसरा लाभ मंजूर केल्यानंतर पहिल्या लाभाप्रमाणेच पदोन्नतीच्या नियमांनुसार विकल्प देण्याची मुभा देऊन वेतननिश्चिती करण्यात येईल, पदोन्नतीनंतर पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

(३) ''सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना'' दिनांक १ ऑक्टोंबर, २००६ पासुन लागू राहील परंतू १ ऑक्टोंबर, २००६ ते या आदेशाच्या दिनांकापर्यंत (१/४/२०१०) काल्पनिकरीत्या वेतननिश्चिती करून प्रत्यक्ष लाभ या आदेशाच्या दिनांकापासुन देण्यात येतील. मात्र थकबाकी अनुज्ञेय असणार नाही.

(ढ) योजनेच्या दुसऱ्या लाभासाठी पात्रतेच्या अटी शर्ती :

(१) पहिला लाभ घेतलेल्या व त्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यास दुसरा लाभ मंजूर करतांना तो पहिल्या लाभाप्रमाणेच दिनांक २० जुलै, २००१ च्या आदेशामधिल व यासंबंधी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या स्पष्टिकरणात्मक आदेशांतील तरतुदीच्या अधीन मंजूर करण्यात यावा. म्हणजेच, ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येणार आहे, त्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळण्यासाठी विहित केलेल्या अटी शर्तींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

(२) पहिल्या लाभांतर्गत पदोन्नतीच्या ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे त्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती न मिळालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, दूसरा लाभ मंजूर करण्यासाठी त्याला ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येणार आहे. त्या पदावरील पदोन्नतीसाठी विहित केलेली गोपनीय अहवालाची किमान सरासरी प्रतवारी प्राप्त करणे आवश्यक राहील.

(३) एक प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्यानंतर या योजनेखाली पदोन्नतीच्या पदाच्या वेतनसंरचनेचा पहिला लाभ मिळाला असेल आणि त्यानंतर पदोन्नती साखळीत (Hierarchy) पुढील पदोन्नतीचा सवंर्ग उपलब्ध नसेल किंवा

या योजनेअंतर्गत एक लाभ मिळाल्यानंतर एक प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असेल आणि त्यानंतर पदोन्नती साखळीत (Hierarchy) पुढील पदोन्नतीचा सवंर्ग नसेल, किंवा

कर्मचा—यास या योजनेखाली पदोन्नतीच्या पदाच्या वेतनसंरचेचा पहिला लाभ मिळाला आहे व त्यानंतर पदोन्नतीसाखळीत (Hierarchy) पुढील पदोन्नतीचा सवंर्ग उपलब्ध नसेल तर या *तिन्ही प्रकरणी* तो ज्या पदाच्या वेतनसंरचनेत वेतन घेत आहे ते पद जणूकाही एकाकी पद आहे असे समजून त्या वेतनसंरचनेतील एकाकी पदाला योजनेच्या पहिल्या लाभांतर्गत अनुज्ञेय वेतनसंरचना दुसरा लाभ म्हणुन मंजुर करण्यात येईल.

या योजनेचा पहिला लाभ मिळाल्यानंतर कर्मचा—यास पहिल्या लाभाच्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असेल आणि त्यानंतर योजनेचा दुसरा लाभ मिळण्यापुर्वीच त्यापुढील पदोन्नतीच्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असेल व त्यानंतर पदोन्नती साखळीत पुढील पदोन्नतीचा संवर्ग उपलब्ध नसेल तर तो, ज्या पदाच्या वेतनसंरचनेत वेतन घेत आहे ते पद आहे



असे समजून त्या एकाकी पदाला योजनेच्या पहिल्या लाभांतर्गत अनुज्ञेय असणारी वेतनसंरचना दुसरा लाभ म्हणून मंजूर करण्यात येईल.

(४) कर्मचाऱ्यास या योजनेखाली कोणताही लाभ मिळण्यापुर्वी एक प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असेल व त्यानंतर पदोन्नतीसाखळीत (Hierarchy) पुढील पदोन्नतीचे पद उपलब्ध नसेल आणि त्याला वरील उपपरिच्छेद (ब) (४) नुसार योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात आला तर, त्याला एकाकी पदास ज्याप्रमाणे या योजनेचा दुसरा लाभ मंजुर करण्यात येतो त्याप्रमाणे दुसरा लाभ मंजूर करण्यात येईल.

(५) पहिला लाभ मंजूर केल्यानंतर संबंधित कर्मचारी प्रत्यक्ष पदोन्नतीस अपात्र ठरला अथवा त्याने पदोन्नती नाकारली तर अशा प्रकरणी पहिला लाभ काढून घेतला जात असल्याने अशा कर्मचाऱ्यांचा थेट दुसऱ्या लाभासाठी विचार करता येणार नाही. मात्र त्याने त्यानंतर पदोन्नती

स्वीकारल्याच्या दिनांकापासून १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्याला अन्य अटी व शर्तीच्या अधीन राहून दुसरा लाभ मंजूर करता येईल.

३. या योजनेखाली पहिला/दुसरा अथवा दोन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील अशा लाभांची वसूली करण्यात येईल. सदर वसुलीची संपूर्ण जबाबदारी संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांची राहील.

४. या योजनेखाली देण्यात आलेले लाभ काढून घेतल्यावर संबंधित कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती जणू काही या योजनेचे लाभ दिले नव्हते असे समजून महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम १२ च्या तरतुदीनुसार करण्यात यावी.

५. सदरचे आदेश केवळ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना लागू असतील. **मात्र रोजंदारीवरील, कंत्राटी तत्वावरील व तदर्थ (Ad-hoc)** नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

तरी उपरोक्त परिपत्रकाद्वारे शासनाकडील आश्वासीत प्रगती योजनेमध्ये केलेल्या सुधारणेस विहितरीतीने अंमलबजावणी करणेकामी मा. महासभा पटलावर मंजूरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १७ अ <u>दिनांक:–१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. दत्तात्रय पवार
अनुमोदकाचे नाव :– श्री. गणपत एडके

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या शासन निर्णय क्रमांक वेतन — ११०९/प्र.क्र. ४४/सेवा ३, दि १ एप्रिल, २०१० च्या धर्तीवर महापालिका कर्मचा–यांना सुधारीत सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना लाभ देणेस मान्यता व वेळोवेळी पात्र कर्मचा–यांचे पदोन्नतीच्या वेतन संरचनेस आयुक्तांना प्राधिकृत करणे कामी पुढच्या सभेत घेण्या प्रयोजनार्थ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १२** :– उल्हासनगर महापालिकेतील रहिवासी व व्यापारी संकुलातील सांडपाण्याच्या पुर्नवापराचे
प्रारुप उपविधीस मान्यता देणे.

---

<u>महापालिका सचिव :–</u>पास? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**--35--**

---

☑

**विषय क्र. १२** :– उल्हासनगर महापालिकेतील रहिवासी व व्यापारी
संकुलातील सांडपाण्याच्या पुर्नवापराचे प्रारुप उपविधीस

मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेतील रहिवासी व व्यापारी संकुलातील सांडपाण्याच्या पुर्नवापराचे प्रारुप उपविधी (Bye law) उल्हासनगर महानगरपालिकेने तयार केले असुन, या उपविधीद्वारे एकापेक्षा जास्त घटक असणाऱ्या आणि व्यापारी संस्था असणाऱ्या इमारतीतील सांडपाणी वापराकरीता मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. त्याचा वापर इमारती बांधकाम उपयोग, व्यवस्था योजक व्यवस्थापक व नियमन करणाऱ्या सर्वांनी करावा असे अपेक्षित आहे.

या नियमांचा उददेश सांडपाणी पुर्नवापराची व्यवस्था योग्य रित्या व वेळोवेळी मागणी असलेल्या दर्जाचे पाणी पुरवेल आणि पाण्याचा अयोग्य वापर टाळेल याकरीता पुरेशी व्यवस्था असल्याची खात्री करणे हा आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रिय शहरी पुनरुत्थान योजनेतील अर्थसहाय्य घेताना उल्हासनगर महानगरपालिकेने भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाशी केलेल्या करारातील बंधनामुळे उल्हासनगर महानगरपालिकेने हा उपक्रम हाती घेतला आहे. करारातील तरतुदीनुसार रहिवासी इमारतीत सांडपाण्याचा व घाण पाण्याचा पुर्नवापर करणे, पर्यावरण सुसंगत इमारती आणि गृह निर्माणाच्या दृष्टिने आवश्यक आहे. विशिष्ट उपविधी अशा प्रकारच्या सांडपाण्याच्या प्रक्रियेला व त्यांच्या व्यापारी संस्थातील वापराला चालना देईल. परंतू, या दोन्ही विभागांच्या पुर्नवापराबाबतच्या समस्या सारख्याच असल्याने, समान नियम पाळणे प्रस्तावित आहे.

तरी सदर प्रारुप उपविधीस (Bye law) मा. महासभेची मान्यता मिळावी, ही विनंती व सदर मान्यता मिळाल्यानंतर राज्य शासनाकडे योग्य ती मंजूरी मिळणेकरीता प्रस्ताव सादर करण्यांत येईल.

<u>महासभा ठराव क्र:</u> १८ <u>दिनांक:—१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :—श्री. दिलीपकुमार जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. शिला मनसुलकर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवासी व व्यापारी संकुलातील सांडपाण्याच्या पुर्नवापरा प्रयोजनार्थ सोबत जोडलेले पृष्ठ क्र. २ तें १५ पर्यंतच्या प्रारुप उपविधीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

३५ ( २ )

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

## उल्हासनगर महानगरपालिकेतील रहिवासी व व्यापारी संकुलातील सांडपाण्याच्या पुर्नवापराचे प्रारुप उपविधी

३५ ( ३ )

# प्रस्तावना

उपयुक्ततेचा विचार करता वेगवेगळया समारंभाच्या वेळी मनुष्य वेगवेगळे कपडे वापरतो. त्याचप्रमाणे वेगवेळया कामांसाठी पुर्नप्रक्रिया केलेले कमी खर्चाचे पाणी अशा ठिकाणी वापरले जाऊ शकते. जेथे पाण्याच्या पिण्या योग्य असण्याच्या प्रमाणकांची आवश्यकता नसते. जसे की, संडास स्वच्छ करणे, गाडी धुणे आणि बागकाम.

अशाप्रकारच्या कामांसाठी मध्यमस्तरीय गाळलेले पाणी वापरात आणले जाऊ शकते. अशाप्रकारे विचारपुर्वक वागण्याने केवळ मुल्यवान पाणी संरक्षित केले जाणार नाही तर जलवाहिन्या, मलजलवाहिन्या, पाणी प्रक्रिया प्रकल्प यांचेही आयुष्य वाढेल आणि अंतिमत: पर्यावरण देखील सुधारेल.

सजीव सृष्टिच्या जीवनाकरीता निर्सगाने बरीच नैसर्गिक साधन संपत्ती समर्पित केली आहे. पाणी त्यातील एक आहे. त्यामुळे पाण्याचे सर्व उगम जास्तीत जास्त काळापर्यंत उपयोगात आणता येतील अशाप्रकारे वापर करण्याची आता काळाची गररज बनली आहे. पाण्याचा पुर्नवापर अशाप्रकारचा ध्येय निश्चितीचा एक मार्ग होऊ शकतो.

लोकसंख्येतील वाढ, पाण्याची टंचाई, पाण्याच्या शुध्दीकरणासाठी होणाऱ्या खर्चातील वाढ, पाणी पुरवठयासाठी लागणारा खर्च, घाण पाण्याची वल्हिेवाट लावण्याचा खर्च आणि पर्यावरण परिरक्षणाचा खर्च हया बाबींचा विचार करता सांडपाणी पुर्नवापर करण्याचे उपविधी तयार करण्यात आले आहेत.

या उपविधींद्वारे एकापेक्षा जास्त घटक राहणाऱ्या आणि व्यापारी संस्था असणाऱ्या इमारतीतील सांडपाणी वापराकरीता मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. त्यांचा वापर इमारत बांधकाम उद्योग, व्यवस्था योजक व्यवस्थापक व नियमन करणाऱ्या सर्वांनी करावा असे अपेक्षित आहे.

या नियमांचा उदद्देश सांडपाणी पुर्नवापराची व्यवस्था योग्यरित्या व वेळोवेळी मागणी असलेल्या दर्जाचें पाणी पुरवेल आणि पाण्याचा अयोग्य वापर टाळेल याकरीता पुरेशी व्यवस्था असल्याची खात्री करणे हा आहे. रहिवासी इमारतीत सांडपाण्याचा व घाण पाण्याचा पुर्नवापर करणे, पर्यावरण सुसंगत इमारती आणि गृह निर्माणाच्या दृष्टिने आवश्यक आहे. विशिष्ट उपविधी अशाप्रकारच्या सांडपाण्याच्या प्रक्रियेला व त्याच्या व्यापारी संस्थेतील वापराला चालना देईल. परंतू हया दोन्ही विभागाच्या पुर्नवापराबाबतच्या समस्या सारख्याच असल्याने समान नियम करणे प्रस्तावित आहे.

३५ ( ४ )

# अनुक्रमाणिका


| अ.क्र | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १ | उपविधी | |
| २ | व्याख्या | |
| | **उपविभाग अ — सांडपाणी पुर्नवापराचे उपविधी** | |
| १ | उपविधीची प्रयोजता | |
| २ | सांडपाणी सोडणे | |
| ३ | उपविधींची सक्ती | |
| ४ | परवानगी देणे | |
| ५ | घाण पाण्याची परीक्षा आणि त्याचे अहवाल | |
| ६ | तपासण्यासाठी नोटीस देणे | |
| ७ | सांडपाणी पुर्नप्रक्रिया प्रकल्प चालवण्याची परवानगी देणे. | |
| ८ | सांडपाणी वेगळे करणे | |
| ९ | अटींसह घाण पाणी सोडण्याची परवानगी देणे | |
| १० | बदलांची नोटीस देणे बंधनकारक असणे | |
| ११ | प्राधिकाऱ्यांना परवाना किंवा नोटीसीतील अटींमध्ये बदल करण्याचे अधिकार | |
| १२ | प्राधिकाऱ्यांच्या कामात लुडबुड | |
| १३ | परवानगी अथवा नोटीस पोचवणे | |
| १४ | दुरुस्तीचे कृत्य | |
| १५ | अधिकाऱ्यांना प्रधिकृत करणे | |
| | **उपविभाग ब — पाणी प्रोत्साहन उपविधी** | |
| १६ | नव्या इमारतीत सांडपाणी वाहुन नेणाऱ्या वाहिन्या वेगळया असणे आणि पुर्नवापर आवश्यक असणे | |
| १७ | अस्तित्वात असलेल्या इमारतीत सांडपाणी वाहुन नेणाऱ्या वाहिन्या वेगळया असणे आणि पुर्नवापर आवश्यक असणे | |
| १८ | पुर्नप्रक्रियायुक्त पाण्याचा वापर पिण्याकरीता न करणे | |
| १९ | पिण्याच्या पाण्याच्या व पुर्नप्रक्रियायुक्त पाण्याच्या वाहिन्या एकमेकांना न जोडणे | |
| २० | पुर्नप्रक्रिया केलेल्या पाण्याचे मोजमाप | |
| २१ | पाणी करातुन वटाव | |
| २२ | मल जल करातुन वटाव | |
| २३ | तंटा बखेडयातील निर्णय | |
| | परिशिष्ट अ — मान्यता प्राप्त प्रयोगशाळांची यादी | |
| | परिशिष्ट ब — सांडपाणी पुर्नप्रक्रिया प्रकल्पातुन बाहेर सोडल्या जाणाऱ्या पाण्याची लक्षणे. | |

३५ ( ५ )

# नागरी स्वराज्य संस्थांकरीता उपविधी

# (सांडपाणी पुर्नवापर आणि पाणी प्रोत्साहन उपविधी)

ज्याअर्थी खाली दर्शविलेल्या कार्याचे नियमन करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| अ. | दिर्घ मुदतीचे, वारंवार लागणारे किंवा तात्पुरते सांडपाणी, व्यापारी सांडपाणी नगरपालिकेच्या सांडपाणी व्यवस्थेत सामावून घेणे. |
| ब. | व्यापारी सांडपाण्याच्या वेगवेगळया श्रेण्या तयार करणे जसे की नियंत्रित सांडपाणी |
| क. | विशिष्ठ कसोटयांवर ठरवण्यात आलेले रहिवासी / व्यापारी सांडपाण्याचे वर्गीकरण |
| ड. | मल जल आणि सांडपाणी यांचा पिण्याशिवाय इतर पुर्वापर करण्यापूर्वीच्या प्रक्रिया |
| इ. | प्रवाह मापके, नमुने घेणारे किंवा सांडपाण्याचा किंवा मलजलाचा दर्जा मोणारे इतर उपकरणे बसविणे. |
| फ. | महानगरपालिकेच्या मलजल योजनेत सामावून घेण्यापूर्वीची वर्गीकरणानुसार सांडपाणी व मलजल यांच्यावरील प्रक्रियापूर्वता |
| ग. | थ्पण्याच्या पाण्याची व न पिण्याच्या पाण्याची नळ जोडणी वेगवेगळी करणे. |
| ह. | व्यापारी सांडपाण्याचे नमुने घेणे आणि उपविधींमधील तरतुदींचे पालन होत असल्याची खात्री करणे |
| य. | व्यापारी सांडपाण्याचे उमपा योजनेत स्विकार करणे अथवा नाकारणे. |
| ज. | सांडपाणी वाहुन नेण्याचा, प्रक्रिया करण्याचा आणि विल्हेवाट लावण्याचा अथवा तत्सम कामावरील प्रशासनाचा व लक्ष देण्याचा खर्च भरुन काढण्याकरीता कर लावणे. |
| ख. | व्यापारी सांडपाणी व धरगुती सांडपाणी निर्माण करणाऱ्यांसाठी सांडपाणी कमी करण्याकरीता व व्यवस्थापनाकरीता कार्यक्रम सुरु करणे. |
| ल. | थ्पण्याच्या पाण्याव्यतिरिक्त इतर कामासाठी पुर्नप्रक्रियामुक्त पाण्याच्या वापराला चालना देणे. |
| म. | पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त इतर कामासाठी पुर्नप्रक्रियायुक्त पाण्याच्या वापराबदद्ल मलजल करातुन आणि पाणी करातुन वटावाचे फायदे देणे. |

त्याअर्थी उमपा क्षेत्रात सदरचे उपविधी तयार करण्यात आले आहेत. हे आदर्श उपविधी भारतातील सर्व राज्यातील व केद्रशासीत प्रदेशातील व नागरी स्वराज्य संस्थांना शिफारशीचे काम करतील

३५ ( ६ )

१.    व्याख्या –

१ : या उपविधीत

'प्रवेश बिंदू' म्हणजे ज्या ठिकाणाहुन खाजगी मलजल वाहिनीला निरिक्षणाकरीता (नमुना घेणे किंवा मोजमाप करणे या सहित), स्वच्छतेकरीता किंवा दुरुस्तीकरीता प्रवेश मिळेल अशी जागा आणि त्यांस महानगरपालिकेच्या प्रमाणकांच्या आवश्यकता असेल त्यालाच सोडण्यापूर्वीचे द्वार असे म्हटले जाईल.

'मान्यता' म्हणजे उमपाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यातर्फे लेखी मान्यता.

'प्राधिकृत अधिकारी' म्हणजे उमपाच्या आयुक्तांकडुन हया उपविधीखाली काम करण्यासाठी अधिकार देऊन नेमणूक केलेला अधिकारी.

'वैशिष्टय' म्हणजे कोणत्याही रहिवासी अथवा व्यापारी साधण्याचे भौतिक किंवा रासायनिक वैशिष्टय.

'अटींसह व्यापारी सांडपाणी' म्हणजे असे व्यापारी सांडपाणी की ज्यात नियंत्रित सांडपाण्याच्या वैशिष्टयांपेक्षा जास्त वैशिष्ट्य असतील परंतु नियमांनी अथवा कायदयांनी मनाई केलेल्या वैशिष्टयांपेक्षा त्यांचे प्रमाण जास्त नसेल.

'सोडन देण्याचा व्यवस्थापन आराखडा' म्हणजे ताब्यातील सांडपाणी महानगरपालिकेच्या घाणपाणी वाहुन नेणाऱ्या यंत्रणेत सांडपाणी सोडण्याचा, सनियंत्रण करण्याचा, प्रक्षेपित करण्याचा आणि नियंत्रित करण्याचा आराखडा.

'सोडणे किंवा धाण सोडणे' म्हणजे सांडपाणी व्यवस्थेमध्ये व्यापारी सयंत्रातुन किंवा इतर कोणत्याही जागेतुन सांडपाणी सोडण्याची व्यवस्था.

'खंडीत करणे' म्हणजे घाणपाण्याच्या यंत्रणेस सांडपाणी सोडणारी जोडणी भौतिकरित्या तोडुन टाकणे किंवा सिलबंद करणे.

'घरगुती सांडपाणी ' म्हणजे असे सांडपाणी की जे नेहमी रहिवाश्यासाठी वापरल्या जाणाऱ्या जागेतुन व रहिवासी कार्य व कामातुन निर्माण होते असे किंवा रहिवासी मानकांमध्ये मोडणारे कोणत्याही जागेतुन सोडलेले सांडपाणी.

'सांडपाणी' म्हणजे स्वयंपाकघराची मोरी, अंघोळीचे टब, शॉवर आणि कपडे धुण्यातुन निर्माण होणारे सांडपाणी.

'व्यापारी जागा' म्हणजे कोणताही धंदा देवघेव, व्यापार व्यवसाय, शिक्षण, संशोधन किंवा उद्योग याकरीता वापरले जाणारे, भविष्यात वापरले जाईल अशी (मग त्यात फायदा असो किंवा नसो) जागा.

'व्यापारी घाण' म्हणजे व्यापारी जागांमधुन द्रव स्वरुपात सोडण्यात आलेली त्यात तरंगते पदार्थ असलेली किंवा नसलेली धंदा देवघेव, व्यापार व्यवसाय, शिक्षण, संशोधन किंवा उद्योग यांतुन किंवा तत्सम कामातुन निर्माण होणारी व महापालिकेच्या यंत्रणेत सोडली जाणारी कोणतीही घाण.

३५ ( ७ )

‘निरिक्षक’ म्हणजे महानगरपालिका आयुक्तांनी या उपविधीमधील कामाकरीता लेखी आदेश देऊन नेमलेली कोणतीही व्यक्ती.

‘आयएसओ ५६६७’ म्हणजे आंतरराष्ट्रीय मानक आयएसओ ५६६७ : १९९४ पाण्याचे गुण नमुने घेणे याबाबतचे नविनतम, संपूर्ण व सर्व सुधारणासह असलेले

भाग १ : १९८० नमुने घेण्याच्या कामाचे संकल्पन करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे

भाग २ : १९९१ नमुने घेण्याच्या तंत्राबदद्लची मार्गदर्शक तत्वे

भाग ३ : १९९४ नमुने सांभाळणे आणि हाताळणी याबाबतची मार्गदर्शक तत्वे

भाग १० : १९९२ सांडपाण्याचे नमुने घेण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे.

आयएसओ टीआर ९८२४ म्हणजे आंतरराष्ट्रिय मानक आयएसओ टीआर ९८२४ : उघडया गटारतुन वाहणाऱ्या द्रवाची मोजणी बाबतचे नविनतम, संपूर्ण व सर्व सुधारणांसह असलेले.

भाग १ : १९९० बंद नळीतील खुल्या पृष्ठभागावरील ओघाचे मोजमाप — पध्दती

भाग २ : १९९० बंद नळीतील खुल्या पृष्ठभागावरील ओघाचे मोजमाप — उपकरणे

‘प्रयोगशाळा’ म्हणजे घाणपाणी किंवा व्यापारी घाण यांचे नमुने तपासण्यासाठी परवानगी मिळालेली अभिकरणे.

‘परवाना’ म्हणजे या उपविधीनुसार महापालिकेच्या आयुक्तांनी व्यापारी सांडपाण्याचे किंवा घाणपाण्यापासुन मुक्त होण्यासाठी लेखी स्वरुपात वार्षिक परवाना देणे अथवा नुतनीकरण करणे.

‘एकुण वनज मर्यादा’ म्हणजे चोविस तासातील एका प्रवेश बिंदुतुन सोडण्यात आलेले किंवा एका जागेतुन सर्व प्रवेश बिंदूतुन सोडण्यात आलेले एकुण घाणपाणी मोजले असता त्यातील कोणत्याही वैशिष्टयाचे एकूण वजन.

‘कमाल संतृप्तता’ म्हणजे सांडपाण्यातील कोणत्याही वैशिष्ट्याची सर्वोच्च संतृप्ता जी प्रमाणाबहेर प्रमाणपेक्षा जास्त असणार नाही.

३५ ( ८ )

'भोगवटादार' म्हणजे व्यापारी सयंत्र किंवा गृहनिर्माण प्रकल्पाच्या किंवा इतर कोणत्याही जागेच्याबाबतीत उद्योग अथवा जागेच्या कोणत्याही तुकडयाचा मालक, भाडेकरु अथवा भाडेपटट्‌ादार या नात्याने उपयोग करणारा.

'व्यक्तीत' महामंडळ आणि व्यक्तींचा समुह मग तो नियम असो किंवा नसो आणि भागीदारी संस्था यांचा समावेश होतो.

'सोडण्याचा बिंदु' म्हणजे असा भौतिक बिंदु की ज्या ठिकाणी व्यापारी घाण अथवा घाणपाणी मलजल वाहिन्या यंत्रणेत प्रवेश करते.

'पूर्व प्रक्रिया' म्हणजे घाणपाणी यंत्रणेत सोडण्यापूर्वी कोणत्याही व्यापारी घाणीतील वैशिष्टये कमी करण्यासाठी करण्यात आलेली कोणतीही क्रिया.

'नोटीस' म्हणजे कोणत्याही मालमत्तेच्या भोगवटादाराला त्या जागेबदद्‌ल पुर्नप्रक्रिया सोईबदद्‌ल आयुक्त किंवा त्याचे प्राधिकृत अधिकारी यांनी दिलेले लेखी सुचना.

'जागा' म्हणजे स्वतंत्र शिर्षकाद्वारे नावे केल्या गेलेली किंवा करता येईल अशा अणि ज्यकरीता स्वतंत्र इमारतीचा नकाशा तयार केला असेल किंवा करता येईल अशा मालमत्ता किंवा अशा इमारती की ज्या स्वतंत्र एक म्हणून भाडयाने किंवा भाडेपटट्‌याने किंवा उलट भाडयाने दिल्या गेल्या आहेत. ज्यांच्या करीता स्वंत्र शिर्षक उपलब्ध आहे किंवा अशा जमिनी की ज्या विशिष्ट उपयोगासाठी असलेल्या सार्वजनिक मालकीच्या किंवा महानगरपालिकांच्या कराकरीता वेगवेगळया निर्धारीत केलेल्या आहेत आणि त्या इमारतीतील स्वतंत्र एकक आहेत.

'खाजगी मलजल प्रणाली' म्हणजे नगरपालिकेच्या मलजल यंत्रणा आणि जागा यांच्यामधील भाग 'सार्वजनिक काली अधिसूचित' म्हणजे उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील वितरीत होणाऱ्या कोणत्याही वर्तमानपत्रात किमान एकवेळा प्रसिध्द झालेली किंवा तातडीच्या वेळी जास्तीत जास्त शक्य असेल अशा व्यवहार्य पध्दतीने सुचित केली गेलेली.

'मलजल पाणी' म्हणजे समुद्र तटीय पाणी किंवा असे नैसर्गिक पाणी प्रवाह की ज्यात प्रक्रिया केलेले घाण पाणी सामावले आहे.

'मलजल प्रक्रिया यंत्रणा' म्हणजे सर्व प्रकारच्या मलजल वाहिन्या, संबंधित जोड वस्तु, उच्चंदन केद्रे, साठवणीच्या टाक्या, मलजल प्रक्रिया केंद्र व सयंत्रे, समुद्रात सोडण्याच्या जागा व नळया आणि तत्सम संबंधी सर्व बांधकामे ज्यांची मालकी स्थानिक स्वराज्य संस्थेंकडे आहे

३५ ( ९ )

अाणि ज्यांचा उपयोग मलजल स्विकारणे, प्रक्रिया करणे आणि विल्हेवाट लावणे याकरीता केला जातो. यालाच घाणपाण्याची यंत्रणा असेही म्हटले जाईल.

'पाणी आणि घाणपाणी तपासण्याच्या मानक पध्दती' म्हणजू प्रदुषण नियंत्रण मंडळाने प्रसिध्द केलेली संपूर्ण व सर्व सुधारणांसह आणि पुरवण्यांसह ताजी आवृत्ती.

'पावसाळी पाणी' म्हणजे पावसापासुन निर्माण झालेले जमिनीवरुन वाहृन जाणारे सर्व पाणी.

'तात्पुरते सोडणे' म्हणजे थोडया काळाकरीता किंवा मधुन मधुन कमी वेळाकरीता सोडण्यात आलेला प्रवाह आणि त्यात चालु परवानगीच्या अधिन राहुन कोणत्याही जागेतुन असाधारणपणे सोडले जाणारे अत्यंत छोटया काळाचे प्रवाह देखील मोडतात. तसेच यात टॅकरद्वारे सोडलेल्या घाणपाण्याचा समावेश होतो.

'शहरी स्थानिक प्राधिकरण' म्हणजे भारताच्या राज्य घटनेतील २४३ क्यु या अनुच्छेदानुसार असलेली स्थानिक महानगरपालिकेचे शहर पालिका, प्रादेशिक पालिका किंवा काही शहरांची एकत्रित पालिका अथवा प्राधिकरण.

'घाण' म्हणजे तरंगणारे पदार्थ किंवा विरघळलेले पदार्थ असणारे कोणतेही पाणी. रहिवासी घरातील सांडपाणी किंवा द्रव घाण आणि त्यात या उपविधींपुरता मलजलाचाही समावेश होतो.

'घाण कमी करणे' म्हणजे कोणत्याही उद्योग किंवा व्यापराशी संबंधित जागेवर निर्माण होणाऱ्या घाणीतील विषारीपणा कमी करण्याच्या किंवा काढुन टाकण्याच्या उदद्‍शाने केलेले व उपयोगात आणलेले सर्व प्रयत्न.

'घाणपाण्याची यंत्रणा' म्हणजे सर्व प्रकारच्या मलजल वाहिन्या, संबंधित जोड वस्तु, उच्चंदन केद्रे, साठवणीच्या टाक्या मलजल प्रक्रिया केंद्र व सयंत्रे, समुद्रात सोडण्याच्या

जागा व नळया आणि तत्सम संबंधी सर्व  बांधकामे ज्यांची मालकी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे आहे आणि ज्यांचा उपयोग मलजल स्विकारणे, प्रक्रिया करणे आणि विल्हेवाट लावणे याकरीता केला जातो. यालाच मलजल प्रक्रिया यंत्रणा असेही म्हटले जाईल.

‘परिमंडळ’ म्हणजे स्वतंत्र घाणपाणी किंवा मलजल प्रक्रिया सयंत्र असलेला शहरातील घाणपाणी ग्रहण करणारे क्षेत्र.

महापौर

उल्हासनगर महानगरपालिका

३५ ( १० )

# उपविभाग अ : सांडपाणी पुर्नवापराचे उपविधी

## १. उपविधींची प्रयोजता

१.१ हे उपविधी सर्व गृहनिर्माण रहिवासी आणि व्यापारी जागांना जर त्यात खालील वर्गात मोडत असतील तर लागु होतील.

१.२

वर्ग १ : ज्यांच्या भुखंडाचे क्षेत्रफळ २००० वर्ग मीटरपेक्षा जास्त आहे.

वर्ग २ : ज्यांचा पाण्याचा वाटा दररोज ६०००० लिटरपेक्षा जास्त आहे. जर एखादा भोगवटादार, मालक, सहकारी गृहनिर्माण संस्था यांचेकडे अथवा त्यांचे नांवे एकापेक्षा जास्त शुध्द पाण्याच्या नळजोडण्या असतील तर त्याच्याकडील सर्व जोडण्यावरील पाण्याचा वापर या उपविधींच्या प्रयोजनाकरीता लक्षात घेतला जाईल.

वर्ग ३ : अशा जागा त्यात ८० पेक्षा जास्त निवासी अथवा इतर कोणत्याही उपयोगात येणारी एकके आहेत.

## २. सांडपाणी सोडणे

२.१ कोणत्याही व्यापारी संयत्राच्या मालकाने किंवा भोगवटादाराने किंवा कोणत्याही जागेच्या मालकाने अथवा भोगवटादाराने महापालिकेच्या मलजल यंत्रणेतच सांडपाणी सोडावे तसेच इतर कोणत्याही व्यक्तिला त्याच्या सांडपाणी सयंत्रात किंवा जागेत इतरांचे सांडपाणी सोडण्याची अनुमती दयावी.

२.२ महानगरपालिकेच्या मलजल यंत्रणेला धोका होणार नाही फक्त अशा परिमाणाचे गुणांचे व पध्दतीने मलजल यंत्रणेत, मलजलवाहिन्यात किंवा प्रक्रिया प्रकल्पात सोडता येईल आणि कोणत्याही परिस्थितीतज महापालिकेकडून घेतलेलया शुध्द पाण्यापेक्षा जास्त परिमाण इतके सोडता येणार नाही.

२.३ ज्याच्याकडे या उपविधीनुसार विधी ग्राहय परवानगी आहे. केवळ अशाच भोगवटादारांना महानगरपालिकेच्या मलजल वाहिन्यांना जोडण्या देता येतील आणि त्यांनाच सांडपाणी पुर्नप्रक्रिया प्रकल्पातुन मिळणारे लाभ घेता येतील.

२.४ घाण वासाचा त्रास किंवा सार्वजनिक धोका होईल किंवा या उपविधीचा अनुपालन होणार नाही अशा पध्दतीने वापर करता येणार नाही.

२.५ पुर्नप्रक्रिया केलेले पाणी पिण्याचा व ज्यासाठी संपर्क येईल अशा बाबींना सोडुन इतर बबींसाठीच वापरता येईल आणि महापालिकेच्या घाणपाणी किंवा मलजल यंत्रणेत सोडता येणार नाही. तथापिपुर्नप्रक्रिया सयंत्रातुन बाहेर पडणारी घाण जर ते गुणांनी स्विकारण्याजोगे असेल तर उमपाच्या मलजल प्रक्रियेला जोडता येईल.

## ३. उपविधींची सक्ती

३.१ सध्या अस्तित्वात असलेल्या मालमत्तांना विशिष्ट वेळेत सांडपाणी पुर्नवापराकरीता महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी नोटीस देतील.

३.२ पुर्नविकास चालू असलेल्या, विचारार्थ असलेल्या आणि बांधकामांचा हेतु असलेल्या मालमत्ताच्या भोगवटादार, विकासक अीिवा बांधकाम करणाऱ्यांनी त्याच्या प्राधिकृत समंत्रकांकडून महानगरपालिका आयुक्तांकडे सोडुन देण्याच्या व्यवस्थापन आराखडयासह अर्ज करावा. त्यात स्वच्छ पाण्याची मागणी आणि सांडपाणी नगरपालिकेच्या मलजल वाहिनीस जोडण्याच्या परवानगी मागण्याचा उल्लेख असावा.

३५ ( ११ )

## ४. परवानगी देणे

४.१ सांडपाणी पुर्नप्रक्रिया करण्याची आणि या उपविधींना जोडलेल्या अनुसुचितील अटींची पूर्तता केली तरच कोणत्याही जागेला वाणिज्य घाण किंवा घाम महापालिका मलजल यंत्रणेत सोडण्याची परवानगी दिली जाईल.

## ५. घाण पाण्याची परिक्षा आणि त्याचे अहवाल

५.१ परवाना मिळविण्याकरीता व्यापारी सयंत्रक किंवा जागांचे मालक महापालिका आयुक्त किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे वर्षातुन एकदा त्यांच्या सयंत्रातुन किंवा जागेतुन सोडल्या जाणाऱ्या व्याापारी घाणीच्या परिक्षेचे अहवाल सादर करतील.

५.२ उपविधी चार मधील तरतुदींना बाधा न येता ज्या जागेतील भोगवटादारांना परवाना हवा आहे किंवा ज्या भोगवटादारांकडे नियंत्रित सयंत्र आहे. ते ज्या वेळी महानगरपालिका आयुक्त त्यांच्याकडे सोडल्या जाणाऱ्या व्यापारी घाणीचा तपासणी अहवाल मागतील त्यावेळी तो भोगवटादाराने उपलब्ध करुन दिला पाहिजे.

५.३ घाणीची परिक्षा अाणि अहवालाचे सादरीकरण हे महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी यांनी आखुन दिलेल्या पध्दतीनुसार व अटीशर्तीनुसार झाले पाहिजे.

या उपविधीनुसार महानगरपालिका आयुक्त त्यांचे अभिकर्ता अथवा प्राधिकृत अधिकारी यांचा सयंत्र किंवा जागेला सर्व वाजवी वेळेत भेट देण्याच्या अधिकारावर गदा येत नाही.

## ६. तपासण्यासाठी नोटीस देणे

६.१ परिस्थितीवरुन आवश्यकता आहे अशी महानगरपालिका आयुक्तांची खात्री झाल्यास उपविधी पाच नुसार व्यापारी घाणीचे किंवा घाणीचे तपासणी करण्याचे आदेश देऊ शकतील आणि त`लेखी नोटीसेद्वारा सयंत्र किंवा जागेचे भोगवटादार यांना अशा परिक्षाबदद्ल खर्च देण्यास आदेशित करु शकते.

६.२ नियंत्रित सयंत्र असलेला कोणताही भोगवटादारास अशी उपविधी पाच नुसार नोटीस प्रापत झाल्यास उपविधी चार मध्ये दर्शविल्याप्रमाणे अनुपालन करेल.

## ७. सांडपाणी पुर्नप्रक्रिया प्रकल्प चालवण्याची परवानगी देणे

७.१ सांडपाण्याच्या परिक्षेचे अहवाल प्राप्त झाल्यावरुन किंवा महानगरपालिका आयुक्तांच्या सांगण्यावरुन केलेल्या परिक्षांचे अहवाल लक्षात घेऊन सांडपाणी पुर्नप्रक्रिया प्रकल्प आवश्यक दर्जाची तडी पार करीता आहे असे निदर्शनास आले तर ते सयंत्र चालवण्याची परवानगी देऊ शकेल.

७.२ प्रत्येक भोगवटादाराने परवानगी दर्शविल्याप्रमाणे सयंत्र चालविले पाहिजे.

३५ ( १२ )

## ८. सांडपाणी वेगळे करणे

८.१ व्यापारी सयंत्रातुन किंवा जागातुन सांडासउ मधुन येणारे पाणी न्हाणीघर आणि स्वयंपाकघराच्या सांडपाण्यापासुन वेगळे केले जाईल त्याकरीता दोन वेगवेग्ळया नळयांचा उपयोग केला जाईल. सांडपाणी विशेषउ सयंत्र वापरुन पुर्नवापर योग्य केले जाईल. असे पर्नवापर योग्य पाणी स्वतंत्र टाकीत साठविले जाईल आणि हिरव्या रंगाच्या नळातुन ते पुरविले जाईल. त्याचा वापर पिण्याव्यतिरिक्त केला जाईल. अशा पुर्नवापरद योग्य पाण्याची वर्षातुन किमान एकदा तपासणी केली जाईल आणि त्याचा अहवाल महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी यांना मागणी केल्यानंतर पुरविली जाईल.

## ९. अटींसह घाणपाणी सोडण्याची परवानगी देणे.

९.१ अटींवर आधारीत स्वयंत्रातुन घाणपाणी सोडण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण मंडळ महामंडळाच्या मानकांचे उल्लंघन करीत नसल्यास पुर्नप्रक्रिया व पुर्नवापर यासाठी अटी व शर्ती टाकुन परवानगी देता येईल.

## १०. बदलांची नोटीस देणे बंधनकारक असणे.

१०.१ घाणपाण्याच्या दर्जात अथवा स्वच्छ पाण्याच्या मागणी कोणताही बदल झाल्यास व त्या बदलामुळे दिलेल्या परवान्यातील बाबींचे उल्लंघन होत असल्यास किंवा सांडपाण्याच्या मोजमापात बदल होत असल्यास भोगवटादारानॆ असा बदल तात्काळ महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी यांच्या निदर्शनास आणुन दिला पाहिजे.

## ११. प्राधिकाऱ्यांना परवाना किंवा नोटीसीतील अटीमध्ये बदल करण्याचे अधिकार

११.१ महानगरपालिका आयकुक्त किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी ज्यांनी या उपविधीनुसार असलेल्या अधिकाराचा वापर करुन लेखी स्वरुपात एखादा परवाना किंवा नोटीस दिली असल्यास सयंत्राच्या निरिक्षणानंतर जागेची पहाणी केल्यानंतर किंवा परिक्षणाच अहवालावरुन त्या रदद् करण्याचे, बदलण्याचे किंवा आणखी अटीशर्ती लागु करण्याचे अधिकार असतात.

## १२. प्राधिकाऱ्यांच्या कामात लुडबुड

१२.१ महानगरपालिकांचे याअुक्त किंवा त्यांचे अभिकर्ता किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी यांच्या कोणत्याही कामात लुडबुड करण्यास सक्त मनाई आहे.

## १३. परवानगी अथवा नोटीस पोहचवणे

१३.१ ज्या व्यक्तीला नोटीस अथवा परवानगी दयायची आहे त्या व्यक्तीच्या हाती देऊन पोच मिळविल्यास किंवा त्या व्यक्तीच्या रहिवासाच्या किंवा कामाच्या किंवा माहित असलेल्या जागेवर देऊन पोच मिळविल्यास किंवा त्या व्यक्तीच्या कुटूंबातील प्रौढ व्यक्ती अथवा प्रौढ कर्मचाऱ्याच्या हात देऊन पोच मिळविल्यास किंवा नोदणीकृत डाकेने रहिवासाच्या किंवा सामान्यपणे कामाच्या किंवा शवटचा माहित असलेल्या

पत्त्यावर पाठविल्यास या                    उपविधीनुसार दिलेली नोटीस कायदेशीररित्या पोहोचली आहे असे मानले जाईल. अशा कोणत्याही पध्दतीने नोटीस देणे शक्य नसल्यास संबंधित जागेवर सहज दिसण्याजोग्या ठिकाणी चिकटवल्यास ती नोटीस अथवा परवानगी कायदेशीर रित्या पोहोचवण्यता आली आहे असे समजले जाईल.

३५ ( १३ )

**१४ दुरुस्तीचे कृत्य**

१४.१ या उपविधीचा जो कोणी भंग करील त्याला ज्या दिवशी असे उल्लंघन लक्षात येईल त्यादिवशी रु. ५०००/— एवढा दंड केला जाईल आणि जर असा भंगउ चालुच ठेवेल तर प्रति दिवशी रु. १००/— असा दंड दुरुस्तीचे कृत्य म्हणून महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी यांचेकडुन लेखी नोटीस पोहचवुन लावला जाईल.

१४.२ उमपाच्या निरिक्षकाने किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याने परिक्षण अहवाल तपासल्यापासुन आणि / किंवा जागेची व सयंत्राची भौतिक तपासणी केल्यापासुन सांगितलेल्या बाबी सयंत्र चालवणाऱ्यांनी लक्षात घेतल्या नाहीत तर प्रती दिन रु. ५००/— एवढा दंड केला जाईल आणि / किंवा स्वच्छ पाण्याची नळजोडणी खंडीत केली जाईल.

**१५. अधिकाऱ्यांना प्राधिकृत करणे.**

१५.१ या उपविधीनुसार वेगवेगळी कामे व कर्तव्ये करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त त्याच्या अधिकाऱ्यांना, निरिक्षकांना व इतर कोणालाही आवश्यक ते अधिकार प्रदान करु शकतील.

महापौर
उल्हासनगर महानगरपालिका

# उपविभाग ब : पाणी प्रोत्साहन उपविधी

१६. सदर इमारतीत सांडपाणी वाहुन नेणाऱ्या वाहिन्या वेगळया असणे आणि पुर्नवापर आवश्यक असणे.

१६.१ प्रत्येक विकासक आणि बांधकाम करणाऱ्यास नविन इमारत बांधताना व त्या विकण्यापूर्वी सांडपाणी पुर्नप्रक्रिया सयंत्र पाण्याची साठवण आणि पुर्नवापर याकरीता वेगवेगळया नळया जोडणे बंधनकारक असणे.

**१७. अस्तित्वात असलेल्या इमारतीत सांडपाणी वाहुन नेणाऱ्या वाहिन्या वेगळया असणे आणि पुर्नवापर आवश्यक असणे.**

१७.१ प्रत्येक अस्तित्वात असलेल्या इमारती किंवा रहिवासी जागेत पाणी पुर्नप्रक्रिया प्रकल्प लावणे व त्यासाठी आवश्यक असलेली सांडपाण्याची व पुर्नवापर करण्याच्या पाण्याची नळ कारागिरी करणे आवश्यक असेल.

**१८. पुर्नप्रक्रियायुक्त पाण्याचा वापर पिण्याकरीता न करणे.**

१८.१ पुर्नप्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर फक्त पिण्याव्यतिरिक्त इतर कामांसाठी हिरव्या रंगाच्या नळातुन पुरवठा करुन केला जाईल. संपर्क येणार नाही असे संडास स्वच्छ करणे, झाडांना किंवा झुडपांना ठिबकसिंचन पध्दतीने पाणी देणे, जमिनी खालुन हिरवळीला पाणी देणे, फुजन स्तराची पातळी वाढविणे आणि रस्ते किंवा फरशी धुणे याकरीताच केला जाईल.

**१९. पिण्याच्या पाण्याच्या व पुर्नप्रक्रियायुक्त पाण्याच्या वाहिन्या एकमेकांना न जोडणे.**

१९.१ पिण्याचे पाणी व पिण्या योग्य नसलेले पाणी यांच्या दोन वेगवेगळया वाहिन्यामध्ये कोणत्याही बिंदुत एकत्र येता कामा नये. पुर्नप्रक्रिया केलेल्या पाण्याची यंत्रण पिण्याच्या पाण्याच्या यंत्रणेपेक्षा कमी दाबावर चालविण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत दोन्ही प्रकारचे पाणी एकत्र येणार नाही यासाठी दक्षता घेतली पाहिजे आणि पिण्याच्या पाण्याची टाकी वेळोवेळी स्वच्छ केली जाईल याची काळजी घेतली पाहिजे.

**२०. पुर्नप्रक्रिया केलेल्या पाण्याचे मोजमाप**

२०.१ पुर्नप्रक्रिया केलेले पाणी स्वतंत्र साठवणीच्या टाकीत साठविण्यापूर्वी पाण्याच्या किंवा ओघाच्या मिटरद्वारे मोजले पाहिजे. असे पाण्याचे मीटर किंवा ओघाचे मीटर उमपातर्फे तपासुन सिलबंद केले जाईल. अशा सिलबंद मिटरची प्रतिमहा वाचणी भोगवटादाराने केली पाहिजे आणि जेव्हा मागणी केली जाईल तेव्हा त्याच्या नोंदी उपलब्ध करुन दिल्या पाहिजे.

२१. पाणी करातुन वटाव

२१.१ जेव्हा एखाद्या संरचनेत किंवाप रहिवासी इमारतीत वापरल्या जाणाऱ्या पाण्यापैकी पंचवीस टक्के पेक्षा जास्त पाणी पुर्नप्रक्रिया केलेल्या पाण्यापैकी असे निदर्शनास येईल तेव्हा अशा इमारतीस पाणी करातुन पंचवीस टक्के वटाव देण्यात



येईल त्यासाठी त्यांनी शुध्द पाण्याची मागणी पंचवीस टक्के कमी करणे आवश्यक असेल या वटावाचा दरवर्षी आढाव घेतला जाईल.

२२. मलजल करातुन वटाव

२२.१ जेव्हा महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी प्रमाणित करतील की एखाद्या इमारत किंवा रहिवासी संरचनेतुन पिण्याच्या पाण्याचा वापर पंचवीस टक्क्यांनी कमी झाला असेल तेव्हा त्यांना मलजल करातुन त्या काळाकरीता पंचवीस टक्के वटाव मिळण्यास पात्र असतील.

२३. तंटा बखेडयातील निर्णय

२३.१ या उपविधीच्या सक्ती करताना निमाण झालेल्या सर्व तंटा बखेडयांना महानगरपालिका आयुक्तांकडे संदर्भित केले जाईल. ज्यामध्ये महानगरपालिका आयुक्त त्यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या विचारविमर्शउ घेऊन सोडवण्याचा प्रयत्न करतील आणि त्याप्रमाणे भोगवटादार विकासक किंवा बांधकाम करतील यांना कळवतील. महानगरपालिका आयुक्तांचा निर्णय शेवटचा आणि सर्वांना बंधनकारक असेल.

महापौर
उल्हासनगर महानगरपालिका

..३६..

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १३** :— ''महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानात'' भाग घेण्यास मंजुरी देणे.

---

<u>महापालिका सचिव :—</u>पास? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १३**:— ''महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानात'' भाग घेण्यास मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

*वर्ष २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील ४२.४ टक्के लोकसंख्या सध्या नागरी भागात रहात असुन पुढील २० वर्षात सदर प्रमाण ६० टक्क्यांच्यावर जाण्याची शक्यता आहे. देशातील सर्वाधित नागरी लोकसंख्या असलेल्या आणि नागरिकरणाचा वेग देखील सर्वाधिक असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचा समावेश आहे. राज्यातील नागरी भागांचा नियोजनबध्द पध्दतीने विकास करणे आवश्यक असुन नियोजनबध्द विकासाच्या अभावी शहरांमध्ये झोपडपट्टयांची वाढ, बेरोजगारी, दारिद्रय, आरोग्य विषयक समस्या तसेच गुन्हेगारीमध्ये वाढ इ.प्रश्न निर्माण होऊ शकतात. मात्र नागरी भागाच्या विकासासाठी योग्य प्रकारे प्रयत्न केल्यास शहरांचा नियोजनबध्द विकास होऊन जनतेच्या राहणीमानाचा दर्जा उंचावु शकतो व नागरिकांना योग्य संधी उपलब्ध होऊन दरडोई उत्पन्नात तसेच राष्ट्रीय सकल उत्पन्नात वाढ होवु शकते. सध्या शहरातील काही शहरांमध्ये पायाभुत सुविधा निर्माण करण्यासाठी केंद्र शासनाकडुन जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान राबविण्यात येत असुन त्याच धर्तीवर राज्यातील नागरी भागांच्या नियोजनबध्द विकासाकरीता महाराष्ट्र शासनाने ''महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान'' राबविण्याचा निर्णय घेतला आहे.*

*सदर महाअभियानाची उद्‌दीष्टे, व्याप्ती, वित्तीय नियोजन, प्रकल्पांकरीता अनुदान व कर्ज उपलब्ध करुन देण्याची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे आहेत.*

*०२) <u>महाअभियानाची उद्‌दीष्टे</u> :—*

*राज्यातील नागरी भागात शासनाने विहीत केलेल्या मानकांप्रमाणे विविध मुलभुत नागरी सुविधा पुरविणे आणि तेथे शहराच्या दर्जाप्रमाणे शैक्षणिक व आरोग्य विषयक पायाभुत सुविधांची निर्मिती करणे तसेच शहराच्या सामाजिक सुविधा व सौंदर्य आकर्षणामध्ये वृध्दी करणे ही ''महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाची'' प्रमुख उद्‌दीष्टे आहेत.*

*सदर महाअभियाना अंतर्गत राज्यातील नागरी भागात खालील प्रकारच्या पायाभुत सुविधांचा विकास करण्यावर व त्यात श्रेणीवाढ करण्यावर भर देण्यात येईल.*

| *अ.क्र.* | *नागरी पायाभुत सुविधा* | *मंत्रालयीन विभाग* | प्राथम्य कमांक |
|---|---|---|---|
| *१* | *<u>नगरी दळणवळण साधनांचा विकास</u> :— याअंतर्गत नागरी रस्ते व पुल, उड्डाणपुल त्वैध्न्ठे पर्जन्य जलवाहीन्या, नागरी परिवहन व्यवस्था, वाहतुक नियंत्रण व्यवस्था (ज्तांपिबैपहदंससपदह ैलेजमउ) वाहनतळ इत्यादी विकसित करण्यासंबंधी प्रकल्प हाती घेण्यात येतील.* | *<u>संबंधित विभाग</u> नगर विकास विभाग* | *I* |
| *२* | *<u>घनकचरा व्यवस्थापन</u> :— याअंतर्गत नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० च्या अनुषंगाने आवश्यक पायाभुत सुविधा विकसित करणे व इतर उपाययोजना करणे यावर भर देण्यात येईल.* | *<u>संबंधित विभाग</u> नगर विकास विभाग* | *I* |
| *३* | *नगरी रस्त्यावरील पथदिव्यामध्ये ऊर्जा बचतीच्या योजना राबविणे तसेच नागरी भागात सौरऊर्जेवर* | *<u>संबंधित विभाग</u> नगर विकास विभाग* | *I* |

| | | | |
|---|---|---|---|
| | आधारित पथदिवे बसविणे. | | |
| ४ | नगरी भागात विहीत मानकानुसार सामाजिक सोयी व सुविधांचा विकास करणे. | संबंधित विभाग<br>नगर विकास विभाग | II |

--37--

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | नगरी तिर्थक्षेत्रांचा सुनियोजित विकास करणे :— या अंतर्गत राज्यातील नागरी भागातील प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या परिसरात व सभोवती परिशिष्ट—अ मध्ये नमुद केल्यानुसार सार्वजनिक नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यावर भर देण्यात येईल. | संबंधित विभाग<br>नगर विकास विभाग | III |
| ६ | थारी स्थानाचा सुनियोजित विकास करणे :— याअंतर्गत ज्या गिरीस्थानांचा सुनियोजित विकास साधण्यासाठी उपाययोजना हाती घेता येतील त्यांचा तपशिल परिशिष्ट—ब मध्ये देण्यात आला आहे. | संबंधित विभाग<br>नगर विकास विभाग | III |
| ७ | नगरी भागातील सार्वजनिक पुरातन वास्तुंचे जतन तसेच नागरी भागात उद्याने, तलाव, नैसिर्गिक जलस्त्रोत यांचे संवर्धन व विकास करणे :—याअंतर्गत ज्या प्रकारच्या सार्वजनिक पुरातन वस्तुंचे जतन करणे अनुज्ञेय असेल त्यांचे पात्रतेचे निकष परिशिष्ट—क मध्ये नमुद करण्यात आलेले आहेत. | संबंधित विभाग<br>नगर विकास विभाग | III |
| ८ | पाणी पुरवठा, मल:निस्सारण व नागरी स्वच्छता या क्षेत्रात शासनमान्य मानंकाप्रमाणे पायाभुत सुविधा विकसित करणे किंवा त्यांची दर्जावाढ करणे.<br>याअंतर्गत पाणी पुरवठा, मल:निस्सारण व नागरी स्वच्छता विषयक ज्या प्रकल्पांकरिता महाराष्ट्र सुजल निर्मल अभियाना अंतर्गत अनुदान उपलब्ध होऊ शकत नाही अशा नागरी प्रकल्पांचा विचार करण्यात येईल. | संबंधित विभाग<br>पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग<br><br>सहयोगी विभाग नगर विकास विभाग | I |
| ९ | शालेय शिक्षणाशी निगडीत पायाभुत सुविधांचा विकास :<br>या अंतर्गत नागरी भागात विहीत मानकानुसार शालेय शिक्षणासाठी सार्वजनिक क्षेत्रात आवश्यक पायाभुत सुविधा (उद.शाळा इमारत, वसतिगृहे, इ) निर्माण करण्याकामी उपाययोजना हाती घेण्यात येतील. | संबंधित विभाग<br>शालेय शिक्षण विभाग<br><br>संबंधित विभाग<br>नगर विकास विभाग | II |
| १० | नगरी आरोग्याशी निगडीत पायाभुत सुविधांचा विकास : यात नागरी भागात विहीत मानकानुसार सार्वजनिक क्षेत्रात आरोग्यविषयक पायाभुत सुविधा निर्माण करण्याकामी उपायायोजना हाती घेण्यात येतील. | संबंधित विभाग<br>सार्वजनिक आरोग्य विभाग<br>सहयोगी विभाग<br>नगर विकास विभाग | II |
| ११ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी आवास योजना राबवुन गलिच्छवस्ती मुक्त शहरे निर्माण करणे :<br>या अंतर्गत नागरी क्षेत्राात गलिच्छवस्त्यांचा प्रश्न सोडविण्याकरीता आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घर बांधणी कार्यक्रम हाती घेण्यात | संबंधित विभाग<br>गृहनिर्माण विभाग<br><br>सहयोगी विभाग<br>नगर विकास विभाग | I |

| | | | |
|---|---|---|---|
| | येईल. | | |
| १२ | नगरी क्षेत्रात पर्यावरणात सुधारणा घडवुन आणणे यासाठी उपायायोजना करणे :<br>या अंतर्गत नागरी क्षेत्रात प्रदुषण नियंत्रण व पर्यावरण संवर्धनाच्या उपाययोजना हाती घेण्यात येतील. | संबंधित विभाग<br>पर्यावरण विभाग<br>सहयोगी विभाग<br>नगर विकास विभाग | I |



०३. महाअभियानाची व्याप्ती :—

''महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान'' राज्यातील 'ड' वर्ग महापालिका व सर्व नगरपालिका/नगरपंचायती यांना लागु असणार आहे. परिशिष्ट १ प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेचा समावेश ''महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानात करण्यात आलेला आहे.

०४. महाअभियाना अंतर्गत शहरांचे दिर्घकालीन नियोजन :—

i) ''महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानाअंतर्गत सहभाग घेणा—या प्रत्येक नागरी क्षेत्रासाठी पुढील २० वर्षात संभाव्य विकास लक्षात घेवुन शहर विकास आराखडा (City Development Plan) तयार करणे अनिवार्य राहील. शहर विकास आराखडयात भविष्यातील गरजांच्या आधारे मुलभुत नागरी सुविधा, शैक्षणिक / आरोग्य विषयक पायाभुत सुविधा तसेच शहराच्या सामाजिक सोयींच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजनांचा अंतर्भाव असेल.

शहराचे दिर्घकालीन नियोजन करताना, विविध मुलभुत नागरी सुविधा तसेच शैक्षणिक व आरोग्य विषयक पायाभुत सुविधा कोणत्या दर्जाच्या पुरविण्यात याव्यात, यासाठी संबंधित मंत्रालयीन विभागाकडील विहीत मानके विचारात घ्यावी लागणार आहेत.

ii) सदर मानकांचे मार्गदर्शनपर परिशिष्ट उल्हासनगर महानगरपालिकेकडे उपलब्ध आहे.

iii) प्रत्येक शहराच्या शहर विकास आराखडयास संबंधित मंत्रालयीन विभागांच्या सहमतीने शासन स्तरावर नगर विकास विभागमार्फत मान्यता प्रदान करण्यात येणार आहे.

iv) ''महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियाना'' अंतर्गत शहर विकास आराखडयातील प्रकल्पांच्याच अर्थसहायासाठीचा विचार करण्यात येणार आहे. तथापि, अभियानाच्या पहिल्या वर्षी स्थानिक गरजांचा विचार करता शहर विकास आराखडा तयार होण्याची वाट न पाहता या अभियानाच्या इतर अटी /शर्तींना अधिन राहुन पाणी पुरवठा/ मल:निस्सारण/घनकचरा व्यवस्थापन या क्षेत्रातील प्रकल्पाचा अर्थ सहायासाठी विचार करता येणार आहे. मात्र अशा प्रकरणी देखील नंतर एक वर्षाच्या आत वरील प्रमाणे शहर विकास आराखडा तयार करुन शासनास सादर करणे अनिवार्य असणार आहे.

०५) महाअभियाना अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रकल्प प्रस्तावांना मंजुरी देण्याची कार्यपध्दती :—

प) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानात सहभागी होण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेत राज्य शासनाबरोबर सामंजस्याचा लेखी करार करुन शासनाने विहीत केलेल सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी कालब्ध्द कार्यक्रम मान्य करणे बंधनकारक असेल व याबाबत ठराव करणे आवश्यक असेल. सदर महाअभियाना अंतर्गत सहभागी होण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेसाठी ज्या प्रमुख सुधारणांचा अंगिकार करणे आवश्यक आहे ते पुढीलप्रमाणे :—

१) द्विनोंद लेखा पध्दतीचा अवलंब करणे.
२) महानगरपालिका/ नगरपालिका यांच्या कामकाजांचे संगणकीकरण करणे.
३) मालमत्ता कर विषयक सुधारणा.
४) उचित उपभोक्ता आकार वसुली संबंधी सुधारणा.
५) नागरी क्षेत्रातील गरीबांसाठी अर्थसंकल्पात विवक्षित निधीची तरतुद करणे.
६) नागरी क्षेत्रातील गरीबांच्या वस्त्यांना आवश्यक नागरी सुविधा पुरविणे.
७) पर्जन्यजल संचय (Rain Water Harvesting)
८) सांडपाण्याचा पुर्नवापर (Recycling and Reuse of Wase Water)
९) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात पाणी बचतीच्या उपाययोजना राबविणे.

१०) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात ऊर्जा बचतीच्या उपाययोजना राबविणे.
११) सार्वजनिक–खाजगी सहभाग (ihihih) तत्वावर आधारीत प्रकल्पाना /उपाययोजनांना चालना देणे.
१२) प्रशासकीय सुधारणा.

या व्यतिरिक्त शासन वेळोवळी इतर सुधारणांचाही अंतर्भाव या महाअभियानात आवश्कतेनुसार करेल.

ii) उल्हासनगर महापालिकेने सुधार कार्यक्रम राबविण्याबाबत ठराव करुन शासनाशी सामंजस्याचा लेखी करार केल्यानंतर शहर विकास आराखडा शासनास सादर करणे आवश्यक असेल. सदर शहर विकास आराखडा शासन स्तरावर मंजुर करण्यात येईल. त्या आधारे शहर विकास आराखडयात विविध क्षेत्रात प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प आराखडे तयार करुन शासनास सादर करावे लागतील.

iii) सविस्तर प्रकल्प आराखडे तयार करण्याची क्षमता नसलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड (MUIDCL) ही शासन प्रणित कंपनी प्रकल्प विकसित करणेकामी मदत करेल असे शासन निर्णयात नमुद केलेले आहे. मात्र अशा परिस्थितीत प्रत्यक्ष प्रकल्प विकासासाठी झालेला खर्च अधिक या खर्चाच्या २५ टक्क्यापर्यंत सेवाशुल्क डन्फ्क्स ला अदा करणे आवश्यक असेल. उल्हासनगर महानगरपालिका सविस्तर विकास/ प्रकल्प आराखडे तयार करण्यासाठी सक्षम आहे. सबब MUIDCL मार्फत मदत घेणे महानगरपालिकेच्या हिताचे ठरणार नाही. तथापि अपवादात्मक परिस्थितीत म्हणजेच काही उच्च तांत्रिक कौशल्याची गरज असणाऱ्या प्रकल्पांसाठी डन्फ्क्स ची मदत घेण्याचा पर्याय खुला ठेवणे संयुक्तिक वाटते.

--39--

iv) <u>महाअभियाना अंतर्गत प्रकल्प अहवालांच्या तांत्रिक व वित्तीय मुल्यमापनाची व्यवस्था</u> :–

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत शासनाकडे सादर करण्यात येणा–या सविस्तर प्रकल्प अहवालांचे तांत्रिक मुल्यमापन संबंधित क्षेत्रातील राज्यस्तरीय यंत्रणांमार्फत उदा : सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, इत्यादी मार्फत करण्यात येईल. सार्वजनिक खाजगी सहभागावर आधारित प्रकल्पांचे मुल्पमापन सिकॉम किंवा राज्य शासनाने यासाठी निर्देशित केलेल्या यंत्रणेमार्फत करण्यात येईल. याकरिता संबंधित मुल्यमापन यंत्रणेस प्रकल्प खर्चाच्या ०.२५ टक्के पर्यत ''मुल्यमापन फी'' अदा करावी लागेल. सदर खर्च प्रथमत: महानगरपालिकेच्या निधीतुन करावा लागेल. व प्रकल्प मंजुर करताना सदर खर्च प्रकल्पांच्या मंजुर किंमतीत अंतर्भूत करण्यात येईल.

अ) <u>महाअभियाना अंतर्गत प्रकल्प मंजुरीसाठी प्रकल्प मान्यता व संनियत्रण समिती</u> :–

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत परिच्छेद क्र.०२ मध्ये नमुद केलेल्या पायाभुत सुविधाशी निगडीत प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी खालील प्रमाणे ''प्रकल्प मान्यता व संनियंत्रण समिती'' गठीत करण्यात आलली आहे.

(अ) परिच्छेद ०२ मधील तक्त्यांतील क्र.१ते ७ येथील पायाभुत सुविधांशी निगडीत प्रकल्पांच्या मंजुरीसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

- सचिव (नगर विकास–२) – अध्यक्ष
- प्रधान सचिव (वित्त) किंवा त्यांना नामनिर्देशित केलेला उप सचिव पेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी – सदस्य
- प्रधान सचिव, नियोजन विभाग किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेला उप सचिव पेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी – सदस्य
- आयुक्त व संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय – सदस्य

व्यवस्थापकीय संचालक MUIDCL – सदस्य

- नगर विकास विभागास आवश्यक वाटतील असे अन्य अधिकारी आणि संबंधित क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती – सदस्य

(ब) परिच्छेद ०२ मधील तक्त्यातील क्र.८ ते १२ येथील विषयांशी निगडीत प्रकल्पांच्या मंजुरीसाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

- संबंधित प्रशासकीय विभागाचे सचिव/प्रधान सचिव अपर मुख्य सचिव – अध्यक्ष
- प्रधान सचिव (वित्त) किंवा त्यांना नामनिर्देशित – सदस्य

केलेला उप सचिव पेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी

- प्रधान सचिव, नियोजन विभाग किंवा त्यांनी नामनिर्देशित — सदस्य
  केलेला उप सचिव पेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी
- सचिव नगर विकास — २ — सदस्य
- आयुक्त व संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनाल — सदस्य
- व्यवस्थापकीय संचालक MUIDCL — सदस्य
- संबंधित विभागास आवश्यक वाटतील असे अन्य अधिकारी — सदस्य
  आणि संबंधित क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती.

वरील (अ) किंवा (ब) प्रमाणे प्रकल्प मान्यता व संनियंत्रण समितीने प्रकल्पास मान्यता दिल्यानंतर शासन कार्यनियमावलीनुसार सक्षम प्राधिका—याकडुन प्रकल्पास मान्यता देण्याकामी अंतिम निर्णय घेण्यात येईल.

०६) <u>महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत अनुज्ञेय अर्थसहाय</u> :—

*i*) प्रकल्प मान्यता व संनियंत्रण समितीच्या मान्यतेनंतर शासन स्तरावर प्रचलित कार्यनियमावलीनुसार अंतिम मान्यताप्राप्त प्रकल्प खालील तीन प्रकारे राबविता येतील.

(१) पुर्णत: सार्वजनिक—खाजगी सहभागातुन (Public Private Partnership तत्वावर)

(२) सार्वजनिक खाजगी सहभागातुन पुर्णत: न होण्याजोगे प्रकल्प हे वर्धनक्षम होण्यासाठी ''तुटीचा अर्थभरणा'' (Viability Gap Funding) करण्याकामी अनुदान व कर्ज मंजुर करुन

(३) सार्वजनिक—खाजगी सहभाग तत्वावर न राबविता येणा—या प्रकल्पासाठी अनुदान व कर्ज मंजुर करुन.



शहरातील प्रस्तावित प्रकल्पांच्या स्वरुपानुसार व वर्धनक्षमतेनुसार, प्रकल्प वरीलपैकी कोणत्या वित्तीय आकृतीबंधातुन /प्रकारातुन राबवायचा हे निश्चित करण्याची मान्यता असावी.

*ii*) महाअभियाना अंतर्गत शहर विकास आराखडा प्रकल्पांची अंमलबजावणी करताना सार्वजनिक, खाजगी सहभाग प्रकल्प राबविण्यास (With or Without Viability Gap) ला प्राधान्य देण्याचे शासनाचे धोरण असुन शासन धोरणानुसार सार्वजनिक खाजगी स्तरावर योजना राबविण्यासाठी मान्यता मिळावी. त्याकरिता आवश्यक मार्गदर्शक सुचना आदर्श करारनामे व निविदा अभिलेख शासनामार्फत प्रस्तुत करण्यात येणार आहेत.

*iii*) महाअभियाना अंतर्गत पायाभुत सुविधांशी निगडीत प्रकल्पांचा आकृतीबंध खालीलप्रमाणे असेल.

(अ) जे प्रकल्प पुर्णत: सार्वजनिक—खाजगी सहभाग तत्वावर राबविता येतील त्यासाठी कोणत्याही प्रकारे अर्थसहाय्याची आवश्यकता भासणार नाही.

(ब) जे प्रकल्प केवळ सार्वजनिक—खाजगी सहभाग तत्वावर पुर्णत: राबविता येणार नाहीत व ज्यांच्यासाठी काही प्रमाणात तुटींचा अर्थभरणा (Viability Gap Funding) यासाठी अर्थसहाय्य लागेल, त्यांच्यासाठी खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देय व अनुज्ञेय राहील.

| अ. क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | अनुदान (वर्धनक्षमता तफावतीच्या रकमेपैकी) | MUIDCL/MMRDA मार्फत, कमाल कर्ज मर्यादा (वर्धनक्षमता तफावतीच्या रकमेपैकी) |
|---|---|---|---|
| १ | ''ब'' व ''क'' वर्ग नगरपालिका/नगरपंचायती | ८० टक्के | २० टक्के |
| २ | ''अ'' वर्ग नगरपालिका ''ड''वर्ग महानगरपालिका | ५० टक्के | ५० टक्के |

क) सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर आधारित नसलेल्या प्रकल्पांसाठी पुढीलप्रमाणे अर्थसहाय्य देय व अनुज्ञेय राहील.

| अ.क्र | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | अनुदान (प्रकल्पांच्या मंजुर किंमतीपैकी) | MUIDCL/MMRDA मार्फत, कमाल कर्ज मर्यादा (प्रकल्पांच्या मंजुर किंमतीपैकी) |
|---|---|---|---|
| १ | ''ब'' व ''क'' वर्ग नगरपालिका/नगरपंचायती | ८० टक्के | २० टक्के |
| २ | ''अ'' वर्ग नगरपालिका ''ड''वर्ग महानगरपालिका | ५० टक्के | ५० टक्के |

वरील तक्त्यांत दर्शविलेली कर्जाची टककेवारी ही कमाल कर्जाची मर्यादा दर्शविते. संबंधित महानगरपालिकेने स्वतःच्या निधीतुन काही रक्कम मंजुर प्रकल्पावरील खर्चापोटी उपलब्ध करुन दिल्यास कर्जाचे प्रमाण त्यानुसार कमी करता येईल.

iv) महाअभियाना अंतर्गत मंजुर प्रकल्पांना मंजुर किंमतीतील कर्जाची रक्कम MMRDA कडुन प्राप्त करुन घेण्यास मंजुरी मिळावी.

०७) महाअभियाना अंतर्गत मंजुर प्रकल्पांना अनुदान व कर्ज शासनाच्या कार्यपध्दतीनुसार उपलब्ध करुन घेण्यास मान्यता मिळावी.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाच्या अटी शर्तीनुसार शहराचा विकास आराखडा तसेच सविस्तर प्रकल्प आराखडे तयार करावे लागणार आहेत. वेळेचे बंधन लक्षात घेवुन शहराचा विकास आराखडा व सविस्तर प्रकल्प आराखडे महानगरपालिकेमार्फत नियुक्त केलेल्या तांत्रिक सल्लागाराकडुन करुन घेण्यास मान्यता मिळावी.

यापुर्वी शहराचा विकास आराखडा तयार करण्यात आला असुन या कार्यक्रमात खालील योजनांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

१) एकात्मिक रस्ते विकास योजना टप्पा १ मधील अपुर्ण कामे पुर्ण करणे.
२) शहरातील रस्त्यांचे रुंदीकरण सिमेंट कॉक्रीटीकरण करुन सुधारणा करणे.
३) रेल्वे उड्डाणपुल, पादचारी पुल.
४) ट्रक टर्मिनस
५) शहरी गरीबांकरीता मुलभुत सुविधा (BSUP) अंतर्गत
६) पाणी पुरवठा योजना. (Source Development )

..४१..

७) मलःनिस्सारण योजना
८) खेमाणी नाला वळविणे.
९) वालधुनी नाला सुशोभिकरण
१०) घनकचरा व्यवस्थापन.

अनुक्रमांक १ ते १० प्रकारातील प्रकल्प '' महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान'' अंतर्गत प्रस्तावित करता येवु शकतात.

वर उल्लेख करण्यात आलेल्या योजना '' महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान'' अंतर्गत प्रस्तावित करण्यास मान्यता मिळावी. तसेच शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविणे अंतर्गत सध्या राजीव गांधी नगर, दत्तवाडी, कौशलनगर, संतोषनगर, महादेवनगर, मिनाताई ठाकरे नगर, गुलशन नगर इत्यादी ठिकाणी सर्व्हेक्षण/प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम चालु आहे. तसेच शहरातील काही प्रमुख रस्त्यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम चालु आहे. सदर प्रकल्प अभियाना अंतर्गत प्रस्तावित करण्यास मान्यता मिळावी.

याव्यतिरिक्त भविष्यात या महाअभियानाअंतर्गत मागणी व आवश्यकता लक्षात घेवुन प्रकल्प प्रस्तावित करण्यात येतील.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाच्या शासन निर्णयात नमुद अटी व शर्ती स्विकारुन या कार्यक्रमात सहभागी होण्यास महानगरपालिकेची मान्यता मिळणेस्तव सविनय सादर.

महासभा ठराव क्र: १९ दिनांक:–१२/७/२०१०

सुचकाचे नाव :– श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अ.क्र. १ ते १० प्रकल्पांकामी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानात सहभागी होण्यास व शासन निर्णयात नमुद केलेल्या अटी, शर्तीवर व शासनाने विहित केलेला कालबध्द सुधार कार्यक्रम राबविण्यासाठी खालील प्रमुख सुधारणांचा अंगिकार करणेस व शासनाशी सामंजस्याचा लेखी करार केल्यानंतर शासनाकडे शहर विकास आराखडा सादर करणेस व मंजुर करुन घेण्यास मान्यता देत आहे.

*१) द्विनोंद लेखा पध्दतीचा अवलंब करणे.*
*२) महानगरपालिका/ नगरपालिका यांच्या कामकाजांचे संगणकीकरण करणे.*
*३) मालमत्ता कर विषयक सुधारणा.*
*४) उचित उपभोक्ता आकार वसुली संबंधी सुधारणा.*
*५) नागरी क्षेत्रातील गरीबांसाठी अर्थसंकल्पात विवक्षित निधीची तरतुद करणे.*
*६) नागरी क्षेत्रातील गरीबांच्या वस्त्यांना आवश्यक नागरी सुविधा पुरविणे.*
*७) पर्जन्यजल संचय (Rain Water Harvesting)`*
*८) सांडपाण्याचा पुर्नवापर (Recycling and Reuse of Wase Water)*
*९) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात पाणी बचतीच्या उपाययोजना राबविणे.*
*१०) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात ऊर्जा बचतीच्या उपाययोजना राबविणे.*
*११) सार्वजनिक–खाजगी सहभाग (पीपीपी) तत्वावर आधारीत प्रकल्पाना /उपाययोजनांना चालना देणे.*
*१२) प्रशासकीय सुधारणा.*

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

यावेळी मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी, श्री. जमनादास पुरस्वानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

..४२..

---

⇨ **विषय क्र. १४ :–** उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी/कर्मचा-या संबंधी सेवा भरती नियमांस अतिम मंजुरी देणे.

---

<u>काही सदस्य :–</u>विषय वगळा.

<u>महापौर :–</u> सदरचा विषय वगळण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

✂ **विषय क्र. १४ :–** उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी/कर्मचा-या संबंधी सेवा भरती नियमांस अतिम मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

शासनाकडील क्र. ठामपा २००२/८२१/प्र.क्र.८६/ नवि–२३, दिनांक जुलै, २००८ रोजी प्राप्त झालेल्या परीपत्रका सोबत मॉडेल सेवा प्रवेश नियमावर आधारीत उल्हासनगर महापालिकेने प्रारूप सेवा

प्रवेश नियम (२००८) तयार केले आहेत. मा. महासभा ठराव क्र. २२, दिनांक २०/०७/२००९ अन्वये त्यास मंजूरी दिलेली आहे.

शासन परीपत्रकामध्ये नमुद केलेप्रमाणे सदरचे प्रारूप सेवा प्रवेश नियम (२००८) शासकीय राजपत्रामध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन—संकीर्ण, गुरूवार ते बुधवार, सप्टेंबर ३—९, २००९/भाद्र १२—१८, शके १९३१ अन्वये प्रसिध्द करून २ महिन्यांच्या कालावधीमध्ये त्यावर हरकती व सुचना मागविणेत आलेल्या होत्या. विहित कालावधीमध्ये एकूण १७ अर्ज प्राप्त झालेले होते.

प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांबाबत अर्जदाराना सुनावणी देणेबाबत कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/ आस्था/ मुली/ ८४२ /१०, दिनांक १३/०१/२००९ अन्वये उप आयुक्त (परिवहन) यांचे अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे छाननी समिती स्थापन करण्यात आली होती.

१) उप आयुक्त (परिवहन) — मा. आयुक्त यांचे प्रतिनिधी व समितचे अध्यक्ष

२) उप आयुक्त (मुख्यालय) — सदस्य

३) उप आयुक्त (आरोग्य) — सदस्य

४) मुख्य लेखा परिक्षक — सदस्य

५) कार्यकारी अभियंता (सा.बा.वि.) — सदस्य

उपरोक्त समितीची बैठक मा. उप आयुक्त (परिवहन) यांचे अध्यक्षतेखाली दि. १५/०१/२०१० रोजी दुपारी १.०० वाजता त्यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

१) श्री. संतोष देहेरकर
उप आयुक्त (परिवहन — मा.आयुक्त यांचे प्रतिनिधी तथा समिती अध्यक्ष

२) श्री. विजयकुमार म्हसाळ
उप आयुक्त (मुख्यालय) — सदस्य सचिव

३) श्रीम. संगिता धायगुडे
उप आयुक्त (आरोग्य) — सदस्य

४) श्री. अनुदीप दिघे
मुख्य लेखा परिक्षक — सदस्य

५) श्री. रमेश शिर्के, प्र. कार्य. अभियंता — सदस्य
मागासवर्गीय अधिकारी

हरकती/सुचना दाखल केलेल्या संबंधीत अर्जदार अधिकारी/कर्मचारी व कामगार संघटनेचे प्रतिनिधी यांना दिनांक १५/०१/२०१० रोजी सुनावणीसाठी उपस्थितीत रहाणेबाबत कळविले होते. त्याप्रमाणे एकूण

..४३..

सर्व १७ अर्जदार दिनांक १५/०१/२०१० रोजीच्या सुनावणीस उपस्थित होते. उपस्थित अर्जदारानी नमुद केलेल्या हरकती व सुचनांचे स्वरूप सर्व समिती सदस्यांनी चर्चा व विचारविनीमय करून अर्जदाराकडून समजावुन घेतले. (इतिवृत्तची प्रत सोबत जोडली आहे)

दिनांक १५/०१/२०१० रोजी छाननी समितीच्या आयोजित केलेल्या बैठकीमध्ये प्रारूप सेवा प्रवेश नियम (२००८) संबंधी प्राप्त झालेल्या हरकती/सुचनाबाबत संबंधीत अर्जदार अधिकारी/कर्मचारी व कामगार संघटनेचे प्रतिनिधी यांनी उपस्थितीत राहुन प्रारूप सेवा प्रवेश नियमामधील तरतुदीबाबत उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत दि. ३१/५/२०१० व २/६/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता छाननी समितीच्या बैठकीमध्ये सर्व संबंधीत सदस्यांमध्ये चर्चा व विचारविनीमय करून प्रारूप सेवा प्रवेश नियमावलीमध्ये आवश्यकतेप्रमाणे योग्यते फेरबदल/दुरूस्ती योग्य त्या कारणास्तव करण्यात आलेले आहेत. (इतिवृत्तची प्रत सोबत जोडली आहे)

प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांच्या आधारे अर्जदाराचे नांव हरकती/सूचनांचे स्वरूप प्रारूप सेवा प्रवेश नियम (२००८) मध्ये प्रसिध्द केलेले मुद्दे आणि त्यावर अभिप्राय इत्यादी माहिती दर्शविणारा अहवाल तसेच त्या आधारे उप आयुक्त (परिवहन) यांच्या अध्यक्षतेखाली छाननी समितीने प्रारूप सेवा प्रवेश नियम (२००८) मध्ये सुचविलेले आवश्यकते फेरबदल दर्शविणारा प्रपत्र सोबत जोडले आहे.

छाननी समितीने सुचविण्यात आलेले दुरूस्ती व फेरबदल अंतिम सेवा प्रवेश (२००८) मध्ये समाविष्ठ करणेबाबत मा. महासभेची मंजूरीसाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र: १९ अ</u> <u>दिनांकः—१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजू (जीवन) इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राम पारवानी

ही महासभा शासनाच्या मंजुरीस अधिन राहून उल्हासनगर महापालिका अधिकारी/कर्मचा—यांच्या संदर्भातील प्रशासनाने प्रस्तृत केलेल्या प्रारुप सेवा भरती नियमास अंतिम मंजुरी देणे कामीचा विषय पुढच्या सभेत घेण्याप्रयोजनार्थ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १५ :—** उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावली कामी अंतिम मान्यता देणे.

---

<u>महापालिका सचिव :—</u>पास? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १५ :—** उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावली कामी अंतिम मान्यता देणे.

..४४..

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अनेक प्रकारचे व्यवसाय चालविण्याकरीता व इतर प्रयोजनाकरीता व्यवसाय धारकाकडुन विवक्षित वस्तुची साठवणुक करण्यात येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, ३८३ व ३८६ नुसार आयुक्तांना दिलेल्या अटी व शर्तीनुसार आणि त्यास अनुसरुन कोणत्याही नियमात विर्निदिष्ट केलेल्या कोणत्याही वस्तु कोणत्याही जागेत किंवा जागेवर परवान्यांशिवाय ठेवता येणार नाहीत.

आसपासच्या इतर महानगरपालिकांचे सदर विषयासंबंधीचे उपविधी पडताळून अधिनियमाचे कलम ४५८ (२०), ४५५ प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नव्याने नियम व उपविधी तयार करण्यात आले असुन

सदर विषयी वस्तु व व्यापार साठवणुकीसंबंधी संपुर्ण माहिती तसेच जागा वापरासंबंधी प्रारुप उपविधी व नियमावली तयार केलेली आहे.

सदर उपविधी व प्रारुप नियमावलीस महासभा ठराव क्र. १११, दिनांक १९/१२/२००३ नुसार प्राथमिक मंजुरी मिळाली होती. त्यानुसार ठरावात नमुद केल्याप्रमाणे स्थानिक वर्तमानपत्रामध्ये उपविधी व प्रारुप नियमावलीस आवश्यक ती प्रसिध्द देवुन दिनांक ३१/१/२००४ अखेर सुचना व हरकती मागविल्या होत्या. तसेच प्रस्तृत प्रारुप उपविधीस महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दी देण्यात आली होती. व जनतेच्या अवलोकनासाठी खुली ठेवली होती. तथापि वरील मुदतीत कोणाचे सुचना अगर हरकती प्राप्त झाल्या नाहीत.

सदर उपविधी अंतिम मंजुरीकरीता राज्य शासनाकडे पाठविणे अगोदर महासभेपुढे अंतिम मंजुरीकरीता प्रस्तावित करणे आवश्यक असल्याने महासभेपुढे प्रस्तावित करण्यात आले. परंतु महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ नुसार शासनाच्या मंजुरीस अधिन राहुन उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणेसाठी धंदे व व्यवसाय करणेसाठीचे परवान्यासंबंधी प्रारुप उपविध व प्रारुप नियमावलीस अंतिम मान्यता दिलेली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (१०) अन्वये उपद्रवकारक व धोकादायक उदयोग किंवा प्रयोग यांचे नियमन व उपशमन करणे हे महापालिकेच्या आवश्यक कर्तव्यात समाविष्ट आहे. कायदयाने महानगरपालिकेवर लादलेल्या या कर्तव्याच्या पालनासाठी वरील उपविधी करुन त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यामुळे शहरातील उदयोग व्यवसायाचे नियमन व सार्वजनिक आरोग्य व सुरक्षितता या बाबी साध्य होवू शकणार आहेत. तसेच या उपविधी अंमलात आणल्यास महानगरपालिकेस निश्चित स्वरुपाचे उत्पन्न प्राप्त होवु शकणार आहे. या बाबी विचारात घेवुन महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ नुसार घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्यासाठीचा प्रस्ताव महासभेकडे पुर्नविचारार्थ ठेवण्यात आला होता.

तथापी महासभा ठराव क्र. ३१ अ दिनांक २९/६/२००७ अन्वये पूर्वीचा महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ व ठराव क्र. १०० दिनांक २०/३/२००६ बदल करुन उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्यासंबंधी प्रस्तावित शुल्क, प्रारुप उपविधी व नियमावलीस अंतिम करण्याचा प्रस्ताव सविस्तर माहिती अभावी सभेच्या कामकाजातुन वगळण्यात आला होता.

सबब, उल्हासनगर शहराच्या वस्तु ठेवणे व धंदे व व्यवसाय करण्यासंबंधी प्रारुप उपविधी व प्रारुप नियमावली सविस्तर प्रस्ताव सोबत जोडलेला असून अंतिम मान्यतेकरीता मा. महासभेसमोर पुर्नप्रस्तावित करण्यात करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र</u>: २० <u>दिनांकः—१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा पूर्वीच्या महासभा ठराव क्र. १६, दिनांक १९/५/२००४ रद्द करुन वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावलीस अंतिम मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

..४५..

---

⇨ **विषय क्र. १६ :—** शरीर सौष्ठव स्पर्धेसाठी भारतीय गारमेंट वेलफेयर असोसिएशन, उल्हासनगर

---

**काही सदस्य :—**हा विषय नाकारण्यात यावा.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**हा विषय कार्यसूचीवरुन वगळण्यात यावा. महानगरपालिकेकडे पैसे नाहीत तुम्ही महानगरपालिकेचे पैसे कोठे घालवितात?

**काही सदस्य :—**हा विषय वगळायचा नाही, नाकारला जावा.

**महापालिका सचिव :—**सर्वसंमतीने?

**महापौर :—** सदरचा विषय नाकारण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १६:—** शरीर सौष्ठव स्पर्धेसाठी भारतीय गारमेंट वेलफेयर असोसिएशन, उल्हासनगर यांना रुपये अडीच लाखा अनुदान मंजुर करणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, श्री. शरीफ एम. शेख, अध्यक्ष, भारतीय गारमेंन्ट वेलफेयर असोसीएशन, उल्हासनगर यांनी मा. सभापती, क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती यांच्या राखीव निधीतून उल्हासनगर उपमहापौर चषक शरीर सौष्ठव स्पर्धेच्या आयोजनासाठी आर्थिक मदत अनुदान म्हणून अडीच लाख मिळणेसाठी विनंती केली आहे.

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समितीसाठी 'अ' अंदाजपत्रकातील खर्च बाजू इ (९) खर्चा मधील राखीव निधी १५ लाखाची तरतूद आहे.

तरी उल्हासनगर उपमहापौर चषक शरीर सौष्ठव स्पर्धेचे आयोजन करणेसाठी श्री. शरीफ एम. शेख, अध्यक्ष, भारतीय गारमेंन्ट वेलफेयर असोसिएशन उल्हासनगर यांना रुपये अडीच लाख अनुदान मंजूर करणेकामी निर्णयार्थ सादर.

**महासभा ठराव क्र:** २१ **दिनांक:—१२/७/२०१०**

सुचकाचे नाव :— श्री. दिलीपकुमार जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. मुकेश तेजी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर उपमहापौर चषक शरीर सौष्ठव स्पर्धेसाठी भारतीय गारमेंट वेलफेयर असोसिएशन, उल्हासनगर यांना रुपये अडीच लाख अनुदान देणे मान्य करीत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

यावेळी मा. सदस्या श्रीमती सुजाता रिजवानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

⇨ **विषय क्र. १७ :**— उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील पुर रेषेच्या अंतर्गत येणाऱ्या बैठया चाळींना/झोपडपटट्ी धारकांना १४ फुटापर्यंत घराची उंची वाढविण्यास परवानगी देणे.

---

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>किती फुट? किती फुट? १६ फुट की किती?

<u>महापालिका सचिव :—</u>गोषवा—यामध्ये एका ठिकाणी १४ फुट लिहिले आहे. दुस—या ठिकाणी १८ फुट लिहिले आहे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, कमीत कमी १६ फुटापर्यंतच्या बांधकामासाठी परवानगी दिली पाहिजे.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :—</u>१८ फुटापर्यंत बांधकाम करण्यास परवानगी दिली पाहिजे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u> गोषवा—यामध्ये १४ फुट लिहिले आहे.

<u>सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—</u>बॅरेकसधारकांना सुध्दा घराची उंची वाढविण्यास परवानगी दिली पाहिजे.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :—</u>गोषवा—यामध्ये खाली १८ फुट लिहिले आहे, बघा.

<u>सदस्य श्री.रविंद्र बागुल :—</u>गोषवा—यात खाली १८ फुट लिहिले आहे, २० फुटापर्यंत परवानगी दिली जावी.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>मा. महापौर महोदया, गोषवा—यामध्ये एका ठिकाणी १४ फुट लिहिले आहे, एका ठिकाणी १८ फुट लिहिले आहे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:—</u>श्री.बी.बी. मोरे साहेब, २० फुटापर्यंत उंची वाढविण्यास परवानगी दिली पाहिजे.

<u>सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :—</u>मा. महापौरजी, यामध्ये बॅरेकचाही समावेश केला जावा.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>पुराचे पाणी आले तर वरती पत्रावर बसू.

<u>सदस्या श्रीमती पंचशिला पवार :—</u>मा. महापौर महोदया, उप—महापौर साहेब, आयुक्त साहेब, सचिव साहेब, हा जो येथे झोपडपट्टीविषयीचा विषय आणला आहे तो अतिशय चांगला विषय आहे. त्यासाठी प्रथम आपले हार्दिक स्वागत. तसेच झोपडपट्टीसाठीचा हा जो विषय त्याबाबत आमचे आरपीआय पक्षाचे असे म्हणणे आहे की, नाल्याच्या शेजारील जी घरे आहेत तेथे अतिवृष्टीमुळे अधिक नुकसान होते, सर्वांचे संसार उध्द्वस्त होतात, आर्थिक हानी होते. त्यामुळे १४ फुटाऐवजी १८ फुटापर्यंत उंची वाढविण्यास परवानगी दयाल तर चांगले होईल. एवढीच आमची आरपीआयपक्षाच्यावतीने व जनतेकडुन विनंती आहे.

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—</u>मा. महापौर महोदया, माझी आपणांस विनंती आहे की, ४८ गलिच्छ वस्तीचा जो विभाग आहे तसेच जो झोपडपट्टीचा विभाग आहे, पुराचा विभाग सोडुन जो इतर झोपडपट्टीचा विभाग आहे तेथे सुध्दा १८ फुट उंची वाढविण्याची परवानगी दिली जावी. कारण इतर महापालिकेत असा नियम आहे व ब—याच महापालिकेत असे होत आहे. तर आपणांस विनंती आहे की, ४८ झोपडपट्टयांचा जो विभाग आहे त्यांना १८ फुट उंची वाढविण्यासाठी परवानगी दयावी अशी विनंती करतो, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>सन्माननिय महापौर महोदया, उप—महापौर, आयुक्त साहेब,............

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, झोपडपट्टयांमध्ये छप्पराची उंची १४, १५,१६,१८ फुट जेवढी काही वाढविण्याचा विषय आहे, त्याबाबत या शहरातील परिस्थिती लक्षात घेता तो

अतिशय महत्वपुर्ण असा विषय आहे. आज गलिच्छवस्तीमध्ये राहणारा एखादा झोपडीधारक आपल्या झोपडीतील थोडीशी जरी उंची वाढविण्याचा प्रयत्न करु लागला तर असे मानले जाते की तो नियमांचे उल्लंघन करत आहे. कधी पावसामुळे तर कधी अन्य कारणामुळे त्याच्या झोपडीच्या छतातुन पाणी पाझरत असते. अशा परिस्थितीत जर

..४७..

त्यांनी नविन छप्पर टाकले तर तो काही तरी नियमांचे उल्लंघन करत आहे असे मानले जाते, यासाठी सभागृहापुढे हा जो विषय आलेला आहे तो अतिशय योग्य असा विषय आहे. यासाठी शहरातील झोपडयांची उंची १४ फुट, १६ फुट, १८ फुट वाढविण्याबाबतच्या तरतुदीचा येथे जो काही विषय आणण्यात आलेला आहे. तो अतिशय चांगला असा विषय आहे. या विषयास संपुर्ण सभागृहाने एकमताने संमती दिली पाहिजे. त्यामध्ये मी एक विषय जोडु इच्छितो या शहरातील गलिच्छ वस्त्यांमध्ये किंवा अधिकृत झोपडपट्टयांमध्ये यांच्या व्यतिरिक्त अनाधिकृत झोपडपट्टयांमध्ये जे लोक राहत आहेत ते गलिच्छ वस्त्यांमध्ये राहत आहेत त्याचप्रमाणे बॅरेकमध्ये राहणारे लोक हे अनाधिकृत झोपडपट्टयांमध्ये राहणारे लोक आहेत असे मानुन या सभागृहाचे मत आपणांस मिळाले पाहिजे. जसे की, बॅरेक्स्मध्ये सुध्दा तीच परिस्थिती आहे. बॅरेकच्या घराच्या छप्परांमधुन सुध्दा पाणी पाझरत असते. त्यांनी सुध्दा छप्पराची उंची वाढविली किंवा छप्परांवरील कौले बदलुन पत्रे बसविण्याचा प्रयत्न केला तर तुम्हांला त्रास होतो. तर या आधारावर या प्रस्तावामध्ये बॅरेकचा सुध्दा समावेश करुन आजच हा प्रस्ताव पारीत केला पाहिजे किंवा पुढील महासभेत दुस—या महासभेत स्वतंत्र प्रस्ताव आणुन प्रस्ताव पारीत केला पाहिजे यापैकी जे काही योग्य असेल त्याप्रमाणे कार्यवाही केली पाहिजे.

<u>सदस्य श्री. तुलसीदास वसिटा :—</u>१८ फुटापर्यंत उंची वाढविण्यास मान्यता दिली पाहिजे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>मा. महापौर महोदया, उप—महापौर आणि आयुक्त साहेब, शासनाचा निर्णय काय आहे तो वाचुन दाखवा. ज्याठिकाणी पूर आलेला असेल किवा त्याठिकाणच्या ज्या लोकांकडे पुरग्रस्ताचा दाखला असेल अशा लोकांनाच घराची उंची वाढविण्यास परवानगी आहे. तुम्ही म्हणाल बॅरेकवाल्यांना आपल्या घराची उंची वाढविण्यास परवानगी दया हे काय चाललेले आहे? मग तर सगळे शहरच अनाधिकृत बांधकामामध्ये सहभागी होईल. १८ फुट उंचीचे बांधकाम करुन मध्ये टिअरगर्डर टाकुन देतील. ज्या ठिकाणी झोपडपट्टी आहे जेथे पुर आलेला आहे, ज्या ठिकाणी पुरामध्ये लोकांची घरे वाहून गेली आहेत अशा लोकांसाठी तेथे तरतुद केलेली आहे. त्यांचा पंचनामा झालेला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यांना पत्र दिलेले आहे. आमचा जो प्रभाग आहे तो पूराच्या पाण्याने बाधित असलेला विभाग आहे. पुरग्रस्त विभाग आहे. १८ फुटापर्यंत उंची करायची मध्ये टिअरगर्डर टाकायचे म्हणजे झाले.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>मा. महापौर महोदया, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य सभागृहात म्हणत आहेत की, ज्याठिकाणी पूर आला असेल आणि त्यामुळे एखादी झोपडपट्टी बाधित झाली असेल त्यांनाच १८ फुटापर्यंत उंची वाढविण्यास परवानगी दयावी. असे त्यांचे वैयक्तीक मत आहे. सर्वसाधारण म्हणणे नाही आहे. वैयक्तीक म्हणणे आहे. मुंबईमध्ये, पुण्यामध्ये आयुक्त साहेब आमच्याबरोबर आले होते. त्यांनी तेथे तपास केला असता त्यांनी देखिल सांगितले आहे की १८ फुटापर्यंत उंची वाढविण्यास हरकत नाही. आणि म्हणुन दोन वेळेस पुण्यासारख्या शहरास आम्ही भेट दिली असता, त्यांनी सांगितले की या पध्दतीने करण्यास हरकत नाही. आणि म्हणुन आम्ही आयुक्त साहेबांना विनंती केली होती की, तुम्ही हा विषय महासभेपूढे आणावा. आणि तो पास करुन घ्यावा. म्हणुन सन्माननिय श्री. धांडे मी तुम्हांला विरोध करत नाही. एखादे घर नदी किनारी असो किंवा मध्ये असो त्यास अठरा फुटापर्यत उंची वाढविण्यास परवानगी दयावी मग ते झोपडपट्टीतील घर असो किंवा बॅरेक असा अशा प्रकारे शासनाचे सर्वसाधारण धोरण आहे. आणि या गोषवा—यामध्ये सुध्दा त्यांनी पहिल्या परिच्छेदात चौदा फुट उंचीचा उल्लेख केला असला तरी शेवटच्या परिच्छदात त्यांनी लिहिले आहे, ''सन १९९५ च्या अधिनियमाच्या अनुषंगाने संरक्षित केलेल्या झोपडयांसाठी १८ फुट उंचीपर्यंतची मर्यादा निश्चित करणेबाबतच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता घेतल्यानंतर सदरच्या प्रस्तावास शासनाकडे सादर करुन प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार प्रभाग अधिकारी मार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल.'' माझी या सभागृहाला आणि आयुक्त साहेबांना विनंती आहे, १८ फुट उंची वाढविण्याचा सभागृहामध्ये हा जो ठराव मंजुर होईल, तो शासनाकडे पाठवावा. शासन जी मंजुरी देईल, तिचे उल्हासनगर शहरवासी स्वागत करतील. आणि या प्रस्तावामध्ये बॅरेकचाही अंतर्भाव करण्यात यावा. एखादया झोपडीची जर १०/१२ फुट उंची असेल आणि अशा झोपडीत जर पुराचे पाणी शिरले तर तो व्यक्ती पुर्णपणे बेघर होवून जातो काही वेळेस ती झोपडी पडते आणि ती दुरुस्ती करता येत नाही. म्हणुन सन्माननिय सदस्यांना माझी पुन्हा एकदा

विनंती आहे की, हा प्रस्ताव पारीत झाला तर उल्हासनगर शहरासाठी चांगले होईल आणि सर्व नगरसेवकांना लोक शाब्बासकी देतील, हा ठराव शासनाकडे पाठवु या. शासनाकडुन आपण मंजुरी घेवून येवू या. एवढे बोलुन मी थांबतो. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी मी आयुक्त साहेबांना धन्यवाद देवू इच्छितो, त्यांनी एक चांगला प्रस्ताव सभागृहापुढे आणला आहे. परंतु श्री.बी.बी.मोरे यांनी सांगितले तसेच श्री. नरेंद्र राजानी यांनी जसे सांगितले की, झोपडपट्टीप्रमाणे बॅरेकधारकांनाही आपल्या घराची उंची वाढविण्यास परवानगी दिली जावी. व अंतिम तारीख आपण १९९५ ची दर्शविली आहे. त्याऐवजी २००५ पर्यंतच्या बांधकामधारकांना उंची वाढविण्यास परवानगी दिली तर फार चांगले होईल. दुसरे असे मी आपणांस विचारु इच्छितो की, समजा ज्यांची झोपडी कच्ची आहे, तो बांधकाम करु शकतो की, त्याच स्थितीत घराची उंची वाढवु शकतो?

..४८..

<u>सदस्य श्री. गणपत एडके :—</u>मा. महापौर, उप—महापौर व आयुक्त साहेब, सन्माननिय श्री.बी.बी. मोरे साहेबांनी जो प्रश्न मांडला तो बरोबर आहे. १ जानेवारी १९९५ पर्यंतच्या झोपडपट्टया तसेच घोषित ४८ झोपडपट्टयातील रहिवाश्यांना आपल्या झोपडीची १८ फुटापर्यंत उंची वाढविण्यास परवानगी दिली पाहिजे. नदी काठच्या झोपडपट्टयांना १८ फुटापर्यंत उंची वाढविण्यास परवानगी दिली तर चांगलेच आहे. १ जानेवारी १९९५ पर्यंत झोपडपट्टयांना उंची वाढविण्यास इतर महापालिकेत सुध्दा परवानगी देण्यात येत आहे. त्याप्रमाणे आपल्या महापालिकेत सुध्दा परवानगी देण्यात यावी.

यावेळी मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. रामचंद्र पारवानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. संतिश चहाळ :—</u>मा. महापौर महोदया, संपुर्ण ४८ घोषित झोपडपट्टया ज्या आहेत त्यांना सुध्दा याचा फायदा मिळाला पाहिजे. किंवा ज्या ज्या ठिकाणी पुरआपत्ती सदृशस्थिती आहे, त्याठिकाणचा तहसिलदारांमार्फत सर्व्हे झालेला आहे. त्यांना सुध्दा १८ फुटापर्यंत उंची वाढविण्यास परवानगी देण्यात यावी. ही विनंती.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>सन्माननिय महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, नगरसेवकाचे पत्र असल्याशिवाय झोपडपट्टीवाशियांना घराची उंची वाढविण्यास परवानगी दिली जावू नये. त्याठिकाणच्या नागरीकांनी संबंधीत नगरसेवकाला विचारावे आणि नगरसेवकाने त्याबाबतचे संमती पत्र दिल्यानंतरच परवानगी दिली जावी. पत्र असल्याशिवाय परवानगी देवु नका.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, आणि सहकारीहो, हा जो विषय आहे तो केवळ झोपडपट्टीवाशियांचा विषय नाही, उदाहरणादाखल मी तुम्हांला सांगु इच्छितो की, हिराघाटपासुन उल्हासनगर स्टेशनपर्यंत ना केवळ झोपडपट्टी आहे, बरेचसे बॅरेक सुध्दा आहेत, कारखाने आहेत, जेथे दरवर्षी पुर येतो, व दरवर्षी केवळ झोपडयाच नाहीत तर बॅरेक सुध्दा पुराच्या पाण्यात बुडुन जातात. हिराघाटपासुन उल्हासनगर स्टेशनपर्यंत प्रत्येक वर्षी पूर येतो तेथे दोन झोपडपट्टया आहेत परंतु जेवढे काही बॅरेक आहेत, जे ऑनप्लाटवर बॅरेक आहेत किंवा कारखाने सुध्दा आहेत. ते दरवर्षी पुराच्या पाण्याने प्रभावीत होतात. तर हा प्रस्ताव केवळ झोपडपट्टयांपर्यंतच मर्यादीत न ठेवता जे पुरग्रस्त आहेत त्या सर्वांना आपल्या घराची उंची वाढविण्यासाठी परवानगी मिळाली पाहिजे, अशी आयुक्त साहेबांना माझी सूचना आहे.

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—</u>हा प्रस्ताव सर्वसंमतीने पारीत केला जावा.

<u>महापालिका सचिव :—</u>अंतिम तारीख काय असेल?

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी/श्री. जीवन इदनानी :—</u>एक सुधारणा समाविष्ट करुन ठराव पास करावा.

<u>महापालिका सचिव :—</u>काय सुधारणा करायची आहे?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>जेवढे काही बॅरेकस् आहेत, कारखाने आहेत जी बांधकामे पुराच्या पाण्याने बाधित होतात, त्या सर्वांना आपल्या घरांची/दुकानाची उंची वाढविण्याची संधी मिळाली पाहिजे.

<u>महापालिका सचिव :—</u>सर्व प्रकारची बांधकामे झाली.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी/श्री. लाल पंजाबी :—</u>सर्व प्रकारच्या बांधकाम धारकांना आपल्या घराची/दुकानाची/कारखान्याची उंची वाढविण्याची परवानगी मिळाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>१८ फुटापर्यंत उची वाढविण्याची परवानगी मिळाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>संपुर्ण उल्हासनगर एक आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>श्री. जीवन इदनानीजी हा जो प्रस्ताव आहे तो केवळ झोपडपट्टी धारकांसाठी नाही आहे. त्यामध्ये बॅरेकचाही समावेश करण्यात यावा.

..४९..

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>पुरामध्ये आमच्या गौल मैदानचा भाग सुध्दा बुडाला होता. तेथे सर्व बॅरेकस् आहेत तो पुर्ण विभाग पुराच्या पाण्याने बुडाला होता.

<u>आयुक्त(श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदया, हा विषय शहराच्या विकासाच्यादृष्टीने व मानवतेच्या दृष्टीने अतिशय महत्वपुर्ण असा आहे. सभागृहास माझी अशी सूचना व विनंती होती की, झोपडपट्टयांबरोबर बॅरेकस् सुध्दा घेतले जावेत. कारखान्यांना शासनाकडुन मंजुरी मिळणे मुश्किलीचे वाटते. यासाठी कारखाने जर वगळत असाल तर बरे होईल, फक्त रहिवास वापरातील जी बांधकामे आहेत तिच घेतली तर शासनाकडुन मंजुरी मिळण्याची आशा जास्त आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>नाही, नाही परंतु जी बांधकामे ऑनप्लॉटवर आहेत..........

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>फक्त रहिवाशी वापरातील बांधकामे घ्या. त्यांना १८ फुटापर्यंत उंची वाढविण्यास परवानगी दया.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>या प्रकारची परवानगी दिली तर महानगरपालिकेला काय फायदा आहे?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>मुल रडल्याशिवाय आई त्याला दुध पाजत नाही, तसे या उल्हासनगर शहरामध्ये जो प्रसंग आहे, झोपडपट्टी आणि बॅरेक बाबतचा जो प्रस्ताव आपण शासनास पाठविला पाहिजे. आणि त्यांना जर मंजुरी मिळाली तर नंतर आपण कारखान्याबाबतचाही प्रस्ताव मांडु शकतो. त्यावेळेला असे नमुद करु शकतो की नदी किनारी किंवा पुर रेषेत कारखाने सुध्दा आहेत. त्यांना देखील याचा लाभ देण्यात यावा. तर सचिव साहेब, हा प्रस्ताव सर्वसंमतीने पारीत करावा अशी सभागृहाच्यावतीने, रिपब्लीकन पक्षाचा गटनेता या नात्याने मी विनंती करतो. हे सर्व सभागृहाचे मत आहे, याबाबतचा ठराव आपण लवकरात लवकर मंजुर करावा ही विनंती धन्यवाद।

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मा. सचिव साहेब, कमित कमी १८ फुटापर्यंत उंची वाढविण्यास परवानगी मिळाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>सचिव साहेब, कुठली कुठली झोपडपट्टी पास केली आहे ते सुध्दा सांगा.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव:—</u>सर्व झोपडपट्टयांना याचा लाभ मिळणार आहे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>नगरसेवकाचे पत्रपण घ्यावे लागेल?

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :—</u>नगरसेवकांच्या पत्राची आवश्यकता पडणार नाही.

<u>महापालिका सचिव :—</u>जे कोणतेही बांधकाम रहिवाशी प्रयोजनासाठी असेल व जे सखल भागात असेल, पुररेषेच्या आत असेल त्यास अठरा फुटापर्यंत उंची आणि १९९५ पर्यंतचे जे बांधकाम असेल त्या बांधकामांना शासनाच्या मंजुरीस अधिन राहुन उंची वाढविण्याची परवानगी दंयायची, ठिक आहे?

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—</u>२००५ पर्यंत.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>२००५पर्यंतच्या बांधकाम धारकांना ना?

<u>महापालिका सचिव :—</u>शासनाने मंजुरी दिल्यानंतरच पुढील कारवाई होईल. १८ फुट उंची, रहिवासी प्रयोजनार्थ आणि सर्व प्रकारची बांधकामे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>ग्रीन झोनमधील जी झोपडपट्टी आहे तिला सुध्दा हा ठराव लागु होईल ना?

<u>महापालिका सचिव :—</u>आता अशा प्रकारचा खुलासा मागुन तुम्ही अडचणी कशाला निर्माण करता?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापालिका सचिव :—</u>सर्वसंमतीने?

..५०..

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १७ :—** उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील पुर रेषेच्या अंतर्गत येणाऱ्या बैठया चाळींना/झोपडपटट्रीधारकांना १४ फुटापर्यंत घराची उंची वाढविण्यास परवानगी देणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. महापौर यांचे दि. ०५.०५.१० रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पूर रेषेच्या अंतर्गत येणाऱ्या बैठया चाळींना झोपडपटट्रीधारकांना (घरांना/पोटमाळा) १४ फुटपर्यंत उंची वाढविणेकरीता मंजूरी मिळाल्यास त्या परिसरात पावसाचे पाणी साचुन होणारे नुकसान टाळता येईल. सदर पत्राच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातुन वाहणाऱ्या बऱ्याच सखल भागातील नाल्याच्या बाजूच्या परिसरात, पावसाच्या अतिवृष्टीमुळे व धरणाचे अतिरिक्त पाणी सोडल्याने तसचे खाडी भरतीमुळे उल्हासनगर शहरात नागरी वस्तीमध्ये दरवर्षी पाणी भरते. त्यामुळे नागरिकांचे अतोनात हाल होतात व फार मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असल्याने महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या मालकीच्या व खाजगी जमिनीवर असलेल्या राजपत्रात समाविष्ट असलेल्या झोपडयाधारकांना १४ फुटापर्यंत घराची उंची वाढविण्यास परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव महासभेत चर्चा व विचारविनिमयाकरीता सादर करण्यास शिफारस करण्यात येत आहे. सदरच्या झोपडया शासनाने निश्चित करण्यात आलेल्या तारखेपासुन म्हणजेच सन १९९५ च्या अधिनियमाच्या अनुषंगाने संरक्षित केलेल्या झोपडयांसाठी १८ फुट उंचीपर्यंतची मर्यादा निश्चित करणेबाबतच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता घेतल्यानंतर सदर प्रस्तावास शासनाकडे सादर करुन प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार प्रभाग अधिकारी मार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

यास्तव शासन स्तरावर आदेश होणेसाठी पाठवावयाच्या प्रस्तावावर मा. सर्वसाधारण सभेसमोर ठेवुन कृपया मान्यता घ्यावी.

महासभा ठराव क्र: २२ दिनांक:–१२/७/२०१०

सुचकाचे नाव :– १) श्री. लाल पंजाबी
२) श्री. बी.बी. मोरे
अनुमोदकाचे नाव :–१) श्री. राजु इदनानी
२) श्री. बच्चाराम रुपंचदानी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार शासनाच्या मंजुरीस अधिन राहुन उल्हासनगर महापालिका क्षेत्रात पुर रेषेअंतर्गत येणा–या रहिवासी प्रयोजनार्थ कोणत्याही प्रकारचे बांधकाम बॅरेक, बैठया चाळीं/झोपडया धारकांना त्यांच्या घरांची १८ फुटापर्यंत उंची वाढविण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–१)
२)
अनुमोदकाची सही/–१)
२)

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १८ :–** उल्हासनगर शहरातील कॅम्प २ व ३ मधे अस्तित्वात असलेल्या भाजी मार्केटच्या इमारती ''बांधा वापरा व हस्तातरण करा '' या तत्वावर विकसित करणे.

---

..५१..

सदस्य श्री. प्रशांत धांडें :–पुढे ढकला, पुढे ढकला.

सदस्य श्री. प्रकाश सावंत :–मा. महापौर, उप–महापौर आणि आयुक्त साहेब, कॅम्प नं. २ आणि ३ मध्ये जी भाजी मार्केट आहेत ती आपण बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर देणार आहात. कॅम्प नं. ५ मधील भाजी मार्केट बाबत काय ठरविले आहे? ती का नाही बांधा वापरा व हस्तातरीत करा या तत्वावर देत?

सदस्य श्री. मोहन साधवानी :–मा. महापौर, मा. उप–महापौर, मी आयुक्त साहेबांचे आभार मानतो त्यांनी हा प्रस्ताव सभागृहापुढे आणलेला आहे, परंतु उल्हासनगर–५ चे जे भाजी मार्केट आहे ते फार मोठे आहे. त्याचा सुध्दा यामध्ये समावेश केला जावा तसेच नेताजी चौकात जे फायरब्रिगेडचे कार्यालय आहे ती इमारत पडुन आहे तिला विकसित करण्याचा प्रस्ताव सुध्दा यामध्ये आला तर बरे होईल. त्याठिकाणी काही आरक्षण वगैरे असेल तर त्यामध्ये बदल करुन तो प्रस्ताव सुध्दा याबरोबर आणावा. नेताजी चौक येथिल आलिशान विभागामध्ये ती जागा आहे.

सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :–मा. आयुक्त साहेब, कॅम्प नं. ५ येथिल भाजी मार्केटची आपण प्रत्यक्ष पाहणी केली आहे. तरी सुध्दा त्या मार्केटचा यामध्ये अंतर्भाव का केला नाही? कॅम्प नं. २ आणि ३ मधीलच भाजी मार्केट का? आपणांस विनंती आहे की, कॅम्प नं. ५ येथिल भाजी मार्केटचाही अंतर्भाव करावा.

आयुक्त(श्री. अशोक बागेश्वर):–सन्माननिय महापौर महोदया, प्रस्ताव सर्व सांगितले आहेत, कार्यवाही चालु आहे. आता जी सूचना करण्यात आली आहे, सर्वांच्या बाबतीत कार्यवाही चालु आहे. टप्प्याटप्प्याने प्रस्ताव आणता येतील आणि दुसरी गोष्ट अशी आहे की, प्रस्ताव मी आणतो असे नाही आहे. प्रस्ताव सन्माननिय नगरसेवक, सन्माननिय महापौर आणि जेवढे काही पदाधिकारी आहेत, सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील आणि आपल्या सर्वांच्या सहका–याने प्रस्ताव येतो. प्रस्ताव आणण्यात माझे एकटयाचे श्रेय नाही. ते मी आधीच

स्पष्ट करतो. आपले माझ्यावर प्रेम आहे ते असेच कायम राहो. शेवटी शेवटी आयुक्ताची येथे काय गत होते ते माहित आहे तशी गत होवु नये.

सदस्य श्री. मोहन साधवानी/सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—सर्व प्रस्ताव एकत्रित आणा आणि फायरब्रिगेडची इमारत सुध्दा घ्या. हे दोन्ही प्रस्ताव घेवुन चारही प्रस्ताव एकत्रितपणे आणुन स्थायी समितीला अधिकार देवुन फटाफाट मंजुर करुन घेवु या.

महापालिका सचिव :—काय करायचे आहे?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—कॅम्प नं. ५ च्या भाजीमार्केटचाही समावेश झाला पाहिजे.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :— सध्या सभागृहापुढे जो दोन ठिकाणचा प्रस्ताव आलेला आहे तो पारीत करुन टाका आणि बाकीच्या दोन ठिकाणचा प्रस्ताव पुढील सभेत आणा.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—नाही,नाही आताच ठराव पारीत करा.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—आता कसे येईल, प्राकलन नाही काही ना.

सदस्य श्री. सतिश चहाळ :—हा जो भाजीमार्केटचा प्रस्ताव आहे तो मला वाटते पुढे ढकलण्यात यावा.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—कॅम्प नं. ५ येथिल भाजी मार्केटचे आपण काय करत आहात?

आयुक्त(श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया मला असे वाटते की एकएक प्रस्ताव घेवु या, प्रस्तावाचा वेग वाढला तर संविदा करण्यास त्याची मदत होईल. एक एक घेवु या माझी तयारी आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—हा प्रस्ताव झाला परंतु ५ नंबरचा कधी कराल आपण?

आयुक्त(श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया एक तर पुर्ण होवु दया. मग बाकी एकएक प्रस्ताव घेता येईल.

..५२..

यावेळी मा. सदस्या श्रीमती लिलाबाई आशान हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—म्हणजेच त्यानंतर कराल.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—माझी अशी सूचना आहे की, आता आपण याबाबतचा प्रस्ताव पारीत करुन ठेवा. दुस—या टप्प्यात ते काम हाती घ्या.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—आयुक्त साहेब, आपणांस याबद्दल संशय आहे का की हा प्रोजेक्ट पास होणार नाही म्हणुन? आपण हे प्रायोगिक तत्वावर करत आहत काय?

सदस्य श्री. मोहन साधवानी :—आता या विषयामध्ये सुधारणा करुन हा प्रस्ताव समाविष्ट करुन ठराव पारीत करावा. पाहिजे तर आपण दोन निविदा मागवा.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—कॅम्प नं. ५ येथिल भाजी मार्केटमध्ये पाय ठेवता येणार नाही अशी स्थिती आहे आणि तेथे भाजी मार्केटची अतिशय आवश्यकता आहे.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**तसे पण ते वापरात  नाही महापालिकेस त्यापासुन एक पैसा सुध्दा मिळत नाही. तसेच फायरब्रिगेडचे कार्यालय तसेच पडुन आहे.  भलेही आपण आता हे पास करा, परंतु दोन निविदा मागवा.

**आयुक्त(श्री. अशोक बागेश्वर):—**सन्माननिय महापौर महोदया, प्रस्ताव घेण्यास हरकत नाही, मी म्हटले प्रस्तावाची तयारी चालु आहे. तो प्रस्ताव महासभेत आणण्यात येईल. याबाबत माझे दुमत नाही.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**भाजीमार्केटचे टायटल तर स्पष्ट आहे.

**आयुक्त(श्री. अशोक बागेश्वर):—**सन्माननिय महापौर महोदया, यामध्ये अशी अट घातली की टायटल क्लीअर केल्याशिवाय भाजी मार्केटचे काम सुरु करता येणार नाही. अशी अट घालुन प्रस्ताव तयार करता यणार नाही.

**महापालिका सचिव :—**पास? दोन तीनसाठी? विषय जसा आहे तसा पास?  सर्वसंमतीने?

**सदस्य श्री. सतिश चहाळ :—**आमचा या विषयास विरोध आहे. आपणांस येथे प्रस्ताव आणायचा असेल तर १ ते ५ पर्यंतच्या सर्व मार्केटसचा अभ्यास करुन नंतर प्रस्ताव आणावा. फक्त कॅम्प २,३ चा प्रस्ताव आणु नका सर्व प्रस्ताव आणा नंतर पास करु.

**सदस्य श्री. बी.बी.मोरे:—** सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, उल्हासनगर कॅम्प नं. २ आणि ३ मधील भाजी मार्केट संदर्भातील आज हा जो विषय सभासूचनेवर आला आहे. तो विषय यासाठी पारीत करावा की आपल्या महानगरपालिकेला उत्पन्न फार कमी आहे.  आणि कर्मचा—यांच्या पगारावरील व महापालिकेच्या इतर कामांवरील खर्च फार वाढला आहे.  आणि म्हणुन आता कॅम्प नं. २ आणि ३ मधील भाजी मार्केट बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर देण्याबाबतचा प्रस्ताव आलेला आहे.  पुढच्या महासभेमध्ये आपण आयुक्तांना विनंती करु व महापौरांना विनंती करु, व कॅम्प नं. ४ व ५ मधील भाजी मार्केटचाही विषय आणू आणि तो देखील आपण मंजुरीसाठी ठेवु.  यामध्ये काय बिघडले आहे?  परंतु हा विषय पुढे न ढकलता पारीत करावा.  नंतर पुढच्या महासभेत कॅम्प नं. ४ व ५ चा विषय पारीत करावा. एवढी मी सभागृहातर्फे मा. महापौरांना व आयुक्त साहेबांना विनंती करतो की त्यांनी सर्वानुमते हा ठराव पारीत करावा.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, माजी महापौर यांनी कॅम्प नं. ५ येथिल भाजी मार्केट संदर्भात सतत पाठपुरावा केला आहे.  तो प्रस्ताव विचारात का घेतला नाही? फक्त कॅम्प नं. २ आणि ३ मधील भाजी मार्केटचा प्रस्ताव ठेवला आहे. मला वाटते महापौर, स्थायी समिती सभापती, आमदार यांच्या दबावामुळे तुमचे लक्ष फक्त कॅम्प नं. २ आणि ३ मध्ये आहे. उल्हासनगर कॅम्प नं. १ ते ५ मध्ये विविध ठिकाणी महापालिकेच्या मालकीची भाजी मार्केट आहेत असा उल्लेख आला आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**पुढच्या महासभेत घेवु या.

..५३..

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** तर मग कॅम्प नं. ४ व ५ मधील भाजी मार्केट संदर्भाचा विषय पुढील महासभेत आणला जावा.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—** मा. महारपौर, उप—महापौर व आयुक्त साहेब, पूढच्या महासभेत कॅम्प नं. १ व कॅम्प न. ४ व ५ मधील भाजी मार्केट विषयीचे तीन प्रस्ताव आणावेत.  व सध्या हे दोन्ही प्रस्ताव पारीत करावेत. धन्यवाद।

**महापालिका सचिव :—**कुणाचा विरोध आहे का?  पास?

**सदस्य श्री. सतिश चहाळ :—**यामुळे महापालिकेला उत्पन्न किती मिळणार ते प्रथम सांगा.  तुम्ही अभ्यास केला असेल ना?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौर महोदया, हा जो बांधा वापरा व हस्तांतरीत करा विषयीचा प्रस्ताव चालु आहे त्याबाबती सभागृहाचे असे मत होते की, कॅम्प नं. ४ व ५ मधील भाजीमार्केटचा सुध्दा प्रस्ताव घेतला जावा त्याविषयी एका गोष्टीकडे विशेष गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो की कॅम्प नं. १ येथे जे भाजी मार्केट आहे तेथे निरंकारी हॉलपास ुन रस्ता रुंदीकरणाचे काम चालु आहे. व तेथे सिमेंट कॉंक्रिटचा रस्ता तयार होणार आहे. व तेथिल भाजी मार्केट १२ ते १५ फुट तुटणार आहे. यासाठी सर्वात प्रथम प्राधान्य तर उल्हासनगर—१ मधील मार्केटला दयायला पाहिजे. यासाठी सर्वात प्रथम कॅम्प नं. १ येथील भाजी मार्केटचा प्रस्ताव बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा या स्वरुपात आणला पाहिजे. कारण की, तेथे महानगरपालिका आपला स्वत:चा पैसा खर्च करुन आपली इमारत पुर्णपणे तोडल्यानंतर पुन्हा खर्च करुन बांधेल. अशा परिस्थितीत सर्वात प्रथम आपला उद्देश असा असला पाहिजे की, ज्या ठिकाणी रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम चालु आहे, तेथिल भाजी मार्केटचे काम बांधा वापरा व हस्तांतरीत करा या स्वरुपात सर्वात प्रथम मंजुरीस्तव महासभेपूढे आणले पाहिजे. व कॅम्प नं. ५ येथिल भाजी मार्केटचा जो विषय निघाला. मला नाही वाटत की आपल्या महानगरपालिकेचा कुणी अधिकारी मागील १० वर्षामध्ये कॅम्प नं. ५ येथिल भाजी मार्केट पाहण्यास गेला असेल. जर का गेला असेल तर मला सांगा की तेथे आजच्या तारखेला किती ट्रक कचरा पडला आहे? कमित कमी २०० ट्रक कचरा त्या भाजी मार्केटमध्ये पडला आहे. तो मार्केट तोडल्याशिवाय काढला जावु शकत नाही. तेथे १४ दुकानांमध्ये चोरी झाली तेव्हा शिवसेना शहर अध्यक्ष श्री. राजेंद्र चौधरी व आम्ही सर्व तेथे गेलो होतो. तेव्हा तेथिल लोकांनी भाजी मार्केटची जी दुर्दशा दाखविली ती पाहता जर या सभागृहामध्ये बसलेल्या अधिका—याच्या डोळयावर पट्टी बांधुन तेथे सोडले तर तो सांगु शकणार नाही की मी उल्हासनगर मध्ये आहे की धारावी मधल्या कुठल्या झोपडपट्टीत आहे? अशी त्या मार्केटची स्थिती आहे. आणि त्या विषयी आमच्या आदरणीय माजी महापौर यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे तो गंभीरतेने घेतला जात नाही. कॅम्प नं. २ आणि ३ मधील भाजी मार्केटस अतिशय चांगल्या रितीने बांधण्यात आलेली आहेत. त्या मार्केटसना बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वानुसार विकसित करण्यास घ्यायची आहेतच. त्यास आमचा विरोध नाही. परंतु जे मार्केट रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित होत आहे. ज्याच्यावर आपणांस लाखो रुपये आता खर्च करायचे आहेत त्या मार्केटचा प्रस्ताव आपण घेत नाहीत. आणि दुसरे असे मार्केट जेथे २०० ट्रक कचरा पडलेला आहे जो आपण बाहेर काढु शकत नाहीत आणि ते मार्केट आपण बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या स्वरुपात विकसित करण्यास घेत नाही यासाठी माझे असे निवेदन असेल की, या प्रस्तावामध्येच कॅम्प नं. १, ४ व ५ मधील भाजी मार्केटचा प्रस्ताव जोडला जावा. व १५ दिवसाच्या आत त्याची पुर्ण रुपरेषा तयार केली जावी. व ही चारही मार्केट बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर विकसित करण्यास दिली पाहिजेत.

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—</u>मा. महापौर महोदया, दोनशे ट्रक कचरा पडला आहे तर मग तेथिल नगरसेवक आणि स्वच्छता निरिक्षक काय करत आहेत?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>मा. महापौर महोदया, ही मार्केट बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर विकसित करण्यासाठी दिल्यानंतर त्यातून महापालिकेस किती उत्पन्न मिळेल अशी मी विचारणा केली होती त्याचे मला उत्तर मिळाले नाही.

<u>श्री. माधव जवांदे (शहर अभियंता):—</u>मा. महापौर महोदया, भाजी मार्केट बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर विकसीत करण्यासाठी दयावयाच्या प्रस्तावावर सभागृहात वेगवेगळे प्रश्न उपस्थित झाले आहेत, त्यांची मी थोडक्यात उत्तरे देवु इच्छितो. पहिली गोष्ट अशी आहे की, उल्हासनगर शहरामध्ये कॅम्प नं. १ पासुन ५ पर्यंत जेवढी काही भाजी मार्केटस आहेत ती विकसित करण्यासाठी सर्वसमावेशक असा अभ्यास करण्यात आला. त्यामध्ये असा काही उद्देश नव्हता की कॅम्प नं. २ व ३ मधील भाजी माकेटसच प्रथम विकसित करावे, आम्ही कंन्सल्टट मार्फत कॅम्प नं. १ ते ५ मध्ये जेवढी काही भाजी मार्केटस् आहेत त्यांचा अभ्यास करण्यासाठी आदेश

..५४..

दिले होते. परंतु जसे की आमचे सन्माननिय सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी साहेबांनी सांगितले की, कॅम्प नं. १ येथिल भाजी मार्केट रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित होत आहे. त्या कॅम्प नं. १ मधील भाजी मार्केटसाठी वेगळी स्ट्रटेजी अवलंबायची होती.

**सदस्य श्री. सतिश चहाळ :—**साहेब, तुम्हांला मी एक सांगु इच्छितो, कॅम्प नं. १ येथिल रस्त्याच्या रुंदीरकणाबाबत जे काही बोलले जात आहे, अगोदरच त्याठिकाणी सिमेंट कॉक्रीटचा रस्ता तयार करण्यात आला आहे मग आताच त्याठिकाणी रस्त्या रुंदीकरणाची निकड कशी उद्‌भवली? या अगोदर कधी याबाबतचा प्रस्ताव आलेला नाही?

**श्री. माधव जवांदे (शहर अभियंता):—**माझी आपणांस विनंती असेल की, आमचा त्या कामांकडे बघण्याचा दृष्टिकोन कशाप्रकारचा आहे ते जरा समजून घेतले तर थोडस लक्षात येईल, बाकी तुमच्या प्रश्नाचा मी सन्मान करतो. भाजी मार्केटचा अभ्यास करतांना किंवा हा प्रस्ताव आणतांना अचानकपणे कॅम्प नं. २ आणि ३ मधील भाजी मार्केटचा प्रस्ताव आणावा असा काही उद्‌देश नव्हता. शहरातील सर्व मार्केटचा अभ्यास करण्यात आलेला आहे आणि कुठलेच मार्केट यातुन वगळायचे नाही हा यामागचा उद्‌देश आहे. फक्त काही अडचणी आल्यामुळे काही प्रस्ताव मागे टाकले आहेत. होवू शकते की काही सन्माननिय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे लगेच होवु शकते. ते पुढच्या महासभेत येतील किंवा एखादया महिन्यामध्ये आणु.

**सदस्य श्री. सतिश चहाळ :—**माझ्या माहिती प्रमाणे मी तुम्हांला सांगतो, कॅम्प नं. १ मध्ये ज्या सिमेंट कॉक्रीटीकरणाच्या रस्त्याचे काम चालु आहे, भाजी मार्केटकडील रस्त्याची बाजु आहे त्या बाजुकडील रुंदीकरणासाठी तेथिल काही लोक विरोध करत आहेत, म्हणुन भाजी मार्केटच्या आतील रस्ता रुंद करायचा हे षड्‌यंत्राचे काम आहे म्हणुन लक्ष ठेवले पाहिजे. कारण कोणाच्याही सांगण्यावरुन कोणाचे नुकसान करणे हे बरोबर नाही.

**श्री. माधव जवांदे (शहर अभियंता):—**नाही तसे काही होणार नाही त्यामध्ये. राहिला कॅम्प नं. ५ मधील भाजी मार्केटचा विषय त्याविषयी मी सांगु इच्छितो की सन्माननिय महापौरां समवेत मा. आयुक्त साहेबांनी स्वत: भेट दिली आहे. या भाजी मार्केटच्या संदर्भात तुम्ही पावले उचलावी अशी त्यावेळी आम्हांला सूचना देण्यात आली होती. आपल्या माहितीसाठी मी सांगतो आम्ही तेथिल प्लेन टेबल सर्व्हे पुर्ण केलेला आहे. परंतु काय झाले तेथे जी मोकळी जागा आहे ती शिटपेक्षा जास्त आहे. आमचा प्रयत्न असा आहे की, जी शिटमधील जागा आहे तेवढी पुर्ण विकसीत झाल्यानंतर एक मोठा प्रस्ताव होईल, त्यासाठी आमचा प्रयत्न चालु आहे. इतर भाजी मार्केट आम्ही टप्प्याटप्प्याने करण्याचा प्रयत्न करु.

**सदस्य श्री. सतिश चहाळ :—**कॅम्प नं. १ ते ५ मधील भाजी मार्केट आपण बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर दिल्यानंतर महापालिकेला याचा किती फायदा होईल असे मी तुम्हांला विचारले होते.

**श्री. माधव जवांदे (शहर अभियंता):—**मा. महापौर महोदया, प्राथमिक अंदाजानुसार या दोन भाजी मार्केटपासुन ३६ लक्ष किंवा ३५.९७ लक्ष रुपये प्रति वर्षी मिळतील असा आम्ही उत्पन्नाचा अंदाज व्यक्त केलेला आहे आणि या उत्पन्नामध्ये प्रत्येक वर्षी ५ टक्के वाढ गृहित धरलेली आहे. हा अंदाज अगदीच प्राथमीक स्वरुपाचा आहे. यास शासनाचे जे २५ रुपये प्रति चौ. फुट वगैर जे काही भाडे पट्‌टयाचे दर आहेत त्याप्रमाणे ३५ ते ३६ लाख रुपये महापालिकेला उत्पन्न होवू शकते.

**सदस्य श्री. सतिश चहाळ :—**यामध्ये भाजी मार्केट बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर विकसित केल्यानंतर आज संपुर्ण उल्हासनगरमध्ये टोपलीमध्ये भाजीपाला घेवुन जे लोक विक्री करतात त्याबद्‌दल काय सुधारणा केली जाईल?

**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—**मा. महापौर महोदया, हातगाडीवाल्या विषयीचा विषय वेगळा आहे. बांधा वापरा व हस्तांतरीत करा या विषयीचा जो प्रस्ताव आहे तो यासाठी आहे की आपणांस उत्पन्नाचे साधन निर्माण व्हावे, दुसरी गोष्ट आपण इमारतींचे इन्फ्रास्ट्रक्चर उभे करु शकत नाहीत. त्यामुळे बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर खाजगी व्यक्तीकडुन बांधुन घेण्याचा मानस आहे. यापासुन साधारणत: वार्षिक ३५ लाख रुपये महापालिकेस उत्पन्न येण्याची शक्यता आहे. सदरचे उत्पन्न हे अंदाजित आहे. प्रत्यक्ष आपण ज्यावेळेस काम सुरु करु त्यावेळेस निविदा मागविण्यात येतील आणि त्यामध्ये आपणांस जो जास्त उत्पन्न देईल त्यास आपण निविदा देणार आहोत. आपण आता हातगाडीवाल्यांविषयीचा जो विषय सांगत आहात त्यांच्या पुर्नवसनाचा विषय वेगळा आहे.

**सदस्य श्री.बी.बी.मोरे** :–सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आता बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर दोन भाजी मार्केट विकसित करण्यासाठी घेतली आहेत आणि यापुढे तीन भाजी मार्केटचा प्रस्ताव येईल त्यासाठी

..५५..

सर्व सन्माननिय सदस्यांना मी एक विनंती करतो की, त्यांनी थोडेसे लक्ष दयावे की आजमितीपर्यंत उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे कॅम्प नं. १ ते ५ मध्ये काही लोकांना भाजी मार्केट भाडेतत्वावर देण्यात आलेली आहेत. हे लक्षात घ्यावे प्रथमत: आमचे सन्माननिय सदस्य हा प्रश्न उपस्थित करत नाहीत. आता कॅम्प नं. १ येथिल भाजी मार्केटमधील गाळे महापालिकेने काही लोकांना भाडयाने दिले आहेत. असे असतांना बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर जर मार्केट विकसित करण्यास दिले तर जे गाळे धारक महानगरपालिकेस १०–१५, २० रुपये भाडे देत असतील परंतु भाजी मार्केट बीओटी तत्वावर घेणारा माणुस त्या भाडेकरुस लगेच सांगेल की ५० हजार रुपये अनामत रक्कम व १० हजार रुपये भाडे किंवा ५ हजार रुपये तरी भाडे दया. आज सध्या ज्या लोकांचा काही धंदा होत नाही तरी देखील ते महापालिकेला मासिक किंवा वार्षिक काही भाडे देतात. व कशीतरी आपली गुजरान करतात. यासाठी मी मा. महापौर आणि आयुक्त साहेबांना विनंती करतो की त्या जुन्या लोकांना बेघर करु नये नाहीतर ते लोक रस्त्यावर येतील आणि रस्त्यावर भाजीपाला विकतील आणि ही वेळ येवु नये म्हणुन तुम्ही बीओटी तत्वावर मार्केट देत असतांना गरीब लोकांचा विचार केला पाहिजे. कारण की बीओटी तत्वावर मार्केट घेणारा माणुस सांगेल की तुम्ही पन्नास हजार रुपये अनामत रक्कम भरा व महिन्याला १० हजार रुपये भाडे दया हे एवढे भाडे त्या गरीब बिचा–यांना देणे शक्य होणार नाही. मग तो डोक्यावर भाजीची टोपली घेवुन भाजीपाला विकेल. नाहीतर कोठेतरी रस्त्याच्या कडेला बसेल तर एकप्रकारे आपण एकाला भाकरी देतो आणि दुस–याची भाकरी हिसकावून घेतो असे काही करु नका म्हणुन माझी आयुक्त साहेबांना, महापौर महोदया, व सर्व सन्माननिय सदस्यांना विनंती करतो की हा विषय अतिशय महत्वाचा आहे. म्हणुन मी माझे म्हणणे मांडले आहे. माझे म्हणणे लक्षात घ्यावे व त्याप्रमाणे बीओटी तत्वावर दयावे धन्यवाद।

**सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले** :–मा. महापौर महोदया, व आयुक्त साहेब, कॅम्प नं. ५ येथिल साफसफाई करुन घेण्यासाठी आरोग्य विभागाच्या उप–आयुक्त श्रीमती संगिता धायगुडे यांना आपण आदेश दिला होता परंतु ते साफसफाईचे काम अर्धवट राहिले आहे. तेथे बाजुलाच एक शाळा आहे. त्या शाळेची एक भिंत तोडुन साफसफाईसाठी आम्ही त्यांना जागा करुन दिली आहे. तरीदेखील अदयाप तेथिल साफसफाई होत नाही का होत नाही? त्याचे कारण काय? त्या शाळेच्या मुख्याध्यापिका नेहमीच याविषयी आमच्याकडें तक्रार करत असते.

**श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य)**:–मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, मा. आयुक्त साहेबांनी आदेश दिल्याप्रमाणे आपण ती भिंत तोडली होती आणि त्यानंतर कचराही उचलण्यात आला होता परंतु १०० टक्के कचरा उचलला गेला नाही आणि त्याठिकाणी पुन्हा नविन कच–याची निर्मीती झालेली आहे. मागच्या महिन्यात ज्याप्रमाणे आपण केले, जसे की काही वेळेस ठेकेदार काम करत नाही त्यास आपण पुन्हा पुन्हा नोटिस दिली आहे. पत्र दिलेले आहे. परंतु मागच्या आठवडयामध्ये मा. आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे जेव्हा ठेकेदार व्यवस्थितपणे काम करत नसेल तेव्हा आपली किंवा भाडयाची जेसीबी मशिन लावुन काम करुन घेतो व सदरची रक्कम दंडाच्या स्वरुपात ठेकेदाराकडुन वसुल करतो. त्यापध्दतीने आता करण्यात येईल.

**सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले** :–यापुढे नियमितपणे साफसफाई होत राहिली पाहिजे, मला पुन्हा पुन्हा सांगण्याची वेळ येता कामा नये.

**श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य)**:–प्रत्येक वेळी साफसफाई केल्यानंतर तेथिल लोक पुन्हा तेथेच कचरा टाकतात आणि त्यामुळे त्याठिकाणी कचरा वाढत जातो. यासाठी जे तेथे कचरा टाकतात त्यांच्याकडुन येथुन पुढे दंड वसुल करायला आपण सुरुवात करु.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे** :–श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितल्याप्रमाणे कॅम्प नं. ५ मधील भाजी मार्केटमध्ये ब–याचप्रमाणात कचरा आहे.

**श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य)**:–मला ते माहित आहे, मी पाहिलेले आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**ब–याच वर्षापासुन आपल्या अधिका–यांचे, कर्मचा–यांचे लक्ष नव्हते आणि त्या कच–यामुळे तेथे रोगराई पसरण्याची शक्यता आहे. माजी महापौरांनी सांगितल्याप्रमाणे तेथिल कचरा प्रथम हटवा आणि मग पुढील प्रस्ताव येईल. परंतु त्या कच–यामुळे रोगराई पसरण्याची दाट शक्यता आहे. तेथिल परिसर पुर्णपणे अस्वच्छ झाला आहे.

**<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>**श्रीमती धायगुडे महोदया, आपण थोडे ऐकुन घ्या. कारण की माजी महापौर महोदयांनी याठिकाणी जो विषय मांडलेला आहे, आणि त्यावर श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जो अतिशय चांगला प्रकाश टाकलेला आहे. सध्या पावसाळयाचे दिवस आहेत. उन्हाळयाच्या दिवसात कचरा सुकतो. पण पावसाळयाचे दिवस असल्यामुळे किती दुर्गंधी सुटते. आणि दुसरी गोष्ट आयुक्त साहेबांनी ऐकुन घ्यावी. कचरा ठेकेदाराने डबेवाला बंद

..५६..

केला आहे. प्रभाग समितीचे सभापती श्री. जग्यासी साहेबांनी जेव्हा सभा घेतली त्यावेळी आम्ही सर्व नगरसेवकांनी ही बाब त्यांच्या निदर्शनास आणली आहे की, कुठल्याही प्रभागामध्ये कचरा ठेकेदाराचा डबेवाला येत नाही. तर त्याचे याकामाचे जे काही पैसे असतील ते कपात करावेत. अशा प्रकारच्या सूचना आम्ही केलेल्या आहेत. आरोग्य विभागाच्या उप–आयुक्त सन्माननिय श्रीमती धायगुडे महोदया, या माझ्या प्रभागातील साफसफाईच्या कामाची पाहणी करण्यासाठी येणार होत्या. परंतु त्या आल्या नाहीत. त्यामुळे आम्हांला जास्त त्रास घ्यावा लागला आणि परिसरातील कचरा उचलुन घ्यावा लागला. एकतर पावसाळयाचे दिवस आहेत. या कालावधीत त्यांनी जास्तीत जास्त प्रभागांना भेटी दयाव्यात आणि जेथे जेथे कचरा असेल तेथे तेथे महापालिकेच्या गाडया किंवा खाजगी गाडया लावुन तो कचरा उचलावा अशी मी विनंती करतो आणि आयुक्त साहेब, दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे, जुन महिन्याच्या अर्ध्यावर पावसाळा सुरु होतो. आपण पावसाळयापुर्वी नाले सफाईसाठी प्रत्येक प्रभागामध्ये १०– १० हंगामी मजुर कामास लावतो.परंतु यावर्षी नाले सफाईचे काम अर्धवट राहिले आणि नंतर पावसास मोठया प्रमाणावर सुरुवात झाली आता नाले सफाई करणारे कुणी नाहीत. आणि महापालिकेचे जे कामगार आहेत ते किती आहेत? प्रत्येक प्रभागात २ नाहीतर ३ . सर्व गैरहजर राहतात. कुणी रजेवर जातो कुणी म्हणतो माझा पाय दुखतो. मी तुम्हांला विनंती करतो की, पुन्हा एक एक महिन्यासाठी रोजंदारी कामगार नेमावेत.

**<u>महापालिका सचिव :–</u>**पास? जसा प्रस्ताव आहे तसा? सर्वसंमतीने?

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>महापौर :–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. १८ :–** उल्हासनगर शहरातील कॅम्प २ व ३ मधे अस्तित्वात असलेल्या भाजी मार्केटच्या इमारती "बांधा वापरा व हस्तातरण करा '' या तत्वावर विकसित करणे.

<u>प्रस्तावना</u>

*उल्हासनगर शहरात कॅम्प नं. १ ते ५ मध्ये विविध ठिकाणी महानगरपालिकेच्या मालकीचे भाजी मार्केट आहेत. सदर भाजी मार्केटच्या इमारती जुन्या झालेल्या असल्यामुळे व त्यांचे देखभाल दुरूस्तीच्या कामावर महानगरपालिकेस मोठया प्रमाणात खर्च करावा लागतो. परंतु त्याअनुषंगाने महानगरपालिकेस पुरेसे उत्पन्न प्राप्त होत नाही. पर्यायाने भाजी विक्रेते व ग्राहक भाजी मार्केटच्या वापर न करता, रस्त्याच्या कडेचा वापर करतात. त्यामुळे रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. अन्य शहरांच्या तूलनेत उल्हासनगर शहरामध्ये नियोजनबद्धरित्या बांधलेले व्यापारी संकूल/ भाजी मार्केट नाही शहरामध्ये व्यापार व व्यवसायाची भरभराट होत असली तरी तेथे व्यापार व व्यवसायाला पोषक असे वातावरण नाही शहराच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी शहरामध्ये उच्च दर्जाचे पायाभुत सुविधा स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत पुरविणे आवश्यक असते वरील सर्व बाबींचा विचार करता अस्तित्वातील भाजी मार्केटच्या ठिकाणी भाजी विक्रेते व ग्राहकांच्या सोयीने नविन अत्याधुनिक मार्केटची/व्यापारी संकुलनाची निर्मिती करणे गरजेचे आहे.*

*२) अस्तित्वातील भाजी मार्केटच्या विकासाबाबत एकात्मिक दृष्टीकोनाची आवश्यकता :—*

*उल्हासनगर शहरातील मच्छी व भाजी मार्केट उल्हासनगर—२ व इंदिरा गांधी भाजी मार्केट, उल्हासनगर—३ येथे एकात्मिक दृष्टीकोन समोर ठेवून अस्तित्वातील भाजी मार्केटच्या ठिकाणी खालील प्रमाणे नविन भाजी मार्केट बनविण्याचे प्रस्तावित आहे.*

| अ.क्रं. | ठिकाण | प्लॉट क्षेत्रफळ | अस्तीत्वातील भाजी मार्केटचे क्षेत्रफळ | प्रस्तावित भाजी मार्केट |
|---|---|---|---|---|
| १. | मच्छी मार्केट व भाजी मार्केट सिंधुनगर, उल्हासनगर—२ | ३७० चौ. मी. | २१२ चौ.मी. | ३७० चौ.मी. |
| २. | मच्छी मार्केट व भाजी मार्केट सिंधुनगर, उल्हासनगर—३ | २४७४ चौ.मी. | १०५३.६५ चौ.मी. | २४७४ चौ.मी. |

..५७..

*त्याअनुषंगाने महानगरपालिकेमार्फत नियुक्त केलेल्या स्थापत्य सल्लागार मे. टेक्नो कन्स्लटंट यांचेकडुन या दोन्ही ठिकाणच्या भाजी मार्केटचा फिजीबीलीटी रिपोर्ट तयार करण्यात आला आहे. स्थापत्य सल्लागाराने तयार केलेल्या प्रस्तावित विकास कामासाठी अंदाजे रूपये ७.३६ कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर योजना ढोबळ स्वरूपाची असून अपेक्षित खर्चास वाढ अथवा घट होण्याची शक्यता आहे. सदर वरील ठिकाणी महानगरपालिकेच्या मालकीचे व स्वत:च्या खर्चाने भाजी मार्केट बांधण्यास मोठया प्रमाणात खर्च येणार आहे व पुढे या भाजी मार्केटचे देखभाल दुरूस्ती साठीही खर्च लागेल.*

*३) प्रस्तावित योजनेतील प्रमूख घटक :—*

*उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उद्योजकांच्या व्यवसायाचा वाढीचा विचार करून योजना तयार करण्यात आली आहे. भाजी मार्केटमधील भाजी विक्रेत्यांचे हित लक्षात घवुन त्यांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करणे प्रस्तावित आहे. योजनेतील प्रमुख घटक खालीलप्रमाणे.*

*अ) भाजी मार्केट/मच्छी मार्केट*
*ब) उद्योग /व्यापारी संकूल*
*क) वाहनतळ व इतर सेवा सुविधा*

*४) उक्त प्रकल्पामधुन प्राप्त होणारे उत्पन्न :—*

*महानगरपालिका क्षेत्रातील प्रस्तावित भाजी मार्केटच्या विकास करतांना नागरीकांना सुविधा पुरविण्याबरोबर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत बळकट करणे अपेक्षित आहे हा उद्देश ठेवुन योजना तयार करण्यात आली आहे. प्राथमिक अंदाजानुसार महानगरपालिकेस प्रथमवर्षी ३५.९७ लक्ष रूपयाचा महसुल प्राप्त होवु शकेल. या व्यतिरिक्त प्रकल्पामधुन महानगरपालिकेस खालिल माध्यमातुन उत्पन्न मिळेल.*

अ) *मालमत्ता करापोटी मिळणारे उत्पन्न.*
*ब) भाजी मार्केटमध्ये प्रस्तावित व्यापारी संकुलनामुळे मिळणारे जकात उत्पन्न.*
*क) भाजी मार्केटमध्ये व व्यापारी संकुलनामध्ये होणाऱ्या पाणीपुरवठया मधुन मिळणारे उत्पन्न.*
*ड) वाहनतळापासुन मिळणारे उत्पन्न.*

*५) अस्तित्वातील भाजी मार्केटच्या विकासासाठी महानगरपालिके समोरील पर्याय :—*

*पर्याय क्रं. १ : महानगरपालिकेच्या स्वत:च्या निधीमधुन खर्च करून भाजी माकेट, गाळे पार्कीग व्यपारी संकुलने बांधणे व ते भाडयाने देणे/विक्री करणे*

*पर्याय क्रं. २ : बांधा वापरा हस्तांतरीत करा तत्वावर भाजी मार्केट त्या इमारतीचा विकास करणे.*

*६) आर्थिक दायत्व :—*

*महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नातून व महसुली कामावर खर्च व भांडवली कामावर खर्च करण्यात येतो. उल्हासनगर शहरात विकासकामाच्या विविध योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, हुडको, व एमएमआरडीए अशा विविध वित्त संस्थांकडुन महानगरपालिकेने आधीच कर्जस्वरूपाने रक्कम उभारली आहे. तसेच महानगरपालिकेस पाणी देयकापोटी एमआयडीसीची थकीत बिले सुद्धा अदा करायची असल्याने.*

*महानगरपालिकेची आर्थिक स्थिती समाधानकारक आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या खर्चातुंन भाजी मार्केट उभारणे शक्य होणार नाही. तसेच महानगरपालिकेवर आधीच बोजा असल्यामुळे इतर वित्तीय संस्थाकडुन कर्ज मिळण्याची शक्यता कमी असल्यामुळे तसेच शहरात इतर विकासाची कामे सुरू असल्याने कर्जाची परतफेड देखभाल दुरूस्तीचा खर्च करणे ही अवघड होणार आहे.*

*७) बांधा वापरा व हस्तांतरण करा तत्वावर योजना राबविणे :—*

*सदर वरील बाबींचा विचार करता आर्थिक दृष्टया वरील कामे करणे शक्य होणार नसल्याने उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत ''बांधा वापरा व हस्तांतरण करा'' तत्वावर वरील प्रस्तावीत भाजी मार्केटच्या कामांची योजना राबविण्यास बांधकामाचा भांडवली खर्च संपुर्णत: खाजगी संस्थेमार्फत करण्यात येईल व पर्यायाने महानगरपालिकेस काहीही गुंतवणुक करावी लागणार नाही. तसेच कर्जाची व देखभाल दुरूस्तीचे दायित्व स्विकारण्याची आवश्यकता राहणार नाही.*

*उपरोक्त विषयान्वये मा. महापौर, उप महापौर उल्हासनगर महानगरपालिका व मा. सभापती सार्वजनिक बांधकाम समिती यांनी वरील चार ठिकाणी नव्याने ''बांधा वापरा व हस्तांतरण करा'' तत्वावर भाजीपाला मंडई विकसित करण्याचे सुचविले आहे. त्यानुसार मे. टेक्नो कन्स्लटंट यांचेकडुन प्राप्त फिजीबीलीटी रिपोर्ट नुसार, खाजगी संस्था मार्केट/विकसकामार्फत भाजी मंडईचे देखभाल दुरूस्ती करणे व देखभाल दुरूस्तीचा ३० वर्षाचा कालावधी*

*..५८..*

*पुर्ण झाल्यावर भाजी मंडई महानगरपालिकेस हस्तांतरण करणे हया बाबी अभिप्रेत आहेत. या योजनेत उल्हासनगर २ व ३ येथे भाजी मार्केट मध्ये भाजीपाला मंडई अथवा मच्छी बाजाराचे गाळे असतील. सदरचे भाजी मार्केट विकासकाने चालविणे अभिप्रेत असुन विकासकाने या योजने मधुन उपलब्ध होणारा महसुल महानगरपालिकेस अदा करावयाचा असुन कंन्स्लटंटचा रिपोर्ट नुंसार महानगरपालिकेस प्रथमवर्षी अंदाजित रू. ३५.९७ लक्ष इतका महसुल व पुढील २७ वर्षाकरीता अंदाजे ५ टक्के प्रति वर्ष वाढ धरून महसुल (भाजी मार्केट मर्यादीत) अपेक्षित आहे. ''बांधा*
*वापरा व हस्तांतरण करा'' तत्वावर योजना राबविण्यासाठी खाजगी संस्थांची निवड स्पर्धात्मक निविदा मागवुनच करणे अपेक्षित असुन खाजगी संस्थेशी करार करून योजनेचे बांधकाम देखभाल दुरूस्तीश करणे गरजेचे आहे.*

*८) करारनाम्यानुसार खाजगी संस्थेची जबाबदारी :—*

*१) उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत, तयार करण्यात आलेल्या आराखडयानुसार स्वखर्चाने भाजी मंडईचे बांधकाम करणे.*

*२) अस्तित्वातील भाजी मार्केटच्या ठिकाणी सद्या उपलब्ध असलेल्या जागेचे क्षेत्रफळ अस्तित्वातील भाजी मार्केटच्या क्षेत्रफळापेक्षा जास्त आहे. खाजगी संस्थेत सद्या अस्तित्वात असलेल्या भाजी मार्केट तोडून भाजी मार्केटच्या क्षेत्रफळाएवढे भाजी मार्केट तळमजल्यावर उभारणे बंधनकारक राहील. नगररचना नियमानुसार व मंजूर आराखड्या नुसार बांधकामासाठी उपलब्ध असलेले अतिरिक्त चटई क्षेत्र खाजगी संस्थेस व्यापारी संकूलनाकरीता वापरता येईल.*

*३) बांधकामासाठी आवश्यक परवाने मिळविणे.*

*४) बांधकामाचा कालावधी पुर्ण झाल्यावर मंडईतील गाळयाचे वाटप करणे, त्यामधुन येणाया उत्पन्नामधुन करारानुसार मासिक महसुल महानगरपालिकेत जमा करणे.*

*५) मंडईची पुर्ण देखभाल दुरूस्तीची जबाबदारी इमारतीची किरकोळ दुरूस्ती, विज देयके, पाणी देयके स्वच्छतागृहाची देखभाल, मंडईची साफसफाई व सुरक्षा व्यवस्था करणे.*

*६) योजना चालवावयाला घेतल्यानंतर, व्यवहारासंबंधी सर्व लेखा विषयक नोंदी अचुकतेने ठेवणे.*

*७) महानगरपालिकेने नेमलेल्या प्रकल्प सल्लागार (Consultant) व प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सटंट (PMC) यांचे शुल्क महानगरपालिकेकडे जमा करणे.*

८) कराराचा कालावधी संपल्यानंतर कंत्राटदाराने योजनेचा ताबा महानगरपालिकेकडे सोपवावा सदरची प्रक्रिया करार संपण्याच्या ६ महीने अगोदर सुरू करावी, महानगरपालिकेने योजनेची तपासणी करून काही निश्चित केलेली कामे अपुर्ण असल्यास त्वरीत कंत्राटदाराला कळवुन दोन महीनेचे आत पुर्ण करावी.

९) कंत्राटदारामार्फत देखभाल दुरूस्तीच्या आवश्यकतेबाबत कराराचा भंग झाल्यास त्याची दुरूस्ती कंत्राटदाराच्या खर्चाने करून घेण्याचे महानगरपालिकेस अधिकार राहतील. तसेच कंत्राटदाराकडुन बेजबाबदारपणे खालील बाबतीत कराराचा भंग नियमितरित्या होत असल्यास नागरी संस्था करार संपुष्टात आणु शकेल.

अ) देखभाल दुरुस्तीच्या आवश्यकतेकडे सारखे दुर्लक्ष/विलंब होत असेल किवा माफकाप्रमाणे काम न केल्यास.

ब) ग्राहकांच्या सोईबाबत, साफसफाईबाबत तक्रारी येत असल्यास

९) नागरी संस्थेची जबाबदारी.

१) खाजगी कंत्राटदाराशी करारनामा झाल्यावर महानगरपालिकेने योजनेसाठी जागा उपलब्ध करून देणे. तथापि जागे संबंधी सर्व आवश्यक कागदपत्रे मिळवीणे व जागसंबंधीचे वाद मिटवणे (आवश्यकता असल्यास) खाजगी संस्थेस बंधन कारक राहातील

२) कराराच्या दरम्यान, आवश्यक परवानग्या, मान्यता मिळविण्यासाठी कंत्राटदारास सहकार्य करणे.

३) देखभाल दुरुस्तीच्या दरम्यान किरकोळ काम कंत्राटदाराला करण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करणे.

४) अस्तित्वातील भाजी मार्केटच्या ठिकाणी नविन भाजी मार्केट उभारण्यास सुमारे २ वर्षाचा कालावधी लागणार असल्याने भाजी विक्रेत्यांकरीता नजीकच्या भागात भाजी विक्री करीता तातुपरत्या स्वरूपाची व्यवस्था करणे.

१०) प्रशासनाचा प्रस्ताव :—

सबब महानगरपालिकेचे हित, प्रकल्प पुर्ण होण्यास लागणारा कालावधी, आर्थिक दायित्व, महसुली उत्पन्न, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करता उल्हासनगर कॅम्प २ ते ३ मधील वरील २ प्रस्तावित ठिकाणी ''बांधा वापरा व हस्तांतरण करा'' तत्वावर भाजी मंडई बांधण्याचा प्रस्ताव, महानगरपालिकेच्या हिताचा असल्याने, प्रस्ताव मंजुरीसाठी महासभेच्या पटलावर ठेवण्यास मंजूरी मिळावी हि विनंती. तसेच प्रस्तावित प्रकल्पाच्या जागे संबंधीची सर्वकश पडताळणी करण्यासाठी नस्ती नगर रचनाकार यांचेकडे पाठवून त्यांचे अभिप्राय घेणेस विनंती.

<u>महासभा ठराव क्र:</u> २३ <u>दिनांक:–१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी, शर्ती व निर्बंधांवर उल्हासनगर शहरातील कॅम्प २ व ३ मधे अस्तित्वात असलेल्या भाजी मार्केटच्या इमारती "बांधा वापरा व हस्तातरण करा '' या तत्वावर विकसित करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १९** :– उल्हासनगर शहरातील कॅम्प ३ मधील सपना गार्डन येथे बहुमजली स्वयंचलीत पध्दतीचे अत्याधुनिक कार पार्कींग "बांधा वापरा व हस्तातरण करा'' या तत्वावर विकसित करणे.

---

<u>महापालिका सचिव :–</u>पास? सर्वानुमते?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>याठिकाणी आरक्षण कसले आहे ते पहावे लागेल. विकास आराखडयामध्ये हा भुखंड कशासाठी आरक्षित आहे?

<u>महापालिका सचिव :–</u>आरक्षणात बदल करण्यासाठी सुध्दा यामध्ये प्रस्ताव आहे. ठरावात बदल करावयाचा आहे.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी:–</u>आम्हां सर्वांना असे वाटते की त्याठिकाणी पार्किंगची सुविधा व्हावी. परंतु या ठरावानुसार आरक्षणात बदल होईल का? किंवा त्यासाठी आम्हांला स्वतंत्र ठराव पारीत करावा लागेल. याची आम्हांला कायदेशीर माहिती दया. तेथे पार्किंगची सुविधा उपलब्ध व्हावी अशी आमची इच्छा आहे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>मला तर असे वाटते की याबाबत नगररचनाकारांचा अभिप्राय घेतला जावा. आरक्षण काय आहे आणि हे काम कसे होवू शकते?

<u>महापालिका सचिव :–</u>या विषयान्वये दोन्ही प्रस्ताव एकत्रितपणे आणलेले आहेत.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>एमआरटीपी ॲक्टच्या कलम ३७ अनुसार प्रस्ताव पास करावा लागेल जोपर्यंत तो पास करणार नाही तोपर्यंत आपला हा प्रकल्प होणार नाही.

<u>महापालिका सचिव :–</u>बरोबर आहे.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>तर माझी अशी सूचना आहे की कायदयानुसार प्रस्ताव पास केला नाही तर त्यामध्ये सुधारणा होणार नाही. त्यासाठी एक विशेष महासभा बोलविण्यात यावी अशी आमची इच्छा आहे व त्यासाठी लवकरात लवकर तो प्रस्ताव आणला जावा. तोपर्यंत हा विषय पुढे ढकलला जावा. नाहीतर त्याबाबत आपण मार्गदर्शन करा. कसे करणार?

..६०..

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>मा. महापौर महोदया, सदरचा विषय पारीत केला तर पुढील कार्यवाही सुरु करता येईल. हा प्रस्ताव फक्त तत्वत: मान्य करण्यासाठी आहे. एकदा महासभेने मंजुरी दिल्यानंतर टप्प्याटप्प्याने पुढची कार्यवाही करता येईल. प्रस्ताव असा आहे की बीओटीवर घ्यायचा आहे की नाही. एकदा प्रस्ताव पारीत केला तर टप्याटप्याने पुढील कार्यवाही करता येईल. जर महासभेने मंजुरी दिली तर पुढील कार्यवाही सुरु होईल, नाहीतर कार्यवाही बंद करता येईल.

<u>महापालिका सचिव :–</u>ठराव अशाप्रकारे असेल, तो मी वाचुन दाखवितो. ही महासभा आवश्यकतेप्रमाणे मंजुर विकास आराखडयात बगीच्यासाठी आरक्षित असलेल्या आरक्षण क्र. २६ मध्ये किंवा सुधारित विकास योजनेमध्ये कायदेशिर पुर्ततेच्या अधिन राहून वाहनतळाचे प्रयोजनार्थ बदल करण्यास व वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी, शर्ती व निर्बंधांवर उल्हासनगर शहरातील कॅम्प ३ मधील सपना गार्डन येथे बहुमजली स्वयंचलीत पध्दतीचे अत्याधुनिक कार पार्कींग ''बांधा वापरा व हस्तातरण करा'' या तत्वावर विकसित करणेस मान्यता देत आहे.
ठिक आहे?

मा. सदस्य/सदस्या श्रीमती मालती करोतिया, श्रीमती रजनी महाडिक, श्री. मोहन साधवानी, श्री. तुलसीदास वसिटा हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १९ :–** उल्हासनगर शहरातील कॅम्प ३ मधील सपना गार्डन येथे बहुमजली स्वयंचलीत पध्दतीचे अत्याधुनिक कार पार्कींग ''बांधा वापरा व हस्तातरण करा'' या तत्वावर विकसित करणे.

<u>प्रस्तावना</u>

*उल्हासनगर शहर हे मुंबई–पुणे रेल्वे लाईन वर बसलेले शहर असून शहरात मोठया प्रमाणात लघु उद्योग चालतात. तसेच शहरात मोठया प्रमाणात फर्निचर व इलेक्ट्रॉनिक वस्तुचे मार्केट आहेत. अन्य शहरांच्या तूलनेत उल्हासनगर शहरामध्ये नियोजनबद्धरित्या बांधलेले व्यापारी संकूल/वाहन तळ नाही शहरामध्ये व्यापार व व्यवसायाची भरभराट होत असली तरी तेथे व्यापार व व्यवसायाला पोषक असे वातावरण नाही शहराच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी शहरामध्ये उच्च दर्जाचे पायाभुत सुविधा स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत पुरविणे आवश्यक असते शहराला व्यापारी स्वरूप असल्याने शहरातील तसेच लगतच्या शहरातून या भागात मोठया प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. परंतू शहरातील या भागात वाहनतळाची व्यवस्था नसल्याने व्यापाऱ्यांमार्फत तसेच बाहेरून येणाऱ्या खरेदीदारामार्फत वाहने रस्त्याच्या लगतच्या उभे करण्यात येतात व त्यामुळे वाहतूक कोंडी होते. त्यामुळे या उल्हासनगर कॅम्प क्र.२ व ३ या भागातील वाहन तळाची आवश्यकता आहे.*

*जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निमाण अभियानाअंतर्गत शहराचा विकास आराखडा; (CDP) तयार करण्यात आला असून या आराखडयात सुध्दा शहरामध्ये विविध ठिकाणी पार्कीग करणेच्या कामाचा समावेश आहे. सदर वरील ठिकाणी महानगरपालिकेमार्फत स्वत:च्या खर्चाने वाहनतळ बांधायचे असल्यास मोठया प्रमाणात खर्च येणार आहे व पुढे या वाहनतळाचा देखभाल दुरूस्तीसही खर्च लागेल.*

*महानगरपालिकेमार्फत नियुक्त केलेल्या स्थापत्य सल्लागार मे. टेक्नो कन्स्लटंट यांचेकडुन वाहनतळ विकास प्रकल्पाचा फिजीबीलीटी रिपोर्ट तयार करण्यात आला आहे. स्थापत्य सल्लागाराने तयार केलेल्या प्रस्तावित विकास कामासाठी अंदाजे रूपये १३.५० कोटी खर्च अपेक्षित आहे.*

*सदर योजना ढोबळ स्वरुपाची असून अपेक्षित खर्चास वाढ अथवा घट होण्याची शक्यता आहे. सदर ठिकाणी महापालिकेमार्फत उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या जागेच्या क्षेत्रफळानूसार, विकासकाने कार पार्कींगची व्यवस्था करावयाची आहे. तसेच या भागात असणारी नागरीकांचर वर्दळ लक्षात घेउन उपलब्ध जागेपैकी काही क्षेत्रात व्यापारी संकूलाची व्यवस्था देखील करावयाची आहे.*

२) प्रस्तावित योजनेतील प्रमूख घटक :—

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उद्योजकांच्या व्यवसायाच्या वाढीचा विचार करून योजना तयार करण्यात आली आहे. योजनेतील प्रमुख घटक खालीलप्रमाणे.

अ) वाहनतळ

ब) व्यापारी संकूल

क) वाहनतळापासुन सुमारे १.५० कि.मीच्या परिसरात चोहोबाजुंनी रस्त्याच्या बाजुस होणाऱ्या पार्कींग वरती निर्बंध करणे.

३) उक्त प्रकल्पामधुन प्राप्त होणारे उत्पन्न :—

महानगरपालिका क्षेत्रातील प्रस्तावित वाहन तळाचा विकास करतांना नागरीकांना सुविधा पुरविण्याबरोबर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत बळकट करणे अपेक्षित आहे हा उद्देश ठेवुन योजना तयार करण्यात आली आहे. प्राथमिक अंदाजानुसार महानगरपालिकेस दरवर्षी वाहनतळापासुन पाच लक्ष रूपयाचा महसुल प्राप्त होवु शकेल

४) वाहनतळाच्या विकासासाठी महानगरपालिकेसमोरील पर्याय

पर्याय क्रं. १ : महानगरपालिकेच्या स्वतःच्या निधीमधुन खर्च करून पार्कींग/व्यपारी संकुलने बांधणे व ते भाडयाने देणे/ विक्री करणे

पर्याय क्रं. २ : बांधा वापरा हस्तांतरीत करा तत्वावर वाहनतळ इमारतीचा विकास करणे.

५) आर्थिक दायत्व :—

महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नातून व महसुली कामावर खर्च व भांडवली कामावर खर्च करण्यात येतो. उल्हासनगर शहरात विकासकामाच्या विविध

योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, हुडको, व एमएमआरडीए अशा विविध वित्त संस्थांकडुन महानगरपालिकेने आधीच कर्जस्वरूपाने रक्कम उभारली आहे. तसेच महानगरपालिकेस पाणी देयकापोटी एमआयडीसीची थकीत बिले सुद्धा अदा करायची असल्याने. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती समाधानकारक आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या खर्चातुंन वाहन तळ उभारणे शक्य होणार नाही. तसेच महानगरपालिकेवर आधीच बोजा असल्यामुळे इतर वित्तीय संस्थाकडुन कर्ज मिळण्याची शक्यता कमी असल्यामुळे तसेच शहरात इतर विकासाची कामे सुरू असल्याने कर्जाची परतफेड देखभाल दुरूस्तीचा खर्च करणे ही अवघड होणार आहे.

६) बांधा वापरा व हस्तांतरण करा तत्वावर योजना राबविणे :—

वरील बाबींचा विचार करता आर्थिक दृष्टया वरील कामे करणे शक्य होणार नसल्याने उल्हासनगर महानगरपालिके मार्फत ''बांधा वापरा व हस्तांतरण करा'' तत्वावर वरील वाहन तळाच्या कामांची योजना राबविण्यास बांधकामाचा भांडवली खर्च संपुर्णतः खाजगी संस्थेमार्फत करण्यात येईल व पर्यायाने महानगरपालिकेस काहीही गुंतवणुक करावी लागणार नाही. तसेच कर्जाची व देखभाल दुरूस्तीचे दायित्व स्विकारण्याची आवश्यकता राहणार नाही.

उपरोक्त विषयान्वये व शहराच्या विकास आराखडयानुसार मे. टेक्नो कंन्स्लटंट यांचेकडून प्राप्त फिजीबीलीटी रिपोर्ट नुसार, खाजगी संस्था मार्केट/विकासकामार्फत २ वर्षात वाहनतळाचे बांधकाम करणे. पुढील २७ वर्षे वाहन तळाची देखभाल दुरूस्तीचा २७ वर्षाचा कालावधी पुर्ण झाल्यावर वाहनतळ महानगरपालिकेस हस्तांतरण करणे हया बांबी अभिप्रेत असुन विकासकाने या योजनेमधुन उपलब्ध होणाया महसुलामधुन महानगरपालिकेस पहिल्या वर्षाकरिता कमीत कमी ५.०० लक्ष व पुढील २७ वर्षाकरीता ५ टक्के प्रति वर्ष वाढ धरून भरणे अपेक्षित आहे. ''बाधां वापरा हस्तांतरण करा'' तत्वावर योजना राबविण्यासाठी खाजगी संस्थांची निवड स्पर्धात्मक निविदा मागवुनच करणे अपेक्षित असुन खाजगी संस्थेशी करार करून योजनेचे बांधकाम, देखभाल दुरूस्ती, इत्यादी गोष्टींचा करारनाम्यात समावेश करणे गरजेचे आहे.

७) करारनाम्यानुसार खाजगी संस्थेची जबाबदारी :—

१) उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत, तयार करण्यात आलेल्या आराखडयानुसार स्वखर्चाने वाहन तळाचे बांधकाम करणे.

२) बांधकामासाठी आवश्यक परवाने मिळविणे.

३) बांधकामाचा कालावधी पुर्ण झाल्यावर वाहन तळ देखभाल दुरूस्ती करणे, चालविणे तसेच वाहनतळापासुन सुमारे १.५० कि.मीच्या परिसरात चोहोबाजुंनी रस्त्याच्या बाजुस पार्कींग होणार नाही याची खबरदारी घेणे.



४) वाहनतळाचे पुर्ण देखभाल दुरूस्तीची जबाबदारी जसे, इमारतीची किरकोळ दुरूस्ती, विज देयके, पाणी देयके स्वच्छतागहाची देखभाल, साफसफाई व सुरक्षा व्यवस्था ठेवणे.

५) योजना चालवावयाला घेतल्यानंतर, व्यवहारासंबंधी सर्व लेखा विषयक नोंदी अचुकतेने ठेवणे.

६) कराराचा कालावधी संपल्यानंतर कंत्राटदाराने योजनेचा ताबा महानगरपालिकेकडे सोपवावा सदरची प्रकिया करार संपण्याच्या ६ महीने अगोदर सुरू करावी, महानगरपालिकेने योजनेची तपासणी करून काही निश्चित केलेली कामे अपुर्ण असल्यास त्वरीत कंत्राटदाराला कळवुन दोन महीन्याचे आत पुर्ण करावी

७) कंत्राटदारामार्फत देखभाल दुरूस्तीच्या आवश्यकतेबाबत कराराचा भंग झाल्यास त्याची दुरुस्ती कंत्राटदाराच्या खर्चाचे करून घेण्याचे महानगरपालिकेस अधिकार राहतील. तसेच कंत्राटदाराकडुन बेजबाबदारपणे खालील बाबतीत कराराचा भंग नियमितरित्या होत असल्यास नागरी संस्था करार संपुष्टात आणु शकेल.

अ) देखभाल दुरूस्तीच्या आवश्यकतेकडे सारखे दुर्लक्ष/विलंब होत असेल किवा मापकाप्रमाणे काम न केल्यास.

ब) ग्राहकांच्या सोईबाबत तक्रारी येत असल्यास.

क) कन्सेशन फी महानगरपालिकेस नियमित न भरल्यास.

ड) वाहन तळावर वाहनधारकांकडुन विहीत रक्कमेपेक्षा जास्त रक्कम वसुलीबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास

८) महानगरपालिकेने नेमलेले प्रकल्प सल्लागार (Consultant) व प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंसी (PMC) यांचे शुल्क महापालिकेकडे जमा करणे.

८) नागरी संस्थांची जबाबदारी :–

१) खाजगी कंत्राटदाराशी करारनामा झाल्यावर महानगरपालिकेने योजनेसाठी जागा उपलब्ध करून देणे. तथापी पार्कींगसाठी नियोजीत असलेल्या जागे संबंधी सर्व आवश्यक कागदपत्रे मिळवीणे व जागेसंबंधीचे असलेले वाद मिटवणे खाजगी संस्थेस बंधन कारक असेल.

२) कराराच्या दरम्यान, आवश्यक परवानग्या, मान्यता मिळविवयासाठी कंत्राटदारास सहकार्य करणे.

३) देखभाल दुरूस्तीच्या दरम्यान किरकोळ काम कंत्राटदाराला करण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करणे.

९) वाहनतळ :–

वाहनतळ बांधण्यासाठी महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत असलेले सुलभ शौचालय व वाचनालय वाहनतळाच्या बांधकामात येत सदर वाचनालय व सुलभ शौचालय तोडावे लागेल यापैकी वाचनालय पुन्हा बांधणे आवश्यक आहे. वाचनालय पुर्नबांधणीचा समावेश वाहनतळाच्या प्रस्तावात करून ते खाजगी संस्थेकडून बांधुन घ्यावे लागेल याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. तसेच सदर जागा गार्डनसाठी आरक्षित आहे याच ठिकाणी चांगल्या प्रकारे विकसीत केलेले परिपुर्ण असे गार्डन व बालोद्यान असुन नागरिक त्याचा वापर करत आहेत. सद्यास्थितीत या भागासाठी सदर गार्डन पुरेसे आहे असे वाटते, शहरातील पार्कींगची ज्वलंत समस्या सोडवण्यासाठी आरक्षणात किरकोळ फेरबदल करण्याचा धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

१०) प्रशासनाचा प्रस्ताव :–

सबब महानगरपालिकेचे हित, प्रकल्प पुर्ण होण्यास लागणारा कालावधी, आर्थिक दायित्व, महसुली उत्पन्न, या सर्व गोष्टीचा सर्वकष विचार करता उल्हासनगर कॅम्प ३ येथील सपना गार्डन समोरील रिकाम्या जागेत ''बांधा वापरा व हस्तांतरण करा'' तत्वावर वाहन तळ बांधण्याचा प्रस्ताव, महानगरपालिकेच्या हिताचा आहे. तरी खालील बाबींवर निर्णय घेण्यासाठी सदर प्रस्ताव महापालिकेच्या पटलावर ठेवण्यासाठी मंजूरी मिळावी हि विनंती.

अ) आरक्षणात किरकोळ फेरबदल करणे.

ब) बांधा वापर व हस्तांतरीत करा या तत्वावर वाहनतळ विकसीत करण्यासाठी मंजूरी मिळणे.

*तथापि जागेवरील आरक्षण व जागेसंबंधिचे अनुषंगिक बाबी तपासणीसाठी व अभिप्रायासाठी नगररचनाकार यांना निर्देश व्हावेत ही विनंती. व अभिप्रायासाठी नगररचनाकार यांना निर्देश व्हावेत ही विनंती.*

<u>महासभा ठराव क्र:</u> २४ <u>दिनांक:–१२/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा आवश्यकतेप्रमाणे मंजुर विकास आराखडयात बगीच्यासाठी आरक्षित असलेल्या आरक्षण क्र. २६ मध्ये किंवा सुधारित विकास योजनेमध्ये तरतुदी कायदेशिर पुर्ततेच्या अधिन राहून वाहनतळाचे प्रयोजनार्थ बदल करण्यास व वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी, शर्ती व निर्बंधांवर उल्हासनगर शहरातील कॅम्प ३ मधील सपना गार्डन येथे बहुमजली स्वयंचलीत पध्दतीचे अत्याधुनिक कार पार्कींग ‘‘बांधा वापरा व हस्तातरण करा’’ या तत्वावर विकसित करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २० :**— दिनांक १४/०७/२०१० पासून विशेष समित्यांची रचना करणे.

---

सदस्य श्री. सुरेश जाधव :—विषय पुढे ढकला, समिती काम करीत नाही. आज हया समित्या चालु करुन ४ महिने झाले आहेत समित्या काही काम करत नाहीत. उगाच अधिका—यांना त्रास देतात. हा विषय वगळण्यात यावा.

महापालिका सचिव :—सर्व सन्माननिय गटनेत्यांची सूचना आलेली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्यावतीने

सार्वजनिक बांधकाम समिती
१. श्री. प्रभुनाथ गुप्ता
२. श्री. राजु जग्यासी

नियोजन व विकास समिती
१. श्रीमती सुरेखा वेलकर
२. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती
१. श्रीमती निलु चांदवानी
२. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

आरोग्य व वैद्यकीय सहाय्य समिती
१. श्री. संजय बठिजा
२. श्री. सतिश चहाळ

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती
१. श्रीमती मंजु पोपटानी
२. श्री. अनिल ऐलानी

गलिच्छ वस्ती व निर्मुलन समिती
१. श्री. प्रभुनाथ गुप्ता
२. श्री. हिरानंद जग्यासी

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती
१. श्री. रविंद्र बागुल
२. श्री. गणपत एडके

महिला व बालकल्याण समिती
१. श्रीमती सुजाता रिजवानी

२. श्रीमती निलु चांदवानी

महसूल समिती

१. श्री. भारत राजवानी
२. श्रीमती संगिता कंडारे

## आरपीआयपक्षाच्या वतीने

सार्वजनिक बांधकाम समिती
१. श्रीमती सुमन शेळके

नियोजन व विकास समिती
१. श्री. बी.बी.मोरे

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती
१. श्री. जे.के. ढोके

आरोग्य व वैद्यकीय सहाय्य समिती
१. श्रीमती सुमन शेळके

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती
१. श्रीमती लता निकम

गलिच्छ वस्ती व निर्मुलन समिती
१. श्रीमती पंचशिला पवार

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती
१. श्री. जे.के. ढोके

महिला व बालकल्याण समिती
१. श्रीमती लता निकम

महसूल समिती
१. श्री. बी.बी. मोरे

## भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्यावतीने

सार्वजनिक बांधकाम समिती
१. श्री.मोहन साधवानी

नियोजन व विकास समिती
१. श्रीमती इंदिरा उदासी

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती
१. श्री. सुंदर मंगतानी

आरोग्य व वैद्यकीय सहाय्य समिती
१. श्री. तुलसीदास वसिटा

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती
१. श्रीमती रजनी महाडिक

गलिच्छ वस्ती व निर्मुलन समिती
१. श्रीमती मालती करोतिया

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती
१. श्रीमती रजनी महाडिक

महिला व बालकल्याण समिती
१. श्रीमती मालती करोतिया

महसूल समिती
१. श्री. मोहन रहंदोमल साधवानी

## शिवसेना पक्षाच्यावतीने

सार्वजनिक बांधकाम समिती
१. श्री. राजेश वानखेडे
२. श्री. मुकेश तेजी

नियोजन व विकास समिती

१. श्री. दिलीप गायकवाड

२. श्री. प्रधान पाटील

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

१. श्रीमती वसुंधरा बोडारे

२. श्री. श्रीमती ज्योती माने

..६५..

आरोग्य व वैद्यकीय सहाय्य समिती

१. श्रीमती जयश्री सुर्वे

२. श्रीमती नेहा भोईर

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

१. श्री. विजय सुपाळे

२. श्री. रामसागर यादव

गलिच्छ वस्ती व निर्मुलन समिती

१. श्री. दिलीप गायकवाड

२. श्रीमती नेहा भोईर

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती

१. श्री. शेखर यादव

२. श्रीमती जयश्री सुर्वे

महिला व बालकल्याण समिती

१. श्रीमती मिनाताई सोनेजी

२. श्रीमती वसुंधरा बोडारे

महसूल समिती

१. श्रीमती विद्याताई निर्मले

२. श्री. मुकेश तेजी

भारतीय जनता पक्षाच्यावतीने

सार्वजनिक बांधकाम समिती

१. श्री. किशोर जग्यासी

नियोजन व विकास समिती

१. श्री. रामचंद्र पारवानी

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

१. श्री. महेश सुखरामानी

आरोग्य व वैद्यकीय सहाय्य समिती

१. डॉ. निना नाथानी

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

१. श्री. हरेश जग्यासी

गलिच्छ वस्ती व निर्मुलन समिती

१. श्री. लालबिहार यादव

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती

१. कु. शकुंतला जग्यासी

महिला व बालकल्याण समिती

१. श्रीमती शकुंतला पाटील

महसूल समिती

१. श्रीमती जया माखिजा

लोकभारती पक्षाच्यावतीने

सार्वजनिक बांधकाम समिती

१. श्री. अंकुश म्हस्के

२. श्री. दिलीप जग्यासी

नियोजन व विकास समिती

१. श्रीमती चंद्रा टेकचदांनी

२. श्री. जीवन इदनानी

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

१. श्रीमती कविता सिरवानी

२. श्री. जीवन इदनानी

आरोग्य व वैद्यकीय सहाय्य समिती

१. श्री. मोहनदास रामरख्यानी

२. श्री. दत्तात्रय पवार

..६६..

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

१. श्री. दत्तारत्रय पवार

२. श्रीमती चंद्रा टेकचंदानी

गलिच्छ वस्ती व निर्मुलन समिती

१. श्री. गोविंदराम लुंड

२. श्री. अंकुश म्हस्के

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती

१. श्री. गोविंदराम लुंड

२. श्रीमती ज्योती चैनानी

महिला व बालकल्याण समिती

१. श्रीमती कविता सिरवानी

२. श्रीमती ज्योती चैनानी

महसूल समिती

१. श्री. मोहनदास रामरख्यानी

२. श्री. दिलीप जग्यासी

ठिक आहे? पास?

काही सदस्य :—पास—पास......

यावेळी मा. सदस्या श्रीमती मोना वनवारी हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. २०:—** दिनांक १४/०७/२०१० पासून विशेष समित्यांची रचना करणे.

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये विशेष समित्यांची नेमणुक करता येते व महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाजाचे नियम ४ अन्वये खालील आठ समित्यांची नेमणुक करता येते. त्यानुसार महासभा ठराव क्र. ४७, दिनांक १३/११/२००९ अन्वये खालील नऊ विशेष समित्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

१. सार्वजनिक बांधकाम समिती
२. नियोजन व विकास समिती
३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती
४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती
५. माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती
६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

७. क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

८. महिला व बालकल्याण समिती

९. महसूल समिती

वरील विशेष समित्यांची आठ महिन्याची मुदत दिनांक १३/७/२०१० रोजी संपृष्टात येत आहे. त्यामुळे दिनांक १४/७/२०१० पासून नविन ८ समित्यांची रचना करणे आवश्यक आहे.

प्रत्येक समितीत ९ सदस्यांची नियुक्ती करता येईल. महापालिकेच्या विशेष समितीवर ९ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या

संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

..६७..

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | १७ | १६ | १२ | ६ | ५ | २ | १ |

$$\frac{७६}{९} = ८.४४$$

प्रत्येक विशेष समितीवर एका सदस्याचे निवडणूकीसाठी मतांचे प्रमाण– ८.४४ असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देश खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | लोकभारती | $\frac{१७}{७६} X ९$ | = २.०१ | (५) | कॉंग्रेस | $\frac{६}{७६} X ९$ | = ०.७१ |
| (२) | शिवसेना | $\frac{१७}{७६} X ९$ | = २.०१ | (६) | आरपीआय | $\frac{५}{७६} X ९$ | = ०.५९ |
| (३) | रा.का.पा. | $\frac{१६}{७६} X ९$ | = १.८९ | (७) | म.न.से. | $\frac{२}{७६} X ९$ | = ०.२३ |
| (४) | भाजपा | $\frac{१२}{७६} X ९$ | = १.४२ | (८) | अपक्ष | $\frac{१}{७६} X ९$ | = ०.११ |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय प्रत्येक समितीवर खालील नेमणूका करण्यात येतील.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | एकूण |
|---|---|---|---|---|
| २ | २ | १ | १ | ६ |

यानंतर रिक्त राहणा–या तीन जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल.

त्यामुळे खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ खालील प्रमाणे आहे.

**(१) लोकभारती** ०.०१ **(२) शिवसेना** ०.०१ **(३) रा.का.पा.** ०.८९

**(४) भा.ज.पा.** ०.४२ **(५) कॉंग्रेस** ०.७१ **(६) आरपीआय** ०.५९

**(७) म.न.से** ०.२३ **(८) अपक्ष** ०.११

वरील परिस्थिती पहाता प्रत्येक समितीवर भाजपा, कॉंग्रेस व आरपीआय या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे व त्यामुळे तीन रिक्त जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक–एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाचे विशेष समितीत प्रमाणाशिर प्रतिनिधीत्व खालील प्रमाणे करण्यास प्रस्तावित.

| लोकभारती | शिवसेना | रा.का.पा. | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | २ | २ | १ | १ | १ | ० | ० | ९ |

महासभा ठराव क्र: २५ दिनांकः—१२/७/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :—श्री. धंनजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्ताव विचारत घेता दिं. १४.०७.२०१० ते ३०.०४.२०११ या कालावधीसाठी प्रत्येक विषय समितीवर नऊ पालिका सदस्यांचा समावेश असलेल्या खालील ९ विषय समित्यांची नेमणुक करीत आहे.

१. सार्वजनिक बांधकाम समिती

१ श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के
२. श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी
३. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे
४. श्री. मुकेश मोहन तेजी
५. श्री. प्रभुनाथ दुखंती गुप्ता

..६८..

६. श्री. राजु किशनचंद जग्यासी
७. श्री. किशोर जीवनलाल जग्यासी
८. श्री. मोहन रहोदंमल साधवानी
९. श्रीमती सुमन गजानन शेळके

२. नियोजन व विकास समिती

१. श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी
२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी
३. श्री. दिलीप दशरथ गायकवाड
४. श्री. प्रधान धर्मा पाटील
५. श्रीमती सुरेखा राजन वेलकर
६. श्रीमती सरोजीनी मुरलीधर टेकचंदानी
७. श्री. रामचंद्र (चार्ली) फुंदुमल पारवानी
८. श्रीमती इंदिरा जमनादास उदासी
९. श्री. बी. बी. मोरे

३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

१. श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी
२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी
३. श्रीमती वसुधा धनंजय बोडारे
४. श्रीमती ज्योती शाम माने
५. श्रीमती निलु ठाकुर चांदवानी
६. श्री. नरेंद्र कुमार ठाकूर
७. श्री. महेश सुखरामानी
८. श्री. सुदंर (बाबु) मंगतानी
९. श्री. जे. के. ढोके

४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

१. श्री. मोहनदास (गारो) रामरख्यानी
२. श्री. दत्तात्रय नारायण पवार
३. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे
४. श्रीमती नेहा नंदकुमार भोईर
५. श्री. सजंय (बबु) भटीजा
६. श्री. सतिश ताताब्या चहाळ
७. डॉ. निना प्रकाश नाथानी
८. श्री. तुलसी बद्रीचंद वसिटा
९. श्रीमती सुमन गजानन शेळके

५. माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

१. श्री. दत्तात्रय नारायण पवार
२. श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी
३. श्री. विजय खंडु सुपाळे
४. श्री. रामसागर जनार्दन यादव
५. श्रीमती मंजु इश्वर पोपटणी

..६९..

६. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी
७. श्री. हरेश परमानंद जग्यासी
८. श्रीमती रजनी मोहन महाडीक
९. श्रीमती लता शांताराम निकम

## ६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

१. श्री. गोविदंराम डोलुमल लुंड
२. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के
३. श्री. दिलीप दशरथ गायकवाड
४. श्रीमती नेहा नदंकुमार भोईर
५. श्री. प्रभुनाथ दुखंती गुप्ता
६. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी
७. श्री. लालबिहारी बुझारत यादव
८. श्रीमती मालती राधाचरण करोतीया
९. श्री. पंचशिला नाना पवार

## ७. क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

१. श्री गोविदंराम डोलुमल लुंड
२. श्रीमती ज्योती रमेश चैनानी
३. श्री. शेखर केशव  यादव
४. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे
५. श्री. रवीद्र दशरथ बागुल
६. श्री. गणपत गोविंद एडके
७. कु. शकुंतला जीवनलाल जग्यासी
८. श्रीमती रजनी मोहन महाडीक
९. श्री. जे. के. ढोके

## ८. महिला व बालकल्याण समिती

१. श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी
२. श्रीमती ज्योती रमेश चैनानी
३. श्रीमती मिनाताई दिपक सोनेजी
४. श्रीमती वसुधा धनंजय बोडारे
५. श्रीमती सुजाता रमेश रिजवाणी
६. श्रीमती निलु ठाकुरदास चांदवानी
७. श्रीमती शकुतंला कौतिक पाटील
८. श्रीमती मालती राधाचरण करोतीया
९. श्रीमती लता शातांराम निकम

## ९. महसूल समिती

१. श्री. मोहन (गारो) नारायणदास रामरख्यानी
२. श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी
३. श्रीमती विद्या विजय निर्मळे
४. श्री. मुकेश सोहन तेजी
५. श्री. भारत (गंगोत्री) रामचंद्र राजवानी

..७०..

६. श्री. संगिता राजेश कंडारे
७. श्रीमती जया प्रकाश माखिजा
८. श्री. मोहन रहंदोमल साधवानी
९. श्री. बी. बी. मोरे

या ठरावाव्दारे घेतलेला निर्णय अतिंम असुन  इतिवृत्त कायम होण्याची पहाता थेट अमंलात आणता येईल.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २१ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २१** :— उल्हासनगर कॅम्प नंबर १,२ व ३ मधील भिषण पाणीटचांईवर तोडगा काढणे.

---

काही सदस्य :—विषय वगळा

महापौर :— सदरचा विषय वगळण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

✂

**विषय क्र. २१**:— उल्हासनगर कॅम्प नंबर १,२ व ३ मधील भिषण पाणीटचांईवर तोडगा काढणे.

महासभा ठराव क्र: २५ अ    दिनांक:—१२/७/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. रामचंद्र पारवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

ही महासभा उल्हासनगर कॅम्प नंबर १,२ व ३ मधील भिषण पाणीटचांईवर तोडगा काढणे कामीचा विषय या सभा सुचनेवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ७.३५ वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—१९/७/२०१०

# ३

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १९/७/२०१० रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१०.महापौर –– श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

११.उप–महापौर –– श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३६ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ३ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३७ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ४ | श्री. गायकवाड दिलीप | ३८ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ५ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३९ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४० | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४१ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ८ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४२ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४३ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४४ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ११ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | ४५ | श्री. शेखर केशव यादव |
| १२ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४६ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १३ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४७ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १४ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४८ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १५ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४९ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५० | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५१ | श्री. किशोर जग्यासी |
| १८ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५२ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५३ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २० | श्री. राजू जग्यासी | ५४ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २१ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५५ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २२ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५६ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २३ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५७ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| २४ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५८ | श्री. मोहन साधवाणी |
| २५ | श्री. लाल पंजाबी | ५९ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २६ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६० | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २७ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६१ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २८ | श्रीमती शकुंतला पाटील | ६२ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २९ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६३ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३० | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६४ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३१ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६५ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३२ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६६ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३३ | श्री.एडके गणपत गोविंद | ६७ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३४ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६८ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३५ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ६९ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती जया प्रकाश माखीजा, २. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ३. श्री. आयलानी कुमार उत्तमचंद, ४. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम, ५. श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा, ६. श्रीमती महाडीक रजनी मोहन, ७. श्रीमती चेनानी ज्योती रमेश, ८. श्रीमती मीना सोनेजी (सोंडे), ९. श्री. सुनिल साहेबराव गंगवानी, १० श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी, ११. श्री. राजेश नानीकराम वधारीया, १२. श्री. भठीजा (बब्बु) संजय

श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.
४६.श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त
४७.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४८.श्रीमती संगिता धायगुडे, उप–आयुक्त
४९.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
५०.श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
५१. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
५२.श्री. माधव जवांदे, शहर अभियंता
५३.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
५४.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
५५. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
५६.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
५७.श्री. एम. जी. गिरगावकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
५८.श्री. जी.जी. हिबारे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
५९.श्री. भास्कर मिरपगार, अग्निशमन अधिकारी
६०.श्री. नानासाहेब कामठे, प्रभाग अधिकारी
६१.श्री. दिपक मोरे, प्रभाग अधिकारी
६२.श्री. नंदू समतानी, प्र. प्रभाग अधिकारी
६३.श्री. भगवान कुमावत, प्र. प्रभाग अधिकारी
६४.सौ. प्राजक्ता कुलकर्णी, प्र. जनसंपर्क अधिकारी
६५.श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्चछता निरिक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती अमिता संखे

सांयकाळी ४.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, मी माध्यमिक शाळेविषयी जो प्रस्ताव दिला होता तो या सभेत का आला नाही?

<u>महापालिका सचिव :–</u>प्रश्नोत्तर झाल्यानंतर आपणांस याविषयी उत्तर दिले जाईल.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, एक शोक प्रस्ताव आहे. आपल्या उल्हासनगर शहरातील नामवंत भगत श्री. खानचंद कुरसेजाजी यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले. ते पुज्य चालिया साहेब मंदिराचे अध्यक्ष होते. दोन मिनीटे उभे राहुन त्यांना श्रध्दांजली दिली जावी.

**सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :–**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, श्री. परशुराम कालानी, माजी नगरसेवक व पुर्वीचे शिक्षण उल्हासनगर महानगरपालिका मंडळाचे सभापती होते. त्यांचे सुध्दा नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे त्यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पित केली जावी.

**महापालिका सचिव :–**कृपया श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी मौन धारण करावे.

---

सुचकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :–श्री. प्रभुनाथ गुप्ता

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर शहरातील नामवंत भगत श्री. खानचंद कुरसेजाजी यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले.

तसेच माजी नगरसेवक व उल्हासनगर नगरपालिका शिक्षण मडंळाचे माजी सभापती असलेले श्री. परशराम कालानी, यांचे नुकत्याच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

वर उल्लेख केलेल्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. २५ ब** **दिनांक:–१९/७/२०१०**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. खानचंद कुरसेजाजी, श्री. परशराम कालानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे......... यावेळी ४ वाजुन ३२ मिनिटे झालेली आहेत.

**महापालिका सचिव :–**प्रश्न क्र. २२९ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :–**एक मिनिट, सचिव साहेब, माझा मागील प्रश्न क्र. २२३ प्रलंबित आहे.

**महापालिका सचिव:–**ठिक आहे. प्रश्न क्र. २२३. श्री.बी.बी. मोरे यांचा आहे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:–**आयुक्त साहेब, मी मागील महासभेच्या वेळी प्रश्न टाकलेला होता तो असा की, या महापालिकेमध्ये ७६ नगरसेवक आहेत आणि पाच नामनिर्देशित नगरसेवक आहेत म्हणजेच एकुण ८१ नगरसेवक आहेत. त्यापैकी १६ सदस्य स्थायी समितीचे आहेत. स्थायी समिती सभापती महोदयांनी या १६ सदस्यांसाठी ८–८ लाख रुपये देण्याचे कबूल केले, व इतर सदस्यांना काहीच निधी नाही. याबद्दल मी त्यांना प्रश्न विचारला होता, त्या प्रश्नाचे उत्तर बरोबर दिलेले नाही. त्या सदस्यांना ८ लाख दिले, बाकीच्या सदस्यांना ३

लाख दिले. या प्रश्नाचे उत्तर त्यांनी बरोबर दिलेले नाही. कृपया संबंधित अधिका—याने या प्रश्नाचे बरोबर उत्तर दयावे.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—सन्माननिय महापौर, सन्माननिय उप—महापौर, सन्माननिय आयुक्त साहेब, तसेच सर्व सदस्यगण, सन्माननिय सदस्य श्री.बी.बी. मोरे यांचा प्रश्न क्र. २२३ आहे. त्यांच्या प्रश्नाप्रमाणे ७६ नगरसेवक निवडून आले आहेत व ५ नामनिर्देशित सदस्य आहेत तर १६ स्थायी समिती सदस्यांमध्ये एक सभापती असतो, या १६ सदस्यांना ८ लाख रुपये निधी दिलेला आहे. आणि ८ सदस्यांना ३ लाख अशापध्दतीने दिड कोटीचे वाटप आहे. परंतु ते वाटप स्थायी समितीचा ठराव क्र. १४७ जो पारीत केला होता त्याप्रमाणे आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—माझे म्हणणे तेच आहे, स्थायी समितीचे जे १६ सदस्य असतात तर मी असे म्हणतो की, महासभा असतांना जर स्थायी समिती असा ठराव करुन घेत असेल तर हे बरोबर नाही आहे. त्यात तुम्ही स्पष्ट म्हटले आहे की, ३, ३ लाख नविन सदस्यांना देण्यात येतात, तर नविन कोणते सदस्य? हे तुम्ही या सभागृहास सांगा. जे दोन तीन वेळेस निवडून आले ते जूने आम्ही, आणि जे एक वेळ निवडून आले असतील ते नविन त्यांना ३ लाखामध्ये खुष करता, आम्हां जुन्या सदस्यांना काहीच नाही असा भेदभाव का आहे?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—स्थायी समितीने ठराव क्र. १४७ मध्ये १० लाख रुपये प्रति सदस्य, म्हणजे त्या सदस्यांनी सुचविलेले काम त्या कामाच्या यादीनुसारच त्यावेळेस ठराव पारीत करुन दिलेला होता. तो एकत्रित दिड कोटीचा जो निधी होता त्यामधुन देण्यासारखा होता.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—श्री. शिर्के साहेब, आपण सन्माननिय सदस्यांना विचारा, आम्हांला देखील निधी मिळावे असे प्रत्येक सदस्यांनी पत्र दिलेले होते मग असे पत्र मिळाल्यानंतर स्थायी समितीच्या सदस्यांनाच निधी दिला जातो आणि बाकीच्या सदस्यांना दिले जात नाही, हा कोणता प्रकार आहे? एकतर मग सर्वांनाच दयावयास नको होते. आणि जर दयायचे होते, तर त्यांना जर ८—८ लाख रुपये दिले तर त्याऐवजी ४—४ किंवा ३—३ लाख रुपये दिले असते. आणि सर्वांना त्याची वाटणी केली असती. जसे २००२ पासुन जो दलित वस्तीचा निधी येतो, तो तुम्ही म्हणतात की, सर्वांनी वाटुन घ्या. ज्याठिकाणी दलित वस्ती नसते तरीदेखील त्या ठिकाणी निधी दिला जातो, मग या स्थायी समितीने असे का नाही विचारात घेतले? सन्माननिय आयुक्त साहेब, याबाबत तुम्ही का नाही बंधन घातले? असा भेदभाव का केला गेला?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—मुळात म्हणजे दलित वस्तीत ज्या ठिकाणी ५० पेक्षा जास्त लोकसंख्या आहे त्याठिकाणीच हा दलित निधी वापरला जातो. इतर ठिकाणी तो निधी वापरला जात नाही. याबाबत मी मागेच या महासभेत उल्लेख केला आहे.

सदस्य श्री.बी.बी.मोरे :—श्री. शिर्के साहेब, मी येथे तुम्हांला फक्त उदाहरण दिले आहे. तुम्ही फक्त मला हे सांगा की, स्थायी समितीने हे जे केले आहे त्याचे बरोबर आहे का चुकीचे आहे?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—स्थायी समितीने हे चुकीचे केले की बरोबर केले हे मी ठरवु शकत नाही. स्थायी समितीचे जे आदेश आहेत ते आम्हांला पालन करायचे आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—असे बिल्कुल नाही. हे चुकीचे उत्तर आहे. तुम्ही पळवाटा काढत आहात हे बरोबर नाही आहे. तुम्हांला नेमके काय म्हणायचे आहे? स्थायी समितीने जे केले आहे ते बरोबर आहे की चुकीचे आहे?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—स्थायी समितीच्या आदेशाचे आम्हांला पालन करायचे आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—मला सांगा की, स्थायी समितीचे आदेश कुणी केले? काय केले येथे महापालिकेत? एकच उत्तर दया, हे चुकीचे आहे की बरोबर आहे? १६ लोकांना ८—८ लाख निधी दयायचा, अर्थसंकल्पातुन त्यांना पुन्हा निधी दयायचा, असे या महापालिकेत सावळा गोंधळ चालला आहे. ज्याच्या हाती सत्ता, ज्याच्या हाती काठी त्याची म्हैस. असे जर येथे चालत असेल तर आम्हांला सुध्दा या महापालिकेत तसेच चालावे लागेल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब...............

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>आधी त्यांना उत्तर देवु दया, मग तुम्ही बोला. आयुक्त साहेब, तुमच्या अधिका—याकडुन या महासभेत समाधानकारक उत्तर मिळत नाही. म्हणुन मी या महासभेत, जोपर्यंत महासभा चालु आहे तोपर्यंत जमिनीवर बसत आहे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ(उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सन्माननिय सर्व सदस्य, स्थायी समिती हा एक प्राधिकरण आहे तसेच महासभा सुध्दा प्राधिकरण आहे. परंतु एका प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयानंतर अधिका—याने अभिप्राय देणे हे उचित होणार नाही. त्यामुळे आमच्या अधिका—यास बोलणे थोडे अवघड होते.
<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>अजिबात नाही, अजिबात नाही. अजिबात नाही, हे उत्तर अजिबात नाही, हे उत्तर जुळत नाही. मला तरी हे सांगा की, महासभा मोठी आहे की स्थायी समिती मोठी आहे?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ(उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>महासभा नक्कीच मोठी आहे. परंतु त्याच बरोबर स्थायी समिती ही सुध्दा कायदेशीर प्राधिकरण आहे. त्यासाठी त्या प्राधिकरणाने घेतलेला निर्णयानंतर महासभेने जो निर्णय घ्यायाचा आहे तो त्यांनी घ्यावा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>अहो, आयक्त साहेब, मी स्पष्टपणे म्हणत आहे की, जर ८१ नगरसेवक या महापालिकेत आहेत. मग १६ सदस्यांना एवढा निधी देता? कारण काय आहे, मी स्वत: पत्र दिले होते की, आम्हांला देखील त्या निधीतुन निधी देण्यात यावा. आम्हांला काहीच दिलेले नाही. झोपडपट्टीचा विभाग, गलिच्छ वस्तीचा विभाग, त्या लोकांना काहीच निधी नाही आणि या स्थायी समितीच्या १६ सदस्यांना ८—८ लाख? इतर ठिकाणी तुम्ही त्याची समान वाटणी करुन म्हणता की, सर्वांनी समान वाटुन घेतला पाहिजे, हा कुठला नियम आहे?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ(उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>महासभेने याबाबत उचित निर्णय घ्यावा. स्थायी समितीने जो निर्णय घेतलेला आहे त्याबाबत महासभेने उचित निर्णय घ्यावा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>अहो, एवढे उत्तर देणे योग्य नाही वाटत. आयुक्त साहेब, असे नाही होत. स्थायी समितीने जो ठराव केलेला आहे तो मलाही दिसत आहे. ठराव क्र. १४७ वगैरे, वगैरे..... मलाही दिसतो तो ठराव, मला दिसत नाही का की स्थायी समितीने कोणता ठराव केला आहे तो? तो मलाही दिसतो. परंतु तो का घेतला, कशासाठी घेतला, १६ सदस्यांबद्दलच का घेतला? हा माझा प्रश्न आहे ना? कमीत कमी दलित वस्तीमध्ये जे ९ प्रभाग येतात यांना तरी तुम्ही तो निधी दिला असता तर आम्ही म्हटले असते की या महापालिकेत असा भेदभाव होत नाही असे मी कमित कमी म्हटले असते परंतु तोही प्रकार केला नाही आहे. म्हणुन आम्हांला मुद्दामहुन विचारायचे आहे की या महापालिकेत असे काय चालले आहे? श्री.शिर्के साहेब, मी खाली जमिनीवर बसु?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—</u>दलित वस्ती, गलिच्छ वस्ती यासाठी आपणाकडे वेगळी तरतुद असते, त्यासाठी आपण शासनाकडे प्रस्ताव पाठवितो व त्यानुसार कामे केली जातात.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>अहो, हे मला मान्य आहे परंतु हे मी कशासाठी सांगत आहे? तुम्ही उत्तर देत नाही म्हणुन मी तुम्हांला म्हणतो, की जर असे केले असते तर बरे झाले असते हे माझे उत्तर त्यास अनुसरुन आहे. मला मुळचे उत्तर असे पाहिजे की, स्थायी समितीने असा ठराव का केला? त्यावेळेस अशी वाटणी का झाली? विषमता नको आहे.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—</u>त्याचे उत्तर मी देवु शकत नाही.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>आयुक्त साहेब, मी या सभागृहासमोर, तुमच्यासमोर सांगतो की, जोपर्यंत महासभा संपत नाही तोपर्यंत मी येथे जमिनीवर बसतो. या महासभेत, उल्हासनगर महानगरपालिकेत उत्तर देण्यासारखा कोणताच अधिकारी नाही. आणि अधिकारी उत्तर देवु शकत नाही म्हणुन मी आरपीआय पक्षाच्यावतीने निषेध व्यक्त करतो. आणि जमिनीवर बसतो.

यावेळी श्री. बी.बी.मोरे, श्री. जे.के. ढोके आणि श्रीमती सुमन शेळके हे सन्माननिय सदस्य महापौरांच्या आसनासमोरील मोकळया जागेत जमिनिवर आसनस्थ झाले.

यावेळी सदस्या श्रीमती पंचशिला पवार, श्रीमती लता निकम या सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :</u>—मा. महापौरजी, आमच्या महापालिकेतील वरिष्ठ नगरसेवक श्री. मोरे साहेबांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत बोलु अथवा न बोलु परंतु हा प्रश्न आमच्या डोक्यात एवढा बसला आहे व फिरत आहे. श्री. मोरे साहेब एवढी चांगली वेशभुषा करुन या सभेत जमिनीवर बसले आहेत, हे आम्हांस योग्य वाटत नाही. नगरपालिका कालावधीपासुन कित्येक वर्षांपासुन वरिष्ठ नगसेवक म्हणुन ते आमच्याबरोबर या सभागृहात राहिले आहेत. विषय केवळ शासन किंवा महानगरपालिका प्रशासन यांचा निर्णय नाही तर निवडुन आलेल्या लोकप्रतिनिधींनी निर्णय घेतलेला आहे. त्याचे उत्तर देण्यासाठी प्रशासनाची एक सिमा असेल, त्यापलिकडे जावुन प्रशासन उत्तर देवु शकणार नाही. आपले दु:ख, आपली पिडा मी समजु शकतो. स्थायी समितीचे जे सोळा सदस्य आहेत त्यांनी संपुर्ण अर्थसंकल्प व पुर्णच्या पुर्ण विषय आपणाकडे घ्यावा, कोणत्याही लोकशाही प्रणाली मध्येयोग्य ठरणार नाही. आता असे झाले आहे किंवा नाही त्याकडे मी जाणार नाही. परंतु आताची परिस्थिती अशी आहे की हा निर्णय स्थायी समितीने घेतलेला आहे. स्थायी समितीने जर निर्णय घेतला आहे तर प्रशासनाकडे त्याविषयी निर्णय देण्यास कुठला पर्याय राहत नाही. या ठरावाच्या विरोधात जायचे कि काय करायचे? न्यायालय त्यावर निर्णय घेते, जर महासभेत त्यावर काही निर्णय होवु शकत असेल तर विषय वेगळा आहे. परंतु जो प्रस्ताव पारीत झालेला आहे त्याविरुध्द आपली पिडा, आपली कठिनाई येणा—या पुढील स्थायी समितीसाठी एक संकेत आहे. विरोधी पक्षाने आपले काम चांगल्या प्रकारे करावे की जेणेकरुन स्थायी समितीमध्ये सर्व पक्षांच्या बाजुने निर्णय लागेल. विरोधी पक्षाच्या धर्माशिवाय आपला वैक्तीगत धर्म निभवण्याचा मार्ग स्थायी समितीने घेतला असेल. त्यावेळेस त्यांना वाटले असेल की आपण १६ च्या १६ सदस्यांनी फायदा घ्यावा. येणा—या स्थायी समितीमध्ये अशा प्रकारच्या घटना घडु नयेत आपला विरोध हा त्याचा एक संकेत आहे. आपण हा मुद्दा उपस्थित करणे उचित होते. आपण हा मुद्दा उपस्थित केला. एक मित्राच्या नात्याने मी आपणांस विनंती करतो की आपण आता आसन ग्रहण करावे जेणेकरुन सभेचे पुढील कामकाज चालु शकेल.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :</u>—सर्व सन्माननिय सदस्यांना मी विचारु इच्छितो की, श्री.बी.बी. मोरे साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो चुकीचा आहे का? स्थायी समितीच्या सोळा सदस्यांनी आठ आठ लाखाचा निधी घेतला आहे. त्याच्या व्यतिरिक्त जे निवडुन आलेले सदस्य आहेत ते सदस्य नाहीत काय? त्यांच्यावर अन्याय झालेला नाही आहे का? १६ सदस्यांनी आठ आठ लाखाचा जो निधी घेतलेला आहे, बाकीचे नगरसेवक नगरसेवक नाहीत का? की स्थायी समिती कोणताही निर्णय घेणार आणि तो तुम्ही मान्य केला पाहिजे असे काही आहे का? श्री. मोरे साहेबांनी जो प्रश्न विचारला आहे तो चुकीचा नाही, स्थायी समिती जे मान्य करेल ते आम्ही मान्य करायचे काय? स्थायी समितीने तो जो काही निर्णय घेतला होता त्याबाबतचा मुद्दा महासभेत आणावयास पाहिजे होता की नाही?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :</u>—मा. महापौरजी, आमचे वडिलबंधु श्री. नरेंद्र राजानी यांनी जसे म्हटले की, विरोधी पक्षाने विरोधी पक्षाची भुमिका बरोबर पार पाडली पाहिजे. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देवु इच्छितो परंतु प्रथा नेहमी अशी असते की, कोणतीही महासभा असो किंवा स्थायी समितीची सभा असो, त्या सभेच्या सभासूचनेवर कोणते विषय घेतले जावेत, कोणते विषय घेतले जावु नयेत याविषयी विचारविनिमय करण्यासाठी मला असे वाटत नाही की यांनी कधी विरोधी पक्षांना बोलावले असेल. परंतु कमीत कमी जे लोक सत्तेत बसले आहेत त्यांनी आपसामध्ये समन्वय ठेवुन कोणते विषय सभेपुढे आणले पाहिजेत त्याचा निर्णय घेतला पाहिजे. व स्थायी समिती यांच्याकडे होती यांनी त्याबाबत निर्णय धेतला पाहिजे की, स्थायी समितीच्या सोळा सदस्यांना आपण आठ आठ लाख रुपये दयायचे किंवा नाही आणि तो विषय सभा सूचनेवर आणायचा किंवा नाही हे यांचे काम आहे. जर हे लोक तो विषय सभा सूचनेवर आणत असतील तर आम्हांस वाटते की, आमचे जे सदस्य त्या समितीत आहेत त्यांना सुध्दा निधी मिळावा, जेणेकरुन शहर विकासाचे काम व्हावे. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>—मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री.बी.बी. मोरे साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, तो एकदम योग्य असा विषय आहे. ज्या ज्या प्रभागांमध्ये अति

आवश्यक अशी कामे आहेत ती कामे करणे ह प्रशासनाचे काम आहे. मग ते काम एखादया साध्या नगरसेवकाचे असो, स्थायी समिती सदस्यांचे असो, सन्माननिय महापौर महोदयांचे असो, स्थायी समिती सभापतींचे असो, किंवा उप–महापौरांचे असो, परंतु जेथे अति आवश्यक काम आहेत ती कामे प्रथम केली पाहिजेत. व त्यांचीच प्राकलने तयार करुन मंजुरीस आणली पाहिजेत. मा. श्री.बी.बी. मोरे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, सोळा सदस्यांनाच निधी मिळाला इतर सदस्यांना निधी मिळाला नाही. हा विषय अतिशय गंभीर आहे. जे स्थायी समितीचे सोळा सदस्य आहेत त्यांच्याच प्रभागात समस्या आहेत असे नाही. समस्या सर्वांच्याच प्रभागात आहेत. दलित व गलिच्छ वस्तीतील प्रभागांमध्ये आहेत. झोपडपट्टयांमधील प्रभागांमध्ये आहेत. तेथे सुध्दा कामे झाली पाहिजेत. सभागृहातील सर्व सन्मानिय सदस्यांच्यावतीने व आमच्या सभागृहनेतांच्यावतीने मी मा. श्री. बी.बी. मोरे यांना आश्वासन देतो की, हे जे घडले आहे ते दोन वर्षापुर्वी घडले आहे. त्यानंतर स्थायी समिती सदस्यांच्या प्रभागात १०,१० लाखाचे काम झालेले नाही ही प्रथा आता बंद झाली आहे. आपण वरिष्ठ नगरसेवक आहात. आपण सभागृहात असे जमिनीवर बसणे आम्हांला बरे वाटत नाही. आम्ही आपणांस आश्वासन देतो की, आपण दिलेल्या प्रस्तावानुसारची कामे होतील. व मागील दोन वर्षापुर्वी जी चुक झालेली आहे तशी चुक पुन्हा होणार नाही. यासाठी कृपया आपण आपले आसन ग्रहण करावे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>उप–महापौर जर आम्हांस सन्मानपुर्वक उठवत असतील तरच आम्ही उठु.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, श्री. बी.बी. मोरे साहेबांनी विचारलेला हा जो प्रश्न आहे, त्याबाबतीत भाजपाचे गटनेता श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की, दोन वर्षापुर्वी हा प्रस्ताव पारित झालेला आहे. त्यावेळेस स्थायी समिती सभापती त्यांचाच होता, त्यावेळेस इतर लोकांचा विचार करावा अशी त्यांना आठवण झाली नाही.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :–</u>त्यावेळी स्थायी समितीतील तुमच्या सदस्यांनीही निधी घेतलेला आहे. श्री. राजु जग्यासी यांनी घेतलेला आहे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>निधी घेतल्याचे त्यांनी कबुल केले आहे. परंतु यांनी प्रस्ताव ठेवतांना संपुर्ण सभागृहाचा प्रस्ताव ठेवावयास पाहिजे होता. तेव्हा यांनी स्वार्थापोटी काम केले. असें सभागृहामध्ये होवु नये. याबाबतीत निश्चितपणे श्री. मोरे साहेब नाराज झाले आहेत. आणि व्हायलाही पाहिजे कारण त्यांचा हक्क आहे. त्यांनी सभागृहाचे डोळे उघडले आहेत पुन्हा असे होवु नये.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>दोन वर्षानंतर नाराज झाले काय?

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, श्री. मोरे साहेबांनी जो प्रश्न विचारला तो अगदी बरोबर आहे. सर्व नगरसेवकांना निधी मिळाला पाहिजे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>मा. महापौर महोदया, उप–महापौर महोदय, आयुक्त साहेब, श्री. मोरे साहेबांनी याठिकाणी जो प्रश्न उपस्थित केला आहे. त्याबाबतीत श्री. जमनु पुरस्वानी यांनी सांगितले की, दोन वर्षापुर्वी स्थायी समितीमध्ये सदरचा प्रस्ताााव पारीत झाला होता. त्याची कामेही पुर्ण झालीत. आणि तेव्हापासुन सर्व सदस्यांची भावना होती. म्हणजे स्थायी समितीत सुरुवातीचे १६ सदस्य आणि पुढल्या वर्षी निवृत्त झालेल्या आठ सदस्यांच्या जागी निवडून आलेले दुसरे आठ सदस्य असे एकुण २४ सदस्य सोडल्यानंतर महापौर, उप–महापौर, विरोधी पक्ष नेता अशा सगळयांचीच भावना होती की, सर्वांच्याच प्रभागामध्ये कामे झाली पाहिज. परंतु गेल्या दोन वर्षापासुन ती प्रथा बंद पडलेली आहे. प्रशासनाला, काय अपेक्षित आहे, त्याबाबतीत त्यांनी लोकांकडुन काम करुन घेतले पाहिजे. प्रशासनाचे काय चालले आहे, आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. आम्ही ज्या प्रभागाचे प्रतिनिधीत्व करतो, त्या प्रभागात जास्तीत जास्त चांगली कामे करणे हे प्रत्येकाचे प्रथम कर्तव्य आहे. पहिले आमचे आणि त्यानंतर शहराचे अशी प्रथा पडलेली आहे. परंतु प्रशासनाची भुमिका ठाम असली पाहिजे की, आम्हांला करायचे काय आहे? स्थायी समितीने ठराव पारीत केला, जर तो चुकीचा असेल तर त्याची अंमलबजावणी केलीच पाहिजे, असे प्रशासनाला बंधनकारक नाही पण बंधकारक नसतांना सुध्दा प्रशासन चालढकल करते. आता सुध्दा महासभेमध्ये असे विषय बरेचसे आहेत, प्रशासनाचे मत एक आहे परंतु लोकप्रतिनिधींना उघडे पाडण्यासाठी प्रशासन अशा प्रकारचे प्रस्ताव आणते. प्रशासनाची ठाम भुमिका

नाही. आणि ठाम भुमिका नसेल तर तुम्ही चालुच शकत नाही. स्थायी समितीमध्ये ज्यावेळेला चुकीचा प्रस्ताव घेण्यात आला त्याचवेळेला त्यांच्या लक्षात आणुन दिले असते तर आज श्री. मोरे साहेबांना जमिनिवर बसण्याची वेळ आली नसती. एकाला न्याय वेगळा, दुस—याला दुसरा. सदस्य कुणीही असु दया मग मीही असु दया. सभापती कुणीही असु दया. प्रत्येकाला स्वारस्य असणार. ही मानवसंस्कृती आहे किंवा भावना आहे, प्रवृत्ती आहे. परंतु आपण सर्वांना समान न्याय देण्यासाठी बसलेले आहात. मला वाटते त्यावेळेस आयुक्त म्हणुन श्री. उन्हाळे साहेब होते. आम्ही त्यांना भेटायला गेलो तेव्हा त्यांनी सांगितले की नाही सर्वांचे ठराव पारीत करु. पण त्यानंतर ते झाले नाहीत आणि आता होणार पण नाहीत. श्री. मोरे साहेब, त्यांना मार्ग वेगळे आहेत, आमच्या श्री. सतिश चहाळ साहेबांनी सांगितले. उप—महापौर साहेब, त्यांचे समाधान करा. आपल्या बरोबरचे ते जेष्ठ सदस्य आहेत. त्यांनी असे जमिनीवर बसणे बरोबर नाही. आणि कशाप्रकारे करता येईल ते पहावे. आयुक्तांनी त्यांचे समाधान करावे. पण यानंतर तरी प्रशासनावर अशी निरुत्तर होण्याची वेळ येवु नये. आयुक्त साहेब, तुम्ही याचे उत्तर देवु शकता काय? त्यांनी सांगितले की, स्थायी समितीच्या सोळा सदस्यांना निधी दिला आता बाकीच्या सदस्यांना तुम्ही निधी देवु शकता काय? दया उत्तर. मग ही जी वेळ येते तिला वेळीच आळा घातला पाहिजे. प्रशासनाचे प्रस्ताव ठाम असले पाहिजेत. तुमचे मत ठाम असले पाहिजेत. तुम्ही सांगाल की हे बरोबर आहे तर आणि तरच स्थायी समितीसमोर प्रस्ताव आणले पाहिजेत. तुम्ही तुमचा बचाव करण्यासाठी स्थायी समितीसमोर किंवा महासभेसमोर प्रस्ताव आणायचे आणि नंतर भुमिका बदलायची. हे बरोबर नाही. श्री. मोरे साहेबांनी एक चांगला विषय सभागृहापुढे ठेवलेला आहे, त्यातुन प्रशासन जागे होईल. आणि कोणते विषय आणायचे आणि कोणते विषय चुकीचे आले तर त्यांची अंमलबजावणी करायची नाही हे ठरविले पाहिजे. तर मी श्री. मोरे साहेबांना विनंती करतो या अगोदर श्री. नरेंद्र राजानी साहेबांनी आपणांस विनंती केलेली आहे. तुम्ही सुध्दा या सभागृहाचा एक अविभाज्य भाग आहात. आम्हीही तुमच्यापैकीच आहेत. उप—महापौर साहेब, यांचे समाधान करा. सन्मानाने त्यांना त्यांच्या जागेवर बसवा. श्री. मोरे साहेब, झाले ते गंगेला मिळाले. इथुन पुढे तरी चुकीची प्रथा पडणार नाही त्यासाठी आपण उचललेले हे पाउल, याबद्दल तुमचे धन्यवाद।

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>एकाच नावेत आपण सर्वजण बसलेले आहोत.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आमचे वरिष्ठ सहकारी श्री. बी.बी. मोरे साहेब, जमिनीवर बसले आहेत. त्यांनी उपस्थित केलेला मुद्दा अगदी बरोबर आहे. दोन वर्षाअगोदर हा प्रकार घडलेला आहे आणि त्यांच्या तक्रारी नंतर ही प्रथा बंद झाली आहे. सभागृह नेता म्हणुन माझी आपणांस विनंती आहे ती मान्य करुन आपण आपल्या आसनावर बसावे. आम्ही सर्वजण आपणांस सन्मानपुर्वक आपल्या आसनावर बसण्यासाठी येत आहोत. शासन आणि प्रशासन हे एकत्रित येतील.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u> श्री. मोरे साहेब, आपण वरिष्ठ आहात, उशिर झाला असला तरी वेळ निघुन गेलेली नाही असे समजुन...............

<u>सदस्य श्री. दत्तात्रय पवार :—</u>श्री. मोरे साहेब, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>महापौर महोदया, ज्यांनी महानगरपालिकेचे जे बोधचिन्ह साकारले ते श्री. शरद निकम हे दुपारी ३.०० वाजल्यापासुन येथे येवुन बसलेले आहेत. आपल्या महासभेचे कामकाज असेच चालु राहिल परंतु त्यांना वेळ होत आहे. मागील महासभेत सांगितल्याप्रमाणे त्यांचा सत्कार करावा.

<u>उप—महापौर :—</u>प्रश्नोत्तराचा कालावधी संपु दया.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>ते दुपारी ३.०० वाजल्यापासुन येथे बसलेले आहेत. आपण त्यांचा सत्कार करुन घेवु या.

<u>उप—महापौर :—</u>प्रश्नोत्तराचा कालावधी संपल्यानंतर आपण त्यांचा सत्कार करु या.

<u>सदस्य श्री. दत्तात्रय पवार :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, याच विषयाशी संबंधीत माझा एक प्रश्न आहे. ज्याप्रमाणे स्थायी समिती सदस्यांना चुकीच्या पध्दतीने जो निधी दिला आहे, त्याचप्रमाणे महापालिका निधीच्या बाबतीत सुध्दा असे आहे की, काही काही सदस्यांना ७०,७० लाखापर्यंतचा निधी दिला जातो. आणि काहींना ३० हजार सुध्दा निधी दिला जात नाही.

यावेळी विरोधी पक्ष सदस्यांनी बाके वाजुन त्यांना प्रतिसाद दिला.

<u>सदस्य श्री. दत्तात्रय पवार :—</u>याविषयी सर्व सदस्यांना माझी विनंती आहे, ज्या प्रभागामध्ये खरोखरच कामाची गरज आहे, कारण की, माझ्या प्रभागात नाल्याची अंत्यत मोठी समस्या आहे. त्याचप्रमाणे समाजमंदिराची गेल्या तीन वर्षापासुन मी मागणी करत आहे. आणि ते काम अजुनही पुर्ण होत नाही. आयुक्तांना भेटलो, उप—आयुक्तांना भेटलो, श्री. शिर्के साहेबांना भेटलो, श्री. जवादे साहेबांना भेटलो. आम्ही त्यांना सांगितले की, तुम्ही प्रत्यक्षात पाहणी करा. जर तुम्हांला त्या कामाची आवश्यकता वाटली तरच तुम्ही ते काम मंजुर करा. परंतु तसे काही होत नाही. नको त्या ठिकाणी नको ती चाळीस चाळीस लाखाची कामे पास झाली आहेत. जेथे सिमेंट कॉक्रिटचा रस्ता आहे तेथे त्यावर पेवर ब्लॉक बसविले जातात परंतु जेथे कामाची आवश्यक आहे, तेथे निधी दिला जात नाही. यापुढे महापालिका निधी देतांना त्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली पाहिजे. आणि त्यावेळी जर ते योग्य वाटत असेल तरच त्या कामाला तुम्ही परवानगी दयावी, अशी माझी विनंती आहे. तुम्ही माझ्या विनंतीचा विचार कराल, एवढे बोलुन मी माझे शब्द संपवितो धन्यवाद।

<u>महापालिका सचिव :—</u>प्रश्नोत्तराचा कालावधी समाप्त.

<u>सदस्या श्रीमती नेहा भोईर :—</u>मी प्रस्ताव दिला आहे, माझा तो प्रस्ताव पारीत करावा.

<u>महापालिका सचिव :—</u>४ वाजुन ३२ मिनिटांनी प्रश्नोत्तरास सुरुवात झाली होती. आता ५ वाजुन २ मिनिटे झाली आहेत. प्रश्नोत्तराचा अर्ध्या तासाचा कालावधी संपला आहे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>श्रीमती भोईर मॅडम, तुम्ही बोला आता.

<u>सदस्या श्रीमती नेहा भोईर :—</u>मा. महापौर, उप—महापौरजी, मी सुध्दा माझ्या प्रभागातील समाजमंदिराचा प्रस्ताव दिलेला आहे. तुम्ही माझ्या प्रभागात पाहणी करा, ............

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—</u>प्रश्नोत्तरांवर सदस्यांना बोलण्याची संधी दिली जावी.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>एकाच प्रश्नावर चर्चा झाली आहे. त्यापुढील प्रश्नावर चर्चा झाली नाही यासाठी पुढील प्रश्नावर चर्चा केली जावी.

<u>उप—महापौर :—</u>प्रश्नोत्तराचा अर्ध्या तासाचा कालावधी संपला आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>प्रश्नोत्तराचा कालावधी पाच मिनिटे सुध्दा चालला नाही आणखी २५ मिनिटे प्रश्नोत्तराचा तास चालविला जावा.

<u>सदस्या श्रीमती नेहा भोईर :—</u>मी सुध्दा माझ्या प्रभागातील समाजमंदिराचा प्रस्ताव दिलेला आहे, आणि ते काम पास करा. अशी मी विनंती करते महापौरांना.

<u>महापालिका सचिव :—</u>उल्हासनगर महानगरपालिकेचे ज्यांनी बोधचिन्ह तयार केले, त्या श्री. शरद निकम यांनी कृपया सभागृहात प्रवेश करावा.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>सचिव साहेब, माझे असे म्हणणे आहे की, प्रश्नोत्तराचा कालावधी चालला पाहिजे. पाच मिनिटाचा एकच प्रश्न झालेला आहे. प्रश्नोत्तराचा विषय पुढे चालु राहिला पाहिजे.

<u>महापालिका सचिव :—</u>श्री. शरद निकम कृपया आपण सभागृहाच्या आत या.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>ज्यांनी या उल्हासनगर महानगरपालिकेचे बोधचिन्ह तयार केले ते सभागृहात आले आहेत. आपण सर्वांनी बाके वाजवुन त्यांचे स्वागत करु या.

<u>महापालिका सचिव :—</u>श्रीमती शबाना शेख व श्री. मोहमद शेख यांनी कृपया सभागृहात यावे.

<u>श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. जनसंपर्क अधिकारी :—</u>मा. महापौर महोदया, मा. उप—महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव साहेब, सर्व उपस्थित सन्माननिय सदस्य, सदस्या, तसेच प्रेक्षक गॅलरीतील माझे पत्रकार बंधु, भंगिनींनो व प्रेक्षक वर्ग आज आपल्या महापालिकेचे बोधचिन्ह तयार करणारे श्री. शरद सुखदेव निकम, राहणार उल्हासनगर यांनी तयार केले असून श्री. निकम हे व्यवसायाने कर्मर्शियल आर्टिस्ट आहे. त्यांनी जे.जे. स्कुल ऑफ आर्टस् मधुन जीडीआय ही पदवी संपादन केली आहे. १९९६ साली महापालिका अस्तित्वात आल्यानंतर

बोधचिन्हासाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यात श्री. शरद निकम यांच्या बोधचिन्हाचा स्विकार केला असून २/१०/९८ पासुन आपण महापालिकेचे बोधचिन्ह म्हणुन त्याचा वापर देखील करत आहोत. त्यांच्या सन्मानार्थ आज महासभा व महापालिकेने त्यांना रुपये १०,०००/– चा धनादेश व मानचिन्ह देवुन सत्कार करण्याचे योजिले आहे. तरी मी मा. महापौर, उप–महापौर व मा. आयुक्त यांना विनंती करते की, त्यांना रुपये १०,०००/– चा धनादेश व मानचिन्ह देवुन त्यांचा सत्कार करावा.

महापालिका सचिव :–मा. महापौर आणि उप–महापौर यांच्यावतीने आणखी १०,०००/– रुपये देण्यात येत आहेत.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :–सचिव साहेब, एक मिनिट, ज्या व्यक्तीने बारा वर्षापुर्वी बोधचिन्ह तयार केले त्या व्यक्तीस आता आपण १० हजार रुपये देत आहोत. त्याबाबतीत मला असे वाटते की, महानगरपालिका भिकारी झाली आहे काय? हे १० हजार रुपये १२ वर्षापुर्वी जर त्यांनी बॅकेत ठेवले असते तर आज त्याचे किती झाले असते. ४०,५० हजार रुपये झाले असते. आणि त्याला आता तुम्ही फक्त १० हजार रुपये देत आहात. हे मला बरोबर वाटत नाही. आणि सर्व सन्माननिय सदस्यांना आणि महापौर, उप–महापौरांना विनंती करतो की, त्यांना जास्तीत जास्त रक्कम दिली गेली असती तर आम्हांला जास्त समाधान वाटले असते.

उप–महापौर :–सन्माननिय सदस्य त्यांना १० हजार रुपये देण्याबाबतचा पुर्वीचा ठराव आहे. आणि महापौर आणि उप–महापौर दोघे मिळुन आम्ही त्यास १० हजार देत आहोत.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–श्री. मोरे साहेब, महापौर, उप–महापौरांच्यावतीने १० हजार रुपये दिले जात आहे.

सदस्य श्री. दत्तात्रय पवार :–श्री. मोरे साहेब, किती देत आहेत?

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–ते सभागृहातील वरिष्ठ सदस्य आहेत. त्यांच्यावतीने यांना आम्ही १० हजार रुपयाचे बक्षिस देत आहोत.

उप–महापौर :–सभागृहाच्यावतीनेही त्यांना १० हजार रुपयाचे बक्षिस देण्यात आलेले आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–त्याच्यामध्ये श्री.बी.बी. मोरेंचाही समावेश आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–श्री.बी.बी. मोरे, शिवसेना, भाजपाच्यावतीने..........

उप–महापौर :–आणि बक्षिसाची रक्कम देण्यास उशिर झाल्याबद्‌दल श्री. निकम साहेबांकडे दिलगिरी व्यक्त करतो.

महापालिका सचिव :–श्री. शरद निकम यांना मा. महापौरजी, रुपये १०,००० चा धनादेश प्रस्तृत करतील. व त्यांचा सन्मान करतील.

सदस्य श्री. दत्तात्रय पवार :–श्री. मोरे साहेबांकडुन ११ हजार?

महापालिका सचिव :–श्री. शरद निकम हे आभार प्रकट करु इच्छितात.

श्री. शरद निकम :–सर्व मान्यवरांचे सर्वप्रथम आभार मानतो. उल्हासनगर महानगरपालिकेने उशिरा का होईना माझा सन्मान केला, त्याबद्‌दल सर्वांचे मी आभार मानतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :–सचिव साहेब, हे जे बोधचिन्ह आहे, त्याची महापालिकेने नोंदणी करुन घ्यायची आहे काय? ती आपण करुन घेतली आहे काय?

उप–महापौर :–आपल्या प्रश्नाचे नंतर उत्तर दिले जाईल.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :–श्री. मोरे साहेबांसारखे मी सुध्दा जमिनिवर बसु का?

उप–महापौर :–दोन मिनिटांनतर आपणांस उत्तर दिले जाईल.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :–ठिक आहे.

डॉ. जी.टी. जिंदे (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):–आदरणीय महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, आणि सन्माननिय सदस्य, सावित्रीबाई कन्या कल्याण योजनेच्या अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडुन आरोग्य विभाग, महानगरपालिका यांनी १० हजार रुपयाचा हा धनादेश श्रीमती शबाना आझमी मोहमद शेख यांना देण्यात येत

आहे. याबाबतची योजना अशी आहे की, त्यांना एका मुलीनंतर मुलगा नसतांना शस्त्रक्रिया केल्याबद्दल २ हजार रुपये रोख आणि ८ हजार रुपयाचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरुपामध्ये दयायचे आहेत आदरणीय महापौर यांना मी विनंती करतो की, श्रीमती शबाना शेख आणि श्री. शेख यांना २ हजार रुपये रोख आणि ८ हजार रुपयाचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र स्वरुपामध्ये निधी दयावा. त्याचप्रमाणे शाल आणि श्रीफळ देवुन जोडप्याचा सत्कार करावा.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>महापौर, उप–महापौर आणि आयुक्त साहेब, श्री. धांडे साहेबांनी हे जे निदर्शनास आणुन दिले त्याबद्दल त्यांचाही सत्कार करावयास पाहिजे होता त्यांनी सर्वांना जागृत केले आहे.

<u>उप–महापौर :–</u>तसेच पुण्यनगरी व सामनाचे जे संपादक आहेत उल्हासनगरचे प्रतिनिधी आहेत त्यांचे सुध्दा आम्ही अभिनंदन करतो.

<u>महापालिका सचिव :–</u> उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये २ नविन अधिकारी आले आहेत, श्री. कामटे व श्री. मोरे यांनी कृपया व्यासपीठावर येवुन आपला परिचय दयावा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, आमचे सन्माननिय सदस्य श्री. किशोर जग्यासी यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. तो योग्य असा विषय आहे. हे जे बोधचिन्ह महापालिकेने तयार करुन घेतले आहे आणि ते ज्यांनी तयार केले आहे, त्याचा आम्ही येथे सत्कारही केला आहे. परंतु या बोधचिन्हाची नोंदणी केली आहे किंवा नाही? नाहीतर उदया सकाळ दुसरा एखादा दुकानदार या बोधचिन्हाची नोंदणी करुन आपल्या दुकानात लावेल. आणि त्यावेळेस आपणांस हे बोधचिन्ह मिटवुन टाकावे लागेल.

<u>उप–महापौर :–</u>आपले म्हणणे बरोबर आहे. याची चौकशी करुन सांगु.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>याची नोंदणी करण्यासाठी पाठवा.

<u>श्री. नानासाहेब कामठे, प्रभाग अधिकारी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी आणि आयुक्त साहेब, माझें नाव श्री. नानासाहेब देवराम कामठे असे आहे. आणि नुकतीच माझी येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहा. आयुक्त म्हणुन नियुक्ती झाली आहे आणि प्रभाग समिती क्र. ४ चा मी पदभार स्विकारला आहे. या पदाचे कामासाठी मी आपणासर्वांकडुन सहकार्याची अपेक्षा करतो. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>आपलेही आम्हांस सहकार्य अपेक्षित आहे.

<u>श्री. दिपक मोरे, प्रभाग अधिकारी :–</u>नमस्कार, मा. महापौर, मा. उप–महापौर, आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्य, सन २००६ च्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत माझी निवड झालेली आहे. नुकतीच माझी आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेतील प्रभाग क्र. १ मध्ये सहा. आयुक्त म्हणुन नियुक्ती झाली आहे. माझ्या कार्यक्षेत्रामध्ये १९ नगरसेवक आहेत. या सर्व नगरसेवकांकडुन मी पुर्णत: सहकार्याची अपेक्षा करतो. आणि त्यांनाही माझ्याकडुन सहकार्य मिळेल. मी माझे वरिष्ठ, आणि मा. महापौर या सर्वांचे सहकार्य आणि त्यांच्या सूचनांचे पालन करुन तुम्हांस पुर्ण सहकार्य करण्याचा माझा प्रयत्न राहिल. धन्यवाद।

<u>महापालिका सचिव :–</u>श्री. भारत राजवानी यांनी दिनांक १५/७/२०१० रोजी जो अशासकिय प्रस्ताव दिला होता. याबाबतीत मा. महापौरांचा आदेश आहे की, पुढील महासभेत त्याचा विचार केला जाईल. ७ लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.

## <u>लक्षवेधी सूचना क्र. १</u>

सुचकाचे नाव:–श्री. भारत राजवानी
अनुमोदकाचे नाव :– श्री. सतिश चहाळ

**विषय :–** परिवहन डेपोसाठी नियमबाहय पध्दतीने ठेकेदारास भुखंड उपलब्ध करुन दिल्याबाबतची लक्षवेधी सूचना

<u>लक्षवेधी सूचना क्र. २</u>

सुचकाचे नावः— श्री. विजय सुपाळे
अनुमोदकाचे नाव :—श्रीमती निलम प्रेमसिंग रावत

**विषय** :— महापालिकेच्या सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत तयार करण्यात आलेल्या बीपीएल यादीस दिरंगाई होत असल्याने या योजनेचा लाभ घेता येत नसल्याबाबतची लक्षवेधी सूचना

<u>लक्षवेधी सूचना क्र. ३</u>

सुचकाचे नावः— श्री. दिलीप दशरथ गायकवाड
अनुमोदकाचे नाव :—श्री. मुकेश सोहन तेजी

**विषय** :— उल्हासनगर महापालिकेतील विकास कामे, साहित्य खरेदी, नागरीकांना विविध प्रकारच्या सेवा पुरविणे याबाबत निविदा मागविण्यात येतात, निविदेची मुदत संपणेस प्रदिर्घ कालावधी असतांना सुध्दा घाईघाईने मुदतवाढीचे प्रस्ताव सादर करण्यात येतात याबाबतची लक्षवेधी सूचना

<u>लक्षवेधी सूचना क्र. ४</u>

सुचकाचे नावः— श्री. सुनिल गंगवानी
अनुमोदकाचे नाव :—श्री. जीवन इदनानी

**विषय** :— पावसाळयात किरकोळ दुरुस्ती करण्याकरीता दुरुस्ती परवानगी मिळत नसल्याने अतिक्रमण मोठया प्रमाणात होत असल्याबाबतची लक्षवेधी सूचना

<u>लक्षवेधी सूचना क्र. ५</u>

सुचकाचे नावः— श्री. रमेश चव्हाण
अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

**विषय** :— महापालिकेच्या सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत तयार करण्यात आलेल्या बीपीएल यादीस दिरंगाई होत असल्याने या योजनेचा लाभ घेता येत नसल्याबाबतची लक्षवेधी सूचना

<u>लक्षवेधी सूचना क्र. ६</u>

सुचकाचे नावः— श्री. रविंद्र बागुल
अनुमोदकाचे नाव :—श्री. एडके गणपत

**विषय** :— शहरातील नाले सफाईबाबतची लक्षवेधी सूचना

<u>लक्षवेधी सूचना क्र. ७</u>

सुचकाचे नावः— श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :—श्री. दिलीप गायकवाड
श्री. राजेश वानखेडे
श्री. प्रधान पाटील

**विषय :—** मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाकडुन जी सुलभ शौचालय बांधण्यात येतात, या शौचालयापैकी काही शौचालयांची कामे प्रलंबित असल्याबातची लक्षवेधी सूचना

यातील केवळ दोन लक्षवेधी सूचनांना मा. महापौरांकडुन अनुमती घ्यायची आहे. व एक लक्षवेधी सूचना जिचे सुचक आहेत श्री. सुनिल गंगवानी व अनुमोदक आहेत श्री. जीवन इदनानी माझ्यामते ते सध्या सभागृहात उपस्थित नाहीत.

बीपीएलबाबत दोन लक्षवेधी सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यांचा विषय एकच आहे. परंतु सुचक दोन वेगवेगळे आहेत. एका लक्षवेधीचे सूचक आहेत श्री. विजय सुपाळे दुसरे लक्षवेधीचे सुचक आहेत श्री. रमेश चव्हाण या दोन्ही लक्षवेधी मिळून एकच लक्षवेधी सूचना होते.

व दुसरी जी लक्षवेधी सूचना आहे जिचे सुचक आहे श्री. धनंजय बोडारे त्या लक्षवेधीचा विषय मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाकडुन जी सुलभ शौचालय बांधण्यात येतात या शौचालयापैकी काही शौचालयांची कामे प्रलंबित असल्याबातची लक्षवेधी सूचना.

या दोन लक्षवेधी सूचनांना मा. महापौरांकडुन अनुमती मिळाली आहे. बाकी ज्या लक्षवेधी आहेत त्यातील एक लक्षवेधी सूचना वगळता बाकीच्या ४ लक्षवेधी सूचना रद्द करण्यात आल्या आहेत.

श्री. धनंजय बोडारे यांनी प्रथम आपली लक्षवेधी सूचना मांडावी.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>मा. महापौरजी, शहराच्या हिताच्या मुद्दयावरील लक्षवेधी आपण स्विकृत केली नाहीत.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, मी सुध्दा एक गंभीर प्रस्ताव लक्षवेधीद्वारे प्रस्तृत केला आहे. ३३ लाख रुपये खर्च करुन आपण जे मोठ मोठे नाले सफाईचे काम केले आहे. त्याकडे आपण लक्ष दया. यातील किती कामे झालेली आहेत, किती बाकी आहेत? पावसाळा येत आहे, मोठ मोठया नाल्याची सफाईचे काम झाले नाही त्याबाबत मी कित्येक पत्र दिलेली आहेत. ज्याला निविदा दिली आहे त्याने नाले साफ केले आहेत का?

<u>उप—महापौर :—</u>सन्माननिय सदस्य श्री. बागुल साहेब आपण कृपया बसून घ्यावे. सध्या पावसाळा येत नसुन पावसाळा चालु आहे.

<u>सदस्य श्री.रविंद्र बागुल :—</u>त्याने ४५ दिवसामध्ये ही कामे पुर्ण करावयास पाहिजे होती.

<u>उप—महापौर :—</u>आपण दोन लक्षवेधी सूचना घेतलेल्या आहेत.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>ही लक्षवेधी सूचना अतिशय महत्वाची आहे.
<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>परिवहन डेपोसाठीची लक्षवेधी सूचना महत्वाची आहे.

<u>सदस्या श्रीमती मालती करोतिया :—</u>मा. महापौरजी, श्री. रविंद्र बागुल यांनी जी लक्षवेधी सूचना दिली आहे, तिच्याकडे आपण गंभीरतेने लक्ष दिले पाहिजे. कारण की अदयापही नाल्यांची व्यवस्थीत साफसफाई झालेली नाही.

<u>उप—महापौर :—</u>दोन लक्षवेधी सूचनांना मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे. यासाठी कृपया करुन आपण बसावे.
**महापौर** :— मी दोन लक्षवेधी सूचनांना स्विकृती दिली आहे, सचिव साहेब कोणत्या प्रकारची लक्षवेधी सूचना आहे ते सांगा
<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>ठिक आहे, मान्य आहे, पण आमची ही महत्वाची लक्षवेधी सूचना आहे ना साहेब.

<u>महापालिका सचिव:—</u>लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :—श्री. दिलीप गायकवाड
श्री. राजेश वानखेडे
श्री. प्रधान पाटील

**विषय :—** मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाकडुन जी सुलभ शौचालय बांधण्यात येतात, या शौचालयापैकी काही शौचालयांची कामे प्रलंबित असल्याबातची लक्षवेधी सूचना

उपरोक्त लक्षवेधील सुचनेनुसार सभागृहाचे विनंती पुर्वक लक्ष वेधू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून वस्ती व सुलभ शौचालये बाधंण्याची मोहिम राबविण्यास आली असून पुर्णत्वास आलेली शौचालये ही सेवा भावी संस्थांना चालविणेस देण्यात आली आहेत. परंतू काही ठिकाणी गोरगरीब नागरीकांची वस्ती असल्याने आर्थिकदृष्टया कमकुवत नागरीक रहात असल्याने ते शौचालयांची फी भरु शकत नसल्याने तसेच काही ठिकाणी नागरीकांची संख्या कमी असल्याने सेवा, भावी संस्थांना उत्पन्न कमी व खर्च जास्त अशी विचीत्र परिस्थिती निर्माण झाल्याने, पाणी बिल, लाईट बिल भरणे आर्थिकदृष्टया परवडणारे नसल्याने त्यांचे शौचालयांचे साफसफाई व देखभाल व दुरुस्ती कडे दुर्लक्ष होत असून नव्याने बांधण्यात आलेल्या शौचालयातून घाण व दुर्गंधीचे साम्राज्या पसरले आहे. शहरातील साफसफाई हे महापालिकेचे कर्तव्य असल्याने सहानुभूती दाखवून महापालिकेने शौचालयांचे पाणी व लाईट बिल भरल्यास शौचालयांची देखभाल व साफसफाई करणे सेवाभावी संस्थांना सुलभ होईल व साफसफाई अभावी होणारी नागरीकांची गैरसोयही दुर होईल.

तसेच मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून फेस १ व २ अर्तगत मंजूर करण्यात आलेल्या शौचालयापैकी अजूनही काही शौचालयांची कामे प्रलंबील असल्याने स्थानिक नागरीकांची गैरसोय होत आहे. सदरच्या शौचालयांची प्रलंबीत कामे लवकरात लवकर पुर्ण करुन ती लोकाअर्पण करणेकामी सदरची लक्षवेधी सुचना मांडत आहे.

---

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, मी या लक्षवेधीद्वारे लक्षवेधू इच्छितो. एमएमआरडीएच्या माध्यमातुन ज्या उपनगरामध्ये म्हणजेच मुंबई महानगर प्रदेशामध्ये निर्मल एमएमआर अंतर्गत बरीचशी शौचालये बांधली, केली गेली. आणि त्यांची देखभाल सेवाभावी संस्थामार्फत केली जाते. काही प्रस्ताव अजुन प्रलंबित आहेत. परंतु जी शौचालये झाली, त्यांची आजची अवस्था पाहिली तर कशीतरी साफसफाई चालु आहे. लोकांच्या तक्रारी येतात, एमएमआरडीएने सूचना केल्यानुसार आम्ही ती सेवाभावी संस्थांना चालविण्यास दिली. यापुर्वी शौचालयांची संपुर्ण देखभाल, दुरुस्ती महापालिका करत होती. साफसफाईसुध्दा महापालिका करत होती. परंतु एमएमआरडीएने दिलेल्या निर्देशानुसार निधी दयायची जबाबदारी एमएमआरडीएची, बांधुन देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची. इतर सुविधा ज्या दयायच्या त्या सेवाभावी संस्थामार्फत शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर अडचणी एवढया काही आहेत, परंतु त्यातुन मार्ग काढणे हे महापालिकेचे प्रथम कर्तव्य आहे. कारण आम्ही नागरीकांना सुविधा देतो, एमएमआरडीएचा निधी असला तरी तो नागरीकांना सुविधा देण्यासाठी आहे. समस्या निर्माण करण्यासाठी नाही. परंतु आजची परिस्थिती अशी आहे की, अधिकाधिक त्यात समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्याचे कारण आम्ही फाईव्हस्टार शौचालय बांधली. दोन दोन माळयाची शौचालये, कुठे १४ कुठे २०, २०—२० शिटची शौचालय बांधली तेथे बाथरुमपण आहेत. लहान मुलांसाठी, वयोवृध्द माणसांसाठी परंतु त्याची निगा राखली गेली नाही तर संपुर्ण निधी शुन्य होईल. त्याचा परिणाम शहराच्या आरोग्यावर होईल. महापालिका त्याठिकाणी साफसफाईसाठी कर्मचारी नेमु शकत नाही. कारण ते काम सेवाभावी संस्थेस दिलेले आहे. आणि सेवाभावी संस्था त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे करु शकत नाही. पर्यायाने शेवटी दुर्गंधीचे साम्राज्य पुन्हा नगरपालिकेच्या किंवा महानगरपालिकेच्या कालावधीत जी शौचालयांची अवस्था होती ती अवस्था होईल. आणि शौचालयांची

अवस्था तशी होवु नये म्हणुन मी सभागृहाला आणि  महापौरांना विनंती करतो की त्याठिकाणचा आर्थिक बोझा महानगरपालिकेने उचलला पाहिजे. १०० घरे आहेत, घरटी फी ५० रुपये याप्रमाणे १०० घरांचे ५००० रुपये होतात. परंतु त्याठिकाणचे येणारे लाईट बिल ७,००० रुपये आहे. त्याठिकाणी एखादा निवासी सफाई कामगार ठेवला तर किमान वेतनाप्रमाणे तीन हजार किंवा साडेतीन हजार रुपये पगार दिला पाहिजे. बाकी फिनाईल व ऑईल इत्यादी असा खर्च हा साधारण साडेआठ हजारापर्यंत जातो आणि त्याठिकाणचे उत्पन्न मात्र पाच हजार रुपये आहे. म्हणजे काय करायचे त्यांनी? सोडुन दयायचे? ही शौचालये गरीब परिस्थिती असलेल्या वस्त्यांमध्येच आहेत. त्यांचे मासिक उत्पन्न साधारणत: तीन ते साडेतीन हजार रुपये आहे. आणि त्यामध्ये ५० रुपये सुध्दा ते रडुन रडुन देतात, वाढवायचे म्हटले तर त्यास ते नकार देतात. त्यामुळे त्याठिकाणी लोकांमध्ये भांडणे होतात. सीबीओ म्हणजे जी सेवाभावी संस्था आहे. सेवाभावी संस्थामध्ये महिला बचतगट असतील किंवा मित्रमंडळ असतील, त्या परिसरातील गरीब लोकांच्या रोषाला, मंडळाला सामोरे जावे लागते. त्या विभागामध्ये वाद निर्माण होतात. ते जर टाळायचे असतील तर आम्हांला स्वंयस्फुर्तपणे त्याठिकाणच्या विदयुत बिलाचा व पाणी बिलाचा खर्च तरी महापालिकेने करावा अशी कळकळीची विनंती मी या सभागृहाला करतो. जेणेकरुन या शहराचे स्वास्थ /आरोग्य, चांगल्याप्रकारे राहो आणि जी आमची कल्पना आहे आणि धारणा आहे की, उल्हासनगरवाशियांना चांगले शौचालय किंवा स्नानगृह देण्याची आहे ती कायमस्वरुपी राहण्यासाठी त्याचे आयुष्य पुढे टिकण्यासाठी त्याठिकाणी स्वच्छता ठेवणे हे आपल्या महापालिकेचे कर्तव्य आहे. आणि चांगल्यात चांगल्या सुविधा देणे हे उल्हासनगर महानरगपालिकेचे कर्तव्य आहे ते पार पाडु या. त्यासाठी आपला सहभाग, विजेचे बिल आणि पाण्याचे बिल मला वाटते सार्वजनिक बांधकाम विभागातुन याबाबत असा प्रस्ताव यावा. श्री. शिर्के साहेब, याबाबतीत काही तरतुद आहे का? कारण की याबाबतीत तुमच्याकडे भरपुर तक्रारी आलेल्या आहेत. कारण की जे माझ्या विभागात आहे ते प्रत्येकाच्या विभागात आहे. ज्या ज्या ठिकाणी शौचालय झाली त्या त्या ठिकाणच्या लोकांची अपेक्षा नगरसेवकांकडुन आहे की नगरसेवकांनी या बाबतीत काही करावे. तर याबाबतीत सर्व नगरसेवक मला वाटते सहमत असतील की महानगरपालिकेने याबाबतीत आपला सहभाग दयावा. आणि कमित कमी विदयुत देयक अदा करण्याची आणि पाण्याची व्यवस्था त्याठिकाणी करावी. बाकी त्याठिकाणी लागणारे फिनाईल किंवा ऑईल आणि सफाई कर्मचा–याचा पगार इत्यादी खर्च त्याठिकाणचे स्थानिक नागरीक करतील. तर मी विनंती करतो आणि या लक्षवेधीद्वारे सांगु इच्छितो की, या प्रस्तावाचा दुरगामी विचार करुन खर्चासाठी महानगरपालिकेने आपला सहभाग दयावा. धन्यवाद, जयहिंद, जयमहाराष्ट्र।

यावेळी सदस्या श्रीमती मोना वनवारी हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>मा. महापौर महोदया, श्री. बोडारे साहेबांनी लक्षवेधीद्वारे जो मुद्दा उपस्थित केला आहे तो अतिशय चांगला आहे आणि शहरातील हा गंभीर प्रश्न आहे. परंतु श्री. बोडारे साहेब, ज्या ठिकाणी शौचालय अपुर्ण आहेत, ४,४ महिने झालेली आहेत अर्धवट बांधकामे आहेत. त्यांची दुर्दशा झालेली आहेत. ठेकेदाराने कामे बंद केली आहेत त्याचे काय? आपण हाही प्रश्न घेतला पाहिजे ना? श्री. शिर्के साहेब, नाही नाही थांबायचे नाही. याचे उत्तर दया तुम्ही. ४ महिने झाले आहेत ठेकेदार काम करत नाहीत. तुमच्या आपसातील वादामुळे ठेकेदारांचे बिल रखडले आहे ते कोण करणार? कामे अर्धवट राहिली आहेत. आज माझ्या प्रभागातील कामे ४ महिन्यापासुन अर्धवट बंद पडले आहे. अशी कितीतरी शौचालये उल्हासनगर महानगरपालिकेत बंद पडली आहेत. अदयापपर्यंत यांच्या देण्याघेण्याचे व्यवहार पुर्ण होत नाहीत. हा माझा यांच्यावर आरोप आहे. मी चौकशी केली असता ते लोक सांगतात की आमचे अदयाप बरोबर जमलेले नाही. श्री. शिर्के साहेब, याचे उत्तर दया.

यावेळी सदस्य श्री. धनंजय बोडारे हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>काही ठिकाणी बोरींग नाहीत. कितीतरी वेळा आम्ही पत्र दिली आहेत. पाण्याची सुविधा नाही.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u>काही ठिकाणी दुर्घटना झाल्या आहेत, श्री. मोरे साहेबांच्या प्रभागात एक मुलगा सार्व. शौचालयात निधन पावला आहे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>माझ्या प्रभागात गेल्या दोन वर्षापासुन दोन शौचालयांचे बांधकाम होत आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>अशी परिस्थिती असून  कामे अर्धवट आहेत. श्री. शिर्के साहेब याचे उत्तर दया.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>माझा पण तोच प्रश्न आहे. माझ्याही प्रभागामध्ये गेल्या दोन वर्षापासुन शौचालय तोडलेले आहे.  एमएमआरडीएच्या माध्यमातुन त्या शौचालयाचे काम होत असून गेल्या दोन वर्षापासुन सन्माननिय महापौर आणि आयुक्तांकडे तक्रारी दिल्या आहेत.  सार्वजनिक बांधकाम विभागाला देखिल तक्रारी दिल्या आहेत.  परंतु धोबिघाट, कमला नेहरु नगर, स्वामी विवेकानंद शाळेच्या बाजुचा संपुर्ण परिसर गलिच्छ वस्तीचा असून त्याठिकाणचे लोक उघडयावर अंधारात शौचास जात आहेत.  आणि अशी स्थिती असतांना देखील दोन वर्षापासून एमएमआरडीएचे शौचालय तयार झालेले नाही.  त्याबाबत सन्माननिय गटनेते श्री. धनंजय बोडारे साहेब यांनी जी लक्षवेधी सूचना मांडलेली आहे तिच्याशी मी सहमत आहे.  कारण की माझ्या प्रभागाती तानाजी नगर या परिसरातील शौचालय पुर्णत: तयार होवून सध्या चालु स्थितीत आहे. परंतु त्या विभागातील लोकांची प्रतिमहा ५० रुपये देण्याची परिस्थिती नाही.  त्या ठिकाणच्या लोकांचे उत्पन्न कमी आहे आणि खर्च जास्त आहे.  त्यामुळे लोक एवढे पैसे देवु शकत नाही.  ज्या संस्थेला आम्ही ते काम दिले आहे ती संस्था ते काम करु इच्छित नाही.  त्यामुळे त्या शौचालयाची साफसफाई होत नाही.  यास्तव माझी मा. महापौरांना विनंती आहे की, एमएमआरडीएच्या शौचालयांच्या देखरेखीसाठी येणा–या खर्चाचा महापालिकेने वाटा उचलावा. आणि आम्हांला सहकार्य करावे धन्यवाद।

<u>श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य:–</u>सन्माननिय महापौर महोदया, सन्माननिय उप–महापौर, मा. आयुक्त व सर्व सन्माननिय सदस्यगण, निर्मल एमएमआर योजना टप्पा–१ जवळ जवळ पुर्ण झालेला आहे. टप्पा दोन मध्ये ८१ कामे होती.  त्यापैकी १८ कामे हस्तांतरीत झाली आहेत. ती सीबीओंना दिलेली आहेत. आणि ३१ कामे पुर्ण आहेत.  आणि तेथे सीबीओंच गठण चालु आहे.  स्थानिक नगरसेवक आणि स्थानिक मंडळ यांच्या सहकार्याने सीबीओ तयार करत आहोत.  बरेचसे सीबीओ तयार होत आले आहेत.  आणि जी कामे पुर्ण आहेत ती हस्तांतरीत करुन शौचालये लवकरच सुरु करु त्या व्यतिरिक्त ३२ कामे अदयाप सुरु आहेत.  त्यातील ३५ कामे पुर्णत्वाच्या मार्गावर आहेत.  ती सुध्दा लवकरच पुर्ण करुन हस्तांतरीत करीत आहोत.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. महापौरजी, श्री. शिर्के यांचे बोलणे मध्येच थांबवत असल्यामुळे क्षमा मागतो. श्री. शिर्के यांना मी विचारु इच्छितो की, कागदावरील जे आकडे आपण वाचुन दाखवत आहात त्याऐवजी वस्तुस्थिती काय आहे ती आपण सांगा. शहरात एमएमआरडीएची जी काही शौचालये तयार करण्यात आलेली आहेत त्या सर्वांची आपण पाहणी केली आहे का?  जे ठेकेदार खड्डा खोदुन गेले आहेत ते आपण पाहिले आहे काय?  आपण कागदावरील आकडे सांगत आहात एवढी शौचालय तयार केली आहेत आणि एवढी तयार करावयाची आहेत. प्रत्यक्षात हकिकत जी आहे त्याबाबतीत आपण सविस्तरपणे सांगावे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>कागदी घोडे नाचवु नका.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>व आपले उत्तर ठराविक असे असले पाहिजे.  शौचालयांच्या स्थितीस जबाबदार कोण आहे?  जर कुणी ठेकेदार खड्डा खोदुन निघुन गेला असेल तर त्यास जबाबदार कोण आहे?  सार्व बांधकाम विभाग आहे की एमएमआरडीए आहे? ज्या ठेकेदाराने निर्धारीत वेळेत काम पुर्ण केले नाही त्याची देयक रक्कम आपण थांबवुन ठेवली आहे का? आपण त्यांना दंड आकारला आहे का?  या सर्व बाबींचा येथे खुलासा करा.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>त्यांना काळया यादीत टाका.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>काळया यादीत टाकण्याची आवश्यकता नाही. याच लोकांचे कामांकडे लक्ष नाही. चार महिने झाले माझ्या प्रभागातील शौचालय बंद पडले आहे.  मला सांगा तुम्ही कधी शौचालयांची पाहणी केली आहे का?  कारण काय आहे त्याचे? तुम्ही म्हणता हे चालु आहे, ते चालु आहे. १८ पुर्ण झालीत १९ प्रगतीपथावर आहेत, २० व्हायची आहेत, हे आकडे कोणते देत आहात तुम्ही आम्हांला?  आम्ही त्या प्रभागाचे नगरसेवक आहोत, आम्हांला माहित आहे त्या प्रभागात काम तर बंद आहे? मी वारंवार ठेकेदारांना फोन करतो तर ते म्हणतात की, आमचे अदयाप देयक अदा केलेले नाही.  तर ते म्हणतात की, बील निघाले नाही, आमचे देणे घेणे झालेले नाही.  बिलाबद्दल ते लोक टक्केवारी घेतात, काय चालले काय हे? शौचालयाचे

काम बंद का आहे? त्याचे मला उत्तर दया. ठराविकपणे माझ्या प्रभागातील शौचालयाबाबत मी विचारत आहे ते काम बंद का आहे? कॅम्प नं. १ येथिल श्री. राजु जग्यासी व श्री. जमनु पुरस्वानी यांच्या प्रभागातील काम तुम्ही पाहिले आहे. सॉरी, चार्ली साहेबांच्या प्रभागातील काम तुम्ही पाहिले आहे का? तिकडच्या लोकांनी माझ्याकडे तक्रार केली आहे. अतिशय निष्कृष्ट प्रतिचे काम आहे, त्याच्यामध्ये तुम्ही लक्ष दिलेले आहे? तेथे आउटलेट कुठे काढलेले आहे त्याकडे तुम्ही लक्ष दिलेले आहे? काहीही आकडे सांगायचे तुम्ही? शौचालयाचे काम का बंद पडले त्याचे आम्हांला उत्तर दया. आणि ते कधी चालु होणार तेही सांगा नाहीतर आम्हांला आमरण उपोषणास बसावे लागेल.

यावेळी सदस्या श्रीमती नेहा भोईर या सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>सदस्य श्री.बी.बी.मोरे :—</u>श्री.शिर्के साहेब, सन्माननिय सदस्य जे सांगतात ते अगदी बरोबर आहे, आम्ही स्वत: शहरामध्ये फिरलो आहोत. प्रत्येक ठेकेदाराने सांगितले की, आम्हांस बिलाची रक्कम मिळत नाही, आम्हांला पैसे मिळत नाहीत. आम्ही कुठल्या पध्दतीने काम करायचे? एमएमआरडीएच्या सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम आम्ही कसे करायचे? माझ्या प्रभागात एमएमआरडीएच्या शौचालयाचे काम जेव्हा चालु होते त्यावेळेस आयुक्त म्हणुन श्री. उन्हाळे साहेब येथे होते. त्यावेळेस ठेकेदारास वेळेवर बिलाची रक्कम देत नाहीत असे मी श्री. उन्हाळे साहेबांना निदर्शनास आणुन दिले असतांना त्यांनी सांगितले की तुमच्या त्या ठेकेदारास घेवून या. आणि त्यावेळेस मी त्या ठेकेदारास घेवुन आलो ही गोष्ट तुम्हांला देखील माहीत आहे. त्यावेळी त्याला विचारले की, तुझे बिल किती राहिलेले आहे. त्याने बिलाची रक्कम सांगितली, त्यावेळी आयुक्त साहबांनी श्री. शिर्के साहेबांना सांगितले की त्याचे जे बिल असेल ते अदा करा आणि शौचालयाचे ते काम उरकुन घ्या. आणि अशा पध्दतीने त्यास बिल अदा करावयास लावले. तेव्हा कुठे एममएमआरडीएच्या त्या शौचालयाचे काम पुर्ण झाले. आणि तेही काम बरोबर केलेले नाही. त्या शौचालयाच्या बांधकामासाठी पाणी पुरवठा मी करुन दिला. लाईटची जेवढी काही फिटींग होती ती मी माझ्या खर्चाने केली. म्हणजे अशा प्रकारे जर महापालिका लक्ष देत नसेल तर त्याबाबतीत हे जे सदस्य बोलतात ते बरोबर आहे. याबद्दल सदस्यांची समिती नेमा. आणि त्या समितीच्या माध्यमातुन संपुर्ण शहराचा आराखडा तयार करा. एमएमआरडीएचे शौचालये वेळेवर का बांधली जात नाहीत? त्यांची देयके किती अदा करावयाची बाकी आहेत? याबाबतीत महापालिका काहीच विचार करत नाही. बस्स, जे चालले आहे ते चालले आहे. दोन दोन वर्षापासुन शौचालयाची कामे पुर्ण होत नसतील तर काय मग ती आमचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर होतील? २०१२ मध्ये आमचा कालावधी पुर्ण होतो. त्यावेळेस निवडणूका होतील.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>श्री. शिर्के साहेब, काम पुर्ण करुन देण्यासाठी त्यांना काही कालावधी नेमुन दिला असेल ना? आज दिड वर्ष झाले, माझ्या प्रभागातील काम अपुर्ण आहे.

<u>सदस्या श्रीमती जयश्री पाटील :—</u>मा. महापौर, उप—महापौर व आयुक्त साहेब, शौचालयाचे बांधकाम किती महिन्यात पुर्ण झाले पाहिजे? त्याला तुम्ही काही कालावधी ठरवुन दिला असेल ना? माझ्या प्रभागातील २ शौचालयांची कामे दिड वर्षापासुन जशीच्या तशी पडुन आहेत. आता पावसाळयाचे दिवस आहे लोक कुठे जाणार?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>ही लक्षवेधी सूचना आपल्या स्थानावरुन भरकटली आहे.

<u>सदस्या श्रीमती जयश्री पाटील :—</u>परिस्थितीच तशी आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:—</u>लक्षवेधी भरकटलेली नाही. श्री. जमनादास पुरस्वानी असो कि दुसरा कुणी असो, त्यांना मी सांगु इच्छितो की, लक्षवेधी भरकटलेली नाही.

<u>सदस्या श्रीमती जयश्री पाटील :—</u>श्री. शिर्के साहेब नेहमीच चुका करतात. आपल्या महापालिकेचे अधिकारी लोकांना त्यांच्या घरामध्ये सुध्दा शौचालय बांधु देत नाहीत.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>मा. महापौर महोदया, हा एमएमआरडीएच्या शौचालयांबाबतचा विषय आहे, याबाबतची लक्षवेधी सूचना भरकटलेली नाही. आमच्या प्रभागांमधील समस्या आहेत, आम्ही ओरडणारच.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>लक्षवेधी कोणत्या विषयावर मांडण्यात आलेली आहे? लक्षवेधी या विषयावर मांडण्यात आलेली आहे की ज्या संस्था शौचालयांची देखभाल पाहत आहेत त्या संस्था आर्थिकदृष्टया सक्षम नाहीत. त्या लाईट व पाण्याचे बिल भरु शकत नाही.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>हा विषय झोपडपट्‌टीवाल्यांचा आहे, त्यांना जो त्रास होत आहे.....

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>अहो श्री. जमनादास पुरस्वानीजी, ........

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>आपण जे म्हणत आहात की लक्षवेधी भरकटली आहे, आम्ही तिला बरोबर रुळावर आणत आहोत.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>श्री. जमनुजी हा काही फाईव्हस्टार शौचालयांचा प्रश्न नाही. एमएमआरडीएच्या माध्यमातुन जी शौचालय बनविण्यात आलेली आहेत त्यांच्याबाबतचा प्रश्न आहे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>मा. महापौरजी, हा झोपडपट्‌टीवाल्यांशी संबंधीत प्रश्न आहे.

<u>महापौर :—</u>कृपया सर्व सदस्यांनी शांत बसावे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>माझ्या प्रभागात लवकरात लवकर शौचालयाचे काम सुरु झाले पाहिजे.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :—</u>मा. महापौर महोदया, मा. उप—महापौर, आयुक्त साहेब, माझ्या प्रभागात सुध्दा......

<u>सदस्या श्रीमती जयश्री पाटील :—</u>मा. महापौर महोदया, माझ्या प्रश्नाचे मला उत्तर मिळाले पाहिजे. उत्तर दया अगोदर, तुम्ही जाता का सर्व्हे करायला?

<u>उप—महापौर :—</u>तुम्ही बसुन घ्या. श्री. शिर्के साहेब उत्तर देत आहेत.

<u>श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य :—</u>प्रत्येक कामाचा माझ्याकडे अहवाल आहे. कामे बंद आहेत ते मी मान्य करतो. परंतु कामे बिलाची रक्कम अदा न केल्यामुळे बंद आहेत हे मी अजिबात मान्य करत नाही. कारण की, झालेल्या कामाच्या टक्केवारीनुसार आपण त्यांना बिलाची रक्कम अदा करत आहोत. ज्योत्याचे बांधकाम झाल्यानंतर पहिल्यांदा त्यांना २५ टक्के रक्कम अदा केली जाते. आरसीसी काम झाल्यानंतर २० टक्के रक्कम दिली जाते आणि २० टक्के रक्कम काम पुर्ण झाल्यानंतर देतो. बिलाची रक्कम अदा करण्याचे काम कुणाचेही थांबत नाही. एमबी रेकॉर्डीगला उशिर होत असल्यामुळे .......

<u>सदस्या श्रीमती जयश्री पाटील :—</u>अशी दोन दोन चार,चार वर्ष शौचालय बांधावयास लागतात काय?

<u>सदस्य श्री.सतिश चहाळ :—</u>नेमुन दिलेल्या मुदतीत कामे पुर्ण करतील अशाच ठेकेदारांना कामे दिली पाहिजेत. जे ठेकेदार विहित मुदतीत कामे पुर्ण करत नाही त्यास बिल दिले जावु नये.

<u>सदस्या श्रीमती जयश्री पाटील :—</u>आता त्यादिवशी माझ्या प्रभागातील एक माणुस घरामध्ये शौचालय बांधत होता तेथे आपला अधिकारी गेला पैसे मागायला. म्हणजेच तुम्ही घरात पण शौचालय बांधु देत नाही व एमएमआरडीएची सुध्दा शौचालये बांधली जात नाहीत. हे लोक जाणार कुठे? दोन,दोन,तीन,तीन वर्ष बाहेर पावसा पाण्यात बाहेर कुठे जाणार?

<u>उप—महापौर :—</u>सन्माननिय सदस्या श्रीमती जयश्री पाटील महोदया, कृपया आपण जरा बसुन घ्यावे. श्री. शिर्के साहेब तुम्हांला उत्तर देतील.

<u>सदस्या श्रीमती जयश्री पाटील :—</u>किती महिन्यात शौचालय बांधले जाईल ते सांगा.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, हा विषय विधानसभेत सुध्दा गाजला आहे. याबाबत एक तारांकित प्रश्न सुध्दा आला होता की नाही यांना विचारा. श्री. शिर्के यांना विचारा. मी सुध्दा आपणाकडे ब—याच तक्रारी केल्या आहेत.

**श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य :—**विधानसभा तारांकित प्रश्न आला होता.

**सदस्य श्री. किशोर जग्यासी :—**तर मग त्याचे काय केले?

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**श्री. शिर्के साहेब उत्तर दया.

**श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य :—**माझे उत्तर आहे की, कामे पुर्णत्वास आलेली आहेत. काही एनजीओंच्या चुकीमुळे संस्था वाल्यांनी कामे घेतली. पहिल्या टप्पयामध्ये त्यांनी समाधानकारक कामे केली. त्यामुळे सर्वांकडुन अशी मागणी आली की, जनसेवा या संस्थेला कामे दया म्हणुन त्याप्रमाणे आपणही त्यांना कामे दिली. परंतु नंतर त्यांच्याकडुन ती कामे होत नाहीत. त्यामुळे रिस्ककॉस्टवर त्यांच्याकडुन ती आपण काढुन घेत आहोत. आणि ती स्थानिक एनजीओंना देत आहोत. ती कार्यवाही सुध्दा चालु आहे. त्यांना आपण दंडही आकारत आहोत.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**श्री. शिर्के साहेब, कारवाई किती दिवस चालणार? आमचा कालावधी संपल्यानंतर?

**श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य :—**या जुलै अखेरपर्यंत सर्व कामे पुर्ण करायची आहेत.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**दिड वर्ष झालीत. अजुन किती वर्ष चालणार ते सांगा.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**मा. महापौरजी, याबाबतीत माझी एक सूचना असेल की, एममएआरडीएच्या मार्फत जी शौचालय बांधण्यात आली आहे, त्याबाबतीत जर एखादी समिती नेमली जात असेल व प्रत्यक्ष जागेवर जावुन जर पाहणी केली जात असेल तर आणि ती समिती शौचालयांची किती कामे प्रलंबित आहेत, किती कामे अर्धवट आहेत याची जर पाहणी करत असेल तर याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक पुर्ण अहवाल सभागृहापुढे सादर केला जावा. व त्यावर काय निर्णय घ्यायचा तो महासभा घेईल.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—**मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, माझी एक सूचना आहे. ज्या ठेकेदाराने गेल्या दिड दोन वर्षापासून एमएमआरडीएच्या शौचालयाचे काम पुण केले नाही त्या प्रभागातील नागरीकांना जो त्रास सहन करावा लागत आहे, आता सन्माननिय सदस्या श्रीमती जयश्री पाटील यांनी पोटतिडकीने आणि आरडाओरडा करुन व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या प्रभागातील शौचालय तोडण्यात आलेली आहेत, त्याठिकाणी दुस—या शाौचालयांची सोय करण्यात आलेली नाही. प्रभाग क्र. २ व ३ मध्ये शौचालयांची पर्यायी व्यवस्था केलेली नाही. दोन्ही प्रभाग बाजुबाजुला असल्यामुळे तेथिल लोक वारंवार आमच्याकडे तक्रार करत असतात आमच्या शिवसेना शाखांमध्ये तक्रार करत असतात. आणि त्या तक्रारी घेवुन आम्ही याठिकाणच्या संबंधीत अधिका—यांना लेखी दिलेल्या आहेत. मी याठिकाणी आपणांस एक विनंती करु इच्छितो की, आपण त्या ठेकेदाराला काळया यादीमध्ये टाकुन त्याला बाजुला करुन ते काम महापालिकेच्या ताब्यात घ्यावे, जास्त काम राहिलेले नाही. माझ्यामते प्लास्टर, टाईल्स आणि दरवाजे एवढेच काम बाकी रहिलेले आहे. त्या कामासाठी सुध्दा ठेकेदार जाणुनबुजुन अढीबाजी करतात. आपल्या अधिका—यांकडे जर एक बोट दाखविण्याचे म्हटले तर तीन बोटे त्या ठेकेदाराकडे व आमच्याकडे देखील येतील असे मी याठिकाणी प्रामाणिकपणे मत व्यक्त करतो. कारण की मी वारंवार श्री. शिर्के साहेबांच्या कॅबीनमध्ये गेलेलो आहे आणि त्यांनी ताबडतोब संबंधीत ठेकेदाराला बोलावले आहे. त्याला दंड केलेला आहे. आणि त्याच्या ऐवजी दुस—या ठेकेदाराला काम देण्याची त्यांनी पुर्तता केली आहे. दुसरा ठेकेदार नेमण्याची पाळी आली की अगोदरचा ठेकेदार तेथे कडीया, बिगारी घेवुन बांधकाम करण्याचे नाटक करत असतो. आणि ज्याला तुम्ही हे काम देवु पाहता, तो म्हणतो की तुम्ही अगोदर त्या कामाचा पंचनामा करुन जोपर्यंत ते काम मला हस्तांतरीत करत नाहीत तोपर्यंत मी काही काम करु शकत नाही. नाहीतर माझ्यावर गुन्हा दाखल होईल ही वस्तुस्थिती माझ्या प्रभागातील आहे. त्याचबरोबर सन्माननिय सदस्या श्रीमती पाटील यांच्या प्रभागातील शौचालयांची देखील तीच परिस्थिती आहे. तर सन्माननिय महापौर महोदया मी आपणांस विनंती करतो की, एमएमआरडीएची जी शौचालय या उल्हासनगर महानगरपालिकेत बंद आहेत, त्या ठेकेदारांवर कडक कारवाई करुन आपल्या ताब्यात घेवुन उदयापासुनच काम चालु करा. अन्यथा २०१२ मध्ये येणा—या निवणूकीत ज्या काही प्रभागांचे नगरसेवक पुन्हा नगरसेवक पदासाठी उभे राहतील त्यांच्या खाटा पडल्याशिवाय राहणार नाहीत. या भाषेत मी स्पष्टपणे सांगु इच्छितो. प्रभागामध्ये आमची एवढी बदनामी चालली आहे, मग तो कुठल्याही पक्षाचा नगरसेवक असू दया, बाकी इतर सर्व कामे व्यवस्थीत चालली आहेत. महापालिकेकडुन जी काही कामे

चालली आहेत मग ते जलवाहिनीचे असेल किंवा सीसीपॅसेजचे असेल किंवा पदपथावरील दिवाबत्तीची असतील परंतु एमएमआरडीएमुळे फार बदनामी सहन करावी लागत आहे. माझी आपणांस विनंती आहे की, उदयापासुन एमएमआरडीएचे जे कोणी ठेकेदार असतील त्यांना काळया यादीत टाका आणि आपल्या महापालिकेचे जे ठेकेदार असतील त्यांना कामे देवुन आपल्या अधिका—यांच्या नेतृत्वाखाली ताबडतोब ती कामे पुर्ण करुन घ्या. आठ दिवसाच्या आत आम्हांला शौचालयांचा ताबा मिळाला नाही तर मी याठिकाणी जबाबदारीने सांगतो की, मी उपोषणाला बसेन. धन्यवाद।

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सन्माननिय महापौर, उप—महापौर आणि सर्व सन्माननिय सदस्य, एमएमआरडीच्या निर्मल शहर स्वच्छता अभियांनातर्गत जी कामे एमएमआरडीएने दिलेल्या गाईडलाईननुसार दिलेली होती त्यामध्ये पाच संस्थांना एमएमआर रिजनमध्ये ७० टक्के कामे दिली होती, जनसेवेला २० टक्के कामे दिली होती. आणि उर्वरीत एका संस्थेला १० टक्के कामे दिली होती. परंतु या संस्थांना कामे दिल्यानंतर पुर्ण वसई—विरारपासुन इकडे अलिबागपर्यंत जिथे, जिथे एमएमआरडीए रिजनमध्ये कामे दिली होती तेथे त्या लोकांना जास्त कामे मिळाल्यामुळे कामे करता आली नाहीत. म्हणुनच एमएमआरडीएने ज्या सूचना दिल्या होत्या त्यातील कॉस्ट ॲण्ड रिस्क वरती स्थानिक स्वराज्य संस्थाना जर कामे दिली तर त्यास परवानगी दिली होती. तर या आपल्या संपुर्ण शहरात निर्मल शहर स्वच्छता योजने अंतर्गत शौचालये बांधण्याचे हे जी काम चालु आहेत, त्यामध्ये जी कामे अपुर्ण राहिली असतील ती कॉस्ट ॲण्ड रिस्क वरती लोकल संस्थेमार्फत सर्व्हेक्षण करुन पुर्ण करुन घेवु. आणि ज्या संस्था पुर्ण करु शकलेल्या नाहीत त्यांना ब्लॅक लिस्ट मध्ये टाकण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने करावे अशा मी सूचना देतो.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—साहेब, त्या विषयावर आपण काही बोलला नाहीत तर त्या संस्थांना लाईट व पाणी मोफत दयायचे आहे, त्याबाबत महासभा काय करु शकते? प्रशासनाकडुन याबाबतीत पुढील महासभेत काही प्रस्ताव येईल का?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—एमएमआरडीएने ज्या सूचना दिल्या होत्या त्यानुसार लाईट, पाणी आणि वापराबद्दलचे शुल्क हे त्या विभागातील नागरीकांकडुन घेवुनच त्याचा वापर करावयाचा होता. त्यामध्ये कॉस्ट बेनेफिट जो काही होता सुरुवातीपासुन जेव्हा ही स्किम आली, तेव्हा आपल्यापुढे ती ठेवली होती तर सीबीआयने तो सर्व खर्च करायचा होत. पाण्याचे जे कनेक्शन आहे त्याऐवजी बोरवेल घ्यावी. लाईट आणि गॅसनिर्मीती अशा काही गोष्टी.......
..

सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—आयुक्त साहेब, एक मिनिट मी तुम्हांला सांगु इच्छितो, ज्या संस्थांना हे काम दिले आहे त्या संस्था आर्थिकदृष्टया सक्षम नाहीत. आणि त्यांना पाहिजे तेवढा पुरेसा पैसा मिळत नाही आणि त्यासाठी आम्ही महासभेला विनंती केली आहे की, त्यातील खर्चाचा काहीतरी वाटा महापालिकेने घेतला पाहिजे. सात,सात आठ,आठ हजार रुपये लाईटचे बिल येते. तेवढे बिल ती संस्था भरु शकत नाही. त्यांना पाहिजे तेवढा पैसा मिळत नाही.

उप—महापौर :—मा. महापौरांच्यावतीने मी सांगु इच्छितो की, आपल्या सभागृहातील दोन सदस्य एमएमआरडीएचे सदस्य आहेत. त्यांच्यामार्फत आपण आपल्या महासभेचा एक ठराव एमएमआरडीएला पाठवु की आमच्या सीबीओला अशा अशा प्रकारची अडचण आहे. विदयुत बिलाची पैसे भरण्याची अडचण आहे. बोरींगला तर पाणी लागणार नाही त्यासाठी त्यांना नळाचे कनेक्शन दयावे लागेल. या सर्व समस्या आपल्या सभागृहाचे जे दोन सदस्य एमएमआरडीएचे सदस्य आहेत त्यांच्यामार्फत पाठवु आणि त्यावर त्यांचा काय अभिप्राय येतो त्यानुसार पुढील कार्यवाही करु.

महापालिका सचिव :—दुसरी लक्षवेधी सूचना जीचे सुचक आहेत श्री. रमेश चव्हाण

लक्षवेधी या प्रकारची आहे..........

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

सुचकाचे नाव:— श्री. रमेश चव्हाण
अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

**विषय :—** महापालिकेच्या सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत तयार करण्यात आलेल्या बीपीएल यादीस दिरंगाई होत असल्याने या योजनेचा लाभ घेता येत नसल्याबाबतची लक्षवेधी सूचना

उपरोक्त लक्षवेधी सुचनेनुसार विनंतीपूर्वक लक्षवेधी इच्छितो की, उल्हासनगर महापालिकेच्या सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत तयार करण्यात आलेल्या बीपीएल यादीचे सर्वेक्षण सन—२००५ मध्ये होवून अंतिम बीपीएल यादी प्रसिध्द होत नसल्याने या योजनेच्या लाभार्थ्यांना लाभापासून वंचित रहावे लागत आहे.

तरी या दिरंगाईस करणारे अधिकाऱ्यांवर का कार्यवाही करण्यात येवू नये, या करिता महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

---

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, मी सभागृहाचे लक्ष वेधु इच्छितो की, सन २००५ मध्ये जी यादी अंतिम टप्प्यात गेलेली आहे. परंतु ती अदयाप प्रसिध्द झालेली नाही. तिच्याबाबतीत जी दिरंगाई झालेली आहे. त्यासाठी जे कर्मचारी दोषी आहेत, आणि यादी प्रसिध्द न झाल्यामुळे ज्या गोरगरीबांना वृध्द नागरीकांना संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत किंवा श्रावणबाळ योजने अंतर्गत त्याना जे पैसे मिळणार होते त्यांच्यापासुन ते वंचित आहेत. त्यास जबाबदार असणारे कर्मचारी कोण? याचे साहेब उत्तर दया पहिले. अजुन यादी प्रसिध्द का झालेली नाही? आणि त्यामागचे कारण काय?

<u>श्रीमती संगिता धायगुडे (उप—आयुक्त, आरोग्य):—</u>मा. महापौर महोदया, उप—महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, त्याचबरोबर सर्व सन्माननिय सदस्य, याबाबत मी जरा थोडक्यात सगळी माहित सांगते. साधारण २००५ पासुन आपण म्हणालात त्याप्रमाणे सर्व्हेक्षण झालेले आहे. त्यावेळी प्रपत्रांची संख्या २५ हजार सहाशे सोळा होती. आणि सदरची यादी १८/८/२००७ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानंतर हरकती व सूचना मागविल्यानंतर ७,३७३ कुटुंबांनी आक्षेप नोंदविले होते. त्यानंतर महासभेपुढे ७३७३ कुटुंबियांची यादी ठेवल्यानंतर २००७ साली महासभेने त्यावर निर्णय न घेतल्यामुळे ती यादी जिल्हा नागरी विकास यंत्रणा यांच्याकडे म्हणजेच डुडाकडें पाठविण्यात आली होती. डुडाकडुन त्याबाबत पुढील कार्यवाही काही झालेली नाही. त्यांनी २३७२ ची यादी कायम केली. आणि उर्वरीत जी १२ हजार कुटुंबे होती त्यांनी आक्षेप नोंदविले होते त्या यादीवर पुन्हा सर्व्हेक्षण करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर १२ हजार कुटुंबियांचे सर्व्हेक्षणाचे फॉर्म भरुन घेतले त्याची संगणकावर नोंद करण्यात आली आणि मी आल्यानंतर त्या यादीचे काम हातात घेतले होते. त्या अनुषंगाने १४ हजार २३ अधिक २५० एवढया आक्षेपांचे जे अर्ज होते ते आणि अधिक दोन हजार पाचशे असे सगळे मिळुन सोळा हजार सातशे त्रयहत्तरची यादी पुन्हा टंकलेखित करायला घेतली त्यानुसार आम्ही मार्चमध्ये ती यादी टंकलेखित करुन डुडोकडे म्हणजे महाराष्ट्र नगरविकास संचालनालयाकडे पाठविण्यात आली होती. परंतु मार्चमध्ये त्यांच्याकडे यादी गेल्यानंतर त्यांनी आम्हांला सांगितले की या यादीमध्ये आम्हांला फेरफार करुन हवेत. त्यामध्ये त्यांनी तीन प्रकारचे वेगवेगळे फॉर्मेट तयार करुन दिले होते. आणि त्यामध्ये निवड न झालेल्या यादीतील आक्षेप अर्ज होते, तसेच नावात दुरुस्ती होती. अशा तीन प्रकारे वेगवेगळया यादी आम्हांला बनवायला सांगितली. त्याचबरोबर तेच फॉर्म इंग्रजीमध्ये करुन पुन्हा एक इंग्रजीची यादी बनवायला सांगितली. आणि त्या अनुषंगाने मार्चपासुन काम सुरु झाले. युध्दपातळीवर ते काम सुरु होते परंतु ठेकेदारांस मध्यल्या काळात पैसे न मिळाल्याने त्याने काम थोडे बंद केले. कारण शासनाकडुन जो निधी मिळणार होता त्यासाठी मी पाठपुरावा करत आहे, परंतु शासनाकडुन अदया पतो निधी मिळालेला नाही. ज्या दिवशी ठेकेदाराने ते काम बंद केले त्याच दिवशी मी मा. आयुक्तांकडे टिप्पणी सादर केली. महानगरपालिकेच्या निधीतुन पैसे खर्च करुन ज्यावेळेस शासनाकडुन पैसे येतील त्यावेळेस ते पैसे महापालिकेच्या निधीत टाकु अशा अर्थाने मी टिप्पणी सादर केली. मा. आयुक्तांनी ती मान्य केली. त्या अनुषंगाने त्या ठेकेदारास २६ —२७ हजाराचे देयक

अदा केले आहे. आणि त्याचे काम सलगपणे चालु  आहे. आज–उदयापर्यंत ते काम शेवटच्या टप्प्याला आलेले आहे. आपली ही यादी दोन दिवसात तयार होईल. आणि शासनाकडे जाईल. शासनाकडे गेल्यानंतर मी सांगु शकत नाही की,  साधारणत: किती वेळ लागेल. मी या महापालिकेत आल्यानंतर त्याबाबत मी सलगपणे पाठपुरावा करुन काम सातत्याने करुन घेतलेले आहे. परंतु त्याअगोदर मला असे वाटते की, विलंब होण्याचे कारण असे असेल की आपल्याकडे प्रकल्प अधिकारी हे पद भरलेले नव्हते. आणि समुह संघटक ज्या मानधन तत्वावर आहेत त्या काम करत असाव्यात. म्हणुन कदाचित पुर्वी त्या कामासाठी उशिर झाला असेल.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :–संबंधित अधिकारी आता सुध्दा या सभागृहात आलेले नाही आहेत?

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–एक आठवडयापासुन प्रकल्प अधिकारी यांस टायफाईड झाल्यामुळे आजारी आहेत. त्याबाबत त्यांनी माझ्याकडे अर्ज दिलेला आहे.

सदस्या श्रीमती ज्योती माने :–मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, ज्या बीपीएल दाखल्याची ज्यांना गरज आहे त्यांनाच ते दाखले दया. कारण त्याच्यासाठी संजय गांधी निराधार योजना, बचत गट तसेच बचत गटाचा जो निधी भेटतो तो गेल्या दोन वर्षापासुन त्यांना भेटलेला नाही.

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–सन्माननिय सदस्या, आपल्या येथील दारिद्रिय रेषेखालील लोकसंख्या अडीच हजार आहे.......

सदस्या श्रीमती ज्योती माने :–मा. महोदया, ती यादी जाण्यासाठी आता पाच वर्ष जातील? तुम्ही सर्व्हे करा, जो व्यक्ती यासाठी योग्य आहे त्यालाच तुम्ही दाखले दया?

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–सन्माननिय सदस्या, शासनाची मान्यता येईपर्यंत आपणांस ते दाखले देता येणार नाहीत. त्याबद्‌दल क्षमस्व.  आणि दुसरी गोष्ट म्हणजे जी संजय गांधी निराधार योजना आहे, त्याबाबत ब–याच लोकांच्या तक्रारी येतात. परंतु जर १३ हजाराच्या, १४ हजाराच्या यादीमध्ये जर त्या व्यक्तीचे नाव असेल तर त्यास आपण एक कच्चा दाखला देतो. म्हणजेच नाही असे म्हणत नाही.

सदस्या श्रीमती ज्योती माने :–आज बीपीएल दाखल्याची प्रत्येक ठिकाणी गरज आहे. ते कधी भेटणार?

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–होय, मला माहित आहे, मी याबाबत युध्दपातळीवर काम करत आहे.

सदस्या श्रीमती ज्योती माने :–याबाबत महिला नाराज आहेत. कारण त्यांना निधी भेटत नाही.

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–मला माहित आहे, परंतु काही गोष्टी अशा आहेत की त्या माझ्या हातात नाहीत, उदयापर्यंत मी यादी पाठविते परंतु तेथुन ती यादी पुढे शासनाकडे गेल्यानंतर ताबडतोब पाठपुरावा करुन मी लवकरात लवकर मंजुर करुन घेण्याचा प्रयत्न करेन. तुमच्या इतकीच मलाही काळजी आहे, कारण माझ्याकडे रोज महिला येतात आणि दाखल्याबाबत बोलत असतात.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, मी श्री. रमेश चव्हाण यांचे अभिनंदन करतो. कारण गरीब व गरजु लोकांचा विषय त्यांना येथे मांडला आहे. आपण जे बीपीएलचे दाखले देणे बंद केलेत, आपण २००५ बद्‌दल बोलत आहात परंतु समजा एखादी गरीब बाई आहे तिचा नवरा निधन पावल्यानंतर तर तिला शासनाकडुन ज्या सुविधा भेटतात तर त्यासाठी दाखले लागतात, दाखल्यात तिचे नाव नसेल ती त्या महिला वंचित राहते. तर अशा स्त्रीयांसाठी आपण काय योजना केलेल्या आहेत?

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–मी आताच सांगितले की, २००३ च्या यादीमध्ये जर त्यांची नावे असतील तर ताबडतोब.................

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>नाही, नाही २००५ च्या  यादी नंतर जी सात—आठ वर्ष झालीत त्यानंतर लोक आलेत, तीच लोकसंख्या राहिली नाही. आता लोकसंख्या वाढली आहे. आपण सर्व्हे करा, रोज माणसे मरतात, रोज जन्माला येतात, परंतु ज्या महिलेचा नवरा निधन पावला त्या महिलेचे नाव बीपीएल मध्ये येते तर त्यांच्यासाठी आपल्याकडे काय सुविधा आहे? दाखल्याशिवाय आता काही सुविधा भेटत नाहीत.

<u>श्रीमती संगिता धायगुडे (उप—आयुक्त, आरोग्य):—</u>तेच मी आता सांगीतले की, १६,७७३ ची जी यादी आहे जी अजुन निश्चित झालेली नाही जे बीपीएलचे आहेत किंवा नाहीत तरी सुध्दा त्यांचे नाव यादीमध्ये आहे अशा अर्थाचे दाखले त्यांना तात्पुरते देत आहोत. जेणेकरुन त्या योजनेपासुन त्या वंचित राहु नयेत. तशी काही अडचण येणार नाही.  १२—१३ हजाराची जी यादी आहे जर त्यांचे या यादीत नाव असेल तर आपण त्यांना तात्पुरता दाखला देत आहोत.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>उप—आयुक्त महोदया, मी ती गोष्ट करत नाही. समजा एक महिना झाला, दोन महिने झाले, चार महिने झाले, पाच महिने झाले, एक वर्ष झाला असेल, असे लोक जे बीपीएलमध्ये मोडतात त्यांच्यासाठी आपण काय सुविधा केल्या?  त्यांच्यासाठी काय उपाययोजना केल्या आहेत?

<u>श्रीमती संगिता धायगुडे (उप—आयुक्त, आरोग्य):—</u>नाही, जर या यादीमध्ये नावे नसतील तर............

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u> या यादीची गोष्टच नाही करत,नविन नोंदणी करण्याविषयी बोलत आहे.

<u>श्रीमती संगिता धायगुडे (उप—आयुक्त, आरोग्य):—</u>आले लक्षात, परंतु त्यासाठी जेव्हा शासन जाहिर करेल नविन सर्व्हेक्षण त्याच वेळेस त्यांची नावे घेता येतील तोपर्यंत महिला व बालकल्याण योजनेमधुन काही महापालिका त्यांना काही देवु शकत असेल तर तेवढेच फक्त आपण करु शकतो.  या योजनेमार्फत केंद्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार त्यांना काही देता येणार नाही.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>त्यासाठी आपणांस काय करावे लागेल, एक ठराव पास करावा लागेल काय? तशी सूचना दया आम्हांला?

<u>श्रीमती संगिता धायगुडे (उप—आयुक्त, आरोग्य):—</u>नाही, महिला व बालकल्याण समितीच्या सभापंतीने ते ठरावावे की त्यांना काही देता येईल का?  परंतु सर्व्हेक्षणासाठी काही करता येणार नाही, त्यांची नावे नविन घेता येणार नाही.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>श्री. सुरेश जाधव यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्यांचा प्रश्न बरोबर आहे आपण या सभागृहास मार्गदर्शन करा, त्यांचे म्हणणे आहे की आपण काही ठराव पास करुन काही करु शकतो काय? महिला बालकल्याण मार्फत नाही.

<u>श्रीमती संगिता धायगुडे (उप—आयुक्त, आरोग्य):—</u>काही करु शकत नाहीत.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>जे गरीब आहेत त्यांना असेच सोडुन देणार काय? असा काही शासन निर्णय आला आहे काय?  जी सुविधा आपण लोकांना देत आहात, गरीब लोकांना ज्या काही सुविधा देतो त्या सुविधा बंद केल्या जाव्यात.  पाहिजे तर अशा प्रकारचा ठराव सभागृहात पारीत करा?

<u>सदस्य श्री. नरेद्र दवणे :—</u>अहो, मराठीत बोला ना?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>नाही, नाही, मी काय म्हणतो एखादा जर गरीब आहे तर त्यांच्यासाठी सुविधा बंद करायला पाहिजे मग? पाच,पाच, सहा,सहा वर्षानंतर त्यांच्या सुविधा बंद केल्या पाहिजेत?  जे नविन लोक आलेत त्यांच्यासाठी तुम्ही म्हणतात की त्यांना कायदयाने देता येणार नाही.

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–नाही, नाही त्यासाठी शासनाकडे विचारणा केली होती, माझ्याकडे सुध्दा काही महिला येतात मलाही खुप वाईट वाटते. परंतु मी काही करु शकत नाही. कारण शासनाने स्पष्ट सांगितले आहे की, जोपर्यंत दुसरे सर्व्हेक्षण होत नाही तोपर्यंत आपण काही करु शकत नाही.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–तर मग आम्ही येथुन ठराव पास करुन पाठवु शकतो काय?

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–तुम्हांला जर पाठवायचे असेल तर त्याबाबत मा. सचिवांकडे विचारणा करु शकतात. परंतु मला असे वाटत नाही की शासनाच्या कुठल्याही शासन निर्णयामध्ये असे बसते म्हणुन. त्यामुळे शक्यता कमी आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–सचिव साहेब, याबाबतचा प्रस्ताव आपण पुढच्या महासभेत आणु शकतो काय? कारण की, श्री. सुरेश जाधव यांनी जो प्रश्न विचारलेला आहे तो फार महत्वाचा प्रश्न आहे.

महापालिका सचिव :–कायदेशीर असले पाहिजे ना?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–ठिक आहे, उप–आयुक्त महोदयांकडे तो शासन निर्णय आलेला नाही आहे, आता समजा जर उदया, परवा एखादया महिलेचा नवरा वारतो, मुले लहान असतात आणि ती महिला बीपीएलमध्ये येते आणि तिला तो दाखला उपलब्ध नसतो, तिला जो १० हजाराचा शासनाकडुन फायदा मिळणार असतो त्यापासुन ती वंचित राहते. अशांसाठी काय?

सदस्य श्री. रमेश चव्हाण :–उप–आयुक्त महोदया, तुम्ही जो तात्पुरता दाखला देतात त्याचा तहसिलदार मध्ये त्यांचा काही उपयोग होत नाही.

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–नाही, आता आम्ही जो दाखला देतो तो कच्चा दाखला देत असलो तरी ग्रहय धरला जातो.

सदस्य श्री. रमेश चव्हाण/श्री. सुरेश जाधव :–नाही, नाही तो ग्रहय धरला जात नाही. तुमच्या कच्च्या दाखल्याचा काही उपयोगच नाही.

सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :–मी वारंवार तुम्हांला हेच सांगत आली आहे की, तो दाखल तहसिलदार कार्यालयात मान्य केला जात नाही. गेल्या तीन वर्षापासुन माझे प्रयत्न चालु आहेत की, महिलांना बीपीएल कार्ड मिळाले पाहिजे, कारण या उल्हासनगर शहरातील महिला सर्व लाभांपासुन वंचित राहिलेल्या आहेत.

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–खरे तर या योजनेचा आणि त्या योजनेचा काही संबंधच असायला नाही पाहिजे कारण या दोन्ही योजना वेगवेगळया आहेत असे त्यांनी दयायला हवे होते. आता शासनाचे निर्णय आहेत त्यामुळे ते सांगत असतील. परंतु या योजनेमध्ये ते पात्र आहेत असे जर आम्हांला वाटत असेल तर आम्ही त्यांना दाखले देत आहोत. आणि ते मान्य करायला काही हरकत नसावी.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–आपण त्यावर तात्पुरता दाखला असा उल्लेख करता. त्यामुळेच ते देत नाहीत.

सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :–तहसिलदारमध्ये तात्पुरता दाखला मान्य केला जात नाही. याबाबत मी तुम्हांला बोलले होते. महिला, तहसिलदार कार्यालयात जातात व परंत येतात, जातात परत येतात. संजय गांधी निराधार योजनेचा त्यांना अजिबात फायदा मिळत नाही.

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–यामध्ये मी एकच करु शकते की, आपली ही जी यादी आहे ती लवकरात लवकर मान्य करुन आणण्याचे मी काम करते, धन्यवाद।

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–हे पळकुटे उत्तर आहे.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>नाही, उत्तर बरोबर नाही आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>प्रश्नाचे उत्तर दिले नाही लवकर सटकु नका महोदया.

<u>श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u>नाही, नाही पळकुटे उत्तर नाही. माझ्याकडे सध्या जे काम चालु आहे तेच काम चालु आहे तुम्ही येवुन बघा. उदयापर्यंत ते काम संपेल.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>प्रकल्प अधिकारी आताही नाही. आयुक्त साहेब, त्यांच्या जागी आपण दुस–यास कार्यभार का देत नाहीत? समजा, त्या आठ दिवस कामावर येणार नाहीत, महिनाभर कामावर येणार नाहीत. तर मग काय काम बंद ठेवणार? जे गोरगरीब ६५ वर्षाच्या वरील वयाचे नागरीक आहेत, त्यांचे घरच त्यांच्यावर चालते त्यांना आधारच नाही, निराधार आहेत त्यांचे काय होणार? त्यांना कोण पोसणार आहे? तुम्ही पोसणार आहात काय? अशा वेळेस प्रकल्प अधिकारी सुट्टीवर आहेत असे जे तुम्ही सांगतात ते काय कारण झाले काय?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. आयुक्त साहेब, या निर्णयामध्ये महानगरपालिकेची काही जबाबदारी आहे की नाही?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>ते उल्हासनगर शहराचे नागरीक आहेत. आयुक्त साहेब, माझा तुमच्यावर आरोप आहे की, तुमचे त्यांच्यावर बिल्कुल नियंत्रण नाही. ते कधी येतात, जातात ते काही नाही. खास करुन तुम्ही प्रमुख आहात तुमच्यावर माझा आरोप आहे. दुपारी जेवायला गेले की सरळ घरी निघुन जातात परत कामावर येतच नाहीत.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>श्री. रमेश चव्हाण साहेब, आता जे म्हणाले ते अगदी बरोबर म्हणाले. आयुक्त साहेब, महापौर, उप–महापौर, तुम्ही आणि मी जी आपण पाहणी केली होती त्यावेळेस किती कर्मचारी हजर होते ते आपणांसही माहित आहे. येतात कधी, जातात कधी? काही कुणावर अंकुश राहिलेला नाही. त्यादिवशी त्यांच्यावर काय कारवाई केली ते मला समजले नाही? त्यांनंतर त्या दिवसाचा आपण मा. महापौरांना अहवाल दिला का? साहेब, विषय भटकावयाचा नाही आहे. अधिका–यांवर आपले नियंत्रण नाही.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>मा. महापौरजी, राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांनी दारिद्रय रेषेखालील नागरीकांसाठी एवढया काही योजना काढलेल्या आहेत परंतु आपल्या महानगरपालिका क्षेत्रातील लोक त्या योजना अंतर्गतच्या सुविधांपासुन वंचित राहतात. ही दुर्देवाची गोष्ट आहे. त्यामध्ये महापौर या नात्याने आपण स्वत: लक्ष घाला आणि या अधिका–यांवर नियंत्रण ठेवा. दारिद्रय रेषेखालील नागरीकांना लवकरात लवकर लाभ मिळण्यासाठी प्रयत्न व्हावा, ही मेहरबानी.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>सन्माननिय महापौर महोदया, उप–महापौरजी व सर्व सन्माननिय सदस्य, कार्यालयामधील कर्मचा–यांच्या उपस्थितीचा सन्माननिय सदस्यांनी जो मुद्दा येथे उपस्थित केला, त्या संदर्भात सांगु इच्छितो की, बायोमॅट्रीक सिस्टम आपण येथे आठवडाभरामध्ये लागु करत आहोत. प्रवेशद्वाराजवळ आपण जे मशिन लावणार आहोत त्या मशिनवर अंगठा लावुन कर्मचारी आपल्या उपस्थितीची नोंद करणार आहेत. त्याबाबतची कार्यवाही येत्या आठवडयात सुरु होईल. त्यासाठी जी कॅबीन तयार करावयाची होती त्यामध्ये थोडा उशिर झाला. दुसरी गोष्ट म्हणजे ज्या प्रकल्प अधिकारी आहेत त्या दोन तीन दिवस गैरहजर राहतील असे सांगुन गेल्या होत्या परंतु आठवडा झाला तरी त्या अदयाप आलेल्या नाहीत. त्यांना आपण सूचना दिलेल्या आहेत की त्यांचा चार्ज आपण दुस–या कुणास दयावा की ज्यामुळे नागरीकांची गैरसोय होणार नाही. मागच्या वेळेस जो मुद्दा आपण उपस्थित केला की जे गैरहजर होते त्या सर्वांना आपण ज्ञापन दिलेले आहे. आणि या नंतर कार्यालयामध्ये वेळेवर हजर राहण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>श्री. रमेश चव्हाण, श्री. प्रशांत धांडे, श्री. सुरेश जाधव, श्री. विजय सुपाळे यांनी हा जो मुद्दा येथे उपस्थित केला त्याचा विषय अतिशय गंभीर आहे. उल्हासनगर सारखे शहर ७ लाखाची

लोकसंख्या त्यातुन १६ हजार लोकांची यादी तयार होते. व त्यातुन अंतिम यादी २१७३ ची तयार होते. आम्ही ८१ नगरसेवक या सभागृहात बसलो आम्ही जेव्हा प्रभागामध्ये फिरतो तेव्हा आम्हांला माहित पडते किती लोक दारिद्रिय रेषेखाली जीवन जगत आहे ते? त्यामुळे मी सांगु शकतो की, दारिद्रिय रेषेखाली केवळ २१७३ लोक असुच शकत नाहीत. आमच्या शहरामध्ये गरीब लोक सुध्दा बरेच आहेत व सरकारी सुविधांपासुन ते वंचित राहतात. श्री. सुरेश जाधव यांनी सांगितल्या प्रमाणे आमच्याकडे बरेचसे अर्ज आले होते. त्यावेळेला या कामाचे सर्व्हेक्षण बरोबर झालेले नव्हते. जे लोक पात्र होते त्यांना सुध्दा अपात्र ठरविण्यात आले. यादी बरोबर तयार करण्यात आली नाही. याबाबतीत श्री. सुरेश जाधव यांचा ठराविक असा प्रश्न होता. श्री. सुरेश जाधव यांचा प्रश्न होता की, एखादया गरीब कुटुंबातील कर्त्या पुरुषाचे निधन होते आणि त्या कुटुंबास त्यांना सरकारकडुन दारिद्रिय रेषेखालील योजनेच्या सुविधा मिळत नाहीत कारण की त्यांचे नाव दारिद्रिय रेषेखालील यादीत नाही असे तहसिलदार कार्यालयात सांगितले जाते. तर सर्वांचे असे म्हणणे आहे की, याबाबत पुन्हा सर्व्हे झाला पाहिजे. उत्पन्नाच्या दाखल्यासाठी ब—याच लोकांनी अर्ज केले आहेत त्यांनाही दाखले मिळालेले नाहीत. यासाठी आपण सभागृहाला मार्गदर्शन करा की, कोणत्या प्रकारे लोकांचे नाव बीपीएलच्या यादीमध्ये येवु शकते. त्याबाबत आपण जरा सांगा.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>सन १९९७, ९९ मध्ये त्यावेळेस आपले उप—आयुक्त जे असायचे ते त्यावेळेस दाखले दयायचे, आणि त्यामुळे जे गरजु लोक असायचे त्यांचा सर्व्हे केल्यानंतर ते उप—आयुक्त स्वत:च आपल्या येथुन दाखले दयायचे. आता कल्पना नाही, वरुन काही आदेश आल्यामुळे ते बंद झाले आहे. असे महानगरपालिकेस अधिकार नाहीत का आपले उप—आयुक्त स्वत:हुन त्यांना दाखले देवु शकतात. कारण बरेचसे गरजु लोक दारिद्रिय रेषेखालील योजनांच्या लाभापासुन वंचित राहतात. पाच,पाच, सहा,सहा वर्ष झालीत अदयापपर्यंत दारिद्रिय रेषेखालील सर्व्हेक्षणांच्या यादीत त्यांची नावे आली नाहीत. पाच,पाच,सहा,सहा वर्ष गरीब माणसे काय करणार? १९९७ पासून मी नगरसवेक आहे तेव्हापासुन मी पाहत आलो आहे, आपले उप—आयुक्त दाखले दयायचे आणि त्यामुळे गरीबांची कामे व्हायची. असे काही आपल्या महापालिकेच्यावतीने करता येत असेल तर त्यावर उपाय काढावा, धन्यवाद।

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>सन्माननिय महापौर महोदया, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना १/१२/१९९८ ला सुरु झाली. त्यापुर्वीच्या ज्या तीन योजना होत्या. त्यात प्रायमिनिस्टर अर्बन प्रोव्हर्टी इरागीटीशन प्रोग्रम ही एक योजना आहे, अर्बन बेसिक सर्व्हिसेस फॉर पुवर्स आणि जवाहरलाल नेहरु रोजगार योजना या तीन योजनांचे एकत्रिकरण करुन ही सुवर्ण जयंती रोजगार योजना सुरु झाली. याकामी सुरुवातील जे सर्व्हेक्षण झाले होते त्यामध्ये ४१९ रुपये ९८ पैसे असे डरडोई उत्पन्न असेल असा व्यक्तींचा सर्व्हेक्षणामध्ये अंतर्भाव करण्यात आला होता. त्यामध्ये आर्थिक निकषामध्ये ४१९ रुपये ९८ पैसे आणि ना आर्थिक निकषामध्ये घराची स्थिती काय आहे त्यांच्या छप्पराची स्थिती काय आहे, बाथरुम आहे की नाही कलर टिव्ही, व्हिडिओ, मोटरसायकल या सगळया गोष्टींचा त्यामध्ये अंतर्भाव होता आणि त्याच्यावरुन हे सर्व्हेक्षण होत होते. आपल्याला ते कुटुंब गरीब दिसते म्हणुन गरीब म्हणता येत नाही त्याचा एकुण आर्थिक व सामाजिक दर्जा विचारात घेवुन त्याचे सर्व्हेक्षण होते. आता १० वर्षानंतर पुन्हा केंद्र सरकारने सूचना दिल्या की, पुन्हा सर्व्हेक्षण करावे. त्यानुसार २००८ मध्ये आपण हे सर्व्हेक्षण पुन्हा करायला घेतले होते. आणि त्यानंतर आर्थिक निकष सुध्दा थोडेसे शिथिल केले होते आणि नॉनइकोनॉमिकल पॅरामिटरर्स मध्ये सुध्दा सुधारणा केली होती. कलर टीव्ही ऐवजी ब्लॅक ॲण्ड व्हाईट टिव्ही असला तर नाव त्या यादीत घ्यावे अश्या सूचना आलेल्या होत्या. हे जे सर्व्हेक्षण झालेले आहे त्यामधील केंद्र सरकारच्या सूचनांमध्ये आपण बदल करु शकत नाही.किंवा पुन्हा याबाबतीत जेव्हा सूचना येतील तेव्हा त्याचे सर्व्हेक्षण होईल. आपण या प्रकरणांमध्ये सूचना व हरकती घेतल्या होत्या. ही यादी प्रसिध्द केली होती. त्यानंतर जेवढे जेवढे लोक आले होते त्यांना आपण सूनावणी दिली होती. सुनावणी दिल्यानंतर आपण ही यादी अंतिम करावयास घेतली होती. महासभेची मंजुरी मिळाल्यानंतर आपण स्टेट अर्बन डेव्हलोपमेंट एजन्सी सुडाच्या मान्यतेनंतर सुडा नावाची एक केंद्र / राज्य शासनाची ॲपेक्स बॉडी आहे. त्यांच्याकडे आपण ही यादी मंजुरीस पाठवित असतो. त्यामुळे आपण सन्माननिय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला होता की, नविन सर्व्हेक्षण करता येईल काय? आणि सुरुवातीच्या गाईडलाईन्स अशा होत्या की, याच्यासाठी जे लाभार्थी आहेत त्यांनी याचा कुठेही इतर कामासाठी वापर करायचा नाही. कुठलाही दाखला या संदर्भात दयायचा नाही. नंतर नगरपालिकेने किंवा महानगरपालिकेने विनंती केली की, संजय गांधी निराधार योजना किंवा इतर तत्सम योजना आहेत त्यांच्या लाभार्थीसाठी वेगळे सर्व्हेक्षण केले जात नाही. तुमच्या सर्व्हेक्षणाच्या यादीनुसार जर दाखले दिले तर बरे होईल, त्याचा त्यांना फायदा होईल म्हणुन आपण शासनाच्या गाईडलाईन्स प्रमाणे दाखले देणेस सुरुवात

केली. आता उप–आयुक्त महोदयांनी सांगितले की  आपण तात्पुरते दाखले देत होतो  त्याचे कारण असे की त्याची यादी अंतिम झालेली नाही.  जोपर्यंत सुडा यादी अंतिम करत नाही तोपर्यंत त्यांना अंतिम स्वरुपाचा दाखला देता येणार नाही.  आता त्यांनी सांगितले की, दोन–तीन दिवसामध्ये ही यादी अंतिम होवुन आपण ती शासनाकडे पाठवु व त्यानंतर आपणांस दाखला देता येईल. परंतु या मध्ये नविन नावे टाकतांना आपणांस शासनाचे मार्गदर्शन घ्यावे लागेल.

यावेळी सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर या सभागृहातुन बाहेर गेल्या. 

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :–**आयुक्त साहेब, आपण आताच सांगितले की, जे सर्व्हेक्षण केलेले आहे, ज्याच्या घरी ब्लॅक अॅण्ड व्हाईट टीव्ही किंवा कलर टिव्ही हा जो प्रकार आहे. आज कचरा वेचणा–या माणसाच्या घरात सुध्दा कलरटिव्ही आहे. म्हणजेच त्याला या योजनेपासुन दुर ठेवण्यात येत आहे की नाही? तुम्ही माझ्या बरोबर चला लफ्टाच्या रुममध्ये राहणा–याच्या घरात मी तुम्हांला कलरटिव्ही दाखवुन देतो. ब्लॅक अॅण्ड व्हाईटचा जमाना गेला आता.  १००० रुपये भरा तुमच्या घरात २५००० चा टिव्ही येतो.

**सदस्य श्री. रमेश चव्हाण :–**मा. आयुक्त साहेब, आता तुम्ही जे काही करणार आहात, तुम्ही बायोमेट्रीक मशिन बसवणार आहात.  पण आता काय करता ते सांगा ना तुम्ही.  तुम्ही कार्यभार दुस–यास दयाल, तुम्ही काय करता हे आम्ही सहा वर्षापासुन पाहत आहोत.  की, प्रकल्प अधिकारी नाही आहे तो विषय तुम्ही काढता काय?  तुम्ही ते काम युध्द पातळीवर सुरु करा असे आमचे म्हणणे आहे.  झाले ते गेले परंतु आता तरी तुम्ही कामाला लागता की नाही?

**श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–**दुस–यास कार्यभार देण्याच्या सूचना आम्ही दिलेल्या आहेत.

**सदस्य श्री. रमेश चव्हाण :–**म्हणजे उदयापासुन काम सुरु होईल?

**महापालिका सचिव :–** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :–** मागील सभेचे दिनांक २०/४/२०१० (त्यात १८/६/२०१० व १२/७/२०१०) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–**मा. महापौरजी, उप–महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्यापुर्वी मी याठिकाणी अतिमहत्वाच्या प्रश्नाच्या बाबतीमध्ये आपले पुन्हा एकदा लक्ष वेधू इच्छितो. जन्म आणि मृत्यु दाखल्या संदर्भात महासभेमध्ये चर्चा झाली होती.  त्या चर्चेमध्ये असे सांगण्यात आले की, दोन दिवसामध्ये जन्म व मृत्युचे दाखले देण्यात येतील त्याला आज आठ दिवस झाले तरी ते दाखले प्रलंबित आहेत. जन्म, मृत्युचे दाखले नागरीसुविधा केंद्रात प्रलंबित आहेत. ते अर्जदारांना मिळत नाहीत.  त्यास जबाबदार कोण? त्याचे याठिकाणी जबाबदारीने उत्तर दिले पाहिजे. अन्यथा या मुद्दयावर शहरामध्ये कुठेही जन आंदोलन किंवा अन्य कुठला प्रकार घडला तर त्यास जबाबदार सर्वस्वी प्रशासन असेल.  कारण जन्म मृत्यु दाखल्यांवर स्वाक्षरी करण्यासाठी ज्यांची नेमणुक करण्यात आलेली आहे, ते डॉक्टर त्यांच्यावर सहया करत नाहीत.  जवळ जवळ दिडशे दाखले सहीसाठी प्रलंबित आहेत.  त्याबाबत याठिकाणी उत्तर दिले पाहिजेत.

**सदस्य श्री. किशोर जग्यासी :–**मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, जोपर्यंत नगररचनाकार येथे येत नाहीत, आमच्या प्रश्नाची उत्तरे मिळाली नाहीत तो पर्यंत आम्ही हे इतिवृत्त कायम करणार नाहीत मागील वेळेस आयुक्तांनी आश्वासन दिले होते की, नगररचनाकार येतील व मी त्या प्रश्नाचे उत्तर देईन.  आजतर आयुक्त साहेब सुध्दा येथे हजर नाहीत.  जोपर्यंत मागील प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत तोपर्यंत आम्ही हे इतिवृत्त कायम करणार नाहीत.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>मा. महापौर, उप–महापौर आणि आयुक्त साहेब, जन्म–मृत्युच्या दाखल्या संदर्भात त्याच दिवशी आयुक्त साहेबांनी आश्वासन दिले होते की, दोन दिवसामध्ये आम्ही त्या कामाची पुर्तता करु. तर मला अशी माहिती पाहिजे की आतापर्यंत किती दाखले बाकी आहेत? कृपया संबंधीताने त्याची माहिती दयावी. नाहीतर तो कामाला लायक नाही असे समजुन त्यास सोडुन देण्यात यावे त्यास बाजुला करण्यात यावे. येथे कोणी गैरहजर असेल, अधिकारी गैरहजर असेल त्याने दुस–याकडे कार्यभार सोपवुन गेले पाहिजे. त्याची सही नाही म्हणुन मी सही करणार नाही असा प्रकार चालणार नाही. जन्म–मृत्युच्या दाखल्याबाबत सर्वात अकार्यक्षम आपली महापालिका आहे. असे आपल्याला नाईलाजाने म्हणावे लागेल.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>सन्माननिय महापौर, उप–महापौर व सर्व सन्माननिय सदस्य, मागच्या वेळेस आयुक्त साहेबांनी जसे आपणांस आश्वासन दिले होते त्यानंतर आम्ही एक बैठक घेवुन समस्या दुर करण्याचा प्रयत्न केला आणि ज्या कर्मचा–यांच्याबाबतीत तक्रारी होत्या त्यांना आपण तेथुन हटविले आहे. आणि दोन लिपिकांच्या ठिकाणी आपण चार लिपिक तेथे दिले आहेत. त्यातील दोन लिपिक उदया हजर होत आहेत. आणि आता डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे दिडशे दाखले प्रलंबित आहेत. डॉ. रेलवानी आजारी आहेत. डॉ. राजा रिजवानी यांना स्वाक्षरी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>श्री. म्हसाळ साहेब मागच्यावेळी सुध्दा मी आपणांस सांगितले होते की, कोण आजारी आहे, कोण उपस्थित आहेत, कोण अनुपस्थित आहे, कोण तेथे नेमला नाही, ही कारणे समाज जानत नाही. आम्ही अर्ज केला आहे त्याप्रमाणे तुम्ही आम्हांस या या गोष्टी दयायच्या आहेत. त्या दयायच्या म्हणजेच दयायच्याच आहेत. कोण हजर आहे कोण गैरहजर आहे, हे सभागृह ऐकुन घेईल जनता ऐकुन घेणार नाही. कृपया अशी कारणे न सांगता किती दाखले बाकी आहेत ते सांगा. अधिकारी तेथे असणे किंवा नसणे, रजेवर असणे याला जबाबदार महानगरपालिका आहे. नगरसेवक किंवा इतर नागरीक नाहीत.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>डॉ. राजा रिजवानी यांना तशा सूचना दिलेल्या आहेत, डॉ. रेलवानी नसल्या तरी स्वाक्षरी करण्याच्या.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>माझ्या माहितीप्रमाणे दिडशे पेक्षा जास्त दाखले बाकी आहेत.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>उदयापर्यंत ते वितरित केले जातील.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>मागील वेळेस आयुक्त साहेबांनी आदेश दिले होते की जन्ममृत्युचे जे दाखले प्रलंबित आहेत ते अर्जदारांना तुम्ही देवुन टाका` दोन दिवसाच्या ठिकाणी ते आठ दिवसात दिले नाहीत आता तुम्ही देणार आहात का? संबंधीत अधिका–यास, डॉक्टरला बोलु दया ना? त्या डॉक्टर रिजवानीची जबाबदारी का घेता? ते कशासाठी महापालिकेत येवुन बसतात?पगार घेत नाहीत का ते? प्रत्येक प्रश्नाचे तुम्हीच उत्तर दिले पाहिजे असे काही नाही आहे. त्यांना त्याची माहिती नाही का डॉक्टरांना? त्यांनी उत्तर दिले पाहिजे या ठिकाणी. जन्म–मृत्यु दाखला हा जीवनाशी निगडीत मोठा प्रश्न आहे. त्या लोकांना महापालिकेत दोन–दोन,तीन,तीन महिने चकरा माराव्या लागतात. याठिकाणी दिडशेच्यावर दाखले प्रलंबिते आहेत दिडशे पेक्षाही जास्त.

<u>डॉ. राजा रिजवानी (वैद्यकीय अधिकारी):–</u>मा. महापौर महोदया, उप–महापौर व आयुक्त साहेब, मागील महासभेत जन्म मृत्यु दाखल्या संदर्भात जी चर्चा झाली होती, त्यानुसार आमच्याकडे जे संबंधित दोन लिपिक होते त्यांना आम्ही त्याच दिवशी कार्यमुक्त केले होते. दुस–या दिवशी मी चार लिपिकांची मागणी करणारी टिप्पणी मा. उप–आयुक्त मुख्यालय व आयुक्त यांच्याकडुन मंजुर करुन घेतली आहे. व ते ४ लिपिक आजपर्यंत माझ्या जन्म आणि मृत्यु दाखला विभागात रुजु झालेले नाहीत. त्यामुळे हे १५० च्या आसपासचे दाखले आजपर्यंत प्रलंबित आहेत.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>यास जबाबदार कोण आहे? आपणांस कुणी ४ लिपिक दिले नाहीत? आपण तर मागणी केली आहे ना?

<u>डॉ. राजा रिजवानी (वैद्यकीय अधिकारी):—</u>होय. मी मागणी केली आहे. ते ४ लिपिक दुस—या विभागातुन कार्यमुक्त होवून आमच्याकडे आलेले नाहीत. व आमच्या विभागात आजच्या तारखेला अदयापपर्यंत ते रुजु झालेले नाहीत.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>आपल्या विभागामध्ये दुसरे लिपिक नाहीत काय की ज्यांच्याकडुन आपण हे काम करुन घेवु शकता? की तेच लिपिक कामावर आल्यानंतर दाखले तयार करतील आणि त्यानंतर आपण सही कराल? आपल्या सहीसाठी तेथे दाखले प्रलंबित आहेत, आपण या अगोदरसुध्दा कधी काम केलेले नाही. कामचुकारपणा केल्यामुळे यांना निलंबित केले होते का? याबाबत मा. महापौर महोदया, व आयुक्त साहेब यांना विचारणा करा. यांना अगोदर निलंबित केले होते का यांना अगोदर निलंबित करा. हे कामाच्या बाबतीत जाणुन बुजुन दुर्लक्ष का करतात? याचे उत्तर याठिकाणी त्यांनी दयावे. यांचा स्वत:चा त्यांच्यात काही रस आहे का? जन्म—मृत्यु दाखला हा जिवनाशी निगडीत प्रश्न आहे. कुटुंबातील एखादया व्यक्तीचा मृत्यु झाल्यानंतर त्यांचे कुटुंबीय मृत्यु दाखला मिळण्यासाठी चकरा मारतात एखादया महिलेचा पती जर निधन पावल्यानंतर तीला एलआयसी वगैरे अनेक ठिकाणावरुन पैसे घ्यायचे असतात ती महिला याठिकाणी मृत्यु दाखल्यासाठी चकरा मारते. याचे सुख दु:ख या अधिका—यांना डॉक्टर लोकांना काहीच वाटत नाही, हे एकच उत्तर देतात माझ्याकडे लिपिक नाहीत. त्यामुळे मी दाखला देवु शकत नाही. मला वाटते यांच्याकडील दाखले सुध्दा हिंदुस्तानातील नाहीत.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, आपण जनतेला आश्वासन दिले होते की, दोन दिवसामध्ये तुम्हांला दाखले देवु. श्री. दिलीप गायकवाड यांनी सांगितले की, मृत्यु दाखला लवकरात लवकर मिळणे आवश्यक असते. आणि त्यासाठी नागरी सुविधा केंद्र आहे त्याचा फायदा काहीच होत नाही उलट दाखल्यासाठी जास्त फे—या माराव्या लागत आहे. लोकांना त्रास होत आहे.

<u>उप—महापौर :—</u> आता डॉक्टर राजा रिजवानी यांनी सांगितले की, मला जे चार लिपिक दिले आहेत परंतु ते चारही लिपिक अदयाप हजर झालेले नाहीत. ते चार लिपिक कोण आहेत त्यांची त्यांनी सभागृहात सांगावीत. आणि ते हजर का झाले नाहीत त्याची कारणे दाखवावीत. नाहीतर त्या चारही लिपिकांना आताच्या आता कारणे दाखवा नोटिसा काढल्या जाव्यात.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>आपल्या बाजुला जे बसलेले आहेत श्री. म्हसाळ साहेब, त्यांचे कर्तव्य आहे, कारणे दाखवा नोटिस काढण्याचे ते त्यांनी का केले नाही? ते हजर का नाहीत याचे उत्तर श्री. म्हसाळ साहेबांनी दयायचे आहे.

<u>उप—महापौर :—</u>ते चार लिपिक कोण आहेत त्यांची नावे सांगावीत.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :—</u>मा. महापौर महोदया, मा. उप—महापौर आणि आयुक्त साहेब, गेल्या दोन महिन्यापासुन माझ्या प्रभागातील एक महिला येथे येते तिला अजुनही मृत्यु दाखला मिळत नाही. तर मला असे विचारायचे आहे की यांना अगोदर कोणत्या कारणावरुन निलंबित केले होते आणि हे काम करत नाहीत त्यांना पुन्हा कामावर का घेतले? यांना परत पाठवा. हजार वेळा ती एक वृध्द आणि विधवा महिला या महापालिकेत चकरा मारत असते त्याची दखल घेतली जात नाही. मागची महासभा होवून फक्त आठ दिवस झाले आहेत. त्यासाठी यांना आता परतच पाठवा. आणि याची माहिती दया आम्हांला. मा. आयुक्त साहेब, अधिका—यांवर कारवाई झालीच पाहिजे यांच्याशी दुरध्वनीवरुन संपर्क साधला तर ते फोन घेत नाहीत. गोर गरीबारंची काळजी घेत नाहीत.

<u>डॉ. राजा रिजवानी, वैदयकीय अधिकारी :—</u>श्री. राजु चुघ, श्री. सुरेश मुलपानी, बिना अडवानी, श्री. प्रकाश बोरसे हे चार लिपिक आहेत. परवा या चारही लिपिकांचे सामान्य प्रशासनाकडुन माझ्याकडे बदलीचे आदेश आले होते. परंतु अदयापपर्यंत ते लोक माझ्या विभागात हजर झालेले नाहीत.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>हजर झाले नाहीत तर त्यांना कारण दाखवा नोटिस देणे ही कुणाची जबाबदारी आहे? श्री. म्हसाळ साहेबांनी यांचे उत्तर दयावे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>मा. महापौर महोदया, ज्या चार लिपिकांची आम्ही बदली केली होती त्यांनी तात्काळ नागरी सुविधा केंद्रात हजर होणे आवश्यक होते. ते अदयापपर्यंत हजर झालेले नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर आतापासुनच शिस्त भंगाची कारवाई करण्याची कार्यवाही आम्ही सुरु करत आहोत

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>श्री. म्हसाळ साहेब, आपण त्यांची कारणे दाखवा नोटिस आजपर्यंत काढली आहे किंवा नाही?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>आता मला समजले की, ते अदयाप हजर झालेले नाहीत डॉक्टरांनी जेव्हा येथे मुद्दा उपस्थित केला तेव्हा.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>याचाच अर्थ आपला आदेश कोणी मानत नाही.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>श्री. म्हसाळ साहेब, ही जबाबदारी कुणाची आहे? डॉक्टर साहेबांची आहे ना? ते निष्काळजीपणे येथे काम करतात. त्यांना निलंबित का केले होते याचे उत्तर मला येथे मिळेल का? याचे आधी त्यांना निलंबित केलेले होते. का केले होते त्याचे उत्तर दया नाहीतर पुढच्या महासभेत दया, आता नसेल तर. कारण की पर्यायी आयुक्त म्हणुन तुम्ही या ठिकाणी आलेले आहात. पुन्हा पुढच्या वेळी तुम्ही नसणार आहोत. या प्रश्नाचे उत्तर तुमच्याकडे आहे का? कारण हे निष्काळजीने वागतात यांच्या चुका हे दाखवत नाहीत हे दुसरीकडे बोटे दाखवितात. मागच्या महासभेत एवढया गंभीरतेने प्रश्न विचारण्यात आला होता त्याची यांनी कुणीही काळजी घेतलेली नाही. हे जर त्यांनी अगोदर सांगितले असते तर त्या लिपिकांवर तुम्ही काहीतरी कारवाई करु शकला असता. महासभेमध्ये प्रश्न आल्यानंतर मग तुम्हांला हे कानामध्ये सांगणार. चामडी बचाव काम चालु आहे या डॉक्टराचे. हे अजिबात चालणार नाही. त्यांना का निलंबित करण्यात आले होते त्याचे या ठिकाणी उत्तर दया.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :–</u>आयुक्त साहेब येथे उत्तर देत आहेत की दोन दिवसात आम्ही या प्रश्नाचे उत्तर देवु. दोन दिवसामध्ये कोणती महासभा होणार आहे की त्या सभेत आपण उत्तर दयाल. याचाच अर्थ असा आहे की या महासभेची आपण दिशाभुल करत आहात. आपले अधिकारी सांगतात लिपिक आले नाहीत, आपण दोन दिवसात उत्तर देणार. या महासभेपुढे जे प्रश्न येतात त्यास टाळमटोळपणे उत्तर देण्यासाठी आपण सांगतात की दोन दिवसात उत्तर देवु. दोन दिवसानंतर येथे कोण बसणार आहे?

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी:–</u>मा. महापौरजी, सभागृहातील सर्व सदस्यांचे असे मत आहे की, शहरातील नागरीकांना जन्म–मृत्युचा दाखला त्वरीत मिळाला पाहिजे. त्याबाबत आपण विचारविनिमय केला पाहिजे. वैयक्तीकपणे मला असे वाटते की, एखादया अधिका–यास शिक्षा करणे किंवा सभागृहाच्या दबावाखाली येवुन चार कर्मचा–यांना निलंबित करण्याचा आपण निर्णय घेतला तर तो विषय आपल्या कार्यक्षेत्रांतर्गतचा आहे. त्याचे मी समर्थन करु इच्छित नाही तसेच त्यास विरोधही करु इच्छित नाही. पण विषय असा आहे की, ते चार कर्मचारी निलंबित झाले तर त्याठिकाणी दुसरे चार कर्मचारी कोण येतील? विषय तिथल्या तिथेच राहिल. याविषयाचे एकच समाधान होवु शकते की, त्या विभागासाठी दोन लिपिक लवकरात लवकर दया, होवु शकते उदयाच ते डॉक्टरांकडे पोहाचले पाहिजेत. व त्यांनी या कामामध्ये सहकार्य करावे. याबद्दलचा दुसरा एक मुद्दा असा आहे की, महापालिकेत सर्व कामकाजाचे संगणकीकरण झालेले आहे. जन्म–मृत्युसंबंधी संगणकात एकदा का नोंदणी झाली की त्यावरुन आपणांस फक्त प्रिंट आऊट काढायची आहे आणि त्यावर अधिका–यांनी स्वाक्षरी करायची आहे. आणखी यामध्ये काय आहे? त्यामध्ये फार मोठे काम आहे. त्यासाठी फार मोठी फौज उभी करायची आहे. जन्म–मृत्यु दाखल्यासाठी या फौजेची आवश्यकता आहे असे काही नाही. याकामी फक्त कुठे ना कुठे मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. मागील महासभेत जन्म–मृत्युच्या दाखल्यासाठी एवढा वेळ आपण गमावला आहे त्यानंतर आजच्या या महासभेत इतिवृत्त कायम करण्यासाठी आपण महासभेचा वेळ घ्यावा तर हा आपणा सर्वांच्या व शहराच्या सामुहिक वेळेचा अपव्यय होत आहे. आणि तोही एक साधारणशः विषयासाठी हा अतिशय लहान प्रश्न आहे. त्याचे समाधान अतिशय सहजतेने

काढले जावु शकते. विभागामध्ये असे होते की, एखादा कर्मचारी एखादया विभागातुन दुस–या विभागामध्ये जावे लागु नये म्हणुन सुट्‌टी घेवुन बसतो आणि म्हणतो की मी त्या विभागात जाणार नाही. त्यास केवळ निलंबित करुन मार्ग निघणार नाही. त्यावर विचार करुन निर्णय घ्यावा, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, हा जो विषय चाललेला आहे, त्याबाबत मागील महासभेत सुध्दा गंभीरतेने चर्चा झाली होती. आज सुध्दा त्यावर तेवढयाच गंभीरतेने चर्चा चालु आहे. तर आयुक्त साहेबांना मी आग्रह करतो की, एवढी चर्चा झाल्यानंतर आपणांस समजलेच असेल की, संपुर्ण सभागृहाचे काय मत आहे ते? जन्म–मृत्युचे दाखले मिळत नाहीत त्याचे कारण काय आहे? आपण म्हणता की, चार कर्मचा–यांना आम्ही निलंबित करु वगैरे, वगैरे ते आपण या महासभेच्या अगोदर का नाही केले? माझे इतर सहकारी जे प्रश्न विचारतात त्यावरुन असे दिसुन येते की, आपण जन्म–मृत्यु दाखला विभागास पुरेसे कर्मचारी देत नाहीत त्यामुळेच ही कामे होत नाहीत. प्रभाग समिती क्र. ४ मध्ये आज सकाळीच मी गेलो होतो तेथे सुध्दा हीच चर्चा होती की मजुर मिळत नाहीत, लिपिक मिळत नाहीत. माझी आपणांस विनंती आहे की, हे जे १००–१५० जन्म–मृत्युचे दाखले देणे प्रलंबित आहेत ते एक दोन दिवसात दिले जावेत. आपण लोकांना सांगितले आहे की आम्ही एक तासामध्ये तुम्हांला दाखले देवु. एक तासात तर आपण दाखले देत नाहीत. एक महिन्यात सुध्दा देत नाहीत. आता हे जे आम्ही सांगितले आहे त्याची आपणांस अंमलबजावणी करायची आहे. मी अशी अपेक्षा व्यक्त करतो की, या विषयावर यापुढे चर्चा होणार नाही. आणि अशा प्रकारचा मुद्‌दा पुन्हा या सभागृहात उपस्थित होणार नाही याची आम्हांला खात्री दया. आयुक्त साहेब याबाबत तुम्ही स्पष्टीकरण दया.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. आयुक्त साहेब, एक अधिकारी सभेत सांगतो की, माझ्याकडे कर्मचारी नाहीत, मी ते काम करु शकत नाही. तरीसुध्दा त्यास धारेवर धरले जाते. ही बाब चुकीची आहे. कारण की तो अधिकारी प्रत्येक वेळा सांगतो की, माझ्याकडे पुरेसे कर्मचारी नाहीत. त्याला वारंवार धारेवर धरले जाते. प्रत्यक्षात प्रशासन कुठेतरी अपयशी आहे, याची प्रशासनाने काळजी घेतली पाहिजे आणि जे कर्मचारी आहेत त्याच्यावर कडक कार्यवाही केली पाहिजे. जेणेकरुन कुठल्याही अधिका–यास धारेवर धरले जावू नये असे मला वाटते याकामी आयुक्तांनी काळजी घेतली पाहिजे.

<u>उप–महापौर :–</u>सभागृहाचा सर्वांनी सन्मान ठेवा. सभागृह नेता बोलण्याअगोदर कुणाला बोलायचे असेल तर ते त्यांनी बोलावे. सभागृहनेता यांनी या विषयावर बोलल्यानंतर कृपया कोणीही बोलु नये. तसेच ज्या काही सदस्यांना माहित नसेल त्यांना सांगु इच्छितो की, आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेने जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत अंतरराष्ट्रीय स्तरावर अशी खात्री दिली आहे की, आम्ही तुम्हांला दोन तासाच्या आत जन्म आणि मृत्यु दाखला पोच करु. आणि आपल्या उल्हासनगरच्या रहीवाश्यांना दोन दोन महिने दाखले मिळत नाहीत ही फार खेदाची बाब आहे. मुख्यालयाने ज्या कुण्या चार लिपिकांची बदली केलेली असेल, डॉक्टरांकडे लिपिक नसतील तर हा सगळा त्यांचा कारोबार आहे तो त्यांनी बघावा. त्यामध्ये आमच्या लोकप्रतिनिधींना काही त्रास होता कामा नये. याची आयुक्तांनी दखल घ्यावी. त्यांच्यावर शिस्तभंगाची काही कार्यवाही करावी ती आयुक्तांनी करावी. जे दिडशे दाखले प्रलंबित पडले आहे ते दोन दिवसाच्या आत त्यांनी दयावेत.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>मा. महापौर, उप–महापौर व सर्व सदस्य जे प्रलंबित दाखले आहेत, प्रत्यक्षात सर्व दाखले तयार झालेले आहेत. त्यांच्यावर फक्त सही करणे बाकी आहे.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>हे काय सांगत आहेत? सही करायचे बाकी आहेत, मग सही कोण करणार? लिपिक करणार? मग त्या लिपिकास तुम्ही निलंबित करणार काय ? हे उत्तर तसे देत आहेत ना?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>संपुर्ण शहराशी संबंधीत विषय आहे आणि अतिशय गंभीर असा विषय आहे तो दडपला जाता कामा नये. मी मा. महापौर आणि उप–महापौरांनाही विनंती करतो की, आपण सुध्दा याकामी आम्हांला साथ दयावी. आपण शहराच्या प्रथम नागरीक आहात. या विषयाबाबत अगोदरही आयुक्तांनी उत्तर दिले होते आता आयुक्तांच्या खुर्चीवर दुसरे अधिकारी बसलेले आहेत आणि ते उत्तर देत आहेत. उदया तिसरा कुणी अधिकारी येईल. परंतु याचे समाधान काय आहे?

<u>उप–महापौर :–</u>आयुक्त साहेब उत्तर देत आहेत ते  जरा ऐकुन घ्या.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>मा. महापौरजी, माझ्या बहिणीचा मृत्यु झाला पुण्यात.  त्या पुणे महानगरपालिकेतुन मला सात दिवसात मृत्यु दाखला मिळाला.  मी बाहेरगावावरुन तेथे जाणारा माणुस आणि याच विषयावर मी येथे चर्चा करतो आणि खोटी खोटी उत्तरे येथे मिळत आहेत. ही उल्हासनगर महानगरपालिकेची बेईज्जत आहे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>कारणे काहीही असतील, जे चार लिपिक आहेत त्यांच्यावर आम्ही शिस्तभंगाची कारवाई सुरु करतो.  जे दाखले प्रलंबित आहेत त्याबाबतीत मी डॉक्टरांना आदेशीत करतो की, त्यांनी उदयापर्यंत ते निर्णयीत काढावेत. आभारी आहे.

**यावेळी महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा हे सभागृहातुन बाहेर गेले आणि त्यांच्या जागी मुख्य लेखा परिक्षक श्री. विकास चव्हाण हे आसनस्थ झाले.**

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>मा. महापौर आणि उप–महापौर साहेब, माझी तुम्हांला विनंती आहे की, जन्म मृत्यु दाखल्यांवर ज्या सहया राहिल्या असतील त्याकामी लिपिकाकडुन जर काही दिरंगाई झाली असेल तर त्यांच्यावर कारवाई करावी.  अन्यथा आम्ही हा प्रश्न उपस्थित केला आहे.  बळीचे बकरे कुणाला करु नका आणि पापाचे वाटेकरी आम्हांला करु नका. माझी विनंती आहे तुम्हांला, ज्यांनी चुक केली असेल त्यांनाच शिक्षा झाली पाहिजे.  त्या बिचा–या लिपिकांना निलंबित करु नका किंवा कारणे दाखवा नोटिस बजावु नका. त्यांची चुक आहे का त्यांच्या सहया राहिल्या आाहेत का कुणाच्या सहया? ज्यांच्या राहिल्या असतील त्यांच्यावर तुम्ही कार्यवाही करा.

<u>श्री. विकास चव्हाण (मुख्य लेखा परिक्षक तथा महापालिका सचिवांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

**यावेळी महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा यांनी सभागृहात प्रवेश केला व महापालिका सचिवांच्या स्थानी आसनस्थ झाले. व श्री. विकास चव्हाण हे आपल्या आसनावर आसनस्थ झाले.**

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>हा दुसरा प्रश्न आहे जो या सभा सूचनेवर नाही.  व माझा तसा स्वभावही नाही. सभासूचनेवर नसलेला विषय उपस्थित करण्याचा.  परंतु सगळयांच्या समोर एक गंभीर असा विषय आहे की श्री. सेलवन नावाचे आपले जे उप अभियंता आहेत त्यांची बदली झाली आहे आणि कार्यमुक्त आदेश केले आहे.  त्यांच्याबाबतीत बरेचसे नगरसेवक आणि सर्व पक्षांच्या गटनेत्यांची भावना अशी होती की, श्री. सेलवन यांनी या महापालिकेत अतिशय चांगले काम केले आहे व त्यांच्या बाबतीत स्थायी समितीने एक ठरावही पारीत केला आहे की, सिटी सॅनिटेशन प्लान त्यांच्या नेतृत्वाखाली तयार केला जावा.  यासाठी माझा मा. महापौर आणि उप–महापौर यांना आग्रह आहे की, त्यांनी आयुक्तांना सांगावे की यांना कार्यमुक्त न करता येथे ठेवून घ्यावे.  अशी संपुर्ण सभागृहाची मागणी आहे मला वाटते की ती पुर्ण केली पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, या योजनेसाठी अभियांत्रिकी शाखेचा पदवीधर व्यक्ती पाहिजे. आपल्या येथे पदवीधर व्यक्ती आला आहे का? आपण सेल्वन त्यांना कार्यमुक्त केले आहे? परंतु त्यांच्या जागी शाासनाने जो अधिकारी दिला आहे तो अभियांत्रिकी शाखेचा पदवीधर आहे का? आज आम्ही जन्मु मृत्युं दाखल्यासाठी रडत आहोत उदया पाईपलाईनसाठी रडावे लागेल. पाईपलाईन कॅम्प ५ मध्ये टाकायची असेल तर कॅम्प नं. १ मध्ये टाकतील.  यासाठी आमचे एवढेच म्हणणे आहे की श्री. सेलवन यांना कार्यमुक्त केले जावु नये त्यांना येथेच ठेवले जावे.

<u>सदस्य श्री. सुरेध जाधव :–</u>मा. आयुक्त साहेब, श्री. सेलवन हे चांगले अधिकारी आहेत, आणि त्यांना पाणी पुरवठा विषयी चांगली माहिती आहे.  तर त्यांना सभागृहाच्या भावना लक्षात घेता कार्यमुक्त करु नये अशी सभागृहाची मागणी आहे.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>श्री. सेलवन यांना चांगला अनुभव आहे आणि त्यांनी इतक्यावर्ष काम केले आहे आणि नविन अधिका—यांकडुन पाहिजे तसे चांगले काम होणार नाही. म्हणुन श्री. सेलवन यांना येथेच ठेवण्यात यावे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आता या महापालिकेत वेगळी प्रथा पडत चालली आहे. या महापालिकेत एक अधिकारी चांगला आहे, एक अधिकारी वाईट आहे एक अधिकारी काही प्रमाणपत्र घेवुन आलेला आहे, नाही आहे, ही काय प्रथा चाललेली आहे? या महापालिकेत मोर्चे बांधणी चाललेली आहे. त्या अधिका—यांनी काम भलेही चांगले केलेले असेल परंतु त्याचा बदली आदेश कधी आलेला आहे ते माहित आहे? त्याचा बदली आदेश पाच सहा महिन्यापुर्वी आलेला आहे. तो माणुस जाण्यासाठी टाळाटाळ करत होता. प्रशासनाला दाखवत नव्हता म्हणुन अखेर शेवटी ती बाब प्रशासनाच्या लक्षात आली, आयुक्तांच्या लक्षात आली. या अधिका—यास एवढे वर्ष झालेली आहेत आणि त्याचा बदली आदेश येथे आलेला आहे म्हणुन त्यास कार्यमुक्त करावे, म्हणुन सेलवन यांना कार्यमुक्त करावे. भलेही त्यांनी चांगले काम केले असेल त्याबद्दल त्यांनी मोबदला म्हणुन पगार घेतला असेल. एक जातो, दुसरा येतो, दुसरा जातो तिसरा येतो यासाठी त्याला सोडु नका हे धोरण सन्माननिय सदस्यांनी वापरु नये नाहीतर मग गटबाजी होईल आणिएक सदस्य महापालिकेत हेच काम करत आहे. हा अधिकारी चांगला आहे त्याच्याशी मला एकांतात बोलायचे आहे. हे करायचे आहे, ते करायचे आहे. आणि अशा प्रकारे श्री. गायकवाड नावाच्या चांगल्या अधिका—यास पळवुन लावले आहे. आणि अशा प्रकारचे धोरण जर चालत असेल तर ते आम्ही कदापि सहन करुन घेणार नाही. श्री. सेलवन यांना बदली आदेश बजावला आहे तो त्यांनी घेतला आहे, त्यांनी खुशाल तेथे जावे. सन्माननिय सर्व सदस्यांच्या समोर मी सांगतो की, या अधिका—याला ठेवा, या अधिका—याला ठेवु नये हे धोरण जर वापरले तर ते बिल्कुल बरोबर नाही. जे प्रशासन करत असेल त्यालाच यांनी मान्यता दयावी. श्री. सेलवन यांनी चांगले काम केले आहे तर काय झाले?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मा. महापौरजी, आणि आयुक्त साहेब, एखादा अधिकारी जर चांगले काम करत असेल तर त्याची प्रशंसा करणे चांगले आहे. एखादा चांगले काम करतो तर तो चांगला एखादा वाईट काम करतो तर त्यास वाईट बोलतो हा अधिकार महापालिकेस आहे. असा अधिकारी जर आपणांस पाहिजे असेल तर आपण त्यांची मागणी करण्यास काही हरकत नाही. त्याच्यामध्ये श्री. बी.बी. मोरे यांना का जड जाते ते मला माहित नाही. हे सभागृहातील नगरसेवकांचे विचार आहेत. एखादा चांगला अधिकारी येथे ठेवायला काय हरकत आहे?

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>जेएनएनयुआरएमचा प्रोजेक्ट त्यांनी आणलेला आहे त्याकामी त्यांनी मेहनत घेतलेली आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>अहो, ज्याची प्रशंसा करु शकत नाहीत त्याचा अपमानही करु नका.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, माझ्या प्रभागातील पाणी प्रश्न अदयाप सुटलेला नाही. जेएनएनयुआरएमची कामेही अदयाप माझ्या प्रभागात सुरु झालेली नाहीत. यासाठी श्री. सेलवन यांना येथे परत घेवु नये अशी माझी विनंती आहे.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :—</u>एखादया अधिका—याची बदली होते. त्यास परत कोणत्या आधारावर घेतले जाते?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>एक अधिका—याचा कालावधी किती वर्षाचा आहे? एक अधिकारी एका जागेवर किती दिवस राहु शकतो?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>श्री. सेलवन यांना याठिकाणी किती वर्ष झाली?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>८ वर्षे एका व्यक्तीला या ठिकाणी झाली. परत त्याच्याच नावाचा टाहो फोडला जातो आहे. दुसरी व्यक्ती काम करणारी येणार नाही का? यासाठी जी व्यक्ती जाते तिला जावु दया. जी व्यक्ती येते तिचा आदर केला पाहिजे. तरच महापालिकेत नगरसेवकाची ईज्जत होईल.

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—</u>सभा सूचनेवरील विषयांवर बोलले जावे त्याव्यतिरिक्तच्या विषयावर बोलले जावु नये. विषय चालु आहे त्यावरच बोलले जावे. बाकीच्या गोष्टी सोडुन दया, कोण कोठे जातो कोण कोठे जातो ते. वेळेचा अपव्यय करु नका.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा जो विषय आहे तो सभा सूचनेवर नाही आहे तर तो घेतला जावु नये. तर हा विषय घेवु नये ही विनंती आहे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>हा विषय घेण्याचे कारणच नव्हते. हा विषय उपस्थित करुन सभागृहाचा वेळ फुकट वाया घालविलेला आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>कुण्याही अधिका—याबाबत सभागृहाचे मत विभाजित राहणे हा एक स्वाभावीक विषय आहे. काही नगरसेवकांना वाटते की यांनी माझ्या प्रभागात काम केले आहे, कुणाला वाटत असेल काम केले नाही. एक काम केले, दहा कामे केली नाहीत. कुणाला वाटत असेल दहा कामे केली एक काम केले नाही. अशा प्रकारे मतांचे विभाजन होते. परंतु विषय असा आहे की, सत्यतेच्या आधावर जर चौकशी केली तर, येथे पाणी पुरवठयाविषयीचा आमचा जेएनएनयुआरएमचा प्रकल्प होता त्याबाबतीत सुरुवातीपासुन काही अधिका—यांनी दिल्लीपर्यंत पाठपुरावा करुन तेथुन हा प्रकल्प मंजुर करुन आणणे तो मंजुर करुन आणण्यामध्ये फार मोठी मेहनत लागते. ब—याचशा कागदांवर प्रकल्प तयार करावे लागतात. श्री. बी.बी. मोरेजी आपण काय बोलत आहात त्याबाबतीत मी एक शब्द सुध्दा उच्चारलेला नाही. कृपया आपण बसुन घ्या.

<u>उप—महापौर :—</u>श्री. मोरे साहेब आपण बसुन घ्या.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:—</u>मा. महापौरजी, सभा सूचनेवर जर हा विषय नसेल तर घेता कशाला?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u> हा विषय रद्द केला जावा. सभा सूचनेवर हा विषय नाही आहे. हा जाणुनबुजनु आणलेला आहे. आणि एक अधिकारी काय कायम स्वरुपी या महापालिकेत राहणार आहे का? किती वर्ष राहणार आहे एक अधिकारी? त्याची सेवा पुर्ण होईपर्यंत तो येथेच राहणार काय?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सभा सूचनेवर हा विषय नाही आहे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सभा सूचनेवर जो विषय नाही तो घेवु नये एवढीच माझी विनंती आहे.

<u>उप—महापौर :—</u>श्री. मोरे साहेब, आपण बसुन घ्या.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—</u>केवळ दोन,तीन वाक्य आहेत. कृपया संयम राखा.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u>महापौर महोदयांनी सर्वांना बसण्यास सांगावे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>महापौर महोदया तुम्हांला जो निर्णय दयायचा असेल तो दया. परंतु कुणाला आपले निर्णय मांडण्यापासुन रोखले जावु शकत नाही. त्यांचे विचार आपण ऐकुन घ्या. आपणांस जो निर्णय घ्यायाचा असेल तो घ्या.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u>सभा सूचनेवर विषय नाही तर बोलण्याचा प्रश्नच येत नाही.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>श्रीमती सुर्वे महोदया आपणाशी माझी स्पर्धा नाही.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :–</u>जो विषय सभा सूचनेवर नाही तो घेवु नये, प्रश्नच मिटला.

<u>उप–महापौर :–</u>श्रीमती सुर्वे महोदया, जरा बसुन घ्या.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–</u>इतर सदस्य जेव्हा विरोध करत होते त्यावेळेस तो विषय होता का?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>श्री. नरेंद्र राजानीजी, विरोध करायचा म्हणुन विरोध करत नाही आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>कृपया लक्ष दया मा. महापौरांनी आदेश दिला आहे की, हा विषय सभा सूचनेवर नाही, त्यामुळे त्यावर काही चर्चा होणार नाही.

विषय क्र. २ जो आहे इतिवृत्त संदर्भातील आहे इतिवृत्त आपण कायम केले आहे किंवा नाही? कुणाचे काही वेगळे मत आहे काय?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> मागील सभेचे दिनांक २०/४/२०१० (त्यात १८/६/२०१० व १२/७/२०१०) रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. २ :–** मागील महासभेचे दिनांक २०/४/२०१० (त्यात दिनांक १८/६/२०१० व दिनांक १२/७/२०१०) रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. दिलीप गायकवाड

अनुमोदकाचे नाव : श्री. विजय सुपाळे

<u>महासभा ठराव क्र. २५ क</u> <u>दिनांक : १९/७/२०१०</u>

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक २०/४/२०१० (त्यात दिनांक १८/६/२०१० व दिनांक १२/७/२०१०) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते १८० पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:—** वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत ६ सफाई कामगारांचे वारसास नियुक्ती देणे.

---

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>मा. महापौर महोदया, उप—महापौर साहेब, सचिव साहेब, मी मुद्दामहुन सांगु इच्छितो, येथे सभा सूचनेवर विषय क्र. ३ पासुन ८ पर्यंत जवळ जवळ सहा विषय आहेत. वारसा पध्दतीने स्वेच्छा निवृत्ती देणे, वैद्यकीय सेवा निवृत्ती देणे असे तेच तेच विषय पुन्हा पुन्हा आले आहेत. हे विषय एकत्रितपणे का येत नाहीत? हा विषय घेण्याची काय आवश्यकता आहे? वारसा पध्दतीने निवृत्ती देणे, वैद्यकीय निवृत्ती देणे, स्वेच्छा निवृत्ती देणे ३ ते ८ पर्यंतचे विषय दोनच आहेत. ते आठ विषयांमध्ये विभागलेले आहेत. एवढे विषय देण्याची काय आवश्यकता आहे? एकत्रीत देता येत नाही काय?

<u>महापालिका सचिवः—</u>सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, सफाई कामगारांचे जसजसे प्रस्ताव येतात आणि कागदपत्रांची पुर्तता होते तसतसे गोषवारा महासभेपूढे पाठविण्यासाठी प्रस्ताव आयुक्त साहेबांकडे मंजुरीसाठी पाठविला जातो. त्यामुळे गोषवारे कधी २ लोकांचे कधी ५ लोकांचे कधी १० लोकांचे असतात. त्यामुळे हे एकत्रित विषय येत नाहीत.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>गोषवारा सचिवांकडे गेल्यानंतर ते एकत्रित करुन ते विषय घेता येणार नाहीत काय? एकत्रितपणे आपण पाठवु शकत नाहीत काय? आपणाकडे जसा प्रस्ताव येत असतो तो प्रस्ताव एकत्रित करुन देता येत नाही काय?

<u>महापालिका सचिव :—</u>सन्माननिय सदस्य श्री. प्रकाश सावंत यांच्या मुद्दयाबाबत खुलासा करतो की जसजसे गोषवारे येतात तसतशी त्यांची कायदेशीर पुर्तता होते त्यानंतरच ते घेतले जातात बाकी अनुंक्रमाने येतात. ठिक आहे? पास?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, विषय क्र. ३,४,५,६,७ व ८ हे पाचही विषय वारसापध्दतीने नियुक्ती, वैद्यकीय सेवा निवृत्ती, स्वेच्छा निवृत्ती या विषयीचें आहेंत. प्रत्येक महीन्याच्या महासभेत असे आठ—दहा विषय येतच असतात. आज ६ तारखेला, १५ तारखेला सेवानिवृत्ती हवी आहे. १५ वर्षाची सेवा केल्यानंतर हे लोक कुठुनही वैद्यकीय दाखला आणतात की ते काम करण्यास असमर्थ आहेत वगैरे वगैरे त्यांना सेवानिवृत्ती देण्यात यावी. त्यांच्या जागेवर त्यांच्या परिवारातील सदस्यास कामावर घेतले जावे व लाड समितीच्या शिफारशीनुसार जो कोणी यांची देखभाल करण्यास तयार आहे त्यास कामावर घेतले जावे. असे पाहिले जाते की अशा काही ब—याच केसेस आपल्याकडे येतात की त्यांना स्वेच्छा निवृत्ती हवी असते. ७५ टक्के, ८० टक्के असे काही विषय येतात की, काम करण्यास जो व्यक्ती सक्षम आहे, लायक आहे तरी सुध्दा स्वेच्छा निवृत्ती मागतो व वशिला पध्दतीने आपल्या कुटुंबातील एखादया व्यक्तीस कामावर घेण्याचा प्रयत्न करतो. किंवा कुणाला आपली सर्विस विकुन टाकतो. तेव्हा असे दाखविले जाते की ती व्यक्ती त्यांना सांभाळण्यास सक्षम आहे. ते हमी देतात की मी त्यांना सांभाळेल. आमचे असे मत आहे अशी सूचना आहे की, असी प्रकरणे मेडिकल बोर्डला पाठविली जावीत. कोणत्याही एका मेडिकल ऑफिसरला सोपविल्यामुळे गैरसमज होवू शकतात, चुकीची सर्टीफिकेट दिली जावु शकतात अशा बाबत आपण हे पाहिलेले पाहिजे की संपुर्ण काम मेडिकल बोर्डला संदर्भित केले जावे. म्हणजेच खरोखर काय चालते ते कळेल. धन्यवाद।

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आताच आमचे सन्माननिय सदस्य श्री. जीवन इदनानी यांनी जे पाच सहा विषय वाचुन दाखविलेत. महापालिका ही नियुक्ती प्राधिकारी आहे. त्यांना ठेवायचे की नाही हे महापालिकेवर असते. मला तर असे वाटते की, सचिव साहेबांनी तो नियम या सभागृहात वाचुन दाखवावा. सफाई कामगारांबाबतीत महाराष्ट्र शासनाने काय नियम तयार केले आहेत? ते नियम जरा वाचुन दाखवावेत. जर एखादया सन्माननिय सदस्यास हे माहित नसेल तर, प्रत्येक महासभेत असे प्रस्ताव येतात. मेडिकल बोर्ड वगैरे हे जे म्हणतात परंतु शासनाने जर त्यांना मान्यता दिलेली आहे, तो जर पात्र असेल तर त्याला घेता येते. किंवा समजा तो जर सेवानिवृत्ती मागत असेल आणि त्याची सेवा कमीत कमी २० वर्षापर्यंत झाली असेल तर तो सेवानिवुत्ती मागु शकतो आणि ती दयायलाच पाहिजे, नाहि दिली तर शासन या महानगरपालिकेला उत्तर मागेल की तुम्ही त्यास सेवा निवृत्ती का दिली नाही? आणि म्हणुन माझी एक

विनंती आहे की, या सफाई कामगारांच्या बाबत शासनाने जे नियम केले आहेत त्याला काय महानगरपालिका विरोध करेल? तसे केले तर आपणांस ते भारी पडेल. आणि ते म्हणजे आपणांस उत्तर दयावे लागेल. आणि यासाठी माझी एक विनंती आहे की, सफाई कामगारांच्या बाबतीत आपण दुसरे नियम तयार करु नयेत. धन्यवाद।

<u>उप–महापौर :–</u>मा. महापौरांच्या आदेशानुसार मी आयुक्तांना निर्देश देतो की, स्वेच्छा सेवानिवृत्ती किंवा वैद्यकीय कारणास्तव सेवा निवृत्ती ज्या कर्मचा–यांनी मागीतली आहे, त्यांची खरच आपण वैद्यकीय तपासणी करुन घेतली पाहिजे. खरेच ते काम करण्याच्या लायक आहेत किंवा नाहीत, त्यांना आपण मेडिकल बोर्डाकडे पाठवु. त्यांच्याकडुन शहानिशा झाल्यानंतर आपण त्या कर्मचा–याला सेवानिवृत्ती देवु.

<u>महापालिका सचिव :–</u>विषय क्र. ३,४,५,६,७ व ८ पर्यंतचे विषय सभेच्या कार्यसूचीवरुन वगळायचे?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>मेडिकल बोर्डाकडे पाठविण्यात यावे.

<u>महापालिका सचिव :–</u>वैद्यकीय तपासणी सर्वांनाच थोडीच लागु होते. काही सफाई कामगार मरण पावले असतील तर त्यांच्या वारसांना नोकरी दयायची आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>ज्यांच्या बाबतीत वैद्यकीय प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे, त्यांना मेडिकल बोर्डाकडे पाठविण्यात यावे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>सर्वांची वैद्यकीय तपासणी करुन घ्यायची नाही आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>या विषयांमध्ये काही ठिकाणी वैद्यकीय कारणास्तव सेवा निवृत्ती मागितलेली आहे, काही ठिकाणी स्वेच्छा सेवानिवृत्ती मागितलेली आहे तर काही ठिकाणी वारसा पध्दतीनुसार नियुक्ती मागितलेली आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>आपण सांगा कोणत्या क्रमांकाच्या विषयामध्ये वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्ती मागितली आहे त्यांना आम्ही मेडिकल बोर्डाकडे पाठवु इच्छितो. ज्यांनी वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्ती मागितली आहे त्यांना आम्ही मेडिकल बोर्डाकडे पाठवु इच्छितो.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>दुसरी गोष्ट अशी की हे जे सफाई कामगार आहेत, त्यांना जिल्हा मध्यवर्ती रुग्णालयाचे अधिक्षक प्रमाणपत्र देतात.

<u>महापालिका सचिव :–</u>माझी एक सूचना आहे, या पाच–सहा विषयामध्ये जे विषय आलेले आहेत त्या सर्वांना एकत्रित करुन यामध्ये वैद्यकीय कारणास्तव ज्यांनी सेवानिवृत्ती मागितली आहे त्यांच्याबाबतीत नव्याने प्रस्ताव सादर केला जावा. व जे सफाई कामगार दिवंगत झाले आहे त्यांच्या जागी त्यांच्या वारसाला नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव पुन्हा सादर केला जावा. आणि वैद्यकीय कारणास्तव ज्यांनी सेवानिवृत्ती मागीतली आहे त्यांच्या बाबतीत मेडिकल बोर्डाच्या प्रमाणपत्रास अधिन राहुन त्यांना सेवानिवृत्ती देता येईल.

<u>सदस्या श्रीमती मालती करोतिया :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब व सचिव साहेब, असा कोणताही अधिकारी नाही की जो न तपासताच त्यांना नोकरीवर घेईल मग ते वैद्यकीय अधिका–याने दिलेल्या दाखल्यानुसारच एखादया सफाई कामगारास तो काम करण्यास सक्षम आहे किंवा नाही असे ठरविले जाते ना? मग असा सफाई कामगार आपली नोकरी कुणासही देत असो मग तो आपल्या भावास देत असो किंवा भाच्यास देत असो, शहरामध्ये साफसफाईसाठी कामगारांची आावश्यकता नाही काय? ही योजना आताची नाही आहे ही तर कित्येक वर्षापासुनची आहे मी महापौर होते तेव्हा सुध्दा होती.

<u>काही सदस्य :–</u>विषय क्र. ३ ते ८ चे विषय नाकारण्यांत यावेत व आवश्यक ती पुर्तता करून फेरप्रस्ताव सादर करण्यास प्रशासनास निर्देशित करा.

<u>महापौर :–</u> सदरचे **विषय अनु.क्र ३ ते ८** च्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेतील निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे रिक्त जागांवर वारसा हक्काने नियुक्ती देणे किंवा वैद्यकीय कारणास्तव स्वेच्छा निवृत्ती देणे बाबतीत दिनांक १९/७/२०१० रोजीच्या महासभेच्या विषयपत्रिकेवर अ.क्र. ३ ते ८ पर्यत पुढील विषय होते.

**विषय क्र. ३** :– वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत ६ सफाई कामगारांचे वारसास नियुक्ती देणे.
४:– वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत ३ सफाई कामगारांचे वारसास नियुक्ती देणे.
५:– श्री. फकिरचंद नानिकचंद करोतिया, सफाई कामगार यांना वैद्यकीय स्वेच्छा निवृत्ती देणे.
६:– श्री. ठाकुरदास व्ही. भोजवानी, माळी, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक १०/०७/२०१० पासुन स्वेच्छा निवृत्तीस मान्यता देणे.
७:– श्रीमती शांती कंच्छी, सफाई कामगार यांना वैद्यकीय स्वेच्छा निवृत्ती देणे.
८:– वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत ५ सफाई कामगार यांचे वारसास नियुक्ती देणे.

वरील सर्व विषयांवर सभेत विचारविनिमय चालु असतांना सभा अशा निष्कर्षा पर्यंत आली आहे की दिवंगत/निवृत्त सफाई कामगारांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती देण्यापुर्वी किंवा वैद्यकीय कारणास्तव नियुक्ती देण्यापूर्वी जे.जे. रुग्णालयाचे मेडिकल बोर्डातर्फे दाखला घेणे गरजेचे आहे. त्या दाखल्याशिवाय वैद्यकीय कारणास्तव स्वेच्छा निवृत्ती किंवा वारसा हक्काने नियुक्ती देणे नियमबाहय ठरले जाईल म्हणुन वरील सर्व विषय उक्त वैद्यकीय दाखल्याशिवाय नाकारण्यास महासभेपूढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> २६ <u>दिनांक:–१९/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. जीवन इदनानी

ही महासभा प्रशासनातर्फे सर्व कागदपत्राचे सखोल तपासणी अंती माहिती दिल्याशिवाय व जे.जे. रुग्णालयाचे मेडिकल दाखल्याशिवाय किंवा तत्सम प्राधिका–याचे वैद्यकीय दाखल्या शिवाय वैद्यकीय कारणास्तव स्वेच्छा सेवा निवृत्ती देण्या विषयीचे तसेच वारसाहक्काने नियुक्ती देण्या विषयीचे सभा सूचनेवरील अ.क्र. ३ ते ८ पर्यंतचे विषय मान्य करीत नाही. व या प्रयोजनार्थ फेर प्रस्ताव सादर करण्यास प्रशासनास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९** :– विकास मतिमंद विदयालय यांना पुढील १५ वर्षाच्या कालावधीसाठी महापालिका समाजमंदिर भाडेतत्वाने देणे कामी स्थायी समिती ठराव क्र. १०३, दिनांक

१०/१२/२००७ कायम करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ९:—** विकास मतिमंद विदयालय यांना पुढील १५ वर्षाच्या कालावधीसाठी महापालिका समाजमंदिर भाडेतत्वाने देणे कामी स्थायी समिती ठराव क्र. २०, दिनांक २१/६/२०१० कायम करणे.

<u>प्रस्तावना</u>

विकास मतिमंद विद्यालय यांना महानगरपालिका मा.स्थायी समितीने ठराव क्र १०३ दि. १०/१२/२००७ अन्वये प्रति माह रु.३८३०/—भाडे या दराने ११ महिन्याच्या कालावधिसाठी भाडे तत्वावर देणेबाबत मंजूरी दिलेली होती. त्याचा कालावधीही संपुष्टात आलेला आहे.

सदर प्रकरणी मुख्याध्यापिका विकास मतिमंद विद्यालय यांनी दि. २०/०४/१० रोजीच्या विनंती अर्जान्वये असे कळविले आहे की शाळेची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजुक असुन सदर शाळेमध्ये एकुण ५२ मतिमंद विघ्यार्थी शिकत आहेत. सदर शाळेला शासनाकडुन ग्रॅन्ड नाही.

मुलांकडुन कुठल्याही प्रकारची शैक्षणिक फी आकारली जात नाही. तसेच शिक्षक विना पगारावर काम करीत आहे. सबब प्रति माह कमीत कमी भाडे आकारुन समाज मंदिर वापरण्यास परवानगी द्यावी अशी विनंती केलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(ख)अन्वये मा. आयुक्तास,स्थायी समितीच्या मंजुरीने, महापालिकेच्या मालकिच्या ज्या जंगम मालमत्तेचे मूल्य पाच हजार रुपयांहून अधिक नसेल अशा कोणत्याही जंगम मालमत्तेचा विनियोग विक्री करुन ,भाडयाने देऊन किंवा अन्य प्रकारे करता येईल आणि त्यास, उपरोक्त असा कोणताही हक्क धरुन , महानगरपालिकेच्या मालकिची कोणतीही स्थावर मालमत्ता एका वर्षाहून अधिक अशा कोणत्याही कालावधीसाठी ,तशीच मंजुरी घेऊन ,पट्टयाने देता येईल:किंवा जिचे मुल्य किंवा अधिमुल्य पन्नास हजार रुपयांहून अधिक नसेल किंवा जिचे वार्षिक भाडे तीन हजार रुपयांहून अधिक नसेल अशी महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता विकता येईल किंवा कायमच्या पट्टयाने देता येईल.

या प्रकरणी यापूर्वी मा. स्थायी समिती मध्ये निर्णय झालेला असल्याने भाडे निश्चितीसाठी पुनश्च प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला होता मा. स्थायी सामिती ठराव क्र २० दिनांक २१/६/१० अन्वेय विकास मतिमंद विद्यालयास १५ वर्षाची मुदत व रू. ५००/— मासिक भाडे आकारणी करणेबाबत ठराव संमत केलेला आहे. यास मा. महासभेची अंतिम मान्यता आवश्यक असल्याने मान्यतेसाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> २७ <u>दिनांक:—१९/७/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे विकास मतिमंद विदयालय यांना पुढील १५ वर्षाच्या कालावधीसाठी महापालिका समाजमंदिर भाडेतत्वाने देणे कामी स्थायी समिती ठराव क्र. २०, दिनांक २१/०६/२०१० कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :–** दिनांक २५/०१/२०१० रोजीचा औद्योगिक न्यायालयाचा आदेश विचारात घेऊल महापालिकेती सफाई कामगार रिक्त पदाच्या सेवाजेष्ठता यादीनुसार भरती करणे.

---

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–कोणते ३०५ सफाई कामगार आहेत काय?

महापालिका सचिव :–होय.

काही सदस्य :–पास–पास......

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–बहुमताने पास.............

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–बहुमताने पास करा.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–माझा विरोध आहे. या विषयावर चर्चा होवु दया ना?

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–चर्चा झालेली आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:–मोरे साहेब चर्चा काय करायची? ज्या लोकांनी आपल्या या महानगरपालिकेमध्ये आयुष्य घालविले. त्यांनी कोर्टामध्ये जावुन जावुन आपले आयुष्य घालविले आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–श्री. धांडे, मी नाही म्हणत नाही.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :–तुम्ही कोर्टाच्या आदेशाच्या विरुध्द जाणार आहात का?

सदस्य श्री. रविंद्र बागुल:–पास करा, पास करा. श्री. मोरे साहेबांना खाली बसायला सांगा.

सदस्या श्रीमती मालती करोतिया :–पास तर करायचेच आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–श्री. धांडे यांचे काही देणे–घेणे झाले असेल म्हणुन ते असे म्हणतात.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–आयुक्त साहेब, माझ्या प्रभागात सफाई कामगार नाहीत, सफाई कामगारांची लवकरात लवकर भरती करा.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–या विषयावर चर्चा होवुन मगच हा विषय पारीत झाला पाहिजे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–मा. आयुक्त साहेब, आपल्या माहितीप्रमाणे ज्यावेळेस ३०५ चे कर्मचारी उपोषणास बसले होते, त्यावेळेस प्रशासनातर्फे आयुक्त साहेब, महापौर महोदया, उप–महापौर महोदय व आम्ही त्या उपोषण कर्त्यांकडे त्यांचे उपोषण सोडविण्यासाठी गेलो होतो त्यावेळेस आम्ही त्यांना आश्वासन दिले होते की, ठिक आहे तुमच्याबाबतीत काही कोर्टाचे आदेश असतील तर आमचे असे म्हणणे आहे की त्या लोकांनी एवढया वर्षापासुन महापालिकेची सेवा केली आहे. आज काही कामगार बिचारे बाहेर पेढे घेवुन बसले आहेत, कितीतरी कर्मचारी या आशेने बाहेर बसुन आहेत की आज आम्हांला दोन वेळेची भाकरी मिळेल. मी श्री. मोरे साहेबांना सांगु इच्छितो, गरीबांवर अन्याय करु नका. त्यांची आशा इतक्या दिवसापासुन राहिलेली आहे. त्यांच्यातील काहीजण मरण पावले आहेत.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे ते समजुन येत नव्हते.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>गरीबांच्या हक्कासाठी विरोध करु नका. गरीबांची हाय घेवु नका. श्री. मोरे साहेब गरीबांची हाय घेवु नका.

<u>काही सदस्य :—</u>पास, पास................

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>विरोध आहे, विरोध आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>श्री. मोरे साहेब, तुम्ही खाली बसा.

<u>सदस्य श्री.जे.के. ढोके :—</u>श्री. धांडे साहेब, ३०५ कर्मचा—यांच्या बाबतीत श्री. मोरे साहेबांचा विरोध नाही. परंतु त्या प्रस्तावात ज्या त्रुटी आहेत त्या ते वाचुन दाखवित आहेत. हा विषय पास आहे. परंतु प्रशासनाच्या काही त्रुटी आहेत ते वाचुन दाखवित आहेत.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>त्रुटी वगैरे काही नाहीत. जो आहे तो प्रस्ताव योग्य आहे. कर्मचा—यांना न्याय मिळालाच पाहिजे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>याच्यामध्ये प्रशासनाची काही चुक झालेली आहे. तेवढेच मी सांगु इच्छितो.

<u>उप—महापौर :—</u>श्री. मोरे साहेब, कृपया जरा आपण बसून घ्यावे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>महापौर महोदया, आपण दिलेला शब्द आपण पाळलाच पाहिजे. त्याचा अपमान होता कामा नये. कर्मचा—यांना न्याय मिळालाच पाहिजे. त्यांना त्यांचा हक्क मिळालाच पाहिजे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>प्रशासन या विषयाबाबत एवढे दिवस का मुग गिळुन बसले होते. हे मला सभागृहाला सांगितले पाहिजे ना? यांना काय आहे? हो हो हो, नाही, नाही, नाही म्हणतात.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>महापौर महोदया, आयुक्त साहेब वस्तुस्थिती काय आहे ते सांगा. सगळयांना येथे ओरडायला लावु नका.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>प्रशासन आपल्या काय त्रृटी आहेत त्या बघुन घेईल. आणि कायदेशीर कार्यवाही करेल. मा. आयुक्त साहेब, हा विषय सर्वसंमतीने पारीत केला जावा.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—</u>कोर्टाचा आदेश असल्यानंतर या विषयावर महासभेत चर्चा करण्याची काही आवश्यकता नाहीच.

<u>काही सदस्य :—</u>पास करा, पास करा.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>हा विषय पास करा परंतु प्रशासनाच्या काही त्रृटी आहेत, चुका आहेत त्या दाखवुन दिल्या पाहिजेत.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>काही त्रृटी राहिलेल्या नाहीत, काही चुका झालेल्या नाहीत. ते कोर्ट बघुन घेईल.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>तुम्ही उठता आणि येता येथे हा बी.बी.मोरे सर्व अभ्यास करुन येतो. प्रशासनाच्या काही त्रृटी आहेत. त्यांनी हा प्रस्ताव का ठेवला?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>प्रशासनाची चुकी नव्हती, ती त्यांच्या युनियनची चुक होती. जावु दया पास करुन घ्या.

उप–महापौर :–एक मिनट श्री. मोरे साहेब आयुक्त  साहेब काय बोलत आहेत ते जरा ऐकुन घ्या.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, सर्व सन्माननिय सदस्य, आपण यापुर्वी सफाई कामगारांच्या रिक्त पदाची भरती चालु केली होती. त्यावेळेस मा. औद्योगिक न्यायालयाने जी स्थगिती दिली होती, त्याचा निर्णय जानेवारी महिन्यामध्ये लागला. त्यामध्ये औद्योगिक न्यायालयाने आपणांस असा आदेश केला होता की, जसजशी तुम्ही रिक्त पदांची भरती सुरु कराल तसे या ३०५ मधल्या लोकांना प्राधान्याने नोकरी दयावी. ३०५ हा उल्लेख त्याच्यामध्ये नाही. ३०५ हा आकडा कोठुन आणला? दुसरी गोष्ट नगरविकास विभागाचे सचिव यांनी मंत्रालयामध्ये एक बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये त्यांनी सूचना दिल्या होत्या. सुप्रीम कोर्टाने याबाबतीत एक निर्णय दिलेला आहे. रोजंदारीवर जे लोक काम करतात त्यांनी केवळ २४० दिवस भरले या तांत्रिक बाबीपायी त्यांना सेवेमध्ये कायम करु नये असा उमा भारती केसमध्ये निर्णय दिलेला आहे. जर औद्योगिक न्यायालयामध्ये महापालिकेची बाजु मांडतांना त्या केसचा उल्लेख केला गेला नसेल तर तो करण्यात यावा. किंवा याच्यामध्ये औद्योगिक न्यायालयाने असा काही निर्णय दिला असेल त्याच्याविरुध्द उच्च न्यायालयामध्ये अपील करावे अशा प्रकारच्या सूचना सचिव महोदयांनी मंत्रालयात दिल्या होत्या त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेने याप्रकरणी उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे त्यामुळे याप्रकरणामध्ये ...

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–कोणत्या कारणामुळे अपिल दाखल केलेले आहे.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–उमा भारती केसच्या अनुषंगाने. उमा भारती केसमध्ये रोजंदारीच्याबाबतीत जे सुप्रीम कोर्टाने निर्णय दिले आहेत त्या निर्णयाचा उल्लेख करण्यासाठी.........

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–म्हणजे परत आता या ३०५ वर अन्याय करणार काय? म्हणजे ज्यावेळेस ते कामगार उपोषणास बसले होते त्यावेळेस तुम्ही स्पष्टपणे का नाही बोलले? म्हणजे ३०५ कामागारांच्या बाबतीत तुम्ही पाठीत खंजीर खुपसले आहे?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–हा निर्णय जानेवारी महिन्यातील होता. आपण फेब्रुवारी महिन्यात एजंडा सुध्दा पाठविला होता. परंतु सचिव महोदयांनी मंत्रालयात जी बैठक घेतली त्यानंतर आपण अपिल दाखल केलेले आहे. त्यापुर्वी नाही.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–कधी अपील दाखल केले आहे.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–साधारणत:जुन महिन्यामध्ये अपील दाखल केले होते.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–आणि उपोषणकर्ते उपोषणासकधी बसले होते?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–मे महिन्याच्या दरम्यान उपोषणास बसले होते.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–आता काही दिवसापुर्वी बसले होते साहेब. आता काही दिवसापुर्वी. दिशाभुल करु नका, ३०५ चे कर्मचारी उपोषणास आता बसले होते. त्या वेळेस तुम्ही त्यांना हे का नाही सांगितले? आमची दिशाभुल का केली? महापौरांना तुम्ही का नाही सांगितले की आम्ही अपील मध्ये चाललो आहे म्हणुन? महापौरांनी त्यांना दिलेला हा शब्द आहे, शहराचे प्रथम नागरीक शब्द देतांत त्यांचा हा अपमान नाही आहे का?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–सचिव महोदयांनी त्यानंतर सुचना दिलेल्या आहेत. उपोषणाला कधी बसले होते ते?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–आता बसले होते. जुन महिन्यात किंवा पंधरा वीस दिवसापुर्वी बसले होते.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–नाही, नाही जुन महिन्यामध्ये नव्हते बसलेले.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–अपिल आपण कोर्टात सादर केले आहे?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–कोर्टात दिले आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–कधी दिले आहे? तारीख? ॲडमिट केले आहे का? आम्हांला दाखवा. आम्हांला आता दाखवा ॲडमिट केले असेल तर आम्हांला त्याचा पुरावा येथे दाखवा. ही अशी उडवाउडवीची उत्तरे दयायची नाहीत. ॲडमिट केले असेल तर दाखवा.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–दाखवतो.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–हा आपण गोरगरीबांवर अन्याय करत आहात. आज इतक्या वर्षापासुन ते बिचारे कोर्टाचे धक्के खात आहेत. आज कुठेतरी त्यांना समाधान मिळत असेल. तर आपण कोर्टात जातात? ॲडमिट केले असेल तर आम्ही काही बोलणार नाहीत. ॲडमिट नसेल आम्हांला माहित आहे ॲडमिट केलेले नाही. आम्हांला तारीख दाखवा कधी ॲडमिट केलेले आहे? हा अन्याय करु नका. गरीबाची हाय घेवु नका. आज कितीतरी कर्मचारी बाहेर बसले आहेत. त्यांना उत्तर तुम्ही देणार आहात का? ते मला तुम्ही सांगा. सचिव साहेब अपील ॲडमिट केले आहे का? ॲडमिट केले असेल तर आम्हांला तारीख दाखवा.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–विधी विभागाकडुन यांची माहिती घेवुन देतो.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–सचिव साहेब, अपील ॲडमिट केले आहे का? सचिव साहेबांना माहित नाही ॲडमिट केले आहे किंवा नाहीत नगरपालिकेचे अधिकारी जे कामे करतात त्यांना माहित नाही आहे अपिल ॲडमिट केले आहे की नाही ते?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–अहो, श्री. म्हसाळ साहेब आपण स्वत: मुख्यालयाचे उपायुक्त आहात आपणांस स्वत:ला माहित नाही की अपिल ॲडमिट केले आहे की नाही ते?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–सन्माननिय आयुक्त साहेब, कोणत्या तारखेला अपील ॲडमिट केले त्याची तारीख सांगा.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–आपण जर सभागृहाची दिशाभुल करत असाल तर आपणावरही कारवाई केल्याशिवाय आम्ही राहणार नाही.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–विधी विभागाच्या अधिका–यांना बोलवा भलेही रात्रीचे बारा वाजु दया.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–हा विषय येथे पास केला आहे सभागृहाने. विषय संपुन टाका. नाहीतर आम्ही आज या सभागृहाच्या बाहेर जाणार नाहीत. आणि तुम्हांलाही जावु देणार नाही. जोपर्यंत या गरीबांच्या बाबतीत न्याय होणार नाही तोपर्यंत. काय फसवणुक चालली आहे काय चालले आहे हे?

सदस्य श्री. नरेंद्र दवणे :–मा. आयुक्त साहेब, या विषयाला राजकीय वळण देवु नका. कोणच्या दबावाखाली अयोग्य निर्णय घेत असाल तर योग्य नाही आहे ते. या ३०५ कामागारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न आहे. यासाठी काहीतरी योग्य निर्णय घेण्यात यावा.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–कितीतरी लोक कोर्टामध्ये भटकत आहेत आज कुठेतरी त्यांच्या मनाला समाधान वाटत असेल तर त्यांच्याबाबतीत आपण उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे वगैरे उत्तर देतात.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—</u>आपण खोटी खोटी उत्तर देत असाल तर यास संपुर्ण जबाबदार आयुक्त साहेब आपण आहात.

<u>महापालिका सचिव :—</u>मा. महापौरांची सूचना आहे की, जोपर्यंत विधी विभागाचा संबंधीत अधिकारी किंवा कर्मचारी येथे येत नाही तोपर्यंत हा विषय प्रलंबित ठेवला जात आहे. तोपर्यंत पुढील विषय घेतला जात आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>नाही, नाही. पुढील विषय होणार नाही, आणि सभागृहातुन कुणी बाहेरही जाणार नाही.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>सभागृहाच्या बाहेर पाठवु नका कुणाला.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—</u>आयुक्त साहेब पास करुन घ्या.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>उप—महापौर साहेब हा विषय पास करुन घ्या.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>जर कुणाचा विरोध असेल तर त्यांनी आपला विरोध दर्शवावा.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :—</u>मतदान घ्या जर कुणाचा विरोध असेल तर त्याने विरोध करावा.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>फालतु पैसे खर्च करण्यासाठी महापालिकेला वेळ आहे.आणि गरीबांचे चांगले होत असेल तर बघवत नाही. महापौर महोदया, मतदान घ्या. लवकरात लवकर मतदान घ्या. ''दुधाचे दुध, पाण्याचे पाणी होईल ना येथे, माहित पडेल ना.'' आपण दिलेला शब्द आहे. सव्वा सात वाजत आले आहेत. सव्वा सात वाजत आले आहेत.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> आयुक्त साहेब, काही अडचण आहे का? उशिर का करत आहात?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>अपील ॲडमिट झालेले नाही आहे. हे स्वत: म्हणतात आम्ही ॲडमिट केले आहे आणि यांना ॲडमिट केल्याची तारीख माहित नाही. विधी अधिका—याने उत्तर दयावे. आणि त्याची आम्हांला आजच्याच तारखेला प्रत दयावी नाहीतर हा विषय पास झाल्याशिवाय राहणार नाही.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, मला दोन मिनिटे बोलु दिले जावे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे:—</u>आता कोणत्याही चर्चेची आवश्यकता नाही.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आता हा जो विषय आहे त्याच्यावर आता काही चर्चा न करता एकमतोन पास करावा.

<u>काही सदस्य :—</u>पास, पास................

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>श्री.बी.बी.मोरे यांनी सांगितले पास करा.

<u>महापालिका सचिव :—</u>सर्व संमतीने?

<u>उप—महापौर :—</u>या प्रकरणामध्ये आयुक्तांतर्फे उच्च न्यायालयात अपील सादर केले आहे की नाही याचा आपणांास काहीही पुरावा मिळालेला नाही, याची काही कल्पना नाही. याची इतिवृत्तांतात नोंद घेतली पाहिजे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>याची इतिवृत्तांतात नोंद घेतली जावी.

**उप–महापौर :–**तीनशे पाच कर्मचा–यांच्या बाबतीत उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले आहे की नाही? त्यांनी ॲडमिट केले आहे किंवा नाही? त्याची कल्पना सभागृहात कुणाला दिलेली नाही. यामुळे हा विषय पारीत केला जावा.


**सदस्य श्री. प्रशांत धांडे :–**आता हा विषय पास झालेला आहे.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :–**पास झालेले आहे. जर असे काही झाले असेल तर यांना त्यावेळेसच माहित पडले असते ना?

**सदस्य श्री. नरेंद्र दवणे :–**विषय क्र. १० पारीत झाला आहे असे जाहिर करा.

**महापालिका सचिव :–**पास?

**काही सदस्य :–**पास, पास............

**महापौर :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. १०:–** दिनांक २५/०१/२०१० रोजीचा औद्योगिक न्यायालयाचा आदेश विचारात घेऊल महापालिकेती सफाई कामगार रिक्त पदाच्या सेवाजेष्ठता यादीनुसार भरती करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेतील रिक्त सफाई कामगारांची पदे भरणेबाबत २००७ मध्ये कार्यवाही सुरु असतांना अखिल भारतीय सफाई कॉंग्रेस व लेबर फ्रंट कर्मचारी या कर्मचारी/कामगार संघटनांनी मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे याचिका क्र. १३४/२००७ नुसार तक्रार दाखल करुन सदरची भरती प्रक्रियेस स्थगिती आणली होती.

मा. न्यायालयाने सन १९८७ ते १९९९ या कालावधीत रोजंदारी/हंगामी स्वरुपी सेवेचे काम केलेल्या सफाई कर्मचा–यांची पगार पत्रके तपासून कामगारांची अदयावत सेवा जेष्ठता यादी सादर करणेस महानगरपालिकेस आदेश देण्यात आले होते. त्यानुसार सदर कालावधीमध्ये काम केलेल्या रोजंदारी/हंगामी सफाई कर्मचा–यांची पगार पत्रके तपासून अदयावत सेवा जेष्ठता यादी मा. न्यायालयास सादर करण्यात आली होती.

त्यानुसार मा. औद्योगिक न्यायालय यांनी दिनांक २५/१/२०१० रोजी महानगरपालिकेतील रिक्त पदांची जसजशी आवश्यकता भासेल तसतशी पदे महापालिकेने मा. न्यायालयास सादर केलेल्या जेष्ठता यादीनुसार भरण्यात यावी असे आदेश दिलेले आहेत.

तरी मा. औद्योगिक न्यायालयाने सफाई कामगारांची रिक्त पदे भरणेबाबत दिलेल्या आदेश निर्णयास्तव मा. महासभेच्या माहितीस्तव ठेवण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** २८ **दिनांक:–१९/७/२०१०**

सुचकाचे नाव :– श्री. प्रशांत धांडे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वानखेडे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिनांक २५/०१/२०१० रोजीचा औद्योगिक न्यायालयाचा आदेश विचारात घेऊन महापालिकेतील सफाई कामगार रिक्त पदाच्या सेवाजेष्ठता यादीनुसार सफाई कामगारांची भरती करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ११ :— प्रस्तावाची सुचना
नागरी दारिद्रय निर्मूलन कक्ष स्थापन करणेकामी पालिका सदस्य श्री. लाल पंजाबी यांची सुचना विचारात घेणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सदस्य श्री. लाल पंजाबी:—**धन्यवाद. हा विषय सर्वसंमतीने पारीत करु या. यामध्ये मी एक मुद्दा सांगु इच्छितो आम्ही जेव्हा चंदीगड येथे प्रशिक्षणास गेलो होतो तेव्हा श्री. बोडारे साहेब होते उप—महापौर होते, श्री. बी.बी. मोरे होते तेथेच आम्ही निर्णय घेतला होता की उल्हासनगरमध्ये जावुन आपण दारिद्रय निर्मुलन कक्ष स्थापन करु. गरीबांसाठी सरकारच्या ब—याच काही योजना आहेत. आताच दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचा विषय निघाला होता. ब—याचशा लोकांकडें त्याबाबतचा दाखला नाही. आता या दारिद्रय निर्मुलनासाठी एक कक्ष असेल यामध्ये गरीबांसाठी सरकारच्या ज्या काही योजना आहेत त्यांची अंमलबजावणी केली जाईल व सभागृहात जुन महिन्यामध्ये त्यांचा अहवाल आला पाहिजे की आजपर्यंत काय काय झाले आहे? हा विषय जेव्हा आला तेव्हा आरोगय विभागाच्या उप—आयुक्त श्रीमती संगिता धायगुडे यांनी आणखी एक सूचना केली की या कक्षामध्ये तीन बॅकाचे शाखा व्यवस्थापक व सीबीएसचे जे अध्यक्ष व सचिव आहेत त्यांचा सुध्दा आपण समावेश करा. जेणेकरुन या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होवु शकेल. यासाठी माझी सूचना आहे की, या कक्षासाठी जे अधिकारी पाहिजेत असे मी लिहिले आहे त्याच्याबरोबर तीन बॅकांचे अधिकारी शाखा व्यवस्थापक व महिला बचत गटांचे अध्यक्ष व सचिव यांचाही समावेश केला जावा.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे पास?

**काही सदस्य:—**पास, पास..................

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

विषय क्र. ११ :— प्रस्तावाची सुचना
नागरी दारिद्रय निर्मूलन कक्ष स्थापन करणेकामी पालिका सदस्य श्री. लाल पंजाबी यांची सुचना विचारात घेणे.

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी
अनुमोदकाचे नाव :— श्री. बच्चांराम रुपचंदानी

**अशासकिय प्रस्ताव**

नागरी दारिद्रय निर्मुलनासाठी केंद्र व राज्य शासनाकडुन विविध योजना जाहिर केल्या जातात व नगरपालिका/महानगरपालिका यांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून त्या राबविल्या जातात या योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी कल्याण डोंबिवली या सारख्या शेजारील महानगरपालिकांमध्ये दारिद्रय निर्मलन कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. या प्रकारचा कक्ष आपल्या महानगरपालिकेत अदयाप स्थापन करण्यांत आला नसल्याने शासनाकडील नागरी दारिद्रय निर्मुलनासंदर्भातील योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही. नागरी दारिद्रय निर्मुलन योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी उल्हासनगर

महानगरपालिकेत उप–आयुक्त, आरोग्य यांच्या अध्यक्षतेखाली दारिद्रय निर्मुलन कक्ष स्थापन करण्यात यावा व या कक्षात खालीलप्रमाणे सदस्यांचा अंतर्भाव करण्यात यावा.

१. उप–आयुक्त (आरोग्य) — सभापती
२. शहर अभियंता — उप–सभापती
३. कार्यकारी अभियंता (सा.बां.वि.) — सदस्य
४. वैद्यकीय आरोग्य अधिकारी — सदस्य
५. कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.) — सदस्य
६. मुख्य लेखा अधिकारी — सदस्य
७. मुख्य लेखा परिक्षक — सदस्य
८. प्रकल्प अधिकारी (सुवर्ण जयंती) — सदस्य सचिव

या समितीने दर तीन महिन्यातून बैठक घेवून आपल्या कार्याचा अहवाल प्रत्येक वर्षाच्या जुन महिन्यामध्ये आयुक्तांमार्फत महासभेपूढे सादर करणे कामी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> <u>दिनांकः–१९/७/२०१०</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या सदस्यासह शहरातील कोणत्याही ३ बॅकाचे शाखा व्यवस्थापकांना, कोणत्याही एका बचत गटांचे अध्यक्ष व सचिव इत्यादी यांचे उल्हासनगर महापालिकेत नागरी दारिद्रय निर्मूलन कक्ष स्थापन करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ७.२० वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांकः–२०/८/२०१०

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/८/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

४

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/८/२०१० रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१२.महापौर —— श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

१३.उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३६ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ३ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३७ | श्रीमती रजनी मोहन महाडीक |
| ४ | श्री. दिलीप दशरथ गायकवाड | ३८ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ५ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३९ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४० | श्री सुंदर आसनदास मंगतानी |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४१ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ८ | श्री भानजी भिकारी. मोरे | ४२ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ९ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४३ | कु. शकुंतला जीवनलाल जग्यासी |
| १० | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | ४४ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४५ | श्री. शेखर केशव यादव |
| १२ | श्री. राजू (जीवन) चंद्रभान इदनानी | ४६ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १३ | श्री. किशोर जिवनलाल जग्यासी | ४७ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १४ | श्री. राजेंद्रसिंह वि. (महाराज) भुल्लर | ४८ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १५ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४९ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १६ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५० | श्रीमती ज्योती रमेश चेनानी |
| १७ | श्री. जमनादास खुबचंद पुरसवाणी | ५१ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १८ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५२ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १९ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५३ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २० | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २१ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५५ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| २२ | श्री. कुमार उत्तमचंद आयलानी | ५६ | श्री. मोहन साधवाणी |
| २३ | श्री. नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम ठाकुर | ५७ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २४ | श्री. संजय (बब्बु) भठीजा | ५८ | श्री. बच्चाराम बाशोमल रूपचंदानी |
| २५ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५९ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २६ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६० | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २७ | श्री. लाल देवनदास पंजाबी | ६१ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २८ | श्रीमती इन्दिरा जमनादास उदासी | ६२ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २९ | श्री. प्रभूनाथ दुखंती गुप्ता | ६३ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३० | श्रीमती शकुंतला पाटील | ६४ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| ३१ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६५ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३२ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६६ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३३ | श्री. जनार्दन किसनराव ढोके | ६७ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३४ | श्री. सतीश (बाजीराव) तात्याबा चहाळ | ६८ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |
| ३५ | श्रीमती सुरेखा राजन वेलकर | ६९ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती निलम प्रेमसिंग रावत, २. श्री. अंकुश  निवृत्ती म्हस्के, ३. श्री. राजू जग्यासी, ४. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ५. श्री. मोहन (गारो) रामरख्यानी, ६. श्री गणपत गोविंद.एडके, ७. श्रीमती मालती राधाचरण करोतीया, ८. श्रीमती शिला सुभाष मनसुलकर, ९. श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी, १०. श्रीमती लता शांताराम निकम, ११. श्रीमती मोना अशोक वनवारी, १२. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई)

खालील अधिकारी सभेस हजर होते.

६६.श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त
६७.श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त (मु)
६८.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
६९.श्रीमती संगीता धायगुडे, उप–आयुक्त, आरोग्य
७०.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
७१.श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
७२.श्री. माधव जवांदे, शहर अभियंता
७३.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
७४.श्री. एम.बी. गिरगावकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
७५.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता सा.बा.वि.
७६.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
७७.श्री. दिपक चिमनकारे,  वाहन विभाग प्रमुख
७८.श्री  जी.जी. हिबारे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
७९.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
८०.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
८१.श्री  भगवान कुमावत, प्र. प्रभाग अधिकारी
८२.श्री. कुमार जग्यासी, कर निर्धारक व संकलक
८३.श्री. बुडगे, कनिष्ठ अभियंता, नगररचनाकार
८४.श्री. नंदु समतानी, मुख्य लिपिक, साप्रवि
८५.श्रीमती दिपमाला गोपाळे, प्रकल्प अधिकारी
८६.श्री. जनार्दन देवकर, लिपिक, आरोग्य
८७.श्री. केशव हंबीर, लिपिक, जकात विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती अमिता संखे
५. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**यावेळी सदस्य श्री. कुमार आयलानी, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर हे सभागृहातुन बाहेर गेले.** 

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आपल्या महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील दोन कर्मचारी अनुक्रमे श्री. भास्कर मिरपगार व श्री. भिमराव खैरे यांना राष्ट्रपती पदकाने सन्मानित करण्यात आले आहे.  मला असे वाटते की महासभेत सुध्दा त्यांचा सत्कार केला पाहिजे.  तर माझ्या या प्रस्तावाचा आपण स्विकार करावा अशी विनंती आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>अभिनंदन प्रस्ताव पारीत करुन घ्या.

<u>काही सदस्य :–</u>  पुढील महासभेत त्यांचा सत्कार करण्यांत यावा

<u>महापालिका सचिव :</u>—पुढील महासभेत ना? पुढील महासभेत त्यांचा सत्कार केला जाईल. ठिक आहे?

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

प्रश्नोत्तरे......... यावेळेस सांयकाळचे ४ वाजुन १७ मिनिटे झाली आहेत.
मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणजी, मराठी भाषेच्या ज्ञानाविषयीचा आपला प्रश्न क्र. २२२ प्रलंबित आहे.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :</u>—मा. महापौर आणि आयुक्त साहेब, माझा हा २२४ क्रमांकाचा जो प्रश्न आहे , मागील महासभेत मी त्याबाबतीत विचारणा केली असता, त्यावेळी आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, पुढील महासभेत आपणांस याचे उत्तर मिळेल. परंतु अदयापपर्यंत मला या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. हा प्रश्न मी नोव्हेंबर महिन्यात विचारला आहे, आता ऑगस्ट महिना चालु आहे. प्रश्न विचारुन जवळ जवळ सात आठ महिने झाले तरीसुध्दा अदयाप त्याचे उत्तर मिळत नाही. काय गोष्ट आहे? नगररचना विभागाशी सबंधीत प्रश्न आहे.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :</u>—मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, आणि सर्व सन्माननिय सदस्य, आयुक्त साहेब, मी मागे प्रश्न विचारला होता संबंधीत अधिकारी त्या प्रश्नाचे उत्तर देवु शकले नाहीत. तर संबंधीत अधिका—याने याबाबत उत्तर तयार केले आहे का, त्यांना विचारा?

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र.२२२ चे उत्तर प्रस्तृत केलेले आहे.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :</u>—मला उत्तर भेटलेले नाही. त्यांनी व्यवस्थीत उत्तर दिलेले नाही. उत्तर पुर्ण नाही

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):</u>—सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, व सर्व सन्माननिय सदस्य, श्री. रमेश चव्हाण यांनी महापालिकेतील कर्मचा—यांना मराठी भाषेचे ज्ञान आहे की नाही असा प्रश्न विचारला होता. याबाबत उत्तर देण्यात आलेले आहे.

<u>उप—महापौर :</u>—एक मिनिट, उभे असलेल्या सर्व सदस्यांना विनंती आहे की त्यासर्वांनी आपापल्या जागेवर बसुन घ्यावे. श्री. सुखरामानी व श्री. रामचंद्र पारवानी साहेब आपण आपापल्या जागेवर बसुन घ्यावे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):</u>—सन्माननिय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देण्यात आलेले आहे. महानगरपालिकेतील वर्ग —१ ते वर्ग —३ मधील एकुण २९० अधिकारी व कर्मचारी यांनी मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे. त्यानंतर ज्यांनी परिक्षा दिलेली नाही त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली ? त्यासाठी संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांना ज्ञापन बजावण्यात आलेले आहे. त्यांची संख्या सुध्दा माझ्याकडे आहे ते जवळ जवळ १४० कर्मचारी आहेत.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :</u>—त्यांच्यावर तुम्ही काय कारवाई केलीत?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):</u>—त्यांना ज्ञापन बजावयण्यांत आलेले आहे.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :</u>—मग आता काय करणार तुम्ही ?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):</u>—मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण करावी असे त्यांना ज्ञापन बजावण्यात आलेले आहे. ते परिक्षा उत्तीर्ण करुन तसे आपणांस कळवतील ....

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> त्यांनी मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक नाही काय? त्यांनी परिक्षा उत्तीर्ण करावी असे तुम्हांला वाटत नाही काय?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):</u>—वाटते ना, म्हणुनच तर आपण त्यांना ज्ञापनाद्वारे तसे कळविले आहे. मागच्या वेळेस सुध्दा कळविले होते.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—त्यांना किती दिवसाचा कालावधी दिला आहे?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—सहा महिन्याच्या कालावधीत त्यांनी परिक्षा उत्तीर्ण केली पाहिजे.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :— बघा, सहा महिन्यापर्यंत त्यांनी परिक्षा उत्तीर्ण केली पाहिजे असेच तुम्ही म्हणत आहेत ना?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—एक वर्षाचा कालावधी आहे.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—साहेब, तुम्ही सभागृहाची दिशाभुल करत आहात, सहा महिन्यात परिक्षा उत्तीर्ण करायची आहे की एक वर्षात करायची आहे हे कळत नाही.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—त्यांना ज्ञापन देवुन सहा महिने झाली आहेत. आणि आता सहा महिने बाकी आहेत.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—यासाठी तुम्ही एवढा विलंब का केलात? हे तर ब—याच अगोदर करावयास पाहिजे होते. तुम्हांला पत्र कधी आलेले आहे?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—पत्र आल्या आल्या लगेच कार्यवाही करायला पाहिजे होती. राहुन गेले आहे.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—राहुन गेले म्हणजे काय? आयुक्त साहेब, हे काय उत्तर झाले काय? नेमणुक झाल्यानंतर मराठी भाषेची परिक्षा दिली पाहिजे. मराठी भाषेची परिक्षा दयावयास पाहिजे होती ते राहुन गेले असे तुम्ही म्हणता? हा काय घरचा कारभार आहे का? मराठी भाषेचे ज्ञान असणे त्यासाठी मराठी परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. काही कर्मचा—यांना मराठी भाषेचे ज्ञान अदयापपर्यंत नाही. २९० अधिकारी, कर्मचा—यांना मराठी भाषेचे ज्ञान आहे, त्यांनी परिक्षा उत्तीर्ण केली आहे. आता १४० कर्मचारी राहिले आहेत ना?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—१४० कर्मचा—यांना अदयाप मराठी भाषेचे ज्ञान नाही आहे, त्यानी मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण केलेली नाही.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—म्हणजे यामध्ये काय आहे? साहेब, मी तुम्हांला असे कितीतरी कर्मचारी दाखवितो त्यांना मराठी लिहिता येत नाही. बसुन पगार घेतात. मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण करुन घेण्याची जबाबदारी कुणाची आहे? आणि आता तुम्ही म्हणत आहात की त्यांच्याकडून मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण करुन घ्यावयास पाहिजे होती आणि अजुन त्यांना एक वर्षाची वेळ दिली आहे. त्यांच्यावर तुम्ही काय कारवाई केली?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—१९९४ च्या शासन निर्णयानुसार त्यांनी स्वत:हुन परिक्षेस बसणे आवश्यक आहे. आणि ते बसलेले नाहीत म्हणुनच त्यांना ज्ञापन दिलेले आहे.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—परिक्षेस कधी बसणे आवश्यक होते?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—नियुंक्ती झाल्यानंतर लगेच मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक होते. काही कर्मचारी बरेचसे जुने आहेत. तसेच ज्यांना शालांत परिक्षा इयत्ता १० वी ला हा विषय असतो त्यांना ही परिक्षा देण्याची आवश्यकता नसते.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—बरोबर आहे.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–परंतु शालांत परिक्षेत ज्यांना हा विषय नसतो, संस्कृत किंवा हिंदी असतो त्याना ही परिक्षा देणे आवश्यक असते.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :–एवढे वर्ष त्यांनी मराठी भाषेची परिक्षा दिलेली नसतांना त्यांना तुम्ही आणखी एक वर्षाची मुदत कशी दिली ?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–त्या शासन निर्णयातच असे म्हटलेले आहे की त्यांना एक वर्षाची मुदत दयायला पाहिजे

सदस्य श्री. रमेश चव्हाण :– आयुक्त साहेब यांचे हे उत्तर बरोबर वाटते का तुम्हांला?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–खरें तर हे जुने कर्मचारी आहेत त्यांनी परिक्षा लवकर देणे गरजेचे होते. परंतु आता जी आपण मुदत दिली आहे त्या मुदतीत जर त्यांनी मराठी भाषा अवगत असल्या बाबतचे प्रमाणपत्र सादर केले नाही केले तर आपण त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करु.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :–सहा महिन्याची वेळ बाकी आहे या सहा महिन्यातच त्यांनी मराठी विषयाची परिक्षा उत्तीर्ण केली नाही तर ? अशी वेळ आणुन देवु नका की आम्ही यासाठी परत प्रश्न विचारावे आणि तुम्ही सांगावे की त्यांना अजुन वेळ दिली आहे म्हणुन?

सदस्य श्री. मोहन साधवानी :–मला अदयाप पर्यंत २२४ क्रमांकाच्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. प्रश्न नगररचना विभागाशी संबंधीत आहे. २० नोव्हेंबरला मी प्रश्न विचारलेला आहे त्याचे उत्तर अर्धेच देण्यात आले आहे व ते सुध्दा हाताने लिहुन. तसेच सांगितले गेले की काम चालु आहे म्हणुन. आता १० महिने झाले आहे उत्तर देण्यासाठी अजुनपर्यंत काम चालु आहे ?

महापालिका सचिव :–उत्तर तर देण्यात आले आहे ना आपणांस?

सदस्य श्री. मोहन साधवानी :–उत्तर तर अर्ध्येच देण्यात आलेले आहे.

महापालिका सचिव :–उर्वरीत माहिती नंतर देण्यात येईल असे लिहिले आहे ना?

सदस्य श्री. मोहन साधवानी :–मागील महासभेत सांगितले होते की ती माहिती पुढील महासभेत दिली जाईल

महापालिका सचिव :–मा. महापौरांच्या आदेशा नुसार या प्रश्नाचे उत्तर पुढील महासभेत दिले जाईल.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–नोव्हेंबर महिन्याचा प्रश्न आहे, प्लान किती पास झाले किती पुर्णत्वास आले, किती प्लींथ सर्टीफिकेट झाले हे नगररचना विभाग सांगु शकत नाही? फक्त प्लान पास करायचे माहित आहे? अर्बन चाईल्डप्रमाणे मुल काढुन फेकुन दयायचे काय? बस्स?

महापालिका सचिव :– प्रश्न क्र. २२९ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

? प्रश्न क्र. २२९ :– महासभेत महापालिका मालमत्ता कर देयक वाटप केलेल्या खाजगीकरणाबाबत विचारलेल्या खालील प्रश्नांची योग्य, सुचक व समाधानकारक उत्तरे मिळणेबाबत.

प्रश्न क्र १ अ) उल्हासनगर महानगरपालिका मालमत्ता कर देयक वाटप करण्याचे काम सन २००८–०९ मध्ये खाजगीकरण करण्यात आले होते का? कोणत्या एजन्सीला ठेका देण्यात आला होता? प्रत्येकी कोणत्या दराने ठेका देण्यात आला होता? सदर ठेका निविदा काढुन दिला होता का? वृत्तपत्रात जाहीरात दिली होती का? असल्यास कोणत्या वृ्तपत्रकात दिली होती? त्यांची नांवे द्यावीत.

ब) सन २००९–२०१० या वर्षाकरीता कोणत्या एजन्सीला मालमत्ता कर देयक वाटप केलेल्या खाजगीकरणाचे काम दिले आहे? निविदा काढली होती का? कोणत्या एजन्सीने निविदा भरल्या होत्या? निविदाची जाहीरात वृत्तपत्रकात दिली होती का? दिली असल्यास कोणत्या वृत्तपत्रकात त्यांची नांवे द्यावीत? कोणत्या दराने ठेका देण्यात आला आहे? सदर कामाची स्थायीसमिती व महासभेची मंजुरी घेतली आहे का? कोणत्या आधारे काम एजन्सीला दिले आहे याचा खुलासा द्यावा.

तरी सदर प्रश्नांची योग्य सुचक उत्तरे देण्यात यावी ही विनंती.

उत्तर :– उल्हासगनर महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतींसाठी वर्ष २००८–०९ मध्ये मालमत्ता कराची बिले बजावणेसाठी अभिकर्त्यांची नियुक्ती करण्यात आली नव्हती

वर्ष २००९–१० या वर्षाकरीता मालमत्ता कर बिले करणेकामी में. अदित्य कॉम्प्युटर सर्व्हीसेस यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याकामी निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहे. पुढील निविदाधारकांनी निविदा सादर केल्या होत्या.

मे. ॲडीकॉम इन्फोसेस

मे. आदित्य कॉम्प्युटर सर्व्हीसेस

मे. जयेश कॉम्प्युटर्स

निविदा सुचनेची प्रसिध्द्‌ी नगरन्युज, दैनिंक धनुष्यधारी या वृत्तपत्रात देण्यात आली होती.

बिले व मागणी नोटीस वितरणाचे काम रु.८.५५ प्रतिबिले/मागणी नोटीस या दराने देण्यात आले आहे. मा. स्थायी समिती ठराव क्र.७० दिनांक २४/०८/२००९ च्या मंजुरीनुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– ठिक आहे.

महापालिका सचिव :–प्रश्न क्र. २३० हा श्री. मोहन साधवानी यांचा आहे.

1. ? प्रश्न क्र. २३० :– Who is the Chief Sanitory Inspectior?
2. Total How Many Sanitory Inspector post are sanction?
3. Out of Which How Many Post of S.I vacant?
4. Total How many Post of MUKADAM are SANCTION?
5. Out of which How many post of Mukadam Vacant?
6. Is there any acting Mukadam post sanction officially?

Total How many acting mukadam are working in each ward?

उत्तर :–१. श्री. के.एन.म्हात्रे, कायम मुख्य स्वच्छता निरिक्षक व प्रभारी साह. सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. जी. जी. हिबारे, कायम स्वछता निरिक्षक, व प्रभारी मुख्य स्वच्छता निरिक्षक.

२. १८ स्वच्छता निरिक्षक पदे मंजूर आहेत.

३. ९ स्वच्छता निरिक्षक पदे मंजूर आहेत

४. ७० मुकादमाची पदे मंजूर आहेत.

५. २ मुकादमांची पदे रिक्त आहेत.

६. नाही.

७. प्रभारी मुकादम एकही नाही.

सदस्य श्री. मोहन साधवानी :– या प्रश्नाचे उत्तर कोण देणार? उप–आयुक्त महोदया, एकुण स्वच्छता निरिक्षकांची किती पदे मंजुर आहेत, आपण लिहिले आहे १८, त्यातील ९ पदे रिक्त आहेत, ही ९ पदे रिक्त आहेत तर मग आपण केव्हा भरणार? आता जे स्वच्छता निरिक्षक आहेत ते आरोग्य विभागाचे काम करतात की इतर विभागाची कामे करतात?

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):– श्री. राजु चुग म्हणुन जे स्वच्छता निरिक्षक आहेत ते आता नागरी सुविधा केंद्रामध्ये काम करत आहेत. व इतर आरोग्य विभागात काम करत आहेत. तसेच जे २, ३ सफाई कामगार आहेत त्यांनी स्वच्छता निरिक्षक या पदासाठी आवश्यक असलेली पदविका परिक्षा उत्तीर्ण केली आहे त्यांना प्रभारी स्वच्छता निरिक्षक म्हणुन नियुक्ती दिली आहे. आता १४ स्वच्छता निरिक्षक असून त्यात ७ कायम आहेत, ७ प्रभारी आहेत. ७ प्रभारी स्वच्छता निरिक्षकात दोन सफाई कामगार आहेत.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–एका स्वच्छता निरिक्षकाकडे किती प्रभाग आहेत?

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–एक,एक स्वच्छता निरिक्षकाकडे ६–६, ७–७ प्रभाग आहेत.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–९ पदे रिक्त आहेत ती आपण का भरत नाहीत? जेव्हा आम्ही कार्यालयात जातो तेव्हा ते सांगातात की, आमच्याकडे एवढे एवढे प्रभाग आहेत, आम्हांला वेळ नाही. आम्ही येथे जावे की तेथे जावे. तर मी सांगतो की जी ९ पदे जर रिक्त आहेत ती जर भरली तर त्यांचे सुध्दा काम कमी होईल ना? ६–६, ८–८, प्रभाग आपण स्वच्छता निरिक्षकांस देता. त्यात त्यांना कधी कधी अतिरिक्त काम येते, कधी निवडणूकीचे काम येते, कधी जनगणनेचे काम येते त्यामुळे ते लोक प्रभागात व्यवस्थीत लक्ष घालु शकत नाहीत. मी कधी पासुन सांगत आहे, ठेकेदार तेथिल कचरा उचलत नाही. ते म्हणतात माझ्याकडे ८ प्रभाग आहेत, मी काय करणार? माझ्या प्रभागात अजुन एक प्रभाग वाढवुन दिला श्री.उमालकराचे प्रभाग कमी केले व माझे वाढविले.

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–पदे तर भरली पाहिजेत परंतु ती भरण्याचे काम सामान्य प्रशासनाचे आहे......

सदस्य श्री. मोहन साधवानी :–पदे भरली तर त्यांचे काम कमी होईल. कधी भरणार पदे?

श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):– आस्थापना विभागातुन पदे भरली जातात ते काम माझ्याकडे नाही.

महापालिका सचिव :–प्रश्न क्र. २३१ हा श्री. मोहन साधवानी यांचा आहे.

प्रश्न क्र. २३१ :– Kindly give me the following Information of

RESERVE PLOTS in Ulhasnagar UMC Limit Area?

1. Complete Address of Reserve Plots?
2. Sheet No. of that Reserve Plots?
3. Plot No of that Reserve Plots?
4. AREA of Plot?
5. Purpose for which the plots IS reserve?

6. Has the Plots covered by Fencing/Boundary work?

Has the UMC Put the Reserve Plot Board on that sights?

<u>उत्तर :—</u> उल्हासनगर मंजुर विकास आराखडयातील TRDRTVE {LOTS च्या संबंधीत मुद्दा क्र. १ ते ५ बाबतच्या माहितीचा तपशिल सोबत जोडत आहोत.

मुद्दा क्र. ६ व ७ बाबतची माहिती या विभागाशी संबंधीत नाही.

**यादी**

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u> हा प्रश्न आरक्षित भुखंडाबाबतचा आहे याचे उत्तर कोण देईल? संपुर्ण यादी दिली आहे परंतु ती बरोबर नाही. नगररचना विभागाशी संबंधीत कुठलाही अधिकारी उपस्थित नाही. या प्रश्नाचे उत्तर कोण देणार?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>सचिव साहेब, जर एखादा नगरसेवक सलगपणे तीन महिने सभेस उपस्थित राहिला नाही तर त्यास बडतर्फ केले जाते असा काही नियम आहे ना? मी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे पुस्तक आणलेले नाही म्हणुन मी आपणांस विचारत आहे. जर नगरसेवक सतत तीन महिने सभेस उपस्थित राहिला नाही तर त्यास बडतर्फ केले जाते ना? नगररचनाकार सतत चार पाच महिन्यापासून सभेस गैरहजर राहतात त्याच्यावर काय कारवाई केली.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>नगररचना विभागातील एखादा तरी अधिकारी उपस्थित पाहिजे ना?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>प्रत्येक वेळेस नगरसेवकांची खिल्ली उडविली जाते.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>मा. आयुक्त साहेब, आज सुध्दा बरेचसे अधिकारी सभेत उपस्थित नाहीत याच्यावर तुम्ही काय कारवाई केली आहे किंवा करणार आहात? यापुर्वी काय कारवाई केली आहे ते सांगा.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—</u>याच्या निषेधार्थ आपण सभात्याग करु या

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>आयुक्त साहेब, ८१ नगरसेवकांची खिल्ली उडविली जाते. पाच, सहा वेळा आम्ही सांगितले की नगररचनाकारांना बोलवा. नगररचनाकार कोठे आहेत? बांधकाम परवानग्या मंजुर केल्या जात आहेत परंतु नगररचनाकार सभागृहात येत नाहीत. त्याची जबाबदारी घेण्यास कुणी तयार नाही.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—</u>प्रत्येक विभागाचा संबंधीत अधिकारी सभागृहात उपस्थित असला पाहिजे. आणि तो सुध्दा वेळेच्या आत.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :—</u>मा. महापौरजी, प्रत्येक सभेत नगररचनाकार अनुपस्थित असतात. त्यांना जेव्हा बांधकाम परवानग्यांवर स्वाक्षरी करायची असते तेव्हा ते महानगरपालिकेत येतात. जेव्हा त्यांना महासभेत यायचे असते तेव्हा त्यांना वेळ मिळत नाही.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>सचिव साहेब, आपण हे सांगा की नगररचनाकार किती सभांना आले नाहीत?

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>सकाळी तर ते आले होते. श्री. खामितकर सुध्दा सकाळी महापालिकेत बसले होते.

<u>उप—महापौर :—</u>आपले जे नगररचनाकार आहेत ते महासभेकडे दुर्लक्ष करुन निघुन जातात, का जातात काय माहित ? आज ते महासभेत आले नाहीत परंतु ते आज शहरात आहेत. शहरात असतांना सुध्दा ते सभेत आले नाहीत. का आले नाहीत? यासाठी मी आयुक्तांना सांगतो की त्यांच्यावर शिस्त भंगाची कारवाई केली जावी.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—मा. महापौरजी, उप—महापौरजी या विषयावर मी सभात्याग करतो.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—मी सुध्दा सभात्याग करतो.

यावेळी सदस्य श्री. रमेश चव्हाण, श्री. प्रधान पाटील, श्री. राजेश वानखेडे, श्री. सुरेश जाधव, श्री. प्रशांत धांडे, श्री. शेखर यादव, श्री. किशोर जग्यासी व सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी सभात्याग केला.

सदस्य श्री. लालबिहारी यादव :—नगररचनाकार दुपारी १.०० वाजेपर्यंत महापालिकेत होते. तरी सुध्दा ते महासभेत आले नाहीत.

सदस्य श्री. सतिश चहाळ :—महापौर महोदया, उप—महापौर साहेब, प्रत्येक महासभेत नगररचनाकार गैरहजर असतात. ही फार खेदाची गोष्ट आहे. त्यांच्यावर चांगलीच कारवाई करावी. त्यामुळे दुसरे जे अधिकारी व कर्मचारी आहेत त्यांना अद्दल घडेल.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, प्रत्येक महिन्याची २० तारीख ही महासभेसाठी ठरलेली तारीख असते. ठरलेल्या तारखेप्रमाणे महासभा भरविण्यात येते. तेव्हा अधिकारी महासभेत का उपस्थित राहत नाहीत? याचे काही कारण समजत नाही. महासभेतील अधिका—यांच्या अनुपस्थितीबाबत ब—याच वेळा ओरड झाली आहे. एखादा नगरसेवक लागोपाठ तीन महिने महासभेत गैरहजर राहिला तर त्यास अनर्ह केले जाते. अधिकारी सभांना उपस्थित राहिला नाही तर त्याच्यावर काय कारवाई केली जाते? त्यापुढे जावुन मला आयुक्त साहेबांना असे सांगायचे आहे की महासभेपुढे ज्या विभागांचे विषय असतात, त्या विभागाच्या संबंधीत अधिका—याने महासभेस उपस्थित राहिलेच पाहिजे असे आयुक्तांनी त्यांना आदेश दिले पाहिजेत. कारण आम्ही सर्व सदस्य इथे महासभेत येतो परंतु उत्तर देण्यासाठी अधिकारी सभागृहात नसतात ही आमची कुचंबना आहे. आमचा अपमान होतो, हे बरोबर नाही. यासाठी आम्ही एकतर असा निर्णय घेवु की, जो अधिकारी पुढच्या महासभेत हजर राहणार नाही त्यास आम्ही या महापालिकेत काम करु देणार नाहीत.

आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):—आदरणीय महापौर महोदया, आदरणीय उप—महापौर, सर्व महापालिका सदस्य, आयुक्त म्हणुन कार्यभार स्विकारल्यानंतर आज ही माझी पहिलीच महासभा आहे. यापुर्वी मी अनेक महासभांना उपस्थित होतो. मी प्रत्येक महासभेला उपस्थित असतोच. तुमच्या भावना मी १०० टक्के समजु शकतो. मी तुम्हांला याठिकाणी खात्री देतो की, यापुढे कुठलाही अधिकारी मग तो कितीही मोठा आणि कितीही वशिल्याचा असला तरी, तो जर उपस्थित राहिला नाही तर त्यावर अत्यंत गंभीर कारवाई करण्याची जबाबदारी माझी राहिल आणि ती कारवाई केली जाईल. वाटेल तसा, कुठल्याही अधिका—याचा त्याच्या मनाप्रमाणे कारभार चालणार नाही. इथे नगरसेवक म्हणुन तुम्ही सर्वसामान्य जनतेचे प्रश्न मांडता आणि आमचे अधिकारी नसतील तर त्यांच्यावर गंभीर कारवाई केली जाईल आणि याची प्रचिती तुम्हांला येईल. आणि त्या कारवाईसाठी तुम्ही माझ्याबरोबर असणे अत्यंत गरजेचे आहे. जरी ही माझी पहिलीच महासभा असली तरी यापुर्वी रजेवर नसतांना मी .प्रत्येक महासभेत उपस्थित राहिलो आहे, परंतु मी स्वत: आयुक्त म्हणुन नगररचना विभागाच्या अधिका—याला फोन करतो परंतु ते माझा फोन घेत नाहीत. ही अत्यंत खेदजनक व मला लाज वाटण्यासारखी गोष्ट आहे. परंतु त्यांच्यावर अत्यंत गंभीरपणे कारवाई केली जाईल. मा. सर्व सदस्यांना मी विनंती करतो त्याचबरोबर सर्व अधिका—यांनाही मी विनंती करतो की, जेव्हा नगरसेवक महासभेच्या माध्यमातुन जनतेचे प्रश्न मांडतात त्यावेळेस त्या संबंधीत विभागाचे अधिकारी जर महासभेत नसतील तर ते बरोबर नाही. एखादया अधिका—यास जर काही अत्यंत महत्वाच्या कामास्तव येता येत नसेल तर त्यांनी कमीत कमी आमची पुर्व परवानगी घेतली पाहिजे. आणि महासभेपुढे त्यांच्या विभागाशी संबंधीत जो काही विषय असेल त्याच्याशी संबंधीत माहिती त्यांच्या कनिष्ठ अधिका—यांकडे सोपविली पाहिजे आणि अत्यंत अपवादात्मक परिस्थितीतच महासभेस अनुपस्थित राहिले पाहिजे. त्या संदर्भात उप—आयुक्त, मुख्यालय यांना याठिकाणी मी आदेशित करतो की, यापुढे जो अधिकारी येथे उपस्थित राहणार नाही त्यावर शिस्त भंगाची कारवाई करण्याचा प्रस्ताव किंबहुना अधिकारी जर जास्त मुजोर असेल तर त्यास सेवेतुन कार्यमुक्त करण्याची आम्ही कारवाई करु.

त्यासाठी आम्ही मागे पुढे पाहणार नाही यास्तव माझी पुन्हा सभागृहाला विनंती आहे की, ही माझी पहिलीच सभा आहे, याठिकाणी खरोखरच काही अधिकारी उपस्थित नाहीत त्याबद्दल मी दिलगीरी व्यक्त करतो. आणि पुढची महासभा निश्चितपणे सर्व अधिका–यांच्या उपस्थित होईल अशी ग्वाही देतो. दोन दिवसापुर्वीच मी उल्हासनगर महापालिकेच्या आयुक्त पदाचा कार्यभार स्विकारला आहे. उल्हासनगरच्या प्रत्येक नागरीकाला आणि प्रत्येक सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याचा आणि त्यास मुलभुत सुविधा देण्याचा प्रयत्न मी करणार त्यामध्ये कोणी आड आले तर त्यांची काहीही गय केली जाणार नाही आणि सर्व सामान्य माणुस केंद्र स्थानी ठेवुनच माझ्या कामाची रुपरेषा असेल. आणि या सर्व कामामध्ये मा. महापौर, उप–महापौर, मा. सभागृह नेता, विविध पक्षाचे गटनेता, विरोधी पक्षनेता, आणि सर्व नगरसेवक माझ्याबरोबर असतील अशी माझी आशा आहे धन्यवाद।

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>प्रश्न क्र. २३१ चे उत्तर पुढील महासभेत मिळेल?

<u>महापालिका सचिव :–</u>होय.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>व प्रश्न क्र. २२४ चे पण मला उत्तर पाहिजे होते. नोव्हेंबर महिन्यापासुन हा प्रश्न प्रलंबित पडला आहे.

<u>आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):–</u>या प्रश्नाचे जर नगररचनाकार उत्तर देत नसतील तर सविस्तर अभ्यास करुन उप–आयुक्त, मुख्यालय हे उत्तर देतील. व महासभेत नगररचनाकारांनी उत्तर न दिल्या बददल आम्ही त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करु.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्यांना विनंती करतो की, उल्हासनगर महानगरपालिकेला एक कणखर, समस्या तडीस लावणारा आयुक्त लाभलेला आहे. या आयुक्ताचे सर्व सन्माननिय सदस्यांनी हार्दिक स्वागत करावे अशी मी सर्व सन्माननिय सदस्यांना विनंती करतो. कारण असे अधिकारी, असे आयुक्त जर आले तर उल्हासनगर शहरा संदर्भात येथे आपण जी काही ग–हाणी मांडतो ती त्वरीत होतील. म्हणुन अशा आयुक्त साहेबांचे सर्व सन्माननिय सदस्यांच्यावतीने हार्दिक स्वागत करतो.

<u>महापालिका सचिव :–</u>प्रश्न क्र. २३२ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे.

**?** **<u>प्रश्न क्र. २३२ :–</u>** उल्हासनगर महानगरपालिका के शिक्षण मंडल मे गत ५ वर्षे मे विविध रिक्त पदोपर कर्मचारीयो भरती की गयी है. उनके अनुसार निचे दिये हुये प्रश्नोपर महासभा मे चर्चा होकर सुचक, समाधानकारक जानकारी मिले.

प्र.क्र. १ अ) सन २००० से सन २००९ तक उल्हासनगर महानगरपालिका के शिक्षण मंडळ मे कोणकोणसे पद रिक्त थे? कोणसे संवर्ग के थे? उन सभी की संख्या मिले? रिक्त पद भरणेके लिए सेवायोजन कार्यालय, समाज कल्याण विभाग, वर्तमानपत्रो मे इस्तिहार देकर रिक्त पदो कर्मचारीयो की नियुक्ती/भरती की गयी है? रिक्त पदोपर नियुक्ती पाने के लिये कितने उमेदवारीने आवेदन पत्र दाखलि किये है? उन सभी आवेदकोके नाम और आवेदनोकी, आर्जीकी और अर्जीके साथ जोडे गये जरुरी कागजात, दाखलो, प्रमाणपत्र, अनुभव, शैक्षणीक अर्हता की सत्यप्रत मिले?

ब) प्राप्त अर्जदारामे से कितने आवेदकोको उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडल के नोकरीपर रखा गया है? कोनकोनसे पदोपर नियुक्ती दी गयी है? नियुक्ती दिये गये उमेदवार पदके लिये आवश्यक शैक्षणीक अर्हता और पात्रता, अनुभव पुरी कर रहे है क्या? नही है तो नियुक्ती देते समय उनहे छूट दी गयी है क्या? उन सभी आवेदकोके नाम, पत्ता और अर्जीकी, और नियुक्ती आदेशकी सत्यप्रत मिले? शासन निर्णय के अनुसार पिछडे वर्गके अनुशेष की भर्ती की गयी है क्या? नही भरा है तो क्यु नही भरा गया है? उसकी वजह क्या है?

<u>उत्तर :–</u> प्रश्न क्र.१अ) सन २००० ते २००९ पर्यंत उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळात ३ लिपिकांची पदे रिक्त होती. सदर पदे अनु.जाती, अनु.जमाती व भटक्या विमुक्त जाती जमाती च्या संवर्गातील होती. एकूण रिक्त लिपिकांची पदे ३ होती. सदरच्या ३ रिक्त पदापैंकी १ अनु.जातीचे अमेदवाराची नियुक्ती म.न.पा.ने अनुकंपातत्वावर

करुन या कार्यालयाकडे वर्ग केलेले आहे. उर्वरित २ पदे भरताना या कार्यालयाने सेवायोजन कार्यालय ठाणे यांचेकडून अनु.जमाती व भटक्या जाती/जमातीची यादी मागविली होती. त्यानुसार १ लिपिकाचे पद भरलेले आहे. १ लिपिकाचे पद अनुकंपातत्वावर रु.५०००/— मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात भरणेत आलेले आहे. तसेच १ लिपिक पद अनु.जातीच्या उमेदवाराचे अर्ज केला त्यानुसार रु.५०००/— मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात भरणेत आलेले आहे.

प्रश्न क्र.१ब) सेवायोजन कार्यालयामार्फत उपलब्ध झालेल्या अनु.जमाती व भटक्या विमुक्त जाती/जमाती च्या उमेदवारांच्या यादीतून १ भटक्या विमुक्त जमातीच्या उमेदवाराची लिपिक या पदावर नियुक्ती करणेत आलेली आहे. अनुकंपावतत्वावर आलेल्या अर्जापैकी एका उमेदवाराची रु.५०००/— मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात लिपिक या पदावर नियुक्ती करणेत आलेली आहेत. तसेच अनु.जातीच्या १ उमेदवाराची पदावर नियुक्ती करणेत आलेली आहे. उपरोक्त नियुक्त केलेले उमेदवार हे आवश्यक शै. अर्हता प्राप्त करणारे आहेत. S.S.C परिक्षा उत्तीर्ण, राज्य शासनाचे मराठी व इंग्रजी टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण, MSCIT, मराठी लिहीता वाचता बोलता येणारे उमेदवार आहेत. भटक्या विमुक्त जाती जमातीचे उमेदवार हे अनुभवी तसेच उच्चशिक्षित (Diploma in Computer Tech/Engg) आहेत. मानधनाावर घेतलेले उमेदवार अनुभवी नाहीत. शासनाच्या प्रचलित निर्णयानुसार आ.जाती, भटक्या जाती जमातीचे सवंर्गातील उमेदवारांची नियुक्ती केलेली आहे.

प्रश्न क्र.१क) शासनाकडून उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळास ५० टक्के अनुदान प्राप्त होते. प्राप्त अनुदानाचा उपयोग शिक्षण मंडळ कर्मचाऱ्यांच्या वेतन व सेवानिवृत्ती वेतनासाठी खर्च करण्यात येतो.

सदस्य श्री. भारत राजवानी :— मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, माझ्या प्रश्नाचे उत्तर कोण देणार?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—मा. आयुक्त साहेब, एका सदस्याने आपला प्रश्न मांडलेला आहे आणि अधिकारी उत्तर देण्यास येत नाहीत? किती वेळ लागणार आहे?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—मा. महापौर महोदया, उप—महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, सन २००० ते २००९ पर्यंत उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळात लिपिकांची एकुण ३ पदे रिक्त होती. सदर पदे अनुसुचीत जाती जमाती आणि भटक्या जमाती या संवर्गातील होती. लिपिकांची एकुण रिक्त पदे ३ होती. सदरच्या तीन रिक्त पदापैकी एक अनुसूचीत जाती जमातीचे उमेदवाराची नियुक्ती महानगरपालिकेने अनुकंपा तत्वावर करुन त्या कार्यालयाकडे वर्ग केली आहे. उर्वरीत पदे भरतांना या कार्यालयाने सेवायोजन कार्यालय ठाणे यांच्याकडुन अनुसूचीत जमाती व भटक्या विमुक्त जाती जमातीच्या उमेदवाराची यादी मागविली होती त्यानुसार लिपिकाचे पद भरलेले आहे. आणि लिपिकाचे एक पद अनुकंपा तत्वावर ५००० रुपये मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात आलेले आहे. तसेच लिपिकाच्या एका पदासाठी अनुसूचीत जातीच्या उमेदवाराने अर्ज केला त्यानुसार पाच हजार रुपये मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यांत आली आहे.

सदस्य श्री. भारत राजवानी :—प्रश्न क्रमांक कुठला आहे?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—प्रश्न क्र. २३२.

महापालिका सचिव :—प्रश्न क्र. २३२ जो शाळेसंदर्भात आहे.

सदस्य श्री. भारत राजवानी :—शाळेसंबंधी आहे?

महापालिका सचिव :—होय.

सदस्य श्री. भारत राजवानी :— इयत्ता आठवी ते बारावी पर्यंतच्या वर्गासाठीचा?

महापालिका सचिव :—शिक्षकांची किती पदे भरली आहेत? त्या संदर्भातील आहे. ठिक आहे?
प्रश्न क्र. २३३ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे. ठिक आहे?

प्रश्न क्र. २३३ :— उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत कर्मचाऱ्यांना अनुभव, सेवाजेष्ठता, शैक्षणी अहर्तेनुसार सामान्य प्रशासन विभागामार्फत वेळोवेळी पदोन्नती देणेचे प्रस्ताव सादर करण्यात येवून पदोन्नती देण्यात येत असते. त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर येत्या महासभेत चर्चा होवून सुचक, समाधानकारक, सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्रश्न १ (अ) उल्हासनगर महापालिकेच्या आस्थापनेवर किती अभियंते कार्यरत आहेत? त्यांचे नाव व पदनाम, शैक्षणीक अहर्ता, पात्रता, नियुक्तीची तारीख मिळावी? कार्यरत अभियंते कोणत्या संवर्गात मोडत आहेत? महापालिकेच्या आस्थापनेवर अभियंत्याची रिक्त पदे किती व कोणती आहेत? रिक्त असणारी अभियंत्याची पदे कोणत्या संवर्गातील आहेत? पदोन्नतीने/सरळ भरतीने सवंर्ग निहाय भरावयाची पदे किती? पदोन्नतीसाठी शैक्षणीक अहर्ता, अनुभव, सेवाजेष्ठतेनुसार कोणकोणते अभियंते सर्वगानुसार पात्र आहेत? कामांची गरज, निकड लक्षात घेता संबधीत सेवाजेष्ठ/ पात्र अभियंत्यांना पदोन्नतीचे आदेश प्रशासनामार्फत अद्यापपर्यंत का काढण्यात आले नाहीत? याची कारणे काय आहेत? पदोन्नतीचे आदेश कधी पर्यंत देणेत येणार आहेत? कालावधी नमूद करणेस यावा?

उत्तर :—१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ३८ अभियंते कार्यरत आहेत.२) सोबतच्या विवरणपत्रात नमुद केले आहे. ३) वरीलप्रमाणे ४) महापालिकेच्या आस्थापनेवर अभियंत्याची रिक्त पदे किती व कोणती याचा तपशिल——

| अ.क्र. | संवर्ग | भरतीचा प्रकार | मंजुर | रिक्त | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | पदोन्नती | ०३ | ०२ | |
| २ | उप अभियंता | सरळसेवा | ०२ | ०२ | |
| | | पदोन्नती | १० | ०५ | |
| ३ | कनिष्ठ अभियंता | सरळसेवा | २४ | १८ | |
| | | पदोन्नती | ०९ | ०९ | |

५ व ६) वरीलप्रमाणे ७) महापालिका कर्मचा—यांची विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर पात्र उमेदवारांची शिफारस मा. महासभेपूढे करण्यात येत आहे. ८) मुद्दा क्र. ७ प्रमाणे ९) मुद्दा क्र. ७ प्रमाणे.

सदस्य श्रीमती जयश्री सुर्वे:— ठिक आहे.

महापालिका सचिव :—प्रश्न क्र. २३४ हा श्री. प्रकाश सावंत यांचा आहे.

?

प्रश्न क्र. २३४ :— आरक्षण क्रमांक ११८ शिट नं. ३४ येथे बाधंकाम परवानगी आदेश क्रमांक उमपा/नरवि/बाप/ २२/०६/१९५ बाधंकाम सुरु असुन त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सुचक, समाधानकारक, सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्रश्न क्रमांक १ (अ) आरक्षण क्रमांक ११८ शिट नं. ३४ या आरक्षित जागेवर कसले आरक्षण आहे? आरक्षित जागेवर बांधकाम परवानगी देता येते का? सदरच्या भुखडांवर सद्यस्थितीत कसले बांधकाम सुरु आहे? शाळेचे बांधकाम सुरु आहे का? शाळेचे बांधकाम सुरु असल्यास शाळेस मान्यता मिळाली आहे का? सदरची शाळी सुरु आहे का बंद आहे? सुरु असलेल्या बांधकामांची सद्यस्थिती काय आहे? आरक्षणात बदल करण्यात आला आहे का? बदल करण्यात आला असल्यास कोणी व कसा व का बदल केला आहे? गैरप्रकारे बांधकाम परवानगी देणेत आली आहे का? गैरप्रकारे बाधंकाम परवानगी दिली असल्यास संबधीत अधिकारी व कर्मचारी कोण आहेत? त्याचेंवर प्रशासन कोणती कारवाई वा गुन्हयाची नोंद करणार आहे का? कधी?

उत्तर :— आरक्षण क्र. ११८, शिट नं. ३४ या आरक्षित जागेवर माध्यमिक शाळा व प्रारुप विकास योजनेनुसार अस्तित्वातील शाळा यामध्ये समाविष्ट आहे.

सदरचा भुखंड शाळेसाठी असल्याने सादर जागेवर शाळेचे बांधकाम प्रस्तावित केलेले आहे व त्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

शाळेचे बांधकाम चालू आहे.

होय.

सदरचा तपशिल या कार्यालयाशी संबधित नाही.

सदरचा तपशिल या कार्यालयाशी संबधित नाही.

सध्या तळमजल्याचे आर.सी.सी. काम चालू आहे.

नाही.

नाही. बदल केलला नाही

नाही.

संबंधित नाही

संबधित नाही.

सदस्य श्री. प्रकाश सावंत :— मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, या प्रश्नाबाबत मी माहितीच्या अधिकारात माहिती मागितली आहे. तरी सदर प्रश्न पुढील सभेमध्ये घेण्यात यावा अशी मी आपणांस विनंती करतो.

महापालिका सचिव :—असे कसे?

सदस्य श्री. प्रकाश सावंत :— माझा प्रश्न पुढील सभेत घेता येणे शक्य नाही का ? काय काही अडचण आहे?

महापालिका सचिव :—आपणांस उत्तर मिळाले आहे ना?

सदस्य श्री. प्रकाश सावंत:—उत्तर मिळाले आहे, परंतु ते बरोबर नाही

महापालिका सचिव :—उत्तर जर बरोबर नसेल तर आपण अधिका—यास उपप्रश्न विचारु शकता. आणि उत्तर देण्यासाठी जर अधिकारी उपस्थित नसेल तर मात्र सदरचा प्रश्न उत्तरासाठी प्रलंबित ठेवण्याबाबत विनंती करण्याचा आपणांस अधिकार आहे.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>नाही, नाही, अधिका–यास प्रश्न काय विचारणार? त्यांनी काही उत्तरच दिले नाही, माहित नाही. आठवत नाही. असे उत्तर देतात.

<u>महापालिका सचिव :–</u>त्यासाठी संबंधीत अधिका–यास प्रश्न विचारा ना?

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>उत्तरामध्ये त्यांनी काहीही लिहिलेले नाही. यासाठी मी माहितीच्या अधिकारान्वये माहिती मागितली आहे ती येत्या आठ दिवसामध्ये मला माहिती मिळेल. त्यानुसार त्यांनी दिलेल्या उत्तराचे त्यांनाच मी उत्तर देतो ना? त्यांनी असे उत्तर दिले आहे की सदरच्या बाबतीत आमच्या कार्यालयात माहिती उपलब्ध नाही. सदर प्रश्न आमच्या अधिकारात नाही.

<u>महापालिका सचिव :–</u>प्रश्न क्र. २३४ कुणाशी संबंधीत आहे? नगररचनाकारांशी संबंधित आहे ना?

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>नेहमीच्या प्रथेप्रमाणे आजही नगररचनाकार उपस्थित नसणार आहेत. आणि आता त्यांचे लाड पुरे झाले त्यांना येथुन काढा, बाजुला करा.

<u>महापालिका सचिव :–</u>हा प्रश्न पुढील सभेत घ्यावा लागेल कारण की या सभेत नगररचनाकार उपस्थित नाहीत.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>आठ नऊ महिन्यापासुन ते महासभेत येत नाहीत. पुढच्या महासभेत हा प्रश्न आपण घेणार आहात का? घेणार नसाल तर तसे सांगा.

<u>महापालिका सचिव :–</u> नाही, नाही,

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>माझा प्रश्न पुढील सभेत घेणार का सचिव साहेब?

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. २३५ हा श्री. रविंद्र बागुल यांचा आहे.

**?** <u>प्रश्न क्र. २३५:–</u> उल्हासनगर महानगरपालिकेचे मालकीचे उल्हासनगर शहरात विविधी ठिकाणी छोटी मोठी उदयाने असून सदरची उदयाने विकास करणे, सौदर्यकरण करणे, निगा दुरुस्ती व देखभाल करणे तत्वावर १० वर्षाचे करारावर देण्यात आली आहेत. त्या अनुषंगाने खालील विषयावर चर्चा होवून माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र. १) उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीची उल्हासनगर महापालिका हद्दतील किती व कोणती, कुठे उदयाने आहेत? गोल मैदान, बासूरी हॉटेल समोरील उदयान विकास करणे, सौंदर्यकरण करणे, निगा दुरुस्ती व देखभाल करणे तत्वावर रोटरी क्लबला १० वर्षाचे करारावर देण्यात आली आहेत का? सदर कराराची मुदत किती वर्षाची होती? सदर मुदत संपृष्टात आली आहे का? सदर उदयानापासून महापालिकेस महिना/वार्षिक किती उत्पन्न मिळत आहे? सदरची उदयाने कोणत्या अटी व शर्तीवर, करारावर देण्यात आली आहेत? संबंधीत संस्था त्यांचे पालन करीत आहेत का? करीत नसल्यास प्रशासनाने संबंधीतावर आजतागायत कोणती कारवाई केली? सदर संस्था उदयानात खेळणी व अन्य कार्यक्रम ठेवून पैसे वसूल करीत आहेत का? महापालिका उदयाने विकास करणे, सौंदर्यीकरण करणे, निगा दुरुस्ती व देखभाल करणे तत्वावर मिळणेसाठी महिला मंडळांनी अर्ज केले आहेत का? सदर अर्जावर प्रशासनाने कोणती कारवाई केली का? एखादे महिला मंडळ रोटरी क्लब पेक्षा जास्त उत्पन्न महापालिकेस देण्यास तयार असल्यास सदरचे उदयान करार तत्वावर भविष्यात देणार आहे का?

<u>उत्तर :–</u> १) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत एकुण ६७ मैदाने व उद्याने आहेत. त्याची यादी सोबत जोडलेली आहे.

२) होय.

३) सदरचा कराराची मुदत १० वर्षाची आहे.

४) सदरचा करार अद्यापपर्यंत संपुष्टात आलेला नाही.

५) दरमहा रु.१००/– भाडे असुन करारातील अटी व शर्तीची प्रत सोबत जोडलेली आहे.

६) सोबत प्रत सादर केली आहे.

७) अटी शर्तीच्या भंगाबाबत अद्यपपर्यंत तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

८) करारातील अट क्र.२४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उद्यानात खेळणी लावल्यास त्यावर नाममात्र शुल्क आकारुन त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन संस्थेने उद्यानाची देखभाल, दुरुस्ती करणे आवश्यक राहील असे नमुद केलेली आहे.

९) उपलब्ध अभिलेखात असा अर्ज दिसुन येत नाही.

१०) प्रश्नच उद्‌भवत नाही.

११) धोरणात्मक निर्णयार्थ प्रस्ताव महासभेसमोर ठेवण्यात येईल.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुलः–</u> सन्माननिय महापौर महोदया, उप–महापौर साहेब, व आयुक्त साहेब, एखादा प्रश्न महासभेत किती वेळा आला पाहिजे?, आम्ही मागील वर्षी दिनांक १९/६/२००९ रोजी हा प्रश्न मांडला होता. गोलमैदान रोटरी क्लब बाबत, आपण आम्हांला ही जी उत्तरे दिली आहेत ती व्यवस्थीत आहेत का? कोण अधिकारी आहे? त्यांनी जरा पुढे यावे. गोल मैदान जे रोटरी क्लबला खेळणी लावायला भाडयाने दिले आहे त्याचे आपण भाडे काय ठरविले आहे? आणि आपण त्याच्याबरोबर आपण जो करार केला आहे त्याप्रमाणे तो काम करत आहे काय? करारामध्ये ६ व्या क्रमांकाचा मुद्दा आहे की उदयानात विनामुल्य मुक्त प्रवेश आहे. यामध्ये गरीब माणसाच्या मुलाला खेळण्यामध्ये बसायचे म्हटले तर तीस रुपये मोजावे लागतात. गोल मैदान मध्ये रोटरी क्लबवाल्यानी ॲम्युजमेंन्ट पार्क लावलेले आहे. तर या पार्कमध्ये २० रुपये तिकीट आहे, आज एखादया गरीब घराचा मुलगा असेल तर तो त्या पार्कमध्ये जावु शकतो काय? पाच वस्तु लावल्या आहेत त्यामध्ये वीसापंचे शंभर रुपये जातात. हे शंभर रुपये कोण भरणार? त्या गरीब मुलाला काय सुविधा दिली आहे? आपण जो करार केला आहे त्या कराराप्रमाणे तो वागतो काय? त्यांनी आतापर्यंत तशी पुर्तता केली आहे काय? कुणीही असू दया एखादा कार्यक्रम करायचा असेल तर पाच हजार रुपये लागतात. मागील वर्षी, १९/६/२००९ रोजी आम्ही हा प्रश्न मांडला होता. परत तोच प्रश्न घेवुन मी आज येथे येत आहे. परत या प्रश्नाचे उत्तर मला दुसरेच मिळाले आहे. १० वर्षाच्या मुदतीसाठी त्यास ते मैदान भाडयाने देण्यात आलेले आहे. १० वर्षाची मुदत पुर्ण झाली आहे की नाही? १० वर्ष झाली असतील तर त्यांनी आजपर्यंत काही चुका केल्या आहेत की नाहीत? काहीच चुका केल्या नाहीत काय? त्याचा कारभार एकदम चांगला आहे काय? हे मैदान भाडयाने मिळावे याबाबत काही महिला मंडळांनी व बचत गटांनी पत्र दिली आहेत. परंतु या प्रस्तावात असे लिहिले आहे की, कुठल्याही बचत गटाने पत्र दिलेले नाही. त्या पत्राची माझ्याकडे स्थळप्रत आहे. अशी उदयाने/मैदाने आम्हांला भाडयाने दया अशा प्रकारचे कित्येक महिला मंडळांनी आम्हांला पत्र दिलेली आहेत. येथे अनुक्र. ९ वर लिहिले आहे की उपलब्ध अभिलेख्यात अर्ज दिसुन येत नाही म्हणजे काय? महिला मंडळांनी /बचत गटांनी अर्ज दिलेले आहेत की, तुमचे काही शुल्क असेल तर ते भरण्यास आम्ही तयार आहोत तरी देखील तुम्ही त्यांना परवानगी देत नाहीत. फक्त रोटरी क्लबबाबत एवढे काय प्रेम आहे? काहीतरी असेल, काहीतरी मोठे वजन असेल हो साहेब. करारातील अट क्र.२४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उद्यानात खेळणी लावल्यास त्यावर नाममात्र शुल्क आकारुन त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन संस्थेने उद्यानाची देखभाल, दुरुस्ती करणे आवश्यक राहील असे नमुद केलेले आहे. तो काय देखभाल दुरुस्ती करतो. या करारनाम्यात लिहिले आहे की त्यांनी २५ लाख रुपये दिलेले आहेत. त्या गोल मैदानामध्ये २५ लाखाचे काम त्यांनी कोठे केले आहे? हे बघा, या अगोदर सुध्दा मी हा प्रश्न विचारला आहे, त्या कराराची प्रत आहे, ४ थ्या क्रमांकाचा. प्रश्न आहे, साधु वासवानी उदयानाच्या विकासासाठी संस्थेने तयार केलेले प्रस्ताव मा. आयुक्त साहेबांना सादर करावेत. आयुक्तांनी सूचना दिल्या आहेत की उदयानाच्या विकासावर खर्च करणे संस्थेवर बंधनकारक राहिल, उदयानाचे सुशोभिकरण करण्या करता २५ लाख रुपये चे काम करण्यास विकासकावर बंधनकारक राहिल. मी तर असे बघत आहे की, आज या आमदारांनी २५ लाख रुपये दिले आहेत, कालच्या आमदारांनी २५ लाख रुपये दिले आहेत. सर्व आमदारच जर अनुदान देत असतील तर यांनी काय केले? तर यांना फुकट १०० रुपयात जागा देता? मला तुम्ही सांगा १०० रुपयात कुठली जागा मिळते? वडापावची जो कोणी गाडी लावतो तो सुध्दा दोन तीनशे रुपये कमवतो. तुम्ही १०० रुपयावर एवढी मोठी जागा देवुन ठेवली आहे. ते लोक कमवत नाहीत काय? त्या संस्थेकडुन तुम्हांला/महानगरपालिकेला काय फायदा आहे?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, सन्माननिय सदस्य यांनी विचारलेल्या प्रश्न क्र. २३४ चे उत्तर त्यांना दिलेले आहे. त्यामध्ये गोल मैदान बासरी हॉटेल समोरील उदयान विकसित करणे, सौंदर्यीकरण करणे, देखभाल दुरुस्ती, निगा राखण्यासाठी रोटरी क्लबला १० वर्षाच्या करार तत्वावर जागा देण्यात आली आहे का? याचे उत्तर होय असे आहे, १० वर्षाच्या करारावर देण्यात आली आहे. दुसरा प्रश्न कराराची मुदत संपृष्टात आली आहे का? त्याचे उत्तर असे आहे की, कराराची मुदत अदयाप संपृष्टात आलेली नाही.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–उल्हासनगरमध्ये अशी किती उदयाने आहेत ती भाडयाने दिलेली आहेत?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत एकुण ६७ मैदाने व उदयाने आहेत. त्याची यादी आपणांस दिलेली आहे.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–आपण आपल्या महानगरपालिकेची जागा सांभाळुन ठेवली आहे मला मान्य आहे. त्यातील किती उदयाने १० वर्षासाठी दिलेली आहेत. १०० रुपये भाडयाने १० वर्षासाठी अशी किती मैदाने दिलेली आहेत.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–वेगवेगळया मुदतीसाठी दिली असल्यामुळे १० वर्षासाठी किती मैदाने/ उदयाने दिली आहेत याची यादी आता याठिकाणी उपलब्ध नाही. ही माहिती आपणांस पुढच्या महासभेच्यावेळी देण्यात येईल.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :– दरमहा रु.१००/– भाडे असुन करारातील अटी व शर्तीची प्रत सोबत जोडलेली आहे. १०० रुपयांवर हे उदयान भाडयाने दिल्याचे चालेल का आयुक्त साहेब?

उप–महापौर :–श्री. बागुल साहेब आपण जरा शांत व्हा. १० वर्ष भाडे करारावर दयायचा हा प्रस्ताव महासभेत पास झालेला आहे, जर रोटरी क्लबवाल्यांशी केलेल्या करारा नुसार त्यानी जर काही चुक केली असेल तर त्यावर आपण कारवाई करु. त्याच्याकडुन ते उदयान आपण परत घेवु.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–ज्या अटी शर्ती आहेत त्या माझ्याकडे आहेत, त्याने काय केले त्याबाबत? मला दाखवा ना? परत प्रश्न मांडायचा काय? माझ्याकडे अटी शर्तीची प्रत आहे, त्यामध्ये लिहिलेले आहे की विनामुल्य व मुक्त आहे. परंतु तसे आहे का? तेथे पैसे घेंतले जात आहेत. त्या अटी शर्तीची प्रत माझ्याकडे आहे.

उप–महापौर :–एक मिनिट, शांत व्हा. जर त्यांनी अटी, शर्तीचा भंग केला असेल तर त्याच्यावर नक्कीच कारवाई होईल.

यावेळी सदस्य श्री. रमेश चव्हाण, श्री. प्रधान पाटील, श्री. राजेश वानखेडे, श्री. सुरेश जाधव, श्री. प्रशांत धांडे, श्री. शेखर यादव, श्री. किशोर जग्यासी व सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–काही कारवाई होणार नाही.

उप–महापौर :–जरा ऐकुन घ्या. हा विषय आपल्या महासभेत प्रलंबित आहे, पुढील महासभेत हा विषय आणु आणि त्यावर कारवाई करु.

यावेळी सदस्य श्री. महेश सुखरामानी, श्रीमती ज्योती चैनानी, डॉ. निना नाथानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>**साहेब, हे चुकीचे आहे. माझा आक्षेप आहे. कुठल्याही प्रश्नाचे व्यवस्थीत उत्तर मिळत नाही.

**<u>महापालिका सचिव :—</u>**प्रश्नोत्तराचा कालावधी संपला. एक स्थगन प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्याचा विषय पुढील प्रमाणे आहे. **<u>विषय :— साखर, गुळ, केरोसिन, व घरगुती गॅस या वस्तुंवरील जकात दर कमी करण्याबाबत.</u>** या स्थगन प्रस्तावास मा. महापौरांनी मंजुरी दिलेली नाही. या स्थगन प्रस्तावाची प्रत आपणा सर्वांना देण्यात आली आहे. व असे मानण्यात येईल की आपण तो वाचला असेल. हा स्थगन प्रस्ताव वाचल्यानंतर सभागृहाचे त्याबाबत काय मत आहे ? ते जाणून घेतल्यानंतर त्यावर निर्णय होईल. हा निर्णय दोन तृतियांश पेक्षा जास्त सदस्यांनी घेतला पाहिजे. दोन तृतियांश पेक्षा जास्त सदस्यांचे मत असेल तर या विषयावर निर्णय घेतला जाईल. या प्रस्तावाच्या बाजुने कोणी आहे काय? सर्वसंमतीने प्रस्ताव नाकारायचा आहे की पास करायचा आहे? मतदान घेतले जावे काय? जे सन्माननिय सदस्य हा प्रस्ताव सभेच्या कामकाजात सामावून घेण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपला हात वर करावा, फक्त २ सदस्य? आपणच दोघे आहात काय?

<u>या प्रस्तावाच्या बाजुने ८ मते</u>

१. श्री. प्रभुनाथ गुप्ता

२. श्री. भारत राजवानी

३. श्री. अनिल (विद्यार्थी) ऐलानी

४. श्रीमती मंजु पोपटानी

५. श्रीमती संगिता कंडारे

६. श्री. रविंद्र बागुल

७. श्री. सतिश चहाळ

८. श्रीमती निलु चांदवानी

जे या स्थगन प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपला हात वर करावा.

<u>प्रस्तावाच्या विरोधात ४२ मते</u>

१. श्रीमती राजश्री चौधरी

२. श्री. विनोद ठाकुर

३. श्री. जीवन इदनानी

४. श्री. गोविंदराम लुंड

५. श्रीमती कविता सिरवानी

६. श्रीमती लिलाबाई आशान

७. कु. शकुंतला जग्यासी

८. श्रीमती चंद्रा टेकचंदानी

९. श्री. भजनलाल रामचंदानी

१०. श्री. बच्चाराम रुपचंदानी

११. श्री. रामचंद्र पारवानी

१२. श्री. जमनादास पुरस्वानी

१३. श्री. लाल पंजाबी

१४. श्रीमती जया माखिजा

१५. श्री. किशोर जग्यासी

१६. श्री. हरेश जग्यासी

१७. श्री. राजेश वानखेडे

१८. श्री. लालबिहारी यादव

१९. श्री. दत्तात्रय पवार

२०. श्री. धनंजय बोडारे

२१. श्री. दिलीप गायकवाड

२२. श्रीमती विद्याताई निर्मले

२३. श्री. रमेश चव्हाण

२४. श्री. विजय सुपाळे

२५. श्री. रामसागर यादव

२६. श्रीमती जयश्री सुर्वे

२७. श्रीमती वसुधा बोडारे

२८. श्रीमती ज्योती माने

२९. श्रीमती नेहा भोईर

३०. श्री. चंद्रशेखर यादव

३१. श्रीमती मिनाताई सोनेजी

३२. श्री. मुकेश तेजी

३३. श्री. प्रधान पाटील

३४. श्री. मोहन साधवानी

३५. श्री. सुंदर मंगतानी

३६. श्री. सुरेश जाधव

३७. श्री. प्रशांत धांडे

३८. श्री. बी.बी. मोरे

३९. श्री. जे.के. ढोके


४०. श्रीमती पंचशिला पवार

४१. श्रीमती सुमन शेळके

४२. श्रीमती शकुंतला पाटील

जे सदस्य तटस्थ राहु इच्छितात त्यांनी आपला हात वर करावा,

मनसेचे दोन सदस्य तटस्थ आहेत व कॉंग्रेसमधील आपण दोन सदस्य? आपण तटस्थ आहात? श्री. तुलसीदास वसिटा हे तटस्थ आहेत.



९ तटस्थ

१. श्री. तुलसीदास वसिटा

२. श्रीमती इंदिरा उदासी

३. श्रीमती रजनी महाडिक

४. श्रीमती जयश्री पाटील

५. श्री. नरेंद्र दवणे

६. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

७. श्री. संजय बठिजा

८. श्रीमती सुरेखा वेलकर

९. श्रीमती सुजाता रिजवानी

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. सचिव साहेब, या प्रस्तावाबाबतीत आम्ही जो विरोध केला आहे त्यामागे काय कारण आहे त्याची आपण नोंद घ्या.

महापालिका सचिव :—मा. महापौरांनी सांगितलेले कारण असे आहे की, हा जो विषय आहे तो .......

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मी, आमच्यावतीने जे कारण सांगत आहे त्याची इतिवृतांतात नोंद करण्यात यावी. आम्ही उल्हासनगर महानगरपालिकेचा जकात वसुलीचा ठेका खाजगी अभिकर्त्यास दिला आहे. जेव्हा एकदा निविदा निघते त्यानंतर दर आणि कर निश्चित करण्यासाठी त्यामध्ये पुन्हा फेरफार करावा लागतो त्यानंतर हा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा लागतो. यासाठी जकात कराच्या दरामध्ये जी काही वाढ किंवा घट करायची आहे ती ३१ मार्चपुर्वी आपला जो अर्थसंकल्प तयार केला जातो त्यामध्ये याकामी आपण दुरूस्ती करू यासाठीच आम्ही या प्रस्तावास विरोध केला आहे.
सदस्य श्री. भारत राजवानी :—अर्थसंकल्पात तर दुरुस्ती झाली होती ना? फक्त अंमलबजावणी झालेली नाही.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—ज्यावेळेस आम्ही जकातीचे दर कमी केले होते, त्यावेळेस सुध्दा जकात वसुलीची आपली निविदा चालु होती. व निविदा चालु असतांना जर कोणतेही दर कमी किंवा जास्त करावे लागत असतील तर महाराष्ट्र शासनाकडे त्याबाबतचा ठराव पाठवावा लागतो. आपण पाठविलेला तो ठराव अदयापपर्यंत तेथे अनिर्णयीत आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाकडे ठराव पाठवुन तो तेथे प्रलंबित राहु नये म्हणुन, ........कारण की शासन कोणतेही काम करत नाही. महाराष्ट्र शासनाकडे आमचा जेव्हा कधी ठराव जातो तेव्हा तो कच—याच्या डब्यात टाकतात. असे होवु नये म्हणुन आपणांस काय करायचे आहे, जेव्हा कधी आपली निविदा निघेल, ३१ मार्चच्या अगोदर व जेव्हा नविन अर्थसंकल्प तयार होईल त्यावेळेस दर आणि कर आपण निश्चित करु. जेणेकरुन आपणांस शासनाकडे ठराव पाठवावा लागणार नाही.

सदस्य श्री. भारत राजवानी :—या अगोदर एका सभेत दर वाढविण्यात आले होते ते चार दिवसात शासनाकडुन मंजुर होवुन आले होते. यास सव्वा वर्ष होवुन गेले अदयाप मंजुर होवुन आले नाहीत. ?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—या वस्तुंचे दर कमी करुन तो ठराव महाराष्ट्र शासनाकडे पाठविला आहे. परंतु तेथे सत्ता कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसची आहे. त्यासाठी आपण तेथुन तो ठराव मंजुर करुन आणा. मा. श्री. भारत राजवानीजी आपल्या माहितीसाठी मी आपणांस सांगतो की, याप्रकारे दर कमी करुन आम्ही कितीतरी दिवस अगोदर शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. परंतु तेथे बसलेले आपले सरकार

उल्हासनगरसाठी काहीही करत नाही यासाठी मेहरबानी करुन आपण तेथुन तो प्रस्ताव पारीत करुन आणा. म्हणजे आम्ही आपले अभिनंदन करु.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>यामध्ये शासनाची काही भुमिका नाही, सभागृहाची फार महत्वाची भुमिका आहे. सभागृहाने अर्थसंकल्प मंजुर केलेला आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. सचिव साहेब, आपण यांना माहिती दया.

यावेळी सदस्या डॉ. निना नाथानी व सदस्य श्री.महेश सुखरामानी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

<u>उप—महापौर :—</u>सन्माननिय सदस्य श्री. भारज राजवानीजी, या प्रस्तावावर मतदान घेतले जात आहे आता काही चर्चा होणार नाही.

<u>महापालिका सचिव :—</u>मा. महापौरांच्या आदेशानुसार बहुमताने हा प्रस्ताव रद्द केला जात आहे.

---

## विषय :— २—ट अन्वये जकात विषयक स्थगन प्रस्ताव

<u>स्थगन प्रस्ताव</u>

उल्हासनगर शहरात आयात होणा—या साखर, गुळ, केरोसिन, व घरगुती गॅस या वस्तुवरील जकात दर कमी करण्याबाबत पूर्वीचा स्थायी समिती ठराव क्र. ११७ दिनांक १२/२/२००९ लागू करण्याप्रयोजनार्थ श्री. भारत राजवानी पालिका सदस्य यांनी उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाज विषयीचे नियम २ ट अन्वये निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या गोष्टींवर चर्चा घडून आणण्याच्या प्रयोजनार्थ मा. पीठासीन अधिका—यांच्या संमतीसाठी दिनांक २०/८/२०१० च्या महासभेचे कामकाज स्थगित करण्यासाठी प्रस्ताव मांडला आहे. परंतु ही नोटिस वाचुन दाखविल्यानंतर सदरहु प्रस्तावास मा. पीठासीन अधिकारी तर्फे परवानगी नाकारण्यांत आली आहे कारण जकात अभित्र्याच्या जकात वसुलीचा ठेका चालु असतांना काही वस्तुंवरील जकात दर कमी करणे किंवा कसे याबाबत शासनाच्या मंजुरीशिवाय निर्णय घेता येत नाही व सदरहु बाब शासनाच्या विचाराधीन आहे म्हणुन सदरहु प्रस्तावास महापालिकेची परवानगी आहे किंवा कसे या प्रयोजनार्थ महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. २९ अ</u> <u>दिनांक : २०/८/२०१०</u>

सूचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव : श्री. गोविंदराम लुंड

ही महासभा उल्हासनगर शहरात आयात होणा—या साखर, गुळ, केरोसिन, व घरगुती गॅस या वस्तुंवरील जकात दर कमी करण्या प्रयोजनार्थ पालिका सदस्य श्री. भारत राजवानी यांनी मांडलेल्या प्रस्तावास परवानगी देत नाही.

सूचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>बहुमताने</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> याचबरोबर ३ लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.

<u>लक्षवेधी सूचना क्र. १</u>

सुचकाचे नावः— श्री. जीवन इदनानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल गंगवानी

**विषय :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात मलेरिया, डेंग्यू, डायरिया, स्वाईन फ्लू इत्यादी रोग पसरल्याने सदर रोगांवर तातडीची उपाययोजना करणेबाबतची लक्षवेधी.

<u>लक्षवेधी सूचना क्र. २</u>

सुचकाचे नावः— सौ. जयश्री सुर्वे
अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

**विषय :—** उल्हासनगर शहरातील साफसफाई, साफसफाईचा ठेका, आरोग्य, जंतुनाशक फवारणी, साथीच्या रोगांची लागण इत्यादी समस्यांबाबतची लक्षवेधी.

<u>लक्षवेधी सूचना क्र. ३</u>

सुचकाचे नावः— श्री. गोविंदराम लुंड
अनुमोदकाचे नाव :— श्री. दत्तात्रय पवार

**विषय :—** उल्हासनगर शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करणे

यातील कोणत्याही दोन लक्षवेधी सूचनांना मा. महापौरांनी स्विकृती दयायची आहे.

<u>महापौर :—</u> अ.क्र.१ व २ या दोन लक्षवेधी सुचना स्विकृत करण्यात येत आहेत.

<u>महापालिका सचिवः— </u>लक्षवेधी सूचना क्र. १

सुचकाचे नावः— श्री. जीवन इदनानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल गंगवानी

**विषय :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात मलेरिया, डेंग्यू, डायरिया, स्वाईन फ्लू इत्यादी रोग पसरल्याने सदर रोगांवर तातडीची उपाययोजना करणेबाबतची लक्षवेधी.

लक्षवेधी सूचना क्र. २

सुचकाचे नावः— सौ. जयश्री सुर्वे
अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

**विषय :—** उल्हासनगर शहरातील साफसफाई, साफसफाईचा ठेका, आरोग्य, जंतुनाशक फवारणी, साथीच्या रोगांची लागण इत्यादी समस्यांबाबतची लक्षवेधी.

या दोन लक्षवेधी सूचनांना मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे. व तिसरी लक्षवेधी सूचना जी आहे तिला मा. महापौरांनी स्विकृती दिली नाही.

<u>सदस्य श्री. दत्तात्रय पवार :—</u>मा. महापौरजी, पहिल्या ज्या दोन्ही लक्षवेधी सूचना आहेत त्यांचा विषय एकच आहे. त्या दोन्ही लक्षवेधी सूचना आरोग्य विभागाशी संबंधीत आहेत. आता गणेशोत्सव जवळ आलेला आहे. उल्हासनगरमधील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. जर त्यांच्याविषयी तुम्ही गंभीर नसाल तर लक्षवेधी

सूचना स्विकृत केली नाही तरी माझी काही हरकत नाही. पण उल्हासनगरमधील रस्त्यांची स्थिती अतिशय दयनीय अशी आहे. आता वेगवेगळे उत्सव येत आहेत. दहीहंडी आहे, गणेशोत्सव आहे. आणि त्यादृष्टीने आम्ही ही जी लक्षवेधी सूचना मांडलेली आहे ती अतिशय योग्य आहे असे मला वाटते. ती आपण मान्य केली तर बरे होईल. अशी मी आपणांस विनंती करतो. आणि कृपया आपण याचा विचार करावा.

उप–महापौर :–सन्माननिय सदस्य श्री. दत्तात्रय पवारजी, शहरातील रस्त्यांची स्थिती अतिशय खराब आहे हे खरे आहे रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी आपण दोन कोटी रुपये मंजुर केले आहेत आणि कार्यादेशही दिलेले आहेत. गणपतीचा सण येण्याअगोदरच सर्व रस्त्यांवरील खड्डे भरले जातील त्यामध्ये काहीही शंका नाही. उल्हासनगर कॅम्प नं. १ ते ५ मधील जे जे रस्ते खराब झालेले आहेत त्या सर्व रस्त्यांवरील खड्डे भरले जातील.

सदस्य श्री. दत्तात्रय पवार :–मा. महापौरजी, ज्याप्रमाणे आपण सभागृहाला आश्वासन दिले आहे गणेश उत्सव सुरु होण्यास १० ते १५ दिवस आहेत. त्यापुर्वी जर रस्त्यांवरील खड्डे भरले जात असतील तर आम्ही आपले अभिनंदन करतो, स्वागत करतो. परंतु जर गणेशोत्सवापुर्वी रस्त्यांवरील खड्डे भरले जात नसतील तर आम्ही सभागृहातील सर्व सदस्य निषेध व्यक्त करु. कारण की सणापुर्वी रस्त्यांवरील खड्डे भरले पाहिजेत. रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी जरीही आपण मंजुरी दिली असेल कार्यादेश दिले असतील तरीदेखील अदयाप काम सुरु झालेले नाही. पावसाचा सतत जोर चालु आहे. सतत पाऊस पडतो आहे. आणि जर हे काम आपण विहित वेळेत पुर्ण केले तर आपले अभिनंदन, परंतु ते काम वेळेत पुर्ण व्हावे अशी मी आपणांस पुन्हा एकदा विनंती करतो, धन्यवाद।

आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):–मा. महापौर महोदया, रस्त्यांवरील खड्डयांबाबत याठिकाणी जी लक्षवेधी सूचना सादर करण्यात आली आहे त्याबाबत मा. उप–महापौर साहेबांनी आताच निवेदन केलेले आहे. याबाबत मला जी माहिती देण्यात आलेली आहे ती मी आताच पाहिली आहे. रस्त्यांवरील खड्डे भरण्याच्या कामाचे कार्यादेश आताच देण्यात आले आहेत. आणि आताच मी मा. उप–महापौर साहेबांबरोबर चर्चा देखील केली आहे. सोमवार पासुन त्या कामाची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी कशी होईल हे मी स्वत: पाहणार आहे. आणि हे काम गणपतीच्या पुर्वी पुर्ण करुन घेण्याचे पुर्ण प्रयत्न करीत आहोत.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–आयुक्त साहेब, रस्त्यांच्या डांबरीकरणाचे जे काम आहे ते आपण पावसाळयात करणार का? जर पावसाळयात डांबरीकरण केले तर ते निघुन जाईल?

आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):–खड्डे बुजविण्याबाबतचा प्रश्न होता त्याबाबत मी सांगत होतो.

सदस्य श्री. लाल पंजाबी:– आयुक्त साहेब, खडड्े पडलेल्या रस्त्यांवर आपण डाबंरीकरण करणार आहात परंतु सिमेंट क्रॉक्रीटचे जे रस्ते आहेत त्यावंर सुध्दा बऱ्यासशा ठिकाणी खडड्े पडले आहेत. आपण शिवाजी चौकातुन उल्हासनगर स्टेशनकडे गेलात तर त्या रस्त्यावर पाच सात ठिकाणी मोठमोठे खडड्े पडल्याचे आपणांस दिसुन येईल. यासाठी त्या ठिकाणी पेव्हरब्लॉक बसविले तर बरे होईल.

आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):– आपण जी सुचना केली आहे त्याबाबतीत आम्ही प्रत्यक्ष जागेवर जावुन पाहणी करु. व गणपती उत्सवाच्या अगोदर रस्त्यावरील खडड्े भरण्याचे काम आम्ही पुर्ण करु.

मा. महापौर :– श्री. जीवन इदनानी व श्रीमती जयश्री सुर्वे या दोघांची लक्षवेधी सूचना एकाच विषयावर असून दोन्ही लक्षवेधी एकत्रित करुन मान्यता देत आहे.

महापालिका सचिव:–लक्षवेधी सुचना क्र. १ व २ या दोन्ही लक्षवेधी एकत्रित केल्या जात आहेत पहिली लक्षवेधी सूचना जी आहे जिचे सुचक आहेत श्री. जीवन इदनानी व दुसरी लक्षवेधी सूचना जी आहे तीचे सुचक आहेत श्रीमती जयश्री सुर्वे , लक्षवेधी सुचना याप्रकारच्या आहेत....................

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

सुचकाचे नावः— श्री. जीवन इदनानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल गंगवानी

**विषय :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात मलेरिया, डेंग्यू, डायरिया, स्वाईन फ्लू इत्यादी रोग पसरल्याने सदर रोगांवर तातडीची उपाययोजना करणेबाबतची लक्षवेधी.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात मलेरिया, डेंग्यु, डायरिया, स्वाईन फ्लू इत्यादी रोगांची लागण अनेक नागरीकांना झाली असून, याबाबतचे वृत्त काही वर्तमानपत्रात देखील प्रसिध्द झाले आहे. वरील रोगाची लागण झाल्याने अनेक नागरीकांचे बळी गेले असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे. यामुळे सदर विषय गांभिर्याने हाताळणे ही काळाची गरज आहे.

परंतु उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनास अजून देखील या विषयाचे गांभिर्य लक्षात आलेले दिसत नाही. कारण शहरात एवढे घातक आजार/रोंग पसरलेले असून देखील धुरफवारणी यंत्र (फॉगिग मशिन) कोठेही उपयोगात आणलेले दिसत नाही. तसेच जंतुनाशक पावडर, जंतुनाशक औषध फवारणी देखील शहरात होत नाही. यामुळे वरील रोगांचा प्रसार अधिकच मोठया प्रमाणात होण्याची शक्यता असून, नागरीकांचे जीवन धोक्यात आले आहे.

जर वेळीच खबरदारी न घेता महापालिका प्रशासन असेच स्वस्थ बसून राहिले तर पुढे ही समस्या हाताबाहेर जाण्याची शक्यता आहे. मग अशावेळी महापालिका प्रशासन काय करेल?

वरील रोगाची लागण होवू नये अथवा सदर रोगाचा प्रसार वाढू नये म्हणुन शहरात सर्वत्र धूर फवारणी, जंतुनाशक पावडर, जंतुनाशक औषध फवारणी, दैनंदिन साफसफाई नियमित व त्वरीत करण्यात यावी. तसेच सदर साथ रोगांबाबत योग्य ती खबरदारी घेणेस्तव प्रसारमाध्यमांद्वारे जनजागृती करावी. अन्यथा सदर समस्या पुढे एक महाकाय संकट बनेल व यावर अंकुश ठेवणे कठिण होवून बसेल. असे झाल्यास यास महापालिका प्रशासनच जबाबदार धरण्यात येईल.

सदर बाब ही नागरीकांच्या जीवनाशी निगडीत असल्याने यणा—या महासभेत सदर विषयावर चर्चा होवून, त्वरीत निर्णय घेण्यात यावा.

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

सुचकाचे नावः— सौ. जयश्री सुर्वे
अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

**विषय :—** उल्हासनगर शहरातील साफसफाई, साफसफाईचा ठेका, आरोग्य, जंतुनाशक फवारणी, साथीच्या रोगांची लागण इत्यादी समस्यांबाबतची लक्षवेधी.

उपरोक्त लक्षवेधी सूचनेनुसार सभागृहाचे विनंती पुर्वक लक्ष वेधू इच्छिते की, उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत साफसफाई स्वच्छता ठेवणे हे महापालिका आरोग्य विभागाची जबाबदारी, आदय कर्तव्य आहे. शहर स्वच्छ व सुंदर रहावे यासाठी कचरा उचलणेचा ठेका दाम दुप्पट किंमतीला देवून अगडबंब खर्च करण्यात आला आहे. काय ठेकेदार निविदेतील अटी व शर्तीचे पालन करीत आहे का? किती कचरा कुंडया बंद केल्या व किती चालु स्थितीत आहेत? खत्त्यावरील कचरा उचलल्यानंतर जंतुनाशक फवारणी केली जाते का? ठेकेदाराने उल्हासनगर शहर झिरो गार्बेज केले आहे का? घरोघर जावून कचरा गोळा करणारे ठेकेदाराचे कर्मचारी नियमितपणे कामे करीत आहेत का? याची पाहणी कोण व कशी करतो? प्रशासनाने ठेकेदाराचे कामकाजावर संतृष्ट आहे का? एकीकडे सार्वजनिक ठिकाणी विद्रुपीकरण करणा—या नागरीकांकडुन दंडात्मक कारवाई म्हणुन दंडवसूली करणारे प्रशासन स्वतःच्या तुंबडया भरणा—या, उखळ पांढरे करुन घेणा—या ठेकेदारापुढे का नमत आहे? ठेकेदारावर कारवाई करणेस का मागेपुढे पाहत आहे? तेच हाल सफाई कामगारांचे बाबतीत आहेत अपुरे कामगार त्यात अनेक दिर्घ रजेवर व गैरहजर, कामावर येणारे कामगारही पुर्णक्षमतेने, पुर्णवेळ कामे करणेपेक्षा खाजगी कामे करण्यात धन्यता मानत आहेत. अधिकारी त्यांना पाठीशी घालून संरक्षण देत आहेत. पावर स्विपींग मशीनने रस्ते साफ करणेचा आगळा वेगळा प्रयोग करण्यात आला आहे. पावर स्विपींग मशीनने रस्ते स्वच्छ करणेचा प्रयोग यशस्वी झाला आहे असे प्रशासनास वाटत आहे का? जंतुनाशक फवारणीसाठीही

ठेका देणेत आला आहे. शहरातील सर्व भागात, गल्लीबोळात, झोपडपट्ट्यातून जिथे आवश्यकता आहे तिथे जंतुनाशक फवारणी खरोखर करण्यात येत आहे का? एकंदरीत सर्व ठेके देवून जनतेच्या तोंडाला पाने पुसली नाही का? महापालिका जंतुनाशक फवारणीसाठी स्वत:चे मालकीचे टॅक्टर का खरेदी करीत नाही? शहरात सर्वत्र अस्वच्छता, घाण, कच—याचे ढिग, दुर्गंधी, बकालपणा, कच—याची नरकपुरी झाली असून अपु—या नाले सफाईमुळे साफसफाईचा बोजवारा उडलेला नाही का? गायी, म्हशी, कुत्रे, डुक्करे इत्यादी भटकी मोकाट जनावरांचे शहरात प्रमाण वाढते असून कचरा कुंडयाजवळ, रस्त्यावर मोकाट, बिनदिक्कत फिरत असतात यामुळे श्वानदंशाच्या घटना वाढल्या आहेत. अपघात वा जिवीतहानी होत आहे. शहराचे सौंदर्यात बाधा येत आहे. डुक्करामुळे स्वाईन फ्लू सारख्या आजाराचा धोका वाढत आहे. यास आळा घालणेसाठी काही उपाययोजना केल्या आहेत का? नाही ना? श्वानांची संख्या घटावी यासाठी निर्बीजीकरणाची मोहिम राबविण्यात येत होती. सदर मोहिम सद्यस्थितीत सुरु आहे का ? की बंद करण्यात आली आहे? सद्यस्थितीत पावसाळयाचा मौसम सुरु असून निसर्ग चक्र बिघडून नैसर्गीक आपत्तीमुळे अस्वच्छतेमुळे आरोग्यास हानीकारक, अपायकारक, साथीचे रोगांची लागण होत असते. आपदग्रस्तांच्या मदतीचे स्त्रोत तुटपुंजे पडु नये यासाठी प्रशासनाने आवश्यक ती पुर्व तयारी म्हणुन साथ रोगांचे निदानांसाठी साथ आजारांवर नियंत्रण मिळविणेसाठी पुरेसे किट, विविध साथ आजारांवरील औषधांचा, जंतुनाशकांचा साठा उपलब्ध केला आहे का? वैद्यकीय शिबीरे भरवली आहे का? महापालिका स्थापनेस १२ ते १३ वर्षे पुर्ण होवूनही आजतागायत स्वच्छतेसबंधी उपविधी तयार केलेला नाही. शहराची साफसफाई ही नागरीकांचे जीवनाशी निगडीत प्रश्न असल्याने कृपया लक्षवेधी सूचनेवर महासभेत चर्चा होवून माहिती मिळावी तसेच आवश्यक उपाययोजना करणेत याव्यात ही नम्र विनंती.

---

**महापालिका सचिव:—** सन्मा. सदस्या श्रीम. जयश्री सुर्वे आपण आपली लक्षवेधी सुचना मांडावी.

**सदस्या श्रीम. जयश्री सुर्वे:—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सुदंर शहर स्वच्छ शहर असे आपण फक्त म्हणतो परंतु प्रशासन व ठेकेदार याबाबतीत कमी पडत आहेत. प्रशासन ठेकेदाराच्या कामावर संतुष्ट आहे का? महत्वाच्या खत्त्यांवरील कचरा नेहमी उचला जात नाही. जे महत्वाचे खत्ते आहेत त्यांवरील कचरा नियमितपणे उचला पाहिजे. दिवसातुन एकदाच या खत्त्यावरींल कचरा उचला जातो. उदा. भाजीमार्केटचे जे खत्ते आहेत ते महत्वाचे आहेत त्यांवरील कचरा नेहमी उचलला गेला पाहिजे. तसेच माझे प्रभागातील सिंध नॅशनल स्कुलच्या बाजुला जो खत्ता आहे तो तसेच स्टेशनच्या जवळ जो खत्ता आहे त्यावरील कचरा उचलला जात नाही. तसेच घरोघर फिरुन कचरा गोळा करणारे जे कर्मचारी आहेत ते सुध्दा नेहमी गैरहजर असतात. रविवारी तर ते येतच नाहीत. तर याची पाहणी कोण करते? आणि कशी करते? दुसरा टॅक्टरचा विषय आहे. आपल्या चार प्रभाग समित्यांना चार टॅक्टर आहेत. एका टॅक्टर मागे अठराशे रुपये भाडे प्रशासन देते याप्रमाणे वर्षाला जवळ जवळ आपण २२ लाख रुपये भाडे देतो. नविन टॅक्टर खरेदीसाठी टॅक्टरचे माझेकडे कोटेशन आहे. कोटेशन प्रमाणे एका टॅक्टरला चार लाख रुपये खर्च येतो याप्रमाणे चार प्रभाग समित्या मध्ये चार टॅक्टर साठी १६ लाख रुपये एवढा खर्च येईल. यासाठी महापालिका आपल्या स्वत:च्या मालकीचे टॅक्टर का खरेदी करत नाही? मी कोटेशन देते ते पहावे. तसेच मोकाट कुत्रे रस्त्यावर इकडे तिकडे धावत असतात याचप्रमाणे माझे प्रभागात डुक्करांची संख्याही फार वाढलेली आहे. आरोग्य समिती सभापतीच्या प्रभागात एवढा त्रास आहे तर इतर सर्व सामान्य नगरसेवकांच्या प्रभागात किती त्रास असेल. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात साथ रोग आजाराबाबत केलेली प्रतिबंधात्मक कार्यवाही बाबतचा हा जो अहवाल आहे जो मा. आयुक्त साहेबांना दैनदिन दिला जातो. त्यात साथ रोग, लेप्टोस्पायराइस, डेग्यु, चिकुनगुनिया आजाराबाबत जनजागृतीसाठी प्रत्येकी १ लाख हस्तपत्रके छापुन त्यांचे वाटप केले जाते. इथे बसलेल्या सन्मा. सदस्यांना मी असे विचारते की, तुमच्या प्रभागांमध्ये अशी किती हस्तपत्रके वाटप केली आहेत ते सांगावे. या हस्तपत्रकांसाठी छपाईचा खर्च किती येतो? दुसरे असे की, हिवतापासाठी पोस्टर्स व होर्डीग्स बनविण्यात आलेली आहेत व ती शहरात मुख्य ठिकाणी प्रदर्शित करण्यात आली आहेत तर होर्डीगचा खर्च किती आहे? तो प्रशासनाने दयावा. तसेच येथे दिले आहे डेमोफार्मा ३५ लिटर, मलेरिया ऑईल २ हजार लिटर खरेदी करुन पुरवठा करण्यात आलेला आहे. माझे प्रभागात फक्त ३ गोण्या ब्लीचींग पावडर मिळालेली आहे. तसेच सार्वजनिक शौचालयांच्या साफसफाई बाबत विचारण्याची सोय नाही ऐवढी काही दुर्गंधी व घाण आहे ते विचारु नका. यासर्व प्रश्नांची उत्तरे देण्यात यावीत.

**सदस्य श्री. सतिश चहाळः—** मा. महापौर महोदया, उप महापौर साहेब, व आयुक्त साहेब आपल्या आरोग्य विभागाच्या ज्या उप—आयुक्त आहेत श्रीमती संगिता धायगुडे यांचे बदलीचे आदेश आले असतानांही त्यांना इथे मुदद्ाम ठेवले आहे का?

**उपमहापौर :—** जी लक्षवेधी आहे ती याबाबतची नाही. कृपया आपण बसुन घ्यावे.

**सदस्य श्री. सुरेश जाधवः—** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त, मा. सचिव साहेब, व सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी याठिकाणी सन्मा. सदस्या श्रीम. जयश्री सुर्वे यांनी जी लक्षवेधी सुचना मांडली आहे. त्याबदद्ल सर्वात प्रथम त्यांचे अभिंनदन करतो. शहरामध्ये कचऱ्याचे खत्ते आहेत आणि ते रोजचेच आहे. त्याचबरोबर त्यांनी जो टॅक्टरचा विषय घेतला त्याबरोबर फवारणीचा विषय घेतला. १९९७ मध्ये जेव्हा मी स्थायी समितीचा सदस्य होतो त्यावेळी याविषयास मी तेथे विरोध केला होता. कारण की हे जे टॅक्टर आहेत त्यांच्यावर काम करणारे कर्मचारी आपले आणि जी काही जंतुनाशके औषधे फवारली जातात ती सुध्दा आपली आणि मोघमपणे आपल्या शहराचा पैसा आपण त्या ठेकेदाराला देतो. यासाठी त्यांनी जी सुचना मांडली आहे की, प्रत्येक प्रभाग समितीस एक याप्रमाणे चार प्रभागसाठी चार टॅक्टर महापालिकेने खरेदी करावेत. त्यांबरोबर मा. आयुक्त साहेबांनी संपुर्ण शहराचा दौरा केला होता त्यावेळेस त्यांनी आश्वासन दिले होते की आपण महापालिकेच्या वतीन टॅक्टर खरेदी करु व ते आपल्या शहरात वापरु याबाबत मा. महापौर, उप महापौर व आयुक्त यांना माझी विनंती की, हे जे ठेके पध्दतीने काम चालले आहे ते रदद् करावे. आणि आपल्या महानगरपालिकेने टॅक्टर खरेदी करुन त्यावरून जंतुनाशक औषधांची चांगली फवारणी करावी जेणेकरुन आपल्या शहरात रोगराई पसरणार नाही. तर याठिकाणी असे पाहिले जाते की, टॅकरमध्ये एखाद बाटली जंतुनाशक औषध टाकले जाते व फवारणी केली जाते. आणि आपण पाण्यासारखा पैसा त्या ठेकेदाराच्या घशात ओततो. तर असे न करता सर्व सदस्यांचा भावनांचा विचार करता महापालिका आयुक्तांनी हा ठेका रदद् करावा. आणि नवीन टॅक्टर आणुन फवारणीचे काम चालु करावे. माझे प्रभाग क्रमांक ५३ मधील लेप्रोसी कॉलनी येथे कचऱ्याचा खत्ता होता तो बंद करण्यात आला आहे. छोटया गाडीने त्याठिकाणचा कचरा उचला जात होता. परंतु आता स्वच्छता निरिक्षक आपल्या महानगरपालिकेचे कर्मचाऱ्यांवर जबरदस्ती करुन त्यांना तो कचरा उचलण्यास लावतात. आणि ठेकेदारांना अश्या प्रकारे मदत करतात. कचरा उचलुन त्यांची विल्हेवाट लावणे हे ठेकेदाराचे काम आहे परंतु तसे न करता सफाई कामगारांवर दबाव आणुन त्यांना त्या खत्त्यावरील कचरा उचलावयास लावतात. आणि तो कचरा मोठया खत्त्यावर फेकावयास लावतात. तर माझी विनंती आहे की आमच्या लेप्रोसी कॉलनी मध्ये जो खत्ता आहे त्यावरील कचरा उचलण्यासाठी छोटी गाडी लावावी. तसेच त्याठिकाणी रिक्षा वगैरे जावु नये म्हणुन स्थानिक लोकांनी रस्त्याच्या मध्ये लोखंडी पोल रोवला आहे तो हटविला जावा अशी माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे तसेच आयुक्त साहेबांना विनंती करतो की, त्याठिकाणी कचऱ्यांच्या गाडीची व्यवस्था करावी. धन्यवाद.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—** सन्मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, सन्मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे यांनी लक्षवेधी सुचनेव्दारे हा प्रश्न मांडलेला आहे. शहरामध्ये डेग्यु आणि मलेरियाच्या साथी वेगाने पसरत आहेत. या उल्हासनगर शहरामध्येच नव्हे तर संपुर्ण महाराष्ट्रात या रोगांची लागण होत आहे आणि आत्ता ती चालु आहे. त्यांच्यावर आपण प्रतिबंधात्मक कारवाई काय करणार आहात? किंवा काय सुरु केली आहे? त्याबाबत आरोग्य विभागाच्या सन्मा. उप—आयुक्त ज्या आहेत त्यांनी या ठिकाणी सांगावे. त्याचबरोबर सन्मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे यांनी शासन आणि प्रशासनाच्या ज्याबाबी निर्देशनास आणुन दिल्या आहेत त्या अतिशय महत्वाच्या आहेत त्यातील महत्वाची बाब म्हणजे १६ लाख रुपयांमध्ये जे चार टॅक्टर खरेदी करायचे आहेत. त्याव्दारे जे काही काम करायचे आहे ते ठेकेदाराकडून करून घेण्याऐवजी महापालिकेने का करु नये? जेणेकरुन महापालिकेचा पैसा वाचेल. प्रत्येक गोष्ट प्रत्येक काम महापालिकेकडुन ठेकेदारांला दिले जाते. ठेकेदार अटी शर्तीचे पालन करत नसल्यामुळे ते काम महापालिकेने करावे अशी त्यांनी याठिकाणी विनंती केली आहे. यांचबरोबर मोकाट जनावरे, कुत्रे व डुक्करांबाबत याठिकाणी अनेक दिवसांपासुन तक्रार येत आहे त्यांची सुध्दा विल्हेवाट लावावीं. मा. महापौर, मा. उप महापौर, व आयुक्त साहेब, तुम्ही इकडे लक्ष दिले तर बरे होईल, तुम्ही टिव्ही पहात असालच, आत्ताच काही दिवसापुर्वी मला वाटते सातारा किंवा कोल्हापुर महापालिकेमध्ये अक्षरशः आयुक्तां समोर डुक्कराचे पिल्लु सोडले गेले होते. ती वेळ येथे येणार नाही असे मी आपणांकडुन आश्वासन घेतो, कॅम्प नंबर ४,५ मध्ये एवढा काही सुळसुळाट आहे की सांगु नका. कुत्रे तर एवढे झाले आहेत की ते जमीनीवर न चालता घराच्या छपरांवरुन चालतात. माझे प्रभागातील तानाजी नगर हा परिसर असा आहे की, त्या परिसरांतील घरांची छप्परे बिर्ला गार्डनच्या समपातळीत येतात तेथून कुत्रे घराच्या छपरांवर

उडया मारतात. यासाठी त्या कुत्र्यांची व डुक्करांची विल्हेवाट लावण्यात यावी. एवढेच मी याठिकाणी सांगु इच्छितो, धन्यवाद.

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता:—</u> मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब, व सर्व सदस्य, सन्मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे यांनी लक्षवेधी सुचनेव्दारे जो प्रश्न उपस्थित केला आहे. तो शहरातील अतिशय गंभीर असा विषय आहे. ॲन्थोनीला दर दिवसाचे १ लाख ४० हजार रूपये जे आपण देतो त्यानुसार तो ठेकेदार बरोबर कचरा उचलत नाही. शहरामध्ये मलेरिया, डेग्यु, लेप्टो, असे विविध प्रकारचे रोग पसरले आहेत. दुसरी एक महत्वाची गोष्ट सांगु इच्छितो की, डी.डी.टी. पावडर, मलेरिया तेल व फवारणीची जी काही जंतुनाशके आहेत त्यांचा दर्जा बरोबर नाही. दाखविताना वेगळा दाखविला जातो व पुरवठा करताना वेगळाच माल पुरवठा केला जातो याबाबीकडे गंभीर पणे लक्ष दया. कारण शहरासाठी हा अतिशय महत्वाचा मुदद्ा आहे. शहराचा पैसा व्यर्थ जात आहे. यासर्व साहित्यांची प्रयोग शाळेकडुन तपासणी करुन घ्या. रस्ते सफाई साठी जी मशीन आणलेली आहे तीचा काहीही उपयोग होत नाही कारण की, ठिकठीकाणी रस्ते खोदले जात आहेत, जलवाहिन्या टाकण्यासाठी रस्ते खोदले जात आहेत. याबाबतील मी क्रित्येक पत्र दिली आहेत परंतु त्यांचे अदयाप उत्तर मिळाले नाही. आता हे सांगा की, की आता तर पावसाळा आहे, पावसाळयात मशीन व्दारे रस्त्यांची सफाई कुठे होत आहे?. शहरातील जनतेचा घामाचा पैसा फुकट जात आहे असे होता कामा नये. यासाठी मा. महापौर महोदयाना मी विनंती करतो की, काहींनाकाही कारण दाखवुन हा ठेका रदद् केला जावा तसेच मशीनव्दारे रस्ते सफाईचा जो ठेका आहे तो सुध्दा रदद् केला जावा. नाहीतर या विरोधात आम्ही आदोंलन करु. धन्यवाद.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी:—</u> मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, आमच्या सन्मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे यांनी लक्षवेधी सुचनेव्दारे अतिशय महत्वपुर्ण असा मुदद्ा माडंला आहे. शहरामध्ये मलेरिया, डेग्युंची साथ फार मोठया प्रमाणात पसरलेली आहे. डॉक्टर म्हणुन मी व्यवसाय करत असल्याने मलेरिया आणि डेग्यु किती मोठया प्रमाणात पसरला आहे यांची मला जाणीव आहे. येथे जी जंतुनाशके आली आहेत ती योग्य प्रमाणात काम करत आहेत काय ? त्यांची आपण तपासणी केली आहे? या जंतुनाशकांचा योग्य प्रमाणात वापर केला असता तर शहरामध्ये ही स्थिती उद्‌भवली नसती. प्रयोगशाळेतुन त्यांची आपण तपासणी करुन घेतली तर आपणांस असे दिसुन येईल की, शहरात फार मोठया प्रमाणावर ही साथ पसरत आहे. माझ्याच दवाखान्यात रोज डेग्यु, मलेरियाचे पाच पाच सहा सहा रुग्ण येत आहेत. तर याबाबत प्रतिबंधात्मक काय उपाययोजना करण्यात आली आहे ते स्वच्छता निरिक्षकांनी सांगावे. आपण जे म्हणत आहात **फॉगींग** केले आहे, जंतुनाशक औषधे आली आहेत आणि मलेरिया ऑइल, डी.डी.टी. पावडर वगैर आणली आहे तर त्यांचा वापर कुठे केला जात आहे? जेवढी काही औषधे मागविण्यात आलेली आहेत त्यांचा प्रभागांमध्ये वापर होत आहे? जंतुनाशकांचा योग्य प्रमाणात वापर झाला असता तर ही परिस्थती उद्‌भवली नसती. कालच माझ्याकडे डेंग्यु आणि मलेरियाचे दोन रुग्ण आले होते. दोन दिवसापुर्वी परवाच्या रात्री डेंग्युची रुग्ण असलेल्या एका मुलीला केईएम हॉस्पीटलमध्ये दाखल होण्यासाठी मी पाठविले. यासाठी मी आपणांस विचारु इच्छिते की, या साथ रोगांवर प्रतिबंधासाठी आपण काय उपाययोजना केली आहे?

<u>श्रीमती संगिता धायगुडे (उप—आयुक्त, आरोग्य):—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, ...........

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u>मा. महापौर, उप—महापौर आणि आयुक्त साहेब, उत्तर देण्यासाठी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. जिंदे किंवा वैद्यकीय अधिकारी डॉ. राजा रिजवानी यांना व्यासपीठावर बोलावले तर बरे होईल.

<u>श्रीमती संगिता धायगुडे (उप—आयुक्त, आरोग्य):—</u> माझ्या विभागाशी संबंधीत जे मुद्‌दे आहेत त्यांबाबत मी उत्तर देते. त्यानंतर डॉ. जिंदे हे उत्तर देतील. या साथ रोगांची आम्ही गंभीरपणे काळजी घेत आहोत. रोजच्या रोज **केमीफॉर्सचा** वापर केला जात आहे. फवारणी केली जात आहे. पॉवर स्प्रेची फवारणी चालु आहे. आपल्याकडे दोन फॉगिंग मशिन आणलेल्या आहेत. त्याद्वारे रोजच्या रोज फवारणी चालु आहे. मलेरिया ऑईलची शिडकावणी चालु आहे. पावडर शिडकावणी चालु आहे. जनजागृतीसाठी आपण दुरदर्शनवर व इतर ठिकाणी जाहिरात लावुन हे काम करत आहोत. शिवाय साडेपाचशे टायर जप्त केले आहेत. **१२ हॅडल फॉगींग मशिन व दोन व्हेईकल माउंटेड मशिनने धुरळीकरण चालु** केलेले आहे. शिवाय रस्त्यावर जी माती पडलेली असते जी ठेकेदार उचलत नाही त्यासाठी जादा वाहन लावुन ती माती ठेकेदाराकडुन उचलुन घेत आहोत. तसेच उल्हासनगर शहरातील डुकरे व कुत्रे पकडण्यासाठी एक डंपर घेतला आहे त्याद्वारे रोज १० ते १२ डुकरे

किंवा कुत्रे पकडण्याची कारवाई सुरु आहे. परंतु जर मा. आयुक्त साहेबांनी जर मान्यता दिली तर आपण याविषयी ठेक्यावर देण्याबाबत मी आज टिप्पणी सादर करणार आहे. परंतु सध्या तरी आता आपण डंम्पर भाडयाने घेवुन त्याविषयी कार्यवाही सुरु करत आहोत. त्याचबरोबर जी औषधे व पावडर आलेली आहे तींची प्रत्येक प्रभाग समिती निहाय वाटप केले आहे. तीन ब्लिचींगच्या गोण्या देवुन अजुन तीन गोण्या आपल्याकडे शिल्लक आहेत. त्या संपल्यानंतर आपण लगेच या उपलब्ध करुन देवु. तसेच सगळया प्रकारची औषधे व पावडर आपल्याकडे उपलब्ध आहे आणि त्याचा वापर व्यवस्थीत व्हावा यासाठी मी दर आठवडयास स्वच्छता निरिक्षक आणि मुख्य स्वच्छता निरिक्षक यांची बैठक घेत असते. प्रभाग अधिका–यांना सुध्दा त्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. तसेच प्रभाग समिती एक व दोन साठी दोन मुख्य स्वच्छता निरिक्षक आहेत. आणि प्रभाग समिती तीन आणि चारसाठी एक मुख्य स्वच्छता निरिक्षक आहे. ते स्वत: जावुन पाहणी करत असतात. आणि व्यवस्थीत फवारणी होत आहे की नाही याची रोज दखल घेतली जात आहे. तसेच साथीच्या रोगांचे नियंत्रण करण्यासाठी होईल तितके नियंत्रण करण्याची कारवाई करत आहोत. आपण जे म्हणालात त्याप्रमाणे व माझ्याकडे जी माहिती आहे त्याप्रमाणे हिवतापाची लागण झालेले १५ रुग्ण आतापर्यंत आढळले आहेत. आणि डेंग्युचे १० रुग्ण आढळलेले आहेत. बाकीचे जे काही रुग्ण आहेत ते दुषित पाणी आणि इतर कारणामुळे बाधित झालेले आहेत. आणि त्यामध्ये आमच्याकडुन जेवढी काही खबरदारी घ्यायला पाहिजे तेवढी खबरदारी घेतली जात आहे. आणि कोणत्याही बाबतीत हलगर्जीपणा केला जात नाही. धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती डॉ. निना नाथानी :–</u>उप–आयुक्त महोदया, एक मिनिट, जंतुनाशक औषधांच्या वाटपाबाबत आपण आता सांगितले या औषधांचे आपण बरोबर वितरण केले आहे, फवारणी केली आहे असे आपण सांगितले हे सर्व ठिक आहे. परंतु मी वैद्यकीय अधिका–यांकडुन असे जाणुन घेवु इच्छिते की, ही जी जंतुनाशक औषधे पुरविण्यात आली आहेत त्यामध्ये किती प्रमाणात भेसळ आहे? जंतुनाशक औषधांचे वाटप केल्याचे जसे आपण सांगत आहात ते पाहता या शहरामध्ये डेंग्यु, मलेरियाचे दुर्लक्ष करण्यासारखे रुग्ण आढळुन यावयास पाहिजे होते. परंतु येथे तर फार मोठया प्रमाणावर या आजारांनी थैमान घातल्याचे दिसुन येत आहे. तसेच आपल्या शहरात डेंग्यु आणि मलेरियाचे किती रुग्ण आढळुन येत आहे याची माहिती घेतली आहे काय? मागील दोन महिन्यापासून डेंग्युचे एवढे काही रुग्ण आढळुन येत आहेत, त्याची आपण काही रेकॉर्ड ठेवले आहे काय? मला असे वाटते की, महानगरपालिकेने याबाबतचे रेकॉर्ड ठेवले पाहिजे. ज्यावरुन आजच्या तारखेला डेंग्यु आणि मलेरियाचे किती रुग्ण आहेत हे माहित पडु शकेल?

<u>श्रीमती संगिता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u>वैद्यकीय आरोग्य विभाग श्री. देहेरकर साहेबांच्या अधिपत्याखाली येतो, त्या विभागाकडुन मला जी माहिती मिळालेली आहे वैद्यकीय अधिका–यांनी मला जो अहवाल दिलेला आहे. त्यानुसार आता सांगितलेले दोन आजार हे माझ्या विभागाशी संबंधीत आहेत. या दोन रोगांविषयी माहिती दिली. इतर सविस्तर माहिती डॉ. रिजवानी हे आपणांस देवु शकतील.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी:–</u>रेकॉर्ड ठेवले आहे का याची मला माहिती जाणुन घ्यायची आहे की किती सकारात्मक डेंग्यु आणि मलेरियाने रुग्ण आहेत याची आपणांस माहिती आहे का?

<u>डॉ. राजा रिजवानी (वैद्यकीय अधिकारी):–</u>मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य डॉ. निना नाथानी यांनी जे प्रश्न विचारले त्याचे उत्तर असे आहे की, आमची जी मॉनिटरींग होत आहे त्या हिशोबाने आम्हांला १५ केसेस सकारात्मक आढळुन आले आहेत. ज्यांच्याबाबत उपचार चालु आहेत. व आमच्या प्राथमिक आरोग्य केंद्रावर जे डॉक्टर्स आहेत ते प्रत्यक्ष सर्व्हेक्षण करुन भेटही देत आहे. आणि त्यावेळी त्यांना काही संशयित रुग्ण आढळुन आले तर जेथे मलेरियाचे तपासणी केली जाते त्यांच्याकडुन तपासणी करुन घेतली जाते.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :–</u>डेंग्यु बद्दल काय?

<u>डॉ. राजा रिजवानी (वैद्यकीय अधिकारी):–</u>डेंग्युचे सुध्दा आम्हांस १० रुग्ण आढळुन आले होते. त्यांपैकी जुन महिन्यामध्ये एका डेंग्युच्या रुग्णाचा मृत्यु झाला होता. मला वाटते तो रुग्ण श्री. शेखर यादव यांच्या प्रभागातील होता आणि शिवनेरी रुग्णालयात दाखल होता. मी स्वत: तेथे भेट दिली होती. आणि तेथिल डॉ. अहुजांशी माझे बोलणे झाले होते. तो रुग्ण त्यांच्या रुग्णालयात पाच सहा तासासाठी होता त्यानंतर त्यास मुंबई रुग्णालयात हलविण्यात आले होते. आणि मुंबईतील रुग्णालयात त्याचे निधन झाले. अशा प्रकारे

आमच्या आरोग्य विभागाकडुन कारवाई झालेली आहे. बाकी स्वच्छतेविषयीचा जो दुसरा भाग आहे जसे की कचरा उचलणे, फॉगींग करणे किंवा मलेरिया ऑईलची फवारणी करणे, हे काम आरोग्य विभागा मार्फत केली जाते त्याबाबतची माहिती उप–आयुक्त, आरोग्य या देतील.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :–</u>क्षमा करा, मी असे सांगु शकते की आपला जो अहवाल आहे तो अपुर्ण आहे. काय तुम्ही सर्व रुग्णालयांना भेट दिली आहे? काय आपण प्रयोग शाळांना भेटी दिल्या आहेत? जेथुन आपणांस कोणत्या रोगांने किती रुग्णग्रस्त आहेत याची १०० टक्के माहिती मिळु शकते. काल माझ्या दवाखान्यात ४ डेंग्युचे रुग्ण दाखल झाले होते. तर या आजारांविषयीचे आपले रेकॉर्ड कोठे आहे? यासाठी आपण प्रयोगशाळांकडुन माहिती घ्यावी. कारण की बहुतांशपणे काय होते एखादा रुग्ण रुग्णालयात दाखल होतो आणि थोडीफार गंभीर स्थिती निर्माण झाली की त्यास मुंबई येथिल रुग्णालयात हलविले जाते. मग त्यानंतर काय? यासाठी आपल्या रेकॉर्डवर किती रुग्ण आले? आपल्याकडील रुग्णालयात ते दाखल नाही तर ते रेकॉर्डवर कसे येतील? यासाठी आपण प्रयोग शाळांकडुन माहिती घ्यावी त्यावरुन आपणांस माहित पडु शकेल की किती प्रमाणात साथ रोगांची लागण झालेली आहे. मलेरियाचे किती रुग्ण आहेत, यासाठी वैद्यकीय आरोग्य विभाग व स्वच्छता विभागाने एकत्रितपणे काम केले पाहिजे.

<u>डॉ. राजा रिजवानी (वैद्यकीय अधिकारी):–</u>यासाठी आम्ही असे केले की आहे की आजच आरोग्य विभागाच्या सभापतींशी माझे बोलणे झाले आहे. त्यानुसार आम्ही उदया खाजगी डॉक्टरांचे कार्यशाळा आयोजित केली आहे. गेल्या १५ दिवसापासून आम्ही त्यांच्या अध्यक्षांच्या संपर्कात आहोत परंतु काही अडचणींमुळे ते आम्हांला तारीख निश्चित करुन देत नव्हते. परंतु आता उदया खाजगी डॉक्टरांची एक कार्यशाळा आम्ही आयोजित केली आहे. तसेच सभापती महोदयांशी झालेल्या चर्चेनुसार सोमवारपासुन आम्ही खाजगी रुग्णालय व खाजगी प्रयोगशाळा यांच्याकडुन आम्ही अहवाल गोळा करण्याचा प्रयत्न करु.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :–</u>हे बरे होईल.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>सन्माननिय सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे यांनी ही जी लक्षवेधी सूचना मांडलेली आहे त्यावरील चर्चेत सहभागी होतांना डॉ. निना नाथानी यांनी सभागृहात एक गंभीर विषय चर्चेत आणला आहे. सभागृहात सर्व नगरसेवक सुध्दा गंभीरतेने बसले आहेत. याबाबतीत मी आयुक्त साहेबांना सांगु इच्छितो की, जेव्हा सर्वसाधारण परिस्थिती असते तेव्हा सर्व सैनिक निवांतपणे आपल्या बॅरेकस् मधील विसावा देत असतात परंतु जेव्हा युध्दा जाहिर होते तेव्हा ते सरहद्दीवर तैनात होतात. आणि त्यावेळी सर्व देशात माहित पडते की आता युध्द सुरु झाले आहे. शहरातील साथीच्या रोगांची परिस्थिती लक्षात घेता आपणांस युध्द स्तरावर काम केले पाहिजे. आपण मलेरियाशी लढले पाहिजे. डेंग्युशी लढले पाहिजे. स्वाईन फ्लुशी लढले पाहिजे. आपण जी आकडेवारी सांगितली ती बरोबर नाही. त्याबाबतीत डॉ. निना नाथानी यांनी सांगितले की कालच त्यांच्याकडे डेंग्यु मलेरियाचे ४ रुग्ण दाखल झाले होते. यासाठी खास करुन आयुक्त साहेबांना माझे सांगणे आहे की, सर्व शहरवाशियांना विश्वासात घेतले पाहिजे. नगरसेवक राजकिय पक्षाचे लोक व जनेतेलाही असे वाटले पाहिजे की, महानगरपालिका यावेळेस गंभीरतेने काम करत आहे. केवळ नगरसेवकांना नव्हे तर सर्वसामान्य जनतेला, गल्लीबोळामध्ये राहणा–या नागरीकांना असे वाटले पाहिजे की, महानगरपालिका मलेरिया विरोधात डेंग्यु विरोधात युध्द पातळीवर काम करत आहे. व आमचा सफाई कामगार, मुकादम, स्वच्छता निरिक्षक हे रस्त्यावर दिसले पाहिजेत. सफाईचे काम युध्द पातळीवर झाले पाहिजे. तेव्हाच लोकांना वाटेल की, आमची महानगरपालिका लोकांना विश्वासात घेण्याचे काम करत आहेत. युध्द स्तरावर काम सुरु झाले पाहिजे. अजुनही वेळ गेलेली नाही. खरे तर हे काम एक आठवडयापुर्वी, पंधरा दिवसापुर्वी व्हावयास पाहिजे होते. लोकांना दाखविण्यासाठी आणि खरोखरच मलेरियाशी लढण्यासाठी युध्द स्तरावर काम झाले तरच चांगले होईल.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–</u>मलेरिया, डेंग्यु किंवा टायफाईड हे जे तीन चार प्रकारचे साथीचे रोग पसरले आहेत, डॉ. निना नाथानी व डॉ. राजा रिजवानी यांनी या विषयावर येथे चर्चा केली. साधारणपणे कोणतीही रोगराई पसरणे हे डॉक्टरी व्यवसाय करणा–यांना व्यक्तीशः फायदेशीर असते. त्यांच्याकडे रुग्ण वाढत असतात. त्यांची कमाई वाढत असते. परंतु महानगरपालिकेमध्ये काम करणा–या लोकांसाठी एखादया रोगाची साथ पसरते. तिला रोखण्यासाठी मलेरिया असो की डेंग्यु असो या दोन आजारांना प्रतिबंध करण्यासाठीच्या उपायांवर जर आपण चर्चा केली, समस्यातर आहेच. ही समस्या ना केवळ उल्हासनगरमध्येच आहे आणि

त्यामध्ये ना कुण्या स्वच्छता निरिक्षकाचा दोष आहे ना स्वच्छता विभागाचा दोष आहे, ना कुण्या डॉक्टरांचा दोष आहे आणि त्यासाठी कुणाला येथे दोषी ठरविण्याची आवश्यकता नाही. परंतु समाधानाची गोष्ट जर आपण म्हटली तर डेंग्यु आणि मलेरिया रोखण्यासाठी मच्छरांना रोखणे हाच केवळ एक उपाय आहे. आम्ही डॉक्टरांच्या कितीही कार्यशाळा आयोजित केल्या, अमुक केले, तमुक केले तरी त्यात काही फरक पडणार नाही. कारण की डेंग्यु झालेला आहे तो झालेला आहे. त्यासाठी अॅन्टी पॅराशिटामिल अमुक तमुक गोळया दयाव्या लागतील. ग्लुकोज चढवावा लागेल, त्याच्या रक्ताची तपासणी करावी लागेल. परंतु ज्याला अदयाप डेंग्यु मलेरिया झाला नसेल त्याला तो यापुढे होवु नये आणि तो रोखण्यासाठी केवळ मच्छरांना रोखणे हे महत्वपुर्ण आहे. हे मच्छर रोखण्यासाठी जे जे उपाय करायला पाहिजे ते केले पाहिजे. त्यातील पहिल्या क्रमांकाचा उपाय हा आहे की, आपणाकडुन जे फॉगींग केले जाते, त्याबाबतीत डॉक्टरांचे म्हणणे असे आहे की, त्यासाठी आपण जी जंतुनाशके वापरतो त्यांचे प्रमाण बरोबर आहे का? की त्याचे प्रमाण कमी जास्त आहे? कधी कधी कोणत्या ना कोणत्या भ्रष्टाचारामध्ये जंतुनाशकांचे प्रमाण कमी जास्त झाल्यामुळे अशा प्रकारच्या घटना घडतात. या शहरामध्ये जे फॉगिंग केले जाते त्या फॉगिंग साठी जंतुनाशकांचे प्रमाण योग्य प्रमाणात आले पाहिजे त्याकडे लक्ष दिले पाहिजे. शहरातील मच्छरांचा मुळासकट नाश केला पाहिजे. सर्वसाधारणपणे डेंग्युचे मच्छर दिवसा चावा करतात. ते स्वच्छ पाण्यामध्ये राहतात. स्वच्छ पाण्याचे जेथे काही साठे असतील मग ते रस्त्यांवर खड्डे आहे पावसाचे पाणी तेथे थांबलेले आहे. त्या त्या ठिकाणी मच्छरांच्या औषधांची फवारणी केली पाहिजे. आणि मच्छर वाढण्याचे तिसरे कारण आहे हिरवळ. जेथे झाडे झुडपे असतात तेथे मच्छर वाढत असतात, त्याठिकाणी सुध्दा फॉगिंग व्यवस्थित केली तर मच्छरांचे प्रमाण कमी होवु शकेल. एवढेच काम केले जावु शकते आणि एवढेच काम पुरेसे आहे. केवळ मच्छरांवर नियंत्रण ठेवणे आणि आपणाकडे टाईफाईडचे सुध्दा प्रमाण वाढत चालले आहे. ते पावसाळयात रस्त्यावरील खाण्यामुळे जिवाणुंचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे अशा प्रकारचे आजार होणे हे स्वाभाविक आहे. त्यासाठी रस्त्यांवरील फेरीवाल्यांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. व शहरामध्ये जो पाणी पुरवठा केला जात आहे त्यामध्ये क्लोरिनचे थोडेफार प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. जेणेकरुन शरीरासही हानीकारक होणार नाही. या लक्षवेधीवर सन्माननिय सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे, डॉ. निना नाथानी, श्री. दिलीप गायकवाड, श्री. जीवन इदनानी व श्री. सुनिल गंगवानी यांनी हा जो विषय येथे उपस्थित केला आहे तो वेळेची गरज पाहुन. आमच्या शहरात मुंबईसारखी स्थिती अदयाप निर्माण झालेली नाही. मलेरियामुळे लोकांना हृदयविकाराचा झटका येत आहे. हृदय काम करणे बंद होत आहे. तशा प्रकारचा गंभीर विषय येथे नाही. आपणाकडे काम करण्यासाळी जेवढे काही लोक आहे, जेवढी आपणाकडे यंत्रणा आहे तिचा शंभर टक्के उपयोग केला पाहिजे व प्रत्येक नगरसेवकाने केवळ येथे विषय उपस्थित करणे किंवा भांडण करणे या व्यतिरीक्त येथिल अधिका—यांना आपल्या प्रभागात घेवुन जाणे त्यांच्याकडुन काम करुन घेणे रस्त्यांवरील एक एक खड्डा शोधुन तो भरुन घेणे मला वाटते हे फार मोठे सेवेचे काम होईल. डॉ. नाथानी यांच्याकडे रोज डेंग्युचे चार चार रुग्ण येत असतील तर डेंग्युची साथ पसरली आहे. अशा प्रकारची रोगराई आणखी वाढण्याअगोदर आपण जर सहकार्य करत असू शकेल तर आपण सर्वांनी सहकार्य केले पाहिजे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आता सन्माननिय सदस्या डॉ. निना नाथानी यांनी व आता श्री.नरेंद्र राजानी यांनी ज्याप्रकारे आता शहरामध्ये रोगराई पसरु नये म्हणुन जो मुद्दा मांडला त्यानुसार मी आयुक्त साहेबांना एक सूचना करतो की, आपणाकडे जंतुनाशक औषधे सुध्दा आहे. फवारणी करण्यासाठी वेगवेगळया प्रकारची कॅमीकल सुध्दा उप—आयुक्त महोदयांनी मागविले आहे. फक्त कमतरताच कर्मचा—यांची आहे. आपत्त कालीन परिस्थिती येते तेव्हा प्रत्येक प्रभागातुन एक एक कर्मचारी मागविला जातो. दुसरी अशी काही घटना घडल्यानंतर एक एक कर्मचारी मागविला जातो, ती अशा प्रकारची रोगराई पसरु नये म्हणुन मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, पावसाळयापुर्वी नाले सफाईसाठी १०,१० हंगामी सफाई कामगार लावतो त्याचप्रमाणे यावेळेस तातडीच्या कामासाठी दोन महिन्यासाठी प्रत्येक प्रभाग समितीमध्ये २५,२५ कामगारांची तात्पुरत्या स्वरुपी नेमणुक केली पाहिजे रस्त्यांवरील खड्डयांमध्ये जे पाणी भरले आहे तेथे जंतुनाशक औषधांची जी फवारणी करायची आहे तसेच अन्य समस्यांचा निपटारा करण्यासाठी प्रत्येक प्रभाग समितीमध्ये तात्पुरत्या स्वरुपी २५, २५ कामगारांची नेमणूक केली पाहिजे. जेणेकरुन डेंग्यु, मलेरिया सारख्या साथीच्या रोगांचा आपण सामना करु शकु. व संपुर्ण सभागृहाचे मत लक्षात घेता हे काम त्वरीत सुरु केले पाहिजे. प्रत्येक प्रभाग समितीमध्ये दिवाळीपर्यंतच्या कालावधीसाठी २५,२५ लोकांची नेमणूक केली पाहिजे. जेणेकरुन डेंग्यु मलेरियाच्या विरोधातील लढाई सहजपणे लढता येईल. धन्यवाद।

**<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>**मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, याबाबतीत आयुक्त साहेबांचे मी दोन गोष्टींकडे लक्ष वेधु इच्छितो, एक तर आमचे सफाई कामगार नालीमधुन जो कचरा बाहेर काढतात, तो कचरा ॲन्थोनी ठेकेदाराने उचलायचा असतो. परंतु ठेकेदाराचे कामगार फक्त सुका कचरा उचलतात. ओला कचरा उचलत नाहीत. त्यामुळे काय होते की, कुत्री व डुकरे तो कचरा सर्वीकडे पसरवितात. त्यामुळे मच्छर वाढत आहेत. यासाठी ठेकेदाराला आपण सूचना दया की, त्याने ओला कचरा सुध्दा उचलावा. तो तीन तीन चार चार दिवस कचरा उचलत नाही. तो म्हणतो सुकल्यानंतर उचलु. आता सलग चार दिवस पाऊस पडला तर तो कचरा आणखी ओला होईल. यासाठी नालीमधुन जो कचरा काढला जातो तो उचलण्यासाठी सूचना दया. आणि दुसरे असे की, जेथे जंतुनाशक औषधांची फवारणी करणारा टॅक्टर जावु शकत नाही अशा ठिकाणी जंतुनाशकांची फवारणी करण्यासाठी या अगोदर प्रत्येक वार्डासाठी एक फवारा असायचा त्याद्वारे छोटया छोटया गल्ल्या नाले, बॅरेकस् मध्ये आमचे सफाई कामगार जात होते व तेथे मलेरिया ऑईल, जंतुनाशकांची फवारणी करत होते व डीटीटी पावडरचा सिडकाव केला जात असे. यासाठी आम्हां प्रत्येक नगरसेवकास तो एक एक फवारा पाहिजे. ते नसल्यामुळेच आता हे मच्छर फार मोठया प्रमाणावर होत आहेत. या दोन बाबींकडे कृपया लक्ष दयावे.

**<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :—</u>**धुरीकरण कोणत्या वेळेस केले जाते? त्याची माहिती दिली जावी.

**<u>उप—महापौर :—</u>**आपल्या प्रभागात कोणत्या वेळेस धुरीकरण केले पाहिजे ते आपण सांगा.

**<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :—</u>**माझ्या प्रभागात धुरीकरण कधी केले जाते ते माहित नाही.

**<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>**मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, आपले उल्हासनगर शहर हे ३५ चौरस किलोमिटरचे आहे.

**<u>काही सदस्य :—</u>**१३ चौरस किलोमिटरचे आहे.

**<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>** क्षमा करा, १३ चौरस किलोमिटरचे आहे. या शहरातील साथ रोगांविषयीची डॉक्टर साहेबांनी आपणांस जी आकडेवारी सांगितली आहे, त्या तुलनेने मुंबई सारख्या शहरामध्ये केईएम सारखे रुग्णालय आहे. त्याठिकाणी रुग्ण ठेवण्यासाठी बेड सुध्दा उपलब्ध होवू शकत नाही. ठाण्यासारख्या शहरामध्ये देखिल तीच परिस्थिती आहे. उल्हासनगर शहरामध्ये साथ रोग फार कमी स्थितीत आहे. डेग्यु, मलेरियाची साथ आहे पण एवढया प्रमाणात नाही. त्यामुळे अधिका—यांचे आपण अभिनंदन करावयास पाहिजे. साफ सफाई होते, होत नाही असे नाही. माणुस आहे किती काम करणार यावर अवलंबुन आहे. आपले शहर आहे. मी अभिमानाने सांगु इच्छितो की, आरोग्य विभागाच्या उप—आयुक्तांनी साथ रोगाविषयीची जी आकडेवारी सांगितली आहे ती पाहता, मुंबई आणि ठाण्याच्या तुलनेने फार कमी आहे. त्यामुळे आपण या अधिका—यांना धैर्य दिले पाहिजे. त्यांची स्तुती करुन आपण त्यांचे मनोबल वाढविले पाहिजे. जसे श्री. नरेंद्र राजानी साहेबांनी सांगितले की त्यांच्या बरोबर राहुन आपण स्वत: मेहनत केली पाहिजे. मच्छरांना आपणांस रोखायचे आहे, रोगराईला रोखायचे आहे. यासाठी आम्ही देखील आमच्या स्वच्छता निरिक्षकांना बरोबर घेवुन काम करतो ते सक्षम आहेत. ते नेहमी माझ्या संपर्कात असतात. माझ्या प्रभागात नियमितपणे फवारणी होते. संध्याकाळी आल्यानंतर अहवाल देतात. त्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. माझ्या प्रभागात परवाच्या दिवशी १७ तारखेला आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये ३५० लोकांनी सहभागी होवून उपचार घेतले परंतु त्यात मलेरिया, डेंग्युची लागण झालेला एकही रुग्ण आढळुन आलेला नाही. हे मी अभिमानाने सांगतो. जे सत्य आहे ते सत्य आपल्याला बोलायलाच पाहिजे. मी आताच काही वेळेपुर्वी सांगितले की, डेंग्यु, मलेरियाची साथ एवढी आहे की रुग्ण ठेवण्यास बेड नाही. सन्माननिय सदस्या डॉ. निना नाथानी यांनी सांगितल्याप्रमाणे तीच स्थिती असेल, एक हजार लोकसंख्येमागे तीन चार रुग्ण जर आढळुन येत असतील तर मुंबई आणि ठाण्यातील स्थिती पेक्षा आपण बरेच सक्षम आहोत. एवढेच बोलतो धन्यवाद।

**<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>** सन्माननिय सदस्य श्री. प्रशांत धांडे मी यांचे अभिनंदन करतो कारण की त्यांच्या प्रभागात आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबीरात साडेतीनशे नागरीकांनी सहभाग घेवुन उपचार घेतले परंतु त्यात डेंग्यु किंवा मलेरीयाचा एकही रुग्ण आढळला नाही. परंतु मी माझ्या आणि श्रीमती ज्योती माने यांच्या प्रभागाचे सांगत आहे. प्रभाग क्र. ५६ व प्रभाग क्र. ६२ बाबत. माझ्या प्रभागात जेवढे काही दवाखाने,

रुग्णालये आहेत, ती सर्व भरली आहेत. बाजुला शिवनेरी रुग्णालय आहे तेथे रुग्ण ठेवण्यासाठी बेड नाहीत. रुग्णांना जमिनीवर ठेवले आहे. आर्शिवाद रुग्णालय, धन्वंतीरी रुग्णालय आहे तेथे मलेरियाचे एवढे काही रुग्ण आहेत, तेथे तुम्ही आताही जावुन बघू शकतात. डेंग्युचे काही रुग्ण त्यांनी उपचारासाठी बाहेर पाठविले आहे तेथे मलेरियाचे जास्त रुग्ण तुम्हांला दिसून येतील. मागच्याच आठवडयात माझे असे निदर्शनास आले आहे की, आपण जी फॉगिंग करतो, फॉगिग मध्ये जंतुनाशकांचे जे काही प्रमाण आहे ते बरोबर नाही. दुसरे असे की आपले स्वच्छता निरिक्षक कामगारांना घाबरतात. स्वच्छता निरिक्षकांचा कामगारांना धाक नाही. कामगार पाहिजे तशी मनमानी करतात. आज आपली जी फॉगिंग मशिन आहे तीच्या मार्फत कॅम्प नं. ४ मध्ये कोणत्या कोणत्या प्रभागांमध्ये फॉगिग केली प्रभाग क्र. ५६ व ६२ बाबत मी बोलतो या दोन प्रभागांमध्ये पंधरा दिवसात किती वेळा फॉगिंग केली आणि त्यांचे डिझेल आणि पेट्रोलचे बिल तुम्ही बघितले तर ते तुम्हांला लांब लचक असे बिल देतील. ४० लिटर डिझेल वापरले, ५० लिटर पेट्रोल वापरले तर ते गेले कोठे? हा सगळा काळा बाजार, मिलिभगत चाललेली आहे. यासाठी कृपया करुन आयुक्त साहेब तुम्ही लक्ष दया. नाहीतर येणारी परिस्थती खुप भयंकर असणार आहे. त्यास तुम्हांला तोंड दयावे लागणार आहे. सध्या आम्हांला लोकांना सामोरे जावे लागत आहे. म्हणुनच आम्ही लोकप्रतिनिधी तुम्हांला सांगणार. हजारो नागरीक रोज आम्हांला सांगत असतात. आम्हांला आमच्या प्रभागांमध्ये फिरावे लागते. तुम्ही सकाळी ११.०० वाजता येणार शहरामध्ये फिरणार नंतर लोकप्रतिनिधींना सांगणार आणि संध्याकाळी तुम्ही घरी जाणार, आम्हांला रात्री १२.०० वाजता सुध्दा ही लोक उठवतात. रात्री २ वाजता ही लोक उठवतात. रुग्णालयात जायचे आहे रुग्णवाहिका पाहिजे. अशी परिस्थिती आहे, यासाठी तुम्ही साहेब लक्ष दया, गंभीरतेने घ्या, प्रत्येक प्रभागामध्ये तीन गोणी ब्लीचींग पावडर देता, हे प्रमाण तुम्ही कसे ठरवता, जेथे आवश्यकता असेल तेथे तुम्ही दहा गोणी ब्लीचींग पावडर दयाना जेथे आवश्यकता असेल तर तुम्ही देऊ नका. तुमचे स्वच्छता निरिक्षक मुकादमाकडे तीन गोणी देता याला काय अर्थ आहे. तीन गोण्या ब्लीचींग पावडर आहे ती घ्या, आत्ता ब्लीचींग पावडर सपंली आहे, आत्ता नाही, म्हणजे काय? स्थायी समितीमध्ये आम्ही तुम्हाला आवश्यक असलेली सर्व जतुंनाशके, पावडर, वगैर यांची मंजुरी देतो. परंतु ती सामग्री तुम्ही स्वच्छता निरिक्षकाला देत नाही. माझ्या प्रभागाच्या बाजुला स्मशानभुमी आहे, स्मशानामध्ये प्रेत घेवुन जात असताना रस्त्यावरील गुळगुळीत झालेल्या भागावर पाय पडल्यामुळे घसरुन पडल्याने त्याचा हात फॅक्चर झाला. रस्त्याच्या गुळगुळीत झालेल्या भागावर ब्लीचींग पावडर न टाकल्यामुळे हा अपघात झाला. आज तो व्यक्ती रुग्णालयात दाखल झाला आहे त्यास जबाबदार कोण? तुमच्या स्वच्छता निरिक्षकाकडे ब्लीचींग पावडर मागितली तर तो म्हणतो ब्लीचींग पावडर नाही. प्रत्येक प्रभागासाठी तुम्ही तीन गोण्या ब्लीचींग पावडर देता तेथे दहाची आवश्यकता आहे तेथेही तीन गोण्या ब्लीचींग पावडर देता, हा जो तुमचा प्रकार आहे तो मला समजला नाही. म्हणुन आयुक्त साहेब प्रत्यक्ष लक्ष दया, येथे आधंळे दळतय कुत्र पीठ खाते असे चालणार नाही. शहरातील नागरीकांना रोगापासुन मुक्त ठेवण्याची जबाबदारी तुमची आणि आमची आहे. आपण सारे मिळुन काम करुया, आणि या कामामध्ये पारदक्षकता असली पाहिजे. स्वच्छता निरिक्षक आणि कामगार सर्व मलीदा खातात आणि त्याकडे कोणाचे लक्ष नाही असा माझा आरोप आहे.

<u>सदस्या श्रीम. मीना सोडें:— </u>मा. महापौर, आयुक्त साहेब, श्रीमती धायगुडे मॅडमची मी प्रशंसा करु इच्छिते त्या एकमेव महिला उप—आयुक्त आहेत व त्याच्याकडे आव्हानात्मक काम आहे त्या ते काम व्यवस्थीत पणे करीत आहे असे आमचे मानणे आहे. फवारणीचे जे टॅकर आहे त्यामध्ये किती प्रमाणात जंतुनाशक औषधे टाकतो त्याची माहिती नोंद, अभिलेखे आपण ठेवता का? त्या टॅकरमध्ये योग्य त्या प्रमाणात जतुंनााशके टाकली जातात की त्यामध्ये काही मिलावट केली जाते? याचे मला उत्तर दिले जावे.

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप—आयुक्त, आरोग्य):—</u> जंतुनाशक औषधाचे प्रमाण जास्त झाले तर त्यापासुन धोका निर्माण होवु शकतो.

<u>सदस्या श्रीम. मीना सोडें:—</u> त्यांचे योग्य प्रमाण काय असते ते आम्हास जाणुन घ्यायचे आहे. व त्याची नोंद प्रत्येक दिवशी आपणांकडे असते का?

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप—आयुक्त, आरोग्य):—</u> आपल्या प्रश्नाचे उत्तर देण्याअगोदर सन्मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण यांना मला काही सागांयचे आहे, आपण आरोग्य विभागात जर काही अनागुदी पाहिली असेल तर त्याची चौकशी केली जाईल. व ज्याकोणावर आरोप सिध्द होईल त्यावर कार्यवाही केली जाईल. माझ्या

विभागात नेहमीच १०० टक्के पादर्शकता राहते, कनिष्ठ स्तरावर जर काही अनियमितता घडत असेल तर त्याबाबतीत मी अतिशय गभीरतेने विचार करेन व त्याबाबतीत मा. आयुक्त साहेबांकडे शिफारस करेन.

सदस्य श्री. सतिश चहाळ:– मा. महापौर महोदया, उप–महापौर व आयुक्त साहेब............

उप–महापौर:– उप–आयुकत महोदयांना आपले तर पुर्ण करु दया.

सदस्य श्री. सतिश चहाळ:– उत्तर तर त्याच देणार आहेत ना? आम्हाला काही बोलु दयायचे नाही का?

उप–महापौर:– उप–आयुक्त महोदया, आपण आपले बोलणे पुर्ण करा.

सदस्या श्रीम. मीना सोडें:– जतुंनाशके औषधांची फवारणी करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या टॅकरची शमता किती लिटरची असते? आणि त्यामध्ये जंतुनाशकांची औषधे किती प्रमाणात टाकली जातात. त्यात दुसरे काही आणखी मिसळले जाते का? यांची आम्हास माहिती पाहिजे.

श्री. जी. जी. हिबारे (प्र. उप–आरोग्य अधिकारी):– मा. महापौर महोदया, उप–महापौर महोदय, व आयुक्त साहेब, व संबधीत सन्मा. सदस्यगण त्या टॅकरमध्ये पाचशे लिटर पाणी असते त्यामध्ये अडीशे लिटर आपण औषध टाकतो त्या मिश्रणातुन फॉगींग करण्यात येत आहे. एक लिटरला पन्नास एम.एल.

सदस्य श्री. सुरेश जाधव:– आपण चुकीचे बोलत आहात, अडीचशे लिटर वगैरे नसते त्यामध्ये आपण फक्त एक बाटली जंतुनाशक औषधे टाकले जातात. सभागृहात जी काही माहिती देत आहात ती चुकीची माहिती देत आहात.

श्री. जी. जी. हिबारे (प्र. उप–आरोग्य अधिकारी):– पंपामध्ये ५० एम.एल. जतुंनाशक औषधे टाकतो आणि पाचशे लिटरच्या एका टॅकरमध्ये अडीच.................. अडीच किलो.

सदस्य श्री. सुरेश जाधव:– तुम्ही जो टॅकर भरता तुम्ही किती जंतुनाशक औषध टाकता?

श्री. जी. जी. हिबारे (प्र. उप–आरोग्य अधिकारी):– अडीच लिटर.....

सदस्य श्री. प्रशांत धांडे:– अडीच लिटर असे बोला ना? अडीच किलो, अडीच किलो बोलता.

श्री. जी. जी. हिबारे (प्र. उप–आरोग्य अधिकारी):– एक लिटर मध्ये ५० एम.एल. अश्या प्रमाणात मिश्रण तयार करुन फवारणीसाठी वापरले जाते.

सदस्य श्री. रवि बागुल:– या प्रमाणातील औषध फवारणीमुळे मच्छर मरत नाही.

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता:– ते अधीक धष्टपुष्ट होतात.

श्री. जी. जी. हिबारे (प्र. उप–आरोग्य अधिकारी):– वेळोवेळी आपण औषध फवारणी करत असतो.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:– अश्या प्रमाणातील औषध फवारणीमुळे मच्छर कसे मरणार?

सदस्य श्री. लालबिहारी यादव:– फवारणी करत असताना जर पाऊस चालु असेल तर ते जंतुनाशक औषध सर्व पाण्यात वाहुन जात असेल?

श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):– आपला जो प्रश्न होता त्याचे उत्तरे असे आहे की, सायंकाळी पाच वाजल्यापासुन फवारणी सुरु केली जाते. कारण की, सायंकाळी मच्छरांची संख्या जास्त असते यासाठी फवारणी सायंकाळी केली जाते.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादवः–</u> उप–आयुक्त महोदया, फवारणी बाबतीत मी विचारले नाही. मी हे विचारले आहे की धरीकरण कधी केले जाते?

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u> तेच, फॉगींग जे आहे..........

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादवः–</u> फवारणी व धुरीकरण हयामध्ये फरक आहे.

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u> फॉगींग जी आहे सायंकाळी पाच ते रात्री आठ–साडे आठ वाजेपर्यंत केली जाते.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादवः–</u> सभागृहात जे ७६ सदस्य आहेत त्यातील एकही सदस्य असे सांगु शकणार नाही आपल्या विभागाचे कोणतेही अधिकारी, कर्मचारी किंवा कामगार सायंकाळी सहा ते आठ वाजेपर्यंत धुरीकरण करतात. एखाद दुसऱ्या प्रभागात धुरीकरण होतही असेल परंतु बहुसंख्य प्रभागामध्ये धुरीकरण होत नाही.

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u> प्रत्येक ठिकाणी फवारणी होते, फॉगिंग होते, मी रोजच्या रोज त्यांच्याकडुन अहवाल सुध्दा घेते. कुणी कर्मचारी/कामगार कामचुकारपणा करत असेल तर त्याच्यावर कारवाई केली जाईल. मला फक्त सांगा आपल्या प्रभागामध्ये कोणत्या दिवशी फवारणी झाली नव्हती. त्यानुसार चौकशी करुन मी संबंधीतांवर कारवाई करेन.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, उप–आयुक्त महोदया, आपणाकडे ज्या फॉगिंग मशिन आहेत त्या संपुर्ण उल्हासनगर महापालिका क्षेत्रासाठी पुरेशा आहेत का असे आपणांस वाटते का? कारण की फॉगिंग मशिन फक्त मुख्य रस्त्यावरुन फिरतात, मुख्य रस्त्यावरुन काय मच्छर येणार आहे का? हातपंपाद्वारे जे फॉगिंग केले जात असे त्याप्रकारची मशिन असावयास पाहिजे होती. आता दोन चार दिवसापासुन मी बघतो आहे, मा. महापौर महोदयांनी दोन फॉगिंग मशिन दिल्या आहेत. त्या गाडया रस्त्यावरुन अतिशय जलद गतीने फॉगिंग करत जातात. त्याच्याने मच्छर मरणार आहेत का? तुम्ही मला सांगा. फॉगिंग मशिन गल्लीबोळात फिरली पाहिजे. काम करायचे म्हणुन करु नका. खरोखरच मच्छर मारायचे असतील तर फॉगिंग मशिन रस्त्यावरुन हळु हळु चालवत नेली पाहिजे. मुख्य रस्त्यांबरोबर लहान लहान रस्त्यांवरुन जेथे नेता येईल तेथे नेली पाहिजे. असे काहीतरी करा, तुम्ही काम करता त्याबद्दल आम्हांला काही शंका नाही. परंतु इतर जे कर्मचारी आहेत तेही काम करतील याकडे बघा. तसे झाले तर बरे होईल अशी आमची इच्छा आहे.

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u> याची गंभीर दखल घेवुन अशा कर्मचा–यांवर अधिकाधिक नियंत्रण ठेवण्याची कार्यवाही करते.

<u>सदस्य श्री. दत्तात्रय पवार :–</u>मा. महापौर, उप–महापौर आणि आयुक्त साहेब, आता नविन आपण जे फॉगिंग मशिन घेतलेले आहे, माझ्या प्रभागामध्ये काही वेळ चालुन ते आपोआप बंद पडलेले आहे. म्हणजे नविन आता कार्यरत असलेले फॉगिंग मशिन ताबडतोब बंद पडते, इतक्या निष्कृष्ट दर्जाचे ते आहे. आणि मला उप–आयुक्त महोदया, आपणांस प्रश्न विचारायचा आहे की तुम्ही आता सध्या महापालिकेत कार्यरत आहात की आपणांस कार्यमुक्त केलेले आहे? याचे उत्तर दया. कारण की आपणांस कार्यमुक्त केलेले असेल तर आपणांस समाधानकारक उत्तर मिळणार नाही.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>महापौरजी, कृपया उत्तर दया.

<u>सदस्य श्री. दत्तात्रय पवार :–</u>कृपया मला उत्तर दया की आपणांस कार्यमुक्त केलेले आहे की कार्यरत आहात?

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u> माझी बदली काही महिन्यांपुर्वी झालेली होती, त्यानंतर नगरविकास विभागाचे आदेश जुन महिन्यात आले होते की यांना कार्यमुक्त करण्यात यावे. परंतु १४ जुलै पर्यंत मला कार्यमुक्त करण्यात आलेले नव्हते. आणि १४ जुलैला माझी जेथे बदली झाली होती ती बदली रद्द झाल्याचा मला कार्यादेश प्राप्त झालेला आहे. आणि मला कोणत्याही प्रकारे कार्यमुक्त केलेले नाही.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>मा. उप–आयुक्त महोदया, फॉगिंग मशिन संदर्भात आपण कोणतेही उत्तर दिलेले नाही. आपणाकडे पुरेश्या संख्येने फॉगिंग मशिन उपलब्ध आहे का?

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u> आपणाकडे सध्या दोन फॉगिंग मशिन उपलब्ध आहेत. त्या पुर्णपणे कार्यरत आहेत. परंतु आपणाकडे तिसरी एक जुनी मशिन आहे, तिला पेट्रोल आणि डिझेल जास्त लागत असल्यामुळे म्हणुन वापरली जात नाही, असे स्वच्छता निरिक्षकाचे म्हणणे आहे. त्या अनुषंगाने मा. आयुक्त साहेबांकडे टिप्पणी सादर करुन जादा पेट्रोल आणि डिझेलची व्यवस्था करावयास लावुन त्यांची मान्यता घेणार आहे. आणि तिसरी मशिन कशी चालु होईल हे पाहु.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, जिकडे तिकडे रोगराई पसरली आहे. यावेळेत आपण पेट्रोल आणि डिझेल जास्त लागत आहे असे जर बघत राहिलो तर ही रोगराई नियंत्रणात येणार नाही. यासाठी कृपया माझी आपणांस विनंती आहे की, आपण हॅण्डलींग जी मशिन आहे ती घेतली तर बरे होईल. या दोन तीन मशिनने काहीही होणार नाही. यासाठी नविन हॅण्डलींग फॉगिंग प्रभागा प्रभागामध्ये फिरवा तरच सर्व मच्छर उडणार आहे.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आम्ही श्री. सावंत यांना पाठींबा देतो. कारण की जेथे गलिच्छ वस्ती आहे तेथे मशिन न गेल्यामुळे तेथे जास्त जंतुनाशक पसरत आहेत. तर याचा दाखला घेवुन लवकरात लवकर काही तरी कारवाई केली जावी. कारण फक्त रस्त्यावरच मच्छर नसतात तर गटार वरुन मशिन न गेल्यामुळे अडचणी येत आहे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>सन्माननिय महापौर महोदया, आयुक्त साहेब, एक सूचना अशी आहे की शहाड फाटकचा एक मेन रस्ता आहे शहाड स्टेशनच्या रस्त्याने उल्हासनगर शहरात येण्यासाठी, मी असे पाहिले आहे की, ज्या दिवशी १५ ऑगस्ट किंवा एखादी सार्वजनिक सुट्टी असेल तर त्यादिवशी तेथे कोणीही साफसफाई करायला कोणीही येत नाही. मला हे काही कळत नाही, माझा व श्री. रामसागर यादव यांचा अर्धा अर्धा प्रभाग येतो, परंतु हा प्रभागातील मेन रस्ता असून देखील त्या मज्जिद समोर एवढी काही घाण असते की नागरीक नाक पकडुन शिव्या देतात. मी स्वत: १५ ऑगस्टच्या दिवशी साहेबांना घेवुन दाखविले व स्वच्छता निरिक्षकांना दाखविले, श्री. हिबारे यांना सुध्दा दाखविले ते म्हणतात की त्यांच्याकडे कामगारच नाहीत. ही परिस्थिती अशी काय? दरवेळेस १५ ऑगस्ट, २६ जानवारी असे काही कार्यक्रम असतात की त्यादिवशी कोणीही कामगार कामावर येत नाही? उप–आयुक्त महोदया असे का होते? दर वेळेस असे होते. आता ईद आणि गणपती उत्सव आहे,या दिवशी तुम्हांला स्वत: बोलवुन घेईल व दाखवेल, बघा, अख्खा रस्ता भरलेला असता, एवढी घाण? एवढी घाण की नागरीक एकदम वास घेवु शकत नाही.

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u> श्री. बागुल महोदय, १५ ऑगस्टच्या दिवशी मी रजेवर होती त्याबद्दल जास्त काही सांगता येणार नाही. परंतु ज्यावेळेस गणपती व ईदचा सण असेल त्यावेळेस मी स्वत: पाहणी करुन तेथे स्वच्छता करुन घेण्याची माझी जबाबदारी आहे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>उप–आयुक्त महोदया, प्रभाग क्र. ६ जो आहे तेथे कोण मुकादम आहे? श्री. हिबारे साहेब तुम्ही सांगा जरा.

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u> तेथे स्वच्छता निरिक्षक श्री. दिपक भोये आहेत.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>तेथे स्वच्छता निरिक्षक श्री. भोये आहेत हे मी मान्य करतो, त्यांच्याशी माझी चर्चा रोज होते, मी त्यांना रोज सांगतो. आमच्या येथे एक मुकादम आहे श्री. मेरसिंग त्यांना तरी साफसफाई करण्यास सांगा, अर्धा रस्ता एकाला व अर्धा रस्ता दुस–याला दिला आहे.

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u> ठिक आहे मी पाहते, मी करुन घेते.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, लक्षवेधी सूचनेवर बरीच चर्चा झालेली आहे. श्रीमती जयश्री सुर्वे, श्री. जीवन इदनानी यांनी लक्षवेधलेले आहे. आयुक्त साहेब, सपुंर्ण सभागृहाची भावना अशी आहे की कोणताही विषय असो, महासभेत संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांना हजर होण्यास सांगा. प्रश्न असतील तर त्या प्रश्नाचे उत्तर संबंधीत विभागातील अधिकारी यांनी ते उत्तर देण्यासाठी यावयास पाहिजे. एक एक प्रश्नावर अर्धा अर्धा तास जात आहे. आता या लक्षवेधीवर दोन दिवसापुर्वी तुमची टिप्पणी यावयास पाहिजे होती. याठिकाणी मुद्दे उपस्थित केलेत त्यास काही अर्थ नाही का? शहरात डेंग्यु, मलेरिया व साथीचे आजार वाढत आहेत. आणि त्यांची कारणे काय ही येथे नमुद केलीत. ते शोधण्यासाठी काही बेस ठेवलेला नाही की त्याची कारणे काय? घाणीचे साम्राज्य आहे. डॉ. राजा रिजवानी यांनी सांगितले की आठ मलेरियाचे रुग्ण आहेत, तर त्यांची नावे सांगा की कोण कोण सकारात्मक आहेत? आमच्या श्री. भुल्लर महाराजांचे नाव आहे का त्यामध्ये? मलेरिया सकारात्मक, स्थायी समिती सभापती आहेत ते? आहे का नाव त्यांच्याकडे? जी खोटी माहिती आहे ती तुमच्याकडे आहे आणि ती तुम्ही येथे आम्हांला देत आहेत. डॉ. रिजवानी, आपण संपुर्ण सभागृहाची दिशाभुल करण्याचे काम तुम्ही करत आहेत का? आमचे सदस्य ओरडुन सांगत आहेत की आर्शिवाद हॉस्पीटल आहे ते संपुर्ण रुग्णांनी भरले आहे. सेंट्रल हॉस्पीटल सुध्दा भरले आहेत. किती रुग्ण वारले? आयुक्त साहेब, डेंग्यु किंवा मलेरीया यांनी मृत झालेल्या व्यक्तींचे नाव आहे का तुमच्याकडे? कोण आहे? नाव काय आहे?

<u>डॉ. राजा रिजवानी (वैद्यकीय अधिकारी):–</u>श्री. सतिश पवार, जुना मटन मार्केट उल्हासनगर–४ येथिल व्यक्ती.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>तो कशामुळे मृत्यु पावला.

<u>डॉ. राजा रिजवानी (वैद्यकीय अधिकारी):–</u>डेंग्युचा संशयीत रुग्ण म्हणुन. त्याच्याशी मी संपर्क साधला होता.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>रेणुका सोसायटीत राहणारा अतिउल्ला खान म्हणुन ८ वर्षाचा मुलगा डेंग्युच्या मुळे भाटिया हॉस्पीटलमध्ये वारला. आधी त्यास सेंट्रल हॉस्पीटलमध्ये दाखल केले होते. यामध्ये त्याचे नाव आहे का?

<u>डॉ. राजा रिजवानी (वैद्यकीय अधिकारी):–</u>नाही त्योच नाव नाही.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>सेंट्रल हॉस्पीटलमध्ये नाव नाही.

<u>डॉ. राजा रिजवानी (वैद्यकीय अधिकारी):–</u>जर त्याची तेथे त्यांनी तपासणी केली असेल तर त्याचे नाव असेल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>ही तुमची माहिती आहे. श्रीमती शेळके महोदया बरोबर आहे ना? तुमच्या प्रभागातील रेणुका सोसायटीमधील आठ वर्षाचा मुलगा डेंग्यु मुळे मृत्युमुखी पडतो.

<u>सदस्या श्रीमती सुमन शेळके :–</u>जेव्हा मला माहित पडले तेव्हा डॉ. रिजवानी साहेबांना फोन केला, परंतु तो सेंट्रल हॉस्पीटलमध्ये नव्हता, खाजगी हॉस्पीटलमध्ये होता. त्याच्यामुळे त्यांच्याकडे तो अहवाल नव्हता. जेव्हा मला माहित पडले तेव्हा मी लगेच डॉ. रिजवानी साहेबांना फोन केला की डेंग्युचा रुग्ण आढळला का?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> रेणुका सोसायटीचा मुलगा, याची आपणाकडे माहिती नाही आहे. आपण चुकीची माहिती देता, एकतर माहिती नाही असे सांगा. याचाच अर्थ आपले बरोबर लक्ष नाही. आपले प्राथमिक आरोग्य केंद्र सध्या किती चालु आहेत?

डॉ. राजा रिजवानी (वैद्यकीय अधिकारी):—सहा.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आयुक्त साहेब, उल्हासनगरमध्ये सहा प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. सध्या त्यांची स्थिती काय आहे? त्यापैकी किती चालु आहेत? किती डॉक्टर्स आहेत?

डॉ. राजा रिजवानी (वैद्यकीय अधिकारी):—आमच्याकडे सहा डॉक्टर्स आहेत. त्यापैकी एक डॉक्टर मंत्रालयात प्रतिनियुक्तीवर आहे. एक डॉक्टर तलोजा येथे आहे म्हणजेच सहा पैकी चार डॉक्टर काम करत आहेत. उल्हासनसगर १ येथे साधुबेला शाळा येथे, उल्हासनगर २ येथे नेहरु चौक येथे, उल्हासनगर ३ येथे डॉक्टर मुंबईकर, तसेच उल्हासनगर ५ येंथे सरकारी रुग्णालयातील डॉक्टर प्रतिभा गवईकर, कॅम्प नं. ५ येथिल भाजी मार्केट येथिल डॉ. दिपक शेंडे हे चार डॉक्टर काम करत आहेत बाकी २ डॉक्टरांची प्रतिनियुक्ती केली आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आरोग्य विभागांतर्गत किती कर्मचारी असले पाहिजेत. ज्या शासकिय योजना आहेत, हा संपुर्ण निधी शासकिय आहे. मग तर तुमचा एकात्मिक लोकसंख्या प्रकल्प असू दया. किंवा इतर दुसरा प्रकल्प असु दया. शासनाचा निधी आहे तो आपणांस खर्च करायचा आहे. येथे कर्मचारी वर्ग सुध्दा आमचा अपुरा आहे. त्याबाबतीत आम्ही एवढे गंभीर आहोत. सदस्य सांगतात, तुमच्याकडुन माहितीसुध्दा चुकीची आहे. ती माहिती गोळा करण्याची सुध्दा तुमच्याकडे क्षमता नाही. आमच्या शहरामध्ये रुग्ण किती आहेत? त्याची माहिती नाही आपल्याकडे? त्याच्यावर नियंत्रण आम्ही काय करणार? साधी आणि सरळ उत्तरे मागितली आहेत की आपण जी फवारणी करतो त्यामुळे मच्छरे मरतात काय? तुम्ही किती लिक्वीड टाकतात त्याचे आम्हांला काही घेणे देणे नाही. पण ती फवारणी परिणामकारक होत नाही. तुमच्या धुरामुळे मच्छर मरत नाहीत. एकदा माझ्या प्रभागात धुराची मशिन फिरवली ५० ते ६० तासी वेगाने ती गाडी गेली. काय उपयोग होणार आहे? लोकांच्या समाधानकारासाठी तुम्ही धुर फिरवायचा, लोकांच्या समाधानासाठी पाणी असल्यावर तुम्ही फवारणी करणार आहात. एका झाडावर कर्मचा—याने फवारणी केली, मी तेथे उभे राहिलो आणि म्हटले मच्छर मरत नाहीत, तर तो म्हणाला की, त्यांना चक्कर आल्यानंतर ते मरतात. हे असे कसे औषध आहे, मच्छरला चक्कर येणार आणि त्यात एकाग्रता वाढविली तर माणसांना अपायकाकरक होईल. असे तुम्ही सांगाता अरे मच्छर मरत नाहीत येथे. म्हणजे चक्कर येते आणि मग तो मरणार, तर अशा प्रकारचे कर्मचारी व अशा प्रकारचे औषध हे आपण वापरत आहोत. याबाबत लक्षवेधी केली आहे त्यावर समर्पक उत्तर येणे हे आपले काम आहे. वास्तविक तुम्ही टिप्पणी ठेवावयास पाहिजे होती की याबाबत उपाययोजना काय केली? कर्मचा—यांच्या बाबत सुध्दा त्यांनी उपयोग केलेला आहे. त्यानंतर ट्रक्टरसाठी आपण अनावश्यक खर्च केलेला आहे त्यात सुध्दा त्यांनी लक्षवेधलेले आहे. एका टॅक्ट्रचा खर्च ५२ हजार आहे आणि वर्षाला आम्ही भाडेपोटीसाठी ४० लाख रुपये खर्च करतो. ४ प्रभाग समितीमध्ये ४, किंवा ५ कॅम्पामध्ये ५ टॅक्ट्र घेतले त्या ट्रक्टरचा खर्च पाच त्रिक पंधरा रुपये होईल तो एक ट्रक्टर कमीत कमी पाच ते सहा वर्ष चालेल. अनावश्यक खर्च कसा टळेल तोही मुद्दा या लक्षवेधीत त्यांनी मांडला आहे. प्रत्येक आजार एका प्राण्यांपासुन होतो, जसे लॅप्टोस्पायरासीस कशामुळे होतो तर उंदिरांपासुन होतो. तर डुक्करापासुन स्वाईन फ्लु होतो. १९९९ साली श्री. आर.डी.शिंदे आयुक्त असतांना त्यांनी डुक्कर हटावो मोहिम चालु केली होती आणि ती राबविली त्यावेळी शहरात एकही डुक्कर नव्हते त्याचा परिणाम दुर्गंधी कमी करण्यास झाला होता. म्हणजे एक आयुक्त ही मोहिम राबवितात त्याचप्रमाणे दुसरे आयुक्त का राबवत नाहीत? वारंवार हा विषय महासभेत आला की डुक्कर हटवा मोहिम तुम्ही राबवा. डुक्कर हटत नाही त्याची लोकसंख्या वाढत चालली आहे त्याचा परिणाम आपल्या लोकसंख्येवर होतो. लोक आजारी पडतात. त्यानंतर मुद्दा मांडला कुत्रयांचा तर विधान परिषद व विधानसभेत तो गाजला. जसे डुक्कर वाढत आहेत तसे कुत्रे वाढतात त्यांना लोकसंख्या वाढीचे काही बंधन नाही. ते वर्षानुवर्षे वाढत आहेत. आम्ही निर्बीजीकरणाचा प्रस्ताव पारीत केला आहे. परंतु त्यानंतर काही नाही. रात्री बे रात्री लोकांच्या मागे कुत्रे धावत आहेत. यावर नियंत्रण आणणे हे महापालिकेचे प्रथम कर्तव्य आहे आमच्याकडे कोठे कोंडवाडा नाही. कर्मचारी त्यावर नियुक्त केले आहे परंतु आता कोठे कोंडवाडा आहे? नगरपालिका असतांना जी कर्तव्य नगरपालिका करत होती ती आता महानगरपालिकेचा एवढा मोठा कर्मचारी वर्ग असतांना ती करत नाहीत. एक नगरमुख्य अधिकारी व इतर सर्व कर्मचारी हे सर्व नगरपालिका १३ चौरस किलोमिटरची ते हाताळत होते तेव्हा तर कोंडवाडे सध्दा होते, तेव्हा कुत्री, डुक्करांवर नियंत्रण होते, आता ५० अधिकारी आलेले आहेत असे असतांना कुत्री व डुक्करावर लक्ष नाही. रस्त्यावरील खड्डे बुजविले जात नाहीत. आणि फवारणी, फॉगिंग असूनसुध्दा लेप्टोस्पायरेसीस सारखे रोग होत आहेत. काल तुमची टिप्पणी यावयास पाहिजे होती की आम्ही खबरदारीची उपाययोजना करणार आहोत, सदस्यांनी तुमचे लक्षवेधल्यानंतर त्यांचे आभार प्रकट करा. तुम्ही आयुक्त म्हणुन काल आले परंतु प्रशासनाचे एकत्रित काम, आम्ही सर्व ट्रस्टी

आहोत तुम्ही प्रशासक आहेत, आमचे तुमच्याकडुन काम करुन घेणे कर्तव्य आहे. परंतु आम्ही केलेल्या ठरावांची परिणामकारक अंमलबजावणी करणे हे तुमचे कर्तव्य आहे. आम्ही कोठेही कमी पडलेलो नाही तुम्हांला पाहिजे असलेला निधी दिलेला आहे. तुम्ही ज्या कल्पना दिल्या आहेत त्या आम्ही मंजुर केलेल्या आहेत परंतु त्या कल्पना या थातुरमातुर आहेत, परिणामकारक नाहीत. परिणामकारक उपाययोजना काय करणार यासाठी त्यांनी लक्ष वेधलेले आहे. कृपया याचे उत्तर दया की कुत्रे व डुक्करांवर परिणामकारक उपाय काय करणार, ते हटविणार की नाहीत? आणि आरोग्य विभागाचे जे अधिकारी व कर्मचारी आहेत ते चुकीची माहिती देत आहेत, मागच्या वेळेस सुध्दा असेच झाले होते. डॉ. रिजवानी हे बेजबाबदारपणे काहीही माहिती देतात. ते त्याबाबत गंभीर नाही आहेत. ते महासभेची दिशाभुल करत आहेत. लोकांना दिसत आहे, कळत आहे की प्रत्येक हॉस्पीटल फुल आहेत. डॉ. रिजवानी यांना गांभीर्य नाही, त्यांना समज दया की अशा पध्दतीने बेजबाबदारपणे व बालीशपणे उत्तर देवु नका. प्रत्यक्ष पाहणी करा, सर्व्हे करा, शहरात फिरा, काय आजार आहे? साथ पसरणार ती मुंबईमध्ये आहे, ठाण्यामध्ये आहे, कल्याणमध्ये आहे. ते चुकीचे माहिती देतात, ते बालीश आहेत की आजाण आहेत हे तरी सांगा. हे सांगा की मी भेट देत नाही पण चुकीची माहिती देवुन त्याचा गांभिर्य कमी करु नका. हा गंभीर मुद्दा आहे त्यासाठी आपण काय उपाययोजना करणार ते याठिकाणी सांगा.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u> मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, या लक्षवेधीवर ब–याच प्रमाणावर चर्चा झालेली आहे. आपणांस कळलेच असेल की या मुद्दयावर आमचे सदस्य किती गंभीर आहेत. याठिकाणी दोन विभाग आहेत एक आहे आरोग्य विभाग व दुसरा सफाई विभाग. आयुक्त साहेबांना मी विचारु इच्छितो की, जे आरोग्य अधिकारी आहेत ते सभेत अनुपस्थित असतात, त्यांची जबाबदारी आहे. डेंग्यु, मलेरिया सारखा गंभीर मुद्दा आहे, तेथे आमचे आरोग्य अधिकारी सभेत उपस्थित राहत नाहीत. तर मी आपणांस आग्रह करतो की पुढील महासभेत आरोग्य अधिकारी सभेत उपस्थित असले पाहिजेत. आमच्या सदस्यांनी आपापले वेगवेगळे उदाहरण मांडले की प्रभागात कशा कशा प्रकारे समस्या आहेत. एकीकडे आमचे प्रशासन म्हणते की डेंग्यु व मलेरीयाचे कोणी रुग्ण नाहीत तर दुसरीकडे आपले सदस्य सांगतात की, एवढें एवढे डेंग्युचे रुग्ण आढळले आहेत. वेगवेगळया प्रतिक्रीया आहेत कोणी म्हणते की फार चांगले होत आहे. कोणी सदस्य म्हणतात की काम चांगले होत नाही. मी प्रशासनास आपल्या आयुक्त साहेबांना विनंती करतो की, आमचे जे कामगार आहेत ते ब–याच दिवसापासुन रजेवर असतील तर त्यांना नोटिस देवुन परत त्यांना कामावर हजर होण्यास सांगावे. कारण की हा मुद्दा फार गंभीर आहे. या विषयावर एवढा वेळ चर्चा करणे, तसेच प्रत्येक सदस्यांचे गंभीर्य आपण पाहिले असेल. जसे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की, प्रत्येक प्रभागात २ महिन्यासाठी २५,२५, कामगार आपण ठेवावेत. कारण ब–याचशा वार्डामध्ये कामगार कमी आहेत, मी हे सुध्दा पाहिले आहे की नोकरी एकाची आहे व काम दुसरा येवुन करतो. जर मुकादम व स्वच्छता निरिक्षकांना विचारले जाते तर ते म्हणतात की हा त्यांच्या जागेवर ठेवला आहे. ही कोणाची पेढी नाही की नोकरी एक करतो व काम दुसरा करतो. यावर लक्ष दिले पाहिजे. हा जो विषय आहे, आपण वारंवार वर्तमानपत्रात वाचत असणार, आम्ही सुध्दा वाचतो की शहरात साफसफाई न झाल्यामुळे शहरात रोगराई पसरली आहे. डेंग्यु पसरला आहे, मलेरिया पसरला आहे. भलेही तेथे जास्त लिहितात व सत्यता कमी असु शकते. परंतु हे सत्य आहे, जितके काम व्हावयास पाहिजे ते होत नाही. आमच्या येथे वैद्यकीय आरोग्य अधिकारी आहेत, डॉक्टर्स आहेत, स्वच्छता निरिक्षक आहेत, मुकादम आहेत, जर काम होत नसेल तसेच आम्ही वाचतो की कच–यामुळे रोगराई होते, तसेच जे ठेकेदार आहेत त्यांच्यावर सुध्दा लक्ष दिले पाहिजे त्यांच्याकडुन रोज कचरा उचलला पाहिजे. तसेच जी औषधे आलेली आहेत ते व्यवस्थीत कामास आणली पाहिजेत. कधी कधी असे म्हटले जाते की ब्लिचींग पावडर नाही, हे नाही ते नाही तर पुढे असे होता कामा नये. पावसाळयाच्या दिवसात कुठलेही रोगराई पसरु नये यासाठी प्रशासनाने लक्ष दिले पाहिजे. व येणा–या महासभेत आपण याप्रकारे चांगले काम कराल तर आमचे सदस्य आपली प्रशंसा करणार, आम्ही जे बोललो ते प्रशासनाने केले अशी माझी आशा आहे. आता आयुक्तांनी पदभार स्विकारला आहे तर आपण त्यात लक्ष दयाल, व येणा–या महासभेत सदस्य म्हणतील की आम्ही जे म्हटले ते प्रशासनाने केले आहे, धन्यवाद।

<u>उप–महापौर :–</u>श्री. मोरे साहेब आपण बसुन घ्या.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>दुस–या नगरसेवकांना बोलु दया ना.

<u>उप–महापौर :–</u>आयुक्त साहेब लक्षवेधीवर उत्तर देतील.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मी सांगतो मी दोन मिनिटे बोलतो आहे. सभागृह नेता बोलण्यानंतर आम्ही बोलु नये असा कुठला कायदा आहे?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>श्री. बच्चाराम रुपचंदानीजी आपणांस बोलण्याची संधी दिली गेली आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>श्री. बी.बी. मोरे साहेबांना बोलावण्याची संधी दया.

<u>उप–महापौर :–</u>प्रथम आपणा सर्वांना बोलण्याची संधी दिली आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>कुठे बोललो आम्ही?

<u>उप–महापौर :–</u>जरा शांत रहा.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>तुम्हीच लोक बोला. तुम्हीच सभा चालवा. आम्ही सभागृहात येण्याची गरजच नाही. तुम्ही प्रत्येक वेळेस आम्हांस खाली बसविण्यास सांगा, दुस–यांना बोलु देता. याचा अर्थ काय होतो? आम्हांला का बोलु देत नाहीत तुम्ही?

<u>उप–महापौर :–</u>एकदाच का बोलत नाही तुम्ही? सारखे सारखे उठुन का बोलता? एका विषयावर १० वेळा उठुन बोलायचे नाही, एकदाच बोलायचे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>दुसरे सदस्य स्वत: बोलता तेव्हा?

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>दुसरा विषय घ्या. बस्स झाली चर्चा.

<u>उप–महापौर :–</u>अहो, सन्माननिय चहाळ साहेब, आपणांस बोलायचे असेल ना तर एकदाच उठुन बोला. मेहरबानी करुन नेहमी नेहमी उठुन चर्चा करु नका.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>प्रत्येक सदस्याचे बोलणे दोन दोन मिनीटे चालले आहे त्याप्रमाणे मी बोलायला पाहिजे. सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आणि सन्माननिय सदस्य, आज सन्माननिय सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे यांनी जी लक्षवेधी सूचना मांडलेली आहे तिच्यावर भरपुर चर्चा झालेली आहे. जेव्हा पावसाळा सुरु झाला तेव्हा उप–आयुक्त, आरोग्य यांना मी माझ्या प्रभागात घेवुन गेलो होतो. माझ्या प्रभागात जे तबेले आहेत ते तबेलेवाले पावसाळयात शेण रस्त्यावर टाकतात. ते वाहत जात असतांना त्यावर मोठ मोठे मच्छर बसतात. आणि त्या मच्छरमुळे तो डेंग्यु होतो. असे मी त्यांच्याशी बोललो आहे. त्यावर उप–आयुक्त महोदयांनी काय उपाययोजना केली ते मला विचारायचे आहे.

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):– </u> मा. महापौर महोदया, मा. उप–महापौर महोदय, मा. आयुक्त साहेब, ज्यादिवशी सन्माननिय सदस्य श्री.बी.बी. मोरे यांच्या प्रभागात मी गेले होते त्याच्या दुस–या दिवसापासुनच त्याठिकाणी दंड वसुल करण्याची आपण सुरुवात केली आहे. तो जो तबेलावाला आहे त्याने शेण नाल्यामध्ये टाकु नये त्याअनुषंगाने पहिल्याच दिवशी आपण त्याच्याकडुन ४००० रुपये दंड वसुल केला होता आणि त्यानंतर स्वच्छता निरिक्षक आणि मुख्य स्वच्छता निरिक्षक यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत की, वारंवार त्याच्याकडुन दंड वसुल करण्यात यावा की जेणेकरुन त्याने तो कचरा गटारात टाकु नये. कचरा कचरा कुंडीवर आणुन टाकावा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>त्यानंतर तुमच्या स्वच्छता निरिक्षकाने दंड वसुल केला?

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):– </u> होय.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>बिल्कुल नाही, अजिबात नाही. तुम्ही सांगता ते चुकीचे आहे. मी असतांना तो ४००० दंड तुम्ही वुसल केला. त्याच्यानंतर तुम्ही दंड वसुल केलेला नाही, केला असेल तर पावती दाखवा मी मान्य करेल. त्यानंतर तुम्ही बिल्कुल दंड वसुल केलेला नाही.

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u> मी चौकशी करते. वारंवार त्यांच्याकडुन दंड वसुल करण्याबाबतीत सूचना दिल्या आहेत.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>उप–आयुक्त महोदया, जोपर्यंत या झोपडपट्ट्यांमधील तबेले हटत नाही तोपर्यंत झोपडपट्टीतील रोगराई वाढत राहिल, कमी होणार नाही. डॉक्टर आंबेडकरनगरमध्ये ११ तारखेला मी आरोग्य शिबीर घेतले. त्या शिबीरामध्ये जवळ जवळ ५३४ लोकांनी उपचार घेतले. मला काय म्हणायचे आहे की, शासकिय मध्यवर्ती रुग्णालयात कर्जत कसा–यापासुन हजारो रुग्ण तेथे येतात. कारण दुसरे रुग्णालय नाही. शासकिय रुग्णालय आहे. मला असे म्हणायचे आहे की, आपल्या महानगरपालिकेने एखादे रुग्णालय बांधण्यास हरकत नाही. आपण लाखो, करोडो रुपये खर्च करतो. परंतु रुग्णालय बांधले जात नाही. त्याच्याही पलिकडे सांगतो की कचरा हा वेळेवर उचचला जात नाही. दुसरी गोष्ट म्हणजे, तुम्ही आल्यापासून डीटीटी पावडर मिळत नाही हे मला खास करुन सांगायचे आहे. मलेरिया तेल नाही. याबाबतीत जेव्हा आम्ही स्वच्छता निरिक्षकांकडे विचारणा करतो तेव्हा ते सांगतात की उप–आयुक्त महोदयांनी हे मागविले नाही, महापालिकेने मागिविलेले नाही आणि जे काही साहित्य पुरविण्यात आलेले आहे ते अतिशय निष्कृष्ट दर्जाचे आहे.

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u> हे चुकीचे आहे. कुठलाही स्वच्छता निरिक्षक असे सांगु शकत नाही. आता संगळयांकडे साठा आलेला आहे. सगळयाप्रकारची औषधे आलेली आहे. स्वच्छता निरिक्षकांकडुन मागणी आल्यानंतर ताबडतोब पाठविला जातो.

<u>सदस्य श्री.बी.बी.मोरे :–</u>उप–आयुक्त महोदया, सन्माननिय सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे यांनी लक्षवेधी सूचना टाकली आहे असे जर मला माहित असते ना तर मी तुम्हांला फिनाईलची बाटली आणून दाखविली असती. ते फिनाईल अतिशय काळेसार आहे. जसे गाडीचे वंगन असते तसे. त्याला कोणत्याही प्रकारचा वास येत नाही. त्याचा काही फायदा नाही. त्यामुळे रोगराई वाढणार आहे की कमी होणार नाही.

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u> असे जर कोठे आढळत असेल तर त्याची मी चौकशी करते. आणि त्याच्यावर कारवाई करते.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>प्रत्यक्षात तुम्ही या, उदयाही तुम्हांला मी दाखवेन. आणि त्याचबरोबर मी तुम्हांला माझ्या प्रभागातील साफसफाईचा सर्व्हे करण्यासाठी नेले होते की प्रभागात कशी परिस्थीती आहे?

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u> आपण जो सर्व्हे केला होता तो एका तबेलाचा होता. तबेला हटविणे हे माझ्या हातात नव्हते.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मला केवळ माझ्या प्रभागाबाबतीत म्हणायचे नाही. या शहराचा तुम्ही दौरा करावा, असे मी तुम्हांला बोललो आहे. तुम्ही माझ्या कार्यालयात आला होतात. त्यावेळेस मी तुम्हांला हे सांगितले होते. दौरा केल्यानंतर तुम्हांला लक्षात येईल की कुठे कुठे तबेला, गटार, कचरा...........

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u> मी सगळीकडे सर्व्हेक्षण केलेले आहे. स्वच्छता निरिक्षकांना सांगुन १०० टक्के सर्व्हेक्षण केले आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मी रोज मध्यवर्ती रुग्णालयात जातो पाहतो तर तेथे रुग्ण ठेवण्यास जागा नाही. पेशंटला जमिनीवर ठेवले जातात. अशी परिस्थती मध्यवर्ती रुग्यालयात झाली आहे ती का झाली आहे? परवाच माझ्या बाजुचा गॅरेजमधील एक जवळ जवळ १२ ते १४ वर्षाचा मुलगा मलेरियाने मृत्युमुखी पडला झोपडपट्टीमध्ये अशी परिस्थिती असतांना तुम्ही जास्तीत जास्त लक्ष दिले पाहिजे.

<u>श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):–</u> मी स्वत: फिरत जाईल, स्वत: लक्ष देत जाईल.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :–तुमचे स्वच्छता निरिक्षक काही, काहीही काम करत नाहीत. सरळ सांगातात की उप–आयुक्त महोदयांनी कुठलीही व्यवस्था करत नाही.

श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):– असे जो कोणी स्वच्छता निरिक्षक सांगत असेल त्याची माझ्याकडे लेखी तक्रार करा त्यानंतर त्यास मी विचारणा करते. आपले हे म्हणणे तद्‌ंत चुकीचे आहे की मी जंतुनाशक औषधे मागविलेली नाही. १०० टक्के जंतुनाशके व औषधे आपणाकडे आहेत.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–आम्ही ओरडुन सांगतो म्हणजे, आम्ही महासभेत बोललो म्हणुन नाही. परंतु शहरात काय चालले आहे, शहरात किती रोगराई चालली आहे. हे आम्ही तुमच्या निदर्शनास आणुन देत आहोत.

श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):– माझ्या लक्षात आलेले आहे. परंतु असे झालेले नाही की, पावडर आणि औषधे नाहीत असे काही नाही. जो कोणी स्वच्छता निरिक्षक असे सांगत असेल तर तो पुर्णपणे चुकीच सांगत आहे. त्याच्यावर कारवाई केली जाईल.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–अगोदर जी डीटीटी पावडर येत होती तिचा एवढा काही वास येत असे की आमच्या नाकाला झीणझीणी येत होती. आता जी पावडर तुम्ही मागवितात तिला अजिबात वास नाही.

श्रीम. सगिंता धायगुडे (उप–आयुक्त, आरोग्य):– ठिक आहे त्या अनुषंगाने मी चौकशी करते.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–आयुक्त साहेबांनी, याबाबींकडे कटाक्षाने लक्ष दिले तर बरे होईल. नाहीतर मला तरी असे वाटते की नगरसेवकांना झाडु हाती घ्यावा लागेल किंवा काही गोष्टी करावे लागतील आणि साफसफाई करावी लागेल.

आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):–मला बोलु दया ना.

सदस्य श्री. दत्तात्रय पवार :–आयुक्त साहेब, आता या विषयावर एवढी चर्चा झाली आहे. आता मला पुन्हा विचारायचे आहे की, उप–आयुक्त श्रीमती संगिता धायगुडे महोदया यांना कार्यमुक्त केले आहे किंवा नाही?

यावेळी सदस्या श्रीमती लिलाबाई आाशान, श्रीमती कविता सिरवानी, कु. शकुंतला जग्यासी हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

उप–महापौर :–नाही, त्यांना कार्यमुक्त केलेले नाही. बोलले ना ते?

सदस्य श्री. दत्तात्रय पवार:– आयुक्त साहेब, आपण त्याचे उत्तर दिले तर बरे होईल.

उप–महापौर :–महापौर महोदयांनी सांगितलेले आहे त्यावेळेस आपण नव्हता का?

आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):– आता आरोग्य विषयीची श्री. जीवन इदनानी व श्रीमती जयश्री सुर्वे यांची जी लक्षवेधी सूचना आहे, चर्चेस जेव्हा सुरुवात झाली त्याच्या पार्श्वभुमीवर मी परवा आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर, काल सुट्टी होती, सुट्टी असल्याच्या कारणाने ब–याच लोकांशी संपर्क होवू शकला नाही परंतु काल चार वाजेपासुन रात्री दहा वाजेपर्यंत संपुर्ण शहरात फिरलो, त्यावेळेस आपल्या सदस्यांनी ज्या ज्या काही सूचना केल्या त्या अत्यंत योग्य आणि बरोबर आहे. या लक्षवेधीच्या विषयाला जेव्हा सुरुवात झाली त्यावेळेस डॉ. निना नाथानी यांनी जे मुद्दे व तांत्रिक मुद्दे जे मांडले ते इतके स्पष्ट होते की आमचे अधिकारी उत्तर देवु शकले नाहीत कारण कुठल्याही प्रकारची प्राथमीक बाब त्यांना माहिती नव्हती. त्याचप्रमाणे त्यांनी जंतुनाशकांची माहिती विचारली त्याबाबत आमचे अधिकारी व्यवस्थीत उत्तर देवु शकले नाहीत. जी जंतुनाशके आम्ही आणतो त्याची तपासणी प्रयोगशाळेत केली जाते की नाही ते औषधे किती प्रकारे योग्य व अयोग्य आहे, याची देखील माहिती आम्ही देवु शकलो नाहीत. श्रीमती जयश्री सुर्वे यांनी जी प्राथमिक स्वरुपाची बाब

येथे मांडली, टॅक्टरचा उल्लेख केला त्याची देखील माहिती याठिकाणी देवु शकलो नाही. त्यानंतर श्री. नरेंद्र राजानी यांनी इतके स्पष्ट व साधे सुत्र मांडले की, मलेरीया हा डासांमुळे होतो त्याचा प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन मलेरियाचा डास मारला पाहिजे, कसा मारला जाईल एवढे साधे सुत्र आमच्या विभागाकडुन पाळले जात नाही. आम्ही त्याबाबत अत्यंत दिलगीरी व्यक्त करतो, हे पाळले जात नाही हे मी स्पष्टपणे मान्य करतो. श्री. प्रशांत धांडे यांनी सांगितले की, १३ चौरस किलोमिटरच्या कमी क्षेत्रामध्ये हे काम प्रभावीपणे करणे शक्य होते ते आम्ही करत नाहीत. श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी फॉगिंग मशिन बद्दल जे प्रश्न उपस्थित केले होते त्याला आम्ही उत्तर देवु शकलो नाही. श्री. बागुल साहेबांनी आरोग्य विभागाविषयीचे काही प्रश्न होते व त्यांच्या भागातील कामाची माहिती दिली, त्यांच्या भागात मी काल फिरलो, त्यांना बोलविले नाही. त्याठिकाणी देखील गंभीर परिस्थिती आहे. उल्हासनगरमधील ४ प्रभाग समिती क्षेत्रापैकी एका प्रभाग समितीचे क्षेत्र वगळता तीन प्रभाग क्षेत्रात मी फिरलो तेव्हा आरोग्य विषयाची जी स्थिती आहे ती खरोखर गंभीर आहे. सन्माननिय नगरसेवकांनी जे काही प्रश्न मांडले ते अत्यंत योग्य आहे. आणि सरतेशेवळी श्री. बोडारे साहेब आणि आपले सभागृह नेता यांनी जे प्रश्न मांडले व श्री. बोडारे साहेबांनी काही गोष्टी विचारल्या, आम्ही आरोग्याचा प्रश्न किती गंभीरतेने घेतो हे त्यातुन दिसुन आले. त्यांच्या प्रश्नांना आम्ही कुठलेही उत्तर आपण देवु शकलो नाही. त्याचे खरे कारण असे आहे की आमच्या कामामध्ये कुठल्याही प्रकारचा समन्वय नाही. या सगळया गोष्टी मी मान्य करतो. हा माझा कमीपणा आहे. या गोष्टी जर आम्ही मान्य केल्या नाहीत तर आम्ही सुधारणार नाही. आमच्या आरोग्य विभागाचा आणि वैद्यकीय आरोग्य विभागाचा कुठलाही समन्वय नाही. आज अशी परिस्थती आहे की आमच्या आरोग्य विभागाला वैद्यकीय अधिकारी नाही. मी दोन दिवसापुर्वी जेव्हा कार्यभार स्विकारला तेव्हा आपले वैद्यकीय अधिकारी गैरहजर आहेत. आमचे स्वच्छता निरिक्षक काय काम करतात, ते मी जरी आयुक्त म्हणुन यापुर्वी काम करत नसलो तरी ते मला चांगले माहित आहे. कारण एका वर्षापुर्वी या विभागाच्या कामाचे मी पर्यवेक्षण करायचो. आपल्याकडे कचरा उचलण्यासाठी ठेकेदार आहे त्याच्याबाबतीत अनेक तक्रारी आहेत, ठेकेदार काम करत नाही, ठेकेदाराला जर स्वतंत्रपणे काम करायचे असते तर आम्ही आमचे अधिकारी नेमलेच नसते. आम्ही थेट अमेरिकेसारखा ठेकेदार नेमला असता. आम्ही अधिकारी जे जनतेच्या पैश्यातुन महानगरपालिकेकडुन पगार घेतो ते त्याच्यावर नियंत्रण करु शकत नाहीत. आणि त्याच्यावर कुठल्याही प्रकारचे नियंत्रण नसल्यामुळे शहरामध्ये कचरा पडुन आहे हे शंभर टक्के बरोबर आहे. काल चार वाजल्यापासुन रात्री दहा वाजेपर्यंत आपले स्थायी समितीचे सभापतीदेखील त्याठिकाणी उपस्थित होते. आपले आमदार देखील होते. परिस्थती पाहिली तर अत्यंत गंभीर परिस्थती आहे. या सगळया परिस्थितीवर मी उदयापासुन नाही, आता ही सभा संपल्यानंतर, आरोग्य विभागाचे सगळे अधिकारी, उप–आयुक्त–मुख्यालय, आरोग्याचे उप–आयुक्त, सगळे स्वच्छता निरिक्षक याठिकाणी मला उपस्थित पाहिजेत. मुख्यालयाच्या उप–आयुक्त यांनी ताबडतोब तसे आदेश दयावेत. आता याठिकाणी ही सभा संपल्यानंतर आपणांस काम चालु करायचे आहे. सगळयात महत्वाची गोष्ट अशी आहे की आमचा आरोग्य विभाग व वैद्यकीय आरोग्य विभाग यामध्ये कुठलाही प्रकारचा समन्वय नाही. स्थायी समिती सभापतीं यांचा कालच वाढदिवस झाला ते आजारी असल्याबद्दल मी त्यांना काल भेटावयास गेलो ते मलेरीयाच्या आजाराने प्रभावीत आहेत परंतु त्यांच्याविषयी आमच्याकडे काहीही नोंद नाही. ही सगळयात दुर्देवाची गोष्ट आहे. मी वैद्यकीय अधिका–यांना याठिकाणी आदेश देईल की, ईपीडॅमीक याची जी व्याख्या दिली आहे त्यामध्ये खाजगी आणि सरकारी दोन्ही दवाखान्यांचा सर्व्हे करायचा आहे, मला वाटते श्री. राजानी साहेब तुम्हांला माहित असेल, हा करायला पाहिजे, परंतु तो होत नाही. आणि आम्ही जर फक्त सरकारी आकडयांवर विसंबुन राहिलो. सरकारी आकडयांमध्ये मी पाहिजे १० मलेरिया, आणि ११ डेंग्युने प्रभावीत रुग्ण आढळुन आले आहेत, एवढाच अहवाल माझ्याकडे आहे. प्रत्यक्षात १४४६ लोक या शहरामध्ये मलेरियाने बाधीत आहेत. डॉ. निना नाथानी यांनी ही माहिती अगती प्रभावीपणे घेतलेली आहे. त्या म्हणत होत्या की प्रत्यक्षात १४४६ रुग्णांची संख्या आहे व आपल्या महापालिकेने फक्त २१ संख्या काढलेली आहे. ही अत्यंत दुर्देवाची गोष्ट आहे. आणि दुसरी गोंष्ट म्हणजे आरोग्य विभागाच्या सभापती यांनी हा लक्षवेधी सुचनेद्वारे हा प्रश्न येथे मांडला आहे, याचाच अर्थ प्रशासनाचा किती नाकर्तेपणा आहे, याचा उल्लेख करण्यासाठी आमच्याकडे शब्दच नाहीत. तीन, चार मुद्दे मी लिहुन घेतले आहे. आपण विविध महापालिकांच्या बातम्या वाचत असाल. त्याबाबतीत माझे असे मत आहे की, याठिकाणी सर्व सदस्य उपस्थित आहेत, आर्थिक दृष्टया निर्णय घ्यायचा आहे. प्रत्येक प्रभागासाठी फॉगिंगमशिनची व्यवस्था करावी. त्यासाठी जे काही आदेश लागतील ते आदेश देण्यात येतील. प्रत्येक फवारणीसाठी आयुक्त म्हणुन मी स्वत: जाणार. प्रत्येक ठिकाणी फवारणी होते की नाही हे पाहणार, त्यासाठी कोणाच्या अहवालावर विसंबुन राहणार नाही. ही सभा संपल्यानंतर त्याची मी सुरुवात करणार आहे. ब–याचठिकाणी कचरा उचलला जात नाही असे ब–याच सदस्यांनी सांगितले, श्री. सतिश चहाळ यांचे बरेच प्रश्न आहे, श्री. मोरे साहेबांचेही बरेच प्रश्न आहेत. कचरा ज्याठिकाणी उचलला जात नाही तो का उचलला

जात नाही, श्री. बोडारे साहेब आपणांस माहित असेल, दिड वर्षापुर्वी याठिकाणी अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. जो कचरा उचलला जात नसेल तो आपण आपल्या विभागामार्फत उचलायचा. ठेकेदार जर कचरा उचलत नसेल तर त्याच्या देयकातुन याबाबतची रक्कम कपात करुन घ्या. कचरा जर चार दिवसात उचलला गेला नाही तर अधिकारी घरी पाठविले जातील. आणि सभागृहाने यासाठी मला सहकार्य करा. डुक्कर हटाओची जी मोहीम आहे ती श्री. आर.डी. शिंदेच्या काळात राबविली गेली होती. श्री. आर.डी. शिंदेच्या काळात मी काम केले आहे, डुक्कर हटावोची मोहिम शंभर टक्के होईल. डुक्कर हटविले नाही तर अधिकारी हटविले जातील. मी कित्येकवेळा सांगितले की आमचा आरोग्य विभाग व वैद्यकीय आरोग्य विभाग यांच्यात समन्वय नाही, तो समन्वय साधुन, आम्ही कशा प्रकारचा समन्वय करत आहोत याचा तक्ता सर्व सदस्यांना देण्याचा प्रयत्न करु. हा आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहोत. त्याची सुरुवात या सभेनंतर आम्ही करणार आहोत. याठिकाणी आज रात्री बारा वाजेपर्यंत काम होईल. जेवढे शक्य होईल तेवढे नागरीकांचे प्रश्न आम्ही सोडवु. कोणीही, कुठलाही अधिकारी फुकट काम करत नाही. पुर्णपणे पगार घेतो. पगाराचे उत्तर दायित्व म्हणुन काम केले पाहिजे. आणि जर आम्ही आरामात फिरत असु आणि शहरातील नागरीक जर कुठल्याही आजाराने त्रस्त असतील, १४४६ लोक जर आजारी असतील तर याठिकाणी असे राहणार नाही, कुणाचीही गय केली जाणार नाही. कुठलेही अधिकाारी राहणार नाही, अत्यंत कडक कारवाई करुन निलंबनापर्यंत कारवाई केली जाईल. याची मी तुम्हांला ग्वाही देतो. परंतु याबाबतीत मला सभागृहाने सहकार्य केले पाहिजे आणि ही लक्षवेधी सूचना मांडल्याबद्दल श्री. जीवन इदनानी व श्रीमती जयश्री सुर्वे यांचे मी खरोखर आभार मानतो. त्या विभागाच्या सभापती असून देखील त्यांनी ही लक्षवेधी सूचना मांडली आणि याची मी माझ्या पध्दतीने काम करणार आहे. कदाचित आमच्या अधिका–यांना त्यामुळे त्रास होणार आहे. यामध्ये कुणाला घरी बसवावे लागेल. त्याची कुठल्याही प्रकारची गय केली जाणार नाही. आणि युध्द पातळीवर काम केले जाईल. श्री. लाल पंजाबी साहेबांनी सांगितले की, युध्द झाले तर सर्व घरात बसत नाहीत. आता रोगराई विरुध्द युध्द सुरु झाले आहे. आता कोणीही घरी बसायचे नाही. जो घरी बसेल त्याला कार्यमुक्त केले जाईल. आणि आजपासुनच मी माझ्या पध्दतीने कामाला सुरुवात करणार आहे. सर्वात प्रथम मी सर्वांची माफी मागतो. दोनच दिवसापुर्वी मी कार्यभार स्विकारला असल्याने मला याबाबतची टिप्पणी काहीही करता आले नाही. आणि दुसरी महत्वाची गोष्ट अशी की महासभा आणि स्थायी समिती यांमध्ये कुठलाही अधिकारी हजर नसेल तर अत्यंत महत्वाच्या कारणाच्या व्यतिरिक्त तर त्याच्यावर गंभीर कारवाई केली जाईल. शासनाचा अधिकारी असेल तर शासनाकडे परत पाठविण्याची गंभीर कारवाई केली जाईल याची मी तुम्हांला ग्वाही देतो. धन्यवाद।

यावेळी सदस्या श्रीमती लिलाबाई आाशान, श्रीमती कविता सिरवानी, कु. शकुंतला जग्यासी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :</u>–मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, या लक्षवेधीचा जो मुख्य झोत होता तो फवारणी विषयीचा ४ ट्रक्टरबाबत होता. ज्याची आपणांस दरपत्रके दिली आहेत त्याबाबत आपण काय निर्णय घेतला?

<u>उप–महापौर :</u>–मा. महापौरांच्यावतीने मी आयुक्त साहेबांना निदेर्शित करतो की, आपण भाडयाने जे टॅक्टर घेतो त्याऐवजी आपण भाडयाने न घेता स्वत:च्या मालकीचे टॅक्टर खरेदी करावे. व दुसरे असे की यावेळेस कुठल्याही अधिकारी, कर्मचारी, मुकादम, स्वच्छता निरिक्षक या कुणालाही रजा मंजुर करु नये. कोणीही रजेवर जाणार नाही.

<u>सदस्य श्री. राम पारवानी :</u>–मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, व सचिव साहेब, आयुक्त साहेबांनी अतिशय चांगल्या प्रकारचे आश्वासन दिल्याबद्दल त्यांना धन्यवाद देवु इच्छितो. व त्यांचे अभिनंदन करतो. आणि दुसरे असे की श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक प्रभागात २५,२५ कामगार घेतले तर फार बरे होईल. त्याचबरोबर तातडीच्या कामासाठी जे कामगार घेण्यात आले आहेत, ते पुन्हा दिले जावेत कारण की अगोदरच प्रत्येक प्रभागामध्ये कामगार कमी आहेत.

<u>आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):</u>–मला क्षमा करा, मी हा मूद्दा आधीच लिहिला होता., उप–आयुक्त आरोग्य व उप–आयुक्त मुख्यालय यांनी कर्मचा–यांबाबत जो मुद्दा सांगितलेला आहे, ठेकेपध्दतीने ताबडतोब

कर्मचारी घ्या व ठेकेपध्दतीने ताबडतोब युध्दपातळीवर काम करा. त्याच्यासाठी कुठलीही मान्यता लागत असेल तर ती दयायला मी तयार आहे.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

<u>**विषय क्र. २ :–**</u> मागील सभेचे दिनांक १८/६/२०१० (त्यात दिनांक १२/७/२०१०) व १९/७/२०१० रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :–</u>मा. महापौर महोदया, उप–महापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब एक मिनिट, १० महिने झालेत श्री. सोनु ठेकेदारास अजुनपर्यंत काळया यादीत का टाकण्यात आलेले नाही?

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, प्रत्येक महासभेसमोर सन्माननिय माजी महापौर यांनी जो प्रश्न याठिकाणी मांडलेला आहे. ज्या ठेकेदाराच्या चुकीमुळे, नाकर्तेपणामुळे किंवा हलगर्जीपणामुळे म्हणा, किंवा जाणुनबुजुन म्हणा, महापौरांच्या दालनामध्ये जी गळती होत होती, त्याच्या निषेधार्थ त्या आयुक्तांच्या कार्यालयाबाहेर बसल्या होत्या. त्यांनी त्याठिकाणी निषेध व्यक्त केला. तत्कालीन मा. आयुक्त श्री. बागेश्वर साहेबांनी त्यांना आश्वासन दिले होते की, त्या ठेकेदाराला काळया यादीत टाकु म्हणुन. परंतु तसे झाले नसल्यामुळे त्या प्रत्येक महासभेत इतिवृत्त कायम करण्याअगोदर उभ्या राहुन त्याची आठवण करुन देतात. परंतु आजपर्यंत त्या ठेकेदाराला काळया यादीत का टाकले नाही? त्याला काळया यादीत टाकण्यात यावे. त्याला काळया यादीत टाकण्याऐवजी त्याला आणखी कामे दिली जात आहेत. त्या ठेकेदारावर एवढे पांघरुन घालण्याची प्रशासनाला काय आवश्यकता होती? आपण नविन आला आहात. सभागृहातील आपले संभाषण ऐकुन मला असे वाटते, अधिका–यांचे धाबे दणाणले आहेत. आणि आपण आजपासुनच कार्य करण्याची आम्हांला जी श्वासती दिलेली आहे मी आपणांस याठिकाणी मुद्दामहुन आठवण करुन देईल की २००५ च्या महापूरामध्ये असेच कार्य तत्कालीन मा. आयुक्त श्री. रामनाथजी सोनावणे यांनी केले होतें. तेच कार्य तुम्ही करणार आहात. असे आपण आम्हां सर्वांना याठिकाणी आश्वासन दिले आहे. त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. परंतु तत्पुर्वी त्या ठेकेदारावर कडक कारवाई झाली पाहिजे. अशी याठिकाणी आपणाला विनंती करतो. धन्यवाद।

<u>आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):–</u>मा. महापौर महोदया, आता जो प्रश्न विचारला आहे, त्याबद्दल आपण सांगितले की, मागे याबाबतीत कुठलेतरी आश्वासन दिले होते तर त्याबददलची माहिती घेतो आपणाबरोबर प्राथमिक चर्चाही करता येईल. आणि जे आश्वासन दिले होते त्याचा कालखंड लक्षात घेता कुठलीही कारवाई करतांना काही कायदेशीर अडचण येवु नये तसेच ती काय वस्तुस्थिती आहे त्याची माहिती घेवुन त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला जाईल. आणि या उपरोक्तही त्यांचे समाधान होत नसेल तर सन्माननिय महापौर महोदया व उप–महापौर यांच्याबरोबर चर्चा करुन अंतिम निर्णय घेण्यात येईल.

यावेळी सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर, श्रीमती सुजाता रिजवानी, श्रीमती निलु चांदवानी, श्रीमती मंजु पोपटानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> मागील सभेचे दिनांक १८/६/२०१० (त्यात दिनांक १२/७/२०१०) व १९/७/२०१० रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. २ :–** दिनांक १८/६/२०१० (त्यात दिनांक १२/७/२०१०) व १९/७/२०१०

रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. बच्चाराम रुपचंदानी
अनुमोदकाचे नाव : श्री. प्रभुनाथ गुप्ता

**महासभा ठराव क्र. २९ ब** **दिनांक : २०/८/२०१०**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक १८/६/२०१० (त्यात दिनांक १२/७/२०१०) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ७० पर्यंतचे इतिवृत्त व दिनांक १९/७/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ४५ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर, श्रीमती सुजाता रिजवानी, श्रीमती निलु चांदवानी, श्रीमती मंजु पोपटानी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३:—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात कार्यरत अधिकारी व कर्मचा—यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे.

---

यावेळी सदस्या/सदस्य श्रीमती संगिता कंडारे, श्रीमती जया माखिजा, श्री. रमेश चव्हाण, श्री. महेश सुखरामानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात कार्यरत अधिकारी व कर्मचा—यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या आग्निशमन विभागामध्ये सध्या असलेली एकूण पदे त्यांचे पदनाम वेतनश्रेणी इत्यादीबाबत सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदनाम | एकूण पदे | ५ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी | ०१ | रू.४०००—१००—६००० | रू. ५२००—२०२००<br>ग्रेड वेतन २४०० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | ०२ | रू.४०००—१००—६००० | रू. ५२००—२०२०० ग्रेड वेतन २४०० | |
| ३ | उपस्थानक अधिकारी | ०६ | रू.४०००—१००—६००० | रू. ५२००—२०२०० ग्रेड वेतन २४०० | |
| ४ | लिडींग फायरमन | १४ | रू.३२००—८५—४९०० | रू. ५२००—२०२००, ग्रेड वेतन २००० | |
| ५ | फायरमन | ६० | रू. २७५०—७०—३८०० ७५—४४०० | रू. ५२००—२०२००, ग्रेड वेतन १८०० | |

नगर विकास विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकिर्ण —१००५/वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५/नवि—२४, दिनांक ४ मे, २००६ राज्यातील महापालिकांचे वर्गीकरण आणि ३८ अधिकाऱ्यांची पदांची संख्या निश्‍चित केलेली आहे. सदर आकृतीबंधाप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका ''ड'' वर्ग महानगरपालिका दर्शविलेली असुन त्यामध्ये अग्निशमन विभागातील पदांचा तपशिल पुढीलप्रमाणे दिलेला आहे.

| अ.क्र. | पदनाम | एकूण पदे | ५ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी | ०१ | रू. ८०००—२७५—१३५०० | रू. १५६००—३९१०० ग्रेड वेतन ५४०० | |
| २ | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | ०१ | रू. ६५००—२००—१०५०० | रू. ९३००—३४८०० ग्रेड वेतन ४४०० | |

तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या नजिकच्या ''ड'' वर्ग असलेल्या मिरा—भाईंदर महानगरपालिकामध्ये अग्निशमन दलामध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची वेतनश्रेणीची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदनाम | शासन निर्णय क्र.मिभामनपा—११०६/२००६/प्र.क्र. १८ /०६/नवि २६, दिनांक २० जून २००३ अन्वये वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी | |
| २ | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | |
| ३ | स्टेशन ऑफिसर | ६५००—१०५०० |
| ४ | सहा. स्टेशन केंद्र अधिकारी/ उपस्थानक अधिकारी | ५०००—८००० |
| ५ | लिडींग फायरमन | ४०००—६००० |
| ६ | फायरमन | ३०५०—४५९० |

उपरोक्त नमुद दिनांक ४ मे, २००६ च्या शासन निर्णयामध्ये दर्शविलेल्या वेतनश्रेणी व मिरा— भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना लागू केलेली वेतनश्रेणी व उल्हासनगर महागनरपालिकेमध्ये अग्निशमन विभागातील अधिकारी/कर्मचारी सध्या यांची असलेली वेतनश्रेणी उचित वाटत नाही. अग्निशमन विभागातील पदोन्नतीच्या संधी चढत्याश्रेणीप्रमाणे ''उपस्थानक अधिकारी'' या पदावरील कार्यरत कर्मचाऱ्यांना ''उप मुख्य अग्निशमन अधिकारी'' या पदावर आणि ''मुख्य अग्निशमन अधिकारी'' या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना मुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर पदोन्नतीची संधी उपलब्ध आहे. तथापि, सध्या उपरोक्त नमुद तीनही पदांना एकच वेतनश्रेणी निश्‍चित केलेली आहे. अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचारी यांचेवरील जोखमीच्या कामाची जबाबदारी व कर्तव्याचे स्वरूप पहाता त्यांचे सध्याचे वेतनावरील तफावत व त्रृटी दुर करणे उचित आहे.

अग्निशमन विभागातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना पुढीलप्रमाणे सुधारीत वेतनश्रेणी प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | पदनाम | एकूण पदे | ५ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य अग्निश्मान अधिकारी | ०१ | रू. ८०००—२७५—१३५०० | रू. १५६००—३९१०० ग्रेड वेतन ५४०० | |
| २ | उप मुख्य | ०२ | रू. ६५००—२००—१०५०० | रू. ९३००—३४८०० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अग्निश्मान अधिकारी | | | ग्रेड वेतन ४४०० | |
| ३ | उपस्थानक अधिकारी | ०६ | रू. ५०००—१५०—८००० | रू. ९३००—३४८०० ग्रेड वेतन ४२०० | |
| ४ | लिडींग फायरमन | १४ | रू.४०००—१००—६००० | रू. ५२००—२०२००, ग्रेड वेतन २४०० | |
| ५ | फायरमन | ६० | रू. ३०५०—७५—३९५०—८०—४५९० | रू. ५२००—२०२००, ग्रेड वेतन १९०० | |

उपरोक्त नमुद प्रस्तावित सुधारीत वेतनश्रेणी लागू करणेबाबत मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ३० दिनांक:— २०/८/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे व शासन मंजुरीस अधिन राहुन उल्हासनगर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचा—यांना उक्त नमुद केलेली सुधारीत वेतनश्रेणी लागु करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी सदस्य / सदस्या श्री. तुलसीदास वसिटा, श्री. मोहन साधवानी, श्रीमती सुजाता रिजवानी, श्रीमती निलु चांदवानी, श्रीमती सुरेखा वेलकर, श्रीमती मंजु पोपटानी, कु. शकुंतला जग्यासी, श्रीमती कविता सिरवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

महापालिका सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ४ :—** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या थकित असलेल्या रक्कमेवर विलंब आकार माफी प्रयोजनार्थ सुधारीत निर्भय योजनेत सहभागासाठी मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४:—** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या थकित असलेल्या रक्कमेवर विलंब आकार माफी प्रयोजनार्थ सुधारीत निर्भय योजनेत सहभागासाठी मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरासाठी सध्या अस्तित्वात असलेली पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने खुल्या बाजारातुन व आर्यविमा महामंडळाकडुन कर्ज उभारणी केली होती. सदर कर्जाची परतफेड महानगरपालिकेमार्फत निधिच्या उपलब्धतेनुसार करण्यात येते. त्यामुळे या थकबाकीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. सदर कर्जाची परतफेड स्थानिक स्वराज्य संस्थांना सुलभतेने करता यावी, यासाठी दंडनिय व्याज आकारण्यात येते. त्यामुळे या थकबाकीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. सदर कर्जाची परतफेड स्थानिक स्वराज्य संस्थांना सुलभतेने करता यावी, यासाठी दंडनिय व्याज माफीसाठी शासनाने प्रथम ''निर्भय योजना'' मंजुर केली होती. परंतु या योजनेप्रमाणे एकाच वेळी अनेक कर्जाची मुळ मुद्दल रक्कम परतफेड करणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक क्षमतेमुळे अवघड झाल्यामुळे ''सुधारित निर्भय योजना'' शासनाने मंजुर केली. या योजनेची मुळ मुदत दिनांक १/८/२००८ ते ३१/७/२००९ अशी होती. सदर कालावधीत विविध कारणास्तव स्थानिक स्वराज्य संस्थांना या योजनेत सहभाग घेता न आल्याने शासनाने संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये या योजनेस दिनांक ३१/७/२०१० पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

या योजनेचा लाभ घेवू इच्छिणा—या स्थानिक स्वराज्य संस्थांना दिनांक ३०/६/२०१० पर्यंत संमती पत्रासह आपले नाव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयाकडे नोंदविणे आवश्यक आहे. या योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) ही योजना दिनांक ३१/७/२०१० पर्यंतच लागु राहिल.

२) या योजनेचा लाभ घेवू इच्छिणा—या ग्राहकांनी दिनांक ३०/६/२०१० पर्यंत संमतीपत्रासह आपले नाव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे नोंदविणे आवश्यक आहे.

३) थकित रक्कमेबद्दल आक्षेप/शंका असल्यास ग्राहकांनी दिनांक ३०/६/२०१० पर्यंत त्यांचे थकित असलेल्या रक्कमेचा ताळमेळ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयात पुर्ण करुन घ्यावा.

४) एकदा या योजनेत प्रविष्ठ झाल्यावर या योजनेतुन बाहेर पडता येणार नाही.

५) दिनांक १/८/२००८ पर्यंतची मुळ थकबाकीची रक्कम एक रक्कमी भरल्यास दिनांक १/८/२००८ रोजी देय असलेली विलंब आकाराची संपुर्ण १०० टक्के रक्कम माफ करण्यात येईल.

मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र. मजीप्रा/विवले—१/सुनियो/२००८—२००९/१३, दि.०२/०८/२००८ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेकडे कर्जाच्या थकबाकीचा तपशिल खालीलप्रमाणे कळविला आहे.

| अ.क्र. | कर्जाचा प्रकार | मुद्दल (रुपये) | व्याज (रुपये) | 'शासन हमी फी (रुपये) | त्यावरील दंडनीय आकार (रुपये) | दंडनीय व्याज (रुपये) | एकुण (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आर्युविमा कर्ज | १,१७,९२,९५५ | २,४९,९७,४१९ | ४६,९३,३८० | १९,८९,२०८ | १,०७,१४,६३६ | ५,४१,५७,५९८ |
| २ | खुल्या बाजारातील कर्ज | ७,६५,००,००० | ५,५३,९०,१७१ | — | — | १४,०५,१०,०५५ | २७,१४,००,२२६ |
| ३ | प्रकल्प कर्ज | ८,७७,७७,०६४ | ४,२९,५२,०३८ | — | — | ६,८९,२९,५२९ | १९,९६,५८,६३१ |
| एकुण | | १७,६०,७०,०१९ | १२,३३,३९,६२८ | ४६,९३,३८० | १९,८९,२०८ | २२,०१,५४,२२० | ५२,६२,१६,४५५ |

संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये उपमुख्य लेखा अधिकारी १) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई यांनी दि. ०१/०८/२००८ पर्यंतची वरील पैकी खुल्या बाजारातील कर्जाची थकबाकी खालीलप्रमाणे कळविली आहे.

| | |
|---|---|
| मुद्दल | — रु. ७,६५,००,०००/— |
| व्याज | — रु. ५,५३,९०,१७१/— |
| दंडनिय व्याज | — रु.१४,०५,१०,०५५/— |
| **एकुण** | **— रु.२७,२४,००,२२६/—** |

निर्भय योजनेत सहभाग घेवुन मुद्दल व व्याजाची एकुण रक्कम रु.१३,१८,९०,१७१/— अदा केल्यास दंडनिय व्याज रु.१४,०५,१०,०५५/— पुर्णपणे माफ करण्यात येईल, असे कळविले आहे.

याप्रमाणे विलंब आकार माफी योजनेत भाग घेवुन रु.१३,१८,९०,१७१/— इतकी रक्कम दि. ३०/०७/२०१० पर्यंत एक रकमी भरल्यास दंडनिय व्याज रु.१४,०५,१०,०५५/— पुर्णपणे माफ करुन घेणे महानगरपालिकेच्या दृष्टीने हिताचे होईल. सदर दंडनिय व्याज माफ करुन घेण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत महासभेचा ठराव पारीत करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविणे आवश्यक आहे. त्याकरिता या योजनेच्या अटी व शर्ती मान्य करुन या योजनेत सहभागी होऊन मुळ मुद्दल व व्याजाची रक्कम रु.१३,१८,९०,१७१/— महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे एक रकमी भरण्याच्या प्रस्तावास मा. महासभेची मंजुरी मिळणे आवश्यक असल्याने मा. महासभेच्या मंजुरीसाठी सादर.

महासभा ठराव क्र: ३१ दिनांक:— २०/८/२०१०

सुचकाचे नाव :— श्रीमती वसुधा बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती सुमन शेळके

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या थकित असलेल्या रक्कमेवर विलंब आकार माफी प्रयोजनार्थ सुधारीत निर्भय योजनेत सहभागासाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी सदस्य / सदस्या श्री. मुकेश तेजी, श्रीमती नेहा भोईर, श्रीमती जयश्री पाटील हे सभागृहातुन बाहेर गेले.

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :**—श्री. जयप्रकाश एस. चर्तुर्वेदी, लिपिक, कर विभाग यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करणे

---

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—शासन निर्णयानुसार?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—सन्माननिय महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, विषय क्र. ५ श्री. जयप्रकाश एस. चर्तुर्वेदी, लिपिक, कर विभाग यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करणे, त्यांचा जो आजार आहे, तो शासन निर्णयातील पाच गंभीर आजारांमध्ये मोडतो, त्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सकांकडुन आपण त्यांचे प्रमाणपत्र घेतलेले आहे. त्यानुसार अनुज्ञेय आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :— सन्माननिय महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, जे लिपिक आहेत, ज्यांना समजते ते अशा प्रकारचा ठराव आणतात. पाणी पुरवठा विभागाचा एक वॉल्वमॅन आहे. सायकलवर

फिरल्यामुळे त्याच्या दोन्ही हड्डी घासल्या गेल्या त्यामुळे त्यावर शस्त्रक्रिया करणे आवश्यक आहे. श्री. स्वामी असे त्याचे काहीतरी नाव आहे. अशा प्रकारे चतुर्थश्रेणी कर्मचा–यांचे प्रस्तावही आणा. पाणी पुरवठा विभागाकडुन या कर्मचा–याचा प्रस्ताव खास करुन मागवुन घ्या. तसे असतांनाही तो कर्मचारी सायकलवर फिरतो आणि वॉल ऑपरेटींग करतो. तो लालचक्की या विभागामध्ये काम करतो. पाणी पुरवठा विभागातील अधिका–यांना विनंती आहे की, पुढच्या महासभेत त्याच्याविषयीचा प्रस्ताव आणला जावा. औषधाविना उपचाराविना आयुष्य बरबाद होईल.

<u>सदस्य श्री. दत्तात्रय पवार :–</u>आयुक्त साहेब, यापुर्वी मी तुम्हांला प्रश्न विचारला होता की, आपल्या आरोग्य विभागाच्या उप–आयुक्त श्रीमती संगिता धायगुडे महोदया, यांना कार्यमुक्त केले आहे की नाही? त्याचे आपणाकडुन आम्हांला उत्तर अपेक्षित होते. कृपया आपण ते उत्तर दया.

<u>उप–महापौर :–</u>सन्माननिय सदस्य श्री. पवार साहेबांवर खुप ताण आलेला आहे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u>आदरणीय महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, आरोग्य विभागाच्या उप–आयुक्त श्रीमती संगिता धायगुडे महोदया यांची कलासंचालनालय येथे सहसंचालक या पदावर बदली झाली होती. परंतु त्याबाबत सुरुवातीला नगरविकास विभागाचे आदेश नव्हते. नगरविकास विभागाने जुनमध्ये आदेश दिले. परंतु त्यावेळेस पावसाळयापुर्वीची नाले सफाई वगैरेची कामे करायची असल्यामुळे आपण त्यांना ठेवुन घेतले. दरम्यान त्यांची तिकडची नियुक्ती रद्द झालेली आहे. त्याप्रमाणे आपण शासनाला जो अहवाल दयायचा आहे तो दिलेला आहे. त्यांना मध्ये १४ जुलैला आपण कार्यमुक्त केले होते. त्यानंतर त्यांनी आपल्याकडे विनंती केली की, त्यांची तिकडचा बदली आदेश रद्द झालेला आहे आणि माझा येथिल कार्यकालावधी पुर्ण झालेला नाही यासाठी कृपया मला येथुन कार्यमुक्त करु नये. १४ जुलै रोजी आपण त्यांना कार्यमुक्त करण्याचे आदेश काढले होते. शासनाला याबाबत आपण कळविलेले आहे.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५:–** श्री. जयप्रकाश एस. चर्तुर्वेदी, लिपिक, कर विभाग यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये श्री. जयप्रकाश एस. चर्तुवेदी, लिपिक कर विभाग यांनी त्यांच्या स्व:ताच्या हृदय विकाराच्या शस्त्रक्रिया या उपचारासाठी रुपये १,६९,३९६/:– (एक लाख ऐकोसत्तर हजार तीनसे शायन्नव रुपये) एवढी रक्कम मिळणेबाबत विनंती अर्ज दिनांक २८/०४/२०१० रोजी केला आहे.

श्री. जयप्रकाश एस. चर्तुवेदी, लिपिक यांना हृदय विकाराच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी सुराणा हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटर, चेंबर मुंबई येथे दिनांक २३/१०/२००९ ते दिनांक २६/१०/२००६ पर्यंत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रुपये १,६९,३९६/– (एक लाख ऐकोसत्तर हजार तीनसे शायन्नव रुपये) इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी दिनांक २८/०४/२०१० च्या अर्जान्वये वैद्यकीय परवाना मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

महासभा ठराव क्रमांक ९० दिनांक १०/०९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुबियांना तातडीच्या आजारावर उपचारासाठी करण्यात आलेलया खर्चाची प्रतीपुर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय (१) उपमार्गसाचक, हृदयशस्त्रक्रिया (२) मुत्रपींड रोपण (३) रक्ताचा कर्करोग (४) हृदयवरील शस्त्रक्रिया करण्यात

आलेल्या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकीय रुग्णालयाकडून अंकित करण्यात येणाऱ्या अंदाजित खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, श्री. जयप्रकाश एस. चर्तुवेदी, लिपिक कर विभाग यांनी त्यांच्या स्व:ताच्या हृदय विकाराची शस्त्रक्रिया सुराणा हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटर, चेंबुर मुंबई येथे करण्यात आली आहे. तरी श्री. जयप्रकाश एस. चर्तुवेदी, लिपिक कर विभाग यांना रुपये १,६९,३९६/— (एक लाख ऐकोसत्तर हजार तीनसे शायन्नव रुपये) एवढी रक्कम मंजुर करणेकामी मा. महासभेपुढे मान्यमा मिळणेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ३२ <u>दिनांक:— २०/८/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. जयप्रकाश एस. चर्तुर्वेदी, लिपिक, कर विभाग यांना हृदयशस्त्रक्रिया या उपचारासाठी अनुज्ञेय असलेली वैद्यकीय खर्चा पोटीची रुपये १,६९,३९६/— प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६** :— वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत १४ सफाई कामगारांचे वारसास नियुक्ती देणे.

---

<u>**सदस्य श्री. राजेश वधारिया :—**</u>मा. महापौरजी, एक मिनिट सचिव साहेब, .....................

<u>महापालिका सचिव :—</u>वशिला पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतचा विषय आहे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब आणि सर्व सन्माननिय सदस्य, सन्माननिय सदस्यांनी विचारलेल्या कामगारांच्या संदर्भात सांगु इच्छितो की, कामगारांचे वारसास नियुक्ती देण्यासंदर्भात मागच्या महासभेला हा विषय येवुन गेला होता. त्यांना सेवा निवृत्त करावे याबाबतीत आपण त्यांना मंजुरी दिलेली आहे. त्यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र आपण घेतलेले आहे त्यामुळेच आपण त्यांना निवृत्त केलेले होते. ज्यावेळेस हा विषय महासभेत आला होता, त्यांना आपण सेवानिवृत्त केले आहे. आता त्यांच्या वारसांना नियुक्त देण्याचा विषय आहे. त्यांना सेवा निवृत्त केले त्यावेळेस आपण त्यांच्याकडुन वैद्यकीय प्रमाणपत्र घेतलेले आहे.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>मा. महापौर व आयुक्त साहेब, या संदर्भात माझी आपणांस एक विनंती आहे. आपण ज्यांना सेवानिवृत्ती देतो त्यांच्या वारसांना नियुक्ती देतो. त्या वारसांची कमित कमी वय व महानगरपालिकेत नोकरी करण्याची पात्रता असली पाहिजे. एवढी नोंद त्या परिच्छेदात घेतली तर बरे होईल. कारण उदया असे होता कामा नये की तो माणुस चाळीस पंच्येचाळीस वर्षाचा असावा, पाच दहा नोकरी केल्यानंतर त्याच्या वारसाने नोकरी मागावी, त्यासाठी त्याचे वय आणि त्याची पात्रता वैद्यकीय तपासणी करुन घेतलेली बरे होईल. अशी माझी आपणासर्वांना विनंती आहे. हे शक्य आहे का? मी आपणांस विचारु इच्छितो, मा. आयुक्त साहेब, वारसा हक्काने आपण ज्यांना नोकरी देतो, त्याबाबत आपण कायदयाप्रमाणे कार्यवाही करत असाल ते बरोबर आहे परंतु त्यांची वय यामध्ये लिहिली, ते काम करण्यास योग्य आहेत किंवा कसे? शारीरीक दृष्टया सक्षम आहेत किंवा कसे? यासाठी आपण काही करु शकतो काय?

<u>आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):–</u>मा. महापौर महोदया, याबाबतची माहिती आपण ........

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब,......

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>श्री. मोरे साहेब, कृपया त्यांना माझ्या प्रश्नाचे जरा उत्तर देवु दया.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>सफाई कामगारांच्याबाबतीत हा प्रश्न घेतलेला आहे. परंतु जे कर्मचारी लिपिक पदी काम करतात त्यांना टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण करण्यासाठी आपण काही कालावधी दिला होता. त्यांना आपण अट घातली होती. मराठी विषयाची परिक्षा उत्तीर्ण करण्याची अट घातली होती. ती त्याने पुर्ण केली आहे. आणि यापुर्वी १४ कर्मचा–यांना पदोन्नती दिली देखिल आहे. बाकीचे कर्मचा–यांना टप्प्याटप्प्याने पदोन्नती देणार होतात त्याचे काय झाले? श्री.म्हसाळ साहेब, हे मी तुम्हांला विचारत आहे. नाहीतर हेही पाच वर्ष आमची अशीच निघुन जातील आणि ते बिचारे बोंबा मारत राहतील. असे होता कामा नये. मला माहित आहे की एखादी बाब मागे पडली तर प्रशासकिय अधिकारी तिच्याकडे अजिबात लक्ष देत नाहीत. ते कर्मचारी पदोन्नतीसाठी ताटकळत बसले आहेत. त्यांनी सांगितले की, आम्हांला टंकलेखनाची अट घातली आहे, प्रमाणपत्र मागितले, या सर्व गोष्टींची आम्ही पुर्तता केल्यावर आम्हांला पदोन्नती का दिली जात नाही. कारण आपण म्हटले होते की टप्पा टप्प्याने पदोन्नती देवु. श्री. बोडारे साहेबांच्या हे लक्षात आणुन देवु इच्छितो. ते आम्हांला विचारतात व सांगतात की आमच्याविषयी तुम्ही महासभेत आवाज उठवा.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>मा. महापौरजी, माझाही एक प्रश्न आहे, सर्व सदस्यांच्या प्रश्नाची एकत्रीतपणे उत्तरे दयाल तर बरे होईल.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u>सन्माननिय महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, श्री. मोरे साहेबांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देवु इच्छितो की, आपण म्हणालात की मराठी टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण केल्यानंतर टप्याटप्याने पदोन्नती देण्याचे म्हटले होते. त्याबाबत मी विनम्रपणे सांगु इच्छितो की, मागील वेळेचे आपले जे सेवाप्रवेश नियमावली आहे, शासनाने मंजुरीसाठी आपणाकडे पाठविली होती आपण त्याची गॅझेटमध्ये प्रसिध्दी देवु सूचना व हरकती मागविल्यानंतर आपण त्याची सुनावणी घेतली, सुनावणी नंतर मी महासभेपुढे मंजुरीनंतर शासनाकडे पाठविणार होतो. तो विषय मागील महासभेच्या पटलावर आलेला होता, तो विषय पुढे ढकलला आहे. सेवा प्रवेश नियमावलीत जी पुर्तता सांगितली आहे त्याप्रमाणे यांनी पुर्तता केलेली आहे. आपल्याकडे प्रस्ताव तयार आहे जर तो मंजुर केला तर आपण त्यास शासनाकडे पाठवुन त्याप्रमाणे आपण ठरावाच्या आदेशान्वये पदोन्नती देवु शकतो. त्यासाठी सेवा प्रवेश नियमावली अंतिम होणे आवश्यक आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>सन्माननिय आयुक्त साहेब, तुम्ही याकडे लक्ष केंद्रीत करावे की ज्याप्रमाणे तुम्ही सभागृहामध्ये अतिशय उत्तम आणि योग्य अशी उत्तरे दिली की ज्या ज्या अधिका–यांचे चुकलेले असेल त्यांना मी गय करणार नाही आणि हा प्रश्न दशास लावेल अशा पध्दतीने म्हणणारे आयुक्त तुम्ही एकटेच आलेले आहेत. पुष्कळ आयुक्त या महापालिकेत येवुन गेलेत परंतु त्यांनी असे उत्तर दिलेले नाही. का दिलेले नाही तर काम जर झाले नाही तर आयुक्तांवर येईल म्हणुन असे उत्तर देणारा कुणीही आयुक्त येथे आलेला नाही. मला तरी असे वाटते ९७ पासुन मी निवडुन आलो आहे त्यावेळेपासुन आजमितीपर्यंत असे उत्तर कोणत्याही आयुक्ताने दिलेले नाही. तर आज या पदोन्नतीच्या बाबत तुम्ही लक्ष घालावे व सन्माननिय

उप–आयुक्त, मुख्यालय यांना आदेश दयावे की याबाबत देखील असाच पध्दतीने बसा आणि ते स्पष्ट करा. कारण काही १४ लोकांना ते दिलेले आहे. आणि बाकी लोकांना टप्याटप्याने देवु असे सूचीत केल्यानंतर सुध्दा अजुन ते टप्या टप्याने पदोन्नती दिली जात नाही. म्हणुन बिचारे कर्मचारी आशेने बघत आहेत की आम्हांला पदोन्नती मिळेल की नाही? की असेच आम्ही सेवानिवृत्त होवुन जावु? कृपया सन्माननिय सदस्यांना तुम्ही दोन शब्दे सांगावे अशी मी विनंती करतो.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>मा. आयुक्त साहेब, माझ्या प्रश्नाचे तुम्ही उत्तर दिलेले नाही, उत्तर दया.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u>सन्माननिय सदस्यांनी जो १४ लोकांच्या विषयामध्ये वयाचा जो मुद्‌दा उपस्थित केला होता की किती वर्षाच्या वयापर्यंत त्यांना वारसापध्दतीने नोकरी देता येते? तर लाड कमिटिच्या शिफारसीनुसार वारसा हक्काने जे लोक नोकरीला लागतील त्यांचे किमान वय १८ वर्षाचे असले पाहिजे. जास्तीत जास्त ३५ अशी सुरुवातीची अट होती. त्यामध्ये सुधारणा होवून आता ४० पर्यंत केलेली आहे. त्यामुळे १८ ते ४० या वयोगटातील कामगारांचे वारसांना आपण लाड कमिटीच्या शिफारसीनुसार आपण नोकरी देतो.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>वैद्यकीय तपासणी वगैरे केली जाते काय?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u>वैद्यकीय तपासणी करुनच आपण नियुक्ती देतो. वैद्यकीय कारणास्तव सेवा निवृत्ती झाल्यानंतर किंवा दिवंगत झाल्यानंतर आपण त्यांच्या वारसांना नियुक्ती देतो.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>आयुक्त साहेब, माझी तुम्हांला विनंती आहे की तुम्ही या सभागृहाला आवर्जून सांगावे अशी मी तुम्हांला विनंती करतो.

यावेळी सदस्य श्री. रामसागर यादव, श्री. नरेंद्र दवणे, श्री. गोविंदराम लुंड सभागृहातुन बाहेर गेले.

<u>आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):–</u>मा. महापौर महोदया, मला वाटते दिड वर्षापुर्वी आपण ब–याचशा कर्मचा–यांना पदोन्नती दिली आहे. आता जी मी माहिती घेतली त्यानुसार पदोन्नती समितीचे अध्यक्ष जे आहेत ते श्री. संतोष देहेरकर साहेब हे आहेत. ते त्यांच्या काही व्यक्तिगत कारणास्तव रजेवर आहेत ते उपस्थित झाल्यानंतर या बाबतच्या सर्व तांत्रिक बाबींची पुर्तता करुन त्याचा पाठपुरावा आपण निश्चितपणे करु. पुढच्या महासभेच्या पुर्वी त्याबाबतची माहिती आपणांस देण्यात येईल.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोर :–</u>तुम्ही सांगाता त्याचे आम्ही स्वागत करतो. तांत्रिक बाब हा जो आपण शब्द वापरला आता ती तांत्रिक बाब काहीही राहिलेली नाही. त्या समितीत मी जवळुन पाहिले आहे आणि मी विचारलेले आहे की त्यांना शिक्षणाची जी अट घातलेली होती ती त्यांनी पुर्ण केली आहे, आता कोणतीही तांत्रिक अडचण नाही. अट कोणती आहे आपले अधिकारी काम करत नाहीत.

<u>उप–महापौर :–</u>पुढच्या महासभेत हा विषय आणु. बाकी सर्व तयारी झाली आहे पुढील महासभेत हा विषय आणु.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>ठिक आहे, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>मा. महापौरजी, या प्रस्तावातील अ.क्र. १,२,६,१०,११ व १३ वर दर्शविलेले वारस हे त्या कर्मचा–याची मुले नाहीत, नातु, भाचा आणि मावस भाऊ असे नाते असलेले वारस आहेत. कर्मचा–याचा मुलगा किंवा मुलगी असे वारस नाही. तर या वारसांची आपण कोणत्या तरतुदीनुसार येथे शिफारस केली आहे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u>सन्माननिय महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, सन्माननिय सदस्याने जो प्रश्न विचारला आहे त्याच्यामध्ये लाड कमिटीच्या शिफारसी प्रमाणे जर कामगाराचे रक्ताचे नातेवाईक असतील यांना प्रथम आणि जर रक्ताच्या नातेवाईक नसतील तर जो कामगार सेवानिवृत्त होणार आहे, त्याचे पालन पोषण करण्याची हमीपत्र जर दिले तर आपल्याला त्यास नोकरी देता येते. त्याप्रमाणे आपण यापुर्वी काही नियुक्ती केल्या आहेत.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>समजा एकाने त्याच्या पालनपोषणाची जबाबदारी घेतली, हमीपत्र दिले, नियुक्ती झाल्यानंतर तो व्यक्ती जर त्याच्या घराची जबाबदारी घेत नाही, तर अशा वेळी प्रशासनाकडे, महासभेकडे काय अधिकार राहतो, काय आपण त्यास नोकरीवरुन काढुन टाकु शकतात? नाही काढु शकत. तर आपणाकडे त्याबाबत काय पर्याय आहे? आपण त्या हमीपत्रास बायडींग कसे करु शकता? ते जरा सांगा. माझ्या माहितीप्रमाणे आपणाकडे अशा काही तक्रारी आहेत, जर तो देखभाल करत नसेल व अशा तक्रारी त्याची नियुक्ती झाल्यानंतर आल्या तर त्यावर आपण काय कारवाई कराल? किंवा ही महासभा त्यावर काय कारवाई करु शकते?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u>लाड कमिटीच्या शिफारशीनुसार नोकरी देण्याची तरतुद आहे, नोकरीवरुन काढण्याची त्यामध्ये तरतुद नाही. महासभेने जर सेवाप्रवेश नियमावलीत या गोष्टीची तरतुद करुन जर आपण शासनाकडे पाठविले तर शासन नक्कीच काहीतरी यावर विचार करेल. व आपली सेवाप्रवश नियमावली मंजुर सुध्दा होईल.

यावेळी सदस्य श्री. संजय बठिजा, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. अनिल ऐलानी, श्री. हरेश जग्यासी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>तर माझी आपणांस अशी सूचना आहे की, या ठरावात अशी अट टाका व आपण त्यास नियुक्ती आदेश देणार त्यावर सुध्दा आपण अट टाका जर आपण यांचे बरोबर लक्ष दिले नाही तर आपली नोकरी परत घेतली जाणार. ही अटीशील नोकरी आहे. जर आपण त्यांचे देखभाल केले नाही आणि जर आम्हांस असे माहित पडते, आमच्याकडे अशी तक्रार येते तर आपली ही नोकरी अटशील आहे तर ती परत घेतली जाईल.

<u>उप–महापौर:–</u>आपले म्हणणे बरोबर आहे. जर तो त्या कुटुंबियांस सांभाळणार नसेल तर त्याची नोकरी परत घेतली जाईल. त्यावर कायदेशीर जे असेल ते करा.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u>त्यामध्ये कायदेशीर अभिप्राय घेवुन त्यानंतरच कार्यवाही करु.

<u>उप–महापौर :–</u>होय, कायदेशीर बाबी बघुनच तुम्ही कार्यवाही करा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>त्यांना मला उत्तर देवु दया. जो शासनाचा नियम आहे, त्या नियमानुसार देणे काही गैर नाही आहे? जर स्वत:चा मुलगा असेल तर तो सुध्दा आज पोटभरुन आपणांस खावु घालत नाही? तर काय त्याची नोकरी परत घेवुन टाकाल? हे असे होवु शकत नाही.

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :–</u>मा. महापौरजी, हा विषय सर्वसंमतीने पारीत केला जावा.

<u>महापालिका सचिव :–</u>अटींशिवाय? अटींशिवाय सर्वसंमतीने पास?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ६:—** वारसा पध्दतीने सेवा निवृत्त/दिवंगत १४ सफाई कामगारांचे वारसास नियुक्ती देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा (वशिला) पध्दतीच्या अंमलबजावणीबाबत नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण— २२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि—६, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दि. ३० जुन १९९४ नुसार महानगरपालिकेतील खालील सेवानिवृत्त झालेल्या एकुण १४ सफाई कामगार यांच्या रिक्त जागी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या वारसांना नियुक्ती देण्यास मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेनंतर ३ प्रस्तावान्वये, मा. महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते.

| अक्र | सफाई कर्मचा—याचे नाव | सेवानिवृत्तीचा/ मृत्युचा दिनांक | वारसाचे नाव | कर्मचा—याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीम. केसरबाई रामदास सुर्यवंशी | नियत वयो. सेवा निवृत्त दि ३०/११/०९ | श्री. रोहित राजु कोळी | नातु (मुलीचा मुलगा) |
| २ | श्रीम. शामो किशनपाल वैद्य | स्वे.सेवा निवृत्त दि.३१/५/०९ | श्रीम. शोभा राजकुमार वैद्य | सुन |
| ३ | श्रीम. सीमा राजु संकत | स्वे. सेवा निवृत्त दि.३१/१/१० | श्री. नरेश राजु संकत | मुलगा |
| ४ | श्री. आशा सुरेश भालेराव | वैद्य. सेवा निवृत्त दि १५/९/१० | श्री. दिनेश सुरेश भालेराव | मुलगा |
| ५ | श्री. लक्ष्मीचंद थाना | वैद्य. सेवा निवृत्त दि. ३१/१/१० | कु. निलम लक्ष्मीचंद थाना | मुलगी |
| ६ | श्री. हरेश राधेश्याम | वैद्य.सेवा निवृत्त दि.३०/७/०९ | श्री. रुपेश रामकरण उज्जैनवाल | भाचा (बहिणीचामुलगा) |
| ७ | श्रीम. सुमन संतोष सोनवणे | वैद्य. सेवा.नि. दि.०६/१/१० | श्री. राहुल संतोष सोनवणे | मुलगा |
| ८ | श्रीम. ममो प्रितम मेहरोलिया | स्वे.सेवा नि. दि.३१/१/१० | श्री. सुनिल प्रितम मेहरोलिया | मुलगा |
| ९ | श्री. महेश डिब्बन कजानिया | स्वे.सेवा.नि. दि.३१/१/१० | श्री.रूपा महेश कजानिया | पत्नी |
| १० | श्री. सर्जेराव सुखदेव गायकवाड | स्वे.सेवा नि. दि.३१/३/१० | श्री. प्रविण शंकर गायकवाड | नातु (मुलाचा मुलगा) |
| ११ | श्री. अशोक दयाराम चौव्हान | स्वे.सेवा नि. दि.२०/१०/०९ | श्री. रणजित फुलचंद मगवाने | मावसभाऊ (मावशीचा मुलगा) |
| १२ | श्री. रमेश गौतम जाधव | वैद्य.सेवा.नि. दि.११/१२/०८ | श्री. सुरेश रमेश जाधव | मुलगा |
| १३ | श्री. शांती मशीचरण | स्वे.सेवा नि. दि.३१/०८/०९ | श्री. सनी बिजेंद्र चंडालिया | नातु (मुलीचा मुलगा) |
| १४ | श्री. पूनियॉ रतनपाल | स्वे.सेवा.नि. दि.३१/१/१० | श्री.हरिचंद्र रतनपाल करोतिया | मुलगा |

परंतु, सदर प्रस्तावास, मा. महासभेने ठराव क्र. २६ दि. १९/७/२०१० अन्वये " हि महासभा प्रशासनातर्फे सर्व कागदपत्राचे सखोल तपासणी अंती माहिती दिल्याशिवाय वारसाहक्काने नियुक्ती देण्याविषयी मान्य करित नाही व या प्रयोजनानार्थ फेर प्रस्ताव सादर करण्यास प्रशासनास निर्देशित करित आहे" असा ठराव पारित केलेला आहे.

प्रस्तावनेतील १४ सफाई कामगार हे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६३ अन्वये नियत वयोमानानुसार —१, नियम ६६ नुसार स्वेच्छानुसार —८ व नियम ७१ अन्वये वैद्यकिय प्रमाणपत्र दाखल केल्यानुसार नियम ८० अन्वये वैद्यकिय सेवा निवृत्त —५ तसेच मा. महासभा ठराव क्र अनुक्रमे ३१ दि. २०/८/२००९, ठराव क्र ५० दि. १३/११/२००९, ठराव क्र ६८ दि. ११/२/२०१०, व ठराव क्र ७५ दि. १०/३/२०१०, अन्वये मान्येतेनुसार ते सेवानिवृत्त झालेले आहेत.

त्यांचे सेवानिवृत्तीनंतर, लाड समिती शिफारशी, शासन निर्णय दिनांक ३०/६/१९९४ चे निर्णयनुसार त्यांनी शिफारस केलेल्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या वारसांना नेमणुक देण्याबाबतचे प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आलेले होते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना महानगरपालिकेतील, नियत वयोमान, स्वेच्छा व वैद्यकिय सेवा निवृत्त झालेल्या वरिल सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मान्यतेसाठी मा. महासभेपुढे पुन:श्च प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ३३ <u>दिनांक:— २०/८/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री.जे.के. ढोके

अनुमोदकाचे नाव :— श्री. तुलसीदास वसिटा

ही महासभा वरील प्रस्तावनेत उल्लेखलेल्या निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे १४ रिक्त जागांवर त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या नातेवाईकांना वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

**विषय क्र. ७ :—**शासननिर्णयाच्या धर्तीवर महापालिका कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवा अंर्तगत प्रगती आश्वासीत योजनेचा लाभ देणे.

यावेळी सदस्या श्रीमती रजनी महाडिक, श्रीमती इंदिरा उदासी, डॉ. निना नाथानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

**विषय क्र. ७:—** शासननिर्णयाच्या धर्तीवर महापालिका कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवा अंर्तगत प्रगती आश्वासीत योजनेचा

लाभ देणे.

<u>प्रस्तावना</u>

शासन निर्णय क्रमांक वेतन — ११०९/प्र.क्र. ४४/सेवा ३, दि १ एप्रिल, २०१० अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देणेबाबत तपशिल नमुद केला आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार विषयांकीत प्रकरणी दिनांक २० जुलै, २००१ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना सुधारीत स्वरूपात यापढे ''सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना'' या नावाने दिनांक १ ऑक्टोंबर, २००६ पासुन पुढीलप्रमाणे अंमलात येईल :—

३. (अ) <u>योजनेचा तपशिल</u> : सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना कमाल वेतन बॅड पी बी — ३ (रू. १५६००—३९१००) + ५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागू राहील. या योजनेखाली पात्र कर्मचाऱ्यांना त्यांच्या संपूर्ण सेवाकालावधीत कमाल दोन वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येईल. तथापि, तीन किंवा त्यापेक्षा जास्त पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरणार नाही. मात्र ज्या कर्मचाऱ्यांना दोन प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्या आहेत त्या कर्मचाऱ्यास या योजनेखाली फक्त एकच लाभ अनुज्ञेय होईल.

(ब) <u>योजनेचा पहिला लाभ</u> : (१) विषयांकीत प्रकरणी शासनाकडील दि. २० जुलै, २००१ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या आधिन पदोन्नती संधी उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यास या योजनेखाली १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येईल.

(२) कालबध्द् पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेखाली कर्मचाऱ्यांनी घेतलेला लाभ हा या योजनेखाली त्या कर्मचाऱ्यांचा पहिला लाभ समजण्यात येईल.

(३) विवक्षित सेवाकालावधीनंतर, संबंधीत पदाच्या कर्तव्ये व जबाबदारीत वाढ न होता, अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचनेचा (Non functional pay structure) मंजूर करण्यात आलेला/येणारा लाभ हा या योजनेखालील पहिला लाभ समजण्यात येईल. उदा. मंत्रालय / विधान मंडळ सचिवालयातील कक्ष अधिकाऱ्यांना चार वर्षाच्या नियमित सेवेनंतर देण्यात येत असलेली अकार्यात्मक वेतनसंरचना.

(४) कर्मचाऱ्यास या योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी एक अथवा दोन वेळेस प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असेल व त्यानंतर पदोन्नतीसाखळीत (Hierarchy) पुढील पदोन्नतीचा संवर्ग उपलब्ध नसेल तर, तो ज्या पदाच्या वेतनसंरचनेत वेतन घेत आहे ते पद जणू काही एकाकी पद आहे असे समजून त्याला एकाकी पदास ज्याप्रमाणे या योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात येतो, त्याप्रमाण पहिला लाभ मंजुर करण्यात येईल. एकाकी पदांना ही योजना लागू करण्याविषयीचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

(क) <u>योजनेचा दूसरा लाभ</u> :

(१) पहिल्या लाभानंतर १२ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यास पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना दूसरा लाभ म्हणून करण्यात येईल. तथापि, या योजनेतील पहिला लाभ म्हणून ज्या पदांची वेतनसंरचना मुजुर करण्यात आली आहे त्या पदाला विवक्षीत सेवाकालावधीनंतर, त्या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यात वाढ न होता, अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतनसंरचना दुसरा लाभ म्हणून मंजूर करण्यात येईल.

(२) दुसरा लाभ मंजूर केल्यानंतर पहिल्या लाभाप्रमाणेच पदोन्नतीच्या नियमांनुसार विकल्प देण्याची मुभा देऊन वेतननिश्चिती करण्यात येईल, पदोन्नतीनंतर पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

(३) ''सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना'' दिनांक १ ऑक्टोंबर, २००६ पासुन लागू राहील परंतू १ ऑक्टोंबर, २००६ ते या आदेशाच्या दिनांकापर्यंत (१/४/२०१०) काल्पनिकरीत्या वेतननिश्चिती करून प्रत्यक्ष लाभ या आदेशाच्या दिनांकापासुन देण्यात येतील. मात्र थकबाकी अनुज्ञेय असणार नाही.

(ड) <u>योजनेच्या दुसऱ्या लाभासाठी पात्रतेच्या अटी शर्ती</u> :

(१) पहिला लाभ घेतलेल्या व त्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यास दुसरा लाभ मंजूर करतांना तो पहिल्या लाभाप्रमाणेच दिनांक २० जुलै, २००१ च्या आदेशामधिल व यासंबंधी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या स्पष्टिकरणात्मक आदेशांतील तरतुदीच्या अधीन मंजूर करण्यात यावा. म्हणजेच, ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येणार आहे, त्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळण्यासाठी विहित केलेल्या अटी शर्तीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

(२) पहिल्या लाभांतर्गत पदोन्नतीच्या ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे त्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती न मिळालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, दूसरा लाभ मंजूर करण्यासाठी त्याला ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येणार आहे. त्या पदावरील पदोन्नतीसाठी विहित केलेली गोपनीय अहवालाची किमान सरासरी प्रतवारी प्राप्त करणे आवश्यक राहील.

(३) एक प्रत्यक्ष पदोन्नती मिळाल्यानंतर या योजनेखाली पदोन्नतीच्या पदाच्या वेतनसंरचनेचा पहिला लाभ मिळाला असेल आणि त्यानंतर पदोन्नती साखळीत (Hierarchy) पुढील पदोन्नतीचा सवंर्ग उपलब्ध नसेल किंवा

या योजनेअंतर्गत एक लाभ मिळाल्यानंतर एक प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असेल आणि त्यानंतर पदोन्नती साखळीत (Hierarchy) पुढील पदोन्नतीचा सवंर्ग नसेल, किंवा

कर्मचा—यास या योजनेखाली पदोन्नतीच्या पदाच्या वेतनसंरचेचा पहिला लाभ मिळाला आहे व त्यानंतर पदोन्नतीसाखळीत (Hierarchy) पुढील पदोन्नतीचा सवंर्ग उपलब्ध नसेल

तर या *तिन्ही प्रकरणी* तो ज्या पदाच्या वेतनसंरचनेत वेतन घेत आहे ते पद जणूकाही एकाकी पद आहे असे समजून त्या वेतनसंरचनेतील एकाकी पदाला योजनेच्या पहिल्या लाभांतर्गत अनुज्ञेय वेतनसंरचना दुसरा लाभ म्हणुन मंजुर करण्यात येईल.

या योजनेचा पहिला लाभ मिळाल्यानंतर कर्मचा—यास पहिल्या लाभाच्या पदावर प्रत्यक्ष

पदोन्नती मिळाली असेल आणि त्यानंतर योजनेचा दुसरा लाभ मिळण्यापुर्वीच त्यापुढील पदोन्नतीच्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असेल व त्यानंतर पदोन्नती साखळीत पुढील पदोन्नतीचा संवर्ग उपलब्ध नसेल तर तो, ज्या पदाच्या वेतनसंरचनेत वेतन घेत आहे ते पद आहे असे समजून त्या एकाकी पदाला योजनेच्या पहिल्या लाभांतर्गत अनुज्ञेय असणारी वेतनसंरचना दुसरा लाभ म्हणून मंजूर करण्यात येईल.

(४) कर्मचाऱ्यास या योजनेखाली कोणताही लाभ मिळण्यापुर्वी एक प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असेल व त्यानंतर पदोन्नतीसाखळीत (Hierarchy) पुढील पदोन्नतीचे पद उपलब्ध नसेल आणि त्याला वरील उपपरिच्छेद (ब) (४) नुसार योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात आला तर, त्याला एकाकी पदास ज्याप्रमाणे या योजनेचा दुसरा लाभ मंजुर करण्यात येतो त्याप्रमाणे दुसरा लाभ मंजूर करण्यात येईल.

(५) पहिला लाभ मंजूर केल्यानंतर संबंधित कर्मचारी प्रत्यक्ष पदोन्नतीस अपात्र ठरला अथवा त्याने पदोन्नती नाकारली तर अशा प्रकरणी पहिला लाभ काढून घेतला जात असल्याने अशा कर्मचाऱ्यांचा थेट दुसऱ्या लाभासाठी विचार करता येणार नाही. मात्र त्याने त्यानंतर पदोन्नती स्वीकारल्याच्या दिनांकापासून १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्याला अन्य अटी व शर्तीच्या अधीन राहून दुसरा लाभ मंजूर करता येईल.

३. या योजनेखाली पहिला/दुसरा अथवा दोन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील अशा लाभांची वसूली करण्यात येईल. सदर वसुलीची संपूर्ण जबाबदारी संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांची राहील.

४. या योजनेखाली देण्यात आलेले लाभ काढून घेतल्यावर संबंधित कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती जणू काही या योजनेचे लाभ दिले नव्हते असे समजून महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम १२ च्या तरतुदीनुसार करण्यात यावी.

५. सदरचे आदेश केवळ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना लागू असतील. **मात्र रोजंदारीवरील, कंत्राटी तत्वावरील व तदर्थ (Ad-hoc)** नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

तरी उपरोक्त परिपत्रकाद्वारे शासनाकडील आश्वासीत प्रगती योजनेमध्ये केलेल्या सुधारणेस विहितरीतीने अंमलबजावणी करणेकामी मा. महासभा पटलावर मंजूरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र: ३४</u> <u>दिनांकः— २०/८/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचदांनी

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या शासन निर्णय क्रमांक वेतन—११०९/प्र.क्र. ४४/सेवा ३, दिनांक १ एप्रिल २०१० च्या धर्तीवर महापालिका कर्मचा—यांना सुधारीत सेवा अंतर्गत आश्वासीत प्रगती योजना लाभ देणेस मान्यता व वेळोवेळी पात्र कर्मचा—यांचे पदोन्नतीच्या वेतन संरचनेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी

महापालिका सचिव :– विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :–** महापालिकेस वार्षिक शुल्क अदा करण्याच्या अधिन राहून शहरातील निवडक विविध ठिकाणी १५ वर्षाच्या कालावधीसाठी बीओटी तत्वावर उजव्या बाजूस खाजगी जाहिरात आणि डाव्या बाजुस महापालिकेतर्फे बिना खर्च दिशादर्शक फलक लावण्याकामी अभिकर्त्यास जाहिरात हक्क प्रदान करणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–नाही, नाही आमचा विरोध आहे. सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब आणि सन्माननिय सर्व सदस्य, तुम्हांला जर सर्व्याच गोष्टी बी.ओ.टी. तत्वावर दयायच्या असतील तर पुर्ण महापालिकाच बीओटी तत्वावर देवुन टाका ना? कशाला ठेवायची ही महानगरपालिका? १५–१५, २०–२० वर्षासाठी तुम्ही सर्व बीओटी तत्वावर देता? बीओटी तत्वावर काय दयायचे आहे? फक्त बोर्ड लावायचा आहे?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–मा. महापौर महोदया, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, या उल्हासनगर शहरात बाहेरुन जे लोक येतात, त्यांच्यासाठी हे दिशादर्शक फलक फार उपयोगी पडणार आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–आजपर्यंत दिशादर्शक फलक लावले नाहीत. तर तुमच्या महानगरपालिकेला कोणी म्हटले नाही का की उल्हासनगर शहर आहे म्हणुन?

उप–महापौर :–दिशादर्शक फलक आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–श्री. मोरे साहेब, आपला प्रभाग दर्शविणारा बाण देखील दाखविला जाईल.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :–आयुक्त साहेब, मला एवढेच सांगायचे आहे की ज्या ज्या गोष्टी तुम्ही बीओटी तत्वावर देत असाल त्यास आमच्या आरपीआय पक्षाचा विरोध राहिल. बीओटी तत्वावर खाणारे दुसरे असतात.

काही सदस्य :–पास–पास......

महापालिका सचिव :–पास? सर्वसंमतीने?

सदस्य श्री. बी.बी. मोरे :–आमचा विरोध आहे.

महापालिका सचिव :–मतदान घ्यायचे काय?

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–होय, मतदान घ्या.

महापालिका सचिव :–काय करायचे? पास?

सदस्य श्री. बी. बी. मोरे :–आमचा विरोध आहे. आरपीआयचा विरोध आहे. याची इतिवृत्तात नोंद घेतली पाहिजे.

महापालिका सचिव :–आपण तटस्थ आहात की विरोधात आहात?

<u>सदस्य श्री.बी. बी. मोरे :—</u>विरोधात.

<u>महापालिका सचिव :—</u>जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत. श्री. भारत राजवानीजी व श्री. सतिश चहाळजी या प्रस्तावाच्या बाबतीत आपली काय भुमिका आहे?

<u>प्रस्तावाच्या बाजुने २९ मते</u>

१. श्रीमती राजश्री चौधरी
२. श्री. विनोद ठाकुर
३. श्री. जीवन इदनानी
४. श्रीमती लिलाबाई आशान
५. श्रीमती चंद्रा टेकचंदानी
६. श्री. दत्तात्रय पवार
७. श्री. भजनलाल रामचंदानी
८. श्री. बच्चाराम रुपंचदानी
९. श्री. रामचंद्र पारवानी
१०. श्री. जमनादास पुरस्वानी
११. श्री. लाल पंजाबी
१२. श्री. किशोर जग्यासी
१३. श्री. राजेश वानखेडे
१४. श्री. लालबिहारी यादव
१५. श्रीमती विद्याताई निर्मले
१६. श्री. धनंजय बोडारे
१७. श्रीमती वसुधा बोडारे
१८. श्री. विजय सुपाळे
१९. श्रीमती शकुंतला पाटील
२०. श्रीमती जयश्री सुर्वे
२१. श्रीमती ज्योती माने
२२. श्रीमती मिनाताई सोनेजी
२३. श्री. शेखर यादव
२४. श्री. दिलीप गायकवाड
२५. श्री. प्रधान पाटील
२६. श्री. सुरेश जाधव
२७. श्री. प्रशांत धांडे
२८. श्री. सुंदर मंगतानी
२९. श्री. रविंद्र बागुल

<u>महापालिका सचिव :—</u>जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपला हात वर करावा.

<u>प्रस्तावाच्या विरोधात ८ मते</u>

१. श्री. जे.के. ढोके
२. श्री.बी.बी. मोरे
३. श्री. प्रभुनाथ गुप्ता
४. श्रीमती पंचशिला पवार

५. श्री. सुमन शेळके
६. श्री. भारत राजवानी
७. श्री. सतिश चहाळ

सदस्य श्री. सतिश चहाळ :—आमचा बीओटी तत्वास विरोध आहे. मसाल्याच्या पदार्थांसाठी इंग्रजांच्या काळात ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली होती.

महापालिका सचिव :—ठिक आहे आपला विरोध आहे ना?

सदस्य श्री. सतिश चहाळ :—होय विरोध आहे.

महापालिका सचिव :—श्री. प्रभुनाथ गुप्ताजी आपण हात वर केला होतात.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—नाही, नाही त्यांचा सुध्दा विरोध आहे.


महापालिका सचिव :—आपला विरोध आहे का? श्री. रविंद्र बागुल आपण सुध्दा हात वर केला होता. आपण दोघेही प्रस्तावाच्या बाजुने आहात ना?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—ते तर सभेतील चर्चेत आमच्या बरोबर बसले होते.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—गुप्ताजीचा एक हात हां म्हणतो, एक ना म्हणतो.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—प्रस्ताव भलेही पारित होवु दया, आम्ही विरोध दर्शविला आहे. व विरोधी पक्ष नेता आमच्या बरोबर आहे.

महापालिका सचिव :—प्रस्ताव बहुमताने पारीत झाला असे समजायचा काय?

महापौर :— सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ८ :—** महापालिकेस वार्षिक शुल्क अदा करण्याच्या अधिन राहून शहरातील निवडक विविध ठिकाणी १५ वर्षाच्या कालावधीसाठी बीओटी तत्वावर उजव्या बाजूस खाजगी जाहिरात आणि डाव्या बाजुस महापालिकेतर्फे बिना खर्च दिशादर्शक फलक लावण्याकामी अभिकर्त्यास जाहिरात हक्क प्रदान करणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयांन्वये उल्हासनगर महानगरपालिका शहरांमधील विविध ठिकाणी दिशा दर्शक फलक (Location and Arrow for Public Information) लावणेसाठी बी.ओ.टी. तत्वावर १५ वर्षाकरीता पवन कंपनी यांनी असा प्रस्ताव दिला आहे कि त्यात आम्ही दिलेल्या आकृती नुसार तेथे दिशा दर्शविणारे फलक लावेल व त्याचा संपूर्ण खर्च निविदा धारक वहन करील. त्याच्या ऐवजी त्याला दिशा दर्शविणा—या फलकाच्या उजव्या बाजूला जाहिरातीचे हक्क पाहिजेत. व सदरच्या कालावधीमध्ये येणारा संपूर्ण खर्च व देखभाल स्वत:करतील.

त्यामुळे केलेल्या खर्चाचा दोन वर्षामध्ये गुतविलेल्या खर्चाऐवढे उत्पन्न मिळणार नाही. म्हणून हा दोन वर्षाचा नियम त्याला लागु करणे रास्त दिसत नाही. तसेच सदर प्रस्तावाबाबत मा. महापौर यांनी सुचविल्या प्रमाणे सदरचा प्रस्ताव १५ वर्षाकरीता देणेबाबत योग्य वाटते. निविदा धारकाशी करारनाम्याचा कालावधी १५ वर्षाचा राहणार आहे. उक्त १५ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर शहरातील सर्व दिशा दर्शक फलक हे निविदा धारक महापालिकेस हस्तांतरीत करेल. त्याचप्रमाणे जाहिरातीकरीता ४५ टक्के भाग व उर्वरीत ५५ टक्के भागात उमपाचे नाव दर्शविणारे सुचना असेल. तसेच ठरलेल्या जाहिरातीच्या भागात म्हणजे ५५ टक्के

भागात महापालिकेचे स्लोगन किंवा बोध वाक्य लिहिण्याकरीता वापरण्यात येईल. जेनेकरूण महापालिकेकडुन करण्यात येणा—या प्रसिध्दीकरणाचा खर्च वाचेल.

उक्त बाबी विचारात घेता शहरांमधील विविध ठिकाणी दिशा दर्शक फलक निविदा काढून विविध ठिकाणी दिशा दर्शक फलक लावने किंवा बी.ओ.टी तत्वावर देणे महानगरपालिका शहरांमधील विविध ठिकाणी दिशा दर्शक फलक लावणेसाठी फलकावर ४५ टक्के निविदाधारकाची जाहिरात व ५५ टक्के भागात उमपाचे नाव दर्शविणारे सुचना असेल. या गोष्टी विचारात घेवून शहर स्वच्छ, सुदर व दिशादर्शक ठेवण्याकरीता शहरांच्या विविध ठिकाणी दिशा दर्शविणारे फलक लावणेकरीता प्रस्ताव तयार करून महानगरपालिकेस वार्षिक देय रक्कम याबाबत निविदा मागविणे उचित होईल. व १५ वर्षांच्या कालावधीसाठी निविदा मागविनेकरीता मा.महासभमध्ये या प्रस्तावावर चर्चा करूण निर्णय घेण्याकरीता प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ३५ दिनांक:— २०/८/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे जाहिर निविदा प्रक्रियेच्या व महापालिकेस वार्षिक शुल्क अदा करण्याच्या अधिन राहून शहरातील निवडक विविध ठिकाणी १५ वर्षाच्या कालावधीसाठी बीओटी तत्वावर फलकावरील उजव्या बाजूस खाजगी जाहिरात आणि डाव्या बाजुस महापालिकेतर्फे बिना खर्च दिशादर्शक फलक लावण्याकामी अभिकर्त्यास जाहिरात हक्क प्रदान करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** श्री. विनोद दौलतराम मेठवानी, मुकादम व श्री. दिलीप पांडुरंग जाधव, मजूर, अनधिकृत बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाच्या तरतुदी अन्वये खटला भरण्यास परवानगी देणे.

---

काही सदस्य :—विषय पुढे ढकलला जावा.

महापालिका सचिव :—सर्व संमतीने?

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

✂

**विषय क्र. ९:—** श्री. विनोद दौलतराम मेठवानी, मुकादम व श्री. दिलीप पांडुरंग जाधव, मजूर, अनधिकृत बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाच्या तरतुदी अन्वये खटला भरण्यास परवानगी देणे.

प्रस्तावना

श्री. मेठवाणी व जाधव हे प्रभाग समिती क्र. ३ येथे कार्यरत असताना त्यांना अनधिकृत बांधकामा संदर्भात लाचेची मागणी करून लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक अधिकारी यांनी रंगेहात पकडल्यामुळे त्यांना सेवेतुन का. आ. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/५०९/०९, दिनांक २६/१०/२०१० च्या आदेशान्वये निलंबीत करणेत आलेले आहे.

उक्त दिनांक १४/१२/१९९५ च्या शासन निर्णयामध्ये शासकीय सेवक जेव्हा मुद्येमालासह प्रत्यक्ष लाच घेताना सापडतो व त्यामुळे त्यांना निलंबन केले जाते अशा प्रकरणामध्ये शासकिय सेवकाविरूध्द न्यायालयीन फौजदारी प्रकरण पूर्ण होऊन अंतिम निर्णय होईपर्यंत त्यास सर्व साधारणपणे निलंबीत ठेवण्यात यावे असे शासनाचे स्पष्ट आदेश आहेत.

तसेच दिनांक २० जुलै २००६ च्या शासन निर्णयामध्ये ज्या शासकीय सेवकांच्या प्रकरणामध्ये निलंबनाचा कालावधी फारच मोठा असेल तर शासनाच्या धोरणाचा विचार करून ''अत्यंत अपवादात्मक परिस्थितीतच'' शासकीय कर्मचाऱ्याच्या निलंबनाबाबत आढावा घेण्यात येईल याबाबत शासन निर्णयामध्ये स्पष्टता नाही यास्तव निलंबनाच्या प्रकरणामधे प्राधिकाऱ्यांने निलंबनाचा आढावा घ्यावा व त्या बाबतची परिस्थिती नमुद करून प्रशासकीय विभागाच्या मान्यतेने उचित निर्णय घ्यावा असे आदेश आहेत. तसेच मुद्या क्र. ३ मध्ये ज्या गुन्हयासाठी ०३ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी करीता तुरंगवासाची शिक्षा होवु शकते असा दखल पात्र आणि अजामिनपात्र गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा फौजदारी गुन्हा समजण्यात यावा असे नमुद केले आहे.

दरम्यानच्या कालावधीमध्ये विषयांकीत प्रकरणी पोलिस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे, परिक्षेत्र ठाणे यांचेकडील दिनांक ३१/५/२०१० रोजीचे पत्राचे अवलोकन केले असता त्यांनी निलंबीत कर्मचारी श्री. विनोद मेठवानी व श्री. दिलीप जाधव यांना लाच लुचपत प्रकरणी रंगेहाथ पकडल्याने त्यांचेविरूध्द अभियोग दाखल करणेबाबत परवानगी मागितली आहे.

तरी श्री. विनोद दौलतराम मेठवानी, मुकादम व श्री. दिलीप पांडूरंग जाधव, मजूर हे महापालिकेचे कर्मचारी असुन लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम १९ (१) नुसार संबंधीता विरूध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५३ अन्वये महानगरपालिका नियुक्ती प्राधिकारी या नात्याने सक्षम आहे. म्हणून संबंधीत कर्मचाऱ्या विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम १९ (१) नुसार खटला दाखल करणे कामी मा. महासभेच्या मंजूरीसाठी शिफारस करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ३५ अ <u>दिनांक:— २०/८/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

ही महासभा संबंधीत प्रकरणाच्या सर्व कागदपत्र व पुराव्यांच्या सखोल अभ्यासा अंती श्री. विनोद दौलतराम मेठवानी, मुकादम व श्री. दिलीप पांडूरंग जाधव, मजूर हे महापालिकेचे कर्मचारी असुन लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम १९ (१) नुसार संबंधीता विरूध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५३ अन्वये महानगरपालिका नियुक्ती प्राधिकारी या नात्याने सक्षम आहे. म्हणून संबंधीत कर्मचाऱ्या विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम १९ (१) नुसार खटला दाखल करणे कामीचा विषय पुढच्या सभेत घेण्या प्रयोजनार्थ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १० :—** उल्हासनगर शहरात शासकिय दुध केंद चालविण्यासाठी महापालिका निहित जागा

वापर परवाना देणे.

---

**<u>काही सदस्य :—</u>**हा विषय नाकारला जावा.

**<u>महापालिका सचिव :—</u>**विषय नाकारण्याबाबतचे कारण?

**<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपंचदानी :—</u>**जागा नाही आहे.

**<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>**महापालिका विहित जागा नाही व सर्व उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द फुटपाथ व रस्त्यांवरील जागा उपलब्ध होवू शकत नाही.

**<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>**मा. महापौर महोदया, दुधकेंद्र चालविण्यासाठी जागा देण्याबाबतचा हा जो विषय आलेला आहे, तो नेमका काय आहे? उल्हासनगरमध्ये एवढया मोठया प्रमाणावर दुध कोठे आहे. दुध येणार कोठुन?

**<u>महापौर :—</u>** सदरचा विषय नाकारण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १०:—** उल्हासनगर शहरात शासकिय दुध केंद चालविण्यासाठी महापालिका निहित जागा
वापर परवाना देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

नगर विकास विभाग शा.नि.क्र.—२००५/२४२८/प्र.क्र.१/०६/नवि—२८, मंत्रालय, मुंबई—४०० ०३२ दि.११/०८/२००६ अन्वये व्यवस्थापक शासकिय दुध योजना गोवे भिंवडी यांनी आरे दुधाचा पुरवठा करण्यासाठी सुशिक्षीत बेरोजगार यांना रोजगार देणेच्या माध्यमातुन या योजनेकडुन आरे दुध विक्री ऐजन्सी मंजुर करण्यात आलेली असल्याने दुध विक्रीसाठी उल्हासनगर शहरात जागा उपलब्ध करूण देणे साठी विनंती केलेली आहे.

व्यवस्थापक शासकिय दुध योजना गोवे भिंवडी यांनी आरे दुधाचा पुरवठा करण्यासाठी सुशिक्षीत बेरोजगार यांना रोजगार देणेच्या माध्यमातुन या योजनेकडुन आरे दुध विक्री ऐजन्सी मंजुर करण्यात आलेली असल्याने दुध विक्रीसाठी उल्हासनगर शहरात जागा उपलब्ध करूण देणे साठी विनंती केलेली आहे.

तसेच उक्त नमूद शासन आदेशानुसार अंध, अपंग, गटई कामगारांना दुध केंद्रासाठी जागा मंजुर करणे बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(अ) अन्वये मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे. सोबत प्रत जोडत आहे.

सदरील आदेशान्वये आयुक्त, दुग्धविकास विभाग, वरळी, यांनी महानगर टेलिफोन निगम तथा मुंबई भारत संचार निगम, वाहतुक पोलिस विभाग इ. ज्या ज्या प्राधिकाराचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक असेल त्या सर्वाकडुन तसे प्रमाणपत्र प्राप्त करून घेउनच जागा वाटप करणे बाबत सुचित करण्यात आले आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी शासकिय दुध केंद्र (आरे दुध विक्री) करीता परवानगी व जागा मिळणेबाबत ०२ अर्ज या प्राप्त झालेले ते खालिल प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव | व्यवस्थापक,शासकिय दुध योजना यांनी वितरीत केलेली जागा. |
|---|---|---|
| १ | श्री. किरण वासुदेव बिचवे. | सधुबेला गर्ल्स हायस्कुल, शासकिय दवाखान्या बाजुला, उ. नगर — १ |
| २ | श्रीम. अश्विनी रंजित राजपुत. | सधुवासवानी उदयान, गोल मैदान, उ.नगर — १ |

जागेची निवड करणेकामी खालील कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

अ) मागणी केलेल्या जागेचा कच्चा नकाशा.

ब) रेशनिंग कार्डची झेरॉक्स.

क) शाळा सोडल्याचा दाखला/जन्म नोंदणी दाखला.

ड) अर्जदार हा उल्हासनगर शहराचा कायम रहिवासी असणे आवश्यक आहे. त्यासाठी त्याने सन १९८५ अथवा त्या पूर्वीच्या मतदार यादी मध्ये नाव समाविष्ट असल्याबाबतचा पूरावा अथवा मामलेदार कार्यालयातील १५ वर्षा पूर्विचा रहिवासी असल्याबाबतचा पूरावा

१) मालमत्ता विभागाकडुन जागेची पाहणी केल्यानंतर नगररचनाकार व शहर अभियंता, उ.म.पा यांचेकडुन प्रस्तावित जागेसंबंधी विकास आराखडा बाबत व वरिष्ठ पोलिस निरीक्षक, शहर वाहतुक नियंत्रण शाखा, उल्हासनगर यांचेकडुन रहदारीच्या दृष्टिने अभिप्राय मागविणे आवश्यक आहे.

२) वरीलप्रमाणे जागा विकास योजनेने बाधित होत नसल्यास व रहदारीस अडथळा नसल्यास सदर जागा मा. आयुक्त सो. यांचे मंजुरीने अर्जदारास वितरीत करण्यात हरकत नाही.

वरील प्रमाणे उल्हासनगर शहरातील सार्वजनिक ठिकाणावरील शासकिय दुध केंद्र (आरे दुध विक्री) परवानगी देणेबाबत महानगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

<u>शासकिय दुध केंद्र (आरे दुध विक्री) साठी जागा निश्चितीचे निकष:—</u>

१) प्रस्तावित जागा ही किमान १०मिटर अथवा त्यापेक्षा जास्त रूंदीच्या रस्त्यावर असणे आवश्यक आहे.
२) प्रस्तावित जागा ही रहदारीसाठी वापरात असलेल्या रस्त्याच्या भागापैंकी नसावी.
३) प्रस्तावित जागा फूटपाथ पैंकी असल्यास ६ फुट पेक्षा जास्त रूंदीच्या पदपथावर असावी.
४) केबिनची साईज ६’ X ३’ पेक्षा जास्त व उंची ७ फुट पेक्षा अधिक असता कामा नये.
५) जागा कोणत्याही विकास योजना प्रस्तावाने बाधित नसावी.
६) दोन शासकिय दुध केंद्रा मधील अंतर किमान २५० मी. पेक्षा कमी असता कामा नये.
७) कोणत्याही चौकामध्ये किंवा दोन रस्त्याच्या कॉर्नरवरती शासकिय दुध केंद्र अनुज्ञेय असणार नाही.

<u>अर्जदाराचे पात्रतेचे निकष:—</u>

१) ज्या व्यक्तिस परवानगी दिली आहे त्याने स्वत: व्यवसाय केला पाहिजे. इतर कोणासही या जागेवर व्यवसाय करता येणार नाही.

२) अर्जदार हा उल्हासनगर शहराचा कायम रहिवासी असणे आवश्यक आहे. त्यासाठी त्याने सन १९८५ अथवा त्या पूर्वीच्या मतदार यादी मध्ये नाव समाविष्ट असल्याबाबतचा पूरावा अथवा मामलेदार कार्यालयातील १५ वर्षा पूर्विचा रहिवासी असल्याबाबतचा पूरावा सादर केला पाहिजे.

३) अर्जदाराचा उल्हासनगर शहरात इतर कोणताही व्यवसाय असता कामा नये.

४) कोणत्याही कुटूंबातील एकच व्यक्ती या योजनेच्या लाभासाठी पात्र असेल.

<u>भाडेपट्टयाचा कालावधी:—</u>

१) भाडेपट्टयाचा कालावधी — परवानगी प्रत्येक वेळी ११ महिनेपेक्षा जास्त कालावधी साठी राहणार नाही. मुदत संपल्यानंतर अर्जदाराची वागणूक व अटी/शर्तीच्या पालनाबाबत पडताळणी करूनच पुढिल ११ महिन्याच्या कालावधी करीता मुदतवाढ देण्यात येईल.

२) रस्ता रूंदीकरण किंवा इतर कोणत्याही कामासाठी महानगरपालिकेस जागेची आवश्यकता भासल्यास ७ दिवसाची नोटीस देवुन कालावधी कमी करण्यात येईल. व अर्जदार स्वखर्चाने सदर जागा मोकळी करून देईल.

३) रस्ता रूंदीकरण किंवा इतर कोणत्याही कामासाठी महानगरपालिकेस जागेची आवश्यकता लागल्यास पर्यायी जागेची जबाबदारी महानगरपालिकेची असणार नाही.

<u>भाडेपट्टयाची रक्कम:—</u>

१) रू. ५/— प्रती चौ. फुट प्रती महिना किंवा वेळोवेळी ठरविलेले भाडे एवढे भुईभाडे आकारण्यात यावे.

२) परवान्याचे हस्तांतरण कायदेशीर वारसास हस्तांतरण फी आकारून करण्यात यावे.

३) हस्तांतरण फी रू. ३०००/— ऐवढी वारसांकडून घेण्यात यावी.

४) रू. ५/— प्रती चौ. फुट प्रती महिना किंवा वेळोवेळी ठरविलेले भाडे एवढे भुईभाडे प्रमाणे परवानाधारकाने रक्कम भरणा करावयाची आहे. जागा मंजुर केल्यानंतर अर्जदाराने तीन महिन्याचे भाडे आगाऊ भरणा करावयाचे असुन दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत भाडयाची रक्कम भरणा केली पाहिजे.

<u>जागा वितरणाची कार्यपद्धती:—</u>

१) अर्जदार वरील निकषास पात्र आहेत किंवा कसे? याची छाननी मालमत्ता विभागाने करावी.

२) मागणी केलेल्या अर्जदारांची संख्या शासकिय दुध केंद्राच्या संख्येपेक्षा कमी असल्यास सर्व पात्र अर्जदारांना नियमित अटी व शर्तीवर जागा वितरीत करण्यात याव्यात.

३) मागणी केलेल्या अर्जदारांची संख्या शासकिय दुध केंद्राच्या संख्येंपेक्षा अधिक असल्यास पसंतीक्रम विचारात घेवुन व आवश्यकता असल्यास सोडत पद्धतीने वितरणाचे मा. आयुक्त यांना अधिकार असतील.

<u>जागा वापरासंबंधीच्या अटी व शर्ती:—</u>

१) अर्जदाराने स्वच्छतेसंबंधीच्या सर्व नियमांचे पालन केले पाहिजे.

२) प्रत्येक स्टॉलवर उल्हासनगर महानगरपालिका अनुज्ञेय शासकिय दुध केंद्र असा फलक लावणे बंधनकारक राहील.

३) अर्जदारास शासकिय दुध केंद्रा व्यतिरिक्त इतर कोणताही व्यवसाय करता येणार नाही.

४) आजुबाजूच्या नागरीकांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही. याची स्टॉलधारकाने दक्षता घ्यावी.

<u>शर्तीचा भंग:— खालील बाबी या शर्त भंग समजण्यात येतील.</u>

१) अर्जदार किंवा त्यांचे कुटूंबाऐवजी इतर व्यक्ती व्यवसाय करीत असल्यास.

२) शासकिय दुध केंद्राच्या ऐवजी इतर व्यवसाय करीत असल्यास.

३) मासिक भाडे भरणा न केल्यास.

<u>इतर अटी व शर्ती</u>

१) स्टॉल करीता जागा संबंधित शासकिय संस्थेस अथवा त्यांचे मान्यता प्राप्त वितरकास देण्यात यावी. सदर संस्थेशी करारनामा करण्यात यावा.

२) सदर स्टॉल शहर अभियंता यांनी दिलेल्या स्पेसिफिकेशन प्रमाणे असावा.

३) सदरचा स्टॉल विकता येणार नाही अथवा भाडयाने देता येणार नाही. अन्यथा पूर्वसुचना न देता परवाना रदद करण्यात येईल.

४) ज्या ठिकाणी स्टॉल उभारण्यास परवानगी दिली आहे. त्या ठिकाणीच स्टॉल उभारण्यात यावा. अन्यथा पूर्वसुचना न देता परवाना रदद करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना राहिल.

वरीलप्रमाणे शर्तीचा भंग केल्यास अर्जदारास दिलेला परवाना रद्द करून त्याने भरणा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

वरीलप्रमाणे शासकिय दुध केंद्राच्या प्रस्तावास परवानगी देणे बाबतचा धोरणात्मक निर्णय घेणे बाबत प्रस्ताव मा. महासभा पटलावर प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ३६ दिनांकः— २०/८/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी
अनुमोदकाचे नाव :— श्री.जे.के. ढोके

ही महासभा अर्जदार श्री. किरण वासुदेव बिचवे व श्रीम. अश्विनी रंजित राजपुत यांना निवडक जागेवर शासकिय दुध योजने अंतर्गत मंजुर करण्यात आलेल्या जागेवर दुध केंद चालविण्यासाठी जागा वापर परवाना देण्यास मान्यता देत नाही.

कारण ——

१) सदर निवडक जागा महालिकेच्या मालकीच्या नाहीत.

२) रस्त्यावरील किंवा पदपथांवरील जागेचा वापर नागरीकांना चालण्या फिरण्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी केला जावु शकत नाही असा मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ११** :— ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास आर्थिक मदत देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापालिका सचिव :—एक लाख रुपये?

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—मा. महापौर महोदया, या विषयाबाबतीत मी दोन शब्द बोलु इच्छितो.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—अहो, एक लाख रुपये तर दयायचे आहेत?

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—मा. महापौर महोदया, या विषयाबाबतीत मी दोन शब्द बोलु इच्छितो, उल्हासनसगर महानगरपालिकेचे १३ चौरस किलोमिटरचे क्षेत्र आहे. व या शहरात बहुभाषिय लोक राहतात. जसे मराठी साहित्य संमेलनासाठी आर्थिक मदत दिली जात आहे. या प्रमाणे अन्य धर्मीयांचा अशाच प्रकारचा जर दुसरा एखादा प्रस्ताव आला तर तो प्रस्ताव सुध्दा सर्व संमतीने त्यावेळी पारीत केला जावा. आता हा प्रस्ताव पारीत करण्यास माझी काही हरकत नाही. धन्यवाद।

काही सदस्य :—पास, पास.........

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ११**:—८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास आर्थिक मदत देणे.

प्रस्तावना

प्रमुख कार्यवाह, ८४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, ठाणे, २०१० यांनी दिनांक १०/०८/२०१० रोजीच्या पत्रान्वये ठाणे शहरात दिनांक २५, २६ व २७ डिसेंबर २०१० रोजी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न हाणार असल्याचे कळविले आहे. आतापर्यंत महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी साहित्य संमेलन आयोजित केली गेली त्या त्या वेळी त्या ठिकाणच्या जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थानी आर्थिक मदत देऊन संमेल यशस्वी करण्यास मदत केली आहे तसेच त्यांनी जास्तीत जास्त अनुदान देणेबाबत विनंती केली आहे.

तरी उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे ८४ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनासाठी रू. १,००,०००/— (रू. एक लाख मात्र) इतकी रक्कम अनुदान देण्याबाबत मा. महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ३७ <u>दिनांक:— २०/८/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती ज्योती माने

अनुमोदकाचे नाव :— श्री. रविंद्र बागुल

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद कारणांमुळे ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास आर्थिक मदत देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १२:— <u>प्रस्तावाची सूचना</u>

उल्हासनगर शहरात माध्यमिक शिक्षण शाळा सुरु करण्याबाबत श्री. भारत राजवानी, पालिका सदस्य यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

---

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>मा. महापौर, मा. उप—महापौरजी, ........

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>बोला, बोला, यांना बोलु दया, बोलु दया.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया :—</u>सूचना कोणाची आहे? त्यास अगोदर बोलु दिले जावे.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>मा. महापौरजी, मा. उप—महापौरजी, मा. आयुक्त साहेब, .....

<u>उप—महापौर :—</u>उभे असलेल्या सर्व सदस्यांनी कृपया मेहरबानी करुन आपापल्या आसनांवर बसुन घ्यावे. शिक्षणाचा विषय आहे, जरा त्यांना बोलु दया, ऐकुन घ्या.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>महानगरपालिकेच्या ज्या शाळा आहे, त्यांमध्ये ८ वी ते १२ वी चे वर्ग सुरु करण्याबाबतीत मी प्रस्ताव आणलेला आहे, ते वर्ग चालु झाला पाहिजे. महापालिका शाळांमधील मुलांचे पुढील शिक्षण होत नाही आहे. व त्यातील बहुतांश मुलांना पुढील शिक्षणासाठी ब—याचशा ठिकाणी प्रवेश मिळत नाही. यासाठी महापालिकेच्या वतीने महापालिका शाळांमध्ये ८ वी ते १२ वीचे वर्ग सुरु केले पाहिजेत.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, या सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्यांना माझी विनंती आहे की, विषय अतिशय चांगला शैक्षणिक बाबतीतला आहे. सर्वांनी याकडे लक्ष दयावे. या

उल्हासनगरमध्ये महापालिकेच्या वतीने काहीतरी ३० शाळा चालविल्या जातात. आणि त्या १ ली ते ७ वी पर्यंतच्या शाळा चालविल्या जातात. आणि यासाठी मुलांना कुठलीही फी किंवा पैसा मोजावा लागत नाही. परंतु ७ वी झाल्यानंतर ८ वी मध्ये प्रवेश घेतांना त्यांना मोठी अडचण भासते. त्यांना इतर ठिकाणच्या शाळा, महाविदयालयांमध्ये प्रवेश घेतांना डोनेशनची मागणी केली जाते. परंतु गोर गरीब, दलित आणि मध्यमवर्गीय समाजातल्या या मुलांकडे डोनेशन देण्याची आर्थिक कुवत नसते आणि त्यामुळे ते फी सुध्दा देवु शकत नाही. आणि फी न दिल्यामुळे त्यांना प्रवेश नाकारला जातो. म्हणजे तो मुलगा उच्च शिक्षणापासुन वंचित होतो. म्हणुन सन्माननिय सदस्याने जी सूचना येथे मांडली आहे ती अतिशय योग्य, सुंदर आणि उत्तम आहे. जर उल्हासनगर महानगरपालिकेने इयत्ता ८ वी ते १२ वी पर्यंतच्या माध्यमिक शाळा सुरु केल्या तर या मुलांना डोनेशनसाठी पैसे मोजावे लागणार नाहीत. आणि त्यांच्या शिक्षणाची सोय होईल आणि तो मुलगा उच्च शिक्षण घेवुन पुढे जावु शकेल, उल्हासनगर महानगरपालिकेचे नावलौकिक करु शकेल. असे माझे मत आहे. कारण की मी बघतो आहे, उल्हासनगरमध्ये महानगरपालिकेच्या शाळांमध्ये जे विदयार्थी शिकत आहेत ते ७ वी पास झाल्यानंतर वणवण भटकत आहेत. नगरसेवकांकडुन प्रशस्तीपत्र घेतात, ओळखपत्र घेतात, महापौरांचे ओळखपत्र घेतात आणि माध्यमिक शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी जातात. त्यावेळी त्यांना असे सांगितले जाते की इयत्ता ८ वी साठी एक हजार रुपये भरा किंवा पाच हजार रुपये डोनेशन दयावे लागेल अशी परिस्थितीत तो मुलगा डोनेशन देवु शकत नाही आणि म्हणुन तो उच्च शिक्षण घेवु शकत नाही. उच्च शिक्षणापासुन वंचित राहतो, तो वंचीत राहु नये म्हणुन उल्हासनगर महानगरपालिकेने ८ वी ते १२ वी पर्यंत माध्यमिक शाळा सुरु कराव्या आणि गोरगरीबांच्या मुलांना शिक्षणाची संधी दयावी, एवढेच मी याठिकाणी सांगु शकतो, जयहिंद।

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u> महापालिकेच्या शाळांची परिस्थिती एवढी नाजुक आहे, त्या शाळांमधील विदयार्थ्यांना कधी कधी गणवेश मिळत नाही तर कधी त्यांना शैक्षणीक साहित्य मिळत नाही. यास्तव श्री. भारत राजवानी यांनी ही जी प्रस्तावाची सूचना मांडलेली आहे, ८ वी ते १२ वी पर्यंतचे वर्ग सुरु केले पाहिजेत. त्यासाठी जेवढा काही प्रयत्न करावा लागेल तेवढा प्रयत्न मा. महापौर महोदया आपण करा. आणि मुलांना शिकण्याची संधी दयावी ही नम्र विनंती.

<u>महापौर :—</u>या प्रस्तावावर मतदान घ्यायचे काय?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>या प्रस्तावावर जर मतदान घेतले जात असेल तर ते बरोबर नाही.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>शिक्षणापासुन कोणाला वंचित ठेवु नका. हा प्रस्ताव पारीत करा.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>महानगरपालिकेचा पुर्वीचा ठराव आहे, पुर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा आणि महाविद्यालय सुरु करण्याबाबतचा ठराव आहे त्याची अंमलबजावणी करा. नविन ठराव करण्याची काही गरजच नाही. पुर्वीचा जो ठराव आहे त्याची अंमलबजावणी करा. श्री. मोरे साहेब, १९९७ ला मी शिक्षण समितीचा सभापती असतांना जो ठराव पारीत केलेला आहे, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांबाबतचा. आता फक्त प्राथमिक शाळा आहे परंतु अंगणवाडी म्हणजे पुर्व प्राथमिक आणि माध्यमिक आणि त्यानंतर महाविदयालयाचाही प्रस्ताव आपण मंजुरीसाठी शासनाकडे पाठविलेला आहे. परंतु शासनाने अदयाप त्याला मंजुरी दिलेली नाही. श्री. राजवानी साहेब, त्यास शासनाची मंजुरी पाहिजे. तुम्ही लवकरात लवकर मंजुरी घेवुन या, तोच प्रस्ताव आहे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>साहेब, कायदयामध्ये लिहिलेले आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>पुर्व प्राथमिक, माध्यमिक व महाविदयालय सुरु करण्याबाबतचा शिक्षण मंडळाने या अगोदरच ठराव पारित केलेला आहे. व त्यास महासभाने ही दिनांक २०/५/२००५ रोजी कायम केले आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>दोन वेळा ठराव पारीत झालेला आहे. तिस—यांदा ठराव करण्याची आवश्यकता नाही.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>शासनाच्या मंजुरीची काही आवश्यकता नाही.

<u>सदस्य श्री. दत्तात्रय पवार :–</u>आयुक्त साहेब, मी पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समितीचा सभापती असतांना मी वरिष्ठ महाविदयालयाचा प्रस्ताव पाठविलेला आहे. त्याला विदयापीठाची मंजुरी मिळालेली आहे. परंतु अदयाप राज्य सरकारची मंजुरी मिळालेली नाही. आणि जर शासनाची मंजुरी मिळाली तर आपल्या महानगरपालिकेचे वरिष्ठ महाविदयालय सुध्दा सुरु होईल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>पूर्वीच पारीत केलेल्या ठरावांची लवकरात लवकर अंमलबजावणी व्हावी.

<u>सदस्य श्री.बी.बी.मोरे :–</u>चालेल चालेल चालेल......... ठिक आहे, ठिक आहे, पास,पास,पास.............

<u>महापालिका सचिव :–</u>हा विषय कार्यसूचीवरुन वगळावा लागेल. पारीत करता येणार नाही.

<u>उप–महापौर :–</u>हा विषय सभेच्या कार्यसूचीवरुन वगळा. आणि याबाबत यापुर्वी जो ठराव झालेला आहे त्यांची अंमलबजावणी करा

<u>महापालिका सचिव :–</u>याबाबतीत पूर्वी जे ठराव केलेले आहेत त्यांचा पाठपुरावा करावा असे सभागृहाचे मत आहे. त्यामुळे हा जो प्रस्ताव आहे तो सभेच्या कार्यसूचीवरुन वगळावा लागेल. वगळायचा? सर्वसंमतीने? ठिक आहे?

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब,.........

<u>महापालिका सचिव :–</u>आपण याबाबतीत निर्णय घ्या. कारण की आपण या प्रस्तावाचे सुचक आहात. आपल्या विरोधात निर्णय जात आहे. पाहिजे तर मतदान घ्यायचे असेल तर मतदान घ्या. नंतर काही बोलु नका.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>सचिव साहेब, ही त्यांची प्रस्तावना आहे. ती पारित करण्यास काय हरकत आहे?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>आम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे त्यानुसार आपण ठराव पारीत करा.

<u>महापालिका सचिव :–</u>या प्रस्तावाबाबत सभागृहातील सदस्यांचे दोन गट तयार झाले आहेत.

<u>सदस्य श्री.बी.बी.मोरे :–</u> सचिव साहेब, ही त्यांची प्रस्तावना आहे. ती पारित करण्यास काय हरकत आहे?

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>प्रस्ताव दिलेला आहे त्यानुसार ठराव पारीत केला जावा.

<u>महापौरः–</u>बहुसंख्य सदस्यांचे प्रस्तावास समर्थन असेल तर ठराव पारीत होईल. समर्थन नसेल तर ठराव पारीत करता येणार नाही. बहुसंख्य सदस्यांचे म्हणणे आहे की हा प्रस्ताव कार्यसूचीवरुन वगळला जावा कारण की या विषयी या अगोदरच काही ठराव पारीत झाले आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–</u>मा. महापौरजी, मी सन्माननिय सदस्य श्री.बी.बी. मोरे यांना समजावु इच्छितो, ज्या प्रस्तावाबाबत या अगोदरच ठराव पारीत झालेला आहे त्याबाबत पुन्हा दुस–यांदा, तिस–यांदा, चौथ्यांदा प्रस्ताव आणला जावु शकत नाही. त्या प्रस्तावनेस दुस–यांदा पारीत केले जावु शकत नाही.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>जो ठराव यापुर्वी पारीत झालेला त्याची अंमलबजावणी केली जावी.

<u>महापालिका सचिव :–</u>सन्माननिय सदस्य श्री. नरेंद्र राजानी यांच्या मताशी तुम्ही सहमत आहात?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>ठिक आहे, चालेल.

<u>महापौर :–</u>या बाबीवर आधीच निर्णय झाला असून हा प्रस्ताव मागे घेण्या शिवाय दुसरा काही पर्याय नाही.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**मा. महापौरजी, सचिव साहेब, एक मिनिट हरकतीच्या मुद्दयांन्वये मी दुस–या विषयावर बोलु इच्छितो, काही वेळेपुर्वी लक्षवेधीवर चर्चा चालु असतांना...............

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**महापौर महोदया, आता कोणताही हरकतीचा मुद्दा वगैरे नाही.

**<u>उप–महापौर :–</u>**महापौर महोदया, राष्ट्रगितासाठी उभ्या राहिल्या आहेत.

**<u>महापौर :–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**प्रस्तावकाचे नाव** :– श्री भारत राजवानी

**अनुमोदकाचे नाव** :–ॲड. अनिल (विद्यार्थी) ऐलानी

**विषय क्र. १२:–** <u>प्रस्तावाची सूचना</u>

उल्हासनगर शहरात माध्यमिक शिक्षण शाळा सुरु करण्याबाबत श्री. भारत राजवानी, पालिका सदस्य यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगर पालिकेच्या ३० प्राथमिक शाळा कार्यरत असून, या ठिकाणी ७ वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे. महापालिका शाळांत शिकणारे बहुतांशी विद्यार्थी आर्थिकदृष्टया दुर्बल कुटुंबांतील असतात. ज्या ठिकाणी शिक्षणाला पूरक वातावरण नाही, अश्या वस्त्यांमध्ये राहून ही मुले परिस्थितीशी संघर्ष करीत आपले शिक्षण घेत असतात. महानगर पालिका त्यांची शिक्षणाची गरज लक्षात घेऊन वेळोवेळी विविध सुविधा त्यांना मोफत पुरविण्यासाठी प्रयत्नशील असते.

मात्र, ७वी नंतर यातील कित्येक मुलांना माध्यमिक शाळांत व पुढे कनिष्ठ महाविद्यालयांत प्रवेश मिळणे कठीण जाते. प्रवेशासाठी खाजगी शाळा, महाविद्यालये घेत असलेले डोनेशन, वहया, पुस्तके, व्यवसाय शाळेतूनच घेण्याची जबरदस्ती, अवास्तव फी अश्या आर्थिक बोझ्याखाली ही मुले भरडली जातात. मजबुरीने शिक्षण अर्धवट सोडण्याची पाळी या मुलांवर येते. त्यामुळे महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांच्या ८वी ते १२वी पर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी महापालिकेने घेण्याची आवश्यकता वाटते.

महाराष्ट्र शासनाने खाजगी शैक्षणिक संस्थांना लागणारी कार्यपध्दती लागू न करता महापालिकांना माध्यमिक वर्गासाठी थेट परवानगी देण्याचा निर्णय, शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्र. नमाशा–२००९/(४९७/०९)/माशि–९, दिनांक ११ जून, २००९ नुसार घेतला आहे. तसेच त्यावर सुस्पष्ट खुलासा करणारे परिपत्रक पुन्हा १८ जुलै, २००९ रोजी काढले आहे. महापालिकांना स्वत:च्या आर्थिक उत्पन्नातून ८ वी ते १२ वीचे वर्ग सुरु करावयाचे असल्यास, शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही, असे शासनाने खुलाश्यात स्पष्ट केले आहे.

तरी, उल्हासनगर महानगर पालिकेने महापालिका शाळांत ८ वी वे १२ वी चे वर्ग सुरु करण्याचा निर्णय घ्यावा व त्यादृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांना द्यावेत, म्हणून उल्हासनगर महानगर पालिकेचे कामकाज नियमांतील १ (ज) अन्वये प्रस्तावित करीत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ३७ अ <u>दिनांक:– २०/८/२०१०</u>

ही महासभा उल्हासनगर शहरात माध्यमिक शाळा सुरु करण्याचा प्रस्ताव मागे घेण्यास मान्यता देत आहे.

कारण––

याबाबत दिनांक १०/८/१९९७ रोजी महासभा ठराव क्र. १३ व दिनांक २०/५/२००५ रोजी महासभा ठराव क्र. १३ अन्वये निर्णय घेण्यांत आलेला आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ७.२५ वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— २०/९/२०१०

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/९/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

५

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक २०/९/२०१० रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१४.महापौर —— श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

१५.उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३६ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३७ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३८ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३९ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४० | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ८ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४१ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ९ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४२ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १० | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | ४३ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४४ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४५ | श्री. शेखर केशव यादव |
| १३ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४६ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४७ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४८ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १६ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४९ | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| १७ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५० | श्री. किशोर जग्यासी |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | श्री. राजू जग्यासी | ५१ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १९ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५२ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २० | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५३ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २१ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५४ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २२ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५५ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २३ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | ५६ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २४ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ५७ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २५ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५८ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २६ | श्री. लाल पंजाबी | ५९ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २७ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६० | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २८ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६१ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २९ | श्रीमती शकुंतला पाटील | ६२ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३० | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६३ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३१ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६४ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३२ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६५ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३३ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६६ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३४ | श्री.एडके गणपत गोविंद | ६७ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३५ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ६८ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती संगीता राजेश कंडारे, २. श्रीमती निलम प्रेमसिंग रावत, ३. श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी, ४. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ५. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ६. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे, ७. श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा, ८. श्री. लालबिहारी बुझारत यादव, ९. श्री. सुरेश मधुकर जाधव, १०. श्री. मोहन साधवाणी, ११. श्री. मुकेश सोहन तेजी, १२. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी, १३. श्री. राजेश नानीकराम वधारीया

खालील अधिकारी सभेस हजर होते.

८८.श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त
८९.श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त
९०.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
९१.श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त
९२.श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
९३.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
९४.डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
९५.श्री. माधव जवांदे, शहर अभियंता
९६.श्री. हरेश इदनानी, उप—मुख्य लेखा अधिकारी
९७.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
९८.श्री. एम. गिरगावकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९९.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१००. श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१०१. श्री. जी.जी. हिबारे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
१०२. डॉ.. विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
१०३. श्री. समिर भुमकर, उप कर निर्धारक व संकलक
१०४. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१०५. श्री. दिपक मोरे, प्र. प्रभाग अधिकारी

१०६. श्री. कुमार जग्यासी, उप–अभियंता
१०७. श्री. भास्कर मिरपगार, अग्निशमन अधिकारी
१०८. श्री. नंदु सामतानी, प्र. मुख्य लिपिक, साप्रवि
१०९. श्री. विनोद केणे, लिपिक, आरोग्य विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती अमिता संखे
५. श्रीमती नर्गिस खान

दुपारी १२.४८ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे.........

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. २३६ हा श्री. धनंजय बोडारे यांचा असून यावेळी ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे त्यांच्या प्रश्न आणि उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

? **<u>प्रश्न क्र. २३६ :–</u>** शासन निर्णय क्र. राफेधो/प्र.क्र.२०/नवि–३४/ दिनांक २० मार्च २००९ अन्वये राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागु करण्याचे दृष्टीने आवश्यक उपाय योजना व फेरीवाला उपविधी लागू करण्यासंबंधी सुचित करण्यात आले होते. उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्रमांक १२ दिनांक १९.६.२००९ अन्वये महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे आदर्श उपविधी २००९ ला मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सुचक, समाधानकारक, सविस्तर माहिती ही विनंती.

प्रश्न क्रमांक १ (अ) राष्ट्रीय फेरीवाला धोरणास महासभेने ठराव मंजूर करुन मान्यता दिलेली असून त्या अनुषंगाने महापालिका प्रशासनाने आजतागायत महापालिका/राज्य शासन स्तरावर कोणकोणती कारवाई केली आहे? उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत फेरीवाला धोरण राबविण्यात आले आहे का? आले नसल्यास का राबविणेत आले नाही? फेरीवाला धोरण न राबविणे मागची कारणे काय आहेत?

<u>उत्तर :–</u> शासन निर्णय क्र. राफेधो ०३०९/प्र.क्र. २० / नवि–३४/दि. २ मार्च, ०९ नुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी तयार केलेली फेरीवाला (व्यवसायाचे विनियमन) उपविधी शासनाच्या मान्यतेसाठी मा. सहसचिव नगरविकास विभाग, मत्रांलय, मुंबई यांचकडे या कार्यालयाचे पत्र क्र.उमपा/अबां निवि/३७९ दि. ११/८/०९ अन्वये पाठविण्यात आली आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्याचे सर्वेक्षण करणे बाबत सर्व चार प्रभाग समितीच्या सहा. आयुक्तांना निर्देश दिले असुन प्रभाग समिती स्तरावर सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.

शासन निर्णयानुसार प्रभाग फेरीवाला तात्रिक समिती स्थापन करण्यात आली असून ती पूढील प्रमाणे आहे.

अध्यक्ष :– सहाय्यक आयुक्त

सदस्य :– उप अभिंयता (स्थापत्य)

सदस्य :– पोलिस निरिक्षक (वाहतूक)

सदस्य :– वरिष्ठ पोलिस निरिक्षक

सदस्य :– नगररचना अधिकारी

सदस्य :– अतिक्रमण निष्कासन अधिकारी

उल्हासगनर महानगरपालिका हद्द्ीत फेरीवाला धोरण आजमितीस राबविण्यात आले नाही. तथापि, सदरचे धोरण राबविण्यासाठी उपविधी तयार करुन शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आली व शहरातील फेरीवाल्या व्यवसायाकांचे सर्वेक्षण करण्याचे काम सुरु आहे.

फेरीवाला व्यवसायाचे सर्वेक्षण अपूर्ण असल्यामुळे व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणे बाकी असल्याने सध्या महापालिका क्षेत्रामध्ये फेरीवाला धोरण राबविले जात नाही.

फेरीवाला धोरण राबविण्यासाठी फेरीवाल्यांना परवाने देण्याची पध्दत रद्द् करुन त्यांची नोंदणी करावयाची आहे त्यासाठी प्रथम संपूर्ण शहरातील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. त्यानुसार सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. २३७ हा श्री. धनंजय बोडारे यांचा असून यावेळी ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे त्यांच्या प्रश्न आणि उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

**<u>प्रश्न क्र. २३७ :—</u>** महाराष्ट्र शासन राजपत्र भाग—४ असाधारण मार्च ३, २००६ अन्वये महाराष्ट्र नॉन बायो डिग्रेडेबल गार्बेज (कंट्रोल) ऑर्डीनन्स मधील प्लास्टीक पिशवी उत्पादन व प्लास्टीक पिशव्यांचे वापराबाबत ठरवून दिलेले नियम यांस महाराष्ट्र कॅरी बॅग (मॅन्यूफॅक्चर अॅन्ड यूजेस) नियम—२००६ प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यानुसार प्लास्टीक पिशव्यांचा वापर व उत्पादन इंडीयन स्टॅडर्ड स्पेशिफिकेशनव्दारे प्रमाणीत केलेले असल्याची खातर जमा करुन प्लास्टीक पिशवीवर उत्पादकाचे नाव व पत्ता, प्रदुषक नियंत्रण मंडळा कडील नोंदणी क्रमांक, राज्य औद्योगीक खात्याकडील नोंदणी क्रमांक, पिशवीची जाडी ५० मायक्रॉनपेक्षा कमी नसावी, व सदर नियमांचे उल्लंघन करण्याऱ्या, प्रमाणीत न केलेल्या पिशव्याचा वापर केल्यास संबधीतावर दंडात्मक कारवाई करावी अशी तरतूद केलेली असून महासभेने ठराव करुन अश्या प्लास्टीक पिशव्यावर बंदी घातली आहे त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सुचक, समाधानकारक, सविस्तर माहिती मिळावी ही विनंती

प्रश्न क्र १ (अ) वरील प्रमाणे ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे पिशव्यावर बंदी घालण्यात आली असून त्या अनुषंगाने महापालिका प्रशासनाने कोणकोणती कारवाई केली आहे? किती कर्मचाऱ्यांच्या नेमणूका सदर कामासाठी केल्या? संबधीतांनी किती प्लास्टीक पिशव्या जप्त केल्या? नागरीक/व्यापाऱ्याकडून किती दंड वसुली केली?

<u>उत्तर :—</u> १ अ) महापालिका प्रशासनामार्फत वेळोवेळी ५० मायक्रोन पेक्षा कमी जाडीच्या पिशव्याचे उत्पादन साठी विक्री व वापर करणाऱ्या विरुध्द माल जप्तीची व दंडात्मक कारवाई करण्याात आलेली आहे.

पथक गठीत करण्यात आलेले आहे. सोबत पथकात कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना बजावण्यात आलेलया कार्यालयीन आदेशाची प्रत जोडली आहे.

महाराष्ट्र कॅरी बॅग (मॅन्युफॅक्चर अॅन्ड युजेस) नियम २००६ चा भंग करण्याऱ्याकडुन जानेवारी २००९ ते आजपर्यंत रुपये २५ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला असून २२१ किलो ५० मायक्रोन पेक्षा कमी जाडीच्या पिशव्या जप्त करण्यात आलेल्या आहेत.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. २३८ हा श्रीमती वसुधा बोडारे यांचा आहे.

यावेळी सदस्या श्रीमती पंचशिला पवार, श्रीमती लता निकम, श्रीमती सुमन शेळके, श्रीमती जयश्री पाटील, श्रीमती शकुंतला पाटील, श्रीमती मिनाताई सोनेजी, श्रीमती लिलाबाई आशान, श्रीमती रजनी महाडिक यांनी सभागृहात प्रवेश केला.

**<u>प्रश्न क्र. २३८ :—</u>** उल्हासनगर महानगरपालिका हद्द्‌ीत बांधण्यात आलेल्या इमारतींना शासन नियमानुसार / महापालिका ठरावानुसार सौर उर्जा/सोलार एनर्जी प्रकल्प राबविणे आवश्यक केले आहे. त्यानुसार खालील प्रशावर महासभेत चर्चा होवून सुचक, समाधानकारक, सविस्तर चर्चा होवून माहिती मिळावी ही विंनती.

प्रश्न क्रमांक १ (अ) नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी देण्यात आलेल्या किती इमारतींनी शासन नियमानुसार/महापालिका ठरावानुसार सौर उर्जा प्रकल्प/सोलार एनर्जी प्रकल्प राबविले आहेत? ज्या इमारतींनी सौर उर्जा प्रकल्प/सोलार एनर्जी प्रकल्प राबविला नाही त्यांचेवर महापालिका प्रशासनाने नोटीसा देवून कोणती कारवाई केली आहे? का अद्यापपर्यंत कारवाई केलेली नाही?

<u>उत्तर :—</u> शासनाच्या निर्देशानुसार जागेचे क्षेत्रफळ ३०० चौ.मी. पेक्षा कमी नसावे. तथापि, उल्हासनगर शहरामध्ये ब्रिटीश कालीन बॅरेक्य/ब्लॉक्स असल्याने त्यांचे क्षेत्रफळ ३०० चौ.मी. पेक्षा कमी असल्याने तसेच ज्या प्लॉटचे क्षेत्रफळ ३०० चौ.मी. पेक्षा जास्त असणाऱ्या इमारतीमध्ये प्रकल्प राबविण्याबाबत महानगरपालिकेकडे प्रस्ताव मंजूर करते वेळेस नकाशामध्ये विकासकाकडुन प्रयोजन करुन नकाशे मंजूर करण्यात येतात.

<u>सदस्या श्रीमती वसुधा बोडारे:— </u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, मी जो प्रश्न विचारला आहे, त्याचे उत्तर देण्यासाठी आपले नगररचनाकार सभागृहात उपस्थित आहेत काय? अधिकारी आहेत काय? त्यांनी सभेत उपस्थित राहावे म्हणुन मागच्या वेळेपासुन आपण त्यांना सूचना देत आहोत. तरी देखील ते आजच्या या सभेत उपस्थित नाहीत. मी जो प्रश्न विचारला आहे २३८ आणि २३९ क्रमांकाचा तो अतिशय गंभीर असा प्रश्न आहे. तो मी ३०/१/२०१० रोजी विचारलेला आहे. सौर उर्जा व रेन वॉटर हार्वेस्टींग विषयीचा तो प्रश्न आहे. आणि एवढया गंभीर प्रश्नाचे उत्तरे देण्यासाठी आपले अधिकारी सभागृहात उपस्थित नसतील तर .........

यावेळी सदस्य श्री. किशोर जग्यासी, श्री. बी.बी. मोरे, श्री. अनिल विदयार्थी, श्री. प्रशांत धांडे, श्री. जीवन इदनानी, श्री. बच्चाराम रुपचंदानी, श्री. लाल पंजाबी, श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. रमेश चव्हाण, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, श्री. दिलीप गायकवाड यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, मागील महासभेत आपण मुद्दामहुन आवर्जुन सांगितले होते की पुढील महासभेत नगररचनाकार हजर नसतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल, आज नगररचनाकार सभागृहात नाहीत. त्यांच्या विभागाशी संबंधीत प्रश्नांची सदस्यांना उत्तरे मिळत नाहीत. हे असेच चालणार असेल तर मग ही सभा चालविता कशाला? कमीत कमी दहा सभांना ते उपस्थित नाहीत. किती सभांना ते उपस्थित होते? याबाबतची इतिवृत्तातील नोंद पहा.

<u>सदस्या श्रीमती वसुधा बोडारे :—</u>प्रश्न गांभीर्याने घेतला जात नाही. आम्ही त्याबाबतीत कुणाकडे पाठपुरावा करायचा? अधिकारीच नसतील तर पाठपुरावा कुणाकडे करायचा? पाण्याचे स्त्रोत आपले पुर्वीपासुन आहे तेवढेच आहेत. उर्जेचा स्त्रोतही ही तेवढाच आहे. त्यासाठी काय उपाययोजना केल्या आहेत असा मी प्रश्न विचारला आहे. क्षेत्रफळाची माहिती फक्त दिलेली आहे. दिनांक ३०/१/२०१० नंतर एकही बांधकाम नकाशा मंजुर झाला नाही काय? त्याठिकाणी त्यांनी काय प्रयत्न केले आहेत? मध्यंतरी दोन वर्ष नगररचनाकार आपल्या महापालिकेत कार्यरत नव्हते. त्यानंतर कुठे नगररचनाकार आपणाकडे आले आहेत तर ते महासभांमध्ये नसतात तर मग आम्ही कुणाकडुन उत्तरे मागायची?

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>मा. आयुक्त साहेब, आपण मागच्या वेळेस आदेश दिला होतात, आपल्या अगोदरचे जे आयुक्त होते त्यांनीही सांगितले होते. नगररचनाकार किती सभांना हजर होते आणि किती सभांना गैरहजर आहेत ते जरा पहा. त्यांच्यावर कारवाई करेन असे तुम्ही बोलला होतात. असेच जर चालणार असेल तर काय उपयोग आहे? आम्ही येथे बसलो आहोत आणि तुम्ही व्यासपीठावर बसला आहात.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, मला असे समजले आहे की, आपण त्यांना सभेस येण्याबाबतीत सांगितले होते परंतु त्यांनी तर आपणासही आव्हान देवुन ते आजच्या सभेत आले नाहीत. आपण त्यांना सांगितले होते की, कसेही करुन सोमवारच्या महासभेत उपस्थित राहायचे आहे.

<u>सदस्या श्रीमती वसुधा बोडारे :—</u>दिनांक ३०/१/२०१० रोजी प्रश्न विचारलेला आहे. आता कोणता महिना चालु आहे? तुम्ही विचार करा, आम्ही उत्तरासाठी किती महिने वाट बघायची? आमचा प्रश्न महासभेत चर्चेला येईल. संबंधीत अधिकारी आम्हांला त्याची उत्तरे देतील अशी आम्ही किती दिवस वाट पाहायची? रेन वॉटर हार्वेस्टींग आणि सौर उर्जा हा भविष्यातील अतिशय महत्वाचा विषय आहे. तुम्ही कितीही पैसा ओता तुम्हांला पाणी मिळणार नाही, उर्जा मिळणार नाही असा हा प्रश्न आहे. त्यासाठी आपण काय उपाययोजना केल्या आहेत, काय करायच्या बाकी आहेत त्याची येथे माहिती दयायला नको आहे काय?

<u>आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):—</u>मा. महापौर महोदया, सभेत उपस्थित राहण्याबाबतीत नगररचनाकारांना सक्त आदेश दिले होते. त्याबद्दल कुठलीही शंका नाही, परंतु आज सकाळी मा. महापौर व माझ्याकडे असा

संदेश आला होता की, आज सकाळी ११.०० वाजता आपल्या महानगरपालिकेच्या एका विषयासंबंधी नगरविकास राज्य मंत्रीं महोदयांकडे उपस्थित राहण्याबाबत त्यांना आदेश होते.

सदस्या श्रीमती वसुधा बोडारे :—राज्य मंत्री महोदयांकडील बैठकीस उपस्थित राहण्याविषयीचे पत्र तुम्ही पाहिले आहे काय? प्रत्येक महासभेच्या वेळेस ते मंत्रालयातच किंवा मुंबईतच असतात. तेथे जर महत्वाची बैठक आहे तर मग ही महासभा महत्वाची नाही काय? प्रत्येक महासभेच्या वेळी हेच उत्तर असते की ते मंत्रालयात गेले आहेत............

सदस्य श्री. प्रकाश सांवत :—मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, किती महासभांना ते हजर होते आणि किती महासभांना ते हजर नाहीत याची आपण जरा नोंद पहा. माझ्यामते ते एकाही महासभेत हजर राहत नाहीत. महासभेच्या आधी काहीतरी कारण सांगतात आणि मी मंत्रालयात आहे असे सांगतात. हे असे चालणार नाही, महापालिकेचे कसे होणार? तुम्ही तरी काय काम करु शकणार आहात, आणि इतर लोक तरी काय काम करु शकणार आहेत? त्यांच्यावर जर तुम्ही कारवाई करणार नसाल तर आम्हांला वेगळा विचार करावा लागेल.

सदस्या श्रीमती वसुधा बोडारे :—११.०० वाजता ते जर मंत्रालयात बैठकीला जाणार होते त्या अगोदर दहा वाजता त्यांच्याकडुन प्रश्नांशी संबंधीत माहिती घेवुन आम्हांस दयावयास पाहिजे होती. तुम्हांला माहित आहे, प्रश्न कोणकोणते आहेत ते? सभेच्या अगोदर तुम्ही अभ्यास करायला पाहिजे होता. आजच्या महासभेपुढे २३६ पासुनचे प्रश्न आहेत, नगररचनाकारांशी संबंधीत ते प्रश्न आहेत. आणि ते सभेत नाहीत. असे आपण सांगणार आणि आपले हे उत्तर ऐकुन आम्ही समाधानी राहायचे. पाणी पुरवठयासाठी आपण काय योजना करत आहोत आणि उर्जेसाठी आपण काय योजना करत आहोत? आपण काय योजना राबवत आहोत तेच जर अधिकारी आम्हांला सांगत नाहीत तर मग आम्ही याबाबतीत नागरीकांना काय उत्तरे दयायची? फक्त आम्ही प्रश्न विचारायचे आणि त्याचे कुणालाच गांभीर्य नाही.

सदस्य श्री. प्रकाश सांवत :—प्रश्न विचारुन दहा महिने झाले या दहा महिन्यात नगररचना विभागाकडुन एकही उत्तर मिळालेले नाही.

सदस्या श्रीमती वसुधा बोडारे :—माझा हा प्रश्न पुढच्या महासभेत घेतला जाईल आणि नगररचनाकार याचे उत्तर देतील अशा प्रकारचे मला येथे उत्तर दिले पाहिजे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—मा. महापौर महोदया, आजच्या या सभेत नगररचनाकार तर नाहीत, सहा. संचालक, नगररचना हे कोठे गेले? त्याचे काही उत्तर आहे काय?

आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):—मा. महापौर महोदया, काल आम्हांला सूचना मिळाल्या आहेत. आणि आज सकाळी संदेश मिळाला की अत्यंत महत्वाच्या बैठकीसाठी मा. राज्य मंत्री महोदयांकडे त्यांना बोलाविले आहे. सहा. संचालक नगररचना श्री. सिंह व नगररचनाकार यांना बोलाविले आहे. वरिष्ठांनी त्यांना तिकडे बोलाविल्यामुळे आम्ही त्यांना तेथे जाण्यासाठी परवानगी दिली.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—ठिक आहे, या अगोदर त्यांनी कोणत्या सभेस आपली उपस्थिती नोंदविली होती? या अगोदर ते कोठे गेले होते? याची काही चौकशी केली? त्यांना कारणे दाखवा नोटिस बजावली?

आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):—मा. महापौर महोदया, या अगोदरच्या त्यांच्या अनुपस्थितीबाबतची माहिती देत आहोत.

सदस्य श्री. किशोर जग्यासी:— त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे किंवा नाही?

सदस्या श्रीमती वसुधा बोडारे :— माझे प्रश्नांची उत्तरे पुढच्या महासभेत मिळतील का? नाहीतर पुढच्या सभेत २३९ च्या पुढचे प्रश्न घ्याल आणि माझे प्रश्न असेच प्रंलबिंत राहतील?

आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):— पुढच्या महासभेत आपल्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

सदस्य श्री. किशोर जग्यासी:— मा. सचिव साहेब, नगररचनाकारांशी संबंधीत प्रश्नांवर जी चर्चा चालु आहे ती पुर्ण होऊ दया.

महापालिका सचिव :— पुढील महासभेत उत्तर दिले जाईल असे सांगितले जात आहे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी:— ते तर मागील सभेत सुध्दा सांगितले होते. आत्ता सुध्दा तेच सांगत आहात हे नेमके काय आहे? नगररचनाकार येतील का? कि आम्हालाच त्यांना भेटायला पुण्याला जावे लागेल, ते पुण्यालाच भेटतात येथे भेटत नाहीत. यासाठी नगरसेवकांना सुध्दा पुण्याला घेऊन जावे लागेल. मा. उपमहापौरजी लोकशाहीचा अपमान होत आहे. सातवी सभा आहे नगररचनाकाराचा पत्ता नाही, सहा. सचालंक नगररचना यांचाही पत्ता नाही. व आपण स्तब्ध बसले आहात.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मु.):— मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सर्व सन्मानीय सदस्य, नगररचनाकार आणि सहा. सचांलक नगररचना हे दोन्ही अधिकारी मत्रांलयामध्ये एका बैठकीसाठी गेले आहेत.

सदस्य श्री. किशोर जग्यासी:— किती, अकरा महिन्यापासुन मंत्रालयात जात आहेत काय? त्यांनी जवळजवळ अकारा महासभांना उपस्थिती लावलेली नाही.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मु.):— आज सकाळीच मंत्रालयातील बैठकीबाबतचा निरोप मिळाला.

सदस्य श्री. किशोर जग्यासी:— जेव्हा नगररचनाकारांना कुढे बैठकीसाठी जायचे नसेल आणि संपुर्ण दिवस ते महापालिकेत असतील त्यांच दिवशी महासभा आयोजित करा.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मु.):— मा. नगरविकास राज्यमंत्री यांच्याकडे आज तातडीने बैठक बोलावली होती त्यामुळे त्या बैठकीसाठी ते अल्प सुचनेवर गेले आहेत. पुढच्या सभेत जर नगररचनाकार किंवा सहा. सचांलक नगररचना हे उपस्थित नसतील तर आम्ही स्वत: त्या प्रश्नांची उत्तरे देऊ.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:— प्रशासनावर आपला काही दबाव आहे किंवा नाही? आज पर्यंत किती महासभा झाल्या किती महासभांना ते हजर होते व किती महासभांना ते गैरहजर होते?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मु.):— १५ दिवसांपूर्वी स्मशानभुमीच्या विषयांसंबधी .........

सदस्य श्री. किशोर जग्यासी:— अडीशे वार जागेवर किती माळयाचे बाधंकाम केले जावु शकते? चटई क्षेत्र किती मिळते ते सांगा? नगररचनाकारांशी संबंधीत या प्रश्नांचे उत्तर दया.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मु.):— पुढच्या वेळेस ते महासभेत उपस्थित राहिले नाही तर या प्रश्नांविषयी अभ्यास करुन आम्ही उत्तरे देवु.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:— मागील चार महासभेपासून आपण सांगत आहात पुढच्या वेळेस, पुढच्या वेळेस .......

यावेळी श्री. धनंजय बोडारे, श्री. प्रभुनाथ गुप्ता, श्री. गोविंदराम लुंड, श्री. नरेंद्र राजानी, श्री.जे.के. ढोके, श्री. कुमार आयलानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्या श्रीमती वसुधा बोडारे :–</u> तुम्ही पुढच्या वेळेस    या प्रश्नांवर अभ्यास करणार व आम्हाला उत्तरे देणार व आत्ता म्हणत आहात की, त्याच्यांशी संबंधीत प्रश्नांची उत्तरे देण्यास मी उभा आहे. ३०/०१/२०१० रोजी मी प्रश्न विचारला आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> १२ विवादींत बाधंकाम परवानगी बाबतचा विषय महासभेपुढे आहे त्याबाबतीत कोण उत्तर देईल. फार मोठा घोटाळा आहे त्यामध्ये, घोटाळा करायचा आणि बाहेर निघुन जायचे?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मु.):–</u> दफनभुमीच्या विषयासाठी मा. नगरविकास राज्यमंत्री महोदयानी बैठक लावली होती त्यासाठी तातडीने तिथे जावे लागले. दफनभुमीचा सवेंदनशिल विषय आहे.

यावेळी सदस्य श्री. अंकुश म्हस्के सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> हा सवेंदनशिल विषय नाही?


<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मु.):–</u> तो सुध्दा आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> उल्हासनगर शहराचा विषय सवेंदनशिल नाही का? याचे मला उत्तर दया.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मु.):–</u> आहे ना?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> हा विषय महत्वाचा नाही का? तोच विषय महत्वाचा ठरला का?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मु.):–</u> तसे नाही. तो विषय सुध्दा महत्वाचा आहे. असे म्हटले आहे, सुध्दा या शब्दावर जोर दिला होता.

 यावेळी सदस्य श्री. मोहन रामरख्यानी, श्री. रविंद्र बागुल यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> नगररचनाकार व सहा. सचांलक नगररचना यापैकी कुठल्यातरी एका अधिकाऱ्याने मंत्रालयात बैठकीसाठी जायला पाहिजे होते, सहा. सचांलक नगररचना यानी जायला पाहिजे होते. गुरगुळे साहेबांनी येथे हजर राहायला पाहिजे होते. एकाने जायला पाहिजे होते, दोघांनी तेथे जायची गरज नव्हती. एकाने जायचे होते एकाने येथे हजर राहायचे होते ना?

 यावेळी सदस्य श्री. अंकुश म्हस्के यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी:–</u>  मा. महापौरजी, सन्मा. सदस्य श्री. किशोर जग्यासी व प्रशांत धांडे यांनी नगररचनाकारांच्या अनुपस्थितीचा जो प्रश्न उपस्थित केला आहे. सर्वात प्रथम उल्हासनगर महानगरपालिकेच्या इतिहासात हा पहिला नगररचनाकार असेल ज्याच्या विरोधात १२ विवादीत बाधंकाम परवानग्याचा विषय महासभेपुढे आहे. ज्यांने स्वत: हे मान्य केले आहे कि या प्रश्नांमध्ये चुक आहे चुक आहे चुक आहे, त्यांनतर सलगपणे महासभेमध्ये उपस्थित न राहणे व प्रत्येक वेळी सभागृहांच्या भावनांची कदर करुन आयुक्त असे सांगतात कि पुढील महासभेत नगररचनाकार जरुर येतील, हे नगररचनाकार आयुक्तांनी दिलेल्या खात्रीची ना कदर करत आहेत, ना सभागृहाच्या भावनांची कदर करत आहेत. प्रत्येक वेळेस काहीनाकाही काही कारण, काहीनाकाही तातडीचे काम, काहीनाकाही विषय,  काहीनाकाही राजकिय उपयोग करुन घेवुन हे नगररचनाकार महासभांना अनुस्थित राहत आहेत? एकप्रकारे हे नगररचनाकार सभागृहाला सामोरे जावु इच्छित नाही. जो नगररचनाकार सभागृहाला तोंड देवु इच्छित नाही, त्यांचा पगार आपण का देत आहात? या शहरातील आमचे जे लोक कराच्या रुपाने पैसे भरतात, नगररचनाकार बरोबर किंवा चुकीचे जे काही बाधंकाम नकाशे मंजुर करतात त्या बाधंकाम परवानग्यांतुन जो पैसा मिळतो त्यातुन त्याचा पगार निघतो. जे लोक त्यांना पगार देतात

त्यांच्या भावनाची ते कदर करत नाहीत. याव्दारे आमच्या भावनांचा कठोर विषय याठिकाणी व्यक्त करत आहेत ज्यांची आज याठिकाणी इतिवृत्ता नोंद झाली पाहिजे व नगररचनाकारांसमोर हा विषय ठेवला पाहिजे व ते वेळोवेळी जी कारणे सागंत आहेत व महासभेच्या वेळी कधी मंत्रालयात, तर कधी कोकंणभवन येथे ते उपस्थित राहतात तर हा विषय तेथ पर्यंत सुध्दा पोहचला पाहिजे सभागृहाची भावना अशी अशी आहे, तर या पुढील सभेत नगररचनाकार जर उपस्थित नसतील तर, मा. महापौरांना माझी अशी विनंती असेल कि, त्यांनी महासभेचे कामकाज चालवु नये. धन्यवाद.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:—</u> मा. महापौरजी, मी आयुक्तांना शेवटचा एक प्रश्न विचारु इच्छितो की, नगररचनाकार एवढया महासभांना उपस्थित नसतांना त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे किंवा नाही? एवढया प्रश्नाचे उत्तर दया.

यावेळी सदस्या श्रीमती निलु चांदवानी, श्रीमती मंजु पोपटानी, श्रीमती कविता सिरवानी, कु. शकुंतला जग्यासी, श्रीमती शिला मनसुलकर, श्रीमती ज्योती चैनानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत:—</u> सन्मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे यांचे प्रश्न जेव्हा पुकारण्यात आले होते तेव्हा ते सभागृहात हजर नव्हते त्यांचे प्रश्न नगररचनाकारांशी संबंधीत होते ते आज सभागृहात उपस्थित नसल्यामुळे त्यांच्याशी संबंधीत असलेला प्रश्न आपण कसे काढुन टाकु शकता? ते प्रश्न पुन्हा आले पाहिजेत, त्यांच्या विषयी उपप्रश्न कोणाला विचारायचे?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:—</u> नगररचनाकारांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे किंवा नाही? ते मी विचारत आहे.

<u>उपमहापौर:—</u> मा. महापौराच्या आदेशानुसार सांगु इच्छितो की, दफनभुमी विषयी मा. राज्यमंत्री नगरविकास यांनी आज मंत्रालयात बैठक बोलावली आहे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:—</u> नगररचनाकारांच्या आजच्या अनुपस्थित बाबत बोलत नाही. याअगोदच्या सहा सभाना ते उपस्थित राहिले नाहीत त्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली आहे किंवा नाही. आजची तर गोष्ट सोडुनच दया.

<u>उपमहापौर:—</u> जर त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली नसेल, काही कामाव्यतिरिक्त.........

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:—</u> असा काही नियम आहे का? सहा सभांना उपस्थित नसतांनाही त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली जावु नये. याबाबतीत आपण सांगा.

<u>उपमहापौर:—</u> कारणे दाखवा नोटीस बजावली नसेल तर त्याबाबतीत चौकशी करुन त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यास आपण सांगु.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:—</u> याचाच अर्थ त्यांच्यावर कोणताही दबाव नव्हता, त्यांच्या विरोधात कोणतीही चौकशी चालु नाही.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:—</u> मा. उपमहापौर साहेब, आपण सागिंतले की, मंत्री महोदयानी बैठक बोलाविले आहे कि नगररचनाकार यांना त्या बैठकिस बोलविल्याबाबतचे आपणाकडे काही लेखी पत्र आले आहे काय?

<u>उपमहापौर:—</u> मत्रालयातुन दुरध्वनी संदेश आला होता. राज्य मंत्री महोदयांनी बोलावलेल्या त्या सभेचे आपणांस इतिवृत्त मिळेल, त्या सभेत काय झाले ते समजेल दफनभुमीविषयीची ती सभा आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:—</u> ते पत्र पाठवितात ना?

<u>उपमहापौर:—</u> होय, होय, इवितृत्त मिळेल त्यावरुन खात्री करुन घेता येईल.

सदस्य श्री. किशोर जग्यासी:— मा. उपमहापौरजी, ज्यांचे काम आहे त्यांना उत्तर देवु दया. त्यांना कारणे दाखवा नोटीस का बजावली नाही? या प्रश्नांविषयी उत्तर देणे हे आपले काम नाही. यांना विचारा त्यांना कारणे दाखवा नोटीस का बजावली नाही? व त्यांच्यावर काय कार्यवाही करत आहात?

उपमहापौर:— त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली नसेल तर कारणे दाखवा नोटीस देण्यास भाग पाडु.

सदस्य श्री. किशोर जग्यासी:— हे मी आपणाकडुन ऐकु इच्छित नाही, मुख्यालयांचे जे प्रमुख आहे त्यांच्याकडुन हे जाणुन घेवु इच्छितो त्यांनी त्याना कारणे दाखवा नोटीस का बजावली नाही? मा. म्हसाळ साहेब, माझा प्रश्न जरा समजुन घ्या, किती महासभांना उपस्थित राहिले नाही तर त्यांना नियमानुसार कारणे दाखवा नोटीस बजावायची आहे, व आपण ती बजावली आहे किंवा नाही? व संपुर्ण वर्षभरातील महासभांना त्यांची उपस्थिती काय आहे? व त्यांनी किती बाधंकाम परवानग्या मंजुर केल्या? त्यांचे उत्तर दया.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मु.):— सन्मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सदस्य, नगररचनाकार यांच्या विषयीची सपुर्ण आस्थापना विषयची कामे, सचालंक नगररचना पुणे, यांच्याकडुन केली जातात. पगार, रजा हे सर्व पुणे येथुन होत असते, मागच्या वेळेस आयुक्त साहेंबानी सागिंतल्यानुसार नगररचनाकार यांच्या अनुपस्थितीबाबत त्यांच्या विभागाकडे आम्ही आता पत्रव्यवहार करत आहोत, त्यांनतर त्यांचा विभाग त्याच्यावर कार्यवाही करेल.

सदस्य श्री. किशोर जग्यासी:— मागील वेळेस सुध्दा आयुक्त साहेंबानी हेच सागिंतले होते की, आम्ही त्यांच्यावर कारवाई करु ती केली आहे का? काय कारवाई करणार ते सांगा. आपणाकडे याबांबतचे दस्तऐवज आहे का? त्यांना कारणे दाखवा नोटीसच बजावली नाही.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मु.):— त्यांचा पगार व रजा या संबंधीची सर्व कामे संचालक नगररचना पुणे, यांच्याकडुन होतात त्यामुळे त्यांच्या विभागास कळविणे आवश्यक आहे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी:— ठिक आहे, सहा. सचांलक नगररचना, हे कुठे आहेत?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मु.):— त्यांच्याकडे कल्याण व उल्हासनगर या दोन महापालिकांचा कार्यभार आहे, आपल्या महापालिकेतील त्यांचा कार्यभार हा अतिरिक्त कार्यभार आहे आणि कल्याण येथील त्यांचा जो कार्यभार आहे तो नियमीत स्वरुपाचा व पुर्णवेळ असा आहे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी:— त्यांना जे चौकशीचे काम देण्यात आले होते त्यांचा अहवाल कुठे आहे तो आपणाकडे आहे का?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मु.):— त्यांचा अहवाल सोबत दिलेला आहे, सभासुचने सोबत दिलेला आहे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी:— कुणास दिला आहे? सभागृहात दिला आहे का?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मु.):— आपणा सर्वांना दिलेला आहे, सभासुचने सोबत जोडलेला आहे.

यावेळी सदस्य श्री. गोविंदराम लुंड व श्री. राजु जग्यासी हे सभागृहातुन बाहेर गेले.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:— मा. महापौरजी, आयुक्त साहेब, हा जो नगररचनाकारांशी संबंधीत विषय चाललेला आहे. याबाबत मागील महासभेत आपण आश्वासन दिले होते की, नगररचनाकारांना कारणे दाखवा नोटीस बजावली जाईल, आता आपले श्री. म्हसाळ साहेब म्हणतात की, आज आम्ही कार्यवाही करु, म्हणजेच एक महिना पुर्ण झाल्यानंतर कोणतीही कार्यवाही झालेली नाही, याबाबत मी असे विचारु इच्छितो की, नगररचनाकार आपल्या महानगरपालिकेत किती दिवस उपस्थित होते, त्याचे काही आपणाकडे नोंद आहे का, जर ते काही रजा घेत असतील तर त्याची आपणाकडे नोंद आहे का? त्याबाबतीत महासभेस सांगु शकाल? मागील

महासभेपासुन आजच्या महासभेपर्यंत नगररचनाकार किती दिवस महापालिकेत आले? याची नोंद कोणाकडे असते?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मु.):–</u> सवंर्ग ३ व सवंर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची नोंद घेण्यासाठी हजेरी पत्रक असते, सवंर्ग १ व २ च्या अधिकाऱ्याच्या उपस्थितीची नोंद घेण्यासाठी कोणत्याही प्रकारचे हजेरी पत्रक नसते.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:–</u> मी विचारु इच्छितो की, जर ते रजा घेत असतील, कधीतरी रजा घेत असतीलच, त्यांची आपणांकडे नोंद आहे का? दस्तऐवज आहेत का? त्यांनी किती रजा घेतल्या आहेत? सवंर्ग ३ व सवंर्ग ४ च्या कर्मचा–यां विषयी मी बोलत नाही. आपण बोलता की, नगररचनाकार यांची रजा संचालक नगररचना, पुणे यांच्याकडुन मंजुर होते, तर नगररचनाकारांच्या रजेविषयी त्यांच्याकडुन काही माहिती आली आहे का?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मु.):–</u> त्यांनी जेवढया काही किरकोळ रजा वैद्यकीय रजा व अर्जित रजा घेतल्या आहे त्याची नोंद आमच्या कडे आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:–</u> तर हे सांगा एक महिन्यामध्ये किती रजा घेतल्या आहेत?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मु.):–</u> त्याची माहिती मी आपणांस देतो.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:–</u> ती माहिती घेऊन या. तसेच मागील महासभेस आयुक्तांनी सांगितलेले होते की, मी त्यांच्यावर कार्यवाही करेन त्यांचे काय झाले. आता आपण म्हणत आहात त्यांच्या कार्यालयास त्यांच्या अनुपस्थितीबाबतचा अहवाल पाठवु. एक महिना पुर्ण झाल्यानंतर आपणांस काय करायचे आहे ते कळत नाही आपण महासभेत आश्वासन देता, परंतु त्याची कार्यवाही करत नाहीत.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मु.):–</u> आजच्या महासभेत ते उपस्थित राहणार होते परंतु सकाळी लवकरच दुरध्वनीवरुन संदेश आल्याने ते मंत्रालयात एका बैठकीस गेले आहेत.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:–</u> हे पहा, आजच्या त्यांच्या अनुपस्थितीबाबत मी बोलत नाही, मी आपणांस हे सांगु इच्छितो की मी त्यांच्यावर कार्यवाही करेन असे मागील महासभेत आयुक्तांनी आश्वासन दिले होते, त्यानुसार काय कारवाई केलीत? आपण त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली, त्यांच्या विभागाकडे नोटीस पाठविलीत का? की, हे नेहमीच अनुपस्थित राहतात कामावर येत नाहीत? असे काही कळविले आहे? सभागृहाच्या भावना त्यांच्या विभागांस कळविल्या आहात का? आज अमुक एका ठिकाणी सभा आहे असे आपण सांगता परंतु या अगोदर एक महिना आपण काय केले? आपण त्यांना नोटीस पाठविली आहे त्यांच्या विभागास कळविले आहे का? की ते कामावर येत नाहीत, आमच्या महासभेत अशी अशी चर्चा झाली आहे. आमच्या सभागृहाच्या भावना त्यांना कळविल्या आहेत का? काहीच करत नाही आपण? आज म्हणता की दुरध्वनी संदेश आला होता, आजच्या अनुपस्थितीबाबत मी काही बोलत नाही. याच्या अगोदर आपण काय केले? आपणांस माहित होते की, या प्रकारचा प्रश्न आहे त्याच्या उत्तरासाठी पुर्ण तयारी करुन यावयास पाहिजे होते? आता मला सांगा नगररचनाकारांनी किती दिवसाची रजा घेतली आहे.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण:–</u> मा. महापौर, उप–महापौर व आयुक्त साहेब, मागच्या सभेत अधिकारी नव्हते याच विषयावर आम्ही सभा त्याग केला होता. त्यावेळेस तुमचे व मा. महापौरांचे उत्तर होते की, पुढच्या सभेत ते आले नाहीत तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल. तसेच सहा. सचांलक नगररचना श्री. सिंग साहेब, हे आपल्या महापालिकेत कधी असतात? त्याबाबतचा फलक महापालिकेत लावला जावा. ते उल्हासनगर महापालिकेत या या दिवशी असतील तसेच कल्याण महानगरपालिकेत या या दिवशी असतील अश्या प्रकारचा फलक लावा. दोन्ही महापालिकांचा त्यांच्याकडे चार्ज आहे म्हणजे काय? ते कल्याण मध्येही नसतात व येथेही नसतात. हे फसवाफसवीचे काम करु नका साहेब. ते येथे केव्हा येतात ते तुम्हाला माहित आहे का, तुम्ही सांगा, तुम्ही उत्तर दया. तुम्ही लिहुन ठेवा, सहा. सचांलक नगररचना हे या या दिवशी उल्हासनगर महानगरपालिकेत असतील, गुरुवारी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत लोंकाना भेटतील, लोक काही वेडे आहेत का, कॅम्प नंबर ४ येथुन महापालिकेत यायला ४० ते ५० रुपये लागतात. हे जी उत्तरे देतात ती साहेब तुम्हाला पटतात का? मागच्या वेळेस तुम्ही जे उत्तर दिले ते पाहता आम्ही काय वेडे आहोत का? याचा

अर्थ असा की, तुम्ही सभागृहाचा अपमान करत आहात. तुम्ही आम्हाला वेडे समजताय. तुम्ही असे समजता की नगरसेवक ओरडतील व शांत बसतील. अगदी सहजतेने घेतात. साहेब एक वेळ अशी येईल की, तुम्हाला हे महागात पडेल, आम्ही सत्तेत बसलो आहोत याचा अर्थ आम्ही हातात हातकडया, दोऱ्या बाधुन बसलो नाहीत. तुम्हाला बसणे येथे मुश्कील करुन टाकु. तुम्ही समजताय काय स्वत:ला, तुम्ही उत्तर देता पुढच्या महासभेत योग्य ती कारवाई करु, काय केली कारवाई ते सांगा.

आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):— मा. महापौर महोदया, मी मागच्या सभेसमोर निश्चितपणे असे बोललो होतो.

सदस्य श्री. किशोर जग्यासी:— मा. आयुक्त साहेब, सर्वांचे बोलणे झाले आपण उत्तर दया.

सदस्य श्री. प्रकाश सावंत:— मला बोलण्याची इच्छा नव्हती परंतु आपण बोललात म्हणुन सांगतो, मा. मागच्या वेळेला तुम्हीच आयुक्त म्हणुन होतात त्यावेळी संपुर्ण सभागृहाचा गदारोळ एकुन उपमहापौरांनी उत्तर दिलेले आहे ते इतिवृत्तात नमुद आहे, पाहिजे तर मी तुम्हाला वाचुन दाखवितो. ''आपले जे नगररचनाकार आहेत महसभेकडे दुर्लक्ष करुन निघुन जातात, का जातात काय माहित? ते महासभेत आले नाहीत पण ते आज शहरात आहेत, शहरात असतानाही सभेत आले नाहीत, का आले नाहीत त्याासाठी मी आयुक्तांना सांगतो की त्याच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही केली जावी'' हे उपमहापौरांनी म्हटले आहे त्याची इतिवृत्तात आलेली नोंद आहे. ही दहावी महासभा आहे. दहा महासभा ते आले नाहीत. नाहीतर श्री. म्हसाळ साहेबांना विचारा ते किती महासभांना आले नाहीत, असेच जर चालणार असेल तर एकाही प्रश्नांचे उत्तर मिळणार नाही. नगररचनाकारा कडुन वेळ निश्चित करुन घ्या त्यानंतर सभा लावा. बाकी सगळे फालतु लोक आहेत, नगररचनाकार हा फार महत्वाचा माणुस आहे असे वाटायला लागले आहे.

आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):— मा. महापौर महोदया, नगररचनाकार पुढच्या सभेत कुठल्याही परिस्थितीत हजर राहतील असे मी स्वत: बोललो होते याच्याबदद्ल कुठलेही दुमत नाही ते मी मान्य करतो, परंतु परिस्थिती अशी आहे की, मला सकाळी व काल अत्यंत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडुन दुरध्वनीवरुन संदेश आला की, एका महत्वाच्या विषयासाठी सोमवारी सकाळी ११ वाजता नगररचनाकार व सहा. सचालक नगररचना यांना या ठिकाणी हजर राहण्यासाठी तुम्ही त्यांना उपस्थित ठेवावे. असे मलाच माझ्या वरिष्ठाकडून आदेश आल्यामुळे मी काहीच करु शकत नाही. आणि महत्वाच्या विषयासाठी मी त्यांना पाठविले नाही तर बरोबर होणार नाही.माझ्या वरिष्ठांनीच मला आदेश दिलेला आहे. त्यामुळे मला त्यांना तिकडे पाठविणे भाग झाले. परंतु या परिस्थीतीमध्ये मी काहीही करु शकत नाही. त्याठिकाणी महत्वाच्या बैठकीसाठी त्यांना बोलाविले होते. आणि तो आपल्या महानगरपालिकेचा महत्वाचा विषय होता. त्यांच्या प्रश्नांची जी माहिती राहिलेली आहे त्याबद्दल आम्ही अत्यंत गंभीर स्वरुपाने माहिती घेवुन पुढच्या सभेत किंवा त्याआधी देण्याबाबतीत कुठला तरी एक निर्णय आधी होईल. किंबहुना त्यापुर्वी गटनेत्यांची बैठक घेवुन किंवा मा. महापौर, उप—महापौर यांच्याबरोबर चर्चा करुन.................................

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—सहा. संचालक, नगररचना यांचे काय? ते कोठे असतात?

आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):—सहा. संचालक नगररचना व नगररचनाकार या दोघांनाही आवश्यक कागदपत्रासह त्याठिकाणी उपस्थित राहण्याबाबती आदेश होते.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—आजची गोष्ट नाही आहे. ते येथे कधी असतात?

आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):—परवा दिवशी मी सहा. संचालक नगररचना यांना बोलावून घेतले होते. तर त्यांनी प्रत्येक बुधवारची याठिकाणची वेळ निश्चित केलेली आहे. त्यानुसार नागरीकांना त्यांना बुधवारी भेटता येईल अशा आशयाचा फलक उप—आयुक्त, मुख्यालय यांनी तेथे लावावा. आणि प्रत्येक बुधवारी पुर्ण कार्यालयीन वेळेत ते उपस्थित राहतील याची तजविज करावी.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—तो एवढा चाप्टर माणुस आहे त्यांनी मंत्रालयात ही बैठक सुपारी देवून बोलाविली आहे. असा माझा त्यांच्यावर आरोप आहे. ते अतिशय चाप्टर आहेत जेवढया काही वेळेस महासभा लावणार त्या प्रत्येक महासभेच्या वेळी ते अशा प्रकारच्या बैठका लावतील. ते कोठुन ना कोठुन आपणांस फोन करतील. ते फार मोठे सुपारी बाज आहेत. त्यांच्यासारखा सुपारी बाज मी कधी कोठे पाहिला

नाही. नगररचनाकार आणि सहा. संचालक नगररचना यांच्या सारखे सुपारी बाज मी कोठे पाहिले नाहीत. यासाठी आयुक्त साहेब, तुम्ही काहीतरी मार्ग शोधा.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—आयुक्त साहेब, नगररचनाकार किती दिवस अनुपस्थित होते तसेच त्यांनी किती बांधकाम परवानग्या मंजुर केल्या आहे त्यांची आपण माहिती काढा. तसेच रजेवर असतांना त्यांनी बांधकाम परवानगीवर सही केली आहे का?. तसेच ते महापालिकेत किती दिवस हजर राहिले आहेत. याचीही चौकशी करा.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—महापौर महोदया, उप—महापौर व आयुक्त साहेब, मागच्या सभेत तुम्ही सांगितले होते की, नगररचनाकार किंवा सहा. संचालक, नगररचना यांच्यापैकी कोणी तरी एक येथे उपस्थित असतील परंतु आज अचानक मंत्रालयात बैठक लागली, वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचे आपण पालन केले. पण सभागृहाच्या भावना, सभागृहाचा मान प्रत्येक अधिका—याने हा ठेवलाच पाहिजे. मा. महापौर महोदया, उप—महापौरजी आपणही हे लक्षात ठेवा आपण पीठासीन अधिकारी आहात. जर आदेशाचे पालन होत नसेल तर संबंधीतांना आपण तसे आदेश दिले पाहिजेत. नाहीतर सभा घेवुन उपयोगच नाही. आणि आयुक्त साहेब, प्रशासनाचा प्रमुख म्हणुन प्रत्येक विभागामध्ये तुम्ही हस्तक्षेप करु शकता. प्रत्येक विभागाचा कारभार आपल्याशी निगडित आहे. एखादया ठिकाणी चुक झाली आहे असे निदर्शनास आल्यानंतर त्याठिकाणी आपण काम काय केले? कार्यवाही काय केली? जो विषय नगररचनाकारांशी संबंधीत आहे, नगररचनाकार हे संचालक नगररचना यांच्या अंतर्गत आहेत. परंतु प्रशासनाचा प्रमुख म्हणुन आयुक्तांनी झालेल्या चुकांवर काय कार्यवाही केली, याचे साधे आणि सरळ उत्तर आपण दयायचे आहे. नगररचनाकार नको आहेत आम्हांला ते आले नाहीत तरी चालतील त्यांच्याशी आम्हांला काहीही देणे घेणे नाही. परंतु आयुक्त म्हणुन आपण काय काम केले? त्यांच्यावर काय कारवाई केली हे त्या ठिकाणी नमुद करा. त्यांच्यावर काही करु शकत नाही. परंतु जे प्लान चुकीचे आहेत हे तुमच्या निदर्शनास आणुन दिल्यानंतर त्याच्यावर एकतर स्थगिती मिळायला पाहिजे होती. हे तर तुमच्या हातात होते. या काही कार्यवाही तुम्ही केल्या काय? श्री. भुल्लर महाराज यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे मला वाटते मागच्या ऑक्टोंबर महिन्यामध्ये हा विषय आणला होता. मागचा ऑक्टोंबर आता सप्टेंबर ११ महिने झाले. ११ महिन्यात नगररचनाकार किंवा सहा. संचालक नगररचना हे एकदाही या महासभेत आले नाहीत. याचा अर्थ त्यांनी गैरप्रकार केला आहे हे सिध्द होत आहे. असे असतांना संपुर्ण प्रशासन त्यांना पाठीशी का लावत आहे? संपुर्ण प्रशासन त्यांच्याबरोबर शामिल आहे का?

यावेळी काही सदस्य घोळक्यात उभे राहून आपसात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण नेमके काय बोलत आहे हे समजून येत नव्हते.

उप—महापौर :—घोळक्याने उभे राहून आपसात बोलत असलेल्या सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर बसून घ्यावे.

महापौर :—घोळक्यात उभे राहून आपसात बोलत असलेल्या प्रत्येकाला वेगळी सूचना देण्याची गरज नाही असे मला वाटते.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आयुक्त साहेब, याविषयी प्रशासनाने दखल काय घेतली आहे? स्थगन प्रस्तावावर पुन्हा चर्चा करण्यासाठी हा तिस—यांदा विषय येत आहे. हा प्रश्नउत्तराचा तास असून प्रश्न नगररचना विभागाशी संबंधीत आहे. २३८ क्रमांकाचा प्रश्न गेल्या सहा महिन्यापासूनचा आहे. नगररचना विभागाने उत्तर काय दिले आहे की, ३०० चौरस मिटरपर्यंतक्ष्स बांधकामाचे जे नकाशे मंजुर केले आहेत, त्यासाठी सौर उर्जा किंवा रेन वॉटर हार्वेस्टींग यांची गरज नाही. परंतु त्याच्यापेक्षा जास्त क्षेत्रफळाचे जे बांधकाम नकाशे मंजुर केले आहे ते किती आहेत? याचेही उत्तर अजुन तुम्ही दिलेले नाही. नगररचनाकार नाहीत म्हणुन काय संपुर्ण प्रशासन ठप्प होणार आहे काय? इतर विभाग नाहीत काय? रेन वॉटर हार्वेस्टींगची योजना जी आहे ती कशासाठी केलेली आहे? आम्ही कार्यशाळा घ्यायच्या, बाहेरुन ऑस्ट्रेलियावरुन लोक बोलवायचे, जर्मनीवरुन लोक बोलवायचे, वॉटर रिसायकलींग करा, रेन वॉटर हावेस्टींग करा, पाणी जतन करा, काही गणेश मंडळांमध्ये देखावे केले आहेत की पाण्याचा गैरवापर टाळा. पाण्याचा कमीत कमी वापर कसा कराल? परंतु महापालिका प्रशासन मात्र याबाबतीत गंभीर नाही. गेल्या सहा महिन्यापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. परंतु नगररचनाकार नाहीत म्हणुन प्रशासनाचे उत्तर तयार नाही. सहा महिन्यापुर्वी जे उत्तर दिले आहे की, ३०० चौरस मिटरपेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या इमारतींना आम्ही रेन वॉटर हार्वेस्टींग सौर उर्जा बंधनकारक करु. असे तुम्ही किती केले?

३०० चौरस मिटरपेक्षा जास्त क्षेत्रफळाचे बांधकाम परवानगी तुम्ही मंजुर केली नाही काय तसे उत्तर दया. तुम्ही नगररचनाकारांवर कारवाई करु शकत नाहीत, सहा. संचालक येथे हजर राहु शकत नाही तर त्यावर तुम्ही दखल घेवु शकत नाहीत. आणि जे साधे व सरळ प्रश्न विचारले आहेत त्याची उत्तरे देखील प्रशासनाकडे नाही. त्यासाठी महासभा स्थगित करायची का? जर नगररचनाकार सभेत उपस्थित नाही, सहा. संचालक, नगररचना उपस्थित नाहीत तर त्यांच्यावर कारवाई काय केली? त्यांच्यावर कारणे दाखवा नोटिस दाखल केली काय? गेल्या ११ महिन्यापासुन नगररचनाकार येथे सभेत उपस्थित नाहीत. आपण पीठासीन अधिकारी म्हणुन त्यांना आदेश दया व तशी कारवाई करा, ''बाप दाखव नाहीतर श्राध्द घाला.'' एकतर ते हजर असले पाहिजे होते किंवा त्यांच्यावर काय कारवाई केली? असे येथे नमुद करायला पाहिजे होते की आम्ही अशी अशी कारवाई केलेली आहे. तुम्ही संचालक नगररचनाकारांना कळविले काय की नगररचनाकार चुकीची वर्तवणूक करत आहेत. ठिक आहे तुम्ही कायदेशीर कारवाई करु शकत नाहीत परंतु तुम्ही त्यांना कळविले आहे काय? श्री. भुल्लर महाराज यांनी आरोप केले आहेत, फक्त आरोप करायचे त्यावर तुमच्या प्रतिक्रीया काय? तुमच्या प्रतिक्रीया काहीच नाहीत म्हणजेच तुम्ही त्यात सामिल आहात. जर तुम्ही त्यात सामिल नाहीत तर तुमच्याकडुन कारवाई होणे अपेक्षित होते. रेन वॉटर हार्वेस्टींग व सौर उर्जेचे किती प्रकल्प पारीत केले हे एक साधेशे उत्तर तुमच्याकडे नाहीत. किती कर्मचारी आहेत? उल्हासनगरच्या अर्थसंकल्पातुन ४५ टक्के आस्थापनेवर खर्च होतो आणि या दोन साध्या प्रश्नाचे गेल्या सहा महिन्यापासुन तुम्ही उत्तर देवु शकत नाहीत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, तुमच्या नगररचनाकारांनी येथे कारनामा केला आहे, संपुर्ण भारतात असा हा कारनामा होवू शकत नाही. ५० वार जागेवर ४ माळयाचा प्लान संपुर्ण भारतात कुठल्या महापालिकेने पास केला आहे काय? संपुर्ण भारतात जर असे होत असेल तर आपण जे सांगाल ते मी करेन. ५० वा जागेवर ४ माळयाचे प्लान पास केला आहे. ४ माळयावर काय पाच पाच फुटच्या खोल्या बांधल्या आहेत काय? या दोन गोष्टींवर उत्तर देण्यासाठी कोणी येथे उपस्थित तर असले पाहिजे ना? संपुर्ण भारतभरातून आपण अहवाल मागवा. २ माळयाचे काम ५० माळयावर होवू शकते? ५० वार ४० वार जागेवर ४—४ माळयाचे प्लान पास केले जातात. प्लान पास केले जातात. असे आपले नगररचनाकार आहेत.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. आयुक्त साहेब, श्री. भुल्लर महाराज यांनी जे सांगितले की असे प्लान आहे, ते फक्त उल्हासनगरमध्येच पास होतात व दुस—या जागेवर जर आपण जाल तर तेथे फक्त अर्धेच चटईक्षेत्र निर्देशांक मिळेल. नगररचनाकार येथे अनुपस्थित राहतात यामागे फार मोठा भ्रष्टाचार दिसतो. ते सभेत उत्तर देवु शकत नाहीत म्हणुन ते उपस्थित राहु शकत नाहीत. तसेच मी आपणांस सांगतो की त्यांनी ७०५ प्लॉटवर सुध्दा प्लान पास केला होता. त्यांना हे सुध्दा माहित नाही की उल्हासनगरमध्ये आरक्षण कोठे आहे? शाळेचा सुध्दा त्यांनी असाच प्लान पास केला आहे. पार्किंगवर, पॅसेजवर आपण बघा त्यांनी कोठे कोठे प्लान पास केलेले आहेत. त्यांनी कोठुन डिग्री घेतली आहे ते कॉलेज मी शोधुन काढेल.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, २० ऑगस्ट २०१० रोजी श्री. गुरगुळे, नगररचनाकार यांना नोटिस बजावण्यात आलेली आहे, त्याची प्रत माझ्याकडे आहे. आणि त्यांच्या वेळोवेळच्या ज्या रजा आहेत त्याचा सुध्दा रेकॉर्ड माझ्याकडे आहे. त्यांनी ज्या अर्जित व वैद्यकीय रजा दिल्या त्याबाबतची माहिती माझ्याकडील संचिकेमध्ये आहे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>ठिक आहे श्री. म्हसाळ साहेब, आपण त्यांना मुख्यालयातुन ना हरकत दाखला दया की ते एकदम बरोबर आहेत, ते आपले कर्तव्य १०० टक्के पार पाडतात. आपणांस हे माहित आहे की, आपणांस नेमुन दिलेले कर्तव्य योग्य प्रकारे पार न पाडणे हा सुध्दा भ्रष्टाचार आहे. जे अधिकारी नियमानुसार आपले कर्तव्य पार पाडत नाहीत त्यास सुध्दा भ्रष्टाचार असे म्हटले जाते. ते आपले काम १०० टक्के बरोबर करतात याप्रकारचे आपण त्यांना ना हरकत प्रमाणपत्र देवुन टाका. त्यामुळे आम्ही कोणत्याही प्रकारचा प्रश्न मांडणार नाही.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>शनिवारी ते लोकशाही दिनानिमीत्त विभागीय आयुक्तांच्या कार्यालयात मला भेटले होते. त्यावेळी त्यांनी खात्री दिली होती की सोमवारी होणा—या महासभेस मी उपस्थित राहुन नगररचना विभागाशी संबंधीत असलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे देईन.

यावेळी सदस्य श्री. कुमार आयलानी, श्री. महेश सुखरामानी, श्री. रामचंद्र पारवानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

सदस्य श्री. किशोर जग्यासी :–श्री. म्हसाळ साहेब, अतिशय दु:खदायक गोष्ट आहे की, उप–आयुक्त, मुख्यालय हे असे एक पद आहे की जे महापालिकेतील सर्व अधिका–यांचे नियंत्रण करते. तेच जर नगररचनाकारांची बाजु घेत असतील त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करत असतील तर ते बरोबर नाही.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–नाही, त्यांना या अगोदरच कारणे दाखवा नोटिस बजावली आहे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :–कधी बजावली आहे? आता पाच मिनिटापुर्वी आपण सांगितले की, मला काही माहिती नाही.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–नाही,नाही, सामान्य प्रशासन विभागामार्फत त्यांना कारण दाखवा नोटिस बाजवली नव्हती तर आयुक्त साहेबांमार्फत बजावण्यात आली होती. त्याची प्रत माझ्याकडे आहे. पाहिजे तर मी ती आपणांस दाखवितो.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :–किती नोटिस दिल्या आपण? फक्त एकच?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–३० ऑगस्टला कारणे दाखवा नोटिस बजावली आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–ती तर कारणे दाखवा नोटिस आहे ना? एक महिन्यामध्ये ते किती दिवस महापालिकेत आले नाहीत?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–एक महिन्यात किती दिवस महापालिकेत आले नाहीत याची नोंद आमच्याकडे नाही. त्यांनी घेतलेल्या रजांची नोंद आमच्याकडे असते.

सदस्य श्री. बच्चाराम रुपंचदानी:–ते एका महिन्यातुन एक दिवस आलेत. हे आपणांस माहित पडत नाही?

सदस्य श्री. किशोर जग्यासी :–आपणांस जर नगररचनाकारांना वाचवायचेच असेल तर आपण स्पष्टपणे सांगा. आम्ही आमचे प्रश्न मागे घेतो. सर्वजण मिळुन आपण त्यांना वाचविण्याचा प्रयत्न का करत आहात? सचिव साहेब, आपण आमचे प्रश्न पुर्ण होवु दया. आपणांस जर असे वाटत असेल की हा प्रश्न चालविला जावु नये तर आपणही तसे सांगा.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–मा. महापौरजी, ही जी कारणे दाखवा नोटिस आहे, ती ऑगस्टमध्ये देण्यात आलेली आहे. त्यामध्ये लिहिले आहे की २४ तासाच्या आत तुम्ही तुमचे स्पष्टीकरण दया. त्यानुसार त्यांनी स्पष्टीकरण दिले आहे का? जर दिले नसेल तर तर ''तुम्हांला काहीच सांगायचे नाही असे गृहित धरुन तुमच्याविरुध्द कारवाई केली जाईल.'' अशी जी ताकिद दिली आहे त्यानुसार कार्यवाही केली आहे का?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–त्यांनी तोंडी खुलासा केला होता. त्यामध्ये म्हटले होते की, मी महासभेत उपस्थित राहून नगररचना विभागाशी संबंधीत सर्व प्रश्नांना उत्तरे देईन.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–कारणे दाखवा नोटिसचे उत्तर लेखी दयावे लागते की, महासभेत उपस्थित राहून तोंडी दयावे लागते. नोटिसमध्ये लिहिले आहे की, त्यांनी २४ तासाच्या आत उत्तर दयायचे आहे. त्याप्रमाणे त्यांनी दिले आहे का? नोटिस मध्ये दिलेले २४ तास ऑगस्ट ते सप्टेंबर पर्यंत पुर्ण झाले की नाहीत?

उप–महापौर :–सन्माननिय सदस्य श्री. नरेंद्र राजानीजी, मा. महापौरांच्यावतीने मी एक निवेदन करतो. उभे असलेल्या सर्व सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर बसुन घ्यावे. सभागृहाच्या भावना लक्षात घेता, मा. महापौरांच्यावतीने आपणांस निवेदन करतो की, जो नगररचनाकार ११ महिन्यामध्ये आजपर्यंत सभागृहात हजर झाला नाही, तो एकाही सभेस उपस्थित राहत नाहीत. ते जे काही कारणे सांगतात ती खरी आहेत की खोटी आहेत ती त्यांची त्यांनाच माहित. तसेच कारणे दाखवा नोटिसचे त्यांनी काही उत्तर दिले नाही यासाठी

येणा—या महासभेत त्यांना बोलावुन प्रत्येक प्रश्नाचे उत्तर घेवुन त्यानंतरच ही महासभा त्यांना येथुन कार्यमुक्त करेल. व त्यांनी जेवढया काही बांधकाम परवानग्या मंजुर केल्या आहेत त्या सर्वांची चौकशी होईल. कोणताही प्लान सूटणार नाही. आजपर्यंत त्यांनी जेवढे काही प्लान पास केले आहेत त्या सर्वांची चौकशी होईल, त्यानंतच त्यांना येथुन कार्यमुक्त करु.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—जो प्लान चुकीचा असेल तो तर रद्द होणार ना?

उप—महापौर :—जे काही चुकीचे प्लान असतील त्याबाबतीत मी आयुक्त साहेबांना सांगतो की ते ते रद्द करावेत.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—त्याची चौकशी कोण करणार?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मा. महापौर महोदया, तोपर्यंत ही महासभा स्थगित केली जावी.जर ते पुढील सभेत आले नाहीत तर आपण ठरवुन ती सभा स्थगित करा.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—मा. महापौरजी, हे शब्द जर आयुक्त महोदय बोलतील तर फार चांगले होईल. कारण की आयुक्तांना तसे अधिकार आहेत.

उप—महापौर :—महापौरांच्यावतीने मी आयुक्त साहेबांना आदेश देतो की, संपुर्ण सभेचा प्रत्येक महिन्यात अपमान होत आहे. म्हणुन मी महापौरांच्यावतीने आयुक्त साहेबांना आदेश देतो की येणा—या महासभेत त्यांना बोलावुन प्रत्येक प्रश्नाचे उत्तर घेवुन त्यांची चौकशी करुन त्यांना येथुन कार्यमुक्त करु.

सदस्य श्री. सतिश चहाळ :—उप—महापौर साहेब, या आधी किती चौकश्या झालेल्या आहेत? जेवढया वेळा चौकश्या करायला लावल्या तेवढया वेळा चौकश्या झाल्यात का? हे फक्त आश्वासन आहे की चॉकलेट आहे? त्याची चौकशी होणार का?

उप—महापौर :—त्याची चौकशी नगररचना विभाग यांच्याकडुन करु.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—त्या आधी सुध्दा महासभेत चौकशी करण्यास सांगितले होते ती चौकशी झाली काय?

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—मा. महापौर महोदया, यानंतर नगररचनाकार यांची सवडीची वेळ पाहुन महासभा आयोजित केली जावी. म्हणजेच त्यांना जेव्हा वेळ मिळेल तेव्हा आम्ही येवु?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मा. महापौरजी, आपण जसे म्हणता की, ते ११ महिने येत नाहीत, आता जे सर्व प्रश्न आहेत ते सर्व नगररचना विभागाशी संबंधीत आहेत.

सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—मा. महापौरजी, सदस्यांच्या भावना लक्षात घेवुन ही सभा स्थगित करण्यात यावी. मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, जोपर्यंत नगररचनाकार सभेत येत नाहीत तापेर्यंत ही सभा स्थगित करण्यात यावी.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, या सभागृहामध्ये नगररचनाकार हे ११ महिन्यापासुन येत नाहीत. हा सन्माननिय सदस्यांचा व महासभेचा अपमान होत आहे. ते सभेत येत नाहीत, सन्माननिय सदस्यांना मी एकच विनंती करतो हे जे श्री. गुरगुळे आहेत ते मोठ मोठया लोकांचे काम करतात. आणि मोठ मोठया लोकांचे प्लान पास केल्यावर, प्लान कसा पास करतो हे त्यांना चांगले माहित आहे. श्री. गुरगुळे हे काही आज कालचे नाहीत. ती व्यक्ती मंत्रालयात जाते आणि राज्यमंत्री महोदयांना सांगतात की श्री. गुरगुळे यांना अशी अशी कामे आहेत म्हणुन ते सभेत हजर राहु शकत नाहीत. आणि म्हणुन श्री. गुरगुळे येथे हजर राहु शकत नाहीत. तुम्ही दिलेल्या नोटिसला व महापौरांनी दिलेल्या नोटिसला तो जर उत्तर देवु शकत नसेल तर तो कोणीतरी मोठा माणुस आहे. एवढया ७६ नगरसेवकांना ते बिल्कुल मानत नाहीत. याचा अर्थ काय? आम्ही प्रत्येक सभेला यायचे, सन्माननिय सदस्यांनी त्यांच्या प्रश्नाचे उत्तर मागावे आणि ते मिळत नाही. म्हणजेच श्री. गुरगुळे साहेब हे मोठ मोठया लोकांचे काम करतात व मंत्रालयात जावून सांगतात की साहेब आज तुम्ही राज्य मंत्रीमहोदय यांना सांगा की मला आज काही काम आहे. हे सर्व चाललेले आहे. मला असे म्हणायचे आहे की, पुढील वेळेस महासभेने एक ठराव करावा, आणि त्या श्री. गुरगुळे यांना येथुन हटवावे. तो

नको आहे. आणि एक वर्षावर आता निवडणूक येवुन ठेपलेली आहे आणि एवढे प्रश्न जर प्रलंबित राहिले तर काही फायदा नाही. म्हणुन पुढील महासभेत त्वरीत निर्णय घेवुन आणि तशा पध्दतीने कारवाई करावी. मला दुसरे असेही म्हणायचे होते की, तुम्ही त्यास जी नोटिस दिली आहे त्या नोटिसीचे त्यांनी तर उत्तर दिलेलेच नाही, त्या नोटिसीबद्दल तुम्ही काय म्हटलेले आहे? सर्व सन्माननिय सदस्यांना देखील कळायला पाहिजे होते.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—जर असेच होत राहिले आपण मध्ये मध्ये उठुन प्रश्न विचारत राहिलात तर मी महासभेत उपस्थित राहणार नाही. आम्हांला हे माहित आहे, हे जर उत्तर देणार नसतील तर आम्हीपण महासभेत उपस्थित राहणार नाही. प्रत्येक वेळी विषयाला डावलून करप्शन होत राहिल तर आम्ही महासभेत उपस्थित राहणार नाहीत. नाहीतर राजीनामा देवु. आयुक्त येतात आणि म्हणतात की चौकशी करु. हे तिसरे आयुक्त आहेत. श्री. बागेश्वर साहेबांनी सुध्दा सांगितले होते व आता हे सुध्दा म्हणत आहेत. श्री. लोणारे साहेबांनी सुध्दा सांगितले होते. ७०५ प्लॉटवर प्लान पास झाला आपण कोणती चौकशी केलीत? आहे कुणाजवळ उत्तर? आपण चौकशी करु शकत नाहीत परंतु माझ्याकडे भरपुर उत्तरे आहेत. मी महासभेत सांगु शकतो की त्यांनी कोठे कोठे प्लान मंजुर केले आहेत? २५० वार जागेवर ६००० फुटाचा पास केला आहे. असे होवु शकते काय? कोणीतरी येथे येवुन उत्तरे दयावीत. मी आव्हान करतो की त्यांनी ९० टक्के चूकीचे प्लान पास केले आहेत. आणि आयुक्तांचे कर्तव्य आहे की ते तपासुन पहावे. कोणताही आयुक्त का तपासत नाही? जर एवढया तक्रारी येतात तर प्लान का तपासुन पाहत नाहीत?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मा. महापौरजी व मा. आयुक्त साहेब, आमचे सन्माननिय सदस्य श्री. किशोर जग्यासी यांनी म्हटल्याप्रमाणे नगररचनाकार यांची चौकशी कोण करेल? आपण जरा उत्तर दया, कोण चौकशी करेल? प्रशासन कोण चालवते? प्रशासन आयुक्त चालवितो ना?

उप—महापौर :—संचालक, नगररचना विभाग, पुणे येथिल जे मुख्य कार्यालय आहे, तेथे आपण प्रस्ताव पारीत करुन पाठवु या.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—नाही, नाही, आपण म्हणता प्रस्ताव पारीत करुन पाठवु या परंतु उत्तर आयुक्त साहेबांना दयावयास पाहिजे होते. आपण उप—महापौर म्हणुन उत्तर देत आहात. याआधी सुध्दा म्हटले होते की आम्ही चौकशी साठी पाठवु परंतु आपण पाठवत नाहीत. असे तर नाही होणार ना आता आम्ही बोलत आहोत परंतु पुढील सभेत परत विचारावे लागेल.

उप—महापौर:—आयुक्त साहेब उत्तर देत आहेत.

आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):—मा. महापौर महोदया, नगररचनाकार या ठिकाणी उपस्थित नसुन त्यांच्या बदद्लच्या बऱ्याच तक्रारींबाबत चर्चा झाली, नगररचनाकार अनेक सभांना उपस्थित राहिले नाहीत आणि परवाच्या दिवशी दोन वेळा मी त्यांच्याशी सपंर्क साधला त्यावेळी त्यांनी मला सांगितले होते की, मी सभेला उपस्थित राहणार आहे. आणि नगररचना विभांगाशी संबधित सर्व प्रश्नाना उत्तरे देण्यात येतील. परंतु तदृनंतर सभेला गैरहजर राहीले, विवादित बारा बाधंकाम परवानग्या विषयीचा जो प्रश्न होता त्याबाबत मा. उपमहापौर साहेबांनी जे निर्देश दिले आहेत त्याप्रमाणे मा. संचालक नगररचना यांच्याकडे सर्व माहिती पाठविण्यात येईल.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी:— क्षमा करा, विवादित बारा बाधंकाम परवानग्या विषयीचा प्रश्न अद्याप सभेपुढे चर्चेस आलेला नाही. हा त्याचा सर्व साधारण प्रश्न चालु आहे.

यावेळी सदस्य श्री. गोविंदराम लुंड यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):— सभेस गैरहजर राहणे किंवा सभागृहाला कोणतीही माहिती न देणे कोणतीही पुर्व परवानगी न घेता गैरहजर राहणे, या सर्व मुदयांचा एकत्रीत अहवाल तयार करुन मा. सचांलक नगररचना हे त्यांचे वरिष्ठ अधिकारी असल्याने त्यांच्याकडे यांच्याबाबत प्रस्ताव पाठविला जाईल.

काही सदस्य :—तोपर्यंत सभा स्थगित करा.

**महापालिका सचिव :—** ठिक आहे? आयत्यावेळीचा एक विषय आहे, विषय आपणांतील बहुसंख्य सदस्यांची संमती असेल तर तो सभेच्या कामकाजात सामावुन घेता येईल तो विषय असा आहे कि, डॉ प्रकाश आमटे, डॉ मंदा आमटे गौरव समिती, उल्हासनगर, अबंरनाथ यांना रुपये १ लाख इतकी आर्थिक मदत देणे. हा विषय सभेच्या कार्यसुचीवर सामावुन घेतला जावा काय?

**काही सदस्य:—** ठिक आहे, हा विषय सभेच्या कार्यसुचीवर सामावुन घ्या.

**महापौर :—**सदरहु विषय कार्यसूचीवर समावेश करुन घेण्यास सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

**विषय** :— आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेणे बाबत

सूचकाचे नांव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नांव :— श्री. रमेश चव्हाण

**महासभा ठराव क्र. :— ३७ ब** **दिनांक : २०/९/२०१०**

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील एका विषयास या सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

**विषय:—** डॉ. प्रकाश आमटे, डॉ. मंदा आमटे गौरव समिती, उल्हासनगर—अंबरनाथ यांना रुपये १,००,०००/— इतकी आर्थिक मदत देणे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य श्री. किशोर जग्यासी:—** आमची विनंती आहे की, ही सभा स्थगित केली जावी.

**सदस्य श्री. रमेश चव्हाण:—** मा. महापौर महोदया, आणि आयुक्त साहेब, सहा. सचांलक नगररचना तसेच नगररचनाकार हे दोघेही आजच्या सभेत नाहीत, यास्तव सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की, ही सभा स्थगित केली जावी.

**सदस्य श्री. राजेंद्रसिह भुल्लर:—** मराठी साहित्य समेंलनास आर्थिक मदत देण्याविषयीचा विषय आयत्यावेळच्या विषयांन्वये सभेपुढे आणण्यास सांगण्यात आले होते, तो विषय सभेपुढे का आला नाही?

**महापालिका सचिव :—** माझ्याकडे त्या विषयाचा गोषवारा आलेला नाही.

**सदस्या श्रीम. जयश्री सुर्वे:—** मा. महापौर महोदया व आयुक्त साहेब, ही सभा स्थगित केली जावी.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे:—** मा. महापौर महोदया, मा. उपमहापौर साहेब, ..................

**सदस्य श्री. बच्चाराम रुपंचदानी:—** मा. महापौरजी, मा उपमहापौरजी, आयुक्त साहेब व सचिव साहेब सर्व सदस्यांचे मत आहे की, ही सभा स्थगित केली जावी.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:—</u> मा. महापौर महोदया, मा. उपमहापौर साहेब, या ठिकाणी सर्वानुमते एक अभिनंदनाचा प्रस्ताव आपण पारित करावा असे मला वाटते.

<u>उपमहापौर:—</u> उभे असलेल्या सर्व सन्मा. सदस्यांनी कृपया २ मिनिटे बसुन घ्यावे. आपल्या अग्निशमन दलातील दोन कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्याचा प्रस्ताव आहे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:—</u> उपमहापौरजी मी आपणांस तेही सागु इच्छितो अग्निशमन दलाविषयीच्या प्रश्नांचे उत्तर देणारे अधिकारी आहेत श्री. शिर्केजी ते सुध्दा आजच्या या सभेत उपस्थित नाहीत.

<u>उपमहापौर:—</u> सन्मा. सदस्य श्री. किशोर जग्यासीजी, अग्निशमन दलाविषयीचा प्रश्न नसुन, अग्निशमन दलातील दोन कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्याबाबतचा प्रस्ताव आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:—</u> याठिकाणी सर्वानुमते एक अभिनंदन प्रस्ताव पारित करायचा आहे. दिनांक २८ फेब्रुवारी २००९ रोजी वॉको रेडिओ कंम्पाऊंड उल्हासनगर—४ येथिल मे. एस.एस. इलेक्ट्रीकल्स या कंपनीस लागलेली आग विझवितांना श्री. भास्कर तानाजी मिरपगार, प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी व श्री. भिमराव वामन खैरे, लिडींग फायरमन यांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून व शौर्य दाखवून अग्निशमनाचे उत्कृष्ठ कार्य केल्याबद्दल भारतांच्या मा. राष्ट्रपतींनी त्यांना दिनांक १५ ऑगस्ट २०१० या स्वातंत्र्य दिनानिमित्त ''राष्ट्रपतींचे अग्निशमन सेवा शौर्य पदक (President's fire service medal for gallantry) जाहिर केले आहे. त्याबदद्ल सर्वानुमते त्यांचे अभिनंदन करणारा ठराव पारित करावा अशी मी सर्वाना विनंती करतो. आणि त्याचे मा. महापौरांच्या हस्ते स्वागत सुध्दा झाले पाहिजे असे शुरवीर आपल्या महानगरपालिकेला लाभले आहेत. त्याबदद्ल या ठिकाणी मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेबांना विंनती करतो की, त्यांनी या दोन कर्मचाऱ्यांचे स्वागत करावे. आणि यानंतर या पूढेही उल्हासनगरला अशी सेवा त्यांनी दयावी. अशी इच्छा बाळगतो.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—</u>अभिनंदन प्रस्ताव मंजुर करा.

<u>महापौर:—</u> याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

<u>अभिनंदन प्रस्ताव</u>

दिनांक २८ फेब्रुवारी २००९ रोजी वॉको रेडिओ कंम्पाऊंड उल्हासनगर—४ येथिल मे. एस.एस. इलेक्ट्रीकल्स या कंपनीस लागलेली आग विझवितांना श्री. भास्कर तानाजी मिरपगार, प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी व श्री. भिमराव वामन खैरे, लिडींग फायरमन यांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून व शौर्य दाखवून अग्निशमनाचे उत्कृष्ठ कार्य केल्याबद्दल भारतांच्या मा. राष्ट्रपतींनी त्यांना दिनांक १५ ऑगस्ट २०१० या स्वातंत्र्य दिनानिमित्त ''राष्ट्रपतींचे अग्निशमन सेवा शौर्य पदक (President's fire service medal for gallantry) जाहिर केले आहे. ही बाब समस्त उल्हासनगर शहरवासीयांसाठी गौरव व अभिमानास्पद आहे यास्तव समस्त शहरवासियांचेवतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यासाठी महासभेपूढे प्रस्तावित.

तसेच भविष्यातही त्यांच्याकडुन अश्याच प्रकारच्या उत्कृष्ट सेवेची ही महासभा अपेक्षा करत आहे.

<u>महासभा ठराव क्र.</u> ३७ क <u>दिनांक :— २०/९/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. प्रशांत धांडे

अनुमोदकाचे नाव :—श्रीमती मिनाताई सोनेजी

ही महासभा श्री. भास्कर तानाजी मिरपगार, प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी व श्री. भिमराव वामन खैरे, लिडींग फायरमन यांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून व शौर्य दाखवून अग्निशमनाचे उत्कृष्ट कार्य करुन राष्ट्रपती पदक मिळविल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी मा. महापौर, मा. उप—महापौर यांनी श्री. भास्कर मिरपगार व श्री. भिमराव खैरे यांना शाल श्रीफळ देवून त्यांचे अभिनंदन केले.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—</u> अग्निशमन दलातील दोन कर्मचाऱ्याच्या बाबतीत अभिनंदन प्रस्ताव पारित केला, त्याकर्मचाऱ्याचे मनापासुन अभिनंदन व कौतुक करतो तसेच सहा. सचालक नगररचना व नगररचनाकार याचांही ते पुढच्या महासभेत आल्यांनतर याठिकाणी सत्कार करावा. नाहीतर एक ढोलीबाजा आणतो आणि खालुनच त्यांना वाजत गाजत आणतो. त्यांचा पुढच्या महासभेत याठिकाणी सत्कार करा. ते पण चांगली कामे करतात?

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपंचदानीः—</u> मा. महापौर महोदया, उल्हासनगर शहरातील सिंधुनगर व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष श्री. कुमार बजाज यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे त्याना श्रधांजली देण्यासाठी आपण सर्वांनी कृपया २ मिनिटे उभे रहावे.

<u>महापौर :—</u>या विषयी पुढीलप्रमाणे शोक प्रस्ताव संमत करण्यात येत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

<u>शोक प्रस्ताव</u>

उल्हासनगर शहरातील सिंधुनगर व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष श्री. कुमार बजाज यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले.

वर उल्लेख केलेल्या कुटूंबियाच्या दुःखात हे सभागृह सहभागी असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ३७ ड दिनांकः—२०/९/२०१०

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. कुमार बजाज यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सदस्य श्री. बच्चाराम रुपंचदानी:— सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेवुन, मी महापौरांना विनंती करतो की, आजची सभा स्थगीत केली जावी.

सदस्य श्री. राजेंद्रसिह भुल्लर:— सभा स्थगीत करण्यापुर्वी आयुक्त साहेब, आजच्या नंतर नगररचनाकारानी एकाही बाधंकाम परवानगीवर स्वाक्षरी करता कामा नये. ते घरी जावुन बाधंकाम परवानगीवर स्वाक्षऱ्या करतात यासाठी बाधंकाम परवानगीचे रजिस्टर आपण ताब्यात घ्यावे.

महापालिका सचिव :— आपल्या महानगरपालिकेत डॉ. विजया कंठे, यांची करनिर्धारक व सकंलक म्हणुन प्रतिनियुक्तीवर नियुक्ती झाली आहे, त्या सभागृहास आपला परिचय करुन देतील.

डॉ. विजया कंठे (करनिर्धारक व सकंलक) :— सन्मा. महापौर, सन्मा. उपमहापौर, मा. आयुक्त व सभागृहातील सन्मा. सदस्य मी स्वत: डॉ विजया कंठे मुख्याधिकारी सेवा वर्ग १, मी जिल्हा प्रकल्प अधिकारी म्हणुन जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे चार वर्ष कार्यरत होते, त्यानंतर एक वर्ष डहाणु नगरपालिकेची मुख्याधिकारी म्हणुन कार्यरत होते. आणि आपल्या महानगरपालिकेमध्ये करमुल्य निर्धारण अधिकारी व संकलक अधिकारी वर्ग १ म्हणुन २६ तारखेपासुन रुजु झाली आहे. उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये सेवेची शासनाने मला जी संधी दिलेली आहे त्याचा सर्व जनसेवेसाठी जास्तीत जास्त चागंल्या पध्दतीने उपयोग करेन एवढेच मी आपले मनोगत व्यक्त करते आणि सभागृहाची मी अत्यंत आभारी आहे.

महापालिका सचिव :— उप करनिर्धारक व संकलक म्हणुन श्री. भुमकर यांची नियुक्ती झालेली आहे ते सुध्दा सभागृहास आपला परिचय करुन देतील.

श्री. समीर भुमकर (उप करनिर्धारक व सकंलक):— सन्मा. व्यासपीठ आणि मा. नगरसेवव मी समीर कैलास भुमकर, मुख्य अधिकारी वर्ग २ या सेवेसाठी मी रुजु झालो आहे व उल्हासनगर महानगरपालिकेत उप करनिर्धारक व सकंलक या पदावर रुजु झालेलो आहे आणि ही माझी पहिलीच नेमणुक आहे. धन्यवाद.

महापौर :— सभा स्थगीत करायची आहे? कधीपर्यंत,

काही सदस्य:— पुढील सुचना देईपर्यंत.

महापालिका सचिव :— पुढील सुचना देईपर्यंत?

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:— सचिव साहेब, जोपर्यंत नगररचनाकार येत नाही तोपर्यंत?

सदस्य श्री. बच्चाराम रुपंचदानी:— नगररचनाकार यांना विचारुन सांगा ते कधी येणार आहेत?

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:— ढोलीबाजासह वाजत गाजत त्यांना सभागृहात आणायचे आहे हे लक्षात ठेवा.

**सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—** सभा कुठे ठेवायची हे त्यांना विचारा आणि त्यानुसार सभा लावा.

**महापौर :—**ही सभा पूढील सूचना देईपर्यंत स्थगित करणेकामी पूढीलप्रमाणे ठराव संमत करीत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

**स्थगित प्रस्ताव**

आजच्या या सभेत नगररचना विभागाशी संबंधीत प्रश्न व विषय असून त्यावर उत्तर देण्यासाठी नगररचना विभागाचे जबाबदार अधिकारी नगररचनाकार व सहा. संचालक नगररचना हे उपस्थित नाहीत त्यामुळे आजच्या या सभेचे कामकाज पूढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ३७ इ** **दिनांक : २०/०९/२०१०**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता आज दिनांक २०/९/२०१० रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज पुढील तारीख व वेळेची सूचना देईपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** दुसरी सुचना अशी आहे की, सर्व सन्मा. सदस्य, अधिकारी, व पत्रकारांसाठी आज दुपारच्या जेवणाची सभागृहाच्या प्रेषक गॅलरीत व्यवस्था केली आहे

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** महापौर महोदया, आयुक्त साहेब, नगररचनाकारांची वेळ घेवुन सभेसाठी तारीख निश्चित करणे असे चालणार नाही तुम्ही तारीख निश्चित करा त्या तारखेला नगररचनाकार उपस्थित असले पाहिजेत.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—** नाहीतर दर आठवडयाला सभा ठेवा, महिन्यातुन चार सभा ठेवा.

**महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी १.५० वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २०/१०/१०

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/१०/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

५—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक २०/९/२०१० रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करुन सोमवार दिनांक २०/१०/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर —— श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

२. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३७ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३८ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३९ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४० | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४१ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४२ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४३ | श्री. शेखर केशव यादव |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४४ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४५ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४६ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १३ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४७ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४८ | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४९ | श्री. किशोर जग्यासी |
| १६ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५० | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १७ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५१ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १८ | श्री. राजू जग्यासी | ५२ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १९ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५३ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २० | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५४ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २१ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २२ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ५६ | श्री. मोहन साधवाणी |
| २३ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५७ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २४ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५८ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २५ | श्री. लाल पंजाबी | ५९ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २६ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६० | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २७ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६१ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २८ | श्रीमती शकुंतला पाटील | ६२ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २९ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६३ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३० | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६४ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३१ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६५ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३२ | श्री.एडके गणपत गोविंद | ६६ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३३ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६७ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३४ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ६८ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | ६९ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ३६ | श्रीमती पंचशिला नाना पवार | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती निलम प्रेमसिंग रावत, २. श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद, ३. श्री. राम (चार्ली) पारवानी, ४. श्रीमती जया प्रकाश माखीजा, ५. श्री. आयलानी कुमार उत्तमचंद, ६. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ७. श्री. मोहन (गारो) रामरख्यानी, ८. श्री. लालबिहारी बुझारत यादव, ९. श्री. मंगतानी सुंदर आसनदास, १०. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान, ११. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), १२. श्री. प्रकाश गणपत सावंत

श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त
४. श्रीमती संगिता धायगुडे , उप–आयुक्त
५. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. हरेश इदनानी, लेखा अधिकारी
८. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
९. श्री. एम.जी.गिरगांवकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१०.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
११.श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
१२.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१३.श्री. जी.जी. हिबारे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
१४.श्री. भास्कर मिरपगारे, अग्निशमन अधिकारी
१५.श्री. भगवान कुमावत, प्र. प्रभाग अधिकारी
१६.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१७.श्री. गंगारामानी, उप अभियंता, विदयुत
१८.श्री. संजय पवार, कनिष्ठ अभियंता, नगररचना
१९.श्री. बुडगे, कनिष्ठ अभियंता, नगररचनाकार

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती अमिता संखे
५. श्रीमती नर्गिस खान

दुपारी ३.२० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u> सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, सन्माननिय आयुक्त साहेब, आपल्या उल्हासनगर महापालिकेचे आयुक्त श्री. अशोककुमार रणखांब साहेब यांचे वडिल श्री. दत्ता रणखांब हे दिनांक २ ऑक्टोंबर रोजी स्वर्गवासी झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभावी यासाठी या दोन मिनिटे मौन धारण करून श्रध्दांजली अर्पण करावी ही विनंती.

**सदस्य श्री. लाल पंजाबी :—**मा. महापौरजी, नगरपालिका शिक्षण मंडळाचे माजी सभापती व माजी नगरसेवक श्री. नारायण आडवानी यांचे सुध्दा नुकत्याच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे. तसेच शिवसेनेचे गट नेते व सन्मा. नगरसेवक श्री. धनंजय बोडारे यांच्या भगिनी श्रीमती अलका कृष्णा मोरे यांचे सुध्दा काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे. या सर्वांना एकत्रितपणे आपण श्रध्दांजली वाहु या.

---

सुचकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर महापालिकेचे आयुक्त श्री. अशोककुमार रणखांब यांचे वडिल श्री. दत्ता रणखांब यांचे दिनांक २ ऑक्टोंबर रोजी निधन झाले.

उल्हासनगर नगरपालिकेचे शिक्षण मंडळाचे माजी सभापती व माजी नगरसेवक श्री. नारायण आडवानी यांचे सुध्दा नुकत्याच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

तसेच उल्हासनगर महापालिकेतील शिवसेनेचे गटनेते आणि सन्माननिय नगरसेवक श्री. धनंजय बोडारे यांच्या भगिनी श्रीमती अलका कृष्णा मोरे यांचे सुध्दा काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

वर उल्लेख केलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यांस चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ३७ फ** **दिनांक:—२०/१०/२०१०**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. दत्ता रणखांब, श्री. नारायण आडवानी, श्रीमती अलका कृष्णा मोरे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे.........

**महापालिका सचिव :—** प्रश्न क्र. २३८ हा श्रीमती वसुधा बोडारे यांचा आहे.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**मा. महापौरजी, माझा अजुन सुध्दा एक प्रश्न प्रलंबित आहे. माझा २३० क्रमांकाचा प्रश्न आहे. तसेच प्रश्न क्र. २२४ चे सुध्दा मला अदयापपर्यंत उत्तर मिळालेले नाही. हा प्रश्न मी दिनांक २०/११/२००९ ला विचारला आहे त्यास एक वर्ष होत आले अजुन त्या प्रश्नाचे उत्तर देण्यात आलेले नाही. पुढील सभेत, पुढील सभेत असे करुन एक वर्ष निघुन गेले, नगररचनाकार यांच्याशी संबंधित प्रश्न आहे. मी एकदम साधा प्रश्न विचारलेला आहे की, १/१०/२००८ पासुन १५/११/२००९ पर्यंत किती बांधकाम परवानग्या मंजुर केल्या आहेत. ? त्याची नावे व पत्ते, बांधकाम वाणिज्य वापरासाठी आहे की रहिवासी वापरासाठी आहे? आरक्षित भुखंडावर प्लान मंजुर केले आहेत का? काम सुरु झाल्याची तारीख काय

आहे? तसेच प्लींथ सर्टिफिकेटची तारीख काय आहे? एवढे साधेशे तीन चार प्रश्न विचारले आहेत एक वर्ष झाले अदयाप त्याचे उत्तर मिळालेले नाही. आणि जे काही उत्तर दिले आहे हाताने लिहुन दिले आहे, हे पहा. नगररचना विभागात संपुर्ण संगणकीकरण झालेले आहे, तरी सुध्दा उत्तर हाताने लिहुन दिलेले आहे. तसेच प्रश्नाचे उत्तर दिले ते सुध्दा अर्धवट? नगररचनाकार नाही आहेत परंतु त्यांच्या बदल्यात जे कनिष्ठ अभियंता श्री. खामितकर किंवा इतर कुणी आहेत, त्यांनीच उत्तर बनविले असेल ना? नगररचनााकरांनी कुठे याचे उत्तर बनविले असेल. याचे जे उत्तर तयार केले आहे ते कनिष्ठ अभियंता यांनीच तयार केले असेल ना? नगररचनाकार कुठे ही यादी बनविणार?

यावेळी मा. सदस्या श्रीमती मोना वनवारी, श्रीमती वसुधा बोडारे, श्रीमती जयश्री सुर्वे, श्रीमती ज्योती माने, श्रीमती बेबी भोईर, श्रीमती चंद्रा टेकचंदानी, श्रीमती शकुंतला पाटील, कु. शकुंतला जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>मा. महापौर महोदया, उप–महापौरजी, सर्व सन्माननिय सदस्य, सन्माननिय सदस्य यांनी विचारलेल्या प्रश्नाची माहिती देण्यात आलेली आहे परंतु ती अपुर्ण आहें असे सदस्यांचे म्हणणे आहे. तर ची संपुर्ण माहिती आठ दिवसामध्ये पुरविण्यात येईल.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>साहेब, जर श्री. खामितकर यांना वेळ नसेल तर, त्यांचे काम दुस–या कुण्या अधिका–यास किंवा अभियंत्यास दिले जावे. जेव्हा जेव्हा त्यांच्या बाबतीत विचारणा केली जाते तेव्हा ते मंत्रालयात गेले आहेत, उच्च न्यायालयात गेले आहेत असे सांगितले जाते. यासाठी त्यांचे काम दुस–या कुण्या अधिका–यास किंवा अभियंत्यास दिले जावे. नाहीतर दुस–या अधिका–यास मंत्रालयातील व मुंबई उच्च न्यायालयातील काम सोपविले जावे व श्री खामीतकर यांचेकडे एकतर मंत्रालयातील किंवा मुंबई उच्च न्यायालयातील काम सोपविले जावे किंवा नगररचना विभागातील त्यांच्याशी संबंधीत टेबलचे काम सोपविले जावे. नाहीतर त्यांच्या जागी दुसरा कोणी अधिकारी दया.

<u>उप–महापौर :–</u>आयुक्त साहेबांनी सांगितले आहे की, आठ दिवसामध्ये आपणाकडे प्रत पोचविली जाईल.

<u>महापालिका सचिव :–</u>ठिक आहे, पुढील प्रश्न, प्रश्न क्र. २३८............

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>नाही, माझा २३१ क्रमांकाचा प्रश्न राहिलेला आहे. नगररचनाकार नव्हते म्हणुन मला त्या प्रश्नाचे उत्तर दिले नव्हते. आता या प्रश्नाचे उत्तर कोण देणार.? आरक्षित भुखंडाबाबतीत मी प्रश्न विचारलेला आहे. या यादीमध्ये अनु.क्र. १ पासुन १९ पर्यंत खेळाची मैदाने दर्शविली आहेत. तर ही सर्व खेळाची मैदाने आपणाकडे आहेत की नाहीत? ही मैदाने सध्या सुरक्षित आहेत की त्यांवर अतिक्रमण झालेली आहेत? महापालिकेच्या ताब्यात ती आहेत की नाहीत? मला या प्रश्नाचे ज्यांनी उत्तर दिले आहे, त्यांनी स्वत: जागेवर पाहणी करुन दिले आहे की कार्यालयात बसून संगणकावरुन प्रिंट काढुन दिली आहे? खेळाचे मैदान असल्याचे लिहिले आहे परंतु प्रत्यक्षात खेळाची मैदाने आहेत किंवा नाहीत? दोन तीन ठिकाणी शेरे लिहिले आहेत, बाकी ठिकाणी काहीही लिहिलेले नाही.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>जे नाही, ते नाही, जे दिले आहे...........

यावेळी मा. सदस्या श्रीमती रजनी महाडिक, श्रीमती मालती करोतिया, श्रीमती निलु चांदवानी, श्रीमती मंजु पोपटानी, श्रीमती संगिता कंडारे यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>जे नाही आहे म्हणजे? याचा अर्थ काय? अनु. क्र. १ ते १९ वर दर्शविलेली खेळाचे मैदाने आपणाकडे आहेतच. की त्यांच्यावर अतिक्रमणे झाली आहेत की त्यांवर बांधकाम करण्यासाठी

परवानगी दिली आहे? प्रत्यक्ष जागेवर जावुन आपण त्यांची पाहणी केली आहे का? खेळाची मैदाने अजुनही आपणाकडे आहेत?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–आज नगररचनाकार स्वत: महासभेत उपस्थित राहणार होते.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–एकुण २०३ आरक्षणे आहेत. त्यापैकी कुण्या एखादया विषयी मला प्रश्न विचारायचा असेल तर त्याचे उत्तर कोण देईल? श्री. खामितकर सुध्दा नाहीत. शेवटी शेवटी पार्किंगसाठीचा भुखंड असे लिहिलेले आहे, पार्किंगसाठीचे भुखंड आपणाकडे आहेत की नाहीत? १८९ पासुन १९४ पर्यंत.....

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–याबाबत पुढील वेळेस सर्व्हे करुन त्यातील जी होय, नाही उत्तरे आहेत त्यांची पडताळणी करुन त्याची उत्तरे देवु.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–पुढील सभेत देणार?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–होय देणार.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–ठिक आहे चालेल.

महापालिका सचिव :–प्रश्न क्र. २३८ श्रीमती वसुधा बोडारे यांचा आहे.

सदस्या श्रीमती वसुधा बोडारे:–मा. महापौर, उप–महापौरजी, आयुक्त साहेब व सचिव साहेब, माझ्या प्रश्नाचे उत्तर दयायला अधिकारी सभागृहात उपस्थित आहेत का? मी जानेवारी महिन्यामध्ये प्रश्न विचारलेला आहे. आणि त्याचे उत्तर मला आता ऑक्टोंबर महिन्यामध्ये मिळत आहे. माझा महत्वाचा प्रश्न रेन वॉटर हावेस्टींगचा होता. आता त्याचा काहीही उपयोग नाही कारण आता पावसाळा संपला आहे. इतके महिने अधिकारी उपलब्ध नव्हते. आता उपलब्ध झाले आहेत. पण आता काही उपयोग नाही. यानंतरचा सौर उर्जेबाबतचा प्रश्न आहे आणि तो अगदी महत्वाचा प्रश्न आहे. अगोदर तुम्ही सांगितले होते की अधिकारी असतील तरच पुढील सभा होईल. त्यानुसार मी विचारु इच्छिते की, आज नगररचनाकार कोठे उपलब्ध आहेत? आम्ही नगरसेविका होवून तीन ते चार वर्ष उलटुन गेली आहेत, नगररचनाकार काळे की गोरे आहेत ते अदयाप आम्ही पाहिले सुध्दा नाहीत. आणि जर ते आज येथे उपलब्ध असतील तर आम्हांला त्यांचे अभिनंदन करायचे आहे. कारण की एवढे मोठे उल्हासनगर ते कसे चालवित आहेत? आणि ते त्याचा काय विकास करतात हे आम्हांला बघायचे आहे. तीन वर्षामध्ये त्यांनी काय काय विकास केला आहे आणि उरलेल्या दिड दोन वर्षात ते काय करणार आहेत? उप–महापौर साहेब, तुम्ही आश्वासन दिले होते की नगररचनाकार नसतील तर सभा होणार नाही, असे तुम्ही आश्वासन दिले होते ते तुम्ही विसरुन जावु नका. हे तुम्ही मागच्याच सभेत सांगितले होते आणि मी जे प्रश्न विचारले होते ते टाकाऊ नाहीत ते अतिशय महत्वाचे प्रश्न आहेत. अगोदरचा प्रश्न जानेवारी महिन्यामध्ये विचारलेला आहे. कारण जुन पर्यंत मला कोठेतरी रेन वॉटर हार्वेस्टींग चालु करायचे होते. त्याचे सुध्दा उत्तर मला मिळालेले नाही आणि येथुन पुढे सौर उर्जा जीची खरोखरच गरज आहे, चार,चार, पाच, पाच हजार रुपयाचे लाईटबिल भरुनही २४ तास विज उपलब्ध होत नाही. त्यासाठी सौर उर्जा अतिशय महत्वाची आहे. त्यांनी किती प्लान पास केले आणि कोठे कोठे उपक्रम राबविले? राबविले नसतील तर ते चालविण्यासाठी काय प्रयत्न केले? एवढे तरी उत्तर दिले पाहिजे. त्यांनी उत्तर काय दिले आहे ते तुम्ही वाचा. ३०० चौरस फुटाच्यावरती हे उपक्रम राबवु शकतो. पण त्यांनी कोठेही हा उपक्रम राबविलेला नाही. शहरात हौसींग सोसायटया नाहीत काय? जुन्या असतील नविन झाल्या असतील, जानेवारी महिन्यापासुन एकही बांधकाम परवानगी मंजूर झाली नाही काय? नगररचनाकार सभागृहात आल्याशिवाय मी माझ्या आसनावर बसणार नाही. माझा जानेवारी पासुनचा प्रश्न प्रलंबित आहे. आणि तुम्ही मला सांगितले होते की, पुढची सभा ते असतील तरच घेण्यात येईल. आज बुधवार आहे त्यांचा आज येथे उपस्थित राहण्याचा वार होता. सकाळी ११.०० ते ३.०० वाजेपर्यंत असे मला वाटते. सभा ३.०० वाजेची होती मला असे वाटते की ते निघुन गेले असतील. प्रत्येक वेळेस आम्ही प्रश्नासाठी उभे राहायचे आणि तुम्ही काहीतरी उत्तर दयायचे आणि आम्ही आमच्या आसनावर बसायचे. आम्ही प्रश्न मांडुन काय उपयोग त्याचा? जानेवारी महिन्याचा प्रश्न

ऑक्टोंबर मध्ये येतो त्यात ते मागच्या महिन्यात उपस्थित नसल्याने आता सुध्दा या महिन्यात ते उपस्थित नाहीत येथे सुध्दा प्रश्न प्रलंबित. किती प्लान त्यांनी पास केले? उल्हासनगरमध्ये मला असे वाटते प्लान पास करुन इमारती बांधतच नाहीत? सर्व अनाधिकृतपणे काम चालु आहे. अधिकृत येथे होतच नाहीत.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–आयुक्त साहेब, नक्की काय चालले आहे? एक सन्माननिय सदस्य बोलत आहे आणि तुमच्याकडुन काय उत्तर आहे? उत्तर मिळणार आहे किंवा नाही?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–मा. महापौरजी, सन्माननिय सदस्या यांनी विचारलेल्या प्रश्नानुसार ३०० चौरस मिटरपेक्षा जास्त क्षेत्रावरती हे प्रकल्प मंजुर करण्यात येतात अशा प्रकारे उत्तर दिलेले आहे. नगररचनाकारांना आजच्या सभेत उपस्थित राहण्यासाठी सूचना केल्या होत्या तसेच सहा. नगररचनाकारांना सुध्दा फोन करुन उपस्थित राहण्यासाठी सांगितले होते, त्यांनी कबुल केले होते परंतु ते आज आलेले नाहीत. कारण की तांत्रिक स्वरुपाचा प्रश्न आहे. ३०० चौरस मिटरच्या वरील बांधकामाबाबत महाराष्ट्र शासनाने काही मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. आणि त्याबाबतीत उपविधी तयार करण्याचे काम सुरु आहे. त्यामध्ये आपण हे अंतर्भुत करायला घेतले आहे. किती ठिकाणी हा प्रकल्प केला आहे. याची माहिती सहा. संचालक नगररचना हे उपलब्ध नसल्यामुळे नाही.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–मा. आयुक्त साहेब, गेल्या तीन चार महासभांपासुन आपण सहजपणे उत्तर देत आहात की, नगररचनाकार आले नाहीत, नगररचनाकार आले नाहीत. त्याबाबतीत काय बोलावे हेच समजत नाही. नगररचनाकारांना गेंडयाची चामडी आहे का? त्यांच्यावर काही परिणामच होत नाही. तुम्ही प्रत्येक वेळेस सांगता की महासभेत उपस्थित राहण्याबाबतीत आम्ही त्यांना आदेश दिले होते. तरी देखील नगररचनाकार हजर राहत नाहीत. म्हणजे काय तुमचे देखिल ते ऐकत नाहीत?

सदस्या श्रीमती वसुधा बोडारे :–किती बांधकाम परवानग्या देण्यात आल्या आहेत हे माहित नाही असे तुम्ही सांगातात. नगररचनाकार नसतांना शेवटी तुम्हांलाच उत्तर दयायचे आहे. त्यासाठी तुम्ही अगोदरपासुन काहीतरी अभ्यास करायला पाहिजे होता. जानेवारी महिन्यापासुन एवढया बांधकाम परवानग्या मंजुर केल्या आहेत त्या एकाही बांधकाम परवानगीमध्ये आपण सौर उर्जेची अट घातलेली नाही. हे तर उत्तर आम्हांला मिळाले पाहिजे? आजपर्यंत किती बांधकाम परवानग्या मंजुर झाल्या हे तुम्हांला माहित नाही.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–सन्माननिय महापौर महोदया, गेल्या दोन–चार महिन्यापासुन हा प्रश्न चालु आहे. नगररचनाकार नाहीत म्हणुन आयुक्त व बाकी सा–या प्रशासनाने हात झटकुन मोकळे होणे बरोबर नाही. नगररचनाकार नाही म्हणुन शहराचा कारभार थांबणार नाही. महासभेने पारीत केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न प्रशासनाने केला पाहिजे. नगररचनाकार म्हणजे संपुर्ण प्रशासन होत नाही. प्रशासनाचा प्रमुख आयुक्त हे हसुन गप्प बसतात. तुम्ही या प्रश्नाची माहिती घ्यायला पाहिजे. ३०० चौरस फुटाच्या वरील बांधकामाच्या किती बांधकाम परवानग्या मंजुर केल्या? याबाबत माहितीच्या अधिकारात माहिती मागितली तर शिपाई सुध्दा माहिती देईल. ३०० चौरस फुटावरील बांधकाम परवानग्यांसाठी तुम्ही रेन वॉटर हार्वेस्टींग व सौर उर्जेचे प्रस्ताव मंजुर केले आहेत का? केले असतील तर किती? हा साधा आणि सरळ प्रश्न आहे. त्यासाठी कशाला नगररचनाकार पाहिजे? ही माहिती आयुक्त घेवु शकत नाहीत काय? उप–आयुक्त म्हणुन तुम्ही सुध्दा घेवु शकत नाहीत का? तुम्हांला महासभेची काळजी नाही. त्यात महापौर सुध्दा आले, उप–महापौर सुध्दा आले. तुम्हांला गांर्भिय नाही. तुम्ही पीठासीन अधिकारी आहात. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना सात–सात, आठ–आठ महिने अधिकारी उत्तर देत नाहीत. नगररचनाकार नाहीत, नगररचनाकारांना उदया काही झाले, उत्तर मिळणारच नाही का? आज नगररचनाकार येथे नाहीत, बाहेर गेलेत, रजेवर गेलेत किंवा त्यांची बदली झाली, कुणाचे कधी काय होईल सांगता येत नाही. म्हणजे हे सर्व गुपित राहणार का? ३०० चौरस फुटावरील एकही बांधकाम परवानगी मंजुर झाली नाही ? हे काय चालले आहे?

सदस्य श्री. लाल पंजाबी :–मा. महापौरजी, आयुक्त साहेब, कायदयानुसार प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आयुक्तांनीच दयायचे आहे. परंतु आम्ही तुम्हांला सवलत देत आहोत.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:—आयुक्त साहेब, ज्या पध्दतीने आज आयुक्त नाहीत त्यांच्या जागेवर आपण विराजमान आहात. तसेच नगररचनाकार नाहीत त्यांच्या जागेवर कुणी जबाबदारी घेवु शकत नाही का? त्यांच्या जागी कोणीतरी असेल ना की जे त्यांची जबाबदारी घेवु शकतील. की ते सुध्दा हजर नाहीत?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सहा. संचालकांकडे कल्याण महापालिकेचा सुध्दा कार्यभार आहे, आम्ही त्यांनायेथे महासभेत उपस्थित राहण्यास सांगितलेले होते. दुसरे म्हणजे ३०० चौरस मिटरच्या वरील जी बांधकामे आहेत ते प्लान मंजुर झालेले आहेत.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—तो विषय नंतरचा आहे. मी आपणांस प्रश्न विचारला की त्यांच्या जागेवर दुसरा कुणी हजर होवु शकत नाही काय? त्यांना तर तुम्ही आदेश देवु शकता ना की नगररचनाकार नाही आहेत त्यांच्या जागी तुला उत्तर दयावे लागेल. ज्यापध्दतीने आयुक्त नाहीत म्हणुन तुम्ही त्यांच्या खुर्चीवर विराजमान आहात. उत्तरच जावु दया, उत्तर नाही, सन्माननिय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे त्याचे नाही, पण उत्तर देण्यास दुसरा अधिकारी हजर होवु शकत नाही त्याचे काही नाही काय? ठिक आहे, त्यांना कल्याणचा कार्यभार आहे. परंतु आज महासभा आहे. किती महासभा झाल्यात सहा. संचालक नगररचना व नगररचनाकार हजर नाहीत. एक तरी हजर राहायला हवा की नाही?

यावेळी सदस्य श्री. महेश सुखरामानी, श्री. प्रभुनाथ गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—बरोबर आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—मग? दोन्ही गैरहजर राहतात म्हणजे याचा अर्थ काय? महासभेला तुम्ही काय गुंडाळुन घेतले आहे का? सन्माननिय सदस्य दर महिन्याला महासभेत हजर राहतात. व आपले ग—हाणे मांडतात की नगररचनाकार नाहीत, सहा. संचालक नगररचना हे दोन्ही हजर नसतात. हा आमचा अपमान आहे साहेब. हा महासभेचा अपमान आहे.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—नगररचनाकारांच्या बदलीबाबत संकेत प्राप्त झाले होते. परंतु आतापर्यंतच्या तयारीवरुन नगररचनाकार उपस्थित राहतील असे त्यांनी आम्हांला सांगितले होते.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—त्यांच्या बदलीचे आदेश प्राप्त झाले का?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—नाही, नाही.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—नाही, तसे लेखी आपल्याला आहे का?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—नाही, नाही त्यांची बदली होणार आहे असे संकेत आहेत.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—साहेब, संकेतला किंमत नाही. संकेतनुसार मी असेही म्हणुन शकतो की उदया तुमचीही बदली होणार आहे. असा संकेत आहे. असे होते का? त्यांनी तुम्हांला आदेश दिलेत का? आणि तुम्ही त्यांना कार्यमुक्त केले आहे का? असे नसतांना तुम्ही असे कसे म्हणत आहात की, त्यांची बदली होणार आहे? संकेत कोठुन आलेत?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—नगररचनाकार आणि सहा. संचालक नगररचना या दोघांनाही उपस्थित राहण्याबाबतीत सूचना दिल्या होत्या परंतु दोघेही उपस्थित राहिले नाहीत.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>साहेब, चार महासभांपासुन तुमचे हेच उत्तर आहे की दोघेही हजर नाहीत, दोघेही हजर नाहीत. मग हा विभाग चालवायचा कशाला? बांधकाम परवानग्या बरोबर मंजुर केल्या जातात. दर महिन्याला बांधकाम परवानग्या मंजुर होतात. पुण्याला जावुन बांधकाम परवानग्या मंजुर करुन घेतल्या जातात.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>३०० चौरस मिटरच्या वरील ज्या इमारतींना बांधकाम परवानगी दिलेली आहे त्याबाबतची सविस्तर माहिती आम्ही आठ दिवसामध्ये सन्माननिय सदस्यांना देण्याची व्यवस्था करतो.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>कालच्या तारखेला नगररचनाकार नसतांना देखील २५ प्लान पास झाले आहेत ते कसे झाले आहेत?

<u>उप–महापौर :–</u>साहेबांनी उत्तर दिले आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>हे काय उत्तर आहे का साहेब?

<u>उप–महापौर :–</u>या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे, कृपया आपण बसुन घ्यावे.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :–</u>आयुक्त साहेब, मागच्या महासभेत जेव्हा सांगण्यात आले की नगररचनाकार येणार आहेत. तरीही नगररचनाकार आलेले नाहीत. यावरुन तुमची काय किंमत आहे आणि महासभेची काय किंमत आहे हे दिसुन येते. नाहीतर त्या विभागाला कुलुप लावा, ११ महिन्यापासुन नगररचनाकार येत नाहीत. कुठलाही आरोपी जर कोर्टात हजर राहत नसेल तर त्यास हजर राहण्याबाबतीत संमन्स पाठविले जाते किंवा अटक करुन आणले जाते. तुम्ही घेवुन येवु शकत नाहीत काय? तसे सांगा. आम्ही घेवुन येवु का त्यांना? आयुक्त साहेबांनी निर्देश देवुनही नगररचनाकार महासभेत येत नसतील तर आयुक्तांना काय किंमत आहे ते तुम्ही सांगा. महिनाभर ते आले नाहीत तरी चालेल परंतु ज्यावेळेस महासभा असते तेव्हा त्यांनी यायला पाहिजे. मागील महासभेत तुम्ही सांगितले होते की, ते येणार आणि त्याच्यानंतरच महासभा चालु होणार. म्हणजे तुम्ही आमची काय किंमत ठेवता साहेब? नगररचनाकार सभेत येत नाहीत. ठिक आहे ते महापालिकेत महिनाभर आले नाहीत तरी चालेल परंतु महासभेत यायला हवेत. ते येणार मग त्यानंतरच महासभा चालु होणार म्हणजे तुम्ही आमची काय किंमत करता? आम्ही कोणाकडे भांडायचे साहेब?

यावेळी सदस्या श्रीमती मालती करोतिया, श्रीमती रजनी महाडिक हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. आयुक्त साहेब, मागच्या वेळेस आयुक्त साहेबांनी आश्वासन दिले होते की, जर नगररचनाकार आले नाहीत तर त्यांच्यावर शिस्त भंगाची कारवाई केली जाईल. त्यानुसार त्यांच्यावर शिस्त भंगाची कारवाई केली का? हि नाटकबाजी आता बंद करा तुम्ही? नाहीतर तुम्हांला तेथे आयुक्त म्हणुन बसायचा सुध्दा अधिकार नाही. पहिले त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यासंदर्भात आदेश दया. नंतरच सभेचे कामकाज चालु देणार. आणि त्या नगररचनाकारावर चौकशी सुध्दा बसवा. येथे पोरकट खेळ चालु आहे. आयुक्त आदेश देतात आणि त्याचे पालन ते स्वत: करत नाहीत. आता तुम्ही आयुक्त म्हणुन बसला आहात तर तुम्हीच आदेश दया. आताच आदेश दया, त्यानंतरच सभेचे काम चालु देणार.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, एक साधासा प्रश्न मला विचारायचा आहे. त्यास आपली सहमती पाहिजे. आता आपण सांगितले की, असा संकेत आहे की, नगररचनाकारांची बदली झाली आहे. त्यांनी असे कितीतरी प्लान मंजुर केले आहेत की, एक मिटरवर ३०, ३० फुट माल दिला आहे. दुसरा नगररचनाकार आला तर कंम्पलीशन व प्लींथ सर्टीफिकेट देणार का? या गोष्टीची आपण हमी दया, कारण की हा शहराच्या हिताचा प्रश्न आहे. याबाबत आपणांस जबाबदारी घ्यावी लागेल. या विषयाबाबत आपण काय म्हणता? त्यांची जर बदली झाली असेल तर त्यांनी जे प्लान मंजुर केले आहेत, त्याबाबत दुसरा जो नगररचनाकार येईल तो प्लींथ व कंम्प्लीशन सर्टीफिकेट देईल काय? याबाबत

जरा आपण स्पष्टीकरण करा. एक साधासा प्रश्न आहे. फार आडवा तिडवा असा काही नाही. कंम्प्लीशन आणि प्लींथ सर्टीफिकेटची जबाबदारी आपली राहिल.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सन्माननिय महापौर, उप—महापौर, सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे की, ज्या बांधकाम परवानग्या दिल्या आहेत त्यांवर प्लींथ प्रमाणे बांधकाम होईल किंवा नाही? ते तपासण्याची कार्यवाही सहा. संचालक नगररचना यांच्याकडुन करुन घेवु. त्यानंतरच पुढील कार्यवाही केली जाईल.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मा. आयुक्त साहेब, जे प्लान मंजुर केले आहेत त्यांना प्लींथ व कंम्प्लीशन सर्टीफिकेट मिळेल किंवा नाही? आता ही आपली जबाबदारी आहे.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सहा. संचालक नगररचना यांचे त्यावर अभिप्राय असल्याशिवाय त्याबाबतची ............

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—साहेब, काय चालले आहे ते संपुर्ण शहराला व सभागृहाला माहित आहे व आजच्या नंतर काय होणार आहे ते कुणाला माहित नाही. यासाठीच आम्हांला याबाबत हमी पाहिजे. आपण आयुक्त आहात, आपली हमी पाहिजे. अभिप्राय नाहीत. ज्यांचे प्लान पास झाले आहेत त्यांना प्लींथ व कंम्प्लीशन सर्टीफिकेट मिळाले पाहिजेत. ती हमी आपण घ्या.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—नियमाप्रमाणे जर नसतील तर आपण सहा. संचालक नगररचना यांचे अभिप्राय घेवुन प्लान (रिव्होक) रद्द करु.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—म्हणजे काय उलटी पध्दत चालु आहे काय?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—म्हणजेच ज्यांचे प्लान पास झालेले आहेत ते जर नंतर रिव्होक केले म्हणजे मेले का ते?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—समजा आज प्लान मंजुर झाले तर लगेच ते प्लींथला येणार नाहीत.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मागील महासभेत मी मुद्दा उपस्थित केला होता की, ५० वार जागेवर ४ माळयाची इमारत उभी केली आहे. ९० वार जागेवर ४ माळयाची इमारत उभी केली आहे. आता कायदयात बसुन आपण प्लान मंजुर केला आहे तर त्याचे प्लींथ आणि कंम्पलीशन सर्टीफिकेट त्या लोकांना मिळेल की नाही? तर काय अगोदर बेकायदेशीर काम झाले आहे का? आपण सांगा अगोदर बेकायदेशीर काम झाले आहे त्यांची तपासणी केली जाईल. असे आपण येथे सांगा.

यावेळी सदस्या श्रीमती मालती करोतिया, श्रीमती रजनी महाडिक यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—त्या बेकायदेशीर कामामध्ये आपला सुध्दा सहभाग आहे म्हणुनच आपण उत्तर देवु इच्छित नाही.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—परवानगी जर चुकीची दिली असेल तर तो प्लान रिव्होक करु ना.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मा. महापौर, उप—महापौरजी, ही तर शहराला मारण्यासारखी गोष्ट आहे. आयुक्त साहेब जे उत्तर देत आहेत ते शहराचे हिताचे नाही.

<u>सदस्य श्री. अनिल (विदयार्थी) ऐलानी:—</u>आयुक्त साहेब, ज्यांचे प्लान रिव्होक केले आहेत, त्यांच्यावर काय कारवाई केलीत?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मा. आयुक्त साहेब, नगररचनाकार आज सुध्दा सभेत हजर नाहीत. त्यांच्यावर शिस्त भंगाची कारवाई करण्यात यावी. त्याबाबत मागच्या वेळेस आयुक्तांनी आश्वासन दिले होते. त्याबाबत काय झाले?

<u>सदस्य श्री. अनिल (विदयार्थी) ऐलानी:—</u>आयुक्त साहेब, ज्यांचे प्लान रिव्होक केले आहेत, त्यांच्यावर काय कारवाई केलीत?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>ते प्लान ज्या कारणास्तव रिव्होक करण्यात आले आहेत त्याची चौकशी करुन...........

<u>सदस्य श्री. अनिल (विदयार्थी) ऐलानी:—</u>प्लान रिव्होक केले तर त्याची चौकशी कसली?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>नाही, नाही पुर्वी जर परवानगी दिली असेल आणि प्लान रिव्होक केले असतील ते कोणत्या कारणास्तव त्यांनी रिव्होक केले आहेत, याबाबत संपुर्ण माहिती घेवून त्याच्यावर शिस्त भंगाच्या कारवाई त्याच्यावर करण्याविषयी संचालक नगररचना यांना कळविण्यात येईल.

<u>सदस्य श्री. अनिल (विदयार्थी) ऐलानी:—</u>किती वेळेत कराल?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>आजच्या या अनुपस्थिती बद्दल..........

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>सभागृहाला वेडे बनवत आहेत. महिने दोन महिने झाले तरी तुम्ही कारवाई केली नाही. उगाच कशाला सभागृहात फालतुगीरी लावली आहे. मागच्यावेळेसच तुम्ही आश्वासन दिले की आम्ही शिस्तभंगाची कारवाई करु. आता म्हणता की आम्ही तिकडे अहवाल पाठवू. नगररचनाकार काही देवुन गेलेत काय? एवढे दिवस झाले तुम्ही त्यांच्यावर काही कारवाई करत नाहीत. ते वाटेल तसे प्लान पास करत आहेत. ''आंधळे दळंत आणि कुत्र पिठ खातय'' असा कारभार चालला आहे. मी सभा चालु देणार नाही. त्यांच्यावर शिस्तभंगाच्या कारवाईचे आदेश दया. आता आदेश लागु करा. नाहीतर सभा चालु देणार नाही. प्रत्येक सभेमध्ये नगररचनाकार हजर नसतात. आणि सभागृहाची तुम्ही दिशाभुल करत असता. आमच्या वेळेला काही किंमत नाही काय? प्रत्येक वेळेस नगररचनाकार येतात प्लान पास करतात आणि निघुन जातात. मात्र महासभेत हजर राहत नाहीत. आणि तुम्ही काय म्हणता की शिस्त भंगाची कारवाई करणार. आणि आता आदेश देणार. मुर्खपणा चालविला आहे तुम्ही.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—</u>साहेब, तुमच्या प्रशासनामध्ये काय चालते ते आम्हांला तुम्हांस सांगावे लागते. साहेब तुमचे लक्ष कोठे आहे?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, आयुक्त साहेब, आयुक्त साहेब, ऐकायला कमी येते जरा? माझे जरा ऐकुन घ्या. प्लानची तुम्ही जशी चौकशी करत आहात तशी नगररचनाकार श्री. गुरगुळे यांची सुध्दा सीबीआय तर्फे चौकशी करा. या उल्हासनगरमध्ये जर अधिकारी महासभेत येत नाही, अशा परिस्थित महासभा लावावयास नाही पाहिजे. महासभेत ज्यांचे विषय आहेत आणि ज्यांना त्या विषयाची माहिती दयायची आहे तेच जर महासभेत येत नाहीत तर मग सभा लावुन उपयोग काय आहे? यामध्ये तुम्ही सदस्यांचा वेळ फुकट घालवत आहात. त्यांनी प्लानचा भ्रष्टाचार केला आहे तो जनतेसमोर उघड होईल. आयुक्त साहेब, मी काय बोलत आहे ते ऐकत आहात ना तुम्ही? श्री. गुरगुळे, त्या नरगररचनाकारांची चौकशी करावयास लावा. त्यांच्यावर प्रथम कारवाई करा. नगरसेवक ज्या विषयांबाबत प्रश्न विचारतात त्याचे उत्तर देण्यासाठी संबंधित अधिकारी जर महासभेत उपस्थित राहत नसतील तर त्यांना निलंबित करण्याची व्यवस्था करा.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आतापर्यंत नगररचनाकार यांना किती पगार मिळाला? त्यांना पगार दिला जातोय काय? आणि आताचा बोनस तोही दिला आहे काय? दिला जाणार आहे काय? तोही बंद करावा. अशी मा. महापौर व आयुक्तांना विनंती आहे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>मा. महापौर महोदया, नगररचनाकार यांना मागील दोन, तीन महिन्यात महासभेत उपस्थित राहण्याबाबतीत सतत सूचना दिल्या होत्या, तरी ते उपस्थित राहिले नाहीत त्यांच्या अनुपस्थिती बद्दल शिस्त भंगाची कारवाई करण्याचा प्रस्ताव नगररचना विभागाचे जे संचालक आहेत त्यांना पाठविण्यात येईल कारण त्यांच्या नियंत्रणाखाली ते काम करतात. आजच्या या सभेच्या अनुपस्थिती बाबत शिस्त भंगाच्या कारवाईचा प्रस्ताव संचालक नगररचना पुणे यांच्याकडे उदया पाठविण्यात येईल.

<u>महापालिका सचिव :–</u>प्रश्नोत्तराचा कालावधी संपला.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>त्या प्रश्नाचे काय झाले?

<u>महापालिका सचिव :–</u>प्रलंबित.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>उत्तर काय? सौर उर्जा, रेन वॉटर हावेर्स्टींग याबाबत उत्तर काय? केले आहे, नाही केले, करणार आहात, नाही करणार आहात याबाबत उत्तर काय?

<u>काही सदस्य :–</u>पुढच्या सभेत.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>पुढच्या सभेत?

<u>उप–महापौर :–</u>साहेब काय म्हणाले, ३०० मिटरच्या वरील क्षेत्रफळाचे जेवढे प्लान मंजुर केले आहेत त्याचा सविस्तर अहवाल घेवुन, आठ दिवसात तुम्हांला उत्तर पोच करणार.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>आयुक्त साहेब, एवढेच सांगायचे आहे की, एवढे मोठे प्रशासन, एका नगरसेविकेने विचारलेल्या प्रश्नास उत्तर देवु शकत नाही. हे किती सक्षम प्रशासन आहे? नगररचनाकार नाहीत, एवढे एक उत्तर दिले, परंतु आयुक्त, उप–आयुक्त एवढे कर्मचारी अधिकारी आहेत, गेल्या सात महिन्यापुर्वी प्रश्न विचारल्यापासुन ३०० चौरस मिटरच्या वरील क्षेत्रफळाचे किती प्लान मंजुर झाले हे बघण्यास कुणाला वेळ नाही. एवढे सक्षम प्रशासन तुम्ही चालविता? महासभेने पारीत केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करण्याची सुध्दा मानसिकता तुमच्यामध्ये नाही. आता या प्रश्नाचे उत्तर पुढच्या सभेत देणार आहात?

<u>महापालिका सचिव :–</u>लेखी उत्तर देणार.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>लेखी का? आम्हां सगळयांना हा प्रश्न आहे. लेखी नको. लेखी मी माहितीच्या अधिकारामध्ये विचारले असते? नगररचना विभागातील एखादया कर्मचा–याने त्याचे उत्तर दिले असते. प्रत्येक अधिका–यास हे माहित असले पाहिजे की माझ्या महापालिकेमध्ये चालले काय? या महापालिकेवर प्रेम करा. तर तुम्ही माहिती घ्याल.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>मगाशी, जे उत्तर दिले होते की आठ दिवसामध्ये सविस्तर उत्तर देतो, त्यात सुधारणा करुन सांगतो की, पुढच्या सभेत सर्व सदस्यांना लेखी उत्तर दिले जाईल.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>आयुक्त साहेब, तुम्ही नगररचनाकारांवर कारवाई करणार आहात का नाही? त्यांची चौकशी करा ना.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

<u>**विषय क्र. २ :–**</u> मागील महासभेचे दिनांक २०/८/२०१० सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>**सदस्य श्री. सतिश चहाळ :–**</u>सचिव साहेब, मी बोलत असतांना कमीत कमी मला माझे बोलणे तर पुर्ण करु दया ना?

<u>**महापालिका सचिव :–**</u>महापौर महोदयांनी जो आदेश दिला, त्यांनी जसे सांगितले तसे मी केले.

<u>**सदस्य श्री. सतिश चहाळ :–**</u>प्रत्येक वेळेस माझे बोलणे आपण अर्ध्यावर थांबविता हे बरोबर आहे का?

<u>**महापालिका सचिव :–**</u>मा. महापौरांच्या परवानगी शिवाय बोलता येत नाही.

<u>**सदस्य श्री. सतिश चहाळ :–**</u>त्यांच्या परवानगीनेच बोलत होतो.

<u>**महापालिका सचिव :–**</u>नाही म्हणुन त्यांनीच सांगितले.

<u>**सदस्य श्री. सतिश चहाळ :–**</u>मा. महापौरजी, तुम्हीच सांगा, नगररचनाकारांवर कारवाई होईल किंवा नाही?

<u>**उप–महापौर :–**</u>आयुक्त साहेबांनी सांगितले आहे की, त्यांच्यावर शिस्त भंगाची कारवाई करु.

<u>**काही सदस्य :–**</u>पास–पास......

<u>**महापौर :–**</u> मागील सभेचे दिनांक २०/८/२०१० रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. २ :–** मागील महासभेचे दिनांक २०/८/२०१० सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्रीमती मोना वनवारी

अनुमोदकाचे नाव : श्रीमती ज्योती चैनानी

<u>**महासभा ठराव क्र. ३७ ग**</u> <u>**दिनांक:–२०/१०/२०१०**</u>

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक २०/८/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ८३ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:—** विद्युत विभागाचे निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावणेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :—** विद्युत विभागाचे निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावणेस मान्यता देणे.

प्रस्तावना

विद्युत विभागामार्फत निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यासाठी जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमानपत्रात निवीदा सुचना देवुन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या.

त्यांच्या प्रतिसादात में.सुसुम ट्रेडींग प्रा.ली. उल्हासनगर. में.भिकमचंद डुंगाजी ॲन्ड कं. मुबई, में नोबेल कार्पोरेशन.मुबई, मे.रामनारायण पांडेय. उल्हासनगर, में.अब्बुल्लाह खान. उल्हासनगर, में.गुड्डु ऑटोमोबाईल उल्हासनगर, व में सुड्डुभाई ओल्ड मोर्टर्स पार्स्ट. उल्हासनगर, अशा एकुण सात मक्तेदारांनी निविदा चे कोरे प्रपत्र खरेदी केले

सदर निविदा इसारा रक्कमेसह सादर करण्याची मुदत ३१/०८/२०१० रोजी सायकाळी ५.०० वाजे पर्यंत होती, त्याच्या प्रतिसादात मे. रामनारायण पांडेय, में.अब्बुल्लाह खान. में. गुड्डु ऑटोमोबाईल व में सुड्डुभाई ओल्ड मोर्टर्स पार्स्ट. अशा ४ निविदाधारकांची इसारा रक्कमेसह सिलबंद निविदा वेळेवर पोहचल्या . तसेच वेळेवर मिळालेल्या चारही निविदा दिनांक ३१/०८/२०१० रोजी सायंकाळी ५.४० वाजता उघडण्यात आल्या. त्यांच्या तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

**COMPERATIVE STATEMENT**

| ैतण छवण | Descr. of Un-serviceable Articles | Unit | Appx Qty. | Expected cost Per Unit in Rs. | M/s. Ramnarayan Pandey Per Unit in Rs | M/s. Abdullah khan Per Unit in Rs | M/s. Guddu Auto mobiles Per Unit in Rs | M/s. Suddubhi Old Motors Parts Per Unit in Rs. | Amount of Highest Rate Qty. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | 40 Watt Tube Lights (Scrap) | Nos | 1200 | 2.80 | **02.81** | 0.25 | 01.05 | 01.50 | **3372.00** |
| २ | Sodium Bulb of Various Wattages (Scrap) | Nos | 2500 | 5.00 | **05.21** | 05.10 | _ | 01.50 | **13025.00** |
| ३ | Igniters (Scrap) | Nos | 1800 | 2.80 | **02.81** | 01.00 | _ | 01.50 | **5058.0** |
| ४ | Kit-Kat Base (Scrap) | Nos | 200 | 10.20 | 10.22 | **10.30** | 05.00 | 03.50 | **2060.00** |
| ५ | All Type of Fiber material (Scrap) | Kgs. | 60 | 05.00 | **05.21** | 01.00 | _ | 04.20 | **312.60** |
| ६ | ES 50 – 12 ( 12 Volt, 50 AH ) | Nos | 11 | 550.00 | **651.00** | 580.00 | 600.00 | 560.00 | **7161.00** |
| ७ | SMF NS 70 SGL 12 Volt, 70 AH CCA 330 | Nos | 50 | 650.00 | 745.00 | **800.00** | 600.60 | 600.00 | **40000.00** |
| ८ | EP 100 – 12 (12 M 100 ) 12 Volt, 100 AH | Nos | 20 | 750.00 | 800.00 | **910.00** | 700.00 | 780.00 | **18200.00** |
| ९ | Mix PVC Material (Scrap) | Kgs. | 30 | 05.00 | **06.05** | 06.00 | 05.20 | 05.10 | **181.5** |
| १० | All Types of A/C Units (Scrap) 1.5 Tons | Nos | 06 | 2722.50 | 3000.00 | **3111.00** | 2000.00 | 2800.00 | **18666.00** |
| ११ | All Types of A/C Units (Scrap) 1 Tons | Nos | 02 | 1815.00 | 2100.00 | **2151.00** | 1500.00 | 1850.00 | **4302.00** |
| १२ | All Types of Flou.Tube Fitting/M.V.Fittings/ S.V.Fittings. | Nos | 110 | 15.75 | 16.00 | **81.10** | 12.00 | 16.00 | **8921.00** |
| १३ | PVC arm/unarm cable & wire (Allum.) | Kgs. | 30 | 35.02 | 36.00 | **41.50** | 20.00 | 27.00 | **1245.00** |
| १४ | All Types Of Copper Chokes | Kgs. | 150 | 41.52 | **51.10** | 46.25 | 42.00 | 40.00 | **7665.00** |
| १५ | All Types Of Iron Scrap | Kgs. | 800 | 18.52 | **18.60** | 16.00 | 13.00 | 12.80 | **14880.00** |
| | | | | | | | | **Total** | **1,45,049.10** |

सदर दराचा तुलनात्मक तक्ता नुसार आयटम क्र १,२,३,५,६,९,१४ व १५ मध्ये मे. रामनारायण पांडेय याचे दर सर्वात जास्त आहे, व आयटम क्र. ४,७,८,१०,११,१२, व १३, मध्ये में.अब्बुल्लाह खान याचे दर सर्वात जास्त आहे,

वरील बाबी लक्षात घेता ( १ ) मे. रामनारायण पांडेय यांचे आयटम क्र १,२,३,५,६,९,१४ व १५ मध्ये सर्वात जास्त दर आहेत तसेच में.अब्बुल्लाह खान. यांचे आयटम क्र. ४,७,८,१०,११,१२, व १३, मध्ये सर्वात जास्त आहेत ज्या ॲटम मध्ये ज्याचे दर जास्त आहे ते ॲटम त्यांना उपलब्ध परिमाण व ३१ डीसेंबर,२०१० अखेर पर्यंत जमा होणा—या परिमाण विल्हेवाट करणेस मान्यता मिळावी.( २ ) जर सर्वाधिक दराच्या निविदाधारकांनी साहित्यें घेण्यास नकार दिला तर त्याची E.M.D फोरफिट करून दुस—या कुठल्याही एजन्सीला अपेक्षित दरानुसार साहित्याची विल्हेवाट करण्यासाठी आयुक्ताना प्राधिकृत करणे.

सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे मंजुरी करीता सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ३८ <u>दिनांक:—२०/१०/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती मोना वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती ज्योती चैनानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे विद्युत विभागाचे निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यास व बाबनिहाय अधिकतम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ४ :—** श्री. ठाकुरदास व्ही. भोजवानी, माळी, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना महापालिका सेवेतून स्वेच्छा निवृत्ती देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ४:—** श्री. ठाकुरदास व्ही. भोजवानी, माळी, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना महापालिका सेवेतून स्वेच्छा निवृत्ती देणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. ठाकुरदास व्ही. भोजवानी, माळी, सार्वजनिक बाधंकाम विभाग यांनी २० वर्षे पेक्षा अधिक सेवा झाली आहे. या कारणास्तव दिनांक १२/४/२०१० रोजीच्या अर्जान्वये स्वेच्छानिवृत्ती मिळणेसाठी अर्ज केला आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (कुटुंबनिवृत्ती वेतन) नियम १९८२ वे नियम ६६ पोटनियम (१) अन्वये कर्मचाऱ्यास तीन महिन्यांची नोटीस देऊन स्वेच्छानिवृत्ती घेता येते.

श्री. ठाकुरदार व्ही. भोजवानी हे आपल्या महापलिकेत दिनांक ०५/०५/१९८३ पासुन माळी या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या दिनांक १२/४/२०१० रोजीच्या अर्जावरुन तीन महिन्यांची नोटीसीनुसार सदर कर्मचाऱ्यांस महाराष्ट्र नागरी सेवा (कुटुंबनिवृत्त वेतन) नियम, १९८२ चे नियम ६६ पोटनियम (१) अन्वये दिनोक १०/०७/२०१० रोजी स्वेच्छानिवृत्ती घेता येईल तसेच दिनांक १२/४/२०१० रोजी त्यांची महापालिकेतील एकूण सेवा २६ वर्षे ११ महिने ०५ दिवस इतकी होते.

त्यांचप्रमाणे सदर कर्मऱ्याचे सेवापुस्तक व वैयक्तिक संचिका तपासले असता सद्यस्थितीत त्याचेविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी अथवा न्यायालयीन प्रकरण प्रलंबित अगर प्रस्तावित नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिकेच्या अधिकाऱ्यांचे किमान मासिक वेतन भत्ते बगळुन रु. चारशे किंवा त्याहुन अधिक आहेत. असे अधिकारी तात्पुरते असो त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार विहित असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम, १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मा. महासभा ठराव क्र. २६, दिनांक १९/७/२०१० अन्वये ही महासभा प्रशासनातफे सर्व कागदपत्रांची सखोल तपासणी अंती माहिती दिल्याशिवाय वारसा हक्काने नियुक्ती देण्याविषयी मान्य करीत नाही. या प्रयोजनार्थ फेर प्रस्ताव सादर करण्यास निर्देशित करीत आहे. असा ठराव पारीत केलेला आहे.

सबब, श्री. ठाकुर के. भोजवानी यांची नियत वयोमानानुसार स्वेच्छा निवृत्ती मंजुर करता येते. श्री. ठाकुर के. भोजवानी यांची वैद्यकीय कारणास्तव किंवा लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा हक्क प्रकरण नाही. सदर प्रकरण केवळ स्वेच्छा निवृत्ती आहे.

सबब, श्री. ठाकुरदास व्ही. भोजवानी, माळी, सार्वजनिक बाधंकाम विभाग यांची स्वेच्छानिवृत्तीस मंजूरी करीता मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ३९ <u>दिनांक:—२०/१०/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती रजनी महाडिक

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. ठाकुरदास व्ही. भोजवानी, माळी, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन महापालिका सेवेतून स्वेच्छा निवृत्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५** :—पुर्वीच्या दिनांक १२/७/२०१० च्या महासभा ठराव क्र. २१ मध्ये बदल करुन शरीर सौष्ठव स्पर्धेसाठी भारतीय गारमेंट वेलफेयर असोसिएशन, उल्हासनगर यांना रुपये अडीच लाखा अनुदान मंजुर करणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

महापौर :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५:–** पुर्वीच्या दिनांक १२/७/२०१० च्या महासभा ठराव क्र. २१ मध्ये बदल करुन शरीर सौष्ठव स्पर्धेसाठी भारतीय गारमेंट वेलफेयर असोसिएशन, उल्हासनगर यांना रुपये अडीच लाखा अनुदान मंजुर करणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, श्री. शरीफ एम. शेख, अध्यक्ष, भारतीय गारमेंन्ट वेलफेयर असोसीएशन, उल्हासनगर यांनी मा. सभापती, क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती यांच्या राखीव निधीतून उल्हासनगर उपमहापौर चषक शरीर सौष्ठव स्पर्धेच्या आयोजनासाठी आर्थिक मदत अनुदान म्हणून अडीच लाख मिळणेसाठी विनंती केली आहे.

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समितीसाठी 'अ' अंदाजपत्रकातील खर्च बाजू इ (९) खर्चा मधील राखीव निधी १५ लाखाची तरतूद आहे.

तरी उल्हासनगर उपमहापौर चषक शरीर सौष्ठव स्पर्धेचे आयोजन करणेसाठी श्री. शरीफ एम. शेख, अध्यक्ष, भारतीय गारमेंन्ट वेलफेयर असोसिएशन उल्हासनगर यांना रुपये अडीच लाख अनुदान मंजूर करणेकामी निर्णयार्थ सादर.

महासभा ठराव क्र: ४० दिनांक:–२०/१०/२०१०

सुचकाचे नाव :– श्रीमती रजनी महाडिक

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

ही महासभा दिनांक १२/७/२०१० च्या महासभा ठराव क्र. २१ मध्ये बदल करुन शरीर सौष्ठव स्पर्धेसाठी भारतीय गारमेंट वेलफेयर असोसिएशन, उल्हासनगर यांना रुपये अडीच लाख अनुदान मंजुर करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ६** :–१२ विवादित बांधकाम परवानगींबाबतचा अहवाल विचारात घेणे.

---

काही सदस्य :–हा विषय पुढे ढकला.

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ६:—** १२ विवादित बांधकाम परवानगींबाबतचा अहवाल विचारात घेणे.

प्रस्तावना

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | बांधकामाचे ठिकाण | प्लान नंबर | विपर्यस्त मुद्दा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. जयप्रकाश पारुमल छाबडिया, श्रीमती आरती जयप्रकाश छाबडिया, श्रीमती लिला शंकरलाल पुरस्वानी, श्री. रमेश मोहनदास पुरस्वानी | यु. न. १२,१५, १९ भाग शिट नं. ५१ ए कॅम्प नं. ४ | उमपा/नरवि/बांप/१६०/०९/११३६, दिनांक ९/१२/२००९ | टिंबर डेपो आरक्षण क्र. २०१ ताबा पावती दि.७.०४.८७ रोजी महापालिकेस मिळाला आहे.तरी सदर जागेवर प्लान पास करण्यात आला आहे. शासन निर्णय क्र. टिपीडी/१०९४/सीआर—१४/९४ नवि—९ दि.०७.०४.९४ नुसार २५ टक्के ताबा महापालिकेन घेणे आवश्यक होते.तो घेतला नाही. सदरहु परवानगी इंडस्ट्री प्रयोजनार्थ देण्यात आली आहे. | यु. नं. १२, १५ (भा), १९, शिट नं. ५१, उ.नगर—४ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत श्री. जयप्रकाश पारुमल छाब्रीया व इतर ३ यांचे वास्तुविशारद श्री. भुषण रुपानी यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. ०३.१०.०९ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने प्रस्तावाची छाननी केली असता मंजूर व प्रारुप विकास आराखडयानुसार विषयांकित जागा आरक्षण क्र. २०१ टिंबर सॉ मिलसाठी आरक्षित असुन प्रारुप विकास योजनेनुसार रहिवासी विभागात समाविष्ट आहे. शासनाचे दिनांक ०७/०४/१९९४ अधिसुचनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेची मंजुर विकास योजना व प्रारूप विकास योजनेतील कठोरतम तरतुदीसह बांधकाम परवानगी देणेबाबत आदेशित केले आहे, त्यामुळे सदर जागेवर रहिवासी वापर अनुज्ञेय न करता औद्योगिक वापर अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. विकासकास उपविभागीय अधिकारी यांचेकडुन सनद प्रदान करण्यात आलेली असल्याने विकासकास या कार्यालयाचे क्र. उमपा/नरवि/बांप/१६०/०९/११३६ दि. ०९.१२.०९ रोजी बांधकाम परवानगी.देण्यात आली आहे. सदर ठिकाणची सनद विकासकाच्या नावे दिसून येते तसेच तात्पुरता ताबा महानगरपालिकेला दिलेला दिसून येतो. तथापि श्री. राजेंद्रसिंह वी. भुल्लर, नगरसेवक यांनी मालकी आरक्षण असल्यामुळे २५ टक्के बांधकाम महानगरपालिकेस देणे आवश्यक होते असे म्हणणे आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | परंतू विषयांकित जागी सॉ मिलसाठी म्हणजेच औद्योगिक बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. शासनाच्या निर्देशानुसार टिंबर सॉ मिलची जागा २५ टक्के घेणेबाबत कोणतेही आदेश नाहीत. त्या सदरच्या योजनेत २५ टक्के आरक्षित बांधकामाचा महानगरपालिकेस घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. |
| २ | श्री. धनराज एन. बालानी | यु.नं. ३, शिट नं. ५१ ए, कॅम्प नं. ३ | उमपा/नरवि/बांप/५९/०८/०१, दिनांक ९/४/२००९ | त्या जागेवर ३९१.८० चौ. मी.एरिया नाही.सनद मध्ये ३५७.१८चौ.यार्ड आहे. प्लॉन पास झाला आहे३९१.८०चौ.मी.सनद पडताळणी झाली नाही. २५.९.०८ जा.क्र.४६ पत्रानुसार सनद पडताळणी झाली नाही.तशी नोंद नोंदवहीत आहे.त्यामध्ये ११७.६/९ मध्ये खाडाखोड आहे.सनद क्षेत्रफळ ११७.६/९ तर ३९१.८० चौ.मी.प्लॉन पास केला आहे.या प्रकाराची चौकशी करावी.सनद नं. २१३` दि.२०.१२.०४ त्यामागे उमपा/नरवि/जीआर—१५ दि.१२.०६.०२ पत्र आहे. ना हरकत दाखला आहे. माहीती अधिकारा अंतर्गत उपविभागीय कार्यालयाने नगररचनाकार,उमपा यांस लिहिले आहे की श्रीमती कमला शौकिन यांच्या अर्जावर ना हरकत दाखला आहे.शिट नं.५२ ए यु.नं.४ डीआयएलआर दप्तरी नोंदवहीत धनराज बालानी यांचे नांवे यु.नं.३ हा १०.४ चौ.मी जागा आहे. सीडी नोंदवहिचा उतारा एसडीओ ने दिला आहे. | यु. नं. ३, शिट नं. ५१, शांतीनगर, उ.नगर—३ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत श्री. वसंत वरदमल चेलानी यांचे वास्तुविशारद श्री. अविनाश कुमावत यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. २४.०७.०८ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. जागेचे क्षेत्र ३९१.८० चौ.मी. होते. विकासकाकडे सदर जागेच्या ३ सनदा असुन त्याचे क्षेत्रफळ ४७४.६६ चौ. यार्ड होते. त्यापैकी उपविभागीय अधिकारी कार्यालयाने २ सनदेची पडताळणी करुन दिलेली आहे आणि ११७.६६ चौ.वार क्षेत्राची सनदेची मुळ नस्ती त्यांच्याकडे उपलब्ध होत नसल्याने सनदेच्या रजिस्टर उतारा प्रतीवरुन उताऱ्याची पडताळणी करुन देण्यात आलेली आहे. त्यामध्ये असलेल्या खाडाखोडा हा कार्यालयाचा विषय होत नाही. तसेच नांव बदल्याच्या दाखल्याची पडताळणी करुन घेतलेली आहे व नांव बदल्याच्या दाखल्यात तिन्ही सनदांच्या क्षेत्रफळाची बेरीज करुन आलेल्या क्षेत्रफळावरती बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. |
| ३ | श्रीमती प्रेमीबाई टोपदास चंचलानी, घनश्यामदास चोरुमल चंचलानी, खेमचंद कुंदामल चंचलानी, श्री. धर्मदास वीरामल चंचलाणी, श्री. सुरेश नंदुमल चंचलानी, श्री. दौलत दर्यारामल चंचलानी | यु. नं. १६, शिट नं. ४८, कॅम्प नं. ३ | उमपा/नरवि/बांप/६०/९८/८१५, दिनांक ४/११/९९ | सदरचा प्लॉन १९९४ जीआर नुसार अर्धा जागेवर प्लॉन पास करायला हवा.त्यानी जेवढी सनदचे क्षेत्रफळ आहे तेवढा प्लॉन पास केला आहे.५०टक्के जागेवर प्लॉन पास न करता १०० टक्के प्लॉन पास केला आहे.त्याचे कडुन गाळे बनवुन घ्यावयाचे होते.त्यासाठी महापालिकेला खर्च करावा लागला.सदर जागेचा ताबा महापालिकेस दि.०७.०४.८७ मध्ये दिला आहे.त्या जागेचे मालक महापालिका आहे.मनपा अधिकाऱ्यांनी डोळे बंद करुन प्लॉन पास केलेला आहे.दि.१८.०२.०३ बांधकाम पुर्णत्वाचा दाखल दिला आहे.त्याचा जा.क्र. ४७/६०/९८/८७७ आहे.आता पुन्हा दि.०३.०८.०९ रोजी सुधारित बांधकाम परवानगी दिली | उपरोक्त विषयांकित जागेवर मुळ बांधकाम परवानगी या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/४७/९८/८९६ दि. १८.०२.०३ रोजी 'ए' विंग तळमजला + २ रा मजला, 'बी' विंग तळमजला + २ रा मजला, 'सी' विंग तळघर + तळमजला + ३ रा मजला अशी वाणिज्य वापरासाठी बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आलेली होती. विकासकाने २५ टक्क्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेस 'सी' विंगमधील २ रा व ३ रा मजला हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. परंतू 'सी' विंगसाठी बांधकाम पूर्णतेचा दाखला दिला असुन फक्त 'ए' |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | आहे.जाग हस्तांरित केली असतानाही खोटया पद्धतीने महापालिकेच्या जागेवर सुधारित बांधकाम परवानगी कोणत्याही कायदयात बसत नाही.५८८९.४६ चौ.मी.चा जीना क्षेत्रफळ सामासिक अंतरे क्षेत्रफळ दिल्याने ५६४.६१ चौ.मी. जादा देण्यात आले आहे.दोषींवर कायदेशिर कारवाई करण्यात यावी.सहा महिन्यानंतर बांधकाम पुर्णत्वाचा दाखला दिल्यानंतर कोणत्याही सुधारित बांधकाम परवानगी देता येत नाही. | विंग व 'बी' विंग साठी पुर्नसुधारीत प्रस्ताव विकासकाने सादर केलेला आहे. तथापि, जीन्याचे प्रिमियम भरुन 'ए' विंग व 'बी' विंगमध्ये प्रस्तावित नकाशे सादर करण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने विकासकास पुर्नसुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. १) ५० टक्के जागेवर नकाशे मंजुर करण्याची कोणतीही तरतुद नाही. २) जागेची सनद विकासकाकडे असून तात्पुरता ताबा महापालिकेस दिलेला आहे. ३) भागशः पुर्णत्वाचा दाखला दिल्याने २००९ मध्ये सुधारीत नकाशे सादर केलेले आहेत. ४) ५६४ चौ.मी. जादा देण्यात आले आहे असे म्हणणे अयोग्य असून तिन्ही विंगमधील जीन्याचे क्षेत्राचा समावेश करुन सुधारीत परवानगी देण्यात आलेली आहे. |
| ४ | हिंदुस्तान पेन्सिल फॅक्टरी प्राय.लि. | प्लॉट नं. २९, सेक्शन—३, शिट नं. ७, कॅम्प नं. ४ | उमपा/नरवि/बांप/३३/०८/७५९, दिनांक ७/१०/२००९ | कंडिशनल सीडीप्रमाणे शासन मंजुरीशिवाय सदर जागा विकु शकत नाही.कर्ज घेवु शकत नाही.गहाण ठेवु शकत नाही.तसेच फेरबदल करु शकत नाही.यांनी प्लॉन पास केला आहे.प्लॉन बघुन लोक बुकींग करतील. सदर इमारतीत लोक गाळे घेतील. त्यामुळे लोकांना नाहक त्रास सहन करावा लागेल.बॅकेतुन कर्ज घेतल्यामुळे बॅकेचे दिवाळखोरीत जाईल.लोकांची व बॅकेची फसवणुक होईल. | प्लॉट नं. २९, सेक्शन ३, इंडस्ट्रियल इस्टेट, शिट नं. ७, उ.नगर—४ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत मे. हिंदुस्तान पेन्सिल फॅक्टरी द्वारा श्री. अनिल पी. होतचंदानी (कुलमुखत्यार) यांचे वास्तुविशारद श्री. भुषण रुपानी यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. ०७.०४.०८ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने प्रस्तावाची छाननी केली असता मंजूर व प्रारुप विकास आराखडयानुसार विषयांकित जागा औद्योगिक विभागात येत असुन सदर विकासकास या कार्यालयाचे क्र. उमपा/नरवि/बांप/३३/०८/७९ दि. ०७.१०.०९ रोजी बांधकाम परवानगी.देण्यात आली आहे. तथापि तक्रारदार याने शासन मंजूरी शिवाय सदर जागा विकू शकत नाही. कर्ज घेऊ शकत नाही, तसेच फेरबदल करु शकत नाही असे म्हणणे आहे. शासनाने त्यांचे दि. १२.०३.१९८५ चे आदेश क्र. ४३ (ए) (vii) अन्वये जी अटी व शर्ती दिलेली आहे. त्यात तक्रारदाराच्या म्हणण्याप्रमाणे अटी व शर्ती नाहीत. या उलट त्या जागेचा उपयोग औदयोगिक वापरासाठी करावा अशी सूचना अट क्र. ४ मध्ये स्पष्ट देण्यात आलेले आहे. म्हणून औदयागिक वापरासाठीच परवानगी असल्याने शासनाची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | श्री. अशोक एस. अडवानी, श्री. अनिल जे. बजाज | बॅ. नं. १९९३, रुम नं. १ व २, शिट नं. ७६, कॅम्प नं. ५ | उमपा/नरवि/बांप/०८/०५/५२, दिनांक १/६/२००५ | सामासिक अंतरे क्षेत्रफळ देण्याचा अधिकार मा.आयुक्तांचा आहे. यावर आयुक्तांची सही नाही. नगररचनाकार व मुख्यालय उपआयुक्तांची सही आहे.चुकीच्या पद्धतीने प्लॅन पास केला आहे. | उपरोक्त विषयान्वये बॅ.नं. १९९३, रुम नं. १,२, शिट नं. ७६, उ.नगर—५ येथील सुधारीत बांधकाम परवानगी देतेवेळेस तळमजला + १ मजलेचे वाणिज्य वापरासाठी सुधारीत बांधकाम परवानगी ही विकासकाच्या प्लॉटचे आकार अनियंत्रित असल्यामुळे मागील बाजुला व सामासिक अंतरात सुट अपेक्षित होती व मंजूर बांधकाम नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्र ६.६.२.२ व प्रसिध्द प्रारुप नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्र. ६.६.२ अन्वये सामासिक अंतरात सुट देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असल्याने त्यानुसार सदर परवानगीमध्ये विकास ? कामे सादर केलेल्या बांधकाम नकाशाच्या छाननी वर मा. अतिरिक्त आयुक्त यांचेकडे प्रकरण सादर केले असता मा. आयुक्तानी सहाय्यक संचालक नगररचना यांनी जागा पाहणी करुन अहवाल सादर करण्यास आदेशीत केले. त्यानुसार सहाय्यक संचालक यांनी स्थळ पाहणी करुन अहवाल सादर केला होता. तथापि सदरच्या कालावधीत मा. आयुक्त यांनी सहाय्यक संचालक नगररचना यांना विकास नियंत्रण नियमावलीनुसार सामासिक अंतराच्या शिथिलतेचे अधिकार मा. सहाय्यक संचालक नगररचना यांना दिले होते. त्याबाबत मा. आयुक्त यांना सदरचे अधिकार बहाल करता येत नाहीत याबाबतची विचारणा केली होती. तरी त्या मध्यंतरीच्या काळात सदरच्या संचिका परस्पर Outward करण्यात आल्या. त्यामुळे ही सदरची बाब निदर्शनास आल्याने संबंधित कर्मचाऱ्यावरती योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने विकासकास नव्याने सामासिक अंतरात सुट विरहीत नकाशे सादर करण्याबाबत सुचना देण्यात आलेले आहेत. तरी सदरचे मंजूर केलेले नकाशे रद्बादल करण्यात येत असुन नव्याने सुधारीत दाखल केलेल्या नकाशाबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | श्री. रमेशलाल गिधनामल डिंगरीया, श्री. मुरली रमेशलाल डिंगरीया | बॅ. नं. १९९३ समोर, चालता नं. ५०८, ५०९ ए शिट नं. ७६, कॅम्प नं. ५ | उमपा/नरवि/बांप/१४५/०६/१६३, दिनांक १०/५/२००७, १४५/०६/८८८, दिनांक ०६/११/२००९ | सहा महिन्यानंतर सुधारित बांधकाम परवानगी देता येत नाही. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला सन २००७ रोजी घेतल्यानंतर दि.०६.११.०९ रोजी सुधारित बांधकाम परवानगी कायदयानुसार देता येत नाही.तर कोणत्या आधारे सुधारित बांधकाम परवानगी दिली आहे . | चा.नं. ५०८,५०९,५०९ ए, बॅ.नं. १९९३ जवळ, उल्हासनगर–५ या जागी विकासकाने तीन सब डिवीजन ले आऊट करुन घेऊन त्यांना ए,बी व सी असे प्लॉट करुन घेतलेले आहेत. सदर ठिकाणी तीन विकासकाच्या नावे बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामधील एका विकासकाने बांधकाम पुर्ण केलेल होते. परंतु उर्वरित दोन विकासकाने जागेवर बांधकाम चालू न केल्यामुळे विकासकाने जीनाचे प्रिमियम भरुन उपरोक्त जागेवर सुधारीत बांधकाम परवानगीसाठी वास्तुविशारदामार्फत प्रस्ताव सादर केलेला होता. त्याअनुषंगाने मुळ बांधकाम परवानगी या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/१४५/०६/१३६ दि. १०.०५.०७ रोजीच्या पत्रान्वये मंजूर करण्यात आलेली आहे. तथापि, बांधकाम परवानगी मंजूर घेऊन जागेवर कुठल्याही प्रकारचे बांधकाम सुरु केले नव्हते. तद्नंतर विकासकाने त्याचा सुधारीत नकाशा सादर करुन या कार्यालयाचे सुधारीत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/१४५/०६/८८८, दि. ०६.११.०९ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम परवानगी मंजूर करुन घेऊन बांधकाम सुरु केलेले आहे. |
| ७ | श्री. रमेशलाल पी. नागरांनी, श्री. अमरलाल ह. कामरा, श्री. दिपक जी. गंगवानी, श्री. सुरेशलाल जी.धामेजा, श्री. महेश उ तन्ना तर्फे कुलमुखत्याधारक श्री. रमेश पी नागरानी | यु. नं. ८६, शिट नं. ६८, कॅम्प नं.५ | उमपा/नरवि/बांप/५१/०७/१०३२, दिनांक ३०/१०/९७, ५१/०५/८२३, दि. २६/१०/२००९ | दि.२७.०७..०९ रोजी परवानगी दिली आहे.सामासिक अंतरे क्षेत्रफळ नियमावली तरतुद क्र.६.६.२.२प्रसिध्द प्रारुप नियमावली तरतुद क्र.६.६.२ अन्वये अधिकार मा.आयुक्तांना आहे.सामासिक अंतरे क्षेत्रफळ देण्याचा अधिकार मा.आयुक्तांचा आहे.यावर आयुक्तांची सही नाही. नगररचनाकार व मुख्यालय उपआयुक्तांची सही आहे.सहा महिन्यानंतर सुधारित बांधकाम परवानगी देवु शकत नाही. | यु.नं. ८६, शिट नं. ६८, उल्हासनगर–५ या जागेत विकासकाने त्यांचे वास्तुविशारदमार्फत दि. १३.०६.२००७ रोजी बांधकाम परवानगीबाबत प्रस्ताव सादर केला होता. त्याअनुषंगाने विकासकास या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/बांप/ ५१/०७/१०३२ दि. ३०.१०.२००७ रोजी बांधकाम परवानगी देण्यात आली होती. तथापि तक्रारदार यांचे म्हणण्यानुसार सामासिक अंतरामध्ये सुट देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना आहेत. असे म्हणणे आहे. परंतु विकासकाने सुधारीत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव सादर करतेवेळेस सामासिक अंतरात सुट अपेक्षिलेली नसून नियमानुसार बांधकाम परवानगीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने विकासकास या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/बांप/५१/०७/८२३ दि. २६.१०.०९ रोजीच्या पत्रान्वये श्री. रमेशलाल नागरानी व इतर यांच्या नांवे सुधारीत बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आलेली होती. तथापि, प्रत्यक्ष स्थळनिरिक्षण केले असता जागेवरील क्षेत्र सनद क्षेत्रापेक्षा जास्त असल्याने व ते सुधारीत नकाशामध्ये दर्शविण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने सदरचे नकाशे रद्बादल करुन विकासकास त्यांच्याकडे असलेल्या सनद क्षेत्रावर सामासिक अंतरात सुट विरहीत नव्याने सुधारीत नकाशे सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | नंदकुमार नेबनदास मनवानी व इतर चार | प्ला.नं. ३२२,३३३,३३४ भा, ३२९ भा, ३२३, भा, इ.न. ८२,८३, शिट नं. २९, कॅम्प नं. ३ | उमपा/नरवि/बांप/८३/०८/७४०, दिनांक ३/१०/२००९ | कंडिशनल सीडी तसेच जागेच्या संरक्षणासाठी दिली आहे.गहाण ठेवु शकत नाही.प्लान रहीवाशी वापरासाठी केला आहे.लोकानी बॅकेतुन कर्ज काढुन प्लॅट घेतल्यास नागरीकांना तसेच बॅकेचे नुकसान होणार आहे.ट्रस्टने मा.धर्मादयाआयुक्तांची मंजुरी घेणे आवश्यक होते.दि.२५.०५.०९रोजी ३२३.९० चौ.मी. जागा महापालिका व त्यांनी खोटा करार करुन सदर रस्त्यांचे रुंदीकरण झाल्याचे दाखवुन जागेचा ताबा घेतला आहे.त्यामध्ये प्लाट नं. ३२१ ,३२२व ३३१ ही त्यांची जागा नाही.तसेच रोडची सीडी दिली जात नाही.नगररचना विभागाच्या नस्तीतील सादरमध्ये ३२१,३२२ व ३३१दाखवली नाही.सीडी एकुण २०००चौ.मी. क्षेत्रफळ आहे.मंजुरी दिली ३०८१.९६चौ.मी.म्हणजे एकुण ११००चौ.मी.जादा परवानगी दिली आहे. सदर ट्रस्टची जागा आहे रहीवाशी वापरास परवानगी दिनी आहे.शिट नं.२१ साईड क्र.८३ प्राथमिक शाळेसाठी राखीव आहे.त्याचा ताबा दि.०७.०४.८७ मध्ये महापालिकेस मिळाला आहे.सदर ठिकाणचे रोडवायडिंग झाले नाही. तसे सार्वजनिक बांधकाम विभागचे पत्रक आहे. धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीशिवाय सदरहु जागा विकु शकत नाही. किंवा विकसित करता येत नाही. | प्लॉट नं. ३३२,३३३,३३४ (भा), ३२१ (भा), ३२२ (भा), ३२३ (भा), ई.नं. ८२,८३, यु.नं. १६९ (भा), शिट नं. २१, उ.नगर–३ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत श्री. मेघराजमल वा. आहुजा, श्री. मनोहर डी. नेभवानी व इतर ३ यांचे वास्तुविशारद श्री. भुषण रुपानी यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. २०.०८.०९ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने प्रस्तावाची छाननी केली असता मंजूर व प्रारुप विकास आराखडयानुसार विषयांकित जागा रहिवासी विभागात येत असुन विकासकास उपविभागीय अधिकारी यांचेकडुन नांव बदलाचा दाखला देण्यात आला असुन त्यामध्ये एकुण ३१०३.१५ चौ.मी. एवढे क्षेत्रफळ दाखविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने विकासकास या कार्यालयाचे क्र. उमपा/नरवि/बांप/८३/०८/७४० दि. ०३.१०.०९ रोजी बांधकाम परवानगी. देण्यात आली आहे. १) सदर जागेची सनद राधा स्वामी सत्संग यांच्या नावे असून नाव बदलाचा दाखला खाजगी असल्याने विकासकाच्या नावे नकाशा मंजूर करण्यात आलेला आहे. २) बांधकाम परवानगी देतेवेळेस विकासकामे ट्रस्टबाबतचे कोणतेही कागदपत्र उपलब्ध करुन दिलेले नाहीत. ३) भविष्यामध्ये सदर ठिकाणच्या रस्त्याचे रस्तारुंदीकरण होणार असेल त्यादृष्टीकोनातून जागा बाधीत होत असेल तर रस्त्यात बाधीत होणारी जागा सोडून बांधकाम परवानगी देण्यात येते. व त्याचा ताबा मनपास दिला आहे किंवा नाही याचा खुलासा मालमत्ता विभागाकडून घेण्यात येईल. व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करणे उचित होईल. तसेच बाधीत होणाऱ्या जागेचा चटई क्षेत्र निर्देशांक विकासकास देण्याबाबतची तरतुद आहे. ४) रस्त्याची सनद दिली जात नाही हा विषय या कार्यालयाशी संबंधीत नाही. |
| | | | | | ५) शिट क्र. २१ आरक्षणाची बाब सुयुक्तीक वाटत नाही. ६) धर्मदाय आयुक्त यांची परवानगी घेण्यात आली नाही या संबधांत उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर या कार्यालयाने नावात बदल करतेवेळेस धर्मदाय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक होते. ती या विभागाशी संबंधीत नाही. |
| ९ | श्री. दिलीप श्यामसिंग चंचलानी मार्फत मधु गे. आचरा | ब्लॉक नं. सी–२१, रुम नं. ८१,८२,८३शिट नं. ५०, उल्हासनगर–३ | उमपा/नरवि/बांप/१५०/०७/०६५४, दिनांक ९/३/२००९ | ब्लॉक नं. सी–२१, रुम नं. ८१ पुर्ण व रुम नं. ८२ च्या अर्ध्या भागावर संताषी निवास नावाचा टकेडीवर बंगला बांधण्यात आलेला आहे, तेथे जागेपेक्षा अधिक चटईक्षेत्र मंजुर करण्यात आले आहे. ज्या जागेवर बांधकाम करण्यात येत आहे, त्यामध्ये ते क्षेत्र व विनिर्दिष्ट केलेले ठिकाण नाही. | ब्लॉक नं. सी–२१, रुम नं. ८१ (भा), ८२,८३, इ. नं. ४४, शिट नं. ५०, उ. नगर–३ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत श्री. मधु के. आचरा (कुलमुखत्यार) यांचे वास्तुविशारद श्री. बुलचंद सोनेसर यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. ०१.१२.०७ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. जागेचे क्षेत्र ३५८.९० चौ. मी. होते. विकासकाकडे सदर जागेच्या ३ सनदा असुन त्याचे क्षेत्रफळ ३५८. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | ९० चौ.मी. होते. त्यापैकी उपविभागीय अधिकारी कार्यालयाने २ सनदेची पडताळणी करुन दिलेली आहे. तसेच एका सनद पडताळणी प्रकरणी सनद ऐवजी रुम नं. ८१ भाग चा उतारा सादर केला आहे. तसेच त्याबाबत नाव बदलाचा दाखला दिला असून त्यात क्षेत्राचा उल्लेख केलेला आहे. तसेच नांव बदल्याच्या दाखल्याची पडताळणी करुन घेतलेली आहे. त्या अनुषंगाने प्रस्तावाची छाननी केली असता मंजूर व प्रारुप विकास आराखडयानुसार विषयांकित जागा रहिवासी विभागात येत असुन सदर विकासकास या कार्यालयाचे क्र. उमपा/ नरवि/बांप/१५०/ ०७/६५४, दि. ०९.०३.०९ रोजी बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे जादा चटई क्षेत्र देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. |
| १० | श्री. सुरेश आर. मुलचंदानी मे. शेरावाली बिल्डर्स | ब्लॉक नं. सी.९, रुम नं. ३६, ब्लॉक सी १०, रुम नं. ३७,प्लाट नं. ८०, शिट नं. ५०, उल्हासनगर—३ | उमपा/नरवि/बांप/७४/२००८ /५०६, दिनांक २२/१/२००९ | ब्लॉक नं. सी.९, रुम नं. ३६, ब्लॉक सी १०, ३६ यांचे सुध्दा बाजुच्या जागेवर देवीभवानी इमारत बनविली आहे. आपल्या लोकांनी त्यांना ८०० मीटरचा एफएसआय दिलेला आहे आणि नंतर १०० मिटरची साईड मार्जीन दिलेली आहे. याप्रकरणामध्ये सीडी व्हेरीफिकेशन झालेले नाही. सीड पडताळणी करता येत नाही असे त्यांनी लिहिले आहे. | ब्लॉक नं. सी—९,१० रुम नं. ३६, ३७ (भा), शिट नं. ५०, उ.नगर—३ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत मे. शेरावाली बिल्डर्स तर्फे श्री. सुरेश के. मुलचंदानी यांचे वास्तुविशारद श्री. अनुपसिंग सोधी यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. ३०. ०८.०८ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. जागेचे क्षेत्र ५८५.४५ चौ.मी. होते. विकासकाकडे सदर जागेची सनद असुन उपविभागीय अधिकारी कार्यालयाने सनदेची पडताळणी करुन दिलेली आहे. तसेच नांव बदल्याच्या दाखल्याची पडताळणी करुन घेतलेली आहे. त्या व्यतिरिक्त जीनाचे क्षेत्र तसेच मा. आयुक्त यांनी उजव्या, डाव्या व मागील बाजूच्या सामासिक अतंरात मा. आयुक्त यांनी सुट देण्यात आली असून जीनाचे क्षेत्र १२१. २९ चौ.मी. चे प्रिमियम भरुन बांधकाम नकाशे मंजूर करण्यात आलेले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | श्री. राम एस निकम व श्रीम. रत्नमाला आर निकम | यु.नं. ७९, चालता नं. १५४, शिट नं. २२, लाल चक्की, उल्हासनगर —४ | सुधारीत बांधकाम नकाशा उमपा/नरवि/बांप/६४/०७/४९५, दिनांक १७/८/२००९ | प्लॉन नं.६४/०७/४९५, दिनांक १७/८/२००९ हा सुध्दा ४० फुट डिपी रोडवर आपण प्लान मंजुर केला आहे. | महराष्ट्र शासनाने आदेशित केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये बांधकामे नियमाधीन करण्याचे कार्यवाही सुरु आहे. सबंधीत मिळकतधारकास मा. पदनिर्देशित प्राधिकारी यांनी नमुना ड मधील प्रमाणपत्र अदा करण्यात आली आहेत. 'ड' प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्यानंतर विकासकाने वास्तुविशारदमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव सादर केला आहे. तथापि विषयांकित जाागा ही मंजूर विकास आराखडयानुसार ४० फुट रस्त्याने बाधीत होत आहे. तसेच प्रारुप विकास योजनेमध्ये सदरचा रस्ता वगळून सदरची जागा रहिवासी वापरात समाविष्ट केलेली आहे. मात्र महाराष्ट्र शासनाच्या दि. १४.०१.२००६ रोजीच्या अध्यादेशानुसार त्यातील नियम (४) मधील पोट नियम (२) (९) च्या तरतुदीनुसार दंड भरुन सदर जागेवरील अनधिकृत बांधकाम नियमित करुन घेतले आहे. सदरचे बांधकाम जुने असल्याने विकासक ते निष्कासित करुन नव्याने बांधकामाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर जागेची सनद विकासक यांच्या नावे देण्यात आलेली आहे. मंजुर विकास आराखडयानुसार ४० फुट विकास रस्ता हा जागेवर अस्तित्वात नसून रस्त्यावर अनेक बांधकामे आहेत. व भविष्यात सुदधा हा रस्ता विकसित होणे शक्य नाही. त्यामुळे प्रारुप विकास योजनेमध्ये हा रस्ता वगळून त्यांच्या शेजारी अस्तित्वात असलेला ४० फुट रुंद रस्त्यालाच ६० फुट रुंद करण्यात आलेले आहे. |
| | | | | | तसेच महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. टिपीएस—१२०७/३८७/प्र. क्र.२४/०८/नवि—१२, नगर विकास विभाग यांचे दि. ३०. ०१.२००८ च्या पत्रान्वये अनधिकृत बांधकाम नियमाधीन झालेल्या विषयांकित जागेचा पुर्नविकास इतर कोणत्याही नियमात सवलत न देण्याच्या अटीच्या अधीन राहून १ चटई क्षेत्र निर्देशांक मर्यादित करण्याच्या संदर्भाधिन प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही. त्या अनुषेंगाने विकासकास बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. |
| १२ | प्राध्यापक शहिर दुनिचंद तेलनदास कालानी मेमोरियल ट्रस्ट | मंजुर विकास आराखडयातील आरक्षण साईट क्र. ५७, शिट नं. ७५, उल्हासनगर—१ | उमपा/नरवि/बांप/१६२/७९/८०, दिनांक | सदरहु इमारत व जागा महापालिका निहित असून वाढीव बांधकामासाठी महापालिकेच्या परवानगीवाचून संस्थेच्या प्राध्यापकास बांधकाम परवानगी देणे नियमबाहय आहे. | साईट नं. ५७, ए ब्लॉक रोड, उ.नगर—१ हया जागेवर संदर्भ पत्र क्र. १ अन्वये तळमजला + २ मजलेचे कॉलेजची बांधकाम परवानगी सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे हयांचे कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/बांप/१६५ दि. २४.०४.८० अन्वये मंजूर करण्यात आलेली होती व जागेवर मंजूर नकाशाप्रमाणे तळमजला + २ मजलेचे बांधकाम आतापर्यंत करण्यात |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | आलेले होते. तथापि या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/सा/८९/०९, दि. ०४.०१.२०१० रोजीच्या पत्रान्वये शहीद दुनीचंद तेजनदास कलानी मेमोरीयल ट्रस्ट यांच्या नावाने तिसऱ्या मजल्यावर देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीच्या प्रस्तावामध्ये पुरेशी कागदपत्रे नसल्याने तसेच सदरची मिळकत महानगरपालिकेची असून आपल्यासोबत केलेले करारनामे या महानगरपालिकेस अप्राप्त आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी दिलेली बांधकाम परवानगी दि. २२.०२.२०१० रोजीच्या पत्रान्वये रद्द करण्यात आलेली आहे. |

*श्री. सी.पी. सिंग सहा. संचालक, नगररचना यांचे अहवाल*

नगर रचनाकार हयांनी एकूण १२ प्रस्तावांची छाननी करुन अहवाल सादर केलेला आहे. त्या अहवालावर माझा अहवाल खालील प्रमाणे आहे.

**प्रकरण क्र. १:–** श्री. जयप्रकाश पारुमल छाबडिया व इतर
यू.नं.१२,१५,१९ भाग, शिट नं.५१ ह, कॅम्प नं.४

नगर रचनाकार हयांच्या अहवालाशी सहमत आहे. ताबा पावती ७/४/८७ रोजी महानगरपालिकेला मिळालेली आहे, असे मा.नगर सेवकांचे म्हणणे आहे. तथापि जागेचा मालकी हक्क महानगरपालिकेकडे नाही. तसेच मालकी हक्काबाबतचा निर्णय राजस्व विभागाचा असतो. सनद राजस्व विभागांनी दिलेली असून तसेच ''वरवार'' यासाठी २५ टक्के गाळे किंवा जागा देण्याचा निर्णय शासनाचे १९९४ च्या आदेशात कुठेही नमूद नाही. दिलेली बांधकाम परवानगी योग्य दिसून येते.

**प्रकरण क्र. २:–** श्री. धनराज एन.बालानी
यु.न.३, शिट नं. ५१ ह, कॅम्प नं.३.

नगर रचनाकार हयांनी दिलेल्या अहवालाशी मी सहमत आहे. बांधकाम परवानगी योग्य प्रकारे दिलेली असल्याचे दिसते.

**प्रकरण क्र. ३:–** श्रीमती. प्रेमीबाई टोपदास चंचलानी
यु.न.१६, शिट नं. ४८, कॅम्प नं.३.

नगर रचनाकारांनी दिलेली बांधकाम परवानगी योग्य असल्याचे दिसून येते.

**प्रकरण क्र. ४:–** हिन्दुस्तान पेन्सिल फॅक्टरी प्राय. लि.
प्लॉट नं.२९, सेक्शन ३, शिट नं.७, कॅम्प नं.४.

शासनानी जी सदन त्यांचे दि. १२/३/१९८५ चे आदेश क्रमांक ४३ (ए) () अन्वये जी अटी व शर्ती दिलेली आहे. त्यात मा. नगर सेवकांचे म्हणण्याप्रमाणे अटी व शर्ती नाही. नगर रचनाकारांनी दिलेल्या अहवालाशी मी सहमत आहे.

**प्रकरण क्र. ५:–** अशोक एस. आडकानी
बॅरेक क्रमांक १९९३, रुम नं.१ व २, शिट नं.७६, कॅम्प नं.५.

नगर रचनाकारानी दिलेल्या अहवाल योग्य आहे. नव्याने नकाशे सादर करण्यास सूचना दिलेलया आहे. तसेच नगररचनाकार हयांनी संबधीतांवर योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

**प्रकरण क्र. ६:–** श्री. रमेशलाल गिधनामल डिंगरिया व इतर
बॅरेक नं. १९९३ समोर, चालता नं. ५०४,५०९ ह, शिट नं. ७६, कॅम्प नं.३.

नगर रचनाकार हयांनी दिलेली बांधकाम परवानगी योग्य असून दिलेल्या बांधकाम पूर्णतेचा दाखला सुध्दा योग्य आहे.

**प्रकरण क्र.** ७:— श्री. रमेशलाल पी. नागरानी व इतर,

यू.नं. ८६, शिट नं. ६८, कॅम्प नं.५

नगर रचयनाकार हयांनी दिलेला अहवाल योग्य असल्याचे दिसून येते. तथापी नगर रचनाकार यांचे अहवालाप्रमाणे जागेवरील क्षेत्र सनदाप्रमाणे जास्त असल्याचे स्थळ निरीक्षणाचे वेळेस निर्देशनास आल्याने सदरचे नकाशे रदद् बादल करुन सुधारीत नकाशे सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

**प्रकरण क्र.** ८:— श्री. नंदकुमार नेघनदास मनवानी व इतर चार

प्लॉट नं. ३२२,३३३,३३४ भाग, ३२९ भाग ३२३ भाग

यु.नं.८२,८३, शिट नं.२९, कॅम्प नं.३.

नगर रचनाकार हयांनी दिलेल्या अहवालाशी सहमत आहे. शिवाय घर्मदाय आयुक्त यांची परवानगी नांव बदल करतेवेळेस देण्यात आलेली आहे किंवा नाही हा मुदद्ा उपविभागीय अधिकारी हयांनी सनद देतेवेळेस तपासणे आवश्यक आहे. तथापी नांव बदल झाल्यानंतर बांधकाम परवानगी देण्यांत आलेली योग्य आहे असे दिसून येते.

**प्रकरण क्र.** ९:— श्री. दिलीप श्यामसिंग चंचलानी

ब्लॉक नं. सी. ३१, रुम नं. ८१,८२,८३, शिट नं. ५०, उल्हासनगर—४.

नगर रचनाकार हयांनी दिलेला अहवाल योग्य असून त्या अहवालाशी सहमत आहे.

**प्रकरण क्र.** १०:— श्री. सुरेश आर. मुलचंदानी,

ब्लॉक नं. सी.९, रुम नं. ३६,

ब्लॉक सी.१०, रुम नं.३७, प्लॉट नं. ८०, शिट नं. ५०, उल्हासनगर—३.

नगर रचनाकार हयांनी दिलेल्या अहवालाशी सहमत आहे.

**प्रकरण क्र.** ११:— श्री. राम एस. निकम,

यू.नं.७९, चालता नं.१५४, शिट नं.२२, लाल चक्की, उल्हासनगर—४.

नगर रचनाकार हयांनी दिलेलया अहवालाशी सहमत आहे. अनाधिकृत बांधकाम नियमित करण्यासंदर्भात ४० फुट रोडच्या विषयासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांत आलेला होता व शाासनानी त्यांचे दि. ३१/०१/२००८ चे पत्रानुसार प्रस्ताव नियमांकित करण्याच्या कळविले होते. त्या अनुषंगाने प्रस्ताव नियीमत करण्यात आलेला होता व त्यानंतर बांधकाम जूने असल्याने नवीन बांधकामाला मंजूरी देण्यात आलेली होती.

**प्रकरण क्र.** १२:— प्राध्यापक शहिद दुनिचंद तेलनदास कालानी मेमोरियल ट्रस्ट

आरक्षण क्रमांक ५७, शिट नं.७५, उल्हासगनर—१.

उल्हासगनर महानगरपालिका यांच्या दि.२४/४/२०१० चे पत्रानुसार बांधकाम परवानगी (तळ २ मजला) देण्यांत आलेली होती. तसेच दि. ४/१/२०१० रोजी नगर रचनाकार हयांनी तिसऱ्या मजल्यावरील परवानगी देण्यांत आलेली होती. तथापी सदर मिळकत महानगरपालिकेची असून, महानगरपालिका सोबत केलेले करारनामे अप्राप्त असून दिलेली बांधकाम परवानगी दि. २२/२/२०१० रोजी नगर रचनाकार हयांनी रदद् केलेली आहे.

वरील सर्व प्रकरणे नगररचनाकार हयांनी दिलेल्या बांधकाम परवानगीच्या संबधांत तपासले असता वरील प्रमाणे शेरे दिलेले आहेत. तथापी अजून बांधकाम परवानगी तपासणीच्या मुद्यावर मा. नगरसेवक हयांची मागणी असल्यास प्रकरणे योग्य ती पुनश्च तपासणीसाठी मा. उपसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबइ हयांचेकडे पाठविता येईल.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४० अ — <u>दिनांक:—२०/१०/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या १२ विवादित बांधकाम परवानगींबाबतचा अहवाल पुढच्या सभेत घेण्याप्रयोजनार्थ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :—** उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी/कर्मचा-या संबधी सेवा भरती नियमांस अतिम मंजुरी देणे.

---

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u>यावर आमचे संशोधन आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>सचिव साहेब, सन्माननिय सदस्य ही जी पत्र देत आहेत ती कसली आहेत?

<u>महापालिका सचिव :—</u>सेवाभरती विषयक नियमामध्ये काही सुधारणा सुचविल्या आहेत.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>काय झाले? सुधारणा काय?

<u>महापालिका सचिव :—</u>काही सन्माननिय सदस्यांनी या नियमामध्ये दुरुस्ती करण्याविषयीच्या लेखी सूचना दिल्या आहेत. आणखी कुणाला काही सूचना दयायच्या आहेत काय? मा. महापौरांच्या माध्यमातून माझ्याकडे ज्या सूचना आल्या आहेत त्या एक एक करुन मी वाचुन दाखवितो.

श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांच्याकडुन सूचना आली आहे की, इरिगेशन ॲण्ड पॉवर डिपार्टमेंटचे शासन निर्णय क्र. १०६२ इआर, दिनांक १९/१२/१९७० तसेच याच क्रमांकाचे शासन निर्णयानुसार दिनांक २०/१/१९६२ त्यानुसार जी शैक्षणिक पात्रता आहे ती ठेवायची आहे.

श्री. लाल पंजाबी व श्री. जीवन इदनानी यांच्याकडुन ज्या सूचना आलेल्या आहेत त्यानुसार उपलेखापाल, कनिष्ठ लेखा परिक्षक, मुख्य लिपिक, अभिलेखापाल, अधिक्षक, चौकशी अधिकारी, सादरकर्ता अधिकारी, खरेदी अधिकारी, भांडार अधिकारी या पदावर पदोन्नतीसाठी त्यांनी शैक्षणिक अर्हता निश्चित केली आहे, पदवीधर, कनिष्ठ लिपिक किंवा वरीष्ठ लिपिक किंवा तत्सम पदावरील १२ वर्षाचा अनुभव, एलएसजीडी व एलजीएस परिक्षा उत्तीर्ण. व पदोन्नतीने अतिरिक्त आयुक्त पदासाठी जी अर्हता दर्शविली आहे त्यासाठी मान्यता प्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता, मान्यता प्राप्त विदयापिठाच्या विधी शाखेचा पदवीधर, महापालिका सचिव, मुख्य लेखा अधिकारी, उप—मुख्य लेखा अधिकारी, सहा. आयुक्त, या पदावरील सलग १२ वर्षाचा अनुभव व वैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदावर पदोन्नतीसाठी जी अर्हता दर्शविली आहे त्यासाठी महापालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी पदाचा १० वर्षाचा अनुभव.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>मा. महापौर महोदया, वैद्यकीय आरोग्य अधिकारी हा एमडी असला पाहिजे, हे जरा लक्षात घ्या.

<u>महापालिका सचिव :—</u>एमडी असला पाहिजे?

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>नुसता अनुभव असुन चालणार नाही.

<u>महापालिका सचिव :—</u>हे मान्य करण्यासाठी सर्वांना विचारावे लागेल. व श्री. जीवन इदनानी यांची दुसरी सूचना आहे. कार्यकारी अभियंता या पदासाठी संबंधित शाखेचा पदवीधारक व उप—अभियंता पदाचा पाच वर्षाचा अनुभव किंवा संबंधीत शाखेचा पदविकाधारक व उप अभियंता पदाचा ७ वर्षाचा अनुभव किंवा कनिष्ठ अभियंता या पदाचा २४ वर्षाचा अनुभव तसेच उप अभियंता या पदासाठी अर्हता संबंधीत शाखेचा पदवीधारक व कनिष्ठ अभियंता पदाचा ७ वर्षाचा अनुभव किंवा संबंधित शाखेचा पदविकाधारक व कनिष्ठ अभियंता पदाचा १२ वर्षाचा अनुभव. हे सर्व सर्वांना मान्य आहे का? श्री. दिलीप गायकवाड यांचे म्हणणे होते की, वैद्यकीय आरोग्य अधिकारी पदासाठी एमडी पाहिजे.................... एमडी नको आहे? श्री. दिलीप गायकवाड हे त्यांची या बाबतची सूचना मागे घेत आहेत. ठिक आहे? सर्वसंमतीने?

यावेळी श्री. दिलीप गायकवाड यांनी इशारा करुन सांगितले की मी माझी सूचना मागे घेत आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>श्री. दिलीप गायकवाड साहेब, सूचना मागे घेतली काय?

<u>महापालिका सचिव :—</u>प्रशासनाकडुन आपणाकडे जे नियम आले आहेत. त्यामध्ये काही ठिकाणी त्यांनी नविन पदे निर्माण करण्यासाठी सूचना दिली आहे. ते शासनाच्या संवर्गानुसार आपणांस अनुज्ञेय नाहीत. त्याबाबतीत आपण काय निर्णय घेत आहात ते सांगा. अतिरिक्त पदे निर्माण करायची आहेत काय? जसे की सहा. जनसंपर्क अधिकारी.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>शासनाच्या मार्गदर्शक सूचना नसतील तर आपण कसे करु शकता?

<u>महापालिका सचिव :—</u>नाही करायचे ना?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>नाही, नाही करायचे.

<u>महापालिका सचिव :—</u>शासनाचे जे संवर्ग आहेत त्यानुसारच करायचे आहे ना? ठिक आहे? मंजुर? बाकी प्रशासनाने ज्या शिफारसी केल्या आहेत त्या सर्व मान्य? ठिक आहे?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ७:—** उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी/कर्मचा-या संबधी सेवा भरती नियमांस अतिम मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

शासनाकडील क्र. ठामपा २००२/८२१/प्र.क्र.८६/ नवि—२३, दिनांक जुलै, २००८ रोजी प्राप्त झालेल्या परीपत्रका सोबत मॉडेल सेवा प्रवेश नियमावर आधारीत उल्हासनगर महापालिकेने प्रारूप सेवा प्रवेश नियम (२००८) तयार केले आहेत. मा. महासभा ठराव क्र. २२, दिनांक २०/०७/२००९ अन्वये त्यास मंजूरी दिलेली आहे.

शासन परीपत्रकामध्ये नमुद केलेप्रमाणे सदरचे प्रारूप सेवा प्रवेश नियम (२००८) शासकीय राजपत्रामध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन—संकीर्ण, गुरूवार ते बुधवार, सप्टेंबर ३—९, २००९/भाद्र १२—१८, शके १९३१ अन्वये प्रसिध्द करून २ महिन्यांच्या कालावधीमध्ये त्यावर हरकती व सुचना मागविणेत आलेल्या होत्या. विहित कालावधीमध्ये एकूण १७ अर्ज प्राप्त झालेले होते.

प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांबाबत अर्जदाराना सुनावणी देणेबाबत कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/ आस्था/ मुली/ ८४२ /१०, दिनांक १३/०१/२००९ अन्वये उप आयुक्त (परिवहन) यांचे अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे छाननी समिती स्थापन करण्यात आली होती.

१) उप आयुक्त (परिवहन) — मा. आयुक्त यांचे प्रतिनिधी व समितचे अध्यक्ष
२) उप आयुक्त (मुख्यालय) — सदस्य

३) उप आयुक्त (आरोग्य) — सदस्य
४) मुख्य लेखा परिक्षक — सदस्य
५) कार्यकारी अभियंता (सा.बा.वि.) — सदस्य

उपरोक्त समितीची बैठक मा. उप आयुक्त (परिवहन) यांचे अध्यक्षतेखाली दि. १५/०१/२०१० रोजी दुपारी १.०० वाजता त्यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

१) श्री. संतोष देहेरकर
उप आयुक्त (परिवहन — मा.आयुक्त यांचे प्रतिनिधी तथा समिती अध्यक्ष

२) श्री. विजयकुमार म्हसाळ
उप आयुक्त (मुख्यालय) — सदस्य सचिव

३) श्रीम. संगिता धायगुडे
उप आयुक्त (आरोग्य) — सदस्य

४) श्री. अनुदीप दिघे
मुख्य लेखा परिक्षक — सदस्य

५) श्री. रमेश शिर्के, प्र. कार्य. अभियंता — सदस्य
मागासवर्गीय अधिकारी

हरकती/सुचना दाखल केलेल्या संबंधीत अर्जदार अधिकारी/कर्मचारी व कामगार संघटनेचे प्रतिनिधी यांना दिनांक १५/०१/२०१० रोजी सुनावणीसाठी उपस्थितीत रहाणेबाबत कळविले होते. त्याप्रमाणे एकूण सर्व १७ अर्जदार दिनांक १५/०१/२०१० रोजीच्या सुनावणीस उपस्थित होते. उपस्थित अर्जदारानी नमुद केलेल्या हरकती व सुचनांचे स्वरूप सर्व समिती सदस्यांनी चर्चा व विचारविनीमय करून अर्जदाराकडून समजावुन घेतले.

दिनांक १५/०१/२०१० रोजी छाननी समितीच्या आयोजित केलेल्या बैठकीमध्ये प्रारूप सेवा प्रवेश नियम (२००८) संबंधी प्राप्त झालेल्या हरकती/सुचनाबाबत संबंधीत अर्जदार अधिकारी/कर्मचारी व कामगार संघटनेचे प्रतिनिधी यांनी उपस्थितीत राहुन प्रारूप सेवा प्रवेश नियमामधील तरतुदीबाबत उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत दि. ३१/५/२०१० व २/६/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता छाननी समितीच्या बैठकीमध्ये सर्व संबंधीत सदस्यांमध्ये चर्चा व विचारविनीमय करून प्रारूप सेवा प्रवेश नियमावलीमध्ये आवश्यकतेप्रमाणे योग्यते फेरबदल/दुरूस्ती योग्य त्या कारणास्तव करण्यात आलेले आहेत. (इतिवृत्तची प्रत सोबत जोडली आहे) प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांच्या आधारे अर्जदाराचे नांव हरकती/सूचनांचे स्वरूप प्रारूप सेवा प्रवेश नियम (२००८) मध्ये प्रसिध्द केलेले मुद्दे आणि त्यावर अभिप्राय इत्यादी माहिती दर्शविणारा अहवाल तसेच त्या आधारे उप आयुक्त (परिवहन) यांच्या अध्यक्षतेखाली छाननी समितीने प्रारूप सेवा प्रवेश नियम (२००८) मध्ये सुचविलेली दुरूस्ती व फेरबदल अंतिम सेवा प्रवेश (२००८) मध्ये समाविष्ठ करणेबाबत मा. महासभेची मंजूरीसाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४१ <u>दिनांक:—२०/१०/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

ही महासभा उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी/ कर्मचा—यांसंबंधी प्रसिध्द करण्यांत आलेल्या प्रारुप सेवा भरती नियम २००८ मध्ये खालील फेरबदलांचा व दुरुस्तीचा समावेश करुन शासनाच्या मंजुरीस अधिन राहून अंतिम मान्यता देत आहे.

| अतिरिक्त आयुक्त पदावर नियुक्ती केवळ पदोन्नतीने केली जाईल व त्यासाठी नेमणूकीची अर्हता खालीलप्रमाणे असेल. | | | |
|---|---|---|---|
| अ. | पदनाम | नेमणूकीची | नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |

| क्र. | | पध्दत | |
|---|---|---|---|
| १. | अतिरिक्त आयुक्त | पदोन्नतीने | अ) मान्यता प्राप्त विदयापीठाच्या कोणत्याही शाखेचा पदवीधारक किंवा समकक्ष अर्हता<br>ब) मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या विधी शाखेचा पदवीधारक<br>क) महापालिकेच्या आस्थापनेवरील (महापालिका सचिव, मुख्य लेखा अधिकारी, उप–मुख्य लेखा अधिकारी, उप–आयुक्त, सहा. आयुक्त या पदावरील सलग १२ वर्षाचा अनुभव |
| **वैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूकीची अर्हता––** | | | |
| २. | वैद्यकीय आरोग्य अधिकारी | पदोन्नतीने | २. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी पदाचा १० वर्षाचा अनुभव |
| **कार्यकारी– अभियंता (स्थापत्य/विद्युत) या पदासाठी पदोन्नतीची अर्हता––** | | | |
| ३. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य/विद्युत) | पदोन्नतीने | संबंधित शाखेचा पदवीधारक व उप–अभियंता पदाचा पाच वर्षाचा अनुभव<br>किंवा<br>संबंधीत शाखेचा पदविकाधारक व उप अभियंता पदाचा ७ वर्षाचा अनुभव<br>किंवा<br>कनिष्ठ अभियंता या पदाचा २४ वर्षाचा अनुभव |
| **उप– अभियंता (स्थापत्य/विद्युत) या पदासाठी पदोन्नतीची अर्हता––** | | | |
| ४. | उप– अभियंता (स्थापत्य/विद्युत) | पदोन्नतीने | संबंधीत शाखेचा पदवीधारक व कनिष्ठ अभियंता पदाचा ७ वर्षाचा अनुभव<br>किंवा<br>संबंधित शाखेचा पदविकाधारक व कनिष्ठ अभियंता पदाचा १२ वर्षाचा अनुभव |
| **उप–लेखापाल, कनिष्ठ लेखा परिक्षक, मुख्य लिपिक, अभिलेखापाल, अधिक्षक, चौकशी अधिकारी, सादरकर्ता अधिकारी, खरेदी अधिकारी, भांडार अधिकारी या पदांसाठी पदोन्नतीची अर्हता** | | | |
| ५. | उप–लेखापाल, कनिष्ठ लेखा परिक्षक, मुख्य लिपिक, अभिलेखापाल, अधिक्षक, चौकशी अधिकारी, सादरकर्ता अधिकारी, खरेदी अधिकारी, भांडार अधिकारी | पदोन्नतीने | १) कोणत्याही शाखेचा पदवीधारक<br>२) वरिष्ठ लिपिक<br>किंवा<br>कनिष्ठ लिपिक किंवा तत्सम पदावरील १२ वर्षाच्या सेवेचा अनुभव<br>३) एलएसजीडी व एलजीएस परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक |

महानगरपालिका अधिका–यांची व कर्मचा–यांची संख्या, पदनामे, श्रेणी इत्यादी प्रयोजनार्थ महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिकांचे वर्गीकरण आणि त्या आधारे महापालिका सेवांची तीन सेवेत विभागणी करुन ३८ अधिका–यांच्या पदांसाठी आकृतिबंध निश्चिती बाबतचा शासन निर्णय क्र. संकिर्ण–१००५/वर्गीकरण/प्र.क्र. ३७९/०५/नवि–२४, दिनांक ४ मे २००६ लागु राहील त्यामुळे अतिरिक्त आयुक्त पद वगळता इतर कोणतेही नविन पद निर्माण करता कामा नये.

सेवा प्रवेश २००८ अंतिम करण्याप्रयोजनार्थ १७ हरकती व सूचना निकाली काढण्यात येत आहेत.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ८ :— पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापालिका सचिव :—नाही पास कसले? तुमच्या समोर काही आलेलेच नाही. प्रशासनाकडुन एक पत्र आले आहे की आम्ही त्याबाबत तयारी करत आहोत. आता हा विषय वगळा.

काही सदस्य :—वगळा, वगळा. विषय संपले.

महापालिका सचिव :—नाही आता अशासकिय प्रस्ताव आहे ना?

सदस्य श्री. लाल पंजाबी :—हा जो पदोन्नतीचा विषय आहे, आम्ही १० मार्च रोजी या सभागृहात एक ठराव सर्वानुमते पारीत केला होता. जे काही पात्र कर्मचारी आहेत त्यांचा विषय एप्रिल महिन्यात आणला जावा. आता आम्ही जी सेवा भरती विषयक नियमावली पारीत केली आहे त्यानुसार जे पदोन्नतीस पात्र आहेत त्यानुसार पुढील महिन्यात पदोन्नतीचा ठराव आणला जावा. आपणांस आठवत असेल की, १० मार्चला आपण एक ठराव पारित केला होता की बाकी जे पदोन्नतीस पात्र कर्मचारी आहेत, त्यांना पदोन्नती देण्याचा आमचा आग्रह आहे की पात्र कर्मचा—यांना पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पुढील महासभेत आला पाहिजे.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सन्माननिय महापौर, उप—महापौरजी, पदोन्नतीबाबत सांगु इच्छितो की, आपले सेवा भरती नियम महासभेने अंतिम केले नव्हते. त्यामुळे आपण पदोन्नती समीतीची बैठक लावलेली नव्हती. पदोन्नती समितीची आता बैठक लावु व आता आपण ज्या काही सूचना केलेल्या आहेत, काही बदल करण्याचे आपण सुचविले आहेत. हे तपासुन घेणे या कामी थोडासा वेळ लागेल. त्याप्रमाणे पुढील महिन्यात दिवाळीच्या परत सुट्टयाही आलेल्या आहेत त्यामुळे नोव्हेंबर ऐवजी डिसेंबरमध्ये जेव्हा सभा लागेल तेव्हा आम्ही कार्यवाही करु.

सदस्य श्री. लाल पंजाबी :—मागील वेळेस आपण प्रस्ताव ठेवला होता.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—परंतु त्यामध्ये काही बदल झाले होते. त्यामुळे ते तपासून घ्यावे लागेल यासाठी नोव्हेंबरच्या ऐवजी डिसेंबर महिन्याच्या सभेत आम्ही प्रस्ताव आणु.

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, डिसेंबर महिन्यापर्यंत पात्र कर्मचा—यांना पदोन्नती झाली पाहिजे.

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ८:—** पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील विविध संवर्गाच्या रिक्त पदावर पदोन्नती देण्यासाठी मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) मधील तरतुदीन्वये दिनांक १२/१/२०१० रोजीच्या आदेशान्वये पुढीलप्रमाणे विभागीय पदोन्नती समिती गठित केलेली आहे.

१) उप आयुक्त (परिवहन) — मा. आयुक्त यांचे प्रतिनिधी तथा समिती अध्यक्ष

२) उप आयुक्त (मुख्यालय) — सदस्य सचिव

३) उप आयुक्त (आरोग्य) — सदस्य

४) मुख्य लेखा परिक्षक — सदस्य

५) मागासवर्गीय अधिकारी — सदस्य

(अधिक्षक किंवा त्यापेक्षा उच्च पदावरील)

उपरोक्त समितीची बैठक मा. उप आयुक्त (परिवहन) यांचे अध्यक्षतेखाली दि. ११/८/२०१० रोजी दुपारी ४.०० वाजता त्यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

१) श्री. संतोष देहेरकर — मा.आयुक्त यांचे प्रतिनिधी तथा समिती अध्यक्ष
उप आयुक्त (परिवहन)

२) श्री. विजयकुमार म्हसाळ
उप आयुक्त (मुख्यालय) — सदस्य सचिव

३) श्रीम. संगिता धायगुडे
उप आयुक्त (आरोग्य) — सदस्य

४) श्री. वि. वै. चव्हाण
मुख्य लेखा परिक्षक — सदस्य

५) श्री. रमेश शिर्के, प्र. कार्य. अभियंता
मागासवर्गीय अधिकारी — सदस्य

शासनाकडील क्र. ठामपा २००२/८२१/प्र.क्र.८६/नवि—२३, दिनांक जुलै, २००८ रोजी प्राप्त झालेल्या परीपत्रका सोबत मॉडेल सेवा प्रवेश नियमावर आधारीत महापालिकेने प्रारूप सेवा प्रवेश नियम (२००८) तयार केले असुन प्रारूप नियम (२००८) प्रसिध्द करण्याबाबत मा. महासभा ठराव क्र. २२, दिनांक २०/०७/२००९ अन्वये त्यास मंजूरी दिलेली आहे.

शासन परीपत्रकामध्ये नमुद केलेप्रमाणे सदरचे प्रारूप सेवा प्रवेश नियम (२००८) शासकीय राजपत्रामध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन—संकीर्ण, गुरूवार ते बुधवार, सप्टेंबर ३—९, २००९/भाद्र १२—१८, शके १९३१ अन्वये प्रसिध्द करून २ महिन्यांच्या कालावधीमध्ये त्यावर हरकती व सुचना मागविणेत आलेल्या होत्या. विहित कालावधीमध्ये एकूण १७ अर्ज प्राप्त झालेले होते. प्राप्त अर्जाबाबत सुणावणी झालेली असुन अंतिम सेवा प्रवेश नियमांना मा. महासभा उल्हासनगर महानगरपालिका यांचेकडे मंजूरीसाठी सादर केलेले आहे. सेवाप्रवेश नियमावली मंजुरीची प्रक्रिया सुरू असतांना पदोन्नती मागील सेवाप्रवेश नियमान्वये देणे योग्य होणार नाही. सदरचे सेवाप्रवेश नियमास मा. महासभेने मान्यता दिल्यानंतर शासन मंजूरीच्या अधिन राहुन महापालिका आस्थापनेवर अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती निवड समितीने सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. निवड समितीचा प्रस्ताव मा. महासभा पटलावर मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४१ अ <u>दिनांक:—२०/१०/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती रजनी महाडिक

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे महापालिका आस्थापनेवरील पात्र अधिकारी/कर्मचा—यांना पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पुढच्या सभेत घेण्याप्रयोजनार्थ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र.** ९:—डॉ. प्रकाश आमटे, डॉ. मंदा आमटे गौरव समिती, उल्हासनगर—अंबरनाथ यांना रुपये १,००,०००/— इतकी आर्थिक मदत देणे.

---

<u>सदस्या श्रीमती पंचशिला पवार :—</u>मा. महापौर महोदया, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, बाबा आमटे यांचे चिरंजीव डॉ. प्रकाश आमटे व सुन डॉ. मंदा आमटे यांच्या गौरव समितीस एक लाख रुपये आर्थिक मदत देण्याबाबतचा जो प्रस्ताव आणलेला आहे, त्याबाबतीत सांगु इच्छिते की, हे लोक आदिवासी भागामध्ये कायम स्वरुपी राहुन काहीही न मागता आदिवासींची जी सेवा करतात, त्यासाठी महासभेने एक लाख रुपयांऐवजी जास्तीत जास्त मदत करावी अशी माझी सर्वांना विनंती आहे. धन्यवाद। दोन लाख तरी सर्वांनी मिळुन दयायला हवेत. असे मला वाटते.

<u>महापालिका सचिव :—</u>किती दयायचे? एक लाख, दोन लाख?

<u>काही सदस्य :—</u>एक लाख,.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र.** ९:—डॉ. प्रकाश आमटे, डॉ. मंदा आमटे गौरव समिती, उल्हासनगर—अंबरनाथ यांना रुपये १,००,०००/— इतकी आर्थिक मदत देणे.

<u>प्रस्तावना</u>

डॉ. प्रकाश आमटे–डॉ.मंदा आमटे गौरव समिती, उल्हासनगर–अंबरनाथ यांचेकडील पत्रान्वये सादर करण्यात येते की, दिनांक २५/९/२०१० रोजी गडचिरोली जिल्हयातील अतिदुर्गमअशा ''हेमलकसा'' येथील ''लोकबिरादरी प्रकल्पाचे'' प्रणेते ''मॅगसेसे'' व ''पदमश्री'' पुरस्काराने सन्मानित, डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मदा आमटे यांचा ''गौरव समिती उल्हासनगर–अंबरनाथ'' नागरिकांतर्फे भव्य सत्कार उल्हासनगर टाऊनहॉल येथे आयोजित करण्यात आला आहे. (सोबत पत्र जोडले आहे.)

गेली ३६ वर्षे हे दांपत्य घनदाट जंगलात राहून तेथील अदिवासींच्या उन्नतीसाठी अविश्रांत झटत आहेत. त्यांच्या कार्याची दखल राष्ट्रीय व अंतराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली आहे. व त्यांना अनेक मानसन्मान मिळाले आहेत. राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात त्यांना आणण्याचं महान कार्य आमटे दांपत्यानं केलं आहे.

सदर आमटे दांपत्याचा आर्थिक मदत देऊन यथेचित गौरव करण्यासाठी महापालिकेतर्फे २ लाखाची मांगणी केली आहे.

तरी डॉ. प्रकाश आमटे–डॉ.मंदा आमटे गौरव समिती, उल्हासनगर–अंबरनाथ यांना रू. १,००,०००/– (रू. एक लाख मात्र) इतकी रक्कम मदत देण्याबाबत मा. महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४२ <u>दिनांक:–२०/१०/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्रीमती मोना वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती ज्योती चैनानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे डॉ. प्रकाश आमटे, डॉ. मंदा आमटे गौरव समिती, उल्हासनगर–अंबरनाथ यांना रुपये १,००,०००/– इतकी आर्थिक मदत देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u>पहिली सभा समाप्त.

सांयकाळी ४.१२ वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२०/१०/२०१०

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/१०/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

७

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक २०/१०/२०१० रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

१६.महापौर —— श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

१७.उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३६ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३७ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३८ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३९ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४० | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ८ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४१ | श्री. शेखर केशव यादव |
| ९ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४२ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १० | श्री. विजय खंडु सुपाळे | ४३ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| ११ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४४ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १२ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४५ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १३ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४६ | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| १४ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४७ | श्री. किशोर जग्यासी |
| १५ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४८ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १६ | श्री. राजू जग्यासी | ४९ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५० | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १८ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५१ | श्रीमती ज्योती शाम माने |
| १९ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५२ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २० | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५३ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २१ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५४ | श्री. मोहन साधवाणी |
| २२ | श्री. लाल पंजाबी | ५५ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २३ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ५६ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २४ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ५७ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २५ | श्रीमती शकुंतला पाटील | ५८ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २६ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ५९ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २७ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६० | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २८ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६१ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| २९ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६२ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३० | श्री.एडके गणपत गोविंद | ६३ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३१ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६४ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३२ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ६५ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३३ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | ६६ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ३४ | श्रीमती पंचशिला नाना पवार | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती संगीता राजेश कंडारे, २. श्रीमती निलम प्रेमसिंग रावत, ३. श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद, ४. श्रीमती सुजाता रमेश रिझवानी, ५. श्री. राम (चार्ली) पारवानी, ६. डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी, ७. श्री. आयलानी कुमार उत्तमचंद, ८. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम, ९. श्री. भठीजा (बब्बु) संजय, १०. श्री. लालबिहारी बुझारत यादव, ११. श्री. मंगतानी सुंदर आसनदास, १२. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान, १३. श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी, १४. श्री. प्रकाश गणपत सावंत, १५. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी

श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त
४. श्रीमती संगिता धायगुडे , उप–आयुक्त
५. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
७. श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी
८. श्री. एम.जी.गिरगांवकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१०.श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
११.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१२.श्री. जी.जी. हिबारे, मुख्य स्वच्छता निरिक्षक
१३.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
१४.श्री. बबीश गंगारामानी, उप अभियंता, विदयुत

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती अमिता संखे
५. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ५.११ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u>विषय क्र. १ प्रश्नोत्तरे.............. यावेळी सांयकाळचे ५ वाजुन ११ मिनिटे झाली आहेत.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:–</u>आज या अगोदरच दोन सभा झाल्या आहेत. त्यामुळे या सभेपुढील प्रश्नोत्तराचा तास पुढील सभेत घेण्यात यावा व या सभेच्या कामकाजातुन तो वगळण्यांत यावा.

**सदस्य श्री. जीवन इदनानी :—**आमच्या महिला सदस्यांची सुध्दा हीच मागणी आहे. कारण सणासुदीचे दिवस आहेत. सर्वांना लवकर घरी जायचे आहे. त्यामुळे कृपया करुन प्रश्नोत्तराचा तास वगळुन पुढील महिन्याच्या सभेत घेण्यात यावा.

**महापौर :—**प्रश्नोत्तराचा तास वगळत आहेत. ठिक आहे? पुढीलप्रमाणे सर्वानुमते ठराव संमत करीत आहे.

---

**विषय :—** प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

**महासभा ठराव क्र. ४४ अ** — **दिनांक :—२०/१०/२०१०**

ही महासभा आज दिनांक २०/१०/२०१० रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** प्रशासनाकडुन आयत्यावेळचे विषय म्हणुन पुढील दोन प्रस्ताव प्राप्त झाले आहेत त्यास मा. महापौरांनी अनुमती दिली आहे. विषय याप्रमाणे आहेत........

**विषय १:—** विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करण्यास अंतिम मंजुरी देणे.

**विषय २ :—** उल्हासनगर स्टेशन परिसराचा ''बांधा वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्वावर विकास करण्यास मान्यता देणे.

**काही सदस्य :—**पास, पास...........

**महापौर :—**पास नाही, हे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घ्यायचे आहेत, मंजुर? कुणाची काही हरकत नाही? सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

**विषय :—** आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेणे बाबत

सूचकाचे नांव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
अनुमोदकाचे नांव :—श्री. बच्चाराम रुपचंदानी

**महासभा ठराव क्र. :— ४४ ब** — **दिनांक : २०/१०/२०१०**

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या खालील दोन विषयास आयत्यावेळचे विषय म्हणून सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

विषय १:– आयत्यावेळचा विषय

विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करण्यास अंतिम मंजुरी देणे.

विषय २ :– आयत्यावेळचा विषय

उल्हासनगर स्टेशन परिसराचा ''बांधा वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्वावर विकास करण्यास मान्यता देणे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. २ :– १) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) श्री. चंद्रकांत गुरुनाथ वायले, ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना दिनांक २३/८/२०१० पासून पूढील **सहा महिन्याकरीता मुदतवाढ** देणे.

---

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–मुदतवाढ दयायची आहे ना? ठिक आहे, पास.

सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :–मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, ..........

सदस्य श्री. मोहन साधवानी :–या कामगारांना प्रत्येक सहा महिन्यांनी मुदतवाढ दिली जाते, जर आपणाकडे पदे उपलब्ध असतील तर त्यांना कायम सेवेत सामावून का घेत नाहीत? प्रत्येक सहा महिन्यांनी त्यांना मुदतवाढ दिली जात आहे. प्रत्येक सहा महिन्यांनी पुन्हा पुन्हा यांना मुदतवाढ देण्याचे विषय येतात. जर पदे रिक्त असतील तर यांना कायमस्वरुपी पदावर सामावुन घेण्यात यावे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–मा. आयुक्त साहेब, या लोकांची आपण जमिन घेतली आहे. आणि त्यापोटी त्यांना आपण कामावर घेतले आहे. आणि प्रत्येक सहा महिन्यांनी मुदतवाढ देवुन आपण त्यांना कामावर घेत आहोत.

तर यांना कायम का करत नाहीत? काही पदे  आपल्याकडे रिक्त आहेत, तरी आपण त्यांना सहा सहा महिन्यासाठी हंगामी स्वरुपात कामावर घेत आहोत.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–सन्माननिय महापौर, उप–महापौर, व सर्व सन्माननिय सदस्य, आपण जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याच्या अनुषंगाने सांगु इच्छितो की, पाणी पुरवठा योजनेअंतर्गत जलवाहिनी टाकण्याचे जे काम हाती घेण्यात आले होते.  त्यामध्ये जे लोक बाधित होत होते, जे जमीनधारक बाधित होत होते, सात–बारा उतारानुसार ज्यांच्या मालकीच्या त्या जमिनी होत्या त्यापैकी ४ लोकांचे प्रस्ताव आपण येथे ठेवलेले आहेत.  आपल्या पाणी पुरवठा विभागाकडे काही पदे रिक्त आहेत, ही गोष्ट खरी आहे परंतु ती पदे ज्या जाती संवर्गासाठी राखीव आहेत त्या संवर्गात हे कर्मचारी मोडत नाहीत.  त्यामुळे या लोकांना आपणांस कायम सेवेत सामावुन घेता आलेले नाही.  म्हणुन आपण यांना तात्पुरत्या स्वरुपात मुदतवाढ दिली आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–अशी नेमणूक किती महिने, किती वर्षे तुम्ही करत राहाल?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–या जाती संवर्गातील पदे जेव्हा रिक्त होतील तेव्हा त्यांना सामावून घेता येईल तोपर्यंत तर आपणांस असे करावे लागेल.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–किती वर्षापासुन आपण सहा, सहा महिन्याची मुदतवाढ देत आहात? प्रत्येक सहा महिन्यानंतर यांचा विषय येत असतो. आता हे कितवे वर्ष आहे यांचे?

सदस्य श्री. सुरेश जाधव :–मा. आयुक्त साहेब, ते जे काम करत आहेत त्या पदासाठी माणसांची गरज नाही काय? असेल तर का सामावुन घेतले जात नाही? त्या कामासाठी पदे आहेत?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–प्रशासनाची अडचण मी आधीच सांगितली की ज्या संवर्गासाठी आपल्याकडे पदे राखीव आहेत त्या संवर्गातील ही मुले नसल्यामुळे त्यांना त्या पदावर सामावुन घेता येत नाही.  २००७ पासुन आपल्याकडे काही अस्थायी स्वरुपातील कर्मचारी कार्यरत आहेत.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–नाही ते काम आपण ठेकेपध्दतीने करुन घेत आहोत ना?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–नाही, ठेकेपध्दतीने नाही, आपण त्यांना सहा, सहा महिन्याची मुदतवाढ देवुन कामावर ठेवतो. सहा महिने ते लोक ठोक वेतनावर राहतात.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–त्यांना पगार कोण देतो?  ठेकेदार देतो की आपली महापालिका देते?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–ठेकेदार नाही, महापालिका त्यांना पगार देते.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–त्यांची पदे काय आहेत? हे चौघे कोणत्या स्वरुपाचे काम करतात?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–ते वेगवेगळया प्रकारची कामे करतात त्यामध्ये कोणी मजुर आहे. कोणी पाणी पुरवठा विभागामध्ये वॉलमनचे काम करतो.  अशा प्रकारची कामे आहेत.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–आपणाकडे अशी काही पदे नाहीत का की त्यांवर आपण त्या चौघांना सामावुन घेवु शकु.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–त्या संवर्गातील पदे राखीव असल्यामुळे व दुसरी पदे शिल्लक नसल्यामुळे त्यांच्यासाठी पदे रिक्त नाहीत.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–त्या कामासाठी अशी काही तरतुद नाही का की या लोकांना आपण कायम सेवेत कामावर ठेवु शकतो. अशी काही तरतूद करता येत नाही का आपणाला?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–त्या संवर्गातील पदे निर्माण करण्यासाठी प्रस्ताव तयार करावा लागेल. व तो शासनाकडे मंजुरीला पाठवावा लागेल. शासनाने मंजुरी दिल्यानंतरच आपणांस तशा प्रकारची कार्यवाही करता येईल.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–ठिक आहे, सहा सहा महिन्यासाठी आपण त्यांना कामावर घेत आहोत त्याप्रमाणे पाठपुरावा तर होईल.

सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :–आयुक्त साहेब, हे चारच लोक बाधित आहेत का की आणखी कोणी आहेत?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–अजुन चार जण आहेत त्यांना सुध्दा अस्थायी पदावर नेमणूक दिलेली आहे.

सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :–त्यांचा विषय येत नाही महासभेच्या पटलावर. त्यांना एक दिवसाचा ब्रेक सुध्दा दिला जात नाही. या चौघांनाच का ब्रेक दिला जातो.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–पुढच्या वेळेस त्यांच्या विषयीचा विषय महासभेपुढे येईल.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–तो विषय महासभेपुढे आणण्यासाठीची ही चर्चा नाही, या लोकांना कायम कसे करता येईल त्याबाबत संशोधन करा. त्याच्यावर मार्ग म्हणजे प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा निर्णय आहे की, ५ टक्के जागा भरायच्या आहेत आस्थापना सुचीमध्ये तशी तरतुद आहे. आपण ५ टक्के पदे भरली नाहीत, हा महापालिकेचा प्रकल्प असल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या यादीमध्ये ही नावे समाविष्ट होत नाहीत.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–प्रकल्पग्रस्तांची २००६–०७ मध्ये आपण जी भरती केली आहे त्यात प्रकल्पग्रस्तांचा आपण अनुशेष भरुन काढलेला आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–अनुशेष भरलेला आहे?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–प्रकल्पग्रस्तांचा अनुशेष भरलेला आहे, माझ्या माहितीप्रमाणे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–माझ्या माहितीप्रमाणे भरलेला नाही. या संवर्गामधील ............

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–या संवर्गामधील नाही, एकुणच आपण जे म्हटलात की ३ टक्के प्रकल्पग्रस्त आणि ते समांतर आरक्षण आहे. हे फक्त प्रकल्पग्रस्तासाठी ३ टक्के म्हणजे आपल्या विविध संवर्गातील जी आरक्षणे आहेत जसे की अनुसूचीत जातीसाठी १३ टक्के, अनुसूचीत जमातीसाठी ७ टक्के ढोबळमानाने, व्हीजेएनटी आणि ओबीसी या व्यतिरिक्त ३ टक्के असे नाही आहे ते, ते समांतर आरक्षण आहे म्हणजे या संवर्गामधील ३ टक्के या पध्दतीचे आरक्षण आहे ते.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>येथे महासभेमध्ये चर्चा झाली होती. आणि प्रकल्पग्रस्ताच्या अंतर्गत या लोकांना समाविष्ट करण्यासाठी चर्चा झाली होती, ते आम्ही मान्यही केले. परंतु प्रकल्पग्रस्तांच्या दाखल्यासाठी ठाणे येथिल पुनर्वसन अधिका–यांकडे आपण मागणी केली. परंतु हा प्रकल्प महापालिकेशी निगडीत असल्यामुळे, व राज्य शासनाचा किंवा केंद्र शासनाचा नसल्यामुळे पुनर्वसन अधिकारी त्यांना सर्टीफिकेट देवु शकत नाहीत. त्यामुळे महापालिकेने आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा. त्यांनी मार्गदर्शक सूचना केलेल्या आहेत. जर जागा रिक्त नव्हत्या तर त्यांचे अर्ज कशाला मागीविले? माझ्या माहितीप्रमाणे त्यांच्या जागा शिल्लक असणार आहेत. त्याची पुन्हा खातरजमा करा. आणि हा महापालिकेचा प्रकल्प असल्यामुळे राज्य शासनाच्या आदेशाची किंवा त्यांच्या यादीत समावेशाची शक्यताच नाही. आणि त्यांनी कळविले आहे आपल्याला की महापालिकेने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा. म्हणजे जर इच्छा असेल तर मार्ग ही निघेल.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>प्रकल्पग्रस्त म्हणुन जसे ३ टक्के आपण म्हटले तसे आरक्षण आपण तपासून पाहु. आपल्याकडे जी रिक्त पदे आहेत, ती ज्या जातीप्रवर्गासाठी राखीव आहेत ते आणि हे जे कामगार आहेत, त्यांच्या जातीचा प्रवर्ग जर एकसारखा असेल तर त्यांना आपण सामावुन घेवु. हे चार अधिक श्रीमती सुर्वे महोदयांनी उपस्थित केलेली ४ अशीएकुण आठ माणसे यापैकी ...........

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>हे चार आणि इतर चार या सर्वांचा विचार करावा. प्रकल्पग्रस्तांच्या यादीत किंवा इतर जी रिक्त पदे असतील कारण की बरेचसे वॉलमन आणि चतुर्थश्रेणीचे कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. आज बरेचसे वॉलमन ठेकेदाराकडे काम करणारे आहेत. एमजीपीने हस्तांतरीत केलेले वॉलमन किंवा इतर जे कर्मचारी आहेत ते सध्या नाहीत. त्यामुळे जर रिक्त पदे असतील, नसतील तरी प्रकल्प ग्रस्तांच्या यादीमध्ये समाविष्ट करुन महापालिका स्तरावर यादी तयार करावी लागेल. कारण प्रकल्प हा महापालिकेचा आहे. राज्य शासनाचा किंवा केंद्र शासनाचा नाही. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या जागेमध्ये त्यांना समाविष्ट करण्यात यावे.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :–</u>आयुक्त साहेब, त्या चार कर्मचा–यांना ब्रेक न देता कामावर घेतात मात्र या चार कर्मचा–यांना एक दिवसाचा ब्रेक दिला जात आहे. तर मा. आयुक्त साहेबांना विनंती आहे की या चारजणांना ब्रेक न देता कामावर रुजु करण्यात यावे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>पुर्वीच्या चार लोकांनाही अस्थायी म्हणुनच आदेश आहेत. एक दिवसाचा ब्रेक दिला नाही हा तांत्रिक मुद्दा आहे.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :–</u>कायदा सर्वांना सारखाच आहे किंवा नाही?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>बरोबर आहे.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :–</u>कायदा सर्वांना सारखाच आहे कि नाही?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>त्या चार लोकांबाबत कार्यवाही पाणी पुरवठा विभागामार्फत केली होती. ती संचिका ज्यावेळेस निदर्शनास आली त्यावेळेस आम्ही सूचना दिल्या आहेत पाणी पुरवठा विभागाला की पुढच्या वेळेस हा विषय महासभेपुढे मंजुरीस आणण्यात यावा. त्यास महासभेची मंजुरी दिली जाईल.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

<u>विषय क्र. २ :–</u> १) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले,

३) श्री. चंद्रकांत गुरुनाथ वायले, ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना दिनांक २३/८/२०१० पासून पूढील **सहा महिन्याकरीता मुदतवाढ** देणे.

प्रस्तावना

महासभा ठराव क्र. ८४, दिनांक १०/३/२०१० अन्वये पाले ते गायकवाड पाडा दरम्यान सुधारीत पाणी पुरवठा अंतर्गत जलवाहिनीचे काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने बांधित होणारे १) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) श्री. चंद्रकांत गुरुनाथ वायले, ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे अशा ४ जणांना पाणी पुरवठा विभागात मजुर/वॉलमन या पदी कार्यरत कर्मचारी उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत तात्पुरत्या स्वरुपात अस्थायी पदावर (वर्ग-४) मान्यता दिलेली आहे.
त्यास अनुसरुन सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक २५ मार्च, २०१० रोजीच्या आदेशानुसार १ दिवसाचा खंड देवुन दिनांक २२/३/२०१० पासून पुढील ६ महिन्यांकरीता मुदतवाढ महासभा ठराव क्र. ८४, दिनांक १०/३/२०१० नुसार देण्यात आलेली आहे. सदरची मुदत दिनांक २१/८/२०१० रोजी संपृष्टात आलेली आहे.
१) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) श्री. चंद्रकांत गुरुनाथ वायले, ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांची सेवा दिनांक २०/८/२०१० रोजी संपृष्टात आल्याने दिनांक २२/८/२०१० रोजी रविवार निमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने ०१ दिवसाचा खंड देवुन दिनांक २३/८/२०१० पासून पुढील ०६ महिन्यांकरीता मुदतवाढ देणेकामीचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) नुसार, नियुक्तीचे नवीकरणासाठी नियुक्ती प्राधिकारी तथा सक्षम प्राधिकारी म्हणुन मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र. ४५ दिनांक : २०/१०/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी

ही महासभा १) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) श्री. चंद्रकांत गुरुनाथ वायले, ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना पाणी पुरवठा विभागात मजुर/वॉलमन पदावर दिनांक २३/८/२०१० पासून पूढील **सहा महिन्याकरीता मुदतवाढ** देणे मान्य करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:—** श्री. शंकर चव्हाण, सुरक्षा रक्षक यांना वैद्यकीय खर्चापोटी रु. १,१३,१७७/- प्रतिपुर्ती मान्य करणे.

---

सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—मा. महापौर, प्रतिपुर्ती करण्याची तरतुद किती आहे? त्याप्रमाणे करा. शासन निर्णयाप्रमाणे मला वाटते ४० हजाराची तरतुद आहे.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>शासन निर्णयानुसार प्रतिपुर्ती करावी.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>महाराष्ट्र शासन निर्णय १९ मार्च २००५ नुसार जो प्रत्यक्ष खर्च अनुज्ञेय आहे म्हणजे औषधोपचारावरील खर्चाच्या प्रत्यक्ष ९० टक्के रक्कम एवढीच रक्कम आपण त्यांना देणार आहोत, शासन निर्णयाप्रमाणे.

<u>म्हापालिका सचिव :–</u>यांचे म्हणणे आहे की, १ लाख १३ हजार त्यांना देय आहेत. ९० टक्के जे म्हणत आहात, १ लाख २५ हजार मधुन १ लाख १३ हजार त्यांना देय आहेत, ते त्यांना मान्य आहे. ठिक आहे?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ३ :–** श्री. शंकर चव्हाण, सुरक्षा रक्षक यांना वैद्यकीय खर्चापोटी
रु. १,१३,१७७/- प्रतिपुर्ती मान्य करणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. शंकर एस.चव्हाण, सुरक्षा रक्षक, हे सुरक्षा विभागात कार्यरत आहेत. त्यांनी त्यांच्या मेंदूच्या विकारावरिल उपचार के. ई. एम. हॉस्पीटल, पुणे येथे घेतले. त्यासाठी त्यांना रू. १,२५,७५२/– इतका खर्च आला आहे. त्यासाठी त्यांना एक विशेष बाब म्हणून रू. २,००,०००/– इतकी रक्कम अग्रीम देण्यात आली होती.

श्री. चव्हाण यांच्या मेंदूच्या शस्त्रक्रियेसाठी आलेला खर्च रू. ७४,१६२/– इतकी रक्कम कापून घेवून उर्वरित रक्कम रू. १,२५,८३८/– इतक्या रकमेचा धनादेश महापालिकेस परत केलेला आहे. तथापि, श्री. शंकर चव्हाण यांचा एकंदरित वैदयकिय खर्च रू. १,२५,७५२/– इतका झालेला आहे.

शासननिर्णय क्र.एम.ए.जी.–२००५/०९/प.क्र.१/आरोग्य–३दि. १९ मार्च,२००५ अन्वये औषध उपचारावरिल प्रत्यक्ष खर्चाच्या ९० : रक्कम सरसकट अनुदेय आहे.

श्री. शकंर चव्हाण यांचा एकुण खर्चाच्या रू. १,२५,७५२/– इतक्या रकमेच्या ९० टक्के म्हणजे रू. १,१३,१७७/– इतकी रक्कम होते. त्यातून त्यांना दिलेली अगाउ रक्कम रू. ७४,१६२/– इतकी वगळून रू. ३९,०१५/– इतकी रक्कम श्री.चव्हाण यांना अदा करणेबाबत मा. महासभेच्या कार्यात्तर मंजूरीसाठी प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४६ <u>दिनांक:–२०/१०/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. गोविंदराम लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. शंकर चव्हाण, सुरक्षा रक्षक यांना वैद्यकीय खर्चापोटी रु. १,१३,१७७/- प्रतिपुर्ती मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४ :—** उल्हासनसगर महापालिका अधिकारी/ कर्मचा-यांना वर्ष २०१०-२०११ साठी सानुग्रह अनुदान म्हणुन रुपये ७,७७७/- रक्कमेस मंजुरी देणे.

---

<u>**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**</u>मा. महापौर महोदया, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आपण जे अनुदान पास केले आहे ते ठिक आहे. परंतु आपल्या महापालिकेतील सुवर्ण जयंती विभागात काही महिला काम करत आहेत, त्या केवळ पाच महिला आहेत व त्यांना पगार केवळ ३००० रुपये आहे. त्यांनाया बोनस पासुन वंचित करु नये. त्यांच्यासाठी एक रक्कम ठरविली जावी. आणि ती त्यांना देखील दयावी. दिवाळीचा सण आहे.

<u>**सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :—**</u>मा. महापौर महोदया, मी मागील वर्षापासुन आपणांस सांगत आहे की आपल्या महापालिकेतील सुवर्ण जयंती विभागात पाच महिला कर्मचारी आहेत त्यांना देखील दिवाळी सणानिमीत्त बोनस देण्यात यावा. धन्यवाद।

<u>**सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—**</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, उल्हासनगरमध्ये जी आरोग्य केंद्र सुरु केलेली आहेत त्या आरोग्य केंद्रावर जे कर्मचारी काम करीत आहेत त्यांची नावे अशी आहेत डॉ. वर्षा नावानी, सययद अली, दर्शना पाठारे, गोविंद फुळे, दिप्ती मराठे, रुपाली शिराळकर, हेमलता पाटील, सोनाली डोंगरे, मिना जाधव, सुनिजा, पुनम देशमुख, कौशल्या फुले, .ऋणाली निहुले मा. महापौरांना विनंती आहे की यांना सुध्दा सानुग्रह अनुदान दिले जावे.

<u>**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**</u>त्यांना सुध्दा सानुग्रह अनुदान ५००१/— असे देण्यात यावे.

<u>**सदस्य श्री.बी.बी. मोरे:—**</u>सन्माननिय महापौर महोदया, आपल्या कर्मचा—यांना रुपये ७७७७/—सानुग्रह अनुदान म्हणुन मंजुर केले आहे. परंतु शिक्षण मंडळातील कर्मचा—यांचे सुध्दा असे म्हणणे आहे की, आम्हांला सुध्दा सानुग्रह अनुदान मिळाले पाहिजे. आम्हांला सानुग्रह अनुदान मिळत नाही. तर महापालिका कर्मचा—यांप्रमाणे शिक्षण मंडळातील कर्मचा—यांना सुध्दा सानुग्रह अनुदान देण्यात यावे, अशी मी सर्व सभागृहाच्यावतीने विनंती करतो. तसेच सन्माननिय सदस्य श्री. प्रशांत धांडे यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे की सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेमध्ये ज्या पाच महिला आहेत त्या पाच असोत किंवा सात असोत त्यांना देखील सानुग्रह अनुदान देण्यात यावे. कारण की त्यांना पगार अतिशय कमी आहे, त्यांना मानधनाच्या रुपात पगार दिला जातो. आणि त्यांना देखील कमीत कमी पाच हजार रुपये बोनस देण्यात यावा.

<u>**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**</u>मा. आयुक्त साहेब, त्याचप्रमाणे क्षयरोग सोसायटी मधील कर्मचारी सुध्दा आहेत त्यांचेही कर्मचारी आपल्या महापालिकेत काम करतात. त्यांनाही अनुदान देण्यात यावे.

<u>महापालिका सचिव :—</u>सुवर्ण जयंतीतील कर्मचा—यांना रुपये ५१००/— अनुदान दयायचे? आणखी कुणाला?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>क्षयरोग सोसायटीचेही लोक आहेत त्यांनाही अनुदान देण्यात यावे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>नगरसेवकांना सुध्दा बोनस देण्यात यावा.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u>नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचा—यांनाही बोनस देण्यात यावा. एकुण १३ लोक आहेत.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे. पास?

**सदस्य श्री. रविंद्र बागुल:—**नगरसेवकांचे काय?

**महापालिका सचिव :—**त्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवा. ठिक आहे? पास?

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र.** ४:— उल्हासनसगर महापालिका अधिकारी/ कर्मचा-यांना वर्ष २०१०-२०११ साठी सानुग्रह अनुदान म्हणुन रुपये ७,७७७/- रक्कमेस मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

सालाबादाप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना सन २०१०—२०११ या वित्तीय वषामध्ये महापालिका अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान व बोनस मिळणेबाबत महापालिकेतील विविध कर्मचारी संघटना यांचे समवेत मा. महापौर, यांचे अध्यक्षतेखाली सर्व गटनेते पदाधिकारी व महापालिका अधिकारी मा. महापौर यांचे दालनात दिनांक ०७/१०/२०१० रोजी दुपारी ०४.३० वाजता बैठक घेणेत आली.

सदर बैठकीमध्ये सर्वानुमते, सन २०१०—२०११ या वित्तीय वर्षामध्ये महापालिका अधिकारी/कर्मचारी यांना रू. ७७७७/— अदा करणेबाबत तत्वत: सहमती दर्शविण्यात आली होती.

सर्व कामगारांना दिपावली सणानिमित्त सानुग्रह अनुदान देण्याबाबत, सर्व गटनेते व अधिका—यांशी चर्चा विनिमय करुन सानुग्रह अनुदान म्हणुन रु. ७७७७/— दिपावली सणापुर्वी देण्यात यावे व तशी मंजुरी तद्नंतर महासभेत घेणेबाबत एकमताने निर्णय घेण्यात आले.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे सादर केरणेत येते की, वित्तीय वर्ष २०१०—२०११ साठी सर्व महापालिका कर्मचाऱ्यांना खालील अटी व शर्तीस अधिन राहून सानुग्रह अनुदान खालील प्रमाणे अदा करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) सदरचे सानुग्रह अनुदान गट ''अ'' ''ब'' ''क'' व ''ड'' मधील सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षण मंडळातील अधिकारी कर्मचा—यांना व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय राहील.

२) जे कर्मचारी ३१ मार्च २००९ रोजी सेवेत होते आणि ज्यांनी वर्ष २००९—२०१० मध्ये किमान ३० दिवस सेवा केलेली असेल असे कर्मचारी सानुग्रह अनुदान मिळण्यास पात्र राहतील.

३) दिनांक १/४/२००९ ते ३१/३/२०१० या कालावधीत संपूर्ण वर्ष निलंबीत असलेले कर्मचारी सानुग्रह अनुदान मिळण्यास अपात्र असतील.

४) सदर सानुग्रह अनुदान ही प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाच्या प्रमाणात खालील सुत्रानुसार देण्याचे प्रस्तावित आहे.

रूपये ७७७७/—

————————————————

**X** हजर दिवस

३६५ दिवस

५) कर्मचा—यांच्या सेवा कालावधीचा विचार करता, सर्व प्रकारच्या मंजूर रजा गृहीत धरण्यात याव्यात परंतु विना वेतन रजेचा विचार करण्यात येवू नये.

६) सानुग्रह अनुदान संदर्भामध्ये शासनाने वसुली संदर्भामध्ये निकाल दिल्यास सदर रक्कम एक रक्कमी वसुल करण्यात येईल.

सदर खर्चाची तरतूद वित्तीय वर्ष २०१०—२०११ च्या अर्थ संकल्पात सानुग्रह अनुदान या शिर्षाखाली रू. १.७२ कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

उपरोक्त वर्ष २०१०—२०११ साठी सानुग्रह अनुदान म्हणून रूपये ७,७७७/—प्रति अधिकारी/कर्मचारी यांना अदा करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४७ <u>दिनांक:–२०/१०/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. प्रशांत धांडे

अनुमोदकाचे नाव :– श्री. सुरेश जाधव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी व शर्तीवर महापालिकेतील सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षण मंडळातील शिक्षक, अधिकारी, कर्मचा-यांना व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी, कर्मचारी यांना वर्ष २०१०-२०११ चे दिपावली सणानिमित्त सानुग्रह अनुदान म्हणुन रुपये ७,७७७/- अदा करणेस मान्यता देत आहे.

तसेच--

सुधारीत क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, प्रजनन व बाळ आरोग्य कार्यक्रम व सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गतच्या सर्व अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांना रु. ५,१००/- सानुग्रह अनुदान देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ५ :–<u>प्रस्तावाची सुचना</u>

महापालिका क्षेत्रातील माजी सैनिकांना मालमत्ता करात सवलत देणे अथवा माफ करण्याबाबत सन्मा. सदस्य श्री. सुरेश जाधव यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

---

<u>महापालिका सचिव:–</u>याबाबत ठाणे महानगरपालिकेच्या ज्या अटी आहेत.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>हा विषय अतिशय चांगला आहे, श्री. राजु जग्यासी आपणांस तो समजुन घ्यायचा आहे काय?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. महापौरजी, हा विषय काय आहे तो मला समजला आहे. परंतु जर श्री. किशोर जग्यासी हे व्यवस्थीतपणे समजुन सांगतील तर तो मला अधिक चांगला समजेल. श्री. किशोर जग्यासी यांच्याकडुन मला तो समजुन घ्यायचा आहे.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ५:– <u>प्रस्तावाची सुचना</u>

महापालिका क्षेत्रातील माजी सैनिकांना मालमत्ता करात सवलत देणे अथवा माफ करण्याबाबत सन्मा. सदस्य श्री. सुरेश जाधव यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

प्रस्तावना

भारतीय सैन्य दलातील (भुदल, नौदल, हवाईदल) जवान देशाच्या रक्षणासाठी सीमेवर आपले कर्तव्य बजावत असतात.

देश रक्षणासारखे मोलाचे कार्य त्यांचे हातुन होत असल्याने सेवा निवृत्तीनंतर त्यांचेसाठी देशभरातील शासकीय/निमशासकीय संस्थांकडुन विविध सवलती उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्याअनुशंगाने काही स्थानिक स्वराज्य संस्थांनीही माजी सैनिकांना मालमत्ता कर आकारणीत सुट दिलेली आहे.

त्याच धर्तीवर उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील माजी सैनिकांना मालमत्ता कर आकारणीत सुट देणेसंबंधी मागणी होत आहे. त्यादृष्टीने पुढीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | माजी सैनिक | : | भारतीय सैन्य दलातील (भुदल, नौदल, हवाईदल) सेवानिवृत्त माजी सैनिक |
| २. | सवलत पात्र मालमत्ता | : | १)निवासी वापर होत असलेल्या मिळकती.<br>२)अनिवासी वापर होत असलेल्या मिळकतींना सुट अनुज्ञेय असणार नाही. |
| ३. | मालकी हक्क | : | १)संबंधित मिळकत माजी सैनिक किंवा त्याचे पत्नीचे नावे असणे आवश्यक<br>२)किंवा मुलगा किंवा अविवाहीत मुलीचे नावे असणे आवश्यक<br>३)माजी सैनिकाचे संबंधित मिळकतीमध्ये वास्तव असणे आवश्यक. |
| ४. | मालमत्ता करात अनुज्ञेय सुट | : | फक्त सामान्य करात १०० टक्के |
| ५. | सवलत लागु असल्याचा कालावधी | : | वर्ष २०११–१२ पासुन माजी सैनिक हयात असेपर्यत |
| ६. | मालमत्ता कर भरणा | : | १)चालु वित्तीय वर्षाकरीता मालमत्ता कराची संपुर्ण रक्कम भरणा करणे आवश्यक.<br>२)तद्नंतर कराचा परतावा मिळणेसाठी अर्ज सादर करणे. |
| ६. | परताव्याची मागणी | : | माजी सैनिकाने प्रतिवर्ष मालमत्ता कराचा परतावा मिळणेसाठी अर्ज सादर करणे बंधनकारक राहील. |
| ७. | अर्जासोबत सोबत सादर करावयाचे पुरावे | : | १) वास्तव्यासंबंधी पुरावे<br>अ)शिधावाटप कार्ड (ज्यात माजी सैनिकाचे नाव असणे आवश्ययक आहे.)<br>ब)किंवा वास्तव्यासंबंधी माजी सैनिकाचे सत्यप्रतिज्ञापत्र. (सक्षम प्राधिकाऱ्यासमोर केलेले)<br>क)माजी सैनिकाचे अधिवास प्रमाणपत्र<br>ड)पारपत्र |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | २) इतर पुरावे<br>अ)ओळखपत्र<br>ब)पेन्शन पेमेंट ऑर्डर<br>क)डिस्चार्ज सर्टीफिकेट<br>ड)माजी सैनिकास अन्य कुठल्याही ठिकाणी मालमत्ता करात सवलत घेत नसल्याबाबत हमीपत्र. |
| ८. | मालमत्ता कराचा परतावा | : | उक्त बाबींची पुर्तता झाल्यानंतर ३० दिवसाचे आत. |
| ९. | इतर | : | मालमत्ता कर आकारणी व वसुली संदर्भात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कराधान नियमातील सर्व तरतुदी लागु राहतील. |

सबब उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील माजी सैनिकांना मालमत्ता करात सुट देणेसंबंधी वरीलप्रमाणे प्रस्ताव मंजुरीकरीता मा. महासभा पटलावर प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ४८ दिनांक:—२०/१०/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील माजी सैनिकांना मालमत्ता करात सुट देणेसंबंधीच्या प्रस्तावास शासन मंजुरीच्या अधिन राहुन मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ६ :— आयत्यावेळचा विषय
विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करण्यास अंतिम मंजुरी देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

विषय क्र. ६:– आयत्यावेळचा विषय

विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करण्यास अंतिम मंजुरी देणे.?

प्रस्तावना

स्वातंत्र्यपूर्व काळात सन १९४२ मध्ये भारत सरकारने लष्करी सैनिकांच्या वसाहतीसाठी सुरक्षित व योग्य ठिकाण म्हणून उल्हासनगरची निवड करुन वसाहतीसाठी १३०० हेक्टर जमिन संपादित केली. सदर जमिनीचा विकास करुन त्यामध्ये १९७३ बॅरेक्स बांधून सुमारे ६००० सैनिकांना राहण्यासाठी देण्यात आले. सन १९४७ मध्ये हिंदुस्तानची फाळणी होऊन भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे निर्माण झाली. या फाळणीमध्ये सिंध प्रांतातुन निर्वासितांचे लोंढे भारतात येऊ लागले. त्या निर्वासितांचे पुर्नवसन १९७३ बॅरेक्सचाच संक्रमण छावण्या म्हणून उपयोग करुन सुमारे ९४४०० निर्वासितांची व्यवस्था उल्हासनगरमध्ये केली होती.

उल्हासनगर ते मुंबई महानगरपासुन जवळ असल्यामुळे तसेच शहरातुन जाणारे महामार्ग व मध्य रेल्वेच्या मार्गावर विठठ्लवाडी व उल्हासनगर ही रेल्वे स्थानके मध्यवर्ती ठिकाणी असल्यामुळे तसेच दळणवळणास सोयीचे ठिकाण असुन लघुउद्योग व औद्योगिक विकास मोठया प्रमाणावर असल्यामुळे उद्योजक व मध्यमवर्गीयांचा लोंढा उल्हासनगरकडे वळला. त्यामुळे शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढुन शहरामध्ये अनेक बांधकामे झालेली आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेने, उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेनुसार वेळोवेळी दिलेल्या शासनाच्या आदेशानुसार उल्हासनगर शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीतील बदल करणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये खालील बदल करण्यास प्रस्ताव मा. महासभेकडे सादर करण्यात आलेला होता.

१. इमारतीची उंची वाढविणे.
२. आरक्षणाचे स्थलांतर व अंतर्गत बदल.
३. आरक्षणाच्या जागेचा चटई क्षेत्र निर्देशांक लगतच्या जागेत वापरणेबाबत. (एकाच मालकाची जागा असल्यास)
४. पोडीयम आर.जी. (Podium R.G.)

त्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका यांनी मा. महासभेचा ठराव क्र. ८७ दि. १०.०३.१० रोजी वरील फेरबदलाकरीता ठराव पारीत केला होता. त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम नुसार विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करणेकामी राजपत्रामध्ये दि. १०.०५.१० व दि. २७.०५. १० रोजी स्थानिक वर्तमानपत्रामध्ये हरकती व सूचनेसाठी नोटीस प्रसिध्द करणेत आली.

त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका अधिसूचित क्षेत्रासाठी विहीत मुदतीत एकुण १० सूचना/हरकती प्राप्त झालेल्या होत्या. त्यांची सुनावणी दि. १८. ०८.१० रोजी दुपारी ३.०० वा. मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या दालनामध्ये आयोजित करण्यात आलेली होती. परंतू काही तांत्रिक बाबीमुळे सदरची सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. दरम्यानच्या काळात मा. आयुक्त यांचे दि.

२२.०९.१० रोजीच्या आदेशान्वये मा. सहाय्यक संचालक, नगररचना यांनी प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींवर सुनावणी घेणेसाठी प्राधिकृत केलेले आहे.

वरीलप्रमाणे सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या एकुण १० सूचना व हरकतीधारकांना दि. १२.१०.१० रोजीच्या पत्रान्वये दि. १४.१०.१० रोजी ठीक ४.०० वा. सहाय्यक संचालक, नगररचना, उल्हासनगर महानगरपालिका यांचे दालनामध्ये सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीचा तपशिल महासभेसमोर प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४९ <u>दिनांक:—२०/१०/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दहा सूचना व हरकती निकालात काढुन महासभा ठराव क्र. ८७ दिनांक १०/३/२०१० नुसार फेरबदल प्रयोजनार्थ प्रसिध्द करण्यात आलेले प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीस खालील बाबींच्या अंतर्भावासह शासनाच्या मंजुरीस अधिन राहुन अंतिम करण्यास मान्यता देत आहे.

१. इमारतीची उंची वाढविणे:— इमारतींची उंची इतर महापालिकेच्या बरोबरीने म्हणजेच ९१ मिटर पर्यंत असावी व उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये प्लॉटचे आकार व क्षेत्रफळ कमी असल्याने खालीलप्रमाणे सामासिक अंतर सोडण्यात येईल.

| समोरील बाजूस | मागील व लगतच्या बाजूस |
|---|---|
| ६.०० मिटर | उंचीच्या १/३ किंवा कमाल १२ मिटर पर्यंत व (डेड वॉलसाठी) खिडकी नसलेल्या भिंतीसाठी ६ मिटर |

उपरोक्त सामासिक अंतरात उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये भुखंडाचे आकार व क्षेत्रफळ कमी असल्याने बांधकाम बसत नसल्यास समोरचे बाजूस किमान अंतर ३.०० मिटर ठेवुन उर्वरीत बाजूच्या सामासिक अंतरात शिथीलता देण्याचे अधिकार आयुक्तांना राहतील.

२. आरक्षणाचे स्थलांतर व अंतर्गत बदल :— उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास आराखडयानुसार जे आरक्षण राखीव ठेवण्यात आलेले आहेत सदर आरक्षण व आजूबाजूचा परसिर समजा एका व्यक्तीच्या नांवे मालकी हक्क असल्यास सदरचा प्लॉट (जागा) विकासकाला विकसित करावयाची असल्यास सदर जागेत जे आरक्षण येत असेल त्याची जागा (ठिकाण) त्याच प्लॉटमध्ये बदलण्यात येवून त्याच्या क्षेत्रफळाएवढेंच क्षेत्रफळ देवून उर्वरीत भूखंडाचा विकास करण्याचा अधिकार आयुक्तांना असेल.

३. आरक्षणाच्या जागेचा चटई क्षेत्र निर्देशांक लगतच्या जागेत वापरण्याबाबत (एकाच मालकीची जागा असल्यास)— उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास आराखडयानुसार जर भुखंड आरक्षित असेल व त्याचा मालकी हक्क कोणा व्यक्तीकडे असल्यास सदर भुखंडाचा ताबा जर ती व्यक्ती विनामुल्य महानगरपालिकेस देण्यास तयार असेल तर त्याचा चटई क्षेत्र निर्देशांक त्याच्याच मालकीच्या उर्वरित जागेत तो मालक विकास योजनेच्या झोनिंग नुसार तेवढाच चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन विकास करु शकेल

४. पोडियम आर.जी. उल्हासनगर शहरामध्ये आर.जी. खालील तळघर व पोडीयम खाली वाहनतळ पूढीलप्रमाणे.....

२००० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या भूखंडावर १० टक्के आर.जी. व या जार.जी च्या जागेत १५ टक्के बांधकाम क्लब हाऊस किंवा संलग्न वापर करणे.

''सार्वजनिक सुखसुविधा'' साठी दोन हेक्टरच्या वरती ५ टक्के जागा सोडणे आवश्यक राहिल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ७ :– आयत्यावेळचा विषय

उल्हासनगर स्टेशन परिसराचा ''बांधा वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्वावर विकास करण्यास मान्यता देणे.

---

सदस्य श्री. मोहन साधवानी :–मा. महापौरजी, या विषयाचा जो गोषवारा दिला आहे, त्याचे स्पष्टीकरण तर केले जावे. सहा, सात पानांचा गोषवारा आहे. चार, चार सभांना आम्ही उपस्थिती लावायची की सात, सात आठ, आठ पानांचे गोषवारे वाचायचे? यासाठी या विषयाचा गोषवारा ज्या कोणी तयार केला आहे त्यांनी त्याचे थोडे स्पष्टीकरण करावे.

काही सदस्य :–पास–पास......

सदस्य श्री. मोहन साधवानी :–थोडे स्पष्टीकरण तर घेवु दया. पास, पास काय म्हणता?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–सन्माननिय श्री. मोहन साधवानीजी, या विषयाचा गोषवारा दिलेला आहे, कृपा करुन आपण तो गोषवारा जर वाचुन पाहिला तर आपणांस सविस्तर माहिती मिळु शकेल.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–श्री. प्रशांत धांडेजी..............

सदस्य श्री. सुरेश जाधव :–सभेस उशिर झाला आहे. आणखी उशिर करु नका. पास करा, पास.......

सदस्य श्री. मोहन साधवानी :–मा. महापौरजी, या विषयाचे स्पष्टीकरण करु दया.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–थोडक्यात स्पष्टीकरण करा. संध्याकाळचे साडेपाच वाजले आहेत. वेळेचेही बंधन आहे.

श्री. एम.जी. गिरगांवकर (कार्यकारी अभियंता):–सन्माननिय महापौरजी, सन्माननिय उप–महापौरजी, सन्माननिय आयुक्त साहेब, महापालिका सचिव साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, सदस्या, उल्हासनगर स्टेशन परिसराचा बांधा वापरा व हस्तांतरीत करा तत्वावर विकास करण्याचा प्रस्ताव मा. महासभेच्या मंजुरीसाठी या ठिकाणी सादर करण्यात आलेला आहे. याचा जवळपास सहा पांनाचा सविस्तर गोषवारा याठिकाणी दिलेला आहे. तर आपल्या शहराचा प्रामुख्याने जो एरिया आहे तो १३ चौरस मिटरचा आहे. त्याठिकाणी विकास करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणे अत्यंत अपुरी आहेत. आणि प्रामुख्याने स्टेशनचा जो परिसर आहे, स्टेशन आणि आपले शहर यामध्ये वालधुनी नाला आहे आणि त्यामुळे पार्किंगचा जो प्रश्न आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–साहेब, सर्वांना समजले आहे, तुम्ही गोषवारा दिलेला आहे. परत तेच तेच तुम्ही सांगणार. पास करा विषयाला पास करा. किती वेळ लावणार? विषय पास, पास.... ती सहा पाने तुम्ही वाचत बसणार काय?

सदस्य श्री. मोहन साधवानी :–अहो, समजुन तर घेवु दया, प्रस्ताव काय आहे?

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–श्री. सुरेश जाधव यांच्या विभागातील हा प्रस्ताव असल्यामुळे ते ...........

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>त्यासाठी एकदिवसाचा कार्यशाळा ठेवा. आता पुढचा विषय घ्या.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>किती वर्षासाठी देत आहात?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>किती वर्षासाठी देण्याचा प्रस्ताव आपण तयार केला आहे?

<u>श्री. एम.जी. गिरगांवकर (कार्यकारी अभियंता):–</u>२८ वर्षासाठी.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>मा. आयुक्त साहेब, या दोन सन्माननिय सदस्यांना बाजुला घेवुन आपण समजावा. इतर सर्व सदस्यांचा वेळ घेवु नका. यांना उशिरा समजते.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>सहा, सात पानांचा गोषवारा आहे, एवढा वाचुन दाखविणार काय?

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>२८ वर्षासाठी ही जागा विकुन टाकली काय?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>या दोन सन्माननिय सदस्यांना आपण आपल्या कार्यालयात बोलवा आणि समजावा.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ:–</u>सभागृहात चर्चा होणे गरजेचे आहे. चर्चा होवु दया नंतर पास करा.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>महापौर महोदया, हा विषय समजावण्यामध्ये काय अडचण आहे?

<u>काही सदस्य :–</u>पास, पास.........

<u>महापालिका सचिव :–</u>पास? सर्वसंमतीने?

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

## ☑ विषय क्र. ७ :– <u>आयत्यावेळचा विषय</u>

उल्हासनगर स्टेशन परिसराचा ''बांधा वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्वावर विकास करण्यास मान्यता देणे.

### <u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहर हे मुंबई–पुणे मध्ये रेल्वे लाईनवर वसलेले शहर असून शहरात मोठ्या प्रमाणात लघुउद्योग चालतात शहरात व्यापारी स्वरूप असल्याने शहरातून दररोज रेल्वे लोकल मार्फत, स्वत:च्या मालकीच्या वाहनाद्वारे तसेच शासनाच्या महानगरपालिकेच्या बससेवामार्फत रहदारी सुरू असते उल्हासनगर शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने व्यापारी उद्योगात तसेच रहदारीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. शहरात दोन बाजूस रेल्वे लाईन असून शहराला लागून विठ्ठलवाडी उल्हासगनर व शहाड असे ३ रेल्वे स्टेशन आहेत. या स्टेशन परिसरात मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.

**१) प्रस्तावना :–**

उल्हासनगर शहराचा मंजूर विकास आराखडा वर्ष १९७४ शासनाने मंजूर केला असून तेव्हापासून महानगरपालिकेतर्फे या विकास आराखडयाप्रमाणे विकासकामे करण्यात येत आहेत. या विकास आराखडयात एकुण २०३ भुखंड विविध कारणास्तव आरक्षित ठेवण्यात आलेली आहेत. उल्हासनगर शहराचा प्रारूप आराखडा तयार करण्यात येत असून त्यामध्ये देखील भूखंड विविध कारणास्तव आरक्षित दाखविण्यात येत आहेत.

अन्य शहरांच्या तूलनेत उल्हासनगर शहरामध्ये नियोजनबद्धरित्या बांधलेले व्यापारी संकूल/भाजीमार्केट नाही, शहरामध्ये व्यापार व व्यवसायाची भरभराट होत असली तरी येथे व्यापार व व्यवसायाला पोषक असे वातावरणाचा अभाव आहे. शहराच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी शहरामध्ये उच्च दर्जाचे पायाभुत सुविधा स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत पुरविणे आवश्यक असते. वास्तविक पाहता विकास आराखडयातील व्यापार व उद्योगासाठी राखीव भूखंडाचा नियोजनबद्ध विकास केला असता, तर येथे व्यापार व उद्योगधंद्यात वाढ होवुन रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होण्याबरोबरच शहराचा सर्वांगीन आर्थिक व सामाजिक विकास झाला असता.

**२) उल्हासनगर स्टेशन समोरील भुखंडाच्या विकासाबाबत एकात्मिक दृष्टीकोनाची आवश्यकता :**

उल्हासनगर शहराच्या विविध समस्यांचा सर्वांगिन विचार करून विकास आराखडयातील भुखंडांचा क्रमाक्रमाने एकात्मिक दृष्टीकोन समोर ठेवुन विकास करणे प्रस्तावित आहे. रेल्वेस्टेशन परिसर हा व्यापारी व व्यवसायाच्या दृष्टीने विकासाचे केंद्र म्हणुन ओळखला जातो त्यामुळे शहरामध्ये रेल्वेस्टेशन परिसरात असलेल्या भुखंडाचा विकास करणे प्रस्तावित आहे. उल्हासनगर स्टेशनच्या उत्तर बाजूस वालधुनी नाल्यालगत असलेला भुखंड विकसीत करण्याची योजना प्रस्तावित आहे.

त्याअनुषंगाने महानगरपालिकेमार्फत नियुक्त केलेल्या स्थापत्य सल्लागार मे. टेक्नो कन्स्लटंट यांचेकडुन उल्हासनगर स्टेशन परिसराचा विकास प्रकल्पाचा फिजीबीलीटी रिपोर्ट तयार करण्यात आला आहे. स्थापत्य सल्लागाराने तयार केलेल्या प्रस्तावित विकास कामासाठी अंदाजे रूपये ९२ कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर योजना ढोबळ स्वरूपाची असून अपेक्षित खर्चास वाढ अथवा घट होण्याची शक्यता आहे.

उल्हासनगर स्टेशन जवळ वालधुनी नाल्याला लागून एकुण १४ एकर म्हणजेच ५.६७ हेक्टर जमिन आहे. या जमिनीवर महानगरपालिकेचे स्वच्छता गृह, गणेश घाट असून स्टेशनला लागून रस्त्याच्या कडेने मच्छीमार्केट, भाजीमार्केट, छोटे बुकस्टॉल अशा प्रकारचे लघु व्यवसाय आहेत. या जागेतून मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत स्कायवॉकचे बांधकाम करण्यात आले आहे.

**३) प्रकल्पाची आवश्यकता व कारणे :**

जागेच्या उत्तरेस वालधुनी नाला असल्याने व स्टेशन पर्यंत वाहतुकीस योग्य असा पुल नसल्याने नाल्याच्या पलीकडील सीएचएम कॉलेज जवळील रस्त्यावर रिक्षा स्टॅण्ड आहे व तसेच प्रवाशांना त्यांच्या गाड्या कॉलेज जवळ थांबवाव्या लागतात त्यामुळे आधिच कॉलेजच्या जवळीला भागात विद्यार्थ्यांच्या गर्दीबरोबर वाहनांची गर्दी होवुन वाहतुकीची कोंडी होते.

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत वाहतुकीची कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने वालधुनी नदीवर पुल प्रस्तावित केला होता. परंतु जागे अभावी त्या पुलाचे बांधकाम पुर्ण होवु शकले नाही उल्हासनगर शहराच्या विकास आराखडयात (CDP) मध्ये या पुलाच्या कामाचा समावेश करण्यात आला आहे. उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत स्वत:च्या मालकीची परिवहन सेवा सुरू करण्यात आली आहे. परंतू स्टेशन परिसरात बस थांबाकरीता पुरेशी जागा नसल्याने व रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी लक्षात घेता. स्टेशन सारख्या वर्दळीच्या परीसरात परिवहन सेवा सुरू करता आली नाही, तसेच उल्हासनगर स्टेशनला लागुन असलेल्या वालधुनी नाल्याची रूंदी कमी असल्याने व पावसाळयात नाल्याच्या प्रवाहात वाढ होते त्यामुळे पाण्याचा निचरा होत नाही पर्यायाने स्टेशन परिसरात तसेच पादचारी पुलावरून पाणी वाहते वरील सर्व बाबींचा विचार करता उल्हासनगर स्टेशनला लागून असलेल्या जागेचा वापर कार पार्कींग, रिक्षा थांबा, बस थांबा याकरीता केल्यास वाहतुकीची कोंडी कमी होईल. तसेच वालधुनी नाल्याचे संरक्षण भिंतीचे काम केल्यास व पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने पाण्याच्या प्रवाहामधील अडथळे दूर केल्यास पाण्याचा प्रवाह सुरळीत होईल.

उल्हासनगर शहराचे क्षेत्रफळ १३.३३ चौ.किमी. असून शहराची व्यवसायीक दृष्ट्या व लोकसंख्येच्या माध्यमातून वाढ होत असल्याने शहरात विकासासाठी जागा उरलेल्या नाही. शहरातील अनाधिकृत बांधकामे अतिक्रमणे गलिच्छ वस्त्यांमुळे आरक्षित भुखंड व्यापलेले आहेत. शहरातील कॅम्प २ व ३ मध्ये मोठया प्रमाणात कपडयांचा इलेक्ट्रॉनिक, इलेक्ट्रिक व फर्निचरचा व्यवसाय चालतो. या भागात ग्राहकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. उल्हासनगर स्टेशनच्या लगतच्या महानगरपालिकेच्या जागेचा वापर व्यापारी संकूलनाकरीता केल्यास शहरातील गर्दी कमी होण्यास मदत होईल. व ग्राहकांच्या दृष्टीने सोयीचे होईल. उल्हासनगर स्टेशन परिसराचा विकास केल्यामुळे स्टेशन परिसरात सेवासुविधा उपलब्ध होतील तसेच स्टेशन परिसराचे सुशोभिकरण झाल्याने शहरास प्रथमदर्शनी चांगले स्वरूप प्राप्त होईल. वरील सर्व बाबींचा विचार करता महानगरपालिकाच्या हद्दीतील रिकाम्या असलेल्या जागेचा उपयोग स्टेशन परिसर सुधारणे व विकसित करणे कामासाठी करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने स्टेशन परिसर विकास प्रकल्पात खालील कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

**४) प्रस्तावित योजनेतील प्रमूख घटक :—**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उद्योजकांच्या व्यवसायाच्या वाढीचा विचार करून योजना तयार करण्यात आली आहे. योजनेतील प्रमुख घटक खालीलप्रमाणे आहेत.

१) वालधुनी नाल्यावर पुल बांधणे : उल्हासनगर उत्तर भागाची रेल्वे स्टेशनच्या दोन्ही बाजूस वाहतुकीच्या दृष्टीने रेल्वे स्टेशनला जोडणी करणे.

२) वालधुनी नाला सुशोभिकरण : वालधुनी नाल्याची स्टेशन परिसरात संरक्षण भिंत बांधणे नाला सफाई करून नाल्याच्या पाण्याचे सपाटीकरण करून व प्रवाह मार्गात काँक्रीटीकरण करून नाल्याचा प्रवाह सुरळित करणे.

३) रिक्षा स्टॅण्ड : नाल्याच्या उत्तरेस असलेल्या सीएचएम कॉलेज जवळील रिक्षा

स्टॅण्ड स्टेशन नजीक प्रस्तावित करणे.

४) बहुमजली वाहनतळ : रेल्वे स्टेशनवर येणाऱ्या प्रवाशांकरीता कार पार्कींगची व्यवस्था उपलब्ध करणे.

५) बस टर्मिनस : परिवहन सेवेचा स्टेशन परिसरात वापर होण्याच्या दृष्टीने बस टर्मिनस विकसीत करणे.

६) रोड व इतर कामे : स्टेशन परीसरात प्रस्तावित योजनांना जोडरस्ते करणे.

७) स्टेशन परिसराचे सुशोभिकरण : परीसरात बगीचा करणे, झाडे लावणे, इलेक्ट्रिफिकेशन करणे, गणेश घाट उभारणे.

८) व्यापारी संकुलन : स्टेशनच्या बाजूस उपलब्ध जागेत व्यापारी संकूलन बांधणे व त्यातून शहरास महसुली उत्पन्न मिळविणे.

९) भाजी मार्केट / मच्छी मार्केट : स्टेशन लगत असलेल्या अस्तित्वातील भाजी मार्केट, मच्छी मार्केट बुक स्टॉल व इतर विक्रेत्यांना जागा उपलब्ध करून देणे.

१०) इतर कामे : परिसरातील अनाधिकृत बांधकामे हटविणे. अस्तित्वातील पाईपलाईन इलेक्ट्रिकल पोल व इतर सेवा सुविधा मध्ये आवश्यकतेनुसार बदल करणे.

११) गणेश विसर्जन घाट : उल्हास स्टेशन परिसरात तयार करण्यात आलेला कृत्रीम गणेश विसर्जन घाट नव्याने सुशोभिकरण करून विकसीत करणे.

**५) उक्त प्रकल्पामधुन प्राप्त होणारे उत्पन्न :—**

महानगरपालिका क्षेत्रातील प्रस्तावित वाहन तळाचा विकास करतांना नागरीकांना सुविधा पुरविण्याबरोबर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत बळकट करणे अपेक्षित आहे हा उद्देश ठेवुन योजना तयार करण्यात आली आहे. प्राथमिक अंदाजानुसार महानगरपालिकेस ठोक स्वरूपात अपफ्रन्ट पेमेंन्ट म्हणुन ६ कोटी रूपये तर दर वर्षी कन्सेशन फी म्हणुन दरवर्षी १२ लक्ष रूपयाचा महसुल प्राप्त होवु शकेल. या बरोबरच स्टेशन परिसर विकासकामात स्टेशन परिसर विकसीत होवुन त्यास वालधुनी नाल्याचे सुशोभिकरण नाल्यावरील पुलांचे बांधकाम रिक्षा स्टॅण्ड, बस थांबा, अशा कामा करीता व त्यांच्या देखभाल दुरूस्तीकरीता महानगरपालिकेस खर्च करावा लागणार नाही.

**६) उल्हास स्टेशन परिसराच्या विकासासाठी महानगरपालिकेसमोरील पर्याय**

पर्याय क्रं. १ : महानगरपालिकेच्या स्वत:च्या निधीमधुन खर्च करून उल्हास स्टेशन परिसराचा विकास करणे.

पर्याय क्रं. २ : बांधा वापरा हस्तांतरीत करा या तत्वावर उल्हास स्टेशन परिसराचा विकास करणे.

**७) आर्थिक दायित्व :—**

महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नातून व महसुली कामावर खर्च व भांडवली कामावर खर्च करण्यात येतो. उल्हासनगर शहरात विकासकामाच्या विविध योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, हुडको, व एमएमआरडीए अशा विविध वित्त संस्थांकडुन महानगरपालिकेने आधीच कर्जस्वरूपाने रक्कम उभारली आहे. तसेच महानगरपालिकेस पाणी देयकापोटी एमआयडीसीची थकीत बिले सुद्धा अदा करायची असल्याने. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती समाधानकारक आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या खर्चातुंन उल्हासनगर स्टेशन परिसर विकासाची कामे शक्य होणार नाही. तसेच महानगरपालिकेवर आधीच बोजा असल्यामुळे इतर वित्तीय संस्थाकडुन कर्ज मिळण्याची शक्यता कमी असल्यामुळे तसेच शहरात इतर विकासाची कामे सुरू असल्याने कर्जाची परतफेड देखभाल दुरूस्तीचा खर्च करणे ही अवघड होणार आहे.

**८) बांधा वापरा व हस्तांतरण करा तत्वावर योजना राबविणे :—**

वरील बाबींचा विचार करता आर्थिक दृष्टया वरील कामे करणे शक्य होणार नसल्याने उल्हासनगर महानगरपालिके मार्फत ''बांधा वापरा व हस्तांतरण करा'' तत्वावर वरील उल्हासनगर स्टेशन विकास प्रकल्प राबविण्यास बांधकामाचा भांडवली खर्च संपुर्णत: खाजगी संस्थेमार्फत करण्यात येईल व पर्यायाने महानगरपालिकेस काहीही गुंतवणुक करावी लागणार नाही. तसेच कर्जाची व देखभाल दुरूस्तीचे दायित्व स्विकारण्याची आवश्यकता राहणार नाही.

उपरोक्त विषयान्वये व शहराच्या विकास आराखडयानुसार मे. टेक्नो कंन्स्लटंट यांचेकडून प्राप्त फिजीबीलीटी रिपोर्ट नुसार, खाजगी संस्था मार्केट/विकासकामार्फत २ वर्षात उल्हासनगर स्टेशन विकासाचे बांधकाम पुर्ण करणे. व पुढील २८ वर्षे उल्हासनगर स्टेशन विकास प्रकल्पातील कामांची देखभाल दुरूस्तीचा २८ वर्षाचा कालावधी पुर्ण झाल्यावर उल्हासनगर स्टेशन विकास प्रकल्प महानगरपालिकेस हस्तांतरण करणे ह्या बांबी अभिप्रेत असुन विकासकाने या योजनेमधुन उपलब्ध होणाऱ्या महसुलामधुन महानगरपालिकेस पहिल्या वर्षाकरिता कमीत कमी १२ लक्ष व पुढील २७ वर्षाकरीता ५ टक्के प्रति वर्ष वाढ धरून रक्कम भरणे अपेक्षित आहे. ''बाधां वापरा हस्तांतरण करा'' तत्वावर योजना राबविण्यासाठी खाजगी संस्थांची निवड स्पर्धात्मक निविदा मागवुनच करणे अपेक्षित असुन खाजगी संस्थेशी करार करून योजनेचे बांधकाम, देखभाल दुरूस्ती, इत्यादी गोष्टींचा करारनाम्यात समावेश करणे गरजेचे आहे.

**९) करारनाम्यानुसार खाजगी संस्थाची जबाबदारी :—**

१) उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत, तयार करण्यात आलेल्या आराखडयानुसार स्वखर्चाने योजनेतील प्रस्तावित वाहन तळ, बस थांबा, रिक्षा स्टॅण्ड, व्यापारी संकूल, भाजी मार्केट, वालधुनी नाल्याचे सुशोभिकरण व इतर सर्व कामे प्रस्तावानुसार पुर्ण करणे.

२) महानगरपालिकेमार्फत तयार करण्यात आलेल्या उल्हास स्टेशन विकास आराखडयात प्रस्तावित कामापैकी वालधुनी नाल्यावरील पुल बांधणे वालधुनी नाला सुशोभिकरण रिक्षा स्टॅण्ड बस टर्मिनस भाजी मार्केट व स्टेशन परिसर सुशोभिकरण अशी महापालिकेच्या हिताची कामे प्रकल्प अहवालानुसार आधी सुरू करणे बंधनकारक राहील. व्यापारी संकुलनाची कामे, वरील कामे ५० टक्के पुर्ण झाल्यावर हाती घेता येतील.

३) प्रकल्प अहवालानुसार महानगरपालिकेने अंतिमत: मंजूर केलेल्या प्रस्तावानुसार व्यापारी संकुलनाच्या बांधकामाचे क्षेत्रफळ असेल तथापी व्यापारी संकुलनातील व्यापाराच्या दृष्टीने अंतर्गत बंदल करण्याची खाजगी संस्थेस मुभा राहील.

४) बांधकामासाठी आवश्यक परवाने मिळविणे.

५) बांधकामाचा कालावधी पुर्ण झाल्यावर प्रकल्पातील सर्व उपांगांची देखभाल दुरूस्ती करणे, तसेच वाहनतळापासुन सुमारे १.५० कि.मीच्या परिरात चोहोबाजुंनी रस्त्याच्या बाजुस पार्कींग होणार नाही याची खबरदारी घेणे.

६) प्रकल्पातील उपांगाची पुर्ण देखभाल दुरूस्तीची जबाबदारी जसे, वालधुनी नाल्यावरील पुल, स्टेशन परिसरातील वालधुनी नाल्याची सफाई, इमारतींची किरकोळ दुरूस्ती, विज देयके, पाणी देयके स्वच्छतागृहाची देखभाल, भाजी मार्केटची देखाभल दुरूस्ती, साफसफाई व सुरक्षा व्यवस्था ठेवणे.

७) योजना चालवावयाला घेतल्यानंतर, व्यवहारासंबंधी सर्व लेखा विषयक नोंदी अचुकतेने ठेवणे.

८) कंत्राटदारामार्फत देखभाल दुरूस्तीच्या आवश्यकतेबाबत कराराचा भंग झाल्यास त्याची दुस्स्ती कंत्राटदाराच्या खर्चाचे करून घेण्याचे महानगरपालिकेस अधिकार राहतील. तसेच कंत्राटदाराकडुन बेजबाबदारपणे खालील बाबतीत कराराचा भंग नियमितरित्या होत असल्यास नागरी संस्था करार संपुष्टात आणु शकेल.

अ) देखभाल दुरूस्तीच्या आवश्यकतेकडे सारखे दुर्लक्ष/विलंब होत असेल किवा मापकाप्रमाणे काम न केल्यास.

ब) ग्राहकांच्या सोईबाबत तक्रारी येत असल्यास.

क) कन्सेशन फी महानगरपालिकेस नियमित न भरल्यास.

ड) वाहन तळावर वाहनधारकांकडुन विहीत रक्कमेपेक्षा जास्त रक्कम वसुलीबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास

७) महानगरपालिकेने नेमलेले प्रकल्प सल्लागार (Consultant) व प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंसी (PMC) यांचे शुल्क महानगरपालिकेकडे जमा करणे.

८) कराराचा कालावधी संपल्यानंतर कंत्राटदाराने योजनेचा ताबा महानगरपालिकेकडे सोपवावा सदरची प्रक्रिया करार संपण्याच्या ६ महीने अगोदर सुरू करावी, महानगरपालिकेने योजनेची तपासणी करून काही निश्चित केलेली कामे अपुर्ण असल्यास त्वरीत कंत्राटदाराला कळवुन दोन महीन्याचे आत पुर्ण करावी

१०) **नागरी संस्थांची जबाबदारी :—**

१) खाजगी कंत्राटदाराशी करारनामा झाल्यावर महानगरपालिकेने योजनेसाठी जागा उपलब्ध करून देणे. तथापी उल्हासनगर स्टेशन परिसराच्या विकासाकरीता नियोजीत असलेल्या जागे संबंधी सर्व आवश्यक कागदपत्रे मिळवीणे व जागेसंबंधीचे असलेले वाद मिटवणे खाजगी संस्थेस बंधन कारक असेल.

२) कराराच्या दरम्यान, आवश्यक परवानग्या, मान्यता मिळविवयासाठी कंत्राटदारास सहकार्य करणे.

३) देखभाल दुरूस्तीच्या दरम्यान किरकोळ काम कंत्राटदाराला करण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करणे.

४) महानगर पालिकेच्या मालकीच्या जागेत असलेले सुलभ सौचालय बांधकामात येत असल्याने ते तोडणे व इतर योग्य ठिकाणी नव्याने बांधणे.

११) **स्टेशन परिसराच्या विकासाची निकड :—**

ते स्टेशन परिसर हरित क्षेत्र दर्शविण्यात आला आहे. सन १९७४ सालच्या विकास आराखडयानुसार परंतू सद्याची परिस्थितीत पुर्णपणे वेगळी आहे. उल्हासस्टेशन येथुन जाणाऱ्या व येणाऱ्या प्रवाशांची संख्या प्रचंड आहे. ह्या प्रवाशांना पार्कींग, रिक्षा, बस, स्टेशन परिसरात चांगले रस्ते, खरेदी गृह, उपहार गृह इत्यादी प्रकारच्या सुविध देणे ही काळाची गरज आहे. स्टेशन परिसर हा विकासाचे केंद्र (Growth Cennter) असल्यामुळे त्याचा विकास करणे क्रम प्राप्त आहे. अन्यथा पुर्ण शहराच्या विकासावर विपरीत परिणाम होणार आहे. तरी सद्याच्या आरक्षणास किरकोळ फेरबदल करून/प्रारूप विकास आराखडयातील प्रयोजनाप्रमाणे स्टेशन परिसराच्या विकासासाठी मंजूरी मिळणे आवश्यक आहे.

१२) सदर जागेवर मंजुर विकास आराखडयाप्रमाणे हरीत क्षेत्र असे आरक्षण आहे. स्टेशन परिसराची सध्याची अत्यंत दयनीय अवस्था व प्रावाश्यांची गैरसोय पहाता स्टेशन परिसराकरीता तातडीने विकास करणे गरजेचे आहे. सध्या स्थितीत स्टेशन परिसरापर्यंत परिवहन सेवेच्या बसेस पोहचू शकत नाही. रिक्षा स्टॅन्ड नाही. त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होते.

महानगरपालिकेने स्टेशन परिसराचा विकास करण्यासाठी वालधुनी नाल्यावर पुल बांधणे, वालधुनी नाल्याचे सुशोभीकरण करणे, रिक्षा स्टॅन्ड बांधणे, बहुमजली वाहनतळ उभारणे, बस टर्मिनल उभारणे, स्टेशन परिसर सुशोभीकरण करणे, व्यापारी संकुलन बांधणे, भाजी मार्केट/मच्छी मार्केट बांधणे, गणेश विसर्जन घाट विकसीत करणे इ. असे विविध प्रस्ताव करण्याचे मानस केलेले आहे. तथापी हे प्रस्ताव मंजुर विकास योजनेप्रमाणे हरीत विभागात येत असुन, प्रारूप विकास योजनेत विविध आरक्षणांनी बाधीत होत आहे. तथापी वरील सर्व सुखसोयी सार्वजनिक स्वरूपाची असुन, सध्या उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे तयार करण्यात येणा—या सुधारीत विकास योजनेत त्याप्रमाणे वापर दर्शविण्यात येत आहे. तथापी ही सुधारीत विकास योजना प्रसिध्द होऊन मंजुरीसाठी बराच कालावधी लागणार असुन, सार्वजनिक सुख सोयीच्या दृष्टीने तसेच जनहिताचे दृष्टीने प्रारूप विकास योजना मंजुर होण्यापूर्वी ही सुविधा करण्यासाठी ‘‘विशेष बाब’’ म्हणुन शासनाची पूर्व परवानगी घेणे गरजेचे आहे. शासनाने या प्रस्तावास तत्वत: मान्यता दिल्यास त्याप्रमाणे ही सार्वजनिक सुखासोयी विकासीत करता येतील. तरी त्याप्रमाणे प्रस्ताव तत्वत: मान्यतेसाठी शासनास सादर करणे गरजेचे आहे.

१३) **प्रशासनाचा प्रस्ताव :—**

सबब महानगरपालिकेचे हित, प्रकल्प पुर्ण होण्यास लागणारा कालावधी, आर्थिक दायित्व, महसुली उत्पन्न, या सर्व गोष्टीचा सर्वकष विचार करता उल्हासनगर रेल्वे स्टेशन लगत असलेल्या रिकाम्या जागेत ‘‘बांधा वापरा व हस्तांतरण करा’’ तत्वावर भूखंड विकसीत करणे महानगरपालिकेच्या हिताचे आहे. तरी सदर प्रकल्प राबविणे व प्रारूप विकास आराखडयात आवश्यक तरतुद करण्यासाठी प्रस्तावास मा. महासभेची मंजूरी आवश्यक आहे. .

सदर प्रस्तावास मा. महासभेची मंजुरी आवश्यक असल्याने, प्रस्ताव मा. महासभेच्या मंजुरीसाठी ठेवणेस प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५० <u>दिनांक:—२०/१०/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी
अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर स्टेशन परिसराचा ''बांधा वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्वावर विकास व त्या प्रयोजनार्थ आवश्यकतेप्रमाणे नविन विकास आराखडयात आरक्षणाची तरतूद किंवा मंजूर विकास आराखडयात आरक्षणात बदल करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>मा. महापौरजी, काही सूचना देवु इच्छितात. २२ ते २७ तारखेपर्यंत गोल मैदान येथे महिला बचत गटांचा जो कार्यक्रम आयोजित केला आहे त्याबाबत त्या सूचना देत आहेत.

<u>महापौर :—</u>येत्या २२ तारखेला उल्हासनगर महापालिकेतर्फे दिवाळी बाजारपेठेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सर्व सन्माननिय सदस्यांनी त्या दिवाळी बाजारपेठेला भेट देवुन त्या बाजारपेठेची शोभा वाढवावी. ही विनंती. बाजारपेठेची वेळ सांयकाळी ४.०० ते १०.०० अशी आहे. आणि सर्वांना दिवाळीच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा।

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>मा. महापौर महोदया, आणखी एक विषय आहे, ब—याच दिवसापासुन वृत्तपत्रामध्ये एक बातमी येत आहे. आपल्या महानगरपालिकेमध्ये आरोग्य विभागामध्ये ज्या महिला अधिकारी कार्यरत आहे, श्रीमती संगिता धायगुडे महोदया, त्यांच्याबद्दल ब—याचशा वर्तमानपत्रामध्ये वृत्त छापुन आलेले आहेत. हा एक महिलांवर अन्याय आहे असे मला वाटते, श्रीमती धायगुडे मॅडम यांच्याबाबतीत बोलायचे झाले तर या शहराला सतावणारा कच—यांचा जो प्रश्न होता तो त्यांनी नियंत्रणात आणला होता. आणि अचानक काय झाले, प्रशासनाने काय केले आम्हांला माहित नाही. आणि त्यानंतर दस—याला देखील कच—याचे फार मोठे साम्राज्य उल्हासनगरमध्ये दिसुन आले आहे आणि आता दिवाळीचा सण आहे. त्यामध्ये लोक आपल्या घराची रंगरंगोटी करत असतात. आणि कच—याची फार मोठी समस्या निर्माण होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने या गोष्टीचा विचार करावा नाहीतर आम्हांला याबाबतीत वेगळे काही निर्णय घ्यावे लागतील. तर श्रीमती धायगुडे मॅडम त्यांच्यावर अन्याय होता कामा नये आणि त्या ज्या पदावर कार्यरत होत्या त्या पदावर त्यांना रुजु करावे जेणेकरुन कच—याच्या ज्या समस्या आहेत त्या सुटुन जातील. आणि वारंवार वर्तमानपत्रामध्ये जे छापुन येते की महिलांवर अन्याय झाला आहे तो आपण उल्हासनगरच्या संदर्भात कोठेतरी संपृष्टात आणु या असे मला वाटते.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—</u>श्री. प्रशांत धांडे यांचे मी समर्थन करते. कारण की महिलांकडे इकडे सर्व दुर्लक्ष होत आहे. मा. आयुक्त साहेब यांनी जरा लक्ष दयावे. श्रीमती धायगुडे या अतिशय चांगल्या प्रकारे काम करत आहेत. आणि दस—याच्या दिवशी सर्वांनी बघितले की कच—याची फारच मोठी समस्या निर्माण झाली होती. यासाठी अशी विनंती आहे की त्यांना त्या पदावर पुन्हा रुजु केले पाहिजे. आपल्या महापालिकेस एक चांगली सक्षम महिला अधिकारी लाभलेली आहे. श्रीमती विजया कंठे या ज्या नविन महिला अधिकारी आल्या आहेत त्यांना उप—आयुक्त पदाचा कार्यभार का देत नाहीत. यावरुन आम्हांला थेट आरोपच

करायचा आहे की तुम्ही महिलांकडे दुर्लक्ष करत आहात. आणि त्यानंतर मागील वेळेस मी महिला बालकल्याण समितीची सभापती असतांना विशेष अधिकारी पदासाठी पत्र दिले होते, दोन वर्षापासुन त्याबाबतही कार्यवाही होत नाही. आता श्रीमती प्रतिभा कुलकर्णी या फ्री आहेत त्यांना विशेष अधिकारी पदावर नेमणुक का दिली जात नाही? यास्तव माझी विनंती आहे की, महिलांचा सन्मान ठेवावा. आणि असे नाही की महिला कुठलेही काम करु शकणार नाहीत. म्हणुन श्रीमती धायगुडे महोदयांना तुम्ही त्यांच्या पदावरुन जे हटविले आहे यासाठी माझी तुम्हांला विनंती आहे की त्यांना पुन्हा त्या पदावर नियुक्ती दयावी. व श्रीमती विजया कंठे या संवर्ग एकच्या अधिकारी असुन त्यांना उप–आयुक्त पदावर नियुक्ती देण्यात यावी.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–मा. आयुक्त साहेब, या विषयाबाबतीत तुम्ही गंभीर आहात की नाहीत? आम्ही येथे फक्त ओरडत आहोत असे वाटते का तुम्हांला?

सदस्य श्री. सुरेश जाधव :–स्त्रियांचा अपमान करत आहात का?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–आपण स्त्रियांचा अपमान करणार काय? हा विषय महत्वाचा वाटत नाही का आपणाला? एवढा गंभीर विषय आहे, तुम्हांला मी सांगितल की वर्तमानपत्रामध्ये सारखे सारखे वृत्त छापुन येत आहे.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :–माझा तुमच्यावर आरोप आहे की, कचरा ठेकेदा तुमचे प्रशासन चालवत आहे. श्रीमती धायगुडे मॅडमने ॲन्थोनीला विरोध केला होता म्हणुन त्यांना तेथुन हटविण्यात आले आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–आयुक्त साहेब, आजची जी महासभा बघितली असता असे दिसून येते की या ज्या ॲन्ग्रीवुमेन आहेत त्या तुम्हांला पुढील महासभेत सोडणार नाहीत. महिलांचे राज्य सुरु झालेले आहे. वरच्या स्तरावर ५० टक्के आरक्षण सुरु झाले आहे.

महापौर :–मा. आयुक्त साहेबांना मी असा आदेश देते की, श्रीमती धायगुडे यांच्याकडुन जे काही कार्यभार काढुन घेतलेले आहेत ते त्यांना परत सोपविण्यात यावेत.

सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :–मा. महापौर महोदया, जेव्हापासुन श्रीमती धायगुडे महोदया यांच्याकडुन आरोग्य विभागाचा कार्यभार काढुन घेतलेला आहे, तेव्हापासुन शहरात कच–याचे साम्राज्य पसरलेले आहे. ज्या दिवशी महासभा असते त्यादिवशी ॲन्थोनीचे कामगार कचरा उचलण्यास येतात. इतर वेळेस महिनाभर कचरा असाच पडलेला असतो. मा. महापौर महोदया आपण आदेश दया की श्रीमती धायगुडे यांना परत त्या पदाचा कार्यभार देण्यात यावा, धन्यवाद।

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–मा. महापौरजी, २२ तारखेला जो गोलमैदान येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे आणि त्याची आपणाकडून जी निमंत्रणपत्रिका काढण्यात आलेली आहे, त्यामध्ये आरपीआय गटनेत्याचे नाव नाही. कॉंग्रेसच्या गटनेत्याचे नाव आहे.

महापौर :–सर्व गटनेत्यांची नाव त्यामध्ये लिहिलेली आहेत.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–नाही. निमंत्रणपत्रिका पाहुनच मी बोललो आहे.

महापौर:–महिलांचा कार्यक्रम असल्यामुळे

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–महिलांचा कार्यक्रम आहे हे मी मान्य करतो परतु इतर गटनेत्यांची नावे कशी? तुम्हांला त्याबाबत गंभीर वाटत नाही?

महापालिका सचिव :–कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दया.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>सचिवांना आमच्या कामाबद्दल गंभीरता वाटत नाही. इतर गटनेत्याची नावे कशी छापली?

<u>महापालिका सचिव :—</u>मा. महापौरांचा आदेश आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>राष्ट्रगित घ्या, राष्ट्रगित.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>श्री. मोरे साहेब, नाव नाही म्हणुन कशाला एवढे गंभीर होता? महिलांचा कार्यक्रम आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.४१ वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २०/१२/२०१०

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/१२/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

८

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक २०/१२/२०१० रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१८.महापौर —— श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

१९.उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३० | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३१ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३२ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३३ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ७ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ३४ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| ८ | श्री. मोरे भानजी भिकारी | ३५ | श्री. शेखर केशव यादव |
| ९ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ३६ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १० | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | ३७ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ३८ | श्री. किशोर जग्यासी |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ३९ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १३ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४० | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४१ | श्रीमती ज्योती शाम माने |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४२ | श्रीमती लता शांताराम निकम |
| १६ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४३ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १७ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४४ | श्री. मोहन साधवाणी |
| १८ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ४५ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| १९ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ४६ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २० | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ४७ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २१ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ४८ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २२ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ४९ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २३ | श्री. लाल पंजाबी | ५० | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| २४ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ५१ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २५ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ५२ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| २६ | श्रीमती शकुंतला पाटील | ५३ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| २७ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ५४ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| २८ | श्री.एडके गणपत गोविंद | ५५ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| २९ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ५६ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती संगीता राजेश कंडारे, २. श्री. रामसागर जनार्दन यादव, ३. श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद, ४. श्री. राजू जग्यासी, ५. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ६. श्रीमती जया प्रकाश माखीजा, ७. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ८. श्री. आयलानी कुमार उत्तमचंद, ९. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे, १०. श्री. मोहन (गारो) रामरख्यानी, ११. ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी, १२. श्री. ढोके जनार्दन किसनराव, १३. श्रीमती वेलकर सुरेखा राजन, १४. श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी, १५. श्रीमती करोतीया मालती राधाचरण, १६. श्री. बोडारे धनंजय बाबूराव, १७. श्रीमती बोडारे वसुधा धनंजय, १८. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे, १९. श्रीमती सुमन गजानन शेळके, २०. श्री. रमेश महादेव चव्हाण, २१. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, २२. श्रीमती चेनानी ज्योती रमेश, २३. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), २४. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी, २५. श्री. राजेश नानीकराम वधारीया

श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

११०. श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त
१११. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
११२. श्री. सी.पी. सिंग, सहा. संचालक, नगररचना
११३. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
११४. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
११५. श्री. एम.जी. गिरगावकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
११६. श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
११७. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
११८. श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
११९. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१२०. श्री. घोलप, प्रभाग अधिकारी
१२१. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१२२. श्री. बुडगे, कनिष्ठ अभियंता, नगररचनाकार
१२३. कु. दिपमाला गोपाळे, प्रकल्प अधिकारी
१२४. श्री. नंदु समतानी, मुख्य लिपिक, साप्रवि

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती अमिता संखे
४. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे.........

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, या महाराष्ट्राचे सुपुत्र लोकशाहीर आणि लाडके लोकनायक श्री. विठ्ठल उमप यांचे नुकतेच काही दिवसापूर्वी निधन झाले आहे. आणि त्याप्रित्यर्थ त्यांना या आपल्या सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पित करावी अशी मी विनंती करतो.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>तसेच थोर मराठी साहित्यकार श्री. नारायण सुर्वे यांचे सुध्दा नुकत्याच काही दिवसापुर्वी निधन झाले आहे. त्यांना सुध्दा श्रध्दांजली वाहीली जावी.

महापालिका सचिव :—कृपया मौन धारण करावे.

महापौर :—या विषयी पुढीलप्रमाणे शोक प्रस्ताव संमत करण्यात येत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे
अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

शोक प्रस्ताव

महाराष्ट्राचे थोर लोकशाहीर आणि लोकनायक श्री. विठ्ठल उमप यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झालेले आहे.

तसेच मराठी साहित्यकार श्री. नारायण सुर्वे यांचे सुध्दा काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

वर उल्लेख केलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यांस चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ५० अ    दिनांक:—२०/१२/२०१०

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. विठ्ठल उमप व श्री. नारायण सुर्वे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मा. महापौरजी, आज दत्त जयंती असल्यामुळे आजची सभा २८ तारखेपर्यंत स्थगित केली जावी असे आम्हांस वाटते. २८ डिसेंबर २०१० पर्यंत स्थगित करण्यात यावी.

महापौर :—२८ डिसेंबर, २०१० पर्यंत ही सभा स्थगित करायची? सर्वसंमतीने?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—२९ डिसेंबर पर्यंत सभा स्थगित करा.

महापौर :—२९ डिसेंबर पर्यंत? सभा स्थगित करायची? कुणाला काही हरकत आहे का? २९ तारखेस ४.०० वाजेपर्यंत?

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, व सर्व सन्माननिय सदस्यांना माझी विनंती आहे की, आता स्थगित केलेली ही जी सभा आहे ती २९ डिसेंबर रोजी आपण ठेवत आहोत. वर्षभरामध्ये कोण जिवंत राहते, कोण मरते हे सांगता येत नाही. त्याबाबतीत माझी एक सूचना आहे की ३१ डिसेंबर साजरा करण्यासाठी आम्ही गोवा वगैरे अशा ठिकाणी बाहेर जात आहोत. त्यासाठी २९ तारखेला आम्ही जाणार असल्याने ही सभा कृपया २८ तारखेला ठेवली तर बरे होईल.

महापौर :—आताच काही वेळेपूर्वी सभागृह नेता यांनी सभेसाठी २८ च्या ऐवजी २९ तारीख सुचविली आहे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>नाही, नाही २८ तारखेला सभा ठेवा. २८ तारखेला....

<u>सदस्य श्री. तुलसीदास वसिटा :–</u>२८ तारखेला ठेवा.

<u>महापौर:–</u>माझी सूचना आहे की, २७ तारखेला सभा ठेवली जावी.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>महापौर महोदया, सभेसाठी २८ तारीख चांगली आहे ना?

<u>महापौर :–</u>ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>२८ तारखेस ४.०० वाजता?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>होय, होय.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रशासनाकडुन आयत्यावेळचा एक विषय आला आहे. तो जर सभेच्या कामकाजात सामावुन घ्यायचा असेल तर त्या विषयी आपण निर्णय घ्या. विषय असा आहे......

## आयत्यावेळचा विषय

**विषय** :– ''जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत'' पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेवर विशेष मोहिम राबविणे प्रयोजनार्थ प्रशासनाने सुचविलेल्या अटी, शर्ती व निर्बंधांवर नविन नळ जोडणी देणेस व दर निश्चितीस मान्यता देणे.

<u>काही सदस्य :–</u>हा विषय अतिशय तातडीचा आहे. स्विकृत केला जावा.

<u>महापालिका सचिव :–</u>सर्वसंमतीने? स्विकृत?

<u>महापौर :–</u>सदरहु विषय कार्यसूचीवर सामावून घेण्यास सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

**विषय** :– आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेणे बाबत

सूचकाचे नांव :– श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नांव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

<u>महासभा ठराव क्र. :– ५० ब</u> <u>दिनांक : २०/१२/२०१०</u>

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील एका विषयास या सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

**विषय**:– ''जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत'' पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेवर विशेष मोहिम राबविणे प्रयोजनार्थ प्रशासनाने सुचविलेल्या अटी, शर्ती व निर्बंधांवर नविन नळ जोडणी देणेस व दर निश्चितीस मान्यता देणे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापौर :—</u>ही सभा मंगळवार दिनांक २८/१२/२०१० रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करणेकामी सर्वानुमते पूढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

सुचकाचे नाव :—श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :—श्री. बी.बी. मोरे

<u>स्थगित प्रस्ताव</u>

आज दत्त जयंती असल्यामुळे आजच्या या सभेचे कामकाज स्थगित करुन ही सभा मंगळवार दिनांक २८/१२/२०१० रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ५० क</u> <u>दिनांक : २०/१२/२०१०</u>

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता आज दिनांक २०/१२/२०१० रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज मंगळवार दिनांक २८/१२/२०१० रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ४.२५ वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २८/१२/२०१०

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २८/१२/२०१० रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

# ८— अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक २०/१२/२०१० रोजी सायंकाळी ४.०० वाजता घेण्यात आली होती. सदर सभा स्थगित केल्याने ती सभा मंगळवार दिनांक २८/१२/२०१० रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

१. महापौर —— श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

२. उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३३ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३४ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३५ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ६ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ३६ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ७ | श्री. मोरे भानजी भिकारी | ३७ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ८ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ३८ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ९ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान | ३९ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १० | श्री. विजय खंडु सुपाळे | ४० | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ११ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४१ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १२ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४२ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १३ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४३ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १४ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४४ | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| १५ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४५ | श्री. किशोर जग्यासी |
| १६ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ४६ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १७ | श्री. राजू जग्यासी | ४७ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १८ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ४८ | श्रीमती ज्योती शाम माने |
| १९ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ४९ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २० | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २१ | श्री. लाल पंजाबी | ५१ | श्री. मोहन साधवाणी |
| २२ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ५२ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २३ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ५३ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २४ | श्रीमती शकुंतला पाटील | ५४ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २५ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ५५ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २६ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ५६ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २७ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ५७ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| २८ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ५८ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| २९ | श्री.एडके गणपत गोविंद | ५९ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३० | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६० | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३१ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ६१ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ३२ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती संगीता राजेश कंडारे, २. श्री. रविंद्र दशरथ बागूल, ३. श्रीमती निलम प्रेमसिंग रावत, ४. श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी, ५. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ६. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ७. डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी, ८. श्री. आयलानी कुमार उत्तमचंद, ९. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम, १०. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ११. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे, १२. श्री. लालबिहारी बुझारत यादव, १३. श्री. शेखर केशव यादव, १४. श्री. सुरेश मधुकर जाधव, १५. श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी, १६. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), १७. श्रीमती वनवारी मोना अशोक, १८. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), १९. श्री. सुनिल साहेबराव गंगवानी, २०. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी

श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
४. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
५. श्री.जी.टी.जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
६. श्री. माधव जवांदे, शहर अभियंता
७. श्री. एम.जी. गिरगावकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
८. श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
९. श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
१०.श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
११.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१२.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१३.श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त, अ.बां.नि.वि.
१४.डॉ. सागर घोलप, प्रभाग अधिकारी
१५.श्री. गंगारामानी, उप अभियंता, विद्युत
१६.श्री. खामितकर, कनिष्ठ अभियंता, नगररचनाकार
१७.श्री. नंदु समतानी, मुख्य लिपिक, साप्रवि
१८.श्री. भगवान कुमावत, प्र.प्रभाग अधिकारी
१९.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
२०.कु. दिपमाला गोपाळे, प्रकल्प अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती अमिता संखे
४. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.१३ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

उप–महापौर :–माझी एक सूचना आहे की, आर.पी.आय., उल्हासनगर शहर जिल्हा अध्यक्ष श्री. नाना बागुल यांच्या मुलीचे निधन झाले आहे, तर त्यासाठी दोन मिनिटे मौन धारण करुन श्रध्दांजली अर्पित करण्यात यावी.

---

सुचकाचे नाव :– श्री.बी.बी. मोरे
अनुमोदकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

<u>शोक प्रस्ताव</u>

आरपीआयचे उल्हासनगर शहर जिल्हा अध्यक्ष श्री. नाना बागुल यांची मुलगी श्रीमती स्वाती सचिन सुट्टे हिचे दिनांक २१ डिसेंबर २०१० रोजी अपघाती निधन झाले.

वर उल्लेख केलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यांस चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ५० ड</u> <u>दिनांक:—२८/१२/२०१०</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती स्वाती सचिन सुट्टे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात. यावेळेस सायंकाळचे ४ वाजुन १३ मिनिटे झाली आहेत.

प्रश्नोत्तरे.........

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>मा. महापौरजी, २० ऑक्टोंबर २०१० रोजी जी महासभा झाली होती. त्या सभेत आयुक्तांच्या स्थानी श्री. म्हसाळ साहेब हे होते. त्यांनी सांगितले होते की, आपणांस एक आठवडयाच्या आत आपल्या प्रश्नाचे उत्तर मिळेल. परंतु दोन महिने झाले तरी अदयाप मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. याबाबत आपणांस काय म्हणायचे आहे? एका प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी आपणांस एक वर्षाचा कालावधी लागतो? आपला नगररचना विभाग काय काम करत आहे? तो विभाग योग्य उत्तर का देत नाही? आपणच सांगितले होते ना की, आपणांस एक आठवडयात उत्तर मिळेल म्हणुन. एकतर सांगा की, आम्ही उत्तर देवु शकत नाहीत, देवु नका उत्तर.

यावेळी सदस्य श्री. भजनलाल रामचंदानी, श्री. इदनानी राजु, श्री. बच्चाराम रुपचंदानी, श्री. महेश सुखरामानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, सन्माननिय सदस्यांनी आरक्षणबाबतची जी माहिती विचारली होती, ती माहिती नगररचना विभागाने तयार करायला घेतली आहे. पुढचा प्रश्न चर्चेस येईपर्यंत ती माहिती नगररचना विभागाचे अधिकारी घेवुन येतील.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>माझ्या दोन प्रश्नांची उत्तरे बाकी आहेत. माझ्या एका प्रश्नाचे अर्धवट उत्तर दिले आहे. त्याबाबतचे कागदपत्र मी आपणांस दिले आहेत. त्याबाबतीत आपण सांगितले होते की, या

प्रश्नाचे सविस्तर उत्तर आपणांस एक आठवडयात मिळेल. ते अदयाप मला मिळालेले नाही. दुसरे मी असे विचारले होते की, आपले आरक्षित भुखंड किती आहेत, त्याची यादी आपण दिली आहे. त्याबाबतीत मी आपणांस अशी विचारणा केली होती की, अनुक्रमांक १ ते १९ वर दर्शविलले भुखंड हे खेळाच्या मैदानासाठी आरक्षित आहेत. आता त्याठिकाणी खेळाची मैदाने आहेत की नाहीत? त्याबाबतीत आपण सांगितले होते की आम्ही प्रत्यक्ष जागेची पाहणी करुन याविषयी आपणांस सांगु. त्यानुसार त्या जागांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी कुणी अधिकारी तेथे गेला आहे का?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>या भुखंडांची पडताळणी करण्यासाठी नगररचना विभागास सांगण्यात आले होते. त्यांनी या विषयी जी काही तयारी केली आहे ती सर्व माहिती पुढील प्रश्न चर्चेस येईपर्यंत नगररचना विभागाचे संबंधित अधिकारी घेवुन येतील.

यावेळी सदस्या श्रीमती सुजाता रिजवानी, श्रीमती शिला मनसुलकर, श्रीमती शकुंतला पाटील, श्रीमती कविता सिरवानी, श्रीमती रजनी महाडिक, श्रीमती चंद्रा टेकचंदानी, श्रीमती मंजु पोपटानी, श्रीमती सुरेखा वेलकर यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>अशा प्रकारचे उत्तर देवुन दोन महिने उलटून गेले आहेत. २० ऑक्टोंबरची ती तारीख होती आज २८ डिसेंबर आहे. दोन महिन्यामध्ये या लहानश्या प्रश्नाचे उत्तर आपण तयार करु शकत नाहीत. मग नगररचना विभाग ठेवता कशाला? बंद करा ना?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>पुढील प्रश्न चर्चेस येईपर्यंत या प्रश्नाची माहिती ते घेवुन येतील. १० मिनिटामध्ये ते माहिती घेवुन येतील.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>१० मिनिटांत?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>होय.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. २३८ हा श्रीमती वसुधा बोडारे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २३८ :—</u> उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत बांधण्यात आलेल्या इमारतींना शासन नियमानुसार / महापालिका ठरावानुसार सौर उर्जा/सोलार एनर्जी प्रकल्प राबविणे आवश्यक केले आहे. त्यानुसार खालील प्रशावर महासभेत चर्चा होवून सुचक, समाधानकारक, सविस्तर चर्चा होवून माहिती मिळावी ही विंनती.

प्रश्न क्रमांक १ (अ) नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी देण्यात आलेल्या किती इमारतींनी शासन नियमानुसार/महापालिका ठरावानुसार सौर उर्जा प्रकल्प/सोलार एनर्जी प्रकल्प राबविले आहेत? ज्या इमारतींनी सौर उर्जा प्रकल्प/सोलार एनर्जी प्रकल्प राबविला नाही त्यांचेवर महापालिका प्रशासनाने नोटीसा देवून कोणती कारवाई केली आहे? का अद्यापपर्यंत कारवाई केलेली नाही?

<u>उत्तर:—</u>शासनाच्या निर्देशानुसार जागेचे क्षेत्रफळ ३०० चौ.मी. पेक्षा कमी नसावे. तथापि, उल्हासनगर शहरामध्ये ब्रिटीश कालीन बॅरेक्य/ब्लॉक्स असल्याने त्यांचे क्षेत्रफळ ३०० चौ.मी. पेक्षा कमी असल्याने तसेच ज्या प्लॉटचे क्षेत्रफळ ३०० चौ.मी. पेक्षा जास्त असणाऱ्या इमारतीमध्ये प्रकल्प राबविण्याबाबत महानगरपालिकेकडे प्रस्ताव मंजूर करते वेळेस नकाशामध्ये विकासकाकडुन प्रयोजन करुन नकाशे मंजूर करण्यात येतात.

<u>मा. सदस्य श्रीमती वसुधा बोडारे:—</u>आता आम्हांला प्रश्न विचारायलाच लाज वाटायला लागली आहे. नगररचनाकार नाहीत. प्रत्येक सभेत तेच, तेच उत्तर काय करायचे? उभे राहायचे, थोडे फार बोलायचे आणि त्यांनी काहीही उत्तर दयायचे नाही. आठ, आठ, नऊ, नऊ महिने प्रश्न प्रलंबित राहतात. त्यांनी कितीतरी प्लान मंजुर केले आहेत. त्याबाबतीत मला एवढेच म्हणायचे आहे की, मी प्रश्न विचारल्यानंतर किती प्लान मंजुर झाले? आणि झाले असतील तर त्यांनी त्यात ही अट का नाही टाकली? अंबरनाथ—बदलापुर येथिल ब—याचशा सोसायटयामध्ये आपण पाहतो. तेथे रेन वॉटर हावेस्टींग किंवा इतर प्रोजेक्ट निर्माण केले आहेत तर

तेथिल जे ठेकेदार असतात ते त्याबाबतचे पैसे वसुल करु शकतात. लोक पैसे देवुन लाईटची सोय विकत घ्यायला तयार असतील परंतु हे लोक प्लानमध्ये ही अटच टाकत नाहीत. अट टाका आणि त्यानंतर प्लान मंजुर करा ना? कितीतरी समजुन सांगितले परंतु आठ, नऊ महिने झाले तरी काही झाले नाही, काय फायदा? दर मिटींगला उभे राहायचे दोन, चार त्यांना शिव्या दयायच्या. झाले.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–सन्माननिय महापौर, उप–महापौर, सन्माननिय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या बाबतीमध्ये दिनांक २७/१२/२०१० ला नगररचना विभागाला एक आदेश देण्यात आलेला आहे. नगररचना विभागाने दिलेल्या परवानगीमध्ये जर रेन वॉटर हार्वेस्टींग आणि जेएनएनयुआरएम अंतर्गतच्या ज्या काही पुर्तता करायच्या होत्या, त्याबाबतीत जर अटी टाकल्या नसतील तर अशा त्या बांधकामांना बांधकाम पुर्णत्वाचे दाखले देण्यात येवु नयेत. या प्रकारचे आदेश देण्यात आलेले आहेत. ते सहा. संचालक नगररचना व नगररचनाकार या दोघांनाही देण्यात आलेले आहेत. त्याची प्रत जर आपणांस पाहायची असेल तर ती माझ्याकडे आहे.

यावेळी सदस्या श्रीमती मालती करोतिया या सभागृहातुन बाहेर गेल्या. 

सदस्य श्री.बी.बी.मोरे :–श्री. बोडारे साहेब, मी एक मिनिट बोलु इच्छितो, सन्माननिय महापौरजी उप–महापौर आणि आजचे आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्यांना माझी एक विनंती आहे. दोन महासभा झाल्या महासभांना आयुक्त का येत नाहीत? असा कोणी प्रश्न विचारत नाहीत. आम्हांला काही अत्यंत तातडीची कामे असतात. शहरातील लोकांनी आमच्यावर विश्वास ठेवून आम्हांला निवडून दिलेले असते. आणि त्याची कामे होणे फार अगत्याचे असते. आणि म्हणुन आम्ही सर्व कामे बाजुला ठेवून या महासभेला हजर राहतो. मात्र आयुक्त हजर राहत नाहीत. कालच्याच दिवशी आयुक्त रात्री ७ ते ८ वाजेपर्यंत आपल्या दालनात बसले होते आणि आज येथे हजर राहत नाहीत. म्हणजेच त्यांना महासभेचे महत्व वाटत नाही काय? दोन महासभांना ते हजर नाहीत. आमच्या नगरसेवकाने दोन महासभांना परवानगी न घेता जर उपस्थिती लावली नाही, तर त्यास अनर्ह करण्यापर्यंतची वेळ येते. आणि महासभांना उपस्थित न राहणा–या आयुक्तांच्या बाबतीत काय करायचे?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–त्यांना परत पाठवा.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :–सर्व सदस्यांना, सर्व पक्षांच्या सदस्यांना माझी विनंती आहे की, आज येथे ठराव पारीत करावा. येथे जो कोणी आयुक्त येतो तो आपले चामडी बचावचे काम करतो. आणि निघुन जातो. म्हणजे आमच्या शहराचा सत्यानाश करण्यासाठी हे अधिकारी बसले आहेत असे मला वाटते. आणि म्हणुन आजच्या दिवशी सर्व सन्माननिय सदस्यांनी मिळुन एक ठराव करावा आणि तो ठराव शासनाला पाठवावा. जर आयुक्त असे करत असतील तर आम्हांला त्यांची जरुरत नाही. त्यांना परत पाठवावे. आता आपले सन्माननिय म्हसाळ साहेब आहेत. ते प्रश्नांच्या बाबतीत काय उत्तर देतील आणि काय निर्णय घेतील? श्री. म्हसाळ साहेब, सांगा तुम्ही निर्णय घेणार आहात? असे बरेचसे प्रश्न आज येथे आहेत. बारा इमारतींचा प्रश्न आहे. असे दुसरे दोन तीन प्रश्न आहेत. त्याबद्दल तुम्ही निर्णय घेणार आहात? बोला.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–नाही, साहेब, निर्णय घेण्याचे तुम्हांला अधिकार आहेत काय? श्री. मोरे साहेबांनी विचारले की, आपण निर्णय घेवु शकता काय?

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–निर्णय घेण्याचे तुम्हांला अधिकार नाहीत. त्यामुळे तुम्ही काय करणार हा कागद घेणार आणि आयुक्तांच्या पुढे ठेवणार. असे होत असेल तर आमचे सन्माननिय उप–महापौर सुध्दा त्याठिकाणी करु शकतील.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–सन्माननिय आयुक्त हे मंत्रालयामध्ये गेले आहेत. उल्हासनगर महानगरपालिकेच्या विकास कामांच्या योजनांबाबतच्या महत्वाच्या बैठकीसाठी गेले आहेत. आणि त्यामुळे आजच्या महासभेत बसण्यासाठी मला जे अधिकार दिले आहेत......

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>मी मान्य करतो की, नगररचनाकाराने सर्व मंत्रालय खरेदी करुन घेतले आहे. आणि ज्या ज्या वेळेला महासभा असते त्या वेळेला नगररचनाकार मंत्रालयात बसलेले असतात. आणि उल्हासनगर शहरामध्ये ते येत नाहीत. आणि आयुक्तांनी सुध्दा आता तेच केले आहे. आता बीएसयुपीचा येथे प्रश्न आलेला आहे. जर ती योजना पुर्ण केली नाही ते काम पुर्ण केले नाही तर तो पैसा परत जाईल. ते काम रेंगाळत राहिले तर त्याबद्दल कोण जबाबदार राहिल? आयुक्त आहेत परंतु आयुक्तांना ते जरुरीचे वाटत नाही. आणि म्हणुन आम्ही या महासभेमध्ये का ओरडतो आहे? आम्ही सर्व सन्माननिय सदस्य ८१ सदस्य येथे सभेत येतो प्रत्येक सभेला हजर राहत असतो. बोलत असतो. आज आमच्या सदस्या श्रीमती सुर्वे मॅडम श्रीम. बोडारे मॅडम यांनी किती प्रश्न विचारले आहेत. प्रत्येक महासभेत तोच तोच प्रश्न हे काय चाललेले आहे? त्याचा अर्थ असा की, आम्ही सन्माननिय नगरसेवक, लोकप्रतिनिधी यांना काही किंमतच नाही? आणि असे होत असेल तर ज्या दिवशी महासभा असेल त्या दिवशी जर आयुक्त व नगररचनाकार हे महासभेत उपस्थित नसतील तर आम्ही सभागृहाच्या प्रवेशद्वारास कुलुप लावु आणि सर्व सन्माननिय सदस्य तेथे बसु. आम्ही त्यांच्या अनुपस्थितीचा निषेध करु. अहो, एकदा झाले, दोनदा झाले.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>नाही, आता सभा स्थगित करुन टाका. सभेत जर कुणी जबाबदार अधिकारी नसेल तर सभा चालविण्याची आपणांस काही जरुरत नाही ना? आमचा येथे टाईमपास थोडाच चालला आहे?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>आयुक्तांनी जर असा टाईमपास केला..........

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>महिन्यातुन एक महासभा होते आणि त्या सभेसही जर अधिकारी हजर राहत नसतील तर काय, गरज काय आहे सभा घ्यायची?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>एक वर्षांनी आता महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूका होणार आहेत. या अल्पशा कालावधीत आम्ही शहरवाशियांसाठी काय करायचे? काय करणार आम्ही?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>आज नगररचनाकार नाहीत, नगररचनाकारांची बदली झाल्यानंतर सुध्दा प्लान मंजुर होत आहेत हे तुम्हांला माहित आहे का? आजचीच वर्तमानपत्रे पहा तुम्ही.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>आम्ही त्या नगररचनाकारांचे प्रताप सविस्तरपणे दाखवुन देवु शकतो. त्या नगररचनाकारांची बदली कधी झाली? त्या नगररचनाकारास येथुन कधी कार्यमुक्त केले? आणि त्यानंतरही त्याच्या सहीने प्लान पास कसे होतात? याची आम्ही सर्व माहिती आणलेली आहे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. सचिव साहेब, मी आपणाकडुन हे जाणुन घेवु इच्छितो की, एका महासभेस किती खर्च येतो. व जेवढया काही वेळेस महासभा स्थगित झालेल्या आहेत त्याची भरपाई कोण करेल? शहराचे जे नुकसान होत आहे, गरीब महिला, धुण्या भांडयाचे काम करुन जो मालमत्ता कर भरतात, त्या पैश्यातुन महासभेसाठी खर्च केला जातो. आणि महासभा होत नसल्यामुळे तो व्यर्थ जातो त्यास जबाबदार कोण? आणि त्यासाठी श्री. म्हसाळ साहेबांनी त्या महासभेत अनुपस्थित राहणा—या अधिका—यांना कारणे दाखवा नोटिस बजावली आहे की नाही? त्याचे मला उत्तर पाहिजे. सचिव साहेब, सभा चालविणे ही आपली जबाबदारी आहे. म्हणुन मी आपणांस विचारु इच्छितो की, प्रत्येक महासभेस किती खर्च आहे? एका महासभेमागे किती खर्च आहे ते मला सांगा. व त्याबाबतीत दोषी कोण आहे?

<u>महापालिका सचिव :—</u>१० हजार रुपये.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>एका महासभेस दहा हजार खर्च आहे. आजपर्यंत दोन सभा स्थगित झाल्या आहेत, या दोन सभांचे २० हजार रुपये कोण भरुन देईल? आयुक्तांच्या प्रभागातुन ही रक्कम कपात करुन घेतली पाहिजे.

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, नगररचनाकार सभेत येत नाहीत. नगररचना विभागातील कर्मचारी आपल्या जागेवर नसतात. लिपिक नसतात त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. श्री.

म्हसाळ साहेबांना मी विनंती करतो की, बरेचसे कर्मचारी आपल्या जागेवर हजर नसतात. त्यांच्या उपस्थिती बाबत आपण सर्व्हे करावा.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>मा. महापौर, उप—महापौरजी, सभा रद्द करा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>काही विषय भलेही पुढे ढकला परंतु चतुर्थ श्रेणी कर्मचा—यांचा पदोन्नतीचा जो विषय आहे तो पारीत करावा.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. सचिव साहेब, एका सभेसाठी किती खर्च येतो.

<u>महापालिका सचिव :—</u>१० हजार रुपये येत असल्याचे आपणांस सांगितले आहे ना? अल्पोहाराच्या खर्चासह.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>बिसलरी पाण्याचे पैसे कोण भरेल?

<u>उप—महापौर :—</u>श्री. मोरे साहेब, प्रश्नोत्तराचा तास चालु आहे. आपण असे प्रश्न विचारत बसलात तर ती वेळ नाहकपणे संपुन जाईल.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. उप—महापौरजी, आपण सुध्दा कित्येक वेळा जे आदेश काढले आहेत त्यांचेही काही पालन झालेले नाही. आपण मागील इतिवृत्त काढुन बघा.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>मा. उप—महापौरजी, हा प्रश्नोत्तराचा तास आहे. किती प्रश्न प्रलंबित आहेत ते आपण पहा. मला वाटते सर्वांत जास्त प्रश्न नगररचना विभागाचे प्रलंबित आहेत.

<u>उप—महापौर :—</u>प्रश्नोत्तराची वेळ अशीच जर फुकट घालवली तर मग काय होईल? यासाठी कृपया करुन आपण बसुन घ्यावे ना?

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>तुम्ही उत्तर देवु शकत नाहीत. तुमचे अधिकारी हजर राहत नाहीत. आयुक्त नसतात.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>प्रश्नाचे कुणी उत्तर देवु शकत नाही. प्रश्नोत्तराचा विषय ठेवता कशाला? प्रश्नोत्तराचा विषय रद्द करा. एकाही प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. प्रश्नोत्तराचा विषय ठेवता कशाला?

यावेळी काही सदस्य उत्तर दया, उत्तर दया असा आवाज देत होते.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>उप—महापौरजी, आपण त्यांचा पाठपुरावा करावा. एकाही प्रश्नाचे उत्तर मिळत नाही.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. उप—महापौरजी, आपण उल्हासनगरचे नागरीक आहात. व आमचे सन्माननिय सदस्य आहात. आपण आम्हांस सहकार्य करा. आपण अधिका—यांना समर्थन देवु नका. आज जर कुणी नागरीक एक दिवस मालमत्ता कर उशिरा भरत असेल तर त्यावर दोन टक्के व्याज लावले जात आहे. व शहराच्या हिताशी निगडित असलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आपला कुणीही जबाबदार अधिकारी महासभेत उपस्थित नाही?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>तर मग यांच्यावर किती दंड आकारला जावा?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>फक्त उल्हासनगर शहरवाशियांसाठी कायदे आहेत, व यांच्यासाठी (अधिका—यांसाठी) कोणताही कायदा नाही?

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>मा. महापौरजी, २३८  पासुन २८८ पर्यंतचे प्रश्न प्रलंबित आहेत. मला वाटते पुर्ण वर्ष गेले तरी प्रश्नांची उत्तरे मिळणार नाहीत.  हे अधिकारी निघुन जातील तुम्ही आम्ही येथेच राहणार आहात.  आणि हे जर असेच चालु देणार असाल तर मा. महापौर आणि उपमहापौर साहेब, तुम्ही सुध्दा जबाबदार आहात.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. श्री. म्हसाळ साहेब, प्रश्नोत्तराचा पाठपुरावा करुन नंतरच सभा आयोजित केली जावी.  आम्ही उत्तरासाठी असे मुर्तीसारखे गुपचुप उभे राहायचे काय?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>दिनांक ३०/१/२०१० रोजी हा प्रश्न विचारलेला आहे.  जवळ जवळ १ वर्ष होत आलेले आहे.  ११ महिने तर नक्कीच झाले आहेत. ११ महिन्यामध्ये एका नगरसेविकेने विचारलेल्या प्रश्नास उत्तर देता येत नाही. महासभेच्या माध्यमातुन केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने कोण कोणते प्रयत्न केले याचे साधे आणि सरळ उत्तर सुध्दा प्रशासनातील उच्च पदस्थ अधिका—याने दिले नाही.  अहो, साध्या लिपिकाचे काम आहे हे.  त्या प्रश्नाचे उत्तर आयुक्त सुध्दा देवु शकत नाही.  मागच्या वेळेस मी म्हटले होते की, सगळे बोलतात लाज वाटते, खरच लाज वाटते. २३८ क्रमांकाचा प्रश्न किती तारखेला विचारलेला आहे तो बघा.  तो विचारला आहे, दिनांक ३०/१/२०१० रोजी.  त्या विषयी प्रशासनाने पत्र कधी काढले? २७/१२ की २४/१२ ?  बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतल्यानंतर, अहो कोण तुमच्या बांधकाम पुर्णत्वाच्या दाखल्याला विचारतो?  आहे का प्रशासनाची तेवढी प्रमाणिकता? वुडलॅड कॉम्पलेक्स १९९९ साली उभी राहिली.  त्यांच्याकडुन २५ टक्के बांधकाम आपण घेतले आणि त्यावर पुन्हा प्लान पास झालेला आहे.  डॉल्फिन क्लब हॉटेल, १९९७ ला इमारत पुर्ण झाली.  आता प्लान मंजुर केला आहे.  तुमच्या बांधकाम पुर्णत्वाच्या दाखल्याला कोण विचारत आहे? येथे तुमची प्रामाणिकता नाही.  तेथे जनता तरी प्रामाणिकता कशाला दाखवेल?  आम्ही जनतेच्या पैश्यातुन पगार घेतो. आमची जबाबदारी काय? कर्तव्य काय हे सर्व अधिकारी विसरले आहेत.  महापालिकेतील कनिष्ठ आणि उच्च पदस्थ पदाधिकारी, अधिकारी हे आपली जबाबदारी आणि कर्तव्य विसरले आहेत.  २३८ क्रमांकाचा प्रश्न हा निरर्थक आहे?  काय सांगायचे आहे त्याच्यामध्ये?  आतापर्यंत तुम्ही ३०० चौरस फुटाच्या वरचे किती प्लान मंजुर केलेत? महासभेने दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार किंवा शासनाने दिलेल्या निर्देशानुसार एवढया एवढया प्लान मध्ये त्यांची अंमलबजावणी केली आहे.  आणि ज्यांनी केली नाही त्यांच्यावर कारवाई काय केली?  त्याचे उत्तर दयायचे आहे. नगररचनाकार नाहीत, मरण पावले ते.  बाकीचे नाहीत?  याचे उत्तर उप—आयुक्त देवु शकत नाहीत काय? ठिक आहे, आज आयुक्तांचा पदभार उप—आयुक्तांकडे आहे, उप—आयुक्तांना एवढे सुध्दा वाटले नाही काय त्या प्रश्नाचे उत्तर आपण घ्यायचे? आयुक्त नाहीत, म्हणुन मला फक्त महासभेत बसण्यास सांगीतले आहे एवढे बोलुन भागणार नाही.  तुम्हांला पदभार दिला आहे, तुम्ही त्या प्रश्नाची माहिती घेतलीच पाहिजे.  नाहीतर ते लिपिक बसले आहेत इतिवृत्त लिहायला ते काम करतात तसे तुमचे काम आहे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>नगररचना विभागाने सांगितले आहे की, माहिती दिली आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>एखादया वेळेस जनतेचा उद्रेक होईल.  आमचाही उद्रेक होईल.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>श्री. म्हसाळ साहेब, जरा ऐकुन घ्या. आमच्या नगरसेवकांना साडेसात हजार मानधन मिळते, आणि त्यापोटी आम्ही इमानदारीने येथे येतो.  जनतेचे काम करतो. आणि तुम्हां लोकांना किती पगार मिळतो? येथे बसलेल्या सर्वांना मी विचारतो.  किती पगार मिळतो तुम्हांला? तुमच्या एक तृतियांश आम्हांला पगार मिळत असेल तर तुम्हांला किती पगार मिळतो? तरीही तुमच्याकडुन कामे होत नाहीत.  सर्व सन्माननिय सदस्यांना आम्हांला शरमेने ते सांगावे लागत आहे की आम्हांला जे साडेसात हजार रुपये मानधन मिळते त्यात आम्ही खुश आहोत.  ठिक आहे, तो जनतेचा पैसा आहे.  तो शासनाकडुन येतो येथुन तो महानगरपालिका आम्हांला देते. त्यात आम्ही खुष आहोत.  अहो, पैसे नसतील तर आम्ही पायी येतो.  आणि तुमच्याकडे गाडया, घोडया हे, ते सर्व असल्यावर आणि एवढा पगार मिळतो तरी तुम्ही कामे करत नाहीत? सोडुन दया ना, सोडुन दया.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>सचिव साहेब, एका महासभेस १० हजार खर्च येतो असे तुम्ही कसे बोललात? प्रत्येक सदस्याला सभेचा बैठक भत्ता १०० रुपये भेटतो, तर हेच किती झाले?

<u>महापालिका सचिव :—</u>बैठक भत्ता वेगळा आहे ना?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>सभा खर्चामध्ये बैठक भत्तापण समाविष्ट केला पाहिजे ना? सभा स्थगित झाली तर हा खर्च कोण पकडेल?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>महासभेस एकुण किती खर्च होतो अशी मी विचारणा केली होती.

<u>महापालिका सचिव :—</u>प्रत्येक सदस्यास सभेचा बैठक भत्ता १०० रुपये दिला जातो याप्रमाणे सभेस सर्व ८१ सदस्य उपस्थित राहिले तर ८१००/— रुपये बैठक भत्त्यापोटी खर्च येतो. तसेच साडेसातशे रुपये बिसलरी पाण्यासाठी खर्च येतो. व इतर लाईट बिलाचा खर्च, याचबरोबर प्रत्येक सदस्यास एक एक कप चहा यापोटी होणारा खर्च.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> आणि अधिका—यांचा एक दिवसाचा पगार.

<u>महापालिका सचिव :—</u>अधिका—यांचा पगार?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>सहाजिकच.

<u>महापालिका सचिव :—</u>तर मग जास्त होईल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>त्यांनी एकुण खर्च विचारलेला आहे. महापौर महोदया, मला खेद वाटतो, प्रशासनाचा प्रमुख म्हणुन आपण चालतोय. ''शहाण्याच नोकर व्हाव पण गाढवाच मालक होवु नये''. हे गाढवाचे मालक झाल्यासारखे येतात. काही अर्थ नाही महापालिकेच्या माध्यमातुन किती प्लान मंजुर केले याबाबत एका नगरसवकेने विचारलेल्या प्रश्नास एक वर्षापासुन आपण माहिती देवु शकत नाहीत. किती वर्ष लागतील या उत्तराला? बाकी मोठे प्रश्न नंतर सोडवु. कुठले ठराव घेवुन उपयोग नाही. प्रशासनाच्यावतीने कुठलेही ठराव यापुढे आणु नका. तुमची लायकी नाही.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>माझा सुध्दा तोच प्रश्न आहे. मी सुध्दा मागील नोव्हेंबरमध्ये प्रश्न विचारला आहे की, किती प्लान मंजुर केले आहेत. त्याचे बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र कधी घेतले? प्लींथ कधीचे आहे? श्रीमती वसुधा बोडारे यांनी जो प्रश्न विचारला आहे तोच प्रश्न मी विचारला आहे. दोघांचा एकच प्रश्न आहे. दोघांनीही प्रश्न विचारुन एक वर्ष झाले आहे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>मागच्या महासभेत प्रश्नांची उत्तरे दिली आहेत किंवा नाही याची माहिती घेतल्यानंतर नगररचनाकार विभागाकडुन असे सांगण्यात आले की, संबंधीत नगरसेवकांना ती माहिती देण्यात आलेली आहे. त्यांनी जर ही खोटी माहिती दिली असेल तर आपण त्यांचयावर शिस्त भंगाची कारवाई करु.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>२० ऑक्टोंबर २०१० रोजी याच महासभेत आपण सांगितले आहे की, आपणांस एक आठवडयात या विषयीची माहिती मिळेल. त्यासही दोन महिने उलटुन गेले आहेत. या कालावधीत आपण कधी माझ्याशी संपर्क साधला आहे? नगररचना विभागातील कुण्या अधिका—याने विचारणा केली आहे? जेव्हा कधी नगररचना विभागात दुरध्वनीवरुन संपर्क साधण्याचा प्रयत्न केला तर असे सांगण्यात आले की, ते मंत्रालयात गेले आहेत, उच्च न्यायालयात गेले आहेत. कोकण भवनला गेले आहेत. तर या ठिकाणी जाण्यासाठी केवळ एक वेगळा विभाग ठेवा. फक्त बांधकाम नकाशे मंजुर करायचे त्याविषयी कुठलाही पाठपुरावा करायचा नाही, त्याचे योग्य प्रकारे काम होत आहे किंवा नाही हे पाहायचे नाही? ज्या कामासाठी बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे त्याच कामासाठी बांधकाम केले जात आहे किंवा नाही की त्याव्यतिरिक्त अन्य कुठल्या कामासाठी बांधकाम केले जात आहे हे पाहत नाही. फक्त प्लान मंजुर करुन गप्प बसायचे?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी</u> :—श्री. म्हसाळ साहेब, ठाकुर नावाचे जे नविन नगररचनाकार आले आहेत ते कुठे आहेत, ते सुध्दा कोठे गायब झालेत काय?

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड</u> :—मा. महापौर, उप—महापौर आणि आयुक्त साहेब, पहिल्याच महासभेत मा. आयुक्त श्री. रणखांब साहेब यांनी फार मोठे भाषण दिले होते. त्याबद्दल सन्माननिय सदस्यांना मी आवर्जुन सांगु इच्छितो की, त्यावेळेस त्यांनी त्यांच्या भाषणातुन सांगितले की, कुठल्याही अधिका—यांनी कामचुकारपणा केला किंवा कुठल्याही प्रश्नाचे उत्तर दिले नाही किंवा गैरहजर राहिले तर त्यांना मी घरी पाठविल्याशिवाय राहणार नाही. याठिकाणी एका प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी जवळ जवळ एक वर्ष लागत आहे. त्या संदर्भात आपण काय कारवाई करणार आहात याचे उत्तर मला आधी दया नंतर मग तुम्ही महासभा चालवा. मा. श्री. म्हसाळ साहेब याठिकाणी आयुक्त म्हणुन तुम्ही दुस—यांदा बसला आहात. याअगोदर कायदेशीररित्या जे अधिकारी आयुक्त म्हणुन आलेले आहेत, श्री. रणखांब साहेब हे एका सभेत फार मोठे भाषण देत असतांना आम्हांला असे वाटले की, आयुक्त साहेब आमच्यावतीने तर बोलत नाहीत ना? नगरसेवक तर नाहीत ना ते? की अगोदर नगरसेवक होते? प्रशासनातील सर्व अधिका—यांच्या विरोधात ते बोलत असतांना त्यांनी त्यांच्या विरोधात भुमिका मांडली. कुठल्याही विभागातील अधिकारी कामचुकारपणा करेल, किंवा एखादया प्रश्नाचे उत्तर देणार नाही तर त्याबद्दल त्याला घरी पाठविले जाईल. यास्तव सन्माननिय महापौर महोदया, याठिकाणी आपण आयुक्तांना आदेश दया, ज्या अधिका—यांनी प्रश्नाचे उत्तर दिले नाही, कामचुकारपणा केला आहे त्याला ताबडतोब आताच्या आता सेवेतून निलंबित करण्यात यावे.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी</u> :—श्री. म्हसाळ साहेब, आपण सांगितले होते की १० मिनिटामध्ये अधिकारी संबंधीत माहिती घेवुन येत आहे, त्यास आता अर्धातास होवुन गेला. त्याचे काय झाले? मंत्रालयातुन उत्तर मागविले आहे काय?

<u>महापालिका सचिव</u> :—प्रश्नोत्तराचा कालावधी संपला. विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. २</u> :— मागील सर्वसाधारण सभेचे दिनांक २०/९/२०१० (त्यात २०/१०/२०१०) दिनांक २०/१०/२०१० रोजीचे व दिनांक २०/१०/२०१० रोजीच्या विशेष महासभेचे रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>काही सदस्य</u> :—पास—पास......

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे</u> :—पास नाही, प्रत्येक विषय पास नाही. मागील महासभेत सेवा प्रवेश नियमास अंतिम मंजुरी देण्याबाबतचा जो विषय आला होता, त्यामध्ये अतिरिक्त आयुक्त पदासाठी जी अर्हता दर्शविण्यात आलेली आहे.

<u>महापालिका सचिव</u> :—त्याविषयी तर ठराव झालेला आहे, त्यामध्ये जर आपणांस बदल करायचा असेल तर......

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड</u> :—ठराव झाला आहे परंतु त्यामध्ये बदल करायचा आहे. मा. महापौर महोदया, अतिरिक्त आयुक्त पद याठिकाणी नाहीच आहे, आपल्या या महापालिकेने घिसाडघाई करुन ते पद याठिकाणी आणलेले आहे. ते घेवु नये असे माझे मत आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे</u> :—आम्हांला याठिकाणी आक्षेप आहे, आपली महापालिका 'ड' वर्गात मोडते. तरी देखील येथे अतिरिक्त आयुक्ताचे पद कसे आले आहे?

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे</u> :— सन्माननिय महापौरजी व आयुक्त साहेब, याविषयी मला एवढेच सांगायचे आहे, जर अतिरिक्त आयुक्तांचे येथे पद नसेल तर ते पद येथे ठेवायला नको, याठिकाणी त्या पदाची आवश्यकता नाही. आम्ही पैसा वाचविण्याचा प्रयत्न करतो, व तुम्ही लोक पैसा उडविण्याचा विचार करता, हे महापालिकेत काय चालले आहे?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>इतिवृत्ताच्या पृष्ठ क्र. ४९ वर नोंद आली आहे, ज्याठिकाणी अतिरिक्त आयुक्त हे पदच नाही तर ते तुम्ही येथे आणले कसे? आणि त्यासाठी अर्हता दर्शविली आहे. मान्यता प्राप्त विदयापीठाच्या विधी शाखेचा पदवीधर, महानगरपालिका अस्थापनेवरील महापालिका सचिव, म्हणजे आपणांस गृहित धरुन हे सर्व केले आहे काय? आणि दुसरे म्हणजे वैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदाची अर्हता निश्चित करतांना त्यावेळी श्री. दिलीप गायकवाड साहेबांनी आरोप केला होता की त्या पदासाठी उमेदवाराची शैक्षणीक अर्हता एमडी अशी असावी. त्याठिकाणी तुम्ही लोकांनी एमबीबीएस ही अर्हता दर्शविलेली आहे. अहो, गाढव कधी घोडा बनु शकतो का? अशी पध्दत तुम्ही येथे केली आहे, हे सर्व चुकीचे आहे, आमचा आक्षेप आहे. ही अर्हता ठरावामध्ये घेवु नये. हे इतिवृत्त मला मान्य नाही. हे वगळण्यात यावे. येथे सर्व चुकीचे केले आहे. फक्त अनु.क्र. ४ वर जी नोंद आली आहे ती बरोबर आहे. ३ क्रमांकावर कार्यकारी अभियंता पदासाठी जी अर्हता दर्शविली आहे त्याच्यामध्ये शेवटची जी नोंद आली आहे, कनिष्ठ अभियंता या पदावरील २४ वर्षाचा अनुभव पाहिजे हा देखील खोडण्यात यावा. याची इतिवृत्तात नोंद येवु दया. उपअभियंतासाठी दर्शविलेली अर्हता योग्य आहे परंतु अनु.क्र. ५ वर जी नोंद आलेली आहे ती खोडण्यात यावी. हे सर्व कोणाला तरी नजरेसमोर ठेवुन करण्यात आलेले आहे. आम्ही काही इतके दुधखुळे नाहीत की आम्हांला काही येत नाही. हे काय काय करुन ठेवले आहे? ज्याठिकाणी अतिरिक्त आयुक्तांचे पद नाही तेथे तुम्ही अतिरिक्त आयुक्तांचे पद ठेवता? जर अतिरिक्त आयुक्त पाठविला तर तुम्ही म्हणता त्या पदासाठी उल्हासनगर महापालिकेचा अधिकारी पाहिजे. हे कशासाठी?

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, यांनी ही जी पदे निर्माण केली आहेत ती काही व्यक्तींना नजरेसमोर ठेवुन निर्माण केली आहेत याकडे आपण लक्षपुर्वक बघितले तर आपणांस दिसुन येईल. आपल्या महापालिकेत अतिरिक्त आयुक्तांची जरुरत नाही हे आजच्या वर्तमानपत्रात देखील आलेले आहे. शासनाचे नियम धाब्यावर बसुन आपण हे करणार आहोत काय? आणि करणे योग्य आहे काय? तसे करणे तुम्हांला योग्य वाटते का? आजच्या वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या पहा तुम्ही, त्यांना ती वर्तमानपत्र दाखवा.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>आणि शासनाच्या मार्गदर्शक सूचना अशा नाहीत. हे सर्व नियम शासनाच्या मार्गदर्शक सूचना धाब्यावर बसून तयार केले आहेत. आणि हे ज्यांनी केले त्यांच्यावर कारवाई करा. हे सारासार षडयंत्र रचलेले आहे. आपापली माणसं बरोबर त्याठिकाणी बसली पाहिजेत त्या पध्दतीने हे काम केले आहे. आणि वर्तमानपत्रांमध्ये त्याबाबत बातम्या आलेल्या आहेत, त्या बघा तुम्ही.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:–</u>मा. म्हसाळ साहेब, सामान्य प्रशासन विभाग हा आपल्याकडे आहे ना? ज्या विभागाशी संबंधीत हा सर्व प्रकार घडला आहे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>सन्माननिय महापौर, उप–महापौर, शासनाने सर्व महापालिकांसाठी जे सेवा प्रवेश नियम दिले आहेत, क वर्ग महापालिकांसाठी वेगळे सेवा प्रवेश नियम, ड वर्ग महापालिकांसाठी वेगळे सेवाप्रवेश नियम असे केलेले नाही.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>महानगरपालिकांचा अ ब क ड असा वेगवेळा दर्जा ठरविण्यात आलेला आहे त्यानुसार हे जे नियम आहेत ते कोणत्या दर्जाच्या महापालिकेंसाठी आहे? क साठी आहेत की ड साठी आहेत?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>शासनाने २००५ मध्ये ३८ पदांसाठी जे कॅडर तयार केले आहे, त्यामध्ये अ ब क आणि ड या चारही दर्जाच्या महापालिकेमध्ये कोणती पदे मंजुर आहेत ते विशद केलेले आहे आणि सेवा प्रवेश नियम जे केले आहेत ते अ ब क ड महापालिकांसाठी वेगवेगळे केलेले नाहीत. आदर्श उपविधी तयार करुन ते स्विकृतीसाठी महानगरपालिकांकडे पाठविले आहेत. आणि त्यामध्ये काही बदल करायचे असतील तर त्यासाठी महापालिकांना स्वातंत्र्य दिले आहे. आणि त्याप्रमाणे आपण ते प्रसिध्द केले होते मागील वर्षी सप्टेंबर महिन्यामध्ये त्यावर हरकती सूचना आल्या, आणि हरकती व सूचनांवर आपण सुनावणी घेवुन नंतर ते आपण महासभेच्या मान्यतेसाठी ठेवले आहेत, आता आपणांस जे नियम लागु आहेत त्याविषयीच शासन विचार करणार आहे, आपल्याला जे लागु नाहीत त्याचा विचार शासन करणार नाही.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :—</u>लागु नसलेले नियम  आपण त्यामध्ये टाकता काशाला? जे लागु आहेत तेवढेच टाका ना? तीन वेगवेगळया प्रकारच्या सेवांमध्ये वेगवेगळी माणसे वाटली गेली आहेत. लेखापालचे काम दुसरा अधिकारी करु शकतो काय? यासाठी जी पदे /नियम लागु आहेत तीच टाका ना?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>३८ पदांच्या कॅडरमध्ये जी पदे आपणांस लागु आहेत त्याविषयीचाच आपला प्रस्ताव मान्य होणार आहे. बाकी जी पदे आपणांस लागु नाहीत ती पदे मान्य होणार नाहीत. ३८ पदांच्या कॅडरमध्ये वर्गवारी दिलेली आहे. त्यानुसार आपणाकडे कार्यकारी अभियंतांची किती पदे असतील? उप अभियंत्याची किती असतील. याप्रकारे ३८ प्रकारची वेगवेगळी पदे आहेत, वैद्यकीय अधिका—याची किती पदे असतील त्याप्रमाणेच पदे मंजुर होणार आहेत.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:—</u>तुमचे हे म्हणणे बरोबर आहे त्याप्रमाणे पात्रता आहे कि नाही. आता वैद्यकीय आरोग्य अधिका—यासाठी येथे उमेदवार एम.डी. पाहिजे तेथे तुम्ही एमबीबीएस अधिका—यास पदोन्नती कशी देता? उल्हासनगरच्या आरोग्याचा प्रश्न आहे, उदया सकाळ जर कुणाला काही झाले तर, त्याबद्दल मला आता तुम्ही काय बोलायला लावता? तुम्हांला काही फरक नाही पडणार परंतु शहरवाशियांना उत्तर आम्हांला दयावे लागणार आहे. मेंढकी फुगली म्हणजे हत्ती बनते काय? साहेब हे तुम्ही मला सांगा. अहो, मला सांगा एमबीबीएस आणि एमडी मध्ये काही फरक आहे की नाही. जमिन आसमानचा फरक आहे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u> शासनाने जे नियम प्रसिध्द केले आहेत तसेच्या तसे नियम प्रशासनाने तुमच्यापुढे मान्यतेसाठी ठेवले होते. त्यामध्ये आपण, सन्माननिय सदस्यांनी बदल सुचविलेले आहेत. प्रशासनाने बदल सुचविलेले नाहीत.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>आम्हांला माहित नाही, आम्हांला ते मंजुर नाही. आम्हांला असे वाटते की, आपल्या कुण्यातरी नातेवाईकाला, हितसंबंधीताला नजरेसमोर ठेवुन याप्रकारची अर्हता टाकलेली आहे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:—</u>  त्यानी (नगरसेवकांनी) सुचविलेल्या प्रमाणे चालणार? की, कायद्यानुसार चालणार?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u> लेखापाल आयुक्त होवु शकतो का? हे काय? काही नियम वैगेरे आहेत की नाहीत?

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी</u>:— सचिव साहेब मी असे विचारु इच्छितो की मागील महासभेत अपण ठराव पारित केले आहेत आता फक्त इतिवृत्त कायम करत आहोत ना? यांना जर ठरावातील काही बाबीबांबत आक्षेत असेल तर, फेरप्रस्ताव आणावयास पाहिजे असे काही आहे का?

<u>उपमहापौर:—</u> इतिवृत्त कायम करण्यास कुणाची काही हरकत आहे का? काही दुरुस्ती करायची आहे का?

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत:—</u> पदोन्नती संदर्भात दुरुस्त्या सुचविल्या आहेत, त्यामध्ये दुरुस्ती केली पाहिजे आणि शासनाच्या मजुंरीस अधिन राहून पदोन्नती दिल्या पाहिजेत.

<u>उपमहापौर:—</u> इतिवृत्त कायम करण्यासंदर्भात कुणाला काही आपले मत मांडायचे असेल तर माडांवे पुढील सभेत प्रस्ताव आणुन ठरावात करता येईल.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u> बरोबर आहे, बरोबर आहे आपले एकदम बरोबर आहे.

<u>काही सदस्य:—</u> कायम कायम.

<u>महापालिका सचिव:—</u> इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम? श्री. प्रशांत धांडेजी इतिवृत्त जसे आहे तसे कायम?

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u> पदोन्नती बाबत ज्या काही आक्षेपार्य किंवा हरकती घेण्यासारख्या नोंदी आहेत त्या वगळा.

<u>महापालिका सचिव:—</u> नविन प्रस्ताव आणुन ठरावांत बदल करु शकतो.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u> होय होय, बरोबर.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u> मा. महापौरजी, आम्ही जे मुद्दे उपस्थित केले आहेत, ज्या हरकती घेतल्या आहेत. त्याअनुसारची नोंद नविन ठरावांत आली पाहिजे. नाहीतर ते प्रश्न उत्तरासारखे होईल त्यासाठी वर्ष दोन वर्ष लावु नका?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u> ही नोंद आजच्या सभेच्या इतिव्त्तात आली पाहिजे.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u> आम्ही काय बोलले ते आजच्या सभेच्या इतिवृत्तात आले पाहिजे.

<u>महापालिका सचिव:—</u> इतिवृत्त सर्वानुमते कायम? इतिवृत्त कायम आहे. सर्वांचे मत हेच आहे. इतिवृत्त कायम केले तरच ठरावात बदल करु शकाल नाहीतर ठरावात बदल करु शकणार नाहीत.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u> अहो, मी म्हणतोय ना पास.

<u>महापालिका सचिव:—</u> सर्व संमतीने?

<u>सदस्या श्रीम. विद्या निर्मळे:—</u> मा. महापौरजी, इतिवृत्त कायम करण्याअगोदर मला बोलु दिले जावे, मा. महापौर, आयुक्त साहेब, अपहरण, खंडणी हे खोटे आरोप शिवाय गुंडगिरी, या गुंडगिरीला मी घाबरणार नाही आणि बळीही पडणार नाही. या भुमाफीयांनी माझे प्रभागामध्ये जेथुन माझ्या माता भगिनी शौचालयात जातात तो मार्ग बंद करुन टाकला आहे. आणि त्यांनतर मी प्रशासनाला दोन तीन पत्र दिली आहेत. त्यांची अजिबात दखल घेतलेली नाही. त्यांचे आयुक्त साहेब तुम्ही उत्तर दया.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u> मा. महापौर, उप—महापौर आणि सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्यांनी जी पत्र दिली आहते ती अतिक्रमण विभागांकडे अद्याप आलेली नाहीत.

<u>सदस्या श्रीम. विद्या निर्मळे:—</u> खोटे बोलु नका. प्रत्येक वेळा हेच हेच खोटे उत्तर, माझे माता भगिनींना किती त्रास होतो तेथे, पत्र मिळाले नाही म्हटले तर प्रश्न मिटला असे तुम्हाला वाटते का? कशाला बसता खुर्चीवर, गरिब लोकांना त्रास देता.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u> सार्वजनिक बांधकाम विभागाने संबधीत जागेच्या आरक्षणाबाबत आणि संबंधीत जागा महापालिकेकडे हस्तांतरीत झाली किंवा नाही याबाबतचा पत्र व्यवहार प्रातांधिकारी यांच्याकडे केला असल्यांचे आम्हाला सांगितले आहे. त्यापुढे काय झाले याबाबतची माहिती घेवुन सांगतो.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:—</u> मा. श्री. म्हसाळ साहेब, आपणांस फोनवरुन कोणी धमकी दिली तर त्यांची दुकाने तुम्ही दोन मिनिटांत उध्वस्त केलीत व आमच्या माजी महापौरांनी इतक्या वेळा तक्रारी केल्या त्याबाबत तुम्ही काय केले ते तुम्ही मला सांगा.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे:—</u> श्री. जीवन भाई आता विचारा ना कोण आहे तो भुमाफीया?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u> श्री. म्हसाळ साहेब, उत्तर दया कोण आहे?

<u>सदस्या श्रीम. विद्या निर्मळे:–</u> निर्लजम् सदा सुखी, भुमाफीया.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत:–</u> माजी महापौर अर्धा तास झाला उभ्या आहेत, त्यांच्या प्रश्नांचे तुम्ही उत्तर देत नाहीत, महासभा बोलवता त्यांची पुर्वतयारी करीत नाहीत. अधिकारी प्रश्नांची पुर्वतयारी करीत नाहीत. आयत्यावेळेला कुणास तरी आयुक्तांच्या आसनांवर बसविले जातो ते चुकीची माहीती देतात असेच चालणार आहे का? महासभा घ्यायची असेल तर तुम्ही काहीतरी तयारी कराल की नाही. त्यांच्या प्रश्नांचे उत्तर देवु शकत नाही अजुन.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u> मागील महासभेच्या वेळेस कार्यकारी अभियंता (सा.बा.वि.) पदाचा कार्यभार श्री. गिरगावंकर यांच्याकडे होता. त्यानंतर दरम्यानच्या कालावधीमध्ये कार्यकारी अभियंता (सा.बा.वि.) पदाचा कार्यभार श्री. शिर्के यांच्याकडे दिल्यांनतर याबाबत त्यांनी काय कार्यवाही केली त्याचा आढावा घेतो.

<u>सदस्य श्री. धंनजय बोडारे:–</u> श्री म्हसाळ साहेब, मागील सभेचे इतिवृत्त काढा. इतिवृत्तांच्या पृष्ठ क्रमाक ३ वर पहा त्यावेळेस आयुक्त म्हणुन आपणच होतात ज्या जागेवर आरक्षण आहे ती कशासाठी आरक्षित आहे हे तुमचेच वाक्य आहे. आरक्षण असेल परंतु महापालिकेकडे हस्तांतरीत झाली आहे किंवा नाही. त्याची शहांनिशा करा त्यांची शहांनिशा केली का तुम्ही? आपल्या मालकिंची आहे का? तुम्ही उत्तर दिलेले आहे. कार्यकारी अभियंता कोण होते ते जावु दया. श्री. गिरगावंकर होते कि श्री. शिर्के होते, श्री. शिर्केना माहित नाही का? त्या ठिकाणी फलक लावण्यासाठी, कुपंण घालण्यासाठी प्राकलन मंजुर केले आहे. किंवा मजुंर केले नाही ते विचारा.

<u>सदस्या श्रीम. विद्या निर्मळे:–</u> आयुक्त साहेब लवकर उत्तर दया, किती वेळ लावताय उत्तर दयायला. बोरींगची परमीशन कशी दिली पटकन मला तो मार्ग मोकळा करुन पाहिजे म्हणजे पाहिजे. भुमापीयांची कसे पटकन ऐकता तुम्ही.

<u>श्री. रमेश शिर्के, कार्यकांरी अभिंयता(सा.बा.वि.):–</u> मा. महापौर, मा. उप–महापौर, मा. आयुक्त साहेब आणि सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे

<u>काही सदस्य:–</u> माजी महापौर आहेत त्या. माजी महापौर म्हणा.

<u>श्री. रमेश शिर्के, कार्यकांरी अभिंयता(सा.बा.वि.):–</u> सन्मा. माजी महापौर आणि नगरसेविका सौ विद्या निर्मळे यांनी जो मुदद् उपस्थित केला आहे, पत्र दिली आहेत, त्यांची ती पत्र अतिक्रमण निमुर्लन विभागाकडे पोहोचलेली नाहीत.

<u>सदस्या श्रीम. विद्या निर्मळे:–</u> कशी पोहोचली नाहीत? तुम्ही चौकशी करावयास पाहिजे होती ना?

<u>श्री. रमेश शिर्के, कार्यकांरी अभिंयता(सा.बा.वि.):–</u> चौकशी करतो.

<u>सदस्या श्रीम. विद्या निर्मळे:–</u> कधी करतो? अगोदर चौकशी करावयास पाहिजे होती, तेथील शौचालयामध्ये अपंगाना व महिलांना जाता येत नाही.

<u>श्री. रमेश शिर्के, कार्यकांरी अभिंयता(सा.बा.वि.):–</u> तेथे काही अडथळा निर्माण केला असेल तर तो काढुन टाकण्यात येईल.

<u>सदस्या श्रीम. विद्या निर्मळे:–</u> कधी काढुन टाकण्यात येईल?

<u>श्री. रमेश शिर्के, कार्यकांरी अभिंयता(सा.बा.वि.):–</u> त्याची आम्हाला खात्री करुन घ्यावी लागेल.

<u>सदस्या श्रीम. विद्या निर्मळे:–</u> कधी खात्री करुन घेणार तुम्ही? किती दिवस लागतील?

<u>श्री. रमेश शिर्के, कार्यकारी अभियंता(सा.बा.वि.):—</u> तुमचे जे पत्र आहे ते काढुन त्यानुसार खात्री करुन जर असा काही अडथळा असेल तर तो काढून लोकांना जाण्यायेण्यासाठी तेथे मार्ग ठेवु.

<u>सदस्य श्री. धंनजय बोडारे:—</u> श्री. म्हसाळ साहेब, तुम्ही खात्री करुन घेणार होतात की, सार्वजनिक बाधंकाम विभागाने फलक लावण्यासाठी किंवा कुपंण घालण्यासाठी पत्रव्यवहार केला होता का? पत्र दिले होते का? त्यांची तुम्ही खात्री केली का? का नाही? आयुक्त म्हणुन तुम्ही उत्तर देत आहात.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u> त्यावेळी जेव्हा काम थांबलेले होते त्यावेळी कोणत्या कारणांसाठी काम थाबंलेले होते....

<u>सदस्य श्री. धंनजय बोडारे:—</u> इतिवृत्त जेव्हा कायम झाले तेव्हा याबाबतीत तुम्ही काय केले? कागदपत्र दाखवा.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u> नाही, सन्मा. माजी महापौरांनी येथे एक मुदद्ा असा उपस्थित केला आहे की, त्यांनी शौचालयांत जाण्यायेण्याचा मार्ग बंद केला आहे आणि दुसरा मुदद्ा  संरक्षण भिंत बाधंण्याबाबतचा.

<u>सदस्य श्री. धंनजय बोडारे:—</u> ती नतरंची गोष्ट आहे. पण तुम्ही महासभेत दिलेल्या उत्तराबाबत तुम्ही काय केले आहे?

<u>श्री. रमेश शिर्के, कार्यकारी अभियंता(सा.बा.वि.):—</u> नाही, संरक्षण भिंतीचा मुदद्ा वेगळा आहे व शौचालयांत जाण्यायेण्याचा मार्ग बंद केला आहे हा वेगळा मुदद्ा आहे. शौचालयांत जाण्यायेण्याचा मार्ग बंद केला असेल तर ते वेगळे प्रकरण आहे. आपण कार्याआदेश दिला होता परंतु जागेवर काहीतरी वादविवाद झाला त्यामुळे ते काम थांबविले.

<u>सदस्य श्री. धंनजय बोडारे:—</u> तुम्ही कार्याआदेश दिला होता?

<u>श्री. रमेश शिर्के, कार्यकारी अभियंता(सा.बा.वि.):—</u> होय, परंतु जागेवर तेथे काही वाद झाले

<u>सदस्य श्री. धंनजय बोडारे:—</u> काय वाद झाला?

<u>श्री. रमेश शिर्के, कार्यकारी अभियंता(सा.बा.वि.):—</u> ती जागा खाजगी असल्याचे माहित झाले.

<u>सदस्य श्री. धंनजय बोडारे:—</u> तर मग तुम्ही कार्याआदेश कसा दिला होता? अगोदर कार्याआदेश का दिला, का तर ती जागा महापालिकेची होती. याची खात्री केल्याशिवाय तुम्ही कार्याआदेश दिला का?

<u>श्री. रमेश शिर्के, कार्यकारी अभियंता(सा.बा.वि.):—</u> ती मोकळी जागा आहे, त्याठिकाणी महापालिकेच्या नावाचा फलक होता ते पाहुन आम्ही त्याठिकाणी संरक्षण भिंत बाधंण्यासाठी प्राकलन मंजुर करुन घेतले होते. आणि त्या कामाचा कार्याआदेश दिला होता.

<u>सदस्य श्री. धंनजय बोडारे:—</u> मी सांगतो ही महापालिकेची जागा माझी आहे. मी सागंतो महापालिकेच्या बाजुची जागा ती माझी आहे अशाच प्रकारचे  श्री. महाराज यांनी मागच्या वेळेस पत्र आणले होते त्यानुसार दयाल तुम्ही? महापालिकेनी दिलेला कार्याआदेश तुम्ही रदद् करणार का?

<u>श्री. रमेश शिर्के, कार्यकारी अभियंता(सा.बा.वि.):—</u> कार्याआदेश रदद् केलेला नाही काय तात्पुरते थाबंविले आहे. कारण की मागच्या वेळेस हरकत घेतली होती त्यामुळे त्यांचे काम थाबंवुन ......

<u>सदस्य श्री. धंनजय बोडारे:—</u> तेच मागच्या वेळेस मा. आयुक्तांनी सांगितले होते ते तुम्ही केले आहे का? मग २३८ क्रमांकाच्या  प्रश्नान्वये महापालिकेने किती प्लॅन मंजुर केले या प्रश्नांचे उत्तर शोधण्यामध्ये तुमचे एक

वर्ष जाते. मागच्या वेळेस तुम्हाला सांगितले होते की तुम्ही खात्री करुन घ्या ती महापालिकेची जागा आहे किंवा नाही त्यांसही दोन महिने उलटुन गेले आहेत. अजुन तुम्ही काय काम करत आहात. फक्त तुम्ही केलेला पत्र व्यवहार, तुम्ही दिलेले उत्तर जबाबदारीने दिले आहे का? मी पुन्हा सागंतो की मी माझे पगारात, माझे कर्तव्यात माझे जबाबदारीत एकनिष्ठ आहे का? तुमच्यात सद्सद्विवेक अजिबात राहिलेला नाही. बस यायचे, पगार घ्यायचा, आठ तासांचा पगार मिळतो, लोक मेले तरी चालतील. तुम्ही मागच्या वेळेस काय खात्री दिली होती तुम्हाला माहिती आहे की मी या खुर्चीवर बसणार आहे. मला विचारले जाईल. एक सामान्य शिपाई सुध्दा विचार करेल की, मागच्या वेळेस मला विचारणा करण्यात आली होती त्यानुसार मी काय केले आहे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u> त्याठिकाणी काम थांबलेले आहे ज्या कारणासाठी काम थाबंलेले आहे त्याबाबतच्या सुचना दिलेल्या होत्या. त्यांनी जर खातर जमा करुन घेतली नसेल तर आपण त्याच्यांवर शिस्तभंगाची कारवाई करु.

<u>सदस्य श्री. धंनजय बोडारे:–</u> तुम्ही काहीही कारवाई करु शकणार नाहीत. तुमच्यात नैतिकता नाही. जनाची नाही तर मनाची तरी ठेवा. मेलेल्या मनाची लोक तुम्ही काय करणार?

<u>सदस्या श्रीम. विद्या निर्मळे:–</u> एवढे मोठे प्रकरण असुनही अद्याप तुम्ही शहानिशा करत आहात?

<u>श्री. रमेश शिर्के, कार्यकारी अभिंयता(सा.बा.वि.):</u>– या विषयाबाबत मी माझे विभागाकडुन माहिती काढली आहे त्या जागेबाबत जो वाद निर्माण झालेला आहे त्यासदंर्भात टी.एल.आर. यांना पत्र पाठविण्यासाठी प्रक्रिया चालु केली आहे. तत्कालीन कार्यकारी अभिंयता यांनी एक टिप्पणी लिहुन शहर अभियंता याच्यांकडे पाठविली आहे. परंतु शहर अभिंयता साहेब आठ दहा दिवसांपासुन आजारी असल्यामुळे आले नाहीत ते आल्यानंतरच टी.एल. आर. यांचे कडे पत्र पाठविले जाईल व जागेची मालकी पडताळली जाईल.

<u>सदस्य श्री. धंनजय बोडारे:–</u> श्री. शिर्के साहेब, तुमची स्वत:ची जागा आहे. कोणत्या इमारतीमध्ये, प्लॅाट क्रमांक किती आहे किंवा कोणत्या माळयावर, किती क्रमांकाचा प्लॅट आहे ते तुम्हाला माहित आहे, कारण की ती तुमची स्वत:ची जागा आहे. महापालिकेची जागा कोणती आहे, कुठे आहे, आपण ज्या जागेचा दावा करतो ती जागा आपलीच आहे का? हे सुध्दा पाहण्याचे काम आपले आहे. एखादा माणुस, क्ष व्यक्ती त्याची नसलेली जागा तिच्यावर जर तो दावा करत असेल तर ती तुझी नाही हे सिध्द करण्याची क्षमता सुध्दा तुमच्यात असली पाहिजे तशी ती तुमच्याकडे आहे का? टी.एल.आर.., एस.डी.ओ. ऑफीस हा काय प्रकार चालला आहे? त्यांस समांतर असे प्रशासन चालले आहे. टी.एल.आर.., एस.डी.ओ. ऑफीस, व महापलिका या तिघां मिळुन शहराला लुटण्याचे काम चालु आहे. आणि पुन्हा ८५५ इमारतींसारखा प्रकार होणार आहे. आणि त्याला जबाबदार तुम्ही सर्व व आम्ही सर्व असणार आहेत. पुन्हा परत एकदा ८५५. कुणाला काही पडलेले नाही. मागचे दोन तीन आयुक्त बघितले, दोन,तीन महासभा बघितल्या चाललेय काय? नगररचनाकारांचा पत्ता नाही. उत्तर काय तर माहित नाही. पुढे काय करायचे ते कळत नाही. महाराष्ट्र शासनाच्या नाकर्तेपणामुळे उल्हासनगर शहरवाशियांना भोगावे लागत आहे. नको ते अधिकारी, जे जाणकार नाहीत, मघाशी यांनी शब्द वापरला, गाढव कधी घोडा होत नाही. या महाराष्ट्र शासनाला थोडीसी जरी कळकळ, तळमळ असती तर त्यांनी चांगले अधिकारी पाठविले असते, पण नाही, नको असलेले अधिकारीच येथे येतात. काय करतात काय नाही, षंडासारखे बसलेले असतात. नगररचना विभागात काय चाललेले आहे हे माहित नाही. सदस्य प्रश्न काय विचारतात त्याच्याशी काही देणे घेणे नाही. आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक नाहीत. काही नाही, काही अर्थ नाही हो.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :–</u>आयुक्त साहेब, पुढील कारवाई काय करणार आहात तुम्ही?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>शहर अभियंता यांच्याकडे कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव दिलेला आहे. शहर अभियंता आल्यानंतर नगररचना विभाग व प्रांत कार्यालयाकडुन त्या जागेच्या मालकी हक्काची छाननी केली जाईल.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले:–</u>मला वेळ दया, कधी करणार, उदया, परवा, कधी करणार? जी वेळ दयाल, त्या वेळेमध्ये झाले पाहिजे. उगाच मला सांगुन खोटे बोलु नका.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>ती जागा आपली आहे किंवा नाही याची प्रांत अधिका–यांकडुन एका आठवडयामध्ये पडताळणी करुन घेवु.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :–</u>मला असे म्हणायचे आहे की तो मार्ग तुम्ही कधी मोकळा करुन देणार आहात? अपंग लोक, माझ्या माता भगिनी तेथे शौचालयाला जातात. त्यांना तेथुन जाता येत नाही. वळसा घेवुन जावे लागते. मला ताबडतोब तो मार्ग मोकळा करुन दया.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>पडताळणी झाल्याशिवाय मार्ग मोकळा करुन देता येणार नाही.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले:–</u>अहो, पण तुम्ही वेळ सांगा ना, कधी करणार आहात? तीन दिवसांनी की चार दिवसानंतर?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>एक आठवडयामध्ये आपण पडताळणी करुन घेवु. आणि त्यानंतर आपण तो मार्ग मोकळा करुन घेवु. जर जागा आपल्या महानगरपालिकेच्या मालकीची असेल तर.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :–</u>ठिक आहे, मी आता सभागृहाचे लक्ष वेधु इच्छिते. कॅम्प नं. ५ येथिल भाजी मार्केटच्या बाजुला असलेला कच–याचा ढिगारा बाजुला करुन एक भुखंड मोकळा केलेला आहे. त्यावर सुध्दा भुमाफियांची नजर आहे. जेव्हा तेव्हा त्यावर आम्हीच लक्ष देणार. महानगरपालिकेची जबाबदारी नाही काय? की तोही भुखंड असाच भुमाफियांच्या घश्यात घालणार तुम्ही? जसे गिधडांना माहित पडते की जनावर त्याठिकाणी मेलेले आहे. ते लगेच येतात तेथे मास खायला. तसे या भुमाफियांना सुध्दा माहित आहे तेथे एक जागा मोकळी झाली आहे आणि लगेच तेथे टपकतात ते.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>मा. आयुक्त साहेब, मी आपणांस एवढेच विचारु इच्छितो की, ही जी चौकशी आहे ती सार्वजनिक बांधकाम विभाग करेल की नगररचना विभाग करेल? नगररचना विभाग करेल, कारण की, जेथे कुठे शाळा वगैरे बांधायची असेल तर त्याविषयीची चौकशी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागवाले नगररचना विभागाकडे पाठवितात. व विचारणा करतात की याठिकाणी काही आरक्षण वगैरे आहे काय? आपण सार्वजनिक बांधकाम विभागाकडे चौकशी करण्यासाठी कसे पाठविले आहे? त्याचे उत्तर दया.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>जागेची मालकी निश्चित झाल्यानंतर तो जो प्लान आहे तो नगररचना विभाग आपल्या डिपीवर सुप्रिम पोच करेल. त्यानंतर आपणांस माहित पडेल.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u> तर मग आपण श्री. शिर्के यांना उत्तर देण्यास का सांगितले?

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>सुप्रिम पोच केल्याशिवाय माहित पडणार नाही की ती जागा आरक्षणामध्ये येते की नाही ते? शिट त्यावर सुप्रिम पोच केली जाते.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>चौकशी नगररचना विभाग करेल की सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. शिर्के करतील ते मला तुम्ही सांगा.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>आरक्षणाच्या बाबतीत नगररचना विभाग चौकशी करेल. आणि मालकी हक्का विषयी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रांत अधिका–यांकडे जो काही पत्रव्यवहार केला आहे....

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>मालकी हक्काविषयीची चौकशी सार्वजनिक बांधकाम विभाग करतो काय? श्री. शिर्के यांना जरा बोलवा. मी आपणांस विचारु इच्छितो की कोणत्या कामाविषयी कोण चौकशी करु शकतो. श्री. शिर्के साहेब, तुम्ही मला एवढेच सांगा की मालकी हक्क कोणाचा आहे? तो आपण चौकशी करुन सिध्द करु शकता काय?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता):–</u>महानगरपालिकेच्या जेवढया काही मिळकती आहेत त्या मालमत्ता विभागाच्या ताब्यात असतात. व मालमत्ता विभाग मालकी हक्काविषयी चौकशी करु शकतो. परंतु तेथे संरक्षण भिंत बांधायची होती.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>तर मग बिल्डींग प्लान मंजुर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रस्ताव का येत नाहीत? ते नगररचना विभागाकडे का जातात?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता):–</u>आरक्षण, प्लान मंजुर करणे हे सर्व काम नगररचना विभाग करते परंतु मालकी हक्काविषयीची माहिती मालमत्ता विभागाकडे असावयास पाहिजे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>याचा अर्थ जे काही प्लान मंजुर होतात त्यासाठी प्रस्ताव आपणाकडे येणे गरजेचे आहे?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता):–</u>मालमत्ता विभाग म्हटले मी. सार्वजनिक बांधकाम विभाग नाही, मालमत्ता विभाग.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>आपण मालमत्ता विभागाचे आहात की सार्वजनिक बांधकाम विभागाचे आहात. सार्वजनिक बांधकाम विभागाचे आहात ना? तर मग आपण ते उत्तर दया. प्रश्नाला फिरवु नका.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता):–</u>मालकी हक्का विषयी फलक लावायचा आहे ती बाब मालमत्ता विभागाशी संबंधित आहे. व प्लान पास करणे व आरक्षणाचा जो मुद्दा आहे तो नगररचना विभागाशी संबंधीत आहे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>या प्रश्नामध्ये आपली काय भुमिका आहे त्याचे मला उत्तर दया. आपणांस श्री. म्हसाळ साहेबांनी उत्तर देण्यासाठी जे बोलावले आहे तर मग या प्रश्नाविषयी आपली काय भुमिका आहे ते सांगा.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता):–</u>तो जो भुखंड आहे तो कुणाच्या मालकीचा आहे?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>हे पाहणे सार्वजनिक बांधकाम विभागाचे काम आहे.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता):–</u>नाही, सार्वजनिक बांधकाम विभागाचे काम नाही. तरीसुध्दा आम्हांला तेथे संरक्षण भिंत...........

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>आपण सभागृहाची दिशाभुल करत आहात.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता):–</u>संरक्षण भिंत बांधायची आहे यासाठी आम्ही ती जागा कुणाची आहे याची माहिती मिळविण्यासाठी टीएलआर यांना पत्र देणार आहोत. पत्र तर कुणी कुणालाही देवु शकते. आम्ही सुध्दा देवु. त्याचप्रमाणे मालमत्ता विभागास सुध्दा पत्र देवु की आपण आपल्यावतीने सुध्दा याविषयी पत्रव्यवहार करा.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:–</u>याचा अर्थ नगररचनाकार सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागाची चौकशी करु शकतात. तेथे बसल्या बसल्या ?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता):—नगररचनाकार नाही, मालमत्ता विभाग म्हणत आहे मी.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—आपले ते काम नाही तर आपण उत्तर देण्यासाठी व्यासपीठावर कसे आलात? आपणाशी संबंधीत विषयच नाही.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता):—तेथे जी संरक्षण भिंत बांधली जात होती तिचा कार्यादेश आम्ही दिला होता. यासाठीच मला येथे बोलवण्यात आले होते.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—याचा अर्थ असा की, जे काही बांधकाम प्लान मंजुर केले जातात ते चौकशीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागात आले पाहिजेत ना? जसे आपण चौकशी करत आहात.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता):—प्लान पास करण्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचा काहीही संबंध नाही.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—तर मग येथे कसा संबंध आहे? येथे सुध्दा भुखंडाचा विषय चालु आहे ना?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—ज्याअर्थी प्लान मंजुर झालेला नाही, त्यांनी संरक्षण भिंत बांधण्यासाठी जो कार्यादेश दिला होता.......

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—संरक्षण भिंत बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन नगररचना विभागाकडे प्रस्ताव पाठवावा लागतो. संरक्षण भिंत बांधण्यासाठी ती जागा महापालिकेची आहे किंवा नाही याची माहिती घेण्यासाठी नगररचना विभागाकडे संचिका पाठवावी लागते किंवा नाही? त्याप्रमाणे त्यांनी पाठविले होते का? व चौकशी हेच करत आहेत, सार्वजनिक बांधकाम विभागवाले? नगररचना विभागाच्यावतीने सुध्दा? संपुर्ण शहराची शिट कोणाकडे असते? शिट नंबर कोणाकडे आहे? प्लॉट नंबर कोण पाहतो यांना काही माहिती आहे का?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—नगररचना विभागाकडुन माहिती मिळाल्यानंतर सुप्रिम पोच केल्यानंतर नगररचना विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व मालमत्ता विभाग या तिन्ही विभागाच्यावतीने चौकशी होणार आहे. कोणत्याही एकाच विभागाचे हे काम नाही. एका विभागाचे काम संपले म्हणजे दुस—या विभागाचे काम सुरु झाले.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—श्री. म्हसाळ साहेब, आयुक्त म्हणुन तुम्ही उत्तर दया. उप—आयुक्त, मुख्यालयाचाही पदभार तुमच्याकडे आहे. अतिक्रमण विभागाचा सुध्दा तुमच्याकडे पदभार आहे. जो विषय मा. माजी महापौरांनी महासभेत घेतलेला आहे त्याला महत्व देवुन तो भुखंड नक्की कोणाचा आहे? महापालिकेचा आहे की श्री. राजेश वानखेडेंचा आहे की श्री. जग्यासी यांचा आहे की दुस—या कुण्या क्ष व्यक्तीचा आहे? तो कोणाचा आहे? याची खातरजमा करा कारण पहिल्यांदा तो भुखंड आमचा आहे असे समजुन महापालिकेने त्यावर संरक्षण भिंत बांधण्यासाठी कार्यादेश दिलेला आहे. आणि नंतर महापालिकेचे अधिकारी फिरले आणि म्हणतात तो आमचा नाही. अशा प्रकारची भुमिका घेत आहेत, काय? आपला नाही तर मग तो कोणाचा आहे? असेल तर कागदपत्रांची पुर्णपणे खातरजमा करा. आणि ती वस्तुस्थिती महासभेसमोर पुढच्या वेळेस ठेवा.

काही सदस्य :—इतिवृत्त कायम, कायम.

महापौर :— मागील सभेचे दिनांक २०/९/२०१० (त्यात २०/१०/२०१०) दिनांक २०/१०/२०१० रोजीचे व दिनांक २०/१०/२०१० रोजीचे विशेष महासभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे. 

**विषय क्र. २ :–** मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक २०/९/२०१० (त्यात २०/१०/२०१०) दिनांक २०/१०/२०१० रोजीचे व दिनांक २०/१०/२०१० रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. बच्चाराम रुपचंदानी
अनुमोदकाचे नाव : श्री. प्रभुनाथ गुप्ता

**महासभा ठराव क्र. ५० इ** **दिनांक : २८/१२/२०१०**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक २०/९/२०१० (त्यात २०/१०/२०१०) पृष्ठ क्र. १ ते ५३ पर्यंतचे, दिनांक २०/१०/२०१० रोजीचे पृष्ठ क्र. १ ते २४ पर्यंतचे व दिनांक २०/१०/२०१० रोजीच्या विशेष महासभेचे पृष्ठ क्र. १ ते १६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी मा. महापौर श्रीमती राजश्री चौधरी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

त्यामुळे, उप महापौर श्री. विनोद ठाकुर यांनी त्याच्या जागी पिठासीन अधिकारी म्हणुन आसन ग्रहण केले.

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

यावेळी सदस्या श्रीमती पंचशिला पवार, श्रीमती लता निकम, श्रीमती चंद्रा टेकचंदानी, श्रीमती ज्योती चैनानी या सभागृहातुन बाहेर गेल्या.

---

**विषय क्र. ३:–** श्री. सुनिल बनारसी रौंधिया सफाई कामगार यांचे फौजदारी गुन्हयात न्यायालयीन निकालामुळे दोषमुक्त झाल्याने त्यांना कामावर पुर्नस्थापित करणे आणि निलंबन रद्द करुन निलंबन कालावधीचे वेतन व थकबाकी अदा करण्यास मान्य करणे.

---

**काही सदस्य :–** पास–पास......

यावेळी सदस्य श्री. सुंदर मंगतानी, श्री.तुलसीदास वसिटा, श्री. दत्तात्रय पवार, श्री. रमेश चव्हाण, श्री. रामसागर यादव, श्री. जीवन इदनानी, श्री. लाल पंजाबी, श्री. अंकुश म्हस्के हे सभागृहातुन बाहेर गेले.

**उप महापौर :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ३ :—** श्री. सुनिल बनारसी रौंधिया सफाई कामगार यांचे फौजदारी गुन्हयात न्यायालयीन निकालामुळे दोषमुक्त झाल्याने त्यांना कामावर पुर्नस्थापित करणे आणि निलंबन रद्द करुन निलंबन कालावधीचे वेतन व थकबाकी अदा करण्यास मान्य करणे.

प्रस्तावना

"श्री सुनिल बनारसी रौधिंया, सफाई कामगार, याचे विरूध मध्यवर्ती पोलिसस्टेशन, उल्हासनगर—३, येथे श्री गुरूप्रकाश चिरंजी, सफाई मुकादम यांना, दि. २०/०९/२००७ रोजी मारहाण, शिवीगाळ केल्याबद्दल गुन्हा रजि. नं I २२४/२००७ भा.द.वि. कलम ३४,३२३,३५३,५०४,५०६ अन्वये गुन्हा दाखल असुन सदर गुन्हात त्यास दि. २४/९/२००७ रोजी १३.१० वाजता अटक केली असुन त्यास कोर्टात हजर करून त्याचेवर दि. १४/१२/२००७ रोजी मा. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी सो सह दिवाणी न्यायालय उल्हासनगर—३ या, कोर्टात दोषारोप सादर केले आहे. त्याचा केस नं. ५०२२/२००७ असा असुन सदरची केस ही न्याय प्रविष्ट आहे". असा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यास कार्यालयिन आदेश जा. क्र उमपा/साप्रवि/आस्था/६१/०७ दि. ऑक्टोबर —२००७ अन्वये सेवा निलंबन देण्यात आले होते.

श्री सुनिल बनारसी रौधिंया, याचे विरूध मा. न्यायालय, उल्हासनगर येथे सेशन केस नं. ५०२२/२००७ बाबत दि. १९/४/२०१० रोजी पुढील प्रमाणे आदेश पारित केलेला आहे. 1. Accused Sunil Banarasi Rondiya is hereby acquitted of the offences punishable u/s. 353, 323, 504, 506, r/w. 34 of the I.P.C. vide section 255 (1) of the Code of Criminal Procedure. 2. his bail bond stands cancelled.

शासनाचे सामान्य प्रशासन विभागा कडिल शासन निर्णय क्र. सी.डी.आर — १३९६/प्र.क्र. ६/०६/११—अ, दि. २० जूलै—२००६ च्या निर्णयातील "परिच्छेद—२" "ड" मध्ये शासकिय सेवकाविरूध्दच्या फौजदारी प्रकरणाबाबत पुढील प्रमाणे तरतुद दिलेली आहे.

"शासकिय सेवकाविरूध्द गंभीर स्वरूपाच्या फौजदारी गुन्हयासंबधी पुरावे आहेत असे सक्रतदर्शनी सिध्द झालेले आहे. तथापी शासकिय सेवकास या गुन्हातुन दोष मुक्त करण्यात आले असेल, अशा शासकिय सेवकाविरूध्द जरी न्यायालयात अपिल पुनर्विलोकन आणि पुर्नरिक्षण दाखल करण्यात आले असेल तरी त्यास निलंबधित ठेवण्यात येउ नये. कारण संबधित सेवक दोषी असल्याची धारणा त्याच्या दोषमुक्तीमुळे शिल्लक राहत नाही".

सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री सुनिल बनारसी रौधिंया, सफाई कामगार याचे विरूध्दच्या फौजदारी गुन्हा प्रकरणी (सेशन केस नं. ५०२२/२००७) मा. न्यायालय, उल्हासनगर यानी दि. १९/४/२०१० रोजी दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये दोषमुक्त केले असल्याने त्यानां महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) १९७९ चे नियम चे पोंट कलम ५(क) मधील तरतूदीनूसार त्यांचे निलंबन रद्द करून सेवेत पून्हा पूर्नस्थापन करणे तसेच यांचा निलंबनकालावधी हा सेवाकाळ धरून त्यांचेविरूध्द निलंबनाची कार्यवाही झाली नस्ती तर जेवढे वेतन व भत्ता मिळण्यास ते पात्र राहिले असते तेवढा पगार व भत्ता त्यांना अनुज्ञेय राहील. सेवेत पुर्नस्थापित करण्याबाबत तसेच निलंबन कालावधितील वेतनाची थकबाकी अदा करण्याचा प्रस्ताव मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ५१ दिनांक:—२८/१२/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. मोहन रामरख्यानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जनार्दन ढोके

ही महासभा प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे श्री. सुनिल बनारसी रौंधिया सफाई कामगार हे फौजदारी गुन्हयात न्यायालयीन निकालामुळे दोषमुक्त झाल्याने त्यांना कामावर पुर्नस्थापित करणेस आणि निलंबन रद्द करुन निलंबन कालावधीचे वेतन व अनुषंगीक थकबाकी अदा करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

उप–महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

यावेळी सदस्य श्री. दत्तात्रय पवार, श्री. राजेश वदारिया, श्री. रमेश चव्हाण, श्री. जीवन इदनानी, श्री. लाल पंजाबी, श्री. अंकुश म्हस्के, श्री. रामसागर यादव यांनी सभागृहात प्रवेश केला.

---

**विषय क्र. ४ :–** सफाई कामगार/मुकादम चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

---

यावेळी सन्माननिय सदस्या श्रीमती पंचशिला पवार, श्रीमती लता निकम यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>उप महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४:–** सफाई कामगार/मुकादम चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

<u>प्रस्तावना</u>

वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५व ६६ अन्वये, अनुक्रमे ३०वर्ष व २०वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर, कर्मचाऱ्यास ३ महिन्यांची नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३०वर्षांच्या सेवेनंतर, व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षांच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत. त्यानुसार त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतून स्वेच्छा सेवा निवृत्ती देणे आवश्यक आहे.

| अ.क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | अर्हतकारी सेवा | नियम | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. राजेश रामचंद्र चौटेले | २०वर्षापेक्षा जास्त | ६५ | ३१/०८/२०१० |
| २ | श्रीम. बिरो विजयपाल मेहेरोलिया | २०वर्षापेक्षा जास्त | ६५ | ३१/०८/२०१० |
| ३ | श्रीम. पुष्पा पुरण मरोठिया | २०वर्षापेक्षा जास्त | ६५ | ३१/०८/२०१० |
| ४ | श्रीम. लीला मावजी वाघेला | २०वर्षापेक्षा जास्त | ६५ | ३१/१०/२०१० |
| ५ | श्रीम. कांता भोलाजी पाटोळे | २०वर्षापेक्षा जास्त | ६५ | ३१/१०/२०१० |
| ६ | श्री. बाळू येडूबा मगरे | २०वर्षापेक्षा जास्त | ६५ | ३१/१०/२०१० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | श्रीम. लक्ष्मी ओमप्रकाश | २०वर्षापेक्षा जास्त | ६५ | ३१/१२/२०१० |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम, ६५ व ६६ अन्वये, सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, वरील सफाई कामगार यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ५२ दिनांक:–२८/१२/२०१०

सुचकाचे नाव :–श्री.बी.बी. मोरे
अनुमोदकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे ७ सफाई कामगारांना आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन महापालिका सेवेतून स्वेच्छा निवृत्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

उप–महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५ :–**उल्हासनगर शहरामधील धोकादायक इमारतींच्या पूर्नबांधणीसाठी ठाणे महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियलावलीच्या धर्तीवर चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणे किंवा महासभा ठराव क्र. ८८, दिनांक १०/३/२०१० प्रमाणे अधिकतम ४ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणे याबाबत अंतिम निर्णय घेणे.

---

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती चैनानी व श्रीमती चंद्रा टेकचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–याविषयी आमची हरकत आहे. सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, हा जो पाचव्या क्रमांकाचा विषय आहे. यामध्ये चटई क्षेत्राचा जो उल्लेख आलेला आहे, जो व्यक्ती इमारतीमध्ये राहत असेल आणि तो जर त्या इमारतीचे बांधकाम करत असेल विकसित करत असेल तर त्याला एक बंधन घातले गेले पाहिजे, तो जर चटई क्षेत्र मागत असेल तर त्याला त्याठिकाणी बंधन घातले पाहिजे. त्यांनी ते बांधकाम विकता कामा नये. नाहीतर तो पैसे कमविण्यासाठी हे सर्व करेल. त्यासाठी महापालिकेने बंधन घातले पाहिजे. त्याने ते बांधकाम विकु नये आणि बाजारभाव करु नये. असे असेल तरच परवानगी दयावी. कोणी उत्तर देतो आहे का?

<u>महापालिका सचिव :—</u>यापूर्वी आपण नियम पारीत केले आहेत. त्यांविषयी शासनाकडुन काही क्युरी काढण्यात आलेल्या आहेत. ठाणे महानगरपालिका क्षेत्रात अधिकतम चटईक्षेत्र दोन आहे. त्याच धर्तीवर आपणांस उल्हासनगरमध्ये लागु करायचे आहे की, अधिकतम चार चटईक्षेत्र लागु करायचे आहे?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>ठाणेवाले करतात म्हणुन उल्हासनगरवाशियांनी करायचे? ते जर सुरी मारुन मरत असतील तर आम्ही गळफास घेवुन मरणार नाहीत. आम्हांला उल्हासनगर वाचवायचे आहे. चार चटईक्षेत्र करण्याविषयी मी असे सांगु इच्छितो की, त्यामध्ये ही अट टाका की त्यांनी बाजारभावानुसार विक्री करता कामा नये. नाहीतर उल्हासनगरवाले बराच काही पैसा कमावितील म्हणतील फार चांगले झाले ब—याच दिवसानंतर आम्हांला ही संधी मिळाली. तसे होता कामा नये.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>श्री. मोरे साहेब, आपले बोलुन झाले ना? उल्हासनगरमधील अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी जो अध्यादेश काढण्यात आला होता त्याविषयीचे जे चटईक्षेत्र होते ते जास्तीत जास्त चार होते. यास्तव आम्हांला असे वाटते की, ज्या काही धोकादायक इमारती आहेत, आपणांस माहित आहे की जेव्हा गुडमॅन कॉटेज इमारत बनली होती तेव्हा सर्वांना त्रास होता, प्लान मंजुर होत नव्हते. यासाठी आम्हांला असे वाटते की, सर्व इमारती नियमाधिन करण्यासाठी चार एफएसआय, त्याच प्रमाणे धोकादायक इमारतींसाठी सुध्दा चार एफएसआय असला पाहिजे. त्यासाठी चार चटईक्षेत्र निर्देशांक मंजुर केला जावा, अधिकतम चार.

<u>महापालिका सचिव :—</u>जे नियम आपण अगोदर पारीत केले आहेत तेच कायम करु इच्छित आहात?

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>आम्ही अगोदर जो ठराव क्र. ८८, १० मार्च रोजी पारीत केला आहे. आता तोच ठराव कायम केला पाहिजे. जास्तीत जास्त चार चटईक्षेत्र निर्देशांक असला पाहिजे.

<u>महापालिका सचिव:—</u>सर्वजण या मताशी सहमत आहे? ठिक आहे? पास सर्वसंमतीने? चार एफएसआय? मागे जो ठराव पारीत केला आहे त्याप्रमाणे?

यावेळी सदस्या श्रीमती शकुंतला पाटील, श्रीमती कविता सिरवानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.



<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>उप महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ५:—** उल्हासनगर शहरामधील धोकादायक इमारतींच्या पूर्नबांधणीसाठी ठाणे महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियलावलीच्या धर्तीवर चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणे किंवा महासभा ठराव क्र. ८८, दिनांक १०/३/२०१० प्रमाणे अधिकतम ४ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणे याबाबत अंतिम निर्णय घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरामध्ये अनधिकृत बांधकामे मोठया प्रमाणामध्ये होऊन सन १९९१ ते १९९६ या कालावधीमध्ये रेतीचा तुटवडा असल्यामुळे माती मिश्रीत वाळू वापरुन तसेच स्वस्त दरामध्ये इमारतीचे साहित्य उपलब्ध झाल्याने अनेक इमारती बांधण्यात आल्या. परंतू अशा इमारतींचे आयुष्य कमी असल्यामुळे त्या इमारती धोकादायक होऊन कोसळण्याच्या मार्गावर आहेत. तथापि उल्हासनगर शहराच्या बांधकाम नियंत्रण नियमावलीमध्ये अशा धोकादायक इमारतींचे पुर्नबांधणी करताना चटई क्षेत्र निर्देशांक वाढवुन देण्याची तरतुद नसल्यामुळे अशा इमारतींना वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करता येत नाही.

उल्हासनगर शहरातील इमारतींपैकी तळमजला + ४ मजलेची वाणिज्य व रहिवासी वापरासाठीची इमारत बांधण्यात आलेली होती व त्यात तळमजल्यावर ३ दुकाने व १ ते ४ मजल्यावर १८ सदनिका होत्या. ती इमारत पूर्णपणे कोसळली. तद्नंतर सदर इमारतीचे दुप्पट

चटई क्षेत्र निर्देशांकाने बांधकाम नकाशे मंजूरीस सादर केले होते. तथापि, अशा प्रकारचे प्रावधान मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नाही. तथापि, सध्या सदर जागेवर १ चटई क्षेत्र निर्देशांकाप्रमाणे बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आलेली आहे. चटई क्षेत्र निर्देशांक १ प्रमाणे पूर्वी रहात असलेले १८ सदनिकाधारक आणि ३ दुकानदार यांना ही जागा अपूरी पडत असल्यामुळे त्यांच्याकडून आणि महानगरपालिकेच्या नगरसेवकाकडून अशा धोकादायक इमारतींना चार चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याची मागणी होत आहे.

सदर धोकादायक असणाऱ्या इमारत पडल्यास पुर्न:बांधणी करतेवेळेस ४ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय केल्यास अस्तित्वातील असलेल्या जास्तीत जास्त सदनिकाधारकांना समावेश करुन घेणे सोईचे होईल. जेणेकरुन रहिवासी बेघर होणार नाहीत.

सदरहू बाबींचा विचार करता धोकादायक असणाऱ्या इमारतीच्या पुर्न:बांधणीचा प्रस्ताव आल्यास खालील बाबींची तपासणी करुन त्यांना consumed केलेल्या एफ.एस.आय. किंवा अधिकतम चार याप्रमाणे पुर्न:बांधणीच्या प्रस्तावास मान्यता देणे योग्य होईल.

१. इमारत धोकादायक स्थितीत आहे किंवा नाही याची पडताळणी करण्यासाठी खालीलप्रमाणे

त्रिसदस्यीय समितीची नेमणूक मा. आयुक्त यांचे मान्यता घेऊन करणे योग्य होईल. त्रिसदस्यीय समितीमध्ये खालीलप्रमाणे अधिकाऱ्यांचा समावेश करता येईल.

१) उप—संचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई

२) शहर अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

३) सहा. संचालक, नगररचना / नगररचनाकार, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

२. ज्या ठिकाणी इमारत बांधण्यात आलेली आहे, त्याठिकाणी जागेचा मालकी हक्क दर्शविणाऱ्या महसुल खात्याचे सनद/प्रॉपर्टी कार्ड/सातबारा उतारा/खरेदी खत/नांव बदलाचा दाखला इत्यादी.

३. उल्हासनगर शहराचे मंजूर विकास योजना किंवा त्यावेळेस अंमलात असलेली शासनाचे

आदेशाच्या प्रमाणेची विकास योजनेचे प्रस्ताव विचारात घेऊन पुर्न:बांधणीच्या प्रस्तावाला मंजूरी देणे बंधनकारक राहील.

४. ज्या धोकादायक इमारतीमध्ये ४ पेक्षा अधिक चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्यात आलेला आहे,

त्यांना अधिकतम ४ व ज्या इमारतीमध्ये ४ पेक्षा कमी एफएसआय वापरण्यात आलेला आहे त्यांना तेवढयापुरती इमारत बांधकाम मंजूरीच्या प्रस्तावावर विचार करता येईल.

तथापि, सध्याचे प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार सामासिक अंतर अधिकतम सहा मीटर चारही बाजूंनी सोडल्यास मजल्यांची संख्या वाढेल. त्यामुळे इतर महानगरपालिकेमध्ये असलेल्या इमारतीची उंचीप्रमाणे अधिकतम (९१ मी.) एवढीची तरतुद करणे योग्य होईल. ९१ मी. पर्यंतची अधिकतम उंचीची तरतुद साधारणपणे सर्व प्रस्तावांना तसेच धोकादायक व इतर (सामान्य प्रस्तावांना) ९१ मी. ची मर्यादा ठेवणे योग्य होईल. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत भुखंडाचे आकार व क्षेत्रफळ कमी असल्याने सामासिक अंतर चारही बाजूने ३ मी. ठेवणे योग्य आहे. तसेच या सामासिक अंतरात बांधकाम बसत नसल्यास समोरचे सामासिक अंतर ३ मी. ठेवुन उर्वरित बाजूस सामासिक अंतरात शिथिलता देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना मंजूर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे देणे योग्य होईल.

५. इमारतीची उंची वाढल्यामुळे धोकादायक किंवा सामान्य इमारतीमध्ये २४ मी. च्या पुढे म्हणजेच सात मजल्याच्या पुढे प्रत्येक मजल्याला अग्निशमनची व्यवस्था (provision) करणे आवश्यक राहील. तसेच महानगरपालिकेला अग्निशमन गाडी खरेदी करण्याकरीता सात मजल्याच्या वरती प्रत्येक मजल्याला प्रती चौ.फुट प्रमाणे Capitation Fee घेणे योग्य होईल. Capitation Fee शासनानी ठरवुन दिलेल्या कारणाप्रमाणे तसचे वेळोवेळी महानगरपालिका जे दर निश्चित करतील त्याप्रमाणे घेणे योग्य होईल.

तरी धोकादायक इमारतींच्या बाबतीत त्यांनी वापरलेला चटई क्षेत्र निर्देशांक किंवा अधिकतम ४.०० यापेक्षा जे कमी असेल ते देण्यासाठी वरीलप्रमाणे फेरबदल करणाऱ्या

मान्यतेस विशेष महासभा ठराव क्र. ८८ दि. १०.०३.१० रोजी मान्यता देण्यात आली होती. त्या अनुषंगाने संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये सदरचा ठराव मा. प्रधान सचिव (नवि—१) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई—३२ च्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला असता त्यांचे पत्र क्र. टिपीएस—१२१०/३३६/प्र.क्र.१६५/१०/नवि—१२ नुसार ''ठाणे महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत मालकी हक्काच्या इमारतीसाठी अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक किंवा अधिकृत व्याप्त चटई क्षेत्र निर्देशांक यापैकी जे अधिक असेल ते अधिक १५ टक्के अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक याप्रमाणे चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. तसेच भाडेकरु व्याप्त इमारतीसाठी अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक + भाडेकरु व्याप्त क्षेत्राच्या ५० टक्के अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक किंवा २ यापैकी जे कमी असेल ते इतका चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. याच धर्तीवर उल्हासनगर शहरातील धोकादायक इमारतीच्या पुर्नबांधणीसाठी अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेकामी वरीलप्रमाणे प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेने कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव सादर केल्यास त्याचा गुणवत्तेनुसार विचार करून शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल'' असे कळविले आहे.

सदर प्रस्तावास महासभेने ठराव क्र.८८, दि.१०/०३/२०१० रोजी मंजुरी दिलेली असुन दिनांक २७/५/२०१० रोजीच्या पत्रान्व्ये हरकती व सुचना मागविल्या होत्या. त्याप्रमाणे विहीत मुदतीत हरकती व सुचना या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या नाही. परंतु शासनाने प्रस्तावित केलेले धोरण किंवा महानगरपालिकेने ठरविलेले धोरण यांचा अंतिम निर्णय महासभेने घेणे योग्य होईल.

सदरचा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी महासभेकडे सादर.

<u>महासभा ठराव क्र</u>: ५३ <u>दिनांकः—२८/१२/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर शहरामधील धोकादायक इमारतींच्या पूर्नबांधणीसाठी अधिकत्तम ४ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणे प्रयोजनार्थ दिनांक १०/३/२०१० रोजीचा महासभा ठराव क्र. ८८ कायम करीत आहे.

कारण——

उल्हासनगर शहरातील अनाधिकृत विकास कामे नियमाधिन कायदा २००६ अन्वये चटई क्षेत्र ४ पर्यंत अनाधिकृत विकास कामे नियमाधीन करण्याची तरतुद आहे, त्यामुळे त्या व्याप्तीचे चटई क्षेत्र अनुज्ञेय असणे गरजेचे आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी सदस्या श्रीमती शकुंतला पाटील, श्रीमती कविता सिरवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६** :— उल्हासनगर शहरातील दारिद्रिय रेषेखालील कुटुंबियांचे सर्व्हेक्षणाच्या अंतिम यादीची

---

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>आपण ही जी सीडी प्रसिध्द केली आहे त्यामध्ये ज्या लोकांनी हरकत घेतलेली आहे, त्यांची नावे समाविष्ट केली आहेत का? त्याचा जरा प्रथम खुलासा करा.

<u>कु. दिपमाला गोपाळे (प्रकल्प अधिकारी, सुजशरोयो):—</u>मा. महापौर महोदया, उप—महापौर, सन्माननिय आयुक्त, सन्माननिय गटनेते साहेब, सन्माननिय नगरसेवक, आपली जी यादी प्रसिध्द झाली होती त्यानंतर ज्यांनी ज्यांनी आक्षेप फॉर्म भरले होते त्यांची आपण माहिती नोंद करुन घेतली आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>पुढील कार्यवाही काय आहे? व ही यादी कधीपर्यंत अंतिम होईल?

<u>कु. दिपमाला गोपाळे (प्रकल्प अधिकारी, सुजशरोयो):—</u>यादी अंतिम झाली नाही ती आता प्रसिध्द करायची आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>सीडी प्रसिध्द केल्यानंतरची पुढील कार्यवाही काय आहे. व किती कालावधीत अंतिम यादी प्रसिध्द होईल?

<u>कु. दिपमाला गोपाळे (प्रकल्प अधिकारी, सुजशरोयो):—</u>आता ही सीडी अंतिम झाल्यानंतर आम्ही शासनाकडे पाठवु. त्यानंतर शेवटची सीडी येईल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>किती दिवसामध्ये अंतिम होईल असे आपणांस वाटते?

<u>कु. दिपमाला गोपाळे (प्रकल्प अधिकारी, सुजशरोयो):—</u>आज आपण मंजुरी दिली तर उदयाच ती शासनाकडे पाठवु.

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—</u>एकुण किती अर्ज भरले होते?

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>मा. महापौर महोदया, जी सीडी देण्यात आलेली आहे ती काही बरोबर दिसत नाही. संगणकावर ती उघडली सुध्दा जात नाही. काहींच्या अशा तक्रारी आहेत की सीडीच उघडली गेली नाही. तर तुम्ही जी सीडी दिली आहे त्यात बघायचे काय? आम्ही कसे समजणार की आमच्या प्रभागातील नावे आली आहेत की नाही?

<u>कु. दिपमाला गोपाळे (प्रकल्प अधिकारी, सुजशरोयो):—</u>त्याच्यासाठी संबंधीत सॉफ्टवेअर लोड असायला हवे होते.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, जी सीडी देण्यात आलेली आहे ती संगणकावर लावली असता काही दिसत नाही असे आमच्या काही नगरसेवकांनी सांगितले आहे. त्याबाबतीत मी असे सांगु इच्छितो की, एक दिवस त्यांनी असा कार्यक्रम आयोजित करावा. व सर्व नगरसेवकांना पत्र देवुन कळविण्यात यावे की दारिद्रय रेषेखाली ज्या लोकांची नावे नोंदणी करण्यात आली आहेत त्याची यादीची सीडी त्या त्या कार्यक्रमाच्या दिवशी दाखविण्यात येईल त्यादिवशी कृपया सर्वांनी उपस्थित राहावे म्हणजे कोणी हरकत घेणार नाही. असे कु. गोपाळे मॅडम तुम्ही सांगा ना.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>ही जी दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या नावाची यादी असलेली सीडी दिली आहे त्यामध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची एकुण संख्या किती आहे?

<u>कु. दिपमाला गोपाळे (प्रकल्प अधिकारी, सुजशरोयो):—</u>१४,०२३ आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>पास? सर्व संमतीने?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>उप महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ६**:– उल्हासनगर शहरातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांचे सर्व्हेक्षणाच्या अंतिम यादीची सीडी प्रधिघ्द करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना कार्यरत आहे. दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण करण्याबाबतचे आदेश शासकिय तांत्रिक विदयालय, उल्हासनगर–३ यांना देण्यात आले होते. सदर सर्वेक्षणाचे कामाचे आदेश २१/०९/२००५ पासून सुरु केलेले होते.

माहे जुलै, २००८ मध्ये दारिद्रय रेषेखालील अंतिम यादी नगरपरिषद संचालनालय वरळी यांनी उल्हासनगर कॅम्प क्र. १ ते ५ मध्ये दारिद्रय रेषेखालील एकूण कुटुंब संस्था २,३७२ प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानंतर दिनांक १०/०७/२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात अंतिम यादी प्रसिध्दी केल्यानंतर आक्षेप व सूचना घेण्यासाठी जाहिरात देण्यात आलेली होती. त्यानुसार दारिद्रय रेषेखालील अंतिम यादीवर आक्षेप घेण्याकरीता १ महिन्याची मुदत आदेशान्वये देण्यात आलेली होती. तसेच त्यानंतर नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी यांच्या आदेशानुसार अंतिम यादीवर आक्षेप घेण्याची मुदत दिनांक ३१/१./२००८ पर्यंत वाढविण्यात आलेली होती. तसेच उल्हासनगर कॅम्प क्रमांक १ ते ५ मधील पाचही समाजविकास संस्थांना दारिद्रय रेषेखालील अंतिम यादीवर ओक्षप अर्ज नागरीकांकडून घेण्याबाबत पत्राद्वारे कळविण्यांत आले होते. सदरील जाहिरात देवून आलेले आक्षेप अर्ज २५४६, नावामध्ये बदल व दुरुस्ती २२९ आणि सूचना/आक्षेप/बदल यांचे एकुण १४०२३ कुटुंबाचे इंग्रजी व मराठी मध्ये डाटाचे रुपांतर करण्यात आलेले आहे. नगरपरिषद प्रशासन संचालनालय वरळी यांचे आदेशानुसार अंतिम यादीवर आक्षेप घेण्याची मुदत दिनांक ३१/१०/२००८ पर्यंत वाढविण्यात आलेली होती व त्यानुसार पुन्हा वेगवेगळया स्थानिक वृत्तपत्रांमधून जाहिरात देण्यात आलेली होती. तसेच उल्हासनसगर कॅम्प क्रमांक १ ते ५ मधील पाचही समाजविकास संस्थांना दारिद्रय रेषेखालील अंतिम यादीवर ओक्षप अर्ज नागरीकांकडून घेण्याबाबत पत्राद्वारे कळविण्यांत आले होते. सदरील जाहिरात देवून आलेले आक्षेप अर्ज २५४६, नावामध्ये बदल व दुरुस्ती २२९ आणि सूचना/आक्षेप/बदल यांचे एकूण १४०२३ कुटुंबांचे इंग्रजी व मराठी मध्ये डाटाचे रुपांतर करण्यात आलेले आहे. नगरपरिषद प्रशासन संचालनालय वरळी यांचे आदेशानुसार नगर वस्ती व उपवस्ती यानुसार सद्यस्थितीमध्ये सर्वेक्षणाचे सर्व काम महापालिका स्तरावरचे पुर्ण झालेले असून सदरची सी.डी. नगरपरिषद संचालनालय वरळी यांच्याकडे दिनांक १०/८/२०१० रोजी सादर केलेली आहे. तसेच या डाटा एंट्रीची प्रत या कार्यालयास प्राप्त झालेली असून या डाटा एंट्रीची प्रतीमधील बदल करुन आपल्या कार्यालयाकडे दिनांक १५/१०/२०१० रोजी सादर केलेले आहे. त्यानुसार दिनांक २३/११/२०१० रोजी नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडुन दारिद्र रेषेखालील अंतरीम यादीची सी.डी. या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. तरी सदरची बाब महासभेच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५४ <u>दिनांक:–२८/१२/२०१०</u>

सुचकाचे नाव :– श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांचे सर्व्हेक्षणाच्या अंतिम यादीची सीडी प्रधिघ्द करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

उप–महापौर / पीठासीन अधिकारी

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ७ :–**१२ विवादित बांधकाम परवानगींबाबतचा अहवाल विचारात घेणे.

---

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–**हे प्रकरण चौकशीसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सोपविण्यात यावे.

यावेळी सदस्या श्रीमती लिलाबाई आशान, श्रीमती शकुंतला पाटील हया सभागृहातुन बाहेर गेल्या.



**सदस्य श्री. किशोर जग्यासी :–**मागच्या वेळेस जेव्हा हा विषय चर्चेस आला होता तेव्हा पंधरा प्लान होते. या पंधरा प्लानची चौकशी करण्यासाठी दिले जावे, त्यातील तीन प्लान कमी करुन बारा प्लानचा विषय आता सभासूचनेवर आणलेला आहे. एकुण पंधरा प्लानची चौकशी झाली पाहिजे.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :–**मा. महापौरजी, आयुक्त साहेबांना मी विचारु इच्छितो की हे जे १२ प्लान आहेत, त्यांची सद्यस्थिती काय आहे? त्याचे काम चालु आहे की नाही? या १२ प्लानविषयी आपण काय पत्र दिले आहे? जोपर्यंत चौकशी अहवाल येत नाही तोपर्यंत काय करायचे? आता त्याची काय स्थिती आहे?

**श्री. विजयकुमार म्हसाळ (उप–आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–**मा. महापौर महोदया, १२ विवादीत बांधकाम परवानगीबाबतचा अहवाल विचारात घेणे या विषयी सर्व परवानग्या छाननीसाठी सहा. संचालक नगररचना यांच्याकडे पाठविल्या होत्या. सविस्तर छाननी करण्यास वेळ लागणार आहे. त्यामुळे त्यांनी वेळ मागितली आहे. प्लान रद्द करण्याची कुठलीही कारवाई झालेली नाही. सर्व छाननी झाल्यानंतरच सहा. संचालक नगररचना हे प्लान रद्द करतील.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :–**हे १२ प्लान चौकशीसाठी पाठविण्यात आले आहेत ना? जोपर्यंत त्यांच्या छाननीचा अहवाल येत नाही तोपर्यंत त्या प्लानधारकांना पत्र दया, चालु असलेले काम बंद करा. प्रेसनोट जारी करा, चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर जर असे आढळुन आले की चुकीच्या पध्दतीने प्लान मंजुर केले आहेत तर मग अशा बांधकामामध्ये लोकांनी जे फ्लॅट/दुकान खरेदी केली असतील तर त्यास जबाबदार कोण राहील? जर अहवालामध्ये काही चुका निदर्शनास आल्या आणि अजुनही जर बांधकाम चालु असेल आणि आपण त्या प्लानची चौकशी करत आहोत उदया त्यामध्ये काही चुकीचे आढळुन आले तर मग? त्यासाठी आपण अगोदरच एक प्रेस नोट जारी करा की १२ प्लान बाबत चौकशी चालु आहे. त्यांच्या छाननीचा जोपर्यंत अंतिम अहवाल येत नाही तोपर्यंत अशा बांधकामांमध्ये कुणीही दुकान किंवा प्लॅाट खरेदी करु नये. आणि तोपर्यंत अशा ठिकाणची बांधकामे आपण बंद करा. चुकीच्या पध्दतीने बांधकाम नकाशे मंजुर झाले आहेत असा जर अहवाल आला आणि जर का तुम्ही अशी बांधकामे तोडली तर नुकसान कुणाचे होणार आहे? जनतेचेच ना? याबाबत श्री. भुल्लर महाराज यांनी म्हटले की, यासाठी हे प्रकरण लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे पाठवा तेच बरोबर आहे. आणि तोपर्यंत काम बंद केले जावे.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :–**मागील वेळेस सुध्दा यावर चर्चा झालेली आहे. या विषयाबाबतीत एक समिती नेमण्यात यावी. आणि त्या समितीला अधिकार देण्यात यावेत. कारण उदया जर त्या प्रकरणांमध्ये काही कमी जास्त अनियमितता आढळुन आल्या तर हे प्रकरण आपण लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे देवु शकतो आणि शहरातील तमाम नागरीकांना हे दाखवु शकतो की या उल्हासनगर शहरामध्ये काय चालले आहे? आणि म्हणुन त्यासाठी सन्माननिय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर आले पाहिजे. तुम्ही त्यासंबंधी काय कारवाई करत आहात? नाही तर तो व्यक्ती तेथे बांधकाम करुन मोकळा होणार. असे होता कामा नये.

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—या प्लानच्या बाबतीत कायदेशीर मत घेवुन जसे सन्माननिय सदस्यांनी सांगितले की, महानगरपालिकेने याविषयी जाहिर सूचना प्रसिध्दीस दयायला पाहिजे. तर कायदेशीर मत घेवुन जाहिर सूचना देण्याची कार्यवाही केली जाईल.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—या सर्व १२ प्लानचे काम चालु आहे? आता एवढा वेळ झाला महासभेमध्ये या १२ प्लान संबंधी वेळोवेळी प्रस्ताव येत आहेत. आम्ही तो पुढे ढकलत आहोत. पुन्हा येत आहे, पुन्हा आम्ही पुढे ढकलत आहोत. असे होता होता आता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे हा मुद्दा जाईल. परंतु जे प्लान मंजुर केले आहेत, त्यांच्यावर काय कारवाई केली? आपण त्यांना काही पत्र दिले आहे का की, जोपर्यंत या विषयी अंतिम अहवाल येत नाही तोपर्यंत काम बंद करा म्हणुन?

श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—दोन प्लान रद्द करण्याची कारवाई करण्यात आलेली आहे. असे संबंधित कनिष्ठ अभियंता यानी सांगितले आहे. इतर प्लानमध्ये छाननी बाकी असल्यामुळे ते रद्द करण्याची कारवाई केली नाही.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—मा. महापौरजी, व आयुक्त साहेब, हा १२ प्लानचा विषय ब—याच कालावधीपासुन चालत आलेला आहे. मला असे वाटत नाही की अशा प्रकारचा गंभीर विषय या महापालिकेत या अगोदर कधी आला असेल. या अगोदर प्लान योग्यप्रकारे मंजुर केले जात होते. बिल्डर त्यावर चटईक्षेत्राचे उल्लंघन करुन किंवा नियमांचे उल्लंघन करुन बेकायदेशीर इमारत बांधत होते. आणि त्यानुसार निष्कासनाची कारवाई इत्यादी आम्हांस पहावी लागली. आता ही नविन पध्दत चालु आहे. नगररचनाकार बिल्डरांना असे सांगतात की, आपणांस बेकायदेशीर इमारत बांधण्याची आवश्यकता नाही. आपण घाबरु नका. आपण माझी काळजी घ्या, मी आपली काळजी घेईन. आपली इमारती एक ऐवजी ४, ५ चटईक्षेत्र वापरुन बांधता येईल. आता आता आपण चार चटई क्षेत्र निर्देशांकाची मागणी करत आहोत. त्या नगररचनाकारास आपण पुन्हा येथे बसवा. चारच्या ऐवजी पाच,सहा,सात चटईक्षेत्र निर्देशांकाच्या इमारती उभ्या राहतील. काय आवश्यकता आहे? आपण आता येथे चार चटईक्षेत्र निर्देशंकाबाबत बोलत आहोत. एक असा नगररचनाकार येथे येतो, तो एका छोटयाश्या जमिनिच्या तुकडयावर चार,चार, पाच,पाच माळयाची इमारत बांधण्याची परवानगी देतो. तळमजल्यावर पार्किंगसाठी जागा सुध्दा सोडली जात नाही. व बाहेर असा फलक लावला जात होता, प्लान अप्रुव्हड एज पर युएमसी, प्लान नंबर .......ते नगररचनाकार, नगरसेवंकानी वारंवार विचारणा करुन सुध्दा या सभागृहात कधी उपस्थित राहिले नाहीत. त्यानंतर श्री. भुल्लर महाराज जेव्हा काही प्लानच्या फाईल घेवुन आले होते. तो दुसरा प्रसंग मी सांगत आहे. ज्यावेळेस श्री. भुल्लर महाराज फाईल्स घेवुन आले होते त्यावेळेस सुदैवाने नगररचनाकार सभागृहात होते. कदाचित त्यावेळेस त्या विषयाची गंभीरता व महत्व त्यांना नगररचनाकारचे लक्षात आले नसेल. म्हणुन ते सभागृहात उपस्थित होते. श्री. भुल्लर महाराज यांनी प्लानसंबंधी माहिती दिल्यानंतर प्रत्येक प्लान बाबत ते सांगत होते की यामध्ये संशय आहे, चुकी झालेली आहे. हा रद्द केला पाहिजे. हे चुकीचे झाले आहे. त्यांनी स्वत: हे सांगितलेले आहे. मागील काही महिन्यापुर्वीचे इतिवृत्त आपण पाहिले तर अशा प्रकारची नोंद आपणांस दिसून येईल. त्या इतिवृत्तात असे लिहिले आहे की, नगररचनाकार स्वत: सांगत आहेत की, हा प्लान रद्द केला पाहिजेत. हे सर्व प्लान रद्द केले पाहिजे. त्यानंतर महासभेत असा प्रश्न उपस्थित झाला होता की, या प्लानचे आता काय केले पाहिजे? त्यानंतर नगररचनाकार या सभागृहात कधी उपस्थित राहिले नाहीत. आता तिसरा प्रसंग त्यांची चौकशी केली जाते. त्यांच्याबरोबर जे सहा. संचालक नगररचना हे आहेत, कल्याण महानगरपालिकेचे त्यांना उल्हासनगर महानगरपालिकेत अतिरिक्त कार्यभार मिळाला आहे. त्या सर्व प्लानवर त्यांनी सहया केल्या आहेत. आता ते त्या प्लानस् बाबत महासभेला अहवाल देतात की, हे सर्व १२ च्या १२ प्लान बरोबर आहेत. तर मग काय हे बरोबर आहेत की, नगररचनाकार श्री. गुरगुळे बरोबर आहेत? ज्यांनी या महासभेत उभे राहुन स्वत: सांगितले होते की, या प्लानमध्ये चुक झालेली आहे. तो रद्द केला पाहिजे. नगररचनाकार म्हणतात की, हा प्लान रद्द केला पाहिजे आणि तोच प्लान बरोबर असल्याचे सहा. संचालक नगररचनाकार सांगतात. व आता तुम्ही म्हणत आहात की, आम्ही या बाबतची माहिती एकत्रित करत आहोत. कधी करत आहात? आता कोणीतरी म्हटले की, ती बांधकामे थांबविण्यासाठी आपण काही प्रयत्न केले आहेत का? आपण म्हणता की, आम्ही पाहु. यास्तव आपण एकतर असे सांगा की, आपला नगररचनाकार बरोबर होता. किंवा असे सांगा की, आपले सहा. संचालक नगररचना हे बरोबर होते की असे सांगा की आम्ही सर्व सन्माननिय सदस्य ज्या काही भावना व्यक्त करत आहोत त्या बरोबर आहेत. आज पुन्हा एक नविन मुद्दा समोर आला. आमचे उपमहापौर श्री. विनोद

ठाकुर जे मा. महापौरांच्या आसनावर आसनस्थ आहेत, त्यांचे म्हणणे एका वर्तमानपत्रामध्ये छापुन आले आहे की येथे नगररचनाकारांची बदली झाल्यानंतर आणि सुट्टी असतांनाही प्लान मंजुर करत आहेत. म्हणजे गंभीरतेची काही सिमा आहे की नाही. बेशर्मीची एक हद्द असते. या सर्व हद्दी पार करुन कोठेतरी बसून, पुण्यामध्ये बसून, हॉटेलमध्ये बसुन बिल्डरांना भेटत राहिल व प्लान मंजुर करत राहील. व आमच्या शहराचा सत्यानाश करत राहिल. व आपण म्हणता की, ठिक आहे, पाहु. हा अतिशय गंभीर विषय आहे. या विषयाची संपुर्ण माहिती मिळविण्याचा अधिकार आमच्या प्रत्येक सदस्यास आहे. व या शहरामध्ये राहणारा एक एक व्यक्ती हे जाणुन घेवु इच्छितो की, हे सर्व कसे होत आहे? अधिका–याची हिंमत कशी होते? एक अधिकारी संपुर्ण महासभेला, शहराला न जुमानता त्याच्या मर्जीला येईल असे प्लान मंजुर करत राहिल. व मर्जीला येईल तेव्हा बदली करुन निघुन जाईल. महासभेत येणार नाही. व सहा. संचालक नगररचनाकार कल्याण महापालिकेत बसून सांगत राहतात की मी जे काही केले ते बरोबर केले आहे. त्यांचें हावभाव पहा. एकतर चोरी करतात आणि वरुन मस्ती दाखवतात. या शहरास लुटतात व मस्ती दाखवतात. या शहरातील बिल्डरांकडुन पैसे घेवुन जातात आणि मस्ती दाखवता? ते बांधकाम बिल्डर कुणा गरीबाला विकतो. जो आपले सोने, नाणे गहाण ठेवतो, बॅंकेतुन कर्ज काढतो, व फ्लॅट खरेदी करतो? उदया ती इमारत तोडली तर कोण भोगणार? बिल्डर की त्या फ्लॅटमध्ये राहणारा? किती लोकांवर आपण अत्याचार करत राहणार? कधी पर्यंत? या प्लॅन संबंधीची संपुर्ण माहिती घेण्याचा अधिकार येथिल प्रत्येक नगरसेवकास आहे. या शहरामध्ये राहणा–या प्रत्येक व्यक्तीस आहे. यासाठी या प्रकरणासंदर्भात नगरसेवकांची एक समिती असली पाहिजे. त्यांनी प्रामाणिकपणे या प्रकरणांच्या तळापर्यंत गेले पाहिजे. व त्या अहवालानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे हे प्रकरण पाठवुन किंवा अन्य कोणत्याही मार्गाने संबंधितास दंडित केले पाहिजे. त्यानंतर याठिकाणी अशा प्रकारचे लोक, समाज उभा राहिला पाहिजे, अधिकारी उभे राहिले पाहिजेत. जेणेकरुन असा प्रकार करण्याची कुण्या अधिका–यास हिम्मत होता कामा नये की, मी माझ्या मस्तीने येईल आणि मस्तीने जाईन.

यावेळी सदस्या श्रीमती लिलाबाई आशान, श्रीमती शकुंतला पाटील यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>तो दलाल कोण आहे की तो पुण्याला जावुन प्लान पास करुन आणतो.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मा. महापौरजी, या प्रकरणासंदर्भात चौकशी करण्यासाठी एक समिती गठित केली जावी. कारण की अधिकारी एक दुस–यास मिळाले आहेत. ते त्या अधिका–यास दोषी ठरवु शकणार नाहीत. कमीत कमी आम्ही नगरसेवक लोक एका अधिका–यास लाचलुचपत विभागाच्या जाळयात पोहचवु शकतो. त्याची वाट लावु शकतो. तेव्हाच ही महापालिका सुधरेल आणि हे शहर सुधरेल.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>आयुक्त साहेब, तोपर्यंत या १२ प्लॅनधारकांना आपण नोटिस बजावुन त्यांचे बांधकाम बंद करावे व त्याबाबत एक प्रेस नोट काढली जावी. जोपर्यंत समितीचा अहवाल किंवा लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचा अहवाल अंतिम होत नाही तोपर्यंत विवादीत प्लॅनचे बांधकाम बंद ठेवले जावे. व प्रेस नोटद्वारे जनतेला कळविण्यांत यावे की, या प्लॅनमध्ये गडबड आहे. तरी कृपया या इमारतींमध्ये फ्लॅट किंवा दुकान खरेदी करतांना योग्य तो विचार करुन त्यानंतरच खरेदी करावे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सभागृहात उपस्थित असलेले सर्व सन्माननिय सदस्य, या विषयाबाबत सभागृहातील सदस्यांची भावना लक्षात घेता मला असे वाटते की, याबाबत चौकशी करण्यासाठी सदस्यांची एक समिती नेमली जावी. त्यामध्ये मा. महापौर, उप–महापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, त्याचबरोबर सर्व पक्षांचे गटनेते यांची एक समिती नेमली जावी. यानंतर जो काही निर्णय होईल, जसे काही सदस्य म्हणतात की, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्रकरण चौकशीसाठी पाठवावे, त्याप्रमाणे ते पाठविले जाईल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:–</u>मा. महापौर, मी जाणुन घेवु इच्छितो की, ही जी समिती नेमली जात आहे ती कोणत्या नियमानुसार नेमली जात आहे? त्या समितीचे अधिकार काय असतील? त्यांचे अधिकार क्षेत्र काय असेल? त्यांची जबाबदारी काय असेल? काय आपण त्यांना हे अधिकार देवु शकतो का की जे प्लान

अगोदरच मंजुर केले आहेत त्यांची छाननी करुन प्लॅन  बरोबर आहेत की चुकीचे आहेत त्याची माहिती देवु शकतील.  कारण की, नगरसेवकांना तर तांत्रिक ज्ञान नाही. ते कसे छाननी करु शकतात? आणि जर करु शकत असतील तर कोणत्या नियमानुसार करु शकतात?  याचाही खुलासा करावा.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—श्री. राजेश वदारिया जे म्हणत आहेत त्यांच्या मताशी मी सहमत आहे. या प्रकरणातील तांत्रिक बाबी सर्वांना माहित नाहीत.  त्यांनी अशी विचारणा केली की, समितीला कोणते अधिकार असतील त्या सर्व बाबींचा खुलासा झाला पाहिजे.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—मा. आयुक्त साहेब, मा. उप—महापौर साहेब, लोकप्रतिनिधींची ही एक समिती असेल आणि ही समिती नेमुनही जर भ्रष्टाचार झाला तर त्यास समिती जबाबदार राहिल असे मला वाटते. लोकांमध्ये अशी चर्चा आहे की, समितीचे त्यांच्यावर नियंत्रण नाही.  भ्रष्टाचारामध्ये समितीपण आहे.  अशी लोकांमध्ये चर्चा होईल. तर माझी सर्व नगरसेवकांना एक सूचना आहे की, सर्व नगरसेवकांनी त्यांच्यावर दबाव आणुन नियंत्रण ठेवले पाहिजे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—बरोबर आहे, स्थायी समितीमध्येही तसेच चालले आहे.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—सन्माननिय सदस्य श्री. रमेश चव्हाण यांनी जो मुद्दा येथे मांडला, समिती नेमण्याबाबतीत सभागृह नेत्याचा प्रस्ताव होता की या समितीमध्ये गटनेत्यांचा समावेश केला जावा.  गटनेता म्हणुन माझा जर या समितीमध्ये समावेश होत असेल तर पुर्ण प्रामाणिकपणे चौकशी होईल श्री. रमेश चव्हाण व संपुर्ण सभागृहाला मी खात्रीपुर्वक सांगु इच्छितो की, ही चौकशी पुर्ण प्रामाणिकपणे होईल. त्यामध्ये शहरातील जनता, नगरसेवक आणि सभागृहास कोणताही धोका दिला जाणार नाही.  सभागृहाची शुध्दता लक्षात घेता ईश्वरास साक्षी ठेवुन मी शपथ घेतो की, येथे कोणत्याही प्रकारची कोणाला अडचण निर्माण होणार नाही.  व चौकशी योग्य प्रकारे झाली पाहिजे.  व त्याद्वारे लोकांमध्ये असा एक संदेश गेला पाहिजे की, योग्यप्रकारे चौकशी चालु आहे.  श्री. राजेश वदारिया हे या समितीच्या रचनेबाबत काही नियम वगैरे आहेत का अशी विचारणा करत आहेत.  त्यानुसार मी सांगु इच्छितो की, समिती नेमण्याबाबतीत सभागृहाला अधिकार आहेत. तांत्रिक गोष्टीवर बोट ठेवुन नियमांची विचारणा केली तर ब—याचशा गोष्टी त्यामध्ये येतात.  परंतु येथे सभागृहातील संकेत समजणे, सभागृहाची भावना समजणे व अशा प्रकारचा भ्रष्टाचार व अशा प्रकारच्या वाईट गोष्टी पुन्हा होवु नयेत यासाठी जे काही करायला पाहिजे त्यासाठी सर्वांनी सहकार्य दिले पाहिजे धन्यवाद.

सदस्य श्री. प्रकाश सावंत :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, १२ विवादित प्लॅन संदर्भात श्री. नरेंद्र राजानी यांनी जे पोटतिडकिने सांगितले परंतु या १२ प्लॅनची सद्यस्थती काय आहे?  त्यांची बांधकामे पुर्ण झाली आहेत काय? काय त्याची परिस्थिती आपण सांगु शकाल काय? यावर तुम्ही कोणती कारवाई केली, काम थांबविले, त्याबददल तुम्ही सांगा तरच समिती काम करु शकेल.

श्री. विजयकुमार म्हसाळ(उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सन्माननिय महापौर महोदया, या संदर्भात अशाच आशयाचा प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळेस उत्तर दिले होते.  की या प्रकरणाची सहा. संचालक नगररचना यांच्या मार्फत चौकशी सुरु आहे.  या प्लानची छाननी पुर्ण झाल्यानंतरच प्लॅन रद्द करण्याची पुढील कार्यवाही केली जाईल.  मघाशी काही सदस्यांनी विचारले होते की याबाबतची प्रेस नोट देता येईल काय?  त्याबाबत कायदेशीर मत घेवुन प्रेस नोट देण्याची कार्यवाही करु.  प्लॅन रिव्होक करण्याची अदयापपर्यंत कुठलीहि कारवाई केलेली नाही.  छाननी लवकरात लवकर होईल यासाठी सहा. संचालक नगररचना यांना समक्ष सूचना दिलेल्या आहेत.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—अशा बांधकामामध्ये बिल्डर लोकांनी प्लॅट विकले आहेत त्याची स्थिती काय आहे ते सांगा ना?  ती माहिती नाही आहे तुमच्याकडे? हा फार महत्वाचा विषय आहे.  या प्रकरणामध्ये कितीतरी अधिकारी जेलमध्ये जावु शकतात.  त्यामध्ये तुमचापण नंबर लागु शकतो.  तुम्ही जर अशा चुका करायला लागलात ना तर गुन्हा दाखल होईल तुमच्यावर.

सदस्य श्री. प्रकाश सावंत :—आयुक्त साहेब, आमच्या श्री. भुल्लर महाराजजी यांनी हे जे प्रकरण काढले होते ते एक वर्षापुर्वीचे आहे.  तेथे लोक जर राहायला गेले असतील तर तुम्ही काय करणार आहात त्यावर?

आणि समिती तरी काय करणार? मला सांगा? एक वर्षापासुन तुम्ही सांगत आहात की पुढच्या महिन्यात कारवाई करु. याच्याकडुन चौकशी करु, त्याच्याकडुन चौकशी करु. कधी तुमचा नगररचनाकार नसतो, कधी सहा. संचालक नगररचना नसतात. अधिकारी फक्त पगार घेणारे आहेत? चौकशी पुर्ण होईपर्यंत येथे कुणी अधिकारी नसणार, तुम्ही नसणार. तेथे राहणारे लोक मरणार आहेत. यासाठी त्या प्लॅनची आताची स्थिती काय आहे? ती सांगावी.

श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–बांधकाम परवानगी रदद केलेली नाही याचा अर्थ तेथे काम सुरु आहे. कुठल्या प्लॉनवर बांधकाम सुरु आहे. कुठल्या प्लानवर बांधकाम बंद आहे. याबाबतची काही माहिती नाही. बांधकाम परवानगी मंजुर केली आहे याचा अर्थ तेथे बांधकाम सुरु असेल.

सदस्य श्री. प्रकाश सावंत :–काम सुरु असेल तर तुमची समिती काय करेल? तुम्ही चुकीच्या पध्दतीने प्लान मंजुर केले आहेत. आणि तेथे जर बांधकाम चालु आहे तर काय करणार आहे समितीतरी?

सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :–मा. महापौरजी, आणि आयुक्त साहेब, मागील सात–आठ महिन्यापासुन १२ विवादीत प्लॉनबाबत सभागृहात चर्चा होत आहे, आणि ज्या पध्दतीने आजकाल प्लॉन मंजुर होत आहेत, मागील सोमवारी सुध्दा नऊ प्लॉन मंजुर झाले आहेत. नगररचनाकार नसतांना सुध्दा. त्यामुळे पुन्हा ६ महिन्यानंतर आपणांस २४ प्लॉनची चौकशी करावी लागेल. तर नगररचनाकार नसतांनाही प्लॉन कसे मंजुर होत आहेत ते पहा.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :–मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सहा. संचालक नगररचना यांच्या चौकशीचा पुरावा आपणांस दाखवु इच्छितो. फक्त आपण श्री. खामितकर यांना व्यासपीठावर बोलवा मी आताच सिध्द करुन दाखवितो सहा. संचालक नगररचना यांनी या १२ प्लॉनची काय चौकशी केली आहे? आपण त्यांना बोलवा. पृष्ठ क्र. ३९ काढा आणि त्यांना वाचण्यास सांगा.

सदस्य श्री. सतिश चहाळ :–मा. महापौरजी, आयुक्त साहेब, नगररचनाकारांची चौकशी सीबीआय मार्फत झाली पाहिजे. हा एकच मार्ग त्यांच्यासाठी पुरेसा आहे. वारंवार चौकशी बसवुन, चौकश्या बसवायच्या त्यांची चौकशी करायची, आता १२ प्लॅनचे जे काम चालु आहे, त्याची सभागृहास माहिती दया. व त्यासंबंधी वर्तमानपत्रांमध्ये एक जाहिर सूचना प्रसिध्द करा. विविध वृत्तवाहिन्यांवर, दुरदर्शनवर जाहिर सूचना प्रसिध्द करा की या विवादित १२ प्लॅनच्या बांधकामामध्ये कुणी दुकान किंवा प्लॅट खरेदी करु नये अशी जाहिर सूचना प्रसिध्द करा.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :–मा. आयुक्त साहेब, दोन मिनिटांसाठी श्री. खामितकर यांना व्यासपीठावर बोलवा. इतिवृत्ताचे पृष्ठ क्र. ३९ त्यांना वाचण्यास सांगा. त्या पृष्ठावर विषय क्र. ४ ची नोंद आलेली आहे.

सदस्य श्री. सतिश चहाळ :–मा. महापौरजी हा आदर्श घोटाळा आहे. उल्हासनगरचा,

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–सचिव साहेब, समिती नेमण्याचा जो प्रस्ताव मी दिला होता तो पारीत केला जावा. किंवा त्यावर मतदान घ्यावे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :–पास, पास, समिती नेमण्याचा प्रस्ताव पास. सचिव साहेब, काय करत आहात, पुढील विषय पुकारत आहात काय? मा. महापौर, मा. उप–महापौर, आयुक्त साहेब, सन्मानिय सदस्य, पान नंबर ३९ वर, हिंदुस्तान पेन्सील फॅक्टरी प्राय. लिमिटेड संदर्भात विपर्यस्त मुद्दा या रकान्यात कंडिशनल सीडी प्रमाणे शासन मंजुरीशिवाय सदर जागा विकु शकत नाही, कर्ज घेवु शकत नाही, गहाण ठेवु शकत नाही, तसेच फेरबदल करु शकत नाही. यांनी प्लान पास केला आहे. प्लॉन बघुन लोक बुकिंग करतील. सदर इमारतीत लोक गाळे घेतील. त्यामुळे लोकांना नाहक त्रास सहन करावा लागेल, बॅकेतुन कर्ज घेतल्यास बॅक दिवाळखोरीत जाईल. लोकांची व बॅकेची फसवणूक होईल.

यावेळी सदस्या श्रीमती जया माखिजा, श्रीमती इंदिरा उदासी, श्रीमती रजनी महाडिक हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—यामध्ये २ नंबरचा जो रकाना आहे त्यामध्ये प्लॉट नंबर लिहिला आहे. तो कोणता आहे ते वाचुन दाखवा. जेथे आपण प्लॅान मंजुर केला आहे तो पत्ता वाचुन दाखवा.

श्री. खामितकर (कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग):—प्लॉट नंबर २९, सेक्शन ३, शिट नंबर ७ कॅम्प ४.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—उल्हासनगरमध्ये सेक्शन नंबर ३ आहे का?

श्री. खामितकर (कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग):—चुक झाली आहे. सेक्शन नं. ३० असेल.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—यामध्ये तर सेक्शन नं. ३ लिहिला आहे. या विषयी सहा. संचालक नगररचना यांनी चौकशी केली. नगरररचनाकारांनी प्लॅान मंजुर केला, तरीसुध्दा त्यांचे लक्ष गेले नाही? व शिट नंबर बरोबर आहे का?

श्री. खामितकर (कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग):—संबंधित फाईल काढुन तपासुन बघावे लागेल.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—हा प्लॉट ३० सेक्शनमध्ये सुध्दा येत नाही. मी आपणांस आव्हान करतो. मा. आयुक्त साहेब, हा प्लॉट सेक्शन ३० मध्ये येतो असे यांना सत्यप्रतिज्ञेवर लिहुन दयावयास सांगा. मी सुध्दा सत्यप्रतिज्ञेवर असे लिहुन देतो की हा प्लॉट ३० सेक्शनमध्ये येत नाही कारण की मी स्वत: ३० सेक्शन मध्ये राहतो, श्री. नरेंद्र राजानी सुध्दा सेक्शन ३० मध्ये राहतात.

श्री. विजयकुमार म्हसाळ(उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—ही टंकलेखनाची चुक आहे ती दुरुस्त करुन घेतली जाईल.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—३० सेक्शनमध्ये हा प्लॉटच नाही आहे. आपण काय म्हणता टंकलेखन दोष आहे म्हणुन?

श्री. विजयकुमार म्हसाळ(उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—तो सेक्शन ३ आहे की ३० आहे............

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—त्यांनी सेक्शन ३ लिहिले आहे, परंतु ते म्हणत असतील की सेक्शन ३० आहे टंकलेखन दोष आहे तर ३० सेक्शनमध्ये सुध्दा हा प्लॉट नाही आहे.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—आदरणीय सदस्य श्री. किशोर जग्यासी जे माझे मित्र आहेत त्यांना सांगु इच्छितो की, यांनी जो अहवाल सादर केलेला आहे, त्यांच्या एक एक पानात नाही तर एक एक वाक्यामध्ये १०, १० चुका मिळतील. या प्रकरणाची जर चौकशी झाली तर ना केवळ नगररचनाकार तर ज्यांनी या महासभेची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला आहे, ज्यांनी हे सर्व बरोबर आहे, बरोबर आहे असा अहवाल दिला आहे त्यांना सुध्दा आम्ही येथे उभा करु ना? एवढया मोठया प्रमाणावर चुका असतांना त्यांनी असा हा अहवाल दिला आहे.

यावेळी सदस्य श्री. दत्तात्रय पवार, श्री. गोविंदराम लुंड हे सभागृहातुन बाहेर गेले.

महापालिका सचिव :—ही जी आपण समिती तयार करत आहात, त्यामध्ये काही अटी शर्ती टाकु इच्छित आहात का?

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—समितीला अधिकार आहेत.

<u>महापालिका सचिव :—</u>काय अधिकार आहेत? समितीचे कार्यक्षेत्र काय राहिल.

<u>सदस्य श्री.जीवन इदनानी :—</u>हा जो अहवाल आलेला आहे त्याची छाननी करणे, त्याच्या तथ्यांमध्ये जाणे, आणि कारवाईची शिफारस करणे हे या समितीचे कार्यक्षेत्र असेल.

<u>महापालिका सचिव :—</u>पहिली गोष्ट तर ही आहे की, त्यांनी जो अहवाल दिलेला आहे त्याबाबत आपण समाधानी नाहीत.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>नाहीत, त्यासाठीच तर समिती नेमत आहोत.

<u>महापालिका सचिव :—</u>तर तो अहवाल आपण अमान्य करत आहात एक गोष्ट तर ही राहिल. दुसरी गोष्ट अशी की आपण जी समिती नेमत आहात त्याचे अध्यक्ष कोण असतील, सचिव कोण असतील?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>समितीचे अध्यक्ष महापौर असतील.

<u>महापालिका सचिव :—</u>व सचिव कोण असतील?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>सचिव राहिल कुणीही गटनेता किंवा सभागृह नेता.

<u>महापालिका सचिव :—</u>आपण ठरवा, निर्णय घ्या. त्याचे नाव दया. कारण की अहवाल तयार करावा लागेल.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>हे त्या समितीमध्ये ठरवु ना?

<u>महापालिका सचिव :—</u>नाही, नाही आपण आता समिती तयार करत आहात तर तिला महासभेपुढे अहवाल दयावा लागेल.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>सदस्य कोण असावा याचा निर्णय समितीमध्ये घेवु.

<u>महापालिका सचिव :—</u>समिती सदस्यांमधुन आपण कुणालातरी सचिव पद दया ना? त्याबाबत आताच निर्णय घ्या ना? कारण की आपणांस महासभेला अहवाल दयावा लागेल.

<u>काही सदस्य:—</u>समितीचे सचिव असतील सभागृह नेता.

<u>महापालिका सचिव :—</u>सभागृह नेता ? ठिक आहे. व कालमर्यादा काय राहिल?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>तीन महिने.

<u>महापालिका सचिव :—</u>तीन महिने? ठिक आहे, १२ प्लॉन संबंधी ना?

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>सचिव साहेब, मी पहिले सांगितले., १५ की १६ प्लॉन आहेत. जे पहिलेच आले होते.

<u>महापालिका सचिव :—</u>येथे आपणा समोर जो अहवाल आहे तो १२ प्लॉनचा आहे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>तर मग तिन प्लॉन कसे काढण्यात आले? त्यासाठी वेगळी समिती नेमली जाईल काय? सर्व प्लानची एकत्रित चौकशी झाली पाहिजे. १५ प्लॉनची एकत्रितपणे चौकशी झाली पाहिजे.

<u>महापालिका सचिव :—</u>काय करायचे आहे? आपण निर्णय घ्या.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—या अहवालामध्ये १२ प्लॉन्स आहेत. त्याचबरोबर नगररचना विभागाने मंजुर केलेल्या प्रत्येक प्लानची व त्यांच्या कार्यपध्दतीची संपुर्ण चौकशी करु.

महापालिका सचिव :—व समितीमध्ये सर्व गटनेते, मा. सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, त्याचबरोबर गटनेत्यांमध्ये श्री. प्रशांत धांडे यांचेही नाव राहिल काय? त्याचबरोबर दुस—या श्रीमती निलम रावत या सुध्दा गटनेत्या आहेत त्यांचेही नाव या समितीत राहिल काय?

उप महापौर:— श्री. गुरगुळे याच्या कालावधीत मंजूर झालेले प्रत्येक विकास परवानगीची चौकशी व्हावी.

काही सदस्य :—होय होय. मंजूर.

उप महापौर:— ठिक आहे?

सदस्य श्री. मोहन साधवानी :—मी या समितीच्या विरोधात आहे. व जसे श्री. भुल्लर महाराजांनी सांगितले की हे प्रकरण लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे गेले पाहिजे त्या मताच्या बाजुने आहे. पाहिजे तर भलेही मतदान घ्या. मी समितीच्या विरोधात आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपंचदानी :—एक सदस्य विरोधात आहे. बाकीचे समितीच्या बाजुने आहेत. प्रस्ताव पारीत करा.

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—मा. महापौरजी, या प्रस्तावावर मतदान घेतले जावे. आम्ही समिती नेमण्याच्या बाजुने आहोत.

महापालिका सचिव:—मा. पीठासीन अधिका—यांच्या आदेशानुसार मी या प्रस्तावावर मतदान घेत आहे. जे समिती नेमण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया हात वर करावा.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—मा. उप—महापौर महोदय, माझी एक सूचना आहे की, या प्रस्तावा बाबत तुम्ही जर एक समिती नेमत असाल तर त्या समितीमध्ये सर्व सभापतींना घ्या. कारण सर्व विभागाचे सभापती त्यामध्ये आले पाहिजेत अशी माझी सूचना आहे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—माजी उप—महापौर सुध्दा आले पाहिजेत?

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—माजी महापौर, माजी उपमहापौर या सर्वांना समितीत घ्या, माझी अशी सूचना आहे.

उप महापौर:— सर्वांना घ्यायचे? सर्व सभापती? पदावर असलेल्या सर्व सभापती घ्या, माजी अधिकारी नको.

सदस्य श्री. सतिश चहाळ :—माजी नगरसेवकांना सुध्दा घेतले पाहिजे ना?



समिती नेमण्याच्या बाजुने ३८ मते

१. श्री. विनोद ठाकुर
२. श्री. जीवन इदनानी
३. श्री. मोहन रामरख्यानी
४. श्रीमती लिलाबाई आशान
५. श्रीमती ज्योती चैनानी
६. श्रीमती चंद्रा टेकचंदानी

७. श्रीमती कविता सिरवानी
८. श्री. भजनलाल रामचंदानी
९. श्री. बच्चाराम रुपचंदानी
१०. श्री. महेश सुखरामानी
११. श्री. रामचंद्र पारवानी
१२. श्री. लाल पंजाबी
१३. श्री. जमनादास पुरस्वानी
१४. श्रीमती शकुंतला पाटील
१५. श्रीमती प्रशांत धांडे
१६. श्री. किशोर जग्यासी
१७. श्री. राजेश वानखेडे
१८. श्री. अंकुश म्हस्के
१९. श्री. धनंजय बोडारे
२०. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
२१. श्री. दिलीप गायकवाड
२२. श्रीमती विद्याताई निर्मले
२३. श्रीमती मिनाताई सोनेजी
२४. श्री. विजय सुपाळे
२५. श्रीमती वसुधा बोडारे
२६. श्रीमती जयश्री सुर्वे
२७. श्रीमती नेहा भोईर
२८. श्रीमती ज्योती माने
२९. श्री. रामसागर यादव
३०. श्री. रमेश चव्हाण
३१. श्री. मुकेश तेजी
३२. श्री. प्रधान पाटील
३३. श्री.बी.बी.मोरे
३४. श्री.जे.के. ढोके
३५. श्रीमती लता निकम
३६. श्रीमती पंचशिला पवार
३७. श्रीमती सुमन शेळके
३८. श्री. प्रभुनाथ गुप्ता

<u>महापालिका सचिव :—</u>व जे समिती नेमण्याच्या बाजुने नाहीत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.



<u>तटस्थ ६ मते</u>

१. श्री. सतिश चहाळ
२. श्रीमती सुरेखा वेलकर
३. श्री. गणपत एडके
४. श्री. मोहन साधवानी
५. श्री. अनिल ऐलानी
६. श्रीमती मंजु पोपटानी
७. श्रीमती सुजाता रिजवानी

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>आम्ही तटस्थ आहोत हे प्रकरण लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे सोपवावे अशी आमची भुमिका आहे.

महापालिका सचिव :—तर मग आपण हात वर करांना?

सदस्य श्री. राजेश वदारिया :—या अगोदर सुध्दा हात वर केला होता.

महापालिका सचिव :—नव्हता केला.

तटस्थ मते

१. श्रीमती जयश्री पाटील

सदस्य श्री. लाल पंजाबी :—ही प्रथा चुकीची आहे. याचा अर्थ असा की, आम्ही हे प्रकरण लाचलुचपत प्रतिबंधंक विभागाकडे देण्याच्या विरोधात आहोत. मात्र प्रत्यक्षात असे नाही. समिती नेमण्याबाबतचा हा प्रस्ताव आहे. हे प्रकरण लाच लुचपत विभागाकडे देण्याबाबतचा नाही.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—माझे असे म्हणणे आहे की, हे प्रकरण लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे गेले पाहिजे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—या प्रस्तावावर सुध्दा मतदान घेतले जावे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—हे प्रकरण लाच लुचपत विभागाकडे पाठविले जावे असे जे म्हणत आहेत ना त्यांना असे वाटते की या महापालिकेत असा प्रकार घडला पाहिजे. या बाजुने ते आहेत. जो भ्रष्टाचार चालु आहे त्यास हे समर्थन देत आहेत. हा एक आदर्श घोटाळा आहे, आदर्श.

काही सदस्य :—लवासा, लवासा घोटाळा.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—आम्हांला असे वाटते की, उल्हासनगरमध्ये असे होता कामा नये. यासाठी त्यांच्यावर प्रभाव ठेवण्यासाठी एक समिती नेमली जावी. या प्रकरणांमध्ये जे अधिकारी भ्रष्ट आहेत त्यांना आम्ही रस्त्याला लावु शकु. यांचे म्हणणे आहे त्यांना रस्त्यावर लावु नका. चालु दया, खावु दया. देशभर आदर्श घोटाळा चालु आहे. त्यात उल्हासनगरमध्ये सुध्दा घोटाळा चालु आहे.

सदस्य श्री. सतिश चहाळ :—उल्हासनगर टाऊन प्लॅनिंग घोटाळा, असे म्हणा. आदर्श घोटाळा तर आहेच. त्यात उल्हासनगर टाऊन प्लॅनिंगचा आदर्श घोटाळा असे म्हणा पाहिजे तर.

काही सदस्य :—श्री. गुरगुळे घोंटाळा.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—सचिव साहेब, हे प्रकरण लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे पाठविण्याच्या बाजुने जे सदस्य आहेत त्यांनी हात वर करावेत असेही आपण म्हणु शकता ना?

महापालिका सचिव :—एकसारखेच आहे.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—एक सारखेच आहे?

महापालिका सचिव :—समिती नेमली जावु नये असे आपणांस वाटते ना? हे प्रकरण ला.च लुचपत प्रतिबंधक विभागाकडे पाठविले जावे असे आपणांस वाटते ना.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—यासाठी मतदान घ्या. जे हे प्रकरण लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे पाठविण्याच्या बाजुने आहेत. त्यांनी हात वर करावेत. असे आपण म्हणा.

<u>महापालिका सचिव :–</u>प्रस्ताव त्यांचा आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:–</u>प्रस्ताव आमचा आहे. आपला विरोध असेल तर आपण विरोध दर्शवा.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>सारखाच प्रस्ताव आहे. जे सदस्य हे प्रकरण लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सोपविण्याच्या बाजुने आहेत त्यांनी हात वर करावेत असे आपण म्हणा.

<u>महापालिका सचिव :–</u>आपण जे काही म्हणालात त्याची इतिवृत्तात नोंद आली आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–</u>येथे काही गैरसमज निर्माण होवू नये. हा प्रस्ताव लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे पाठविण्याच्या विरोधात कुणी नाही. परंतु ही माहिती सर्वांना मिळाली पाहिजे की, या समितीची घोषणा केली पाहिजे. त्या समितीच्या आधारावर किंवा याचबरोबर हे प्रकरण लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे देण्यास कुणाचा विरोध नाही. तसा विषयच नाही. तर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या विरोधात कोण आहे? विरोधात कोण आहे? कोण जाईल लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या विरोधात? त्या अधिका–यास जी सजा दयायची आहे ती लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या मार्फत दयायची आहे किंवा त्यांचे वरिष्ठ जे विभाग आहेत त्या एक एक विभागांकडे चौकशी देणे हे करावेच लागेल. त्यामध्ये कुणाचे काहीही नाही.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>लाचलुचपत प्रतिबंधक विभागाबाबत बोलत आहात. महापौर महोदया, आमचे श्री. नरेंद्र राजानी यांनी स्पष्ट सांगितले की, या महासभेच्या सदस्यांना कळले पाहिजे की, अधिकारी काय करतात आणि काय नाही? सध्या काहीच कळत नाही. महासभेत चर्चा करायची, अधिका–यांनी मनात आले तर सभेत यायचे, जेव्हा त्यांचे विषय असतील तेव्हा जातील परंतु या चौकशीच्या माध्यमातुन सर्व सदस्यांना तरी कळेल की काय चालले आहे म्हणुन आणि हे प्रकरण लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे देण्यासाठी महासभेच्या परवानगीची गरज नाही. कुणीही सामान्य माणुस जरी गेला तरी आणि श्री. मोहन साधवानी आणि श्री. राजेश वदारिया यांना मी सांगतो की हे प्रकरण यापुर्वीच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे का गेले नाही? हे उल्हासनगर महापालिकेचे अधिकारी भ्रष्टाचार करत आहेत म्हणुन? आता तुम्ही येथे ओरडुन सांगत आहात परंतु आतापर्यंत का नाही गेलात? तुम्हांला अडविले होते कोणी? लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे हे प्रकरण पाठविण्याबरोबरच ही समिती स्थापन होवु दया. त्यातुन सदस्यांना कळेल की अधिका–यांचे नक्की गौडबंगाल काय आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>मा. महापौरजी, मी नाही म्हटले ते श्री. मोहन साधवानी यांचे म्हणणे आहे. जरा ऐकुन घ्या. जर आपणांस यांची चौकशी करायची आहे, माझा प्रस्ताव जो होता तो लाच लुचपत प्रतिबंधक विभागाबाबत नव्हता. मी आपणांस नियम विचारला की आपण कोणत्या नियमाच्या आधारे समिती बनवत आहात? त्याचा कोणी खुलासा केला नाही.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>मतदान घ्या. आता चर्चा नको.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>या महापालिकेचे हीत हाच नियम आहे. महापालिकेच्या भल्यासाठी, चांगल्यासाठी व जे काही चुकीचे चालले आहे ते थांबविण्यासाठी जे नियम आहेत ते आम्ही तयार केले. जे नियम आहेत ते आम्ही तयार करु.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>या व्यतिरिक्त मी या समितीला निर्देश देतो की, सुट्टीच्या कालावधीत जेवढे काही प्लान मंजुर झाले आहेत त्या सर्व प्लानची सुध्दा याबरोबर चौकशी केली जावी.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:–</u>होय बरोबर आहे.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>जेव्हापासुन श्री. गुरगुळे साहेब येथुन कार्यमुक्त होवुन गेले तेव्हापासुन आजपर्यंत येणा–या दिवसांमध्ये श्री. गुरगुळे साहेबांच्या सहीने जेवढे काही प्लान मंजुर होवुन आपल्या समोर येत आहेत, येणार आहेत. त्या सर्वांची चौकशी ही समिती करेल.

<u>महापालिका सचिव :—</u>प्रस्तावाच्या बाजुने ३८ मते व ७ विरोधात तसेच मनसेचे सदस्य तटस्थ आहेत काय? श्रीमती जयश्री पाटील आपण तटस्थ आहात काय? परंतु आपण हात वर केला नाहीत. दोन्ही वेळेस आपण हात वर केला नाहीत. ठिक आहे? बहुमताने पास?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>सचिव साहेब, एक माहिती घेवु इच्छितो. आता जी समिती नेमली त्यामध्ये सर्व पक्षांच्या गटनेत्यांना आपण घेतले. ज्या गटनेत्यांनी विरोध केला आहे त्यांना आपण समितीमध्ये घेत आहात का? ते जरा स्पष्ट करा. गटनेत्यांनी विरोध केला आहे. त्याचे नाव समितीत कसे असेल? ज्यांनी समिती नेमण्यासाठी विरोध केला आहे त्याच समितीत आपण कसे घ्याल?

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>नाही घेणार, नाही घेणार. ते तर आणखी चोरी करावयास लावतील.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>श्री. जमनुजी, गटनेते व सभापती यांना समितीमध्ये घेतले जावे.

<u>महापालिका सचिव :—</u>हा आपला धोरणात्मक निर्णय आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>साधारणत: पहिला निर्णय हा झाला. त्यावरच मतदान झाले की गटनेता या समितीत घेतले जातील. आता ज्या गटनेत्यांनी या प्रस्तावाच्या बाजुने मतदान केले नाही त्यांनी समितीत यायचे किंवा नाही हे त्यांच्यावर सोडायचे आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे? पास? बहुमताने?

<u>उप महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र.** ७:—१२ विवादित बांधकाम परवानगींबाबतचा अहवाल विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | बांधकामाचे ठिकाण | प्लान नंबर | विपर्यस्त मुद्दा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. जयप्रकाश पारुमल छाबडिया, श्रीमती आरती जयप्रकाश छाबडिया, श्रीमती लिला शंकरलाल पुरस्वानी, श्री. रमेश मोहनदास पुरस्वानी | यु. न. १२,१५, १९ भाग शिट नं. ५१ ए कॅम्प नं. ४ | उमपा/नरवि/बांप/१६०/०९/११३६, दिनांक ९/१२/२००९ | टिंबर डेपो आरक्षण क्र. २०१ ताबा पावती दि.७.०४.८७ रोजी महापालिकेस मिळाला आहे.तरी सदर जागेवर प्लान पास करण्यात आला आहे. शासन निर्णय क्र. टिपीडी/१०९४/सीआर–१४/९४ नवि–९ दि.०७.०४.९४ नुसार २५ टक्के ताबा महापालिकेन घेणे आवश्यक होते.तो घेतला नाही. सदरहु परवानगी इंडस्ट्री प्रयोजनार्थ देण्यात आली आहे. | यु. नं. १२, १५ (भा), १९, शिट नं. ५१, उ.नगर–४ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत श्री. जयप्रकाश पारुमल छाब्रीया व इतर ३ यांचे वास्तुविशारद श्री. भुषण रुपानी यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. ०३.१०.०९ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने प्रस्तावाची छाननी केली असता मंजूर व प्रारुप विकास आराखडयानुसार विषयांकित जागा आरक्षण क्र. २०१ टिंबर सॉ मिलसाठी आरक्षित असुन प्रारुप विकास योजनेनुसार रहिवासी विभागात समाविष्ट आहे. शासनाचे दिनांक ०७/०४/१९९४ अधिसुचनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेची मंजुर विकास योजना व प्रारूप विकास योजनेतील कठोरतम तरतुदीसह बांधकाम परवानगी देणेबाबत आदेशित केले आहे, त्यामुळे सदर जागेवर रहिवासी वापर अनुज्ञेय न करता औद्योगिक वापर अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. विकासकास उपविभागीय अधिकारी यांचेकडुन सनद प्रदान करण्यात आलेली असल्याने विकासकास या कार्यालयाचे क्र. उमपा/नरवि/बांप/१६०/०९/११३६ दि. ०९.१२.०९ रोजी बांधकाम परवानगी.देण्यात आली आहे. सदर ठिकाणची सनद विकासकाच्या नावे दिसून येते तसेच तात्पुरता ताबा महानगरपालिकेला दिलेला दिसून येतो. तथापि श्री. राजेंद्रसिंह वी. भुल्लर, नगरसेवक यांनी मालकी आरक्षण असल्यामुळे २५ टक्के बांधकाम महानगरपालिकेस देणे आवश्यक होते असे म्हणणे आहे. |
| | | | | | परंतू विषयांकित जागी सॉ मिलसाठी म्हणजेच औद्योगिक बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. शासनाच्या निर्देशानुसार टिंबर सॉ मिलची जागा २५ टक्के घेणेबाबत कोणतेही आदेश नाहीत. त्या सदरच्या योजनेत २५ टक्के आरक्षित बांधकामाचा महानगरपालिकेस घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | श्री. धनराज एन. बालानी | यु.नं. ३, शिट नं. ५१ ए, कॅम्प नं. ३ | उमपा/नरवि/बांप/५९/०८/०१, दिनांक ९/४/२००९ | त्या जागेवर ३९१.८० चौ.मी.एरिया नाही.सनद मध्ये ३५७.१८चौ.यार्ड आहे. प्लॉन पास झाला आहे३९१.८०चौ.मी.सनद पडताळणी झाली नाही. २५.९.०८ जा.क्र.४६ पत्रानुसार सनद पडताळणी झाली नाही.तशी नोंद नोंदवहीत आहे.त्यामध्ये ११७.६/९ मध्ये खाडाखोड आहे.सनद क्षेत्रफळ ११७.६/९ तर ३९१.८० चौ.मी.प्लॉन पास केला आहे.या प्रकाराची चौकशी करावी.सनद नं. २१३` दि.२०.१२.०४ त्यामागे उमपा/नरवि/जीआर–१५ दि.१२.०६.०२ पत्र आहे. ना हरकत दाखला आहे. माहीती अधिकारा अंतर्गत उपविभागीय कार्यालयाने नगररचनाकार,उमपा यांस लिहिले आहे की श्रीमती कमला शौकिन यांच्या अर्जावर ना हरकत दाखला आहे.शिट नं.५२ ए यु.नं.४ डीआयएलआर दप्तरी नोंदवहीत धनराज बालानी यांचे नांवे यु.नं.३ हा १०.४ चौ.मी जागा आहे. सीडी नोंदवहिचा उतारा एसडीओ ने दिला आहे. | यु. नं. ३, शिट नं. ५१, शांतीनगर, उ.नगर–३ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत श्री. वसंत वरदमल चेलानी यांचे वास्तुविशारद श्री. अविनाश कुमावत यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. २४.०७.०८ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. जागेचे क्षेत्र ३९१.८० चौ.मी. होते. विकासकाकडे सदर जागेच्या ३ सनदा असुन त्याचे क्षेत्रफळ ४७४.६६ चौ. यार्ड होते. त्यापैकी उपविभागीय अधिकारी कार्यालयाने २ सनदेची पडताळणी करुन दिलेली आहे आणि ११७.६६ चौ.वार क्षेत्राची सनदेची मुळ नस्ती त्यांच्याकडे उपलब्ध होत नसल्याने सनदेच्या रजिस्टर उतारा प्रतीवरुन उताऱ्याची पडताळणी करुन देण्यात आलेली आहे. त्यामध्ये असलेल्या खाडाखोडा हा कार्यालयाचा विषय होत नाही. तसेच नांव बदल्याच्या दाखल्याची पडताळणी करुन घेतलेली आहे व नांव बदल्याच्या दाखल्यात तिन्ही सनदांच्या क्षेत्रफळाची बेरीज करुन आलेल्या क्षेत्रफळावरती बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. |
| ३ | श्रीमती प्रेमीबाई टोपदास चंचलानी, घनश्यामदास चोरुमल चंचलानी, खेमचंद कुंदामल चंचलानी, श्री. धर्मदास वीरामल चंचलाणी, श्री. सुरेश नंदुमल चंचलानी, श्री. दौलत दर्यारामल चंचलानी | यु. नं. १६, शिट नं. ४८, कॅम्प नं. ३ | उमपा/नरवि/बांप/६०/९८/८१५, दिनांक ४/११/९९ | सदरचा प्लॉन १९९४ जीआर नुसार अर्धा जागेवर प्लॉन पास करायला हवा.त्यानी जेवढी सनदचे क्षेत्रफळ आहे तेवढा प्लॉन पास केला आहे.५०टक्के जागेवर प्लॉन पास न करता १०० टक्के प्लॉन पास केला आहे.त्याचे कडुन गाळे बनवुन घ्यावयाचे होते.त्यासाठी महापालिकेला खर्च करावा लागला.सदर जागेचा ताबा महापालिकेस दि.०७.०४.८७ मध्ये दिला आहे.त्या जागेचे मालक महापालिका आहे.मनपा अधिकाऱ्यांनी डोळे बंद करुन प्लॉन पास केलेला आहे.दि.१८.०२.०३ बांधकाम पुर्णत्वाचा दाखल दिला आहे.त्याचा जा.क्र. ४७/६०/९८/८७७ आहे.आता पुन्हा दि.०३.०८.०९ रोजी सुधारित बांधकाम परवानगी दिली आहे.जाग हस्तांरित केली असतानाही खोटया पद्धतीने महापालिकेच्या जागेवर सुधारित बांधकाम परवानगी कोणत्याही कायदयात बसत नाही.५८८९.४६ चौ.मी.चा जीना क्षेत्रफळ सामासिक अंतरे क्षेत्रफळ दिल्याने ५६४.६१ चौ.मी. जादा देण्यात आले आहे.दोषींवर कायदेशिर कारवाई करण्यात यावी.सहा महिन्यानंतर बांधकाम पुर्णत्वाचा | उपरोक्त विषयांकित जागेवर मुळ बांधकाम परवानगी या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/४७/९८/८९६ दि. १८.०२.०३ रोजी 'ए' विंग तळमजला + २ रा मजला, 'बी' विंग तळमजला + २ रा मजला, 'सी' विंग तळघर + तळमजला + ३ रा मजला अशी वाणिज्य वापरासाठी बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आलेली होती. विकासकाने २५ टक्क्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेस 'सी' विंगमधील २ रा व ३ रा मजला हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. परंतू 'सी' विंगसाठी बांधकाम पूर्णतेचा दाखला दिला असुन फक्त 'ए' विंग व 'बी' विंग साठी पुर्नसुधारीत प्रस्ताव विकासकाने सादर केलेला आहे. तथापि, जीन्याचे प्रिमियम भरुन 'ए' विंग व 'बी' विंगमध्ये प्रस्तावित नकाशे सादर करण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने विकासकास पुर्नसुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. १) ५० टक्के जागेवर नकाशे मंजुर करण्याची कोणतीही तरतुद |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | दाखला दिल्यानंतर कोणत्याही सुधारित बांधकाम परवानगी देता येत नाही. | नाही. २) जागेची सनद विकासकाकडे असून तात्पुरता ताबा महापालिकेस दिलेला आहे. ३) भागशः पुर्णत्वाचा दाखला दिल्याने २००९ मध्ये सुधारीत नकाशे सादर केलेले आहेत. ४) ५६४ चौ.मी. जादा देण्यात आले आहे असे म्हणणे अयोग्य असून तिन्ही विंगमधील जीन्याचे क्षेत्राचा समावेश करुन सुधारीत परवानगी देण्यात आलेली आहे. |
| ४ | हिंदुस्तान पेन्सिल फॅक्टरी प्राय.लि. | प्लॉट नं. २९, सेक्शन—३, शिट नं. ७, कॅम्प नं. ४ | उमपा/नरवि/बांप/३३/०८/७५९, दिनांक ७/१०/२००९ | कंडिशनल सीडीप्रमाणे शासन मंजुरीशिवाय सदर जागा विकु शकत नाही.कर्ज घेवु शकत नाही.गहाण ठेवु शकत नाही.तसेच फेरबदल करु शकत नाही.यांनी प्लॉन पास केला आहे.प्लॉन बघुन लोक बुकींग करतील. सदर इमारतीत लोक गाळे घेतील. त्यामुळे लोकांना नाहक त्रास सहन करावा लागेल.बॅकेतुन कर्ज घेतल्यामुळे बॅकेचे दिवाळखोरीत जाईल.लोकांची व बॅकेची फसवणुक होईल. | प्लॉट नं. २९, सेक्शन ३, इंडस्ट्रियल इस्टेट, शिट नं. ७, उ.नगर—४ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत मे. हिंदुस्तान पेन्सिल फॅक्टरी द्वारा श्री. अनिल पी. होतचंदानी (कुलमुखत्यार) यांचे वास्तुविशारद श्री. भुषण रुपानी यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. ०७.०४.०८ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने प्रस्तावाची छाननी केली असता मंजूर व प्रारुप विकास आराखडयानुसार विषयांकित जागा औद्योगिक विभागात येत असुन सदर विकासकास या कार्यालयाचे क्र. उमपा/नरवि/बांप/३३/०८/७९ दि. ०७.१०.०९ रोजी बांधकाम परवानगी.देण्यात आली आहे. तथापि तक्रारदार याने शासन मंजूरी शिवाय सदर जागा विकू शकत नाही. कर्ज घेऊ शकत नाही, तसेच फेरबदल करु शकत नाही असे म्हणणे आहे. शासनाने त्यांचे दि. १२.०३.१९८५ चे आदेश क्र. ४३ (ए) (vii) अन्वये जी अटी व शर्ती दिलेली आहे. त्यात तक्रारदाराच्या म्हणण्याप्रमाणे अटी व शर्ती नाहीत. या उलट त्या जागेचा उपयोग औदयोगिक वापरासाठी करावा अशी सूचना अट क्र. ४ मध्ये स्पष्ट देण्यात आलेले आहे. म्हणून औदयागिक वापरासाठीच परवानगी असल्याने शासनाची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. |
| ५ | श्री. अशोक एस. अडवानी, श्री. अनिल जे. बजाज | बॅ. नं. १९९३, रुम नं. १ व २, शिट नं. ७६, कॅम्प नं. ५ | उमपा/नरवि/बांप/०८/०५/५२, दिनांक १/६/२००५ | सामासिक अंतरे क्षेत्रफळ देण्याचा अधिकार मा.आयुक्तांचा आहे. यावर आयुक्तांची सही नाही. नगररचनाकार व मुख्यालय उपआयुक्तांची सही आहे.चुकीच्या पद्धतीने प्लॉन पास केला आहे. | उपरोक्त विषयान्वये बॅ.नं. १९९३, रुम नं. १,२, शिट नं. ७६, उ.नगर—५ येथील सुधारीत बांधकाम परवानगी देतेवेळेस तळमजला + १ मजलेचे वाणिज्य वापरासाठी सुधारीत बांधकाम परवानगी ही विकासकाच्या प्लॉटचे आकार अनियंत्रित असल्यामुळे मागील बाजुला व सामासिक अंतरात सुट अपेक्षित होती व मंजूर बांधकाम नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्र ६.६. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | २.२ व प्रसिध्द प्रारुप नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्र. ६. ६.२ अन्वये सामासिक अंतरात सुट देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असल्याने त्यानुसार सदर परवानगीमध्ये विकास ? कामे सादर केलेल्या बांधकाम नकाशाच्या छाननी वर मा. अतिरिक्त आयुक्त यांचेकडे प्रकरण सादर केले असता मा. आयुक्तानी सहाय्यक संचालक नगररचना यांनी जागा पाहणी करुन अहवाल सादर करण्यास आदेशीत केले. त्यानुसार सहाय्यक संचालक यांनी स्थळ पाहणी करुन अहवाल सादर केला होता. तथापि सदरच्या कालावधीत मा. आयुक्त यांनी सहाय्यक संचालक नगररचना यांना विकास नियंत्रण नियमावलीनुसार सामासिक अंतराच्या शिथिलतेचे अधिकार मा. सहाय्यक संचालक नगररचना यांना दिले होते. त्याबाबत मा. आयुक्त यांना सदरचे अधिकार बहाल करता येत नाहीत याबाबतची विचारणा केली होती. तरी त्या मध्यंतरीच्या काळात सदरच्या संचिका परस्पर Outward करण्यात आल्या. त्यामुळे ही सदरची बाब निदर्शनास आल्याने संबंधित कर्मचाऱ्यावरती योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने विकासकास नव्याने सामासिक अंतरात सुट विरहीत नकाशे सादर करण्याबाबत सुचना देण्यात आलेले आहेत. तरी सदरचे मंजूर केलेले नकाशे रद्बादल करण्यात येत असुन नव्याने सुधारीत दाखल केलेल्या नकाशाबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |
| ६ | श्री. रमेशलाल गिधनामल डिंगरीया, श्री. मुरली रमेशलाल डिंगरीया | बॅ. नं. १९९३ समोर, चालता नं. ५०८, ५०९ ए शिट नं. ७६, कॅम्प नं. ५ | उमपा/नरवि/बांप/१४५/०६/१६३, दिनांक १०/५/२००७, १४५/०६/८८८, दिनांक ०६/११/२००९ | सहा महिन्यानंतर सुधारित बांधकाम परवानगी देता येत नाही. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला सन २००७ रोजी घेतल्यानंतर दि.०६.११.०९ रोजी सुधारित बांधकाम परवानगी कायदयानुसार देता येत नाही.तर कोणत्या आधारे सुधारित बांधकाम परवानगी दिली आहे . | चा.नं. ५०८,५०९,५०९ ए, बॅ.नं. १९९३ जवळ, उल्हासनगर—५ या जागेी विकासकाने तीन सब डिवीजन ले आऊट करुन घेऊन त्यांना ए,बी व सी असे प्लॉट करुन घेतलेले आहेत. सदर ठिकाणी तीन विकासकाच्या नावे बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामधील एका विकासकाने बांधकाम पुर्ण केलेल होते. परंतु उर्वरित दोन विकासकाने जागेवर बांधकाम चालू न केल्यामुळे विकासकाने जीनाचे प्रिमियम भरुन उपरोक्त जागेवर सुधारीत बांधकाम परवानगीसाठी वास्तुविशारदामार्फत प्रस्ताव सादर केलेला होता. त्याअनुषंगाने मुळ बांधकाम परवानगी या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/१४५/०६/१३६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | दि. १०.०५.०७ रोजीच्या पत्रान्वये मंजूर करण्यात आलेली आहे. तथापि, बांधकाम परवानगी मंजूर घेऊन जागेवर कुठल्याही प्रकारचे बांधकाम सुरु केले नव्हते. तद्नंतर विकासकाने त्याचा सुधारीत नकाशा सादर करुन या कार्यालयाचे सुधारीत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/१४५/०६/८८८, दि. ०६.११.०९ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम परवानगी मंजूर करुन घेऊन बांधकाम सुरु केलेले आहे. |
| ७ | श्री. रमेशलाल पी. नागरांनी, श्री. अमरलाल ह. कामरा, श्री. दिपक जी. गंगवानी, श्री. सुरेशलाल जी.धामेजा, श्री. महेश उ तन्ना तर्फे कुलमुखत्याधारक श्री. रमेश पी नागरानी | यु. नं. ८६, शिट नं. ६८, कॅम्प नं.५ | उमपा/नरवि/बांप/५१/०७/१०३२, दिनांक ३०/१०/९७, ५१/०५/८२३, दि. २६/१०/२००९ | दि.२७.०७..०९ रोजी परवानगी दिली आहे.सामासिक अंतरे क्षेत्रफळ नियमावली तरतुद क्र.६.६.२.२प्रसिध्द प्रारुप नियमावली तरतुद क्र.६.६.२ अन्वये अधिकार मा.आयुक्तांना आहे.सामासिक अंतरे क्षेत्रफळ देण्याचा अधिकार मा.आयुक्तांचा आहे.यावर आयुक्तांची सही नाही. नगररचनाकार व मुख्यालय उपआयुक्तांची सही आहे.सहा महिन्यानंतर सुधारित बांधकाम परवानगी देवु शकत नाही. | यु.नं. ८६, शिट नं. ६८, उल्हासनगर–५ या जागेत विकासकाने त्यांचे वास्तुविशारदमार्फत दि. १३.०६.२००७ रोजी बांधकाम परवानगीबाबत प्रस्ताव सादर केला होता. त्याअनुषंगाने विकासकास या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/बांप/ ५१/०७/१०३२ दि. ३०.१०.२००७ रोजी बांधकाम परवानगी देण्यात आली होती.<br>तथापि तक्रारदार यांचे म्हणण्यानुसार सामासिक अंतरामध्ये सुट देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना आहेत. असे म्हणणे आहे. परंतु विकासकाने सुधारीत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव सादर करतेवेळेस सामासिक अंतरात सुट अपेक्षिलेली नसून नियमानुसार बांधकाम परवानगीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने विकासकास या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/बांप/५१/०७/८२३ दि. २६.१०.०९ रोजीच्या पत्रान्वये श्री. रमेशलाल नागरानी व इतर यांच्या नांवे सुधारीत बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आलेली होती. तथापि, प्रत्यक्ष स्थळनिरिक्षण केले असता जागेवरील क्षेत्र सनद क्षेत्रापेक्षा जास्त असल्याने व ते सुधारीत नकाशामध्ये दर्शविण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने सदरचे नकाशे रद्बादल करुन विकासकास त्यांच्याकडे असलेल्या सनद क्षेत्रावर सामासिक अंतरात सुट विरहीत नव्याने सुधारीत नकाशे सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | नंदकुमार नेबनदास मनवानी व इतर चार | प्ला.नं. ३२२,३३ ३,३३४ भा, ३२९ भा, ३२३, भा, इ.न. ८२,८३, शिट नं. २९, कॅम्प नं. ३ | उमपा/नरवि/बांप/८३/०८/७४०, दिनांक ३/१०/२००९ | कंडिशनल सीडी तसेच जागेच्या संरक्षणासाठी दिली आहे.गहाण ठेवु शकत नाही.प्लान रहीवाशी वापरासाठी केला आहे.लोकानी बॅकेतुन कर्ज काढुन प्लॅट घेतल्यास नागरीकांना तसेच बॅकेचे नुकसान होणार आहे.ट्रस्टने मा.धर्मादयाआयुक्तांची मंजुरी घेणे आवश्यक होते.दि.२५.०५.०९रोजी ३२३.९० चौ.मी. जागा महापालिका व त्यांनी खोटा करार करुन सदर रस्त्यांचे रुंदीकरण झाल्याचे दाखवुन जागेचा ताबा घेतला आहे.त्यामध्ये प्लाट नं. ३२१ ,३२२व ३३१ ही त्यांची जागा नाही.तसेच रोडची सीडी दिली जात नाही.नगररचना विभागाच्या नस्तीतील सादरमध्ये ३२१,३२२ व ३३१दाखवली नाही.सीडी एकुण २०००चौ.मी. क्षेत्रफळ आहे.मंजुरी दिली ३०८१.९६चौ.मी.म्हणजे एकुण ११००चौ.मी.जादा परवानगी दिली आहे. सदर ट्रस्टची जागा आहे रहीवाशी वापरास परवानगी दिनी आहे.शिट नं.२१ साईड क्र.८३ प्राथमिक शाळेसाठी राखीव आहे.त्याचा ताबा दि.०७.०४.८७ मध्ये महापालिकेस मिळाला आहे.सदर ठिकाणचे रोडवायडिंग झाले नाही. तसे सार्वजनिक बांधकाम विभागचे पत्रक आहे. धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीशिवाय सदरहु जागा विकु शकत नाही. किंवा विकसित करता येत नाही. | प्लॉट नं. ३३२,३३३,३३४ (भा), ३२१ (भा), ३२२ (भा), ३२३ (भा), ई.नं. ८२,८३, यु.नं. १६९ (भा), शिट नं. २१, उ.नगर–३ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत श्री. मेघराजमल वा. आहुजा, श्री. मनोहर डी. नेभवानी व इतर ३ यांचे वास्तुविशारद श्री. भुषण रुपानी यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. २०.०८.०९ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने प्रस्तावाची छाननी केली असता मंजूर व प्रारुप विकास आराखडयानुसार विषयांकित जागा रहिवासी विभागात येत असुन विकासकास उपविभागीय अधिकारी यांचेकडुन नांव बदलाचा दाखला देण्यात आला असुन त्यामध्ये एकुण ३१०३.१५ चौ.मी. एवढे क्षेत्रफळ दाखविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने विकासकास या कार्यालयाचे क्र. उमपा/ नरवि/बांप/८३/०८/७४० दि. ०३.१०.०९ रोजी बांधकाम परवानगी. देण्यात आली आहे. १) सदर जागेची सनद राधा स्वामी सत्संग यांच्या नावे असून नाव बदलाचा दाखला खाजगी असल्याने विकासकाच्या नावे नकाशा मंजूर करण्यात आलेला आहे. २) बांधकाम परवानगी देतेवेळेस विकासकामे ट्रस्टबाबतचे कोणतेही कागदपत्र उपलब्ध करुन दिलेले नाहीत. ३) भविष्यामध्ये सदर ठिकाणच्या रस्त्याचे रस्तारुंदीकरण होणार असेल त्यादृष्टीकोनातून जागा बाधीत होत असेल तर रस्त्यात बाधीत होणारी जागा सोडून बांधकाम परवानगी देण्यात येते. व त्याचा ताबा मनपास दिला आहे किंवा नाही याचा खुलासा मालमत्ता विभागाकडून घेण्यात येईल. व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करणे उचित होईल. तसेच बाधीत होणाऱ्या जागेचा चटई क्षेत्र निर्देशांक विकासकास देण्याबाबतची तरतुद आहे. ४) रस्त्याची सनद दिली जात नाही हा विषय या कार्यालयाशी संबंधीत नाही. |
| | | | | | ५) शिट क्र. २१ आरक्षणाची बाब सुयुक्तीक वाटत नाही. ६) धर्मदाय आयुक्त यांची परवानगी घेण्यात आली नाही या संबधांत उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर या कार्यालयाने नावात बदल करतेवेळेस धर्मदाय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक होते. ती या विभागाशी संबंधीत नाही. |
| ९ | श्री. दिलीप श्यामसिंग चंचलानी मार्फत मधु गे. आचरा | ब्लॉक नं. सी–२१, रुम नं. ८१,८२,८३शिट नं. ५०, उल्हासनगर–३ | उमपा/नरवि/बांप/१५०/०७/०६५४, दिनांक ९/३/२००९ | ब्लॉक नं. सी–२१, रुम नं. ८१ पुर्ण व रुम नं. ८२ च्या अर्ध्या भागावर संताषी निवास नावाचा टकेडीवर बंगला बांधण्यात आलेला आहे, तेथे जागेपेक्षा अधिक चटईक्षेत्र मंजुर करण्यात आले आहे. ज्या जागेवर बांधकाम करण्यात येत आहे, त्यामध्ये ते क्षेत्र व विनिर्दिष्ट केलेले ठिकाण नाही. | ब्लॉक नं. सी–२१, रुम नं. ८१ (भा), ८२,८३, इ. नं. ४४, शिट नं. ५०, उ. नगर–३ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत श्री. मधु के. आचरा (कुलमुखत्यार) यांचे वास्तुविशारद श्री. बुलचंद सोनेसर यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. ०१.१२.०७ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. जागेचे क्षेत्र ३५८.९० चौ. मी. होते. विकासकाकडे सदर जागेच्या ३ सनदा असुन त्याचे क्षेत्रफळ ३५८. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | ९० चौ.मी. होते. त्यापैकी उपविभागीय अधिकारी कार्यालयाने २ सनदेची पडताळणी करुन दिलेली आहे. तसेच एका सनद पडताळणी प्रकरणी सनद ऐवजी रुम नं. ८१ भाग चा उतारा सादर केला आहे. तसेच त्याबाबत नाव बदलाचा दाखला दिला असून त्यात क्षेत्राचा उल्लेख केलेला आहे. तसेच नांव बदल्याच्या दाखल्याची पडताळणी करुन घेतलेली आहे. त्या अनुषंगाने प्रस्तावाची छाननी केली असता मंजूर व प्रारुप विकास आराखडयानुसार विषयांकित जागा रहिवासी विभागात येत असुन सदर विकासकास या कार्यालयाचे क्र. उमपा/ नरवि/बांप/१५०/ ०७/६५४, दि. ०९.०३.०९ रोजी बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे जादा चटई क्षेत्र देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. |
| १० | श्री. सुरेश आर. मुलचंदानी मे. शेरावाली बिल्डर्स | ब्लॉक नं. सी.९, रुम नं. ३६, ब्लॉक सी १०, रुम नं. ३७,प्लाट नं. ८०, शिट नं. ५०, उल्हासनगर–३ | उमपा/नरवि/बांप/७४/२००८/५०६, दिनांक २२/१/२००९ | ब्लॉक नं. सी.९, रुम नं. ३६, ब्लॉक सी १०, ३६ यांचे सुध्दा बाजुच्या जागेवर देवीभवानी इमारत बनविली आहे. आपल्या लोकांनी त्यांना ८०० मीटरचा एफएसआय दिलेला आहे आणि नंतर १०० मिटरची साईड मार्जीन दिलेली आहे. याप्रकरणामध्ये सीडी व्हेरीफिकेशन झालेले नाही. सीड पडताळणी करता येत नाही असे त्यांनी लिहिले आहे. | ब्लॉक नं. सी–९,१० रुम नं. ३६, ३७ (भा), शिट नं. ५०, उ.नगर–३ येथील इमारतीच्या बांधकाम परवानगीबाबत मे. शेरावाली बिल्डर्स तर्फे श्री. सुरेश के. मुलचंदानी यांचे वास्तुविशारद श्री. अनुपसिंग सोधी यांचेमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दि. ३०.०८.०८ रोजी या कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. जागेचे क्षेत्र ५८५.४५ चौ.मी. होते. विकासकाकडे सदर जागेची सनद असुन उपविभागीय अधिकारी कार्यालयाने सनदेची पडताळणी करुन दिलेली आहे. तसेच नांव बदल्याच्या दाखल्याची पडताळणी करुन घेतलेली आहे. त्या व्यतिरिक्त जीनाचे क्षेत्र तसेच मा. आयुक्त यांनी उजव्या, डाव्या व मागील बाजूच्या सामासिक अतंरात मा. आयुक्त यांनी सुट देण्यात आली असून जीनाचे क्षेत्र १२१.२९ चौ.मी. चे प्रिमियम भरुन बांधकाम नकाशे मंजूर करण्यात आलेले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | श्री. राम एस निकम व श्रीम. रत्नमाला आर निकम | यु.नं. ७९, चालता नं. १५४, शिट नं. २२, लाल चक्की, उल्हासनगर—४ | सुधारीत बांधकाम नकाशा उमपा/नरवि/बांप/६४/०७/४९५, दिनांक १७/८/२००९ | प्लॉन नं.६४/०७/४९५, दिनांक १७/८/२००९ हा सुध्दा ४० फुट डिपी रोडवर आपण प्लान मंजुर केला आहे. | महराष्ट्र शासनाने आदेशित केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये बांधकामे नियमाधीन करण्याचे कार्यवाही सुरु आहे. सबंधीत मिळकतधारकास मा. पदनिर्देशित प्राधिकारी यांनी नमुना ड मधील प्रमाणपत्र अदा करण्यात आली आहेत. 'ड' प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्यानंतर विकासकाने वास्तुविशारदमार्फत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव सादर केला आहे. तथापि विषयांकित जाागा ही मंजूर विकास आराखडयानुसार ४० फुट रस्त्याने बाधीत होत आहे. तसेच प्रारुप विकास योजनेमध्ये सदरचा रस्ता वगळून सदरची जागा रहिवासी वापरात समाविष्ट केलेली आहे. मात्र महाराष्ट्र शासनाच्या दि. १४.०१.२००६ रोजीच्या अध्यादेशानुसार त्यातील नियम (४) मधील पोट नियम (२) (९) च्या तरतुदीनुसार दंड भरुन सदर जागेवरील अनधिकृत बांधकाम नियमित करुन घेतले आहे. सदरचे बांधकाम जुने असल्याने विकासक ते निष्कासित करुन नव्याने बांधकामाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर जागेची सनद विकासक यांच्या नावे देण्यात आलेली आहे. मंजुर विकास आराखडयानुसार ४० फुट विकास रस्ता हा जागेवर अस्तित्वात नसून रस्त्यावर अनेक बांधकामे आहेत. व भविष्यात सुदधा हा रस्ता विकसित होणे शक्य नाही. त्यामुळे प्रारुप विकास योजनेमध्ये हा रस्ता वगळून त्यांच्या शेजारी अस्तित्वात असलेला ४० फुट रुंद रस्त्यालाच ६० फुट रुंद करण्यात आलेले आहे.<br>तसेच महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. टिपीएस—१२०७/३८७/प्र.क्र.२४/०८/नवि—१२, नगर विकास विभाग यांचे दि. ३०.०१.२००८ च्या पत्रान्वये अनधिकृत बांधकाम नियमाधीन झालेल्या विषयांकित जागेचा पुर्नविकास इतर कोणत्याही नियमात सवलत न देण्याच्या अटीच्या अधीन राहून १ चटई क्षेत्र निर्देशांक मर्यादित करण्याच्या संदर्भाधिन प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही. त्या अनुषेंगाने विकासकास बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. |
| १२ | प्राध्यापक शहिर दुनिचंद तेलनदास कालानी मेमोरियल ट्रस्ट | मंजुर विकास आराखडयातील आरक्षण साईट क्र. ५७, शिट नं. ७५, उल्हासनगर—१ | उमपा/नरवि/बांप/१६२/७९/८०, दिनांक | सदरहु इमारत व जागा महापालिका निहित असून वाढीव बांधकामासाठी महापालिकेच्या परवानगीवाचून संस्थेच्या प्राध्यापकास बांधकाम परवानगी देणे नियमबाहय आहे. | साईट नं. ५७, ए ब्लॉक रोड, उ.नगर—१ हया जागेवर संदर्भ पत्र क्र. १ अन्वये तळमजला + २ मजलेचे कॉलेजची बांधकाम परवानगी सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे हयांचे कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/बांप/१६५ दि. २४.०४.८० अन्वये मंजूर करण्यात आलेली होती व जागेवर मंजूर नकाशाप्रमाणे तळमजला + २ मजलेचे बांधकाम आतापर्यंत करण्यात |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | आलेले होते. तथापि या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/सा/८९/०९, दि. ०४.०१.२०१० रोजीच्या पत्रान्वये शहीद दुनीचंद तेजनदास कलानी मेमोरीयल ट्रस्ट यांच्या नावाने तिसऱ्या मजल्यावर देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीच्या प्रस्तावामध्ये पुरेशी कागदपत्रे नसल्याने तसेच सदरची मिळकत महानगरपालिकेची असून आपल्यासोबत केलेले करारनामे या महानगरपालिकेस अप्राप्त आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी दिलेली बांधकाम परवानगी दि. २२.०२.२०१० रोजीच्या पत्रान्वये रद्द करण्यात आलेली आहे. |

*श्री. सी.पी.सिंह, सहा. संचालक, नगररचना यांचे अहवाल*

नगर रचनाकार हयांनी एकूण १२ प्रस्तावांची छाननी करुन अहवाल सादर केलेला आहे. त्या अहवालावर माझा अहवाल खालील प्रमाणे आहे.

**प्रकरण क्र. १:—** श्री. जयप्रकाश पारुमल छाबडिया व इतर

यू.नं.१२,१५,१९ भाग, शिट नं.५१ ह, कॅम्प नं.४

नगर रचनाकार हयांच्या अहवालाशी सहमत आहे. ताबा पावती ७/४/८७ रोजी महानगरपालिकेला मिळालेली आहे, असे मा.नगर सेवकांचे म्हणणे आहे. तथापि जागेचा मालकी हक्क महानगरपालिकेकडे नाही. तसेच मालकी हक्काबाबतचा निर्णय राजस्व विभागाचा असतो. सनद राजस्व विभागांनी दिलेली असून तसेच ''वरवार'' यासाठी २५ टक्के गाळे किंवा जागा देण्याचा निर्णय शासनाचे १९९४ च्या आदेशात कुठेही नमूद नाही. दिलेली बांधकाम परवानगी योग्य दिसून येते.

**प्रकरण क्र. २:—** श्री. धनराज एन.बालानी

यु.न.३, शिट नं. ५१ ह, कॅम्प नं.३.

नगर रचनाकार हयांनी दिलेल्या अहवालाशी मी सहमत आहे. बांधकाम परवानगी योग्य प्रकारे दिलेली असल्याचे दिसते.

**प्रकरण क्र. ३:—** श्रीमती. प्रेमीबाई टोपदास चंचलानी

यु.न.१६, शिट नं. ४८, कॅम्प नं.३.

नगर रचनाकारांनी दिलेली बांधकाम परवानगी योग्य असल्याचे दिसून येते.

**प्रकरण क्र. ४:—** हिन्दुस्तान पेन्सिल फॅक्टरी प्राय. लि.

प्लॉट नं.२९, सेक्शन ३, शिट नं.७, कॅम्प नं.४.

शासनानी जी सदन त्यांचे दि. १२/३/१९८५ चे आदेश क्रमांक ४३ (ए) () अन्वये जी अटी व शर्ती दिलेली आहे. त्यात मा. नगर सेवकांचे म्हणण्याप्रमाणे अटी व शर्ती नाही. नगर रचनाकारांनी दिलेल्या अहवालाशी मी सहमत आहे.

**प्रकरण क्र. ५:—** अशोक एस. आडकानी

बॅरेक क्रमांक १९९३, रुम नं.१ व २, शिट नं.७६, कॅम्प नं.५.

नगर रचनाकारानी दिलेल्या अहवाल योग्य आहे. नव्याने नकाशे सादर करण्यास सूचना दिलेलया आहे. तसेच नगररचनाकार हयांनी संबधीतांवर योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

**प्रकरण क्र. ६:—** श्री. रमेशलाल गिधनामल डिंगरिया व इतर

बॅरेक नं. १९९३ समोर, चालता नं. ५०४,५०९ ह, शिट नं. ७६, कॅम्प नं.३.

नगर रचनाकार हयांनी दिलेली बांधकाम परवानगी योग्य असून दिलेल्या बांधकाम पूर्णतेचा दाखला सुध्दा योग्य आहे.

**प्रकरण क्र.** ७:— श्री. रमेशलाल पी. नागरानी व इतर,
यू.नं. ८६, शिट नं. ६८, कॅम्प नं.५

नगर रचयनाकार हयांनी दिलेला अहवाल योग्य असल्याचे दिसून येते. तथापी नगर रचनाकार यांचे अहवालाप्रमाणे जागेवरील क्षेत्र सनदाप्रमाणे जास्त असल्याचे स्थळ निरीक्षणाचे वेळेस निर्देशनास आल्याने सदरचे नकाशे रदद् बादल करुन सुधारीत नकाशे सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

**प्रकरण क्र.** ८:— श्री. नंदकुमार नेघनदास मनवानी व इतर चार
प्लॉट नं. ३२२,३३३,३३४ भाग, ३२९ भाग ३२३ भाग
यु.नं.८२,८३, शिट नं.२९, कॅम्प नं.३.

नगर रचनाकार हयांनी दिलेल्या अहवालाशी सहमत आहे. शिवाय घर्मदाय आयुक्त यांची परवानगी नांव बदल करतेवेळेस देण्यात आलेली आहे किंवा नाही हा मुदद्ा उपविभागीय अधिकारी हयांनी सनद देतेवेळेस तपासणे आवश्यक आहे. तथापी नांव बदल झाल्यानंतर बांधकाम परवानगी देण्यांत आलेली योग्य आहे असे दिसून येते.

**प्रकरण क्र.** ९:— श्री. दिलीप श्यामसिंग चंचलानी
ब्लॉक नं. सी. ३१, रुम नं. ८१,८२,८३, शिट नं. ५०, उल्हासनगर—४.

नगर रचनाकार हयांनी दिलेला अहवाल योग्य असून त्या अहवालाशी सहमत आहे.

**प्रकरण क्र.** १०:— श्री. सुरेश आर. मुलचंदानी,
ब्लॉक नं. सी.९, रुम नं. ३६,
ब्लॉक सी.१०, रुम नं.३७, प्लॉट नं. ८०, शिट नं. ५०, उल्हासनगर—३.

नगर रचनाकार हयांनी दिलेल्या अहवालाशी सहमत आहे.

**प्रकरण क्र.** ११:— श्री. राम एस. निकम,
यू.नं.७९, चालता नं.१५४, शिट नं.२२, लाल चक्की, उल्हासनगर—४.

नगर रचनाकार हयांनी दिलेलया अहवालाशी सहमत आहे. अनाधिकृत बांधकाम नियमित करण्यासंदर्भात ४० फुट रोडच्या विषयासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांत आलेला होता व शाासनानी त्यांचे दि. ३१/०१/२००८ चे पत्रानुसार प्रस्ताव नियमांकित करण्याच्या कळविले होते. त्या अनुषंगाने प्रस्ताव नियीमत करण्यात आलेला होता व त्यानंतर बांधकाम जूने असल्याने नवीन बांधकामाला मंजूरी देण्यात आलेली होती.

**प्रकरण क्र.** १२:— प्राध्यापक शहिद दुनिचंद तेलनदास कालानी मेमोरियल ट्रस्ट
आरक्षण क्रमांक ५७, शिट नं.७५, उल्हासगनर—१.

उल्हासगनर महानगरपालिका यांच्या दि.२४/४/२०१० चे पत्रानुसार बांधकाम परवानगी (तळ २ मजला) देण्यांत आलेली होती. तसेच दि. ४/१/२०१० रोजी नगर रचनाकार हयांनी तिसऱ्या मजल्यावरील परवानगी देण्यांत आलेली होती. तथापी सदर मिळकत महानगरपालिकेची असून, महानगरपालिका सोबत केलेले करारनामे अप्राप्त असून दिलेली बांधकाम परवानगी दि. २२/२/२०१० रोजी नगर रचनाकार हयांनी रदद् केलेली आहे.

वरील सर्व प्रकरणे नगररचनाकार हयांनी दिलेल्या बांधकाम परवानगीच्या संबधांत तपासले असता वरील प्रमाणे शेरे दिलेले आहेत. तथापी अजून बांधकाम परवानगी तपासणीच्या मुद्यावर मा. नगरसेवक हयांची मागणी असल्यास प्रकरणे योग्य ती पुनश्च तपासणीसाठी मा. उपसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई हयांचेकडे पाठविता येईल.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५५ <u>दिनांक:—२८/१२/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे १२ विवादित बांधकाम परवानगींबाबतचा अहवाल नाकारुन श्री. अ.पा. गुरगुळे यांनी उल्हासनगर महानगरपालिकेत ज्या दिनांकापासून नगररचनाकार पदी पदभार ग्रहण केला आहे त्या दिनांकापासून आजपर्यंत त्यांनी बांधकाम परवानगी देतांना केलेल्या अनियमितता व नियमबाहय प्रकरणी चौकशी करणे व ३ महिन्याच्या आत महासभेपुढे अहवाल सादर करण्या प्रयोजनार्थ पूढीलप्रमाणे समितीची नेमणूक करीत आहे.

| | |
|---|---|
| १. श्रीमती राजश्री चौधरी——महापौर | अध्यक्षा |
| २. श्री. विनोद ठाकुर—— उप—महापौर | सदस्य |
| ३. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर——स्थायी समिती सभापती | सदस्य |

४. श्री. बच्चाराम रुपचंदानी——सभागृह नेता सदस्य सचिव

५. श्री. प्रभुनाथ गुप्ता—— विरोधी पक्ष नेता सदस्य

६. श्री. धनंजय बोडारे——शिवसेना गटनेता सदस्य

७. श्री. जीवन इदनानी——लोकभारती गटनेता सदस्य

८. श्रीमती निलु चांदवानी——राष्ट्रवादी कॉंग्रेस गटनेता सदस्या

९. श्री. नरेंद्र राजानी——भाजपा गटनेता सदस्य

१०. श्री. तुलसीदास वसिटा——कॉंग्रेस गटनेता सदस्य

११.श्री. बी.बी. मोरे——आरपीआय(आ) गटनेता सदस्य

१२. श्री. प्रशांत धांडे——आरपीआय(गवई) गटनेता सदस्य

१३. श्रीमती जयश्री पाटील——मनसे गटनेता सदस्या

१४. श्रीमती निलम रावत——अपक्ष गटनेता सदस्या

१५. श्री. राजेश वानखेडे—सभापती, सार्व.बांध. समिती सदस्य

१६. श्रीमती चंद्रा टेकचंदानी—— सभापती, नियोजन व विकास समिती सदस्य

१७. श्रीमती वसुधा बोडारे—— सभापती, पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती सदस्य

१८. श्रीमती जयश्री सुर्वे—— सभापती, आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती सदस्य

१९. श्री. रामसागर यादव—— सभापती, माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण सदस्य

२०. श्री. गोविंदराम लुंड—— सभापती, गलिच्छ वसती निर्मुलन समिती सदस्य

२१. श्रीमती ज्योती चैनानी—— सभापती, क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समाज समिती सदस्य

२२. श्रीमती कविता सिरवानी—— सभापती, महिला व बालकल्याण समिती सदस्य

२३. श्री. दिलीपकुमार जग्यासी—— सभापती, महसूल समिती सदस्य

२४. श्री. हरेश जग्यासी——सभापती, प्रभाग समिती क्र. १ सदस्य

२५. श्री. महेश सुखरामानी—— सभापती, प्रभाग समिती क्र. २ सदस्य

२६. श्री. किशोरसिंह जग्यासी——सभापती, प्रभाग समिती क्र. ३ सदस्य

२७. श्रीमती ज्योती माने—— सभापती, प्रभाग समिती क्र. ४ सदस्य

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>बहुमताने</u>

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ८ :—** प्रभाग क्र. २३ मधील ब्रम्हकुमारीज आश्रमाजवळील भाग शांतता क्षेत्र म्हणुन घोषित करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>उप महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ८:—** प्रभाग क्र. २३ मधील ब्रम्हकुमारीज आश्रमाजवळील भाग शांतता क्षेत्र म्हणुन घोषित करणे.

<u>प्रस्तावना</u>

संदर्भित पत्रान्वये श्री.राजेंद्रसिंह.वी.भुल्लर (महाराज),सभापती,मा.स्थायी समिती यांनी उल्हासनगर महानगरपालिकेतील प्रभाग कं.२३ मधील ब्रम्हकुमारीज आश्रमाजवळच मुख्य बाजारपेठ असल्याने आश्रमाजवळच वाहन मालक त्यांची वाहने उभी करतात.तसेच

अवजड वाहनेही मालाच्या चढ उतारासाठी तेथेच उभी करतात.या कारणाने आश्रमाजवळ हॉर्नचे आवाज गोंगाट/ध्वनी प्रदुषण वाहतुक कोंडी होत असल्याने शांततेचा भंग होत आहे.या कारणास्तव आश्रमात भाविकांना पुजाअर्चा/मेडिटेशन व योगा करण्यासाठी नाहक त्रास होत आहे म्हणून सदर विभाग सायलेंट झोन घोषित करण्यात यावा.यासाठी सदरचा प्रस्ताव महासभेपुढे विचारविनिमय करणेस व प्रस्तावास मंजुरी मिळणेसाठी सादर करण्यास कळविले आहे.

सदर प्रस्ताव सायलेंट झोन करण्यासाठी मा.महासभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.मा.महासभेची मंजुरी प्राप्त झाल्या नंतर सायलेंट झोन करण्यासाठी प्रस्ताव वाहतुक शाखेकडे सादर करण्यात येईल.तरी सदर प्रस्ताव मा.महासभेच्या मंजुरीसाठी सादर.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५६ <u>दिनांकः—२८/१२/२०१०</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार प्रभाग क्र. २३ मधील ब्रम्हकुमारीज आश्रमाजवळील भाग शांतता क्षेत्र म्हणुन घोषित करण्यास व सदरहु प्रस्ताव वाहतूक शाखेकडे किंवा सक्षम प्राधिका—याकडे पाठविण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** चतुर्थश्रेणी कर्मचा—यांना पदोन्नती देणे.

---

यावेळी सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी, श्रीमती सुरेखा वेलकर हया सभागृहातुन बाहेर गेल्या 

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>एक मिनिट, एक मिनिट या विषयात अग्निशमन विभागातील कर्मचा—यांना पदोन्नती देण्याचा विषयही आहे काय? त्यांना पदोन्नती देण्याबाबत आपण कोणता निकष लावला आहे? त्यांना पदोन्नती कोणत्या निकषानुसार देणार आहात? याचे उत्तर कोण देईल?

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>सचिव साहेब, महापालिकेत नविन कोणी अधिकारी आले आहेत का? त्यांचा आपण सभागृहास परिचय करुन दिला नाही?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>श्री. बच्चारामजी एक मिनिट, महत्वपुर्ण विषयावर चर्चा चालु आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :–</u>भुमाफिया कोण आहे?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>अग्निशमन विभागातील तीन कर्मचा–यांना आपण पदोन्नती दिली आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>आपल्या महापालिकेत दोन नविन अधिकारी आलेले आहेत. सभागृहास त्यांचा परिचय करुन दिला जात आहे. श्री. विनोद डवले, सहा. आयुक्त कृपया यांनी व्यासपीठावर यावे. व आपला परिचय दयावा.

यावेळी सदस्य श्री. गणपत एडके, श्री. अनिल आयलानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>श्री. विनोद डवले(सहा. आयुक्त):–</u>मी श्री. विनोद डवले सहाआयुक्त म्हणुन २८ नोव्हेंबरला रुजु झालो आहे. आता माझ्याकडे अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. मी मुख्याधिकारी संवर्गातुन आलेलो आहे. मी अंबरनाथ नगरपरिषदेमध्ये मुख्याधिकारी म्हणुन कार्यरत होतो. त्यानंतर येथे रुजु झालेलो आहे. अनाधिकृत बांधकामासंदर्भात मला येथे पदभार देण्यात आला असून उप–आयुक्त, अनाधिकृत बांधकाम यांच्या नियंत्रणाखाली मला काम करायचे आहे. त्यामुळे सन्माननिय आयुक्त आणि उप–आयुक्त यांचे जे आदेश असतील त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करायचे आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>डॉ. सागर घोलप, सहा. आयुक्त प्रभाग समिती क्र. २ यांनी व्यासपीठावर येवुन सभागृहास आपला परिचय करुन दयावा.

<u>डॉ. सागर घोलप (सहा. आयुक्त, प्र.स.क्र.२):–</u>सन्माननिय महापौर, उप–महापौर, सन्माननिय आयुक्त आणि सन्माननिय सर्व नगरसेवक, माझे नाव डॉक्टर सागर सुनिल घोलप मी सहा. आयुक्त प्रभाग समिती २ या ठिकाणी कार्यरत आहे. आणि नुकतीच माझी निवड मुख्याधिकारी संवर्गात झालेली आहे. आणि माझी ही पहिलीच नियुक्ती आहे. आभारी आहे.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:–</u>मा. महापौरजी, या अगोदर जेवढया काही पदोन्नती दिल्या आहेत त्या सर्वांना नियुक्तीचे आदेश व थकबाकीची रक्कम मिळाली आहे का?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>लिडिंग फायरमन पदावर आपण ज्यांना पदोन्नती दिली आहे त्याबद्दल जरा सविस्तर स्पष्टीकरण करा. कोणता निकष लावुन त्यांना पदोन्नती दिली आहे.

यावेळी सदस्य श्री. गणपत एडके यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>सन्माननिय महापौर, उप–महापौर, सर्व सन्माननिय सदस्य, आपण पदोन्नती दिलेली नाही. निवड समितीने शिफारस करुन नावे आपल्याकडे दिली आहेत त्यांना अदयाप पदोन्नती दिलेली नाही. जोपर्यंत महासभेचा निर्णय होत नाही तोपर्यंत पदोन्नती दिली जाणार नाही. दुसरी गोष्ट ही की आपण जे उपविधी तयार केले आहेत त्यास शासनाने अदयापपर्यंत मान्यता दिलेली नाही. शासनाने जे नियम आपणाकडे दिलेले होते ते आपण जेव्हा अंतीम करुन शासनाकडे पाठवु त्यास अधिन राहुन दिलेली आहे. जर शासनाने यामध्ये काही फेरबदल केले तर, तसेच ही तात्पुरत्या स्वरुपाची पदोन्नती आहे. जोपर्यंत शासन उपविधींना अंतिम मान्यता देत नाही तोपर्यंत ही तात्पुरती पदोन्नती आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>मी अग्निशमन दलाबाबत बोलत आहे. मला दुस–या पदांबाबत बोलायचे नाही. कारण मुद्दा असा आहे की, मध्यंतरी ठाण्यामध्ये जो प्रकार घडला, त्यामध्ये अग्निशमन दलाचे सहा कर्मचारी दगावले होते. वर्तमानपत्रांमध्ये, दुरदर्शनवर त्यांच्या संबंधी ज्या बातम्या आल्या होत्या त्यामध्ये असे दर्शविले

होते की त्यांना प्रशिक्षण नव्हते. अनुभव त्यांना भले पाच वर्षाचा असो की दहा वर्षाचा असो त्याच्याशी मला देणे घेणे नाही. पण त्यांना प्रशिक्षण नव्हते म्हणुन ते दगावले गेले होते. अशी जिवीत हानी येथे होवु नये त्यामुळे आपण यांना जर पदोन्नती देत असाल तर प्रशिक्षण पात्रता प्रथम असली पाहिजे दुसरे म्हणजे त्यांचे सहा महिन्याचे जे प्रशिक्षण असते ते त्यांनी पूर्ण केले पाहिजे, अनुभव असला पाहिजे अशा लोकांना तुम्ही पदोन्नती दया. केवळ अनुभव आहे, इतके वर्ष काम केले आहे त्यामुळे त्यांना पदोन्नती देवु नका. कारण की माझ्या माहितीप्रमाणे ज्यांना अनुभव आहे, पण प्रशिक्षण नाही अशा कर्मचा–यांना पदोन्नती देण्याची शिफारस केली आहे. त्यामुळे भविष्यात असा काही धोका निर्माण होवु नये, ठाणासारखी उल्हासनगरमध्ये दुर्घटना होवु नये अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. पण असे झाले तर त्यावेळेला अनुभव कामात येत नाही. प्रशिक्षण कामात येते. आपण याचा गांर्भियाने विचार करावा. आपण जी तीन नावे दिली आहेत त्यास माझा विरोध नाही परंतु तिथे जो सक्षम अधिकारी असेल, जो त्या प्रशिक्षणामध्ये बसत असेल जो त्या पदासाठी योग्य असेल त्यांनाच तुम्ही पदोन्नती दया. जसे तुम्ही २००० मध्ये ज्या पदोन्नती दिल्या होत्या त्यावेळेस प्रशिक्षण आवश्यक ठेवले होते, आणि शैक्षणीक पात्रता ठेवली होती. आता जी तुम्ही पदोन्नती देत आहात त्यांना शिक्षण नाही, प्रशिक्षण नाही, फक्त अनुभव पाहुन त्यांना पदोन्नती दिली आहे.

श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–पहिले जे उपविधी प्रसिध्द झाले आहेत, शासनाने प्रसिध्द केलेल्या उपविधीनुसार पदोन्नतीसाठीची जी अर्हता निश्चित केलेली आहे, त्यानुसार फायरमन पदावरील पाच वर्षाचा अनुभव आणि लिडिंग फायरमनची कर्तव्य पार पाडण्यासाठी शारीरीक दृष्टया पात्र असावे. प्रशिक्षणाबद्दल त्यामध्ये उल्लेख नाही.

यावेळी सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–मग प्रशिक्षण कशासाठी आहे? अग्निशमन दल काय काम करते? प्रशिक्षण नको आहे का? उदया सकाळ महापूर आला, कोणी महापूरामध्ये वाहुन गेले तर त्यांना पोहण्याचे प्रशिक्षण नको आहे?

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–आणि फायरमनसाठी काय अर्हता आहे?

श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–फायरमनसाठी प्रशिक्षण आवश्यक आहे. ते असल्याशिवाय आपण त्यांना फायरमन बनवुन घेत नाही.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:–तुम्ही काय म्हणता प्रशिक्षण असणे आवश्यक आहे.

श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–साहेब, तेच सांगतो. लिडिंग फायरमनला ते आवश्यक आहेचच आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–श्री. म्हसाळ साहेब, श्री. प्रशांत धांडे यांनी विचारल्यानुसार फायरमनला अग्निशमन सेवेचे प्रशिक्षण असले पाहिजे. बरोबर आहे?

यावेळी सदस्या कु. शकुंतला जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–फायरमनसाठीची अर्हता ही राज्य अग्निशमन केंद्राकडुन चालविल्या जाणा–या मुलभुत अग्निशमन पाठयक्रम उत्तीर्ण आणि त्याची उंची, छाती जी काही शारीरीक अर्हता आहे ती आहे. तर तो फायरमन होईल. आणि फायरमनलाच आपण लिडिंग फायरमन पदावर पदोन्नती देतो.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–त्यानंतर पाच वर्षाचा अनुभव घेतल्यानंतर लिडिंग फायरमन, हे बरोबर आहे. लिडिंग फायरमनचे काम काय?

श्री. विजयकुमार म्हसाळ(उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—त्यांच्या बरोबरच्या लोकांना मार्गदर्शन करणे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—तो त्यांचे नेतृत्व करत असतो.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आमच्या गैरसमजुतीने किंवा पुर्वी भरती केल्यामुळे जर एखादयाने फायर फायटिंगचा कोर्स पुर्ण केला नसेल तर आज काय करणार? त्यांना लिडिंग फायरमनची पदोन्नती देणार काय?

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—श्री. म्हसाळ साहेब, विडंबना ही आहे की, फायरमन प्रशिक्षीत असला पाहिजे. प्रशिक्षण पुर्ण केलेला असला पाहिजे. लिडिंग फायरमनने कोर्स केला नसला पाहिजे? फायरमनला ५ वर्षानंतर लिडिंग फायरमन म्हणुन तुम्ही पदोन्नत करता, ज्या फायरमनला मुलभुत प्रशिक्षण लागते, लिडिंग फायरमनला कुठलेही प्रशिक्षण लागत नाही? हा जो विषय उपस्थित झाला आहे त्याचे कारण हे आहे जे लिडिंग फायरमन होणार आहेत त्यांनी ब—याचवर्षापासुन काम केलेले आहे त्यांना बराच अनुभव आहे ज्यांच्यावेळेस कदाचित हा प्रशिक्षण आवश्यक असल्याचा नियम नसेल तर त्या आधारावर ते बसले असतील की आम्हांला पदोन्नती मिळाली पाहिजे कारण की आम्ही सेवानिवृत्तीच्या जवळ आलो आहोत. त्यासाठी आम्हांला पदोन्नतीची संधी मिळाली पाहिजे त्याच्याही विरोधात आम्ही नाहीत. परंतु यामुळे जे लिडिंग फायरमन होतील व जे नविन फायरमन येतील ज्यांच्याकडे प्रशिक्षण आहे, ज्यांच्याकडे शैक्षणीक अर्हता आहे, ज्यांच्याकडे शारीरीक क्षमता आहे, ज्यांच्याकडे मानसिक सतर्कता जास्त आहे, अशा लोकांमध्ये कलह निर्माण होवु नये, या कलहामुळे गंभीर प्रकरणे उद्‌भवतात. एखादया ठिकाणी जर आग लागली आणि त्यावेळेस जर अग्निशमन दलातील कर्मचा—यांची मानसिकता बिघडली असेल तर त्याचे नुकसान शहरातील लोकांना भोगावे लागते. या आधारावर या विषयाचा योग्य प्रकारे विचार झाला पाहिजे की कोणत्या पध्दतीने आपण त्यांना पदोन्नती दिली पाहिजे.

यावेळी सदस्य श्री. मोहन रामरख्यानी, श्री. रामसागर यादव, श्री. रामचंद्र पारवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—ज्या पध्दतीने तुम्हांला मी ठाण्याचे उदाहरण दिले त्याप्रमाणे आणखी एक उदाहरण मी तुम्हांला देतो. नाशिकमधील उदाहरण आहे. एका विहिरीमध्ये मुलगी पडली होती. त्यावेळेला फायरमनला अनुभव होता पण प्रशिक्षण नव्हते. त्यावेळी त्यामुलीला वाचविण्यासाठी फायरमनने ऑक्सिजन बॉक्स घेवुन विहिरीत उडी मारली, १० मिनिटामध्ये त्याचेच प्रेत वर आले होते. या घटना वर्तमानपत्रामध्ये छापुन आल्या आहेत. मी माझ्या मनाचे काही बोलत नाही. या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे अशा घटना परत होवु नयेत. म्हणुन प्रशिक्षण आवश्यक असले पाहिजे. प्रशिक्षण असलेल्या लोकांना तुम्ही पदोन्नती दया, अनुभव सर्वांनाच आहे. त्यांनी इतक्या दिवस येथे काम केलेले आहे. महानगरपालिकेने त्या लोकांना प्रशिक्षणासाठी पाठविले होते ना. महानगरपालिका खर्च करत होती. पण हे लोक गेले नाहीत. त्यामुळे आता जर तुम्ही त्यांना लिडिंग फायरमन पदावर पदोन्नती देत असणार, तर तो तेथे काय काम करेल? परत अशी घटना घडेल, परत त्याच्या जिवावर बितेल. मग परत आपल्या महानगरपालिकेची बदनामी. तुम्ही असे कसे केले? परत त्यावर चौकशी मग अशी समिती तयार होणार. त्याला काही अर्थ नाही. त्यामुळे या प्रश्नाचे गांर्भिर्य तुम्ही लक्षात घ्या.

श्री. विजयकुमार म्हसाळ(उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—मागासवर्गीयांच्या बाबतीत शासनाचा एक शासन निर्णय आहे. त्यामध्ये जर एखादी पात्रता, अर्हता........

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—साहेब, २००३ च्या भरतीमध्ये आपण कसे केले? २००३ च्या भरतीमध्ये आपण प्रशिक्षीत कर्मचारी घेतले आहेत ना? आता कोणता शासन निर्णय आला?

श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–आपण जे प्रसिध्द केलेले उपविधी आहेत ते सांगतात. त्याच्यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–आता आपण या तीन कर्मचा–यांना पदोन्नती देण्याचे जे प्रस्तावित केले आहे त्याला माझा विरोध आहे. नाहीतर एक काम करा त्यांना सहा महिन्याचे प्रशिक्षण दिल्यानंतर त्यांना पदोन्नती दया. प्रशिक्षण आवश्यक आहे. त्यांच्या जिवावर बितली तर त्यांच्या कुटुंबाचे पोषण कोण करणार? तुम्ही तर पदोन्नती देवुन मोकळे होणार आणि ते घ्यायला ते तयारच आहेत. पदोन्नती कोणाला नको आहे असे नाही. ते घ्यायला तयार आहेत, त्यांना प्रशिक्षणास पाठवा.

श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–आता यामध्ये पदोन्नती देतांनाच आपण असे करु की, प्रशिक्षणाचा कालावधी जर आठ महिन्याचा असेल तर आपण आठ महिने बोलु या. त्यांनी प्रशिक्षणास प्रवेश घेवुन वर्षभरामध्ये तो पुर्ण करावा. सहा महिन्याचे प्रशिक्षण हे सुरु होत आहे की नाही हे बघुन त्यांनी वर्षभराच्या आत जर प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांची नियुक्ती रदद् (व्यपगत) होईल.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–जो सेवाजेष्ठतेत बसतो त्याला दया ना मग? ज्यांनी प्रशिक्षण घेतले आहे, जे पात्रतेत बसतात, जे पदवीधर आहेत, बीए, बीकॉम आहेत अशा कर्मचा–यांना का नाही देत तुम्ही?

श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–यामध्ये सेवाजेष्ठता डावलता येत नाही. पदोन्नती समितीने त्याचा विचार केलेला आहे. आणि अशी पदोन्नती दिली तर चुकीचे होईल. समजा कुणी एमई, एमटेक असेल तर कुणी म्हणेल मला शहर अभियंतांचे पद दया. मी शहर अभियंत्यापेक्षा उच्च शिक्षीत (एमटेक) आहे. एमई आहे असे कधी होत नाही.

यावेळी सदस्य श्री. मोहन रामरख्यानी, श्री. रामसागर यादव यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–साहेब, आता जे तुम्ही बोललात तोच मुद्दा या अगोदर सुध्दा झाला होता. बीएसस्सी नको बीकॉम पाहिजे. मध्ये एमडीचा विषय असाच आला आता तुम्ही स्वतःच्या तोंडाने कबुल केले आहे. कुठे ना कुठे गाडी अडते. तुम्ही आता स्वतः मान्य केले आहे. त्यामुळे याला माझा विरोध आहे.

सदस्य श्री. लाल पंजाबी :–याबाबत माझी दुसरी एक सुचना आहे, मागील वेळेस जेव्हा लिपिक पदावर पदोन्नती दिली जात होती, १९ जुन २००९ रोजी त्यावेळेस असे ठरले होते की, बाकी जे पाच कर्मचारी होते त्यांचे पदोन्नतीचा सुध्दा प्रस्ताव आणला जावा, प्रशासनाच्या दिरंगाईमुळे तो प्रस्ताव येवु शकला नाही. पाच कर्मचारी होते, त्यांचे १९ जुन २००९ रोजीच्या प्रस्तावामध्ये नाव होते. तर त्यांना सुध्दा त्या तारखेपासुनच लाभ देण्यात आला तर बरे होईल.

महापालिका सचिव :–पुर्वलक्षी प्रभावाने. पाच लिपिक याप्रस्तावामध्ये आहेत, जे सेवाजेष्ठ आहेत. कोणते आहेत त्यांची नावे सांगा.

सदस्य श्री. लाल पंजाबी :–ती नावे अशी आहेत १. श्री. मनोज जाधव, २. श्री. बाबुराव पाचपिंडे, ३. श्रीमती नर्गीस खान, ४. श्रीमती रेशमा नागपुरे व ५. श्री. महेश पपनलाल.

श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–या यादीमध्ये सर्वांचा समावेश आहे. आपण जी नावे वाचुन दाखविले, मागील वेळेस पदोन्नतीचा प्रस्ताव यासाठी पुढे ढकलण्यात आला होता की आपले सेवाप्रवेश नियम अंतिम केलेले नव्हते. अजुनही ते शासनाकडे पाठवायचे बाकी आहेत. तर ज्या तारखेला आपल्या महापालिकेचा ठराव झाला, तोपर्यंत आपण ते केलेले नव्हते. महासभेचा ठराव सेवाप्रवेश नियमाच्या बाबतीत झालेला नव्हता. म्हणुन आपण ते अंतिम केलेले नव्हते. महासभेचा ठराव मागच्यावेळेस झालेला आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>श्री. भजनसिंग केवलसिंग करीरा यास गंवडीचे पद दिले जात आहे, त्याऐवजी मेस्त्रीचे पद दिले जावे, मेस्त्रीचे पद खाली आहे. पाच पदे होती त्यातील चार पद भरलेली आहेत. एक पद रिक्त आहे आणि ते पदोन्नतीच्या प्रस्तावात बसतात श्री. समतानी यांना बोलावून विचारणा केली जावी.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>सेवाजेष्ठता यादीमध्ये त्यांना अग्रक्रम होता त्यामुळे त्यांना छाननी करुन जेथे ते बसत होते तेथे त्यांना बसविले आहे. त्यांनी जर पदोन्नती नाकारली तर त्यांना कोठे पदोन्नती देता येणार नाही. ज्या पदावर आपण त्यांना पदोन्नत करत आहोत ते जर त्यांनी नाकारले तर त्यांना दुसरी पदोन्नती कशी देता येईल?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>श्री. समतानी तुम्ही म्हणत होतात ना की तुम्ही सांगितले तर त्यांचे पदोन्नतीचे पद बदली होईल. श्री. समतानी इकडे येवुन सांगा ना जरा.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>मिस्त्रीचे एक पद रिक्त आहे. त्यासाठी एक कर्मचारी पात्र आहे. परंतु तो निलंबित असल्यामुळे आपण ते पद रिक्त ठेवले आहे. बाकी कुणाला पदोन्नती देता नाही येणार. चुकीची माहिती आहे आपली.

<u>महापालिका सचिव :–</u>सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी जी सूचना आपणांस दिली आहे त्यांच्या मताशी आपण सहमत आहात का? सहमती? पाच कर्मचा–यांना पुर्वलक्षी प्रभावाने लाभ देण्याबाबत जे आता त्यांनी सांगितले.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>सर्वांना दया.

<u>महापालिका सचिव:–</u>सर्वांना देवू शकत नाहीत, बाकीचे लोक सेवेत कनिष्ठ आहेत. कुणा कुणाला दयायचे ते आपण ठरवा.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>सर्वांना दया. आपण कसे म्हणता की सर्वांना देवु शकत नाही. आपण म्हणता ना की आपण ठरवा. आम्ही म्हणतो सर्वांना दया.

<u>महापालिका सचिव :–</u>आपण निर्णय घ्या ना? सर्वांना कसे?

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>सर्वजण पात्र आहेत का?

<u>महापालिका सचिव :–</u>पाच कर्मचारी सेवाजेष्ठ आहेत, बाकी कर्मचारी सेवाजेष्ठ नाहीत.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>शासन निर्णय काय आहे?

<u>महापालिका सचिव :–</u>लिपिक पदावर ज्या कर्मचा–यांना पदोन्नती दिली जात आहे त्यामधील पाच कर्मचारी हे मागील वेळेस ज्या कर्मचा–यांना पदोन्नती दिली होती त्यांच्यापेक्षा सेवाजेष्ठ आहेत. यासाठी त्यांचे म्हणणे आहे की त्यांना पुर्वलक्षी प्रभावाने लाभ दयायचा आहे. परंतु त्यावेळच्या नियमानुसार त्यांना पदोन्नती देण्यात आलेली नव्हती.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>मागच्या वेळेस पाच कर्मचा–यांचा जो प्रस्ताव होता त्यावेळेस आपण ९६ च्या नियमाप्रमाणे जे कर्मचारी मराठी आणि इंग्रजी टंकलेखनाच्या दोन्ही पात्रता धारण करत आहेत त्यांचा प्रस्ताव पदोन्नतीस ठेवला होता. आताचे जे नविन सेवाप्रवेश नियम आहेत त्यामध्ये मराठी किंवा इंग्रजी असे आहे. या दोन्ही शब्दामध्ये ऑबलिक आलेले आहे. मराठी किंवा इंग्रजी यापैकी एकच आहे. त्यामुळे एका भाषेच्या टंकलेखनामध्ये सर्व लोक बसतात. मागच्या वेळेस मराठी आणि इंग्रजी टंकलेखनाची पात्रता जे कर्मचारी धारण करत होते त्यांचाच प्रस्ताव होता. तो ठराव मान्य कोठे झाला होता. त्यावेळेस आपण ठराव मंजुर केला नव्हता.

<u>महापालिका सचिव :–</u>यांचे म्हणणे आहे की, होवू शकत नाही.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>समितीपुढे ठेवावे लागेल, मला एकटयाला सांगता येणार नाही.

<u>महापालिका सचिव :–</u>पाच कर्मचा–यांच्या बाबतीत काय करायचे आहे? त्यांना लाभ दयायचा नाही? आपणांस जो काही निर्णय घ्यायचा आहे तो घ्या.

<u>सदस्य श्री. प्रभूनाथ गुप्ता :–</u>कायदयामध्ये बसते काय? बसत असेल तर लाभ देण्यात यावा.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>शासन निर्णयामध्ये तशी तरतुद आहे का? असेल तर दया.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ(उप–आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>याची सर्व तपासणी करुनच पदोन्नती समिती या सर्व प्रकरणाची छाननी करुन नंतर अहवाल देईल.

<u>महापालिका सचिव :–</u>ठिक आहे या पाच कर्मचा–यांना कोणताही लाभ दयायचा नाही. व सन्माननिय सदस्य श्री. प्रशांत धांडे यांनी लिडींग फायरमनच्या पदोन्नतीसाठी प्रशिक्षणाची अट घालण्याचे जे सुचीत केले आहे त्याबाबत काय करायचे?

<u>काही सदस्य :–</u>बरोबर आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>काही सदस्यांचा विरोध असेल तर मतदान घेतले जाईल.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>आयुक्त साहेब, हा जो पदोन्नतीचा ठराव आहे, तो इतिवृत्त काम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात यावा.

<u>महापालिका सचिव :–</u>ठिक आहे?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>दुसरी गोष्ट आपल्या अग्निशमन दलात बरीच पदे रिक्त आहेत. लवकरात लवकर तीही भरुन घ्या. तीन महिन्याच्या आत एक एक फायरमन सेवानिवृत्त होत आहे. ते पण जरा बघा. मा. पीठासीन अधिका–यांच्या आदेशानुसार या प्रस्तावावर मतदान घेतले जात आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>निवड समितीचा जो प्रस्ताव आहे त्याच्या बाजुने जे सदस्य आहेत, त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>सचिव साहेब, विषय सांगा, विषय.

<u>महापालिका सचिव :–</u>पदोन्नती समितीचा जो प्रस्ताव आलेला आहे, त्याबाबत सन्माननिय सदस्य श्री. प्रशांत धांडे यांची जी सूचना आहे ती वगळता ज्याप्रमाणे प्रशासनाच्यावतीने प्रस्ताव आलेला आहे त्यांचे समर्थन करण्याच्या बाजूने जे सदस्य आहेत त्यांनी आपला हात वर करावा.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>श्री. प्रशांत धांडे यांनी जो प्रस्ताव दिला होता त्यास आयुक्त साहेबांनी उत्तर दिलेले आहे. मतदानाचा प्रश्न नाही.

<u>महापालिका सचिव :–</u>एक वर्षात त्यांनी प्रशिक्षण घेतले पाहिजे? ठिक आहे? पास? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>उप महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.** ९:– चतुर्थश्रेणी कर्मचा–यांना पदोन्नती देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील विविध संवर्गाच्या रिक्त पदावर पदोन्नती देण्यासाठी मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१) मधील तरतुदीन्वये दिनांक १२/१/२०१० रोजीच्या आदेशान्वये पुढीलप्रमाणे विभागीय पदोन्नती समिती गठित केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) उप आयुक्त (परिवहन) | — | मा. आयुक्त यांचे प्रतिनिधी तथा समिती अध्यक्ष |
| २) उप आयुक्त (मुख्यालय) | — | सदस्य सचिव |
| ३) उप आयुक्त (आरोग्य) | — | सदस्य |
| ४) मुख्य लेखा परिक्षक | — | सदस्य |
| ५) मागासवर्गीय अधिकारी (अधिक्षक किंवा त्यापेक्षा उच्च पदावरील) | — | सदस्य |

उपरोक्त समितीची बैठक मा. उप आयुक्त (परिवहन) यांचे अध्यक्षतेखाली दि. ७/१२/२०१० रोजी दुपारी ४.०० वाजता त्यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थीत/अनुपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) श्री. संतोष देहेरकर समिती उप आयुक्त (परिवहन) | — | मा.आयुक्त यांचे प्रतिनिधी तथा अध्यक्ष (उपस्थीत) |
| २) श्री. विजयकुमार म्हसाळ उप आयुक्त (मुख्यालय) | — | सदस्य सचिव (उपस्थीत) |
| ३) श्रीम. संगिता धायगुडे उप आयुक्त (आरोग्य) | — | सदस्य (अनुपस्थीत) |
| ४) श्री. वि. वै. चव्हाण मुख्य लेखा परिक्षक | — | सदस्य (उपस्थीत) |
| ५) श्री. रमेश शिर्के, उप अभियंता मागासवर्गीय अधिकारी | — | सदस्य (उपस्थीत) |

उल्हासनगर महानगरपालिकेतील दिनांक ७/१२/२०१० रोजी कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांची संवर्गनिहाय अंतिम सेवा जेष्ठता यादी दिनांक १७/१०/२००८ च्या परिपत्रकानुसार अंतिमत: प्रसिध्द केलेली आहे.

२. उपरोक्त विभागीय पदोन्नती समितीचाी अंतिम बैठक दिनांक ७/१२/२०१० रोजी अध्यक्ष्यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती.

३. सदर बैठकीमध्ये मा. महासभा ठराव क्र. ४१, दिनांक २०/१०/२०१० अन्वये महापालिका प्रारूप सेवाशर्ती नियम — २००८ मान्यत दिलेल्या सेवा भरती नियमास अनुसरून महानगरपालिका आस्थापनेवरील मंजूर पदे, भरतीचे प्रमाण, भरलेली पदे, रिक्त पदे व अनुशेष या बाबत आढावा घेण्यात आला.

४. मा. महासभा ठराव क्र. ४१, दिनांक २०/१०/२०१० अन्वये सेवा प्रवेश नियमावलीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ४५५ अन्वये शासनाने मंजूरी दिलेली नाही. त्यामुळे नियामनुसार पदोन्नती देता येणार नाही. तथापि, मा. शासनाच्या आदेशाच्या अधिन राहुन (<u>शासन मान्य करेलच असे नाही</u>) तसेच मा. महासभेने सदर सेवा प्रवेश नियम प्रारूप मान्य करतांना शासनाचे प्रारूपातील तरतुदीशी सुसंगत मान्यता दिली अशा संवर्गातील पदोन्नतीबाबत आणि मुळ नियुक्ती (प्रथम नियुक्ती) ही खुल्या प्रवर्गातील असेल तरच तो सेवाजेष्ठता, शैक्षणिक अर्हता आणि अनुभवानुसार खुल्या प्रवर्गातील

पदावर पदोन्नतीस पात्र असतील, अशांचे बाबतीत जात वैधता प्रमाणपत्र किंवा जात प्रमाणपत्र सादर करणेची आवश्यकता नाही. तसेच सदर कर्मचारी खुल्या प्रवर्गातील आहे असे समजून पदोन्नती देणेबाबत चर्चा झाली. मात्र सदर कर्मचाऱ्याने पुढे कोणत्याही राखीव प्रवर्गातील जागेवर हकक सांगितल्यास सदर कर्मचाऱ्यास जात प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल अशी चर्चा झाली.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. सदर बैठकीमध्ये विविध पदांवर पदोन्नती देण्यासाठी विभागगीय पदोन्नती समितीने एक मताने निवडसूची मंजूर केलेली आहे. ती खालीलप्रमाणे.

**सेवा नियम — २००८ अन्वये सेवा शर्ती नियमास शासनाच्या मंजूरीच्या अधिन राहुन तसेच न्यायालयीन प्रकरणे, चौकशी व शासन आदेशास (सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ५ नोव्हेंबर, २००९) अधिन राहुन विभागीय पदोन्नती समितीने खालील निवड सुचीस तात्पुरत्या स्वरूपात एकमताने मान्यता दिली.**

# निवड सुची

## लिडींग फायरमन

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सेवा जेष्ठता क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. धरमपाल एम. चौधरी | ०५ | खुला |
| २ | श्री. पांडूरंग कोकम | ०६ | खुला |
| ३ | श्री. भगवान मोरे | १२ | अनु. जाती |

## पंपचालक

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सेवा जेष्ठता क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. अमृत देऊ मानकर | ३८ | अनु जमाती |
| २ | श्री. प्रभाकर के. कुंभार | १५४ | खुला (इमाव)) |
| ३ | श्री. विकास रामा गायकवाड | १३ | अनु. जाती |

## गवंडी

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सेवा जेष्ठता क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. भजनसिंग करिरा | ०६ | खुला |

## मिस्त्री

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सेवा जेष्ठता क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. कमल गुजरानी | ०९ | खुला |
| २ | श्री. सुरेश शंकर निकम | १० | खुला |
| ३ | श्री. वासुदेव शर्मा | ११ | खुला |
| ४ | श्री. ज्ञानेश्वर दुभेले | १२ | खुला(इमाव) |

## लिपीक

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम | नियुक्ती दिनांक | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. अे. एस. सोनावणे | मजूर | १/३/८४ | खुला (अनु. जाती) |
| २ | श्री. के. के. जाधव | मजूर | १/३/८४ | खुला (अनु. जाती) |
| ३ | श्री. भिमराव सावळे | मजूर | १/१/८८ | खुला (अनु. जाती) |
| ४ | श्री. महेश बदलानी | रोडमुकादम | १/१/९० | खुला |
| ५ | श्री. नवनाथ राठोड | मजूर | १/५/९० | वि.जा. (अ) |
| ६ | श्री. उल्हास सिताराम राठोड | मजूर | ७/३/९२ | वि.जा. (अ) |
| ७ | श्री. दिलीप बि—हाडे | मजूर | ७/५/९२ | खुला (अनु. जाती) |
| ८ | श्री. मनोज विष्णू जाधव | शिपाई | ३०/०६/९२ | अनु. जाती |
| ९ | श्री. शांताराम डी. चौधरी | शिपाई | ६/२/९३ | खुला(इमाव) |
| १० | श्री. रामकुमार बी. बिडलान | शिपाई | १/३/९३ | खुला (अनु. जाती) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | श्री. बाबूराव रंगनाथ पाचपिंडे | रोडमुकादम | १/६/९३ | खुला |
| १२ | श्री. मनोहर बाबूलाल जेस्वानी | मजूर | ७/६/९४ | खुला |
| १३ | श्री. संजय प्रभाकर पवार | मजूर | ११/६/९४ | खुला (अनु. जाती) |
| १४ | श्री. दयाराम डोभाळे | सुरक्षारक्षक | १३/६/९४ | खुला (अनु. जाती) |
| १५ | श्रीम. नर्गीस एस. खान | शिपाई | १८/१२/९६ | खुला(इमाव) |
| १६ | श्री. गिरीष एन. दावानी | शिपाई | २०/३/९९ | खुला (अनु. जाती) |
| १७ | श्री. ब्रम्हचंद मलीराम करोतिया | सफाई कामगार | २९/५/९९ | खुला (अनु. जाती) |
| १८ | श्री. महेश पी. वालानी | सफाई कामगार | २२/२/०० | खुला (अनु. जाती) |
| १९ | श्रीम. रेशमा हरेश नागपुरे | शिपाई | १४/२/२००३ | खुला |
| २० | श्री. भानु अशोक परमार | सफाई कामगार | १२/३/२००३ | खुला (अनु. जाती) |
| २१ | श्री. अजय श्रीचंद बेहनवाल | सफाई कामगार | १३/३/२००३ | खुला (अनु. जाती) |
| २२ | श्री. सुरेश सुखदेव लहुंडे | सफाई कामगार | १०/५/२००३ | खुला (अनु. जाती) |
| २३ | श्री. सुंदरदास भानुदास लांडगे | सफाई कामगार | १९/५/२००३ | खुला (अनु. जाती) |
| २४ | श्री. विशाल व्ही. बांगर | बिल सर्व्हेअर | ३१/५/२००३ | खुला |
| २५ | श्री. यशवंत रतन सगळे | सुरक्षारक्षक | ३१/७/०३ | भ. ज. (ड) |
| २६ | श्री. नितीन करोतीया | सफाई कामगार | १६/६/२००४ | खुला (अनु. जाती) |
| २७ | श्री. सुनिल वाघेला | सफाई कामगार | १५/७/२००४ | खुला (अनु. जाती) |
| २८ | श्री. रामदास गवारी | मजूर | १२/१२/०६ | (अनु. जमाती) |

## वाहनचालक

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | सातत्याने काम करित असल्याचा दिनांक | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. भास्कर वाळकु भोईर | १७/०८/२००० | खुला |
| २ | श्री. राजेंद्र विठ्ठल माळी | १३/१०/२०० | खुला |
| ३ | श्री. विलास गणपत कवडे | १७/२/२००१ | खुला |
| ४ | श्री. किसन रामभाऊ भगत | १०/६/२००४ | अनु. जमाती |
| ५ | श्री. अजय विष्णू काळे | २९/७/२००५ | विमाप्र |
| ६ | श्री. प्रल्हाद दत्तात्रय वाख | २७/४/२००६ | अनु. जमाती |
| ७ | श्री. केशव रघुनाथ बागराव | ६/६/२००६ | खुला |
| ८ | श्री. अब्दुल सी. पिंजारी | ११/६/२००९ | खुला |

## रोडमुकादम

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सेवा जेष्ठता क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. विश्वनाथ गणपत राठोड | १९४ | वि. जा. (अ) |

## सफाई मुकादम

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सेवा जेष्ठता क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. महेंद्र रामसरण | ३८५ | अनु. जाती |
| २ | श्री. सुनिल श्रावण निकम | ३९२ | अनु. जाती |
| ३ | श्री. मोतीलाल रामचंद्र | ३९४ | अनु. जाती |

## वरिष्ठ सुरक्षारक्षक

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सेवा जेष्ठता क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. शंकर चव्हाण | १४ | खुला (अनु. जाती) |

न्यायालयीन प्रकरणे, चौकशी, व शासन आदेशास (सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ५ नोव्हेंबर, २००९) अधिन राहुन मुंबई प्रांमिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये नियुक्ती प्राधिकरण मा. महासभा आहे. तरी निवड समितीचा प्रस्ताव मंजुरीकरीता मा. महासभा पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ५७ दिनांक:—२८/१२/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. प्रशांत धांडे
अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

ही महासभा निवड समितीच्या शिफारसी प्रमाणे अनुक्रमे लिडिंग फायरमन, पंप चालक, गवंडी, मेस्त्री, लिपिक, रोड मुकादम व वरिष्ठ सुरक्षारक्षक पदांवर प्रस्तावनेत सुचविलेल्या एकुण ५२ कर्मचा—यांना पदोन्नती देणे मान्य करीत आहे.

परंतु——

लिडिंग फायरमन पदाचे पदोन्नतीनंतर एक वर्षाचे आत अग्निशमन प्रशिक्षण पुर्ण करणे गरजेचे राहिल.

तसेच या ठरावान्वये घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १० :— उल्हासनगर शहरातील रस्ते/चौक व सार्वजनिक जागांचे नामकरण प्रयोजनार्थ तदर्थ समितीने शिफारस केलेल्या यादी मान्य करणे.

---

सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, माझा नामकरणाच्या प्रस्तावास विरोध नाही आहे. परंतु ज्या विभागाला २०—२५ वर्षापासुन नाव देण्यात आले आहे, जसे माझ्या प्रभागातील तानाजी नगर असे नाव आहे, एकदा नाव देतो आणि नंतर नाव देण्यासाठी प्रस्ताव येतो याला काय अर्थ आहे का? दुबार नाव येत आहे ना? माझ्या प्रभागातील एक नाव आले आहे शिवाजी नगर म्हणुन, हे काय चालले आहे? जे नाव आलेले आहे, त्याची करपावती सुध्दा येते.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—सन्माननिय महापौरजी, मागे काही अर्ज आमच्याकडे व महापौरांकडे आलेले आहेत. की जे डबल डबल जी नावे आली आहेत किंवा एका माणसाचे काही करत नसतांना देखील त्याची रस्ते

चौकांना नावे दिली आहेत, वाटेल तशी. तर तेवढे सोडुन तुम्ही ठराव पारीत करावा. सभागृहनेताजी ते प्रस्ताव सोडुन ठराव पारीत करावयास पाहिजे.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>मा. महापौरजी, माझी एक सूचना आहे, २००७ मध्ये मी एक नाव सुचविलेले होते. त्याचा प्रस्ताव का आलेला नाही परंतु आता सध्या श्री. गोविंदराम लुंड यांनी नाव सुचविलेले आहे. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन ते रद्द करण्यात आलेले आहे. त्यांना चुकीचे उत्तर दिले आहे की, तेथे अगोदरच नामफलक आहे. उदया कोठुन कोणी कोठेही फलक लावेल. परंतु ते नाव पारीत झालेले नाही. ते नाव रद्द का केले? तेथे फलक लावला आहे म्हणुन रद्द केले? एक स्वातंत्र्य सेनानी आहे, त्याचे नाव सुचविले होते श्री. गोविंदराम लुंड यांनी. त्याबाबतीत सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन असे उत्तर आलेले आहे, तेथे नामफलक आहे. परंतु नामफलक आहे म्हणजे कोणीही उठुन तेथे नामफलक लावेल. परंतु महापालिकेकडुन ते नाव पारीत झालेले नाही. ठराव पारीत झालेला आहे का स्पष्टपणे सांगावे.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>काय नाव आहे?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>श्री. गोविंदराम दादा यांनी नाव सुचविले आहे. स्वातत्र्य सेनानी स्वर्गीय श्री. लधाराम भक्तीयानी. त्याबाबती सार्वजनिक बांधकाम विभागाने उत्तर दिले आहे की, त्याठिकाणी फलक आढळलेला आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>सन्माननिय रमेश चव्हाण म्हणतात, त्याबद्दल एकच केले पाहिजे होते की जर कोणाची हरकत असेल तर तो प्रस्ताव वेगळा ठेवावयास पाहिजे होता, त्यावर चर्चा केली पाहिजे होती. एकदम ते नाव रद्द करता कामा नये. असे श्री. रमेश चव्हाण यांचे सुध्दा म्हणणे आहे.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–</u>सन्माननिय महापौर, उप–महापौर आणि सन्माननिय सर्व सदस्यगण मा. तदर्थ समितीपुढे सार्वजनिक बांधकाम विभागाने नामकरणाचे ८५ प्रस्ताव ठेवले होते. त्यामध्ये सदर रस्त्याच्या नामकरणाचा प्रस्ताव ठेवलेला आहे.

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सन्माननिय सदस्य श्री. रमेश चव्हाण साहेब, आपण म्हणालात की तेथे फलक लावलेला आहे तो कुणाच्या नावाचा आहे? तुम्ही जे सांगितले की तेथे फलक लावलेला आहे तो फलक कुणाच्या नावाचा लावलेला आहे? आपण जो मुद्दा उपस्थित केला आहे त्या रस्त्याला फलक लावलेला आहे म्हणुन तो प्रस्ताव नामकरण समितीच्या प्रस्तावातुन काढुन टाकलेला आहे म्हणुन जर नामकरणाचा प्रस्ताव पारीत नसेल तर ते नाव आपण या प्रस्तावात घेवु.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–</u>तदर्थ समितीने ते नाव मंजुर केलेले नाही.

<u>सदस्या श्रीमती विद्याताई निर्मले :–</u>मा. आयुक्त साहेब, माझ्याही प्रभागात असे झाले आहे की, १५ वर्षापासुन भगतसिंग चौक हे नाव तेथे दिलेले आहे. तरी सुध्दा हा प्रस्ताव कसा आला?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>मा. उप–महापौर साहेब, आणखी दुसरा एक असाच मुद्दा आहे. अनु.क्र ९७ वर माझ्या प्रभागातील गुरुद्वारा लालचक्की येथे प्रवेशद्वार बसवुन तेथे त्याचे नामकरण करणे हा प्रस्ताव कुणी दिला आहे?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–</u>अनु.क्र. ९७ वर ते नाव दर्शविले आहे का? हे श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी सुचविले आहे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>मा. महापौरजी, श्री. दिलीप गायकवाड यांनी जसे सांगितले की विर तानाजी नगर प्रवेशद्वाराचे तसे आपल्या महापालिकेचे रजिस्टरमध्ये नाही आहे म्हणुन त्याची नोंद दिली आहे.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>श्री. शिर्के साहेब, ८६ क्रमांकावर जो चौक दिला आहे भाटिया चौक येथे पुर्वीच नाव दिलेले आहे. आपण प्रथम आपण त्यास तपासुन घ्या.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मी तर असे म्हणतो की सर्वच तपासुन पहावे. जेथे नावे डबल झाली आहेत ती रद्द करा. अनु.क्र. १०२ व ९७ तपासा.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—अनु. क्र. ८६ तपासा. तेथे पुर्वीच नाव दिलेले आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—श्री. शिर्के साहेब बाकीचे पारीत करा. हे सोडुन बाकी पारीत करा.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौरजी हा जो ठराव करत आहोत त्यामध्ये एक वाक्य समाविष्ट करणे आवश्यक आहे तर कुण्या एखादया जागेचे नाव या अगोदरच्या ठरावात आलेले असेल आणि चुकीने तेच नाव पुन्हा आले असेल तर ते नाव रद्द समजले जावे. हे वाक्य ठरावात आले पाहिजे. तसेच जर नाव असेल व पुन्हा ठरावात तेच नाव असेल तरी सुध्दा त्या ठरावास रद्द समजावे. हे वाक्य ठरावात टाकुन दया.

सदस्या श्रीमती कविता सिरवानी :—सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, माझ्या प्रभागात सुध्दा असेच झाले आहे. १०२ क्रमांकावर एक प्रस्ताव आलेला आहे.

सदस्य श्री. सतिश चहाळ :—महापालिकेत ठराव मंजुर झालेले नाहीत अशी यादी आलेली असेल ते सर्व प्रस्ताव पारीत केले जावेत.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—पास करा.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—जमनादास पुरस्वानी यांची सूचना व ......

महापालिका सचिव :—सर्व अटी टाकल्या जातील.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—सचिव साहेब, माझे उत्तर दिले नाही, माझ्या येथिल नाव वगळले आहे ना?

महापालिका सचिव:—होय, वगळले आहे. अ.क्र. ४७, ८६, ९७ व १०२ हे वगळले जात आहेत.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—याची चौकशी करुन जी डबल नावे आली आहेत ते प्रस्ताव रद्द केले जावेत.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—नाही, नाव डबल असेल तर तो प्रस्ताव वगळला जाईल.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—होय वगळले जावे.

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—मा. महापौरजी, जे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले आहे त्या बाबीकडे विशेष लक्ष दिले जावे. जे पुर्वीच नाव आले आहे त्यास परत नाही घेतले पाहिजे, जर डबल नावे आली असतील तर ते तपासुन एकच केले जावे. तसेच ज्या नगरसेवकांनी पत्र दिलेली आहेत आणि ते नियमात बसत असेल तर त्यांचे सुध्दा प्रस्ताव घेतले जावेत व ते पारीत केले जावेत.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—त्यांचे प्रस्ताव पुढील महासभेत घेतले जातील, ज्यांचे राहुन गेले असतील त्यांचे.

काही सदस्य :—पास—पास......

उप महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

☑

**विषय क्र. १०:—** उल्हासनगर शहरातील रस्ते/चौक व सार्वजनिक जागांचे नामकरण प्रयोजनार्थ तदर्थ समितीने शिफारस केलेल्या यादी मान्य करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेल्या रस्त्यांना व चौकांना नामकरण करणेकरीता खालील प्रमाणे प्रस्ताव आलेले आहे.

| अ.क्र. | प्रस्ताविताचे नाव | नामकरण करावयाचे ठिकाण रस्ता/चौक | प्रस्तावित नाव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीम.लिलाबाई लक्ष्मण आशान | उल्हासनगर—४ येथील ओ.टी.चौक ते पुज्य पंचायत हॉल या रस्त्यावर | ''जय झुलेलाल'' |
| २ | श्रीम.लिलाबाई लक्ष्मण आशान | उल्हासनगर—४ येथील प्र.क्र.४७ मधील भिमनगर ते भिमकॉलनी पर्यंतच्या परिसराचे नामकरण करणे | ''माता रमाबाई आंबेडकर प्रवेशद्वार'' |
| ३ | श्रीम.लिलाबाई लक्ष्मण आशान | उल्हासनगर—४ येथील प्र.क्र.४७ मधील महात्मा ज्योतिबा फुले जयभिम नगर येथे परिसराचे नामकरण करणे. | ''महात्मा ज्योतिबा फुले प्रवेशद्वार'' |
| ४ | १) श्री.सुनिल बेहराणी, महासचिव, उल्हासनगर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटी<br>२) मा.श्री.कुमार आयलानी, आमदार, उल्हासनगर | उल्हासनगर—३ येथील इंदीरागांधी भाजीमार्केट, बॅरेक क्र.१००२ समोरील चौकास | ''स्वर्गीय भाऊ गोपबहराणी चौक'' |
| ५ | १) श्रीम.मालती राधाचरण करोतिया २) श्री.राजेंद्रसिंह भुल्लर (महाराज) | उल्हासनगर—३ प्र.क्र.४५ बॅरेक क्र. ११३५ ताडीमाडी दुकानाजवळ, फॉलवर लाईन येथील समाजमंदीरास | ''संत महर्षि वाल्मिकी'' |
| ६ | १) श्रीम.इंदीरा उदासी<br>२) श्री.गोधमल एन.किशनानी | १) उल्हासनगर—३ येथील दशहरा मैदान येथील प्रवेशद्वारास<br>२) दशहरा मैदानाच्या आतील भागास | १) प्रवेशद्वारास स्व.श्रीम. इंदीरा गांधी असे नामकरण<br>२) आतील उद्यानास कै. मोहनदास वरियलदास बेहराणी |
| ७ | श्री.गोविंदराम ढोलूमल लुंड | उल्हासनगर—४ येथील प्रभाग क्र.६० मधील विनोद अपार्टमेंट पासून ब्लॉक क्रमांक ६६६ पर्यंतच्या रस्त्यास | ''साई आत्माराम मार्ग'' |
| ८ | श्री.गोविंदराम ढोलूमल लुंड | उल्हासनगर—४ प्रभाग क्र.६० मधील ब्लॉक क्र.६६६ पासून ब्लॉक क्रमांक ६१६/१२३१ पर्यंतच्या रस्त्यास | ''गुरु गोविंदसिंग मार्ग'' |
| ९ | श्री.गोविंदराम ढोलूमल लुंड | उल्हासनगर—४ प्रभाग क्र.६० मधील नवजिवन बॅक ते बॅरेक क्र.१६९३ पर्यंतच्या रस्त्यास | ''साधुराम अहुजा मार्ग'' |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | श्री.गोविंदराम ढोलूमल लुंड | उल्हासनगर–४ बॅरेक नं.१६८८ जवळ मिरा हॉस्पीटलचे व नवजिवन बॅकेच्या मागे, सेक्शन–२५ येथील वाचनालयास | ''स्व.श्री.साधूराम आहुजा वाचनालय'' |
| ११ | श्री.लालबिहारी यादव | प्र.क्र.४१ उल्हासनगर–३ मधील पंजाबी कॉलनी चौक, रिक्षा स्टॅंड समोर नविन प्रवेशद्वार बांधून त्या प्रवेशद्वारास | ''महान कवी हरवंशराय बच्चन'' |
| १२ | श्री.लालबिहारी यादव | प्र.क्र.४१ उल्हासनगर–३ मधील दिपक मटेरीयल सप्लायर्सच्या बाजूला नविन प्रवेशद्वार बांधून त्या प्रवेशद्वारास | ''स्व.प्रमोद महाजन'' |
| १३ | श्री.प्रधान धर्माजी पाटील | उल्हासनगर–५ येथील प्र.क्र.७६ मधील सेक्शन ३६ मधील श्री.शांताराम भोईर यांचे दुकान ते जागृती विद्यामंदीर या परिसरास | ''खामदेव पाडा'' |
| १४ | श्री.प्रधान धर्माजी पाटील | उल्हासनगर–५ येथील प्र.क्र.७६ मधील गायकवाड पाडा नाका नं.११ ते कलर फॅक्ट्री पर्यंतच्या रस्त्यास | ''छत्रपती शिवाजी महाराज मार्ग'' |
| १५ | श्री.प्रधान धर्माजी पाटील | उल्हासनगर–५ येथील प्र.क्र.७६ मधील दुर्गादेवी पाडा येथील आकाश किराणा स्टोअर्स जवळील चौकास | ''छत्रपती शिवाजी महाराज चौक' |
| १६ | श्री.प्रधान धर्माजी पाटील | उल्हासनगर–५ येथील प्र.क्र.७६ मधील एकता नगर, दुर्गापाडा ते चोलेकर पाडा कलर फॅक्टरी पर्यंतच्या रस्त्यास | ''धर्माजी पाटील मार्ग'' |
| १७ | श्री.प्रधान धर्माजी पाटील | उल्हासनगर–५ येथील प्र.क्र.७६ मधील आकाश कॉलनी येथे प्रवेशद्वार बांधून त्यास नामकरण करणे. | ''आकाश कॉलनी रहिवासी संघटना'' |
| १८ | श्री.प्रधान धर्माजी पाटील | उल्हासनगर–५ येथील प्र.क्र.७६ मधील गायकवाड पाडा येथील महेश कोलेकर यांचे घराजवळ प्रवेशद्वार बांधून त्यास | ''स्व.मॉ.मिनाताई ठाकरे प्रवेशद्वार'' |
| १९ | श्री.प्रधान धर्माजी पाटील | उल्हासनगर–५ येथील प्र.क्र.७६ मधील स्वामी शांतीप्रकाश शाळेसमोर प्रवेशद्वार बांधून त्यास | ''धर्माजी पाटील कॉलनी'' |
| २० | श्री.प्रधान धर्माजी पाटील | उल्हासनगर–५ येथील प्र.क्र.७६ मधील राजाराम पाटील यांचे रेशन दुकानासमोरील चौकाचे नामकरण करणे. | ''धर्मविर आनंद दिघे चौक'' |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | श्री.प्रधान धर्माजी पाटील | उल्हासनगर–५ येथील प्र.क्र.७६ मधील आकाश किराणा स्टोअर्स समोर साईबाबा मंदीराजवळ प्रवेशद्वार बांधून त्यांचे नामकरण करणे. | ''धर्मविर आनंद दिघे प्रवेशद्वार'' |
| २२ | राष्ट्रीय मातंग शक्ती, विर तानाजी नगर, सेक्शन–४० उल्हासनगर–५ | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र.७१ मधील विरतानाजी नगर नजीकच्या दलित वस्तीचे नामकरण करणे. | ''वीर लहुजी साळवे नगर'' |
| २३ | राष्ट्रीय मातंग शक्ती, विर तानाजी नगर, सेक्शन–४० उल्हासनगर–५ | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र.७१ मधील गणेशनगर या वस्तीस | ''अण्णाभाऊ साठेनगर'' |
| २४ | श्रीम.मंजू ईश्वर पोपटानी | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र.६९ मधील बॅरेक क्र.१८११,१८१२,१८१३, १८१९,१८२२ ते १८२५ आणि १८२८ ते १८३१ पर्यंतच्या परिसरास | ''भगंत कंवरराम नगर'' |
| २५ | सौ.शकुंतला कौ.पाटील | उल्हासनगर–३ प्र.क्र.३३ येथील स्व. केशवदास जयसिंघानी यांच्या घराच्या समोरील परिसरास | ''एकता कॉलनी'' |
| २६ | सौ.शकुंतला कौ.पाटील | उल्हासनगर–३ येथील शिवगंगा व शिवसागर सोसायटीच्या परिसरास | ''शिव कॉलनी'' |
| २७ | सौ.शकुंतला कौ.पाटील | उल्हासनगर–३ प्र.क्र.३३ येथील शिवगंगा अपार्टमेंट समोरील प्रस्तावित करमणूक सेंटरचे | ''स्वातंत्रविर वि.दा.सावरकर भवन'' |
| २८ | सौ.शकुंतला कौ.पाटील | उल्हासनगर–३ प्र.क्र.३३ येथील वैष्णवदेवी अपार्टमेंट समोरील महानगरपालिकेच्या उद्यानास | ''हरे राम हरे कृष्णा'' |
| २९ | सौ.शकुंतला कौ.पाटील | उल्हासनगर–३ प्र.क्र.३३ मधील श्री. आंबेकर यांच्या घरासमोर उद्यान बांधून त्यास नामकरण करणे. | ''सु–प्रभात'' |
| ३० | श्रीम.इंदीरा उदासी | उल्हासनगर–३ येथील प्र.क्र.३१ मधील दसेरा मैदान सेक्शन २३ येथे साईपार्क अपार्टमेंट ते भाग्य कृपा मेडीकल स्टोर येथील रस्त्यांस | ''डॉ.जमनादास एच.उदासी मार्ग '' |
| ३१ | श्री.मोहन आर.साधवानी | उल्हासनगर–५ येथील प्र.क्र.६६ मधील गणेश धाम मार्ग ब्लॉक बी ६० ते ब्लॉक ५६ व कृष्णा माता यांचे घर या परिसराचे नामकरण करणे. | ''संतोषी माता नगर'' |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | श्री.मोहन आर.साधवानी | उल्हासनगर–५ येथील प्र.क्र.६६ मधील कैलाश नगर येथे प्रवेशद्वार बांधून त्यास नामकरण करणे. | ''अण्णाभाऊ साठे'' |
| ३३ | श्री.रमेश म.चव्हाण | उल्हासनगर–४ येथील प्र.क्र.५६ मधील स्व.सौ.मिनाताई ठाकरे चौक ते धर्मविर संभाजी चौक पर्यंतच्या परिसरास | ''धर्मविर संभाजी नगर'' |
| ३४ | श्री.भरत गंगोत्री | उल्हासनगर–५ येथील सेक्शन ३९ पासून भाटीया चौक पर्यंतच्या परिसरास | ''संतबाबा अमलोकदास नगर'' |
| ३५ | १) श्रीम.सुजाता रिझावानी<br>२) श्री.कुमार आयलानी | उल्हासनगर–२ प्र.क्र.१७ येथील सोनारा हॉल जवळ श्री.गुरु अर्जुनदेव साहिब कॉलनी याठिकाणी | ''श्री गुरु अर्जुनदेव साहिब'' |
| ३६ | १) श्री.राजेंद्र नामदेव अडांगळे<br>२) श्री.किशोर शंकर बोराडे अध्यक्ष, क्रांतीवीर लहुजी सेना, उल्हासनगर शहर | उल्हासनगर–५ येथील नेताजी, जुनी प्रभात टॉकीजवळील चौकात स्व. आनंद दिघे यांचा पुतळा बसवून त्या चौकाचे नामकरण करणे. | ''सद्‌गुरु धर्मविर स्व.आनंद दिघे चौक'' |
| ३७ | सौ.संगिता राजेश कंडारे | वार्ड क्र.४ मधील बिर्लागेट, मुरबाड रोडला लागूल असलेल्या परिसराचे | ''छत्रपती शिवाजी नगर'' |
| ३८ | सौ.संगिता राजेश कंडारे | उल्हासनगर–१ प्रभाग क्र.४ मधील बॅ. क्र.३१–३२ समोरील परिसरास व प्रवेशद्वारास | ''जनता मित्र मंडळ'' |
| ३९ | सौ.संगिता राजेश कंडारे | उल्हासनगर–१ प्रभाग क्र.४ मधील हरमन मोहता कंपनीचे बाजूच्या परिसरास | ''बालाजी नगर'' |
| ४० | सौ.संगिता राजेश कंडारे | उल्हासनगर–१ प्रभाग क्र.४ मधील बॅ.क्र.९ चे मागील परिसरास | ''दत्तवाडी'' |
| ४१ | सौ.संगिता राजेश कंडारे | उल्हासनगर–१ प्रभाग क्र.४ मधील बॅ. क्र.३१ समोरील परिसरास | ''संगम कॉलनी'' |
| ४२ | सौ.संगिता राजेश कंडारे | उल्हासनगर–१ वार्ड क्र.४ मधील सहयाद्री कॉलनी या परिसराचे तसेच तेथील प्रवशेद्वारास | ''सहयाद्री कॉलनी'' |
| ४३ | श्री.रविंद्र द.बागुल | वार्ड क्र.५ मधील गुलशननगर, आय.डी. आय., अमरडाय रोड, नाका क्र.१० येथील चौकास | ''मौलाना आझाद चौक/मार्ग/रस्ता'' |

| | | | |
|---|---|---|---|
| ४४ | श्री.रविंद्र द.बागुल | ,शहाड फाटक ते महात्मा फुले चौकापर्यंत रस्त्यास | ''शहाड फाटक शिवाजी रोड'' |
| ४५ | डॉ.निना प्रकाश नाथानी | उल्हासनगर–१ मधील प्र.क्र.२४ मधील रामजपो आश्रम समोरील उद्यानास | ''डॉ.घनश्यामदास टिलोमल नाथानी उद्यान'' |
| ४६ | सौ.शिला सुभाष मनसुलकर | मुक्ती अपार्टमेंट ते निखलेश्वर कॉम्प्लेक्स पर्यतच्या परिसरास | ''श्री सिध्दीविनायक नगर'' |
| ४७ | श्री.विनोद लालसिंग ठाकूर | उल्हासनगर–५ येथील विरतानाजी नगर गुरुगोविंदसिंग गुरुद्वाराच्या समोरच्या चौकाचे नामकरण करणे | ''भगतसिंग चौक'' |
| ४८ | सौ.बेबी (नेहा) नंदू भोईर | उल्हासनगर–१ प्रभाग क्र.१ मधील धोबीघाट येथील चौकास | ''हुतात्मा विरभाई कोतवाल चौक'' |
| ४९ | श्री.विजय खंडू सुपाळे | प्रभाग क्र.११ कल्याण–अंबरनाथ रोड, रेमण्ड शो रुम समोरील प्रवेशद्वारास | ''धर्मविर आनंद दिघे प्रवेशद्वार'' |
| ५० | श्री.भारत रा.राजवानी (गंगोत्री) | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र.६७ मधील गांधीरोड, तहसिल कार्यालयाजवळील चौकाचे नामकरण करणे. | ''गुरुदाससिंग जवाहरसिंघ ऐलसिंघानी'' |
| ५१ | श्री.भारत रा.राजवानी (गंगोत्री) | उल्हासनगर–५ येथील सेक्शन ३५ बॅरेक क्र.२०७८ येथील ब्रम्हकुमारी हॉल बॅक ऑफ इंडिया जवळील चौकाचे नामकरण करणे. | ''साई गुरुमुखदास चौक'' |
| ५२ | श्री.प्रधान धर्माजी पाटील | उल्हासनगर–५ येथील प्र.क्र.७६ मधील सेक्शन ३६ मध्ये ट्रान्सफार्मर ते गणेश कॉलनी ते शिवसेना गायकवाडपाडा शाखेच्या मागील श्री.गुप्ता श्री.नन्नावरे श्री.ज्ञानदेव पाटील ते एम.एस.इ.बी. कार्यालयापर्यंतच्या विभागाचे परिसरास नामकरण करणे. | ''धर्मविर आनंद दिघे साहेब नगर'' |
| ५३ | श्री.राजेश देवेंद्र वानखेडे | उल्हासनगर–४ येथील प्र.क्र.६४ मधील भरतनगर येथे मम्मादेवी मंदीरासमोरील चौकास नामकरण करणे. | ''महाराणा प्रताप चौक'' |
| ५४ | मा.श्री.विनोद ठाकूर | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र.६५ मधील गुजरातीपाडा परिसराचे नामकरण करणे | ''श्री बाबा रामदेवनगर'' |
| ५५ | श्री.सुरेश मधुकर जाधव | उल्हासनगर–४ येथील उल्हासनगर रेल्वे स्टेशन परिसराच्या रस्त्यास | ''स्वर्गीय धर्मविर आनंद दिघे प्रवेशद्वार'' |

| | | | |
|---|---|---|---|
| ५६ | श्री.सुरेश मधुकर जाधव | उल्हासनगर–४ येथील अंबिकानगर या रस्त्यास | ''अंबिकानगर प्रवेशद्वार'' |
| ५७ | श्री.सुरेश मधुकर जाधव | उल्हासनगर–४ येथील विरसावरकर नगर या रस्त्यास | ''विरसावरकर प्रवेशद्वार'' |
| ५८ | श्रीम.लिलाबाई लक्ष्मण आशान | उल्हासनगर–४ प्रभाग क्र.४७ मधील सुखसागर ते करिश्मा अपार्टमेंट या ठिकाणी रस्त्याला | ''वीर शहिद (२६/११) हुतात्मा प्रवेशद्वार'' |
| ५९ | श्रीम.लिलाबाई लक्ष्मण आशान | उल्हासनगर–४ प्रभाग क्र.४७ मधील महात्मा फुले नगरास | ''महात्मा ज्योतिबा फुले प्रवेशद्वार'' |
| ६० | श्रीम.लिलाबाई लक्ष्मण आशान | उल्हासनगर–४ प्रभाग क्र.४७ मधील महात्मा फुले नगर रस्त्यास | ''लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मार्ग'' |
| ६१ | मा महापौर सौ.राजश्री राजेंद्र चौधरी, श्री राजेद्रसिंह वि. भुल्लर महाराज व श्री. धनंजय बोडारे | उल्हासनगर रेल्वे परिसरात उभारलेल्या स्काय वॉकचे नामकरण करणे<br>उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथील पश्चिमेकडे जाणा–या स्कायवॉकचे मार्गास<br>उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथील पुर्वेकडे जाणा–या स्कायवॉकचे मार्गास | <br>स्वामी शांतीप्रकाश मार्ग<br>महाराष्ट्र भूषण डॉ श्री नारायण विष्णु तथा नानासाहेब धर्मधिकारी मार्ग |
| ६२ | श्री चहाळ सतीश बाजीराव तात्याबा | उल्हासनगर–२ येथील प्र.क्र.३९ मधील बजरंग इंडस्ट्रीजचे मागील परिसर ते एम.एम.आर.डी.ए. शौचालय येथे प्रवेशव्दार बनवुन त्याचे नामकरण करणे | ''संत ज्ञानेश्वर नगर प्रवेशव्दार'' |
| ६३ | श्री प्रभुनाथ दुखंती गुप्ता | उल्हासनगर–३ येथील प्र.क्र.३२मधील भवानी नगर पासुन मच्छी मार्केट ते दर्ग्यापर्यंतचे मार्गाच नामकरण करणे | ''नेव्हीनगर मार्ग'' |
| ६४ | श्री.प्रभुनाथ दुखंती गुप्ता | उल्हासनगर–३ येथील प्र.क्र.३२मधील गौतमवाडी मातभूमी त सॉ मीलजवळ प्रवेशव्दार बनवुन त्याचे नामकरण करणे | ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशव्दार'' |
| ६५ | श्री चहाळ सतीश;बाजीराव तात्याबा | उल्हासनगर–२ येथील प्र.क्र.३९ मधील वडार कॉलनीच्या बाजुला इंद्रावती यांचे घरासतोरील परिसर येथे प्रवेशव्दार बांधून त्याचे नामकरण करणेकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे. | ''बौध्द नगर प्रवेशव्दार'' |

| | | | |
|---|---|---|---|
| ६६ | श्री लालबिहारी यादव व सौ ेराजेश्री राजेद्र चौधरी | उल्हासनगर–३ प्र.क्र.४१मधील दिपक मटेरियल सप्लायर्स ते पेपर बॉक्स दरम्यान प्रवेशव्दार बनवुन त्याचे नामकरण करणे | ‘‘लाल बहाददुर शास्त्री प्रवेशव्दार ’’ |
| ६७ | श्री.प्रभुनाथ दुखंती गुप्ता | उल्हासनगर–३ येथील प्र.क्र.३२मधील रेडक्रॉसचे मागे नेव्हीगेट नं.२चे बाजूचे नविन वस्तीचे नामकरण करणे | ‘‘महात्मा गांधी नगर ’’ |
| ६८ | श्री प्रभुनाथ दुखंती गुप्ता | उल्हासनगर–३ येथील प्र.क्र.३२मधील कालीमातामंदिराचे मागे सुभाषनगर येथे प्रवेशव्दाराचे व चौकाचे नामकरण करणे | ‘‘नेताजी सुभाषचंद्र बोस प्रवेशव्दार व चौक’’ |
| ६९ | श्री प्रभुनाथ दुखंती गुप्ता | उल्हासनगर–३ येथील प्र.क्र.३२मधील गुरुव्दाराचे बाजुला प्रितम हाउसचे बाजुचे चौकाचे नामकरण करणे | ‘‘शहिद भगतसिंग चौक’’ |
| ७० | सौ. सुरेखा राजन वेलकर | उल्हासनगर–२ मधील प्रभाग क्र.४० येथे गरीब नगर देवी मंदिरा जवळील समाज मंदिराचे नामकरण करणे | ‘‘साहित्य रत्न आण्णा भाउ साठे समाजमंदिर’ |
| ७१ | श्री.राजेंद्रसिह वी. भुल्लर महाराज व सौ ेराजेश्री राजेद्र चौधरी | उल्हासनगर–२ येथील प्रभाग क्र.२३ रोहन पॅलेस सोनारा हॉल परिसर येथील प्रवेशव्दार बांधुन त्याचे नामकरण करणे. | ‘‘गुरु अर्जुनदेव साहेब गुरुव्दारा प्रवेशव्दार ’’ |
| ७२ | श्री.सरोजिनी एम. टेकचंदानी व श्री.राजेंद्रसिह वी. भुल्लर महाराज | उल्हासनगर–२ मधील प्रभाग क्र.२३ रोहन येथील महान पॅलेस लासी हॉल शापरु हॉल रामा अपार्टमेंट शिवलीला अपा. परिसराचे नामकरण करणे. | ‘‘भाउ हरिराम एम. इसरानी नगर’’ |
| ७३ | सौ.लता शांताराम निकम | उल्हासनगर–४ मधील प्रभाग क्र.६३ मधील डिफैन्स किराणा स्टाअर्स जवळ चौकाचे नामकरण करणे. | सम्रट अशोक चौक |
| ७४ | श्री प्रभुनाथ दुखंती गुप्ता | उल्हासनगर ३ मधील प्रभाग क्रमांक ३२ मधील डॉली क्रिस्टी यांच्या घराजवळ चौकाचे नांमकरण करणे | श्री साई बाबा चौक |
| ७५ | मा.महापौर सौ.राजश्री राजेद्र चौधरी | उल्हासनगर–४ येथील श्रीराम चौक जवळील रस्त्याचे व प्रवेशद्वार बांधून त्याचे नामकरण करणे प्रस्तावित आहे. | स्व.धर्मविर आनंद दिघे साहेब मार्ग<br>स्व.धर्मविर आनंद दिघे साहेब प्रवेशद्वार |

| | | | |
|---|---|---|---|
| ७६ | मा.महापौर सौ.राजश्री राजेद्र चौधरी | उल्हासनगर–३ येथील प्रभाग क्र.१० मध्ये अे.व्हि.नारायण मार्ग शांतीनगर या रस्त्यावरील प्रवेशद्वार बांधून त्याचे नामकरण करणे प्रस्तावित आहे. | श्री सिध्दी विनायक प्रवेशद्वार |
| ७७ | मा.श्री.रमेश चव्हाण | उल्हासनगर–४ येथील स्व.सौ.मिनाताई ठाकरे चौक पासून धर्मवीर संभाजी चौका पर्यंतचे परीसराचे व प्रवेशद्वाराचे नामकरण करणे. | धर्मविर संभाजीनगर<br>धर्मविर संभाजीनगर प्रवेशद्वार |
| ७८ | श्रीम.निलम चांदवानी | उल्हासनगर–४ येथील मुख्य बाजाराचे नामकरण करणे. | श्री बाबासाई बाजार |
| ७९ | सौ.जयश्री सुनिल सुर्वे | उल्हासनगर–४ जिजामाता उद्यानाजवळील उद्यानास नामकरण करणे. | स्व.धर्मविर मा.आनंद दिघे साहेब आजी आजोबा उद्यान |
| ८० | सौ.जयश्री सुनिल सुर्वे | उल्हासनगर–४ येथील बॅरेक क्र.१३२८, हिरा मेन्शस अपार्टमेंट समोरील चौकातील प्रस्तावित घडयाळ टॉवरचे नामकरण करणे. | महाराष्ट्र भूषण डॉ नारायण विष्णु तथा नानासाहेब धर्मधिकारी |
| ८१ | श्री.सुदंर (बाबू) मंगतानी | उल्हासनगर–३ येथील बॅरेक क्र.९४४, रुम नं.४, पोस्ट ऑफीस जवळील रस्त्यास नामकरण करणे. | स्व.एस.एम.पंजवानी मार्ग |
| ८२ | श्री.राजेश वधरीया | प्रभाग क्र.२५ मधील विमल मोबाईल ते स्नेहा अपार्टमेंट हिरा मॅरेज हॉल पर्यंत रस्त्यांस नामकरण | स्व.हिरानंद राजवानी मार्ग |
| ८३ | सौ.सुमन गजानन शेळके | उल्हासनगर–३ येथील प्रभाग क्र.५४ मध्ये वडोल गांवात जाधव किराणा स्टोअर्स समोरील चौकाचे नामकरण करणे | स्व.सुरेश पं.जाधव 'समाजसेवक चौक' |
| ८४ | श्रीम.ज्योति श्याम माने | उल्हासनगर–४ येथील प्र.क्र.५६ मधील सार्वजनिक मित्र मंडळ हनुमान मंदीर ते मंदार अपार्टमेंट मार्गे स्व.शखर भालेराव चौक पर्यंतच्या रस्त्याचे नामकरण करणे. | स्व.किरणताई माने मार्ग |
| ८५ | श्री.भरत आर.गंगोत्री | उल्हासनगर–५ येथील प्र.क्र.६७ मधील स्वामी नारायण पॅलेस भाटीया हॉस्पीटल जवळील चौकाचे नामकरण करणे. | स्व.सेठ देवीचंद वलेचा चौक |
| ८६ | श्री.दिलीप जग्यासी | उल्हासनगर–३ येथील प्र.क्र१४ मधील सोनेसर अपा. समोर ते गणेश हॉपीटल व्हाया सतगुरु अपा. पर्यंतचे परिसराचे नामकरण करणे. | स्व.पदमादेवी चं.इदनानी नगर |

| | | | |
|---|---|---|---|
| ८७ | श्री.सुनिल गंगवानी | उल्हासनगर–३ येथील प्र.क्र१४ मधील रिजन्सी हॉटेल ते साईबाबा सोसायटी व्हाया ग्रीन पार्क सोसायटी पर्यंतचे परिसराचे नामकरण करणे. | मॉ इच्छापुर्ती उषा माताजी नगर |
| ८८ | श्री.अंकुश म्हस्के | उल्हासनगर–३ येथील प्र.क्र१२ मधील ओमकार पान शॉप ते कल्याण अंबरनाथ रस्त्याचे व साईबाबानगर येथील प्रस्तावित प्रवेशद्वाराचे नामकरण करणे. | कै. नीता गावडे मार्ग<br>''श्री साईबाबा नगर प्रवेशद्वार'' |
| ८९ | श्री.राजू (जीवन) इदनानी | उल्हासनगर–३ येथील प्र.क्र.१३मधील आशा सोसायटी ते आशियाना अपार्टमेंट रस्त्याचे नामकरण करणे. | स्व.पमनदास बी.चांदवानी मार्ग |
| ९० | श्री.राजू (जीवन) इदनानी | उल्हासनगर–३ येथील प्र.क्र.१३मधील दाभाडे चौक ते डॉ. आंबेडकर चौक पर्यंतचे रस्त्याचे नामकरण करणे. | स्व.गोविंदराम दनुमल शौकीन मार्ग |
| ९१ | श्री.राजू (जीवन) इदनानी | उल्हासनगर–३ येथील प्र.क्र.१३मधील जेठानंद अपार्टमेंट ते आशा सोसायटी व्हाया मल्हार सोसायटी पर्यंतचे रस्त्याचे नामकरण करणे. | स्व.खुबचंद हुकुमतराय इदनानी मार्ग |
| ९२ | श्री.राजू (जीवन) इदनानी | उल्हासनगर–३ येथील प्र.क्र.१३मधील जगदंबा मंदिर ते कल्याण अंबरनाथ रोड रस्त्याचे परिसराचे नामकरण करणे. | मोहोटा देवी माता मंदिर प्रवेशद्वार |
| ९३ | श्री.राजू (जीवन) इदनानी | उल्हासनगर–३ येथील प्र.क्र.१३मधील तरण तलाव ते कल्याण अंबरनाथ रोड पर्यंत व्हाया जकात नाका रस्त्याचे नामकरण करणे. | स्व.खिमनदास आनंदराम मनुजा मार्ग |
| ९४ | श्री. बच्चाराम रुपचंदानी | उल्हासनगर–४ येथील प्र.क्र.६८ मधील स्वामी त्रिलोकदास उद्यानातील वाचनालयाचे नामकरण करणे. | स्व.भगवंती रुपचंदानी वाचनालय |
| ९५ | महंत बाबा केसरदासजी उदासी | उल्हासनगर–४ येथील सुभाष टेकडी आंबेडकर चौक ते श्री श्रीचंद्र दरबार पर्यंतच्या रस्त्याचे नामकरण करणे. | स्व.बाबा पहिलदास उदासी मार्ग |
| ९६ | महंत बाबा केसरदासजी उदासी | उल्हासनगर–४ येथील ,गुरुद्वारा लाल चक्की येथे प्रवेशद्वार बनवून त्याचे नामकरण करणे. | जगतगुरु श्रीचंद्र भगवान उदासी संप्रदा आचार्य प्रवेशद्वार |
| ९७ | श्री. बच्चाराम रुपचंदानी | उल्हासनगर–५ येथे ब्लॉक ७४५ जवळ बांधलेल्या समाजमंदिराचे नामकरण करणे. | स्व.भगवंती रुपचंदानी समाजमंदिर |

| | | | |
|---|---|---|---|
| ९८ | श्री. प्रशांत धांडे | उल्हासनगर–४ येथे सुभाष टेकडी परिसरात प्रवेशद्वार बनवून त्याचे नामकरण करणे. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर प्रवेशद्वार |
| ९९ | श्री.राजेंद्रसिह वी. भुल्लर | उल्हासनगर–१ येथे प्र.क्र.१५ मधील हॅपी होम बंगल्यामागे वुध्दकृपा इमारतीसमोर प्रस्तावित (तळमजला अधिक दोन) भव्य समाजमंदिराचे नामकरण करणे. | |
| | | संपुर्ण इमारतीस<br>पहिल्या मजल्याचे सभागृहास<br>दुस–या मजल्याचे सभागृहास | स्व.मॉसाहेब मिनाताई ठाकरे भवन<br>स्व.प्रबोधनकार ठाकरे सभागृह<br>स्व.धर्मवीर आनंद दिघे साहेब सभागृह |
| १०० | श्रीम.लता शांताराम निकम | उल्हासनगर–४ येथील प्र.क्र.६३ मधील गुरुनानक शाळेच्या मागे नाना पाटील यांच्या रॅशन दुकानासमोरच्या चौकाचे नामकरण करणे | ''दिवंगत जेष्ठ रिपब्लिकन नेते रमेश इंगळे चौक'' |
| १०१ | श्री.सुदंर (बाबू) मंगतानी | उल्हासनगर–३ येथील प्र.क्र.४६ मधील उल्हासनगर स्टेशन ते नानोमल बिल्डींग ओटी सेक्शन पर्यंतच्या रस्त्याचे नामकरण करणे | स्व. रुखीदेवी असनदास मंगतानी मार्ग |
| १०२ | श्रीम.कविता सिरवाणी | उल्हासनगर–३ येथील नवजीवन बॅक सलामतराव पुरोसवानी भवन ओ.टी. सेक्शन पर्यंतच्या प्रवेशद्वाराचे नामकरण करणे | स्व. शेठ रुपचंद हरचोमल परचानी प्रवेशद्वार |
| १०३ | श्रीम.कविता सिरवाणी | उल्हासनगर–३ येथील शाम सुदर सोसायटी, गणेशनगर समोर ओ.टी. सेक्शनच्या प्रवेशद्वाराचे नामकरण करणे | स्व. शेठ मुरलीधर धरमदास अहुजा प्रवेशद्वार |

उक्त रस्त्याचे/चौकाचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त चौकाला कोणत्याही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे उपरोक्त प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर रस्त्यांना/चौकांना नामकरण करणेस तदर्थ समितीपुढे विचार विनिमय करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**तदर्थ समिती ठराव क्रमांक :२** **दिनांक : १८/१२/२०१०**

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही तदर्थ नामकरण समिती महासभेच्या मंजूरीच्या अधिन राहून यादीत नमुद केलेप्रमाणे एकुण १०३ दर्शविल्याप्रमाणे रस्ते/चौक इत्यादीस नांव देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते मंजुर

महापौर
उल्हासनसगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र: ५८ दिनांक:—२८/१२/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. रमेश चव्हाण

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा अनुक्रमांक ४७, ८५, ९६ व १०१ वगळून प्रस्तावनेत नमुद केलेल्या तदर्थ समितीच्या दिनांक १८/१२/२०१० रोजीच्या ठराव क्र. २ मधील उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील काही रस्ते/चौक व काही सार्वजनिक जागांना सुचविलेली नावे देणे मान्य करीत आहे.

परंतु——

सदर यादीमध्ये आलेले एखादे नाव दुस—यांदा आले असल्याचे किंवा सदर जागेस यापुर्वीच नाव देण्यांत आले आहे असे प्रशासनास आढळून आले तर त्या जागेचे किंवा सार्वजनिक ठिकाणाचे या ठरावाद्वारे नामकरण करण्यांत आलेले नाही असे मानण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ११ :— प्रस्तावाची सूचना

सुभाष टेकडी चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा बदलून तेथे पुर्णाकृती पुतळा उभारण्या बाबत पालिका सदस्या श्रीमती लता शांताराम निकम यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापालिका सचिव :—प्रथम त्यांना त्यांचा प्रस्ताव मांडु दया ना.

यावेळी सदस्या श्रीमती कविता सिरवानी, श्रीमती सुरेखा वेलकर, श्रीमती मंजु पोपटानी, श्रीमती सुजाता रिजवानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

सदस्या श्रीमती लता निकम :—मा. महापौर, उप—महापौर, मा. आयुक्त साहेब, मी जो प्रस्ताव मांडला आहे तो सगळया नगरसेवकांनी, महापौरांनी व सभागृहाने पारीत करावा ही माझी सर्वांना नम्र विनंती आहे धन्यवाद।

सदस्य श्री.बी.बी.मोरे :—सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आमच्या सन्माननिय सदस्या श्रीमती लता निकम महोदया यांनी जो प्रस्ताव मांडला आहे, त्यानुसार सुभाष टेकडी येथे जो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे तो अर्धकृती पुतळा आहे, तर त्यांनी येथे असे मत मांडले आहे की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जो पुतळा आहे तेथे पुर्णाकृती पुतळा बसवावा व त्यांनी तसा प्रस्ताव मांडला आहे. त्यांना आम्ही या दृष्टीकोनातुन सहकार्य देत आहोत की सन्माननिय सदस्यांनी हा प्रस्ताव पारीत करुन तो शासनाकडे पाठवायचा आहे. आणि जर शासनाकडुन त्यास मंजुरी मिळाली तर त्याबाबत कोणीच काही करु शकणार नाही. तर हा प्रस्ताव पारीत करावा ही विनंती.

यावेळी सदस्य श्री. महेश सुखरामानी, श्री. मुकेश तेजी, श्री किशोर जग्यासी, श्री. नरेंद्र राजानी, श्री. रमेश चव्हाण, श्री. रामसागर यादव हे सभागृहातुन बाहेर गेले.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—शासनाच्या चौकटीच्या अधिन राहुन हा प्रस्ताव पारीत करा.

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—मा. महापौरांना अशी विनंती आहे की, हा प्रस्तावास सर्वसंमतीने पारीत करावा.

महापालिका सचिव :—सर्वानुमते पास? ठिक आहे?

काही सदस्य :—पास—पास......

उप महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. ११:— प्रस्तावाची सूचना

सुभाष टेकडी चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा बदलून तेथे पुर्णाकृती पुतळा उभारण्या बाबत पालिका सदस्या श्रीमती लता शांताराम निकम यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

प्रस्तावना

उल्हासनगर—४ येथिल सुभाष टेकडी चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा उभारण्यात आलेला आहे. हा पुतळा २५ वर्षापूर्वी स्थानापन्न करण्यात आलेला आहे. हा चौक डॉ. आंबेडकरांच्या नावानेच ओळखला जातो. आंबेडकरी चळवळीचे हा चौक म्हणजे केंद्र असून, आंबेडकरी जनतेचे ते श्रध्दास्थान आहे. संपूर्ण शहरातील आंबेडकरी जनता याच ठिकाणी येवून नतमस्तक होते. सदर ठिकाणी डॉ. आंबेडकरांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, ही शहरातील समस्त नागरीकांची आग्रही मागणी आहे. डॉ. आंबेडकर पुतळा स्मारक समिती सुध्दा बनविण्यात आलेली आहे. उल्हासनगर महानगरपालिकेने आंबेडकरी जनतेच्या तीव्र भावना लक्षात घेवून सदर कामी पुढाकार घ्यावा, ही अपेक्षा आहे. तरी, सदरच्या विषयावर विचारविनिमय करण्यात येवून अंतिम सकारात्मक निर्णय घेणेसाठी सदरचा अशासकिय प्रस्ताव सादर करीत आहे.

महासभा ठराव क्र: ५९ दिनांक:—२८/१२/२०१०

सुचकाचे नाव :— श्रीमती लता निकम

अनुमोदकाचे नाव :– श्री.बी.बी. मोरे

ही महासभा पालिका सदस्या श्रीमती लता शांताराम निकम यांचा प्रस्ताव विचारात घेता सर्व कायदेशीर प्रक्रियेच्या व शासनाच्या दिशा निर्देशांचे पुर्ततेस अधिन राहून सुभाष टेकडी चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा बदलून तेथे पुर्णाकृती पुतळा उभारण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

उप–महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १२ :– <u>प्रस्तावाची सुचना</u>


मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या शौचालयांचे लाईट व पाणी बिलापोटी येणारा खर्च महापालिकेमार्फत अदा करणे तसेच आवश्यकतेनुसार जंतुनाशके पुरविण्याबाबतची सन्मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे यांची प्रस्तावाची सुचना विचारात घेणे.

---

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>आयुक्त साहेब, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या माध्यमातुन पुर्वी फक्त मुंबईमध्येच कामे व्हायची, मागच्या तीन चार वर्षापासुन या परिसरामध्ये, उपनगरामध्ये किंवा इतर विभागामध्ये कामे सुरु झालेली आहेत. त्यामध्ये जवळपास १०० च्या वर मला वाटते, १६० ठिकाणी शौचालये बांधलेली आहेत आणि त्यांचे देखभालीची कामे सीबीओच्या मार्फत करायची असे एमएमआरडीएचेच मत आहे, शौचालये बांधण्याचे काम एमएमआरडीएचे, सुविधा पुरवायचे काम एमएमआरडीएचे, त्याची देखरेख महापालिकेने करायची आणि सीबीओच्या मार्फत त्याची देखभाल व निगा ठेवायची. त्या स्थानिक लोकांकडुन ५० रुपये, ७० रुपये गोळा करायचे, त्याचे नावच निवासी स्वच्छता गृह आहे. तेथे एक माणुस ठेवायचा, लाईटची व्यवस्था पाण्याची व्यवस्था इतर सर्व जबाबदारी त्या सीबीओने घ्यायची. मुळ संकल्पना आहे या शहराचे व नागरीकांचे आरोग्य चांगले रहावे. पुर्वी महानगरपालिकेच्या माध्यमातुन बांधलेली शौचालयांची महापालिकेच्या अपु–या कर्मचा–या अभावी साफसफाई होत नव्हती. दुरुस्ती वेळेवर होत नव्हती. लोकसंख्या वाढत आहे, जागा कमी, त्यामुळे डबल माळयाची शौचालये बांधली त्याची देखभाल सीबीओ मार्फत केली. परंतु आज समस्या भेडसावत आहे तीच पहिल्यासारखी कारण त्या सीबीओकडे उत्पन्न कमी येत आहे, ६० रुपये, ७० रुपये जरी ठेवले एकतर शौचालय जेथे झोपडपट्टी विभाग आहे तेथे दुर्बल घटक जास्त आहेत ज्यांचे उत्पन्नच २०००/–, २५००/–, ३०००/– असे तुटपुंज आहे. तेथे ही शौचालये बांधली आहेत. आणि त्यांची देखभाल तेथल्याच लोकांवर ठेवली आहे. आणि ५०/–, ६०/– रुपये देवुन सुध्दा खर्च जो आहे तो जास्त आहे आणि उत्पन्न कमी आहे. जर ५००० रुपये उत्पन्न आहे तर खर्च ८००० रुपये होत आहे. त्याठिकाणी तो खर्च परवडत नाही. तर कोठे लाईटचे कनेक्शन कट कर, तर कोठे तेथिल माणूस काम सोडुन निघुन जातो. त्यामुळे पुन्हा रोगराई, दुर्गंधी ही परिस्थती. म्हणजे मुख्य उद्देश एमएमआरडी, महाराष्ट्र शासन व महापालिका एकत्र येणे हाच आहे की तेथिल लोकांना आरोग्य चांगले मिळावे, शौचालय व्यवस्थीत मिळणे परंतु त्यात बाधा येते. शेवटी उल्हासनगर शहरवासियांची जबाबदारी उल्हासनगर महापालिका, शासन व प्रशासन आपल्या दोघांवर आहे. तेथे दुर्गंधी पसरु नये म्हणुन ज्या ज्या उपाययोजना करायच्या आहेत त्या आम्हांस करायच्याच आहेत. परंतु माझी या सभागृहास विनंती आहे की, त्याठिकाणच्या लोकांना अर्थसहाय्य करणे हे आपले काम आहे की जेणेकरुन महाराष्ट्र शासनाचा किंवा महानगरपालिकेचा उद्देश असफल होणार

नाही. म्हणुन दरमहा जवळपास २००० रुपये च्या वर लाईटबिल आणि इतर खर्च त्या सीबीओस देण्यात यावे परंतु अंमलबजावणी व्यवस्थीत ठेवली पाहिजे. एखादया सीबीओने त्याचा गैरउपयोग केला, जर एमएससीबीचे बिल तसेच ठेवले तर ते दुस–या महिन्याला त्यांना देता कामा नये अशा प्रकारचे कडक निर्बंध ठेवले जावेत व पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये याकामी तरतुद ठेवली पाहिजे, तसे केले नाही तर एमएमआरडीएची शौचालये बंद पडतील. लोकांच्या आपआपसात मारामा–या होतील. सीबीओचे जे ट्रस्टी असतात किंवा जी समिती नेमली जाते, १०–११ लोकांची ती बॅकफ्रुट वर जाते ते सही घेत नाहीत पुढे येत नाहीत त्यांना आर्थिक सहाय्य करणे हे आपले काम आहे तरच ते सफल होईल म्हणुन माझी संपुर्ण सभागृहाला विनंती आहे की दरमहा रु. २००० सीबीओच्या नावावर त्यांच्या बॅक खात्यावर त्यांना खर्चविण्यासाठी दयावी. तेथिल लोकांचे वर्गणी व महापालिकेचे अनुदान त्यांना दया अशी मी सर्वांना विनंती करतो. असा माझा प्रस्ताव आहे.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, श्री. बोडारे यांच्या प्रस्तावाशी मी सहमत आहे. माझ्या प्रभागात सुध्दा अशी दोन सुलभ शौचालये आहेत. एक चालु स्थितीत आहे कैलास नगर येथे आहे. ते आता चालत नाही कारण त्यांचे लाईटबिल २५००० रुपये, ३००० रुपये असे येते. तर यांनी सांगितल्या प्रमाणे या लोकांना २००० रुपये अनुदान म्हणुन दिले पाहिजे, हे जर झाले तर चांगले होईल. तरच ती संस्था या शौचालयाची चांगली देखभाल करु शकेल.

यावेळी सदस्य श्री. प्रधान पाटील, श्री. मोहन रामरख्यानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>सन्माननिय महापौरजी, श्री. धनंजय बोडारे यांनी येथे सविस्तरपणे सांगितलेले आहे, पण त्यात सांगण्याचे विशेष म्हणजे मी पुन्हा त्यामध्ये सांगतो की जी झोपडपट्टीतुन, इतर विभागातुन एमएमआरडीएने जी शौचालये बांधली आहेत ती काही रोडलगत नाहीत. रोडलगत नसल्यामुळे त्यांना जेवढी वसुली व्हायला पाहिजे तेवढी होत नाही. कारण झोपडपट्टीचा माणुस तो म्हणतो मी दहा रुपये देईन नाहीतर १५ रुपये देईन, अशी अट आहे. त्यामुळे पैसा वसुल होत नाही. एक मंडळ गेले दुसरे आले तरी तीच परिस्थती आहे. जर हे शौचालय रस्त्यालगत असेल तर तेथे जा–ये करणारे भरपुर लोक असतात तेथे २ रुपये एका माणसामागे जरी लावले तरी पैसा येईल परंतु झोपडपट्टी विभागातुन हे होवु शकत नाही. म्हणुन ही संकल्पना जी आहे ती अयशस्वी होवु नये, यासाठी आम्हां सर्व सन्माननिय सदस्यांचे निवेदन आहे की महापालिकेने त्या संस्थेस आर्थिक मदत दयावी कारण आता लाईटचे बिल वाढलेले आहे, हे वाढल्यामुळे तेथे ३००० रुपये, ४००० रुपये, ५००० रुपये बिल येते. तसेच जो चेक असतो त्यात त्या व्यक्तीचे भागत नाही आणि म्हणुन काही शौचालये उदास होवु लागली असेच आपण ज्यास सामान्य शौचालय म्हणतो तशा स्थितीत होवु लागली आहेत. त्यामुळे दुर्गंधी वाढते ती दुर्गंधी वाढली तर तीच गत होईल, पुर्वीचे जसे महापालिकेचे शौचालय होते त्याप्रमाणे. म्हणुन कृपया आमच्या सन्माननिय सदस्यांने जी सूचना मांडलेली आहे त्यास आम्ही अनुमोदन करतो, सहकार्य देतो, त्याप्रमाणे आम्ही महापालिकेला विनंती करतो.

<u>सदस्य श्री.धनंजय बोडारे :–</u>सन्माननिय सदस्यांनी सहमती दिलेली आहे. सभागृहाने यास मान्यता दिली आहे. अंमलबजावणी करणे तुमची जबाबदारी आहे. प्रशासनाचे मत याविषयी काय आहे, अडचणी काय आहेत? सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता श्री. शिर्के यांनी पहिल्यापासुन ही योजना राबविलेली आहे. खरोखर इतर सर्व सन्माननिय सदस्यांनी नमुद केले ते बरोबर आहे की नाही तर यावर अंमलबजावणी करा. याची अंमलबजावणी केव्हापासुन करणार, म्हणजे पुर्वलक्षी प्रभावाने लोकांना दिले तरी चालेल.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>यामध्ये औषध फवारणीचे सुध्दा टाका.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, जर त्या शौचालयाच्या दरवाज्यांची काही दुरुस्ती वगैरे करायची असेल तर नगरसेवक निधी टाकु शकेल.

<u>सदस्य श्री. गणपत एडके :–</u>मा. महापौरजी, श्री.बोडारे साहेबांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे तो झोपडपट्टीवाशियांचा आणि शहराच्या हिताचा आहे. सर्वांनी त्यास मान्यताही दिलेली आहे. परंतु माझीएक विनंती अशी आहे की, त्वरीत हे काम झाले पाहिजे.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता):—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, निर्मल एमएमआर योजना २००८ साली एमएमआरडीएने हाती घेतली. ही योजना शासन निर्णय ३० ऑगस्ट २००१ त्यावर आधारीत होती. त्यामध्ये शासनाची कॅम्युनिटी टायलेटची जी योजना आहे त्यामध्ये महापालिकेने व शासनाने जी काही शौचालये बांधायची ती स्थानिक सीबीओंना देखभालीसाठी दयायची जेणेकरुन स्थानिक लोकांची एक भावना राहिल की हे आपल्या मालकीचे शौचालय आहे. या भावनेने तो शासन निर्णय काढण्यात आलेला आहे. या शासन निर्णयानुसार महापालिकेने एमएमआरडीएने किंवा शासनाने कुणीही बांधावे परंतु तो स्थानिक सीबीओंना देखभालीसाठी दयावा. माझ्याकडे तो शासन निर्णय आहे. परंतु त्या शासन निर्णयामध्ये एकच अडचण आहे की त्या शासन निर्णयामध्ये तो जो खर्च आहे त्या खर्चासाठी आपण, आता महासभेपुढे हा विषय आलेला आहे परंतु शासनाचे धोरणानुसार की सीबीओकडुन तो खर्च होत नाही.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—शासनाने तो खर्च कमी केले आहे की नाही? मंजुरी किती दिली आहे? शासन आपल्या धोरणानुसार चालते का? महापालिकेचे जे नागरीक आहेत ते तुमचे नागरीक आहेत. तुम्हांला त्यांनी सांगितले का मदत करु नका म्हणुन? शासनाचे मार्गदर्शन आहे का?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता):—शासनाचेंच धोरण तुम्हांला अवगत करुन देत आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—त्यांना सहाय्य करणे हे महापालिकेचे काम आहे. येथे कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे आमचे काम आहे.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता):—माझा उद्‌देश आहे की शासनाचे धोरण आपणांस समजावे. माझा आपल्या प्रस्तावाला विरोध नाही आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आपण १०० टक्के रक्कम भरत नाही, पण ती शासनाची योजना पुढे चालावी यासाठी आपण महापालिकेच्या माध्यमातुन पुढाकार घेत आहोत. उलट शासन आपणांस प्रोत्साहन देईल. आणि हा जो नियम आहे तो संपुर्ण महापालिकेत चालेल. प्रत्येक ठिकाणी ते असणार. उल्हासनगरमधील महापौर, आयुक्तांनी तसा पुढाकार घेवुन शासनाने आखलेली ही योजना पुर्ण करणे ही आपल्या अभिनंदनाची गोष्ट राहिल.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता):—हा जो प्रस्ताव आलेला आहे, याचा ठराव आता पारीत होईल. तो ठराव आपण शासनाकडे पाठवु तसेच आपल्या अर्थसंकल्पात तशी तरतुद करुन घेवु. कारण आजच्या तारखेस या अनुषंगाने आपल्या अर्थसंकल्पात तरतुद नाही आहे. जे काही महापालिकेने खर्च करायचे आहे ते अर्थसंकल्पात तरतुद करुनच करायचे आहे. पुढील, आगामी वर्षात एप्रिलच्या अर्थसंकल्पात तशी तरतुद करु. आणि शासनाकडे तसा प्रस्ताव पाठवुन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करु.

काही सदस्य :—चालेल, चालेल.

महापालिका सचिव :—शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहुन काय?

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—शासनाच्या मंजुरीची काय गरज आहे याला? ठराव पाठवुन दया ना? शासनाची म्हणजे आस्थापना सुची तुमची मंजुर झाली आहे का? शासनाच्या मंजुरीची वाट बघत बसलो तर १० वर्ष जातील.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—श्री. शिर्के साहेबांनी जसे सांगितले की, आपण ठराव पारीत करु. पुढील अर्थसंकल्पात तरतुद करु नंतर शासनाकडे मंजुरीसाठी पाठवु.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—सचिव साहेब, हा ठराव पास करा. अर्थसंकल्पात तशी तरतुद करु आणि त्या पध्दतीने महापालिका तशी मदत करेल.

महापालिका सचिव :—म्हणजे १ एप्रिल पासुन लागु करणार?

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—१ जानेवारीपासुन करा ना?

महापालिका सचिव:—आता अर्थसंकल्पात तशी तरतुद नाही ना?

सदस्य श्री.बी.बी. मोरे:—ठिक आहे, ते चालेल.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आयुक्त साहेब, सप्टेंबर, ऑक्टोंबर, नोव्हेंबर महिन्यामध्ये आपण सुधारीत अर्थसंकल्प तयार करतो अजुनही तुम्ही सुधारीत अर्थसंकल्प आणलेला नाही.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—कोठे आहे सुधारीत अर्थसंकल्प?

सदस्य श्री. धनंजय बोडारे:— सुधाारीत अर्थसंकल्पात घ्या ना हा विषय?

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—होय.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आपण किती पैसे खर्च करत आहोत? श्री. जैन साहेब काय हो? हा सर्वाचा विषय आहे. हा विषय तुम्ही घेवु शकता मग याबाबत नकारात्मक भुमिका का?

श्री. विजयकुमार म्हसाळ(उप—आयुक्त, मुख्यालय तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—नाही, लेखाशिर्ष जर अस्तित्वात असेल तर आपण समायोजन करतो (रिॲप्रुप्रीएशन) करतो, लेखा शिर्ष या संबंधी नसेल तर नविन लेखा शिर्ष टाकण्याची रिअप्रोव्हिशन अर्थसकल्पात तरतुद नाही.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—मानसिकता ठेवा म्हणजे बरोबर रिॲप्रुप्रिंएशन करता येईल. कुठे करायचे ते बरोबर कळते, मानसिकता पाहिजे त्या दृष्टीकोनातुन तुम्ही विचार केला तर नक्कीच रस्ता सापडेल, विचारच केला तर नक्कीच रस्ता सापडेल.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—विचार केलाच पाहिजे.

श्री. प्रविणकुमार जैन (मुख्य लेखा अधिकारी ):—मा. महापौर महोदया, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, एमएमआरडीए अंतर्गतची जी शौचालये आहेत त्याबद्दल ज्या सूचना आलेल्या आहेत, लाईटबिल, जंतुनाशके वगैरे यांची देयके दयायची महानगरपालिकेने देखभाल करावी हा थोडक्यात विषय आहे. श्री. शिर्के साहेबांनी म्हटल्याप्रमाणे नविन वित्तीय वर्षात १ एप्रिल पासुन आपण त्याची तरतुद करावी ही भावना शक्य होवुन नविन अर्थसंकल्पात त्याची तरतुद करु. रिॲप्रुप्रिंएशनमध्ये जानेवारी महिन्यामध्ये स्थायी समितीसमोर आपला सुधारीत अर्थसंकल्प जाईल तसेच २० फेब्रुवारीला महासभेत अर्थसंकल्प मंजुर होणे आवश्यक आहे. तोपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाने वर्षभरात अंदाजित किती खर्च होईल आणि येणा—या तीन महिन्यात किती खर्च होईल हे जर आम्हांला कळविले तर आम्ही त्याप्रमाणे एमएमआरडीएच्या अंतर्गत येणा—या शौचालयांसाठी विदयुत बिलासाठी अर्थसंकल्प तरतुद करु, तशी बिले आपण तयार करा.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—मी सांगतो साधारणत: किती शिट आहेत? १६३ गुणीले २ याप्रमाणे एक महिन्याचे. मी सांगतो ना, १६० ते १६३ ठिकाणे आहेत २००० रुपये प्रत्येकी किती होतात. त्याप्रमाणे तुम्हांला तरतुद करायची आहे.

श्री. प्रविणकुमार जैन (मुख्य लेखा अधिकारी ):—त्याप्रमाणे तरतुद करायची आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—विशेष नाही.

यावेळी सदस्य श्री. प्रशांत धांडे, श्री. राजेश  वानखेडे, श्री. मोहन साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**<u>महापालिका सचिव :–</u>**कधी पासुन लागु होणार? १ एप्रिल २०११ पासुन? की आधी? १ जानेवारी? तसे ठरवावे लागेल ना? आपले मत पाहिजे. ठिक आहे पास?

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास……

**<u>उप महापौर :–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १२:– <u>प्रस्तावाची सुचना</u>**

मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या शौचालयांचे लाईट व पाणी बिलापोटी येणारा खर्च महापालिकेमार्फत अदा करणे तसेच आवश्यकतेनुसार जंतुनाशके पुरविण्याबाबतची सन्मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे यांची प्रस्तावाची सुचना विचारात घेणे.

**<u>प्रस्तावना</u>**

दिनांक १७ ऑक्टोंबर २०१० रोजीच्या महासभेमध्ये लक्षवेधी सूचनेद्वारे सूचीत करण्यात आले होते की, उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमध्ये मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून निवासी/वस्ती/सुलभ शौचालये बांधणेची मोहिम राबविणेत आली असून पुर्णत्वास आलेली शौचालये/स्वच्छतागृहे ही स्थानिक लोकांच्या सहभागातून, सेवाभावी संस्था (सीबीओ) मार्फत देखभाल व दुरुस्ती करणेचे प्रयोजन किंवा संकल्पना मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत ठरविण्यात आली. तशी सुरुवातही करण्यात आली. परंतू प्रत्यक्षात मात्र त्यांची अंमलबजावणी करतांना ब–याच प्रकारच्या अडचणी निर्माण झाल्याने महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून राबवविणेत येणारा हा प्रकल्प अपयशी ठरत असल्याचे निदर्शनास येत आहे. याचे मुख्य कारण असे की, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाने शौचालयांचे बांधकामावर करोडो रुपये खर्च केले व देखभाल ही स्थानिक लोकांच्या सहभागातून, वर्गणीतून सेवाभावी संस्था (सीबीओ) मार्फत करावी असे ठरल्याने, लोकवर्गणीतून लाईट बिल, पाणी बिल, साफसफाईसाठी २४ तास त्याच ठिकाणी राहणारा सफाई कर्मचारी याचे वेतन, जंतूनाशके, स्वच्छतेसाठी फिनेलचा खर्च नागरीकांनीच करावा. ज्यामुळे विभागाचा परिसर स्वच्छ राहिल. शौचालयातून दुर्गंधी होणार नाही. साथीचे आजार होणार नाहीत. अशी चांगली भुमीका असतांना त्यांचा परिणाम उलटा विपरीत झालेला दिसतो. कारण मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणांचे माध्यमातून बांधण्यात आलेली शौचालये ही मुख्यत्वे करुन झोपडपट्टयातून बांधलेली असून सदर ठिकाणी गोरगरीब, आर्थिकदृष्टया कमकुवत, नागरीक राहत असल्याने त्यांचेकडून घरटी ६० ते ७० रुपये वर्गणी रुपाने घेतले तरी अनेक ठिकाणी दरमहा अंदाजे रुपये ५०००/– एवढीच वर्गणी जमा होत आहे. व प्रत्यक्षात लाईट, पाणी बिल, वेतन व इतर खर्च दुप्पट होत असल्याने उत्पन्न कमी व खर्च जास्त अशी विचीत्र परिस्थिती निर्माण होत असल्याने असल्याने स्थानिक नागरीकांत वादविवाद, असंतोष निर्माण होत आहे. विदयुत देयक न भरल्याने लाईट कट झाल्याने शौचालयात अंधार आहे. शौचालयात पाणी नसल्याने व सफाई कामगारास वेतन मिळणेची आशा धूसर झाल्याने ते काम करणेस तयार नसल्याने शौचालयात अस्वच्छता, दुर्गंधी व घाण आहे. यामुळे रोगराई होणेची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून लोकवर्गणी व त्याला आधार म्हणून शौचालयांची लाईट व पाणी बिले महापालिकेने भरल्यास नागरीकांना सुविधा मिळेल. शासकिय योजना यशस्वी होईल.

तरी या प्रस्तावाद्वारे सुचित करण्यात येते की, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणांचे माध्यमातून बांधण्यात आलेल्या व लोकवर्गणीतून देखभाल व दुरुस्ती करण्यात येत असलेल्या सर्व शौचालयांचे लाईट व पाणी बिलापोटी येणारा खर्च (देयके) महानगरपालिकेमार्फत अदा करणेत यावा. तसेच आवश्यकतेनुसार जंतूनाशके पुरविणेत यावीत.

**<u>महासभा ठराव क्र:</u>** ६० **<u>दिनांक:–२८/१२/२०१०</u>**

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी

ही महासभा पालिका सदस्य श्री. धनंजय बोडारे यांचा प्रस्ताव विचारात घेता मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या शौचालयांचे लाईट व पाणी बिलापोटी येणारा खर्च प्रति महा रुपये २००० पर्यंत १ जानेवारी २०११ पासून सेवाभावी संस्थेस किंवा प्राधिकृत कामगारांना प्रतिपुर्ती करणे तसेच आवश्यकतेनुसार जंतुनाशके पुरविण्यास मान्यता देत आहे.

परंतु––

मागील महिन्याचे पाणी व विद्युत देयकाची रक्कम भरल्याचा किंवा अदा केल्याचा पुरावा दिल्याशिवाय पूढील महिन्याच्या खर्चाची प्रतिपुर्ती अदा करता कामा नये.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

उप–महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

आयत्या वेळचा विषय :–

**विषय क्र. १३ :–''जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत'' पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेवर विशेष मोहिम राबविणे प्रयोजनार्थ प्रशासनाने सुचविलेल्या अटी, शर्ती व निर्बंधांवर नविन नळ जोडणी देणेस व दर निश्चितीस मान्यता देणे.**

---

सदस्य श्री. धनंजय बोडारे:–मा. महापौरजी, आयुक्त साहेब, जेएनएनयुआरएम अंतर्गत आपले पाण्याचे नळाचे काम चालुच आहे, प्रत्येकाला मिटरद्वारेच पाणी पुरवठा करायचा आहे. पुर्वीसारखे हे चालणार नाही. याठिकाणी ज्यांचे कनेक्शन मंजुर आहे त्यांच्याकडुन एकही पैसा न घेता, ते कनेक्शन घरगुती असु दे, बिगर घरगुती असु दे, व्यापारी असु दे. पण ज्यांचे कनेक्शन मंजुर नाही मग ती एमजेपीच्या काळातील असतील किंवा महानगरपालिकेच्या काळातील असतील किंवा नगरपालिकेच्या काळातील असतील त्यांना मंजुर करण्यासाठी प्रशासनाने प्रस्ताव आणलेला आहे, यामध्ये मी एक सुधारणा सांगतो की जे घरगुती १५ मिलिमिटरची कनेक्यशन आहेत, त्यासाठी २१०० रुपये इतर काही खर्च तुम्ही सांगितलेला आहे. तर इतर खर्च आपणांस लागणार नाही. कारण महापालिकेची जी योजना चालु आहे त्यामध्ये खड्डा किंवा रोड प्रोसेसींग हे येणारच नाही. कारण संबंधीत ठेकेदार आहे तोच खर्च करणार आहे त्यामुळे कमीत कमी खर्च केला तर सर्व लोक नळ जोडणी घेतील त्यासाठी माझी एक सूचना आहे, श्री. मोरे साहेब, १५०० रुपये साधारणत: घरगुती कनेक्शनसाठी ठेवल्यास अगदी झोपडपट्टीतील लोकसुध्दा यांस प्रतिसाद देतील आणि एकही बेकायदेशीर कनेक्शन होणार नाही. किंवा जे झालेले असतील ते कायदेशीर होतील त्यासाठी घरगुती लोकांसाठी १५०० असा दर असेल. खड्डा, लायसन्स वगैरे काही असेल लायसन्स प्लंबर वगैरे त्याची काही अट नाही. कारण कनेक्शन करुन तो ठेकेदारच देणार आहे. तर १५०० रुपयामध्ये घरपोच कनेक्शन अशा प्रकारचा या ठरावात बदल करावा धन्यवाद।

महापालिका सचिव :–आपली एकच सुधारणा आहे ना? घरगुती वापरासाठी १५०० रुपये सर्व धरुन? ठिक आहे? पास?

काही सदस्य :–पास–पास......

उप महापौर :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १३:– ''जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत'' पाणी**

पुरवठा वितरण व्यवस्थेवर विशेष मोहिम राबविणे प्रयोजनार्थ

प्रशासनाने सुचविलेल्या अटी, शर्ती व निर्बंधांवर नविन नळ जोडणी देणेस व दर निश्चितीस मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमध्ये सध्या **''जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत'' पाणी पुरवठा वितरण व्यवस्था** व उंच जलकुंभ नव्याने बांधण्याचे काम सुरु असुन, सदरची योजना **डिसेंबर २०११** पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

सदरच्या योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर अस्तित्वातील वितरण व्यवस्थेमधील जमिनीखाली होणारी पाण्याची गळती बंद होऊन अंदाजे ३० ते ४० टक्के पाण्याची बचत होणार आहे. शहरातील ग्राहकांना महानगरपालिकेमार्फत जलमापकासह नवीन नळजोडण्या देणे प्रस्तावित करण्यात आले आहे. त्या अंतर्गत मंजुर नळजोडण्यांनाच महानगरपालिकेमार्फत नवीन नळजोडणी देण्यात येणार आहे. अवैध नळजोडण्या नवीन वितरण वाहिन्यांवर स्थलांतरीत केल्या जाणार नाहीत. मात्र जे नागरीक नळजोडण्यांना रितसर मंजुरी घेतील अशा सर्व नळजोडण्या महानगरपालिकेमार्फत जोडणी करुन देण्यात येणार आहेत.

नवीन नळजोडणी मंजुर करण्याकरीता विशेष मोहिम राबविल्यास भांडवली खर्च व पाणी बिलाचे नियोजन, पाण्याची होणारी चोरी रोखणे ही उद्दीष्टे साध्य होऊ शकतील त्या दृष्टीने नवीन नळजोडणी व अस्तित्वातील मंजुर नळजोडण्या नव्याने टाकलेल्या वितरण वाहिन्यांवर जलमापकासह नळजोडणी महानगरपालिकेमार्फत देणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

उल्हासनगर नगरपालिकेची स्थापना सन १९६० साली झाली व सन १९९६ मध्ये तिचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर झाले. शहरातील ग्राहकांना पाणी पुरवठा विभागामार्फत मार्च २००० पर्यंत पाणी वापरानुसार देयक देण्यात येत होते. मात्र एप्रिल २००० पासुन घरपट्टी बरोबर सरासरी पद्धतीने घराच्या बांधकामाच्या प्रकारानुसार घरगुती पाणी बिलाची आकारणी करणेत येत आहे. या प्रकारात एकच मालमत्ता कर पावती असल्याने एकाच कुटूंबाचे सरासरी पाणी देयक वसुल होते. त्यामुळे पाण्याचा विना मोजमाप जास्त वापर होत असल्याने होणा—या पाणी पुरवठयाचे व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून येणा—या पाण्याचे व्यवस्थित नियोजन व मोजमाप करुन समतोल राखणे शक्य होत नाही. म्हणुन नागकरिकांना स्वत:च्या आवश्यकतेनुसार व पाणी वापरानुसार देयक अदा करणे शक्य व्हावे या उद्देशाने महानगरपालिकेमार्फत जलमापकासह घरगुती व बिगर घरगुती नळजोडणी या योजनेअंतर्गत देणे खालील प्रमाणे प्रस्तावित करणेत आले आहे.

**स्वतंत्र घर अथवा इमारत यांना नळजोडणी देणेबाबतचा सुधारीत प्रस्ताव:—**

| अ.क्र. | स्वतंत्र घर अथवा इमारती मधील सदनिकांची संख्या | नळजोडणीचा आकार मि.मि. | नळजोडणीची संख्या |
|---|---|---|---|
| १ | १ ते ४ सदनिका | १५ मि.मी. (१/२") | १ नग |
| २ | ५ ते ८ सदनिका | २० मि.मी. (३/४") | १ नग |
| ३ | ९ ते १६ सदनिका | २५ मि.मी. (१") | १ नग |
| ४ | १६ ते ३२ सदनिका | २५ मि.मी. (१") | २ नग |
| ५ | ३३ सदनिका व पुढील वाढीव १० सदनिका | २५ मि.मी. (१") अधिक | २ नग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २० मि.मी. (३/४") | १ नग |

**"जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत'' नवीन नळजोडणी मंजुरीकरीता विशेष मोहिम :—**

सध्या नवीन नळजोडणी घेण्यासाठीच्या प्रचलित दरामध्ये नळजोडणीसाठी लागणारे साहित्याचा खर्च ग्राहकांस करावा लागतो. आता नवीन "जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत '' योजनेचे काम चालू आहे. त्यामुळे नवीन नळजोडणी देतांना विशेष योजने अंतर्गत जोडणी साहित्य व जलमापकासह देण्याचे प्रस्तावित आहे.

सदर मोहिमेमध्ये सहभागी होण्याची अंतिम मुदत दि. ३१/०३/२०११ अशी प्रस्तावित आहे.

विशेष मोहिमे अंतर्गत नवीन नळजोडणी करणे किंवा खंडीत करण्यात आलेल्या नळजोडणीची पुनजोडणी करणे यासाठी खालीलप्रमाणे सध्याचे प्रचलित शुल्क आकारणे प्रस्तावित करणेत आले आहे.

| अ.क्र. | आकार | घरगुती वापरासाठी दर | बिगर घरगुती वापरासाठी दर | सार्वजनिक संस्था व सरकारी संस्था दर |
|---|---|---|---|---|
| १ | मि.मि. | १५०० | ५१०० | ३१०० |
| २ | ० मि.मि. | २९०० | ७१५० | ४७५० |
| ३ | ५ मि.मि. | ४२०० | ११२०० | ६४०० |
| ४ | ० मि.मि. | ८८०० | २१३०० | १३३०० |
| ६ | ० मि.मि. | १०५०० | ३१५०० | १७५०० |

तसेच अस्तित्वात असलेल्या ग्राहकांना जुन्या जलवाहिनीवरुन नवीन जलवाहिनीवर विनामुल्य नळजोडणी बदलणे, विनामुल्य जलमापक बसविणे, नावात बदल करणे तसेच अस्तित्वातील नळजोडणी कायमस्वरुपी खंडीत करणे असल्यास त्यांनी *विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह या विशेष माहिमे अंतर्गत दि. ३१/०३/२०११ पूर्वी सादर करावा असे प्रस्तावित करण्यात येत आहे.*

## नवीन नळजोडणी करतांना नळधारकांनी पाळावयाच्या अटी व शर्ती

१) नळजोडणी मंजुरीची अंतिम मुदत दि. ३१/०३/२०११ अशी प्रस्तावित आहे. त्यानंतर प्रचलीत दराने शुल्क आकारण्यात येईल व नळजोडणी साहित्य, जलमापक व जोडणी खर्च ग्राहकांस स्वत:ला करावा लागेल.

२) इमारतीच्या सदनिकांमध्ये घेतलेली वैयक्तिक नळजोडणी कायम स्वरूपी खंडीत करून फक्त सामुहीक वापर तत्वावर जमिनीखालील साठवण टाकीमध्ये नळजोडणी देण्यात येईल. खंडीत करण्यात आलेल्या नळजोडण्यांची अनामत रक्कम मागणी केल्यानंतर ग्राहकांस आवश्यक बाबींचीं पूर्तता केल्यानंतर परत करण्यात येईल.

३) फक्त महापालिका क्षेत्रातील नळजोडण्या या योजने अंतर्गत देण्यात येतील. त्याकरीता घरपट्टीची अद्ययावत भरणा केलेली पावती सादर करणे बंधनकारक असेल.

४) जुनी पाणीपट्टी थकबाकी (मार्च २००० पूर्वीची) असल्यास ग्राहकाने ती भरणे आवश्यक आहे.

५) घरगुती नळजोडणीचा वापर काही प्रमाणात बिगर घरगुती मिळकतीमध्ये आढळल्यास त्यावर बिगर घरगुती दराने आकारणी करण्यात येईल.

६) जलमापक नादुरुस्त झाल्यास/चोरीस गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ग्राहकांची राहील. त्याकरीता येणारा सर्व खर्च ग्राहकास सोसावा लागेल.

**जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत'' योजनेतील वितरण व्यवस्थेवर विशेष मोहिमे अंतर्गत नवीन नळजोडणी मंजुरीची दर निश्चिती करणेबाबतचा प्रस्तावास मा. महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे त्या अनुषंगाने सदर प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेसाठी सादर करणेत येत आहे.**

महासभा ठराव क्र: ६१ दिनांक:—२८/१२/२०१०

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे ''जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत'' विशेष मोहिम राबविणे प्रयोजनार्थ पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेवर प्रशासनाने सुचविलेल्या अटी, शर्ती व निर्बंधांवर दर निश्चितीस व नविन नळ जोडणी देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.५७ वाजता महापौर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका